प्रथमावृत्तीचें मुखपृष्ठ

काव्येतिहास--संग्रह

[३१]

ऐतिहासिक पत्रें यादी वगैरे

[हे ५०१ लेख]

अर्थद्योतक व इतर माहितींच्या टीपांसह

काशीनाथ नारायण साने, बी. ए. (डेक्कन कॉलेज)

यांणीं प्रकाशित केले

शालिवाहन शके १८११

श्री

महाराष्ट्राच्या भाषेचा व इतिहासाचा

आस्थापूर्वक आभ्यास करूं

इच्छिणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

परम प्रेमपूर्वक अर्पण करितों.

–ग्रंथ–प्रकाशक (का० सं०)

प्रस्तावना



इतिहासाचीं अत्यंत विश्वसनीय साधनें म्हणजे निरनिराळ्या घडामोडींत व राजकारणांत भाग घेणाऱ्या पुरुषांचीं पत्रें, तहनामे [illegible] खासगी लेख होत. असलीं कागदपत्रें छापून खऱ्या इतिहासाच [illegible] डांत आणण्याचें श्रेय ज्या गृहस्थांना दिलें पाहिजे त्यांपैकीं [illegible] साने*, राजवाडे, खरे, पारसनीस, मोडक वगैरे प्रमुख आहेत. [illegible] नवीन भांडार ह' ज आपणांस उपलब्ध झालें आहे त्याचें [illegible] थोर पुरुषांनाच दिलें पाहिजे.

लो.टिळक ग्रंथसंग्रहालय,वाई.
003790

हल्लींचा ग्रंथ "पत्रें व यादी" हा कै. साने यांनीं "काव्येतिहाससंग्रह" या मासिक पुस्तकाच्या ऐतिहासिक भागांतून प्रथम छापून मग शके १८११ (इ. स. १८८९) मध्यें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला. काव्येतिहाससंग्रह हें मासिक इ. स. १८७८ च्या जानेवारीपासून कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, जनार्दन बाळाजी मोडक व रा. ब. साने या त्रिवर्गानें सुरू केलें. त्याचे तीन भाग होते. एक संस्कृत कविता, दुसरा मराठी कविता व तिसरा मराठी इतिहास. वरील तिन्ही भाग तिघांनीं वांटून घेऊन बरेंचसें उपयुक्त वाङ्मय प्रसिद्ध केलें. मासिकाची पृष्ठें दरमहा ४८ असून वर्गणी वार्षिक ५ रु. होती. निबंधमालेच्या ४९ व्या अंकांत या मासिकाचा शास्त्रीबोवांनीं पुरस्कार करून एक मोठा विस्तृत निबंध लिहिला. "पत्रेंयादी" शिवाय या ऐतिहासिक भागांतून अनेक बखरी, कैफियती व चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत व त्यांपैकीं बरींच पुस्तकरूपानें कायम राहिलीं आहेत. त्यांची यादी "मराठ्यांच्या इतिहासाचें साहित्य" यांत दिली आहे.

हें उपयुक्त मासिक इ. स. १८७८ पासून १८८९ पर्यंत चालून बंद पडलें. रा. ब. साने यांनीं निरनिराळ्या ठिकाणांहून मोठ्या परिश्रमानें हीं जुनें कागदपत्रें मिळवून व तीं वाचून, त्यावर अपरिचित शब्दांच्या व संदर्भविषयक टीपा देऊन छापलीं. त्याचीच ही पुनरावृत्ति आहे. साने यांच्या पूर्वतयारीमुळेंच वरील ग्रंथ वाचकांना समजण्यास सुलभ झाला आहे. नाहीं तर अनेक व्यक्तींची स्मृतिहि आज राहिली नसती.

"पत्रें, यादी" हें पुस्तक कांहीं वर्षांपासून दुर्मीळ झालें असल्यामुळें आतां उपलब्ध नाहीं. हल्लीं मराठ्यांच्या इतिहासाची बरीचशी दुसरी सामुग्री उपलब्ध झाली आहे. व चिकित्सक अभ्यासकांची संख्याहि दिवसेंदिवस वाढत आहे. अशा वेळीं या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाची आवश्यकता आम्हांस वाटूं लागली. परंतु अशा पुस्तकांचा खप कमी असल्यामुळें कोणीहि मुद्रक व प्रकाशक आपखुषीनें हें काम हातीं घेईल असें वाटेना. शेवटीं चित्र-

---

* रा. ब. साने यांचें त्रोटक चरित्र चित्रमयजगत्, जुलै १९२३ व "मराठी भाषेचे व्याकरणकार मोने" यांनीं पृ. २३५ यांत दिलें आहे.

शाळा प्रेसचे मालक रा. रा. वासुदेवराव जोशी यांनीं आमच्या विनंतीवरून हें काम पतरिलें. कै. साने यांचे चिरंजीवांनींहि पुनर्मुद्रणास परवानगी दिली.

पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणें या कागदपत्रांचा कालानुक्रम साधण्याचा प्रयत्न केला नव्हता, व त्यांचीं कारणेंहि तशींच अपरिहार्य होतीं. हल्लीं कामाची मर्यादा बांधतां आल्यामुळें सर्व कागदपत्रांच्या तारखा शोधून व जेथें नाहींत त्या आंतील मजकुराच्या संदर्भानें ठरवून अनुक्रम लाविला आहे. जेथें मूळांत तारीख मिती नाहीं अशा कांहीं पत्रांच्या हल्लीं दिलेल्या तारखा कदाचित् चुकल्या असण्याचा संभव आहे, परंतु शक्य तितकी काळजी घेतली आहे. काल कसा ठरविला हें बहुतेक ठिकाणीं टीपेंत दर्शाविलें आहे त्यामुळें पडताळा पाहण्यास सोईचें होईल.

पूर्वीचे आवृत्तींत मूळांतील अक्षरें न लागल्यामुळें जशीं समजलीं तशीं अक्षरें देऊन संशय प्रगट केला आहे. अशा स्थळांपैकीं पुष्कळ ठिकाणीं तर्कानें मूळांत शुद्ध अक्षरें कोणतीं असावींत तें संदर्भावरून व मोडी वाचनाच्या संभाव्य चुकांवरून ठरवून दुरुस्ती केली आहे. आणखीहि दुरुस्ती करतां येणें शक्य आहे. परंतु मूळ कागद हल्लीं पहाण्यास मिळण्यासारखे नसल्यामुळें सर्वच दुरुस्त्या करितां आल्या नाहींत.

कठीण शब्दांचा कोश शेवटीं निराळा दिल्यामुळें अर्थाच्या टीपा मजकुराच्या खालीं आल्या नाहींत. फक्त महत्त्वाच्या व सदंर्भदर्शक टीपाच काय त्या मजकुराखालीं आल्या आहेत व टीपांची संख्या कमी झाली आहे. तेच तेच कठीण शब्द पुनः पुनः आल्यामुळें या नवीन पद्धतीनें पुनरावृत्ति टाळतां आली आहे.

दुसऱ्या कागदपत्रांशीं अगर ग्रंथांशीं संबंध दाखविणाऱ्या टीपा देण्याचा प्रथमपविचार होता, परंतु असें करणें फारच त्रासाचें झालें असतें, त्यामुळें ग्रंथाच्या प्रकाशनास उशीर लागला असाता. शिवाय हल्लीं सर्व साधनांचा उपयोग करून लिहिलेले इतिहासग्रंथ प्रसिद्ध झाले असून त्यांतच "पत्रें व यादी" या ग्रंथाचाहि उपयोग केलेला असल्यामुळें तो विषय काढतांच सर्व संबद्ध साधनांचा उल्लेख एके जागीं मिळण्याची सोय झाली आहे. यामुळेंहि वरील गोष्ट अनवश्यक वाटली.

या ग्रंथांतील काहीं कागदपत्रें फार महत्वाचीं व कांहीं कमी महत्वाचीं आहेत. त्यांची निवड करून फक्त महत्वाचेच कागद पुनः छापावे असेंहि एकदां वाटलें, परंतु यांतहि एक अडचण अशी होती कीं, एकास जें पत्र निरुपयोगी वाटेल तेंच दुसऱ्यास उपयोगी असें वाटण्याचा संभव आहे. सबब सर्वच पत्रें छापून त्यांची चिकित्सा करण्याचें काम वाचकांवर सोपविलें आहे.

या पुस्तकाच्या गुणदोषांविषयीं प्रकाशक जबाबदार नाहींत. तें काम पूर्णपणें संपादकांचें आहे. शक्य ती काळजी घेऊनहि या पुस्तकांत पुष्कळ दोष राहिले असतील. परंतु त्यांबद्दल वाचक आम्हांस क्षमा करतील अशी आशा आहे.

"पत्रें यादीं"तील ऐतिहासिक मजकुरासंबंधीं कै. राजवाडे व खरे यांच्या खंडांच्या प्रस्तावनेप्रमाणें सारांशरूपानें दिग्दर्शन पुढें केलें आहे. ग्रंथांतील सर्वच पत्रें एकमेकांशीं

संबद्ध नाहींत. व मधील पुष्कळ भाग गळलेला आहे. परंतु ज्यांना सर्वच ग्रंथ वाचण्याची सवड अगर इच्छा नाहीं, त्यांना साधारण कल्पना येण्यास पुढील मजकुराचा उपयोग होईल.

या ग्रंथांत शिवपूर्वकालीन लेख फारसे नाहींत. ले. ६ मध्यें शहाजीची कैफियत दिली आहे, तींत शिवपूर्वकालीन मजकूर बराचसा आहे व शहाजीच्या वेळच्या प्रसिद्ध व्यक्तींचा बराचसा निर्देश आहे. बाकीचे सर्व लेख शिवकालीन व उत्तरकालीन आहेत. ले. १४, १८, १९, २०, ३१ हे लेख कोल्हापुरकर संभाजी व शाहूराजे यांमधील तहाचे आहेत. त्यांनीं उभयतांच्या मुलखाच्या हद्दी निश्चित केल्या आहेत. ले. २६ हा डच वखारीवाल्याशीं संभाजी कोल्हापुरकर यानें केलेल्या तहाचा आहे. ले. २७ हें भोपाळजवळ बाजीराव पेशव्यानें निजामुल्मुल्कास अडवून त्याचा मोड केला, त्यावेळचें खुद्द बाजीरावानें ब्रम्हेंद्रस्वामीस लिहिलेलें पत्र आहे.

ले. २९, ३०, ३१, ३२, ३३ हे चिमाजी आपानें वसई घेतल्याबद्दलचे आहेत. वसई घेणें किती दुरापास्त होतें व त्या विजयाचें महत्व मराठ्यांस किती वाटलें हें चिमाजी आपाच्या पत्रावरून दिसतें. या वेढ्याचें बरेंच तपशीलवार वर्णन ले. ३१ मध्यें आहे. " फिरंगी यांनीं तों हिंमतीची व मर्दुमीची सीमा केली, " " फिरंगियांसारखे झुंजणार, " " टोपकर अग्निरूप होत. " या उद्गारांवरून उभयपक्षांच्या पराक्रमाची कल्पना येते.

बाजीराव व नानासाहेब यांच्या मागें पैशाची ओढ किती असे याची कल्पना येण्याजोगीं स्थळें पुष्कळ आहेत. पेशव्यांच्या मागें सर्व राज्याची काळजी; परंतु इतरांना त्याची कांहींच फिकीर नसे. प्रांतांचे सुभेदार, सरदार, कमाबीसदार वसूल वेळच्या वेळीं पाठवीत नसत व कित्येक तर अगदींच डोईजड असत. नागपूरकर भोसले यांनीं पेशव्यांस कधींच मनापासून मदत केली नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील कमावीसदारहि निरनिराळ्या सबबी सांगून वेळ मारून नेत, (ले. १४८, १४९, १५८) त्यामुळें बाजीरावासारख्या पराक्रमी पुरुषासहि सावकारांची मनधरणी करावी लागे. ब्रम्हेंद्रस्वामी व कायगांवकर दीक्षित यांची कांहींशी गुरु म्हणून तर बऱ्याच अंशीं सावकार म्हणून खुशामत करावी लागे, व तेहि या परिस्थितीचा फायदा घेत असत. बाजीरावाचा मृत्यु होतांच दीक्षितांनीं रकमेचा तगादा लावला व पुढें दुहोत्रा ब्याज घेऊं म्हणून सांगितलें, त्यावर चिमाजी आपा व नानासाहेबांना "दुहोत्राचा करार करावा असें काय आहे !" असें लिहून कांहीं रकम दिली (ले. ३६-३७) तसेंच सदाशिवरावानें ब्रम्हेंद्रस्वामीस " स्वामींनीं पैकियाविषयीं चार महिने कृपा करावी " असें म्हणून स्वामीस थांबविलें (ले. ४२).

ले. ४९, ९२, १४४, १६६, १८६, १८९, १९५ वरूनहि पैशाच्या अडचणींची कल्पना येईल. ले. १२७ यांत तर राज्यास हा कर्जाचा क्षयरोग लागला आहे असें म्हटलें आहे. बंगालचे मोहिमेवरून पैसा आणावा (ले. १६६), दिल्लीची वजीरी दुसऱ्यांस देऊन पैसा मिळवून कर्ज वारावें (ले. १६७), वगैरे मनसुबे केले पण कर्जाची ओढ मिटली नाहीं.

शाहूच्या कारकीर्दीच्या अखेरीस राजस्त्रियांचें वर्चस्व कारभारांत होऊन शाहू कसा

शक्तिहीन झाला होता हें ले. ५४, ५५, ५९ वरून दिसतें. " उभयतां महालचें अति प्राबल्य जहालें आहे, " " राजश्री स्वामींचें सरकार कर्जदार झालें व खर्च महालाचे अनिवार, नित्य कथळे.....घरच्याच कारभारांत राजश्री-स्वामी दंग आहेत. " शाहूनंतरहि ताराबाईच्या व पेशव्यांच्या बिघाडाचीं अनेक पत्रें आहेत. (ले. ७८, ८१).

ले. ७९ पासून उत्तर हिंदुस्थानांतील मसलतीचीं पत्रें आहेत. जयाजी शिंदे व मल्हारराव होळकर यांनीं अहमदखा बंगस व बहादुरखा रोहिल्याचा केलेला पराभव व वजीराचा केलेला पाठपुरावा (ले. ७९), दत्ताजी शिंद्याचा पराक्रम (ले. ८३), क्षेत्रें सोडविण्याची मसलत, मारवाडांत बिजेसिंगाशीं युद्ध ले. (१३६, १३७, १७१), जयाजींचा दग्यानें खून (ले. (१३९, १४३), वगैरे हकीकतीं समकालीन लोकांच्या लेखणींतून आपणांस वरील पत्रांतून वाचावयास मिळतात.

वरील भानगडी हिंदुस्थानांत चालूं असतां " सा सुभे दक्षण सोडवावी या कामाची पाळी आहे. "(ले. ९२) अशी स्थिति दक्षिणेंत आली होती. वृद्ध निजामुल्मुल्क चीनकिलिचखान हा इ. स. १७४८ मध्यें मरण पावला व त्याचे मागें गादीबद्दल भांडणें सुरू झालीं. वडील पुत्र गाजीउद्दीन ऊर्फ फेरोजजंग हा दिल्लींस दरबारांत होता, त्यानें मराठ्यांचे सरदार शिंदे होळकर यांशीं मदतींचें बोलणें लावलें. इकडे सलाबतजंग यानें नानासाहेबांशीं बोलणें लावलें व जानबा निंबाळकर, सयद लष्करखान, रामदासपंत यांजकडे नानाहेबांनीं राजकारणें सुरू केलीं. गाजीउद्दीन इकडे येईना व तो आल्याशिवाय दक्षिणच्या कारस्थानास रंग चढेना. पातशहा व वजीर यांचे कारस्थानास गुंतलेले सरदार शिंदे व होळकर यास नानासाहेबानें दक्षिणेत बोलावलें, परंतु तेहि येईनात. नानासाहेबाजवळ फौज थोडी, शिवाय आपसांतील शत्रु दाभाडे, गाईकवाड, भोसले, प्रतिनिधि यांची पेशव्यास खालीं ओढण्याची धडपड, यांमुळें " दक्षिण मोकळी करण्याचा " पेशव्याचा जन्माचा प्रयत्न सिद्धीस गेला नाहीं. या घडामोडींचें रसभरित वर्णन ले. ९९ मध्यें खुद्द नानासाहेबानें केलें आहे. त्यामुळें त्याचें हृद्गत स्पष्ट होतें. हें अस्सल पत्र त्यावेळच्या अंतःस्थ गुंतागुंतीं कळण्यास फार महत्त्वाचें आहे. शिवाय याच संबंधाचे ले. ८४, ९०, ९५, १०२, १०७, १०९ पहावे. राजकारणाच्या लटपटींतही जबाबदार पेशव्यांना आपले शब्दाची व नांवलौकिकाची बरीच किंमत होती हें ले. ८४, १०२ वरून दिसेल.

ले. १६२ हें पत्र राघोबादादानें लाहोर घेऊन अबदालीस शह दिला त्याबद्दलचें आहे व लेखक अंताजी माणकेश्वर यानें दादास सुचविलें आहे कीं पठाण पुन्हां पंजाबांत येतील. परंतु राघोबादादानें तेथें स्वतः छावणी न करतां अगर कोणी कर्तबगार सरदार पाठवून आपलें ठाणें पक्कें न करतां परत भरारी मारली व मागें सर्व मुलूख मोकळा सोडला, त्यामुळें अबदालीचा मार्ग मोकळा राहून त्याचा परिणाम परंपरेनें पानिपतच्या युद्धांत कसा भोवला हें दिसून येईल. चाणाक्ष नानासाहेबाच्या हें लक्षांत आलें होतें व दादांनीं ठेवलेला अदनाबेग मृत्यु पावल्यावर दत्ताजी शिंद्यानें लाहोरास जाऊन राहावें म्हणून लिहिलेंहि होतें. (ले. १६५), परंतु त्याप्रमाणें बागणूक घडली नाहीं.

पानिपताचे युद्धाबद्दल एकहि पत्र या संग्रहांत नाहीं. नानाफडणीसाचें आत्मचरित्र (ले. १९२) यांत थोडासा मजकूर आहे, व लढाईनंतरच्या पळापळीची व मोठमोठ्या पुरुषांच्या व स्त्रियांच्या आपत्तीची हृदयद्रावक हकीगत त्यांत दिली आहे. सदाशिवराव भाऊचा शोध लढाईनंतर सर्वत्र झाला. त्यांपैकीं नानासाहेबानें नाना पुरंदरे यांस लिहिलेलें एक पत्र (ले. १८७) आहे व त्यांत भाऊसाहेबाची खबर आणण्यास सांगितलें आहे. पानिपतचे लढाईनंतर उत्तर हिंदुस्थानांतील मराठ्यांची सत्ता कमी होऊन सर्वांनींच उठाव केला. त्यांतच बुंदेल्यांनी सर्व बुंदेलखंडांतून मराठ्यांचा अमल उठंविला. तेव्हां पेशव्यांनीं नागपुरकर जानोजी भोंसल्यास पाठवून आपले सरदारांची बाजू सांभाळली व आपला अमल कायम केला (ले. १८८). तसेंच जाटांनींहि उचल केली. त्यावर गोपाळराव गणेश वगैरे सरदार रवाना केले; व मागाहून खुद्द राघोबादादा हिंदुस्थानांत गेला व कांहीं स्वस्थता झाली (ले. १९३, ९४). मल्हारराव होळकर दक्षिणेंत आल्यामुळें उत्तरेकडील बाजू लंगडी पडली, ती सावरण्याचा प्रयत्न नारोशंकर करीत होता (ले. १९६).

ले. २५३ ते ३९३ हे इंग्रजांविरुद्ध नाना फडणीसानें चालविलेल्या युद्धासंबंधींचे इ. स. १७८०–८२ दरम्यानचे आहेत. सवाई माधवरावांचे कारकीर्दीत सुद्धां राघोबादादाचा पक्ष धरून इंग्रजांचें कारस्थान चालूच होतें. पूर्वी वडगांवच्या तहानें इ. स. १७७९ मध्यें इंग्रज नरम पडून त्यांनीं राघोबादादास मराठ्यांच्या ताब्यांत देऊन साष्टीसह सर्व प्रांत परत दिला होता, परंतु तो तह इंग्रजांनी पाळला नाहीं. नानांनी यावर इंग्रजांची पुरीच खोड मोडण्याचा निश्चय करून इंग्रजांविरुद्ध जंगी संघ तयार केला. शिंदे, होळकर, भोंसले वगैरे मराठे सरदार, निजाम व हैदर यांची एकजूट करून चोहोकडून इंग्रजांशीं एकदम युद्ध सुरू केलें. त्याची हकीकत या पत्रांत पहावयास सांपडेल. नाना फडणीसाची करामत या युद्धांत चांगली निदर्शनास आली.

ले. ३९७ हा सवाई माधवरावाचे लग्नाच्या व्यवस्थेसंबंधीं आहे व फार मनोरंजक आहे. यांत लग्नांतील निरानिराळीं कामें व त्यांचा बंदोबस्त फार बारकाईनें नेमून दिला आहे. राजकारणाच्या दृष्टीनें हें टिपण महत्त्वाचें नाहीं, परंतु उच्च वर्गाच्या मराठ्यांच्या लग्नाच्या रीतीभाती व ऐश्वर्य यांचें हें स्मारक आहे.

ले. ३९८ पासून ४५० चे कागद नाना फडणिसाच्याच कारभाराचे सवाई माधवरावाच्या काळाचे असून तदुत्तर खर्ड्याच्या लढाईचा पोवाडा व तपशीलवार दिनचर्या आहे. त्यापुढचे कागद दुसऱ्या बाजीरावाच्या राजवटीचें नानाविध बाबतींचे व ऐतिहासिक महत्त्वाचे आहेत. विशेषतः ले. ४७५ चे कागदांत एकंदर मराठी राज्याची उपज व सरंजामी सरदारांचीं पथकें व त्यांचें खर्च दाखविले आहेत. ते सर्व तपशीलवार व अभ्यसनीय आहेत.

ले. ४८९--९० यांतील शकावली अत्यंत बहुमोल समजली जाते. ले. ४९१--९७ पादेतों निरनिराळ्या पेशव्यांच्या हकीकती व वंशावळी आहेत, त्याही बहुधा ज्या त्या-वेळींच अस्सल टिपणांच्या आधारें बनविलेल्या दिसतात. अशा रीतीनें या पुस्तकांत आलेले

पंचशत कागद हेच महाराष्ट्राच्या इतिहासाचा पाहिला मुख्य गाभा होत. मासिकांत विखुरले गेल्यामुळें त्यांजकडे अभ्यासकांचें लक्ष प्रथम व्यवस्थितपणें जाऊं शकलें नाहीं. आतां तरी चित्रशाळेच्या मालकांनीं हें खर्चाचें ओझें अंगावर घेतलें, हा त्यांचाच इतिहासावर उपकार आहे. सारांश या दुर्मीळ ग्रंथाच्या पुनर्मुद्रणानें मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासाची नवीन सोय होईल, अशी आशा आहे.

गोविंद सखाराम सरदेसाई.
यादव माधव काळे.
विनायक सदाशिव वाकसकर.

———

रा. ब. साने यांचें छायाचित्र.

रावबहादूर साने

रा. ब. साने यांचें हस्ताक्षर.



रा. ब. साने यांचें हस्ताक्षर.



Dear Rāṣṭrarāv,

I send the balance of the Aryabhūshaṇ Press by an insured letter. You will get it on monday. The letter contains the particulars. This is only intimation by post.

Yours affectionately
K. G. Sane.

P. S. Which cheque the Deccan Bank asks for regarding which I wrote to you the day before yesterday?

K. G. S.

अनुक्रमणिका.



लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
१	खेम सांवत	लखम सांवत	५-३-१६५९	तहनामा.
२	,,	,,	२१-६-१६७३	कानूजाबता अष्टप्रधानांचीं कामें.
३	,,	,,	२९-५-१६८८	यादी घोरपडे यांचे सरंजामाबद्दल.
४	रामचंद्र नीलकंठ अमात्य	संताजी घोरपडे	२९-७-१६९२	भिरज देशमुखींची सनद.
५	छत्रपती शिवाजी	कृष्णाजी भास्कर पंडित	२२-४-१७१२	इनामपत्र-कलबस्ते गांव.
६	,,	,,	इ. स. १७१२	कैफियत शहाजी भोसले.
७	शंभु छत्रपती	वतनदार अधिकारी	२४-१२-१७१४	पायरे गांवचा मुकासा.
८	शंभु छत्रपती	देशाधिकारी	२-११-१७१७	अडेली गांव नागणप्रभूच्या बायकांस इनाम
९	,,	,,	१७१८ इ.	राणोजी व उदाजी चव्हाणाची हकीकत.
१०	,,	,,	१७-७-१७१८	यादी युवराजा व अष्टप्रधान यांचीं वस्त्रें.
११	कान्होजी आंग्रे	देशाधिकारी	८-९-१७२०	राघोबल्लाळ देसाई यांस सनद.
१२	शंभु छत्रपती	फोंड सांवत	२७-१०-१७२०	कर्जफेड.
१३	दादभट उपाध्ये	चांदोजी जाधव	२-५-१७२१	सिंधुदुर्गाची वसाहत व भिक्षुकी वतन.
१४	शाहू राजे	संभाजी कोल्हापुरकर	३०-१२-२५	तहनामा.
१५	बाजीरावबल्लाळ	अंबाजीपंत पुरंदरे	फेब्रु. १७२७	ताबडतोब येण्याबद्दल पत्र.
१६	शाहू	अंबाजी पुरंदरे	१२-३ १७२७	बाजीरावास निजामावर हल्ल्याची आज्ञा.
१७	शंभु छत्रपती	कृष्णाजी प्रतिनिधि	११-७-१७२८	कामाबद्दल आज्ञा.
१८	शंभु छत्रपती	नीळकंठराव त्रिंबक	८-८-१७३०	शाहूशीं तहाच्या शर्ती.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
१९	शाहू राजे	संभाजी करवीरकर	१३-४-१७३१	तहनामा नक्कल.
२०	शाहू	संभाजी	१३-४-३१	तहनामा.
२१	शाहू	सुभानराव मोरे	१६-४-१७३१	कोपल संभाजीच्या स्वाधीन करण्याची आज्ञा.
२२	बाजीराव	अंबाजीपंत पुरंदरे	२४-५-१७३३	हबशी यांचे मसलतीसंबंधी.
२३	लक्ष्मीबाई आंग्रे	शाहू राजे	इ. १७३४	मानाजी आंग्रयाविरुद्ध तकरार.
२४	बाजीराव	ब्रह्मेंद्र स्वामी	इ. १७३४	मोघम पत्र.
२५	बाजीराव बल्लाळ	नारायण दीक्षित पाटणकर	२४-७-१७३५	मथुरेनजीक दहा गांव देऊं.
२६	शंभु छत्रपती	वलंदेज (डच)	२-३-१७३६	तहनामा.
२७	बाजीराव	ब्रह्मेंद्रस्वामी	८-१-१७३८	भोपाळनजीक निजामाचा मोड.
२८	चिमाजीआपा	,,	११-१-१७३८	सदरहू
२९	,,	,,	४-३-१७३९	वसईवर लगट करतों.
३०	बाळाजी बाजीराव	,,	१७-४-१७३९	वसईचें वर्तमान.
३१	,,	,,	१२-५-१७३९	वसईच्या वेढयाची हकीकत.
३२	चिमाजीआपा	ब्रह्मेंद्रस्वामी	१३-५-१७३९	वसई फत्तेचें वर्तमान, पुतळ्या नजर.
३३	,,	,,	१५-६-१७३९	वसईच्या वेढयाची हकीकत व सामान.
३४	बाजीरावबल्लाळ	नारायणदीक्षित	इ. १७४०	रांजणगाव मुकाशा बद्दल.
३५	चिमाजी	ब्रह्मेंद्रस्वामी	१०-४-१७४०	संभाजी आंग्र्याचा मोड.
३६	चिमाजी व बाळाजी बाजीराव	नारायण दीक्षित	२९-९-९१७४०	व्रतें, कर्ज वगैरे.
३७	चिमाजी	वासुदेव दीक्षित	१३-११ १७४०	नारायण दीक्षितास पंधरा हजार रु. दिले.
३८	बाळाजी बाजीराव	ब्रह्मेंद्रस्वामी	१४-१-१७४१	चिमाजी आपाचा मृत्यु.
३९	मानाजी आंगरे	बाळाजी बाजीराव	२५-३-१७४१	मामुली.
४०	बाळाजी बाजीराव	ब्रह्मेंद्रस्वामी	२४-४-१७४४	जनार्दनपंताचें लग्न.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
४१	नारायण दीक्षित	बाळाजी बाजीराव	२४-१२-१७४१	रामाजी केशव याची शिफारस
४२	सदाशीव चिमणाजी	ब्रह्मेंद्रस्वामी	१९-१-१७४३	पैक्याबद्दल.
४३	शाहू राजे	,,	१६-२-१७४३	पत्र आल्याबद्दल आभार.
४४	,,	बापूजी भिमराव	२९-८-१७४४	पत्र यावें.
४५	बाळाजी बाजीराव	,,	८ ५-१७४५	राघो गोविंदास मदत करा.
४६	,,	बाळाजी बाजीराव	२९-५-१७४५	मोगलाचा कजिया मिटता घ्यावा.
४७	सदाशिवराव भाऊ	ब्रह्मेंद्रस्वामी	२-६-१७४५	बाबूजी नाईकास कर्नाटकचा मामला.
४८	बाळाजी बाजीराव	बापूजी बाजीराव	२६ ७-१७४५	मोघम.
४९	सदाशिवराव भाऊ	मल्हारराव होळकर व	२३-१२-१७४५	फौजेच्या खर्चाबद्दल वगैरे
५०	बाळाजी बाजीराव	जयाजी शिंदे	१०-४-१७४६	अर्जुनासिंगास मदत.
४१	,,	,,	७-६-१७४६	जैतपुर घेतल्याबद्दल शाबासकी.
५२	,,	,,	८-६-१७४६	बुंधेल्यांवरील मोहीम.
५३	,,	,,	१७-७-१७४६	पुढील बातमी पाठवा.
५४	नाना पुरंदरे	नानासाहेब पेशवे व सदा-	२९-८-१७४६	साताऱ्याचें वृत्त, रघूजीस कर्नाटक.
५५	बाळाजी बाजीराव	शिवराव	२१-१०-१७४६	शाहूचा निरोप घेण्यास साताऱ्यास.
५६	,,	रामचंद्रबाबा शेणवी	२२-१०-१७४६	दतियेकरांची आगळीक.
५७	,,	,,	२४-१०-१७४६	अर्जुनासिंगाचा जागा बुंधेल्याकडून परत.
५८	,,	,,	२८-१०-१७४६	,,
५९	,,	,,	१६-१२-१७४६	शाहूच्या दरबारचें वर्तमान.
६०	,,	,,	२१-२-१७४७	बाबूजी नाईकास कर्नाटकांतून काढणें.
६१	,,	,,	२२-२-१७४७	सोंधे, बिदनूर, सावनूरकडील हकीकती.
६२	,,	,,	६-५-१७४७	सर्व हालचालींची खबर.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
६३	नानासाहेब	,,	२१-५-१७४८	निजामुल्मुल्काचा नासरजंगास उपदेश.
६४	,,	मल्हारराव व जयाजी	१३-७-१७४८	राघोजी भोसल्याची कटककडे पिछेहाट.
६५	सदाशिवराव भाऊ	धोंडोबा पुरंदरे	१७४८	निजाम,गाइकवाड लाहोरकडील हकीकती.
६६	,,	,,	१७४८	गोविंदराव दाभाडे याची मसलत.
६७	नानासाहेब	रामचंद्रबाबा	१७४८	सफदरजंगास मदत,काशी त्याचे ताब्यांत.
६८	बाळाजी बाजीराव	वासुदेव दीक्षित	१५-१०-१७४९	मोघम
६९	नानासाहेब पेशवे	नाना पुरंदरे	१५-११-४९	किरकोळ बाबी
७०	सदाशिवराव भाऊ	नाना पुरंदरे	१७५०	कर्नाटकचा मामला व इतर बाबी.
७१	सदाशिवराव भाऊ	नाना पुरंदरे	१७५० डिसेंबर	दाभाडे, सातारा वगैरे प्रकरणीं.
७२	नाना सा.	जयाजी शिंदे	१७५१ जानेवारी	दाभाडे, रामचंद्रबाबा,गंगोबा तात्या इ०
७३	नाना सा०	वासुदेव दीक्षित	२०-१-१७५१	निजामाबद्दल मसलती.
७४	सदाशिवराव भाऊ	नाना पुरंदरे	३०-३-१७५१	गायकवाडाचा मोड
७५	नाना सा०	नाना पुरंदरे	३१-३-१७५१	गायकवाडचा पराभव, पुढील घोरण.
७६	नाना सा०	वासुदेव दीक्षित	२२-४-१७५१	औरंगाबादेहून ऐवज पाठवणें.
७७	सदा० भाऊ	नाना पुरंदरे	११-५-१७५१	सातारचें राजकारण.
७८	नाना सा.	मल्हारराव होळकर व जयाजी शिंदे	२२-५-१७५१	ताराबाईची मध्यस्ती, सलोखा फसला.
७९	नाना सा.	जयाजी शिंदे	२२-५-१७५१	बहादुरखा रोहिल्याचा पराभव.
८०	नाना सा०	मल्हारराव होळकर व जयाजी शिंदे	२३-५-१७५१	रेवा मुकुंदपुरचा पैसा उगवत नाहीं.
८१	नाना सा०	जयाजी शिंदे	१७५१ मे.	ताराबाईशीं बिघाड, शिंदे यांस इशारा.
८२	नाना सा०	साबाजी शिंदे	१०-६-१७५१	शाबासकी.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
८३	नाना सा०	जयाजी शिंदे	१०-६-१७५१	अहमदखान पठाण बुडविला.
८४	,,	मल्हार० व जयाजी	११-६-१७५१	गाजीउद्दीन व सलाबतजंग संबंधी घोरण.
८५	,,	वासुदेव दीक्षित	१२-७-१७५१	निजामशाहीच्या राजकारणी मसलती.
८६	,,	,,	११-९-१७५१	जानबा निंबाळकर व रामदासपत.
८७	,,	शिंदे, होळकर	२९-९-१७५१	सय्यद लष्करखान व जानबा निंबाळकर गाजीउद्दीनास फक्त वरवर अनुकूळ आहेत.
८८	नानासा०	शिंदे, होळकर	८-१०-१७५१	सलाबतजंग व गाजीउद्दीन,
८९	,,	,,	८-१०-१७५१	गाजीउद्दीन यास खान आलमची थैली.
९०	,,	,,	८-१०-१७५१	गाजीउद्दीनास रामचंद्र जाधवराव, जानबा निंबाळकर व खान आलम यांच्या थैल्या.
९१	,,	वासुदेव दीक्षित	१७५१ सप्टेंबर	नवाब बाहेर निघाले.घुढें मनसुबा काय ?
९२	,,	रामाजीपंत दाभोळकर	१६-१२-१७५१	जयापास पत्र, मल्हारबाचेबुद्धीस भेद.
९३	उदाजी चव्हाण	नाना सा०	१७५१	लिंगोपंतास पाठविलें आहे.मनसुबा कळवावा.
९४	नाना सा०	वासुदेव दीक्षित	१७५२ जानेवारी	मोघम.
९५	,,	,,	१७५२ जानेवारी	निजामानें पेशव्यास जहागिरीची कबुलो.
९६	,,	जयाजी शिंदे	१२-२-१७५२	मल्हारराव होळकराच्या इमानाचा बेल-भंडार पाठविला तो पावला.
९७	नाना सा०	जयाजी शिंदे	१२-२-१७५२	घराऊ प्रकार,मनसुब्याचा तपशील पाठवूं.
९८	,,	,,	७-३-१७५२	इकडील अडचणी व पैशाची ओढाताण, तुम्ही ज्येष्ठमासीं यावें म्हणजे मनसुबे सांगूं म्हणून निकडीचें पत्र.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
९९	नानासाहेब	शिंदे, होळकर	२७-३-१७५२	शिंदेहोळकरांस दोष. दक्षिणेकडील व अंतस्थ भानगडींची महत्त्वाची माहिती.
१००	,,	बापूजी भिवराव	८-४-१७५२	सख्यदलष्करखानास तंबी देऊन त्याजकडून आपले मुद्दे मान्य करून घेतल्याची शाबासकी.
१०१	रघुनाथ बाजीराव	जयाजी शिंदे	२४-५-१७५२	रामदासपंत व निजाम, ताराबाई, दादोबा प्रतिनिधी यांची माहिती.
१०२	नाना सा.	शिंदे, होळकर	३१-५-१७५२	आपलेकडे दोष न येईल अशा रीतीनें सला-बतजंग यासंबंधी मसलत.
१०३	नाना सा.	जयाजी शिंदे	१८-७-१७५२	गाजीउद्दीनास ताराबाई व महादोबा पुरंदरे यांचा मजकूर.
१०४	,,	वासुदेव दीक्षित	२०-७-१७५२	गाजीउद्दीन बऱ्हाणपुरास येतांच औरं-गाबादेस त्याची द्वाही फिरवावी अशी मसलत.
१०५	,,	,,	२५-७-१७५२	सख्यदलष्करखान व गाजीउद्दीन.
१०६	,,	,,	२५-७-१७५२	गाजीउद्दीन नर्मदा उतरून आले.
१०७	,,	,,	२७-७-१७५२	
१०८	जयाजी शिंदे	भाऊसाहेब	३१-७-१७५२	शिंदे होळकर व गाजीउद्दीन.
१०९	मल्हारराव होळकर व जयाजी शिंदे	भाऊसाहेब	९-८-१७५२	नर्मदा उतरलों. तुम्ही लौकर मिळावें.
११०	नाना सा०	शिंदे, होळकर	६-१०-१७५२	रामचंद्र जाधवाचे मनसबदारांची यादी.
१११	हणमंतराव निंबाळकर	जयाजी शिंदे	१५-१०-१७५२	बीड प्रगण्यास लष्करचा उपद्रव होऊं नये.
११२	राघोबादादा	दत्ताजी शिंदे	२२-१०-१७५२	तुम्ही लांब लांब मजला मारून लौकर यावे.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
११३	मानाजी आंगरे	नाना सा०	१०-१२-१७५२	रामाजी महादेव व नारो त्रिंबक तळेकर सागरगडावर हल्ला.
११४	नाना सा०	वासुदेव दीक्षित	२५-१-१७५३	सलाबतजंगाशीं सल्ला. दादाची गुजराथेंत रवानगी.
११५	नाना सा०	जयाजी शिंदे	६-२-१७५३	तुम्ही भोजन करून लौकर येणें.
११६	रघुनाथ बाजीराव	वासुदेव दीक्षित	२७-३-१७५३	अहमदाबाद झुंझत आहे.
११७	जयाजी शिंदे	रामाजीपंत भाऊ	२८-४-१७५३	असाम्याचे हिशेब. आम्ही गोंयास आलों.
११८	यशवंतराव दाभाडे	बाळाजी बाजीराव	६-१०-१७५३	बैल पाठविले. हाशीलाचा उपसर्ग नको.
११९	रघुनाथ बाजीराव	वासुदेव दीक्षित	३-६ १७५४	मथुराप्रांती दहा गांव व द्वारकेकरितां पांच गांवांची मागणी.
१२०	बाळाजी बाजीराव	वासुदेव दीक्षित	३-६-१७५४	आम्ही कर्नाटक कचेश्वरीहून आलों.
१२१	रघूजी भोसले	वासुदेव दीक्षित	३०-७-१७५४	पत्र पावलें.
१२२	गणेश कृष्ण	दीक्षित	१-८-१७५४	दिल्लिहून सर्व बातम्या कळवितों.
१२३	रघुनाथ बाजीराव	जयाजी शिंदे	१९-८-१७५४	सुरजमल जाटाकडील वसूल आला काय ?
१२४	नाना सा०	जयाजी शिंदे	२०-८-१७५४	कृष्णगड फत्ते केल्याची बातमी कळली.
१२५	,,	,,	३-९-१७५४	मारवाडच्या युद्धा बद्दल सल्ला.
१२६	,,	,,	३-९-१७५४	विजयादशमीनंतर स्वारीस निघूं.
१२७	,,	,,	३-९-१७५४	कर्जाची ओढ, तुमचेकडून पैसा येत नाहीं.
१२८	नाना सा०	जयाजी शिंदे	४-९-१७५४	
१२९	सदाशिव चिमणाजी	जयाजी शिंदे	५-९-१७५४	वर प्रमाणें.
१३०	बाळकृष्ण दीक्षित	वासुदेव दीक्षित	२-११-१७५४	राघोबादादांचे भेटीस दिल्लीस आलों.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
१३१	बाळाजी बाजीराव	रामाजी अनंत दाभोळकर	१५-११-५४	विजेसिंगाचा पराभव केला. रामसिंग स्थापिला. गोहदकरराण्याचें पारिपत्य करावें.
१३२	गंगाधर यशवंत चंद्रचूड	रामजी अनंत दाभोळकर	१७५५ जानेवारी.	रोहिल्यांचे मामलतीचा वसूल आला.
१३३	बाळाजी बाजीराव	वासुदेव दीक्षित	२७-२-१७५५	टोक्यास येऊन भेटावे. सय्यद लष्करखान याचा दिवाण बरोबर आणावा.
१३४	महादजी अंबाजी पुरंदरे	मुरारराव घोरपडे गुत्तीकर	१४-४-२७५५	मोघम.
१३५	सखाराम भगवंत	जयाजी शिंदे	१७५५ मे	बिजेसिंगाबद्दल मनसुबा काय आहे?
१३६	बाळाजी बाजीराव	वासुदेव दीक्षित	२३-६-१७५५	सयद लष्करखानाचे निरोपाची संशयनिवृत्ति.
१३७	बाळाजी बाजीराव	वासुदेव दीक्षित	२७-७-१७५५	श्रावणमासचे उत्सवास यावें.
१३८	नाना सा०	जयाजी शिंदे	३१ ७ १७५५	अंताजी माणकेश्वर समागमें निरोप पावला. मल्हारबास मायेंत राखावें.
१३९	बाळाजी बाजीराव	रामाजी अनंत दाभोकर	३०-८-१७५५	जयाजी शिंदे यास दग्यानें मरण.
१४०	,,	वासदेव दीक्षित	१ ९-१७५५	फिरंगियांचा भाव खराखुरा कसा आहे?
१४१	,,	दत्ताजी शिंदे	१८-९-१७५५	अष्टपैलूरीतीनें वागावें, निवळ शिपाईगिरी नको.
१४२	,,	रामाजी अनंत	२९-९-१७५५	दसऱ्यानंतर खासा स्वारी चाळीस हजार फौजेनिशी दत्ताजीचे मदतीस येईल.
१४३	अंताजी माणकेश्वर	नानासाहेब	१७५६ जानेवारी	बिजेसिंगावरील मारवाडचे स्वारीचें वर्णन.
१४४	नाना सा०	जनकोजी शिंदे	१७ ८-१७५६	कोटयाचे खंडणीचे दहा लक्ष पाठवावे.
१४५	दत्ताजी शिंदे	रामाजी अनंत	७-९-१७५६	हिशेब श्रीमंतांस दाखवावा. आम्ही गंगा-तीरास जातों.
१४६	दत्ताजी शिंदे	रामाजी अनंत	१५-९-१७५६	ताळेबंद दाखवून यावें.
१४७	दत्ताजी शिंदे	नाना सा०	२१-९-१७५६	झडत्या तयार नसल्याबद्दल जबाब,

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
१४८	दत्ताजी शिंदे	रामाजीपंत	३०-९-१७५६	हिशेबाबदल.
१४९	जानोजी भोसले	नाना सा०	२४-११-१७५६	वऱ्हाडचे मामलतीचा वसूल पाठविता.
१५०	हणमंतराव निंबाळकर	नाना सा०	१९-१२-१७५६	फिरंगोजी निंबाळकर याजबरोबर दोन हजार फौज पाठविली.
१५१	नाना सा०	दत्ताजी शिंदे	१७५६	गोविंदबाबा दीक्षित हे धरणें धरून बसले तरी त्यांची समजावीस करणें.
१५२	रघुनाथ बाजीराव	दत्ताजी शिंदे	१७५६	विष्णु महादेव गद्रे यांजकडून ऐवज आला असल तो पाठविणें.
१५३	जानोजी भोसले	नाना सा०	७-२-१७५७	आज्ञेप्रमाणें फौजेसह गंगेकडे येत आहों.
१५४	जानोजी भोसले	वासुदेव दीक्षित	२८-३ १७५७	उद्यां आम्हास दुधनातीरी करंडीवर भेटावें.
१५५	,,	,,	३०-२-१७५७	उंदरीच्या मुक्कामी येऊन जरूर भेटावें.
१५६	बळवंतराव मेहेंदळे	नाना सा०	२-७-१७५७	श्रीरंगपट्टणकर पैका देतात कीं नाहीं ?
१५७	हणमंतराव निंबाळकर	दत्ताजी शिंदे	७-१२-१७५७	निजाम व पेशवे यांचा सलोखा करावा.
१५८	महादजी पुरंदरे	सोमशेखरनाईक हरपन हल्ली	१७५७	संस्थानचा मामला चुकवावा. नाहीं तर आम्ही फौज सुद्धां तुमचे प्रांतावर येतों.
१५९	गोपाळराव बापूजी	नाना सा०	१७५७	हिंदुपत बुंधेले यानें अमानसिंगास मारून त्यानें सरकारचा टिका न होता राजा झाला व खेदसिंगास काढून दिलें. तरी त्यांस पत्रें व फौज पाठविणें. बंदोबस्त करतों.
१६०	विठोजी पाटील	तिमाजी	१७-४-१७५८	भोरगांवचे पांढरीचें खरेदीखत.
१६१	मुधोजी भोसले	राघोबादादा	४-५-१७५८	लाहोर घेतल्याबद्दल संतोष.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
१६२	अंताजी माणकेश्वर	राघोबादादा	५-५-१७५८	लाहोरास छावणी करून राहण्याची सूचना.
१६३	मानाजी आंगरे	नाना सा०	१-६-१७५८	महादाजी रघुनाथास पालखी देण्याबद्दल शिफारस.
१६४	बाळाजी बाजीराव	वासुदेव दीक्षित	८-९-१७५८	काशीबल्लाळाची हिंदुस्थानांत रवानगी.
१६५	नाना सा०	रामाजी अनंत	१७-१२-१७५८	दत्ताजी शिंदे यांनीं लाहोरास राहावें.
१६६	,,	,,	२४-२-१७५९	लाहोर, बंगाला, पट्टणें, तिन्ही मसलती करून प्रयाग, काशी, अयोध्या सोडवून घ्यावी.
१६७	,,	दत्ताजी व जनकोजी शिंदे	२१-३-१७५९	शुजाउद्दौला पन्नास लाख रु. व काशीप्रयाग देत असेल तर त्यास वजिरी द्यावी.
१६८	,,	,,	२१-३-१७५९	अंताजी माणकेश्वर मुद्दाम उशीर लावून लबाडीनें राहिले. कैद करून हुजूर पाठवावे.
१६९	राघोजी आंगरे	नाना सा०	२२-४-१७५९	उंदेरी व जंजीऱ्यावर सर्व आरमारें एकत्र करून हल्ला करावा याबद्दल खटपट.
१७०	,,	भाऊ सा०	१९-४-१७५९	वर प्र० व वसईहून आरमार लौकर पाठवावें.
१७१	बाळाजी बाजीराव	रामाजी अनंत दाशोळकर	२-५-१७५९	सुजाउद्दवला, नजीबखान, वजीर, लाहोर, अंताजी माणकेश्वर वगैरे मनसुबे.
१७२	जसवंत निंबाळकर	राघोबादादा	१२-६-१७५९	लाला ब्रिजनाथकडून आमचे रुपये देववावे.
१७३	आनंदराव निंबाळकर	नाना सा०	१७५९ जुलै	अंजनरोड येथील बाजाराबद्दल.
१७४	जसवंत निंबाळकर	नाना सा०	८-७-१७५९	तोंडी निरोप सांगण्याकरितां मनुष्य.
१७५	नारायण भास्कर	नाना सा०	२८-८-१७५९	गोविंकर गव्हर्नरास पत्रें पाठवून सरकारचे आरमारास मदत करण्यास सांगावें.
१७६	,,	,,	२९-८-१७५९	सदरहू प्रकरणीं.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
१७७	दमाजी गायकवाड	,,	२९-८-१७५९	सांवत व गोवेंकर फिरंगी यांची लढाई व तहाची वाटाघाट चालली आहे.
१७८	नाना सा०	नाना सा०	१०-१०-५९	जंजीऱ्याच्या हबशास मदत न करावी, नाहीं तर तुमचें पारिपत्य करूं अशी तंबी.
१७९	,,	नाना पुरंदरे	७-११-१७५९	हबशी व कोळी प्रकरणीं.
१८०	नानासा०	सदाशिवराव भाऊ	२१-१-१७६०	संगमनेरच्या आसाम्याबद्दल
१८१	नाना सा०	महीपतराव त्रिंबक पुरंदरे	८-२-१७६०	मोगलाशीं लढाई तोफा व हत्ती पाडाव.
१८२	नाना सा०	भाऊसाहेब	२२-२-१७६०	रामाजी महादेव, व नारो त्रिंबक याज. मध्यें फिरून कलुषीता आली. दोघास कांसे बेट घेण्यास लावावें.
१८३	सदाशिवराव भाऊ	बजाबा पुरंदरे	१९-४-१७६०	आम्ही नर्मदापार झालों. पुढें जातों. तुम्ही घोड्यवर बसणें, लिहिणें, पढणें नीट करावें. खेळूं नये.
१८४	नाना सा०	विसाजी कृष्ण विनीवाले	१३-५-१७६०	तुम्ही शिरहट्टी घेतली. संतोष झाला.
१८५	,,	बाबुराव रामरामी	१६-२-१७६१	सुमेरसिंग याजकडील गाड्यांची वाटणी.
१८६	नाना सा०	गोविंद दीक्षित	२०-२-१७६१	पन्नास हजार कर्ज घेतलें.
१८७	,,	नाना परंदरे	७-३-१७६१	भाऊसाहेब आल्याखेरीज तुम्ही न यावें. बाबूजी नाइकास अजमीरपर्यंत खबरीसाठी पाठविणें (पाणीपतचें लढाई नंतर).
१८८	जानोजी भोसले	नाना सा०	८-५-१७६१	खेचीवाड्याचें पारिपत्य करून सुरंजेस आलों. गोविंदपंत बुंदेल्याची कुमक केली. वराड-प्रांतींची जपती करूं.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
१८९	नाना ना०	गोविंद दीक्षित	१२-५-१७६१	पंचवीस हजार कर्ज.
१९०	नाना सा०	रघुनाथ हरी	२८-५-१७६१	वोडसे प्रांताचा बंदोबस्त व वसुलीबदल.
१९१	जिजाबाई (संभाजी बायको)	बाळाजी बाजीराव	९-६-१७६१	सलोख्याचें पत्र.
१९२	नानाफडणीसांचें आत्मचरित्र	नाना फड० आत्मचरित्र	२०-७-१७६१	पाणिपतची लढाई व पलायन, वगैरे.
१९३	गोपाळराव गणेश	विश्वासराव (नारो शंकरचा पुतण्या	२१-८-१७६१	दादासाहेबांच्या आज्ञेप्रमाणें हिंदुस्थानांत जातों. दादासाहेब चांदवडास आले.
१९४	,,	,,	२३-८-१७६१	दादासा० बऱ्हाणपुरास आले जाटांनीं गडबड आरंभली तर आम्ही सत्वरच येतों.
१९५	माधवराव बल्लाळ पेशवे	गोविंद दीक्षित	२७-११-६१	पंचेचाळीस हजार कर्ज.
१९६	नारोशंकर	विश्वासराव लक्ष्मण	१२-२-१७६२	मल्हारराव होळकर देशास आले.आम्ही येतों.
१९७	शिवछत्रपती करवीरकर	त्रिंबक सदाशिव परंदरे	२६-११-१७६२	विजयादशमीचे मुहूर्तें सिंहासनारोहण.
१९८	माधवराव बल्लाळ	महिपतराव पुरंदरे	३-५-१७६३	राजास किल्यावर नेऊन ठेवणें.
१९९	,,	महिपतराव पुरंदरे	१९-५-१७६३	वरप्रमाणें
२००	,,	,,	२०-५-१७६३	राजश्रीस किल्यावर हरतजविजीनें नेणें.
२०१	रघुनाथ बाजीराव	बाळकृष्ण दीक्षित	३-९-१७६३	औरंगाबादेस जातों. यवनांस बुडवितों.
२०२	महादजी शिंदे	दादासा०	३-३-१७६४	नगरास तोफखाना आला आहे त्यांतून पांच तोफा आम्हांस द्याव्या.
२०३	माधवराव पेशवे	त्रिंबकराव विश्वनाथ पेठे	२८-६-१७६४	पिरेपट्टणाचा किल्ला घेतला. कळलें.
२०४	देवजी बयाजी	दादासा०	१५-७-१७६४	महादजी शिंदे यांचें पलायन.
२०५	माधवराव बल्लाळ	नाना पुरंदरे	५-२-१७६५	पुरंदरचे किल्ल्यांतील सरकारी जामदारखाना कोठें आहे त्याची याद करून पाठविणें.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
२०६	महादजी बल्लाळ व हरी बल्लाळ फडके	,,	१७-५-१७६५	श्रीमंत कृष्णा उत्तरतीरास आले. बंकापूरचा किल्ला खालीं करून घेतला.
२०७	माधवराव बल्लाळ	दादासा०	३-२-१७६६	निजामाची भेट कुरूमखेडानजीक
२०८	,,	,,	८-२-१७६६	करांडे यांची सुटका झाली पाहिजे.
२०९	माधवराव बल्लाळ	माधवराव रामचंद्र	९-३-१७६६	बाबूजी नाईकाचा पाठलाग.
२१०	बाळाजी कृष्ण व हरी बल्लाळ मु. पुणतांबे	रामचंद्रपंत तात्या	२४-४-१७६६	रावसाहेब (माधवराव) टोपयास आले. लढाई फत्ते झाली. आम्हां उभयतांस बुनगे आणण्यास मागें ठेवलें. भवानराव प्रतिनिधि लष्करांत आले त्यांस अडकावून घेतलें.
२११	माधवराव पेशवे	दादासा०	४-६-१७६६	बऱ्हाणपुरची कमावीस त्रिंबक नारायण यांस सांगितली. नारो कृष्ण सर सुभेदार यांनीं त्यास अमल दिला नाहीं. पारिपत्य असावें.
२१२	रघुनाथ बाजीराव	बाळाजी गोविंद	१३-६-१७६६	पुरुषोत्तम महादेव हिंगणे यास सरंजाम.
२१३	,,	,,	२५-६-१७६६	नारो कृष्ण याजकडेस कमावीस राहूं द्यावी, परंतु गोपाळराव गणेश याजप्रमाणेंच यांनीं अमर्यादा चालविली म्हणून त्याजकडे तुम्ही लिहिल्याप्रमाणें ठेविली नाहीं.
२१४	माधवराव पेशवे	नाना पुरंदरे	२२-११ १७६६	कृष्णातीरास जातों. आज कूच होऊन येवतावर जातों. तुम्हीं येऊन वक्तशीर मिळावे.
२१५	माधवराव पेशवे	बाळाजी जनार्दन (नाना फडणीस)	२२-१-१७६७	दादोउद्धव यांस वरघाटचे किल्लघास ऐवज एक लक्ष मुदती प्रमाणें देणें.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
२१६	नारायणराव बल्लाळ (पेशवे)	बजाबा पुरंदरे	१२-३-१७६७	तीर्थरूपांनीं खड्या घोड्यानिशीं शिरें घेतलें. आम्ही लष्करांतून निघालों.
२१७	माधवराव पेशवे	दादासा०	१७६८ पूर्वीचें	पत्राचीं उत्तरें पाठविलीं.
२१८	नारायण बल्लाळ	त्रिंबक सदाशिव पुरंदरे	१६-३-१७६८	माधवरावांनीं दादासाहेबांशीं झुंज करून त्यांची फौज लुटली. कारभार माधवरावाचे स्वाधीन केला.
२१९	मुरली जोतिषी	माधवराव प्रधान	१७६९ फेब्रुवारी	जानोजी भोसल्याचा तुम्ही पराभव केला. मी भविष्य लिहून दिलें होतें त्यांत पहावें.
२२०	बाळाजी गोविंद खेर	रामचंद्रपंत	५-४-१७६९	उत्तर हिंद्रकडील राजकारणी परिस्थिति.
२२१	माधवराव पेशवे	त्रिंबकराव विश्वनाथ ऊर्फ त्रिं. मामा पेठे	१४-७-१७६९	हिंदुराव घोरपडे व गोपाळराव व आनंदराव यांचे मतानें लष्कर उभारणें.
२२२	खंडोजी अरगडे; बुंदीकोटा	बाबा दीक्षित कायगांवकर	४-१२-१७६९	जयनगरकडे जाटावर फौज जात आहे.
२२३	,,	,,	६-१२-१७६९	मराठी फौजांनीं केलेलीं कामें.
२२४	रामचंद्रपंत तात्या व विसाजीपंत	विष्णू महादेव गद्रे साव०	९-१२-१७६९	शिंदे, होळकर व तुम्ही मिळून एक मनसुबा करावा. तुम्ही न ऐकाल तर आम्ही मागें जातों.
२२५	माधवराव पेशवे	नाना फडणीस	१९-६-१७७०	हिशेबी.
२२६	जानोजी भोसले	सखाराम बापू	२७७२	आमचा प्रांत कडेबळींत येथील पागेस भगवंतराव राम हे त्रास देतात तरी ताकीद द्यावी.
२२७	सदाशिव मल्हार पुरंदरे	माधवराव पेशवे	१८-२-१७७२	महमदअलीखान व हैदर, इंग्रज यांजकडील राजकारणें.
२२८	करवीरकर	हैदरअली	५-११-१७७३	तुम्हीं फौजेसुद्धां येऊन रघुनाथरावांची पेशवाईवर स्थापना करावी.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
२२९	गोविंदराव गायकवाड	पंतप्रधान	६-२-१७७४	आज्ञा घेऊन सुरत अठाविशीत आला. फत्तेसिंग गायकवाड रेवातीरीं आहे.
२३०			२८-२-१७७४	३३ सरदारांस छत्रपतींची आज्ञा.
२३१	गोविंदराव गायकवाड	पंतप्रधान	१५-४-१७७४	बेडाद्यास वेढा दिला आहे.
२३२	नारो शंकर राजेबहादर	नाना फडणीस	११-६-१७७४	दौलतबाबूरावानें जंबूसर घेतलें.
२३३	हरी बल्लाळ (फडके)	नारोपंत नाना (नारोशिवदेव)	१-८-१७७४	दादासा० धुळकोटापलीकडे आहेत खर्चास मागतात, विष्णूपंताकडून देवविले.
२३४	शिवछत्रपती	बाळाजी जनार्दन	१९-११-१७७४	येसाजीराम वगैरेचीं गांवें कराराप्रमाणें सरकारांत येत नाहींत त्याबद्दल ताकीद.
२३५	०	,,	१७७५ मे	एक राजकारणीं पत्र.
२३६	०	,,	८-८-१७७५	मुंबईकर इंग्रजांस पत्र कीं इंग्रजांशीं लढाईचा प्रसंग आणूं नये.
२३७	हैदर अली	कोल्हापुरचे कारभारी यशवंतराव शिंदे	६-३-१७७७	तुम्हीं बारभाईच्या फौजेवर हल्ला करून मुलूख मारावा. आम्हीहि इकडून तसेंच करतों.
२३८	,,	,,	,,	सदरहूची नकल.
२३९	०	महादाजी प्रभू	९-३-१७७७	मुंबईकर इंग्रजांची तयारी चालली आहे, बंदोबस्त करावा.
२४०	सवाई माधवराव	गणेश विश्वनाथ बहेरे	२२-४-१७७७	फत्तेसिंग गायकवाड अमदाबादेंत मोर्चे लावून बसले. तरी तुम्ही तेथें यावें. ताळ्यावर येतील.
२४१	गोविंदराव नारायण	त्रिंयकराव दाभाडे	१-६-१७७७	फत्तेसिंग गायकवाड व काठेवाड प्रकरणीं.
२४२	सवाई माधवराव	जिवाजी रघुनाथ	२-१२-१७७७	सिंदखेडच्या मजमदारास रुपये देण्याबद्दल

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
२४३	सवाई माधवराव	बाबुराव कृष्ण	२७-१२-१७७८	निशाणाचा फडका व ढाल, तरवार, पडदळें आलीं नाहींत, तीं यावीं.
२४४	नाना फडणीस	नारोपंत (नारो शिवदेव)	७-७-१७७९	हैदराखानाच्या हरकाऱ्यांच्या जोड्या येतील त्यांजवर नजर ठेवावी. पाटीलबावांसहि सूचना द्यावी.
२४५	सवाई माधवराव	कृष्णराव बळवंत (ऊर्फ आपा बळवंत)	५-८-१७७९	भुजापा वाणी यास पकडण्याकरितां सजावल येतील त्यांचे स्वाधीन वाण्यास करणें.
२४६	बाळाजी बाजीराव	करवरिकर छत्रपति	३-१०-१७७९	कलमबंदीची नक्कल.
२४७	पुणे दरबार	हैदरअल्ली	२२-१०-१७७९	सलूख्याचें पत्र.
२४८	नाना फडणीस	हैदरअल्ली	१७७९ डिसेंबर	इंग्रजांविरुद्ध मसलत. भोसले, शिंदे होळकर, पेशवे हैदर व निजाम.
२४९	यादी		१७७९	अनु. नंबर २४६ चा भाग.
२५०	त्रिंबकराव आपाजी	नानाफडणीस	जानें. १७८०	श्रीरंगपट्टणाहून पत्र हैदरअलीस पत्रें दिली.
२५१	करवीरकर	हैदरअली	१९-४ १७८०	तुम्ही बारभाईवर स्वारी करावी आम्ही करूं.
२५२	कलमबंदी	पुणें दरबारीं	१९-४-१७८०	कलमबंदीची यादी.
२५३	नानाफडणीस	सदाशिव दिनकर	३०-४-१७८०	महादजी शिंद्यांच्या मनांतील कलुषता
२५४	,,	नारोपंत (नारो शिवदेव)	८-५-१७८०	हैदरखानाकडून साडेतीन लक्ष दरबार खर्च आला त्याचा तपशील.
२५५	नरसिंगराव तमाजी	नाना फडणीस	१५-५-१७८०	इंग्रजाविरुद्ध जूट करण्याचे प्रकरणीं.
२५६	गणेश केशव	,,	१५-५-१७८०	सदरहू प्रमाणें.
२५८–२६६	नाना फडणीस	सदाशिवपंत	२४-५-१७८०	कोंडाईबारीवर छापणी व चौकडीची जूट.
२६७–३०४	नाना	हैदरअल्ली	२४-५-१७८०	इंग्रजांच्या युद्धप्रकरणीं पत्रव्यवहार.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
२६७	नाना	,,	१४-६-१७८०	वरीलप्रकरणीं शिंदे हैदर यांशीं पत्रव्यवहार.
३०५	नाना	हैदर	२१-१-१७८१	भोसले व निजाम इंग्रजांनीं फोडले.
३०८	नाना	हैदर	११-२-१७८१	इंग्रज लबाडीनें या बातम्या पसरवितात.
३०९-३३६	नाना	नारो शिवदेव	२५-२-१७८१	इंग्रज व सुरतकर गाडर वगैरेचे युद्धप्रकरणीं.
३३७	नाना	नारोपंत	४-२-१७८२	इंग्रजाशीं तहाची वाटाघाट.
३३८-३५४	नाना	,,	१४-२-१७८२	शिंदे, इंग्रज प्रकरणीं उत्तर हिंद राजकारण.
३५५	,,	,,	२७-५-१७८२	सालबाईस शिंद्यांचे मोर्चे लागले आहेत.
३५६-३७५	,,	,,	जुलै ते आक्टो १७८२	इंग्रजांशीं तहाप्रकरणीं वाटाघाट.
३७६-३७८	,,	,,	१२-१०-१७८२	किरकोळ.
३७९	सवाई माधवराव	देशमुख देशपांडे प. जालनापूर	२६-१०-१७८२	एक ब्राह्मण बाटून मुसलमान झाला. त्यास प्रायश्चित्त देऊन शुद्ध करावें.
३८०-३८१	नाना	नारोपंत	१७-११-१७८२	सरकारी ठाण्यावर महादजीचा जुलूम.
३८२-३९१	नाना	नारोपंत	१७८२आक्टो.ते दिसें	इंग्रजांशी तहाच्या पक्क्या शर्ती.
३९२	,,	टिपू	७-१२-१७८२	हैदरअली मृत्यु, सांत्वनपत्र.
३९३	गोपिकाबाई	सवाई माधवराव	८-१-१७८३	उपदेश, दिनचर्या, अभ्यास व वर्तणुक.
३९४	नाना	नारोपंत (नारो शिवदेव)	२१-१-१७८३	सालबाईनें पुरंदरच्या तहापेक्षां नफा नुकसान.
३९५	,,	,,	२१-१-१७८३	इंग्रज व फ्रेंच यांची चढाओढ.
३९६	,,	,,	,,	किरकोळ.
३९७	नाना	व्यवस्थेची यादी	१०-२-१७८३	सवाई माधवरावाच्या लग्नांतील कामें.
३९८	नाना	नारोपंत	११-२-१७८३	इंग्रजांशीं लौकर तह पक्का करून घेण्याबद्दल पाटील बावास सांगा.
३९९	,,	,,	२५-२-१७८३	अटेर घेऊन ग्वालेरीस शिंद्याचा अंमल.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
४००	,,	,,	२५-२-१७८३	इंग्रजांशीं तह करण्याचे तीन पर्याय.
४०१	,,	,,	२५-२-१७८३	इंग्रजांनीं बिदनूर घेतलें.
४०२	,,	,,	,,	सवाई माधवराव यांचें लग्न झालें.
४०३	,,	,,	६-३-१७८३	अंबोजी इंगळे यांचे गांवाची तक्रार.
४०४	,,	,,	१३-३-१७८३	इंग्रजांचा तहनामा पाटीलबावाजवळ द्यावा.
४०५	फ्रेंच गव्हर्नर	पुणें दरबार	३०-३-१७८३	इंग्रजांविरुद्ध मराठ्यांशीं फ्रेंचांचा सलूख.
४०६	नाना	नारोपंत	४-४-१७८३	हैदरखान मरण पावल्याचें वर्तमान न आलें म्हणून महादजी शिंद्याचा रुसवा.
४०७	,,	,,	४-४-१७८३	पाटीलबावानीं सरकारी वकीलावर जबरी करून तहनामा इंग्रजास दिला.
४०८	,,	,,	,,	दादासाहेब महादजीकडे सुरक्षित येऊन येथें येत असें करावें.
४०९	,,	,,	,,	इंग्रजांचा कंपू तूर्त ठेवून द्यावा. टिपू विरुद्ध गेल्यास गरज लागेल.
४१०	नाना	पाटील बाबा	,,	इंग्रजांशीं तह झाला. आतां नारो शिवदेव यास परत पाठवावें.
४११	नाना नारोपंत	नारोपंत	२५-४-१७८३	दादासाहेब मध्येंच कोठें निघून न जावोत.
४१२	,,	,,	,,	टिपू व फ्रेंच एक झाले.
४१३	,,	,,	,,	इंग्रजाविरुद्ध फ्रेंच टिपूचें कारस्थान.
४१४	,,	,,	,,	मुसाबुसी भारी सरंजामानिशीं आला.
४१५	गोविंद राम	नाना फडणीस	२७-४-१७८३	टिपूचे मदतीस रास्ते व परशुरामभाऊ न गेले.
४१६	नाना	नारोपंत	२८-४-१७८३	टिपूस मदत गेली हें खरें नाहीं.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
४१७	,,	,,	११-५-१७८३	ग्वाल्हेर किल्यास मोर्चे लावले आहेत.
४१८	,,	आपाजीराम दाभोळकर	१४-५-१७८३	इंद्रसेन वकीलास दोन लक्षाची जहागीर.
४१९	,,	नारोपंत	२७-५-१७८३	टिपूचे युद्धप्रकरणीं.
४२०	,,	,,	,,	ग्वाल्हेर किल्यावर हल्ल्याचा तपशील कळला.
४२१	,,	,,	,,	रकारनामक पुण्यांत असतांना गप्पा मारीत होता तेथें आल्यावर कांहीं काम केलें नाहीं.
४२२	,,	,,	,,	फ्रेंच व टिपूच्या इंग्रजाविरुद्ध चळवळी.
४२३	,,	,,	४-६-१७८३	दादासाहेबास आणण्याबद्दल.
४२५	,,	,,	१६-६-१७८३	अहिल्याबाई व तुकोजी होळकर यांचे
४२६	,,	आपाजी राम	१६-६-१७८३	बखेड्याविषयीं तडजोड.
४२७	,,	नारोपंत	४-७-१७८३	आनंदराव धुळप यांचीं इंग्रजांशीं लढाई.
४२८	नाना	नारोपंत	२८-९-१७८३	इंद्रसेनास दीड लक्षाची जहागीर देऊं.
४२९-४३०	,,	,,	२८-९-१७८३	किरकोळ.
४३१	,,	,,	,,	दादासाहेबास आणण्याबद्दल.
४३२	,,	,,	१-१०-१७८३	ग्वाल्हेर घेतली कळलें.
४३३-४३४	,,	,,	२३-११-१७८३	किरकोळ.
४३५			१७८३	कापशीकर घोरपडे यांची हकीकत.
४३६	राव रंभा जयवंत निंबाळकर	गोविंदराव काळे	३-९-१७८४	नरसिंगराव घाटके याचा अमल टेंभुरणीवर नीट करून द्यावा.
४३७-४३८	शिवाजी छत्रपति	परशराम रामचंद्र	११-४-८५	मनोली तालुक्याचे पाचलक्षांचे मामलतीबद्दल.
४३९	नाना	अमृतराव	७-३-१७८६	मालीटइंग्रज श्रीमंताचे भेटीस आला.
४४०	आज्ञापत्र पंतप्रधान यास		१४-६-१७८७	नारायणराव ढमढेरे याचे सरंजामाची यादी.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
४४१	हरिपंत फडके	आपाजी राम	१२-१-१७८९	गुलाम कादराचा अलीबहादराकडून पराभव.
४४२-४४४	,,	,,	,,	किरकोर.
४४५	नाना	आपाजीराम दाभोळकर	३०-११-१७९०	महादजी डेरे दाखल झाले. सांबर त्याच्या फौजेनें घेऊन अजमेरास मोर्चे लावले, मेड-त्यावर मारवाडी व राठोड यांचा मोड केला.
४४६	बळवंतराव भवानीशंकर	गोविंदराव काळे	५-५-१७९१	तात्यास हरिपंत मिळण्यास जात आहेत. वाशीमावर चार दिवस जास्त लागले.
४४७	परशराम रामचंद्र	गोविंदराव पिंगळे	१४-५-१७९१	धारवाडचा बंदोबस्त करून तुंगभद्रापार होऊन ठाणीं घेऊन रामदुर्गास मुक्काम केला.
४४८	महादजी शिंदे	बळवंतराव कमावीसदार	२८ ९-१७९१	हिशेबी
४४९	यादी		२१-११-१७९२	पंतप्रधान, प्रतिनिधी, अमात्य, गायकवाड यांचे सत्काराविषयीं करवीरकर छत्रपती यांची यादी, गायकवाड घराण्याची वंशावळ इ.
४५०-४५२	करारनामा		२५-११-१७९२	करवीरकर शिवाजी छत्रपती तर्फे बाळाजीराम व मुंबईचे गव्हर्नर आबरकांबी तर्फे सांडफोर्ड
४५३			२९-७-१७९३	खेमसांवत कुडाळकर व करवीरकर महाराज यांजमधील जाबसाल.
४५४-४५५	गोविंदराव काळे	नाना	४-१२-१७९४	पेशवे निजामाच्या तंट्यासंबंधीं,
४५६			१६-१२-१७९४	मालिटास जकास माफीचा परवाना
४५७	संस्कृत पत्र	सवाईमाधवराव	१७९५	वाडी गांवासंबंधीं
४५८	गोविंदराव काळे	नाना	२१-२-१७९५	निजाम प्रकरणीं.
४५९			११-३-१७९५	खर्ड्याचे लढाईचा पोवाडा.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
४६०			११-३-१७९५	यादी सवाई माधवराव पुण्याहून खर्ड्यापर्यंत लढाईस गेले त्याचे लष्कराचे मुक्कामांची
४६१	गोविंदराव काळे	भाऊ	२७-८-१७९५	किरकोळ
४६२	नाना फडणीस	बाबूराव	७-१२-१७९५	सवाई माधवरावाचे मृत्यूचें वर्तमान.
४६३	शाहू छत्रपती सातारा	यशोदाबाई प्रधान	सन १७९५	गोत्रज मुलगा दत्तक घेऊन कारभार करावा.
४६४	बाजीराव रघुनाथ प्रधान	कावीरी राजे	१०-६-१७९७	चिमाजी आपाचे लग्नाची पत्रिका.
४६५	अलीबहादर	पेशवे	५-६-१७९८	धोडपचे जहागीरीचा अमल भोंसले व निजाम सुरळीतपणें देत नाहींत. बंदोबस्त व्हावा.
४६६	मुतुरामालिंम विजय रघुनाथ सेतुपति. रामेश्वर क्षेत्राचे राजे	बाजीराव पेशवे	४-११-१७९८	इंग्रजांनीं आमचें राज्य घेऊन आम्हांस त्रिचनापलीचे किल्यांत कैदेत ठेविलें तरी सोडवून इंग्रजांची खंडणी ठरवून द्यावी.
४६७	नारो हरि करंदीकर	पटवर्धन	१७-९ १७९९	परशराम भाऊचे लढाईचें व मृत्यूचें पत्र.
४६८			१४-२-१८००	प्रातिनिधि प्रकरण.
४६९			१८००	गुत्तीकर, गजेंद्रगडकर व कापशीकर घोरपडे यांची वंशावळ व सरंजाम.
४७०	भवानीशंकर हैबतराव	पंतप्रधान	इ. १८०० ची यादी	वाई प्रांतांत ब्राह्मण जातींत कन्याविक्रय करणारांस व घेणारास दंड.
४७१			१६-१२-१८०१	तैनात जाबत्याचा एक नमुना, एकांडे शिलेदारांचा पगार, शर्ती वगैरे.
४७२	आनंदराव गायकवाड	पंतप्रधान	१५-२-१८०२	कान्होजी गायकवाड यांस कैद केल्याबद्दल.
४७३	बाजीराव पेशवे	कृष्णराव नारायण	११-२-१८०२	साताऱ्याचे बंदोबस्तास त्रिंबक महिपत पुरंदरे,

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
४७४	यशवंतराव होळकर	रामचंद्र व लक्ष्मीनारायण दीक्षित कायगावकर	११ ८-१८०२	नबाब अमीरुद्दौला यांस कायगाव टोकें व इतर क्षेत्रास उपसर्ग न देण्याबद्दल पत्र.
४७५			१८०३	हिंदुस्थानातील सर्व प्रांतांचा जमाबंदीचा खर्डा जनरलवेलस्ली यानें तयार करविलेला.
४७६			१०-११-१८०९	इंग्रजांनीं लढाईची तयारी चालविल्याबद्दल एक गुप्त बातमी.
४७७	बाजीराव पेशवे	माईसाहेब सातारकर छत्रपती	१७-२-१८११	यशवंतराव होळकर जेजुरीचे दर्शनास येतात.
४७८	मल्हार चिंतामण	आबासाहेब	१४-१०-१८११	एक बातमीपत्र. मजकूर किरकोळ.
४७९	मल्हारराव होळकर	रावजी गोविंद	१५-७-१८१२	किरकोळ
४८०-८४	,,	,,	२७-७-१८१२	,,
४८५	बयाजी नाईक.		१४ते २२-१२-१८१४	गुप्त बातम्या रेसिडेंटास कोणकोण भेटले.
४८८	दौलतराव शिंदे	सदाशिव माणकेश्वर	१८१७	दाभोळकर घराण्याची सेवा व वतन.
४८९	मेस्तक व शकावली		११-२-१८१८	शिवाजीपासून दु. बाजीरावाचे अखेरपर्यंत.
४९०	मेस्तक व शकावली		२०-११-१८३०	सवाई माधवरावापासून महत्त्वाचे गोष्टींचें टिपण.
४९१				पेशवे व सातारकर राजे यांच्या कारकीर्दी.
४९२			१८३२	महत्वाच्या गोष्टींचीं टिपणें.
४९३			१८३३	चंदावराकडील राजांची वंशावळ तपशीलवार.
४९४			२-८-१८४१	पेशव्यांची संपूर्ण वंशावळ.
४९५			७-८-१७४१	बाळाजी विश्वनाथाची कैफियत.
४९६			१६-८-१८४१	बाजीराव बल्लाळ पेशवे यांची कैफियत.

लेखांक	कोणाकडून	कोणास	तारीख	विषय
४९७				पेशव्यांचे कारभाऱ्यांची यादी.
४९८	सोयराजी अवधूत	पेशवे	१८५०	मकरसंक्रमणाचे तीळ.
४९९–५००	,,			किरकोळ.
५०१				बावडेकर पंत अमात्य यांची वंशावळ.

सूचना.

१ पूर्वीच्या आवृत्तींत कालानुक्रम नव्हता, तो या आवृत्तींत दिल्यानें पूर्वीचे लेखांक बदलावे लागले. तरी जुने लेखांक त्यांच्याच खालीं काटकोनी कंसांत दिले आहेत.

२ मूळांत मोडी वाचतांना जे शब्द लागले नव्हते, त्यांपैकीं संदर्भानें लागले तेवढे दुरुस्त करून बाकींचे तसेच सुटया अक्षरांनीं कायम ठेविले आहेत.

३ पृ.३ ले. २ चा सन १६७३ पडला आहे तो १६७४ पाहिजे; व पृ.५ ले. ३ चा सन १६६८ पडला आहे तो १६८८ पाहिजे.

४ पृ.३६५–६८ वर ले. ४०४–४०९ असे आंकडे पडले आहेत, त्याऐवजीं ले. ४०५–४१० असे अनुक्रमें समजावे.

५ पृ.४१३ वर ले. ४६२ आहे त्याऐवजीं ४६१ पाहिजे.

शुद्धिपत्र

पृ०	ओळ	अशुद्ध	शुद्ध
९०	६	" १–१६–१७५१	"११–६–१७५१
९६	७	" व जे ही "	" बाजेही "
१२७	१२	" शहाजवान खानाशी "	"शहा नवाज खानाशी"
२११	शेवटून २	" मुंबईकर इंग्रजाचें "	" हैदर खानाचें "
२५२	२५	" कु पी या "	" कुपिया [खुफिया=गुप्त]"
२९७	शेवटून ३	" स जा व ल "	" सजावल * " खालीं टीप * सजावल= गुन्हेगारास पकडून आणण्या- करितां पाठविलेले लोक.
३०२	१७	" तरफे न "	" तरफैन "
"	२२	" ईमाजुद्दौला "	" इमानुद्दौला "
४०७	शेवटून ५	" * तवाफरा वगैरे सर्व. '	ही सर्व टीप गाळावी
४०८	२	" दनीं "	" पनी "
४०८	टीप ओळ २	{" × बहिऱ्यामधीं– तोफांच्या.....नळी ?"	{" बहिऱ्यामधी "=बहिर- बुणम्यात (गैरलढाऊ लोकां- त लढाऊ लोक मिसळले)
४०८	१८	" येथ शामजंगास "	" येहेतेशामजंगास "
४५१	११	" पिपडी "	" पिदडी "
४५३	५	" दु स रे व जी "	" खुसरुद्दीन "
	"इजायतनामा"	हा शब्द जेथें जेथें येईल तेथें तेथें	"इनायतनामा" असें वाचावें.

काव्येतिहास-संग्रह

पत्रें, यादी वगैरे.

उपोद्घात

१ राजकारणी पुरुषांनीं मागें निरनिराळ्या ऐतिहासिक गोष्टींच्या संबंधानें जीं पत्रें लिहिलीं व त्यांस जीं पत्रें आलीं तीं आणि ऐतिहासिक व थोर पुरुषांच्या चरित्रांस अनुलक्षून असणारे नानाप्रकारचे जुने किरकोळ लेख आमचेकडे येऊं लागले आहेत. या पत्रांचा व किरकोळ लेखांचा इतिहासाच्या कामीं बारीक बारीक गोष्टींचा निर्णय करण्यांत व इतिहासाच्या खांचा खोंचा भरून काढण्यांत मोठा उपयोग होईल. पत्रें लिहिण्याची पद्धति, लिहिणारांचा स्वभाव, तेव्हांची लोकस्थिति इत्यादि प्रकारच्या माहितीचेहि हे लेख द्योतक होतील. यास्तव ते सर्व एका ठिकाणीं निराळे बांधितां यावे म्हणून "**पत्रें, यादी वगैरे**" असें निराळें सदर घालून त्या खालीं जसजसे ते येतील तसतसे देण्याचें योजिलें आहे.

२ आतां हे पत्रें वगैरे लेख कालानुक्रमानें प्रसिद्ध करणें योग्य होतें. परंतु तसें सध्यांच करणें म्हणजे दुरापास्त आहे. एक तर या लेखांवर शक वगैरे मिति साकल्येंकरून दिली नसते. कोठें नुसता वार, कोठें नुसती तिथी व महिना इतकेंच घातलेलें असतें. तेव्हां त्यांचा अनुक्रम लाविता येत नाहीं. खेरीज पत्रें वगैरे सर्व लेख आम्हांस मिळाल्यावर त्यांचा अनुक्रम लावण्यास ठीक पडणार. परंतु हा पत्रसंग्रह जितका असेल तितका आमचेकडे येणें कठीण दिसतें; आणि तो एकदम सगळाच्या सगळाच आमचेकडे येणें हें तर मुळींच अशक्य आहे. याकरितां सर्व पत्रादिकांचा संग्रह आमचेकडे येई तोंपर्यंत न थांबतां जीं जीं पत्रें, टिपणें मिळतील तीं तीं सर्व जशीं येतील तशीं देऊन त्यांची कालानुक्रमें व्यवस्था करण्याचें काम तूर्त न स्वीकारितां कालांतरावर टाकितों.

३ या किरकोळ लेखांच्या मूळच्या भाषेंत फेरफार वगैरे न करितां बखरी प्रमाणें जशाचे तसेच छापण्याचें योजिलें आहे. दुर्बोध ठिकाणीं [?] असें प्रश्न चिन्ह करून जशीं अक्षरें दिसलीं तशीं घातलीं आहेत. त्यांचा बोध कोणास झाल्यास इकडे कळविण्यांत यावा, व तसेंच निरनिराळ्या पुरुषांचीं व स्थलांचीं नांवें येतील त्यांजबद्दलही कांहीं कमीजास्त माहिती मिळाल्यास तीही आम्हांकडे पाठविण्याची एतत्-संग्रह-हित-चिंतकांस आमची विनंती आहे.

४ जुन्या काळच्या पत्रव्यवहारांचीं पुडकींच्या पुडकीं पुष्कळ गृहस्थांकडे लोळत पडलेलीं सांपडतील. परंतु तीं मिळण्याचीच मोठी मारामार आहे. या पत्र-व्यवहाराची ऐतिहासिक दृष्टीनेंच काय किमत असेल ती असेल; बाकी दुसऱ्या दृष्टीनें पहातां त्यांची कांहीं किंमत ह्या काळीं दिसत नाहीं. तेव्हां हे लेख वाण्याच्या दुकानांत किंवा कसरीच्या भक्ष्यस्थानीं दवडण्यापेक्षां त्यांचा जीर्णोद्धार करण्याविषयीं त्यांच्या रक्षकांचे मनांत कोणतेही रीतीनें बिंबलें तर इतिहासाचे कामास मोठी अनुकूलता होईल.

[हा काव्येतिहाससंग्रहकारांचा मूळचा उपोद्घात तसाच येथें घेतला आहे.]

पत्रें, यादी वगैरे.

ले. १
(४११)]

[श. १५८० फा. व. ७
ता. ५ मार्च १६५९

श्री

सन १०६८ फसली. फेरिस्त नंबर

तहनामा राजश्री खेम सांवत व लखम सांवत देसाई बहादूर प्रांत कुडाळ यांजकडील पीतांबर शेणवई कारभारी येऊन ठराव करून दिला सुरू सन तिस्सा खमसैन अलफ

प्रांत मजकूरचे महाल वगैरे चालत आहेत. आकार होईल त्याचा ऐवज दरसाल निम्मे हुजूर पावता करावा, निम्मा आकार राहील त्यांत तीन हजार लोक पायदळ हेटकरी ठेवावे आणि ज्या वेळेस हुजूर चाकरीस बोलाविले जातील तेव्हां तीन हजार लोकांनिशीं सेवा करावी. खांसा जातीने येण्याचे प्रयोजन पडेल तेव्हां बोलावणें होईल तेव्हां येत असावें. कलम १

किल्ले फोंडे प्रांत तालुका घेऊन हुजूर ठेविला त्यास हरएक प्रसंगास कुमक राखीत जावी. बिदनूर वगैरे संस्थानच्या खंडण्या घेण्यास स्वारी होईल त्यांच्या कुमकेस जात असावें. कलम १

स्वराज्य साधनाच्या ठायीं वकिलापाशीं मध्यें राहून तुरुक लोकांचें साधन करावें. कलम १

प्रांतांतील जमाबंदीच्या चौकशीस हुजुरून कारकून व लोक राहतील ते ठेवून त्यांच्या नेमणुकीबद्दल हुजूर अमल पैकीं पावतें करावें. कलम १

प्रांत मजकूरची देशकत वतनें तुमची व बहादूर किताब अजरा [मन्हा] मत चालेल. त्यांतील किल्ले, कोट व ठाणीं तुमच्या स्वाधीन केलीं आहेत. तेथें दस्तान करून जतन करावीं. तेथें हुजूरचे कारकून व लोक येतील ते ठेवावे. कलम १.

शके १५८० विलंबीनामसंवत्सरे फाल्गुन वद्य ७. एकूण पांच कलमें करार करून तहनामा दिला असे " मोर्तब. "

ले. २
(२१)]

[श. १५९६ ज्ये. व. १३
ता. २१-६-१६७३

श्री

कानूजाबता राज्याभिषेक शके १ आनंद नाम संवत्सरे ज्येष्ठ वद्य १३ त्रयोदशी भोमवासरे.

मुख्य प्रधान यांणीं सर्व राजकार्य करावें. राजपत्रावर शिक्का करावा. सेना घेऊन युद्धप्रसंग व स्वारी करावी व तालुका ताबिनांत स्वाधीन होईल त्याचा रक्षून बंदोबस्त करून आज्ञेंत वर्तावें. सर्व सरदार सेना [यांणीं] याजबरोबर जावें. त्यांणीं सर्वांसमेत चालावें. येणेंप्रमाणें. मोर्तब. कलम १.

अमात्य यांणीं सर्व राज्यांतील जमाखर्च चौकशी करून दप्तरदार, फडणीस [हे] यांचे स्वाधीन असावें. लिहिणें चौकशीनें आकारावें. फडाणिसी, चिटणिसी पत्रांवर निशाण करावें. युद्धप्रसंग करावे. तालुका जतन करून आज्ञेंत चालावें. मोर्तब. कलम १.

सचीव यांणीं राजपत्रें शोध करून अधिक उणें अक्षर मजकूर शुद्ध करावा. युद्धप्रसंग करून तालुका स्वाधीन होईल तो रक्षून आज्ञेंत वर्तावें. राजपत्रांवर चिन्ह संमत करावें. मोर्तब. कलम १.

मंत्री यांणीं सर्व मंत्रविचार राज्यकारणें यांतील सावधतेनें विचार करावें. आमंत्रण, वांकानिसी त्यांच्या स्वाधीन. तालुका जतन करून युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रांवर संमत चिन्ह करावें, मोर्तब. कलम १.

चिटणीस यांणीं सर्व राज्यांतील राजपत्रें लिहावीं. राजकारणपत्रें, उत्तरें लिहावीं. सनदा, दानपत्रें वगैरे महालीं हुकुमी यांचा जाबता फडणिसी अलाहिदा त्याप्रमाणें लिहावीं. हातरोखे

सेनापती यांणीं सर्व सैन्य संरक्षण करून युद्धप्रसंग स्वारी करावी. तालुका स्वाधीन होईल तो रक्षून हिशेब रुजू करून आज्ञेनें वर्तावें. फौजेच्या लोकांचें बोलणें बोलावें. सर्व फौजेचे सरदार यांणीं त्यांजबरोबर चालावें. मोर्तब. कलम १.

पंडितराव यांणीं सर्व धर्माधिकार, धर्म, अधर्म पाहून शिक्षा करावी. शिष्टांचे सत्कार करावे. आचार, व्यवहार, प्रायश्चित पत्रें होतील त्यांजवर संमत चिन्ह करावें. दानप्रसंग, शांति, अनुष्ठान तात्काळ करावें. मोर्तब. कलम १.

न्यायाधीश यांणीं सर्व राज्यांतील न्याय, अन्याय मनास आणून बहुत धर्में करून न्याय करावे. न्यायाचीं निवाडपत्रें यांजवर संमत चिन्ह करावें. मोर्तब. कलम १.

सुमंत यांणीं परराज्यांतील विचार करावा. त्यांचे वकील येतील त्यांचे सत्कार करावें. युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रांवर संमत चिन्ह करावें. मोर्तब. कलम १.

फौजेचे सबनीस बक्षी यांणीं सर्व फौजेची हजेरी चौकशी करावी. यादी करून समजवावें. रोजमुरा वाटणें, सत्कार करावा. युद्धादि प्रसंग करावा. मोर्तब. कलम १.

सेनाधुरंधर यांणीं बिनी करावी, आघाडीस जावें, फडफर्मास करावी, लूट करणें, मना करणें, चौकशी, ताकीद त्यांजकडे, पुढें असून

नाजूकपत्रें यांजवर मोर्तब अथवा खास दस्तक मात्र.वरकडांचा दाखलाचिन्ह नाहीं. चिटणीसानींच करावें. मोर्तब. कलम १.

किल्ले, कोट, ठाणीं, जंजिरे येथील कायदे करून दिले त्याप्रमाणें हवालदार, सुभेदार, कारखानीस, सबनीस, सरनोबत, तटसरनोबत लोक यांचे जाबते करून दिले त्याप्रमाणें चालून सावधतेनें स्थळें रक्षावीत. तगिरी बदली हुजुरून व्हावी. बेजमी नेमणूक तालुकेदार यांजकडे. दरवाजा, किल्या [यांजवर] हवलदार याचा हुकूम, शिक्के त्याच्या नांवचे. कारखानिसी, सबनिसी, जाबता अलाहिदा असे. मोर्तब. कलम १.

आठरा कारखान्यांचे अधिकारी यांणीं खासगीचे अधिकारी यांच्या इतल्यांत चालून दफतरीं हिशेब गुजरावे. मोर्तब. कलम १.

आबदारखाना चिटणीस यांजकडे सरफखाना सुद्धां अधिकार सांगितला. मजालसी विडे, अत्तरगुलाब व हारतुरे, फळफळावळ खुषबई खेरदी, जमाखर्च यांणीं करून हिशेब दफतरीं गुजरावा. मोर्तब. कलम १.

पागा जुमलेदार, सरदार यांणीं कैद करून दिली त्याप्रमाणें चालून सेनापती व प्रधान यांच्या समागमें कामकाजें करावीं. मोर्तब. कलम १.

सेना रक्षण करावी. मोर्तब. कलम १.

सुभे मामले तालुकेदार, यांस ज्याजकडे जें नेमलें तें त्यांणीं जाबत्या प्रमाणें चालावें. हुजूरचे दरखदार चिटणीस, फडणीस, मुजूमदार यांच्या इतल्यानें चालून हिशेब गुजरावे. मोर्तब. कलम १.

*बारा महालचे अधिकारी यांणीं आपापलें काम दुरुस्त राखून हिशेब आकारून दफतरांत गुजरावे. मोर्त. कलम १.

दरुणी महालाचें कामकाज दिवाण नेमून दिले त्यांणीं सर्व पाहून करावें. चिटणीस, फडणीस यांणीं आपलाले दरखाचे कागद लिहावे. त्यांजवर निशाणचिन्ह दिवाणांनीं करून त्यास समजून मोर्तब समक्ष करावे. मोर्तब कलम १.

पोतनीस यांणीं पोतें जमाखर्च लिहिणें करावें. नजरपेशकशी जमा करावी. पोतदार यांणीं पारख करावी. कलम १. मोर्तब.

अष्टप्रधान यांजकडे पेटे व तालुके व स्वारीस जाणें त्यांस दरखदार सर्व हुजूरच्या नांवें, त्यांच्या दाखल्यांनीं पत्रव्यवहार करावा. स्वारीस जावें त्यांस मुतालीक करून दिले त्यांणीं सर्व व्यवहार चालवावा. हुजूर राहवें. कलम १ मोर्तब.

एकूण कलमें वीस. मोर्तब. §

---

* बारा महालः—पोतें–कोठी–पागा–दरजी–टंकसाळ–सौदागिरी–इमारत–हवेली—पालखी–थट्टी–चौबिना–शेरी महाल.

§हा व याच्याच सारखे आणखी कांहीं कागद ' सनदा पत्रें ' पृ. १२२ पासून पुढें छापलेले आहेत. कागदाची मिति ज्येष्ठ व॥ १३ या दिवशीं खरें जंत्रींत रविवार आहे, भोमवार नाहीं. त्याची इंग्रजी तारीख २१ जून स. १६७४ येते. भारतवर्ष २ मराठ्यांचें दप्तर या प्रकरणांत, इ० ऐ० वि० वि० खं. १ पृ. २१ व खं ३ पृ. २५ यांत अशाच प्रकारचे कागद आहेत. तसेंच भा. इ. सं. मं. इतिवृत्त १८३६ पृ. २०३ आणि चित्रगुप्त-बखर पृ. १०४-५ पहा.

ले. ३ (४०६)] [श. १६१० ज्येष्ठ शु. १० ता. २९ मे १६६८

श्री

सन १०९८ फसली. श्रीमन्महाराज शंभु छत्रपती शेज नंबर २६

यादी श्रीमन्महाराज शंभुछत्रपति यांची स्वारी संगमेश्वर मुकामीं होती ते समयीं अवरंगजेब पादशहा याची फौज शके १६१० विभवनामसंवत्सरे ज्येष्ठ शुद्ध १० रोज मंदवासरीं येऊन लढाई जहाली. त्या लढाईत म्हालोजी घोरपडे फौजे सुद्धां लढून ठार झाले. त्यास पुत्र तीन

१ संताजी घोरपडे वडील पुत्र. १ बहीरजी घोरपडे दुसरें पुत्र.

१ मालोजी घोरपडे तिसरे पुत्र. ... ...

एकूण ३

या तीन असामींनीं व विठोजी चव्हाण यांणीं फौज सुद्धां तुळापूर मुक्कामीं अवरंगजेब पादशाहाचे लश्करावर छापा घालून पादशाहाच्या डेऱ्याचे सोन्याचे कळस आणून श्रीमन्महाराज राजे साहेब विशाळगड मुक्कामीं होते त्यांच्या पुढें ठेविले. ते समयीं महाराजांची मर्जी संतोष होऊन चवघांचा सन्मान करून व वस्त्रे,भूषणें,जवाहीर देऊन संताजी घोरपडे यास ममलकतमदार हा किताब दिला. बहीरजी घोरपडे यास हिंदूराव म्हणून किताब दिला; व मालोजी घोरपडे यास अमिरुलउमराव म्हणून किताब दिला व विठोजी चव्हाण यास हिम्मतबहादर हा किताब दिला. नंतर विशाळगड मुक्कामीं रामचंद्र पंडित आमात्य यांणीं महाराजांच्या सेवेशीं विनंती करून संताजी घोरपडे यास सेनापतिपद देविलें. नंतर महाराजांची स्वारी कांहीं कारणामुळें चंदीस निघोन गेली. बरोबर नानाप्रकारचे वेष धारण करून घोरपडे व चव्हाण वगैरे सेवक लोक निघून गेले. तेथें चंदी मुक्कामीं घोरपडे यांणीं काजकामें बहुत केलीं. पुढें चंदीहून आल्यावर संताजी घोरपडे सेनापति प्रांतांत स्वाऱ्या करून राज्य काबीज करीत होते. पुढें श्रीमन्महाराज राजाराम साहेब छत्रपति यांणीं किल्ले †शिवगड एथें शके [१६२१] सालीं कैलासवास केला. पुढें संताजी घोरपडे यास म्हसवडकर माने यांणीं दगाफटका करून शके १६३५ ¶सालीं मारले.पुढें त्याचे चिरंजीव पिराजी घोरपडे यास सेनापतिपद दिलें, तें शके १६३७ सालीं. ते पुढें शके १६५० सालीं स्वामीकार्यावर हलकरणी कसबा नूल या गांवावर लढाईत ठार पडले. पुढें त्याचे पुत्र राणोजी घोरपडे यास सेनापतिपद जहालें.

१ महाराज सरकारांतून राणोजी घोरपडे सेनापति यास तालुका सुद्धां इसने सलासीन मया अलफ दफतर दिमत मुजमू विरोधीकृतनाम संवत्सरे छ १ माहे मोहरम श्रीमन्महाराज शंभुछत्रपति महाराज यांणीं मनोळीच्या मुक्कामीं सरंजाम निवडून दिला. आषाढ शुद्ध २ गुरुवार. (२५-६-१७३१).

---

† सिंहगड ले. ९ पहा. ¶ हा शक चुकला आहे. श. १६१९ आषाढमासीं संताजी मारला गेला. जे. श.

ले. ४
(४३३)]

[श. १६१४ श्रावण व. ११
ता. २९ जुलै १६९२

श्री

तालीक फेरिस्त नं. १३

राजश्री संताजी घोरपडे गोसांवि यांस

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित रामचंद्र नीलकंठ अमात्य आशीर्वाद सुरुप्रन सल्लास तिस्सैन मय्या[1] व अल्फ.राजश्री छत्रपति स्वामी कर्नाटकांत जातेसमयीं तुम्हांस या प्रांतांत ठेऊन गेले त्यासमयीं इकडे गलिमाची धामधूम बहुत होऊन कुल देशदुर्ग हस्तगत केलीं होतीं तीं गेलीं. राज्यामध्यें कांहीं अर्थ उरला नाहीं कुल् मराठे यांणीं इमान खत्ता करून गलिमाकडे गेले परंतु तुम्ही इमान खत्ता न करितां राजश्रीच्या पायाशीं बहुतच एकनिष्ठा धरून जमाव करून शेख निजाम व सर्जाखान व रणमस्तखान व जानसरखान असे उमदे वजीर बुडविले. जागोजाग गलीमास कोट घालून नेस्तनाबूद केलें आणि देश सोडविला. राज्य संरक्षणाच्या प्रसंगास असाधारण श्रम केले, अवरंगजेबास दहशत लाविली. पुढेंही कित्येक स्वामिकार्याच्या ठायीं हिम्मत धरितां. या करितां तुम्हांवरि राजश्री स्वामी संतोष होऊन मामले मिरज कर्यातीं २२ बेबीस एथील देशमूख होतें ते नस्तनाबूद झाले, त्याच्या वंशीं कोणी नाहीं, त्याचे मुतालिक होते ते बळावून देशमुखी वतन खात होते तेही दुर्बुद्धि धरून गलिमाशीं मिळून फिसालत केली, एकनिष्ठा धरून इकडे येऊन भेटले नाहींत, म्हणून त्यांसि देशमुखी दूर करून तुम्हांस अजरामरामत देशमुखी मामले मजकूरची अवलाद अफलाद वतन करून दिली असे. पुत्रपौत्रीं चालवून देशमुखीचा हक्क लाजिमा व इनामत व इसाफतीचे गांव सालाबाद पहिले देशमुखास चालले असतील तेणेंप्रमाणें खाऊन वतनाचा मामला चालवून सुखरूप रहाणें. तुम्हांस देशमुखी नूतन करून अजरामरामत दिली म्हणून शेरणी तुमच्या माथां होन पातशाही ५,००० पांच हजार करार केले असत. यांचा वसूल हुजूर घेतला. छ २४ जिल्काद. मोर्तब...हुजूर... ... ...

---

१ मय्या हा शब्द चुकून अधिक लिहिला गेला आहे.

ले. ५ (४०९)]

[श. १६३४ चैत्र व. १३ ता. २२-४-१७१२

श्री

सन ११२१ फसली फेरिस्त नंबर ६

शिक्का

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३८ नंदननामसंवत्सरे चैत्र बहुल त्रयोदशी भोमवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा **शिव** छत्रपति स्वामी यांणीं राजश्री **कृष्णाजी भास्कर** *उपनाम पंडित गोत्र काश्यप यांस दिलें इनामपत्र ऐशी जे. तुम्ही स्वामींचे पुरातन सेवक, स्वामींच्या पायाशीं निष्ठा धरून अंतःकरणपूर्वक सेवा केली. किल्ले **विशाळगड अवरंगजेबानें** हस्तगत करून उदितसिंग रजपूत किल्ले मजकुरीं ठेवून मनसुबी केली, ते स्थळ स्वामींच्या शासनावश व्हावें या गोष्टीचा प्रयत्न तुम्हीं विशेष केला. उदितसिंगाशीं राजकारण करून त्याला खालीं उतरिलें ते समयीं आपला भाऊ **केशव भास्कर** यास उदितसिंगाच्या समागमें त्याच्या देशास जावयास दिलें आणि स्थळ स्वामींच्या शासनावश केलें. ते समयीं तुमच्या विषयीं राजश्री **परशराम पंडित** प्रतिनिधी यांणीं एक गांव इनाम करून द्यावा म्हणून विनंति पूर्वी केली होती, ती सांप्रत तुम्हीं स्वामींची सेवा प्रेमभावें करून स्वामीस संतोषी करून एक गांव आपणास लेंकराच्या लेंकरीं चाले ऐसा इनाम करून दिला पाहिजे म्हणून पन्हाळ्याच्या मुक्कामीं तुम्हीं स्वामीसंनिध विनंति केली, त्याजवरून स्वामी तुमच्या सेवेवरि संतोषी होऊन तुम्हास नूतन इनाम कुलबाब कुलकानू देखील हल्ली पट्टी व पेस्तरपट्टी झाडझाडोरा व जल तरु पाषाण सहित, खेरीज हक्कदार व इनामदार करून मौजे कलबस्तें तर्फ संगमेश्वर देहे, १ एक रास इनाम आजरामरामत करून दिला असे, तरि तुम्ही मौजे मजकूर पूर्व मर्यादेप्रमाणें चतुःसीमा याचे स्वाधीन करून हरदू इनाम तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून स्वामींची सेवा करून सुखरूप राहणें. स्वामी तुम्हास मौजे मजकूर इनाम सुरक्षीत चालवितील. जाणिजे. निशाण निदेश समक्ष "मोर्तब"

---

* हे हल्ली उपनांव जमेनीस लाविताते. यांचें घराणें मलकापुर संस्थान विशालगड व मौजे सालपें तालुके संगमेश्वर येथें नांदत आहे.वंशावळ पहा,मावलंकर सरदेसाई घ. इ. भाग १ पृ. ६८ व भाग २ ते ६८-७१.

ले. ६ (४३८)] [श. १६३४ इ. स. १७१२

श्रीं.

सन ११२२ फसली. फेरिस्त न० ५.

कैफियत शहाजी महाराज भोसले यांची

इब्राहिम आदिलशहा मृत्यु पावले *सन १०३७ हिजरी छ ११ माहे *मोहरम ते समयीं **मिरजा महंमद व दौलतखान** यांणीं तें वर्तमान प्रगट न होऊं देतां दरवाजा बंद करून, सर्व मुत्सद्दी यांस बोलावून सांगितलें कीं, पादशहाचा हुकूम सुलतान **महंमद** यांस माझ्या पाठीमागें तक्तावर बसवणें म्हणून जहाला आहे.त्या वेळीं **दौलतखान** यांणीं **एक**लासखान यांस विचारलें. त्यांणीं " बडे साहेबांस विचारावें, आणि आम्हांस पादशाहाच्या पाठीमागें कारभार करण्याची इच्छा नाहीं. दुर्वेष पादशहा व सुलतान महंमद या उभयतांतून **बिबी बडेसाहेब** यांच्या विचारास येईल त्यांस तक्तावर बसवावें." असें सांगितलें. नंतर तेथून **दौलतखान बिबी** बडेसाहेब यांच्या महालांत जाऊन याप्रमाणें विनंति केली. त्यांणींही सांगितलें कीं, " पादशहाची आज्ञा जहाली असेल त्याप्रमाणें करावें. "

नंतर तेच दिवशीं सुलतान महंमद यांस तक्तावर बसविलें. ते समयीं वय पंधरा वर्षांचें होतें. एकलासखान यास घरास जावें म्हणून सांगितलें. आणि **दियानतुलमुल्क** व **आकारजा** वगैरे ब्राह्मण यांस कैद केलें. आणि इब्राहिम पादशहास यवनी पद्धतीप्रमाणें नेऊन माती दिली.

दुसरे दिवशीं दुर्वेष पादशहा व दुसरा एक होता त्यांस नजरबंदींत ठेविल्यावर **दियानतुलमुल्क** व **आकारजा** व ब्राह्मण यांस कैदेतून मोकळीक करून पूर्ववत् प्रमाणें कामास ठेविलें. आणि मंडळीस किताब दिले ते आकारजा यास काम मुल्की व **दियान**तुलमुल्क यांस सरखेली व मिरजा महंमद यांस मुस्तफाखान व दौलतखान यांस खवासखान असें देऊन वाढविलें.

सन मजकुरी निजामशहा अहंमदनगर ऊर्फ बेदर यांणीं आपला गेलेला प्रांत परत घ्यावा म्हणून फौजेसह तयार होऊन किल्ले दारूर येथें आले. विजापुराहून वजीर यांस समागमें फौज देऊन त्याजवर रवाना केलें. उभयतांची लढाई झाली. बेदरवाले नामोहरम होऊन पळाले. नंतर कांहीं दिवसांनीं फौज घेऊन येऊन विजापूरच्या पादशहाकडील **सि**आदतखान व यतिबारखान यांस धरून नेलें आणि आपल्या रुबरू आणवून वस्त्रें भूषणें व

---

* ता. १२ सेप्टेंबर १६२७.

घोडे देऊन रवाना केलें आणि आपण फौजेसुद्धां कृष्णाकिनाऱ्यास येऊन राहिले. नंतर कांहीं दिवसांनीं हमीदखान यास फौजेसह विजापुरानजीक जाऊन ब्राह्मणपुरीच्या दरवाजाबहून लढाईस प्रारंभ केला. आंतून नबाबखान व एकलासखान व यतियादखान सरनोबत व आणखी सरदार फौज घेऊन बाहेर निघून लढाई झाली. ते वेळेस हमीदखान नामोहरम होऊन पळाले.

नंतर चार महिन्यांनीं वर्तमान आलें कीं, कदमराव संकापूरकर यांणीं बंडाई केली. त्याजवर पादशहा यांणीं मीर अझीरजा यास फौज देऊन रवाना केलें. ते जाऊन पोंहचल्यावर एक वर्षपर्यंत लढाई होत होती. शेवटीं कदमराव यास हिजरी सन १०३८ छे १० रबिलावल रोजीं कैद करून मारिलें.

दिल्लीकडून शहाजहां पातशहा यांणीं वस्त्रें भूषणें शेखमहमुद्दीन याजबरोबर पाठविलीं, तीं सनमजकूर छ १० जमादिलावल रोजीं पावलीं. नंतर कचेरी करून वस्त्रें घेतलीं. मुस्तफाखान म्हणजे महंमदअमीन हे फार दिवस निजामशहाशीं द्वेष करीत होते, कारण मालिक अंबर हे त्याचे श्वशूर त्यांस त्यांणीं मारिलें. यामुळें मालिक अंबर यांचे पुत्र फत्तेखान यांणीं मुस्तफाखान याचे विचारें निजामशाही दौलतीचा विभाग करावा, आणि वरकड सरदार यांच्या चित्तास ही गोष्ट येईना तेव्हां काजी सय्यद रणदुल्लाखान यांजकडील वकील यांणीं कचेरीत येऊन पादशहास सांगितलें जे, इच्छा दूर होऊन निजामशाही[2] तालुका घ्यावा हें योग्य नाहीं. कारण निजामशाही दौलत बुडाली असतां संबंध आपणांस व मोंगल यांस पडेल, आणि कांहीं दृष्टोपत्तीस द्वेष आला असतां कठीण होईल, याजकरितां दौलत निजामशाही कायम राखावी. त्याजवरून मुस्तफाखान व काजीसय्यद यांजमध्यें विरुद्ध वाढलें. खवासखान यांणीं मुस्तफाखान याजपाशीं करार केला. परंतु मुस्तफा यांच्या आग्रहामुळें मोंगलाशीं स्नेह केला, आणि अंबरखान व अलीखान व सर्जेराव घाटगे वगैरे यांस जाहागीर जास्ती देऊन फरहादखान व खेरियतखान व आणखी सरदार यांचा स्नेह करून रणदुल्लाखान यास कुमक मोगलास पाठविली. निजामशहा याजबरोबर द्वेष मुस्तफाखान यांणीं केला आणि मोंगल याशीं स्नेह केला यास्तव सर्व मुत्सद्दी द्वेष करूं लागले आणि खवासखान व मुस्तफाखान यांजमध्येंही विरुद्ध वाढलें. अदीलशहा व मोंगल या उभयतांनीं मुलूक वांटून घ्यावा असें ठरून शेख महमुद्दीन यास वस्त्रें, भूषणें देऊन दिल्लीस रवाना केलें. इतक्यांत वर्तमान समजलें कीं, मोंगल यांणीं आपली क्रिया सोडून किल्ले दारूर कृष्णेच्या काठीं आहे तो घेण्याकरितां फौज मोंगल यांजकडील आली, असें

---

१ तारीख २८ नोव्हेंबर सन १६२८

२ निजामशाही=अहमदनगरवाले- अथवा दौलताबादवाले.

ऐकतांच अदीलशहा पादशहा यांणीं वकिली व पत्र मालिकमरजान यांजकडे पाठवून शेख महमुदीन यांस कैद केलें. हें वृत्त शहाजहां पादशहा यांणीं ऐकून क्रोधायमान होऊन असफखान व अबदुल्लाखान व खाजेजादखान व इरादतखान व अबदुल हसन बक्षी व आकिदतखान व राजे ला ज शिंग व राजे राम हे फौज देऊन या मोहिमेस रवाना केले. असफखान हसनाबादपर्यंत येऊन प्रांत लुटण्यास प्रारंभ केला आणि विजापुराकडील नजीक हाउद रजोरंग म्हणून आहे तेथें येऊन राहिले. अदिलशहा याजकडील फौज बाहेर येऊन दररोज लढाई होत होती. मोंगलाकडील सरदार शिकंदर अली छ २ माहे शाबान रोजीं लढाईत पडले. नंतर छ ९ माहे मजकुरीं फौज तयार होऊन शहरच्या आसपास आली आणि लढाईस प्रारंभ केला तो अदिलशहाची फौज हतधैर्य होऊन एकाएकीं बाहेरील फौज पडून लढाई दिली. ते समयीं ती फौज घाबरी होऊन पळाली, तों आंतून मुरारपंत फौज घेऊन पाठीवर चालले तों ती फौज आपल्या सरहद्दीत गेली. नंतर मुरारपंत फिरून किल्ले परंडा येथें राहिले. तो किल्ला विजापुराकडे होता याचें कारण पूर्वी आकारी जवान किल्लेदार निजामशाही तेथें होता, तेव्हां निजामशहा याची दौलत गिरिफ्तारींत आली, यामुळें तो किल्लेदार अदिलशहा याजकडे मिळून हिजरी सन १०४२ छ १० माहे मोहरम रोजीं किल्ला दिला. त्या किल्यावरील तोफ मुलुख मैदानै होती ती विजापुरास पोंहचवावी म्हणून पादशहाचा हुकूम मुरारपंतास झाला. त्या प्रमाणें तोफ सन मजकुरीं छ १५ माहे सफर रोजीं गरबी बुरुजावर ठेवली.

त्या समयीं असफखान यांचा मोड होऊन पळाले, हें वृत्त शहाजहांस कळून बहुत हैराण झाले, आणि मोहबतखान यांस लाहोरहून आणवून बऱ्हाणपूरचे साहेब सुभा व फौज देऊन दक्षिणेस पाठविले. फत्तेखान यांणीं निजामशाही दौलत जप्त केली. हें वर्तमान

---

१. मुलुख इ मैदान = मैदानचा सिंह. मलीक इ मैदान=मैदानचा राजा. दुसरें नांव बरोबर आहे असें ग्रांटडफ् साहेबांचें म्हणणें आहे. ह्या तोफेच्या तोंडाचा व्यास ४ फूट ८ इंच आहे व पोकळीचा व्यास २ फूट ४ इंच आहे. सन १८२३ सालीं ही तोफ विलायतेस नेण्याचा विचार चालला होता, पण मुंबईपर्यंत आणण्याचे संबंधें रस्त्याची वगैरे अडचण म्हणून तो तसाच राहिला. औरंगजेबानें स० इ० १६८६ मध्यें विजापूर घेतलें त्या वेळीं आपल्या विजयाच्या स्मरणार्थ ह्या तोफेवर एक लेख खोदिला. ह्या वरून ही तोफ त्या सालीं ओतिली असा कितीकांचा समज होतो पण तो चुकीचा आहे. ही स० इ० १५४९ सालीं अहमदनगर येथें चलिबी रूमीखानानें ओतिली. (पहा मु. रि १।२७१)

२ फत्तेखान हा मलीक अंबर यांचा मुलगा. हा पहिल्यानें विजापूरवाल्यांच्या धाकानें मोगलांच्या स्वाधीन झाला व दौलताबाद किल्ला त्याणें मोगलांच्या ताबेत दिला. पण पुढें पुनः फत्तेखान मोगलाकडून विजापूरवाले यांस मिळाला. शाहाजीची जहागीर फत्तेखान यांस मोगल यांणीं लावून देऊन त्यांस निझामशहाचा मुक्त्यार नेमिलें होतें; त्यामुळें शहाजीचें व फत्तेखानाचें वांकडें होतें.

मोहबतखान यांस समजल्यावर दौलताबादेस गेले. हें वर्तमान आदिलशहा यांणीं ऐकून फौजेसुद्धां या मोहिमेस निघाले. मोहबतखान दौलताबादेस जाऊन तें शहरपन्ना घेऊन किल्ला घेण्याच्या तरतुदींत होते. आंतून फत्तेखान यांणीं अदिलशहास पत्र लिहिलें कीं, आपल्याकडून कांहीं कुमक येऊन पोंहचली असतां परचक्राचा पराभव करून किल्ला पादशहाच्या हवाली करितों. कारण किल्ल्यांत सामान व सरंजाम कांहीं नाहीं. याजवरून पादशहा यांणीं खवासखान यांस सांगितलें. त्यांणीं आज्ञेप्रमाणें फौज व सामान मुरारपंतासमागमें* देऊन रवाना केलें. आणि मुरारपंतास सांगितलें जे, जातांच सामान पोंहचतें करून कुमक करावी, आणि कपेंहि करून किल्ला दौलताबादेचा मोहबतखान यांस हस्तगत होऊं देऊं नये. मुरारपंत दौलताबादेजवळ येऊन पोंहचले. फत्तेखान यांणीं लढाई बंद केली, कारण फत्ते जहाली असतां पादशाही पत्र त्यांच्या नांवें येईल. फत्तेखान यांणीं मुरारपंतास लिहिलें कीं, किल्ल्यांत कांहीं जखीरा व सामान नाहीं तरी जलद पाठवावें. यांणीं लिहिलें जे, तुम्हीं जखीरा मागण्याचें कारण काय? तुम्हांस याविषें गरज नाहीं. किला आमच्या स्वाधीन करून बाहेर जाणें.नाहीं तरी तुम्हांस कैद करून दौलताबादेच्या बुरजावरून खंदकांत टाकवीन.फत्तेखान यांणीं मुरारपंत ऐकत नाहीं सबब मोहबतखान यांजकडे मिळाले आणि त्यांस पत्र पाठविलें जे, तुम्हीं आमची कुमक केली असतां किल्ला तुमच्या स्वाधीन करितों. त्याजवरून मोहबतखान यांणीं विचार केला कीं, कांहीं प्रयत्न न करितां किल्ला हातास येतो म्हणून पत्राचें उत्तर व क्रियाशफती देऊन हरकामांत कुमक करितों म्हणून सांगून पाठविलें. नंतर किल्ला त्याच्या स्वाधीन केला. तेथें आपल्या पुत्रास ठेवून निजामशहा व फत्तेखान यांस बरोबर घेऊन बऱ्हाणपुरास निघाले आणि किल्ला लढाई व श्रम सायास न करितां आला यास्तव व लष्कर श्रमी झालें याजबद्दल दररोज कोश दोन कोश चालावें. हें वर्तमान अदिलशहा यांणीं ऐकून त्यांच्या पाठीवर सरदार फौज देऊन रवाना केले ते आल्यावर मोहबतखान यांणीं द्रव्य देऊन आपली व लष्करची मोकळीक करून घेतली, आणि आपल्या सरहद्दींत पोंहचले.

शहाजी महाराज व मुरारपंत व रणदुल्लाखान मागें फिरून शहाजी महाराज नाशिकाकडून भीमगडास गेले, रणदुल्लाखान व मुरारपंत त्र्यंबकाकडून विजापुरास आले; खवासखान मुरारपंतावर बहुत रागास येऊन बोलले कीं, तुम्हीं फत्तेखान याचें न ऐकतां किल्ला मोहबतखान यांस देविला आणि पादशाही द्रव्यही बहुत खर्च झालें; मुरारपंत कांहीं एक उत्तर न देतां स्वब्ध बसले; पादशहांत निजामशाहींवर पादशहा नाहीं; याजमुळें आदिलशहा व शहाजहा हे उभयतां तो मुलूख घेण्याचा प्रयत्न करूं लागले, आणि सिद्दी रेहान सोलापुरी होते; शहाजी महाराज भीमगडीं होते, श्रीनिवासराव जुन्नरास

---

* मुरारपंत—हा मोठा कर्ता ब्राह्मण होता; बाबल, जनार्दनपंत, अक्कण्णा व मादण्णा वगैरे मंडळीप्रमाणेंच बहुतेक सर्व कारभार याजकडे असे.

होते, सिद्दी साया सैफखान तळ कोंकणांत होते, सिद्दी अंबर, जंजिरा राजपुरी होते आणि दुसरे किल्लेदार व जमीदार आपलाले ठिकाणीं प्रांत घेण्याच्या उद्योगांत होते. सिद्दी रेहान थोड्या फौजेनिशीं मोहबतखान याजशीं युद्ध करून यश संपादिलें, आणि निजामशाही स्वार चार पांच हजार त्याजपाशीं जमले होते. खवासखान यांचा स्नेह पूर्वीपासून होताच, त्या वेळेस अदिलशहा याचीं फर्मान लिहून हाफीजनसरुल्लाह याजबरोबर पाठविला जे, "तुम्ही पुरुषार्थें करून मोहबतखान याजबराबर लढलां यास्तव तुम्हावर संतोष होऊन फर्मान पाठविला आहे. तरि फर्मान देखतांच कोणी विश्वासूख इकडून पाठवून देणें म्हणजे जें बक्षिस मिळावयाचें तेंही प्राप्त होईल." नंतर हाफीजनसरुल्लाह याचा सन्मान बहुत करून त्याजबराबर आपल्याकडील सिद्दी पोलाद दौलतखान व न्यामतखान व विनंतिपत्र देऊन रवाना केले. ते येऊन पावल्यावरि पादशहा व खवासखान यांणीं त्यांस कोल्हापूर व कन्हाड हे परगणे दिले. आणि पोलादखान व दौलतखान यांस जवळ राहण्याविषयीं हुकूम झाला.

शहाजी महाराज भीमगडीं जातांच निजामशाही प्रांत पुणें व जालना बालेघाटपर्यंत व जुन्नर व अहंमदनगर व संगमनेर व नाशिक व त्र्यंबकपर्यंत घेतले. आणि सात आठ हजार स्वार ठेवून प्रांत लुटूं लागले. इरादतखान दौलताबादेस होते. त्यांस मालोजी भोंसले यांजकडून स्नेह केला आणि उमेदवार शहाजहां पादशहा याच्या कृपेचे म्हणून मनसब बेवीस हजारी करार करून फर्मान शहाजी महराज यांच्या नांवें व वस्त्रें पादशहाचीं आणून दिलीं. आणि शहाजीमहाराज ज्याप्रमाणें सांगतील त्याप्रमाणें दिल्लीहून आणवून देऊन शहाजहांचे चाकर करून विजापूरच्या पादशहाचा मुलूक [?] असें इरादतखान याच्या चित्तांत होतें. हें वृत्त महाराजांस समजून हे हुशारच होते. मुरारपंतांस न कळतां खवासखान याजकडून कागदपत्रें येत होतीं. शहाजी महाराज यांणीं लिहिलें कीं, तुम्हाकडून कांहीं उपराळा जहाला असतां आम्हीं पुनरपि निजामशाही उभी करितो. त्यास खवासखान याच्या चित्तांत होतें, परंतु मुस्तफाखान याच्या विचारास येईना. खवासखान दौलताबादेस गेले. अजुर्देपणानें इरादतखान याशीं स्नेह केला आणि शहाजीमहाराज यांचें भय होतें, परंतु ही मसलत, याजवरून बहुत संतोष वाटला. आणि पत्राचें उत्तर पाठविलें कीं, वंश निजामशाही म्हणून गादीवर बसवावें. असें लिहिलें. मुरारपंत याजबराबर फौज देऊन कुमकेस शहाजी महाराजाकडे रवाना केलें. शहाजी महाराज श्रीवर्धन किल्याहून निघून कोंकणांत जाऊन निजामशाही वंश कैदेंत होते त्यांतून दहा वर्षांचा मूल मुरतजा नामें होता त्यास आणून भीमगडीं येऊन तक्तावर बसविलें आणि प्रांत घेण्याच्या उद्योगास लागले. सिद्दी साबा सैफखान कोंकणप्रांत घेऊन भीवंडीस होता, त्यांस शहाजी महाराज यांणीं पत्र आपल्या व मुरारपंत यांच्या नांवें तुम्हीं निजामशहास येऊन भेटावें असें लिहिलें. तेव्हां महाराजांच्या लिहिण्यास राजी न होतां आदिलशहाची चाकरी करावी म्हणून कोंकणप्रांत शहाजीमहाराज यांच्या स्वाधीन करून निघाले. तो शहाजी महाराज यांणीं फौज त्याच्या पाठलागास

पाठविली. तेव्हां उभय लष्करची गांठ पडून युद्ध होऊं लागलें. दोहींकडील मनुष्यें बहुत जायां झालीं. सिद्दी अंबर तोफखान्याचा सरदार होता त्यास कैद केला, आणि सैफखान याच्याही फौजेस वेढा दिला. इतक्यांत मुरारपंताकडील फौज कुमकेस येऊन सैफखान यास घेऊन नंतर विजापुरास जाऊन पादशहाची भेट घेतली. बादशहानी त्यास दोन ल होन देऊन हरपनहल्ली येथें ठेविलें. नंतर कांहीं दिवसांनीं मृत्यु पावले. शहाजी महाराजांनीं श्रीनिवासराव यास मेजवानीस बोलावून कैद करून त्यांजकडील किल्ले व प्रांत घेऊन मुरतजा पादशहास जुन्नरास घेऊन येऊन द्रव्य व सरंजामही बहुत संग्रह केला. दहा बारा हजार स्वार जमविले.

हें वर्तमान मोहबतखान यास कळून, बहुत क्रोधायमान होऊन, शहाजहां पादशहा याच्या आज्ञेवरून शहाजादा § दारुशकोह यास बऱ्हाणपुराकडून परंडे कित्यास वेढा घातला आणि सुरंग काढण्यास सांगितला. कित्यांतील फौज तयार होऊन युद्ध करीत होते. असें चार महिने युद्ध चाललें. ते समयीं मोहबतखान यांणीं विचार केला कीं, येथें बसून उपयोग नाहीं. म्हणून कांहीं निमित्त करून बऱ्हाणपुरास गेले.

सुलतान महंमद याची मातुश्री हिजरी सन १०४३ छ ३ माहे सफर रोजीं मृत्यु पावली. ते समयीं खवासखान यांणीं मुस्तफाखान यास कैद केलें. आणि वरकड मुत्सद्दी यांसही दूर केलें आपल्या तर्फेचे त्या कामावर ठेविले. तेव्हां मुत्सद्दी यांणीं खवासखान यास पत्र लिहिलें कीं, मुरारपंत कामास योग्य नाहीं, याकरितां त्यास काशीस जाण्यास निरोप द्यावा म्हणजे आम्ही तुमच्या पक्षानीं वागतों. तेव्हां यांणीं लिहिलें जे, तुम्हीं आज त्यास राजी नाहीं. उद्यां आम्हांसही राजी नाहीं. म्हणून असें उत्तर आलें. त्याजवरून सर्वत्रांनीं शेख महमुदीन यास शहाजहांकडे रवाना केलें कीं, विजापुरीं बहुत अव्यवस्थितपणानीं वागतात याजकरितां कुमकेस फौज पाठवून, बंदोबस्त करून, विजापूर आपल्या ताब्यांत घ्यावें आणि अल्ली खैरयतखान व अल्ली खुदावंतखान व महंमद याकुबखान व राघोपंत व खेलोजी भोसले व सर्जेराव घाटगे वगैरे विजापूरच्या सरहद्दींतून निघून गुलबर्ग्यास येऊन राहिले. इमामखान हवालदार आनिकेरचा यांणीं बंड केलें. त्याच्या पारिपत्यास खवासखान यांणीं मुरारपंत व फौज रवाना केली. आणि कांहीं फौज मुत्सद्दी यांच्या रोखास ठेविली.. मुत्सद्दी यांणीं विचार करून खवासखान याच्या पारिपत्यास विजापुराकडे निघून मलिक रेहान सोलापुराहून निघून कमलापुरीं येऊन मिळाला. राघोपंतास सांगितलें कीं, तुम्ही भीमानदी भरली आहे, त्यास पलीकडे जाऊन उतरावें, आम्हीही येऊन पोहचतों. नंतर राघोपंत गेले. खवासखान यांणीं मलिक रेहान याजबराबर राजकारण लावून बोलणें लाविलें जें, " रणदुल्लाखान वगैरे हे दौलत गारत करण्यास तत्पर जहाले. तुम्हीं दौलतीचें कल्याण करणारे तेव्हां

§ ग्रांटडफ म्हणतात शहाजादे सुजा यांस पाठविलें.

हें योग्य नव्हे." मालिक रेहान हें ऐकून टाकळीहून निघून मंदप येथें गेलें. राघोपंत भीमा उतरून पांच सहा हजार फौजेनिशीं देवगांवच्या सुमारें राहिले. मुरारपंत बंड मोडून निघाले तों राघोपंताचें वृत्त ऐकिलें. तेव्हां विचार केला कीं, ते सर्व एकत्र झाले नाहींत तों पर्यंत जाऊन गांठावें. असें योजून आनीकरेहून एकतीस कोश एक रोज व रात्रींत येऊन लढाई सुरू केली. सय्यद उसमान, शेलार मोठे बहुत शूर मुरारपंताकडील ठार झाले आणि राघोपंताकडील लष्कर मुरारपंतावर पडून बहुत जायां जखमी जहालें. लष्कर पळूं लागलें तेव्हां मुरारपंत पंधरा स्वारानिशीं सावनुरास जाऊन, तेथें निजामशहा कडील मुस्तफाखान होता त्याची भेट घेऊन, तेथून निघून द्वारकेस[1] गेले. तेथून मौजे मदगी रणदुल्लाखान यांच्या जहागिरींतील लुटून कृष्णातीरीं येऊन राहिले. तेव्हां सर्वांनीं विचार करून खवासखान याजकडे विजापुरास जावें. म्हणून तो धारवाडचे नाईकवाडी याजबरोबर नदी उतरून धारवाडास गेले. रणदुल्लाखान यास मुरारपंताचा मोड होऊन पळाले. हें वर्तमान समजतांच आपण फौजेनिशीं भीमा उतरून विजापुरानजीक जाऊन राहिले. खवासखान यांणीं विजापूरचे दरवाजे बंद करून लढाईचा बेत केला, रणदुल्लाखान यांणीं खवासखान यास निरोप पाठविला जे, शहरचे दरवाजे उघडावे आणि तुम्हीं सर्व अमिराप्रमाणें रहावें, तें त्यांणीं ऐकिलें नाहीं. तेव्हां अदिलशहा यांणीं सिद्दी रेहान यास बोलावून आणून सांगितलें जे, या वेळेस कार्य साधावयापूर्वी सिद्दी मजकूर व मातुश्री इब्राहिम आदिलशहा यांच्या कारकीर्दीत नौरसपूर येथें विकावयास सौदागरांनीं आणिले तेव्हां सिद्धीमजकूर पादशहानीं खरेदी घेऊन आपले पुत्र सुलतान महंमद यास दिला व त्याच्या मातुश्रीस अक्कीखान हजारी यांणीं घेतली. त्या पासून शहाजाद्या बराबर सिद्दी मजकूर नेहमीं असे. एके दिवशीं शहाजादे यांणीं त्याची टोपी हौदांत टाकली तेव्हां तो पादशहाकडे फिर्याद गेला. पादशहा यांणीं टोपी काढून देण्यास सांगितलें आणि जवळ होते त्यांस सांगितलें कीं, पादशाही सुलतान महंमद करील तेव्हां हा वाजिरी करील. तेव्हां सिद्दी मजकूर यांणीं करीम सर्जे व हुसेनखान या दोघांस हस्तगत करून खवासखान याच्या पारपत्यास तयार होऊन कचेरींत बसले. खवासखान पालखींत बसून घरास निघाला तों करीम सर्जे यांणीं उरावर खंजीर मारला हुसेनखान यांणीं वार मारला असतां खवासखान जखमी होऊन आपल्या घरास गेला. सिद्दी रेहान यांणीं पाहिलें कीं, खवासखान जखम सोसून गेला तेव्हां हा वांचला असतां आपल्यास नीट नाहीं. म्हणून पादशाहाकडे जाऊन खाजगीचे लोक घेऊन जाऊन खवासखान याचें घर लुटून पाडून शिरच्छेद केला. हुसेनखान तयार होऊन हत्तीवर बसून खंदकापर्यंत आला. त्यांस सिद्दी मजकूर लोकांसुद्धा जाऊन लोक मारून त्यास मारिला. त्याचा बंधू दाऊदखान पादशहाच्या कृपेंत होता त्या सही मारला. रणदुल्लाखान वगैरे मुत्सद्दी पादशहाच्या आज्ञेनें त्याच रात्रीं येऊन शहापूरच्या हौदावर येऊन उतरले. तेव्हां पादशाहानीं खवासखान व मुबरकखान यांचें शीर पाटींत घालून रणदुल्लाखान वगैरे मुत्सद्दी यांजकडे पाठविलें. दुसऱ्या दिवशीं सर्वत्र

---

१ या धामधुमींत द्वारकेस जाऊन परत दक्षिणेंत आलें हे मोठें नवल आहे.

आल्यावर पादशहा तक्तावर बसून सिद्दी रेहान यास किताब पवलासखान हा देऊन वजिरी दिली. नबाबखान यास प्रांतांचा बंदोबस्त सांगितली. अहंमदखान बक्षद खुदावंतखान यास सरनोबती दिली. हिजरी सन १०४५ त खवासखान यांणीं वजिरी आठ वर्षे केली.

नंतर कांहीं दिवसांनीं मुस्तफाखान बेळगांवच्या किल्ल्यांत कैदेंत होता त्यास आणावयाकरितां शहाहसन फकरजाबादेस रवाना केले. त्यांणीं जाऊन नववे दिवशीं त्यास विजापुरीं पोंहचविलें. त्यास पादशहांनीं सर्फराजी करून ठेविले. मुरारपंत पांच हजार स्वारांनिशीं धारवाडास आले तों किल्लेकरी यांणीं किल्ल्यांत घेतलें नाहीं. तेव्हां लढाईस तयार झाले. ते समयीं दलपतराव व सूर्याराव व नाईकवाडी क्रियाप्रमाण घेऊन भेटीस आले. नंतर कैद करून कांहीं लोक मारिले. पण तेथें चार रोज राहूं न दिलें. तों खवासखान यास मारलेली खबर आली. तेथून रात्रीस पळून हरिहरास गेला. तेथील अंमलदार यांणीं कैद करून विजापुरीं पोंहचविला. तेव्हां रुबरु पादशहास शिवीगाळ केली त्याजमुळें जिव्हाच्छेद करून गाड्यावर बसवून शहरांत फिरवून मारिला. खवासखान यास मारिल्यावरि एक माहिन्यानें हें वर्तमान झालें. हिजरी सन १०५७ त मुस्तफाखान यास फौज देऊन कर्नाटकास रवाना केलें. पेशजी शहाजी महाराज व असदखान यास रवाना केलें. मागून मलिक रेहान वगैरे सरदार रवाना केले. कृष्णाकिनाऱ्यास युद्ध झालें. शहाजी महाराज यांणीं मोड केला. ते समयीं शहाजी महाराजांचा हत्ती आणि सरंजाम लुटून नेहला. मुस्तफाखान यांणीं आपल्या लष्करचें बुनगे बंकापुरास पोंहचवून कुमक पाठवावी म्हणून पादशहास पत्र लिहिलें. गाजीखान व मलिक रेहान गंजीकोट घेण्यास रवाना केले. ते तेथें जाऊन वेढा घालून बसले होते. ते समयीं हुकूम आला जे, मुस्तफाखान याच्या कुमकेस जाणें. तेव्हां ते सर्व सोडून तिकडे निघून गेले. तो बंकापुराजवळ नबाब मुस्तफाखान यांची भेट झाली. मुस्तफाखान सर्वांस मेजवानी करून लढाईस निघाले. येलूर येथें लढाई सुरू झाली. मलिक रेहान यांणीं आपली फौज एक वेळ शहाजी महाराज असदखान यांच्या फौजेवर पळून मोड करावा असा बेत करून चालून घेतलें. असदखान याच्या घोड्यास जखम लागून घोडा पडला. बावाकरी व खवाजहुसेन यांणीं कोतवाल घोडा आणिला त्या घोड्यावर बसून निघाले. नबाब मुस्तफाखान लष्कर सुद्धां तळ्याच्या कांठीं उभें राहून तमाशा पहात होते. तेथून मागें सरून मलिक रेहान याचा तमाशा पहावा म्हणून मागें सरून उभें राहिलें. इतक्यांत मलिक रेहान मोड होऊन पळाले. आल्यावरि नबाब यांणीं शाबासकी देऊन आपली तरवार दिली आणि मलिक रेहान यास सांगितलें कीं, तुम्ही शहाजी महाराजांकडील हत्ती लुटून ठेविले ते पादशहाकडे पाठवावे. त्यांणीं उत्तर दिलें जे, तुम्हांकडे हत्ती देणार नाहीं. पातशहाकडे आम्ही जाऊं त्या वेळेस हत्ती गुजरूं. हें वर्तमान पादशहास समजल्यावर मुस्तफाखान यास लिहिलें जे, मलिक रेहान यांणीं शूरत्वें लढाई केली हें प्रसिद्ध झालें असतां त्याचें चित्त अजुर्दा करणें हें योग्य नाहीं. जे वेळेस येथें येईल त्या वेळेस हत्ती येतील. असें येतांच मुस्तफाखान चंदीकडे

निघून गेले. मलिक रेहान यास कन्या दोन उपवर झाल्यामुळें लग्नें करण्याकरितां मुस्तफाखान याजबरोबर गेले. नबाब व शहाजी महाराज यांजमध्यें वैमनस्य येऊन शहाजी महाराज मुक्कामारीनें वागूं लागले. सन मजकूर छ १५ माहे रज्जब रोजीं मुस्तफाखान यांणीं मलिक रेहान व बाजीराव घोरपडे व यशवंतराव व असदखान यांस फौज देऊन शहाजी महाराजांस कैद करण्यास रवाना केलें. तो शहाजी महाराज आपल्या डेऱ्यांत रात्रौ राग-रंगांत निमग्न होते. तों येऊन वेढा घातला. शहाजी महाराजांस हें वर्तमान कळतांच घोड्यावर बसून जावे तों बाजीराव घोरपडे यांणीं येऊन पाय धरिला आणि मुस्तफाखान याजकडे घेऊन गेले. महाराजांचे स्वार तीन हजार होते ते पळून गेलें लूट पुष्कळ सांपडली. छ २६ माहे मजकुरी खैरीयतखान मेला. मलिक रेहान मुस्तफाखान याचा विश्वास धरीत नव्हता. भेटीस गेले असतां बहुत हुशारीनें रहावें शहाजी महाराजांस धरल्यावरि आणखी दोन हजार स्वार ठेविले. मुस्तफाखान यांणीं सांगून पाठविलें कीं, फाज ठेविण्याचें कारण काय ? यांणीं सांगून पाठविलें जे, चंदीस वेढा आणि शहाजी महाराज कैदेंत, चहुंकडून गलिम असे जाहे. त्यास कोणाकडून कांहीं भय न होईल याजकरितां ठेविलें. नंतर कित्येक दिवसांनीं चंदी घेतली. छ २६ माहे मोहरम सन १०६० सोमवारीं तिसरे प्रहरीं सुलतान महंमद आदिलशहा मृत्यु पावले, वय वर्षें ४७ दौलत केली वर्षें ३१.

यास पुत्र अल्ली आदिलशहा सन १०४८ सालीं झाले ते गादीवर बसले. पूर्वीचा वजीर अजब खानमहमद यास मारून वजिरी इब्राहिमखान यास दिली. अल्ली आदिलशहा याची मातुश्री बडेसाहेब मक्केस निघाली त्याजबर वजीर गेले. तेव्हां वजिरी अबदुल महमद यास दिली.

हकीकत खान यास मारण्याची

शहाजहा पादशाह नजरबंदींत होतें. अवगरंजेब फौज घेऊन दक्षिणेस निघाले. हें वर्तमान अल्ली आदिलशहा यांणीं ऐकून खानमहंमद याजबरोबर सरदार व फौज देऊन सामोरे रवाना केले. ते जाऊन पोंहचले. एके दिवशीं अवरंगजेब यांची फौज अडचणीच्या जागीं उतरली. तेव्हां खानमहंसद यानीं रस्ता बंद केला. सबब बहुत हैराण होऊन पादशहानी त्यास चिठी पाठविली कीं, तुम्ही आमची मुरवत ठेवून रस्ता सोडला असतां स्नेहांत अंतर करणार नाहीं, आणि दिल्लीचा शहाजादा दक्षिणेस कोणही पहाणार नाहीं खानमहंमद संध्याकाळीं नमाज करून कांहीं पढत बसले होते तो ही चिठी आली. तिच्या पाठीवर लिहून पाठविलें कीं, आज रात्रीस निघून जावें अशी रवाना करून आपल्या मंडळीस सांगितलें कीं, आमचा मृत्यु समीप आला. अवरंगजेब रात्रीस निघून गेले. अफजुलखान बहुत कठोर होता, त्याणीं हें ऐकतांच खानमहंमद याजपाशीं येऊन सांगितलें जे,हा समय आहे, तरि जाऊन गांठूं. खान महंमद यांणीं उत्तर दिलें कीं, गेला, तो गेला जाऊं द्या. अफजुलखान बोलले कीं, कोठें जातो ? पाठलाग केला असतां सांपडेल. खानमहंमद यांणीं विचा-

रिलें जे, त्यास धरून काय करील ? शहाजादा दिल्लीचा त्यास धरिलें असतां बहुत अरिष्टें होतील, असें सांगून तसेंच ठेविलें. अफजुलखान यांणीं विचार केला जे, हें करणें खानमहंमद याचें. तेव्हां क्रोधायमान होऊन विजापुरास जाऊन तरवार पादशाहापुढें ठेऊन हा सर्व मजकूर विदीत केला. पादशहा बहुत अजुर्दा होऊन खानमहंमद यास येण्यास पत्र पाठविलें. तेव्हां त्यांणीं हलके हलके मुक्काम करून विजापुरास आले. तो मक्केदरवाजाच्या लोकास हुकूम होतांच येतांच मारिलें. सन १०६७ हिजरींत.

कोकणप्रांत चेऊल व दाभोळ व वेंगुर्ले व साळसी व को वा वगैरे बंदरें विजापुराकडे होतीं. पूर्वी दौलत निजामशाही बुडविली तेव्हां प्रांत शहाजहांपादशहाकडे निम्मा व सुलतान महंमद अदिलशाह याजकडे निम्मा वांटून घेतला. तेव्हां सारा कोकणप्रांत विजापुराकडे आला. त्याची मामलत मुल्ला महंमद यास सांगितली आणि त्यापैकीं दोन महाल पुणें व सुपें शहाजी महाराजांस जहागिरींत दिले होते. तेथें शहाजी महाराज जमेदाराप्रमाणें वतनदारी करून राहिले. सुलतान महंमद यांणीं कर्नाटक प्रांत घेण्यास सर्व सरदार फौज देऊन रवाना केले त्या समयीं शहाजी महाराजही गेले. तिकडे वडील पुत्र संभाजीराजे मृत्यु पावले. शिवाजी महाराज त्या दोन महालची वहिवाट करून पुणें मुक्कामीं रहात होते. पादशहा सुलतान महंमद यास रोग उत्पन्न होऊन अंतकाळ समीप आला. त्याजमुळें प्रां(तां)त शत्रूंचा उपद्रव बहुत झाला.सबब *मुल्ला अहंमद यास कोकणांतून येण्याविषयीं हुकूम जहाला. त्याजवरून तेथून विजापुरीं आले. तो प्रांत मोकळा पाहून, शिवाजीराजे यांणीं तजवीज करून, कित्येक मराठे जमवून कित्येक किल्ले घेतले. बाकीचे किल्ले सरंजामविरहित होते ते हलके हलके घेतले. इतक्यांत पादशहाचा काळ जहाल्याचें वर्तमान ऐकून बहुत संतोष होऊन कोकण प्रांत घेतला आणि किल्ले नवे बांधावयास लाविले. पूर्वीपासून चाळीस किल्ल्यांवर सामान भरलेलें होतें त्यांपैकीं रायरी किल्ला घेतला. तेव्हां त्यांच्या पारिपत्यास अल्ली अदिलशहा यांणीं अफजुलखान यास रवाना केलें ते जाऊन लढाई देऊन किल्ले सोडून घेतले. तेव्हां शिवाजी महाराज यांणीं विचार करून बोलणें लाविलें कीं, आमचे सर्व अन्याय पादशहाकडून क्षमा जहाल्यास आणि पादशहाची भेट करविली असतां पूर्वीप्रमाणें चाकरी करूं. तेव्हां अफजुलखान यांणीं बरें आहे म्हणून सांगितलें. नंतर त्यास मेजवानीस जावली किल्ल्यावर यावें म्हणून सांगून पाठविले. तेव्हां तो निघोन आला. येतांच त्यास मारिला. सन १०७० हिजरींत.

हें वृत्त पादशहास समजल्यावर बहुत क्रोधायमान होऊन कोणास पाठवावें या विचारांत होते तों सिद्दी जवाहर कर्नुळास बंड करून होते. त्यांची अर्जी आली जे, सर्व अन्याय क्षमा करून अभय जहाल्यास सवेशीं येऊन हजर होईन. पादशहांनीं उत्तर लिहिलें कीं तुम्ही म्हणतां तें कबूल, तरि जलद येऊन पोंचावें. त्याजवरून सिद्दी मजकूर आले. त्याची सरफराजी करून किताब सलाबतखान देऊन शिवाजी महाराज यांच्या पारिपत्यास रवान

* वर मुल्ला " महंमद " असें आहे.

केलें. नंतर येऊन लढाई देऊन कित्येक किल्ले घेतले. शिवाजीराजे पन्हाळ्यास येऊन राहिले. सिद्दी मजकूर किल्ल्यास वेढा घालून बसले. तो महाराज यांणीं स्नेहाचें बोलणें लावून आपल्या आधीन केला. हें वर्तमान पादशहास समजतांच खुद्द पादशहा निघाले ते मिरजेस येऊन पोंहचले. हें वर्तमान शिवाजी यास कळतांच निघोन गेले. सिद्दी मजकूर करनुळाकडे गेले. किल्ला पादशहाच्या स्वाधीन जहाला. सन १०७७ हिजरी.

नंतर पादशहा विजापुरास निघोन गेले. सिद्दी जवाहर पन्हाळ्याहून निघाला तो प्रांत लुटीत खंडणी घेत चालला. त्याच्या पारिपत्यास खुद्द पादशहा फौज घेऊन निघून कृष्णेच्या तटाकीं राहिले. तों खबर आली कीं, सिद्दी याकुत हवालदार तोरगळकर यांणीं बंड केलें. तेव्हां तिकडे जाऊन त्याचें पारपत्य करून रायचुरास गेले. सिद्दी जवाहर लढाईस तयार होऊन आले. अबदुल महंमद वजीर जाऊन युद्ध होऊं लागलें. सिद्दी मजकूर याची फौज सिकस्त होऊन रायचुरास गेले. तेथें एक रात्र राहून दुसऱ्या दिवशीं तुंगभद्रा उतरून करनुळाकडे गेले. पादशाहा यशस्वी होऊन रायचुरास गेले. तेथें किल्लेदार सिद्दी मजकूर याजकडील होता त्याणें विचार करून किल्ला पादशहापाशीं आणून दिल्या, आणि कृपा संपादून घेतली. नंतर पादशहा किल्ल्यांत गेल्यावर मुसलखान व जबदस्त यास हुकूम जहाला कीं, फौज घेऊन जाऊन परंडे किल्ल्याच्या सुमारें राहून सिद्दी मजकुराकडून उपद्रव जहाला असतां पारपत्य करावें. सरदार मजकूर हुकुमाप्रमाणें तुंगभद्रा उतरून राहिले. ती फौज आली या करितां सिद्दी मजकूर फार क्रोधायमान होऊन सिद्दी मसाऊद याजबराबर फौज देऊन रवाना केला. तो आल्यावर उभय लष्कराचें युद्ध होऊन सिद्दी मजकूर याचा मोड होऊन करनुळाकडे पळून गेला. हें वर्तमान सिद्दी जवाहर ऐकून फार खिन्न जहाला. त्यास पूर्वी रोग लागला होता आणि हें दुःख झालें यास्तव बहुतच रोगानें ग्रासून त्यांतच मरण पावला. नंतर त्याचा पुत्र अबदुल अजीज व सिद्दी मसाऊद यांणीं अबदुल महंमद वजीर यांचा स्नेह केला. त्यांणीं पादशहास सांगून सर्फराज करून चावरीस ठेविलें.

हिजरी सन १०७३ यांत भद्राप्पा नाईक राजे जमीदार मुल्नार सुभे बिदनूर यांणीं बंडाई करून पादशाही मुलूक घेतला सबब खुद्द पादशाहा तयार झाले आणि पुढें त्याच्या पारपत्यास सय्यद इलपास यास सर्जेखान हा किताब देऊन फौजेसह रवाना केलें. मागाहून आपणही गेले. सर्जेखान तेथें जाऊन लढाई देऊन कित्येक किल्ले परत घेतले. पादशहाही बंकापुरास येऊन पोहोचले. हें ऐकून बहुत संतोष होऊन युद्ध करूं लागले. कर्नाटक प्रांत घेण्यास अबदुल रहीम बहलूलखान यास पाठविलें होतें, त्यास हुजूर येणें म्हणून आज्ञापत्र पाठविलें. त्याजवरून ते आले. त्याची सर्फराजी करून सेनेसहीत सर्जेखान याजकडे निघाले. सर्जेखान बिदनुरीं लढत होते तेथें जाऊन फौज मिळाली. भद्राप्पा नाईक धीर सोडून बिदनुरांतून कोलीदुर्गास गेले. बिदनूर घेऊन पादशहा कोलीदुर्गाकडे निघाले. इतक्यांत बहलूलखान याच्या विद्यमानें बोलणें केलें जें, दरसाल खंडणी देऊन राहूं. तें पादशाहांनीं कबूल करून पूर्ववत् प्रमाणें रहाण्यास हुकूम दिला. ते समयीं भद्राप्पा नाईक याणीं नजराणा बहुत दिला.

पादशहा निघून विजापुरास आले. नंतर मुल्ला अहंमद यास कर्नाटक प्रांतीं रवाना केलें. त्यावर तिकडे जाऊन चंदावर घेतलें. आणि बाकीचे किल्लेही घेतले.

इकडे अलमगीर यांणीं जयसिंगराजे शिवाजी महाराज यांच्या पारपत्यास दक्षिणेस रवाना केले. त्यांणीं विजापूर प्रांतास उपद्रव केला. सबब आदिलशहा यांणीं मोठमोठे सरदार सल्लाह अलमगीर व आपल्यामध्यें असावा म्हणून रवाना केले. परंतु त्यांणीं कांहीं ऐकिलें नाहीं. तेव्हां आदिलशहा यांणीं अबदुल महंमद याजबराबर फौज देऊन रवाना केलें तों खबर आली कीं, जयसिंगाकडील सरफराज यांणीं पांच सहा हजार फौज घेऊन जाऊन मंगळवेढ्याचें ठाणें घेतलें. त्या वेळेस सर्जेखान मंगळवेढ्यास जलद जाऊन लढाई दिली; सर्जेखान याची फत्ते जहाली. सर्फराज निघून गेले आणि सर्जेखान पादशहाच्या फौजेंत दाखल जहाले.अबदुल महंमद वजीर व पोलादखान व अजीजखान व गालीबखान व दियानतराव वगैरे तयार होऊन दक्षिणेंतील फौजेची व हिंदुस्थानच्या फौजेची कित्येक दिवस लढाई होत होती. इतक्यांत हैदराबादवाले कुतुबशहाचें पत्र अल्लीअदिलशहास आलें जे, कुमकेची जरूर असल्यास पाठवितों. यांणीं फार उत्तम आहे म्हणून उत्तर पाठविलें. त्याजवरून कोणी नेकनामखान याजबराबर फौज देऊन पाठविलें तेहीं येऊन पावले. तों एके दिवशीं वर्तमान आलें कीं, अलमगीर याजकडून सलाबतखान जयसिंगाकडे येत आहे. त्यावरून सर्जेखान फौजेनिशीं त्याचे तोंडावर जाऊन लढाई दिली. फत्ते सर्जेखान याची झाली. हैदराबादकर यांची व अल्लीशहा यांची फौज एकंदर लढतां तेव्हां परिणाम नीट नाहीं, म्हणून जयसिंग दिल्लीस निघून गेले. पादशाह विजापुरास आले.

नंतर अल्ली आदिलशहा नेहमीं ऐषआरामांत नाटकशाळेच्या संगतीस घालवूं लागले. छ ४ रबिलावल रोजीं मुजफरखान बिदनुराहून आले त्यास सामोरे पादशहाची स्वारी जावी म्हणून निघाले तों रस्त्यांत वारा लागून प्रकृति बिघडल्यामुळें परत येऊन दाखल झाली. नंतर तिसऱ्या प्रहरीं बेशुद्ध झाले. एक दिवस एक रात्र तसेच होते. दुसरे दिवशीं कांहीं शुद्धि आली, परंतु अर्धें आंग गेलें. हें पाहण्यास अबदुल महंमद व खवासखान आले, पाहून परत गेले. मिरजा युसफबेगखान व धर्माजीपंत डबीर बादशहा जवळ राहून दरवाजा बंद करून येणें जाणें दिंडीतून यावें असें केलें आणि औषध उपाय हकीम शमशुद्दीखान याजकडून करवीत. परंतु शुद्ध पूर्ववत्प्रमाणें [न] आली आणि रोग दिवसेंदिवस वृद्धिंगत जहाला. दौलतीचें काम अबदुल महंमद वजीर करीत होते. एक दोन दिवस पादशहाच्या समाचारास गेले. खवासखान चहूं दिवसांनीं येऊन हुजरे यांस बोलावून नेत. पादशहाकडे वजीर याचें जाणें येणें होतें. त्या प्रमाणेंच दियानतराव जात येत होते, परंतु दौलतीच्या कामांत खलेल जहाली नाहीं. दियानतराव सर्वकाळ अबदुल महंमद याचें कोणत्या वेळेस काय होईल या विवंचनेंत राहिले. युसफबेगखान खवासखान याच्या तर्फेनें वागूं लागले. अबदुल महंमद वजीर व दियानतराव याचा व धर्माजीपंत डबीर यांचा द्वेष पडून धर्माजीपंत मुजफरखान याच्या विचारें वागूं लागले. पादशहा यांणीं

विचार कला जे, खवासखान व मुजफरखान यांस वजिरी करण्याचें सामर्थ्य नाहीं आणि अबदुल महंमद यांणीं दहा बारा वर्षें वजिरी करून माहितगार व कार्यकर्ते आहेत व शिवाजी महाराज व बहलूलखान राजी आहेत तरि त्यांस आणून, शाहजादा शिकंदर यास हवाली करून, त्यास आपल्या समक्ष तक्तावर बसवून त्याणीं कारभार करावा. त्याजवरून अबदुल महंमद यांस बोलावून आणून या प्रमाणें सांगितलें. नंतर त्याणीं कबूल केलें नाहीं. तेव्हां आपल्या मागें दौलतीची व्यवस्था कशी होईल? अलमगीर पादशहा व शिवाजी महाराज हे उभयतां वाट पहात बसले आहेत. त्यांस हेंच उत्तम. तुम्ही शिकंदर पादशहास तक्तावर बसवून प्रांताचा बंदोबस्त तुम्ही करावा. त्याणीं उत्तर दिलें कीं, माझ्यानें हें काम होत नाहीं. या कामास खवासखान योग्य आणि त्याचा बाप या कामांत मेले आहेत. त्याजवरून पादशहा अजुर्रा होऊन बसले जे, आपल्यामध्यें सामर्थ्य राहिलें नाहीं, त्यास दियानतराव वगैरे याणीं अबदुल महंमद यास सांगितलें. परंतु त्याणीं मान्य केलें नाहीं. आणि बोलिले कीं, खवासखान याणीं शहाजादे यांस तक्तावर बसवून आपण वजिरी करावी आणि आम्हास किले शादुर्ग व सगर व गुलबुर्गे देऊन मोंगलाई तोंडावर ठेवावें. बहलूलखान याजकडे भिरज आहेच आणि पन्हाळ देऊन शिवाजी राजे यांच्या तोंडावर ठेवावें, आणि मुजफरखान यास बिदनुरीं ठेवावें. त्याजवरून खवासखान बहुत खुषी होऊन अबदुल महंमद व खवासखान यांचें क्रियाप्रमाण जहालें जे, पादशहा मृत्यु पावल्यावर दुसरे दिवशीं याप्रमाणें करावें. पादशहास रोगानें बहुत हैराण केलें. ते समयीं दियानतराव खवासखानाकडे मिळाले. धर्माजीपंत डबीर मुजफरखान याजकडे मिळाले. परंतु अबदुल महंमद व दियानतराव याणीं मुजफरखानाचें कांहीं चालूं दिलें नाहीं. पादशहास सांगून बिदनुरास रवाना केलें. नंतर धर्माजीपंत यांणीं पादशहास सांगून परत मुजफरखानास आणविलें. त्याणीं फौज यादवाडांत ठेवून एक रात्रीत येऊन पावले; आणि सर्वकाळ पादशहाच्या सन्निध राहून खवासखान याची येण्याची परवानगी बंद केली. आणि सांगितलें जे, तुम्हांस येणें असल्यास एकटें यावें. यामुळें याचें व त्याचें वैमनस्य पडलें. मीरजा युसफबेगखान पादशहास रोग उत्पन्न जहाल्यापासून शेवटपर्यंत एक क्षणभर सोडून गेले नाहींत, आणि खवासखान याची तर्फदारी करीत होते. पादशहास मृत्यूच्या पूर्वी पंधरा दिवस भ्रम पडला होता. युसफखान यांणीं सर्व कारभार खवासखान याच्या स्वाधीन केला. त्याणीं पादशहाचा अंतकाळ समीप आला हें पाहून आंत जाऊन युसफखान याच्या मार्फतीनें वाड्याचा बंदोबस्त करून किल्याचाही केला. हिजरी सन १०८३ छ १३ शाबान रोज रविवार पांचव्या तासीं अल्ली आदिलशहा मृत्यु पावले. नंतर सर्वत्रांनीं जाऊन माती दिली, आणि गुमजही बांधला.

त्याच दिवशीं शहाजादा शिकंदर याचें वय पांच वर्षांचें होतें त्यास तक्तावर बसवून द्वाही फिरविली. दुसरे दिवशीं अबदुल महंमद यांणीं खवासखान यांजकडे सांगून पाठविलें जे, कराराप्रमाणें किले द्यावे. त्यांणीं उत्तर दिलें कीं, तूर्त किले देतां येत नाहींत. कारण शहाजादा लहान आहे, यास्तव दोन वर्षें झाल्यावर पहातां येईल. यावरून अबदुल महं-

मद अजुर्दे होऊन दिल्लीस निघून गेले. तेथें जाऊन हा सर्व वृत्तांत अवरंगजेबास विदीत केला. वैरी चहूंकडे छपून होते, त्यांस ही संधी सांपडली. शिवाजी राजे यांणीं पन्हाळा घेऊन प्रांतांत फौजा रवाना केल्या. त्याजवर विजापुराहून नबाब अबदुल करीम फौज देऊन रवाना झाले ते येऊन पन्हाळ्या नजीक पावले. तों शिवाजी महाराज तयार होऊन लढाई सूर्योदयापासून अस्तमानपर्यंत जहाली. दोहींकडील लष्कर बहुत जायांजखमी जहाले. नबाब याची सिकस्त होऊन तिकोट्यास राहिले. विजापुराहून नवी फौज येऊन पावली. हें वृत्त महाराजांस कळून आपले सरदार यांजवर क्रोधायमान होऊन बोलले जे, तुम्ही नबाबास जाऊं दिलें आणि आपलें यश आपल्या हातें सोडिलें, यावरून दोन चार सरदारांस जिवें मारविलें.

अवरंगजेब पादशहाच्या चार पिढी पासून दक्षण घ्यावी हा संकेत होता, परंतु तें जहालें नाहीं. याजकरितां प्रथम नबाब बहादरखान यास लाहोराहून आणवून रवाना केलें. ते पेडगांवीं येऊन राहिले. खवासखान वजीर यांणीं हें वर्तमान शमशुदीखान हकीम यांस सांगितलें. हकीम याणीं खवाजे अमीन काश्मीरी नबाबाचे परम विश्वासुक, यांस आपलेसें करून, नबाबाची व खवासखान यांची दोस्ती करविली आणि बोलणें लाविलें जे, शाहरबानु ऊर्फ पादशहा बिब्बी कन्या अदिलशहाची उपवर आहे ती शहाजादे यास देऊन मोहीम शिवाजी महाराज यांजवर करवावी, आणि सुलतान शिकंदर यास किताब पादशाही अलमगीर यास आणवावा. याप्रमाणें खवाजे अमीन याणीं नबाबापाशीं रदबदली करून खवासखान यास किताब नवाजिषखान व पोषाख आणून दिले. बार्कीचें ही चालविलें, परंतु चहूंकडून गलिमांची गलबल झाली. मिरजा बकर शमशुदीखान हकीम याचे बंधू त्यास नबाबापाशीं वकिलीस ठेवून कारभार करीत होते. मिरजा बकर कांहीं कामामुळें विजापुरीं आले. खवासखान यास हकीम याचे द्वेषी जे होते त्याणीं चाडी सांगून काढविलें. पुढें कांहीं दिवसांनीं मिरजा बकर यासही काढिलें. नंतर वकिलीस श्यामराव यास ठेविले. नबाब याणीं त्याची भेट घेतली. कारण या करण्यामुळें शिवाजी महाराज याणीं पंचमहाल घेण्यास फौज रवाना केली आणि कांहीं दिवसांनीं आपणच गेले, आणि नबाबाकडून कांहीं खलेल न व्हावीं म्हणून त्याजकडे बोलणें लाविलें जे, पेशजी केलेले अन्याय क्षमा करून दक्षणेची देशकत आपले पुत्र संभाजी महाराज यांच्या नांवें सनद द्यावी म्हणजे नवीन किल्ले घेतले ते परत देऊं, आणि संभाजीराजे यांस चाकरीस देऊं. बहादरखान यांणीं विचार केला कीं, कांहीं एक श्रम न करितां साध्य होतें यावरून अवरंगजेब पादशहाकडून देशकतीचा फर्मान आणवून सय्यदखान याजबरोबर पाठविला. तो शिवाजी महाराज यांणीं कोंकणप्रांत घेतल्यानंतर यांची भेट घेऊन बोलिले कीं, हें कर्तव्य आम्हांस नाहीं आणि यवनाची सेवाही करणें नाहीं. त्यानंतर सय्यदखान माघारे येऊन सर्व मजकूर नबाबास सांगितला. नबाबही बहुत क्रोधायमान जहाले. हें वृत्त पादशहास कळल्यावर आपलें पारिपत्य होईल यास्तव, खवासखान यास घेऊन महाराजावर मोहिम करावी, असा विचार करून खवासखानाकडील श्याम-

राव होते त्यांची भेट घेतली नव्हती त्यास बोलावून आणून भेट घेतली आणि स्नेहाचें बोलणें लाविलें. श्यामराव यांणीं खवासखानाचीं कन्या बहादरखान याच्या पुत्रास द्यावी असें ठरवून विजापुरीं येऊन खवासखानास सांगितल्यावरून बहुत संतोष होऊन भेट भीमेच्या काठीं व्हावी असा बेत केला. नबाब पेडगांवाहून निघून चालले आणि महंमद अमीन यास खवासखान यांजकडे रवाना केलें. तों ते विजापुराहून हिजरी सन १०८६ छ १० रज्जब रोजीं निघाले. त्याची याची भेट वाटेंत जहाली. नबाबाचें पत्र खवासखानास दिलें. नंतर कांहीं दिवसांनीं भीमातटीं उभयतांची भेट होऊन सन्मान जहाले. बोलणें होऊन छ २० शाबान रोजीं विजापुरास आले.

नबाब अबदुल करीम बहलूलखान हे सरलष्कर होते. याचें व खवासखानाचें वैमनस्य होतें. खवासखान याचा व बहादुरखानाचा स्नेह जहाल्यामुळें खवासखान याचा स्नेह बाह्यात्कारे करून त्यास मेजवानीस म्हणून बोलावून त्यास कैद करून बंकापुरास रवाना केलें. दुसरे रोजीं छ ४ रमजान रोजीं विजापुरीं जाऊन वजिरी करूं लागले, आणि खवासखान याच्या तर्फेचीं मनुष्यें होतीं त्यांस निरोप दिला आणि खकरखान यास प्रांताचे बंदोबस्तास रवाना केलें. तेव्हां पूर्वीचे मुत्सद्दी वगैरे यांचा द्वेष पडला. खकरखान यांनीं आपलीं मुलें माणसें शहादुर्गात ठेवून चालले. ते शेखमुजहान यांनीं आपलें लष्कर एकाचित्त करून सांगितलें जे, खकरखान यास पुरुषार्थें करून मारावा म्हणजे अबदुलकरीम याची समजूत करणें अशक्य नाहीं. त्यांनीं उत्तर दिलें जे; तुम्ही सांगाल ते प्रमाण. तें समयीं खकरखान यांनीं शेखमुजहान यास मेजवानीस बोलाविलें. ते आले. तों सामोरे आपल्या डेऱ्यांतून बाहेर आले आणि त्याचा हात धरण्यास आपला हात पुढें केला, इतक्यांत शेख यानीं त्याचे दोन्हीं हात एका हातीं धरून दुसरे हातीं कटयार होती ती चालविली, तों ते तत्काळ मृत्यु पावले. हें वृत्त अबदुल करीम यास समजल्यावर ते बहुत श्रमी जहाले, आणि विचार केला कीं, ते लोक खवासखानास सोडविण्यास बंकापुरास गेले असतां कठीण, यास्तव आपल्याकडील कोणी तेथें होते त्यास लिहून पाठविलें कीं, पत्र पावतांच खवासखानास जिवें मारावें. असें पत्र जातांच मारिलें. सन १०८६ छ १२ माहे जिल्हेज. नंतर त्यांनीं गुमट विजापुरी बांधविला होता तेथें आणून गुमटांत माती दिली. छ २० जिल्हेज.

त्या दिवसापासून अबदुलकरीम फार सावधगिरीनें दहा बारा हजार स्वार ठेवून वागत. सर्व सरदार वगैरे लोक यांचा द्वेष करूं लागले. सबब कितीएक वेळ लढाया झाल्या. सिद्दी मसऊद जादुनीस सलाबतखान याच्या जाग्यावर होते. त्यांनीं विचार करून दक्षणी फौज जमवून अबदुलहसन कुतुबशहाकडे गेले. त्यांनी ठरविलें जे, अबदुलकरीम, बहलूलखान व सिद्दी मजकूर सरदार वगैरे यांचें सख्य असावें आणि अबदुलकरीम यांनीं अफगानी लोक ठेविले त्याचे तैनातीचे रुपये सहा लक्ष देणें ते सिद्दी यानीं द्यावे. नंतर अबदुलकरीम यानीं त्या लोकांस निरोप देऊन विजापूर किल्ला सिद्दी मजकूर याच्या स्वाधीन करावा. नंतर आकाजीपंत वकील आपणाकडून आहेत त्यास वजिरी देऊन सिद्दी मजकूर यांनीं प्रांताचा

बंदोबस्त करून शिवाजी राजे वगैरे यांचें पारपत्य करावें असें ठरविलें. इतक्यांत बहलूलखान मृत्यु पावले. त्यांनीं दोन वर्षें वजिरी केली.

तेव्हां सिद्दीमसऊद येऊन वजिरी करून राहिले. तों बहलूलखानाचे पुत्र दिलेरखान व सिद्दी मजकूर यांचें वांकडे येऊन सिद्दी मजकूर बेजार होऊन रात्रीस निघून अदुनीस गेले. त्याच्या जागीं शमशुद्दिनखान हकीम वजिरी करूं लागले. नंतर कांहीं दिवसांनीं सिद्दी येऊन आपले वजिरीचें काम पाहूं लागले. परंतु सिद्दी व दिलेरखान यांमध्यें बहुत लढाया जहाल्या. नंतर दिलेरखान विजापूर प्रांतास उपद्रव करूं लागले. त्याणेंही कांहीं जहालें नाहीं. नंतर सिद्दी मजकूर याची व आपली मैत्री व्हावी याकरितां बहुत मेहनत केली, परंतु तेंही साध्य जहालें नाहीं आणि शहाजादा अलमगीर यास बंदोबस्त करण्याविषयीं वरचेवर लिहीत होते; आणि दुसरे सरदारही लिहीत होते. अवरंगजेब पादशहाकडून पत्रें शहाजाद्यास रागाचीं येत होतीं. दिलेरखान मृत्यु पावल्यानंतर सन १०९१ हिजरीत शिवाजी महाराज यांणीं कैलासवास केला. नंतर संभाजीराजे गादीवर बसून दौलत करून मसऊदखान याजकडे मिळून मोगलाच्या प्रांतास उपद्रव करूं लागले. विजापूरच्या दौलतींत बखेडा फार जहाला, यामुळें बंदोबस्त न होई. सबब मसऊदखान बेजार होऊन अदुनीस गेले. तेव्हां वजिरीचें काम शेख मखदूम व अबदुल रऊफ चालवूं लागले. शिकंदर आदिलशहाही त्या उभयतांच्या स्वाधीन जहाले. परंतु शहरबानू ऊर्फ पादशहा बिब्बी कन्या अल्लीआदिलशहा यांची व वडील बहीण शिकंदर अदिलशहाची प्रौढ व शहाणी होती, याजकरितां जें करणें तें पादशहा बिब्बीच्या विचारें करीत होते. तेव्हां हे उभयतां कामांत वागतात हें बिब्बीच्या चित्तास येईना. ते समयीं या दोघांनीं विचार केला कीं, ही अशीच राहिली असतां आपला दोघांचा बंदोबस्त करील. याजकरितां इजला काढावी. म्हणून पादशहा बिब्बीकडे आले आणि विनंती केली कीं, आपणास बंधूच्या राज्याचें अगत्य असल्यास दिल्लीस जाऊन आपलें लग्न पेशजी बहादरखान याच्या विद्यमानें अवरंगजेब याचे पुत्र महंमद अज्जम या समागमें करावें, आणि या दौलतीस उपद्रव न होईल असें करावें. नाहींपेक्षां अवरंगजेब येऊन जबरीनें दौलत घेऊन तुमचें लग्न आपल्या पुत्राबराबर करितील असें सांगितलें; आणि तिच्या दाईकडून सांगून पादशहा बिब्बीस राजी केली. नंतर छ १४ माहे रबिलावल भृगुवारीं निघून दिल्लीस रवाना जहाली. मागाहून शमशुद्दीनखान हकीम जाऊन मिळाले. दिल्लीस जाऊन पोंहचल्यानंतर हिजरी सन १०९२ छ १२ रज्जब रोजीं लग्नसमारंभ जहाला. लाखों रुपये खर्च, दानधर्म वगैरे केला.

महंमद अज्जमशहा यास किताब पादशाही छ २५ माहे मजकुरीं दिला आणि संभाजी राजे यांच्या पारपत्यास व दक्षणेच्या बंदोबस्तास छ ५ माहे रमजान रोजीं रवाना केले ते छ १२ जिलकाद रोजीं बऱ्हाणपुरीं आले. तेथें चार महिने राहून ६ हिजरी सन १०९३ रबिलावल माहिन्यांत तेथून कूच करून अवरंगाबादेस येऊन राहिले. तेथें सहा सात महिने राहून तेथून निघून सन मजकुरीं छ १ जिलकाद रोजीं अहंमदनगरास आले. त्यापूर्वी

शहाजादे शहाअलम यास किताब बहादरशहा देऊन कोंकणांत रवाना केलें. ते रामघाट उतरून कोंकणांत गेले आणि बंदोबस्त करून साळशी वेंगुर्लेपर्यंत गेले. धान्याच्या महर्गतेमुळें व संभाजी राजे यांच्या उपद्रवास्तव बहुत लष्कर हैराण होतें. इतक्यांत अवरंगजेब यांचा हुकुम परत येण्याविषयीं जहाला आणि शहाजादा अझीजहा यास विजापूरचा मुलूक लुटण्यास रवाना केलें. अझीजहा आज्ञेप्रमाणें प्रांत लुटीत जाऊन धारवाडास वेढा घालून कित्येक दिवसांत किल्ला घेतला. त्यापूर्वी महंमद अज्जमशहा यांस विजापुरास वेढा घालण्याविषयीं हुकूम जहाला. त्याप्रमाणें त्यांणीं वेढा घातला. फौज थोडी सबब अज्जमशहा यांणीं शहाअलम व अझीजहा यास फौज घेऊन येणें म्हणून हुकूम केला. त्याप्रमाणें ते दोघे येऊन सामील जहाले. नंतर अहंमदनगराहून खुद्द स्वारी हिजरी सन १०९६ छ २९ माहे जमादिलावल रोजीं कूच करून सोलापुरास आले. अज्जमशहा याच्या फौजेंत धान्य मिळेनासें जाहलें. हें पादशहास वृत्त कळल्यावर त्यास माघारें आणवून गाजीवदीखान यास नवी फौज देऊन व सरंजाम दारूगोळा व धान्य भारी देऊन रवाना केलें. आणि हिजरी सन १०९७ छे १८ जमादिलाखर रोजीं सक्त वेढा घालून चहूंकडून गर्दी करून लढाई केली. परंतु आंतून तोफा व बंदुका वगैरेनीं बाहेरील फौजेस जवळ येऊं दिलें नाहीं. हें वृत्त अवरंगजेबास समजल्यावर आपण खुद्द सन मजकुरीं छ २ माहे शाबान रोजीं कूच करून छ २१ माहे मजकुरीं रसुलपुरानजीक मुक्काम केला, आणि सर्वत्र सरदार यांस आणून सांगितलें कीं, प्राणापेक्षांही पराकाष्टा करून किल्ला घ्यावा. तेव्हां मोर्चेबंदी होईना. सबब पाथरवट वगैरे लोकांकडून खडक खणून काढावें असें करून लाविले. परंतु आंतून त्यांसहा जवळ येऊं दिलें नाहीं. तेव्हां अलमगीर यांचा एक कोशावर मुक्काम होता तेथून कूच करून शहरानजीक येऊन उतरले. शहाजादे व उमराव व सरदार यांस हुकूम केला जे, सर्वांनीं एकवेळीं हल्ला करावा. हें वर्तमान किल्यांतील लोकांस कळतांच घाबरे झाले आणि आदिलशाहा व मुत्सद्दी यांणीं विचार केला जे, सल्याशिवाय तूर्त उपाय नाहीं. यावरून अवरंगजेबाकडे छ १ जिल्काद सन मजकुरीं हाफीज अबजुल व सय्यदखान तरी व मुनशी अबदुल रऊफ व शेख हुशेन व मुनषी सर्जेखान व सय्यद मखदुम बराबर देऊन गाजीवदीखान याच्या विद्यमानें सल्याचें बोलणें करावें म्हणून पाठविलें. ते येऊन गाजीवदीखान याच्या विद्यमानें बोलणें ठरवून त्याच रात्रीं परत गेले आणि शिकंदर आदिलशहास सांगितलें कीं, किल्ला स्वाधीन करावा. नंतर छ ३ माहे मजकुरीं गाजीवदीखान याजकडे जाऊन पादशाही चाकरीस राहिले. अबदुल रऊफ गाजीवदीखानापाशीं राहिले. छ ४ माहे मजकुरी सन १०९७ हिजरी भोमवारीं चवथे प्रहरीं शिकंदर आदिलशहा यांणीं जवाहीर व द्रव्य दानधर्म करून बाकीचे खंदकांत टाकून आपण बाहेर निघून किल्ला स्वाधीन केला; आणि आपण जाऊन अवरंगजेब यांची भेट घेतली. त्यांणीं बहुत कृपायुक्त सन्मान करून आपले खासे डेऱ्याजवळ डेरे देऊन बायकांमुलांनिशीं ठेविले आणि सालीना एल लक्ष रुपये खर्चास द्यावे असें ठरविलें. अबदुल हसन कुतुबशहा याची कन्या आणून लग्न केलें. अबदुल रऊफ व सय्यद मखदुम यांस किताब मनसब हशतहजारी दिली. दिलेरखान दुसरे सरदार यांस किताब रुस्तुमखान हा दिला; आणि

विजापुरास किताब दारुलजफर विजापूर दिला.दुसरे दिवशीं छ ५ माहे मजकुरीं खासा स्वारी किल्यांत जाऊन किल्ला पाहून परत लष्करांत दाखल जहाली. रुस्तुमखान यास मनसब पंजहजारी देऊन विजापूरची मामलत दिली. अदिलशाही दौलत त्या दिवसापासून गेली. शिकंदर अदिलशहा अंतकाळपर्यंत नजरबंदींत होते. ते तक्तावर बसल्यापासून चवदावें वर्षीं कैद केले. नजरबंदींत चवदा वर्षें होते. नंतर सन १११९ हिजरींत मृत्यु पावले. त्याचा तपशील पुढें आहे.

अवरंगजेब विजापूर घेऊन बिल्ले ठाणीं घेत घेत चालले तों लहानशी गढी होती तेथील किल्लेदार लढूं लागला. त्यास सर्वज्ञांनीं सांगितलें जे, तुझ्या पादशहास कैद करून सर्व दौलत घेतली हें लढणें व्यर्थ आहे. त्याणीं उत्तर केलें जे, जों पर्यंत आमचा पातशहा जिवंत आहे तों पर्यंत अलमगीर म्हणजे पदार्थ काय ! ! हें वृत्त अवरंगजेबास कळून बहुत रागास येऊन खरबूज जहर भरून पाठविलें, त्याणीं आज्ञे प्रमाणें जाऊन खावयास सांगितल्याप्रमाणें शिकंदर अदिलशहा यार्णी खाऊन अंतकाळ समीप आला. ते समयीं सांगून पाठविलें कीं जे, तुमची कांहीं इच्छा असल्यास सांगावी, त्याप्रमाणें करितां येईल. यार्णी सांगून पाठविलें कीं, माझी इच्छा परिपूर्ण झाली परंतु एक राहिली ती पूर्ण करावी. ती कोणती म्हणाल तरी आमचें शरीर विजापुरीं नेऊन सार्थक करावें. या प्रमाणें अवरंगजेबास सांगितलें. नंतर त्याच दिवशीं गुरुवारीं सन १११९ हिजरी शिकंदर अदिलशहा मृत्यु पावले. या नंतर अवरंगजेब यार्णी त्याचें प्रेत विजापुरास पाठवून सार्थक करविलें.

अवरंगजेब तेथून दीड महिन्यानें छ २ माहे जिल्हेज रोजीं कूच करून छ २८ माहे मोहरम रोजीं गुलबर्गेस गेले. तेथून बेदरास जाऊन तसेंच हैदराबादेस जाऊन राहिले. सन १०९८ हिजरी छ ४ जिलकाद रोजीं गोंवळकोंडा किल्ला घेतला आणि अबदुल हसन कुतुबशहास कैद करून दौलताबादेस पाठविलें. सगर किल्ला विजापुराकडील पामनाईक महार याजकडे होता. तो किल्ला सन मजकुरीं छ २ सफर रोजीं घेऊन सरतगड नांव ठेविलें. तेथून निघून छ ३ जमादिलावल रोजीं गुलबर्गेस आले. तेथून कूच करून छ २२ माहे मजकुरीं विजापुरास दाखल होऊन खवासखान याच्या हवेलींत राहिले. महंमद अज्जमशहा यार्णी बेळगांवचा किल्ला घेऊन अज्जमनगर नांव ठेविलें. अ दु न जा किल्यांत सिद्दीमसऊद अदिलशाई होता तो किल्ला गाजीउद्दीनखान यार्णी छ १८ शवाल रोजीं घेतला. सिद्दी मजकूर यास मनसब हप्तहजारी दिली.

अवरंगजेब विजापुरीं होते तेथें कांहीं महामारीचा उपद्रव ईश्वरसत्तेनें उत्पन्न होऊन लाखों मनुष्यें मेलीं. अवरंगजेब याची स्त्रीही बराबर होती तीही मेली. तेव्हां पादशहास बहुत दुःख झालें, आणि वरचेवर मनुष्यें मरण पावलीं. त्यांचें सार्थक होईना सबब गाड्यावरून नेत होते. तों एका दरवाजानें सातशें गाडे गेले. असेच सर्व द्वारें गेले व जात होते. पंधरा दिवसांनीं तो उपद्रव कांहींसा शमला. नंतर अवरंगजेब छ १८ रबिलावल रोजीं कूच करून अकुलजे नजीक मुक्काम केला. महामारीचा उपद्रव तीन वर्षें होता.

नंतर अवरंगजेब छ १६ माहे मजकुरीं कोरेगांवाहून निघून छ २ जमादिलावल रोजीं कृष्णाकांठीं मौजे विदरीं येथें राहिले. तेथें दोन महिने राहून तेथून कूच छ १८ शाबान रोजीं करून गलगल्यास जाऊन राहिले; आणि तेथें शेखनिजाम यास किताब मुकरबखान देऊन पन्हाळा घेण्यास रवाना केले. संभाजी महाराज रायगडाहून *कबगुलशन दिवाण सह निघून संगमवाडा व बाग होता तेथें जाऊन राहिले, मुकरबखान पांच सहा हजार स्वार घेऊन गेले. हें वृत्त महाराजांस कळून सहा सात हजार स्वारानिशीं येऊन लढाई दिली. उभयतांकडील लोक जायाजखमी जहाले. मुकरबखान याजकडील अमीन खानकरी व पहिदखान काश्मिरी व गंगाराम व आप्पाजीपंत हे मोठे मानकरी पडले. महाराजांकडील कृष्णाजी घोरपडे व दौलतराव शिंदे व शेखमिरा वगैरे मानकरी पडले. कबगुलशन यास जखम लागली. ते वाड्यांत छपून होते. ते धरून छ ५ जमादिलावल रोजीं कुटुंब सुद्धां बहादरगडीं कैदेंत ठेविले. नंतर संभाजी राजे यास छ २० माहे मजकुरीं कैद केलें. नंतर त्यास घेऊन अवरंगजेब याजकडे गेले. त्यावर छ २९ माहे मजकुरीं नील फिरवून मारिलें. शेखनिजाम यांणीं जिवादारभ्य श्रम केले, सबब त्यास किताब फत्तेजंग देऊन मनसब हफ्तहजारी दिली. नंतर सन ३३ जलूषी छ ५ माहे मोहरम रोजीं रायरी किल्यास संभाजी राजे यांचे पुत्र शिवाजी व त्यांची मातुश्री व द्रव्य फार सांपडलें, यतिकादखान यास किताब जुलफुकारखान दिला. शिवाजीराजे व त्यांच्या मातुश्रीस जुलफुकारखान घेऊन गेले. नंतर पादशहानीं एकंदर डेऱ्यांत येऊन तेथील देखरेख असदखानास पाहण्यास हुकूम जहाला आणि त्या वेळेस शाहूराजे यांचें वय १० वर्षांचें होतें. त्यास किताब राजगी व चौघडा व मनसब हफ्तहजारी देऊन बहुत तरतुदीनें खर्च वगैरे बंदोबस्त ठेविला.

छ ६ माहे सफर सन मजकूर रोजीं रुस्तुमखान यांणीं रायचूर किल्ला घेतला त्याचें नांव फैराजगड ठेविलें. नंतर अवरंगजेब गलगल्याहून कूच करून विजापुरास आले. नंतर आणखी फिरून गलगल्यास गेले. आणि सन ३८ जलूसी छ २० माहे शाबान रोजीं कूच करून विजापुरास आले. नंतर सन ३९ जलूसी छ १७ शाबान रोजीं पादशहा कूच करून मौजे भरमपुरी× नजीक भीमाकाठीं येऊन राहिले. सन ४१ जलूसी छ ६ शाबान रोजीं चंदी जुलफुकारखान यांणीं घेतली. सर्व सरदार किल्ले घेण्यास रवाना केले, त्यांणीं किल्ले घेतले. अवरंगजेब कोकणप्रांत घ्यावयास गेले. सन ४३ जलुसी छ ५ जमादिलावल रोजीं निघून मिरजेस येऊन राहिले. महंमद अज्जमशहा सन ४४ जलुसी छ २५ जमादिलाखर पासून छ १३ जिलकाद पर्यंत वेढा घालून सातारा घेतला आणि अज्जमतारा नांव ठेविलें. छ ३ माहे मोहरम रोजी अज्जमशहा यांणीं परळीचा किल्ला घेतला आणि नौरसतारा नांव ठेविले. नंतर पन्हाळ्यास जाऊन वेढा देऊन सन ४४ छ १ मोहरम रोजीं किल्ला घेतला.

---

* कवि कलुष=ऊर्फ कबजी. × ब्रह्मपुरी.

आणि नबीशाहदुर्ग नांव ठेविलें. सन ४५ खिलना किल्यास वेढा घातला. खुद्द पादशहा अर्ध कोसावर उतरून बहुत विचार करून सन ४६ छ २२ जिल्हेज रोजीं किल्ला घेतला. नंतर छ ७ मोहरम रोजीं कूच करून पन्हाळ्यास येत होते. वाटेनें परजन्यामुळें फार गिरीफ्तर जहाले. परंतु तसेच पन्हाळ्यास आले. नंतर छ १० जमादिलाखर रोजीं कूच करून बहादरगडास आले. तेथून छ २४ रजब रोजीं कूच करून छ १८ शाबान रोजीं खंडाळ्यास पावले. नंतर ४७ सन छ २७ जिल्हेज रोजीं कूच करून पुण्यास आले. तेथून सन ४८ छ २३ माहे जिल्काद रोजीं कूच करून मसुदाबाद ऊर्फ खेडें येथें साडेसात महिने राहिले. नंतर छ ४ माहे रजब रोजीं जुन्नर घ्यावयास कूच करून निघून आले. वाकनगिरी एथें रामनाईक महार याचा भाऊ होता त्याजवर फौज रवाना केली. तेव्हां कुलिचखान बहादर वगैरे व महंमद अमीन यांणीं पुरुषार्थें करून लढून किल्ला घेतला. नंतर अवरंगजेब देवापुरीस कृष्णेतीरीं छावणी झाली. तेथें कांहीं पादशहास स्वस्थ वाटत नव्हतें. ते कांहीं दिवसांनीं आरोग्य जहालेवर तेथून कूच करून सन ५० छ १ माहे शाबान रोजीं बेचीस वर्षांनीं अहंमदनगरास आले. नंतर सन ५१ माहे शव्वाल अखेरीस बादशहास अजार उत्पन्न जहाला, तो फारच वृद्धिंगत होऊन सन मजकूर छ २८ माहे जिलकाद रोजीं म्हणजे हिजरी सन १११७ भृगुवारीं दुसरे प्रहरीं मृत्यु पावले.

नंतर संदुकेंत घालून रोज्यास नेऊन छ १५ जिल्हेज रोजीं इंदुवारीं सार्थक केलें. त्यास पुत्र चार होते. त्यांपैकीं महंमद अकबर हे बापाबरोबर द्वेषबुद्धीनें वागूं लागले. नंतर कांहीं दिवसांनीं आपण दौलत करावी या उद्देशानें फौज जमविली, आणि लढाईस उभे राहिले; तेव्हां युद्धप्रसंगीं शिकस्त होऊन पळून इराणास गेले. तेथील पादशाहानीं बहुत सन्मान करून सहा लक्ष रुपयांची जहागीर दिली. पुढें कांहीं दिवसांनीं ते तिकडेच मरण पावले. नंतर अवरंगजेब दक्षिणेस आले, आणि विजापूरचे शिकंदर पादशहा व हैदराबादचे तानाशहा पादशहा या दोघांस दस्तगीर करून त्यांची दौलत आपल्या स्वाधीन करून घेतली. शिवाजी राजे वगैरे बंड होते त्यांचेंही पारपत्य केलें आणि सर्वकाळ ईश्वरप्रीत्यर्थ घालवीत पन्नास वर्षे दौलत केली.ती शास्त्राधारें केली आणि सन ५१ जलूसी म्हणजे हिजरी सन१११७ जिलकाद महिन्यांत खुजस्तेबुनयाद ऊर्फ अवरंगाबाद येथून शहाजादे महंमदअज्जम यास सुभे गुजराथेस रवाना केले. ते दोन मुक्काम गेल्यानंतर नवे घेतलेले सुभे विजापूर व हैदराबाद येथें राहण्यास शहाजादे कामबक्ष यास विजापुरास जाऊन पावले होते. महंमदअज्जम यास हें वर्तमान समजतांच येऊन पावले आणि बापास तावुतांत घालून लवकर घेऊन दिल्लीस निघाले. बापाचा तावूत बापानें सांगितल्याप्रमाणें रोजेस नेऊन सार्थक करून कबर बांधविली आणि आपण लष्करसुद्धां पुढें रवाना झाले. ते जाऊन *शाहाजानाबादेस राहिले आणि दौलत करूं लागले. महंमद अज्जम शहाजादा यास शहाअलम म्हणत होते, ते बहुत तामसी होते तेही तेथेंच राहिले. तों उभयतांमध्यें द्वेष पडून उभयतांनीं फौज जमाव करून

* शाहाजहानाबाद = दिल्ली.

अकबराबादेनजीक+ येऊन उभयतांची लढाई जहाली. हिजरी सन ११११८ छ १७ रबिलावल रोजीं. ते समयीं शहाअलम यांणीं आपले बंधु महंमद अज्जम यास व त्याचे पुत्र महंमद बेदरबख्त व वालाजहा या त्रिवर्गास मारून शहाजहानाबादेस जाऊन राज्य करूं लागले. शहाजादे कामबक्ष विजापुराहून निघून हैदराबादेस जाऊन दौलत करीत होते. तेव्हां शहाअलम यास अयोग्य वाटून फौजेसह हैदराबादेस येऊन सन ११२० हिजरी छ १७ रबिलावल रोजीं लढाई देऊन कामबक्ष यास व त्याचा पुत्र तीन वर्षांचा होता त्यासह मारून दिल्लीस परत गेले. तेथून लाहोरास गेले तेथें सहा वर्षें राहिले. कांहींसा बंदोबस्त प्रांताचा जहाला होता तो सन ११२३ हिजरी छ १७ माहे मोहरम रोजीं मृत्यु पावले.

त्यास पुत्र चार. प्रथम पुत्र महंमद मगरुद्दीन, त्यासच जहांदार म्हणतात. त्याचे बंधु धाकटे महंमद अजिमुद्दीन याची व त्याची लढाई होऊन महंमद अजिमुद्दीन ठार जहाले. नंतर आणखी दोन बंधु रफिउलदराजत दुसरे खुजस्त अख्तर यास कांहीं फौज व सरंजाम देऊन ठेविले होते. ते दोघे बदलून युद्धास सिद्ध जहाले. नंतर या त्रिवर्गांचें युद्ध होऊन शेवटीं महंमद मगरुद्दीन यांणीं त्या उभयतांस मारिलें. नंतर लाहोराहून कूच करून शहाजहानाबादेस येऊन पावले. महंमद अजिमुद्दीन याच्या वेळीं महंमद फरुखसेर होते. तेव्हां हा वृत्तांत जहाला ते समयीं येथें नव्हते. आपले वडील सुभे बंगाल्यांत रहात होते तेथेंच होते. तेथें हें वर्तमान श्रवण करून बहुत क्रोधावेशें लष्कर घेऊन दिल्लीस निघून जागोजागीं ठाणीं घालीत चालले. ते अकबराबादेस आले. जहांदार पादशहा शहाजाहानाबादेस होते. जुलफुकारखान अवरंगजेब याच्या वेळचे होते. त्यांजवर बहुत विश्वास ठेविला होता आणि फौज तयार करून फरुकसेर याजवर चालून आले. ते येऊन अकबराबादे नजीक आले तों इकडून फरुकसेरही गेले. उभयतांचा मुकाबिला होऊन लढाई जहाली. उभय लष्करचीं मनुष्यें बहुत जायांजखमी जहालीं. त्या समयीं जहांदार याचा मोड होऊन पळून जुलफुकारखानासुद्धां शहाजहानाबादेस गेले. त्याच्या पाठीवर फरुकसेर फौजसुद्धां जाऊन शहाजहानाबादे नजीक बारापळीस राहिले. असदखान वजीर अलमगीर याच्या वेळचा किल्यांत होता त्यांनीं जहांदार बादशहास येतांच धरून कैद केलें आणि फरूकशेर यास लिहून पाठविलें. ते येऊन पावतांच फरुकशेर तयार होऊन शहरांत जाऊन दाखल झाले आणि त्याच समयीं आपले चुलते जहांदार यास कैदेंतून आणवून आपले बापाच्या मुबदला त्यास किल्याच्या बाहेर मारविलें. नंतर किल्यांत जाऊन पूर्वीची दौलत व नवे दोन सुभे घेतले ते असे फरुखसेर वल्द महंमद अजिमुद्दीन वल्द महंमद व अज्जम वल्द महमुद्दीन अवरंगजेब बहादर अलमगीर पादशहा गाजी याच्या स्वाधीन जहाले. सन ११२४ हिजरींत कैफीयत समाप्त.

+ अकबराबाद=आग्रा.

ले. ७
४१३

[श.१६३६ मार्ग. वद्य १४
ता. २४-१२-१७१४

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४१ जयनाम संवत्सरे मार्गशीर्ष बहुल चतुर्दशी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभुछत्रपति स्वामी यांणीं ... ...

मिराशी यांणीं व गांवकरांनीं मौजे पायरे तालुका साळशी यांसि, आज्ञा केली ऐशी जे, मौजे मजकूर रामजी बाबाजी दिमत हिरसांवत याजकडे वतनाच्या ऐवजीं मुकासा दिला आहे. त्याप्रमाणें करार आहे तरि तुम्ही हें जाणून गांवचा ऐवज रामजी बाबाजी यांजकडे पाववणें, दुसरेयाजकडे एक रुपया वसूल न देणें. बाबतीचा ऐवज पेस्तर सालीं कोटाकडे पाववणें. जाणिजे. लेखनालंकार " मोर्तब " असे.

ले. ८
४१४

[श. १६३९ कार्तिक वद्य ५
ता. २-११-१७१७

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४४ हेमलंबीनामसंवत्सरे कार्तिक बहुळ ५ भोमवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभुछत्रपति स्वामी यांणीं

राजश्री देशाधिकारी व कारकून वर्तमान भावी सुभा परगणे कुडाळ यांसि आज्ञा केली ऐशी जे, नागण प्रभु देसाई परगणे मजकूर हे पूर्वी कोट कुडाळ येथें होते. त्यास खेमसांवतानें कोटास परीघ चालून कोट हस्तगत केला. ते समयीं बरी शर्त करून नागण प्रभु स्वामीकार्यावर खर्च जहाला. त्याच्या बायका काशीबाई व येसूबाई उभयतां आहेत त्यांचा योगक्षेम चालवावा हें स्वामीस अवश्यक. यास्तव स्वामी उभयतां बायकांवर कृपाळू होऊन शंभर होन निशाणी होनाचा गांव इनाम द्यावा असा सिद्धांत करून यांस नूतन इनाम कुलबाबकानु खेरीज हकदार व इनामदार करून मौजे अडेली तालुका तळवडे हा गांव इनाम अजराम(राम)त करून दिला असे. तरि तुम्हीं मौजे मजकुरीं सदर्हूप्रमाणें इनाम यांस नेमून देऊन बायकांचा योगक्षेम चालवून सुखरूप रहात ते गोष्ट करणें. सालदरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें. तालीक लिहून घेऊन अस्सल सनद परतोन देणें. जाणिजे. निदेश समक्ष " मोर्तब " असे.

ले. ९ (४२२)]　　[श. १६४० इ. १७१८

श्री

सन ११२८ फसली　　फेरिस्त नंबर ५

यादी स्मरणार्थ सुरुसन तिस्सा अशर मय्या व अल्फ शके १६४० राज्याभिषेक शके ४५ वाकानेशीस पूर्वी लिहिले जे. राणोजी चव्हाण हे पूर्वी शकर्ते महाराज याजपाशीं चाकरीस होते. पायी शिपाई मर्द किल्ले वे च घेतला उपयोगी बहुत दिवस सरकारी चाकरी उमेदीनें करूं लागले. सरकारही वाढवीत चालले. मालोजी घोरपडे हे [व] चवाण आप्त. एकविचारें सरकारचाकरी करीत होते. गाळमोटावर सरकारकामावर आले. याचा पुत्र विठोजी चव्हाण लहान होते. मालोजी घोरपडे यांणीं मुलाविषयीं सरकारांत अर्ज करून मुलाचा बंदोबस्त करून रायगडीं असामी देऊन ठेविलें. पुढें थोर होत चालला, त्यास आपल्या बराबर बागवून सरकार काम करवीत. पुढें संभाजी महाराज विल्हा पन्हाळा येथें राहिले. त्याजपाशी फौजेंत घोरपडे कांहीं स्वारानिशी होते. आपल्याबराबर विठोजी चव्हाण यासही स्वार करून देऊन आपल्या बराबर चाकरी करवीत होते. पुढें मालोजी घोरपडे यांचा काळ जहाला. त्यास पुत्र तिघे. त्यांत प्रमुख ज्येष्ठ संताजी घोरपडे व विठोजी चव्हाण हे मिळून एकविचारें चाकरी करीत होते. शकर्ते यांच्या अखेर व संभाजी महाराज यांच्या अखेरपर्यंत चाकरी केली. नंतर राजाराम साहेब यांच्या कारकीर्दीत संताजी घोरपडे व विठोजी चव्हाण यांणीं तुळापूरच्या* मुक्कामीं जाऊन पादशहा यांच्या फौजेवर छापा घालून पादशहाच्या डेऱ्याचे कळस सोन्याचे घेऊन राजाराम साहेब याजपाशीं विशाळगड मुकामीं आणून नजर केली. त्या समयीं घोरपडे तिघां बंधूंस किताबती देऊन विठोजी चव्हाण यास किताबत समशेर बहादर म्हणून देत असतां त्याणीं अर्ज केला कीं, " महाराज, पूर्वी आमचे वडील मोगलाईत चाकरी करीत होते त्यास हिम्मत बहादर ही किताबत होती ती द्यावी. " म्हणून अर्ज केला तेव्हां संतोष होऊन महाराज यांणीं हिम्मत बहादर म्हणून किताबत दिली. साडेतीन वस्त्रें, कंठी, शिरपेच, तोडा याप्रमाणें दिले आणि घोरपडे यांसही देऊन नंतर हिम्मत बहादर विठोजी चव्हाण यास दिले. शके १६१० विभवनाम संवत्सरे श्रावण शुद्ध ५ सोमवारीं वस्त्रें जहालीं. रामचंद्रपंत अमात्य यांचे दिमतीस स्वाधीन केलें. नंतर चंदी मुक्कामीं कामकामें बहुत केलीं. जुल्फुकारखान यांणीं चंदीस वेढा शके १६१७ सालीं घातला.तेव्हां महाराज निघोन देशीं यावयाच्या संधींत शके १६१८ बेंगलूर तालुक्यांत लढाई जहाली तेथें विठोजी चव्हाण पडले. त्याचे पुत्र उदाजीराव चव्हाण यास स्वारींत हिम्मत बहादरीचीं वस्त्रें दिलीं. वयवर्षें १६ याचे धाकटे बंधु सारेंच कुटुंब चंदीस होतें त्यांत होते. पुढें विशाळगड मुक्कामीं स्वारी येऊन नंतर सिंहगडास

* लेखांक ३ पहा.

महाराज जाऊन फौज जमा करून शाहू महाराज व येसूबाई साहेब वगैरे मंडळी पादशहाचा मुक्काम अवरंगाबादेवर होता तेथें बेगम याजपाशीं मंडळी शाहू महाराज सुद्धां होते. ते हस्तगत करावे म्हणून राजाराम महाराज यांणीं अवरंगाबाद मुक्कामीं जाऊन छापा घातला. परंतु शाहू महाराज हस्तगत झाले नाहींत. राजाराम साहेब माघारे सिंहगडास येऊन काळ जाहला. शके १६२१ प्रमादिनाम संवत्सरे फाल्गुन वद्य ८ स. नंतर ताराबाई साहेब व शिवाजी महाराज, कारभारी रामचंद्रपंत अमात्य मिळून राज्य करूं लागले. त्याजपाशीं उदाजी चव्हाण चाकरी करीत होते. त्याजकडे तालुका विजापूर व ठाणें व अठरा परगणे मणगुत्ती सुद्धां जुनाट शिरोळ, रायबाग वगैरे ठाणीं व खेडीं होतीं. पुढें देशीं शाहू महाराज शके १६२९ सर्वजितनाम संवत्सरीं आले. नंतर आईसाहेब यांचा व त्यांचा कलह वाढत चालला. त्यांत ताराबाई साहेब यांचे पुत्र शिवाजी महाराज यांचा काळही जहाला. संभाजी महाराज मोंगलाईंत जाऊन खटपट केली. तिकडून सिद्ध जहाले नाहीं. देशीं येऊन पन्हाळ्यास जाऊन उदाजीराव चव्हाण यांच्या हातून दंगा करवूं लागले. म्हणून शाहू महाराज यांणीं श्रीपतराव प्रतिनिधी व धनसिंगराव जाधव सेनापती यांस रवाना केलें. उदाजीराव चव्हाण शिराळे गुमट ऐथें होतें; तेथें येऊन वेढा घातला. या संधीस संभाजीराजे कुटुंबसुद्धां श्रीनरसोबाच्या वाडीस जावयास निघाले होते. तेथेंच उदाजी चव्हाण त्याच्या कुमकेस गेले. शिरोळ येथील वेढा उठवून उदाजी चव्हाण यास ठाण्यांतून लष्करांत आणिलें. नंतर दुसरे दिवशीं पुनः लढाई झाली. तेव्हां यांचा मोड जहाला. चव्हाणसुद्धां निघून महाराज पन्हाळ्यास आले. जाधवराव व प्रतिनिधी यांणीं बुणगें लुटलें महाराज यांच्या उभयतां मातुश्री यांची भेट घेऊन सन्मान केला. राजसबाईसाहेब व संभाजी महाराज यांचें कुटुंब सुद्धां पन्हाळ्यास रवाना केलें. ताराबाई साहेब तुम्हांपाशीं रहातें म्हणाली म्हणून सातान्यास घेऊन गेले. नंतर शाहू महाराज व संभाजी महाराज यांचा तह शके १६५२ त झाला. नंतर उदाजी चव्हाण संभाजी महाराज यांजकडे राहून शाहू महाराजांच्या राज्यांत दंगा करूं लागले. म्हणून शाहूमहाराज यांणीं आपल्याकडे नेऊन अथणी विजापूर देऊन ठेविले असतां दिलेले अजमीर जवला (कोल्हापुरकर संभाजी) याची कुमक करूं लागले. सबब शाहू महाराज याणीं रागें भरून याची खोड जात नाहीं म्हणून बाजीराव पेशवे पारपत्यास पाठविले. ते मिरजेस आल्यावर उदाजी चव्हाण पळून मोंगलाईत गेले. त्याजकडील तालुका पेशवे यांणीं घेऊन बंदोबस्त करून सातान्यास गेले. या नंतर शाहू महाराज यांच्या अखेरीपर्यंत देशीं आले नाहींत. नंतर नानासाहेब भाऊसाहेब पेशवे यांच्या कारकीर्दीत उदाजी चव्हाण यांस मोगलाईंतून घेऊन आले. त्यांस सरंजाम देऊन ठेविलें. थोडक्याच दिवसांत मिरज प्रांतीं एका खेड्यावर रोखा केला. गांवकर यांणीं रोखा टाकिला. याजबद्दल स्वारी केली. त्या ठाण्यावर घोडीस गोळी लागली. घोडी उधळली. रिकिबींत पाय अडकून डोचकें फुटून मेले. उभयतां पुत्र विठोजी चव्हाण व प्रीतिराव चव्हाण मोगलाईंतून देशीं येऊन डिगरजेस राहिले. विठोजी चव्हाण डिगरजेस नेहमीं राहिले. प्रीतीराव चव्हाण करविरीं शिवाजी महाराज याज-

पाशीं येऊन राहिले. पूर्वी लिहिलेला शके १६४० च्या मधील सालांत चव्हाण प्रकरणीं हकीकत वाकनिशीं लिहून ठेविली आहे. सुरुसन अर्बा तिसैन मय्या व अलफ. ते दिवशीं लिहून ठेविलें.

ले. १० (४०५)]

[श. १६४० श्रावण शु. १ ता. १७।७ सन १७१८

श्री

फसली सन ११२८ फेरिस्त नं. ४

यादी युवराजा व अष्टप्रधान पद द्यावयाच्या समयीं वस्त्रें वगैरे शके राज्याभिषेक ४५ विलंबीनाम संवत्सरे सुरुसन तिस्सा अशर मय्या अलफ.

१ युवराजा ... ...

१ वस्त्रें पांच भरगच्ची. ... ...

१ मंदील. १ चादर. १ पटका. १ किनखाप पान व १ महमुदी पान एक. एकूण सनगें ५

१ दागिने ... ...

१ शिरपेंच. १ कंठी मोत्यांची. १ चौकडा. १ मोत्यांचा तुर १ जगा. दागिने ५.

१ कित्ता ... ...

१ शिक्केकटार. १ चौघडा. १ हत्ती. १ चौरी सोन्याच्या दांडीची १ ढाल तरवार. १ जरीपटका. १ घोडा. १ चोपदार.

२ २ २ २

३ एकूण ... ...कलम.

१ पंत प्रधान यांस युवराजा अन्वयें.

१ सेनापती यांस सदहू अन्वयें.

१ पंत आमात्य.... ... ...

१ वस्त्रें ... ...

१ मंदील. १ चादर. १ किलखाप पान. १ महमुदी पान. एकूण सनगें चार ४

१ दागिने... ... ...

१ चौकडा. १ तुरा मोत्यांचा. १ कंठी मोत्यांची. १ शिर्पेच एकूण दागिने चार ४

१ कित्ता ... ...

१ शिक्केकटार. १ चवरी सोन्याच्या दांडीची. १ ढालतरवार. १ कलमदान रुप्याच्या दांडीचें. १ हत्ती. १ घोडा.

३ एकूण ... ... कलम. ... ...

१ पंत सचीव यास पंत अमात्याप्रमाणें.
१ पंत सुमंत सदर्हू अन्वयें.
१ पंत मंत्री यास सदर्हूप्रमाणें.
१ पंडितराव यास सदर्हूअन्वयें ढालतरवार खेरीज करून.
१ न्यायाधीश यास पंत सुमंत, मंत्रीअन्वयें.
१ पंत राजाज्ञा यास सदर्हू अन्वयें.

१०

१ उपप्रधान यांस वस्त्रें ३॥ साडेतीन.
१ तिवट. १ दुपेटा. ॥ किनखाफ. १ महमुदी पान.
सदर्हूप्रमाणें अष्ट प्रधान यांस वस्त्रें द्यावयाचीं.
१ चिटणवीस यांस.
१ वस्त्रें-मंदील १, झगा १, इजार १, दुपेटा, दुमजन १. एकूण.
१ दागिने-कंठी मोत्यांची १, चौकडा १, शिरपेंच १. एकूण.
१ कित्ता कलमदान रुप्याच्या पेटीचें १, चवरी रुप्याच्या दांडीची १, घोडा १
३ एकूण ... ... कलम.
१ फडणवीस वस्त्रें ३॥ साडेतीन, कलमदान रुप्याच्या दांडीचें १.
१ पोद्दार यांस वस्त्रें साडेतीन, कलमदान रुप्याच्या दांडीचें. १

१४

येणेंप्रमाणें राज्याभिषेकसमयीं शककर्ते महाराज यांनीं वस्त्रें वगैरे सन्मान दिला असे. छ २९ साबान.

ले. ११ (४९८) | श. १६४२ भाद्रपद वद्य ३ ता ८-९-१७२०

श्री

राजश्री देशाधिकारी व देशलेखक वर्तमान व भावी मामले दाभोळ प्रांत सुवर्णदुर्ग गोा यांस

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रेा कान्होजी आंगरे सरखेल रामराम सुरू सन इहिदे अशरीन मयां व अल्लफ. राघो बल्लाळ देसाई ता पंचनदी प्रांत मजकूर यांनीं विनंती केली कीं, आपले वडिलीं तर्फ मजकुरीचें देसाईपण साध्य केलें. आपणाजवळी अदिलशहा पातशहाचें फर्मान होतें तें धामधूमप्रसंगीं राजपुरकरांची स्वारी कसबे मजकुरीं पडली तेव्हां गांव जाळिला, आपलें घर दग्ध जहालें, त्यामध्यें कागदपत्र दग्ध होऊन गेले. आपणाजवळीं आश्रय कांहीं राहिला नाहीं. परंतु भोगवटा चालिला आहे, तो मनास आणून साहेबीं पत्र करून द्यावयाची आज्ञा केली पाहिजे; व पातशहाचे कारकीर्दीस हकलबाजिमे होते ते महाराज राजश्री.....थोरले कैलासवासी स्वामीनें दूर करून वतनदारांस मुशाहिरे

यांची मोईन करून दिली. ते वख्तीं आपणास मोईन दाभोळी लारी २०० दोनशें केली होती. त्यास आपले चाकरीवरी नजर देऊन कोणे सालीं शंभर, कोणे सालीं पाऊणशें रुपये साहेब पावीत असतातीं. ऐशीयास सन समान अशर मयामध्यें दुतर्फा मुलकाचा तह होऊन वतनदारांस हक्काची मोईन केली. ते वख्तीं आपणास मोईन रुपये ७५ पाऊणशें मुकरर केली आहे. त्याप्रमाणें सनद सादर होऊन पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चाले ऐसें आज्ञापत्र देविलें पाहिजे, म्हणून विनंती केली. ते मनास आणून तुम्हांस पत्र सादर केलें असे. देसाई माारनइलेचें पूर्वोक्त मनास आणितां, प्रथम मूल पुरुष नारोबा देसाई, त्याचा पुत्र मालोबा देसाई, त्याचा पुत्र दादोबा देसाई, त्याचा पुत्र बाळाजी, त्याचे पुत्र हल्लीं राघो बल्लाळ व गणो बल्लाळ; एकूण पांच पिढ्या वतन चालवीत आले आहेत म्हणून पुरातन लोकीं शाहिदी



दिली. देसाईपणाचे वतनाचा भोगवटा चालला आला आहे; व हक्काची मोईन सालीना रुपये ७५ पाऊणशें सन समान अशर मयामध्यें मुकरर केली आहे. त्या प्रमाणें देसाई माारनइलेस व त्याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेस वतनाची सेवा घेऊन हक्काची मोईन पावीत जाणें. सालदरसाल नूतन पत्राचा आक्षेप न करणें. तालीक लेहून घेऊन अस्सल पत्र देसाई मानिइले यांजवळी देणें. रा छ १५ माहे जिलकाद मोर्तब सुद. (शिक्का पत्राचे पाठीवर आहे.)

ले. १२ (४१२)

श. १६४२ आश्विन शु. ७ ता. २७।१०।१७२०

श्री

राजश्री फोंडसांवत भोंसले देसाई प्रांत कुडाळ गोसावी यांसि

छ अखंडित लक्ष्मी आळंकृत राजमान्य ... ...

प्रति राजश्री राजा शंभुछत्रपति उपरी बद्दल देणें बा ग मी न मा र ख(द)कर्ज राजश्री हरी सांवत यास रुपये ६००० सहा हजार रुपये देविले आहेत. सदर्हू ऐवज अधीं अधीं मशारनिल्हेच्या जमावाकडे बिनकसूर आदा करणें. सदर्हू ऐवज दरसाल दोन हजार प्रमाणें तीन सालें पावणें. छ ५ जिल्हेज सुरुसन इहिदे अशरीन मय्या अल्लफ. बहुत काय लिहिणें "मोर्तब" असे.

ले. १३ (४२१)

श. १६४३ वैशाख वद्य २ ता. २-५-१७२१

श्री

सन ११३० फसली फेरिस्त नं. १

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री दादभट बिन पिलंभट उपनाम भट उपाध्ये स्वामींचे सेवेशीं--सेवक चांदोजी घाटये नाव जाधव व कारकून जंजिरे सिंधुदुर्ग दंडवत विनंती सुरू

सन इहिदे अशरीन मय्या व अल्फ. उपाध्येपणाचा पृथक् तुम्हांस व कृष्णभट अभ्यंकर महाजन मौजे मालवण यांस पृथक् होऊन जंजिरा आलीं. त्याजवर हजर मजालस छ जमादिलाखरीं सदरहू अश्वारूढ व तटसरनोबत व बारगीर व नायकवाडी लोक मिळून तुमचा स्याचा करिना मनास आणितां तुम्ही व जंजिराच्या लोकांनीं उपाध्येपणाचें वर्तमान सांगितलें कीं, महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामी यांनीं राज्य आक्रमण करीत असतां कुडाळ प्रांतास जमाव पाठवून कांहीं मुलूख कबदस्त करितां केवळ प्रांत मजकुरीं होती. ते समयीं महाराज राजश्री बसनूर प्रांत मोहीम करावया निमित्य आरमाराच्या जमावानिशीं मौजे मजकूर एथें आले. त्या उपर दर्यामध्यें बेट (मौजे मजकूर एथें आले.) नजीक दृष्टीस पडलें तेव्हां या बेटाचें नांव काय म्हणून पुसिलें, त्यावर कृष्ण सावत देसाई व भानजी प्रभु-देसाई प्रांत मजकूर यांनीं सांगितलें कीं, या बेटाचें नांव कुरटें असें सांगितलें. त्यावरी राजश्री स्वामी बेटावरी येऊन जागा पाहिला. तें स्थळ उत्तम विस्तीर्ण आटोपसारखें दिसलें. त्या उपरी राजा स्वामींनीं आज्ञा केली कीं या जागीं बिलंद किल्ला बांधून वसवावा, म्हणून आज्ञा करून किल्ला बांधावयास हुकूम केला आणि आरमारच्या जमावानिशीं राजश्री स्वामींनीं बसनूरावरी मोहीम केली. जंजिरा बांधावयास राजश्री स्वामींनीं मुहूर्त करिते समयीं पंडितराव व उपाध्ये ज्योतिषी होते. तथापि आज्ञा केली कीं पेस्तर संपूर्ण प्रांत हस्तगत करणें आहे हें कृत्य होतच आहे. ऐशियास गांवीचा उपाध्या असावा म्हणून आपणास व आपला मामा जानभट अभ्यंकर उपाध्ये मौजे मजकूर असे दाखल्यास धरून आणून छ १४ जमादिलावल सन खम्मस सितैन मार्गशीर्ष बहुळ २ ते* दिवशीं किल्ला बांधण्यास मुहूर्त करून चिरा भूमीमध्यें बसविला; आणि सिंधुदुर्ग असें नांव ठेविलें आणि आपणास व आपला मामा जानभट यांस राजश्री स्वामींनीं सांगितलें कीं तुम्हीं ब्राह्मण या जागीं सुखरूप राहणें, कांहीं शंका मनामध्यें न धरणें. प्रांत मजकूर हस्तगत जहालाच आहे. कांहीं किंचित् अद्दलशाई कुडाळापासून मामले फोंड्यापर्यंत ठाणीं आहेत तीं दहशत खाऊन जातील. महाराज राजश्री स्वामींचें राज्य प्रबळ होत आहे. चिंता न करणें. म्हणून अभय देऊन सांगितलें. त्याउपर आम्ही एथें राहिलों. पडून जावें तर यत्न नाहीं. त्यावर आपला मामा जानभट यांणीं आपणास सांगितलें कीं तूं म्हणजे एका पायानें क्षीण आहेस. तुझेवस्तु हर कोठें जावतें येवतें असा अर्थ नाहीं. तूं एथें राहणें, जंजिराचें उपाध्येपण चालविणें. जो उपाय होईल त्यावर आपला योगक्षेम करणें म्हणून सांगितलें. त्या गोष्टीस आपण मान्य होऊन या स्थलीं राहिलों. आपला मामा जानभट मालवणीं जाऊन राहिला. महाराज राजश्री स्वामींचें राज्य प्रबळ होऊन कुडाळापासून फोंड्या कडेवाड शिवेश्वर देवाचे महाल पर्यंत ठाणीं बसविलीं. अद्दलशाई ठाणीं निःशेष निघोन गेलीं. आपल्या मनाच्या ठायीं निर्धार जाहला जे, या उपर अद्दलशाईचा प्रसंग होत नाहीं. हेंच राज्य प्रबल जहालें. असा निश्चय चित्ताचे ठायीं केला आणि या जागीं राहिलों. त्या उपर आपला मामा जानभट यांणीं हि जंजिरां वास्तव्य केलें. परंतु उपाध्यायपणाचा व्यवहार-संबंधें जें कर्तव्य तें आपणच

* १६ जमादिलावल. शके १५८६ = २५-११-१६६४.

करीत होतों. जानभटामध्यें व आपणामध्यें भिन्नता नव्हती. असें असतां महाराज राजश्री संभाजी राजे तक्तारूढ जहाले. त्या उपर सहासात वर्षांनीं शामल तांब्र फौजेनिशीं प्रांत मजकुरीं आला. त्यामुळें संपूर्ण प्रांत उध्वस्त जहाला. कितीएक मनुष्यें तांब्रेनीं धरून नेलीं. तांब्राच्या भयास्तव ज्यास जिकडे मार्ग जहाला तिकडे मनुष्यें निघून गेलीं. जानभट आपला मामा मालवणामध्यें कुटुंबसह होता, तो तांब्राच्या धामधुमी करितां परागंदा होऊन गेले. कुडाळ प्रांतीं संपूर्ण धामधुमी जहाली.त्या उपरांतिक खेम सांवत देसाई प्रांत मजकूर यांणीं महाराज राजश्री स्वामींच्या राज्याची निष्ठा सोडून तांब्राचा अवलंब धरिला आणि तांब्राकडील फौजदार महंमद अब्बस व अबदुल राजखान यांस जमावानिशीं कुडाळास आणिलें. त्यांच्या स्वाऱ्या मुलखामध्यें होत्या. एकवेळ मौजे मजकुरीं स्वारी येऊन कित्येक लुटी नागाव करून मनुष्यें धरून नेलीं. मौजे मजकुरचे देव श्रीनारायण व रामेश्वर एथें गोवध करून देवस्थानें भ्रष्ट केलीं. जंजिऱ्याच्या मनुष्यांस बाहेर जावया करितां मोगलांच्या भयास्तव सांवंताच्या रिस्का ? करितां जागा नाहीं. कोठून दाणा गल्ला येणें तो राहिला. मनुष्यांस अन्न नाहीं. जो कोणी मूठमर्दीनें दलाकडे जाऊन भाजीपाला आणून उदरपोषण करीत वांचला व कितीएक मनुष्यें जंजिराच्या लोकांचीं मयत जहालीं. असा प्रसंग जाहल्यावर चाकर लोकांखेरीज जंजिरे मजकुरीं जे कोणी होते ते बिदनूर प्रांतीं जाऊं लागले. ते समयीं जंजिराचा मुद्राधिकार राजश्री कृष्णाजी मोहिते यांस होता. त्याणीं व जंजिऱ्याचा तटसरनोबत व नाइकवाडी याणीं आपणास पुसिलें कीं तूं ब्राह्मण म्हणजे एका पायानें क्षीण आहेस; तुझ्यावस्तु कोठें जावतें असें नाहीं. जंजिरामध्यें अन्नाचें दुर्भिक्ष्य जाहलें. त्याहीमध्यें कर्नाटकांतून वाणी उदमी उकडे तांदूळ आणितात. ते कांहीं ब्राह्मणाच्या प्रयोजनाचे नव्हत. आम्ही मराठे लोक भाजीपाला खाऊन धन्याची जागा जतन करीत आहों. आमच्या निष्ठेस फलदाता ईश्वर आहे. आम्हा चाकर लोकांस सुटका नाहीं. तूं ब्राह्मण करनाटकास जाणार तर सुखरूप जाणें. आम्ही निरोप देत असों. म्हणून आपणास सांगितलें. त्यावर आपण उत्तर दिलें कीं आपण एथें आहां. मागें तुम्हांमध्यें राहून उपाध्येपण करून सुख भोगिलें आणि तुम्हांस कांहीं काल विलग पडल्यावर टाकून जावें, ही गोष्ट ईश्वरास बरी मानवणार नाहीं; व महाराज राजश्री स्वामींनीं जे समयीं सिंधुदुर्गास मुहूर्त केला ते समयीं आपल्या मामास विचारिलें कीं, येथें ब्राह्मण कोण रहातो. ते समयीं आपला मामा बोलला कीं आपला भाचा दादंभट येथें राहून उपाध्येपण करील. म्हणून बोलून महाराज स्वामींचे दृष्टीपुढें आपणास उभें केलें. आपण ते समयीं महाराजा सन्मुख बोललों कीं आपण येथें राहून उपाध्येपण करीन म्हणून सांगितलें. ती गोष्ट आपल्या चित्तामध्यें आहे. ते केवळ महाराज स्वामीजवळ मी भाष्य दिल्यासारखी जहाली. त्या गोष्टीस आतां माझ्या हातून आतां अंतर करवत नाहीं. होणार प्राक्तनाधीन आहे. कोठेंही गेलों तरी सुटणार नाहीं. असें असतां ही जागा टाकून आपण जात नाहीं. तुम्हाबरोबर जसें होईल तसें होऊं म्हणून बोललों. त्या उपर जंजिऱ्याचे नायकवाडी याणीं व लोकांनीं आपलें समाधान केलें कीं, आम्हा निमित्य तुम्ही म्हणून इतका निर्धार केला, त्यास आम्ही जें अन्न मिळवूं त्यामध्यें तुमच्या प्रयोजनाचे सुरई तांदूळ व नाचणे जे मिळ-

तील ते तुमच्या कुटुंबास देऊन, भाजीपाला आणूं त्यांतील विभाग तुजला देऊं म्हणून समाधान करून सांगितलें. त्यावरून आपण राहिलों. त्यास जंजिऱ्यामध्ये पांच वर्षेपर्यंत मोठें महार्णवांतील दुःखामध्यें गडकरी यांच्या घरीं लग्न मुहूर्त, हव्यकव्य, बरें वाईट जो प्रसंग जहाला जो संपादिला. ज्यानें आपल्या उचितानें जें दिलें तें तितकें घेऊन लक्षशः मानिलें,न्यून पूर्ण बोलिलों नाहीं.कार्यनिमित्तें जे सर्व प्रसंग धामधुमीकरितां तुटका जहाला असेल तो पदार्थ द्यावयास हे लोक अनमान करणार नाहींत. पदरीं नाहीं तेव्हां मजलाच कोठून देणार ? असें चित्तामध्यें मानून कार्यप्रसंग संपादिले. कोणाचेंही न्यून पडूं दिलें नाहीं. व कोणा समागमें खटला न केला. याप्रमाणें पांच वर्षें दुःखाचीं घालविलीं. उपरांतीक सुभिक्ष्य प्रसंग होत चालला. महाराज राजश्री राजाराम चंदी प्रांतीं असतां राजश्री रामचंद्र पंडित अमात्य विशाळगडीं राहून संपूर्ण तांब्र कोंकण प्रांत प्रवेश केला होता त्यास दहशत लावून निःशेष घालविला. कुडाळ प्रांतही राजश्री नरहर कृष्ण मुतालिक दिमत पंत प्रतिनिधि व राजश्री सखोजी नाईक जगताप यास जमावासहवर्तमान पाठवून खेम सांवत यांस हातीं घेऊन कुडाळीं मोगल होता तो पराभवातें पाविला. प्रांत मजकूर कबदस्त जहाला. मनुष्यास जाण्यास व यावयास मुलुखगिरी मध्यें रहावयास जागा जहाला. सुभिक्ष्य काल दृष्टीनें पाहिला. त्या उपरांतिक ईश्वरी इच्छेनुरूप होणारा सारखें कालचक्र प्रसंग सन आर्बा तिरसैन यामध्यें महाराजांचा प्रसंग जंजिरा प्राप्त जहाला. ते समयीं उपलग मनुष्यें जितकीं होतीं तितकीं कांहीं मेलीं व कांहीं गेलीं. जंजिराच्या लोकांचीं तर घरें बुडालीं ते समयीं आपण जातों तर कोणी नको न म्हणतें. परंतु आजपर्यंत येथें राहून काळ दुष्काळ काढून या लोकांस सोबत दिली. त्यास अशा प्रसंगास टाकून गेल्यावर ईश्वर बरें पहाणार नाहीं, म्हणून निर्धार करून पाहिला होणार प्रसंग चुकत नाहीं, परंतु कांहीं बुद्धिवाद सांगावा. दैवी मानवी उपाय करून अरिष्ट दूर करावें. म्हणून लोकांस व सुभानजी नलवडे मुद्राधिकारी यांस सांगितलें आणि कितीएक शांति केल्या, व मौजे मजकूरचे देव तांब्र यांनीं भ्रष्ट केले आहेत त्यांची हि अर्चा शुद्ध करावी म्हणून सांगितलें; आणि दोन देवस्थानें अर्चाशुद्ध शास्त्रसंमतें बोललीं आहेत त्याप्रमाणें करून देवस्थापना केली. त्यावरून मौजे मजकुरचे ग्रामस्थ यांनीं देवासंनिध उभें राहून संकल्प केला कीं, देवा, तुझी स्थापना या ब्राह्मणानें केली, हा मौजे मजकुरचा उपाध्या; परंतु या समयीं अधिक कांही द्यावें म्हणून समस्त ग्रामस्त मिळून दोन देवालयांचा अभिषेक आपणास देऊन वृत्तिभूमीपत्र करून दिलें. उपाध्येपण गांवचें व किल्याचें इस्तकबील पासून आजपर्यंत करीत असों. असें असतां कृष्णभट महाजन जानभटाचे गोत्र पुरुष हे मौजे मजकुरीं येऊन राहून आपणा समागमें उपाध्येपणाचा खटला करूं लागला. त्यास पाहिल्यापासून सदरहू वर्तमान विदित केलें आहे, मनास आणून मनसुबी करावी, म्हणून तुम्ही हजर मजालस करीणा सांगितला व जंजिगचे मोतादिमत तटसरनोबत नाइकवाडी लोक याजवळही हजर मजालस आणितां त्यांणीं सांगितलें कीं, महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामींनीं जंजिरा वसाविला त्या दिवसा. दारभ्य आजपर्यंत दादंभट उपाध्ये आम्ही जाणत आहों. आमच्या घरचा मुहूर्त सोहळा,

हव्यकव्य, कोणीं केलें, कोणाची प्रथम पिढी, कोणाची दुसरी व कोणाची तिसरी अशा तीन पिढ्यांपर्यंत हा उपाध्या, आम्ही याचे शिष्य, दुसरा पदार्थ नाहीं. हल्लीं कृष्णभट महाजन जानभटाचा गोत्रज म्हणून उपाध्येपणास भांडतो,तर ग्रामसंबंधिक उपाध्यपण बहुत काळ दादंभटांनीं चालविलें आहे. त्यास मौजे मजकुरचा उपाध्या जानभट, त्याचा गोत्रज कृष्णंभट्ट, त्यास ग्रामसंबंधें उपाध्येपण जें असेल तें दादंभट यांणीं व कृष्णंभटांनीं समजून रहावें. जंजिऱ्याचें उपाध्येपण दिवाणसंबंधिक व जितक्यांचा यांणीं व वाणी उदमी सावकार व सावकारी तांडेल व बनेतुम (?) इतक्यांचें उपाध्येपण दादंभट याचें आणि यांणींच आजपर्यंत उपाध्यपण चालविलें. कित्येक महार्णवाचे प्रसंग सोसिले. आम्हा लोकांबरोबर कितीएक काल दुष्काळ काढिला. भाजीपाला खाऊन सोबत दिली. आमचा काळ तुटका जे समयीं जहाला ते समयीं आम्ही जितकें दिलें तितकें लक्षशहा मानून आमच्या घरचीं कार्यप्रस्तें केलीं. महामारीचा प्रसंग जहाला ते समयीं हा ब्राह्मण जिवंत राहून महामारीचें भय न धरितां कितीएक प्रकारें शांतीकर्में केलीं. अरिष्ट निरसन होऊन त्यामुळें आमचे कांहीं जीव वांचविले. मौजे मजकुरचीं देवस्थानें भ्रष्ट जहालीं होतीं तीं या ब्राह्मणानें अर्चाशुद्ध करून स्थापना केलीं. इतकी खस्त खाऊन आजपर्यंत उपाध्येपण केलें. जंजिराचें उपाध्येपण म्हणजे आम्हां लोकांचें, तें आम्ही तीन पिढ्यांपर्यंत वडिलांपासून या ब्राह्मणास दिलें आहे व दिवाणसंबंधीं कार्यप्रस्त प्रसंगोचित होईल तेंही या ब्राह्मणाचें म्हणून लोकांनीं तुमचें वर्तमान सांगितलें व तुम्ही सदर्हू वर्तमान सांगितलें त्यावरून मनास आणितां, तुमचा भोगवटा मनास आणितां; जंजिरा यास मुहूर्त केल्यापासून साठ वर्षें झालीं.त्या दिवसादारभ्य उपाध्येपण करून जंजिऱ्यास राहून कितीएक काळ दुष्काळ काढून भाजीपाला खाऊन गडकरी यास सोबत दिली, त्यांच्या घरचीं कार्यप्रस्तें संपादिलीं. ज्याणें जें आत्मसंतोषें दिलें तितकें दातृत्व घेतलें; न्यूनपूर्ण कांहीं न म्हणिलें. व महामारीचा प्रसंग जहाला तें समयीं जंजिऱ्यांत राहून भय न धरितां कितीएक शांती करून अरिष्ट दूर केलें. मौजे मजकूरचे देव भ्रष्ट झाले त्याची स्थापना केली. असे कितीएक श्रमसाहस या जागीं केले. या करिता जंजिऱ्याच्या लोकांनीं विनंती केली कीं, दादंभट उपाध्या, याच्या उपाध्येपणास दुसऱ्यास संबंध नाहीं; व आम्ही लोक कांहीं दुसऱ्या ब्राह्मणास उपाध्या असें म्हणणार नाहीं. आमचें वचन उपाध्येपणाचें या ब्राह्मणास दिल्याचें गुंतून गेलें. आतां कांहीं भय नाहीं, म्हणावें असें नाहीं ? परंतु यासी पुढें उपाध्यपणाचें पत्र असावें तें करून द्यावें. आम्ही त्यास साक्षी असूं. पुढें आमच्या वंशीं जो कोणी होईल त्यांणीं दादंभटास व याच्या पुत्रपौत्रादि संततीस भजून आपल्या घरचें कार्यप्रस्त होईल तें याजपासून करवावें. ये विषयीं अंतर करील त्यास काशीविश्वेश्वराची शफत. असें असून चुकेल तो आमच्या वंशींचा नव्हे म्हणून शफत पूर्वक बोलले. आणि सर्वांनीं विनंती केली कीं, त्याजवरून व तुमचे श्रमसहास इस्तकबील पहिल्यापासून केले व तुम्हीं उपाध्यपण जंजिऱ्याचें बहुत काल केलें आहां. परंतु पत्र असावें ही गोष्ट आम्हांस समजून व लोकांनींही तुमच्या विषयीं विनंती केली त्याजवरून जंजिऱ्याच्या उपाध्येपणाचें

पत्र करून दिलें असे. तुम्ही व तुमच्या पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें जंजिऱ्याचे उपाध्येपण दिवाणसंबंधिक व लोकांच्या घरचें करीत जाणें. जंजिराचे उपाध्येपणास दुसऱ्यास संबंध नाहीं. आपलें समाधान असूं देणें. मौजे मालवण येथील ग्रामसंबंधिक उपाध्येपण आहे त्याचा अनुभव तुम्हीं व कृष्णंभट महाजन घेत जाणें. जाणिजे. छ १६ माहे रज्जब हे विनंती. " मोर्तब असे. "

ले. १४ (४१९)]

[श. १६४७ पौष शु. ७ ता. ३०-१२-१७२५

श्री.

सन ११३५ फसली. फेरिस्त नंबर २

तहनामा चिरंजीव राा संभाजीराजे यांस प्रती शाहू राजे यांणीं लिहून दिला सुरु सन सांत अशरीन मया व अलफ छ ५ माहे रविलाखर* ऊर्फ पौष शुद्ध ७ गुरुवार विश्वावसुनाम संवत्सरे... ... ...बितपशील

हद्द श्रीकृष्णा धौम महाबळेश्वरा पासून दक्षिण तीर तहत निवृत्तिसंगम× पर्यंत कुल दुतर्फा मुलूख दरोबस्त ठाणीं व किल्ले तुम्हांस दिले असत. कलम.

श्रीसावित्री नदी संगमा पासून तहत समुद्रगामिनी पर्यंत दक्षीण तीर जंजिर कोट. किल्ले सुद्धां व ठाणीं दरोबस्त महाल अंकोले‡ पर्यंत तुम्हांस दिली असत कलम १

मिरज प्रांत व विजापूर प्रांतींचीं ठाणीं देखील अथणी, तासगांव वगैरे तुम्हीं आमच्या स्वाधीन करावें. कलम १.

इकडील चाकर तुम्हीं ठेवूं नयेत व तुम्हांकडील चाकर आम्हीं ठेवूं नयेत. कलम १.

तुंगभद्रा दक्षिण तीरा पासून श्रीकृष्णा समुद्रगामिनी व श्री रामेश्वर देखील संस्थानें निमीं आम्हांकडे करार करून दिलीं असत. कलम १.

मोंगलाईतील वगैरे उत्तरेकडील मुलूख सुटले त्यांतील निम्मे प्रांत तुम्हांस देऊं व तुम्हांकडून सुटला असतां निम्मा प्रांत आम्हांस द्यावा. कलम १.

तुम्हाशीं जे वैर करतील त्याचें पारिपत्य आम्हीं करावें, आम्हांशीं जे वैर करतील त्यांचें पारिपत्य तुम्हीं करावें. तुम्हीं आम्हीं एकविचारें राज्याभिवृद्धि करावी. कलम १.

एकूण सात कलमें करार करून तहनामा लिहून दिला असे. सदर्हु प्रमाणें आम्ही चालूं. कांहीं अंतर येणार नाहीं. " मोर्तब. " §

---

* पौषांत जमादिलावल महिना आहे. × कृष्णा घटप्रभांचा. ‡ अकोला कारवारचे द० स वीस मैल. § लेखांक १८, १९, २० पहा.

ले. १५ (१६९) | श १६४८ फाा फेब्रुवारी स. १७२७

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री अंबाजीपंत स्वामी गोसावी यांसि

पोष्य बाजीराऊ बल्लाळ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत जाणें. विशेष तुम्हांकडून एक दोन पत्रें आलीं व चिरंजीव राजश्री चिमाजी यांनीं लिहिलें त्यावरून सविस्तर अर्थ कळों आला. ऐसियासि मुलकाच्या बंदोबस्ताबद्दल फौज या प्रांतें ठेवावी लागते. त्यास कांहीं फौज आंगेजणी केलिया खेरीज राहते असें नाहीं. यास्तव तुमच्या आगमनाचा मार्ग लक्षावा लागला. तरि जे क्षणीं तुम्हांस पत्र पावेल ते क्षणीं अविलंबे स्वार होऊन आलिया उत्तम आहेत. पूर्वी हि पत्रें पाठविलीं आहेत. परंतु यावयास विलंबावर घातलें. या उपरि दिरिंग लावावा ऐसें न करणें. त्वरेनें आलें पाहिजे. तुम्ही येथें आलियावरि येथील बंदोबस्त तुमचे स्वाधीन करून राजदर्शनास जावें लागतें. ज्यांनीं रहावें त्यांनीं आंगेजणी करून बाकी भरावी आणि लोक ठेवणें ते तुमचे विचारें ठेवावे लागतात. आम्हांकडे सरकार इजारा करून घेतले दरगांवीची बोली औरंगाबादेस गोलियावरि करून घ्यावेशी केली आहे. तेही होईल. साराच प्रसंग इकडील अनुकूळ केला. परंतु तुमचे येण्यामुळें तटला आहे. तुम्ही आलियाविना कांहीं होत नाहीं. तरी लौकर लौकर येणें. आलियावरि तुम्हांस ठेऊन आम्ही हुजूर जाऊन. कळलें पाहिजे. विना तुम्ही आल्या-खेरीज राऊत राहत नाहीं. ×क ठी जी कडील कारभार तसाच बुडतो. सर्व प्रकारें आमचा घात न करणें. लौकर येणें, कीं पुढें तरी मामलियाची सांवरासांवर होईल वारंवार लिहावें तर अडलेंसें दिसतें. परंतु न लिहितां उपाय नाहीं. लौकर येणें. तुमचें येणें झाल्या खेरीज आमचें येणें होतच नाहीं. लोभ असो दीजे हे विनंती.

ले. १६ (१६७) | श. १६४९ चैत्र शु॥ १ ता. १२-३-१७२७

श्री.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५३ प्लवंग संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदा रविवासरे क्षत्रिय-कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यांणीं* राजश्री अंबाजी त्र्यंबक यांसि आज्ञा केली ऐसी जे.+मनसुब्याचा अर्थ सविस्तर राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांस लिहिला आहे

× क ठी जी म्हणजे कंठाजी कदम असावा. शाहू रोजनिशी ले. २५ वरून या कागदाचा काळ वर अंदाजी दिला आहे. +हा 'मनसुबा' निजामावरील धामधुमीचा होय. पहा शाहू रो.१९-३०. * येथें कोरी जागा आहे.

त्यावरून कळेल. तरि तुम्ही पंडित मशारनिल्हेस चार गोष्टी विचाराच्या सांगोन अमित्राचे पिछावरि * * कृत्यत (क्रियेत) फितूर तुटे तो अर्थ करणें. तुम्हीं स्वामींजवळ बोलोन गेलां काय, करितां काय, हा विचार कळत नाहीं. राजश्री प्रधानाचे व राजश्री सेनापतीचे चित्तीं विचार काय आहे हा तर्‍ही शोध घेऊन लेहून पाठवणें. त्यावरून स्वामी निश्चिती मानितील. *गूज काढावयाचा विचार चित्तांत येत नसेल तरि इलाज काय ? वारंवार त्याहावयाची सीमा झाली. परंतु कार्यभागाचा विचार दिसत नाहीं. या उपरि तरि गूज काढावें. फितूर तुटावा ऐसें चित्तांत असेल तरि पत्रदर्शनीं फौजेनिशीं अमित्राचे पिछावर येऊन त्याची ऽघाताहात करणें. ‡बहुत काय लिहिन.

ले. १७ (४१५) | श. १६५० आषाढ वद्य १ ता. ११-७-१७२८

श्री

सन ११३८ फसली फेरिस्त नं. १

स्वतिश्री राज्याभिषेक शके ५५ किलकनाम संवत्सरे आषाढ बहुळ १ सोम्यवासरे क्षत्रिय-कुलावतंस राजश्री राजाशंभुछत्रपति स्वामी याणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री कृष्णाजी पंडित प्रतिनिधी यास आज्ञा केली ऐसी जे, स्वामींनीं स्वामीकार्याविषयीं तुम्हांस आज्ञा केली आहे

हुजूरचा कारभार पूर्वी ज्या पद्धतीनें राजश्री परशराम पंडित करीत होते त्याप्रमाणें करावा आपल्या गळ्यास जाबसाल देणें त्यास स्वामीचे मुख्यच तुम्ही आहां.....कलम १

खासगी पागा व पीलखाना अठरा कारखाने व लोकांचा रोजमुरा यांचा हिशेब मनास आणून मोईनजाबते करून द्यावे स्वामी त्याप्रमाणें चालवितील... कलम १

सर कारकून व सरदार जिल्हेचे हिशेब व हुजरे यांची बोलाचाली तुम्ही मनास आणून स्वामीस विदित करीत जावी...कलम १

राजश्री यशवंतराव गोपाळ व शिवाजी शंकर व चिंतो महादेव व जिवाजी राघोजी याजकडील हिशेबकितेब तुम्हीं मनास आणावे. हे स्वामींनीं तुमच्या स्वाधीन केले आहेत.....कलम १

सोंधेबिदनूर येथील हिशेबकितेब मनास आणावे. तेथील खर्चाची बंदोबस्ती करून ऐवज मनास आणावा.....कलम १

पन्हाळा पावनगड येथील हिशेब मनास आणून बंदोबस्ती करावी व सिंधूदुर्ग...

कलम १

ऽ वरील सेनापतीच्या उल्लेखावरून हा त्यांचा फितूर निजामुल्मुल्क यांजकडे झालेला असावा असें दिसतें. तो फितूर नाहींसा करण्यास निजामावरच हल्ला करावा असा शाहूचे लिहिण्याचा भाव दिसतो. ‡ येथून खुद्द महाराजांचें अक्षर.

× वार जमत नाहीं ? * गुंज = मनांतली तेढ ?

येणेंप्रमाणें स्वामीनीं सहा कलमी धंदा तुम्हांस सांगितला असे. तुम्ही बरी चौकशी मनास आणून कारभार करावा. स्वामींनीं दिन प्रतिदिनीं तुमचें उर्जित करून चालवावें यास अन्यथा नाहीं. तुमची जिल्हे भूदरगड, सामानगडची राज्यकार्यानिमित्य स्वामीनीं घेतली असे हे एका वर्षानें तुमची तुम्हांस करार करून द्यावी. बहुत लिहिणें तरी तुम्ही सूज्ञ असा

ले. १८ (४१६)

श. १६५२ अ. भा० शु. ६ ता. ८-८-१७३०

श्री

सन ११४० फसली

फेरिस्त नं. ३

राजमान्य राजश्री नीलकंठराव त्र्यंबक यांस आज्ञा केली ऐशी जे तुम्ही तीर्थरूप राजश्री शाहूराजे दाजी ह्याजवळ बोली करणें.

उत्तम पक्ष कऱ्हाड पावेतों ×सारद, विजापूर, मिरज अगदीं स्थळें इकडील इकडेच असावीं. कोकण दाभोळे पासून किल्ले वसंतगड व कुपणे दया करून द्यावा... कलम १

कनिष्ठ पक्ष शिराळ्याच्या डोंगराची सारद करावी. स्थळें इकडील इकडे असावींत. कोकण विजापूर मिरज सदर्हू प्रमाणें.....कलम १

यामध्यें जे बोली ठरविली त्याविषयीं राजश्री शाहूराजे दाजी यांचे शफतपूर्वक लिहिलें घ्यावें व सनमादिक सरकारकून व राजश्री फत्तेसिंग भोसले यांचें लिहिलें द्यावें. इमान बोल तुम्हीं द्यावा. बोलीचा निष्कर्ष करून मातुश्री आईसाहेबांस बहुमानार्थ न्याव यास मातबर त्यास घेऊन व मातुश्री आईसाहेबही जावयास मसादतदेखील साहित्य मागून आणावें.

मध्यम पक्ष बनाम व मलकापूर सुभ्याची सारद स्थळें इकडील इकडे असावींत. विजापूर, मिरज व कोकण दाभोळ्यापासून क० १

रदबादलमुळें तिन्हीही पक्ष न व्हत तरि हद्द वारणा तहत रामेश्वरापर्यंत मुलूख व यामध्यें गड किल्ले देखील कोपल निर्वेध विजापूर, मिरज व निम्में कोकण राजापूर सुभा देखील संगमेश्वर यापासून व भगवंत रामचंद्र अमात्य व कृष्णाजी पंडित प्रातिनिधि, हिंदुराव घोरपडे व सगुणाबाई व राणोजी घोरपडे व शिंदे व नरगुंदे यांत अनुसंधानें लागलीं असतील त्यांस परिछिन्न अस्थपन्न द्यावें. इकडील सेवक इकडे असावे. ये विषयीं गेल्या अनुसंधानास नसहित असावींत भिवरेपलीकडे याचा लांब मुलुख द्यावा,.....कलम १

या प्रमाणें बोली करणें व त्यांचे प्रांतांत इकडील सेवकांचीं वतनें व इनामें तीर्थरूप राजश्री थोरले कैलासवासी स्वामीपासून आहेत तीं चालवावीं अशी बोली करणें. सुरूसन इहिदे सल्लासीन मया व अल्फ. जाणिजे छ ५ माहे सफर " मोर्तब. " *

---

* ले. १४, १९, २० पहा. × सारद = सरहद्द

ले. १९ (४५६) श. १६५३ चैत्र व. २ ता. १३-४-१७३१

श्री (तालीक)

तहनामा चिरंजीव राजश्री संभाजी राजे यांसिप्रति शाहूराजे यांणी लिहून दिल्हें सु॥ इहिदे सल्लासीन मया व अलफ. [शिक्का] छ १६ सवाल शके १६५३ विरोधिकृत नाम संवत्सरे चैत्र वद्य द्वितीया, बितपशील.

इा वारुण महाल तहद संगम दक्षणतीर कुल दुतर्फा मुलुख दरोबस्त देखील ठाणीं व किल्ले तुम्हांस दिल्हे असत. कलम १.

तुंगभद्रापासून तहद रामेश्वर देखील संस्थानें निम्मे आम्हांकडे, निम्मे तुम्हांकडे करार करून दिल्हे असत. कलम १.

किल्ले कोपल तुम्हांकडे दिल्हा त्याचे मोबदला तुम्ही रत्नागिर आम्हांकडे दिल्ही. कलम १.

वडगांव ठाणें पाडून टाकूं. कलम १.

तुम्हांसी जे वैर करतील त्यांचे पारिपत्य आम्हीं करावें. आम्हाशीं जे वैर करतील त्यांचें पारपत्य तुम्हीं करावें तुम्हीं आम्हीं एक विचारें असावें. राज्याभिवृद्धि करावी. कलम १.

वारणेच्या व कृष्णेच्या संगमापासून दक्षणतीर तहद निवृतिसंगम तुंगभद्रा पावेतों दरोबस्त देखील गड- ठाणीं तुम्हांकडे दिल्हीं असत. कलम १.

कोकणप्रांत साळशी पलीकडे तहद पंचमहाल आंकोल पावेतों दरोबस्त तुम्हांकडेस दिल्हे असे. कलम १.

इकडील चाकर तुम्हीं ठेवूं नये. व तुम्हांकडील चाकर आम्हीं ठेवूं नये. कलम १.

मिरज प्रांत विजापूर प्रांतींचीं ठाणीं देखील अथणी तासगांव वगैरे तुम्हीं आमचे स्वाधीन करावीं. कलम १.

एकूण नऊ कलमें करार करून तहनामा लिहून दिल्हा असे. सदर्हूप्रमाणें आम्ही चालवूं. यांसि अंतराई होणार नाहीं. मोर्तब चिटणिशीकडील §यादी.

ले० २० (४१८) श. १६५३ चै. व २ ता. १३-४-१७३१

श्री

सन ११४० फसली फेरिस्त नं. २२

तहनामा राजश्री संभाजीराजे सुरुसन इहिदे सल्लासीन मया व अलफ छ १६ शौवाल ... ... बितपशील

---

§ ले० १४, १८, १९, २० पहा. अशा सारखाच एक तहनामा (श.१६२९ मधील) खं २० ले. २८२ मध्यें आला आहे.

इस्तकबिल वारणा तहत संगम कृष्णा तीर कुल दुतर्फ मुलूख दरोबस्त देखील ठाणीं किल्ले दिले आहेत.

तुंगभद्रापासून तहत रामेश्वर देखील संस्थानें निम्मीं राजश्री संभाजी राजे यांस दिलीं. किल्ले कोपल त्यास दिला त्याणीं मुबदला रत्नागिरी द्यावी.

वडगांव किल्ला पाडूं. जे तुम्हांस बैर करतील त्यांचें पारपत्य आम्ही करावें आम्हाशीं वैर करतील त्यांचें पारपत्य तुम्ही करून तुम्हीं आम्हीं एकविचारें राज्याची अभिवृद्धि करावी.

वारणेच्या व कृष्णेच्या संगमापासून दक्षिणतीर तहत निवृत्तिसंगम तुंगभद्रा पावेतों दरोबस्त देखील गड ठाणीं दिलीं असत. कोंकण प्रांत साळशी पलीकडे तहत पंचमहाल अंकोलें पावेतों दरोबस्त. इकडील चाकर त्याणीं ठेवूं नयेत व तिकडील चाकर आम्हीं ठेवूं नयेत. मिरज प्रांतींचीं ठाणीं व तासगांव देखील आमच्या स्वाधीन करावें.

एकूण नऊ कलमी करार करून सदरहू प्रमाणें तह दिला असे. सदरहू प्रमाणें नऊ. स्वहस्ताक्षर मजकुराप्रमाणें करून देऊं. यादीप्रमाणें ×

ले० २१ (४१७)

श. १६५३ चै. व.६ ता. १६-४-१७३१

श्री

सन ११४० फसली

फेरिस्त नं. ४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५७ विरोधिकृत नाम संवत्सरे चैत्र बहुल ६ भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपतीस्वामी यांनीं राजश्री सुभानराव मोरे यांस आज्ञा केली ऐशी जे स्वामींची व चिरंजीव राजश्री संभाजी राजे यांची भेट झाली. वारणेपासून तुंगभद्रा पावेतों मुलूख दरोबस्त देखील गड, कोट, ठाणीं त्यांजकडे दिलीं. किल्ले कोपल चिरंजीव राजश्री यांजकडे देविले असे. तरी त्यांचीं पत्रें घेऊन येतील त्यांच्या स्वाधीन कोपल किल्ला करणें जाणिजे. बहुत काय लिहिणें, " मोर्तब " ×

ले. २२ [१६६]

श. १६५५ ज्येष्ठ व. ७ ता. २४।५।१७३३

॥ श्री ॥

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री अंबाजीपंत स्वामी गोसावी यांसि

सेवक बाजीराव साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशळ तागाईत ज्येष्ठ कृष्ण सप्तमी गुरुवार पर्यंत यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष-तुमचीं दोन तीन पत्रें व

× ले. १९ २० पहा.

बाळाचें+ पत्र व राजश्री स्वामींचीं पत्रें ऐशीं कांहीं कालीं परवां ऐशीं पावलीं. त्यांत सारांश कीं, " छावणी केली उत्तम केलें खर्चास व लोक राजश्री स्वामी पुरवितात. प्रतिनिधीस व सरलष्कर,कृष्णाजी दाभाडे रवाना केले.महाडास येतील.† उदाजी चव्हाणाकडील कारकुनास सांगोन दोन हजार प्यादे आणविले आहेत तेही येतील. संभूसिंग चव्हाण यासही बोलाविलें आहे. तेही आलियावर रवाना होतील. साचिवासही निरोप दिल्हा." म्हणून सविस्तर लिहिल्याप्रमाणें कळलें. परंतु येथील मनसबा ऐसा आहे. ‡शेखजी आम्हांस भेटले. खोकरीची वाट मात्र त्यांणीं दाखवून दिल्ही. काम करितां इतकेंच केलें. येथें येतांच दुसरे दिवशीं त्यास बोलावून हत्ती, वस्त्रें देत होतों; खर्चाची रदबदल करूं लागले. तेव्हां बोली करून तूर्त दहा हजार रुपये त्याचे पदरीं घातले. बहुमानासाठीं बहुतसा आग्रह केला. परंतु ते करून घेईनात. लोक कोणी त्याजवळ राहिले नाहींत. सारे उठउठोन आपापले कबिले काढावयास गेले. तेव्हां गड सुटले नव्हते. आतां गड सुटले. सारे कबिले मुलखांतच मागतीं राहिले. लोकांस मागती बोलावूं पाठविलें आहे. येतील तेव्हां खरें. पहिले लोक कोणी शें दोनशें भेटले त्यांस अटक करून ठेवावें तरि कौल दिल्हा. कार्य होतें कौलाचेंच होतें. यास्तव त्यास अटकही करितां नये. यास्तव निरोप दिल्हा. आंतील राजकारण होतें ते तो पहिलेच दिवशीं वारले. आतां प्रस्तुत कांहीं शेखजीच्यानें कार्य होत नाहीं. बरेंही वाटत नाहीं. चार महिने येथें राहिल्या उपरि मग त्यांच्यानें तरतूद होईल ते करतील. खर्चास मागतील तसें देणें लागेल. गड घेतले त्यापैकीं अवचितगड त्याचे हवाली कबिले ठेवावयास करावा असें झालें. तोही त्याचे हवालीं केला. न करावा तरि बेदील होतो. करावा तरि इतबारही पुरेना. परंतु करणें प्राप्त झाला. केला. या जातीचें त्याचें वर्तमान आहे. §खानजादा थोरला मेला. त्याचा लेक बाहेर होता तो आम्हांजवळ आहे, आणि लहान भाऊ त्याचे सहा जण आहेत. हाही मूल शहाणाच आहे. आंत सिद्दीसमूल व सिद्दीअंबर अ फ ला नी ऐसे आहेत. बाराशें माणूस किलियावर आहें. पहिले थोडके होते. आलीकडे अंजनवेली व *उंदेरीहून मदत त्यास आली. एकून भरती झाली आहे. अंजनवेलही मजबूतच आहे. उंदेरीही मजबूतच आहे. चारी जंजिरे त्याचे बरे खबरदार मुसलमानच आहेत. अंजनवेलीस कांहीं मराठे असतील त्याकडे विजयगड, गोवळचा कोट दोन आहेतच. तिसरा मंडणगडही त्यानें बळाविला आहे. रायगडावर तीन चारशें माणूस मुसलमान आहेत. चार पांचशें मराठे आहेत. गड न [?] बळाविला आहे. जुंजतात. कांहीं पैगामही वरील लागला म्हणून गेले आहेत. ते लिहितात सत्यामिथ्या तहकीक तह किंवा नाहीं. कळलें नाहीं वर्तमान येईल तें लिहून पाठवून. ऐसें वर्तमान आहे. सविस्तर कळावें म्हणून लिहिलें असे. लोभ असो दिजे हे विनंती. छ २२ जिल्हेज शनवार.

---

† हें पत्र हबशी याच्या मसलतीच्या संबंधाचें आहे. ‡ शेखजी—हा जंजिऱ्यातील एक फितुरी. येथें अक्षर गेलें आहे. § शिद्दीच्या मुलांपैकीं वडील. * उंदेरी कीं खांदेरी तें स्पष्ट नाहीं. तरी पुढील संदर्भावरून उंदेरीच असावें. + बाळाजी बाजीरावाचें.

ले. २३ [११९] | श. १६५६ सन १७३४

॥ श्री ॥

÷विज्ञापना–चिरंजीव राजश्री संभाजी आंगरे कुलाबियाहून विजयदुर्ग प्रांतें जावयास स्वार होते समयीं मजला व चिरंजीव राजश्री मानाजी आंगरे यांस जंजीरे कुलाबास ठेऊन कारभार संपूर्ण निरोपिला. त्याप्रमाणें त्यांची आज्ञा वरिष्ठ स्थानीं मानोन एकनिष्ठपणें वर्तणूक करून यथाज्ञानें देशदुर्गांचा परामर्श रक्षणयुक्त करावयाचें तें केलें. शिपाई लोक आदिकरून मातबर सरदार नामांकितांस खावया खर्चावयाची अनुपत्य जाली त्यांची समाधानें शब्द-गौरवानें व किंचित् देऊन घेऊन राखिलीं. चिरंजीव संभाजी आंगरे इकडे आले म्हणजे तुमचीं उर्जितें करून म्हणोन कित्येक शफतपूर्वक लोकांशीं भाषण करून महाराजांचे जागे जुने व नवे शामलापासून घेतले. ते हा कालपर्यंत जतन केले. कारभार प्रसंग काडी पावेतों केले ते चिरंजिवाचे आज्ञे खेरीज केला नाहीं. तदनंतर चिरंजीव विजयदुर्गाहून कुलाबां आले. आम्हांस व सर्व लोकांस आल्हाद जाला कीं, अतःपर आपलें उर्जित होईल व आम्ही काम-काज केलें हें धनी दृष्टीनें पाहून गौरशी करील म्हणोन आस्था होती. ते गोष्टी त्यांहीं एकी-कडे ठेवून आम्हांशीं व चिरंजीव मानाजी आंगरे याजशीं दुरोक्तीचें भाषण करूं लागले. नित्य नवेच कारभारसंबंधें आरोप ठेऊन प्रथमता मजला बाहेर घातलें. तदोत्तरीं मानाजीस जीवनमुक्त करावयाचें आरंभिलें. हें त्यास कळतांच हिम्मत धरून प्रातःकाळीं तो निघोन रेवदंडियास गेला. संभाजी आंगरे यांनीं देशदुर्गाचा परामर्श बंदोबस्त करावा, लोकांचीं समाधानें करावीं, ते किमपि न केली. जे दिवशीं चिरंजीव मानाजी आंगरे निघोन आले त्याचे दुसरे दिवशीं उंदेरकर शामलानीं थळच्या चौबुर्जी संनिध मोर्चा होता त्याजवरि घातले. जुंझ बरें दाट जाहालें. मुर्चीयांतील तोफ शामलांनीं नेली. तथापि तेथील लोकांचें समाधान व मोर्चाची बंदोबस्ती न करितां दुसरे दिवशीं चिरंजीव संभाजी आंगरे निघोन सुवर्णदुर्गास गेले. आणि तमाम लोकांनां अवसानें सोडलीं. महाराजांचे जंजिरे व कोट, ठाणीं नाजूक वरघाटे ताम्रानें उदंड उत्पात केले. राजे स्वारीस आले होते. परंतु महाराजांचे एक-निष्ठ सेवक होते त्यांणीं देशदुर्गे जतन करून फिरंगी, इंग्रज, शामल वगैरे शत्रूंवरि स्वामींचा प्रताप कोदंड फिरवून शत्रु पादाक्रांत केले. हल्लीं तरि सुगम प्रसंग महाराजांसारखा धनी सर्व प्रकारें अभिमानी चित्तावरि धरितील तरी रुमशाम शासनाक्रांत करितील. या समयीं फिरंगी, इंग्रेज, हबशी यांणीं महाराजांच्या स्थळाची चालना करावी ऐसें नव्हतें. परंतु कालवशें करून जालें त्यास उपाय काय? आपण महाराजांचे सवेशीं यावें याच उदेशें लवलीया* पर्यंत आलों. त्यास राजमाचीकराकडील कांहीं वृत्त आढळलें. यास्तव तिकडे गेलों. राजमाचीचा बंदोबस्त केला. व या उपरि कुलाबां जाऊन बंदोबस्त करितों. लोकांस

÷ हें पत्र लक्ष्मीबाई आंग्रे यांनीं शाहूमहाराजांस लिहिलेलें आहे. * लवलें = लोवलें हा गांव संगमेश्वराजवळ आहे.

विना दिल्या घेतल्या खेरीज समाधान होतें ऐसें नाहीं. तमाम लोक बेदिल, निराश्रित; धनी नाहीं, ऐसें त्यांचें चित्तांत जालें. साहित्य तो जालें पाहिजे. या जिल्ही या मु त शी ल जिल्हा राजश्री प्रधान पंताचा आहे. सर्व प्रकारे हशमांनीं व फौजेनें व कित्येक गोष्टीनें संजुदे आहेत. महाराजांनीं कृपाळू होऊन राजश्री प्रधानपंतांस आमच्या साहित्याविशीं आज्ञा करावी. महाराजांचे आज्ञेप्रमाणें ते साहित्य करतील. व लोकांस समाधानपूर्वक डौलें तीस पसतीस पाठवावी. तें त्यांस देऊन मनोधारण करून या जिल्हियाचा बंदोबस्त करून महाराजाचे पायासंनिध येतो. आम्हांस महाराजांचे पायांखेरीज दुसरा अवलंब आश्रा आहे ऐसें नाहीं. जरी डौलें येत नाहीं तरी लोक तजा वजा जाहाले. संभाजी आंगरियानीं तो या जिल्हियाची उपेक्षा केली आहे. महाराजांस एक एक स्थळ निर्माण करितां काय श्रम लागले आहेत ? ते स्थळें अनियासें शत्रूचे हातांत जाऊं सकते. लोकांचा इतबार पुरत नाहीं. लोक कष्टी आहेत. कोणे समयीं त्यांस काय बुद्ध सुचेल व कोणाकडे डोळे देतील तें न कळे. शत्रु तरी उशापायेतरास सकळ सामुग्रीनें सिद्धच आहेत. तरी महाराजांनीं कृपाळू होऊन डौलें अगत्य पाठवावी. सारांश महाराजांनीं सध्या दोन गोष्टी कराव्या. एक प्रधान पंतास साहित्याची आज्ञा करावी, दुसरे डौलें पाठवावी. म्हणजे बंदोबस्त महाराजांचे प्रतापें करून होतो. आम्हांस महाराजांचे पाया खेरीज दुसरा आश्रा आहे ऐसें नाहीं. देवधर्म मायबाप सर्व महाराजांचे पाय आहेत. सदर्हूप्रमाणें साहित्याची आज्ञा करणार महाराज धनी आहेत.

चिरंजीव राजश्री मानाजी आंगरे यांणीं राजकोट, चेऊल आपले हातीं घेतलें. हजार पांचशें माणूसही जमा केले आहेत व फिरंगी व इंग्रज ही अनुकूळ करून घेतले.

ले. २४ (४२) — श. १६५६ भाद्र. सन १७३४ आगष्ट पूर्वी

श्री.

श्रीमन्महाराज परमहंस परशराम बाबा स्वामीचे सेवेशीं आज्ञाधारक चरणरज बाजीनें कृतानेक विज्ञापना, स्वामींनीं आशीर्वाद पत्र पाठविलें तें पावलें. कितेक मजकूर लिहिला त्यास आमची निष्ठा स्वामीचें पायां शिवाय नाहीं, हें आम्ही काय सांगावें ? जैशी स्वामी बुद्धि चित्तांत धरतील तैशी होईल. असो ते इतका परिहार त्याहावा असें नाहीं. आम्ही लेकरें खरीं. आज नव दिवस जाहले. राजश्री × × × स्वामी निरोप देत नाहींत. आतां दोन प्रहरीं राजश्री आबाजीपंतांचें+ पत्र आलें कीं पुणेस लवकर येईन. असें त्यांचें पत्र आलें आहे. तर ठरावितां येईल. सेवेशीं आज्ञा पा ही विज्ञापना.

+ अंबाजीपंत पुरंदरे हा. १६५६ भाद्रपद शु. ८ (२५।८।१७३४) रोजीं वारला. त्या पूर्वीचें हें पत्र (भा. इ. सं. मंडळ ग्रंथांक ३३ पुरंदरे दप्तर भा. १ पृ. ६७).

ले. २५ [२५] | श. १६५७ श्रावण व. १ ता. २४-७-१७३५

श्री.

वेदशास्त्रसंपन्न राजश्री नारायण दीक्षित पाटणकर स्वामींचे सेवेशीं—विद्यार्थी बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती येथील कुशल ता॥ छ १४ रबिलावल जाणोन स्वकीय लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. विशेष स्वामीनें मथूरे सन्निध धर्मकृत्यास दहा गांव मागितले. त्यास तेथें आपला अंमल बैसला म्हणजे दहा गांव तुम्ही मागाल ते इनाम करून देऊं.सुरू सित सल्लासेन मया व अलफ.बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती-

---

ले. २६ [४२०] | श. १६५८ चैत्र शु.१ ता. २-३-१७३६

श्री

सन ११४५ फसली. फेरिस्त नंबर

शिक्का.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६२ अनल* नाम संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदा भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपती स्वामी याणीं वलंदेज यांस करून दिला तहनामा ऐसी जे- वलंदेज कुडीदोर जुली यासेफाल तेजफन खालनेस बंदर कोची यांणीं जंजिरे सिंधुदुर्गचे बंदरास आपणाकडील जाहजावरून नुबल दलील व पित्रलेनजाई या दोघांजणांबराबर कोल्हापूर मुक्कामीं पत्र पाठविलें असतां जहाला करार ... ... बितपर्शाल

१ वलंदेज बंदर कोची याचे बाबद हद्दीचे कोपानीं महाराजा सन्निध बसून बोली केली कीं, स्वामींची व वलंदेजाची गोडी व खुलासा बळकट झाला आहे तो यावत् चंद्रसूर्य तोंवर करार चालावा मध्यें अंतर होऊं नये.... ... ...कलम १.

१ महाराजांनीं आपणास मालवणच्या बंदरीं वखार बांधावयास जागा दिली आहे. तो वेंगुर्ल्यास वखार होती. त्यास त्यानें आपला खर्च लावून बांधून द्यावी. वेंगुर्ल्यास पहिलें आपलें चालवीत होते तसें चालवावें. म्हणून विनंती केल्याप्रमाणें करार असे

कलम १.

१ जहाज बंदरांत येतां वादळानें शिकस्त जहालें तरि आपले लोक लावून जिन्नस निघेल तो आपला आपल्यास काढून द्यावा, त्यास खर्च लागेल तो वरकड बंदराच्या शिरस्त्याप्रमाणें वलंदजांनीं आपणाकडून द्यावा.... ... ...कलम १.

पूर्वी वेंगुर्ल्यास फैतारी (फॅक्टरी) म्हणजे वखार होती ती लुटून नेली, त्या गोष्टीबद्दल आपल्या मनामध्यें कांहीं नाहीं. कलम १.

---

* अ अधिक पडला आहे. नल पाहिजे.

१ आणखी सोईकर वखारीस जागा मागतील त्यास तेथें जागा न द्यावी. जहाजावरून जिनस उतरेल त्याची व येथील जिन्नस भरीत करतील त्याची जकात घेऊं नये. वेंगुर्ल्यास चालत होतें त्याप्रमाणें चालवावें. कलम १

१ वखारींत कोणी चोरी केली तर त्याचें पारपत्य करावें. कोणी वखारीवर चढाई केली तरि त्यास मारून काढावें. नेक (ला) मत्ता आणून द्यावा. कलम १.

१ आपणाकडील उदमी माल नेतील त्याचा पैका न देतां दगाबाजी करतील त्यांचें पारपत्य करून पैका घेऊन आपणास द्यावा व आपले चाकर कोणी पळून जातील ते कबजी मुलुखांत उमगतील त्यास धरून आणून द्यावे. कलम १.

१ आतां या बोलीखेरीज कांहीं बोली असली तरि पुढें होईल. कलम १.

एकूण कलमें आठ. शालिवाहन शके १६५८ सोळाशें अठ्ठावन्न नियाबाच निगादास्त अय्यद ? " मोर्तब " तारीख २९ माहे शब्वाल सुरुसन शीत सल्लासीन मया व अलफ

ले २७ [४४]

श्री

श. १६५९ पौष व. १४
ता. ८-१-१७३८

श्रीमंत परमहंस+ महाराज श्री स्वामींचे सेवेशीं,

चरणरज बाजीराव बल्लाळ प्रधान कृतानेक विज्ञापना. येथील कुशल महाराजांचे आशीर्वादे पौष वद्य चतुर्दशी पावेतों मुक्काम भूपाळ यथास्थित असो विशेष. या प्रांतीं फौजेसहित आलों. नबाबाचा* व आमचा मुकाबला व्हावा तों नबाब भूपाल टप्पा अशीरी यास गेले. छ× ३ रमजानीं एक युद्ध जाहलें. दुसरें कालही एक युद्ध नबाबाचें व लोकांचें‡ झालें. बरासा तमाशा नबाबांनीं पाहिला. महाराजांचे प्रतापें मोर्चे नबाबावरील सलाबत बरीशी चढली. नबाब भोपाळचे आश्रयास तीस चाळीस हजार फौजेनिशीं बसले. आमचे मोर्चे बाद घोडीवरि बसले आहेत. कराळचा मार देत आहेत. मोंगलांचा आरगानरगा केला आहे. दाणा, गल्ला, वैरण, काडी कुल बाद जाहली आहे. बंगसाचीच गत यास झाली आहे. स्वामींच्या आशीर्वादें निजाम उल्मुल्क या ठिकाणीं बुडत आहे. अगर सुटका झाली तरि उत्तमच होईल. नबाब किल्लेबंद झाले त्यामुळें त्यांची अब्रू राहिली नाहीं. आपला आशीर्वाद समर्थ आहे. सर्व आशीर्वाद महाराजांचा आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

+ ' परशरामबाबा ' हें नांव स्वामी परशुराम येथील भार्गवरामाचे भक्त होते म्हणून त्यांस पडलें. परमहंस दीक्षा ग्रहण केल्यावर ब्रह्मेंद्रस्वामी असें नांव त्यांच्या गुरुजीनें त्यांस ठेविलें. ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र पृ०२पहा. ‡म्ह० आमच्या फौजेचें. * हे नबाब निजामउल्मुल्क होत. हें पत्र इ० १७३८ सालीं निजामास कोंडलें असतां लिहिलें हें स्पष्ट आहे. × श. १६५९ पौष शु. ५ (ता. १५-१२-१७३७).

ले. २८) {श. १६५९ माघ शु. २
[४३] } {इ. १७३८ जानें ११

श्री

श्रीमंत महाराज श्रीपरमहंसबावा स्वामींचे सेवेशीं. अपत्य चिमाजीनें कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना.येथील कुशल माघ शुद्ध द्वितीयापर्यंत स्वामींचे आशीर्वादें करून यथास्थित असो विशेष. तीर्थरूप राजश्री रायाकडून[1] पत्रें स्वामींस आलीं तींच व जिन्नस पाठविलीं आहेत. त्याजवरून विदित होईल. सारांश स्वामींचा अशीर्वाद तीर्थरूपांचे मस्तकीं आहे. तत्प्रभावेंकरून म्लेंच्छ मोठा गर्वेंकरून आला तो गर्वहत जाहला. समूळीं अविलंबेंच बुडालियाचें वृत्त येईल तें मागाहून सेवेशीं लिहून पाठवितों. अवरंगाबादेचीं फौज त्यांचे कुमकेस जाणार; शहर सोडून फुलदरीस आली आहे. स्वामींच्या आशीर्वादें ये फौजेचा निःपात इकडेच होईल. असो. आशीर्वाद दिला पाहिजे. होतें तें स्वामींच्या आशीर्वादें होतें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. २९ } {श.१६६० फाल्गुन शु.६
[५५] } {ता. ४-३-१७३९

श्री

श्रीमंत महाराज श्री परमहंस बाबा स्वामींचे सेवेशीं,

आपत्यें चिमाजीनें कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत फाल्गुन शुद्ध षष्टीपर्यंत स्वामींचे आशीर्वादेंकरून यथास्थित असे विशेष. आशीर्वादपत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन संतोष जाहला. तुम्हीं वसईवर लगट करून शिमगे पूर्णिमे आलीकडे श्रीनें तुम्हांस वसई दिली. ऐशियास स्वामी साक्षात्कार ईश्वराचा अंश आहेत. स्वामींचे मुखांतून निघेल त्याप्रमाणें होईल येविषयीं संशय नाहीं. स्वामींनीं कृपा करून अभय उत्तरें देऊन वसई दिली म्हणोन आज्ञा केली तेव्हां वसई दिलीच. स्वामींचें अभय [वचन] पूर्ण चितांत धरून आज्ञेप्रमाणें शरीरद्वारां साहस करणें तें आम्ही सर्वही करीत असों. तरि शिमगे पूर्णिमे आलीकडे वसईवर स्वामींचा ध्वजारोपण करण्यास स्वामी समर्थ आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. ३० } {श. १६६१ चैत्र व. ५
[४५] } {ता. १७-४-१७३९

श्री

श्रीमंत महाराज परमहंस स्वामींचे सेवेशीं,

चरणरज बाळाजी बाजीराव कृतानेक विज्ञापना. येथील कुशल तागाईत चैत्र वद्य पंचमी मंगळवार मुकाम म्हसाळ कृष्णातीर येथें स्वामींचे कृपेंकरून सुखरूप असों विशेष.

---

१ राया=राव=बाजीरावसेाा प्रधान.

वसईकडील† वर्तमान तर मोर्चे लागले आहेत. दोन तीन सुरुंग जवळही गेले आहेत. व पांच धमधमे तयार झाले आहेत. परंतु सुरंगास पाणी लागल्यावरून मोर्चे चालत नाहींत. लष्कर फार, दोन तीन महिने एक जागां मुक्काम झाला. गवत चहूं गांवांहून आणावें लागतें. असें वर्तमान तेथील आहे. तें स्वामींस तीर्थरूप राजश्री आपा सेवेशीं लिहीतच असतील.मीही वर्तमान विदित व्हावें म्हणून लिहिलें आहे. +इराणी तो वे या स (तहमास?) कुलीखान यानें पादशाह व सर्व लोक कैद केले; आणि आपण दिल्लीस येऊन तक्तावर बसणार. पुढें दक्षणेवर चाल करावी हाच त्याचा पुर्ता आशय आहे. असो. पुढें होईल वर्तमान तें शेवटीं लिहून पाठवूं. तीर्थस्वरूप राजश्री $राऊ ब-हाणपुराजवळ आहेत.येथील वर्तमान तर तूर्त राजश्री छत्रपती स्वामींचा मुक्काम येथेंच आहे. विशेष अर्थ लिहावयास योग्य आहे असें नाहीं.सर्व आश्रा व आशीर्वाद आमचे मस्तकीं असे. तों वसईही येईल. तहमास कुलीखानासही पोंचेल. स्वामींनींही सदैव लेखकास आज्ञा करून तीर्थस्वरूप राजश्री आपास लिहिलें पाहिजे. स्वामींची कृपा आहे तों सर्व घडतच आहे. वरकड विशेष अर्थ आहे असें नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. ३१ [४३९]

श. १६६१ वैशाख शु. १५ ता. १२-५-१७३९

श्री

त्यात * बुदले भरून छ ३ ‡ सफरीं कुल अवघी सिद्धता करून, लोकांस सुरुंग उडतांच हल्ला करण्याविशीं ताकीद केली. छ ४ रोजीं सुरंगास बत्या दिल्या. राजश्री ×राणबाकडील पांच सुरुंग उडावे. त्यांत चार उडाले. एक उडावयाचा होता तोंच लोकांनीं तांतड करून हल्ला केली.तों पांचवा सुरुंग उडाला.तेणेंकरून लोक बहुतकरून दगडांनीं दडपले. तैसे हल्लेस हशमाचे लोक चढले होते तेही उडाले; व फिरंगी यानें हुक्के व गरनाळा, दारूचीं मडकीं, बरखंदाजी, रंजगिरी येणेंप्रमाणें अतिशय मार दिला. यामुळें ते दिवशीं लोक कचमोहरे जाले. काम कारेगार जालें नाहीं. दुसरे दिवशीं दोन सुरुंग उडतां राहिले होते, त्यांचा शोध करून, बत्या ठीक करून, साऱ्या लोकांची निवड करून, हल्लेविशीं ताकीद केली; आणि सुरुंगास बत्ती दिली. त्यानें निम्मे बुरूज उडाला. लोकांनीं जीवित्वाकडे दृष्टी न देतां चालोन गेले. फिरंगी यांणीं आंतून मेढा घालून बळ धरिलें होतें. हल्ला करितांच हुक्के व गरनाळा, दारूचीं मडकीं, राळ, माशांचें तेल, बरखंदाजी ऐसा सीमे परता मार दिला. परंतु लोकांनीं मेला तो मेला,जळाला तो जळाला,त्याजवर दृष्टि न देतां ज्या जागां गेले त्या जागांच

---

† वसईचा किल्ला घेतल्याची हकीगत साष्टीची बखर पृ० १६-२२ यांत पहावी.

+ नादीरशहा (१७३८।३९). $ राऊ—राव—बाजीराव.

* हें पत्र असें त्रुटितच सांपडलें आहे. मजकुरावरून हें कोण्या सरदारानें शाहू-महाराजांस लिहिलें असावें. ‡(ता.१-५-१७३९). ×राणबा=राणूजी शिंदे.

कायम राहून फिरंगी यासही मार दिला. त्यांणीं तो जे जे जागा खिंडारें पडलीं होतीं त्या जागां दारूचीं मडकीं व राळ टाकून होमच मांडिले. तैसेंच लोकांनीं सोसून कायम राहिले. फिरंगी यांणीं तो हिमतीची व मर्दुमीची सीमा केली. तथापि बाहेरील मार बहुत जाला. आंतील चांगलेंच माणूस रेणोळ व ढो णें व मोठे मोठे फिरंगी मेले. त्यामुळें व बाहेरील मारामुळें बेऔसान होऊन कौल मागावयास माणूस पाठविलें. त्यांजवरून कौल देऊन त्यांजकडील तिघे भले माणूस आणिले. त्यांजपाशीं करार करून तहनामा देऊन आंत पाठविले. हत्यार व कबिले सामान सुद्धां सोडावे ऐसा करार केला. सहा दिवसांची मुदत दिली. जागां जागां गलबतें आणावयास माणसें पाठविलीं आहेत व जमाही झालीं आहेत. सत्वर जाऊन किल्यावर निशाण चढेल. ऐसें विस्तारें वृत्त लिहिलें. श्रवणें बहुत आनंद जाला. त्याचा विस्तार लिहितां विस्तार आहे. वसई [म्हणजे तेथें] एक्या तोंडानें झुंजावें. कोट बिलंद, गची रूंद. मोर्चा अथवा सुरुंग चालवीन म्हटल्यास पाणी लागतें. फिरंगी-यांसारखे झुंजणार. असें असोन अप्रतिम तर्तूद करून उघडे सुरुंग चालविले. त्यांणीं ही प्रत्योपकार यथाविध केला. तत्रापि स्वामींचें पुण्य व पराक्रम अप्रतिम. तन्मुलें त्याजवर सलाबत बसून ईश्वरावर तवकल केली. तन्मुलें फिरंगी यावर सलाबत बसली. दाक्षिणची फौज म्हणजे मऊ लागलें म्हणजे बेजरब घेणार, कठीण लागलें म्हणजे फिरोन पहाणें नाहीं. ऐशी पूर्वापार या राज्यांतील तऱ्हा. [असें] सरदारांस कर्म जहालें नाहीं, पुढेंही होणें नाहीं, हा तो निश्चयच आहे. स्वामी केवळ ईश्वरी अवतार; तन्मुलें ह्या फौजेस ह्या हिमती जहाल्या. ज्या प्रकारें वानरांकरवून लंका घेविली त्या प्रकारें हे गोष्ट जहाली. दक्षिणी फौजेस उपास करून व छातीचा कोट करून झुंजावें हे हिंमत पूर्वी कोणी केली ऐसें ऐकिलेंही नव्हतें. परंतु स्वामी साक्षात् ईश्वराचे अवतार ह्यामुळें हें कर्म होतें. येथें संशय नाहीं. सर्व प्रकारें ओढ, उपास करून हिंमत धरणें आणि येणेंप्रमाणें झुंजणें ही गोष्ट सर्व स्वामींच्या पुण्याची आहे. नाहीं तरि औरंगजेब पूर्वीही पातशाह जहाले होते. त्यांनीं हीं कर्में करावीं. परंतु त्यांस ही तवकल न जहाली. स्वामींचें पुण्य थोर, तत्प्रभावें हें होतें. नाहीं तरी ह्या गोष्टी विचाराच्या वाटेनें या समयांत ह्याव्या ऐसें येत नाहीं. स्वामी ईश्वराचे अवतार हे गोष्ट खरी येथें संशय नाहीं. आम्ही मानवी लोक, नानाविध मनाचे प्रकार, निश्चय होत नाहीं. सारांश येतदर्थी पर्याय मनांत आणितां अंत चित्तांत येत नाहीं. सर्व गोष्टी ईश्वरा-वतारासारख्या आहेत. जे सेवक हे पराक्रम पहात असतील त्यांचे जन्म धन्य आहेत. जे कामास आले त्यांणीं तो हा लोक व पर लोक साधिला. ज्या पासून ईश्वराची सेवा जितकी घडावयाची असते त्याप्रमाणें घडते. सारांश, हे तर्तूद, हे मर्दुमी; या समयांत हे हिंमत, हे गोष्ट मनीं ही कल्पवत नाहीं. हीं कर्में ईश्वरासमान आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विनंति.

ले. ३२ [५६] | श. १६६१ वैशाख व० १ ता. १३-५-१७३९

श्री

श्रीमंत महाराज राजश्री परमहंस बावा स्वामींचे सेवेशीं,

चरणरज चिमणाजी बालक विज्ञापना येथील वर्तमान तागाईत वैशाख वद्य १ पावेतों महाराजांचे आशीर्वादेंकरून यथास्थित असे विशेष. स्वामींचे आज्ञेप्रमाणें श्रीनिवास केदार याजसमागमें पुतळ्या १२५ रुपये १२५ एकूण सवाशें पुतळ्या व सवाशें रुपये पाठविले आहेत. सेवेशीं प्रविष्ट जाहलियाचें उत्तर सादर जाहलें पाहिजे; व सर्व स्वामींच्या आशीर्वादें-करून फत्ते जाहलेयाचें वृत्त सविस्तर काल लेहून सेवेशीं विनंतीपत्र ×पाठविलें आहे तें पुण्याहून रा॥ अंताजी नारायण यांणीं स्वामींचे सेवेशीं पावतें केलेंच असेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पैवस्ती चंद्र २४ सफर सन तिस्सा सल्लासेन हे ज मा अ से [?]

ले. ३३ [५७] | श. १६६१ ज्येष्ठ वद्य ६ ता॥ १५-६-१७३९

श्री

श्रीमत् महाराज श्री परमहंस बाबा स्वामींचे सेवेशीं

अपत्यें चिमाजीनें कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत ज्येष्ठ बहुल षष्ठीपर्यंत स्वामींचे आशीर्वादेंकरून यथास्थित असे विशेष. सोमाजी बराबर स्वामींनीं आशीर्वादपत्र पाठविलें +तें प्रविष्ट होऊन संतोषावासी जाहली. वसई फत्ते जाहली यावरून स्वामींनीं मजला कित्येक कृपा-उत्तरें गौरवून दाशरथी आदिकरून साक्ष-उपसाक्ष देऊन आज्ञा दिली. तर सर्व सामर्थ्य स्वामींचे आशीर्वादाचें. वसई दिल्ही दिल्ही हें उत्तरें त्रिवार स्वामींनीं लेख केलीं व स्वामींनीं पाटसास मज दर्शन दिलें तेथेंही वसईविशीं अभय दिलें. तदनरूप स्वामींनीं वसईवर सुदर्शन प्रेरून धर्मद्वेष्टे यांचा निःपात केला. येरवीं वसई सई होती असें [नवतें]; व टोपकर अग्निरूप होते त्यांच्या सर्व शक्ती कुंठित करणें हा प्रताप स्वामींचा, आम्हां मानवी लोकांचें हें कृत्य नव्हे. श्री रघुनाथ [यांणीं] वानरां हस्तें समुद्रीं पाषाण तरवून लंकेशादिक त्रिकूटाचळाचें मर्दन केलें; तैसेंच श्रीकृष्णें यादवां हस्तें म्लेच्छादि दैत्यांचें निर्दळण केलें; याच प्रकारें पाश्चात्यांचें उपमर्दन स्वामींनीं करून वसईत ध्वजारोपण केलें. स्वामी मूर्तिमंत ईश्वररूप आहेत. स्वामींचा प्रताप कर्तृत्व वर्णावयास

×ले. ३१ पहा. + ले. ३१ चे पत्राचा जबाब.

आमची बुद्धि नाहीं. प्रपंचिक विचारें **स्वामीं**नीं मज महत्त्व देऊन आज्ञा दिली तर हें सर्व भूषण **स्वामीं**चें आहे. मी स्वामींचा असें.

पुतळ्या पाठविल्या त्या निफासी आहेत. त्यांस फांसे करावयास सोनें तोळे ५ पांच पाठवणें म्हणून आज्ञा त्यांजवरून सदर्हू पांच तोळे सोनें **सो**माजी बराबर पाठविलें आहे.

लक्ष्मणराव याजबाबत सातशें रुपये आम्ही **पु**ण्यास येऊन सेवेशीं पाठवून देऊं.

जिन्नस पाठविणें वजन पक्के.

८३ साकर.
८३ गूळ.
८८॥ केशर.
८८१ कृष्णागर.
८८८३ कस्तुरी तोळे.
फिरंगी कागद गडी २.
पंवळी माळ १०८.

येणेंप्रमाणें पाठवणें म्हणून आज्ञा त्यावरून साताऱ्याहून देवविलें.

८३ साकर.
८३ गूळ.
पुण्याहून देवविलें वजन पक्के.
८८॥ केशर.
८८१ कृष्णागर.
८८८३ कस्तुरी.
फिरंगी कागद गडी २.
पंवळ्याची माळ. १०८.

मोतें दर रुपयास मोतीं १ एक प्रमाणें मोतीं सव्वाशें पाठवणें म्हणून आज्ञा. त्यास येथें मोतीं नाहींत. स्वामींचे आज्ञेप्रमाणें **पु**ण्यास खरीदी करून पाठवावयाविशीं लिहिलें आहे. मोतीं मिळालीं तर पाठवितील. मोतीं न मिळत तर सव्वाशें रुपये सेवेसीं पाठवितील.

पांच कारकुनांस पाठवितों त्यांस धंदे सांगणें म्हणोन आज्ञा. ऐशास आम्ही **पु**ण्यास आल्यावर **स्वामीं**नीं दोन अथवा तीन कारकून पाठवून द्यावे हे विनंती आमची आहे. असें असतां स्वामींनीं पांच कारकून पाठविले. तर स्वामी-आज्ञा आमचे वस्तु मोडवेल असें नाहीं. येविषयीं सोमाजी विनंती करील त्याजवरून विदित केलें आहे. स्वामींची आज्ञा सोमाजीनीं जबानी सांगितली त्याजवरून वस्त्रें पाठविलीं व सोमाजीस, सोमाजी बरोबर दोघे होते त्यांस दिलीं.

कारकुनास वस्त्रें.
१५ तिवटे.
३ पासोडिया.
१८

सोमाजीस रुप्याचें कडें दिलें, सोमाजीबरोबर दोघे होते त्यांस दोन पासोड्या दिल्या.

१९०॥ [?] पुण्याहून देवविले.

येणेंप्रमाणें सेवेशीं पाठविलें आहे. विदित जालें पाहिजे. सेवेशीं श्रुत व्हावें हे विज्ञापना.

ले. ३४ [९] — श. १६६२ पूर्वी, सन १७४०

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री ‡दीक्षित बावा स्वामीचे सेवेशीं,

विद्यार्थी **बाजीराव बलाळ प्रधान** साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ

---

‡ हे नारायण भट दीक्षित पाटणकर होत. हे पुढें काशीस जाऊन राहिले

स्वामीचे आशीर्वादें करून यथास्थित असों विशेष. मौजे **रांजणगांव** पो॥ मजकूर हा गांव खासगत मुकासा आहे तो राजश्री **बाबूराव मल्हार** यास दिला आहे. त्यास राजश्री **मानाजी जाधव** याजपासून चिरंजीव **राजश्री चिमणाजी** यांणीं बाकीचे ऐवजीं पैका घेतला त्यास दरम्यान तुम्हींच अहां. तुम्हीं आपले हातें कारभार विल्हेस लाविला आहे. हल्लीं मौजे मजकुरासि वगैरे गांवासि कटकट करणार म्हणून कळलें. स्वामींनीं दरम्यान होऊन त्याजकडील कारभार चिरंजीवापासून फैसल करून घेतला असतां हल्लीं ते कटकट करणार, ही गोष्ट उत्तम आहेशी नाहीं. स्वामींनीं त्यास माकूल करून सांगणें ते रीतीनें सांगावें आणि मौजे मजकुरास कटकट न करितां अंमल सुरळीत चालेल तें करावें. अगोदर स्वामीस लिहिलें असावें यास्तव लिहिलें आहे. तरि त्यास फजित करावयाचें तें करून मौजे मजकुराचे वाटेस न जात तें करणें. लोभ असो दीजे हे विनंती.*

ले. ३५ [५८]

श. १६६२ चैत्र वद्य १०
ता. १०-४-१७४०

श्री

श्रीमत् परमहंस **बा**वा स्वामींचे सेवेशीं

चरणरज **चि**मणाजी **ब**ल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशळ तागाईत छ ३ मोहरम चैत्र वद्य दशमी मुक्काम किल्ले § कोरिगड घाटमाथा यथास्थित असों विशेष. **औ**रंगाबादेहून **पा**रनेरनजीक आलों. तेथें राजश्री +**सं**भाजी आंगरे सरखेल एकाएकीं **आ**लीबागेंत उतरोन **हि**राकोट घेतला, **सा**गरगड घेतला, **चौ**लचा कोट घेतला, **थ**ळचा कोट घेतला, **आ**लीबागेंत **कु**लाब्याचें पाणी बंद केलें. ये समय येऊन आपलें रक्षण करावें. ऐसें ×**मा**नाजीचें पत्र ऽ**ना**नांजवळ आलें. येतांच **ना**नांनीं चार पांचशें राऊत **वा**सुदेव जोशी व **वि**ठ्ठल शिवदेव व अंताजी **ना**रायण यां समागमें देऊन रवाना केले. आम्हांस **मा**नाजीचें पत्र होतें तें आम्हांकडे पाठविलें. पत्र मार्गी पावलें. तेच दिवशीं लांब मजल करून **घो**डनदीवर मुक्काम केला. तेथून **मा**नाजीस आश्वासनाचें पत्र लिहून रवाना केलें. दुसरे दिवशीं विसां कोसांची मजल करून **लो**हगांवास आलों. **मा**नाजींचे कुमकेविषयीं इंग्रजांसही पत्रें पाठविलीं. तेच दिवशीं **पु**ण्याहून चिरंजीव **ना**नांस रात्रीं बोलावून आणून त्या समागमें सारी फौज देऊन रवानगी केली. ते येथून पांचवे रोजीं **कु**लाबियास जाऊन पोंहोचले. आपणही **पु**ण्यास जाऊन तीन दिवस तेथें राहून **मा**तुश्रीचें दर्शन व आज्ञा घेऊन स्वार होऊन काल येथें आलों. नाना तेथें पावले तेच दिवशीं **सं**भाजीकडील चौकी बाहेर उभी **हि**राकोटाजवळ आश्रयास होती, ते मारिली.पंचवीस तीस माणूस कापून काढिलें.

---

* सदर्हू अस्सल पत्र डुबेरकर बरवे यांजपाशीं आहे. § **को**री कीं **कां**गोरी ? + संभाजी हा कान्होजी आंग्रे यांच्या औरस पुत्रांपैकीं धाकटा. × **मा**नाजी हा **कान्होजी**च्या राखपुत्रांपैकीं एक, याजकडे कुलाबा किल्ला होता. ऽ **ना**ना=**बा**ळाजी **बा**जीराव.

§तुळाजी आंग्च्या जखमी धरून आणिला आहे. इंग्रजहि अगोदर कुलाबियास येऊन पाणी, सामान जें पाहिजें तें कुलाबियास पोंचविलें;व सांप्रत तो आरमारानशीं कुलाब्याजवळ आहे. तेथून तोफांचा मार दिला. त्यामुळें आलीबागेंतून सरोन हिराकोटचे उत्तरेस आश्रयानें मोर्चे बांधून राहिले आहेत. नाना सागरगडाखालून खाडीचे कडेनें गेले तेथें पंचवीस माणूस संभाजीकडील आलें होतें. त्यांत सरदार होता तो व पांच सात माणूस जिवें मारिलें व वरकड पळाले. सा सातजण धरून आणिले. जर संभाजी लौकर निकाल काढून जीव वांचवून निघोन गेला तर उत्तमच जालें. ऽगुराब व थोरली गलबतें इंग्रजांचे भयानें सुवर्ण-दुर्गाकडे लावून दिलीं आहेत. लहान गलबतें व ऽमहागिऱ्या मिळोन साठ ×दागिने तरतीं साखरीचे खाडीजवळ ठेविलीं आहेत. जर धीर धरून मोर्चेबंदी करून राहिला तर मोर्चे लावून पारपत्याचा विचार करणें तैसा स्वामींच्या आशिर्वादाचे बळें करीतच आहों. इंग्रजांस मार्ग देऊन जाऊं द्या म्हणून संभाजीनें सांगून पाठविलें होतें. परंतु इंग्रेजानें मान्य केलें नाहीं. आम्हीं =औरंगाबाद प्रांतीं आहों, ये प्रांतीं ध्यान नाहीं, ऐसा समय पाहोन, [संभाजी] आले होते. तुमचा आशीर्वाद आमचे मस्तकीं असतां त्यास समय काय फावणार आहे ! कळावें म्हणून लिहिलें असे. मानाजीची स्थापना आम्हीं केली. परंतु त्यास स्मरण न राही ऐसें जहालें. कितेक प्रकारें वावगी वर्तणूक आम्हांशीं केली. त्याचा विस्तार लिहिल्यानें चित्तांत येणार नाहीं. जे समयीं पाय पाहूं तेव्हां विदित करूं. उरण जागा फिरंग्याची ते आपणच बळावली. तैसेंच आमचे उरावर बांधिला (?) तेविशीं व पैक्याविशीं वारंवार लिहिलें, परंतु ते गोष्ट चित्तांत न ये. आज पांचा वर्षांत एक पैसा आमचा देणें तो दिला नाहीं. बहुतच अमर्यादा मांडिली. यास्तव त्याचेही डोळे उघडावे; याकरितां तजविजेनें पाल व मिरगड दोन्ही जागे संभाजीच्या हातास जात होते, तेथील लोकांचा दिलासा करून ते जागे घेऊन आपलीं निशाणें चढविलीं. तैसेंच फिरंगी याचें उरण बळाविलें होतें तेंही घेतलें. आजच फत्ते जाल्याचें पत्र उरणाहून आलें. सारांश त्याचे डोळे उघडले. व सर्व प्रकारें संभाजीचे हातोन जीवही ये समयीं वांचविला असे. सारांश इतकाही प्रताप स्वामींचे आशीर्वादाचा आहे. तेणेंकरून सर्व विचार होतात. दुसरा अर्थ नाहीं. कर्ज फिटेल ऐसें स्वामींचे मुखावाटे निघालें आहे, तेंही शेवटास जाईल. स्वामींच्या आशीर्वादावेगळें दुसरें जाणत नाहीं. उद्यां परवां घाट उतरोनही कुलाब्या पावेतों जाणार आहे. तेथें न पावतां अगोदर संभाजीचा निकाल जाला तर उत्तमच आहे. नाहीं तर तेथवर जाऊन

---

§तुळाजी-कान्होजीच्या राखपुत्रांपैकीं एक. हा संभाजीच्या पक्षाकडे होता. ऽएक प्रकारचें तारूं. ×दागिने=नग (तारवांचें). =औरंगाबाद प्रांतीं निजामाचा वडील पुत्र नासिरजंग याजबरोबर लढाई सुरू होती; तेव्हां बाजीरावाच्या कुमकेस आपा ससैन्य वरघाटीं गेले होते स. १७४०.

होईल वृत्त तें लिहून पाठवूं. निरंतर आशीर्वाद पत्र पाठवीत जावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. ३६ [११] | श.१६६२ आश्वीन व.५ ता॥ २९-९-१७४०

श्री

तीर्थरूप वेदशास्त्रसंपन्न राजश्री *दीक्षित स्वामी वडिलांचे सेवेशीं,

अपत्य **चिमणाजी बल्लाळ व बाळाजी बा**जीराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम आश्वीन वा॥ ५ मुक्काम कसबे पुणें **स्वा**मींच्या कृपेंकरून यथास्थित असे विशेष. **स्वा**मींनीं ज्येष्ठ शुद्ध १० चें पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर अर्थ कळला. सारांश **स्वा**मींचे आशीर्वादाचा सर्व आमचा विचार आहे. **स्वा**मींच्या आशीर्वादापेक्षां दुसरें दैवत जाणत नाहीं.

संसर्गदोषाचा× परिहार करावा. याविशीं **आज्ञा** लिहिली तर अवश्यक **स्वा**मींचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करूं.

कोणी मंत्रशास्त्री भेटतील आणि कांहीं अनुष्ठान करा म्हणतील तर ते गोष्ट न करणें, कोणाचा मंत्र न घेणें, **शि**वपूजन व **वि**ष्णुपूजन व गायत्रीचा जप व वेदोक्त अनुष्ठानें करीत जाणें, म्हणून लिहिलें; तर आज्ञेप्रमाणें करीत जाऊं. **स्व**धर्में करून आचरण करणें, कोणी दुराचरणी असतील त्यांस शासन करावें म्हणून लिहिलें; त्यास अवश्यमेव लिहिल्याप्रमाणेंच वर्तणूक करूं.

रायांचे वैभवाची वृद्धी व्हावी यास्तव आपण बहुत श्रम आजपावेतों केले, पुढें जोंपर्यंत आपण आहें तोंपर्यंत तुमच्या कल्याणास्तव श्रम करावयास अनुमान न करूं म्हणून लिहिलें; तर **रा**ऊ स्वामींस मातापित्रांचेठायीं मानीत होते, त्यांच्या कल्याणास्तव **स्वा**मींनीं श्रम केले

---

* पारसनीसकृत ब्रह्मेंद्र-चरित्र ले.५६ येथें हेंच पत्र आहे. ग्रांट डफ व्हॉ. १ पा. ४०२ (१८६३) यांत या पत्राचा दाखला दिला आहे; व सर्व वर्णन या पत्राबरहुकूम दिलें आहे. कांहीं वाक्यें तर या पत्रांतील वाक्यांचें भाषांतरच आहे. उपकारबद्ध मानाजीचें पत्र पुढें ले. ३९ पहा.

× थोरले बाजीरावानें मस्तानी घरांत बाळगिल्यानें सर्व कुटुंबीयांस जो संसर्गदोष पर्यायानें झाला त्याबद्दल-(नारायण दीक्षित पाटणकर चरित्र पृ. ४३).

१ रायाचें—रावाचें—बाजीरावाचें. बाजीरावास या पत्रामध्यें पुष्कळ ठिकाणीं राया, राऊ किंवा राव असें म्हटलेलें आढळतें.

२ देवतार्चन (सदर चरित्र पृ. ४३).

तर ते गोष्टींचें अपूर्व काय आहे ? बालकाचें कल्याण इच्छावें हें मातापितरांस सांगावें लागतें नाहीं. पुढें ही आम्ही लेकरें स्वामींचीं आहों. आमचें कल्याण व आमची बुद्धि उत्तम कर्माच्या ठायीं दिवसेंदिवस [लागून] यशाची अभिवृद्धि होय, ऐसा आशीर्वाद स्वामी देतीलच, व देवाची प्रार्थना करतीलच यांत संशय नाहीं.

राजश्री लक्ष्मण× **शं**कर,बुंदेलखंडांतील,त्यांचे हातून **स्वा**मींकडे खर्चास रवाना करवितों. तो ऐवज स्वामींपाशीं पावता होईल, तो घेऊन उत्तर त्यांजपाशीं द्यावें. ऐवजाचा अंगीकार करावा. माघारां सर्वथा पाठवूं नये.†

अकरा कावडी **रा**मेश्वरास पाठवाव्या म्हणून आज्ञा लिहिली; ऐशियास **स्वा**मींनीं तेथें* ब्राह्मण योजून तेथूनच कावडी आकरा **रा**मेश्वरास रवाना कराव्या.त्यास पैका पडेल तो लिहून पाठवावा. पाठवून देऊं.

राज्यप्राप्तीकरितां पूर्वी सत्तावीस लक्ष दूर्वा वाहिल्या आहेत. बाकी त्र्याहात्तर लक्ष राहिल्या आहेत त्याचा विघ राजश्री **वा**सुदेव दीक्षितांस ठावका आहे. तेविशीं त्यांस सांगितलें असे. ते दुर्वा देवास वाहतील.

चिरंजीव **ना**नांस आमची आज्ञा मान्य असें असेल तर, त्यांचें पत्र आज पावेतों आम्हास आलें नाहीं. त्यांचें पत्र आलियावर त्यास पत्र पाठवीत जाऊं, म्हणून लिहिलें; तर आज पावेतों **रा**यांनीं स्वामींचे आज्ञेस उल्लंघन न केलें, व आम्हांस स्वामींचे आज्ञेहून दुसरें दैवत नाहीं. तोच विचार चिरंजीव **ना**नाचा आहे. स्वामींची आज्ञा म्हणजे केवळ दैवत असेंच मानून वर्तणूक करितील. सांप्रत त्यांच्या आमच्या नांवाचें एकच विनंतिपत्र लिहिलें आहे. स्वामींनीं त्यांस आम्हांस एकच आशीर्वादपत्र पाठविलें तरी कार्यास येईल. चिरंजीव **ना**नाचा आमचा काडी इतका दुसरा विचार आहे असें नाहीं.

आजपावेतों जालें तें जालें, पत्र दिलें होतें तें फिरोन घेतलें, पुढें नवें जें प्राप्त होत जाईल त्याचा दुहोत्रा घेत जावा म्हणोन लिहिलें; तर दुहोत्राचा करार करावा असें काय आहे ? सारांश मीळ--जोड स्वामींच्या आशीर्वादें होईल. वरकड स्वामींची सेवा जे प्रकारें करणें ते प्रकारें करण्यास अंतर सर्वथा होणार नाहीं.

सारांश स्वामींचे आज्ञेचें उल्लंघन केल्यास कोण उत्तम फल पावेल ? आम्हांस तो

---

* म्ह. कीशाहून. × नारो शंकरचा भाऊ.

१. हें नारायण दीक्षित यांचें चिरंजीव. नारायण दीक्षित काशीस गेल्यानंतर वासुदेव दीक्षित संस्थानचे मालक झाले.

* नारायणभट्ट दीक्षित पाटणकर कायगांवकर.

† ले. ३७ पहा.

३. बाळाजी बाजीराव.

२ श्री विद्यागणपती (द्वादश भुजांची मूर्ती). औरंगाबादेनजीक सातारें येथें दीक्षितांचे वंशजांजवळ आहे.

स्वामीवेगळें दुसरें दैवतच नाहीं. हेच बुद्धि वडिलांचे आशीर्वादेंकरून स्थिर राहील हा सिद्धांत आहे. तेणेंकरून सर्व उत्तमच होईल. यांत संशय नाहीं. कृपा पाहिजे. हे विज्ञापना.

ले. ३७ [१०] | श. १६६२ मार्गशीर्ष शु. ५ ता ता १३-११-१७४०

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री **वासु**देव **दीक्षित** स्वामीचे सेवेशीं

विद्यार्थी **चिमणाजी बल्लाळ** साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल. ता ता मार्गशीर्ष शुद्ध पंचमी जाणून स्वकीय लिहीत गेलें पाहिजे. विशेष. वेदशास्त्रसंपन्न राजश्री **नारा**यण **दीक्षित** यांस रुपये १५००० पंधरा हजार राजेश्री **लक्ष्मण शंकर** यांजकडून देवविले आहेत. × मशारनिल्हे प्रांत **बुंदेलखंड** येथें गेलियावर वसूल करून **दीक्षितांकडे श्रीस** पावते करतील. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें असे. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंती.

मार्गशीर्ष वद्य २ शके १६६२ रौद्रनामसंवत्सरे.

ले. ३८ [४९] | श. १६६२ माघ शु. ९ ता ता १४-१-१७४१

श्री

श्रीमंत परमहंस महाराज श्री स्वामींचे सेवेशीं

चरणरज **बाळाजी बाजीराव प्रधान** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागाईत छ ७ जिलकाद पावेतों स्वामींचे कृपावलोकनें करून यथास्थित असे विशेष. बहुत दिवस आशीर्वादपत्र पाठवून परामृष न केला, असें नसावें. चरणरजाचा परामृष सदैव करावा. तीर्थरूप **आपां**नीं * कैलासवास केला हें वर्तमान स्वामींनीं ऐकिलेंच असेल. मोठा घातच झाला. तीर्थरूप × राऊ यांणीं कैलासवास केलियास आठ महिने न झाले तों श्रीनें हा प्रसंग घडविला. एकाएकींच श्रीनें दुःखार्णवीं पाडलें. होणार बळवंत. श्रीइच्छेस उपाय काय? वडील होते त्यांजवरि स्वामींची कृपा होती. जों जीवित्व तों पर्यंत कीर्तीच जाहली. त्या माघारी चरणरजावरि महाराजांची कृपा आहेच व कृपेमुळें कल्याणच होईल. नबाब **निजामउल्मुल्ख** याचा व **नासरजंग**चा कलह निर्माण झाला होता. त्यास आम्ही साहित्य करितां **निजामउल्मुल्ख** यांचें केलें. त्यावरून **नासरजंग** फकीर

×थोरले बाजीराव श. १६६२ वैशाख शु. १३ (ता. २८-४-१७४०) रोजी मरण पावले आणि चिमाजी अप्पा श.१६६२ पौष शु. १० (ता. १७-१२-१७४०) रोजी निवर्तले. हें पत्र बाजीरावाच्या नंतर व चिमाजीच्या हयातींतील आहे. × ले. ३६ पहा.

* ले. ३६ पहा.

जाहले. तदोत्तर आसफज्याची भेटी झाली बहुमान आदर फारच केला. सर्वप्रताप स्वामींचे कृपेचा आहे. स्वामीवांचून आम्हांस दैवत नाहीं. वरकड विस्तार काय लिहिणें ? सेवेशीं श्रुत व्हावें हे विज्ञापना.

ले. ३९ } { श. १६६३ चैत्र व. ४
[१०० } { ता॥ २५-३-१७४१

॥ श्री ॥

राजश्री बाळाजी पंडित प्रधान दाजी गोसावी यांसी—

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्षुमी अलंकृत राजमान्य स्रेा॥ मानाजी आंगरे वजारतमाब रामराम विनंती उपरि येथील जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. सांप्रत पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं मोंगल आगळीक करून पुढें येत आहे म्हणून आपण मजल दरमजल मोंगलाचा उपमर्द करावयाकरितां जात आहेत ऐसें वर्तमान परस्परें कळोन येत असे. हा काल पावेतों मोंगल आपले दर्पे कडून स्रेहांत असतां या समयीं दुर्बुद्धि धरिल्यावरून आपण पारिपत्याचा विचार योजिलाच असेल व योजावा हाच प्रसंग प्राप्त असेल. दुसरा विचार आचार पारिपत्याविना योग्यांत पडोन येत नसतील ऐसेंच दिसतें; असो आपला पुण्योत्कर्ष समर्थ आहे. तत्राप आपण खांसा आहांत. मान-मार्ग पाहून कर्तब्यांत येणें तेंच येईल व आणतीलच. मोंगलाचें सामान जथलें असेल. आपलें जथोन फौजेचा गाहा होत असेलच व पुरता होय तावत्काल सलाबतीखालें राखणें धरणें त्या रीतीनें आपण धरतीलच. न कळे एखादे समयीं सरदार मामलेदाराकडून आग-लीक होऊन थोडकेच सामानानशीं मोंगलाचे फौजेस तोंड करावयाचा विचार करतील. तरि एक वेळ शेर जाहला म्हणजे गोष्ट कार्याची नाहीं. हे विशीं लिहावेसें काय ? कैला-सवासी राऊ व आपा तांब्राचे उपमर्द करीत आले. त्या युक्ति प्रयुक्ति सर्व आपण पाहिल्या असत. मसलतीच्या प्रसंगाचा गरगशा तो आहेच. त्याजमध्यें स्मरणपूर्वक संतोषाचें वृत्त लिहून पाठवीत असावें. रा॥ छ १८ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें कृपा असो दीजे हे * विनंती. मोर्तबसूद.

१ही भेट वऱ्हाडचे आग्नेय कोपऱ्यास पैनगंगा व वर्धा यांचे संगमाजवळ माहूरच्या दक्षिणेस एदलाबाद येथें ता. ७ जानेवारीपासून ता. १३ जानेवारीपर्यंत झाली. हें पत्र त्या मुक्कामाहूनच लिहिलें असावें. निजामुल्मुल्काचा पुत्र नासिरजंग यानें बंड केलें; औरंगाबादे-जवळ त्याचा मोड झाला व तो फकिराचे कपडे घालून जवळच रोझें येथील अवलियाच्या कबरीजवळ बसला. ग्रांट डफ भाग. २ पृ. १४ (१८६३) व सरदेसाई रि० मध्याविभाग २ ३० पहा.

* ले. ३५ पहा. मानाजीस नानांनीं एप्रिल १७४० मध्यें त्याचा भाऊ संभाजीपासून वांचविलें होतें.

ले. ४०
[४७]

शु. १६६५ वैशाख वद्य ५
ताा २४-४-१७४४ चे सुमारास

श्री

श्रीमंत महाराज राजश्री परमहंस बावा स्वामींचे सेवेशीं

चरणरज बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक विज्ञापना येथील कुशल स्वामींचे आशीर्वादें यथास्थित असो विशेष. चिरंजीव राजश्री जनार्दनपंत* यांचें लग्न वैशाख बहुल पंचमीस योजिलें असे. तर स्वामींनीं कृपा करून कार्य सिद्धीस पावविलें पाहिजे. पहिलें विनंतीपत्र सेवेशीं पाठविलें आहे. परंतु प्रविष्ट झालें असेल नसेल न कळे. यास्तव हल्लीं विज्ञाप्ति लिहिली आहे. आम्हीं लेंकरें, स्वामींनीं कृपा सर्व प्रकारें करावी हें उचित असे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

ले. ४१
[२६]

शु. १६६३ मार्ग० व. १३
ताा २४-१२-१७४१

॥ श्री ॥

सहस्रायु चिरंजीव विजयी भव राजमान्य राजश्री बाळाजी बाजीराव प्रधान यांप्रति श्री वाराणशीहून नारायण दीक्षित अनेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम मार्गशीर्ष वद्य १३ जाणोन समस्त सुखरूप असों. विशेष. तुमचें पत्र आलें, पावोन बहुत समाधान जालें. विशेष. तुमचीं व चिरंजीव वासुदेव दीक्षितांचीं भेट जालीं. हें वर्तमान दीक्षितांहीं लिहिलें जे, " बहुत सन्मान केला. घाटावरून पुढें मनुष्य पाठवून बलावून सर्व सविस्तर वर्तमान सांगितलें. बहुत सत्कार केला. " तरि [यांत] अपूर्व काय आहे ? हें तुम्हांस योग्यच आहे. न कराल तर अपूर्व !

यानंतर ऐकितों की जे सर्वांस क्रोधें आहांत. तर ते सर्व तुमच्या वडिलांपासून शोभतीस आहेत. त्यांचा अन्याय जाला [तर] तुम्हीं क्षमा करावी हें तुम्हां योग्यच आहे. बहुतसा अतिशय न करावा.

यानंतर तुमच्याविषयीं आपण जे ईश्वराची प्रार्थना करावयाची ते करीतच आहो. तुम्ही म्हणाल जे लोभामुळें करितेत तर ईश्वर जाणे, कैलासवासी बाळाजीपंतांपासून× आमचें त्यांचें चालत आलें. आणखी आमच्या वचनाचा विश्वास असे. त्यापेक्षां तुमचे तीर्थरूपांची निष्ठा उभयतांच्या आमच्या स्थळीं असे, जे तीर्थरूपांसारखे मानीत असत. आम्हीं क्रोधेंकरून नाना प्रकारें रागीजोन पत्रें लिहीत असों. परंतु त्यांस क्रोध तिलमात्र

---

* हा बाजीरावाचा कनिष्ठ पुत्र. भिडे यांची कन्या सगुणाबाई हिच्याशीं याचा विवाह या पत्रांतील मित्तीस (तारीख २४-४-१७४४) झाला. या तारखेपूर्वी थोडे दिवस हें पत्र लिहिलें आहे. खं. ४ पृ. ११७ व खं. २ पृ. ९९ वरून हीच मिति येते. त्या हिशेबानें हें पत्र पुढें जावयास पाहिजे. पण चुकीनें येथें लागलें. × बाळाजी विश्वनाथ.

येत नसे. आणखी आपणही त्याजकरितां श्रम केले ते ईश्वर जाणे. त्यापेक्षां तुमचें उत्कृष्ट नांव व्हावें ऐसा ईश्वरें आम्हांस दृष्टांत जाला आहे. परंतु तुम्ही कारभाराविषयीं अत्यंत सावध रहाणें. कोणे गोष्टीची चिंता न करणें. तुमच्या पित्याच्या स्थळीं ममता होती त्यापेक्षां तुम्हांवर अधिक आहे. बरें. हेच ईश्वराजवळ प्रार्थना करितों जे यांचें उत्कृष्ट चालो. आणखी काय लिहावें ?

यानंतर आमच्या सोबतीस दहा वर्षें रामाजी +केशव आहे. आमचा म्हणवितों. त्यास खानदेशचे महाल पहिले कोणी न करी तेव्हां आम्ही या ब्राह्मणास देवविले, त्यास पांच सहा वर्षें चालत होतें, त्यास एका महापुरुषानें आपलें पुण्य खर्चून मामला काढिला. त्यास दोन तीन वर्षें तो ब्राह्मण आमच्याच आशेनें राहिला आहे. यंदां तुम्ही देणारच होतां हें दीक्षितांहीं आम्हांस लिहिलें होतें. त्यास आतां गतवर्षी ज्यास महाल होते त्याणें चढविला, परंतु तोटा आला, त्यांजवर आपांहीं त्यांस वीस सहस्र सूट दिल्ही असतां यंदां सोळा सहस्र चढ करून मामला त्यानें केला, बरें तुमचें कार्य जाहलें, तेंहे आम्हांस समाधानच आहे. परंतु तेच महाल एक वेळ त्या ब्राह्मणास करून द्यावे हा हेत आमचा आहे याकरितां लिहिलें असें. सुज्ञाप्रति बहुत काय लिहिणें ? येथें वैशाखमासीं पंचपक्वान्नांचें लक्ष भोजन करावयाचा प्रारंभ करून मग कार्तिकमासापर्यंत वाचलों तर एक वेळ त्या प्रांतास सिंहस्थास गोदा स्नान करून, उत्तम लक्ष भोजन गोदातीरीं करून, सर्वांच्या भेटी घेऊन यावें. दर्शनानंतर सर्व विदित होईल. हे आशीर्वाद.

ले. ४२ [४८] | श. १६६४ माघ शु. ५ ता १९-१-१७४३

श्री

श्रीमंत महाराज—श्री परमहंस बावा स्वामींचे सेवेशीं

चरणरज सदाशिव चिमणाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल माघ शुद्ध पंचमी पर्यंत स्वामींचे आशीर्वादें करून यथास्थित असों विशेष. स्वामींनीं आशीर्वादपत्र पाठविलें तें शिरसा वंदिलें. पैकियाविषयीं स्वामींनीं आज्ञा केली. ऐशियास प्रस्तुत येथें ओडीचा प्रसंग असे तो काय त्याहावा ? स्वामींनीं पैकियाविषयीं चार महिने कृपा करावी. तीर्थरूप राजश्री नाना स्वारी करून आलियावरि स्वामी आज्ञा करतील त्याप्रमाणें वर्तणूक करतील. सारांश हा मामला स्वामींच्या आशीर्वादाचा आहे. उभयतां तीर्थरूप असतां यथास्थित चाललें, त्याप्रमाणें किंबहुना याहून विशेष चालावें हें स्वामीस आवश्यक आहेच. स्वामीही कृपा करणें ते करतील व करावी [हें] उचित असे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

+हा रामाजी केशव नागपूरकर भोंसल्याकडील कीं काय ? उपनांव तिखे, पहा ना. भो. ब. पृ, ७९, ८० व ना भो. का. ले. ५५

ले. ४३ } [४०] } { श. १६४४ फा. शु ३ ता १६-२-१७४३

श्री

श्रीसकळतीर्थरूप राजश्री श्रीमत्परमहंस स्वामींचे सेवेशीं.

अपत्यसमान शाहूजी राजे कृतानेक दंडवत विज्ञाप्ति येथील कुशल फाल्गुन शुद्ध तृतीया सौम्य वासर स्वामींचे आशीर्वादें यथास्थित असों. विशेष. स्वामींनीं आशीर्वाद-पत्र पाठविलें; तेथें आज्ञा जे, श्रीनें जें वदविलें त्यास संदेह आहे असें नाहीं. पत्र पत्रिकार्थ जाणून जतन करून ठेवणें म्हणून त्यावरून स्वामींनीं आशीर्वादप्रसाद दिला. त्यास संदेह चित्तांत आणिजेतो असें नाहीं. सूचनार्थ विनंति लिहिली होती. त्यास निर्वाहरूप पत्रिकाच आज्ञा प्रमाण, संग्रहीं ठेविली असे, विदित होय. श्रीपदप्रसाद पाठविला तो पावला. सेवेशीं विनंति.

ले. ४४ } [४१] } { श. १६६६ भाद्रपद शुद्ध ३ ता २९ । ८ । १७४४

श्री

श्रीसकलतीर्थरूप श्रीमत् परमहंस श्री स्वामींचे सेवेशीं

अपत्यसमान शाहूजी राजे कृतानेक दंडवत विज्ञाप्ति येथील कुशल भाद्रपद शुद्ध तृतीया सौम्यवार स्वामींचे आशीर्वादें यथास्थित असों विशेष. सांप्रत स्वामींचें आशीर्वादपत्र येऊन परामृष होत नाहीं याकारितां चित्त सापेक्षित असे. तरि सर्वदां आशीर्वादपत्र पाठवून चित्त सानंदित केलें पाहिजे हे विनंति.

ले. ४५ } [१०४] } { श. १६६७ वैशाख व. ४ ता ८-५-१७४५

॥ श्री ॥ छ १६ रविलोखर.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **बा**पूजी **भी**मराव स्वामीं गोसावीं यांसि-पो **बा**ळाजी **बा**जीराव प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जाणें. विशेष.-**ये**रूळकर **मों**गल व खोजजी वगैरे यांचें व राजश्री **रा**घो **गो**विंद यांचें युद्ध जहालें. परस्पर माणसें घोडीं पडलीं. **रा**घो **गो**विंद खानदेशांत गेले. त्यांचे मागें **मों**गलाची फौज लागली आहे. मशारनिलेची कुमक करणें जरूर तरि तुम्ही बाहीर बुनगे देपूर वेलापुराकडे ठेऊन, सडे जाऊन, **रा**घो **गो**विंद यांस सामील होणें. तुम्ही जातां कोण्हाशीं कजिया न करणें. **मों**गल बळें येऊन कलहास प्रवर्तेल तर मग जैसें

---

१ ले. ४७ पहा. २ कमावीसदार परगणे नेवासें. पहा ना. रो. भा. १ ले. ३८१, ४४७ व भा. २ ले. १८, ६६, १३५, १७४, ३२३.

बनेल तैसें तुम्हांस करणेंच लागेल. कराल. करणें. राघोपंताचा पिछा सुटे ऐशी तजवीज करणें. वरचेवर वर्तमान लिहीत जाणें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले. ४६ [६०] | श. १६६७ जेष्ठ शु।। १० ता। २९-५-१७४५

॥ श्री ॥

छ १९ जमादिलोवल प्रहर दिवस प्रातःकाळ

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बापूजी भीमराव* स्वामी गोसावी यांसि— पो बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष-तुम्ही रा राघो गोविंद यांचा व अंतुरकर मोंगलाचा कजिया जाहालियाचा मजकूर दोन चार बंद विस्तारें लिहिला, परंतु कोणे गोष्टी वरून कजिया ह्मावयास कारण काय, तो मजकूर किमपि लिहिला नाहीं. याजवरून तुमच्या लिहिण्याची तारीफ काय त्याहावी ? जरी शिंपी, रंगारी यांचे मजकुरावरून अंतुरकर मोगलांनीं कजिया फैलाविला असेल तर तो जूजे मुकदिमा आहे. जैसा जेथें जीव देखावा तैसा तेथें पैका वसूल करावा. जातीचा मुकदिमा त्यास पैका सुटेल असें नाहीं. व पैका दिल्या खेरीज तेही जातींत येथपूर्व वर्तणार नाहीं. या करितां दारनादार पाहून घेणें तें घ्यावें व त्यांनींही बोलावें. असें असोन जूज कारभारावरून इतकें दररोज लावावेंसें नाहीं. थोडे बहुतांनीं कजिया चुकेल तर चुकवणें. माणसें इकडील मेलीं व जखमी जालीं याजप्रमाणें तिकडीलही मेलीं व जायां जालीं असतील त्याचा मजकूर नाहीं, परंतु घोडीं गेलीं मेलीं असतील तीं द्यावीं. येणेंप्रमाणें होऊन अंमल करार वाके चालवीत असिलियास कजिया वारून टाकणें. वर्तमान वरच्यावरी लिहीत जाणें. जाणिजे. छ ८ जमादिलोवल सु।। सीत आर्बे मया व अलफ. बहुत काय लिहिणें. अगर मामलतीवरून कजिया जाहाला असेल आणि सालबसाल मालियत चालत आल्या प्रमाणें सुरळीत करून देतील तरी उत्तम आहे. कजिया वाढवूं नये. याप्रमाणें करावें. तरि तुम्ही काय त्याशीं बोलतां व ते काय कोठपर्यंत बोलतात, व कोणत्या गोष्टी [वर] अट येऊन पडते तें वरचेवर वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे. बहुत काय लिहिणें हे विनंती.ऽ

---

* बापूजी व बाजी भिवराव हे रेटरेकर. यांचें घराणें पेशव्यांचे ऋणानुबंधी होय.

ऽ ले. ४५ पहा. १ किरकोळ, अल्प.

ले. ४७ [७९] | श. १६६७ ज्येष्ठ शु० १४ ता। २-६-१७४५

श्री

तीर्थरूप राजश्री नाना स्वामींचे सेवेशीं

आपत्ये सदोबानें साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ ता। छ १२* जमादिलोवल मुक्काम पुणें. स्वामींच्या आशीर्वादें करून यथास्थित असें विशेष.—स्वामी कोठें आहेत, माघारे फिरले न फिरले, कोणें जागा आले, हें कांहींच वर्तमान कळत नाहीं, तरि स्वामींनीं सविस्तर वर्तमान वरच्यावरि ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर आम्ही राजश्री+—स्वामींचा निरोप छ ३ जमादिलोवलीं घेऊन पुण्यास आलों. स्वामींस वर्तमान कळावें यास्तव लिहिलें असे. राजश्री बाबूजी नाईक यांस राजश्री स्वामींनीं कर्नाटकाचा मामला मुकासा सांगून गौरव केला. तो अर्थ विस्तारें स्वामींस लिहिलाच आहे, त्याजवरून विदित होईल. राजश्री आबाजी नाईक राजश्री स्वामींच्या दर्शनास गेले होते. त्यांस छ ५ जमादिलोवलीं राजश्री स्वामींनीं निरोप दिल्हा. वस्त्रें १ मंदील, १ महमुदीचा झगा, १ चादर मोराची. १ पदक हत्तीचा मजुरा दिल्हा.

येणें बहुमान करून आबुराव किताब देऊन निरोप दिल्हा. स्वामींस कळावें यास्तव लिहिले असे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती.

ले. ४८ [४६] | श. १६६७ श्रावण शु।१९ ता। २६-७-१७४५ पूर्वीचे

श्री

चरणरज बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक विज्ञापना ऐशी जे स्वामींनीं चिठ्ठी पाठविली तेथें कित्येक खेदयुक्त पर्याय लिहिला, तो कळला. ऐशियास आम्हीं स्वामींचीं लेंकरें. आम्हांस इतके पर्याय स्वामींनीं लिहावे हें काय आहे? आम्ही स्वामी खेरीज आहों असें नाहीं. जशी आमची निष्ठा पायाशी असेल तदनुरूप फल. पत्रीं काय ल्याहावें? हे विज्ञापना.

---

* हें पत्र भेलशाचे स्वारींत नानासाहेबास लिहिलें आहे. ही स्वारी ता। २०-११-१७४४ पासून ता। १-८-१७४५ पर्यंत झाली.

+राजाचें नांव अदबे खातर न घालतां 'राजश्री' शब्दापुढें कोरी जागा टाकून पुढें 'स्वामी' वगैरे बहुमानदर्शक शब्द लिहिण्याची वहिवाट असे.

ले. ४९ [८१] | श. १६६७ चैत्र शु. ११ ता. २३-१२-१७४५

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बापूजी बाजीराव स्वामी गोसांवी यांसि पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत जाणें विशेष. तुम्ही निरोप घेऊन गेलां तेव्हां राजश्री त्र्यंकटराव यांजकडील स्वार पथक तुम्हांबरोबर पाठवितों म्हणोन सांगितलें व त्याजवरून मशारनिल्हेकडील कारकुनासही आज्ञा केली. ते तुम्हांकडे आले. त्यांणीं तुम्हांस खर्चावेचाचा मजकूर पुसला. त्यास तुम्हीं त्याजपाशीं साफ बोललां कीं, " श्रीमंत राजश्री नाना स्वामी यांणीं कांहीं आपल्यास द्यावयाचीं बेगमी केली नाहीं. आपण कोठून द्यावें ? तरि श्रीमंत राजश्री भाऊ यांजपाशीं जाऊन आपली रोजमरीयाचीं बेगमी करून घेणें. " त्याजवरून माारनिल्हेचे कारकून येथें आले कीं, " आपल्यास खर्चावेचास देत नाहीं याप्रमाणें बोलतात. तरि त्याजबरोबर जाऊन पोटास काय करावें ? आणि जावयासही मागें पुढें घेतात. " त्यास तुम्ही सरकारचें निशाण व हत्ती बरोबर घेऊन जातां. फौज अलबता हजार बाराशें असली पाहिजे. केवळ हत्ती आणि चार तट्टें आपण जाईन म्हटल्यास कैसें बनतें ? त्यांमध्यें राजश्री राणोजी शिंदे* लांबले तेथपर्यंत तुम्ही जा[ल] तोंपर्यंत बरोबर फौजही पाहिजे; व जे फौज येईल त्यास कांहीं पोटासही दिल्हें पाहिजे. विना दिल्याघेतल्याबगर सरदारी कैशी चालते ? व बोज कैसा राहतो ? हा अर्थ तो सर्वही तुम्हांस ठावकाच आहे. हें जाणून राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ याजपाशीं तुम्ही बोललां होतां कीं, " श्रीमंत राजश्री नाना स्वामींनीं तों कांहीं खर्चावेचाची बेगमी केली नाहीं. भाऊ जवळ मागावें तरी त्यांस कांहीं लिहिलें नाहीं. ऐसें असतां हे कांहीं देतात ऐसें नाहीं. सरदारी तो चाललीं पाहिजे. याजकारितां श्रीमंताचे नांवावर व सरदारीवरी पांच हजार रुपयेपर्यंत घेऊन रोखा लिहून दिल्हा. घेऊन जातों. पुढें देणार खावंद आहेत. " ऐसें बोलले असतां माारनिल्हेकडील कारकुनास साफ जाब दिल्हा हें कैसें कार्यास येतें ? या उपरी माारनिल्हेस पाठवावें तरि ते जात नाहींत. तरी मशारनिल्हेचे राऊत तुम्हांबरोबर पाहिजेत व यांस राजश्री रामचंद्र बावापर्यंत जा[ल] तों, थोडें बहुत खर्चा[स] देऊन घेऊन जावें लागतें. तरि या पत्राचें उत्तर जलदीनें पाठवावें कीं, मशारनिल्हेकडील राऊत पाठऊन द्यावें. त्यांस थोडें बहुत खर्चास देऊन घेऊन जातों, या प्रकारचें उत्तर जलदीनें पाठऊन द्यावें म्हणजे तेंच पत्र बजिन्नस त्यांस दाखऊन त्यांजला तुम्हांकडे रवाना करितों. सारांश बाकी सरदारीचा बोझ उचललियाखेरीज भारीपणा कैसा पडतो ? केवळ आंगावेगळेंच टाकलें तरी सरदारीचा आबही राहिला पाहिजे. हा अर्थ सर्व तुम्ही जाणतां. लिहिणें काय आहे ? तरी या पत्राचें उत्तर जलदीनें पाठऊन द्यावें. दिरंग न लावावा. रा छ १०× जिल्हेज बहुत काय लि-हिणें हे विनंती.

---

* राणोजी सिंदे ता. १९-७-१७४५ रोजीं निवर्तला. त्या पूर्वीचें पत्र असलें पाहिजे.

× ले० ५६ पहा.

ले. ५० [९९] शि. १६६८ वै. शु. ६ ता १०-४-१७४६

श्री

राजश्री मल्हारजी होळकर व राजश्री जयाजी शिंदे गोसांवी यांसी

अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य स्नेहा बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद सु॥ सीत आर्बेन मया व अल्फ. राजश्री अर्जुनसिंग राजे हे बंगाल्याचे सालीं हुजूर आले त्या तागायत हुजूरच आहेत. त्यास हे हुजूर आल्या आगोदर यांजकडे जागा होती ते जागा राजश्री सभासिंग याणीं हे हुजूर आले यास्तव झुंजून घेतली. यांचा कुंवर तेथें कामास आला. याप्रमाणें नाश जाहला. त्यास हे हुजूर आले होते कीं, पुढें कांहीं राज्य आपल्या जिमे करून घ्यावें, श्रम करावे, साहस करावें, कृपा संपादून घ्यावी. ऐसें असतां हे उमेद एकीकडेच राहोन यांची जागा होती ती जाऊन रहावयास स्थल नाहीं ऐसें जालें; आणि त्यांणीं तो एकनिष्ठा धरून बसले आहेत. ऐशास आमच्या विचारें ऐसें आहे जे, यांणीं आपल्या बऱ्याकारणें कश्यप* धरला, चार वर्षें जहालीं आणि यांची दाद न लागे. तेव्हां ही गोष्ट योग्य नाहीं. हें जाणून निकाल या प्रकारचा काढला आहे जे, हे हुजूर फिर्याद आले होते; त्या आगोदर यांजकडे गांव गद्या ज्याप्रमाणें चालत आले आहेत त्याप्रमाणें चालवावें. अधिकही कांहीं देऊं नये, त्यांत उणें करूं नये. ये विशीं यंदा सभासिंग याजकडील तह सरकारचा होणें तो जहालियावरी सदहू प्रमाणें याची जागा यास द्यावयाचा करार करून याचे जिमे करावी. जाजती उपसर्ग लागों न द्यावा. याप्रमाणें खामखा करावें. कदाचित बुंधेले म्हणतील कीं, याची पुरातन जागा कांहीं नाहीं, ऐसे असतां काय म्हणून ते जागा द्यावी ! तरि हे पुरातन आहेत म्हणोन द्यावी ऐसें नाहीं. हे सरकारांत आले त्या आगोदर यांजकडे जागा होती, त्यापासून यांजकडे चालत नाहीं. कजिया करितात. यास्तव हुजूर फिर्याद आल्या आगोदर यांजकडे होती त्याजप्रमाणें यांजकडे चालों देत तें करणें. या उपरी यांचें काम लांबणीवर न घालणें. हे बहुत येथें हैराण जहाले आहेत व यांची हैराण गत दूर होणें तें करणें. जाणिजे छ २९ रविलोबल बहुत काय लिहिणें.

लेखन सीमा

ले. ५१ [९९] शि. १६६८ ज्ये. व. ३० ता. ७-६-१७४६

श्री

राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहा बाळाजीराव प्रधान आशीर्वाद सुरुसन

* कच्छप म्ह० कांस.

सबा आर्बेन मया व अलफ तुम्ही पत्र छ २४ रबिलाखरचें पाठविलें तें छ २४ जमादिलो-वलीं प्राविष्ट झालें. जैतपुरास राजश्री जयापा अगोदर येऊन मोर्चे दिले. मागून आम्ही आलों. बुंधेलियांनीं जैतपुरास सामान बरें विपुल ठेविलें होतें. तोफा, जेजाला व बरकंदाज दारूगोळा व बाजे सामान बहुत होतें. रेवणींतून हमेशा झुंजत. आपलेकडील हजार माणोस मेले. चार हजार जखमी जाले. तथापि सुरंग चालवून दोन सुरंग उडविले, कांहीं भिंताड पडलें तेणें करून गांवकरी कौलास येऊन अजीच किल्ला फत्ते केला. म्हणोन विस्तारें लिहिलें तें श्रवण होऊन संतोष जहाला. जैतपूर बांकी* जागा व लढाऊ सामान बहुत, दारूगोळा विपुल असतां तुम्ही व बाजे सरदारांनीं व लोकांनीं श्रम साहस करून जागा फत्ते केली. शाबास तुमची व शाबास लोकांची. मोठी गोष्ट जहाली. जैतपूर लहान सामान्य जागा नव्हती. जर हस्तगत न होतें तरि बदनक्षास कारण होतें. तुम्हांसारखे उमदे सरदार इरेस पडल्यावर जैतपूर काय आहे ? किंबहुना याहूनही बांकी बिकट जागा असल्यास हस्तगत कराल. या उपरिही तिकडोल नवल विशेष व कर्तव्य मनसुबा उल्लेख पुरःसर लिहीत जाणें. जाणिजे छ २८ जमादिलोवल बहुत काय लिहिणें, पै॥ व जा-पासुन स्वामीन (?) पै॥ छ शाबान मु॥ गहबरा पै॥ सेवढा.

शिक्का

लेखन सीमा

ले. ५२
[७४]

श. १६६९ आषाढ शु. १
ता ८-६-१७४६

श्री

राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसांवी यांसी—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—स्नो बाळाजी बाजीराव प्रधान अशीर्वाद. सु॥ सबां आर्बेन मया व अलफ. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. बुंधेलियांनीं बदमामली केली तहरहावर गोष्ट पडून बेरीज ठहरली. बोला कांहीं दिल्या. कुंवर बोलेस द्यावे इतकी बाकी असतां उभयतां राजे पळून गेले. कालिंजर व अजेगडास गेले. बुंधेलियांचा मोठा गुबर होता तो त्यांचा त्यांणीं गमाविला. अतःपर जें करणें तें नेट धरूनच करावें लागेल. स्वामींच्या पुण्यप्रतापेंकरून उत्तम होईल, म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास तुम्ही श्रमसाहस कर्तव्य तें केलें, व बुंधेलो-यांचा बचाव करून दारमदार केला असतां त्याचे दुराद्दष्ट, दुर्बुद्धे तदनुरूप यांचे मनांत येऊन पळून गेले, येणेंकरून सर्व गोष्टीनें खराब तेच जहाले. तुम्ही कर्तव्य तें करालच व केलेंच पाहिजे. असो; येविशींचे कितेक पर्याय राजश्री रामचंद्रबाबांच्या पत्रीं लिहिलें आहेत. त्यांजवरून कळेल. आपल्याकडील सदैव वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे. छ २९ जमादिलावल बहुत काय लिहिणें. पै॥ छ ७ साबान मु॥ गहबरा पै॥ सेवढा.

शिक्का

लेखन सीमा

---

* सरदार-शिंदे व होळकर.

ले. ५३ [६२] (श. १६६८ श्रावण शुद्ध ११ (ता॥ १७-७-१७४६

श्री

राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसावी यांसी—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेा॥ बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद सुा॥ सबां आबेंन मया व अलफ तुम्ही फौजसुद्धां बुंदेलियांवरि कालिंजराकडे गेलिया आलीकडे कांहीं वर्तमान अवगत होत नाहीं. पत्रही येत नाहीं. तरि प्रस्तुत तुम्हीं कोण्हे जागा आहां, काय मनसुबा योजिला आहे. बुंधेलियानें सुप्रवृत्त होऊन तुमच्या मनोदयानुरूप मामलियत विल्हेस लाऊन टाकलीं कीं नाहीं ? यौ, तह करूं नये. झुंजावेंच,हाच त्यांनीं विचार चित्तांत आणिला आहे ? पुढें तुम्ही काय कैसें करावयाचें केलें आहे. तें सर्व वरचेवरी लिहिणें. इकडील कांही नवीन लिहिजेसें नाहीं. अद्यापि सातारियासच आहों, पुढें होईल वर्तमान तें लिहिलें जाईल. जाणिजे छ ९ रज्जब बहुत काय लिहिणें.

श्री राजा शाहु नरपीत (हर्षनिधान बाळाजी बाजीराव मुख्य प्रधान

पै॥ छ ३ रमजान.

लेखन सीमा

ले. ५४ [८२] (श. १६६८ भाद्रपद वद्य ९ (ता॥ २९।८।१७४६

॥ श्री ॥ छ २२ साबान.

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना व राजश्री भाऊ स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि राजश्री फत्तेसिंग बावा यांणीं सांगितलेयाप्रमाणें स्वामीस लेहून पाठविलें. त्याचें उत्तर स्वामींनीं लिहिलें. त्यांत मजकूर कीं, रघोजी बावांस कर्नाटक होतें कीं काय ? हा अर्थ स्पष्ट उघडला पाहिजे. दुसरे बावांनीं तमाम सरदार सरंजामी फौज जमा करावी. कर्नाटकांत पाय पडला तरि घालावा. न पडे तरि वराड देवगडाकडे जावें. गेले तरी चालेल. परंतु हिम्मत जाली पाहिजे. व निरोपहि व्हावा. आपण खामखा द्यावा. बाहेर निघावें. आम्हीही फौजेचें साहित्य करूं. कर्ज मात्र आम्हांस द्यावयास अनुकूल पडणार नाहीं. बावांनीं उत्पात केला तरी कर्नाटक यास होईल कीं काय हा शोध बावांनीं थोरले वाडियांत* चालून पहावा म्हणून लिहिलें. ऐशियास फत्तेसिंग बावाचा कारभार आहे,तो स्वामी जाणतात. त्यांचें सर्व साहित्य मनसुब्याचें आपण केलें पाहिजे. पैका कर्ज द्यावयास मात्र मिळणार नाहीं तरी तेवढी गोष्ट नसो, परंतु वरकड तरी सर्व जालें पाहिजे. सरंजामी फौज ते मेळवितील. आपली ही मातबर फौज समागमे व मनसबा आपणास करावा लागतो, याचा स्पष्ट भाव त्याशीं बोलला पाहिजे. तेव्हां ते उद्योगास लागतील. ऐशीयास त्यांस सरदारी

* थोरले वाडियांत= थोरली राणी सकवारबाईकडे. १ किंवा. २ जरूर, निश्चित.

करणें आणि आम्ही होऊन उत्पात कां करावा ? त्यांची त्यांस दरकार आहे कीं नाहीं ? असें स्वामी म्हणतील. तरी त्यांची त्यांस आवश्यकता असावी [हें] उचितच; परंतु त्यांस घरीं राहिल्यानें काय सुख नाहीं ते बाहेर निघोन हैराण व्हावें ? मशारनिल्हेनीं स्वामींचा अविलंब धरिल्यास तीन वर्षें जालीं, परंतु फलादेश कांहीं उत्कर्षें करून जाला नाहीं हें त्याचें टेपर स्वामींवर आहेच. दुसरें, हे लगामी असल्यास कित्येक गोष्टी उपयोगास पडतात. बाहेर काढिल्यानें त्यांचें टेपर दूर होऊन त्यांत आपलाही कार्यभाग असे. डौल चित्तांत आणून बाहेर निघण्याविशीं उत्तेजन देऊन करावें. त्यास येविशीं स्पष्ट स्वामींचा भाव कळला पाहिजे तेव्हां त्याशीं बोलावें. अथवा त्याणें विचारल्यास अबघल जाब करावा. कर्नाटक रघोजी-बावास होतें न होतें, याचा अर्थ पेशजी चोपदारास मोघम लिहिलाच आहे. अद्यापि कांहीं चर्चा नाहीं. परंतु राजश्रीचा भाव आबाजी नाईक यास पुढें करून रघोजीस आंत घालावा असा आहे. हाच घडिल्यास फत्तेसिंगबावांसही त्यामध्यें मिळावयास उत्पात केलाच पाहिजे. न करीत तरी आम्ही करावा. काय निमित्य कीं, बाबूजी नाईक व आबाजी नाईक यांच्याशीं खरी का ब्या [?] लागावयाची बाकी राहिलीच नाहीं. आबाजी नाईक जाले तरी काय ? वाडियांतील वगैरे पेच पडतील, व आपण वाढविला त्याचें बरें कसें चालावें या अर्थें मात्र आबाजी नाईक यांस पुढें करणें. नाहीं तर रघोजी बावांचेच स्वाधीन; असें जालियास कर्नाटक त्यांचे घरास जाऊं देणें उचित नाहीं. यास्तव जरूर पाय धरून वोढावे. येविशीं स्वामींची आज्ञा काय ? तिसरें फत्तेसिंग बावांनीं थोरले वाड्यांतील मर्जी कर्नाटक होतें न होतें हे पहावी ऐशी आज्ञा स्वामींची. तरि थोरले बाईचें कर्ज नाइ-कांकडे आहे त्याचा निकाल तीं आधीं पुसतील. दुसरें राजश्रीचे देणें याचा विचार जाला पाहिजे. जे कर्नाटकाचा कारभार जालियास दिवाणांत ऐवज देणें पडेल तो फत्तेसिंगबावा स्व तीस द्यावा म्हणतील. हा एक पक्ष. दुसरें कदाचित् बाईनीं म्हटलें कीं, आबाजी नाईकास पुढें करून राजश्री दुसरे साहिल्यास देणार तरी नाईक माझे अगत्यवादाचा, मी कर्ज दिल्हें आहे तें मामल्यावरीच दिल्हें आहे, तेव्हां मामलाही माझाच आहे. आबाजी नाईकास समागमें घेऊन तुम्हींच करावें. म्हणजे दोन्हीही पक्ष मजकडेच लागले. रघोजी धाकटे बाईचे पक्षींचा, त्यासही तोंडघशी दिल्हें. असें बोलली तरी याचा विचार काय करावा. आणि जरी बाईसीं लाघावळ लाऊन कांहीं आशा दर्शविली व राजश्री धाकटे बाईचे अगत्यवादामुळें रघोजीस कर्नाटक सांगणार असें बोलल्यास, आबाजी नाईक यांस राखून तुम्ही करा असें बाई बोल-तीलसें वाटतें. यास्तव सुचला विचार स्वामींस लिहिला आहे. तरी तींहीं पर्यायाचे स्फूर्दरूप समर्पक सालजाब पाठवावयास आज्ञा करावी. त्रिचनापल्ली बाबत सन सीतचे ऐवजाचा हिशेब वगैरे याची पुरवणी आलाहिदा लिहिली आहे. त्याचेंही उत्तर सादर करावें. विदित जाहालें पा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. ५५ [७३] | श. १६६८ कार्तिक व. ३ ता. २१-१०-१७४६

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **रामचंद्र बावा** स्वामी गोसावी यांसी—

पोष्य **बाळाजी बाजीराव** प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जाणें. विशेष—दरबारचा मजकूर विस्तारें सरदारांस× लिहिला त्याजवरून कळेल. आमचा गुंता आजपर्यंत दरबारीं व्हावयास कारण काय म्हणाल, तर राजश्री स्वामींचें सरकार कर्जदार झालें व महालचे खर्च आनिवार. नित्य कथळे, यास्तव राजश्री स्वामींनीं आपले कारभारी यांस ताकीद करून बंदोबस्त करितात. घरच्याच कारभारांत राजश्री स्वामी दंग आहेत. त्यांहीं होऊन आम्हांस निरोप द्यावा तर आपले कारभारांत गिरीफदार. आम्हीं विनंती करावी तर त्यांची मर्जी दीक पाहून आज पावेतों चर्चा न केली. राहात राहात गोष्ट राहिली. आम्ही निरोपाच्या विचारांत आहों. राजश्री स्वामींची मर्जी पाहून निरोप घेऊन, परंतु (?) यश येणें आमचें तिकडे होतें असा विचार नाहीं. निरोपासच किती दिवस लागतील तें नकळे. निरोप होऊन पुणियास आलियावर **कोंकणचा** वगैरे कारभार करणें लागेल. तुम्हांस कळावें याजकरितां लिहिलें असे. छ १६ **सव्वाल** बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले० ५६ [९७] | श. १६६८ कार्तिक वद्य ४ ता. २२-१०-१७४६

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **रामचंद्र** बावा स्वामी गोसांवी यांसिः—

पोष्य **बाळाजी बाजीराव** प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. किल्ले **कन्हारा** हा दतीयेकरानीं पैगाम करून घेतला; आणि **झांशी** प्रांतीं उपसर्ग करीत आहेत; सरकारची बाकी येणें ते देत नाहींत; मवाशी मनमाने तैसी करितात, म्हणोन राजश्री **नारो शंकर** यांणीं लिहिलें, त्यास येविशीं त्यांणीं तुम्हांसही लिहिणें तें लिहिलेंच असेल. तुम्हीही या गोष्टीची पैरवी चित्तांत उचित कर्तव्य ते आणलीच असाल. त्यास यंदां दतीयेकरांनीं दो चौं प्रकारें लबाडीच केली. विना त्यास **बोडसेकरासारखाच** नतीजा दिल्या खेरीज हलखुद राहोन सरकारचा अंमल सुरळीत देतात ऐसें नाहीं. ऐशियास मानिल्लेची मदत फौज पाठवून केली पाहिजे, कीं दहशतीनेंच **कन्हाड्हा** सोडीत आणि आपले जागां जाऊन सरकारी अंमल सुरळीत चालतात. याजकरितां येथूनही **मीरखान** वगैरे मानिल्लेचे ताबियांतील पथकें आहेत. त्यास ताकीदपत्रें लिहिलीं आहेत व त्या प्रांतीं इज-

× शिंदे-होळकर.

तखान वगैरे आहेत त्यांस ताकीद करून फौजसुद्धां मार निळेकडे पाठवणें म्हणजे फौजेच्या दबाबानें जें काम होणें तें होईल. मुलकांत फितुर होणार नाहीं. यद्यपि दतीयेकर कन्हाऱ्हा धरून बसलेच तरी काय मुजाका आहे ? फौज त्या प्रांतीं फिरूं लागलियावरि त्याचा आटा बंद करील ऐसा प्रकार आहे. तरि जें करणें तें विचारें यांची पैरवी करून सुरळीत होय तें करणें. रा॥ छ १७ सवाल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले० ५७ [५१] | श. १६६८ कार्तिक व. ६ ता॥ २४-१०-१७४६

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **रामचंद्र** बावा स्वामी गोसावी यांस—

पो॥ **बाळाजी बाजीराव** प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें विशेष. राजश्री **अर्जुन**सिंग राजे यांची जागा बुंधेलियांनीं जबरदस्तीनें घेतली. हे पदरीं पडले, यांची स्थापना करावयाचें आमचें वचन गुंतलें आहे, तरी तुम्ही यांचा आगत्यवाद धरून यांची जुनी जागा बुंधेलियांनीं घेतली तेथें यांची स्थापना करून जागा यांचे हवालीं करावयाचा प्रकार राजश्री **अमृतराव** शंकर यांस सांगितला आहे. हे सांगतील तदनुरूप जुने जाग्यावर स्थापना करून सर्व प्रकारें चालवणें. सारांश आम्ही **बंगा**लियास गेलों ते सालीं बुंधेलियांनीं यांजपासून जागा घेतली ते यांची यांचे हवालीं करणें जाणीजे. छ १९ सवाल बहुत काय लिहिणें हे विनंती.- *

ले० ५८ [९५] | श. १६६८ कार्तिक व. १० ता॥ २८-१०-१७४६

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **रा**मचंद्र बावा स्वामी गोसावी यांसि—

पोष्य **बाळाजी बाजीराव प्रधान** नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहिणें. विशेष.-राजश्री राजे **अर्जुन**सिंग **धंधेरे** यांचे वडील लेक **बुंधेलियांस** मिळोन यांचे कनिष्ट पुत्राशीं झुंज केलें. दोन तीन महिने लढाई जाहाली. नाइलाज देखोन यांचे कनिष्ट पुत्रांनीं जोहार करून आपण कटून? मेला. मग **बुंधेलिया**चे आसरियानें यांचे वडील पुत्रांनीं घेतलें. **मेल**शाचे स्वारीस **अर्जुन**सिंग याचे ज्येष्ट पुत्रांनीं भेटीस यावयाचें व नजर कबूल करावयाचें राजकारण लाविलें. त्यास आम्ही उत्तर केलें कीं, " **अर्जुन**सिंग आमचे पदरचे. जागे × यांचे. तुम्हीं भेटीस येणें व नजर कबूल करणें ते आधीं **अर्जुन**सिंग यांस भेटणें, ते आम्हांस आणून भेटवितील, उपरांतिक नजर करार करूं " म्हणोन उत्तर केलें. त्यास ते सालीं भेटीस न आले. हल्लीं तुम्हाशीं भेटीचा पैगाम करतील, व नजर नियाज

---

* ले० ४९, ५७ पहा. × मुलूख यांचा आहे.

कबूल करतील. अगर कबूल केली असली तरी तुम्हीं कबूल न करणें. अर्जुनसिंगाचे हातून येऊन भेटतील, जागे खालीं करून यांचे हवालीं करतील, तरि भेट घेणें. अर्जुनसिंग पदरचे यांची स्थापना करूं ऐसें आमचें वचन गुंतलें आहे. याजवरि दृष्टि देऊन यांची स्थापना करणें. याचा लेक ज्येष्ठ फंदफिरिंदाची गोष्ट सांगेल त्याजवरि सर्वथा न जाणें. जाणिजे. छ २३ सवाल बहुत काय लिहिणें हे विनंती.*

ले० ५९ [६७] | श. १६६८ पौष व. १ ता. १६-१२-१७४६

श्री

पु॥ राजश्री रामचंद्र बावा स्वामी गोसावी यांसि—

विनंती उपरि दरबारचें वर्तमान व राजश्री श्रीपतरावे निवर्तलियाचा अर्थ पहिला तुम्हांस लिहिलाच आहे. आलीकडील वर्तमान तर श्रीपतराव यांचे बंधु राजश्री जगजीवनराव परशराम यांजवरि राजश्री—स्वामींनीं कृपा करून छ १४ जिल्हेजीं पौष शुद्ध प्रतिपदेस प्रतिनिधीपद दिल्हें. वस्त्रें व हत्ती, बहुमान दिला. वरकडही त्यांचे समागमीं मुतालीक व राजश्री कृष्णाजी परशराम यांचे पुत्र दोघे यांसही वस्त्रें [दिलीं.] राजश्री उदाजी चव्हाण येथेंच आहेत. अद्याप कांहीं बोलीचाली नाहीं. पुढें होईल वर्तमान तें लिहिलें जाईल. सारांश उभयतां महालचें+ अती प्राबल्य जहालें आहे. याचा विस्तार कोठवरी त्याहावा ? आम्ही युक्ति करून रेटणें तें रेटितों. कांहीं आइकावें लागतें. कांहीं करून देतों म्हणतों. या रीतीनें येथील विचार आहे. राजश्री रघोजी भोसले वराडांतून माहूर प्रांतें आले. त्यांच्या चित्तांत आमच्या मुलकांत घांसदाणे घ्यावे ऐसा विचार आहे. जागांजागांहून महालकरी यांचीं पत्रें येतात. मशारनिले तो स्नेहयुक्ति भावभक्तीचीं पत्रें पाठवितात. तथापि त्यांचा प्रकार कपटी आहे. तो तुम्ही जाणतच आहां. आम्हीही कागदींपत्रीं स्नेहयुक्तच लिहीत असतों. पुढें होईल वर्तमान तें लिहिलें जाईल. येथें येणार ऐसेंही वर्तमान आहे. हे विनंती ×

ले. ६० [७७] | श. १६६८ फाल्गुन व. ८ ता. २१-२-१७४७

श्री

पु॥ राजश्री रामचंद्र बावा स्वामी गोसांवी यांसि विनंती उपरि बाबूजी नाईक

---

* ले० ४९, ५७ पहा. १ मृ. २५. ११. १७४६. २ वद्य पाहिजे.

+ महाल = राजस्त्रिया, सकवारबाई मोठी शिर्क्योकडची व सगुणाबाई धाकटी मोहित्यांकडची.

× हें पत्र ना नासाहेबानें लिहिलें आहे. यावेळीं शाहूमहाराज फार आजारी झाले होते.

यांणीं कर्नाटक प्रांतीं न जावें. गेले तरि धुंडाऊन काढावें.याजकरितां चिरंजीवांचीं× खानगी कर्नाटक प्रांतीं केली. त्याचा मजकूर विस्तारें लिहिलाच आहे. प्रस्तुत नाईक यांणीं राजश्री—स्वामींस दोन लाख रुपये रोख द्यावे ऐसें केलें होतें ते रोख निशा केली. बाकी राहिले ऐवजाचे हप्ते करून याद राजश्री येसाजी भोंसले यांजपाशीं दिल्ही. व बेदनूरचा साडेतीन लक्षांचा कतबा होता तो मारनिल्हे जवळ देऊन निरोप घेऊन गेले. पुढें + नबाबास भेटून नबाब म्हणतील तें द्यावें आणि तेवढियावरि ठाकुरकीऽ वाढवून कर्नाटक प्रांतीं जावें ऐसें आहे. नबाबाचा विचार पाहतां दोही दगडीवर हात आहेत. नाईकांची प्रतीक्षा करीत आहेत. व आमची फौज सोधें बिदनुर प्रांतें गेली आहे, यांसही पैका न मिळावा याही उद्योगांत आहेत. श्री इच्छेनें इतकियाही गोष्टीचें निराकरण होऊन उत्तमच होईल. कांहीं फिकीर आहे ऐसें नाहीं. तुम्हांस वर्तमान कळावें म्हणोन लिहिलें असे. पुढें ही होईल तें लिहिलें जाईल. र॥ या मनसब्याचे मजकूर किरकोळ किरकोळ फार आहेत. पत्रीं काय ल्याहावे श्री कृपनें दर्शनोत्तर कळतील. छ २२ सफर हे विनंती. *

ले. ६१ [७८] | श. १६६८ फाल्गुन व. ९ ता २२-२-१७४७

॥ श्री ॥

पु॥ राजश्री रामचंद्र बावा स्वामी गोसावी यांसि—विनंती उपरि चिरंजीव राजश्री भाऊ निरोप घेऊन गेलियावरि कितूर म्हणोन ठाणें गिराशियानें राजश्री नारायणराव घोरपडे यांचें होतें तें बळाविलें म्हणोन घेऊन दिल्हें. पुढें मजल दरमजल सोंधियाचे लतियांत गेले आहेत. सावनूरकरांचा तहरह होणें तें होत आहे. अद्यापि चुकला नाहीं. सोंधेकरीयांची दरदबदल लागली असे. बिदनुरास वकील गेले आहेत. फिरंगीयावरी दबाव असे. जयराम सांवत येऊन भेटले आहेत. तेही आपले साहित्येच्या गोष्टी बोलतात कीं रेडी वगैरे फिरंगियानें घेतले आहेत त्यास तंबी पोहाचाऊन घ्यावी, आपली स्थापना करावी. फिरंगी आपली बोली बोलतात कीं सांवत आम्ही समजोन घेऊं. तुम्ही त्याचा पक्ष न करावा. या प्रकारचें वर्तमान आहे. पहातां अर्थी फिरंगी बेइमान, त्याचें पारपत्य करावें तरि येसमयीं बनत नाहीं. दोन्ही ही अलग अलग राखिले आहेत. कां कीं, सावनूरचा दारमदार करणें तो करून घेऊन, सोंधेकरांचीही मामलियत चुकऊन बिदनूरकरांकडे जावें. तेथील मामलियत विल्हेस लाऊन खबरदार होऊन राखा [हा ?] वें. सारे पठाण एकवट करावे. नाईक आले तरि त्यांस धुंडावून द्यावें. ऐसा विचार असे. पुढें विचारें होतां होईल तें करीतच असों. र॥ छ २३ सफर हे विनंती.[२]

× चिरंजीव-सदाशिव चिमणाजी. + हे नबाब सावनूरचे. ऽ ठाकुरकी=ऐश्वर्य
* ले० ६२ व ६३ पहा.
१नाईक—बापूजी नाईक बारामतीकर. २ ले. ६२ व ६३ पहा.

ले. ६२)
[६८]

शा. १६६९ वै. शु. ८
ता ६-५-१७४७

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **रामचंद्रबावा** स्वामी गोसांवी यांसि—

पोष्य **बाळाजी बाजीराव** प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष-तुम्ही पत्रें अधिक शुद्ध त्रयोदशीचीं पाठविलीं तीं छ २९ रबिलाखरीं पंढरपुरीं पावलीं. सर्व वर्तमान कळलें, त्यांचीं उत्तरें आलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिलीं आहेत. त्याजवरून कळेल. येथील वर्तमान तरि आम्ही क्षेत्र मजकुरीं आहों. या उपरि पुण्यास जाऊं. चिरंजीव राजश्री **भाऊ** याजकडील वर्तमान तरि ते **सा**वनूर प्रांतीं आहेत. **सा**वनूरकरांची त्यांची भेट होणार. उपरांतिक तिकडील तालामाला पाहून यावें. फार तर पंधरा दिवस तिकडे मोडतील. नाईक **सिरे** प्रांतीं आहेत. **ना**सरजंग **आर**काट-कडे जाणार तिकडे छावणी करणार. पहावें नबाब **वाजरा**नदीचे तीरें जात आहेत. **औरं**-गाबादेस छावणीस जाणार हेंही वर्तनान असे तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें असे. *सावनूरकरांची भाऊंची भेट जहाली. या उपरि पंधरा विसा दिवसां आलीकडे चिरंजीव येतील. **नाई**क **ना**सरजंगाचे आश्रयानें ते प्रांतीं छावणी करून बिदनूर प्रांतीं उत्पात करणार व करतील. सांप्रत बरसात जवळ आला. काय काय होतें तें पहावें.छ ६ जमादिलावल हे विनंती.

ले. ६३)
[४४२]

शा. १६७० ज्येष्ठ शु. ५
ता २१-५-१७४८

श्रीx

यादीx नबाब **नि**जामन्मुलुख यांणीं **ना**सरजंगास उपदेश केला छ ४ जमादिलाखर सन ११६१ हिजरी.

१. दक्षणचे सुभेदार सर्व प्रकारें **म**हाराष्ट्र राजाशीं स्नेह राखावा हें उचित महाराष्ट्र दक्षणचे जमीदार आहेत.

२. माणसाचे वधास विचार दूरवर करावा. दाण्याचीं कणसें नाहींत कीं. वर्षास नवीन उत्पन्न होतील. दंड योग्य असेल त्यास काजीकडे हवाला घालावा व धर्मशास्त्रांचा भार काजीवर ठेवावा.

३. मुशाफरींत वय न्यावें. नित्य नवें उदक व नवें स्थल व डेरियाची सावली अनुभवावी. मुशाफरींत लाभ बहुत आहे व मुलखाची उस्तवारी होते. पर्जन्यकाळीं एके ठिकाणीं रहावें. पर्जन्यकाळांत प्राणिमात्रास श्रम होतो, वंश उच्छेद न व्हावा हें मुख्य कारण समजावें.

---

१ बारामतीकर. २ निजाम. ३ ले. ६०. ६१, ६२ पहा. हेंच पत्र खरे ऐ. ले. सं. भाग १ पृ. ४ वर आहे. * येथून खुद्द नानासो यांचे हातचा मजकूर आहे.

x येथें बाजूबर दौलतराव शिंदे यांचे नांवचा शिक्का आहे.

४. लोकांचीं कामें आपले अधीन आहेत येविषयीं केवळ ईश्वराची कृपा जाणून शास्त्राप्रमाणें आपला स्वधर्म करून दिवस काढी व मुलकी कामांत वांटून मोहसबा इहलोक व परलोकविषयीं घेत जावा.

५. दौलतीची कायमी महापुरुषाचे कृपेनें असते. केवळ बाह्य साहित्यानें निर्वाह नाहीं. यास्तव सर्वभावें महापुरुषास शरण असावें.

६. आकाश, पृथ्वी व विश्व अनादि आहे. सर्व भूमंडळास आपलाच विभाग समजून हक्क कोणाचा बुडवूं नये.

७. दक्षण सहा सुभे आहे. पूर्वी दर सुभ्यास पातशहा वेगळा होता. औरंगजेबापासून दरोबस्त तालुका एकास होऊं लागला. यास्तव वेगळे वेगळे घरानदार माणसें ध्यानांत आणून कामकाज सांगत जावें. वर्षा दो वर्षा तालुकियाची तगीरी बदली करीत जावी. यांत विभाग सर्वांस पावता होतो.

८. भावाबंदाची परिवारीष करीत असावी. बाहूबळ व अब्रूचें रक्षण यांत आहे. बेदिल असल्यास दौलतीस धक्का व फितुर करितात. केवळ अन्यायास प्रवर्तलियास शिक्षाही करावी.

९. हलके मनुष्यास दरवाज्यावर उभें राहूं न द्यावें. सहवास तर बहुत दूर.

१०. उमदे माणसास हलकें काम व हलके माणसास उमदें काम सहसा न सांगावें.

११. दक्षण सुभेदारी वतन नाहीं. धनी याची मर्यादा पाळीत जावी. विपरीत वर्तणूक जाहालिया ईश्वरापाशीं अन्याय व लोकांत दुर्नाम होतें.

१२. लढाईस आपणाकडून कदापि उद्योग न करावा. आपण बलिष्ठ व शत्रु दुर्बल असें न समजावें. भार ईश्वरास पडतो. गर्व आवडत नाहीं. जेथवर प्रसंग न पडे तेथवर प्रयत्न करावा. शत्रू अमर्यादेस प्रवर्तलिया हक्क आपला जाणून, ईश्वरास साह्य समजून, पराक्रम करावा. भगवान् अवश्य जय करितो.

१३. खजिना स्वारीसमागमें जरूर असावा. येणेंकडून फौजेची खातरजमा असती व साहुकार मंडळी सरकारचे खजिन्यावर समाधान राखिते व शत्रूचा पराभव होतो.

१४. फौजेचा हक्क आपल्यावर ठेवीत न जावा. आपले फौजेस शत्रूचे फौजेपेक्षां अधिक भीत असावें.[1]

ले. ६४
[३९७]

{श. १६७० आषाढ वद्य १४
ता. १३-७-१७४८

श्री

पु॥ राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसावी यांसि.

उपरी बंगालियाकडील वर्तमान आलें कीं; राजश्री रघोजी भोसले यांची फौज मोह-

---

१. ह्या कागदाचा उतारा नाना फडणीस यांच्या स्वदस्तुरचा त्यांचे चिरंजीव रावसाहेब फडणीस यांजपाशीं होता त्यावरून आमचे इंदोरकर स्नेही रा० रा० सावळ्याराम माधव यांणीं ही नक्कल करून पाठविली. इतिहास संग्रह पेशवे दप्तर पृष्ठ ३१७ येथें हें प्रकरण विस्तृत दिलेलें आहे. २ आढावा, हिसेब.

बतजंगानीं कटकपर्यंत पिटोन घातली. यांचा जोरा पोंचला नाहीं. राजश्री अमृतराव बिदा होऊन गयेस लष्करांत आलियावर सविस्तर लेहून पाठवून म्हणोन लिहिलें तें कललें. या उपरि ही तिकडील वर्तमान येईल तें लिहिणें *अमृतराव तुम्हांजवळ आलेच असतील. सविस्तर वर्तमान लिहिणें. छ २७ रजब बहुत काय लिहिणें लेखनसीमा. पौ॥ छ ४ रमजान.

ले. ६५ [९२]

श. १६७० चैत्र
ता॥ मार्च स. १७४८

श्री

चिरंजीव राजश्री धोंडोबाऽ यांसि—सदाशिवऽ चिमणाजी आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. धारेचा प्रकार उपस्थित जाला होता. तो तर्थिरुपांनीं× सोडून तेथें धारेजवळ रा॥ गोविंद हरी[1] यांस ठेवून आपण कोटधाच्या रोखें राणाजीचे सरहद्दप गेले. तेथून दिल्लीचा मार्ग समीपच. पठाणांनींच येऊन लाहोर घेतलें. वजीर व मनसूर अलीखान चाळीस कोसांवर गेले. पठाणांचींच सलाबत याजवरी होती. यास्तव वजिरांनीं पादशहास बाहेर निघावयाविशीं लिहिलें होतें. पादशहा भगेंद्रांनीं वेथिस्त. यास्तव पातशहांनीं शहाजादियाचा मरातीब अलमगीर पादशहानीं बहादूरशहा व अजमशास दिल्हा होता त्याप्रमाणें देऊन शहाजादा वजीरासमीप पाठविला. लढाई होणें होती. पुढें कसकसें जहालें असेल वर्तमान येईल तें लेहून पाठवूं. येशवंतराव पवार औरंगाबादेहून कूच करून गेले. त्यांचे मागें मागें राघो गोविंदें गेले होते. गांठ पडों न देतां ते झाडून गेले. धारेस गेलेंसें वर्तमान आलें आहे. नबाब बऱ्हाणपुरास गेला. पुढें जाईलसें दिसत नाहीं. सुरतेकडेही जात नाहीं. रा॥ गोविंदराव तीर्थरूपांजवळ बोलत होते कीं, नबाब सुरतेस जातो, दाभाडियांचे आपण साहित्य करावें. तेव्हां निमे गुजराथ द्यावी [म्हणजे] साहित्य करूं म्हणाले. त्यास गोविंदराव आम्हांजवळ बोलिले, लक्ष रुपये रोख चहूं पांच पावेतों परगणे जहाले तरी स्वामींनीं मान्य करून साहित्य करावें. त्यास आम्ही म्हणालों कीं, पांच लक्ष रोख, पांचा लाखाची जागा द्यावी. म्हणोन त्यास मारनिल्हे उमाबाई जवळ बोलले. तीं मुलकाची गोष्ट मान्य न करीत. पैका देऊं म्हणाली व तीर्थरूपांचें उत्तर तो निमे गुजराथ घेऊं तरीच साहित्य करूं म्हणोन आलें. जरी नवाब सुरतेकडे जाता तर दाभाडेही बोलते. तें होत नाहीं. याजकरितां तो प्रसंग शिथिल पडला. +

---

* अमृत शंकर ले. ५७ पहा.

× नानासाहेबानीं. १ पटवर्धन. २ ले. ४६ पहा. ३ निजामुल्मुल्क. ४ चिटणीस. ५ यशवंतराव दाभाडे सेनापतीची आई.

+ पठाणांनीं लाहोर फेब्रुवारी १७४८ मध्यें घेतलें व निजामुल्मुल्क ता. २१-५-१७४८ रोजीं बऱ्हाणपुरास मृत्यु पावला त्या दरम्यानचें हें पत्र. पहा ले. ६७.

ऽ धोंडोपंत पुरंदरे साताऱ्यास छत्रपतींजवळ, व सदाशिवराव पुण्यास आहे.

ले. ६८ [११४] | श. १६७० चैत्र मार्च सन १७४८

श्री

आशीर्वाद उपरि. राजश्री गोविंदराव आम्हांजवळ बोलले कीं, लक्ष रुपये व दो चहूं लक्षांचे परगणे दिल्हे म्हणजे साहित्य करावें म्हणोन. त्यास आम्ही उत्तर केलें कीं, चार पांच लक्ष रुपये रोख व चार पांच लक्षांची जागा याप्रमाणें द्यावी. तुम्ही ठीक करणे म्हणालों. तीर्थरूपांसही लिहिलें. तेथून उत्तर आलें कीं, ह्या गोष्टी तोंडच्या नाहींत. मुलुखागिरी बुडवून नबाबाचा तह मोडा, तेव्हां हें कर्म करावें. या गोष्टीस आपलें स्वहितही पाहिलें पाहिजे. निमित्तें गुजरात देतील तर करूं म्हणून लिहिलें आहे. प्रस्तुत तरी नबाब बरानपुरास आहे. सुरतेकडे जात नाहीं. याजमुळें दाभाडे बोलत नाहीं, व तीर्थ [रूप] ही कोठ्याचे रोखे गेले. यास्तव सर्व प्रकारें मनसुबा शिथिल पडला. ...

ले. ६७ [८६] | श. १६७० सन १७४८

॥ श्री ॥

पु॥ राजश्री रामचंद्रबावा स्वामी गोसावी यांसि—

विनंती उपरि सफदरजंग यास निमरजाबंद करून आपले लगामीं लावावयाचा विचार केला असे म्हणून लिहिलें तें कळलें. ऐशीयास हा विचार उत्तम केला. आम्हांसही दिल्लीहून लिहिलें आलें होतें. आम्हीही त्यास येविशीं विचारानुरूप लिहिणें तें लिहून त्यास लगामी लाऊन घ्यावें, त्यांनीं+रकारपूर्वकाचें साह्य न करावें असें करावें,म्हणोन लिहिलें असे. तुम्हीही त्यास वरचेवर उचित जाणून लिहीतच असाल व लिहिणें. ज्यांत आपल्या मनसुबियास व कर्तव्यतेस उचित आणि उपयोगी, परिणाम उत्तम,लोकोत्तर, योग्यतर,लौकिक कीर्तीस्पद तेंच करणें व कराल हा निशा आहे. सफदरजंग‡ उमदा मनुष्य त्याचा स्नेह हरप्रकारें रक्षण करणें* उचित. दुसरें, काशी त्यांचे हातीं. त्याशीं निखालसता असलिया कालगतीनें काशीचें स्पष्ट दर्शन होणार तो महा लाभ आहे. यासाठींही स्नेह रक्षावा. दुसरे अत्यंत अर्थाअर्थी संबंध नाहीं जाहला. अप्रिय भाषण करून विग्रह वाढविणें उचित नव्हे. थोडासा तोटा जाहला तरी सोसून स्नेह रक्षणें उचित–असे. हे विनंती.

× हें त्रुटिक पत्र सदाशिव चिमणाजीचें धोंडोबा पुरंदरे यास, ले. ६६ नंतर लगेच लिहिलेलें आहे. १ निमित्तच सांगण्यास पाहिजे म्हणून, असा अर्थ.

‡ सफदरजंग–हा अयोध्येचा नबाब हा दिल्लीच्या बादशाहाचा वजीर होता. ह्याचे व गाजीउद्दीन यांचे वांकडें होतें. * येथपासून खुद्द खाशांच्या (बाळाजी बाजीरावांच्या) हस्ताक्षरीं मजकूर लिहिला आहे. + रघूजी भोसले ले. ६८ पहा.

ले. ६८ [१] { श. १६७१ आश्विन वद्य १ ता॥१५।१०।१७४९

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित[1] स्वामींचे सेवेशीं

विद्यार्थी बाळाजी बाजीराव. नमस्कार विनंति उपरी येथिल वर्तमान तागाईत आश्विन वद्य प्रतिपदा पावेतों स्वामींचे कृपेंकरून सुखरूप.

सविस्तर अर्थ मी सेवेशी विदित केला होता. राजश्री स्वामींचीही मर्जीच राखून एक जशी आज्ञा केली त्याप्रमाणें मान्य करून पुढें स्वामींचे आशीर्वादें परंपार पावूं. विस्तारे त्याहावा ऐसा काय आहे ? सारांश स्वामींचीं लेंकरें आहों. आपलेच आशीर्वादें सर्वही उत्तम होईल. वरकड लिहितां विस्तारच आहे. यास्तव उभयतां वेदमूर्ति[2] निवेदन करितां विदित होईल. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

ले. ६९ [१११] { श. १६७१ कार्तिक व. २ सन १५-११-१७४९

॥ श्री ॥

विनंती उपरि सुरतेस वकील गेला त्याजकडील बोलीचालीचा काय मजकूर तो त्याहावा म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास नारो तुकदेवु तेथें पावलियाचीं पत्रें आलीं. परंतु त्यांची

---

१ हे वेा शा॥ रा. नारायणभट दीक्षित यांचे चिरंजीव. नारायण दीक्षित हे मोठे विद्वान् व तपस्वी ब्राह्मण होते. त्यांस निरनिराळ्या राजपुरुषांनीं इनाम दिलें आहे. काशीतील ब्राह्मणास सुजाउद्दवला यांणें मोठ्या संकटांत घातलें असतां तेथील ब्रह्मवृंदाची सुटका करणारे हेच दीक्षित होत. (पेशव्यांची बखर पृ० ७३ पहा). यांशी व त्यांच्या वंशजांशीं निरनिराळ्या राजपुरुषांचा पत्रव्यवहार राजप्रकरणींही सुरू असे. नारायण दीक्षित हे पुढें काशी येथें श. १६७० कार्तिक शु. १४ (२४-१०-१७४८) कैलासवासी झाले.

यांचे वंशज श्री० रा० यज्ञेश्वर बाळकृष्ण दीक्षित कायगांवकर यांजकडून हा पत्रव्यवहार अंशतः आम्हांस मिळाला आहे. ह्याजबद्दल आम्ही त्यांचे मोठे आभारी आहों.

२ यावरून हें पत्र दोन ब्राह्मणांबरोबर पाठविलें होतें.

३ **राजश्री स्वामी** हे शब्द प्रायः तत्कालीन कागदांत छत्रपतींनाच उद्देशून योजीत असत. नुसता **स्वामी** असा शब्द असल्यास तो तें पत्र ज्याला लिहिलें असेल त्यालाच अनुलक्षून असे. **राजश्री स्वामी** आणि **स्वामी** या दोहोंतिल हा भेद लक्षांत ठेविणें अवश्य आहे. ४ नारायण दीक्षित तारीख २४-१०-१७४८ रोजीं निवर्तले आणि छत्रपति शाहू महाराज तारीख १५-१२-१७४९ या दिवशीं परलोकवासी झाले. या दोन तारखांच्या दरमियानचें हें पत्र असलें पाहिजें असें समजून तारीख ठरविली आहे.

बोलीचाली जाहालियाचा मजकूर कांहीं लिहिला आला नाहीं. त्याहीमध्यें राजश्री स्वामींx दुखणियाचीं वर्तमानें तेथें हजर जालीं असतील याजमुळें मोंगलही बोली सुधी बोलणार नाहीं. तालामाला पहातील. ऐसें आहे. त्यास आलीकडे वर्तमान आलें नाहीं. काय वर्तमान लिहिलें येईल तें सवेशीं लिहून पाठऊं. व्यंकटराव मोरेश्वर यांचीं पत्रें आलीं तीं सवेशीं पाठविलीं असत. त्याजवरून वर्तमान कळेल. त्याकडील जाजती जासूद मागें पाठविलेच आहेत. वरकड रघोजी भोसले यास व सैद शरीफखान यास पत्र पाठवल्याचें लिहिलें आहे तीं द्या व या स(?) नाहींत. गुप्तरूपें बातमी घेणें तेव्हां पत्रें नेलियास ठीक पडणार नाहीं व राहूं ही देणार नाहीं. स्वामींचे विचारें पत्रें द्यावींशीं जालियास लेहून पाठवावीं. दारको रंगनाथ याजपासून तिजाई ग्वालेरची रसद घेऊन हुजूर मामला ठेऊन सनद द्यावी असें लिहिलें होतें. परंतु तूर्त रसद न घेणें, पुढें लिहून त्या प्रकारें करणें म्हणून लिहिलें. ऐशीयास स्वामींस सनद कशी द्यावी. हें लेहून पाठविलें त्याचे आधींच पैका रसदेचा घेतला होता. स्वामींनीं सनद द्यावयाचें लिहिलें त्यावरोन देणार होतो. परंतु घालमेलीचें वर्तनामुळें दिल्ही नाहीं. हल्लीं आज्ञेप्रमाणें सनद देत नाहीं. रसद तो घेतलीच आहे. पुढें आज्ञा होईल त्याप्रमाणें रसदेचे विल्हे होईल. रा॥ छ१५ जिल्हेज बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले. ७०
[१७४]

श. १६७२ भाद्र०–कार्तिक
सन १७५० सप्टेंबर ते नोव्हेंबर दरम्यान

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री* नाना यांसि प्रति सदाशिव चिमणाजी आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. तीर्थरूपांकडून पत्रें आलीं त्यांचा वगैरे कित्येक अर्थ लिहिणें तो तुम्हांस लिहिलाच आहे. त्याचीं उत्तरें अद्यापी कांहीं येत नाहीं, तरि सर्व वर्तमान लिहिणें. कर्नाटकच्या मामलियाची राजेश्रीचीं पत्रें वगैरे कामें यमाजी शिवदेव व पाटणकर यांचीं करून पाठवावीं तीं अद्यापि येत नाहीं. व पैक्याचे गोपाळराव वगैरे यांजकडील कोणाकडून काय येतो तो मजकूर सविस्तर लिहून पाठविणें. येथील विचार तर मा च णु रा हून कूच करून भंडार कवठें येथें आलों. येथें पांच सात मुक्काम होतील. पुढें होईल तें वर्तमान लिहिलें जाईल. मातोश्री आईसाहेब यांचा विचार काय ? राजेश्री स्वामींची मर्जी कशी ? वरकड सामादिक कोण कसे आहेत याचा अंतर बाह्यता मजकूर लिहिणें. तुम्हीं सविस्तर मजकूर पुण्यास लिहित असाल तेथील भाव भक्ति कळत असेल ते लिहिणें. येथें तीर्थरूपानीं नायकाची समजावीस काढावी, सरंजाम घ्यावा,

---

x राजश्री स्वामी म्हणजे साहू महाराजपत्र बहुधा रामचंद्रबाबाचें पेशव्यास. पहा खरे भा. १ सुरत शहरांतील धामधूम.

* नाना पुरंदरे. साता-यास पेशव्यांचे तर्फेचे.

पुढें त्यांनीं दाभाडियाचा कारभार उरकायाजोगी फौज गेलिच आहे तें करून आम्हीं जातों. ताराबाईची गडबड राहिल्यास करनाटकांत पाय घालावा, बाबूजी नाईकानें भीकच मागावी हें बाबाचे मनांत व दाभाडे याचाही निकाल करणें त्याचे हजार विचारच होतात यामुळें होत नाहीं. तुम्हीं त्या शहावरच दररोज राहणें. इकडे आम्हांसच मातबर गुंता पडलियास तुमचे तिकडे जाणें कळतच आहे म्हणून लिहिलें होतें. नाईकास तीन चार लाख यशवंतराव पवाराचा सरंजाम व कांहीं गुजराथेंत द्यावें अशी मर्जी आहे. आम्ही याप्रमाणेंच करावें असें लिहिलें आहे. पवार कांहीं कामाचे नाहींसें दिवसेंदिवस रूप दाखवितात. *बाबा दाभाडिया पासून पैका घ्यावयाचा मनसुबा करतात; आम्हांसही लिहितात. आम्हीं कामाचे नाहीं, न करावें असें लिहिलें आहे. करूं दिलें, आव पुरला, तर जवळील गुत्ता उरकून पुढें जातील. नाईकाचे याप्रमाणें तीर्थरूपांचेच विचारेंच आहे. करतील. आम्हांस मग गुत्ता नाहीं. पैका मात्र पाहिजे. आठ नव लाख त्यांत बाबा तीन देतील वरकड तुम्हांस मी * * * येईल मजकूर लिहून पाठविणें. हे आशिर्वाद.

ले. ७१ [१८४]

श. १६७२ मार्ग० पौष १७५० डिसेंबर

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नाना= यांसि सदाशिव चिमणाजी आशीरवाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. राजश्रीचें लक्ष सर्व प्रकारें आहे. तीर्थरूपांचा विचार कळतच आहे. याचे कित्येक प्रकारचे पेंच पडणार. त्याचा अर्थ राजश्री गोविंदराव यांणीं व तुम्हीं लिहिला तो कळलां. ऐशियास तुम्हीं लिहिल्या गोष्टी सर्व यथार्थच आहेत. त्यास दाभाडियाकडील कारभार निरगमांत न ये. मनसुबियास तोड पडेना. वगैरे कित्येक पेंच उलगडले पाहिजेत. यास्तव मानाजी पायगुडे व हरी राम यांस हजार तीन पावेतों फौजेनिशीं वारणेचें काठीं पाठवून आम्हीं पुणियास गेलों. तिकडील मनसुबा लवकर उलगडून बाकी फौज पुढें करनाटक प्रांतीं जावयास येतां त्यास तुम्हीं सर्व प्रकारें राजश्री स्वामींचें लक्ष आपलेवरि कायम राही ते गोष्ट करणें. त्यांत अंतर पडूं न देणें. आणि वर्तमान लिहिणें ते पुणियाकडे लिहीत जाणें. आम्ही पंढरपुरापलीकडे कुरल्याजवळ आलों. पांच सहा दिवशीं तीर्थरूपांजवळ पोहोंचतों. पैकाही पाठविणें तो पुणियाकडे पाठविणें. सातारियाचेंही बंड मोडलें पाहिजे. मूळ दाभाडे. तेथें कांहींच होईना, करीनात, मनासही न ये, संशयच वाढतात. यास्तव जाऊन नीट करून होईल तें लेहून पाठवून. दुसरें रविवारचें पत्र पाठविलें तेंही पावलें. सर्व कळलें. कान्होजी बावाजवळ मातुश्रीचे भाव निघाले व राजश्रीचा निरोप वगैरे सर्व लिहिलें तें कळलें. तुम्ही

* रामचंद्रबाबा ? = पुरंदरे.

बोलला ऐशियास हा डौल कामाचाच नाहीं. मातुश्री नीट सांगून राजश्री सोडावे लागतील याचें पुण्याहून लिहून पाठवूं त्याप्रमाणें करणें. मुख्य राजश्रींचा लगाम पुर्ता राहे तें करणें. हें काम तुमचे हातीं आहे. जरूर याप्रमाणें करणें. मोठी गोष्ट आहे. हजारों भातेनें खर्चवेंच करून, वरतीं आपलीं मायेचीं माणसें पाठवून लगाम राखणें. वरचेवर सर्वा मुतसदियांचे भाव लिहिणें. मजवळ संदेह तुम्हांस वाटतो. ईश्वरी जुलूम आहे ! असें न करणें. सविस्तर लिहिणें हें आशिर्वाद.

ले. ७२
[३५९]

पौष श. १६७२
जानेवारी १७५१

श्री

राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि

आशीर्वाद उपरि राजश्री महादोबाशीं आम्हाशीं विमनस्कता तीन वर्षें आहे. सातारियापासून विशेष वृद्धि पावली. तुमचे पक्षपातामुळें अतिकष्टी होते. याजमुळें आम्हांस हरएक कामांत मुरदाड करावें याची तजवीज रामचंद्र बावा भाऊंकडे राजकारणें पत्रें जात येत असत. आम्हांपासून हरएक मसलत पुर्ती पायाशुद्ध शेवटास न जावी या भावें भाऊंकडेच फौज पाठवावी, आम्हांस घरीं बसवून गोविंदरायाचे आझेंत वर्तवावें, उमाबाईस राखावें, ताराबाईसि गोविंदरायाचे मार्फतीनें चढवावें, आम्हांवर सर्वांचे हुकूम रहावे, ऐसा विचार दिसोन आला. तेव्हां आम्ही भाऊंस साफ लिहिलें कीं, जर भाऊ असलेस तर पत्रदर्शनीं येणें. दाभाडिया कडील काम चांगलें करूं. त्यावरून भिडेस पडून आले. दाभाडियाकडील काम रगडून आरंभिलें. नासरजंग मेला. जफती करावी, दहावीस लाख मेळवावे, सरदारही बलवावे, हिदायत मोहिदी खानावर जावें, गरमी दाखवून जें मिळेल तें मेळवावें. ऐसा विचार आम्हीं केला, याजमुळें बावांनीं बहुत वाईट मानून घरास गेले. कोणी म्हणतात कीं ताराबाईकडे जातील. परंतु ते कुलीन, जुने चाकर, हरामखोरी कधीं करणार नाहींत ऐसें वाटतें. कालगत मात्र न कळे. असो आम्हांशीं बाबाशीं तूट पडली. भाऊ अर्धे इकडे अर्धे तिकडे. रामचंद्र बाबा बाह्यात्कारें आम्हांकडे, अंतर्यामीं बहुत गुप्त रीतीनें बावाकडे. येथें बाहेर तो सर्वत्र दाखवितात कीं, खावंदाची मर्जी तेंच प्रमाण. परंतु अंतर्भाव तुम्ही जाणतच आहां. त्रिंबक विनायक कोनेरपंत हे केवळ बावांचे. ×गंगोबाशीं त्याशीं राजकारण पूर्ण. येथून मल्हार [बा] स लिहितील कीं, खामखां बाबांचा पक्षपात करोन आमचे केलें घडावें. मल्हारबा भला माणूस येखादे जागां वचनास गुंतल्या आम्हांशीं तूट मात्र पडेल. आमचे विचारें चाललें तर समजाविशी करावी, चालवावें, ऐसें आमचे मनांत आहेच. आतां जहाले तरि बरें न जहालें तरि पुढें ही जो विचार आमचे मनापासून खुलासियानें

× गंगोबा तात्या चंद्रचूड. हें सर्व पत्र खाशांच्या हातचें असून संपविलेलें नाहीं.

ठरेल तोच शेवटास न्यावा. गंगोबानीं त्रिंबक विनायकाचे मार्फतीनें लिहिलें तर साफ जाब करावा कीं, खावंदाशीं आम्ही इरे वाढविणार नाहीं. ऐसें साफ बोलावें. जें करणें तें आमचे विचारें करावें. या मजकुरावर मल्हारबास कायम अगोदर करून ठेवणें. असें असतां आम्हांशीं विरुद्ध करतील तर करोत. आमची तवकल ईश्वरावर आहे. तुमचे भरंवासियावर ऐसें केलें.

ले. ७३ [१२]

श. १६७२ माघ शु. ४ ता. २०-१-१७५१

श्री

वेदशास्त्र-संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशीं—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. विशेष-काल तुम्ही गेलेस [त ?] त्यास तुमची त्यांची बोलाचाली होऊन काय मजकूर जाला. हें तुम्हांकडून कांहींच लिहून न आलें यास्तव आजि येथें मुक्काम करून हें पत्र तुम्हांस लिहिलें असे; तर त्याचा जाबसाल घेऊन बोली ठीक जाली असली तर तुम्हींच लौकर येणें, अथवा काय मजकूर जाला असेल तो लिहून पाठविणें. त्यासारखा विचार केला पाहिजे. आजि रात्रौ तुमचें कांहीं तरी लिहिलें यावें. परंतु न आलें यास्तव मुक्काम केला. आतां पत्राचें उत्तर सत्वर पाठविणें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पौ माघ शुद्ध ४ रविवार शके १६७२.

ले. ७४ [१७२]

श. १६७३ चैत्र शु. १५ ता ३०-३-१७५१

॥ श्री ॥

चिरंजीव नाना यांसि भाऊ आशिर्वाद. सविस्तर तीर्थरूपांनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. सारांश तुम्हीं सारे जमा करून काम उत्तमच जाहालें. सलाबत वाढली. तरी बहुत विचारें हावभरी न होतां सर्व कामें करणें. आम्हींही दरमजल जसें वर्तमान येईल तसें फौज घेऊन पुढें येऊन. रघोजी बाबास विचारें करून राखिलें पाहिजे. हयौ आणलियां त्याचें काम बुडतें. पेंचहीं आहेत ह्मणून निरोप दिला. फत्तेसिंगाचे× फौजेंत त्रिंबक हरी+ व दारखोजी पाटील सरदार ते आमचे बदल कदाचित राहिले तरि अक्कलकोटी राहतील. फौज हयाचें आहे. आठ कोस प्रमाणें दर मजल कडबे देशचा दाणा खात ताजे होत येतों. वरकड तपशील काय लिहावा ? हजार प्रकारें सारे एक होऊन, आपले फौजेचा गाहा चांगला करून, आपण जरब न खातां जें होईल तें करणें. पायगुडे वगैरे फौजही सामील जाहलीच आहे. रवाना छ १३ जमादिलावल. हे आशिर्वाद. *

× फत्तेसिंग भोसले. + त्रिंबक हरी पटवर्धन. * ले. ७५ चें पत्र पहा. १ त्रास, कष्टी.

ले. ७५
[१६८]

शु. १६७३ चैत्र व. १
ता. ३१-३-१७५१

श्री

चिरंजीव राजश्री नाना+ यांसि बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. तुम्हीं पत्र छ २८ रविलाखरचें पाठविलें तें छ १२ जमादिलोवलीं सांडणीस्वाराहातीं येऊन पावलें. " गाइक्वाडाचे आपले फौजेचें युद्ध छ २७ रविलाखरीं झालें. *गेंड्या पावेतों मोडून ताराज केले. त्याचे बुनगे तिजाई लुटून आणिले. उटें, घोडीं, पालख्या घेतल्या " म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. लेखनार्थ-श्रवणें संतोष झाला, मोठी गोष्ट झाली. शाबास तुमची लोकांची ! बरी केली ! गायकवाड वेणेवर राहिला. तुम्ही कृष्णेवर आहां, म्हणोन सांडणीस्वारांनीं सांगितलें. त्यास राजेश्री मानाजी पायगुडे व तात्याही तुम्हांजवळ येऊन पावलेच असतील. सारे एकदील होऊन गायकवाडास जाऊं न देणें. जोर पोंहोंचल्यास लुटून नेस्तनाबूद करणें. जों पर्यंत गायकवाड [याचा] वारापाणी झाला नाहीं तों फौज न फोडणें. आमचा मोंगलांचा सलूखा झाला. इकडील सर्व गुत्ते उरकले. आम्ही मजल दरमजल येत असों. आणि छ १२ जमादिलावलीं निजाम-कोंड्यावर मुक्काम झाला. जलदीनें येतों. गायकवाड जाऊं न पावे तें करणें. युद्धप्रसंगीं राजेश्री सोनजी भास्कर व राजेश्री बापूजी बावा व सरकारचे हुजूरातचे लोक व राजहुजुरातच्या लोकांनीं शर्त केली. बापूजी बावास तरवारींची जखम लागली, नागोरा यास गोळीची जखम लागली, म्हणोन [लिहिलें] तर ते थोर थोर मातबर लोक प्रसंगीं असतां कां चुकतील ? व पुढेंही सर्व प्रकारें त्यांचाच भरंवसा असे. तुम्हीं सर्वांचीं समाधानें करणें. मोडेली बाजी तुम्हीं सांवरली ! जी गोष्ट तुमचे वडिलांचे वडिलांस योग्य तें तुम्हीं केलें ! या उपर बहुत सावधतेनें जरब देणें. मळमळीत न करणें. आम्ही येऊन पोहोंचतों. छ १४ जमादिलावल. हे आशीर्वाद.

+ नाना पुरंदरे-यांस चिरंजीव लिहिण्याचें कारण असें कीं अंबाजीपंत पुरंदरे व बाळाजी विश्वनाथ हे आपणास भाऊ भाऊ समजत व हाच घरोबा पेशव्यांनीं शेवटपर्यंत पुरंदऱ्यांशीं ठेविला होता. तेव्हां नानाकडे धाकटे भावाचें नातें येत असावें. याचें नांव त्रिंबक सदाशिव.

१. ' भास्कर ' आहे तेथें ' भापकर ' असें असावें.

२. हे बापूजी खंडेराव चिटणीस असावे. रामराजाचें चरित्र पहा.

३. येथपासून खुद्द खाशांचे हातचा लेख आहे.

* गेंड्याचा माळ साताऱ्याजवळ आहे.

ले. ७६ [२] | श. १६७३ वैशाख शु.८ ता. २२-४-१७५१

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री वासुदेव दीक्षित

स्वामीचे सेवेशी

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय लेखन करीत असले पाहिजे. विशेष राजश्री शिवराम गोविंद भिडे व सखाराम बापूजी नाईक भिडे व नेमीदास अनंतपंत [?] यांजकडे सरकारचा ऐवज येणें तो आणावयासि राजश्री पांडुरंग महादेव व यादाजी दादाजी दिा दादो महादेव यांस फौज सुद्धां व बरोबर उंट नफर २५ पंचवीस देऊन पाठविले आहेत. तर सदरहु ऐवज ×शहराहून बहुत तजविजीनें रवाना करणें. ऐवज पारखवयासि राजश्री बाबूजीनाईक दि।। रामाजी नाईक पोतदार यांस पाठविले आहेत. यांचे मारफतीनें ऐवज पारखाऊन शहराहून बहुत तजविजीनें, सुरक्षित-पणें, कांहीं अटकाव, कजिया न होतां बाहेर काढून ठेविला पाहिजे. रा॥ छ ६ जमादिलाखर बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंति.

ले. ७७ [१७३] | श. १६७३ वैशाख व. १२ ता. ११-५-१७५१

॥ श्री ॥

चिरंजीव नाना यांसि भाऊ, आशीर्वाद सविस्तर मजकूर भेटी नंतर कळेल. वरकड तरतुदेचा मजकूर तीर्थरूपांनीं* लिहिला आहे त्याप्रमाणें करणें. विशेष राजकारणांत असतील ते सविस्तर कोण कोणे प्रकारें व तुम्हांसी ही दुसरे प्रकारे संदेहाचे लिहून पाठविणें. त्याचा सुमार येथून केला पाहिजे तर सविस्तर लिहिणें. वरकड सातारां कजिया न पडावा. सर्व उत्तम परंतु कालें करून प्राप्त जाहालें तें आपले इजतीसाठीं केलें पाहिजे. तुम्ही बहुत सावधतेनें सर्व करावयाचा काल आहे, परंतु आलीकडे तुमचें सविस्तर पत्र येत नाहीं. उचित नाहीं. सर्व लिहून पाठविणें. आमची रवानगी पुढें तुम्हांकडे करणार याचाही विचार सर्व लिहिणें. साराश इनाम देऊन रोजचे रोज येथें लवकर वर्तमान येई तें करणें. रवाना छ २५ जमादिलाखर. दादास पांच सात रोज बरें वाटत नव्हतें. इकडील पाणियानें परसाकडचें जाहलें होतें. आतां उतार पडून बरे जाहले. येथील फौज दरमजल येते ही खबर तेथें पावलियावर कोणें प्रकारें भाव होतात हें सर्व लिहिणें. वरकड हजार प्रकारें लबाडया करणार आमचे दरबारीं गृहस्थ आहेत. तें चुकत नाहीं. सर्वही ईश्वर क्षेम करून परस्परें पेंच सुटतील. असो. पत्रीं विशेष काय लिहावें ? हे आशीर्वाद.

× शहर=औरंगाबाद. येथेंच यावेळीं निजामाची राजधानी होती. राजवाडे खंड १ लें.१० प्रमाणें शिवराम गोविंद भिडे हा सावकार औरंगाबादेस सन १७५१ मध्यें होता. त्या वरून या पत्राची तारीख ठरविली आहे. भिडयांची वंशावळ भा. इ. सं. त्रै. व. ९.३ त आहे, तींत हें नांव नाहीं.

* तीर्थरूपांनीं=नानासाहेब पेशवे यांनीं.

ले. ७८ [३५४] | श. १६७३ जेष्ठ शु. ९ ता. २२-५-१७५१

॥ श्री ॥

पुरवणी राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसावीं यांसि

उपरि गायकवाडाचा× जो मजकूर जहाला तो तुम्हांस लिहिलाच आहे. तदोत्तर मातोश्री आई साहेब* व राजश्रीनीं खालीं यावें, येविशींचा प्रेत्न बहुतां प्रकारें केला. त्यांही जे जे मुद्दे घातले तेही मान्य केले असतां त्यांजकडून राजश्री मानसिंग जाधवरावँ व आम्हांकडील मध्यस्त राजश्री महादजी नाईक निंबाळकर व धोंडो गोविंद आले गेले होते. त्यां सह त्रिवर्गास गडावरि पाठविलें होतें. त्यास गडावर न घेतलें. आम्हाकडील मध्यस्त गडावरी न घेतले तर न घेवोत परंतु त्यांणीं आपलेकडलि मध्यस्तांस तों घ्यावें. त्यांस ही न घेतलें. आईसाहेब वसवासी फार. लोक व गडकरी यांचे चित्तांत आमचे सूत बनो न यावें[3] ××× वास घालून नाशितात. गडकरी यांचे मतें सर्व सभ्य आम्ही आहों. मातोश्री व पेशवे एक जालियावर आम्हांस कोण पुसतो ? असा विचार आहे. याजकरितां गडकरी यांस नरम करावयाचा विचार केला. फौज व इशम पोख्त ठेवून आम्ही कूच करून आलों. छ ७ रजबीं पुण्यास येऊन दाखल जालों. या उपरि होईल वृत्त तें लेहून पाठवून. येथील सर्व अर्थ तुम्हांस कळावा याजकरितां लिहिलें असें छ ७ रजब बहुत काय लिहिणें.

लेखन सीमा

ले ७९ [१६२] | श. १६७३ ज्येष्ठ शु.९ ता २२-५-१७५१

श्री

राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहा बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित असिलें पाहिजे.विशेष तुम्ही जयनगर-हून निघालियावर एक पत्र आलें. त्या आलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं.

---

* आईसाहेब=ताराबाई, राजश्री=रामराजे.

३ मधील अक्षरें फाटलीं आहेत.

× गायकवाड ताराबाईस मिळून १५ हजार फौजेनिशीं पुण्यावर चाल करून आले होते.

४ मानसिंग जाधवराव–उर्फ बाबजी सिंदखेडकर हा शाहूचा भाचा. निजामानें फत्ते-खडर्याच्या लढाईत त्याचा बाप मारल्यामुळें लहानपणीं आईबरोबर पळून साताऱ्यास आला. शाहूचे पश्चात् तो ताराबाईचा कारभारी बनला व पेशव्याशीं तह झाल्यावर परत औरंगाबादेस गेला. वंश औरंगाबादेस व वऱ्हाडांत देऊळगांव राजा येथें आहे. (काळे वऱ्हाडचा इतिहास)

तुमचीं व नबाब वजीर यांची भेट जाली, यमुना पार होऊन कादरगंजा जवळ दहा हजार पठाण सरदार सुद्धां बुडविला, तेंही वर्तमान परभारेंच येऊन पोचलें. तदोत्तर अहमदखा पठाण बंगास प्रयागास आसरा करून होता तो उठऊन फरोखाबादेस येऊन लढाईस नमूद जाहाला. त्याची तुमची लढाई सुरू जाहली. अहमदखा बंगशानीं फरोकाबाद सोडून गंगा-तीरास बेहडा अडचण जागा पाहून आराबा रचून त्याची तुमची नित्य लढाई होऊं लागली. तथापि वर्तमान लिहिलें नाहीं. याजवरून अपूर्वता, आश्चर्य वाटलें. प्रस्तुत राजश्री दामोदर महादेव यांचें पत्र छ. ७ जमादिलाखरचें छ ५ रजबीं येऊन पावलें कीं, " अहमदखा बंगस बाहादुरखा रोहिल्यास शरण जाऊन त्यास दहा बारा हजार स्वार व प्यादे यांजसीं कुमकेस आणिलें. सरदारांची फौज व जाटाची फौज व नबाब वजीराची फौज गंगापार होऊन छ३ जमादिलाखरी लढाई जाली. बाहादूरखा रोहिला बुडविला. हजारो घोडीं घेतलीं. हत्ती पाडाव केले. हें वर्तमान बंगसानी ऐकून घाबरा जाला. दुसरे दिवशीं पळून गंगापार गेला. लष्कराच्या लोकांनीं घोडीं पाडाव फार आणलीं. तोफखाना पाडाव केला. " म्हणोन लिहिलें तें श्रवण होऊन संतोषाच्या कोटी जाहल्या. शाबास तुमच्या हिमतीची व दिलेरी-हस्तुमीची व शाबास लोकांची ! आमच्या दक्षिणच्या फौजांनीं यमुना गंगा पार होऊन रोहिले पठाणांसीं युद्ध करून आपण फत्ते पावावें हें कर्म लहान सामान्य न जालें ! तुम्हीं एकनिष्ठ; कृतकर्मे सेवक या दौलतीचे स्तंब आहां ! ! जें चित्तावर धरितां तें घडून येतात. पहिलीं यशावह कर्में संपादिलींत ततोधाधिक हें यश संपादिलेंत. या यशास जोडाच नाहीं ! परंतु केल्या मनसुबियाचा अर्थ किमीप लिहीत नाहीं ऐसें नसावें. सर्वदा आपलें कुशल वृत्त लिहीत जाणें. तेणें करून संतोष होत जाईल. मोठा मनसबा कठीण होता. नानाप्रकारचीं येथें वर्तमानें उठतात. तुमचें पत्र तों येत नाहीं. याजमुळें चित्त चिंतेंत होतें. इरान +तुरान पावेतों लौकीक जाला कीं, वजीर मोडला, पैंठाला असतां फिरोन फत्तेच्या मनसदीवर बसविला. याजहून यश कोणतें अधिक आहे ? या उपरि तेथील रंग भरून, स्वकार्य साधून, आपलें मुलुखांत येणें योग्य आहे. छ ७ रजब बहूत काय लिहिणें लेखनसीमा.

ले. ८० } { श. १६७३ ज्येष्ठ शु. १०
[३८५] { ता। २३-५-१७५१

॥ श्री ॥

पु॥ राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसावी यांसि

उपरि. रेवामकुंदपुरचा मामला बहुत आफ्तर पडला. कमावीसदारांच्या साहित्यास तीन चार वर्षें फौज एकंदर न गेली. प्रस्तुत आपणास तो प्रांत जवळच आहे. कोणी एक दोन पथके पाठविणें तीं पाठवून कादाराचा चौका बैसे, कमावीसदाराचा पैका उगवे, तें खामखा करावें. रा छ ८ रजब. तेथील बंदोबस्त जरूर करावा बहुत काय लिहिणें. लेखनसीमा.

+ येथपासून खुद्द खाशांच्या हातचें अक्षर आहे.

२ सफदरजंगास पठाणांनीं पदच्युत केलें होतें. त्यास पुनः वजीरी दिली.

ले. ८१ [३५३] | श. १६७३ वैशाख इ. १७५१ मे

श्री

आशीर्वाद उपरि. गुणापासून ताराबाईशीं बिघाड पडला, याजमुळें नानाप्रकारें पेंच त्यांनीं केले. ज्याशीं आम्हीं गोड न बोललों तो त्यांचे लगामीं. ज्याशीं आम्ही गोड बोललों तो ही त्यांनीं लटका चढीं लावून आपले लगामीं लाविलेच आहेत. कोठें ताळ राहिला नाहीं. यास्तव आम्हीं कबूल केलें कीं, दादोबांस प्रतिनिधी द्यावी. सर्व कारभार त्यांनीं करावा. आमचा गुजराथ कर्नाटक दिल्याप्रमाणें चालवावें. त्यांनींही कबूल केलें. परंतु खालीं उतरल्या वांचून, भेट जाल्यावांचून, जनांत नीट दिसत नाहीं, संशय तुटत नाहीं, यास्तव बहुतां प्रकारें आग्रह करितों. परंतु खालीं उतरतांच राजा पळून जाईल, अगर आम्ही मागती राजास हातीं धरून आपल्यास मुरदाड करतील, हा संशय मानून संकटांत आहेत. परंतु सभोंवतीं भलताच गुरें वळितो. पोटास एक पैसा येत नाहीं. सोनें,रुपें मोडून खावें येथपावेतों आलें. यास्तव मातबर मराठे मध्यस्त घेऊन उतरावें, ऐसा करार जाहला आहे. उतरलीं तर उत्तम, नाहीं तर एका खाशानें दहा हजार फौजेनिशीं येथें असलें पाहिजे. मुरारजी घोरपडे व मोंगलै यांजकडे नानाप्रकारें आम्हांशीं अति वादास प्रवर्तून राजकारणें करितात. सर्व संभाळलें पाहिजे. घरकलह कठीण आहे. येतद्विषयीं कसें करावें ? तुम्हांकडे, मल्हारबांकडे देखील, राजकारणें करितात ऐसें ऐकितों. त्यास तुम्हाशीं राजकारण केल्यास काय होणें ? परंतु यत्नास चुकत नाहींत. पुढें जें होईल तें लिहून पाठवूं हे आशीर्वाद. ×

ले. ८२ [१६३] | श.१६७३ ज्येष्ठ व. १३ ता। १०-६-१७५१

॥ श्री ॥

राजश्री साबाजी सिंदेऽ गोसावी यांसि

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य लेहांकित बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद सुा इसने खमसेन मया व अलफ. तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं ऐसें नसावें. सर्वदा आपलें कुशल वृत्त लिहीत जावें. यंदा सरदारांनीं मोठा अवघड मनसुबा करून, यमुना-भागीरथी पार होऊन, पठाण रोहिल्याशीं गाठ घालून, युद्धप्रसंग करून पन्नास साठ हजार फौज बुडविली. तुम्हीं सर्व लोकांनीं जिवाची तमा न धरितां साहेब-कामावरीच दृष्टि देऊन

---

१. यावरून हें पत्र जयापा शिंदे यांस लिहिलें असावें असें होतें. मल्हारबा=होळकर

× हें सर्व पत्र नानासाहेबांच्या हातचें आहे. २ गुत्तीकर. ३ हैदराबादवाले.

ऽ साबाजी शिंदे हे राणूजीचे कोण हें समजत नाहीं. भाऊसाहेबांच्या बखरींत साबाजी शिंदे यांस दादासाहेबानीं पुढें लाहोर येथें ठेविलें असें आहे. भा० सा० ब० पृष्ठ ५१ व ५७ पहा. तेच साबाजी हे असावे. हे हल्लीं जयाजी शिंद्यांच्या लष्करांत होते असें दिसतें.

शत्रु शासनाक्रांत केलात. तुमची निष्ठा दृढोत्तर, तद्योगें यश रामेश्वर इरान तुरान पर्यंत प्रफुल्लित जालें. शाबास सरदारांची ! व शाबास तुम्हां लोकांची आहे ! ! दुसरियांस हें यश फार दुर्लभ असे. इकडील वृत्त राजेश्री जयाजी शिंदे यांस लिहिलें आहे, त्याजवरून कळेल. अतःपर माघारें यावें. रवाना छ २६ रजब बहुत काय लिहिणें. लेखन सीमा.

ले. ८३ [३६४]

श. १६७३ ज्येष्ठ व. १३ ता १०-६-१७५१

श्री

राजश्री जयाजी शिंदे गोसांवी यांसि

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेा बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. तुम्हीं पत्रें छ १ जमादिलाखरचीं पाठविलीं तीं छ २३ रजबीं पावलीं. लिहिलें वर्तमान त्यांत खु ला बाच सादलखान पठाण पठाणाचा हरोळ होता तो लुटून पस्त केला. तदोत्तर अहमदखान पठाण प्रयागींहून जलद स्वारीनें फरोकाबादेस आला. याची बातमी कळोन बुनगे कोशीं दुकोशीं ठेऊन सडे फौजनशीं मोर्चेबंदी करून राहिलों. त्यांस व आम्हांकडील मोर्च्यांचे × × × × त होती मारामार × × × × असतां पंचवीस रोज पर्यंत जहाले. पठाणास सामान सरंजाम पलीकडून पोंचत होता. त्यामुळें आयास न येत. तेव्हां नबाब मनसूर अल्लीखान वजीर आम्हां पासून पांच कोश कन्होज जवळ होते. त्यांजकडून गंगेस पूल तयार करवून फौजा निवड करून पार उतरून त्याजकडील फौज रोहिले सुद्धां तीस हजार पावेतों होती त्यांसि गांठ घालून पठाण लुटून मारून पस्त केला. तेच दिवशीं मोर्च्यांतून अहमदखान पठाण रात्रौ पळोन गेला, त्याचा पिच्छा करून बुडविला. दत्ताजी शिंदे यांणीं फारफार शर्त केली. हत्ती, घोडे, उंटें, निशाणें कुल लुगारा केला. याउपरि वजीराशीं काशीं, प्रयाग क्षेत्राचा वगैरे मजकूर घातला आहे. त्याचा निकाल जहालियावरि त्यासि यावयाचा विचार करून लेहून पाठवूं म्हणोन विस्तरें लिहिलें तें कळलें. ऐशियास, तुम्हीं एकनिष्ठ मातबर सेवक, उमदीं उमदीं कामें दूरदेशींनें मनांत आणून त्यांचें ठायीं नेट मारून करणें आणि शिपाईगिरीची व मनसुबेबाजपणाची शर्त करून यशास पात्र व्हावें ऐसेच आहां. तदनुसार हें महत्यश घेऊन वजीरास पठाणांनीं व रोहिल्यानें फरारी करून तमाम दिल्लीपर्यंत आक्रम शक्त केली असतां त्याची पुस्तपन्हा करून त्यांसि नतीजा देऊन नेस्तनाबूद केलें. वजीराचा बोलबाला करून, पादशाहत रोहिले पठाण घेऊं चाहात होते ते पादशाहाच्या घरांत राखोन, त्यास संतोष व वचनास खरेपणा महत् यशाची पराकाष्ठा होऊन, स्वामिसेवा पैका व यश आजि तागायत जहाली नाहीं ती करून दाखविलीत. याजवरून फार संतोष जहाला. तुम्हांस योग्य तेंच केलें व पुढें ही कराल, हा निशाच आहे. या उपरि साधल्या यशाचा लाभ अतितर मानून, काम काज करणें तें करून, सर्वांची मर्जी राखून, देशीं यावयाचा विचार केलाच असेल. तर सविस्तर वर्तमान लिहिणें. येथील वर्तमान तरि वरकड सर्व राज्य आमचे

लक्षाशिवाय नाहीं. × मातुश्री चढीं लागलीं आहेत. त्यास गडावरि दोन फळ्या. राजश्री निराळे. मातुश्री निराळी. प्रस्तुत राजश्रीचें प्राबल्य आहे. बहुधा उतरतील. श्रीकृपें लौकरीच राज्याचें कल्याण. दुष्ट दुर्बुद्धीनें राज्यांत बखेडा करितात त्यांचीं *काळीं तोंडें होऊन राज्य स्वस्थ होईल. पुढें वर्तमान होईल तें लिहिलें जाईल. जाणिजे. छ २६ रजब बहुत काय लिहिणें. पौा छ ४ रमजान.

लेखन सीमा

ले. ८४ [३५८] श. १६७३ ज्येष्ठ व. १४ ता १-१६-१७५१

श्री

पुरवणी राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसांवी यिसि

उपरि. नबाब गाजुदीनखान फेरोजजंग बादज बरसात दक्षणेंस यावयाची तजवीज करतीलसें दिसतें. फेरोजजंग नबाब आसोफज्याचे पुत्र खरेच. परंतु बहुत दिवस दिल्लीस राहिले. मुतसदगिरीचेंच काम केलें. शिपायगिरी सरदारीचें काम त्यांस पडलें नाहीं. प्रस्तुत ते सरदारीचे व बहादुरीचे कामास हिंमत करणार. त्यास आम्हीं सलाबतजंगाशीं जागीरीची बोली लाविली आहे. तेही आम्हाशीं बोलतात. परंतु गाजुदीखानाची येण्याची गरमी असती तर चित्तानुरूप हेही आम्हाशीं बोलते. जर चित्तानुरूप याजकडून कार्य न होतें तर त्याजकडून कार्याची पैरवी करून घ्यावयाची तजवीज करितों. परंतु गाजुदीखान तुम्हाशीं बोलतील. तुम्हांस वचनाशीं गोवितील. तुम्ही वचनास गुंतोन त्यांस घेऊन यावयाचा विचार कराल. तर आम्ही सलाबतजंगाची दस्तगिरी केली, कांहीं वचनासही गुंतलों, आमची जागिरीविशीं याजशीं बोली लागोन राहिली आहे. गाजुदीखान येतातसें यांस कळोन हेही आम्हांशीं बोलतील. पुर्ते वचनास गोवितील. एकूण तुम्ही त्यांजकडे वचनास गुंतला, आम्ही यांजकडे गुंतलों, येणेंकरून दोहींकडेही फार फार अवघड होऊन बेइमानीचा शब्दारोप येईल. त्यास ही गोष्ट सर्वथा कार्याची नाहीं. प्रस्तुत कांहीं तुम्ही त्याजशीं वचनास गुंतला नाहीं. मोकळेच आहां. ते बोलत असतील तर सुखरूप बोलोत. तुम्हीं ही जाबसाल उचित रीतीनें करावे. वचनास न गुंतावें. आम्ही याजशीं जागिरेविषयीं बोलतों. चित्तानुरूप यांजकडून काम जहाल्यास उत्तमच आहे. जरी हे आमचे खातरखां कार्ये करून न देत तेव्हां यांजकडील बोली तोडून त्यांजकडे बोली लावून त्यांजपासून आपलें कार्य करून घ्यावें लागेल. सारांश, इकडील प्रकार निवडला नाहीं तोंपर्यंत तुम्हीं गाजुदीखानाशीं वचनास न गुंतावें. इकडीलही सर्व अर्थ तुम्हांस कळावा याजकरितां लिहिला असे. पुढें होईल मजकूर तोही तुम्हांस लिहून पाठवून. तदनुसार जसजसा

× या शब्दापुढील बरींच अक्षरें फाटलीं आहेत.

* येथें बाजूवर बाळाजी बाजीरावांचा शिक्का आहे.

विचार करणें तो करालच. ×आमचे मतें यांजशीं वचनाप्रमाणें जाहलें आहे. यांनींच जागीर दिल्ही तर तो यांसच राखावें. त्यांचा पक्ष न करावा. यांनीं लबाडी केली, नीट न देत, तर यांसि इमान उजवलें. आम्हांवर तर शब्द नाहीं. ऐसे जानोजी निंबाळकर मध्यस्त आहेत त्या हातीं जाबसवाल करावे. मग सुखरूप गाजुद्दीखानास आणून त्यांचें पारपत्य करावें व त्यांपासून मातबरच पैका मुलूख घेणें तो घ्यावा. ये गोष्टीचा स्पष्ट अर्थ श्रावण-भाद्रपद अखेर कळेल. तदनुरूप जें कर्तव्य तें करावें. जर केवळ त्यांचें राजकारण तुम्हीं टाकिलें, ते नाउमेद होऊन घरीं बसले म्हणजे, यांसही आमची गरज पडणार नाहीं. त्यांसि कांहीं दिवस धातुपोषण बोलावें, यांजपासून आपलें कार्य साधावें. हे ताळ्यावर नच येत तर त्यांसि शफतपूर्वक बोलून मग त्यांस आणावें. ऐसा कारेगारीनें मनसबा केलियावांचून प्रामाणिकता राहणार नाहीं. जर तुम्हीं त्यांसि केवळ इमानपूर्वक बोललेस, आणि त्यांस घेऊन याच मजलीस आलेस म्हणजे हे आमचे पाया पडतील. आम्हासही यांचें ऐकावें लागेल. आम्ही यांसि सलुख केला, तुम्हीं त्यासि इमान केलें, म्हणजे महा अप्रमाणिकतेचें कारण होणार. बहुत लौकिक फटकळ होणार. यास्तव त्यांचें भय यांस पडे, कार्य यांजपासून होय, ऐसें करावें. हे ताळ्यावर नच येत तर आपलें इमान उगवलें. ऐसें स्पष्ट बोलून मग सुखरूप तुम्हीं आम्हीं मिळोन गाजुद्दीखान उभे करून बेजरब यांस जरब द्यावी. आपलें कार्य मातबर साधावें. तुम्हांशीं ते बोलत असतील. तुम्हीं दसरिया पावेतों राजकारण राखावयाचें रीतीनें बोलणें. इतक्यांत यांसि आम्हीं बोली पाडून स्पष्ट निश्चय करून तुम्हांस लिहून पाठवूं. तदनुरूप जें कर्तव्य तें करणें. यांनीं आमची रजावंदी केली आणि तुम्ही त्यांसि वचन इमानास गुंतलेस, त्यांस घेऊन यांजवर चालून आलेस, म्हणजे सर्व प्रकारें लौकिक वाईट होईल. यास्तव विस्तारें लिहिलें असे. सलाबतजंग थोड्या दिवसांत अवरंगाबादेस दाखल होतील. जानबा जाऊन जाबसाल करून येत तों उबार आहे. या गोष्टीस दोन तीन महिने पाहिजेत. इतक्यांत पावसाळा आहे. चारी राजकारणें व्हावीं. दसरिया नंतर जें लिहून पाठवूं तें करावें. छ २७ रजब बहुत काय लिहिणें.

पौा छ ४ रमजान

ले. ८५ [५]

श. १६७३ श्रावण शु. १
ता १२-७-१७५१

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री **वासुदेव दीक्षित** स्वामींचे शेवेशीं,
विद्यार्थी **बाळाजी बाजीराव प्रधान** साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल

× येथपासून खुद्द नानाचें अक्षर.

जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. गाजुदीखान× वडील आणि पातशाही सनदेसहवर्तमान येतात. त्यांचे साहित्यविषयीं पातशहानीं सरदारांस बहुत सांगितलें. आम्हांसही लिहिलें आहे. याप्रकारें पावतां सय्यद लष्करखान यांणीं सलाबत* × × × × विचार तों सांगून ते आलियावर परस्पर तह होय, कलह–वृद्धि न व्हावी, प्रजा सुखी असावी, याप्रकारें खानास करणें योग्य आहे. मागें खानानीं नागो रामा बरोबर पलीकडील वर्षी सांगून पाठविलें होतें त्यांत खानाचा मनोदय गाजुदीखानाकडेच स्पष्ट दिसत होता. रामदासपंताशीं चित्तापासून विमनस्कता, याजमुळें ही तिकडेच अनुकूळ मनोदय होता. सांप्रत मात्र कांहीं संशयांत पडले असतील. आपण त्याचा इतबारी, प्रमाणिक शहरांत असेल त्यापासून लिहून पाठवावें, व आपलें ही पत्र त्याच अन्वयें जाऊन जाब सत्वर आला पाहिजे. प्रसंगीं खानांनीं गाजुदीखान याजकडे जाहलिया, एक निष्ठेस योग्य व लाभ ही त्यांत व आमचे लेहास ही योग्य, असे तीन अर्थ घडतात. सर्व प्रजांचें बरें होतें व गाजुदीखान नबाबाचा वडील पुत्र, आणि पातशाही सनदेसहित येतो, त्याकडे जाहलियास कोणेविशीं ही दोष नाहीं. आम्हांस तो जें सरदार करून येतील तें निभावलेंच पाहिजे. सलाबतजंगासही हेंच योग्य आहे. मागें नासरजंग नबाबाशीं भांडले [ते] काय फळ व काय लौकिक पावले ? बाहेरील कोणी आला तर भांडणें योग्य,घरचे घरीं भांडणें सर्व प्रकारें योग्य नाहीं. याच प्रकारें

× हा निजाम उल्मुल्काचा ज्येष्ठ पुत्र. ह्यानें शिंदे होळकर मार्फत पेशव्यांशीं लेहाचें बोलणें लावून दक्षिणचा सुभा सलाबतजंगाकडे होता तो आपणाकडे व्हावा अशी मसलत मांडिली. ह्या मसलतीच्या संबंधानेंच खालीं दिलेलीं पत्रें पेशव्यांनें दीक्षित यास लिहिलीं. इ० सन १७५१।५२.

१. सय्यद लष्करखान हा औरंगबादचा सुभा गुप्तपणें गाजुदीखान याची मदत करीत होता. सन १७५२ च्या एप्रील महिन्यांत रामदासपंत मारला गेल्यावर ह्यास बुसीनें दिवाण नेमिलें.

* ह्या शब्दापुढील शब्द गेले आहेत किंवा पत्र लिहिणारानें गुप्त कारणासाठीं बळेंच लिहिले नसावे. अशा ठिकाणीं फुल्या घातल्या आहेत.

२. हा ब्राम्हण गृहस्थ डुप्ले याणें नासरजंगाचा नाश करण्यास योजिला होता. त्या प्रमाणें त्याणें नासरजंगाच्या लष्करांत फितूर करून शेवटीं नासरजंग मारला गेला, नंतर ' राजा रघुनाथ ' असा त्यास किताब देऊन डुप्लेनें त्यास सलाबतजंगाचा मुख्य प्रधान केलें. सन १७५२ मध्यें मोंगलाचा पराजय झाल्यावर ह्याच्या फौजेंत आपसाआपसांत पगाराच्या बाकीवरून जो तंटा झाला त्यांत रामदासपंत मारला गेला. (एप्रिल ता० ७ इ० स० १७५२) याचें व रामदासपंताचें वांकडें होतें. रामदासपंताच्या मृत्यूपूर्वीचें हें पत्र· ह्यावरून तारीख ठरविली आहे.

खानानीं मसलत × × × कोणी कलहवृद्धीचा उपदेश × × × त्यास दोघ दर्शित्व ख म वार [?] करून आपले हातीं घेणें योग्य आहे. आम्हांस तो खानाचा भरंवसा पूर्ण आहे. तथापि नवीन प्रसंग आहे. लिहून उत्तर आणणें योग्य आहे. एतद्विषयीं कांहीं संकलित खानास पत्र पाठविलें आहे. हें जलद पावतें करून सविस्तर उत्तर आणून पाठवावें. तदनुरूप कर्तव्य तें केलें जाईल. छ २९ साबान बहुत काय लिहिणें हे विनंति. कदाचित् खान फिरंग्यांचे भरावर जातील तर न जावें. सर्व उमराव तिकेडे होतील. फिरंगियाची फुलचरीसें संकट, मग नवें सामान कोठें येणार ? व एक फिरंगी सामानानें काय होतें ? ते भर देतील परंतु भरंयसा न मानावयाचा. त्याचा पूर्व प्रकार कळलाच आहे. हे विनंति.

ले. ८६ [४] — श. १६७३ आश्वीन शु. ३ ता ११।९।१७५१

॥ श्री ॥

वेदमूर्ति राजश्री वासुदेव दीक्षित, स्वामीचे सेवेशीं

विद्यार्थि बाळाजी बाजीराव प्रधान. साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशळ जाणून स्वकीय लिहिणें विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर वर्तमान कळलें. राजश्री जानबा निंबाळकर आले. राजश्री रामदासपंताचे स्नेहाचाच अर्थ सांगितला. तेणें करून संतोष झाला. आम्हींही स्नेहवादें च किती एक विचार मशारनिल्हेशीं बोललों आहों. ते सविस्तर लिहितील व बोलतील. त्याजवरून सविस्तर कळेल. निरंतर सविस्तर अर्थ लिहीत असलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विनंति पैा आश्विन शुद्ध ३ बुधवार शके १६७३.

ले. ८७ [३३४] — श. १६७३ आश्विन व. ६ ता २९-९-१७५१

श्री

राजश्री* मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसावी यांसि.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य-स्नेहांकित बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लिहीत जाणें. विशेष. सैद लष्करखान जानोजी निंबाळकर हे बहुत दिवस नबाब फेरोजजंग याचें येणें इकडे व्हावें इच्छीत होते. परंतु नबाबाचें निघणें दिल्लीहून पेंचपांचामुळें न घडे. यास्तव मात्र हिदायत

---

१ सय्यद लष्करखान. २ फ्रेंचांचे. ३ गाजुद्दीनखानाकडे. ४ पांडेचरीस यावेळीं इंग्रज फ्रेंचांचें युद्ध चालू होतें.

* हें पत्र व खालचीं पत्रें श्री० रा० आबासाहेब दाभोळकर इनामदार अकोळनेर जि० नगर यांजकडून अस्सल मिळालीं. आबासाहेबांचे आम्ही आभारी आहों.

मोहिदीखानाशीं व रामदासपंताशीं चार दिवस आपला रंग राखून होते. सांप्रत सलाबतजंगाकडून मध्यस्ती निमित्य इकडे आले. जर आतांच नबाबास जाऊन भेटावें तर लौकिक सर्व प्रकारें वाईट होतो कीं मध्यस्तीस गेले, आणि तिकडेच जाऊन मिळाले. यास्तव आजच यांस केवळ भेटतां येत नाहीं. नबाब फेरोजजंग यांचे सेवेंत यांची एकानिष्ठता आहेच. प्रस्तुत आम्हीही विशेषात्कारें या उभयतांस नबाबाचे ज ना बे त रुजू आणिलें आहे. ऐशास हे उभयतां मर्द, प्रामाणिक, मातबर, सर्वही अमीर यांचे लगामी, दहा हजार फौज एकीकडे व हे दोघे बुद्धिवंत एकीकडे, हें नबाबाशीं रुजू जाहलें असतां कबू थोर अमीर नबाबाशीं हात बांधून सिद्ध आहेत असें जाणावें. दुसरें आमचे वडिलांतागाईत परम स्नेही, गतवर्षी मातबर पेंच आम्हावर पडला तेव्हां बहुतां प्रकारें आमचे कार्यास आले. तोही यांचा उपकार आम्हांवर आहे. यास्तव तुम्ही नबाबास या उभयतांविशीं उत्तम रीतीनें सांगून, ज्यांत नबाब अकृत्रिम यांजवर कृपा करीत असें करावें. व नबाबाचे खास

श्री
राजा शाहु नरपति
हर्षनिधान बाळाजी
बाजिराव
प्रधान

दस्तूरचीं पत्रें उभयतांचे नावें आश्वासनपूर्वक कीं, तुमचे भरवंसियावर येथें आलों, तुम्ही सर्व प्रकारें माझे आहां, असे विस्तारयुक्त पाठवणें. त्यांत यांची खातरजमा होईल. यांच्या जागिरा मनसबा जें जें आहे नबाबास बहाल करावें लागेल. किंबहुना अधिकही कृपा करून देणें प्राप्त होईल. हे उभयतां नबाबाचे स्वाधीन जहाले असतां नबाबाचा बहूत नफा आहे. शत्रुही आपोआप गर्वहत व पादाक्रांत होऊ[न] विशेष उपयोग होता.+ यास पूर्ण भरंवशियाचें नबाबाचे हातचें पत्र जरूर पाठविणें. छ १९ जिलकाद. बहुत काय लिहिणें. पौ॥ छ २२ जिल्काद.

लेखन सीमा

ले. ८८
[३९२]

श. १६७३ आश्विन व. ३०
ता॥ ८-१०-१७५१

श्री

पुरवणी राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसांवी

उपरी खान अलम याची थैली दुसरी आली ते पाठविली आहे. नबाब फेरोजंग यास पावती करावी. कृपा उत्तर पाठवून द्यावें. जाणिजे छ २८ जिलकाद. लेखनसीमा.

+ येथपासून खुद्द नानासाहेबांचें अक्षर.

ले. ८९ [३६९] | श. १६७३ आश्विन व. ३० ता ८-१०-१७५१

॥ श्री ॥

राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसावी यासि

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेा बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष.

३. रामचंद्र जाधवराव यास नवाबाचे इजायतनामे सादर जहाले होते. त्याचे जाब आले थैल्या.

१. जानोजीराव निंबाळकर यांची थैली.

१. खान अलम यांची थैली.

४

येकूण चार थैल्या पाठविल्या आहेत. प्रविष्ट करून उत्तरें पाठवावयाचीं असलीं तर पाठवणें. जाणिजे. छ २८ जिलकाद. बहुत काय लिहिणें.

ले. ९० [३९१] | श. १६७३ आश्विन व. ३० ता ८-१०-१७५१

श्री

पु।। राजश्री मल्हारजी होळकर, जयाजी शिंदे गोसावी यांसि

आशीर्वाद उपरि. नबाब लौकर आले तर गंगे आलीकडे भेट होईल. तूर्त नदीस पाणी आहे. अथवा नबाबास तूर्त एकाएकीं जवळ नेतां येत नाहीं, सबब एथ्हां नबाबाची भेट महकूब करून जलद तुम्ही आम्ही मिळोन कामास जावें. ते नरम केलियावर नबाबांनीं जवळ यावें. ते समयीं सावकाश भेट होईल. परंतु भेटीस गुंतून काम नासावें ऐसें नाहीं. सैद लष्करखान, जानबा कित्येक तजविजांनीं आज पावेतों रहाविले. इतक्यांत नबाबाकडील जितके माणूस येऊन पावल्यास पुढेंही रहातील. सेवटेंत भरंवसा नाहीं. कां कीं, सलाबतजंगाचे कुचाचे गरमीनें दुदील होतात. नबाबानीं जप्ती न करावी एतद्विषयीं लिहिविलें त्यास जप्तीची तांतड सहसा नव्हती. नालबंदीस तोटा तूर्त दहाचा आला, तुम्हीही [illegible] न पाठविला, यास्तव जरूर पोटाचे संकटासाठीं रसदा घेतल्या. सर्वांपुढें इलाज आहे; पोटापुढें कर्जापुढें, इलाज नाहीं. तो विचार पत्रीं काय लिहावा ? भेटी नंतर समक्ष एक वेळ फार वाईट तुम्हाशीं बोलूं यांत संशय नाहीं. हणमंतराव निंबाळकरास लौकर एखादा मान्य पुरुष पाठवून भेटीस न्यावें. आम्हाशीं बोलले ते बेमान केलें. तें खरें, लटकें हें परीक्षा जलद पहावी. सारांश, तुमचे भेटीसाठीं व पुढील तोडजोडीसाठीं इतके दिवस मुक्काम केला. या उपर जलद येणें. सहसा विलंब न करणें. छ २९ जिलकाद बहुत काय लिहिणें. लेखनसीमा.

ले. ९० पहा.

ले. ९१ [२४] {श. १६७६ आश्विन ई.१७५१ सप्टेंबर

श्री

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेसी—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असले पाहिजे. विशेष. आलीकडे आपणांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी ऐसें नसावें. सदैव आपणांकडील वर्तभान लिहीत जावें. आपला व खानाचा स्नेह व राबता बराच आहे. व जे ही [?] मुत्सदी यांचा स्नेह व राबता असेलच. नबाब बाहेर निघाले. पुढें मनसुबा काय करणार, तें अंतर्बाह्य वर्तमान सर्वही आपणास कळतच असेल. तर सर्वदा लिहीत जावें. कळावें. आमचें पत्र येईल तेव्हांच उत्तर पाठवावें, असा अर्थ चित्तांत आणितां, नंतर वर्तमान लिहितां. [तर] आळस न करावा. बहुत दिवस पत्र येत नाहीं. असें नसावें हे विनंती.

ले. ९२ [३३६] {श. १६७३ पौष शु. १० ता १६-१२-१७५१

श्री

राजश्री रामाजीपंत यांसि

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार. जयापास जरूरी पत्र लिहिलें आहे. हें एकांती देणें. तुम्हांजवळून वाचून पाहिलीं तर उत्तम. नाहीं तर ज्यांपासून मनास येईल त्यापासून वाचून पहातील. सविस्तर जाब मागून सत्वर पाठवणें. सर्व प्रकारें कर्जे फेडावयाचा व आम्ही केलें तें शेवटास न्यावयाचा भरंवसा आम्हांस या समयीं जयापाचा आहे. त्यांनीं तिळमात्र मल्हारबाचे बुद्धीस कोणी भेद करतील तो न होऊं देतां ते आमचेच एकनिष्ठेंत रहात तें करावें. मागें मोठें मोठें कर्ते जहाले.त्यांनीं कर्जे फेडलीं. आतां आम्हांवर जयापावर कर्जे फेडावें. जें केलें तें एकविचारें शेवटास न्यावें. सा सुभे दक्षण सोडवावी. या कामाची पाळी [आली] आहे. श्री कृपा आहे. तरी सर्वही मनावर घेऊन करतील छ ८ ×सफर.

लेखन सीमा

---

१०. रामाजीपंत दाभोळकर—हल्लींचे आबासाहेब. ज्यांनीं हीं पत्रें आम्हांकडे प्रसिद्ध होण्याकरितां दिलीं, त्यांचे पूर्वज. दाभोळकर मंडळी शिंद्याच्या पदरीं होती व ह्या पत्रव्यवहारांत त्यांचीं नांवें जागोजाग आलीं आहेत, करितां त्यांची वंशावळ थोडक्यांत येथें देऊं. इनाम संपादन करणार रामाजी अनंत दाभोळकर हे पाणिपत येथें कामास आले शा० शके १६८२. यास पुत्र दोन आपाजीराव राम व ब्यंकटराव राम. आपाजीराम यांचे रामराव आपाजी (म० श० १७४३.) त्यांचे कृष्णराव व आपाजीराव. कृष्णराव यांचे मोरोपंत आबा. ×हें सर्व पत्र खुद्द नानासाहेबांच्या हातचें आहे.

ले. ९३ [१४४] श. १६७३ इ. १७५१

श्री

राजेश्री पंत प्रधान गोसावी यांसि—

छ सकळ गुणाळंकरण अखंडित लक्ष्मी आळंकृत राजमान्य—स्नेा उदाजी चव्हाण हिंमतबहादर ममलकतमदार दंडवत विनंती येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळलेखन करीत असले पाहिजे. विशेष—आपण पत्र पाठविलें पावलें. लेखनाभिप्राय कळोन समाधान जालें. सातारियाकडील वर्तमान लिहिलें त्याजवरून साकल्य कळलें. सांप्रत आपण कोठें अहा? विचार मनसुबा काय? आपण चित्तांत काय आणिलें आहे तें त्याहावें. पुढेंही कितेक विचार करणें आहेत. तर राजश्री लिंगो आमाजी यास पाठवून द्यावें. विचार सुचेल तो मशारनिले समागमें सांगोन पाठवावा. जाणोन लिहिलें. ऐशास आपण आम्हांस निरोप दिल्हा ते वेळेस सांगितलें कीं श्रावणमासीं मनसुब्याची रीत व फौज ठेवावयाचा विचार तुम्हांस सांगो. तोंपावेतों दोन दिवस मनसुबा राखून राहणें असें बोलोन निरोप देऊन लावून दिल्हे. त्याजवरून आम्ही आथणीस आलों. ज्येष्ठ मासीं चिरंजिवांचें लग्न केलें, वरकड या मुलकांतील जागां जागां कागदीपत्रीं व नानाप्रकारचे फितूर पत्रीं काय लिहावे? सर्व अर्थ आपणास विदीत. मसलतीचा विचार, आपणा शिवाय आमचीं मसलत नाहीं. या फितुरांत आज पावेतों आम्ही मनसुब्याचा जीव मात्र रक्षून आहों. इकडील कितेक अर्थ सांगणें तो सांगोन राजश्री लिंगोपंत रवाना केले आहेत, ते आपणा संनिध येऊन सविस्तर विनंती करतील. तो अर्थ चित्तारूढ करून प्रत्युत्तर समर्पक पाठविलें पाहिजे, प्रस्तुत या श्रावणमासीं आम्ही कूच करून झेंडे डेरे बाहेर देऊन निघालों आहों. सर्व भार आपणावर आहे, आपणाखेरीज दुसरा विचार जाणत नाहीं, हें मनोमन साक्ष असे. पुनरुक्त पत्रीं विशदें ल्याहावें हा अर्थ नाहीं. तपशिल अर्थ मशारनिले निवेदन करतील त्याजवरून श्रुत होईल. आपलें उत्तर येईल तदनुरूप वर्तणूक होईल. विशेष काय लिहिणें. कृपा वर्धमान करावी हे विनंती.

श्री राजाराम छत्रपती स्वामी चरणीं तत्पर उदाजी चव्हाण हिंमत बहादर ममलकतमदार निरंतर

शिक्का

ले. ९४ [२३] श. १६७३ पौष इ. १७५२ जानेवारी

श्री

वेदमूर्ती राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशीं--

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती आपलें पत्र बहुत दिवस येत

नाहीं. मागें सरदारांस पत्रें गेलीं त्याचा जाब आला असला तर पाठवा, व तिकडील भाव कर्तव्य जरूर ल्याहावें. मागें आपण लिहिलें तें आम्ही संदिग्ध मानिलें. अखेर आपण लिहिलें तें जाहालें. या उपरही वर्तमान असलेलें तें लिहीत असावें. मंगळवार तिसरा प्रहर हे विनंती.

फेरिस्त नंबर ५५६.

ले. ९५ [१९] श. १६७३ पौष इ. १७५२ जानेवारी

श्री

वेदमूर्ती वासुदेव दीक्षित स्वामीचे सेवेशीं--

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती. येथील वर्तमान नारायणभट सांगतील. राजाजी स्वभावानें कुटील बोलतात, तो भरंवसा येत नाहीं. भेट इमान सर्व विध जालें. परंतु परिणाम कठीण बिसतो. पांचा लक्षांची जागीर द्यावयाचा करार जाला. देतील तेव्हां खरें. त्यांणीं जागीर दिली, दाभाडियांचा आभिमान सोडिला, तर आम्ही त्रिंबकें देऊं. सारांश दैवी मानवी रीतीनें पाहतां काल कठीण आहे. सर्व स्वामींचें आशीर्वादें उत्तम होईल. पत्र पाठवीत जावें. जर जाला [?] सलूख शेवटास गेला तर येथून कूच होईल. आपण भेटीस यावें. कृपा केली पाहिजे. हे विनंती

फेरिस्त नंबर २४८

ले. ९६ [३६३] शके १६७३ फाल्गुन शु.९ ता। १२-२-१७५२

श्री

पुरवणी राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि.

आशीर्वाद उपरि. मल्हारबाचा शफतपूर्वक बेलभंडार पाठविला. तो पावला. आधींच भरंवसा त्यांत येणेंप्रमाणें पाठविला तेणेंकरून संतोष जहाला. जर मागें येणें झालें असतें तर महत्तर कार्य होतें. तथापि ईश्वर-इच्छा प्रमाण. आतां तों तह *चारा लाखांची जागीर त्यांनीं द्यावी, इकडून त्यांचें स्थल त्रिंबक कलहाचे दिवसांत घेतला तो द्यावा, ऐसें ठरलें. चिरंजीव दादाजवळ वीस पंचवीस हजार फौज देऊन गुजराथेस पोट भरावयास रवाना केलें. गैरहंगाम, पोटास नाहीं, ठाणीं बळकट, जितकें होईल तितकें करतील. ताराबाई हजार

---

१ राजाजी--रामदासपंत हा तारीख ७ एप्रिल १७५२ म्ह० श. १६७४ वैशाख शु. ४ रोजीं वारला. याचे हयातींतील पत्र.

२ सूर्याजीनें त्रिंबक किल्ला सन १७५१ च्या डिसेंबरांत घेतला. त्यानंतरचें पत्र. पहा. खंड १ प्रस्तावना पृ.११५.

* मूळांत 'राचा' असें आहे.

मनसबे राजकारणें घाटितात. करवीरवासीस आणावें ऐसेंही म्हणतात. आम्हांवरही कृपा दाखवितात. मळमळींत आहे. तुम्ही हरप्रकारें तेथील निकाल काढून माळवें, बुंदेलखंड, भदावरचा बंदोबस्त करून ज्येष्ठ, आषाढमासीं जरूर निघोन यावें. दिल्लीकडे गडबड पडली. यामुळें इकडे कोणी तोंड या दिवसांत करीत नाहीं. तुम्हीं तों येणें. येथें या कलहामुळें बाहेरील घरांतील फौज फार मिळाली. देश लुटला. पोटास नाहीं. मिळालें तेंही कळतच आहे. याउपर वांस पंचवीस× वैशाख अखेर येऊन पावले तरच स्थीत राहील. नाहीं तर रहात नाहीं. कमाविसदारांनीं सर्वंगाईचे निमित्यें पाय पसरले आहेत. याचीही चौकशी जरूर करणें. तिकडूनही ऐवज येईलसें करणें. घरांत बाहेर सर्व भरंवसा तुमचा आहे. विस्तार काय लिहिणें. छ ७ राबिलाखर बहुत काय-लिहिणें हे आशीर्वाद.

ले. ९७ [३९४] | श. १६७३ फाल्गुन शु. ९ ता। १२-२-१७५२

श्री

आशीर्वाद उपरि. येथें घराऊ प्रकार फार कठीण आहेत. याचा तपशील लिहितां येत नाहीं. तुम्ही खामखा मल्हारबाचें इमान व आपला खासा निश्चय हाच करणें कीं, हजारों प्रकारें मातबरांनीं, लहानांनीं लिहिलें तर तें सर्व एकीकडे ठेवून, येथें आल्यावर जो आमचाच मनोदय असेल त्यास शफतपूर्वक अनकूल वर्तावें. या पत्राचा भरंवसापूर्वक उत्तर आल्या आम्हास संतोष आहे. या पत्राचें उत्तर आलियावर तपशील लिहून पाठवूं. हे आशीर्वाद. *

ले. ९८ [३५५] | श. १६७४ चै. शु. ३ ता. ७-३-१७५२

श्री

राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि

आशीर्वाद उपरि. बिघाड झाल्या पूर्वी दोन तीन पत्रें पाठविलीं, बिघाड जाल्यावर पांच सात पत्रें पाठविलीं; परंतु तिकडील मनसब्याची तोडमोड करून आलीकडे आल्याची खबर न आली, व पत्र तों येतच नाहीं. असो. तुमचे मनसब्यास बरें वाटेल तें करितां. आम्हांस शिष्टाचारास मात्र लिहितां कीं, जे आज्ञा होईल त्या प्रमाणें वर्तणूक करूं. ऐसें दिसोन आलें. याचा तपशील समक्ष एकांतीं याल तर बोलूं. येथील अर्थ अद्याप लिहितों जे ईश्वर तुम्हांस बुद्धि देईल तें करा. मोंगलाची चित्त शुद्धि नाहीं. ताराबाईची चित्तशुद्धि नाहीं. फार फौज मिळाली. अबरू मात्र शेवटी राहिली. परंतु देश अगदीं गेला. रुपया एक

× वांस पंचवांस लक्ष. हें सर्व पत्र नानासाहेबांच्या हातचें आहे. या पत्रावरून नानावर त्यावेळीं प्रसंग कसा गुदरला होता तें ध्यानीं येईल.

* पत्र नानासाहेबांचें जयापा शिंद्यांस. ले. ९६ पहा.

नाहीं. पन्नास लाख कर्ज नवें जहालें. गुजराथेस चिरंजीव दादा गेले, सर्व वसूल त्यांनीं नेला. रुपया एक मिळणार नाहीं. लोकांस खानगी नाहीं. घोडीं पडलीं, या विचारें लोक दारीं बसतील. कर्जदारांचीं दिवाळीं निघत चाललीं. या उपर पंचवीस तीस हजार ऐवज आला तर उत्तम. नाहीं तर स्थित रहात नाहीं. हरतजविजीनें कांहीं तोडमोड करून खामखा यावें. येथें कोणाचा वसवस तिळमात्र न धरावा. तुम्हीं [व] मल्हारजी [यांणीं] एकच निश्चय धरावा कीं एकांतीं सर्व आशय आम्हांस पुसावे. जें सांगूं तें ध्यानांत आणून तदनुरूप करावें. ऐसें केलिया तिळमात्र गुंता संशय नाहीं. हें पुर्तें जाणून खामखां यावें. यंदा तुम्हीं ज्येष्ठमासीं न आलेसें तर आम्ही फिरोन पत्र तुम्हांस लिहिणार नाहीं. छ १ जमादिलोवल. हे आशीर्वाद×

ले. ९९)
[१६१]}

{श.१६७४ चैत्र व. ८
ता २७-३-१७५२

॥ श्री ॥

पु॥ राजश्री मल्हारजी होळकर व राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि—

आशीरवाद उपरि. नासरजंगास हिदायतमोहीदीखानाकडे १ पठाणांनीं भेदून नासरजंगास मारलें. हिदायतमोहीदीखान औरंगाबादेकडे येऊं लागला, तेव्हां आम्ही जसी केली. औरंगाबादेजवळून रुपये घेतले. याजमुळें मोंगलानें विषम मानिलें. तेव्हां तुम्ही जयनगरापाशीं होतेसें. तेव्हां वारंवार पत्रें पाठविलीं कीं, गाजुदीखान इकडे येतील तर उत्तम. तुम्हींही यावें. सा सुभे दक्षिण सोडवावी. अथवा गाजुदीखानास आणावें. त्यास स्थापावें. त्यापासून एखादा तरी निदान सुभा घ्यावा. कर्ज वारून घ्या [वें] येणेंप्रमाणें करावें. तेव्हां तुम्ही न आलेसें, वजीराचे कामावर गुतत चाललस. आम्ही खामखा आणावें तर तुम्ही कामास चाललेस. श्री इच्छेनें हिदायतमोहिदीखान व पठाण भांडून हिदायतमोहिदीखान मेला. आम्ही जवळ गेलों. परंतु मागें बापूं भिवराव मोडले. याजमुळें शह पडला. व आम्हांजवळ फौज थोडी. सोबत्याचा भरंवसा नाहीं. उन्हाळा दिवस. जानोजी निंबाळकर तेव्हां केवळ रामदासपंताचे लेकें ! त्यांनीं थोडया बहुतावर आम्हांस समजाऊन त्याजवर उपकार करून मजकूर विल्हे लाविला. आम्हांस गाईकवाडास जरब देणें जरूर यास्तव आम्ही दरमजल साता-

---

× हें सर्व पत्र नानासाहेबांच्या हातचें आहे. ह्याहि पत्रावरून पेशव्यांवर ह्या वेळीं कसा प्रसंग आला होता तें चांगलें कळतें.

१ मुजफरजंग

२ असा द्वितीयपुरुषीं अनेकवचनीं प्रयोग ह्या पत्रांत बरेच जागीं केलेला आहे.

३ वजीराचें काम-अयोध्येचा सफदरजंग याजला रोहिले लोकांचा सूड उगवावयाचा होता, तें काम.

४ हे बापूजी भिवराव रेटरेकर पेशव्याचा सरदार गायकवाडाशीं लढला, तो काय ?

५ निंबाळकर फितूर झाल्यावरून त्यास असें म्हटलें आहे.

रियाकडे आलों. तुम्ही वजिराचे कामावर मोठी मेहनत, मोठें जोखींव केलें. प्रांतही सुटला. परंतु मनसब्याचा जवा बसवून कांहीं पठाणास देऊन, कांहीं आपण घेऊन, रंग भरून माळव्यांत यावें, ते गोष्ट तेथील मुरवतीमुळें न जाहाली. एकदेशी मनसबा जहाला. गायकवाडाचें पारपत्य केलें. तुम्हांस नाना प्रकारें लोकांनीं दर्शविलें कीं,यांनीं बेइमानी, *दगाबाजी केली. परंतु ईश्वर साक्ष आहे. मोठे मोठे मराठे, मोठे कारभारी, यांनीं त्याचे घर बुडविलें. नाहक चढीं लाविलें. आम्हांशीं कबूल करून मागती चौथे दिवशीं फिरावें यामुळें बंदीखाने, गड सर्वही प्राप्त त्याचे कर्मानुरूप प्राप्त झालें. असो, एतद्विषयीं विस्तार कशास ? परंतु आईसाहेबाशीं विरुद्ध वाढलें. आईसाहेबांचे मतें सर्व प्रकारें आम्हांस मोडावें, रामदासपंताचे पुतण्यास पेशवाई द्यावी, त्यांनीं आम्हांस बुडवावें, दाभाडे यांणीं त्यास मिळावें, प्रतिनिधींनीं त्यांस मिळावें, रघोजीबाबांनीं त्यांस मिळावें, ऐसा पूर्ण भाव. पावसाळा हीं राजकारणें परस्परें शफथपूर्वक घाटलीं. परंतु आईसाहेबांस गडावर एके दिवसाचे खावयास नाहींसें जाहलें, याजमुळें बाह्यात्कारें मात्र आम्हांशीं सलूख करून खालीं उतरलीं. आम्ही विचार केला कीं, केवळ विरुद्धाचा लौकिक आहे तो वारावा. मनांत कांहीं तरी त्यांचे असो. जशी आमची क्रिया असेल तसें फळ आम्हांस होईल. जशीं तीं चालतील तसे आम्ही चालूं. ऐसा सिद्धांत करून सलूख केला. प्रतिनिधीस प्रतिनिधी करार केली. परंतु आंत सर्वांचे मनसबे घांटून तयार जाले. आम्ही पंचवीस लक्ष कर्ज मात्र नवें करून फौज नवी पंधरा व जुनी चाळीस येणेंप्रमाणें ठेविली. त्या उपर रामदासपंत आले. प्रथम आमची फौज जमा झाली

---

* ताराबाईच्या कारस्थानांत गायकवाड सामील झाले म्हणून त्यांस पेशव्यांनीं विश्वासघात करून कैद केलें, हा जो आरोप पेशव्यांवर आहे त्याचें निराकरण येथें त्यांनीं केलें आहे.

६ कबूल काय केलें होतें व फिरलें कसें हें येथें स्पष्ट लिहिलें नाहीं. दुसरे कोठेंही ही गोष्ट लिहिलेली आढळत नाहीं. तथापि गायकवाडानें कांहीं धरसोड केल्यावरून त्यास कैद करणें प्राप्त झालें असा ह्या पत्राचा आशय स्पष्ट दिसतो.

७ ह्यावरून ताराबाई व दुसरी मंडळी मिळून बाळाजी बाजीरावास पदच्युत करण्याचें कारस्थान उभें केलें व त्यांत हैदराबादकरांचा दिवाण जो रामदासपंत त्यासही सामील केलें होतें असें दिसतें. रामदासपंत (राजा रघुनाथराव) यांनीं ताराबाईकडे बोलणें लाविलें होतें व त्याचें पत्र गोविंदराव चिटणीस यांचे हातीं पडलें यावरून हीं गुप्त मसलत पेशव्यांस कळली, इतकेंच ग्रां० ड० लिहितो. पत्रांत आशय काय तें लिहीत नाहींत. पंताच्या पुतण्यास पेशवाई देण्याच्या बेताबद्दलही तो कांहीं बोलत नाहीं.

८ दाभाडे, गायकवाड, भोसले,प्रतिनिधि हे सर्व पेशव्यांच्या घराण्याचें बाईट पहाणारेच होते.

९ येथें ' हजार ' ह्या शब्दाचा अध्याहार समजावयाचा.

नव्हती. छापीं[10] घातला. दुसरें जुंझ उत्तम झालें. त्याजवर सलाबत बसली. इत्यादिक [मजकूर] जगविख्यात व इकडील पत्रावरून तुम्हास अवगत होत गेले. वारंवार लिहिलें कीं, " लक्षा प्रकारें यावें. वजिराची अब्रू रोखिली[11] व आमची गमावली हें कामाचें नाहीं. तुम्ही दौलतेचे स्तंभ[12], राज्यांत खेळ फार झाले आहेत. खामखा यावें. जे मेहनत तुम्ही वजिराचे कामासाठीं केली ते मेहनत येथें येऊन जलदीनें कर्तेस तर बहुत लाभ होता. परंतु तेथें कामामुळें व इरेसुळें शह पडला. तुमचें येणें, दोन महिने वाट पाहिली, न जहालें. शेवटी जानबा[13], सैद लष्करखान केवळ बजीद जहाले कीं, खामखा सलूख करावा. तेव्हां सलूख केला. त्रिंबकें[14] एका महिन्यानें द्यावा ऐसें कबूल केलें. कां कीं, तुम्हांस पत्रें गेलीं आहेत. तुम्ही यालच, तुम्ही आलियावर जे तुमचे विचारें होईल तें करावें. व गुजराथचें काम अगदीं बुडतें, खर्चास अगदीं नाहीं, मोंगलोंची आग भारी, सरदार कोणी मनापासून अगदीं मेहनत न करीत, एक चिरंजीव उभयतांनीं मात्र खटपट करावी. ऐसे अनेक प्रकार घरावू जाणून सलूख केला. परंतु अंतर शुद्ध नाहीं. आम्हांजवळून रघोजी बाबा मोंगलाकडे गेले. मोंगलांनीं त्यांस जाहागीर करार करून क्रिया घेऊन आपलेसें केलें. बाबूजी नाईक यांचें कर्नाटक काढून आम्ही घेतलें याजमुळें [ते] दुःखी. लटकें फटकें बोलून आशेस लावून दोन वर्षें आम्ही वोढिलें. परंतु ते याउपर जाणार. आईसाहेबाजवळून कर्नाटक करून घेणार. रामदासपंताजवळून नालबंदीस रुपये घेऊन तिकडे जाणार. ते हे एकत्र होणार. प्रतिनिधी ही वाढले. गोविंदरायाचीं सरंजाम घेतला. वरकडही किरकोळ कामें केलीं. शेर जहाले.

---

१० या वेळीं बुसी फराशीस याचीं पलटणें रामदासपंताबरोबर होतीं.

११ रोहिल्यास मोडून सफदरजंग याचे हेतु सिद्धीस नेले व त्याचा आब राखिला त्यास उद्देशून हें लिहिणें आहे.

१२. शिंदे होळकर पेशव्यांच्या उपयोगी कसे पडत व पेशवे त्यांस कसें जाणत हें यावरून स्पष्ट होईल. " दौलतेचे स्तंभ हा गौरव योग्य असून सेवकांचे बाहु स्फुरविणारा होता यांत संशय नाहीं.

१३ जानबा निंबाळकर सरलष्करखान हा औरंगाबादचा सुभा हा बाळाजीरावास व गाजुद्दीखानास प्रथम पासून अनुकूळ होता.

१४ त्रिंबक येथील किल्ला पेशव्यांनीं घेतला होता तो परत नवाबास द्यावा.

१५ बुसी मोंगलाकडे होता. त्याचा तोफखाना फार जबर असल्यामुळें थोड्या फौजेनें टिकाव लागेना. हीं तह करण्याचीं कारणें लक्षांत ठेवण्याजोगीं आहेत.

१६. उभयतां चिरंजीव म्हणजे दादा व भाऊ.

१७ बापूजी नाईक बारामतीकर यांजकडे कर्नाटकाचा सुभा होता तो त्यांजकडून शाहूनें काढून सदाशिवराव भाऊ यांस दिला होता. यावरून नाईक हे पेशव्यांचे नातेवाईक असूनही त्याच्या वाइटावरच होते.

१८. गोविंदराव चिटणीस असावे. हे पेशव्यांच्या पक्षांत होते.

त्यांचीं हीं राजकारणें कीं, नाईक आम्ही एकत्र होतों. कर्नाटकास येतों. रामदासपंतांनीं आणखी फिरंगी[१९] गाडदी ठेवावे. खांमखा आम्हांवर मनसबा मागती करावा. बाह्यात्कारें सलूख कांहीं दिवस दाखवावा व मागें जानबा आमचे मित्रें[२०] पुणियांत तीन महिने येऊन बसले. नित्य आम्हांस म्हणत कीं, " मोंगलांजवळ तुम्ही नवी जागीर मात्र न मागावी. म्हणजे आम्ही त्यांचीं तुमची पूर्ण निखाल [स] ता करून देतों. " लहानसहानें[२१] आम्हांस लिहीत कीं, " हें सर्व लटकें. हे एकाएकीं येऊन तुमचीं घरें जाळतात. " आम्हांस वाटे कीं, " लोक आफवेवर काय आहे ? व जानबा आमचे मित्र आहेत, सहसा आम्हांस फसवणार नाहींत. " शेवटीं जें जहाले तें दृष्टीस पडलें. बहुत लोक म्हणतात कीं रामदासपंतानें जानबा याच कामासाठीं पाठविलें कीं, तुम्हीं स्नेह मानून गाफील रहावें. जानबा तों दाखवितात कीं, त्यानें लबाडी केली. असो. याचा अंत ईश्वर जाणें. एकदां मात्र तुम्हांस लिहिलें होतें कीं, याउपर गाजुदीखानाचें येणें कामाचें नाहीं. यांचा आमचा स्नेह होत आहे. परंतु बिघाड झाल्यापासून निरंतर हेंच लिहितों कीं, " खामखा गाजुदीखानास आणावें. वजीराचा लेक सुभा[२२] करून आणिला तर मागें कुचेदे दिल्लींत करतील[२३]. व येथें मोंगल, मराठे भेटणार[२४] नाहींत. गाजुदीखान आलिया सहज पडेल. मोंगल व मराठे मातबर सर्व बराणपुरावर येऊन भेटतील. एक फिरंगी गाडदी नवी फौज मात्र रोहील. पठाण[२५] कर्नाटकांत बलावले आहेत. महमद अल्लीखानें[२६] त्रिचनापल्लीस[२७] बळावला आहे. सर्व गाजुदीखानास अनुकूल पडतील. दुसरें, तुम्ही तिकडून, गाजुदीखान दहा पंधरा [हजार,] आम्ही हिकडून, येणेंप्रमाणें मनसबा उभा रहातांच सर्व कामें होऊन जातील. सारांश, रामदासपंतानें अब्रू घेतली ही एकदां हरतजवांज करून त्यास पुर्ती जरब देणें घडल्यावांचून, तुम्हांस कैलासवासी यांनीं वाढविलें, व तुम्ही इराण तुराण पावेतों लौकिक केला, तो सर्व व्यर्थ ! आम्ही हि रायांचे वंशीं व्यर्थ जन्म घेतला[२८]. या उपरि तुम्हीं खामखा

---

१९. येथें फिरंगी म्हणजे फ्रेंच.

२०. ' मित्र ' ही व्याजोक्ति आहे. मित्र म्हणविणारे पण खरे शत्रु.

२१. लहानसहान सरदार, जाहागिरदार.

२२. वजीराचा लेक शुजाउद्दवला.

२३. गाजुद्दीखान यांस आणिल्यास पाठीमागें ते दिल्लीस कारस्थान करतील असा भाव.

२४. वजिराचा पुत्र शुजा यास दक्षिणचा सुभा करून आणिल्यास त्यास इकडील मुसलमान अगर मराठे अनुकूळ होणार नाहींत असा भाव.

२५. फ्रेंच व दुसरी नवी फौज.

२६. पठाण–हे कर्नोळ, कडपा व सावनूर येथील नबाब असावे.

२७. महमदअल्ली हा अर्काटचा नबाब.

२८. बाजीराव बल्लाळ.

२९. यावरून आपणास जो तह करावा लागला त्यानें व मराठेशाहींत रामदासपंत जी ढवळाढवळ करीत तिनें बाळाजीरावास फारच संताप आला होता असें दिसतें.

त्यांस[३०] आणावें अथवा त्यांनीं दसरा करून मागून यावें. तुम्हीं खामखा देशास यावें. शपथपूर्वक हा मनसबा करावा तरच उत्तम आहे. मागें यावें यावें हें लिहित गेलों; न आलां. आतां त्याचा पुढील रंग जाणून सर्व विस्तारें लिहिलें आहे. याउपर याल यांत संशय नाहीं. या पत्राचें उत्तर यथार्थ सत्वर पाठवणें. गुजराथचे कामास फौज गेली. श्रीकृपेनें काम होत चाललें. जेव्हां म्हटलें तेव्हां जवळ आहे. या उपर गाजुदीखानास पूर्ण भरंवसा देऊन बाजिराशीं लगाम[३१] राखून शेवटीं न तोडितां दक्षणचे कामास उपयोगीं पडत तें करून यावें. सर्वस्व वेचून एकदा रामदासपंत मोडावा. ते आम्हांवर मनसबा करितात यांत संशय नाहीं. तुम्हीं हल्लीं लिहिल्याप्रमाणें केलिया सहजच ते हतप्रभ होऊन मोठें यश तुम्हांस येतें. या उपर तुम्हीं न आलिया मनसब्यास वाईट, मनास वाईट, यास्तव मनसबा सिद्ध करून यावें. कदाचित् गाजुदीखान नामर्द, फौज न ठेवी, बाहेर न निघे, तर दुसरा कोणी पंधरा हजारांचा धनी आणावा. निदानीं तुम्हीं यावें. येथेंही फौज फार आहे. रामदासपंतास तुम्हीं आम्ही एकत्र जहाल्यास अंगीध[३२] नाहीं. रघोजीबाबाही येतील. लाभही उत्तम होईल. हें सर्व मनन करून उत्तर सत्वर पाठवावें. येथेंही तरतू [द] करीत आहों. ऐवजाची मात्र मोठी वोढ आहे. तुम्हीं आल्या सर्व वारेल. सांप्रत नवें वर्तमान कीं, त्रिंबक[३३] आम्ही न दिला यासाठीं रामदासपंत औरंगाबादेस येणार. मग किल्लाही कदाचित् देणें पडेल. जागिरीचा जाबसाल त्याकडूनही अद्याप जहाला नाहीं. मोठा लबाड दगाबाज आहे. सारांश एकदा त्यास जरब द्यावी तरच सर्व सार्थक आहे. छ २१ जमादिलावल. लेखनसीमा. पौ छ ३० जमादिलावल.

ले. १०० }
[१०३] }

{श. १६७४ वै. शु. ६
ता। ८-४-१७५२

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बापूजी बाजीराव स्वामी गोसावी यांसि

पोा बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें, विशेष. तुम्ही पत्र छ २५ जमादिलोवलचें पाठविलें तें छ ३ जमादिलाखरीं प्रविष्ट जहालें. आम्ही पलाशीहून कूच करून घाटावर आलों. तों, सैद लष्कर-

---

३०. गाजुदीखानास.

३१. सफदरजंगाशीं स्नेहभाव ठेवून.

३२. रामदासपंतास मोडण्यास कठीण नाहीं असा भाव.

३३. कबूल केलें (वर पहा) पण देण्यास उशीर लाविला असा भाव ?

३४. हें पत्र मोठ्या कारस्थानाचें आहे. पेशव्यांवर अनेक संकटें उत्पन्न झालीं असतां त्यांतून साम दाम दंड भेद यांनीं ते त्यांतून कसे पार पडले, वगैरे गोष्टी यावरून चांगल्या लक्षांत येतील. गाजुदीखानाच्या मसलतीचा हेतु हा होता कीं दक्षणचा सुभा आपले कब्जांत राहावा. किंबहुना पुढें मागें सर्व दक्षण आपले अमलांत यावी.

खानेंही रोजियांहून कूच करून पुढें आले. बातमी राऊत घेऊन आले. आम्ही तेच क्षणा कूच करून,सामाने बांधून खानासंनिध आलों. त्यांस आम्हांस अंतर दो कोसाचें राहिलें.तेव्हां खानांनीं सांगून पाठविलें कीं, " आज तुम्हीं मुक्काम करणें, आम्हीही मुक्काम करतों. तदोत्तर तह झाला तर उत्तम. नाहीं तरि दुतर्फा ही तयारीच आहे " म्हणोन त्याजवरून मुक्काम केला. रा॥ बजाजी माधवराव व विठ्ठल सुंदर सादतखानाचे दिवाण आम्हांकडे आले. आम्ही आपले मुद्दे त्यास सांगितले. ते त्यांनीं खानास जाऊन सांगितले. खान म्हणाले हे मुद्दे आम्हांस मान्य होत नाहींत. तेव्हां आम्ही तुटती गोष्ट सांगितली. तुटतेंसें देखोन त्यांनीं मुद्दे मान्य केले. त्यांच्या आमच्या भेटी जाहल्या. परस्परें वस्त्रें घोडे दिल्हे. म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास तुम्ही हिंमत धरून फार शिकस्त केली. शाबास ! तुम्हीं केलें तें बहुत बहुत उत्तम केलें. रंगाच्या[३] मोटा बहुत बांधाव्या ऐसें नाहीं अतःपर तुम्ही न वोढणें. केलें तें सुरळीत करून तुम्हीं येणें. खान स्नेहावर, अंतीं मुस्तकीम म्हणोनच हे गोष्ट रफेदफे जाहली. अन्यथा अन्यत्रापासून होणें दूर. नाहक कलहास कारण जाहलें होतें. जुज मुकदमियावरून दीर्घ कलह प्राप्त होता. वारापाणी जहालें व तुम्ही दम धरून केलें बहुत बरें केलें. अतःपर तुम्ही सुरळीत करून येणें. मजकुराचे रजबदलींमध्यें खानाची मर्जी तोडून थोडक्या मुद्यासाठीं नाखुश न करणें. त्यांची मर्यादा व स्नेहाची रीत बहुत संरक्षण करणें. जाणिजे. छ ४ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले. १०१ [३८४]

श. १६७४ ज्येष्ठ व. ७ ता॥ २४-५-१७५२

श्रीशंकर

पु॥ राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि

स्नेहा॥ रघुनाथ बाजीराव आशीर्वाद उपरि. तिकडील वर्तमान आठा पंधरा दिवसांआड काशीदजोडी रवाना करीत जावी तें कांहींच लिहीत नाहीं. अपूर्व आहे. दिल्लीकडील व पठाणाकडील काय वर्तमान, तुम्ही कोणत्या मनसुब्याचा डौल धरिला आहे, तो सविस्तर लिहिणें. हिकडील विशेष वर्तमान तर ×रामदासपंतास देवआज्ञा जहाली. सलाबतजंग पंच-

---

१. सैदलष्करखान हैदराबादकर.

२. रोजें-औरंगाबादेनजीक.

३. रंगाच्या मोटा बांधणें=आब राखणें, प्रतिष्ठा राखणें, (सर्वकाळ) कलावर गोष्ट घेणें. हें पत्र वांचून बापूजी बाजीराव डोंगराएवढा झाला असेल ! सैदलष्करखान सन १७५२-५३ मध्यें कामावर असून सन १७५४ चे आरंभीं तो कारभारावरून निघाला. सन १७५३ मध्यें त्याचें पेशव्याशीं वांकडें नव्हतें. सन १७५३-५४ या दोनहीं सालीं जमादिलावलांत पेशवा कर्नाटकांत होता. × ता. ७ एप्रिल १७५२ रोजीं.

महालांत बेदराजवळ आहेत. सैद लष्करखानास बलावणें आलें होतें. ते शहराहून निघोन गेले. सांप्रत याजवरच भार आहे. आईसाहेबांची अद्याप पुर्ती निखालसता जहाली नाहीं. दरबारीं चार लुचे मिळोन आम्हांविशींचा संदेह घालितात. दादोबा प्रतिनिधी सावनूरच्या मोगलापासून खंडणी घ्यावयास गेले होते. त्याजवरून त्यांचे मदतीस नारायणराव व्यंकटेस घोरपडे यांस रवाना केलें. प्रयोजन कीं, मोगलासही चार गोष्टी सांगोन दादोबास तोंडघशीं पाडावें. ऐसियाशीं सावनूरकर मोंगल त्याचा बक्षी बाहेर निघोन यांस पिटोन घातलें. तूर्त दादोबाचा आमचा थोडासा स्नेहही आहे. आम्हीच सावनूरच्या मोंगलास सांगून व आपली फौज दुतर्फा डौल दाखवून फशीं पाडलें, हें अद्याप दादोबास ठाऊक नाहीं. वरकड किरकोळी वर्तमान विशेष नाहीं. आपलेकडील वर्तमान वरचेवर लिहीत जाणें, त्यासारखी अगोदर तर्तूद करून मनसबा करूं. कागद आमचे कोणास दाखवीत न जाणें. छ २० रजब बहुत काय लिहिणें. लेखनसीमा. पैा छ १८ साबान.

ले. १०२ [३९६]

श. १६७४ ज्ये. व. १४ ता ३१-५-१७५२

॥ श्री ॥

पुरवणी राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसावी यांसि

उपरि गाजुदीखान यांस दक्षणेस यावयाचा हुकूम जहाला. तयारी होणें तीं होत आहे. येविशींची सलाह पुष्टता देऊन येथून पत्रें पाठविलीं असत. त्याजकडील हि संदर्भ आहे. त्यास आम्ही पठाणाचे मसलतीस गुंतलों अहों. बहुतेक कामें आपले मतलब मवाफीक जहालीं. अवशिष्ट राहिलीं तीं थोडकेच दिवसांत होतील. येथील गुंता उरकून गाजुदीखान याजकडील संदर्भ दृढोत्तर करून त्याचें आगमन दक्षणेस होय तें करूं म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास एतद्विषयीं विस्तारें आलाहिदा लिहिलें आहे. जेणेंकरून त्यांसि अथवा यांसि बेमानी पदरीं न येतां कार्य होय तें करावें लागेल. सलाबतजंग आमचें ऐकेनात. तेव्हां तें जरूर केलें पाहिजे. नाहीं तर ते आमचे भरंवाशियावर राहिलें, आम्ही गाजुदीखान तुम्हांकडून आणून त्याचें घर बुडविलें म्हणजे फिरोन आमचा भरंवसा कोणी धरूं नये, ऐसें होणार. यास्तव आधीं यासि बोलावें, कार्य न होय तेव्हां बोलून चालूनच गाजुदीखानास आणावें. या डौलानें आपण करावें म्हणजे कार्यही आहे व लौकिकही उत्तम. याखेरीज प्रकार जहाल्या युक्त नाहीं. छ २७ रजब बहुत काय लिहिणें. पै॥ छ ४ रमजान लेखनसीमा.

× हे पंचमहाल कोणते ?

१ आईसाहेब=ताराबाई साहेब.

ले. १०३ [३८३] श. १६७४ आषाढ व. ३ ता १८-७-१७५२

॥ श्री ॥

राजश्री जयापा शिंदे गोसावी यांसि

आशीर्वाद उपरि. आलिकडे तुमचें वेगळें पत्र येत नाहीं. ऐसें नसावें. तुम्ही गाजुदीखानासह ग्वालेरास आलेस यास्तव बाहेर आषाढ शुद्ध त्रयोदशीस बाहेर निघालों. फौज बलावूं पाठवली. पाऊस फार, नद्यांस पाणी फार, याजमुळें कांहीं दिवस फौज जमा व्हावयास लागतील. गाजुदीखानांनीं पैक्याकडे न पहातां फौज ठेवावी हेंच उत्तम आहे. सलाबतजंगापाशीं फिरंगी यांनीं आव फार धरिला आहे. पहावें कितीक जमतात. तुम्हीं आपले कर्तब्याचें वर्तमान लिहिणें. मल्हारबा तुम्ही निखालस राहून जो आमचा मनोदय आहे तो करावा. याच गोष्टीवर सिद्ध असावें. येथील वर्तमान तर ताराबाईकडील ठीक नाहीं. दमाजी गाइकवाड बहुत सुरळीतपणें आहेत. महादोबास समजावून आणिलें. त्यांनीं आमचे मनास अनकूल चालावें, दुराग्रह तिलमात्र कोणेविशीं न करावा, आम्ही सर्व प्रकारें त्यावर कृपा करून त्याचे स्वरूपाप्रमाणें चाकरी घ्यावी. गुजा ही याच प्रकारें करार होऊन बराबर नेलें. परंतु नीट चाललें नाहीं. यंदा विचारावर आले आहेतसें दिसतें. परिणाम ईश्वर उत्तम लावू. वरकड अर्थ श्रीकृपेनें भेट सत्वरच होईल. सविस्तर कळेल. सर्व विशीं भरंवसा तुमचा आहे. विस्तार काय लिहिणें. छ१७ रमजान हे आशीर्वाद. पैा छ ३० रमजान

ले. १०४ [१६८] श. १६७४आषाढ व. ५ ता २०-७-१७५२

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशीं.

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम तागाईत आषाढ वद्य पंचमीपर्यंत यथास्थित असे. विशेष आषाढ शुद्ध पौर्णिमा मंगळवारचें पत्र पाठविलें तें वद्य चतुर्थीस पावलें. लिहिलें वृत्त सायंत कळलें. दरगाह कुलीखान यांस पत्र लिहून पाठविण्याचा मजकूर व यांचेविशीं गाजुदीखान याचें पत्र दरगाह कुलीखान यास आणवावयाचा मजकूर लिहिला तो सायंत कळला. त्याजवरून दरगाह कुलीखान यास पत्र लिहून पाठविलें आहे. हें त्यास प्रविष्ट करणें; व यांचेविशीं राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे यांस पत्र लिहून पाठविलें आहे, व गाजुदीखान यास पत्र लिहून पाठविलें आहे. तेथूनही पत्र येईल. सारांश औरंगाबादेस खुदाबतखान व शेख अलीखान जुनदी [?] व जमीलबेगखान व अस्सलखान व हशमदुल्लाखान वगैरे आहेत, त्यांशीं सर्वांशीं राजकारणें करून गाजुदीखान बऱ्हाणपुरास येतांच साऱ्या शहरामध्यें गाजुदीखान यांची द्वाही फिर-

वावी आणि सर्वांनीं गाजुदीखान याजकडे राजकारण लाऊन सामील व्हावें. याप्रमाणें विचारणा होय तें करावें. दरगाह कुलीखान तुम्हांशीं बोलले त्याप्रमाणें त्यांचीं निष्ठेचीं पत्रें आमचे नांवें व फेरोजजंगाचें नांव घेऊन पावून देणें. परभारें हि पत्रें पाठवीत जाणें. वरकड, प्रस्तुत बाहेर निघालों. लोक जमा होत आहेत. आठ दहा रोजांत भीमा पार होऊं. मराठियाशीं जाबसाल आहेच. पहिलें पहिलें लिहून पाठविलें त्याप्रमाणें खानास वरचेवर लिहून तेथून हरएक बाबांनीं भोजन घेत व तेथेंही सर्व सूत्रें गाजुदीखानाकडे अनुकूल पडत अशीं करावीं. याप्रमाणें लिहून उत्तर आणवावें. ता॥ छ २० रजमान बहुत काय लिहणें लोभ असों दीजे हे विनंति. ×

ले. १०५ [८] | श. १६७४ आषाढ व. १० ता. २५-७-१७५२

॥ श्री ॥

पौ॥ आषाढ वद्य ३० बुधवार शके १६७४.

× वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दिक्षीत स्वामींचे सेवेशीं.

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम ता॥ छ २४ रमजान पावेतों यथास्थित असे विशेष. आपण आषाढ व॥ ५ रविवारचीं पत्रें पाठविलीं तीं दशमीस शुक्रवारीं पावलीं. वृत्त सायंत कळलें. सय्यद लष्करखान याचे कबिल्याचा मजकूर लिहिला तो कळला. ऐसियास सय्यद लष्करखान सलाबतजंग याजपासून निरोप घेऊन आमचे भेटीस येत आहेत. तरी शहराकडे न जातां आमचे भेटीस आले तर उत्तम आहे. कदाचित् त्यांणीं आपले चित्तामध्यें आणिलें असेल कीं, मराठे सरदार आहेत, त्यांस आपण समागमें घेऊन शहरास जाऊन शहरचा बंदोबस्त करूं. असें म्हणतील तरी आम्ही या प्रमाणें त्यांस करूं देणार नाहीं, व शहरास ही जाऊं देणार नाहीं. ते परभारें उपद्व्याप करून शहरास गेले म्हणजे त्यांचे कबिल्यास काय चिंता आहे ? सुखरूप शहरामध्यें असावें. नाहीं तर त्याचें आमचें सौरस्य व घरोबा आहे त्या रीतीनें म्हटलें तर त्यांचे कबिले ठेवावयास एखादें मातबर स्थल देऊन ठेऊं. चिंता काय आहे ? गुदस्तां सैय्यद लष्करखान त्याचे चित्तामध्यें रामदासपंताचे वर्तणुकेंकरून विपर्यास होताच. परंतु यंदा रामदासपंत वारलियावर सलाबतजंग याचा पक्ष धरिला आहे; तरि तुम्ही सय्यद लष्करखान याजला बहुत प्रकारें लिहून पाठवून तो ग्याजुदीखान याजकडे संदर्भ लावीत, आमचे विचाराप्रमाणें वर्तत, ते गोष्ट करणें. ये समयीं खानांनीं आमचे विचारें न वर्तल्यास तिलमात्र आमचा व खानाचा स्नेह राहत नाहीं, असा भाव तुम्ही दाखविणें. खान हजारदां आम्हांशीं ग्याजुद्दी-

---

× गाजुद्दीखान ता॥ १६-१०-१७५२ रोजीं विषप्रयोगानें मरण पावला. त्याच्या हयातींतील पत्र. या पत्रावर पूर्वी पैवस्ती तारीख आषाढ शु ६ सोमवार शके १६७६ अशी होती ती चुकीची असल्यानें गाळली आहे.

खानाचा प्रकार बोलले असतां रामदासपंत मेले म्हणून आयते वेळेस फिरले, तर हें कसें कामास येईल ? यांचा स्नेह परलोकीं कामाचा नाहीं हें विनंति. ×

ले. १०६ [७] { श. १६७४ आषाढ व. १० ता॥ २५-७-१७५२

श्री.

पौ॥ आषाढ वद्य ३० बुधवार शके १६७४.

पु॥ वेदशास्त्रसंपन्न राजश्री **वासुदेव दीक्षित** स्वामींचे सेवेशीं.

विनंति. **गा**जुदीखान छ ११ रमजानीं **नर्म**दा उतरून आलीकडे आले, म्हणून पत्रें आलीं, म्हणून लिहिलें तें कळलें. पुढें वर्तमान आणखी येत जाईल तें वरचेवर लिहून पाठवीत जावें. **भा**गानगराकडील वर्तमान लिहिलें तें सांयंत कळलें. आपले विद्यमानें **गा**जुदीनखान याजला स्नेहाचा संदर्भ लावून **भा**गानगर[1] प्रांत आपणाकडे करून घ्यावा. मक्ता झाला तर करून देतील त्याप्रमाणें वर्षास देत जाऊं. या प्रमाणें पत्रें आलीं म्हणून लिहिलें तें कळलें. ऐसियास **सय्यद** लष्करखान आमचे भेटीस **स**लाबतजंग याजपासून रुसकत[2] होऊन येत आहेत. ते येथें आलियावरी त्यांची आमची भेटी जाहलियावरी जो विचार होणें तो होईल. **दर**गाहाकुलीखान याजविशीं आपणांस पत्र लिहिलें आहे त्याप्रमाणें पत्रें अगत्य पाठवून द्यावीं म्हणून लिहिलें; तर येविशींचें उत्तर पूर्वीच आपल्यास लिहून पाठविलें आहे, त्याजवरून कळलेंच असेल. आपण लिहिला अर्थ तहकीक करून मागितल्याबद्दल मग सरदारांस लिहून याचा विचार करूं. आम्ही तो सर्वत्र ऐकतों कीं **फिरंगी**[3] व खान मिळोन फार जुझावयाच्या गप्पा मारतात. त्यास पुर्ता शोध करून जरूर लिहिणें.जरूर गुप्त रितीनें राजकारण शोध जरूर करून अती त्वरेनें लिहीत असावें. बहुत काय लिहिणें हे विनंति.

ले. १०७ [१३] { श. १६७४ आषाढ व. १३ ता॥ २७-७-१७५२

॥ श्री ॥

वेदशास्त्र-संपन्न राजश्री **वा**सुदेव **दी**क्षित स्वामींचे सेवेशीः—

विद्यार्थी **बा**ळाजी **बा**जीराऊ प्रधान कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम ता॥ आषाड वद्य १३ पावेतों यथास्थित असे विशेष-आपण पत्र पाठविलें तें पावलें. **दर**गाह **कु**लीखान याजविशीं कित्येक प्रकार लिहिले व **गा**जुदीखान व राजश्री **मल्हार**राव **होळ**कर व राजश्री **ज**याजी **शिं**दे यांस पत्रें लिहून पाठवावीं म्हणून लिहिलें; तरि येविशीं पूर्वी

× पत्र या पत्राची पुरवणी आहे.

१. भागानगर=हैदराबाद. २. निरोप घेऊन, निरोपाचीं वस्त्रें मिळून. ३. बुशी फरांशीस.

आपण पत्र लिहून पाठविलें होतें त्यावरून पूर्वीच पत्रें लेहून पाठविलीं आहेत. तुम्हींही गुप्त प्रकारें सरदारांस पत्र लिहिणें. जे जे ये समयीं चाकरी करून दाखवितील त्यांचें बरेंच होईल यांत संशय × नाहीं. आपण याचअन्वयें निशा करावी. भागानगराकडील आपण वर्तमान लिहिलें. पुढेंही जरूर तिकडील अंतर्बाह्य ठिकाणीं लक्ष्य ठेवून त्वरेनें पावते करावें. हे दिवस कामाचे फार आहेत व नर्मदा गाजुद्दीखान उतरले किंवा नाहीं, हेंही जलद लिहावें. कोण इकडे तिकडे हें मनास आणून लिहीत असावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पौ श्रावण शुद्ध १ शके १६७४.

ले. १०८ [५] | श. १६७४ श्रावण शु. २ ता ३१-७-१७५२

॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री—भाऊसाहेब स्वामींचे सेवेशीं

विनंती सेवक जयाजी शिंदे कृतानेक विज्ञापना येथील वर्तमान त॥ छ १ सवाल पावेतों मुक्काम नजीक सिपाबरड स्वामींचे कृपावलोकनें कडून यथास्थित असे विशेष. मजल दरमजल रेवापार आलियाचें वृत्त पूर्वी विनंतीपत्रीं सेवेशीं लिहिलें आहे, त्याजवरून विदीत जालेंच असेल. स्वामींचे आज्ञेप्रो जलदीनें येऊन पोहोंचावें,परंतु पर्जन्याचे अतिवृष्टीमुळें जागां जागां गुंता होत गेला. हल्लीं कांहींशीं उघाडी जाल्यावर तिन्हीं लष्करें वार * उतरलों. प्रस्तुत पर्जन्यही थोडका आहे. याउपर जलदीनें चार पांच रोजीं ब्रह्माणपुरास दाखल होतों. ब्रह्माणपुरचा बंदोबस्त होऊन येईल तदनुसार मागाहून सविस्तरें सेवेशीं लिहून पाठऊं. वरकड निराळें पुरवणी पत्रीं सेवेशी लिहिलें आहे, त्याजवरून निवेदन होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. १०९ [८५] | श. १६७४ श्रावण शु. ११ ता ९-८-१७५२

॥ श्री मोरया ॥

छ २६ सवाल.

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामींचे सेवेसि—

विनंती सेवक मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे कृतानेक विज्ञापना स्वामींचे कृपाव-

---

× निजामउल्मुल्काचा ज्येष्ठ पुत्र जो ग्याजुद्दीखान यास हैदराबादचीं गादी मिळवून देण्याच्या मसलतीस अनुलक्षून हें पत्र आहे.

* लष्करें=ग्याजुद्दीनखां, निजाम उल्मुल्काचा वडील मुलगा, यास हैदराबादचा सुभा बनविण्याकरितां शिंदे होळकर घेऊन दक्षिणेंत येत होते त्या वेळचें हें पत्र आहे. तीन लष्करें शिंदे, होळकर व खुद्द ग्याजुद्दिन यांचीं. वार=पार असावें.

लोकनें करून ताा छ १० शवाल रेवातीरीं यथास्थित असे विशेष. स्वामींकडून आज्ञा पत्रें सादर जालीं त्याजवरून लेखनार्थ सविस्तर कळला. उत्तरें निराळे पुरवणी पत्रीं सेवेशीं लिहिलीं आहेत त्यांजवरून सविस्तर निवेदन होईल. आम्ही व नबाब × निजाममुलक सद्यवर्तमान नर्मदातीरास येऊन पोंहोचलों. या उपर सारें लष्कर लौकरच पार उतरोन येत असों. स्वामींनीं तिकडून फौज जमा करवून पुण्याहून कूच करून आलीकडे अविलंबें आलें पाहिजे. आम्ही ब्रन्हाणपूरचा बंदोबस्त करून येतों. मग पुढील बंदोबस्त होणें तो उत्तमच होऊन येईल. स्वामींच्या विचारानुरूप साऱ्या गोष्टी होतील. वरचेवर आज्ञापत्रें सादर केलीं पाहिजेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ती

ले. ११० } { श. १६७४ भाद्रपद व.१४
[३८९] } { ताा ६-१०-१७५२

श्री.

पु।। राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसावी यांसी.

उपरि राजश्री रामचंद्र जाधवराव यांसमागमें सरदार मनसबदार आहेत त्यांस नबाबाचे इजायेतनामे यावे म्हणोन माानिलेनीं लिहिले आहेत. सरदारः—

१ मालोजीराजे घोरपडे मुधोळकर.
१. भालेराव पांढरे व गुरुवक्ष पांढरे.
१. मनप्या नाईक व किलीच नाईक जमीदार देवदुर्ग.
१. रायाजी भोंसले.
१. आनंदराव जमीदार पो। कमरनगर ऊर्फ कर्नोल.
१. गिरजोजी हांके.
१. शंकरंमा जमीदार पो। अंदोल.
१. भूपाळराव निंबाळकर.
१. कृष्णाजी नाईक निंबाळकर.
१. मकरंदसिंग नाईक निंबाळकर.
१. पामनाईक बहिरी जमीदार पो। वागनगिरा वगैरे.
१. लक्षमकाजे व जेमकरंडी जमीदार पो। कानकूर्ती.
१. रामराव जामीदार गदवाल.
१. अगाजी सलगर.
१. राजे अजेचंद खंदारकर.
१. महीपतराव निंबाळकर.
१. येशवंतराव निंबाळकर.

येणेंप्रमाणें सरदारांस इजायतनामे पाठविणें कीं, राजे रामचंद्र जाधवराव यांस इजायेतनामा पाठविला आहे तरि तुम्ही त्याजपाशीं येऊन त्याचे हमराहा मुलाजमत करणें म्हणोन इजायेतनामे नबाबाचे पाठवणें. छ २७ जिलकाद बहुत काय लिहिणें. लेखनसीमा.

× हा निजामउल्मुल्क याचा बडील मुलगा ग्याजुद्दीन होय, मागें ले. १०८ पहा.

ले. १११ }
[३९५] }

{ श. १६७४ आश्विन शु. ८
{ ता॥ १५-१०-१७५२

॥ श्रीशंकर ॥ (गंगा)

राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि.

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—स्नेा॥ हणमंतराऊ निंबाळकर. राम राम विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशळ लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. सांप्रत वर्तमान ऐकिलें कीं + + + श्री उतरोन आलीकडे राक्षसभुवनापाशीं आले. गांवगन्ना चिळ्या, घासदाणियाच्या जाल्या व तमाम जिराईत सजगुरे वैगरे कापून घोडियांशीं नेतात. पलीकडे लष्कर होतें तेव्हांही अगदीं थडीचे गांव लष्करचे मुक्कामाखालें उठले. जिराईत गेलें. सांप्रत आलीकडेही ऐसेंच होत आहे.त्यासि बीड प्रगणा आमची जागीर,ते आपली आहे.दुसरा अर्थ आहे ऐसें नाहीं. गांवचे गांव उठले. व जिराईतही कापून नेतात ऐसें जालें. तेव्हां सर्वस्वें नुकसानी आहे. याजकरितां हें पत्र आपणांस लिहिलें आहे. व राजश्री केदारजी लेहणे

श्री शिवचरणीं तत्पर बापूजी सुत हणमंतराव निंबाळकर

पाठविले आहेत, हे कितेक अर्थ सांगतील, त्यावरोन कळों येईल. तरि चित्तावर धरून गांवगन्ना चिळ्या केल्या असतील त्या मन[1] कराव्या व लष्करांत ताकीद करून जिराईत, जोरी, बाजरी कोणी कापून न नेत ऐशी गोष्टी करून मुलकाचें संरक्षण होय, कोठें आजार न लागे तें केलें पाहिजे. आपला आमचा स्नेह आहे म्हणून लिहिलें असे. रा॥ छ ७ जिल्हेज बहुत काय लिहिणें × × × आमचा मुलूख खराब जालियानें आपणासही समाधान आहे ऐसें कांहीं नाहीं. जागीर तुमचीच आहे. आणि सर्वस्वें आपले स्नेहाची जोडी आहे. तरि चित्तीं धरून मुलकाचें संरक्षण केलें पाहिजे. कृपा असों दीजे हे विनंती. मोर्तबसूद.

ले.११२ }
[३६७] }

{ श. १६७४ आश्विन शु. १४
{ ता॥ २२-१०-१७५२

पौ॥ छ २९ रविलोवल रविवार. ॥ श्री ॥

राजश्री दत्ताजी शिंदे गोसावी यांसि.

छ सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्ये स्नेा॥ रघुनाथ बाजीराव आशीर्वाद उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय लिहीत असलें पाहिजे. विशेष. अबदाली पठाण याची[2] आमद आमद गरम आहे. त्यास तों आला नाहीं तों आपण भारी होऊन

---

२ आमद आमद गरम आहे=तो जलद चालणारा आहे.

रहावें म्हणजे उत्तम. तरि तुम्ही जलदीनें येणें. ऐशीं पत्रें पेशजीं लिहिलींच आहेत. त्याजवरून तुम्हीं यावयाची तर्तूद केलीच असेल व हल्लींही लिहिलें असे. तरि याजउपरी तुम्ही जलदी करून लांब लांब मजली करून बहुतच त्वरेनें येणें. रा॥ छ १४ जिल्हेज.

ले. ११३ [१०२] श. १६७४ मार्गशीर्ष शु. ४ ता १०-१२-१७५२

॥ श्री ॥

राजश्री बाळाजी पंडित प्रधान दाजी गोसावी यांसि—

छ सकळगुणाळंकरण अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य-स्नेा मानाजी आंगरे बजारतमाब रामराम विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. आपणाकडून राजश्री अंताजी बाबाजी पत्रें घेऊन आले. आपले सांगितल्याचा अर्थ निवेदन केला. स्वहस्ताक्षरें लेखनान्वय श्रवण करून घेतला. नंतर विश्वासपूर्वक स्वस्थ असतां रेवदंडे यांत येऊन कर्म आचरलें तो वृत्तांत व चिरंजीव राघोजी आंगरे आपलें आश्वासेन व मागाहून राजश्री सांबाजी प्रभु तदुत्तर अंताजी बावाजी संपादोन आलियाचें संतोषवृत्त लेहून पत्रें पाठविलीं तीं हुसेनखान मिरधे घेऊन आपणाजवळ जाऊन, पावलींच असतील. आपले विश्वासवचनावरि सर्व खेद परिमार्जनांत आणोन, समजोन आपले कृपेची अभिवृद्धि निशापूर्वक करून घेत जावी, याच कृतसंकल्पावरि आपणाकडील सौख्याचे विभागाची सध्या प्रतिक्षा न करितां आजि समयीं मोंगलाचे शहाकरितां आपली स्वारी जहालियामुळें इकडील मामले याविशीं आम्हांस कितेक प्रकारें सुचविलें तें स्वहितास उचितांत म्हणोन, अस्मतभागी शत्रुवर्ग प्रसिद्धपणांत आहेत त्यांत फिरंगी याची आवाई दिवसेंदिवस येत चालली. निमित्य अगोदर सावध असावें म्हणोन आरमारच्या तयारीनिशीं बातमींत राहिले. याचें वृत्त साकल्य लेहून गेलेंच असे. आम [चे] कडेस फिरंगी याचें वृत्त आलें, प्रमाण अप्रमाण असो. म्हणून खांसाच आरमारावरि चढोन बाहेर स्वारी केली. अगोदर कळतां रेवदंडे यांत राजश्री नारायण खंडो कारकून इतबारी जाणून सुचनेस पाठविले. खांसा आम्हींच आरमारावरि गेलों. फिरंगी कदाचित् आमचे [?] तरि सर्व मामलेदारी आमचे युक्तीस मिळोन एकत्र विचारांत येऊन शत्रूस पराभवांत आणावें याच्याही युक्ति योजोन ठोविल्याच होत्या कीं, जलमार्ग आरमाराच्या जोऱ्यानें आगमन होतां त्यास प्रति मप्यता [बंध्यता ?] न जहाल्यानें सर्व साहित्यानशीं खुषकीस जातां त्यास गुंता पडणार नाहीं. याजकरितां वसै, साष्टी, रेवदंडे देखील आरमार एकत्र करून फिरंगी आल्यानंतर कावे, दावे, खेळोन मुकाबल्यास प्रतिमल राहून आंगावरि ओढोन संपूर्ण दर्यातच वेध ओढोन घ्यावा. समयीं फिरंगी तडीस लागों जातो. आम्ही पाठीवरी जातांच क्षणीं तडीस उतरावयाचें अवसान सहजांतच खता पाऊन आमचे मुकाबलेयास येईल. आलियावरि आम्ही बाहेर पडत आलियावरि तोही येतच जाईल. ऐसें ही असोन रेटाई करून तडीस सामान सुद्धां उतरावयासि

१ याचा संबंध याच ओळींतील ' संपादोन ' ह्याकडे आहे. २ मागील ले. ३९ पहा.

लागलाच तरि त्याचे आरमारांत मुख्य जोरा थोरले तरांडियाचा; ती तरांडी तडीस जाणेंच नाहींत. लहाना तरांडियांवरून तडीस जावयाचा संबंध पडोन जाईल तेव्हां जुंजारू लोक सामान देखील तडीस उतरावायावरि तरांडी सहजांतच खालीं पडो पहातील. त्यांजवरि आपले आरमाराची नेहटबाजी, व खुषकीस उतरूं लागतील त्याजवरि खुषकीचे लोकांची नेटबाजी, ऐसा एकावर्च्छेदंकडून येलगार करावाच करावा. ऐसा व आणखीही विचार समयीं सुचेल त्याप्रों सर्व एकरूपतेनें व आरमार एकत्र होऊन कर्तव्यांत आणावें. याचे विचारें-करून बाहेर स्वारी केली. लहान थोर मिळून साठ शिलशिला आरमाराचा फिरता ठेविला. ऐसें केलें असतां राजश्री रामाजी महादेव पराक्रमी विश्वासघातकी निर्माण आहेत. दुसरे नारो त्रिंबक तळेकर, रामाजी महादेव यांचे साम्यतेस होऊन किल्ले सागरगडीं कार्तिक वद्य द्वितीया गुरुवारीं पहाटेस बारा पंधराशें लोकांनिशीं शिड्या घेऊन बजरटोंक म्हणोन दक्षणभागीं असे तेथें जाऊन शिड्या लाविल्या. किल्ल्यांची चौकशी आहे तैशीच होती. त्यांणीं शिड्या लोटिल्या. दगडी घालितां अवसान खचता होऊन श्यामवदन केलें. मोड जाहला. परकीयाकडील *असते तरि मोडाचे पाइकावरि स्वारी गेलियास जाऊं पावते ऐसें नाहीं. तत्राप आचरणाप्रमाणें पारिपत्य करावें तरि ते करणार, आचरणार लघुकर्म आचरोन गेले. परंतु मोड पाहून मारिले, धरिले तरि तोही लौकिक या समयांत पराकियांत उत्तम नाहीं. हेंचविशीं कळंक. अगोदर सर्वांस ताकीद आहेच कीं, सावध राहून रक्षावें. बुद्धिपुरःसर क्षितीस पाठीवरि न जावें. तदनुरूपच वर्तणूक होऊन सात शिडिया सोडविल्या. शिडिया लावितां बकरे मारिले तेही सांपडले. तळेकर लोक फिरून जातां रेवदंडे समीप पल्ला पाहून रेवदंडां गेले. तेथून तळेंयास गेले. याप्रों मामलेदाराचें आचरण आणि आपले तो विश्वासपूर्वक आश्वासन आणि परिणाम या प्रकारें. तेव्हां काय करावें ? आपले विश्वासवचनावरून आम्हीं स्वस्थ, यामुळें कपटियास भास होतो कीं, विश्वासास प्रवर्तले आहेत, यांतच संध असे. ऐसें समजोन माणिकपुरास दगा दिल्हा. हल्लीं आपले कृपेची निखालसता सर्वत्रांस कळल्याप्रमाणेंच किल्याचेही लोक विश्वास मानोन वर्तत असत तरि सध्यां दगाबाजी जहालीच होती कीं नाहीं. अनभवास येत गेल्याप्रमाणें साकल्य त्याहावें लागतें. लिहितां तपशील सुद्धां लांबतो, परंतु लंबायमान मजकूर पाहून समयीं श्रवण करून घ्यावयाचा अनादर केला तरि तोही खेदच म्हणावा. असो, आमचा एक निश्चय कीं, आपले ऐसें म्हणून आहों. त्यास अंतर नाहीं. अतःपर आपले विचारास येईल तदनुरूप उपद्रव कर्त्यांस जांजीत केलें तरी उत्तम, न केलें तरी उत्तम, आपला अवलंब समजोन मानानें आहोंच. घडलें वर्तमान साकल्य कळावें म्हणून लिहिलें असे. फिरंगी याचे आगमनानंतर युक्तिप्रयुक्तीची योजणूक आमची आम्हां जवळ राहिली असे. लिहिला पाल्हाळ एव्हां वृथा असे. समयीं घडेल तेव्हां खरें. आवाईप्रमाणें आगमन जहालें. आपले सामर्थ्यावरून निरंतर शोधांत आहोंच. वरकड ताजी आपले आम्ही म्हणवीत असतां आमचे पाठीं

* येथें शिक्का बाजूवर आहे.

एसा विचार उपद्रव असावा, परकियांत लौकिक आणिकासारिखा रुढीस यावा, हाच मात्र खेद वाटतो. बरें, याचें निराकरण करणार आपण आहेत. विस्तारें किती म्हणून ल्याहावें ? न ल्याहावें तर कोणास ल्याहावें ? यास्तव सविस्तर जाहलें वृत्त लिहिलें असे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे राा छ ३ माहे सफर हे विंनंती-(मोर्तबसूद.)

ले. ११४ [१४] | श. १६७४ पौष व. ७ तारा २५-१-१७५३

श्री

वेदशास्त्र-संपन्न राजश्री **वा**सुदेव **दी**क्षित स्वामींचे सेवेशीं:—

विद्यार्थी **बा**ळाजी **बा**जीराव **प्र**धान-साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागाईत पौष बहुल पंचमी गुरुवारपर्यंत स्वामींचे आशिर्वादें करून यथास्थित जाणोन स्वकीय लिहीत असलें पाहिजे. विशेष-आपणांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरि सविस्तर लिहीत जावें. इकडील वर्तमान तर **न**बाबांनीं **फिरंगी** याच्या विद्यमानें आम्हांशीं सल्ला केला. हें दुःख सर्वा अमिरांस होऊन बिघाड करावा हे इच्छा करितात. परंतु जीव कोणांत आहे ? सर्वही निर्मोल्य ? पदरचा पैका वेंचावा. जातीनें हिंमत धरून करावेंच करावें, हे गोष्ट कालेंकरून कोणांतही राहिली नाहीं. खान आदिकरून सर्व[3] * * **बा**बुजी **ना**ईक **सा**तारियास जाऊन आईसाहेबाचे विचारांत मिळाले. आमचा अपकर्ष इच्छितात, आमच्या सरदारांकडे येऊन, बुद्धिभेद करून त्यांस **सा**तारियास न्यावें, या विचारियास आले होते. परंतु सरदार गेले नाहींत. **ना**ईक माघारे गेले. असो. **ना**ईकांचेविशीं आमचे चित्तांत तो कांहीं नवतें. असो. त्याही होऊन गडबड मांडिली आहे. ते आपले कर्मानुरूप फळ पावतील. वरकड आईसाहेबांचा विचार तरि आमचे न्यून पहातात. सरदाराशीं भेदभाद करितात. **मो**गलाईत **रा**जकारणें करितात. कोणे प्रकारें आमचें वाईट व्हावें, या विचारांत आहेत. ईश्वरच आमच्या बऱ्यावर असल्यास त्यांणीं वाईट इच्छून होणें काय ? व वरकडांनीं पांचपेंच करून होणें काय ? चिरंजीव राा **दा**दास फौजेनिशीं गुजराथेस रवाना

---

१ नबाब=सलाबतजंग. २ फ्रेंच सरदार बुसी.

३ येथें मुळांत सुमारें दीड ओळ मजकुराची जागा कोरी टाकिलेली आहें.

४ बारामतीकर. हे पेशव्यांचे नातलग असून धनकोहि होते. बाजीराव मरण पावल्यावर बाबूजी नाइकास पेशवाई द्यावी अशी रघुजी भोसल्यानें शाहूच्या दरबारीं बरीच खटपट केली, परंतु ती सिद्धीस गेली नाहीं. तेव्हांपासून नाईक व भोंसला हे दोघे हि बाळाजीचा द्वेष विशेष करूं लागले.

५ आईसाहेब=ताराबाई. शाहू वारल्यानंतर हिचा नातू रामराजा सातारच्या गादीवर बसला. परंतु बाई मोठी खबरदार बायको असल्यामुळें स्वतः राज्यकारभार पहावा व पेशव्यांची सत्ता काढून टाकावी म्हणून तिनें बरीच धवलाधवळ केली. ह्या गोष्टीस उद्देशून वरील लेख आहे.

केलें ते गंगातीरांनींच गेले असतील. तिकडील मुलकांचा बंदोबस्त करून पुढें जातील. आम्ही हरपनहली समीप पावलों. श्रीरंगपट्टण, सौंदें, बिदनूर [हीं] स्थळें पैकियाचीं आहेत. एकाएकीं भलतीं गोष्ट आम्ही करीत नाहीं. कां कीं मागील पेंचपांच बहुत आहेत. मागील अर्थ पाहून जसजसा विचार करणें तसा करितों. आपले आशीरवादें करून सर्व शत्रु शमता पावोन जो लाभ होणें तो होईल. चिंता नाहीं. स्वामींनीं तिकडील वर्तमान निरंतर लिहीत जावें. यथार्थ वर्तमान व अति-विशेष अनहितकारी जें असेल तें जरूर ल्याहावें, व चिरंजीव दादासही ल्याहावें. सर्व स्वामींचे आशीरवादें नीटच होईल. आपणही तजविजीनें संभाळीत जावें. छ० १९ रबिलावल हे विनंती.

पौ माघ वद्य १३ शुक्रवार शके १६७४ अंगिरानामसंवत्सरे.

ले. ११५ [३८१] | श. १६७४ माघ शु. ३ ता॥ ६-२-१७५३

श्री

राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि.

आशीर्वाद उपरि. कित्येक बोलणें आहे. त्यास तुम्हीं भोजन करून लौकर येणें. रा छ २ रविलाखर. राजश्री रामाजी अनंत यांसि आधीं पुढें पाठवून देणें. मागाहून तुम्हीं बहुत लौकरीच येणें. जाणीजे. छे मजकूर. लेखनसीमा.

ले. ११६ [२८] | श. १६७४ फाल्गुन व. ८ ता॥ २७-३-१७५३

॥ श्री ॥

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशी—

विद्यार्थी रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. स्वामींनीं आशीर्वाद पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. लिहिला अर्थ सर्व कळला. तीर्थस्वरूप राजश्री नानासाहेबीं पत्रें आपणाकडे रवाना केलीं तें पण अजुरदार कासिदा हरी आम्हांकडे पाठविलीं तें पावोन लेखन अर्थ कळला. त्याचीं प्रत्योतरें लेहून पाठविलीं आहेत. तीर्थरूपांकडे रवाना करावीं. आपल्याकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावें. छ २१ जमादिलावल. बाबुजी :नाइकांकडील वर्तमान लिहिलें तें कळलें. सर्वदा वर्तमान लिहीत जावें. येथील वर्तमान तर अहमदाबाद झुजत आहे. आपल्या आशीर्वादें लौकरच येईल. हे विनंती. काशिदास कांहीं दिलें नाहीं हे विनंती.

पो छ १३ जमादिलाखर सन ११६२ चैत्र शु॥ १५ मंगळवार.

---

१ हें सर्व पत्र नानासाहेब पेशव्यांचे हातचें आहे.

ले. ११७ [३४०]

शा. १६७५ चैत्र व. १० ता॥ २८-४-१७५३

॥ श्री ॥ पै॥ छ २५ जमादिलाखर प्रहर दिवस.

राजश्री रामाजीपंत भाऊ गोसावी यांसि

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेा॥ जयाजी शिंदे दंडवत विनंती उपरि येथील स्वकीय कुशल जाणोन कुशल लेखन करणें. विशेष. राजश्री कुसाजी शिंदे* शिलेदार हुजुरात यांचे भाऊ गुणाजी शिंदे* व राजश्री वणगोजी निंबाळकर व आनंदराव निंबाळकर शिलेदार निा॥ तुकोजी शिंदे व बंदुभाई व मोहदीन ऐसे समागमें आले आहेत. यांचे हिशेब करून द्यावे लागतात. तर सदर्हू असाम्यांचे हिशेब दफ्तरचे लेहून पाठवावे म्हणजे समजावीस करून वाटे लावून देऊं. आम्ही आजच दोन प्रहरां श्रीगोंदेयास आलों. कळलें पाहिजे. छ २३ जमादिलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती.

श्री.
ज्योतीचरणी तत्पर
राणुजी सुत जयाजी
शिंदे निरंतर

मोर्तब
सूद

ले. ११८ [८९]

शा. १६७५ आश्विन शु. १० ता॥ ६-१०-१७५३

॥ श्री राम ॥

राजश्री बाळाजी पंडित प्रधान गोसावी यांसि—

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—स्ने॥ येशवंतराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. विशेष खासगत कोठींचे बैल सर २०० दोनशे येसाजी गव्हाणा याचे स्वाधीन करून सातारा मिरज प्रातें पाठविले आहेत. ये विशीं गोसावी यांनीं आपल्याकडील कमावीसदारास पत्रें देऊन सरसाल कोठीस हाशिलाचा उपसर्ग न होतां आमदरफ्त सुरळीत चाले ते गोष्टी केली पाहिजे जाणिजे. र॥ छ ८ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.×

श्री
श्री राजाशाहू स्वामी
छत्रपति येशवंतराव दाभाडे
सेनापति.
*

---

* कुसाजी व गुणाजी यांचीं नांवें साष्टीच्या बखरींत आलीं आहेत.

× यशवंतराव दाभाडे तारीख १८-५-१७५४ रोजीं निवर्तला त्यापूर्वीचें पत्र.

ले. ११९ } {श. १६७५ फाल्गुन वा। १२
[२७] } {ता। ३-६-१७५४

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशीः—

विद्यार्थी रघुनाथ बाजीराव नमस्कार. विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहित गेलें पाहिजे. विशेष. कलमें येणेप्रो—

कैलासवासी राव यांनीं कैलासवासी तीर्थरूप नाना दीक्षित यांस प्रांत मथुरा सुटल्यावर दाहा गांव देऊं केले आहेत× ते हल्लीं देवावे ह्मणोन तुम्ही विदित केलें. ऐशास तीर्थरूपांनीं थोरले दीक्षितांस लेहून दिल्हें आहे त्याप्रो प्रां। मथुरा हस्तगत जाल्यावर दाहा गांव नेमून देऊं.

प्रां। गुजराथ आपणाकडे जाली आहे. थोरले दीक्षितांचे दैवत श्रीकृष्ण द्वारका क्षेत्र आपणाकडे जालें आहे. तेथें शंभर ब्राह्मण भोजन नित्य घालावें ऐसें चित्तांत आहे. त्याचे खर्चास त्या प्रांतीं गांव नेमून द्यावें ह्मणोन तुम्हीं विदित केलें. ऐशास आह्मीं पुणेयास आलियावर पांच हाजारांचें गांव वसुली सरकारांतून नेमून देऊं.

येणेंप्रमाणें दोन कलमें करार केलीं असत. सदरहू प्रो होतील. रा। छ २५ जमादिलावल सुा। अर्बा खमसेन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

ले. १२० } {श. १६७६ ज्येष्ठ शु. १३
[१५] } {ता। ३-६-१७५४

श्री

वे। राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशी—

विद्यार्थी बाळाजी बाजीराऊ प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. आह्मीं करनाटक कचेश्वरीहून ज्येष्ठ शुद्ध १३ पुणियास आलों. आपण श्रीहून कधीं आला तें वर्तमान लिहिलें नाहीं. चिरंजीव राजश्री दादाकडील शहरीं व आपली बातमी काय आली असेल तीं व सलाबतजंग कोठें आहेत, कोणीकडे जाणार व दिल्लीकडील वर्तमान, येणेंप्रमाणें सविस्तर लिहून पाठवावीं. कृपा-पत्र न आलें असें नसावें हे विनंती.

पौ। ज्येष्ठ वद्य ७ बुधवार शके १६७६.

ले. १२१ } {श. १६७६ श्रावण शु॥ ११
[३७] } {ता। ३०-७-१७५४

॥ श्री ॥

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेवबावा दीक्षित स्वामींचे सेवेशीं सेवक रघोजी भोंसले

× मागें पृ. ४८ वर ले. २५ पहा.

सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल तागाईत श्रावण शुद्ध ११ पर्यंत स्वामींचे आशीर्वादें करून यथास्थित असे विशेष. स्वामींनीं राजश्री रामचंद्र बल्लाळ यांजबराबरि आशीर्वादपत्र व प्रसादवस्त्र पाठविलें तें मस्तकीं वंदून सनाथ जालों. याचप्रकारें निरंतर आशीर्वादपत्रीं संतोषवित जावें. यानंतर स्वामींचे सेवेशीं वस्त्रें पाठविलीं आहेत. बि॥

चांदणी तिवट पैठणी. चांदणी पैठणी सक [ला ?]

येकूण सनगें दोन व ब्राह्मण संतर्पणाकरितां दुबत्या म्हशी उत्तम ४ चार पाठविल्या आहेत. प्रविष्ट होतील. विदित व्हावें याजकरितां विनंती लिहिली असे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. १२२ [३२]

श. १६७६ श्रावण शु. १३ ता॥ १-८-१७५४

श्री

पै॰ भाद्रपद शु॰ १३ शुक्रवार शके १६७६.

वेदशास्त्रसंपन्न राजश्री दीक्षित बाबा स्वामींचे सेवेशीं

विद्यार्थी गणेश कृष्ण सां॥ नमस्कार. विनंती येथील कुशल ता॥ श्रावण शु॥ त्रयोदशी मुक्काम दिल्ली. स्वामींच्या आशीर्वादें सुखरूप असो विशेष स्वामींनीं पत्र पाठविलें तें पावून बहुत संतोष जाहला. लिहिला मजकूर सविस्तर कळला. याच प्रकारें सदैव पत्र [पाठवून] सांभाळ केला पाहिजे. आपण श्रीमंतास पत्रें पाठविलीं तीं प्रविष्ट करून जाब घेऊन पा॥ आहेत. दिल्लीचा पैका वसूल होत आहे. आठ दिवस तेथें राहणें होईल. तदनंतर जिकडे जाणें ते जातील. ×सार्वभौम नवे जुने जाहले, हें सर्व वर्तमान आपणांस कळलेंच असेल. कसबे सातारियाचे ताकीद-पत्रांविशीं लिहिलें तें कळलें. वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाळकृष्ण दीक्षित येथें आले आहेत. श्रीमंतांची भेट जाहली. वरकड मंडळींची भेट जाहली. त्यांणीं आणखी कितीएक मजकुराच्या यादी लिहिल्या आहेत, त्यांस हें कलम लिहा आहे. आपले आज्ञेप्रमाणें श्रीमंतांस विनंती व राजश्री मल्हारबाबा, राजश्री गंगोबा तात्या यांस सांगोन जें होईल तें करून घेऊन सेवेशीं लिहून पाठऊं छ १० रमजानीं जयाजी शिंदे मारवाडांत गेले. सरकारची फौज चार हजार बराबर दिली. तेही मारवाडची कार्यसिद्धी करतील. बहुत काय लिहिणें? कृपा केली पाहिजे हे विनंती.

---

१ रघोजी १४-२-१७५५ हा मरण पावला, त्यापूर्वीचें हें पत्र. २ श. १६७६ आषाढ शु॥ १३ (२-७-१७५४).

×सार्वभौम-दिल्लीचे बादशहा

ले. १२३ [३६०] {श. १६७६ भाद्रपद शु. १ ता ११-८-१७५४

श्री

राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ रघुनाथ बाजीराव आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहिजे. विशेष. सुरजमल जाट याजकडील मामलतींचा रुपया पहिले हपतियाचा येणें त्याजपैकीं रुपराम कटारा याणें येथें कांहीं वसूल दिला. बाकी बहुत राहिली आहे. त्याचा तगादा करितों. त्यास जयापाकडे कांहीं रुपाया आपण वसूल दिला आहे, ऐसें रूपराम सांगतो. त्यास तुम्हीं जाटाचे मामलतींपैकीं रुपाया काय वसूल घेतला आहे हें लेहून पाठवणें. जाणिजे छ २९ सवाल बहुत काय *लिहिणें

लेखन सीमा

ले. १२४ [३९८] {श. १६७६ भाद्रपद शु. २ ता २०-८-१७५४

श्री

राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि

उपरि तुम्ही पत्रें कृष्णगड फत्ते करून पाठविलीं ती पावोन सविस्तर अर्थ कळला. त्याजउपरि तुम्ही कोठें गेला, काय करितां, बिजेसिंगापाशीं जमियत काय आहे, पुढें जुंजावयाचा प्रकार कैसा, सफेजंगी बाहेर निघोन करणार किंवा मेडतेयांत राहोन जुंजणार, हा अर्थ तपशिलें लिहिणें. जाणिजे छ १ जिलकाद बहुत काय लिहिणें. लेखनसीमा.

ले. १२५ [३७६] {श. १६७६ भाद्रपद वद्य २ ता ३-९-१७५४

श्री

पुरवणी राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि

आशीर्वाद उपरि चिरंजीव राजश्री दादाजवळून तुम्ही निरोप घेऊन मारवाडप्रांतीं गेला. या वर्तमानाचीं पत्रें मात्र तुमचीं आलीं. त्या आलीकडे पुढें कोठ पावेतों गेलां, तिकडील मेडतेवाले वगैरे रजपूत यऊन तुम्हांस सामील किती जहाले, बिजेसिंगाजवळ फौज

---

*येथें बाजूवर बाळाजी बाजीराव यांचा शिक्का आहे.

१ मारवाडांत. २ मेडतें मारवाडांत जोधपुराजवळ. येथें मारवाडी रजपूत व मराठे यांचीं युद्धें पुनः पुनः झालीं आहेत.

तोफखाना किती जमा जहाला, वरकड राजे रजपूत बहुत व चांगले कोणीकडे सामील जहाले व होणार, फौज दोहींकडील किती आहे, दाणावैरण कशी मिळते, पर्जन्य कसा आहे, त्या प्रांतांत फौजेस मजलीनें पाणी मिळत नाहीं, सांप्रत पर्जन्यवृष्टि करून तों ओढे तळीं जहालीं असतील, हा सर्व विस्तारें अर्थ निरंतर लिहीत जाणें. मोठा मनसबा, मारवाडी रजपूत अद्याप गर्विष्ठ, इकडील फौजांच्या गांठी सावकाश पडून संग्रामी श्रमग्रस्त न जहाले. त्यांसि प्रसंग एकाएकीं तुम्हांवर प्राप्त जहाला आहे. त्यास तजविजीनें दमवून, युक्तीनें समय पाहून जरब देऊन स्वकार्यसिद्धी करावी. श्रीकृपेनें सरदारी व शिपायागिरी व दाब उपाय जाणणें सर्व गुण तुम्हांस आहेत. तदनुरूप साध्य असाध्य विचार करून कार्य करणें. जर जोधपूर निम्मे राज्य द्यावेसें विचार जहालिया उत्तम आहे. दाटून अगदीं घ्यावयासाठीं कलहवृद्धि न करावी. हा थोरांचा संप्रदाय आहे. जर युद्धावांचून साम न होयसेंच असलिया सावधतेनें आपले रीतीनें त्यास आयास आणून नम्र करून कार्य संपादावें. सत्वर कार्यसिद्धीचे वर्तमानाचें पत्र पाठवणें व विलंबावर पडलें तरि निरंतर सविस्तर अर्थ लिहीत जाणें. रा॥ छ १५ जिलकाद. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. लेखनसीमा.

ले. १२६ [३५७] श. १६७६ भाद्र. व. २ ता॥ ३-९-१७५४

श्री

राजश्री जयाजी शिंदे गोसांवी यांसि

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें विशेष. सांप्रत पंधरा दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. ऐसें निरंतर सविस्तर कुशळार्थ लिहीत जाणे. येथील अर्थ तरी फौजेची तयारी होत आहे. विजयादशमी नंतर स्वारी*साठीं बाहेर निघणें होईल. जिकडे कार्य विशेष दिसेल तिकडे श्रीकृपेनें जाणें होईल. जाणिजे. छ १५ जिलकाद बहुत काय लिहिणें लेखनसीमा. पो छ २५ जिल्हेज मुा नागोरा.

ले. १२७ [३८०] श. १६७६ भाद्र. व. २ ता॥ ३-९-१७५४

श्री

पुरवणी राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि

आशीर्वाद उपरि. गुदस्तां तुम्ही निरोप घेऊन गेलां तेव्हां कर्ज वारावयाचा निश्चय होता. तुम्ही ऐवज दिल्हा. तो कर्जदारांस दिल्हा. परंतु बाकी कर्ज बहुत होतें. जाटाचा मनसबा भारी पडून शेवटीं पैका न मिळाला. दिल्लींत मातबर ऐवज मिळावा ऐसें असतां घराऊ पेचापाचामुळें तेंही नीट न जहाले. मनांत होतें कीं, हिंदुस्थानांतून एकदांच चाळीस

---

* येथें बाजूवर बाळाजीबाजीरावांचा शिक्का आहे.

पन्नास लक्ष रुपये यावे. येतांच कर्ज वारावें. परंतु तो अर्थ न घडला. तुम्हीही अंगीकृत प्रतिज्ञेत पक्षासाठीं चिरंजीवांजवळून गेलां. या उपर सत्वर मातबर ऐवज कर्ज वारेसा बहुधां सत्वर तुमचें महत् कार्यासिद्धि जहालियावांचून येणार नाहींसें पूर्ण मानून रसदाचे ऐवजापैकीं निम्मे कर्जदारांस द्यावा, व सर्व मुस्सदी सरदार, महालकरी, आप्त, सेवक, लहान मोठे यांजवर पंचवीसा लक्षांची बेरीज करून सर्वांस सांगितलें.सर्वांनीं उच्छाहें खावंदास अवश्यक कार्य व हे दौलत कर्जरोगानें निरंतर ग्रस्त, येवढा क्षय रोगा समान कर्जरोग दूर जहालिया अतिउत्तमसेंच सर्वांनीं मानून जे ज्यास बेरीज सांगितली ते सर्वांनीं कबूल केली. हिंदुस्थानांत जे मातबर आहेत त्यांचा याद बेरीज चिरंजीवांस लिहून पाठविली आहे.जे सेवक स्वामींचे हितानें आपलें हितसें मानीत असतील ते तो संतोषें कबूल करून ऐवज कर्जदारांचे वरातेप्रमाणें प्रविष्ट करतील. एक दोन कोणी या कार्यावर मन न घालीत तर त्याचा काय मजकूर आहे ? बहुतांनीं अवलंबिलें स्वकार्य सहजांत सिद्धीस जाऊन न करी तोच मात्र दोषस्थान होईल. तुम्ही कर्ज वारावयास रुपये दिल्हे. सर्वांचे अगोदर. यास्तव हल्लीं कांहीं तुम्हावर बेरीज चिरंजीवांस लिहून पाठविली नाहीं. तुर्त हेच इच्छा आहे कीं, तुम्ही सत्वर यश संपादावें. तुम्हांस यश ये समयीं आलियांत सर्व दौलतेस यश. जेथें यश तेथें द्रव्यास काय वाण ? सविस्तर अर्थ तुम्हांस कळावा यास्तव लिहिला असे. एतदर्थी जें कांहीं उपयोगी दिसेल तें करावें. विस्तार काय लिहिणें. छ १५ जिलकाद हे आशीर्वाद. लेखन सीमा.

ले. १२८ [३९९] | श. १६७६ भाद्र. व. ३ ता ४-९-१७५४

श्री

पुा राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि

उपरि कासीद तीन जोडी पत्रें देऊन तुम्हांकडे पाठविले असत तरि तुम्हीं तिकडील मनसुबियाचा अर्थ आठां रोजांच्या अंतरें एक एक जोडी कासीद सरकारच्या व आपल्या पाठवीत जाणें. जाणिजे. छ १६ जिलकाद. लेखनसीमा.

ले. १२९ [३७०] | श. १६७६ भाद्रपद व.४ ता ५-९-१७५४

श्री

राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि.

अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेा॥ सदाशिव चिमणाजी आशीर्वाद उपरि

---

१. प्रतिज्ञात पक्ष रामसिंग मारवाडी याचा पक्ष. कुंभेरीस मराठ्यांनीं वेढा दिला होता तेथून जयापा निघून मारवाडची मसलत साधण्यास गेले. भाऊसाहेबांची बखर पृ. ११ पहा.

२. कर्जाची वर्गणी या मंडळीवर घातली.

३. चिरंजीव दादा.

येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे. विशेष. पत्र सांप्रत आपणाकडून येऊन वर्तमान अवगत होत नाहीं. तर निरंतर पत्रें कुशलार्थ लेखन करीत जावें. वरकड अर्थ तीर्थरूपांचें पत्रावरून सविस्तर अवगत होईल. जाणिजे. छ १७ जिलकाद बहुत काय लिहिणें.

लेखन सीमा

ले. १३०
[३१]

{श. १६७६ कार्तिक व. २
ता. २-११-१७५४

श्री

पौ मार्गशीर्ष शुद्ध १० रविवार शके १६७६

तीर्थस्वरूप राजश्री दादा स्वामी वडिलांचे सेवेशीं

अपत्य बाळकृष्ण दीक्षित साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम ता कार्तिक वद्य ३ गुरुवार जाणून स्वकीय कुशल लेखन करावयासि आज्ञा केली पाहिजे. विशेष. काशींतून स्वार होऊन श्रीमंत राजश्री रघुनाथपंत दादांचे भेटीस गेलों. वडिलांचे आशीर्वादें सर्वांशीं ओळख भेटी जाहाल्या. चाळीस दिवस दिल्लींत होतों. श्रीमंतांनीं बहुत स्नेह कृपा केली. कांहीं मेळवावें म्हणून गेलों नाहीं. उगेंच जावेसें चित्तांत आलें. दिल्ली शहर पहावें निमित्य गेलों. आपले आशीरवादें सुखरूप घरास आश्वीन शुद्ध १४ सोमवारीं आनंदरूप काशींत पावलों. कळलें पाहिजे. विशेष. वडिलांनीं त्रिंबक नाईक वगैरे यास कसबे +सातारियाच्या पादशाही फर्मानाविशीं लिहिलें होतें. त्यास वजिराचे अर्जीवरी दस्तक करून घेतलें. त्यास वडिलांनीं जमीनजुमला किती, तनखा काय, परगणा कोण, तें पत्र लिहून दिल्लीस रवाना करावें. व आम्हांस पालखी रो॥ रघुनाथपंत दादांनीं व मोत्याचा चौकडा एक दिल्हा व तीन हजार रुपयांचा गांव एक दिल्हा व पादशाहाकडून पंधरा हजार रुपयांचे गांव काशीशिव भु दा न वली [?] चंद्रोतींचे आलीकडे नेमून घेतले. वडिलांचे अर्जीवरी दस्तक जाहाले. परवाने तयार एका मासा आलीकडे करून देतों म्हणून निश्चय रो॥ रघुनाथपंत दादांनीं व होळकर यांणीं व वकिलांनीं सर्वांनीं मान्य केलें आहे. या कामासाठीं सिद्धेश्वर महाशब्दे येथें ठेविला आहे. कळलें पाहिजे. विशेष. हरिदास कृपाराम यांचें दुकान गडबडलें. परंतु वडिलांचे आशीर्वादें ठरलें आहे. लोकांचे रुपये देतों. दोन दिवस गडबड आम्ही आलों तों जाहाली. आतां आनंदरूप आहे. वडिलांच्या जागेची हुंडया हजारिया बद्दल रुपये साहा हाजार व हरिदास कृपाराम याजबद्दल रुपये चवतीस हजार लादण्या [लाद-या ?] पाठविल्या आहेत. रुपये घेऊन पावलियाचा जाब पाठविला पाहिजे व मनसारामानें हुंडी अठरा हजारांची वडिलांकडे पाठविली आहे. ते रुपये घेऊन अमानत ठेविले पाहिजेत, आणि त्यास पावलियाचा जाब पाठविला पाहिजे. वरकड जें वर्तमान होईल तें मागाहून लेहून पाठवूं. परवाना आला अ ल त म गा करून घेतले आहेत. त्यास तयार व्हावयासि एक वर्ष पाहिजे. बहुत त्वरेनें जाहाला तरी या प्रोच सातारियाचा ही लाविला आहे. वडील म्हणतील कीं काशीजवळ

+ सातारें दौलताबादेजवळ.

घेतले गांव हे हस्तगत कसे होतील. तरि राजानें आधीं मान्य केले तेव्हां हें कार्य केलें. हरिदास कृपारामास वीस हजार रुपयेपर्यंत लागले तरी देतों. चिंता नाहीं. तो सांभाळून घेईल. तों इतकियांत त्याचा ही ऐवज चहूंकडून येईल. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे नमस्कार.

चिरंजीव गोविंद दीक्षित व रामचंद्र दीक्षितां प्रति : बाळकृष्ण दीक्षित [यांचे] अनेक आशीर्वाद. लोभ असों दीजे हे आशीर्वाद. चरण बापुजी महादेव सां नमस्कार.

राजश्री भिकाजीपंत स्वामीस सां नमस्कार. विनंती ज्यांचीं पत्रें त्यांस पावती करावीं.

ले. १३१] [३९३]

{श. १६७६ मार्ग. शु. १ ता॥ १५-११-१७५४

श्री

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री रामाजी अनंत गोसावी यांसि.

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ खमस खमसैन मया व अलफ. बिजेसिंगाचा पराजय केल्याचें तुमचें पत्र आलें. त्या अलीकडे तुमचें पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरि सविस्तर लेहून पाठविणें. बिजेसिंग आदिकरून मारवाडच्या रजपुतांची तरवार मद्दसूर. फार करून तिकडील मर्द मनुष्य समशेरचें काम पडल्यास कोणेविशी चुकतील हें होणेंच नाहीं. असें असतां राजे रामसिंग यांची स्थापना करून बिजेसिंगाचा पराजय करावाच करावा, येतद्विषयींचा उद्योग राजश्री जयापांनीं करून गेले. मोठा अवघड मनसुबा होता. तथापि त्यांचे सुकृतयोगें व धन्याचे कृपेनें त्यांणीं यश संपादिलें. येणेंकरून अतिशयेशीं आनंद झाला. जे धन्याशीं परम एकनिष्टेनें वर्ततात, धन्या × × × विना दुसरें दैवत नाहीं ऐसें समजतात, त्यास ऐशींच महत यशें येतात. मूळ सेवकलोकांस निष्ठाच कारण आहे. त्यांची फळें हीं आहेत. प्रस्तुत सर्व प्रकारें भरोंसा जयापाचाच असे. फार करून रामसिंगजीचे कार्य अभिमानपुरस्कर आपांनीं करून दिलेंच. अतःपर त्याच मनसुबियांचे भरी भरोन गुंतावें ऐसा अर्थ नाहीं. चार रजपूत मातबराशीं व रामसिंगाशीं गांठ घालून देऊन आपण मोकळें व्हावें, केवळ बिजेसिंगाची जड उखडून टाकीन म्हटलें तर हा दीर्घ प्रयत्न, त्यास फार दिवस पाहिजेत. व आपां कडे मनसुबे फार. मनसूर अल्लीखान वारले तो मनसुबा मोठाच आहे, व फौज चिरंजिवापाशीं थोडी. फौजेविशीं सर्व इमारत जयापांवरच आहे, हे एक-उद्योगी नव्हते, अनेक उद्योग यांस चिरंजिवांसमीप राहून करणें लागतात. यास्तव यांणीं त्या कामाचा उलगडा करावा पूर्वील बख्तसिंग व राजे अभेसिंग यांची वांटणी आहे, त्याचप्रमाणें बख्तसिंगाचा वांटा बिजेसिंगास द्यावा. अभेसिंगाचा वांटा रामसिंगास द्यावा. त्याचा त्याचा एक विचार परस्पर करून देऊन बिजेसिंगापासून आपलें स्वकार्य होईल तें करून घ्यावें व रामसिंगापासून जें कार्य करारप्रमाणें करून घेणें तें मोकळें व्हावें. गोहदकर राणा ग्वालेरीस आपले ताब्यांत बळावला आहे, त्याचें पारपत्य जरूर करावें. शत्रु लहान

आहेसा न म्हणावा × × × वी आणि अविलंबे जाऊन चिरंजिवांस सामील होऊन उमेद मनसुबियांचा साहास करावा (हें) युक्त आहे. येविशीं तुम्ही आपांस सांगणें तें सांगोन चिरंजिवांकडे जावयाची त्वरा करणें. वरकड वृत्त आपांस लिहिलें असे त्याजवरून कळेल. तिकडील कार्य उरकून सत्वर ज्या कार्यास चिरंजीव जातील तिकडे यावें. छ २९ मोहरम बहुत काय लिहिणें लेखनसीमा.

ले. १३२ [३३८] श. १६७६ पौष इ. १७५५ जानेवारी

॥ श्रीमोरया ॥.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामोजीपंत भाऊ स्वामींचे सेवेशीं

सेवक गंगाधर येशवंत सां॥ नमस्कार विनंती उपर येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लिहीत असावें. विशेष. बहुत दिवस आपणाकडून पत्र येऊन वृत्तांत कळूं येत नाहीं तर निरंतर पत्र पाठवून संतोषवृद्धि करावी. या नंतरें गंगास्नानास श्रीमंतांसुद्धां आम्ही आलों. रोहिलियांची मामलत झाली. वसूल आला. त्याची वाटणी होऊन राजश्री आपा साहेबांचे वाटणीचा ऐवज श्रीमंतांस विनंती करून आपल्याकडे घेऊन दिल्लीहून हुंडी बाळाजी सामराज यांजवर करून पाठविली आहे.प्रविष्ट जालियाचें उत्तर पाठवावें.वरकड वृत्त प्रस्तुत यमुनातीरास येऊन मुक्काम ग्वालेरीच्या कामाकरितां आहे. सत्वरच श्रीमंतांचें कूच करोन तिकडे येत असों. राजश्री सुभेदार सामरच्या सुमारें आले आहेत. कागदपत्र येत जात असतील. आपण प्रसंगीं आहेत उत्तम तें करतील. आम्ही सत्वरच राजश्री सुभेदारांपाशीं येत असों. लोभाची वृद्धि करावी हे विनंती.

ले. १३३ [१६] श १६७६ फाल्गुन व. १ ता॥ २७-२-१७७५

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशीं--

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक नमस्कार विनंती उपरि येथील कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष आपल्या भेटीस बहुत दिवस जाले. भेटीची इच्छा आहे. आम्ही टोंक्याचे रोहोकें येतों. आपणही तेथें आलें पाहिजे.येते समयीं सैद लष्करखान याचे दिवाण राजश्री मल्हारपंत यासही समागमें घेऊन आलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विनंती

पौ॥ फाल्गुन वद्य १ गुरुवार शके १६७६ भावनाम

---

१ दामोळकर-शिंद्यांचे कारभारी. २ चंद्रचूड-होळकरांचे दिवाण. ३ जयापा शिंदे. ४ खं. ३ ले. ४५१ पहा.

ले. १३४ [१३४] { श १६७७ वैशाख शु. ३ ता १४-४-१७५५

॥ श्री ॥

राजश्री मुरारराव घोरपडे बजारतमाब गोसावी यांशी—

छ सकळ गुणाळंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहा महादाजी अंबाजी आशीर्वाद विनंति उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय लिहीत असले पाहिजे. विशेष. पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन संतोष जाहला. स्नेहाचा अर्थ लिहिला व राजश्री पंतप्रधान यांनीं आम्हांस बंधु म्हणाविलें आहे ते गोष्ट लोकोत्तरांत उत्तम दिसे तें करावयास आपण साभिमानी आहोंत, म्हणोन कितेक लिहिलें व राजश्री नागोपंत यांनीं निवेदन केलें, त्याजवरून कळलें. ऐशास, आपला व राजश्री पंतप्रधान यांचा स्नेह आजी कालचा नाहीं. पूर्वापार चालत आला तो अभिवृद्धीस पावावा. सर्व प्रकारें श्रीमंतांचा तुम्ही लोभ संपादून उमदे महत्कार्यास उपयोगी व्हावें हेंच आम्ही इच्छितों. राजश्री श्रीनिवासराव यांस बोलाविलें असे. तेही एका दों रोजांत येतील, त्याजशीं बोलोन आपणाकडे पाठऊन देऊन. वरकड अर्थ राजश्री नागोपंत याजशीं बोललों आहों हे लिहितील त्याजवरून कळेल. राजश्री नरसिंगराव एक प्रकारचे मनुष्य यांस निरोप देऊन पाठविलें म्हणोन; तर आपण श्रीमंतांचे बंधु म्हणवितात. श्रीमंत उमदे अमीरांची तोर व रीत भात राखतात अनेक देशांतरीचे वकील सहवाशीं राहून घेतात. तोच प्रकार आपणाजवळ असावा व आपण इच्छा धरतात त्यास मुख्यत्वें हींच कारणें आहेत. प्रस्तुत राजश्री गोविंदराव शामराव यांस पाठविले असत. हे सर्वही सांगतील त्यांजवरून कळेल. यांस आपणाजवळ राहूं द्यावें. रा छ १ रजब बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंती[1].

ले. १३५ [३४३] { श. १६७७ वैशाख व अ. ज्येष्ठ मे १७५५

॥ श्री ॥

राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहा +सखाराम भगवंत आशीर्वाद विनंती उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें प्रविष्ट जालें. लिहिलें वृत्त अवगत जालें. अशास सांप्रत आपण कोठें आहेत ? ×बिजेसिंगाचा इरादा काय आहे ? आपण मनसबा कैसा योजिला जाहे ? हें वृत्त सविस्तर लिहिलें पाहिजे. येथील वृत्त श्रीमंतीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल. Sसारांश केवळ कुंभेरीप्रमाणें न

---

१ हा संताजीचा नातू. गुती हें त्याचें संस्थान.

+ सखारामबापू बोकील. × जोधपुरकर, ज्यानें जयापास मारेकरी घालून पुढें मारिलें. S येथपासून खुद्द खाशांचे हातचा मजकूर.

गुंतवें. बहुतां दिवसांचें काम विचारें विचारें दमवून करावें उतावळीनें लोक जाया होऊन कार्य सुधें होणार नाहीं. अह्मांस सुचलें तें लिहिलें. तेथील प्रसंगानुरूप आपण जें करणें तें करीतच असतील. बहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हे विनंती.

ले. १३६ [१७ [} { श. १६७७ ज्येष्ठ शु. १४ ता २३।६।१७५५

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामीचे सेवेशीं—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. जीवनराव केशव या समागमें खानांनीं सांगून पाठविलें आहे. मुसा बुस्सी आदिकरून सर्वही येथील अमीर आमची आरजो करितात. कारभार करावा ह्मणोन इच्छितात. एक आपली मर्जी असल्या हें कार्य करूं. त्यास हैदरजंग व मुस्सा बुस्सी यांस पत्रें पाठवावीं कीं, खानास वकील किंवा कारभार सांगावा. ऐशास जीवनराव, परशराम महादेव यांचे निसबतीचे शाहाजवानखानाशीं केवळ ममतेंत. त्यांशीं खान या गोष्टी कशा बोलतील हा संदेह प्राप्त जहाला. यास्तव आपणास लिहिलें असे. तरि खानाशीं हा मजकूर तजविजीनें करून या गोष्टीचा शोध बारकाईनें घ्यावा, व लेहून पाठवावें. तेणेंप्रमाणें येथें करणें तें केली जाईल. तहकीक मसलत अर्थ जरूर लिहून पाठवावे. बहुत काय लिहिणें हे विनंती ×

पौ ज्येष्ठ शुद्ध १५ सोमवार शके १६७७.

ले. १३७ [३] } { श. १६७७ आषा. व. ४ ता २७-७-१७५५

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामीचे सेवेशीं

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत असलें पाहीजे. विशेष. आपण टोंक्याचे मुक्कामीं श्रावण मासाचे उत्साहास पुण्यास निश्चयें येतों म्हणोन मान्य केलेंच आहे. त्यास सांप्रत उत्साहाचा प्रसंग आहे. तरि स्वामींनीं स्वार होऊन आलें पाहिजे. अगत्य श्रावणचे उत्साहास यावें. हे विनंति

पौ आषाढ वद्य ४ रविवार शके १६७७ युवनाम संवत्सरे.

× खंड ३ ले. ४५८ येथें हेंच पत्र आहे.

ले.१३८ [३८२] } श. १६७७ आषाढ व. ८ ता ३१-७-१७५५

श्री

राजश्री जयापा गोसावी यांसि.

आशीर्वाद उपरि. तुम्ही सविस्तर वृत्त राजश्री अंताजी माणकेश्वर यां समागमें सांगून पाठविल्या प्रमाणें सर्व एकनिष्ठेचा व आपले बंदोबस्ताचा अर्थ विदित केला तेणेंकरून बहुत संतोष जहाला. सर्वाविशीं भरंवसा तुमचा आहे. हर प्रकारें मल्हारबास आपले मायेंत राखून तिकडील तहरह करून मोकळें होणें. पूर्वी सविस्तर लिहून पाठविलें आहेच. दसरा जहालियावर सविस्तर अर्थ लिहिला जाईल. तुमचे विशीं येथें तिळमात्र दुसरा अर्थ नाहीं. सर्व प्रकारें समाधान असों देणें. छ २१ सव्वाल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

ले. १३९ [३५२] } श. १६७७ श्रावण व. ८ ता ३०-८-१७५५

श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री रामाजी अनंत गोसावी यांसि

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें विशेष. तुम्ही पत्र छ १५ सवालचें पाठविलें तें छ १७ जिलकादीं पावलें. राजश्री जयाजी शिंदे यांस दगा होऊन निधन पावलियाचा मजकूर लिहिला तो कळोन बहुत श्रम जाले. ईश्वरें मोठी अनुचित गोष्ट केली. ईश्वरी तंत्रांस उपाय नाहीं. जयापासारिखा उमदा सरदार या दग्यांनीं मृत्यु पावावा ऐसें नव्हतें. होणारेस उपाय नाहीं. असो. दत्ताजी शिंदे मर्द खबरदार आहेत. तुम्हीं व सर्व सरदार शाबूत आहां. दत्तबाचें समाधान करून जयापांनीं उपस्थित मनसुबा केला तो सिद्धीस पावून शत्रूचें पारपत्य होय, तह रह उत्तम प्रकारें होय, तें करणें. वरकड वृत्त दत्तबाच्या पत्रीं लिहिलें असे. त्यांजवरून कळेल. ÷दत्तबाचा स्वभाव शिपायागिरीचा आहे, यास्तव रागें करून असमयीं अस्थानीं निकडीस प्रवर्ततील. त्यास समजावून गोड बोलूनच सांगत जाणें. आपा असतां बोलत होते त्याचप्रमाणें जहालें तर तह करणे. परंतु ते सांप्रत चढीं लागले असतील यास्तव हर तजविजेनें संभाळून राहणें. दोन चार मिळून पंचवीस चाळीस हजार जमा होऊन आले तर गनीमी तऱ्हेनें तीन महिने संभाळणें. फौजा तिकडे आलियावर श्रीकृपेनें उत्तमच होईल. छ २१ जिलकाद. तीळमात्र उदास नसतां सेवा करणें. बहुत काय लिहिणें.

÷ येथून खुद्द बाळाजी बाजीरावाचें हस्ताक्षर.

ले. १४० [१८] | श. १६७७ श्रावण व. १० ता. १-९-१७५५

श्री

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशी—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. सैद लष्करखान यांचे मजकुराचीं पत्रें नबाब सलाबतजंग मुस्सा दुस्सी व शाहानवाजखान यांस पाठविलीं होतीं. त्यांचीं उत्तरें आलीं त्याच्या नकला पाठविल्या आहेत. त्या पाहाव्या व खानास ही दाखवाव्या. उत्तर कोणे प्रकारें पाठवावें हें पुसून लिहून पाठवावें, व खानास पत्र लिहिलें आहे, तें प्रविष्ट करावें. खानाचे साहित्याविशीं मुस्सा बुस्सीस पत्रें पाठवावीं. तेथें सर्व यास अनकूल आहेत म्हणोन लिहिलें; ऐशियास खानाविशीं मनापासून अंतस्थ सर्व प्रकारें साहित्यपत्रें व बोलणें होत आहे; परंतु सांप्रत पत्रें आलीं तीं पाठविलीं. पुढें ज्या प्रकारें तुम्हीं तजवीज योजून त्याहाल त्या प्रकारें लिहून पाठऊं. चित्त शुद्ध सत्य भाषण तेथें याविशीं दिसतें. परशरामपंतही नीट नाहींत म्हणोन लिहिलें तेंही यथार्थच आहे. परंतु सांप्रत परशराम महादेव ही हुजूर येत आहेत. सांप्रतचा फिरंगीयाचा भाव खराखुरा कसा खाना विशीं आहे ? तें सर्व शोध करून लिहावें.×पौ श्रावण वद्य १० शके १६७७ युवनाम संवत्सरे

ले. १४१ [३५१] | शके १६७७ भाद्रपद शु. १३ ता. १८-९-१७५५

श्री

पु॥ राजश्री दत्ताजी शिंदे गोसावी यांसि.

आशीर्वाद उपरि. बिजेसिंगास उत्तम प्रकारें तंग केलें आहे. वरकड कोणाच्यानें काहीं स्याची कुमक करवत नाहीं, स्वामींनीं त्याचे वकिलास साफ सांगून निरोप द्यावा. कैलासवासी आपानीं जो अभिमान धरिला होता तो शेवटास नेलियानें लौकिक व स्वामी कार्य सर्वोस जय म्हणोन लिहिलें. त्यास आपानीं जें अवलबिलें तें आम्हांस सर्व प्रकारें करणें; परंतु हा राजकार्य प्रसंग आहे. आपासही येथून बुद्धिवाद आपा असतां चार महिने पांच महिने मागें लिहीत गेलों. तीं पत्रें तुम्हीं पाहिलीच असतील. दूर पथ, दो वर्षांनीं हिंदुस्थानांतून फौज आली, एकाएकी येऊन तयार करतां उशीर लागतो. हे लोकांची येथील रीत तुम्हांस ठाऊकच आहे. हंगाम फौजसिद्ध ऐसा असता तर एक खावंद[1] आज वीस हजार फौजेनिशी तुम्हाजवळ प्रविष्ट झाला असतां. परंतु नाईलाज. गैर हंगाम व दूर पथ याजमुळें विलंब लागला. श्रीकृपेनें दिढा महिन्यांत पांच सहा हजार फौज येऊन पावेल. मागाहून खांसांही वीस हजार फौजेनिशीं येतच आहे. तुम्ही अवलंबिलें कार्य तें अगत्य आम्हांस करणें. परंतु

× खंड ३ ले. ४६२ येथें हेंच पत्र आहे.

१. खावंद=खांसा=धनी. पेशव्यांच्या घराण्यापैकीं कोणी तरी एक असा भाव.

होणारानुरूप आपानीं हातेर वोढिलें. शिपायागिरीची रीत केली. सरदारागिरीचा प्रकार न केला. जेव्हां प्रथम भारथी लढाई मारली त्या उपरि नव्या दबावांत तूट सोसून सलूख हर प्रकारें, पुढील संकट दूरंदेशीनें जाणून, करून मोकळे जहाले असते तर आज प्रयाग अंतर्वेद व आलीकडील खेचीचा मुलूक सोडविणें वगैरे कामें सर्व ही सरकारकिफायतीचीं होऊन गेलीं असतीं. परंतु होणारास इलाज नाहीं. तुम्हीही आज पावेतों शिपायागिरी केली. आतां सरदारीची रीत धरून तजविजीनेंच कांहीं कामें करावीं. जरूर संकट पडेल तेथेंच नेटून *शिपायागिरी करावी. तुमचा अभिमान ईश्वरास आहे, व मजवर ईश्वरी कृपा आहे, तो तुमचे साहित्यास कधीं चुकणार नाहीं. तीं पिढ्यांचे एकनिष्ठ सेवक, कामाचे असतां, तुमचा अभिमान नसावा हें कधींही या घरांत घडणार नाहीं. सर्व प्रकारें समाधान चित्ताचें करून अष्टपैलूचे रीतीनें जसा जे समयीं प्रसंग पहाल तसा मनसबा करीत जाणें. सत्वरच येथून फौजही येऊन पोंचत आहे. बिजेसिंगाचा वकील पन्नास लक्ष द्यावे, रामसिंगास थोडीशी जागा पोटापुर्ती द्यावी, ऐसें बोलत होता. आम्हीं ते गोष्ट मान्य केलीच नव्हती. सांप्रत हा प्रसंग जहाला याजमुळें आम्ही साफच त्यास जाब दिला कीं, या उपर आम्हांस तह कर्ता अनकूल पडत नाहीं, तुम्हीं जाणें. ऐसें म्हणून निरोप दिल्हा. तेथें ते आतां चढीं लागले असतील व मध्यस्थ मारले गेले, त्यामुळें मध्यस्तींतही कोणी शिरत नसेल. अद्याप त्यांनीं रामसिंगास पंधरा विसांची जागा दिली व तुमचा शिबंदीखर्च मसलतखर्च फिटोन दहा लाख जाजती दिल्हे, तर घेऊन सलूख करून त्या संकटांतून सुटावें, हें राज्यभार अष्टपैलूपणास उचित आहे. तेथील प्रसंगानुरूप करणें. फौज तो तुमचे साहित्यास रवाना करीत असों.छ ११ जिल्हेज बहुत काय लिहिणें.×

लेखन सीमा

× दत्ताजीनें फौजेची कुमक मागितली होती त्यावर हें प्रत्युत्तर आहे. दत्ताजी मारवाडांत जयापाचा सूड उगवण्यांत गुंतला होता. हें पत्र नानासाहेबांनीं त्यास लिहिलें आहे व तें सर्व खुद्द त्यांच्याच हातचें आहे.

२. भारथी=जंगी, आरतुरची, भारती युद्धाच्या तोडीची. ह्या लढाईचें वर्णन, भाऊसाहेबांची बखर पृष्ठ ११ ते २० यांत पहावें.

*शिपायागिरी व सरदारी या दोहोंत जो भेद येथें दाखविला आहे तो ध्यानांत ठेवण्याजोगा आहे. त्याप्रमाणेंच शिंद्यांची स्तुती करतां करतां व कैवार घेतां घेतां त्यास दोष दिला आहे, तोही प्रकार मोठा खुबीदार. आहे म्हणून मुत्सद्दीपणा, लोकसंग्राहकत्व, इ. राज्यकर्तृत्वाचे गुण ह्या पत्रावरून कळून येतात.

ले.१४२ [३८६] श. १६७७ भा. व. ९ ता. २९-९-१७५५

श्री

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री रामाजी अनंत गोसावी यांसि

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ सीत खमसैन मया व अलफ. तुम्हीं राजश्री जयाजी शिंदे निधनऽ पावलियावर पत्रें पाठविलीं त्यांचीं उत्तरें मुजरद काशीदाबा पाठविलीं तीं पावलींच असतीच. जयाजी शिंदे यांनीं मारवाडच्या मनसुबियाचा अंगेच केला. त्यास आयुष्य असतें तरी,कांहीं चिंता नव्हती त्यांचे तेच सिद्धीस नेते. तथापि त्यांच्या मागें राजश्री दत्ताजी शिंदे यांनीं हिंमत धरून मनसुबियास आव घातला तो प्रकार सिद्धीस पावावाच पावावा, यापेक्षां दुसरें अधिक न जाणतां रा अंताजी माणकेश्वर ग्वालेरीहून रा करविले. चिरंजीव राजश्री समशेर बहादर व राजश्री येशवंतराव पवार ऐसे दहा हजार फौजेनिशीं रवाना केलें. अविलंबेंच येऊन पावतील. खासास्वारीचीही तयारी होत आहे. दसरा झालियावर चाळीस पन्नास हजार फौजेनिशीं येणें होईल, ये विशींचा विस्तार दत्ताजी शिंदे यांसि लिहिला असे. त्याजवरून कळेल. रजपुतांमध्यें जाटाशीं राजकारण राखून एकाशीं स्नेह तर एकाशीं बिघाड, एकदांच सर्वांशीं कजिया करूं नये. तूर्त तोंडानें वरकडांशीं फारच गोड बोलून राजकारण राखावें, श्रीकृपेनें फौजही येत आहे. मग जे समयोचित दिसेल तें करणें. छ २२ जिल्हेज. वरचेवर आठां दिवसांआड वर्तमान लिहीत जाणें. छ २२ जिल्हेज. बहुत काय लिहिणें. पैा छ २७ मोहरम.

ले. १४३ [४५१] श. १६७७ इ.१७५६ जाने

श्री

[*श्रीमंत राजमान्य राजश्री नानासाहेब स्वामींचे सेवेशीं पोष्य सेवक अंताजी माणकेश्वर] मुक्काम किल्ले नागोर प्रांत मारवाड स्वामींचे कृपादृष्टि करून सेवकाचें वृत्त यथास्थित असें विशेष.

ऽ इ. १७५५ जून ३० (श.१६७७ ज्येष्ठ वद्य ७) जयाजी शिंदे निधन.

* हें प्रकरण त्रुटित मिळालें. चौकटींतलि मजकूर आम्हीं समग्र संदर्भ पाहून अनुमानानें घातला आहे.

१. हें प्रकरण आमचे स्नेही रा० अंताजी रामचंद्र हरडीकर वास्तव्य महाड यांनीं नक्कल करून पाठविलें. हें महाड येथें गोखले यांच्या जुन्या दप्तरांत मिळालें. ह्याचे एके बाजूनें लिहिलेले २३ बंद आहेत. पैकीं पहिल्या बंदाचा अर्धा भाग गहाळ झाला आहे. अक्षर वळणदार व सुवाच्य आहे. शेवटील मजकुरावरून ही प्रत लिहिल्यास सुमारें ८९ वर्षें होऊन गेलीं.

कसबे नाशीक ऊर्फ गुलचनाबाद येथील मुक्कामीं वैशाखमासीं सेवेकास आज्ञा केली जे, चिरंजीव राजश्री दादासाहेब यांची स्वारी हिंदुस्थानांत दोन सालें राहून, अटक पावेतों मुलूख सर करून, तमाम खंडण्या लाहूरे वगैरे सुमेयांनीं घेऊन शाहाजनाबाद ऊर्फ इंद्रप्रस्थ येथें आली. अकबराबादे करून दरमजल देहिजे[४] यास्तव तुम्हीं आपले फौजेनिशीं चिरंजिवांकडे जाऊन तेथून आज्ञा होईल त्या अन्वयें वर्तन करणें. म्हणोन त्यावरून आज्ञा शिरसा वंदोन विनंति केली [कीं] साल मजकुरीं फौजेस नालबंदी सरकारांतून पावली नाहीं. यांचा ऐवज आदा नाहीं. सावकारापासून कर्ज घेऊन नालबंदी रोजमुरा दिला. येविशीं आज्ञा झाली पाहिजे. बराय विनंती खातरेस आणून राजश्री गोविंद बल्लाळ बुंदेले याजवरि प्रांत अंतरवेदपैकीं वरातीचा ऐवज बारा लक्ष रुपये देविले. त्याप्रमाणें घेऊन, स्वामींची आज्ञा घेऊन, दर मजल हिंदुस्थानांत आलों. दरमियान कसबे हांडिये प्रांत नेमाड रेवातीरीं मुक्काम जाहला. इतक्यांत मागाहून फौजेची गणती घ्यावयासि राजश्री चिटको सोयराजी व नारो गणेश कारकून व भालदार, जासूद व हुजुरे रवाना होऊन आले. त्यांनीं गणतीविशीं चौकशी बहुत करून गोट गणती घेऊन सात हजार गणती भरली. ते हुजुर गेले. सेवकानें कूच करून प्रांत माळवा येथें कसबा कालाबाग व शाहाणेरा येथें आलों. इतक्यांत 'श्रीमंत राजश्री दादासाहेब यांची स्वारी नरवरचे घाटानें दरकूच आली. सेवकाची भेटी झाली. दोन कोसांचे

---

१. हे सेवक अंताजी माणकेश्वर गंधे होत. ह्यांजविषयीं हकीकत भा. इ. सं. मं. त्रै वर्ष ३ व ६ पहा. अंताजीपंतांहीं लिहिलेलीं दुसरीं कांहीं पत्रें आम्हीं प्रसिद्ध केलीं त्यांच्या रचनेच्या शैलीवरून व त्यांनीं रचलेली एक पाणिपतची बखर आम्हांपाशीं आहे तिच्याही रचनेच्या शैलीवरून, हें प्रकरण विस्तीर्ण पत्ररूपानें त्यांनींच लिहिलें असें मानण्यास बिलकुल हरकत नाहीं. अंताजीपंत हे हिंदुस्थानांत वागणाऱ्या पेशव्यांच्या सरदारांपैकीं मोठे प्रसिद्ध सरदार होत. त्यांणीं हें पत्र नागूर प्रांत मारवाड येथून लिहिलें आहे. मारवाडच्या मोहिमेंत हे अंशतः होतेच, व पुढें त्या मोहिमेचा शेवट, म्ह. बिजेसिंगाशीं तह, तोही त्यांच्या मार्फत झाल्याचें त्यांणीं लिहिलें आहे. त्यावरून ही हकीकत विश्वसनीय आहे असें कळून येईल.

२. ही दादांची मोहीम सन १७५३ ते १७५५ सालची होय. परंतु ह्या वेळीं ते दिल्लीच्या पलीकडे फारसें गेल्याचें आढळांत येत नाहीं. लाहोर अटकपर्यंत ते सन इ० १७५७ ते १७५८ च्या मोहिमेंत गेले. ३. इंद्रप्रस्थ-दिल्ली.

४. अकबराबाद=आग्रा ह्या खेड्यास नांवारूपास आणून अकबरानें आपलें नांव दिलें. तेव्हांपासून तें मोठें शहर बनलें.

५. हा शब्द दुर्बोध आहे.

६. अंताजीपंतांवरतीं पेशवे ह्यांचा विश्वास जरा कमती होता असें मागें त्यांच्या फौजेची गणती घेण्याविषयीं जीं पेशव्यांचीं दोन तीन पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांवरून अनुमान होतें.

तफावतींनें मुक्काम केला. दुसरे दिवशीं राजश्री रामचंद्र गणेश व कुकाजी शिवराम व आणखी पंचवीस कारकून मंडळी व भालदार, जासूद, स्वार, गारदी, सरकारांतून येऊन चौगिर्दा लष्करास घेर घालून एक स्वार क ट क जे हो ता खा लीं गणती घेतली. तेव्हांही सदरहू प्रमाणें सात हजार स्वार गणती लागले. श्रीमंतांनीं आज्ञा केली जे, राजश्री गोपाळराव गणेश बर्वे यांस कु र रा जाहनाबाद, प्रांत अंतरवेद पावेतों, चवदा महालांचा चकला आहे त्याची मामलत सांगितली आहे. प्रस्तुत सदरहूचें काम राजश्री गोविंद बल्लाळ यांजकडे आहे. सबब तुम्हीं यांस घेऊन जाऊन अंमल बसवून देणें; आणि हिंदुस्थान प्रांतीं दुसरी फौज नाहीं, जिकडे कामें पडतील तिकडे पुस्तपन्हा करून बंदोबस्त राखणें. याजवरून मशारनिल्हे यांस घेऊन ग्वालियेर प्रांतीं छावणी आषाढ मासीं केली. श्रावणमासीं जंगमपूर, प्रांत कालपी, यमुनातीरास जाऊन राजश्री गोविंद बल्लाळ व राजश्री हरि विठ्ठल दिंमत मेघश्याम बापूजी यांस पत्र पाठवून आणविलें.

पुढें राजश्री गोपाळराव बर्वे यांच्या मामलतीचा बंदोबस्त करून द्यावा, इतकियांत राजश्री दत्ताजी शिंदे व राजश्री जनकोजी शिंदे यांचीं पत्रें भाद्रपद मासीं सांडणीस्वारा समागमें आलीं. त्यांतील मजकूर जे, प्रांत मारवाड येथील राज्य राठोड यांचें आहे. त्यास राजे ढोकळसिंग वडील, राजे बखतसिंग धाकटे बंधु असतां, ढोकळसिंगाचे पुत्र राजे रामसिंग व बखतसिंगाचे पुत्र राजे बिजेसिंग होते त्या बिजेसिंगानें राज्य बळकावून रामसिंगास राज्याबाहेर लावून दिलें. तेव्हां राजे रामसिंग मथुरेच्या मुक्कामीं येऊन, आपली हकीगत सांगून, भेटी घेतल्या. आणि पगडीबदल भाईचारा केला. कित्येक मनसबियाचा अर्थ समजाविला जे, *आपण वडील राज्यास अधिकारी असतां बिजेसिंगांनीं राज्य बळकावून आपणांस बाहेर घातलें, याजकरितां तुम्हांकडे येऊन पगडीबदल भाई झालों. याचा अभिमान धरून मजला राज्यासनीं बसविणें. निमे राज्य तुम्हांस देऊन, दोन क्रोड खर्च देतों. याप्रमाणें करारांत आणिलें. तेव्हां तीर्थस्वरूप राजश्री जयाजी आप्पा शिंदे यांनीं मान्य करून फौजबंदी केली आणि संवत्सर प्रतिपदेस कूच करून मारवाडांत चालिले. हा मजकूर राजे बिजेसिंगास कळतांच नागोराहून फौजबंदी करून, कसबे मेडतें प्रांत मजकूर येथें आले. इकडून राजश्री संताजी वाबळे व राजश्री शेटि याजी खराडे व आणखी भोइटे व पागा मिळून पंधरा हजारांनिशीं पुढें रवाना केले. त्यांचे यांचा मोकाबिला झाला. त्यास बिजेसिंगाची फौज पन्नास साठ हजार व तोफखाना व गंजिफांचे गाडे शें दीडशें व बाणांच्या कैंच्या याप्रमाणें जंगी सामान भारी असतां आम्हां कडील फौजेनें एक टक्कर दिली. यास राठोडाची फौज, बहुत जंगी सामानाची मारागिरी झाली. ते समयीं मोड इकडील होऊन निघाले. पालख्या, नगारे, निशाणें, चवऱ्या, आबदागीर, झरझऱ्या

---

१. गोविंद बल्लाळ-गोविंदपंत बुंदेले सागरवाले.

२. ह्या हिंदुस्थानी चाली वद्दलची माहिती भाऊसाहेबांची बखर पृष्ठ ८ येथें सविस्तर सांपडेल. * आपण-रामसिंग. हें रामसिंगाचें बोलणें.

आदि करून त्यांणीं नेलें. अवसान यांस होईना. बेलाशक लष्करांत आले.त्यावरि फौजेचें कूच करून दोन तीन मजली मेडतें याजकडे चालोन घेतलें. दोन्दी फौजेचा मुकाबिला जाहाला. राठोड श र बाजूस प ड ले. त्यांणींही चालोन घेतलें. आम्हांकडे जंगी सरंजाम नाहीं. लढाईचें तोंड लागलें. प्रातःकाळ पासून तृतीय प्रहर पावेतों लढाई जाली. परंतु हत्यार लागेना. गा जीचा मा र भारी जाहला. तेव्हां सारी फौज तीा जयाजी आपा शिंदे यांजजवळ ठेवून दोन हजार धारकरी निवडक घेऊन आपण श्रीमंतांचे चरणांचें ध्यान करून, नीट चालोन घेतलें. त्यांणींही मारगिरी फार केली. फौजेंत तोंड लोकांचें स ली स ब त च दुभाग फौज करून पार निघोन गेलों. शें दोनशें खांसा ठार व घोडीं ठार बहुत जालीं. जखमीही जाले. हें पाहून जयाजी आप्पांनीं सारे फौजेनिशीं हत्यार लाविताच राठोडांची फौज मोडून ताराज केली. आम्हांस तीन जखमा तिराच्या व सांगेच्या लागल्या. श्रीमंतांचे कृपेंकरून महत्तर यश आलें. रात्रौ चौक्या दिल्या. त्यासमयीं बिजेसिंग शुत्तरस्वार होऊन एका दिवासांत एकाएकीं चाळीस कोस नागोरास पळोन गेला. सलतनत सर्व हस्तगत झाली.

मग कूच करून नागोरास मोरचे देऊन, शिकस्त केला. त्याजवरि राजे माधोसिंग जयनगरवाले, राठोडाचे म्याही, यांजकडे त्यांनीं पैगाम लावून फौज आणविली. जयनगरवाले यांनीं फौज तयार करविली. ज्येष्ठमासीं बिजेसिंगानें तिघे मारेकरी घालून वद्य ७ मीस तीा राजश्री जयाजीआप्पा शिंदे यांस प्रातःकाळच्या प्रहर दिवसास स्नानसमयीं दगा केला. तीन जखमा भारी लागल्या. मारेकरी धरले. त्यांणीं बिजेसिंगाचें नांव घेतलें. लष्करांत गडबड झाली. तसेंच उचलोन डेऱ्यांत आणिलें. ते समयीं सांगितलें कीं, " अमित्राची फौज येत आहे, तुम्ही नगारा करून तयार होऊन नागोराकडे जाणे. नाहीं तरी लष्कर मारिलें जाईल." म्हणतांच जीनबंदी करून, ढालेपुढें गेलों. तों राठोडांनीं नीट चालोन घेतलें. लढाई मोठी झाली. दोन तीन हजार फौज मारून बिजेसिंगास किल्यांत घातलीं. इतक्यांत जयाजी आप्पाचा काळ जाहला. मग येऊन दहन केलें. हें वर्तमान जयनगरवाले यांस कळतांच अनिरुद्धसिंग याज समागमें शकवंत, राजावंत व कुपावंत व रुके इत्यादि संस्थानिक देऊन पंचवीस हजार फौज व जंगी सामान, तोफा व गंजिफा वगैरे सरंजामसुद्धां आश्विन मासीं राठोडाचे कुमकेस रवाना केले. म्हणून येथून राजश्री संताजी वाबळे व शेटियाजी खराडे, रामराव नीळकंठ वगैरे पंधरा हजार फौजेनिशीं जयनगरकर यांचे फौजेवरी पाठविले आहेत.हा सविस्तर मजकूर पुणियास* लिहिला आहे. परंतु बरसातीचे

---

१ ह्या मेडत्याच्या लढाईचें वर्णन भाऊसाहेबांची बखर पृष्ठ १३–१५ येथें सांपडेल.

२ हें जयापाचें प्रसंगावधान मोठें लक्षांत ठेविण्याजोगें आहे.

३ मेडत्याच्या लढाईंत व ह्या नागोऱ्याच्या लढाईंत शिंद्यांनीं मोठा पराक्रम केला. दत्ताजीस " भीमबहादर " म्हणत असत.

* पुण्यास पेशव्यांना. हा सर्व शिंद्याचे पत्रांतील मजकुराचा उतारा (अगर गोषवारा) अंताजीपंत देत आहे.

दिवस, पुण्याहून फौज लवकर येणार नाहीं, सबब तुम्हांस इतिहास सर्व कळावा म्हणोन लिहिलें आहे. तरि पत्रदर्शनीं भारी फौज घेऊन दुमजला मजला करून जलद येऊन सामील होणें. येते समयीं बाणांच्या कैचे च्या जेजाला आणणें. त्याप्रमाणें पत्रें मागें पत्रें आलीं. कारकून शुतरस्वार जासूद जोडया आल्या. व तुम्हांस इकडे येण्याविशीं पुण्यासही पत्रें गेलीं आहेत. तिकडून आज्ञापत्र येतच आहे. जलदीनें निघोन येणें. म्हणोन मारवाडांतून पत्रें शिंदे यांचीं आलीं.

ऐशियास श्रीमंत राजश्री दादासाहेब यांची आज्ञा, गोपाळराव गणेश बर्वे यांचा मामलतींचा बंदोबस्त करून देणें. दुसरा मजकूर–शिंदे यांचीं निकडीनें पत्रें आलीं. दुरोंख शह पडून अंदेश पडला. इतक्यांत पुण्याचे मुक्कामींहून शुत्तरस्वार समागमें आज्ञापत्र भाद्रपद मासाचे निकडीनें आले जे, गोपाळराव गणेश याचा बंदोबस्त तोडजोड पाडून करणें. शिंदे यांची फौज मारवाडांत आहे, जयाजी शिंदे सरकारकार्यास आले, दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे जाऊन फसले आहेत, मोहरा शहास पडिला. तुमचीं सर्फराजी सर्व प्रकारें करून वाढविलें आहे. तरि मातबर सरंजामानिशीं जलद मारवाडांत जाऊन पुस्तपन्हा करून, लढाईस हमरहा होणें. साम-दाम-दंड-भेद चहूं प्रकारें युक्तीस पडेल तसें करून शिंदे यांस काढून घेऊन येणें. तरी तुमचीं तारीफ. म्हणोन दोन चार आज्ञापत्रें स्वदस्तुरचीं सादर जाहलीं. वरातीचा ऐवज राजश्री गोविंदराव बल्लाळ यांजकडून घेतला. पुढें मसलत भारी, जमाव पोक्त असावा, मारवाडांत महर्गता रुपयास चार शेर दाणे, खर्चाची बेगमी पाहिजे. म्हणून रामराव रतनसिंग वि शं ब ज दा स व आणखी सावकार झांसी, कालपी येथील यांजपासून कर्ज वीस लाख रुपये घेतलें. हमी गोविंद बल्लाळ यांची दिली. गोपाळराव बर्वे यांचा गोविंदराव बल्लाळ यांचा तह निम्मेनिम महाल वांटून देऊन केला. तो बंदोबस्त राजश्री हरी विठ्ठल यांस सांगून विजया दशमीचे मुहूर्तें कूच करून ग्वालेरीकडे गेलों. इ-ज य खान पठाण भुपाळवाले यांस एक हजार स्वार पठाणसुद्धां चाकरसि ठेविले. ग्वालेरीचे पठाण बाराशें ठेविले. कांहीं मराठे स्वार झाशीपैकीं, एकूण तीन हजार फौज जास्ती ठेविली. शंभर उंट बाणांच्या कैंच्या भरून घेतले. पंचवीस जेजालाचे उंट घेतले. मारवाडांत महागाई, व मोहीम कठीण, सबब लोकांनीं गवगवा केला, [कीं,] बक्षीस व जाजती तैनाता केल्याखेरीज आम्ही येत नाहीं. तेव्हां लाचार जाणून जाजती तैनाता बक्षीस, हत्ती, घोडे, पालख्या, चौकडे, कडीं योग्यायोग्य पाहून कबूल केलें. व चौथाई तूर्त नालबंदी देऊन फौजेची समजाविशी करून, दहा हजार फौजेनिशीं मारवाडचे रोखें चालिलों. राठोड व कछवे जयनगरवाले एकत्र जाले, जमाव भारी पडला. शिंदे यांजकडील फौज दोन छावण्या व महागाई बाबद खराब आहे. त्याअर्थी सरंजाम चांगला असावा म्हणोन केरोलीस आलों. राजे गोपाळसिंग केरोलीवाले व रामसिंग हाडे बुंदीकोटकर यांचा व सेवकांचा स्नेह पूर्वीपासून आहे. सबब उभयतांस मोहिमेस चालणें म्हणोन सांगितलें. त्यांणीं मान्य केलें. परंतु दर स्वारास दररोज खर्च दोन रुपये द्यावे व एक साल खंडणी आम्हांस माफ करावी म्हणजे येतों, [असें बोलले.] तेव्हां त्याप्रमाणें मान्य करून, उभयतां राजे मशार-

निल्हे यांस दर पांच हजार फौजेची नेमणूक सांगोन, दोघांची दहा हजार फौज व मशारनिल्हेस घेऊन चालून नदीपार जालों. हा मजकूर तपशीलवार शिंदे यांजकडे नागोरास लिहून सांडणीस्वार रवाना केला, व वाबळे, खराडे यांस पत्रें पाठविलीं कीं, दर मजल येतों, तुम्ही धैर्य धरणें, आणि फौजेस ताकीद करून कहीवाले यांस मुलूख लुटावयास जयनगर प्रांतांत सांगितलें. त्यांणीं धूम करून, मुलूख लुटून, मराठी कावा करून, गांव जाळिले. हें वर्तमान राजे माधोसिंग जयगगरवाले यांस कळलें. चाळीस हजार फौजेची आवाई पडली. माधोसिंग कछवे जयनगरवाले यांजकडे कारकून पत्रें देऊन पाठविले कीं, श्रीमंतांची कृपा तुम्हांवरी आहे सालाबाद खंडणी देऊन जाजती उपसर्ग तुम्हांस लागत नाहीं. असें असोन तुम्ही आपली फौज राठोड यांजकडे कुमकेस पाठविली आहे. जयाजी शिंदे सरकारकार्यास आले. शिंदे यांचें अवश्यक श्रीमंतांस आहे. सबब आम्हांस आज्ञा केली जे, भारी सरंजामानिशीं जाऊन राठोड यांस तंबी पोंचवून राजे रामसिंग यांस राज्यासनीं बसवून शिंदे फौजेसुद्धां [घेऊन] तुम्हीं हुजूर येणें. त्यावरून आम्ही दर कूच आलों. दरमियान तुम्हाकडील फौज आहे तिचा मोकाबला घेऊन लढाई करून फौज गारत करून मग पुढें बिजेसिंग राठोड यांचें पारपत्य करूं. स्पष्ट समजोन वर्तणूक करणें असें सांगोन पाठविलें आणि लांब लांब मजली करून कसबे दिंडवणे प्रांत मजकूर येथें आलों. जयनगरची फौज व शिंदे यांचे फौजेची लढाई होत होती. अनिरुद्धसिंग यांची फौज भारी याजमुळें रगडीत चालिले. तीस कोसांची तफावत नागोरची राहिली. इतकियांत सेवकानें फौजसुद्धां जाऊन शह दिला. परंतु जयनगरची फौज हांवभरी जाहली. नगदी सामान भारी, यामुळें दोन कूच दाटी करून त्यांणीं केली, आणि तोफा व गंजिफांची मारगिरी केली. हत्यार लागेना. तेव्हां शिंदे यांजकडील सरदार यांस बोलावून आणून मसलत केली जे, नागोरा समीप उतरले, राठोड व कछवे, एकत्र जाहले, म्हणजे भारी पडेल. यास्तव तुम्हीं एक बाजूस होऊन लढाई द्यावी, आम्हाकडील होंडे व केरोलीकर उभयतां राजे एकीकडे लढाई करतील. व आम्ही एकीकडे होऊन चौगीर्दा लढाई करावी. यश देणें श्रीमंतांचें पुण्य आहे. याप्रमाणें करारांत आणून तीन टोळ्या करून लढाई सुरू केली. त्यांणींही मारगिरी भारी केली. लोक व घोडीं बहुत जायां झालीं. मग श्रीमंत स्वामींचे चरण दृष्टीस आणून घोडे घातले. ज्याप्रमाणें श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांणीं निजाम अल्लीखान याचे फौजेवरी हल्ला करून दुमदारी बुडवून मोंगल

---

१ ' करून ' हा शब्द काढून टाकिला तर संबंध बरा जुळतो. " कछवे हांवभरी होऊन दोन कूच आमचे होत असतां त्यांणीं आम्हांभोंवतीं दाटी केली. नगदी सामान आम्हांजवळ असल्यामुळें आमचा विशेष यत्न चालेना " असा अर्थ होईल. नगदी सामान–रोकड पैका.

२. हाडे बुंदीकोटेकर ह्यांच्या शौर्याविषयीं, अढळपणाविषयीं, फार लौकिक आहे. ह्यांच्या राजांनीं आपल्या कुटुंबाच्या ' शाका ' करून युद्धामध्यें शेवटीं आत्माहुति दिल्याबद्दल इतिहासांत प्रसिद्ध आहे.

पस्त केलीं, त्याप्रमाणें येथें करून दुमदारी बुडाविली. दोन कोस माघारे सारिले. चौगीर्दा चौक्या बसवून कोंडिला.

इतकियांत राजे माधोसिंग यांणीं जयनगराहून पत्रें अनिरुद्धसिंग यास पाठविलीं जे, पूर्वी दिल्ली शाहाजाहानाबाद येथें हजरत पातशहानीं ल सू भाजि याचे खिजमतीस दक्षिणेहून राजे अंताजी माणकेश्वर यास फौजसुद्धां पाठविलें. ते समयीं नबाब मनसूर अल्लीखान जाफरजंगबादकर वजीर याची व हजरत पातशहाची लढाई झाली. ते समयीं राजे मशारनिल्हे यांणीं लढाई बहुत करून नबाब मसूरअल्ली खान याचा पराजय केला. ते हल्लीं शिंदे यांचे कुमकेस आले आहेत. चाळीस हजार फौजेची आवाई ऐकतों. यास्तव तुम्ही पुढें न जाणें. कळेल तसें करून सल्ला करून निधोन येणें. अगर मगरूरी करून पुढें गोलियास फौज गारद करून देतील. स्पष्ट समजोन माघारे फिरणें. याप्रमाणें पत्रें जयनगराची येतांच अनिरुद्धसिंग यांणीं तह करावा याबद्दल वकील येलचीं पाठविले. लढाईचीही जरब बसली. चौगिर्दा चौकी दिली. यामुळें दाणा वैरण बंद होऊन महर्गता पडली. आम्ही सांगोन पाठविलें कीं, तहच करणें तरी तुम्हीं खांसा व संस्थानिक आहेत त्यासुद्धां वोलीस येणें, फौज लावून देणें. नागोरास गेल्यावर ज्याप्रमाणें राजश्री पाटीलबाबा आज्ञा करतील त्याप्रमाणें वर्तणूक होईल. म्हणून. त्याजवरून त्यांनीं मान्य करून शकावत, रजावत व कुपावत तनैरुके इत्यादि संस्थानिकसुद्धां तीनशें राऊत घेऊन सेवकाचे लष्करांत उतरले. वरकड फौज जयनगरास गेली. रामबाण व कृष्णबाण दोन तोंफा नामीं पंचरसी होत्या त्या घेतल्या आणि कूच करून नागोरास आलों. उभयतां शिंदे दोन कोस येऊन लोकांच्या भेटी घेतल्या व सेवकाची भेट जहाली. उभयता राजे समागमें होते. त्यांच्या भेटी बहुमानानें सांप्रदायाप्रमाणें जाहल्या. लष्कराचा मुक्काम जाहला. अनिरुद्धसिंग जयनगरवाले वगैरे संस्थानिकांच्या भेटी जाहल्या. दुसरे दिवशीं तयार होऊन नागोरावर लढाई केली. राठोडाची शिपायागिरीची स्तुत काय लिहावी ? विजेसिंग तयार होऊन आला. लढाई सुरू झाली, आम्हांकडील उभयता राजे होते त्यांची यांची रजपुतांची लढाई लागली. हाडे यांची शिपायागिरी राठोडास ठावून आहे. घोडे सोडून खेत केलें, ख ण ख ण ता त तर्वारेची लढाई जहाली. दुतर्फा ही बळी रजपूत एकमेकांस हटेनात. म्हणून बहुत [माणसें] दुतर्फा जायां जहालीं. बोळखीची लढाई, यामुळें मागें पाय टाकीनात तेव्हां सेवकानें दुसरीकडे बाण व जेजालांचा मार राठोडावरी केला व लोकांनीही घोडे बेशक घातले. शिंदे उभयतां सरदार उभे राहून

---

१. यावरून अंताजीपंत हे भाऊबरोबर १७५२ च्या लढाईंत होते असें दिसतें.
२. जाफरजंगाबाद–अयोध्या ? ३. हें लिहिणें आत्मप्रशंसेचें आहे.
४. एला (वेलदोडे) सामदर्शक होय.
५. ' कळल्यावर ' किंवा ' गेल्यावर ' ?
६. ह्यांतील कांहीं मारवाडांतील असावे.
७. घोडे सोडून, घोडे टाकून, पायउतारा होऊन.

तमाशा पाहिला. दोन प्रहर लढाई जहाली. तेव्हां आगीचे मारानें विजेसिंग राठोड माघारे सरोन किल्याचे आश्रयास गेले. आपली फौज व हाडे केरोलीकर देहीं मुक्कामास आले. राजश्री दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे यांणीं उभयतां राजांस आलिंगन देऊन मर्दुमकीची स्तुती केली. सेवकास सांगितलें कीं, तुम्हीं आलां त्यासारखे कामकाज चांगलें जहालें.

त्यावरी विजेसिंग राठोड यांणीं येलचीं सेवकाकडे पाठवून तहाची बोली लाविली. तुम्ही आलां तुमचेच मारफतीनें जें बोलणें असेल तें बोलोन तह करितों. याउपरि लढाई राहिली म्हणून वकिलानें येऊन सांगितलें. त्यास सदरहू मजकूर राजश्री पाटीलबाबांस विदित केला. परंतु त्यांचे मर्जीस तह करावयाचे येईना. आज दोन तीन सालें या मसलतीस लागोन खर्चाखालीं आलों. शेवटीं वडीलही सरकार-कार्यावर आले; आणि राजे रामसिंग राठोड यांचाही बंदोबस्त जहाला नाहीं. यास्तव सल्लाही आपण करीत नाहीं. आणखी वर्ष सहा महिने राहून विजेसिंगाचें पारिपत्य करून रामसिंगास राज्यासनीं बसवून मग देशास जाऊं; तोंपर्यंत जात नाहीं. याप्रमाणें वकिलास जाबसाल सांगितला. त्यावरून वकिलांनीं जाऊन विजेसिंग यांस सांगितलें. त्यावरून त्याजला जरब भारी बसली. तेव्हां सेवकाकडे पेगाम बहुत बर्जिदे होऊन लाविला कीं, तुम्हीं श्रीमंतांकडून आलां आहां व तुमची मर्दुमीही पाहिली. याउपरि कळेल तसें चार गोष्टी पाटील बाबांस सांगून विवेक करवावा. ज्याप्रमाणें मर्जी असेल त्याप्रमाणें मी राजी आहें.रामसिंग यास राज्यीं बसवून मला सांगाल त्याप्रमाणें राहीन. खर्च आजितागायत पडला आहे. जीवनमाफक सांगाल त्याप्रमाणें देईन. तुमच्या वचनाशिवाय एकंदर नाहीं. असें बोलणें जाहलें. तेव्हां राजश्री पाटीलबाबांस त्या अन्वयें निवेदन केलें, आणि सरकारचीं आज्ञापत्रें सेवकास आलीं होतीं तींच बाजिन्नस दाखविलीं, आणि सांगितलें जे, याउपरि फार ओढूं नये खर्च जाहला त्याची विल्हे व रामसिंगास स्थानावर बसावयाचें व मुलूख वांटून घेऊन यश घेऊन श्रीमंताचे दर्शनास जावें हें बरें आहे. तेव्हां मान्य जाहलें. राज्याच्या तीन वांटण्या केल्या. एक सरकारची व एक बिजेसिंग एक रामसिंग याप्रमाणें तह झाला. पांच क्रोड रुपये सरकारची नजर, दोन करोड दरबार खर्च व कांहीं सेवकाचे मिळोन याप्रमाणें ऐवजाची निशा घेतली. नागोर मुख्य स्थळ तेथें रामसिंग यांणीं राहून राज्य करावें. झालोर किल्ला तेथें विजेसिंगानें असावें. जोतपूर किल्ला सरकारांत ठेवावा. याप्रमाणें करारांत जाणून विजेसिंग याची भेटी करविली. परस्परें हत्ती, घोडे, वस्त्रें बहुमान जाला. रामसिंग व विजेसिंग यांची भेट होऊन किलाफ तोडिला. राजे रामसिंग हाडे बुंदीकोटकर व राजे गोपाळसिंग केरोलीकर याचा करार केला होता तो पाटीलबाबांस सांगून, एक सालची खंडणी माफ करून हत्ती, घोडे, जवाहीर, वस्त्रें, मेजवानी इत्यादिक आदर त्यांच्या योग्यतेप्रमाणें करून उभयतांस निरोप दिला. अनिरुद्धसिंग

---

१ याप्रमाणें तह कदाचित् ठरला असेल पण अमलांत आला किंवा नाहीं ह्याविषयीं संशय आहे. अजमीर प्रांत मात्र जो सर्व रजपुतस्थानचें नाक-तो मराठ्यांस मिळाला.

व आणिक संस्थानिक जयनगरचे होते त्यांच्या भेटी करविल्या. त्यांनीं फोज पाठवून कुमक केली त्याबद्दल गुन्हेगारी दोन करोड रुपये सावकारी निशा घेऊन त्यास जयनगरास पाठविलें. याउपरि मुहूर्त पाहून तेथून कूच करून रूपनगरवाले याजकडील खंडणीचा फडशा करून शिंदे यांस फोजेसुद्धां घेऊन हुजूर येतों.

ज्याप्रमाणें सरकारची आज्ञा होती त्याप्रमाणें चाकरी बजावून दिली. या मसलतीस लाखों रुपये देणें सावकारी आहेत. त्याचा परिहार होऊन पुढें आधिक ऊर्जित करणार स्वामी समर्थ आहेत. साहेबनौबत माहीमरातिब झालरदार पालखी देऊन सरदारी वाढवून सर्फराजी केली.त्याअन्वयें सेवा करून दाखविली.मनविशीं [म्हणाविशी] लोकांनीं चाकरी केली आहे तो अर्थ राजश्री पाटील × बावा सेवेसीं विदित करतां घ्यानास येईल. तपशील बहुत लिहिला आहे. येविशीं चिटणीसास आज्ञा होऊन श्रवण करावयास स्वामी समर्थ आहेत सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

* * * * *

ही बखर भिकाजी नारायण अभ्यंकर वस्ती सुशेरी तालुके खेड तर्फ सुवर्णदुर्ग क्षेत्र परशुराम सूत्र हिरण्यकेशी गोत्र वसिष्ठ याची असे. शके १७२१ सिद्धार्थीनाम संवत्सरे पौष वद्य १३ त्रयोदशी गुरुवार ते दिवशीं बखर समाप्त. हस्ताक्षर गोपाळ गोविंद जोशी मुक्काम वेळणेश्वर हल्लीं वस्ती मौजे सुशेरी सन १२०० माहे सबान सुा मयातैन अलफ. श्रीभार्गवराम प्रसन्न.

ले. १४४ [३५०] | श. १६७८ श्रावण व. ७ ता. १७।८।१७५६

॥ श्री ॥

पुरवणी राजश्री जनकोजी शिंदे गोसावी यांस

आशीर्वाद उपरि. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. सा मा कोटें येथील चाळीस लाख रुपये खंडणी केलियाचा लिहिला त्यापैकीं सरकारचा नजराणा पंधरा लक्ष रुपये करार केले, त्या पैकीं सालमजकुरीं दहा लक्ष रुपये द्यावे, बाकी पांच लक्ष रुपये पेस्तरसालीं द्यावे, याप्रमाणें करार केला आहे म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास प्रस्तुत सरकारांत ऐवजाची निकड बहुतच आहे. याजकरितां सदर्हू नजराण्यापैकीं दहा लक्ष रुपये सालमजकुरीं यावे ते सत्वर तर्तूद करून पाठविल्यास फारच उपयोगी पडतील. यास्तव पत्रें पावतांच दहा लक्ष रुपये सत्वर पाठवून देणें. वरकड मारवाड प्रांतें वगैरे ऐवज स्वारीमुळें जमा जहाला असेल तो तुम्ही देशास याल ते समयीं समागमें घेऊन यालच. यंदा* पैकियाची ओढ फारच जहाली आहे.याजकरितां निकड जाणून लिहिलें असे. रवाना छ २० जिलकाद सुा सबां खमसेन मया व अलफ.

× दत्ताजी शिंदे. अंताजी माणकेश्वर पानिपतावर पडला त्यापूर्वीची ही हकीकत.

* येथपासून खुद्द खाशांचें हस्ताक्षर. हें पत्र सदाशिवराव भाऊ यांणीं लिहिलेलें दिसतें.

ले. १४५ [३४९] | शा. १६७८ भाद्रपद शु. १४ ता॥ ७-९-१७५६

राजश्री रामाजीपंत भाऊ गोसावी यांसि.

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य. स्नेहा दत्ताजी शिंदे दंडवत विनंती उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींनीं पूर्वी आज्ञा केली होती कीं, घरास आल्यावर शिल्लक किती व लोकांचें कर्ज काय जालें, त्याचा खर्च कैसा केला, त्याचा ताळेबंद लेहून पाठवणें. म्हणोन लिहिलें होतें. त्यावरून ताळेबंद लिहून राजश्री रामराव नारायण याजबरोबर पाठविला + आहे. तो श्रीमंतास दाखवून जाब घेऊन आज्ञा मागोन येणें. येथील वर्तमान तर, आम्हीं करंजीच्या घाटें तोंडास आलों. पुढें गंगातीरास जातों. फौज जमा झाल्यावर गंगापार होऊन जाऊं. कित्येक वर्तमान राजश्री रामरावजी सांगतां कळों येईल. त्याप्रमाणें करावें. रा॥ छ १२ जिल्हेज. बहुत काय लिहिणें हे विनंती.

मोर्तब सूद

ले. १४६ [३४७] | शा. १६७८ भाद्र. व. ७ ता॥ १५-९-१७५६

॥श्री॥

राजश्री रामाजीपंत भाऊ गोसावी यांसि.

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य. स्ने॥ दत्ताजी शिंदे दंडवत विनंती उपरि येथील कुशल ता॥ छ १९ जिल्हेज जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत गेले पाहिजे. विशेष तुम्हीं पत्र छ १५ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें पावलें. आज्ञेप्रमाणें श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींची आज्ञा घेऊन लष्करास यावें म्हणोन श्रीमंतांकडे गेलों होतों. आज्ञा आली कीं, राजश्री रामराव नारायण हिशेब घेऊन येतात. ते आल्यानंतर तुम्हीं आण ते समागमेंच जाणें. म्हणोन आज्ञा आली. त्यावरून राहिलों. रामराव आल्यावर सत्वरीच येतों म्हणोन लिहिलें. तर बहुत उत्तम असे. रामरावजी पावलें असतील. ताळेबंद सरकारांत दाखवून श्रीमंतांची आज्ञा × मागोन उभयतांही समागमेंच येणें. आम्ही गुंजाळाचा घांट उतरोन गंगातीरास जातों. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हें विनंती.

+ येथें शिक्का बाजूवर जनकोजीचा आहे

× येथें बाजूवर "श्री ज्योतिस्वरूपचरणीं तत्पर जयाजी सुत जनकोजी शिंदे निरंतर" असा शिक्का पिंपळपानाच्या आकृतीचा आहे,

ले. १४७ [३७१] श. १६७८ भाद्रपद व. १२ ता. २१।९।१७५६

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेशीं

विनंती सेवक दत्ताजी शिंदे कृतानेक विज्ञापना. सेवकाचें वर्तमान ताा छ २५ जिल्हेज पर्यंत यथास्थित असे विशेष. आज्ञापत्र छ १९ जिल्हेजचें पाठविलें तें छ २२ मिनहूस पावलें. हिशेबाची याद रामराव नारायण यांजबा पाठविली ते पावली. हिसेब ऐसा असत नाहीं, सात सालां वेगळी वेगळी झडती असावी, तर त्यासि हिसेब म्हणावा. कारकून तैनात खावून हिशेब नीट तयार करीत नाहींत. यास्तव परिच्छिन्न कारकुनांस ताकीद करून सात सालां वेगळया वेगळ्या झडत्या तयार करवणें, म्हणोन आज्ञा केली. ऐसियासि श्रीगोंद्यांत असतां एक दोन आज्ञापत्रें आलीं कीं, झडत्या पाठविणें. कदाचित् झडत्या तयार नसल्या तर स्वारी करून घरास आल्यावर शिल्लक किती व लोकांचें कर्ज घेतलें किती त्याचा खर्च कसा केला तो तूर्त ताळेबंद पाठविणें. मागून झडत्याही तयार होऊन येतील. त्यावरून कारकुनांस ताकीद करून सांगितलें कीं, झडत्या तयार करणें. सन इहिदे ताा सन सल्लास तीन सालां तर झडत्या तयार होत्याच सन आर्बा ताा सन सीत तीन सालच्या झडत्या नव्हत्या. त्या करून देणें म्हणोन ताकीद केली. तों स्वामीपासून रामराव आज्ञा मागोन श्रीगोंद्यास आले. त्यांनींही जे आज्ञा जाहली होती त्याप्रमाणेंच सांगितलें, परंतु तीन सालांच्या झडत्या तयार होत्या. तीन सालांच्या झडत्या नाहींत, कारण निमित्य कीं, आमची छावणी मारवाड प्रांतें तीन सालें जाली तेथें महालाचे हिशेब आले नव्हते. ते स्वारीहून माघारे घरास येते समयीं महालचे हिशेब तीन सालांचे गंगा उतरून येऊं तों पावेतों होतच होते. शिलेदार वगैरे लोकांची समजाविशीं तीन सालांची होणें होती ती स्वामींची भेट सिद्धटेकावर झाली तों पावेतों होत होती. त्यामुळें तीन सालांच्या झडत्या तयार नव्हत्या. झडत्या करावयास आणखी सा सात महिने पाहिजेत. या करितांच कारकून नेहमीं श्रीगोंद्यांत ठेवून झडत्या तयार करविल्या आहेत. ताळेबंद तूर्त पाठवणें म्हणोन आज्ञा होती. त्यावरून श्रीगोंद्यास आल्यावर जे शिल्लक होती व कर्जे लोकांचीं घेतली होतीं ते जमा धरून खर्च जाला तो अखेर सालपावेतों लिहून पाठविला. तो कांहीं हिशेब नव्हे यथार्थच आहे. राजश्री रामराव येथून गेले, तेव्हां सांगितलें कीं, झडत्या करून मागाहून पाठवून देऊं, याप्रमाणें विनंती करणें. त्यांनीं हि विनंती केली असेल. वारंवार ताकीद पत्रें येतात कीं, हिशेब सात सालां पाठवणें, तर आम्ही चाकर लोक आहों. वावगी वर्तणूक करूं अगर न करूं हें सर्व स्वामी जाणतच आहेत. झडत्या सत्वर करावयानिमित्य दफ्तरदार रामाजीपंतकडील श्रीगोंद्यांत ठेविले आहेत. झडत्या तयार जाहल्यावर सेवेशीं पाठवून देऊं. कच्चे कागद पाठवावयाची आज्ञा जाली तर कच्चीं दफ्तरें पुण्यास पाठवून देऊं. झडत्या

---

१ नगरजिल्ह्यांत ता. श्रीगोंदें.

तयार असत्या तर मागेंच पाठविल्या असत्या. कारकुनास बेमुलाहिजा ताकीद केली आहे. सत्वरीच झडत्या तयार होतील. राजश्री रामाजीपंत स्वामींची आज्ञा घेऊन येतील. दफ्तरदार त्यांजकडीलच आहेत. लष्करास आल्यावर त्यांसिहि ताकीद आज्ञाप्रमाणें केली जाईल. तेही आपल्याकडून कारकुनांस ताकीद करतील. झडत्या तयार झाल्यावर सेवेशीं पाठवून देऊं. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञप्ती.

ले. १४८ [३४८]

श. १६७८ आश्विन शु. ७ ता ३०-९-१७५६

॥ श्री ॥

राजश्री रामाजीपंत भाऊ गोसावी यासि.

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य. स्नेहा जनकोजी सिंदे दंडवत विनंती उपरि येथील कुशल ता॥ छ ५ मोहरम जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. हिशेब पाठविला तो श्रीमंतास दाखविला. परंतु ह्या हिशेबानें समजावीस होत नाहीं. साता वर्षांच्या झडत्या तपशीलवार ऐशा पाहिजेत म्हणोन लिहिलें. तर साता वर्षांच्या झडत्या न द्याव्या, न दाखवाव्या, हें कांहीं आमच्या चित्तीं नाहीं. झडत्या झाल्यावर दाखवाव्या हें आमच्या चितीं होतें. झडत्या तयार नाहींत म्हणोन मात्र न दाखविल्या. दुसरा गुंता काय आहे ? हें सर्व तुम्ही जाणतच आहां. झडत्या तयार करून सरकारांत द्याव्या म्हणून कारकून नेहमीं श्रीगोंद्यांत ठेविले आहेत. झडत्या तयार झाल्यावर पाठवून देऊं. कदाचित तूर्तच आणवीत असतील तर झडत्या तयार नाहींत, परंतु कच्चेच कागद उंटावर घालून पुणियास पाठवून देऊं. याप्रमाणें श्रीमंतांसि जाबसाल करणें. आज्ञापत्र आल्यावर दफ्तर पाठवून देऊं म्हणजे त्यांची तरी समजावीस होईल. बाँबती व सरदेशमुखीचा पैका[2] तूर्त मागतात. फाजील जालें तें हिंदुस्थानास गेल्यावर श्रीमंत राजश्री दादा साहेबापाशीं उगवून द्यावें म्हणोन आज्ञा जाली म्हणोन लिहिलें. तर आमच्या घरांत शिल्लक आहे अथवा नाहीं हें तुम्ही पुर्तें जाणतच आहां. समजाविशीस ऐवज लोकांचा घेणें लागला तो माळव्यांतून ऐवज आणविला. तो त्यांस दिला; तरी लोकांचीं देणीं तैशींच राहिलीं आहेत. त्याशिवाय नित्य रोजमुरा लोकांस द्यावयास ऐवज पाहिजे त्यास तर रोजमुरा द्यावाच लागतो. ऐशी चोहोंकडून अडचण आहे. याप्रमाणें जाबसाल करून निरोप मागोन लष्करांत आलें पाहिजे. श्रीमंतांस खर्चास मागितलें परंतु द्यावयाचा अनमान करितात म्हणोन लेखन केलें, तर येते समयीं मागोन पाहणें, दिल्हें तर फारच उत्तम जालें. नच देत तर आम्हीं चाकर लोक आहों. खावंदाशीं बळ

---

१. होळकरांची कैफियत पृष्ठ २२ टीप ४१ पहावी. हिशोबाचा नेट पेशव्यांकडून होता. पण शिंद्यांनीं बेजबाब किंवा उडवाउडवीचें उत्तर दिलें नाहीं असें या पत्रावरून होतें.

२. चौथाईचा वसूल येईल त्यांतून सरकारांत जो पैका जमा होणें तो 'बाबती.'

कोठवर करावें ? कर्जवाम जालें तर ते गोष्टीची चिंता खावंदांसच आहे. कर्ज होईल तें तेच वारतील. बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले. १४९ }
[३४६] }

{श. १६७८ मार्गशीर्ष शु. ३
{ता॥ २४-११-१७५६

॥ श्रीलक्ष्मीकांत ॥

पौ॥ छ २८ रबिलोवल.

राजश्री बाळाजी पंडित प्रधान गोसावी यांसि.

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहा जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. गोसावी यांनीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. लिहिलें वर्तमान अक्षरशहा अवगत जालें. राजश्री शिवाजी भिकाजी यांजकडे बाबती सरदेशमुखी प्रमाणें वराड येथील सालगुदस्ताचा आषाढमासचा [ऐवज] साडेब्याण्णव हजार रुपये येणें; त्यास मुदत होऊन गेली. त्यांस ताकीद करून ऐवज पाठवावा. मशारनिलेचा बंदोबस्त करून मामला यथास्थित चालविला नाहीं. म्हणोन ऐवजास दिरंग लागला. शिवाजी भिकाजी आपले तर्फेचेच आहेत. म्हणोन विस्तारें लिहिलें. ऐशियास गोसावी यांनीं आमचे निसबतीस अमल दिला आहे त्याचा बंदोबस्त न केल्यानें सरकारचा ऐवज सुटेल कीं काय ? मामलतीचा बंदोबस्त करणें तो आम्ही केलाच आहे. शिवाजी भिकाजी आमचे तर्फेनेंच आहेत. सरकारचा ऐवज मुदतीस पाठवावा, [ही] उचित गोष्ट, परंतु निजामअल्ली आले यांनीं वराडांत दंगा नजरेचा केला याजमुळें, महालों महाल बाकी राहिली आहे; म्हणोन मुदतीस* अंतर जालें. अतःपर आम्ही वराडांत येतांच झाड्यानशीं ऐवज पाठवीत असों. पेस्तरसालचा मजकूर लिहिला. सरदेशमुखीचा अमल आम्हांकडे तहनामियांत गोसावी यांनीं लिहून दिल्हाच आहे. आहे, त्याप्रमाणें सालमजकुरच्या ऐवजाची ताकीद मामलेदारांस केलीच आहे. करारप्रमाणें अंतर होणार नाहीं. × र॥ छ १ माहे रबिलावल. वराडांत आलियावर ऐवजाचा निकाल मामलेदारांस सांगून जलदीनें ऐवज यावे ऐसें होईल. सुज्ञाप्रती विशेष काय लिहिणें ? कृपा लोभ असों दिला पाहिजे, हे विनंती



---

* येथें बाजूवर " श्रीशाहू राजपदांभोज भ्रमरायितचेतसाः विवात्मजस्य " असा शिक्का अष्टपैलू आकृतीचा आहे. × येथपासून खुद्द खाशांचें हस्ताक्षर.

ले. १५० [७१] श. १६७८ मार्गशीर्ष व. १३ ता १९-१२-१७५६

॥ श्री शंकर ॥

राजश्री बाळाजी पंडित प्रधान गोसावी यांसि—

छ सकळगुणाळंकरण अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य. स्नो हणमंतराव निंबाळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. आपणांकडून राजश्री काशीराऊ दिवाण व राजश्री राजजी जुंझारराऊ घाटगे व रा तुकोजी चव्हाण आले यांनीं आपणांकडील कितेक स्नेहाचें व उत्तर प्रत्योत्तर जाल्याचें वर्तमान सांगितलें त्यावरून कळोन आलें. ऐशियासि आपणांशी जो निश्चय हे करून आले त्याप्रमाणें राजश्री फिरंगोजी निंबाळकर याजबा दोन हजार फौज देऊन रवानगी केली. येविषयीं राजश्री दतबांनींही गोसावी यांसि पत्र लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. उभयपक्षीं दुसरा विचार आहे ऐसें नाहीं. रा छ २६ रोवलें बहुत काय लिहिणें कृपा असों दीजे हें विनंती.

श्री शिवचरणीं तत्पर बापुजी सुत हणमंत राव निंबाळकर

मोर्तब सुद

ले. १५१ [३६१] श. १६७८ सन १७५६

॥ श्री ॥

आशीर्वाद उपरि. बिजेसिंगाचा वकील रुपयांचा निशा करावयाचा मजकूर पुणियांत बोलत होता. आम्हीं साफ म्हटलें कीं, दत्तोबाचे मनास आलें तर तुम्हीं येणें. त्यास त्याची आर्जी व कृष्णराव पारसनिसाचें पत्र यावें न यावें याविशीं आलें आहे. त्यास जलद जाब सांडणीस्वारा समागमें पोंहोचला पाहिजे. तर रामाजीपंत रामराव यासमागमें त्यास काय

---

१ गोविंदबाबा बिन वासुदेवबावा दीक्षित पाटणकर सावकारी करीत. त्यांचें कर्ज दत्ताजीनें देणें. त्याची फेड दत्ताजी, मारवाडच्या बिजेसिंगाकडील पैसा जयाप्पाच्या मुंडकटाईबद्दल येणें होता, त्यांतून करणार होता. पैशाची तडजोड करण्यासाठीं मारवाडचा वकील पुण्यास आला. पेशव्यानें त्यास दत्ताजीकडे हवाला देऊन पाठविलें. मारवाडचा पैसा येईना व गोविंदबावाची फेड होईना. म्हणून गोविंदबावा व इतर पैठणकर ब्राह्मण दत्ताजीचे दारांत धरणें धरून उपास करूं लागले. तेव्हां ब्राह्मणांस जोर करून गप्प बसाविण्याविषयीं दत्ताजीनें पेशव्यास लिहिलें, त्यावर पेशव्याचें हें उत्तर आहे. ब्राह्मणांवर जबरदस्ती करून प्रकरण मिटणार नाहीं, त्यांची समजूत काढावी असें पेशवा दत्ताजीस सुचवितो. [गो.स.स.]

रामाजीपंत दाभोळकर सिंद्याचा कारभारी. रामराव नारायण सिंद्याचा हिशेबी कारकुन.

लिहावें, तें सांगून पाठविणें. पैठणचे ब्राह्मण आमचे दारीं उपास करीत बसणार ऐशियास गोविंदबाबांचें अगत्य जसें तुम्हांस तसेंच आम्हांस. परंतु ब्राह्मणांचे बोभाटास इलाज नाहीं. याची समजाविशी होय तें करावें तरच उत्तम. समजाविशी न होतां जोरावारीवर गोष्ट आलिया ब्राह्मण आमचे दारीं उपास करूं लागतील, आम्हींही सहजच उपाशीं राहूं, या थरास जाईल. ब्राह्मणांचा बोभाट काय ? आपण खावंद आहेत. सर्व त्यांस बोलावून पुसावें. बाजवी असेल तें करावें. ब्राह्मणापाशीं बळ चालणार नाहीं व करूं नये. गुंता आम्ही फार कल, शेवटीं नाइलाज जाणून याप्रों केलें. आतां जें करणें तें समजाविशीं काढून करावें. हे आशीर्वाद. तुम्ही त्रिवर्गच हेच चिठ्ठी पहाणें. फाडून टाकणें हे आशीर्वाद.

ले. १५२ [३५६] { सन १७५६

श्री.

राजश्री दत्ताजी शिंदे गोसावी यांसि.

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य. स्नो रघुनाथ बाजीराव आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष रो विष्णु महादेव+ यांजकडील ऐवज तुम्हांकडे जमा करविला होता तो जमा जालाच [असेल] त्यास तुम्हांस आम्हांकडे याव-याचें नसेल तरि जो कोणीं तुम्हां अगोदर आम्हांकडे येत असेल याजबराबरी मशारनिले बाबत पैका आधीं हुजूर पाठवून देणें. ओझ्यास उंटें त्या बराबर तुम्हांजवळ अधिक असलीं तरी देऊन पाठवणें. विठ्ठल शिवदेव अथवा समशेर बहादूर अथवा हरकोणी मातबर पथक येईल त्या बराबर पाठविणें. उंटें नसलीं तरि त्यांचीं[3] + + + +

ले. १५३ [३७४] छ ८ जमादिलाखर रविवार { ता॥ ७-२-१७५७

श्रीलक्ष्मीकांत.

राजश्री बाळाजी पंडित प्रधान गोसावी यांसि.

छ सकळ गुणाळंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ जानोजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें

---

१ गुदस्तां. २ हें सर्व पत्र नानासाहेबाच्या हातचें दत्ताजी शिंदे यास लिहिलेलें आहे.

+ विष्णु महादेव गद्रे, सावकार.

३ पुढें एक दोन ओळी फाडून गेल्या आहेत.

पाहिजे. विशेष. गोसावी यांना पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जहाला.

ऐसीयास गोसावी यांचे लक्षानरूपचा इकडील विचार आहे. वरकड सविस्तर अर्थ वरचेवरि पत्रीं लिहिला आहे. त्याजवरून श्रुत जहाला असेल. वारंवार ल्याहावें ऐसें नाहीं. फौज तयार आहे. जिकडे बोलाविलें तिकडे येत असों. वोढगस्त सरदारी याजमुळें गवगवा येऊन पडतो. या उपरि विलंब न लावितां गोसावी यांचे आज्ञेप्रमाणें मजल दर मजल फौजेसह गंगातीराकडे येत असों. गोसावी यांचे आज्ञे खेरीज आम्हांकडील तीलतुल्य विचार नाहीं. खान, छ १७ माहे जमादिलोवल +सुज्ञांप्रती विशेष काय लिहिणें. कृपा लोभ असूं दिला पाहिजे हे विनंती. लेखन सीमा. + येथपासून खुद्द जानोजीचें अक्षर.

ले. १५४
[३६]

शा. १६७९ चैत्र शु. ८
ता। २८-३-१७५७.

॥ श्री ॥

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव बावा दीक्षित स्वामींचे सेवेशीं. सेवक जानोजी भोसले सेनासाहेब सुभा, दंडवत. विज्ञापना येथील कुशल ता। छ ७ माहे रजब मुक्काम मालडगांवपर्यंत सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. यानंतर स्वामींचे भेटीची बहुत अपेक्षा आहे. यास्तव आपणाकडे पत्र लेहून जासुद जोडी पाठविली आहे. ऐसीयास उदईक मंगळवारीं आमचा मुक्काम दुधनातीरीं करंडीवर आहे. तेथून दर मजल सत्वरच वराडप्रांतीं जाणें आहे. योवेशींचा अर्थ सेवेशीं लिहिला आहे. तरि स्वामींहीं कृपा करून सत्वर भेटीस आलें पाहिजे. येते समयीं राजश्री शामराव विश्वनाथ यांस समागमें घेऊन यावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. १५५
[३५]

शा. १६७९ चैत्र शु. १०
ता. ३०-२-१७५७

॥ श्री ॥

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेवबाबा दीक्षित स्वामीचे सेवेशीं. सेवक जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विज्ञापना येथील कुशळ ता। छ ९ माहे रजब मु॥ नजीक जाफराबाद येथें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष.-स्वामींनीं पत्र पाठविलें तें

प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाला. भेटीचा माार लिहिला कीं पैठणावरि मुक्काम होत तरि येणें होतें. लांब यावयासि योग्य घडत नाहीं म्हणोन लिहिलें. त्यास पैठणावरि मुक्काम करावे तरि तो विचार कांहीं विस्तारयुक्त ल्याहावा असें नाहीं. संकल्पित मजकूर पहिले पत्रीं आपणास लिहिलेलाच आहे. यास्तव उंदरीवरि त्वरेनें जावें लागेल म्हणोन गंगातीरीं मुक्काम नेमले. उंदरीवरि मुक्काम नेमले आहेत, तेथेंच मागाहून म हं त हं स्व पंढरी बावा व बाबुराव कोनेर येतील त्यांस स्वामींच्या भेटीची अपेक्षा फार आम्हांस आहे. कैलासवासी तीर्थरूपांमागें स्वामी वडील आहेत. तीर्थरूपांपेक्षां आमचे ठायीं ममता विशेषात्कारें धरिली पाहिजे. वर्षासनाचा माार लिहिला तरी कैलासवासी यांणीं वर्षासन चालविलें आहेत. त्यांत तिलतुल्य अंतराई होणार नाहीं. तरी स्वामींनीं कृपा करून उंदरीच्या मुक्कामीं येऊन भेटीचा लाभ दिला पाहिजे. येते समयीं राजश्री शामराव विश्वनाथ यांसही घेऊन यावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. १५६ [६६] | श. १६७९ आषाढ व. १ ता. २-७-१७५७

॥ श्री ॥

पु॥ राजश्री बळवंतराव गणपत* स्वामी गोसावी यांसि—

विनंती उपरी. श्रीरंगपट्टणकरांचा प्रकार कसा आहे, बुद्धि स्थीर राहून सरकारचा पैका टक्का हसेबंदीचा देऊन दोन पट्टयांतील कोणती पट्टी सोडवितात, किंवा पैका द्यावयास अभाव करून लबाडीवर आहेत, वकील पाठविले याजशीं कसे वर्ततात, यांचें त्यांचें अंतरबाह्य कसें, व सरकारी निष्ठेनें वर्तावयाचा या न वर्तावयाचा डौल कसा घातला आहे, ते बातमी तुम्हांस येतच असेल. तरि विस्तारयुक्त त्यांजकडील वर्तमान लिहीत जावें. आदवानीकरांनीं हा कालवरी ऐवजाचा निकाल केला नाहीं. मौलवी तेथें यख्त्यारी जाले आहेत, तरि तुम्हीं त्यास वरचेवरि ताकीद करून ऐवज राजश्री मल्हार नाईक+ यांस दोविला आहे, त्यांचे पदरीं पडे तें करावें. छ० १४ सवाल हे विनंती.

---

१५७ [३७८] | श. १६७९ कार्तिक व. ११ ता. ७।१२।१७५७

श्री शंकर

राजश्री दत्ताजी शिंदे गोसावी यांसि.

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्रे॥ हणमंतराऊ निंबाळकर रामराम विनंती उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष.

---

*मेहेंदळे यास नानासाहेबानें हें पत्र लिहिलें आहे. + रास्ते.

नबाब साहेबाचा× व आपला हर्षामर्ष आजि तीन महिने वाहडला आहे. येणें करून दुतर्फाही स्नेहास उत्तम नाहीं. त्यासि त्यांचें व आपलें रहस्य व्हावें ऐसा मनोदय आमचा आहे. त्यांचे पदरीं तुम्हांसारिखे मातबर सरदार आहेत, व इकडे यांचे पदरीं आम्ही आहों. त्यास आपला आमचा स्नेह आणि जिव्हाळा, माया ममता आहे, म्हणून आपल्यास स्नेहानें पत्र लिहिलें आहे. तरि हे गोष्टी चित्तांत आणून उत्तर पाठवावें. म्हणजे कोणी कारकून पाठवून देऊं. हें यश आपण घ्यावें, यांत उत्तम आहे. बहुत लिहिणें तरि आपण सुज्ञ आहेत. र॥ छ २४ र॥बल बहुत काय लिहिणें कृपा असों दीजे हे विनंती. मोर्तबसूद.

ले. १५८ [१३३] | श. १६७९ सन १७५७

॥ श्री ॥

राजश्री **सो**मशेखर नाईक संस्थान **ह**रपनहली गोसावी यांशीं–

छ सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ **म**हादाजी **अं**बाजी आशीर्वाद उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय लिहीत असलें पाहिजे. विशेष–तुमच्या संस्थानचा मामला चुकला पाहिजे. तुम्हांकडून मातबर येऊन तह रह करावा. ऐसा निमित्य र॥ **त्रिं**बकराव **गि**रमाजी तुम्हांकडे पाठविले असतां हा कालपर्यंत मातबर पाठविले नाहीं. अपूर्व असे! अतःपर आम्ही मजल दरमजल ते प्रांतें येत असों. तुमच्या चित्तांत तह रह करावा, मुलकाचा बचाव करून घ्यावा, ऐसें असेल तर अविलंबें मारनिले बरोबर मातबर पाठवून देणें.

ले. १५९ [११०] | श. १६७९ सन १७५७

॥ श्री ॥

सेवेशीं विज्ञापना. **हिं**दुपत **बुं**धेले याणीं **अ**मानसिंगास मारिलें. टिका जहाला नाहीं. त्यांणीं महदन्याय केला आहे त्यांचें पारपत्य करणें जरूर आहे. तुम्हीं त्याचे सन्निध जाग्याचे असोन कांहींच वर्तमान लिहिलें नाहीं. तरी तुम्हांकडे राजकारण आलें असेल त्यास सविस्तर वर्तमान लिहून पाठवणें म्हणोन आज्ञा. त्यास येविशींचें एक वेळ विनंतीपत्र लिहिलें होतें, परंतु जोडी मारिली गेली. दुसरें तो जिम्मा राजश्री **गो**विंद **ब**ल्लाळ यांचा. सेवकास स्वामींची आज्ञा नाहीं व त्यांचे पुत्रांस लिहून पाठविलें त्याणीं पत्रांतील मजकूरच समजला नाहीं म्हणोन दस्तऐवज न गोवितां उत्तर लिहिलें. दुसरें गैरहंगाम दिवस आणि सेवकाजवळ फौज थोडी.

× निजाम सलाबतजंग. यानंतर एक महिन्यानें दत्ताजी शिंदे व विश्वासराव पेशवे यांनीं रामचंद्रराव जाधवास शिंदखेडच्या गढींत कोंडून निजामअलीस धुडकावून उत्तरेस साखर-खेर्ड्याकडे पिटाळलें व तेथें नानासाहेब पेशव्यानें पंचवीस लक्षांचा मुलूख घेऊन तह केला.

हिंदुपत माजोरा आहे. त्याचा लहान भाऊ खेदसिंग त्यास काढून दिल्हें. त्याचे वकील आले. बोली चालीही लागली आहे. त्याजकडील सूत्र ठीक करून ठेविलें आहे. त्याचा हिस्सा निमेचा देविल्यानें कांहीं नामजादा* चार, पांच लक्ष रुपये मिळतील ऐसें आहे. परंतु फौज पाहिजे. याजकरितां आलाहिदा पत्रीं सविस्तर विनंती लिहिली आहे. त्याप्रमाणें दोन हजार फौज आल्यियानें चार महिने पोट बाहेर भरून सरकार किफायत होईल. इतके दिवस इकडे जाहले या उपरि कालपीस जाऊं, दसरा जाहला म्हणजे इकडे येतों. स्वामींनी कृपा करून दोन हजार फौज दसरा आलीकडे येऊन पोंहचे तें करणार स्वामी समर्थ आहेत. स्वामीचे प्रतापें करून पारपत्य उत्तम प्रकारें करून होईल. हल्लीं एक पत्र हिंदुपतीस जे तुम्ही नाहाक अमानसिंगास मारून सरकारचा टिका न होतां राजे जाहलां, व खेदसिंगास काढून दिल्हा हे गोष्ट कार्याची नाहीं. हल्लीं गोपाळराव बापूजी यांस आज्ञा केली तरी मशारनिले सांगतील त्याप्रमाणें खेदसिंगास हिस्सा देणें व यांचे आज्ञे प्रमाणें वर्तणूक करणें, म्हणोन उत्तम प्रकारें निक्षून ताकीद, व एक पत्र राजे जगतराज यांस जे गोपाळराव यांस आज्ञा केली आहे तरी तुम्ही हे एक होऊन पारपत्य करणें [व] सवाई दिवाण गुमानसिंगास यांचे समागमें देणें, याप्रमाणें, व एक पत्र राजश्री गोविंदपंत यांस जे फितुर करून पा व ते स दिल्यानें उत्तम प्रकारें पारपत्य स्वामींचे प्रतापें होऊन येईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. ×

ले. १६० [४०३]

{श. १६८० चैत्र शुद्ध १० ता १७ एप्रिल १७५८

श्री

खरेदीखत शके १६८० बहुधान्यनाम संवत्सरे चैत्र शु।। १० सोमवार ते दिवशीं तिमाजी व।। कान्होजी व रामजी कान्होजी भोर मौजे भोरबाडी के।। अकोलनेर प्रे।। पांडेपेडगांव यांसि विठोजी पाटील मोकदम व समस्त दाहीजन समाकुळ पांढरी मजरे मजकूर के।। मजकूर सन हजार ११६७ कारणें खरेदीखत लिहून दिधलें ऐसिजे. सन हजार ११६१ एकसष्टीच्या सालांत दोहीं राजांचा दंगा झाला, तमाम मुलूख जाळून लुटून परागंदा जाला, त्याजमुळें मौजे मजकूर परागंदा होऊन मुलकावर गेले. तों सन हजार ११६२ बासटी मध्यें मोंगलाई कडील जागीर निघोन स्वराज्यांत श्रीमंत रा।। भाऊसाहेबांसें जागीर झाली. मग साहेबी रयत गोळा करून मौजे मजकुरास कौल दिल्हा, आणि गांवची वसात

---

* नामजादा चालून जाण्याबद्दल दिलेला ऐवज ह्या अर्थी.

१. टिकाटिळा-गादीवर बसण्याचे वेळीं वडील नातलगानें टिळा लावला म्हणजे सर्व विधि पूर्ण झाला असा रजपुतांचा समज आहे. येथें पेशव्यांच्या मार्फत व्हावयास पाहिजे होता. पत्र गोपाळराव बर्वे याचें पेशव्यास. खंड १ लें.७२ पहा.

२ हे भाऊसाहेब पेशवे नव्हत. अकोळनेरकर इनामदार रामाजी अनंत दाभोळकर ते हे होत. मारवाडांत भाऊ साहेब पेशवे कधींही गेले नाहींत.

केली, आणि साहेब मोहीम प्रांत मारवाड देशास गेले. तो मागें राजश्री **गो**पाळ **शं**कर सरदेशमुख याणीं प्रगणे मजकुरावर दंगा करून राजश्री **कृ**ष्णाजीपंत शेखदार व राजश्री **चां**दजी पाठील जाधव व **वि**साजी बाबाजी कुलकर्णी ऐशियांस धरोन ठाणें पिंपळगांवू गर्भा येथें नेऊन जबरदस्तीनें सन हजार ११६१ एकसष्टीचे खंडणी सन ११६४ चौसष्टीमध्यें केली. त्यास रुपये द्यावयास ऐवज नाहीं. कोठें कांहीं नाइलाज जाहला. मग तुमच्या गळां पडोन तुम्हांस जागा पांढरी गांवची बखळ पैकीं खरेदी दिधली. तपशील गज सुमारीं प्रें॥ करार पूर्व पश्चिम गज सु॥ ३३ उत्तर दक्षीण गज १९॥ सु।

६२७

१६॥

६४३॥

सदर्हू प्रमाणें रुमाळी गज ६४३॥ किंमत रुपये ४५ पंचेचाळीस घेऊन तुम्हांस मिरास करून दिधली असे. हद्द मोहताद पडेवळकरी पूर्वेस **रा**णोजी जासुदेव, दक्षणेस गांवची गल्ली, पलीकडे **बा**ळोजी जासूद नवी खरेदी व पश्चिमेस गांवची गल्ली, पलीकडे गांवची गांवकुसूं व उत्तरेस तुमचे तुम्ही. दरवाजा पूर्व मुखी लावावा, व मोरी दरवाजिया सेजारीं लावावी व पन्हेळ आपले अंगणाथें लावावे. येणें प्रें॥ तुम्हांस मिरास करून दिधली आहे. या जागियावर इमारत बांधोन लेकराचे लेकरी करावा आणि नांदावें. यास कोणी हरकत करील त्यास आपण समजाऊं. आपण आपले बेताळीस स्मरोन तुम्हास मिरास करून दिधली असे. हें खरेदीखत लेहून दिधलें सहीः—

निशाणी नांगर.	रामाजी व॥ कान्होजी भोर. हिसा ३ रुपये १५.
वि॥ **गो**विंद नारायण **बु**ळे जोशी कुळकर्णी मार	**रा**णोजी व॥ कान्होजी भोर वि॥ भाऊ हिस्से २ रुपये ३० तीस.

गाही.

विठोजी बिन जोमाजी पाटील मौजे भोर. **म**ल्हारजी बिन गंगाजी को॥ मार.

ले. १६१ [३७७]

श. १६८० चै. व. १२ ता ४-५-१७५८

श्री

राजश्री **र**घुनाथपंत गोसावी यांसि.

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ **मु**धोजी **भो**सले सेनाधुरंधर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे.

विशेष आपण जासूद जोडी समागमें पत्र पाठविलें, सुसमयीं प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय अवगत झाला. लाहोर फत्ते होऊन जाहानखान पळोन गेला, त्याजमागें फौजा गेल्या आहेत, म्हणोन लिहिलें, त्याजवरून बहुत संतोष जहाला. हरघडी येणार समागमें पत्रद्वारां साकल्य लिहित असावें. रवाना छ २५ माहे साबान. *सुज्ञा प्रति विशेष काय लिहिणें. लोभ असों दीजे हे विनंती. मोर्तबसूद.

---

१६२ / [३४१] — चैत्र व० १३ श. १६८० / ता ५-५-१७५८.

पौा छ ५ रमजान.

॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामींचे सेवेशीं

विनंती सेवक अंताजी माणकेश्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना सेवकाचें वर्तमान तागा चैत्र वद्य १३ शुक्रवार मुक्काम दिल्ली स्वामींचें कृपावलोकनें करून यथास्थित जाणोन स्वकीय लेखन करावयासि आज्ञा केली पाहिजे. विशेष. सेवकास स्वामींनीं कृपा करून पत्र छ ९ साबानचें पाठविलें तें पावलें. वर्तमान लाहोरचें फत्तेचें व शत्रूचे पारिपत्याचें व तिकडील मुलूख काबीज केल्याचें लिहिलें तें सविस्तर वाचून परम आनंद जाला. तो पत्रीं कोठवरि त्याहावा. हिंदुस्थानांत कीर्त, लौकिक मातबर जाली. कुल राजे, उमराऊ, सुभे, यांस दहशत पडली. सारे हिंदुस्थानचा सूड अबदाल्ली पासून एक स्वामींनीं घेतला. तेणेंकरून यशाचे पर्वत जाले! स्वामी यशस्वीच आहेत. याचा विस्तार सेवकास लेखन करावयास सामर्थ्य कैचें? हें वर्तमान वजिरांनीं ऐकोन बहुतच हर्ष मानिला. शत्रूंनीं बहुत उन्मत्तपणा करून मथुरा क्षेत्राचा कट्टा केला होता, त्याचें फल ईश्वरें लवकरीच दाखविलें! स्वामींस यश आलें याचा संतोष फारच वजीरांनीं मानिला. त्याचा परिवार कोठवरि लिहावा. स्वामी अवतारी पुरुष आहेत. त्यांची स्तुत मनुष्यांनीं काय करावी? वरकड इकडील सविस्तर वर्तमान आलाहिदा पुरवणिया लिहिल्या आहेत त्या ध्यानास आणून यांचीं उत्तरें वेगळालीं पाठवावयास स्वामी समर्थ आहेत. सारांश गोष्ट सेवकास आश्रा स्वामींचे पायांखेरीज दुसरा कोठें-ही नाहीं. येविषयीं वारंवार सेवकांनीं लिहावेंसें नाहीं. स्वामींच्या दृष्टीस थोडक्यांच दिवसांत पडेल. जरि स्वामींची छावणी लाहोर प्रांतीं जाली तरि वजीर पातशाहास घेऊन छावणीस आपल्या जवळ घेउन येतो. जरि करितां आपण कांहीं आपली दहा हजार फौज ठेवून इकडे येतील तरि हे दोघे सरदार आपल्या सरदारांजवळ ठेवितील. आपण जेथें खांसा छावणी करतील तेथेंच हे खांसा वजीर छावणी आपणांजवळ करतील, आपणा वेगळें कोठें खांसा निराळे रहात नाहींत. परंतु वजीरानें व लहान मोठे सर्वत्र म्हणतात, खांसा छावणी न जाली तरि पठाण मागती लाहोर प्रांतीं पावसाळां येतील. उगेच लोक म्हणतात तें सेवेशीं लिहिलें,

*येथून मुधोजीचें हस्ताक्षर.

करणें न करणें यथल्यार खावंदाचा. वजीराच्या यावयाचा निश्चय कोणे प्रकारचा कोणे स्थळीं ती आज्ञा निवडून सेवकास व वजीरास त्याहावी. त्याप्रमाणें त्या स्थळीं दाखल होऊन. राजश्री विठ्ठल शिवदेवही सत्वरच सेवेशीं येतील. त्याजही प्रमाणें राजश्री कृष्णरावजी येतील. सर्व विनंती करतील. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. +

ले. १६३
[६१]

श. १६८० वैशाख व. १०
ता. १-६-१७५८

॥ श्री ॥

राजश्री नाना पंडित प्रधान गोसावी यांसि—

छ सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ मानाजी आंगरे वजारतमाब रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन आज्ञा करीत असलें पाहिजे. विशेष–राजश्री महादाजी रघुनाथ यांस मजमुचा धंदा सांगोन रेवदंडियास पाठविल्यापासून कारभाराचा बंदोबस्त व लोकांची समजावीस यथास्थित करून अमीनपणें येकनिष्ठेनें वर्ततात, ऐसें समीपवर्ती कुलाबियास श्रवणांत येतच होतें. एकनिष्ठतेविशीं आपलाही निशा जाहालाच आहे. सांप्रत जंजिरेयाचे मोहिमेचे प्रसंगांत जमाव व साहित्य सहवर्तमान मशारनिले येथें आलियावर तरतुद व ततबीर पाहून बहुत संतोष जाहाला. सेवक लोक निष्ठेनें वर्ततात त्यांची सर्फराजी बहुमान खावंदांहीं करावा उचित जाणोन राजश्री रामाजीपंतांकडून तपशीलें विनंति लेहविली आहे. आम्ही लिहिल्याचें जरूर जाणोन या समयांत मशारनिल्हेचे बहुमानास पालखीची आज्ञा करणार आपण समर्थ आहांत. मोर्चेबंदीचे प्रसंगास हरएक साहित्यास रेवदंडासमीप अनुकूल आहे. साहित्याचे तरतुदीस मशारनिल्हेस खाना करविले असत. सारांश बहुमानायोग्य जाणून लिहिलें आहे. येविशीं उपेक्षा नसावी. रा। छ० २४ माहे रमजान. बहुत काय लिहिणें कृपा निरंतर वर्धमान असावी हे विनंती.

शिक्का *

मोर्तब सूद

+ हें पत्र दादांच्या लाहोरच्या मोहिमेस अनुलक्षून आहे. या पूर्वी अबदल्ली हिंदुस्थानांत येऊन दिल्ली, मथुरा, वगैरे शहरांचा नाश करून गेला होता, त्याचा सूड दादांनीं घेतला अशा भावीं हें लिहिणें आहे.

* शिक्यावरील अक्षरें लागत नाहींत. हा दीर्घवर्तुलाकृति आहे.

ले. १६४ [३४] | श. १६८० भाद्रपद शु. ६ ता॥ ८-९-१७५८.

॥ श्री ॥

वेदशास्त्र संपन्न राजश्री **वा**सुदेव **दी**क्षित स्वामीचे सेवेशीं

विद्यार्थी **बा**ळाजी **बा**जीराव प्रधान कृतानेक नमस्कार विनंति उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय लिहित असलें पाहिजे. विशेष. राजेश्री **का**शी **ब**ल्लाळ व अरवे रमण [?] याजबरोबर खिजमतगार वगैरे माणसें देऊन **हिं**दुस्थान प्रांतें कामगिरीस रवाना केले आहेत. मागाहून याजबरोबर आणिक सरंजाम पाठवावा लागतो, त्यास आठ दहा दिवस *सातारियास राहतील. त्यास यांचा समाचार घेत जावा. जागा राहण्यास द्यावी. रा॥ छ ४ मोहोरम. बहुत काय लिहिणें हे विनंति.

ले. १६५ [३८८] | श. १६८० मार्गशीर्ष व. २ ता॥ १७ १२-१७५८

श्री.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री **रा**माजी **अ**नंत गोसावी यांसि–

सेवक **बा**ळाजी **बा**जीराव प्रधान नमस्कार उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. राजश्री **द**त्ताजी **शिं**दे व **ज**नकोजी **शिं**दे कोठें आहेत, काय मनसुबा करितात, तें वरच्यावर कळलें पाहिजे. याजकरितां निरंतर लिहीत जाणें. वजीराचा अगत्यवाद चिरंजीव राजश्री **दा**दांस आहे. त्याचा पक्ष धरून **न**जीबखानाचें पारपत्य करावें. **ला**होरचा नवा मुलूख सोडविला तेथें अदीनाबेग ठेविला होता तो मृत्यु पावला. यास्तव तेथील बंदोबस्त चांगला जाला पाहिजे. याजकरितां **द**त्ताजी **शिं**दे यांणीं तिकडे जाऊन यथास्थित बंदोबस्त राहे तें अगत्य करावें. **बं**गाल्याकडील्हीं काम मातबर आहे. तेथें पैका मेळवावयाची जागा आहे. **ला**होराकडील बंदोबस्त असिल्यास **म**नसूरअल्लीखानाचे लेकासारिखा मातबर सोबती करून भारी फौजेनशीं जावें. जरब देऊन पैका मातबर मेळवावा. **पं**ड्याकडील व **बं**गालियाचा मुलूख सोडवावा. ठीक पडल्यास वजीरासही समागमें न्यावें. परंतु त्यांचें येणें पेंचपाचामुळें घडेल असें दिसत नाहीं. **द**त्तबा चित्तावर धरतील तें करतील. दुसरियाचे सोबतीचा भरोंसा कशास पाहिजे ? तसे **म**नसूरअल्लीचे लेकापासून **का**शी **प्र**यागची नजर व आणखी कित्येक बाबती त्याजकडे लावून पैका साधेल तरि साधावा. एक **ला**होरचा बंदोबस्त असल्यास हें करावें. सारांश सरकारच्या कर्जास ऐवज मातबर मिळे असा मनसुबा करून पैका मेळवणें. विस्तारें उभयतांस लिहिलें त्याजवरून कळेल. जाणिजे छ १५ रबिलाखर बहुत काय लिहिणें. लेखनसीमा.

---

*सातारें हें औरंगाबादेजवळ आहे. हें दीक्षितांचें जहागिरींतील एक गांव होय.

ले. १६६] [३७३] [श. १६८० माघ व. १२ ता. २४-१२-१७५९

॥ श्री ॥

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री रामाजी अनंत गोसावी यांसि.

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. तुम्हांकडून पत्र बहुत दिवस येऊन वर्तमान कळत नाहीं. राजश्री दत्ताजी शिंदे यांचा मारखाडचा मातबर पैका उगवणें त्याचा उगवावयाचा विचार कसा केला तो लिहिणें व लाहूर, बंगाला व पट्टणें हे तीन मनसुबे प्रस्तुत मशारनिलेस मातबर आहेत. त्यास लाहोरास चिरंजीव राजश्री दादांनीं अदीनाबेग सुभेदार करून ठेविला होता, तो मृत्यु पावला. त्याचा नायब लाहोरास आहे तो तुमचे उपयोगीं असला तर कोणी सरदार फौज देऊन तिकडे पाठवून बंदोबस्त करावा. बंगाला, पट्टणें यास स्वारी करावी. मातबर पैका कर्जाबद्दल मेळवावा. बंगाल्यास क्रोड दोन क्रोडी पैका मिळे अशी जागा आहे. भारी पैका मेळवून कर्जाची परिहार करून फौज ताजी राखावी असा विचार झाला पाहिजे. पट्टणें हस्तगत करावें, तें स्थळ घ्यावयाचेंच आहे. खांसा दत्तबा व जनकोबांनीं मातबर फोजेनिशीं तिकडे जाऊन पट्टणें घ्यावें, तेथें छावणी करून राहवें. तेथून बंगाल्याचा मनसुबा करावा. तों चिरंजीव राजश्री दादा बादज बरसात हिंदुस्थानास येतील. तदोत्तर चिरंजीव मशारनिलेनीं बंगाल्याची स्वारी करून मातबर पैका मेळवावा. गुदस्ताप्रों बंगाल्याची मामलत चुकवावयास वकील तुम्हांकडे आला तर चुकवूं नये. बंगाल्याकडील मातबर पैका आल्याविना कर्जाचा परिहार होत नाहीं. भारी फौज जाऊन क्रोड दोन क्रोडी पैका मेळविला पाहिजे. जर फौज न जातां पन्नास साठ लक्षांवर मामलत चुकवितील तरि चुकवावी. असें न होय तरि चिरंजीव तिकडे आल्यावर मनुसुबा करावा. प्रस्तुत तुम्हीं पट्टणाकडे जाऊन पट्टणें काबीज करावें. व सुजात उदवला कडील दोन तीन कामें आहेत. काशी, अयोध्या, प्रयाग, घ्यावें. चिरंजीवाजवळ काशी, अयोध्या द्यावयाचा करार केला आहे. प्रयागची+ रतबदल आहे. तोही मनसुबा सोहलतीनें होईल तरि करावा. सारांश उमदे मनसुबे करून, पैका भारी मेळवून कर्जाची ओढ वारून, फौज ताजी राखावी. मुखत्वें करून हेच मर्जी आहे. गुदस्तां अवकाश नव्हता. यास्तव बारांवर* मामलत र॥ विठ्ठल शिवदेव याणीं चुकविली. यंदां मोठें काम ऐवजाचें तेंच आहे. जर दिल्लीस पन्नास लक्षांवर एकसालां लागली तरीच विल्हे लावावी. ते सुधे बोलें देणार नाहींत, परंतु जबरदस्तीनें मशारनिल्हेनीं पट्टण्यापावेतों चालून जातील तेव्हां नरम होऊन मातबर ऐवज देतील. दिल्ली प्रांतीं नारो शंकर अथवा आणखी कोणी दोन तीन हजार फौज ठेवावी. यंदां लाहोराकडील ऐवज आणून जरूर हुजूर पावता करावा.

+ काशी, प्रयाग, हीं ठिकाणें घेण्याविशीं पेशव्यांच्या मनांत फार होतें पण त्याप्रमाणें घडून आलें नाहीं. हें पत्र व मागील मसलती फार मोठमोठ्या आहेत ह्या पारपडत्या तर हिंदुस्थानाचें संपूर्ण सार्वभौमत्व पेशव्याकडे आलें असतें. * बारा लक्षांवर.

करावा. अंताजी माणकेश्वर यांस परिच्छिन्न हुजूर यावयाविशीं लिहिलें आहे. त्यांचे हवाल्याबाद राहिली असेल तरि सक्त ताकीद करून उगवेसें करावें. वर्जाराकडे त्यांची फौज किती व चाकर किती महिने होती, मेरट वगैरे महालांचा ऐवज त्यांस वसूल किती जहाला, हुजूरचे तैनातजाबत्याची फौज चार पांच हजार आहे, ऐसें ते लिहीत असतात. परंतु वर्जीराकडील फौज व हुजूरचे कराराची फौज दोन्ही मिळोन पांच सहा हजार असेल. हे ते मिळोन घालमेल करीत असतील यांत संशय नाहीं. याचा शोध ते आले तरि करावा. यांत सरकारची मातबर किफायत आहे. गणतीचे निकडीची संधि पाहून, महिनेमहाल फौज चाकर ठेवून, गणतीची भरती करून दाखवावी, मग दूर करावी, हा प्रकार त्यांचा आहे. येविशींचा शोध पूर्ता करणें. भीड न धरणें. जर भीड धरणें असेल तरि मोघम चौकशी करूं नये. येथें येतील मग जसें बनेल तसें केलें जाईल. जर चौकशी करणें तर फारच सख्तीनें खावंदगिरीनें करावी. सर्व माहीत मेळवून चौकशी करावी. मागें जफर्तींत व फुरोइत+ त्यांणीं तफावत केली असेल तेही कलमवार ठिकाणीं लावणें. सारांश मळमळीत कांहीं न करणें. येथील मुख्य वर्तमान इतकेंच कीं, क्रोड रुपये कर्ज देणें. त्यास अवघी फौज घरीं बसविली, वीस हजार जरूराती कामाबद्दल ठेविली, त्यास पैका देणें आला. तीस लाख मात्र कर्जदारांस ऐवज पावला. बाकी सतर लाख देणें आहे. पन्नास लाख कर्ज तुम्हीं फेडावें. एक दुसरें मातबर काम करावें. वांटणी वगैरे अर्थ ध्यानांत न आणितां खामखा कर्ज फेडावें. जाते समयीं दूतबा बोलोन गेले त्या गोष्टीवर भरोंसा आहे. ये विशीं उभयतांसही पत्रें याच प्रकारें लिहिलीं आहेत. तरी उमदें काम होऊन पैका भारी मिळे ते गोष्ट करणें. जाणिजे. छ २५ जमादिलाखर* आठां दिवसां आड मागील पुढील वर्तमान लिहीत जाणें. यंदां के दारा स× जाणें जहालें होतें. इमारत बहुत उत्तम जहाली. पाण्याचें तळें बळकट रुंद चुनेगच्ची जरूर बांधावें ऐवढें राहिलें आहे. तेही फावलेमानीं करावें. वरचेवर स्वारीचें वर्तमान लिहीत जाणें. वजीराचा लगाम जरूर राखणें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

+मामलेदार कायद्याविरुद्ध दंड घेत असत ते.

लेखन सीमा

ले. १६७ [३६२]

श. १६८० फाल्गुन व. ७ ता॥ २१-३-१७५९

श्री.

पु॥ राजश्री दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे गोसांवी यांसि.

आशीर्वाद उपरि. वजीराचा विचार सुधा नाहीं, यास्तव मनसूर अल्ली खानाचे +लेकास

---

* येथून खुद्द नानासाहेबांचें हस्ताक्षर.

× केदारखाडी किंवा लोहारें हा दक्षिणेंतला गांव असावा. (पहा स्थ. सू.)

+ मनसूर अल्ली=सफदरजंग. याचा मुलगा शुजाउद्दौला.

वजीरी दिल्हियानें पन्नास लक्ष रुपये देतो, परंतु येथील मर्जी कशी असेल ते कळेना यास्तव न केलें, पुनरपि करावयाविशीं आज्ञा जालिया लाहोराहून येऊन कार्यसिद्धी करूं, सरकारचें कर्ज फेडूं, म्हणून लिहिलें तें अक्षरशा अवगत जालें. ऐशियास मातबर मनसबा करून कज फेडावें हें आपणासच योग्य आहे. परंतु गाजुदीखानास ×येथूनच स्थापिलें. त्यापासून हरएक अंतर करारांत पडावें मग त्याचा मुलाहिजा काय आहे ? काशी तों पूर्वी मनसूरअल्लीच्या लेकानें चिरंजीव दादा दिल्लीजवळ असतां आपण होऊन द्यावयास कबूल होता. जर त्यास वजीरी देणें तरी काशी, प्रयाग हीं दोन्हीं स्थळें घ्यावीं. पन्नास लाख रुपये दिल्लीचे वजारत देणें हें कांहीं फार नव्हे. परंतु बेरीज मात्र बोलावी, रुपये द्यावयास दोन तीन वर्षें लावावा, याप्रमाणें रुपये देऊं केले तरी काय कामाचे ? एका वर्षांत रुपये रोख द्यावे, या तिही गोष्टी कबूल कराव्या. तुमची पक्की निशा व्हावी. वजीर लबाडीस आला तरी सुजाउद्दवलांनीं गंगे आलीकडे सत्वर येऊन तुम्हांस नेऊन आपलें कार्य करून घ्यावें. तुम्ही त्यानें मिळून वजीरी करार करून द्यावी, रुपये द्यावयास दोन तीन वर्षें लावावीं, प्रयाग, काशी न द्यावी, ऐसें असल्यास विशेष त्यास वजीरी द्यावी असें नाहीं. कां कीं, ते पैकेकरी जबरदस्त, फौज तोफखाना मोठा, जाटांशीं त्यांशीं स्नेह. याजमुळें सत्वरच भारी होतील. मोगल लोक आहेत. फावले मानीं आम्हाशीं वाकडें वर्तावयास अंतर करणार नाहीं. यद्यपि इतके दोष आहेत, तथापि पन्नास लाख रोख हातास येतात, काशी प्रयाग येतो, असे लाभ होत असले तरी करावें. कासी न दिल्हिया एक प्रयाग व पन्नास लाख रोख दिल्हे तरी वजीराकडे कांहीं अंतर ठेवून करावें. परंतु त्याची रीत संस्थानिकपणाची दिसते. गंगेपलीकडील संभाळून असावें. दिल्लीचे खटपटींत जीव राहिला नाहीं. निरंतर तुमचे आझेंत चालावें. अबदाल्लीचाही शह हमेशा फावले मानीं दिल्लीवर आहेच. पहिला दिल्लींत ऐवज मातबर होता, मुलूखही फार होता, पादशहाचा दबाब होता. यास्तव मनसूर अल्लीखान वजीरीसाठीं झटत होता. आतां पादशाई बदवकैरीची, खजीना नाहीं, मुलूख नाहीं, अशी जाली. याची रीतही गर्भश्रीमंतपणाची आहे. यास्तव हें राजकारण खरें लटकें या गोष्टीचा पूर्ता शोध जाटाचे मार्फतीनें व गोविंद बल्लाळ यांचे मार्फतीनें पूर्ता करून आपणाकडील इतबारी शहाणा सुजाउद्दवला पावेतों पाठवून सर्व रागरंग पाहून जर पन्नास लाख रोख प्रयाग हातास येत असला तरी वजीरी द्यावी. नजीबखानास बक्षागिरी दिल्हियास तीस लाख रुपये देतो म्हणोन लिहिलें. ऐशियास नजीबखान पुरा हरामखोर बाट आहे. गुदस्तां चिरंजीव दादाशीं त्यांशीं कांहीं मजा राहिली नाहीं. तो दिल्लींत प्रविष्ट जालिया अबदाल्लीचेंच दिल्लींत ठाणें बसलेंसें जाणावें. बेमान हरामखोर आहे. त्यास वाढवणें सर्पास दूध पाजण्याप्रमाणें आहे.* फावले मानीं त्याचें पारपत्यच करावें. मनसूरअल्लीचा लेंक प्रयाग न

× येथूनच स्थापिलें=इकडूनच वजीरीच्या कामावर नेमिलें. १ दुर्वर्तनाची.

* नजीबखानाचें खरें स्वरूप नानासाहेबास किती स्पष्ट कळत होतें तें ह्यावरून दिसतें.

देई, बेरीज मात्र बोलावी, रुपये द्यावयास तीन वर्षे लावावीं, असें करूं लागला, तरी गाजुदीखानाशीं जे जे करार चिरंजीवांनीं केले आहेत ते कायम करून, ते आपण एक होऊन असावें. बाजद बरसात वजीर पातशाहास घेऊन नीट बंगाल्याच्या सुमारें गेलिया भारी वजन पडेल. रोहिले जमीदार बहुत करून सामील होतील. वजीर तुम्ही एकदील होऊन बंगाल्याचा रोंख धरावा. इकडून चिरंजीव सत्वरच बुंदेलखंडाचे मार्गे प्रयागाजवळ येतील. तुम्हीं वजीरास घेऊन अंतरवेदींतून यावें. भारी दबाब पडून प्रयाग हातास हरतरेनें येईल आणि खामखा घ्यावा. चिरंजीव इकडून व तुम्ही वजीर मिळून तिकडून असा भारी शह पडल्यास मनसूरअल्लीखानाचे लोकांसही मातबर नजर द्यावी. जर त्याणें येणें प्रमाणें शह पडतांच तुम्हांस काशी प्रयाग दिल्हा, नजर भारी दिल्ही, तरी बादशाह वजीरास समजून हर प्रकारें सांगून त्यास बक्षीगिरी द्यावी, हा दुसरा प्रकार. तिसरा प्रकार वजीर बाहेर न येई तरी तुम्हीच जाऊन सुजाउद्दवल्यास मेळवून घेऊन काशी, प्रयाग मात्र त्या जवळून घ्यावी. रुपये न मागतां त्यास पट्टणे बंगाला हातीं निमे देऊं करून तो तुम्ही मिळून जाऊन बंगाला सोडवावा, व ऐवजही मातबर मेळवावा. या तिन्ही मनसब्यांत जो पक्का बनेल तो करावा. दिल्लींत लहान वकील लबाड फार बोलत असतात. एकाचे पक्के पांचाचे राजकारण आणिलें, तरि एकानें दहाचें अंतर ठेऊन उगीच गोष्ट फुगवून राजकारण अडकवून पाडावें. निशेस थाक नाहीं. तुमचा सरळ कारभार यास्तव हरएक राजकारण पक्के निशेचें कोणतें हा शोध आपला इतबारी ज्याकडील राजकारण येईल त्याजकडे पाठवून पक्कें करून तो मनसबा करावा. तूर्त तुम्ही लाहोर प्रांतीं गेलां तिकडेही काम फार आहे. याजमुळें उशीर लागेल. छावणीही तेच प्रांतीं होईल, तेव्हां हा मनसबा बाजत बरसातेवर जाईलसें वाटतें. तथापि सत्वर लाहोराकडील बंदोबस्त होऊन छावणीस तुम्ही दिल्ली आसपास आलां तरि हीं कारणें रुबकार पडून येतील. तेव्हां नीट शोध करून ज्यांत मातबर पैका पन्नास लाख पाऊण करोड कर्ज वारावयास हातास येतातसें दिसेल [तें] तीळमात्र संशय न धरितां करावें. छ २१ रजब बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. पै॥ छ २४ साबान मु॥ सतलजनदी.+

ले. १६८ [३३७] श. १६८० फा. व. ७ ता २१-३-१७५९

श्री

पु॥ राजश्री दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे गोसावी यांसि.

आशीर्वाद उपरि. अंताजी माणकेश्वरास हुजूर परिच्छिन्न दादांनीं मनापासून येथील आज्ञेप्रमाणें बोलाविलें असें असतां हरप्रकारें उशीर लावून राहतात. आम्हांस लिहितात कीं, दत्तबांनीं राहाविलें यास्तव महिनाभर राहिलों.वजीराची दत्तबाची भेट होतांच दरमजल

+ दत्ताजी व जनकोजी पंजाबांत दादांच्या मागून तेथील बंदोबस्ताकरितां गेले होते.

यतों. सांप्रत तुमच्या लिहिल्यावरून दिसोन आलें, कीं लबाडी करून रहातात. हरप्रकारें ऐवज हाताखालीं घालून हात उगवणार. अबरूचा, प्रमाणिकतेचा दरकार त्यांनीं टाकिलासें दिसतें. यास्तव पत्रदर्शनीं तिळमात्र मुलाहिजा न धरितां हुजूर यावया-विशीं सख्त ताकीद करावी. न येत तरि परिछिन्न बोलावून आणून कैद करून त्यांस हुजूर पाठवावें. तीळमात्र मुलाहिजा करूं नयें. मागें त्यांनीं जितक्या ऐवजाचे हवाले घेतले होते तो मात्र ऐवज ताकीद करून उगवावा. या सालचे वजीराकडील अथवा कोणीही ऐवज अंताजीपंताचें हातीं न जाय तें करावें. तो ऐवज जमा करून हुजूर करून जरुर पाठवावा. अंताजीपंतास पत्रदर्शनीं न येत तरि कैद करून पाठवावें.+ छ २१ रजब. हे आशीर्वाद.

ले. १६९ [७६]

श. १६८१ चैत्र व १० ता २२-४-१७५९

श्री

राजश्री नाना पंडित प्रधान गोसावी यांसि—

छ सकळ गुणाळंकरण अंखडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य स्ने॥ राघोजी आंगरे बंजारतमाब राम राम विनंती येथील खुशल जाणोन स्वकीय लेखन आज्ञा करीत असलें पाहिजे विशेष.—छ ५ शाबनचें पत्र पाठविलें तें छ २२ मिनहूस उंदेरीचे मोर्चेबंदीस थळचे मुक्कामीं येऊन पावलें. मुख्यार्थ कीं, उंदेरींत पाण्याची अनुपत्य जहाली आहे. दैशाखांत तरि भारीच होईल. सुरतेकडील बळ तुटलें. यामुळें शामल अवसान खाता जाला असतां चोरपाईकी अवसान धरून करितो. राजपुरीचीं गलबतें गेलीं. उंदेरीस साज सामान घेऊन येतो. उलटी सलाबत त्याचीच पडोन आली आहे. त्याचें पारिपत्य होत नाहीं हें अपूर्व असे. किरकोळ उपद्रव मुलकांत होतात ते केवळ जंजिरे याहूनच होतात ऐसे नाहीं. उंदेरी-हून होतात ऐसें निर्दशनास येतें. याउपरि सारीं आरमारें येकत्र होऊन या समयांत सर्वांनीं एकदिलीनें लगट केलियास स्थळ हस्तगत होऊन यावयास अगाध नाहीं. येविशीं विस्तारें राजश्री रामाजीपंतास लिहिलें आहे. म्हणोन नशीहतपूर्वक आज्ञा केली. ऐशास उंदेरकरांचे व जंजीरकरांचे पारिपत्याची योजना होऊन राजश्री शंकराजीपंतास व राजश्री नागोपंतास व राजश्री रामाजीपंतास पत्रें सादर जालियाची आज्ञा छ १४ मिनहूचें पत्र खास दस्तुराचें मुजरद जासुदा समागमें आलें तें छ १८ तारखेस माहे मजकुरीं पावलें. आज्ञेचे निकडी-प्रमाणें वसैपैकीं व राजश्री नारोपंतीं आरमार सुद्धां येऊन पावावें. सारें येकत्र होतांच जीवाभ्य श्रमेंकडून श्रम साहसास अंतर न करावें. हाच कस्त धरून आरमाराची प्रतीक्षा आज पावेतों करीत आहों. तथापि अद्याप येऊन पावलें नाहीं. पत्राची विनंती लेहून

+ अंताजी माणकेश्वराकडून ऐवज बरोबर येत नव्हता असें या पत्रावरून स्पष्ट होतें. ह्या प्रकरणीं हेळकरांची कैफियत पृष्ठ २१ टीप ४१ पहावी.

पाठविली आहे. त्यावरून सेवेशीं निवेदन जहालेंच असेल. अखेरीचे दिवस, अवकाश बहुतसा राहिला नाहीं. आज्ञेचा अर्थ निकडीचा जाणोन येथून मुजरद महागिरी मशारनिले शंकराजीपंताकडेस व नारोपंताकडे पाठविली आहे. त्वरेनें यावें म्हणोन लिहिलें असे. वरकड किरकोळ उपद्रव चोरी छपीनें उंदेरीहूनच होतात. जंजिराहून होत नाहीं म्हणोन तरि उंदेरीचे मोर्चेबंदीस चौक्या कुलाबापासून थळ नवगांवचे खाडी पावेतों आम्हांकडील नवगांवापासून केहीम, आव्हास, सातवेन, मांडवें, रेवस पावेतों राजश्री महादाजी रघुनाथ यांहीं रेवदंडकर रायगड भोरपकर लोक जागां येऊन बंदोबस्त केला आहे. उरण खाडीची खबरदारी उरणाहून होत असतां उंदेरकराची महागिरी तडीस लागावी ऐसें नाहीं. एक दुसरा होडीवर काळोखे रात्रीस येत जात असेल. तरीच कोठें आग लावावी, धोंडे मारावे हे उपद्रव होतात. याजवरून नित्य चौकीदारांचें पारिपत्य करणें तें करीत असों; व राउतांचा छबीनाही होतो. खबरदारीस आम्हांकडून व महादाजीपंताकडून अंतर पडत नाहीं. बिरवाडी, माडलतपा, अष्टमीकडून चोर येऊन तुमचे टापियांत रयतेस मारामार

उपद्रव केला. जंजीरकर प द म (पद्म?) दुर्गकरी ऐसे रयतीजवळ सांगत गेले. त्यांचे शोधास आम्हांकडील व मशारशिले महादाजीपंताकडील लोक मुलखांत घालून रात्रंदिवस शोधास लागलोंच आहों. जंजीरकरास व प द म दुर्गकरी यांस बंदरें अनकुल व राना जंगलाचा आश्रय

बहुत. रानांत दबा देऊन काळोखे रात्रीचे संध्यांतून चोरी कर्म आचरतात. तिकडील मामलेदार खबरदारी करीतच आहेत. सारांश योजिले मनसबेयाप्रमाणें येखादे जागां निकडीचा प्रकार या समयास ब्हावा हेंच कार्याचें आहे. श्री कृपेनें व आपले तपोबलें कार्य सिद्धि होऊन आलियास सारेच उपद्रव दूर होतील. जळमार्गे उंदेरीस सामान चोरी छपीनें नेतो त्याचे बंदोबस्तास आम्हांकडील गुराबा गलबतें महागिरिया दक्षिणभागीं मार्ग अवरोधोन ठेविल्या आहेत. याचप्रमाणें उत्तरभागीं महागेरिया व गलबतें मा।निले महादजीपंताकडील येऊन रात्रंदिवस छबिना होत असतां उंदेरीस मुंबैसमीप काळोखे रात्रीस चोरीछपीनें महागिरी येते जाते, त्यांचे पैरवीस आरमारकरी लाविलेच आहेत. गांठ पडतां जीवाभ्य श्रम करून दस्त करायास चुकणार नाहीं. फाल्गुनमासीं रात्रौ महागेरी येतां आम्हांकडील आरमारकरी यांनीं पिच्छा केला. तडीस येतां रेवदंडकरांहीं मर्दुमी करून कोंडून दस्त केली. या प्रकारचें वर्तमान आहे. दर्या अफाट चौगीर्द आरमार परीघ असावा. सारें आरमार येकत्र जडाव जालियावर चित्तानरूप सेवा घडोन येईल व यावी, हाच कस्त व उमेद असे. स्वामी सेवेचे ठायीं आम्हांपासून कसूर कोताई हा काल पर्यंत जाली नाहीं व पुढेंही होणार नाहीं. हेच निष्ठा मनोमानसीं असेच. अंतरसाक्ष आपण समर्थ आहांत. राजश्री रामाजीपंतही लौकरीच येणार, येतील. त्यांचे अनुमतें श्रम साहसास दुसरा विचार

घडणार नाहीं. र॥ छ २४ माहे शाबान बहुत काय लिहिणें कृपा वर्धमान असावी. हे विनंती. [मानाजी आंगरे सप्टेंबर १७५८ त मरण पावल्यावर रघुजी गादीवर आला त्याचें पत्र.

मोर्तब-
सूद

ले. १७० }
[८३] }

{ श. १६८१ चैत्र व. ७
{ ता॥ १९-४-१७५९.

॥ श्री ॥

राजश्री भाऊ गोसांवी यांसि—

छ सकळ गुणाळंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—स्ने॥ राघोजी आंगरे चजारत माब रामराम विनंति उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लेखन आज्ञा करीत असलें पाहिजे. विशेष. छ १४ शाबानचें स्वहस्ताक्षर पत्र आलें तें छ १८ मिनहूस मौ॥ थळ उंदेरीचे मोर्चेबंदीस प्रविष्ट जाहालें. गौरवाभिवृद्धीस पावलों. श्रवणेंकडून संतोष जाला. सुरतेकडील आरमार राजश्री नारोपंत सहवर्तमान आठा दहा रोजांत येईल. सर्व एकत्र होऊन उंदेरींत पाणी नाहींसें जालें आहे या समयांत मारागिरी करून लगट करावा म्हणोन आज्ञा केली. आज्ञेचे अन्वयांत सविस्तर विनंती श्रीमंत पंतप्रधान यांचे सेवेशीं लिहिली आहे, त्यावरून निवेदन होईल. आम्हांस आपली आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करावी श्रम साहासास अंतर न करावें, हेंच निष्ठा. दुसरा विचार नाहीं. म॥ निळे नारोपंतास व घसैस आज्ञापत्रें जाऊन पावलींच असतील. त्याप्रमाणें आरमार व महागेरिया अविलंबें येऊन पावलियास शत्रूवरी निकर्ष होऊन येई ; मुख्य गोष्ट सारा आरमाराचा जडाव व महागेरिया मारागिरीचें पोंचतें सामान अल्प अवकाशेंकडून आलें पाहिजे. विलंबावर गेलिया अखेर मुसुब आली आहे. वारा, तुफान जालें म्हणजे आरमाराचा टिकाव होणार नाहीं. येविशीं राजश्री महादाजी रघुनाथ यांहीं लिहिलें आहे, त्यावरून सविस्तर श्रुत होईल. राजश्री साबाजी प्रभु जाऊन पावलियावरि हलाखीचें सार्थत वर्तमान निवेदन केलें असेल व करितील. अनुकुलतेविशीं सर्व प्रकारें भरंवसा आपले कृपेचा आहे. विस्तारें विनंती ल्याहावी तर सर्वजाण आपण समर्थ आहेत. र॥ छ २१ माहे शाबान. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों द्यावा हे विनंती.

शिक्का

मोर्तब
सूद

ले. १७१ [३८७]

श. १६८१ वैशाख शु. ६ ता. २-५-१७५९.

॥ श्री ॥

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री रामाजी अनंत गोसांवी यांसि. सेवक बाळाजी बाजीराव प्र ान नमस्कार उपरि यथेल कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. सुजायतदौलाजवळून पन्नास लाख रुपये घेऊन वजीरी द्यावी, अंताजी माणकेश्वर यांस दिल्लीच्या कारभारांतून काढावें, हा मनसुबा; दुसरा, नजीबखानाजवळून तीस लाख घ्यावे. त्याहून तिसरा आपणच पातशाहातेचा बंदोबस्त करावा. याचें सेवटवर कसें तें ल्याहावें, तोंपर्यंत लाहोराहून येऊं म्हणोन लाहुराचे पत्रीं मजकूर. त्यास वजीर दादानीं सर्व प्रकारें आपले करून ठेविले [ते] निर्बल आहेत. याजपासून केल्या करारांत अंतरही कांहीं नाहीं. ऐसें असोन सुजाअतदौलाचा मनसुबा करणें योग्य नाहीं. तत्रापि करणें तेव्हां जर पक्की निशा पन्नास लाखांची सहा महिन्यांत होती असें दिसल्यास, वजीरा+ जवळून केल्या कारभारांत अंतर मातबर पडल्यास, वजीरावर जाटांनीं व सुजाअतदौलांनीं एक होऊन यावें. तुम्हीं सुजातदौलाचा पक्ष न करावा. जर सुजातदौलाचें पक्कें राजकारण नाहीं तर वजीर पातशा बाहेर काढून सुजातदौलाचें पारपत्य करून मातबर पैका मेळवावा. जर हे गोष्ट वजीरा जवळून न होय, बाहेर न निघे, तेव्हां दिल्लीतील कारभार वजीरावर सोंपून सुजातदौला व आपण एक होऊन काशी प्रयागचें काम करून घेऊन, पूर्वेस जावयास सुजातदौला सामील करून घेऊन, त्यास निम्मे बंगाला देऊं करून मातबर पैका मेळवावा. लाहोर प्रांतींचा बंदोबस्त उत्तम प्रकारें करावा. चिरंजीव दादानीं अबदाली ठेविला होता, त्याचाच कोणी मातबर इतबारी ठेवून तो कारभार नीट करून सारा पैका हुजूर येई तें करावें. इतकें करून दिल्लीतील बंदोबस्त होऊन पूर्वेस जावयास बाजद बरसात ठीक पडेल. यंदां छावणी दिल्लीची कराल तेव्हां सोई पडेलसें दिसतें. अंताजी माणकेश्वर यांस वारंवार हुजूर बोलाविलें असतां येत नाहीं. वजीराकडे पन्नास लाखांचे हिशेब काढून तेथेंच गुंतले. कित्येक लबाड्या करितात. त्या तुमचे प्रत्ययास येऊन त्यास ठेऊं घेतां; मेरट वगैरे परगणे मधींच खातात, वजीराजवळ हजेरी बारा हजार फौजेची लटकींच देतात, ही चौकशी करीत नाहीं; अपूर्व आहे. याउपर त्यांस पत्र पावतांच हुजूर पाठावणें. सुप्रयुक्त आले तर वरें, न आले तर धरावे, लुटावे, माल सर्व सरकारांत लावावा. मेरट वगैरे सर्व महाल सरकारांत लावावे. वजीरावर पांच लाख रुपयांची वरात चिरंजीवांनीं दिली आहे ती सरकारांत वसूल घ्यावी. त्यास याउपरि एक पैसा न द्यावा. जर ही गोष्ट जबरदस्तीनें न करतां अंताजी हुजूर आला तर त्याचा एक लेक हजार राऊतांनिशीं ठेवावा. बाकी फौज वजीराजवळ चाकरीस पाहिजे ते दुसरी नेमून द्यावी. परंतु अंताजीस ठेऊं नये. याउपरी त्याचा कांहीं एक मुलाहिजा न करितां कैद करून पाठवणें. तुम्हीं, कारभारी भिडेस न पडणें. जाणिजे.

+ वजीर=ब्याजुद्दीनखान. हा मराठ्यांचा हस्तक रोहिले यांच्या विरुद्ध होता.

नजीबखान बाट, अर्धा अबदाली. त्याचें राजकारण न करावें. सुजातदौला व जाट एक जहाल्यास भारी उपयोगीं नाहींत. यापेक्षां आहेत वजीरचं ते फारच उपयोगी. परंतु सुजातदौला साहा महिन्यानें पन्नास लाख रुपये खुरेखुरे देतात, या वजीराजवळून एक दोन मातबर अंतरें याची तगेरी करावयाजोगीं जहाल्यास सुजातदौलाचें काम जरूर करावें. मातबर लाभ सोडूं नये. याचा विस्तार उभयतां सरदारांस लिहिला असे. तो मनांत आणून उत्तम दूरदर्शीनें सरकारांत मातबर लाभ होऊन,येथील लक्ष्यानें वर्त [त] ऐसें प्रकारें जें तुमचे तेथील माहितगारीस बनेल तें करणें. वरचेवरी कचें वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे. छ ४ रमजान. बहुत काय लिहिणें. अंताजीपंतास जरूर हुजूर पाठविणें. सहसा रजबदल ऐकूं न देणें. लक्षा प्रकारें वजीरासच राखावें. कदाचित तो करारांत वाकडा वर्तत असला तर मात्र मातबर लाभ पुर्ता दृष्टीस पडला तरच सुजातउद्दवलास हातीं धरावें. परंतु काशी, प्रयाग हरतजविजेनें साधावीं. विशेष काय लिहिणें. कर्जाची चिंता दत्तबास असेलच. जाणिजे लेखनसीमा.

ले. १७२ [३६५] छ ४जिलकाद सीतैन. श. १६८१ ज्येष्ठ व. २ ता १२-६-१७५९

श्री.

राजश्री रघुनाथ रावजी गोसावी यांसि.

श्रीमंत प्रताप गुणवंत ऐश्वर्य कुसुमविलसितैकव्रतंस श्रेष्ठप्रभाव ले॥ महाराव जसवंत निंबाळकर दंडवत विनंती उपरि येथील क्षेम तागा० छ १६ सवाल जाणोन निजानंद लिहिणें. विशेष. लाला ब्रिजनाथ यांनीं श्रीमंतांचे प्रांतापासून वं आमचेही तालुकिया पासून रुपये घेतले. सरकारचे ऐवजाचा निकाल करून घेऊं तेव्हां तुमचेही तालुकिया पासून लालानीं घेतला पैका त्याचाही त्याजपासून निर्गम करून घेऊन पावता करूं, ऐसें राजश्री आबाजीराव यांनीं आम्हांस वचन केलें. ऐसें असतां प्रस्तुत वचनाप्रमाणें घडोन येत नाहीं. सदर्हू मजकुराचे राजश्री रामचंद्रपंतही वाकीफ आहे. विस्तरें येविषयीं विनंती करतील. सारांश राजश्री आबाजीराव यांसि सरकारचें पत्र सादर व्हावें कीं, वचन केलें आहे त्या प्रमाणें निर्वाह करावा. हे विनंती.

---

१७३ [३९०] श. १६८१ आषाढ जुलई १७५९

श्री.

राजश्री नानासाहेब गोसावी यांसि.

छ श्रीमंत महदैश्वर्यनिधान श्रेष्ठाभिधान महेश्वरानुसंधान लेहांकित आनंदराव निंबाळकर कृतानेक दंडवत विनंती येथील कुशल जाणून स्वानंद लेखनें सदैव आनंद दिल्हा पाहिजे. विशेष कृपा करून पत्र व राजश्री माधवराव रघुनाथ पाठविले, पत्रीं व मानिल्हेच्या जबानी आज्ञा जे, अंजनडोह येथील बाजारास अटकाव केला आहे, तो तूर्त न करावा. राजश्री साबाजी नाईक व महादाजी नाईक स्वारीस गेले आहेत, ते आलियावर त्यांस सांगोन विल्हे

लाविलें जाईल. ऐसियास आम्हांस आज्ञा प्रमाण. येविषयीं राजश्री मल्हारपंत खिजमतरावजी यांनीं पूर्वी सेवेंत विनंती केली असेल व प्रस्तुतही करतील. सांप्रत पूर्ववत प्रमाणें बाजार व मार्ग चाली लागला, हें वृत्त राजश्री माधवराव सविस्तरें निवेदन करतील त्याजवरून श्रुत होईल. हे विज्ञप्ति.×

ले. १७४ [३६६] { श. १६८१ आषाढ शु. १३. ताा. ८-७-१७५९

श्री.

राजश्री पंत प्रधान गोसावी यांसि.

श्रीमंत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापवरिष्ठाभिधान निरंतर भगवदनुसंधान सावधान स्ने॥ महाराव जसवंत निंबाळकर दंडवत विनंती उपरि येथील क्षेम ताा छ १२ जिलकाद जाणोन निजानंदलेखन करावें. विशेष. कृपापत्र उत्तमावसरीं पावोन संतोष जहाला. राजश्री विठ्ठलराव व गोविंद खिजमतराव यांचे जरूर आहे. मशारनिलेपाशीं कांहीं मजकूर सांगोन आपलियासि कळों द्यावा लागतो. तर उभयतांस सत्वर पाठवणें म्हणोन पत्रीं आज्ञा. ऐशियासि उभयतांचें शरीर भावनेचें वर्तमान याजपूर्वी तपशिलें साास लिहिले आहे. निवेदन जहालें असेल. गोविंद खिजमतराव याजकडे पत्र पाठविलें होतें. उत्तर आलें कीं, श्री कृपेंकरून कांहींसा आराम आहे. थोडियाच दिवसांत येतों ऐसें लिहिलें असे. खिजमतरायाचे दोघे धाकटे बंधूही आहेत त्यांजपाशीं मजकूर आज्ञा करावया योग्य असल्या आज्ञा जहालिया त्या एकास सेवेशीं पाठविलें जाईल हे विनंती.

ले. १७५ [१४६] { श. १६८१ भाद्रपद व. १३ ताा २८-८-१७५९

श्री.

सेवेशीं नारायण भास्कर साष्टांग दंडवत विज्ञापना ऐसिजे. गोवेकर फिरंगी याकडे राजपुरींतून पेगाम लागल्याचा मजकूर निराळे विनंतीपत्रीं लिहिला आहे याजवरून सेवेशीं निवेदन होईल. फिरंगी यंदां पूर्तकालाहून जाहाजें आल्यानंतर वळवळ करितां राहात नाहीं. या गोष्टीस स्वामींच्या प्रतापाचा दबाव असिल्यानें उत्तम आहे. दबाव हाच कीं, वरकड टोपीकर वगैरे यांस राजपुरीचे मसलतीमुळें पत्रें सादर जालीं असतील त्या प्रमाणें गोवेकरांसही पत्र सादर व्हावें कीं, जंजिरे दंडा राजपुरी यांजवर सरकारची मसलत आहे, तरि तुम्हीं आपलीं जाहाजें संजुता करून सामान सरंजाम सुद्धां तयार होऊन जलमार्गे येऊन सामील होणें. कदाचित् राजपुरीवाले तुम्हांस लाभ लोभ दाखवून आपले कुमकेस बोलावतील व तुम्ही ममतेस गुंतोन त्यांचें साहित्य कराल तरि आधीं तुमचें पारपत्य हाईल. राजपुरीवाल्यांस तंबी करून जंजीरा सरकारांत घेणें हें तों जरूर आह. त्या प्रीं थोड-

× ले. ३६६ पहा.

क्याच दिवसांत सिद्धीस जाईल. परंतु तुम्ही तु र द रा ज पाहोन वर्तणूक करणें. म्हणोन पत्र व त्यांतच मजकूर त्याहावयाचा सेवकास सुचला लिहिला जातो जे. तुळाजी आंगरे याजवर सरकारची मसलत पेशजी जाहाली होती तेसमयीं तुम्ही त्याची कुमक उपराळा करावयाची कबुलात करून आडीच लक्ष रुपये आंगऱ्याकडून तुम्ही नेले आहेत. त्यास आंगऱ्याचा मुलुख व कोट किल्ले दरोबस्त सरकारांत घेतले. मालीयत व खजाना जेथें जेथें त्यांचा सांपडला तो सरकारांत आणिला. तुम्हीं त्याजकडून रुपये नेले आहेत ते सरकारचे आहेत. तरि सदरहू ऐवज पाठवून देणें म्हणोन पेशजीं तुम्हांस लिहिलें अथवा अद्यापवर पाठवीत नाहीं. हे गोष्ट कार्यास येणार नाहीं. हल्लीं देखत पत्र सदरहू रुपये सेवकाचे पदरीं घालून हुजूर पाठविणें. तैसेंच सोंधेकरांचा मुलूख आहे तो सरकारचें स्वराज्य आहे ऐसें असतां कूर्मगड व सदाशिवगड हे दोन्ही किल्ले तुम्हीं घेऊन ठाणीं ठेविलीं आहेत म्हणोन कळलें, तरि हरदू विम्यावरील तुम्ही आपलीं ठाणीं उठवून, किल्ले खालीं करून, सेवकांचे स्वाधीन करणें व यांचीं पावती घेऊन हुजूर पाठवणें. आणि तुम्ही भाद्रपद शुद्ध चतुर्थी होतां आपलें सामान सुद्धां येऊन राजपुरी जवळ सरकारच्या फौजांस सामील होणें. येणें प्रा तुम्ही केल्यास तुमचे संस्थानचें व तुमचें कल्याण आहे, न केल्यास तुम्हास नतीजा पोंचेल. स्पष्ट समजोन वर्तणूक करणें, म्हणोन पत्र व गोवरनदोर राजा व सकटतार दिवाण यांस वस्त्रें साबांक [ला ?] दस्तुर येऊन सेवकास आज्ञा जालिया गोमांतकास जाईन. हे गोष्ट जालियानें फिरंगी दबाव खाऊन आपले ठिकाणीं रहातील. वळवळ करूं शकणार नाहीं. महाराजांचे ध्यानास आलिया येणें प्रा पत्रें वस्त्रें पाठवावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत व येथून सेवकाची खानगी उत्तम प्रकारें करून द्यावयाविशीं जिनुबा सबनीस यांस आज्ञा असावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

———

ले. १७६ [१४७]

श. १६८१ भाद्रपद शु. ६. ताा २९-८-१७५९

श्री.

सेवेशीं नारायण भास्कर साष्टांग दंडवत विज्ञापना. गोंवेकर फिरंगी यांकडील बातमीचा मजकूर तरि, राजपुरीहून ज्येष्ट अखेर मार्शी गलबतावरून वकील येऊन नेहमीं गोव्यांस येऊन राहिला आहे. त्याजकडून गलबत राजपुरीस जाऊन मागती सांप्रत आलें. जंजिऱ्यावर मसलत श्रीमंतांची जाली आहे, जंजीरा घेणार, त्यास या समयास तुम्हा आपली कुमक उपराळा जळमार्गे करावा, सामान सरंजाम आपणास पोहोंचवावा, आपली शरम या वख्तीं तुम्हीं राखावी. तैसेंच मर्दनगडास तुमचा मुख्य राजा मारला गेला असतां तुम्ही आजि पावेतों कांहीं प्रतिकार दाखविलें नाहीं, तरि मर्दनगडाचा सूड घ्यावा, येविषयीं दू मु त व जे करतात. परंतु आजवर फिरंगी याजवळ जमात किंवा लढाईचा पोख्ता सरंजाम नाहीं. दरसाल जहाज एक येतें, व तीन वर्षांनीं चार पांच

गल्या व मोठीं जाहाजें तीरकती सु ब रां चीं यावीं त्यास हें तिसरें साल आहे. यंदां भाद्रपद माशीं गणेश चतुर्थी माजी पांच जहाजें घेऊन नवा राजा येणार. तीं जाहाजें पूर्तकालाहून आल्या उपरांतीक आधीं मर्दनगडचे गळीं पडावें, हा त्यांचा मनसबा आहे. बादज शाम* लांचा यांचा करार मदार होऊन वर्तमान आव्हेळ तें सेवेशीं लेहून पाठवीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. *

ले. १७७ [१४८] | श. १६८१ भाद्रपद शु. ६ ता। २९-८-१७५९

श्री.

सेवेशीं नारायण भास्कर साष्टांग दंडवत विज्ञापना. सांवतांचा व गोंवेकर फिरंगी यांचा हर्षामर्ष गतवर्षापासून लागला आहे. त्यास गोमांतकचे खाडी आलीकडील मुलूख यांणीं घेऊन सारे मुलकाची जप्ती केली. रहातां तीन ठाणीं राहिलीं. येक हलर्ण, दुसरी डिचोली, तिसरें तेरेखोल. या तीन ठाण्यांत फिरंगी यांचे लोक आहेत. ठाण्याबाहेर नाक्या नाक्यावर चौक्या यांच्या बसल्या आहेत. सामान बाहेरून जाऊं पावत नाहीं. दोन तीन जुंजें यांचीं त्यांचीं जालीं. त्यांत फिरंगी यांचें सामान बहुत बराच, दारू गोळीची मोठी मार. तथापि एक दोन वेळां यांचा जोरा होऊन फिरंगी मोडून माघारे घातले. वीस बावीस फिरंगी यांजकडे सांपडला. त्यांस आणून कैदेंत ठेविले आहेत. सांप्रत फिरंगी यांजकडून बोली चाली लागली आहे. त्याजकरितां वाडीस फिरंगी होते त्यांपैकीं एक दोघे गोव्यास गेले आहेत. परस्पर यांचा त्यांचा तहरह व्हावा, खाडी ठाणीं यांचे स्वाधीन करावीं, पुढें यांणीं बारदेशांत न उतरावें, फिरंगी यांणीं आलीकडे उपसर्ग न द्यावा, असा कारभार त्यांचा घाटत आहे. होतां होईल तें सेवेशीं लेहून पाठवीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. १७८ [८४] | श. १६८१ आश्विन व. ५ ता। १०-१०-१७५९

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबांचे सेवेशीं.—

आज्ञाधारक दमाजी गायकवाड समशेरबहादर कृतानेक दंडवत विज्ञापना येथील

---

*तुळाजी आंगऱ्यावर पेशजी मसलत झाल्याचा उल्लेख या पत्रांत आहे ही मसलत सन १७५६ मध्यें झाली. तसेंच दंडाराजपुरच्या मसलतीचा उल्लेख आहे ती सन १७५९ मध्यें होती. 'भाद्रपद शु।। ४ नंतर तुम्ही सामील व्हावें' या मजकुरावरून सन १७५९ च्या भाद्रपद शु।। ४ चे पूर्वी ८।४ दिवसांत हें पत्र लिहिलें असावें पो भाद्रपद शु।। ६।७

क्षेम तागाईत आश्वीन कृष्ण पंचमी पावेतों साहेबांचे कृपाकटाक्षें करून यथास्थित असें विशेष. साहेबांकडून आज्ञापत्र सादर जाहालें तें उत्तम समयीं प्रविष्ट होऊन अक्षरशहा विलोकनें परम प्रमोद जाहला. पत्रीं आज्ञा कीं, " चांचवे: व **जा**फराबादकर एकत्र होऊन, लोक जमा करून, जाहजावर चढवून **रा**जपुरीस कुमक पोंहचवावी, मन माने तैसा उपद्रव करावा, ऐशी तरतूद करितात. त्यांजला उत्तम प्रकारें ताकिदीचीं पत्रें लिहावीं आणि बंदोबस्त करावा. " ऐशी आज्ञा सादर होतांच **जा**फराबादवाले व **चां**चवे यांशि ताकीद-पत्रें लिहून पाठविलीं आहेत कीं, " तुम्हीं कुमक **जं**जिरीयाशीं परिच्छिन्न न पाठविणें. यद्यपि न ऐकिलें तर पारपत्य यथास्थितपणें होईल. " त्या· प्रांतीं कमाविसदार नाहींत. जोरतलबी मुलूख. तेथील भुमे आहेत त्यांस पत्रें लिहिलीं आहेत व **घो**गे वगैरे बंदराचे कमाविसदारांस एताद्विषयीं लिहिलें आहे, व फौजही त्यांचे बंदोबस्तानिमित्य रवाना जाहाली आहे. सेवेशीं श्रुत होय हें विज्ञप्ती.*

ले. १७९ [९६] — श. १६८१ कार्तिक व ३ ; ता. ७-११-१७५९

श्री

चिरंजीव राजश्री **नाना**[1] यांसि-**बा**ळाजी **बा**जीराव प्रधान आशिर्वाद उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लिहीत जाणें. विशेष. **मि**या **आ**छनचे मजकुराविशीं **मु**जफरखान यास पत्र लेहून तुम्हांकडे पाठविलें आहे. तें पावलें असेल. त्यास **मि**या **आ**छनचा व हबशाचा जोरा होऊन अल्ली **न**वाजखान याचा तह जाला. आपण लोक सुद्धां बाहेर निघालों म्हणून रा॥ **म**हादाजी **के**शव यांचें पत्र छ १२ रबिलावर शनवारीं आलें. त्यास याप्रमाणें मजकुर जाला, तेव्हां **म**हादाजी **के**शव व **कृ**ष्णाजी **अ**नंत मागें फिरलेच असतील. **कृ**ष्णाजी **अ**नंत येऊन **को**ळ्यांचें[2] पारपत्य करावयाचे तरतुदीस लागतील. **मु**जफरखान यास पत्र पाठविलें आहे, तें त्यास द्यावें ऐसें नाहीं. याजकरितां पत्र न देणें. व जासूदाबरोबर पत्रें **म**हादाजी **के**शव व अल्ली**न**वाजखान यास वगैरे पाठविलीं आहेत. तीं पत्रें पाठवावयाचें प्रयोजन नाहीं. जासूद तुम्हांजवळ जाऊन पावलेच असतील. त्यास माघारें फिरवावयास जासूद पाठविले असत, तरि तीं पत्रें पावलीं असतील तर [परत] पाठवणें. जाणिजे छ १३ रबिलोवर. बहुत काय लिहिणें- **मु**जफरखानांनीं जाऊन **ज**वार घेतली, **गं**भीरगड घेतला. याची सलाबत त्यांजवर पडली. कोळी[3] मैदानचे जुंझणार नव्हत. दोन हजार **मु**जफरखान, **स**टवोजी **जा**धव, **कृ**ष्णाजीपंत तुम्हीं जलदीनें जावें. उशीर न करावा.सत्वर काम उरकेल. उत्तम प्रकारें पारपत्य करावें. घरांतील चोर मळमळित जाहालिया परतेल. लबाडी करतील. हे आशिरवाद. पो। १६ रबिलावर्रे.

---

* हें पत्र जंजिऱ्याच्या हबशाराबरोबर जें युद्ध चाललें होतें त्यास अनुलक्षून आहे. मागील पत्रें पहा.

१ नाना पुरंदरे असावेत. २ सुरतकर ? ३ कोळी—जव्हारचे वगैरे. ४ नानासाहेब रोजनिशी भाग १ ले. ९८ पहा.

ले. १८० [३६८] पौ॥ छ ९ जमादिलाखर सोमवार. श. १६८१ माघ शु. ३ ता. २१-१-१७६०

॥ श्री ॥

चिरंजीव राजमान्य राजश्री **भाऊ** यां प्रति.

बाळाजी बाजीराऊ प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीये लिहीत जावें. विशेष राजश्री **बापूजी बल्लाळ** दफ्तरदार यांचे गुजारतेनें कांहीं काम होतें. त्यांचे कांहीं कागदपत्र शहरींहून आणायाचे होते ते आणिले. त्यांतील दोन तीन असाम्या **संगम**नेरीं होत्या त्यांस आणावयाबद्दल हुजूरून **बुधा** चोपदार व दहा राऊत **नागो राम** याचे देऊन **जेजोरी**चे मुक्कामींहून रवाना केला होता. त्यास चोपदार मजकूर आपणांकडे आला आहे म्हणोन ऐकिलें. अशास ते कोण्हीं घेऊन आपणांकडे गेला, काय मजकूर तो लेहून पाठविणें. तेथें कोणी आलें असेल तर त्याची चौकशी करून त्याचा काय प्रकार तो लेहून पाठवावा. रवाना छ २ जमादिलावर सुरू सन सितैन मया व अल्फ हे आशीर्वाद.

ले. १८१ [१७०] पौ॥ छ २४ जमादिलाखर. श. १६८१ माघ व. ७ ता. ८-२-१७६०

॥ श्री. ॥

चिरंजीव राजमान्य राजश्री **महीपतराव त्रिंबक** यांसि **बाळाजी बाजीराव प्रधान** आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करणें. विशेष. **मो**गलांशीं छ १५ जमादिलाखर रक्विार लढाई भारी होऊन दहा हत्तीवाले त्यांजकडील मारले. पाडाव हत्ती दहा व चार पांच तोफा जाल्या. याप्रमाणें मातबर लढाई झाली. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. चिरंजीव राजश्री **नाना*** सुखरूप आहेत. कळावें. जाणिजे छ २० जमादिलाखर सुरु सन सितैन मया व अल्फ. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

ले. १८२ [३७९] पौ॥ छ १२ रजब माघ सितैन. श. १६८६ फाल्गुन शु. ६ ता. २२-२-१७६०

॥ श्री ॥

चिरंजीव राजश्री **भाऊ** यांसि. **बाळाजी बाजीराव** प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय लिहित जाणें. विशेष उंदेरीचें काम राजश्री **रामाजी महादेव** व **नारो त्रिंबक** यांनीं जेवतेव करून केलें. उंदेरीच्या कार्यामुळें दोघांत कुरुषता लटकीच वाढली. पाहत्या अर्थें त्यांत कांहींच जीव नाहीं. प्रस्तुत **का**शास गेले तें कार्य एकरूपतेनें करावें तो अर्थ होत नाहीं. कोणी मातबर पाठवून उभयतांसच ठीक हमवार करून कार्यावर पडत तें करावें असा कोणी योजक नाहीं. उभयतां **पु**ण्यास असतां पेंच वाढला होता. तो रा०

---

* नाना पुरंदरे बरोबर होता असें दिसतें.

रामाजी विश्वनाथ बरवे यांचे मध्यस्तीनें बोलोन चालोन दोघेही निखालसा होऊन एकरूपतेनें कार्य करून दाखवूं म्हणोन दोघांनीं करार करून पायांवर हात ठेवून गेले. असें असतां फिरोन कुरुषता वाढविली यास्तव मध्यस्त रामाजी बरवे यांसच राजपुरीस उभयतांकडे पाठविले आहेत. उभयतांस बरे रीतीनें कडकावून हमवार करावें. काशींचें× कार्य एकमतें खामखां करावेंच करावें. या विचारें पाठविले आहेत. पाहवें काय करून येतात. छ ४ रजब हे आशिर्वाद.

ले. १८३ [१७१] पो छ. २२ रमजान. श. १६८२ वैशाख शु. ४ ता ११-४-१७६०

॥ श्री ॥

चिरंजीव राजमान्य राजश्री बज्याबा यांशि प्रति सदाशिव चिमणाजी आशीर्वाद उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष—तुम्हांकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरि वरचेवर सविस्तर वर्तमान लिहीत जाणें. आम्ही मजल दरमजल नर्मदापार झालों. पुढें ही दरकूच जात असों. घोड्यावर बसणें व लिहिणें पढणें चांगलें करणें. तीर्थरूप बोलावतील तेव्हां पुण्यास जात जाणें. फार खेळत न जाणें. घरीं अबई मायेनें रागें भरणार नाहीं. लाडके ब्हाल तें कामाचें नाहीं. चांगलें लिहिणें, पढणें, घोड्यावर बसणें करणें. छ. २ रमजान हे आशिर्वाद *

ले. १८४ [९८] श. १६८२ वैशाख वद्य १३ ता १३-५-१७६०

॥ श्री ॥

अखंडित लक्षुमी अळंकृत राजमान्य राजश्री विसाजी कृष्ण व हरी गोपाळ गोसांवी यांसिः—

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ सितेन मया व अलफ. तुम्ही शिरहट्टी घेतली याचीं पत्रें पाठविलीं तीं पावोन संतोष जाहाला, उत्तरें आलाहिदा पुरवण्यांत लिहिलीं असत. त्याजवरून शिरहट्टीचा बंदोबस्त करून तुम्ही पुढें गेलांच असाल. कोठें गेलां काय वर्तमान तें आठा रोजांच्या अंतरानें लिहीत जाणें. वरकडही त्या प्रांतींचें वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे. छ २६ रमजान. बहुत काय लिहिणें.

× कासें नांवाचें बेट.

* यावरून महिपत त्रिंबक ऊ० बजाबा पुरंदरे या वेळीं लहान असून त्याचे शिक्षणावर पेशव्यांची नजर होती असें दिसतें. शिक्षण कोणत्या प्रकारचें होतें तेंही या पत्रावरून व्यक्त होतें.

ले. १८५ [१३५] श. १६८२ माघ शु. १२ ता. १६-२-१७६१

॥ श्री ॥

राजश्री बाबुराव रामरामी गोसावी यांशीं-

विनंती उपरि तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. सुमेरसिंग यांजकडील गाडदी यांची वांटणी केली याची याद पाठविली ती पावली. पुण्यांत लोक हजर नव्हते व मयत जाले व रजेस गेले त्यांचे वां-णीचा ऐवज रुपये ११३२ अकराशें बत्तीस चिमणाजी × पडवळ खासबारदार दि॥ रुमाजी विंचरेकर याजबराबर पाठविले ते पावले. त्याची वांटणी लष्करांत जाली असे. र॥ छ १० रजब सु॥ इहीदे सितेन मया व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

१८६ [२१] श. १६८२ माघ व. १ ता. २०-२-१७६१

॥ श्री ॥

वेदशास्त्र संपन्न राजश्री गोविंद दीक्षित स्वामींचे सेवेशीं—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान साष्टांग नमस्कार. विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जावें. विशेष तुम्हापासून सरकारांत कर्ज घेतले मुद्दल रुपये ५०००० पन्नास हजार यांचें व्याज दरमहा दरसदे रुपया १ एकोत्रा बिनसूट प्रमाणें करार केलें असे. जाले मुदतीचें व्याज व मुद्दल हिशेब करून देऊं. मिती माघ वद्य १ प्रतिपदा शके १६८२ विक्रम नाम संवत्सरे रा॥ छ २६ जमादिलाखर सु॥ इहिदे सीतैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले. १८७ [१७५] श. १६८२ फा. शु. १ ता ७-३-१७६१

श्री.

चिरंजीव राजश्री नाना यांसि बाळाजी बाजीराव प्रधान आशिर्वाद उपरि. तुमचे सविस्तर पत्रांचीं उत्तरें अलाहिदा लिहिलीं आहेत त्याजवरून सर्व कळेल.चिरंजीव भाऊसाहेब आल्याखेरीज तुम्ही हरगीज न यावें. त्या फौजेंत अवघा मदार तुमचाच आहे. तुम्ही आल्यानें ठीक पडणार नाहीं. राजश्री बापूजी नाइकास अजमेर पावेतों भाऊसाहेबांचे खबरीसाठीं रवाना करणें.ते फलाणे ठिकाणीं आहेत अशी खबर आल्यावर यांस पाठवावयाची काय मजा ? यास्तव अगोदरच यांस पाठवावें हें उत्तम.+ छ. २९ रजब हे आशिर्वाद.महिपतराव पांड्या यास पत्रदर्शनीं पाठविणें. हे आशिर्वाद

× पडवळ हे महाळुंगें पडवळांचें, ता॥ खेड, येथील पाटीलकीचे तक्षीमदार आहेत.

+ येथपासून खुद्दाचें अक्षर.

ले १८८ [३७५] श. १६८३ वैशाख शु. ४ ता ८-५-१७६१

श्री लक्ष्मीकांत.

राजश्री बाळाजी पंडित प्रधान गोसावी यांसि

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लखन करीत असलें पाहिजे. विशेष गोसावी यांनीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लिहिला मजकूर अवगत जाहला. माघारे जातां मुलखाची पायमाली न करावी. वराड प्रांतीं गेल्या नंतर मोंगलाई अमलाची जफती करावी, म्हणोन लिहिलें. ऐसियास गोसावी यांनीं आम्हांस व राजश्री गोपाळराव यांसि खेचिवाडियाचे पारिपत्यापबद्दल ठेविलें होतें. त्यास तेथील गुंता उरकून दरकूच सुरंजेस आलों. तेथून मंडले प्रांताचे बंदोबस्ता बद्दल सागराचे सुमारें आलों तों राजश्री विसाजी गोविंद कमावीसदार दिम्मत राजश्री बाळाजी गोविंद हे भेटीस येऊन निवेदन केलें कीं, बुंदेल खंडांत बुंदेले यांनीं जमाव करून तमाम ठाणीं घेतलीं. एक सागर व हाटें राहिलें त्याजमध्यें हाटयास मोर्चे लाविले आहेत. ते घेतल्यानें तर सागरास लागतील. म्हणजे बुंदेलखंडाचा अमलच उठतो. याची साहित्य केलिया मुलुक राहतो. नाहीं तर नाहीं. यास्तव या प्रांतीं येऊन हाल्याचे मोर्चे कापून काढिले. वरकड ठाणीं घेऊन मशारनिलेचे स्वाधीन केलीं. याचा मजकूर सविस्तर पेशजी लिहिलाच आहे. सांप्रत राजश्री हिंदुपतराजे यांचा वकील सौरस्या निमित्य आला आहे. त्यास कमावीसदार मशारनिलेचा व त्याचा तहरह करून देऊन सत्वरच आपले प्रांतास जावयाचें होईल. जाते समयीं उत्तम प्रकारें फौजेंत ताकीद करून गोसावी यांचे मुलखांत पायमाली सर्वथैव होऊन येणार नाहीं. वरकड वराड प्रांतींचे जफतीचा मजकूर तर प्रस्तुत इस्तमालतीचे दिवस आहेत या दिवसांत जफती जहालिया इस्तमालतींत खा रा ख ना होती. यास्तव हे दिवस जहालिया नंतर गोसावी यांचे आज्ञे प्रमाणेंच वर्तणूक होऊन येईल. रा॥ छ २ माहे शवाल. सुज्ञा प्रति विशेष काय लिहिणें. कृपालोभ असूं दिला पाहिजे हे विनंती मोर्तबसूद.

ले. १८९ [२२] श. १६८३ वैशाख शु. ६ ता १२-५-१७६१

श्री

वेदशास्त्र संपन्न राजश्री गोविंद दीक्षित स्वामीचे सेवेसी—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष तुम्हांपासून कर्ज घेतले मुद्दल रुपये २५००० पंचवीस हजार. यांस व्याज दरमहा दरसदे रुपया १ बिनसूट प्रमाणें करार केला असे. जाहाले मुदतीचें व्याज व मुद्दल हिशेब करून एका महिन्यानें ऐवज पावता करूं जाणिजे. छ ६

सवाल वैशाख शुद्ध ८ अष्टमी शके १६८३ व्यानाम संवत्सरे सु॥ इहिदे सीतैन मया व अलफ हे विनंती.

ले. १९०
[१०७]

श. १६८३ वैशाख व. ९
ता २८-५-१७६१

॥ श्री ॥

सेवेशी रघुनाथ हरी सं॥ नमस्कार विनंती येथील कुशळ: छ २२ सवाल मु॥ मौजे जेरोण पे॥ जतारा प्रांत वोडसें स्वामींचे कृपें करून यथास्थित असों विशेष. छ १३ साबानचें पत्र सादर जाहलें तें छ १२ रमजानीं झांशीच्या मुक्कामीं पावोन बहुत संतोष जाहला. पत्रीं आज्ञा कीं, राजे हटेसिंग यांची स्थापना वोडशांत करावी. दतीयेकरांचें संमत नसावें. राणी व कारभारी एक विचारें करून बंदोबस्त करावा. त्यास राणीचें वैमनस्य राजांशीं जाहलें तेव्हां राणीनेंच कुचोद्य करून राजास काढून दिल्हा. त्याचें साहित्य दतीयेकरांनीं केलें. ते एकच आहेत. परंतु येथील प्रसंग पाहून होईल तितका स्वामींच्या आज्ञेनुरूप बंदोबस्त करून सेवेशीं लिहून पाठवितों. सालगुदस्तार्चा पक्की वहिवाट व सालमजकूरचा आजमास पाठवणें म्हणून आज्ञा. त्यावरून सालमजकूरचा आजमास सेवेशीं पाठविला आहे. स्वदेशाप्रमाणें येथील प्रकार नाहीं. रयत मवाशी. वैशाख अखेर पावेतों वसूल येईल तितकाच. अम्मल सुरळीत रीतीनें चालावे हा अर्थ रयतीस ठाऊकच नाहीं. अखेर साल पावेतों पक्की वहिवाट होईल तीं घेऊन सेवेशीं येतों. गु॥ वहिवाट पाठवावी त्यास माहितगार कारकून आहेत ते प्रस्तुत जमाबंदी वगैरे कामेंकाजें हंगामाचे दिवस आहेत याजकरितां येथें जरूर पाहिजेत. सालासही चारपांच महिने यांची अवध राहिली. सालगु॥ व सालमजकुरची वहिवाट घेऊन आम्हीच स्वामीपाशीं येतों. हिशेब पाठवावयासि विलंब लागला म्हणून रागें न भरावें. एक दोन कारकून माहितगार आहेत. त्यांस येथील काम मोठें आहे. येथील माहितगीरी त्यांचीच याजमुळें पाठविले नाहींत. त्यांत-वोडशामुळें, वोडसेकर बुंधेले याणीं या प्रांतांत दुंडी केली याजमुळें, स्वारीस निघालों. याजकरितां कारकून समागमें आणिले आहेत. वोडशाच्या बंदोबस्तास आणीक मासपक्ष पाहिजे. राजश्री विश्वासराव लक्ष्मण यांजकडे सालगु॥ वसूल पडिला, व मशारनिल्हे यांच्या विद्यमानाची शिबंदीची हिसेरसीद बेहड्याच्या अजमासें निवडून पाठविली आहे. एक दोन वेळ स्वामींची आज्ञा आली त्यावरून पाठविली. मर्जी असेल त्याप्रमाणें फडशा करावा. त्यांचा खच सरदारीचा आहे. आम्ही नेमणुकेच्या आधारें लिहून पाठविलें आहे. कमजास्त जें करावयाचें असेल तें करावें. सालगुदस्तां मवासापासून गढ्या घेतल्या, त्यांतून पाडून टाकल्या. व ठाणीं ठेविलीं व मवासांच्या दंग्यापासून गांव निर्वेध केले. त्यांची तनखा निराळी यादीवर लिहून पाठविली आहे. त्यावरून श्रुत होईल. मवासांपासून मुलूख सोडाविला आहे. परंतु जागा उजाड. लावणी केली आहे. चवसालां तनखा भरेल. मवासाचा उपद्रव जाहालियासि किले करेरा व झांशी येथें

जकीरा पाहिजे सबब आजमाशीं रुपये खर्ची लिहिले आहेत. मर्जी असल्यास जकीरा घेऊं. पागेस खर्च लागतो. पागेवांचून जुंजाचें काम जमत नाहीं. पागेमुळें सामान चांगलें राहतें. परंतु खर्च भारी. याची विनंती पूर्वी सेवेशीं लि॥ च आहे. आज्ञा कर्तव्य ते करावी. येथें घोडीं ठेवण्याचीं असिल्यास खर्च दहा हजार रुपये नेमणुकेहून जाजती लागतील. श्रुत असावें. जाटांच्या दंग्यामुळें सुलाकरी [सुकलारी ?] येथील ठाण्याचा बंदोबस्त करावा लागला. याजमुळें जाजती खर्च रुपये सुलाकरीस जहाले आहेत. खर्च न करावे तर मुलकास उपद्रव लागतो. काय करावें ? खर्च थोडका करून जमा जाजती साधावी यांत धन्याची मर्जी प्रसन्न राहते. परंतु येथील प्रकार सारा शिबंदीचाच आहे. यास काय करावें ? श्रम सायास करून फळ नाहीं. न करितां अम्मल राहत नाहीं. या रीतीचें वर्तमान आहे. निर्वाह करणार स्वामी समर्थ आहेत. वोडसेकर बुंधेले यांणीं दुंडी केली हें वर्तमान दिल्हीस राजश्री विसाजीपंतांस लिहून पाठविलें. त्यावरून राजश्री आनंदराव गणेश दिपे, राजश्री नारो शंकर राजेबहादर यांस पथक सुद्धां पाठविले आहेत. येथें येऊन पंधरा दिवस जाहले. सेवेशीं श्रुत व्हावें म्हणून लिहिलें असे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती.

ले. १९१ [३३५] | बार पैा॥ छ ११ जिलकाद सन इसने सांतैन जेष्ठमास. | श. १६८३ जेष्ठ शु. ७ ता ९-६-१७६१

श्री

राजश्री बाळाजी पंडित प्रधान यांसि.

श्रीमंत महाराज मातोश्री *जिजाबाई साहेब उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन केलें पाहिजे. यानंतर आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ कळला. तेथें लिहिलें जे, साहेबांचा पडदा सेवकाशीं नव्हता, म्हणून लिहिलें तें खरें. आपल्याशीं पडदा स्वप्नींही नाहीं. कैलासवासी महाराज स्वामींची अकृत्रिम ममता असतां साहेबीं वियोग केला, उचित नाहीं, म्हणोन लिहिलें, तें प्रमाणच आहे. आपण बंधुच आहेत. परंतु राजश्रीच्या आज्ञेनुरूप चारी गोष्टी तुम्हांप्रति बोलावेसें होतें. आपण दूर राहिलां. समेटी साहेबांपासून घडेल न घडेल, हें आपण जाणतात. प्रत्ययासही येईल. येथील अर्थ आपल्या शिवाय नसल्यास आपण इतका संदेह घेऊन ल्याहावें, सर्व प्रकारें करून आपल्या ममतेची आहों. राजश्री शेषो नारायण यांसही मागाहून पाठवून देत आहों. पुण्यशील अनुबाईसही येणें विशीं पत्रें गेलींच होतीं. कळलें पाहिजे जाणिजे. रवाना छ ५ माहे जिलकाद बहुत लिहिणें तरी सुज्ञ आहां.

लेखन सीमा

* जिजाबाई कोल्हापुरकर संभाजीची बायको.

ले. १९२ [५३] | स. १६८३ आषाढ वद्य ३ ता. २०-७-१७६१नंतरचें

श्रीकृष्ण प्रसन्न

श्रीसांबसदाशिवायनमः जो सांबसदाशिव कसा आहे कीं, सत्स्वरूप म्हणजे असें चित्स्वरूप प्रकाश अवस्था-त्रय साक्षी जागृत कालीं त्यास विश्व स्वप्रकाशीं तैजस सुषुप्ती-कालीं प्राज्ञ असें ज्यास म्हणतात, जो एकच आत्मा उपाधि-भेदें करून नाना प्रकारें भासतो. पाय नसतां चालतो. डोळे नसतां पाहतो. हात नसतां घेतो. कान नसतां ऐकतो. सर्वांतर्यामी व्यापक हें कशावरून ? व आत्मा आहे हं कशावरून ? तर, दूर कोणी इंगितज्ञ बसला असतो त्याचा याचे आत्म्यांत [आरशांत ?] प्रतिबिंबित होऊन तींच गोष्ट घेतो. व्यापकते व्यतिरिक्त कसें घडेल. असा आत्मा त्यासच आपणांत विसरून आनंद-स्वरूप सोडून दुःखांतील सुख भोगावयाची इच्छा धरितो. हेच त्या आत्म्याची माया. सत्य ह्मणतां नये, असत्य ह्मणतां नये. जिचें स्वरूप अनिर्वचनीय सत्त्व, रज, तमोगुणी तिजपासून अहंकार, आकाश, वायु, तेज, उदक, पृथ्वी पंचमहाभूतें. महत्तत्व ह्मणजे अंतःकरण तदवच्छिन्न जें चैतन्य जो जीव अपंचीकृत पंच महाभूतें करून तदंशरूपें लिंगशरीरद्वारा जीवास सुख दुःखादि प्राप्ती. ' भोगायतनं शरीरं ' भोगाच स्थान शरीर होय. त्या शरीराची उत्पत्ती तर जें निंद्यस्थान योनी, व पुंस स्थानापासून रेत ज्याचे स्खलनें करून व स्पर्शे करून स्नान करावें लागतें, अशा निंद्य पदार्थापासून शरीर वृद्धीतें पावतें. गर्भींच लयातें पावलें तर गेलें, वांचलें तर आंत अनेक जंतूंचे उपद्रव व जठरस्थ अग्नीनें दाह इत्यादि क्षुधा-तृषा समयीं परिमार्जन न होणें. असे क्लेश भोगितां प्रसव वायूकडून कष्टें करून जन्म जाहालें म्हणजे जाताशौच प्राप्त. तदनंतर रोगादिक वेदना आपणच मुक्यानीं सोसाव्या. षड्भाव विकार अस्ति, जायते, वर्धते, विपरीणमते, अपक्षीयते, नश्यति. हे षड्भाववत् विकार असा देही जो मी * त्याला लाहनपणीं अज्ञानें करून आवृत. परंतु पूर्व संस्कारें करून देवाची पूजा करावी हा छंद फार. याजकरितां * * मातोश्रींनीं मारही दिला. परंतु संस्कार दृढ, विद्याभ्यासा करितां मातापितर जे यांची शिक्षा तेणेंकरून लहानपणीं अज्ञानाकरितां चित्तास फार वाईट वाटून त्यांचेंही अनिष्ट चिंतीत असें. दहावे वर्षी विवाह झाला. विघ्नें पडलीं असतां निर्विघ्न केलें. पुढें ऊणा बारा वर्षां नंतर कामाविर्भाग शरीरीं होऊं लागला. तेणेंकरून व असत्समागम किंचित झाला तेणेंकरून पापप्रवृत्ती होऊं लागली. रेतस्खलनही व्यर्थ करूं लागलों. मध्यें घोड्यावरून पडलों. अति अवस्था कठीण, दोन दिवस शरीर भान नाहीं. या प्रमाणें जाल असतां गोविंद जो त्याचे कृपेनें बरें केलें. पुढें पंधरावे वर्षी पित्याचा काळ झाला. त्यांचें और्ध्वदेहिक ईश्वरें करविलें.

---

१. हें बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणीस यांचें स्वलिखित आत्मवृत्त आहे हें कसें प्राप्त झालें या विषयीं या लेखाच्या अंतीं हकीकत लिहिली आहे. हें ता. २०-७-१७६१ रोजीं पहिले माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळाली तों पर्यंत आहे. याचें इंग्रजी अवतरण मॅक्डोनल्ड कृत ना. फ. चरित्रांत छापलें आहे.

*. जन्म-ज्येष्ठ शके १६६३. २. पिता-जनार्दन बल्लाळ भानु.

त्यांत पापदृष्टे एक समया जहाली. हा अपराध झाला. व्यर्थ रेतस्खलनें करून पाप व शरीर-नाश समजूं लागलें तेव्हां सोडून देऊन निश्चय केला. परंतु कामाविर्भाव विशेष, येणें करून पापबुद्धी होत असे. पुढें परंपरा सेवाधर्म[3] चालावा या योगें व श्रीमंतांची कृपा पुत्र-वत् असे जाणून कर्नाटक प्रांतीं श्रीरंगपट्टणें पर्यंत गेलों. परंतु प्रत्यहीं स्वप्नावस्था होऊं लागली. पुढें घरीं आलियावर रमणीयोग मात्र अज्ञानच तेणेंकरून जाहला. परंतु पापबुद्धी निःशेष सुटेना. तेव्हां चित्तात विचार केला कीं, पितामहें[4] यांची बुद्धि धर्मशील असतां व सत्य-वचनी एकनिष्ठ देव-ब्राह्मणांचे ठायीं परम भक्ती; सात्विक आणि निषिद्ध कर्म करणेंच नाहीं; असें असतां माझें चित्त पापाकडे थोडेंसें कां जातें. ? याचा विचार करितां मातामह-पक्ष× अति व्यभिचारी तो संस्कार आहे. बुद्धीचा निश्चय करावा तत्रापि स्थिरता राहूं नये. तेव्हां संस्कार बलवत्तर. पुढें टोंक्यास अतिरुद्र करावयास गेलों. तेथें देवतार्चन-नेम धरिला. परंतु शरीरीं पीडा तेणेंकरून वैराग्य असें कीं, पर-स्त्री मनांतही येऊं देऊं नये मग पाहणें कोठील ? मातोश्री व कुटुंब सहवर्तमान भाऊं बरोबर हिंदुस्थानांत जाऊन स्वर्गंगा त्रिपथ भागीरथीचें स्नान त्रिस्थली यात्रा करावी, अंतःकरण शुद्धी होईल, या भावने करून गेलों. त्या कालीं चित्तास अति वैराग्य. याचें कारण शरीरीं किंचित् पीडा. तेणेंकरून चित्त अति वैराग्यशील जहालें, कीं, भगवंताची पूजा व ध्यान मात्र करावें. उष्ण शीत यांचीही पीडा परंतु चित्तास नाहीं. मातेच्या ठायीं भक्ती होत्साता चाललों. ते नर्मदा महागंगेमध्यें स्नान करून एका वृत्तीनें ध्यान केलें. त्या दिवसा पासून उत्तरोत्तर वैराग्य अंतःकरण-शुद्धीच होत चालली. भाऊंची ममता विशेष व आंवेची व्यथा बहुत जाहाली, उठावयास शक्ती नाहीं, रेचन बहुत, ग्लानी फार तेव्हां कूच जहालें असतां मुक्काम श्रीमंतांनीं करवावा. त्या कालीं ईश्वरें आरोग्य केलें. पुढें दर मजल चरमन्वतीतीरींगेलों. तेथें ग्रहण पडलें. स्नान-दानादिकें करून आत्मा पवित्र होत्सता ध्यानें करून कालक्षेप चालत असे. पुढें सूर्यतनया यमुना इचे तीरीं गौ-घाटा जवळ गेलों. तेथें स्नान-संध्या करून दोहों दिवसां नंतर मुक्ति-पुरी श्रीमथुराक्षेत्रीं[5] गेलों. तेथें क्षौर प्रायश्चित्त श्राद्धादिक करून तदनंतर पुढें भगवान् पूर्णब्रह्म राधाकृष्ण याणें सकल लीला केल्या असें जें वृंदावन त्या स्थळास गेलों. तेथें कालिया-डोहीं कदंबवृक्ष ज्याजवर भगवान् बसून वस्त्रहरण करिता जहाला, त्याच्या शाखा अद्यापि यमुनेंत गेल्या आहेत, त्या खालीं जाऊन स्नान तर्पण करून तदनंतर

---

३. परंपरेनें कसा चालत आला तें वंशावळ पाहिली असतां समजेल. खेरीज भानूंचा व पेशव्यांचा घरोबा किती होता हेही पे० ब० पाहिली असतां ध्यानांत येईल.

४. ही स्वारी १७५५।५६ त झाली.

५. पितामह-बाळाजी महादेव भानु. × मातामह पक्ष मेहेंदळे.

६. ह्या सप्त मुक्तिपुऱ्या प्रसिद्ध आहेत. अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका पुरी द्वारवती चैव सप्तैता मोक्षदायकाः ॥ १॥

गोपीचंदनाचे टिळे व तुळसीच्या माळा घालून भगवंताचें ध्यान करीत होत्साता वृंदावनांत अटलबिहारी व कुंजबिहारी व बालबिहारी, राधाकिशोर, गोविंदजी या भगवंताच्या मूर्ती यांचीं दर्शनें घेतलीं. त्यांत कुंजविहारी मध्यानकालीं चोंपाळ्यावर निद्रिस्थ, कपाट लागलेलें, परंतु चोंपाळ्याची दोरी बाहेर ओढीत असत. ती आपले हातीं ओढून भगवान् जो यास आंदोलन-लीला केली. तेथोन शृंगारवट जेथें भगवंतें राधेस शृंगार केले तेथें जाऊन वट-दर्शन घेऊन पुढें बंशीवटी म्हणजे जेथें भगवंतें मुरलीवादन केलें, तेथें जाऊन वटाचें दर्शन केलें. तेथून सेवाबन, कुंजबन हीं स्थळें, कुंज कसें कीं भगवान् लीला करितो असाच भास होत असावा. सर्वही वृक्ष छत्राकार ठेंगणे भूमिस्थ पल्लव कंटक वृक्षासही परंतु [?] कंटक नाहीं हें पाहून आनंदमय होत्साता यमुनातीरीं रेतींत भगवान् जो याणें बाळरूपी लीला केली. पादारविंद संबंधीं रेणु रजःकण त्याची प्राप्ती मस्तकीं वंदावया करितां ब्रह्मादिक देव इच्छितात. तेथें जाऊन लोळून ती रेती मस्तकावर घेतली. तेथोन ज्ञानगुदडीस [?] गेलों. तेथें थोर थोर संत, महंत, बैरागी भगवत्पर होत्साते, सायंकाळचे साहा घटिका दिवसास येऊन बसून पुराण-श्रवण करीत आहेत. भगवंताच्या कथा नामें गाताहेत. त्यांचें दर्शन घेऊन चार घटका पाहून चित्त बहुत शांत जहालें. तदनंतर धीरसमीर जे यां प्रति कालिंदी-तीरीं जाऊन सायंकाल संध्या करून भगवान् सांबसदाशिव जो याचें एकाग्र मनें करून ध्यान करून येता जहालों. याप्रमाणें तीन चार दिवस क्रमिले. अनेक जन्मांचें पुण्य कीं, असें वृंदावन दृष्टीस पडलें तेणें करून भगवंताच्या मूर्ती व भगवद्भक्त त्यांचे दर्शनें करून नेत्र पवित्र जाले. पादें करून चालत गेलों तेणें करून पायांचें सार्थक जाहालें. हस्तें करून नमस्कार करिता जाहालों तेणेंकरून हस्त पवित्र झाले. मुखेंकरून नामस्मरण केलें तेणेंकरून मुख पवित्र झालें. कर्णें करून भगवत्कथा-श्रवण केलें तेणेंकरून श्रोत्र पवित्रता पावले. स्नानें करून सर्व देह पवित्र झाला. ज्या वृंदावनांत बैरागी एकाग्र वृत्ती करून ध्यानस्त होत्साते कुंजाखालीं जागां जागां बसले आहेत; कोणी पर्णेंच भक्षून, कोणी जल प्राशन मात्र करून, कोणी दुग्ध सेवन करून, कोणी सिद्धान्न आणून घालील तेंच खाऊन राहिले आहेत; अशांचें दर्शन घेऊन सत्समागमाचें माहात्म्य किंचित् आनंदातें पावलों. त्यांत एका बैराग्यानें कृपा करून एक मंत्र भगवंताचे नामाचा सांगितला, कीं याचा जप करीत जावा. तो भगवंतेंच सांगितला असा मानून, सर्वांस यथाशक्ति देणें देऊन संतोषातें पावलों. पुढें दिल्लीस गेलों. तेथें पृथ्वीपतीचें* दर्शन श्रीमंतांचे आज्ञेवरून घेतलें. त्याणीं बहुत कृपायुक्त भाषण करून आशीर्वाद देऊन आपले जवळील वस्त्रें दिलीं तीं घेतलीं. किंचित् संतोष जाहला कीं, भगवंताचे कृपेचे अंतर्वर्ती ही कृपा आहे. तदनंतर श्रीमंतांचे लष्करांत श्रीमंतांजवळ आलों. बसलों असतां भूमीकंप जाहला. परंतु भगवंताचें ध्यान चित्तांत आणिता जालों. दिल्लीतील चित्रें वगैरे विषय ज्यांत पाप नाहीं असेही घेतले.

---

* पृथ्वीपति=बादशहा. जवानबख्त म्हणून एक लहान शहाजादा भाऊनींच गादीवर बसविला होता.

पाहिले. पुढें उत्तरेकडील यवनें शत्रुत्वें करून यमुना पैल्तीरीं पाऊण लक्ष सेनेसहवर्तमान येऊन उतरला. परंतु यमुना भरपूर चालली तेणेंकरून उभयपक्षीं स्तब्धताच जाहली. पुढें कुंजरपुरा श्रीमंतांनीं शौर्यें करून घेतला. माही युद्धांत होतों. ईश्वरें राखिलें. तों इत्कियांत यवन आलीकडे आला. श्रीमंत सैन्यासहवर्तमान त्याचे समोर गेले. गांठ पडली. तेव्हां मी तर लहान श्रीमंताचे बुद्धीस महानबुद्धी [?]. परंतु भावी अर्थ तेणेंकरून विपर्यास पडला. आप्त होते बळवंतराव[२] मातुल व नाना पुरंधरे वगैरे ते अनाप्त झाले. जे अनाप्त शाहनवाजखानी, भवानी शंकर वगैरे ते आप्त जाहले. त्यांचे वाक्याचे ठायीं विश्वास, तेणेंकरून आपली रीत युद्धाची सोडून यवनाची रीतें धरिली. परस्परें युद्ध होत असे. गोळे प्रत्यहीं शत्रूचे राहुटींवरून जात. मातोश्री व स्त्री भयभीत होत. कीं कसें होईल? ते ते समयीं मातोश्रीस विनंती करीत गेलों, कीं मी विनंती करितों. एक ईश्वरीं लक्ष असावें. त्यांत मातुल युद्धांत होते ते पडले. ते दिवशींच सर्व सैन्य नाशास पावावें. परंतु रात्र जाहली यामुळें राहिलें. त्या दोन महिन्यांत मनुष्यें, पशु बहुत मेले. अन्नाची महर्गता. दुर्गंधी एकेच ठिकाणीं. असे श्रम पाहिले. पुढें मातुळाची स्त्री समागमें गेली. मातोश्रीस श्रम फार जाहले. होणार अवश्यक होतें. यदर्थी संदेह धरूंच नये. हा माझा निश्चय. पुढें थोरलें *युद्ध उदयीक होणार तों पूर्व दिवशीं संकेत कीं, पराजय आपला जाहला तरी शत्रूचे हातीं श्रीमंताचें कुटुंब व आपलें हातीं लागूं नये. आपणच नाश करवावा. आपण तर वांचत नाहीं असा सिद्धांत करून श्रीमंतांनीं याची ही योजना केली. दुसरे दिवशीं तयार होऊन प्रातःकालचे दोन घटिका दिवसास युद्धास गोळागोळींचा प्रारंभ जाहला. श्रीमंत अति बुद्धिवान्, धैर्यवान्, शूर, कृतकर्मे गर्व मात्र विशिष्ट, परंतु तर्तुद फारच सैन्याची वगैरे केली. शेवटीं निशाणा जवळील तर्तुद एकीकडे जाऊन शत्रूची मुख्य स्थानींच गांठ पडली. मी श्रीमंता सन्निध ईश्वरस्मरण किंचित् करून असें. तों विश्वासराव यांस गोळी लागली. पडले. ते हत्तीवर श्रीमंतांनीं घालून उभेच राहिले. तों पठाण पाय उतारा आंत येऊन मिसळले. तोडातोडी होऊं लागली. आणि डावे बाजूचे मातबर सरदार, चौघड्याचे धनी देखील, पूर्वीच पळाले.

---

१ यवन अहमदशहा अबदाली हा या काळीं २४ दस्ते फौजेसह आला होता. सुमारें १२ शें लोकांचा एक दस्ता.

२ बळवंतराव मातुल-हे बळवंतराव गणेश मेहेंदळे. नाना म्हणतात मातुळ अनाप्त झाले. परंतु दुसरे लेखांत बळवंतरावांच्या मसलतीनेंच भाऊसाहेब चालत असत असें म्हटलेलें असतें.

३ हे दिल्लीतील पादशाही मुत्सद्दी-

४ एक जागां खंदक करून राहणें ही रीती-ही यवनी रीत इब्राइमखा गाडदी याचे मसलतीवर व बळावर पतकरली.

५ मातुळ-बळवंतराव मेहंदळे.

* थोरलें युद्ध-पौष शुद्ध ८ शके १६८२.

उजवे बाजूचेही होळकर शिंदे निघोन निशाण निघालें. दोन तीन शत पायदळ होतें. श्रीमंत दिसेनातसे जहाले. तेव्हां ईश्वरें बुद्धी दिली. माघारे फिरलों. पूर्वी युद्धांत बापूजी+ पंतीं बोध केला, माघारे फिरावें. त्यांस उत्तर केलें कीं, अशा समयीं श्रीमंतांस सोडणें ठीक नाहीं. परंतु पुढें या प्रमाणें जहालें. लक्ष सैन्य त्यांत मोठे मोठे सरदार असतां एकही त्या समयीं श्रीमंतांस आप्त न जहाला. बहुत दिवस अन्न भक्षिलें, कृपा पुत्रवत् केली. तितकें चांगला काळ होता तेव्हां केशास ढका लागल्यास प्राण देऊं अशा प्रतिज्ञा. परंतु ईश्वर घटित विपरीत काळ त्यांत सोबती कोण होतो ? सर्व सुखाचे सोबती. भोजन आदरें करून करावें. वस्त्रें, जवाहीर, जागिरा द्याव्या. निदानीं इतके असून ज्यांचे देहाचें ठिकाण कोणास ठाऊक नाहीं. सर्व वातादत जहाले. मी सायंकालचे दोन घटका दिवसास घोड्यावर पाणिपतांत आलों. त्या देशाचा मार्ग अगदीं ठाऊक नाहीं. तेथें परमेश्वरें वाट दाखवावया पुरते रामाजीपंत उभे होते. सांगूं लागले घोडें वस्त्रें टाकून द्यावीं. त्या वरून सर्व टाकून शुद्ध लंगोटी लावून बसलों. रात्र जहाल्यावर चाललों. तों एका कोसांत तीन चार वेळ शरीरास हात लावून टोपीवाल्यांनीं झाडा घेतला. दर खेपेस समागमेचे दहावीस तोडून टाकीत. त्यांत मी राहिलों, हे सत्ता ईश्वराची. परंतु बापूजीपंत, रामाजीपंत, राहतच गेले. असे जातां दाहा बारा कोश पश्चिमेकडे गेलों. तों तेच शत्रु येऊन रामाजीपंत बापूजीपंत वगैरे यांस जखमी भारी केलें. पडले. मी एकटा राहिलों. तो गवतांत गेलों. ईश्वरें तृणें करून माझें रक्षण केलें. त्यांस मोहनी घातली. सर्वांस मारिलें असतां मी जवळ असतां न मारिलें, व गवत लांब असतां जाऊं दिलें. पुढें ते गेल्यावर जाऊं लागलों. तों पुढें दोन कोशांवर दुसरे मागती दृष्टीस पडले. तेव्हां मागती तृणांत जाऊन बसलों. तों जवळ येऊन काढूं लागले. ते समयीं ईश्वर त्यांतील्च एका वृद्धाचे मनांत संचार करिता जहाला, कीं कशास मारितां ? मग गेले. तदनंतर माझी शक्ति पाणिपतावर बहुत क्षीण, आमविकारादिक विकारयुक्त, अन्न चालेना, असा मी त्याजवर दयासमुद्र सांबसदाशिव जो याणें कृपा करून, शरीर अशक्त, ऊन पाहिलेंच नाहीं, व पादचारी अभ्यास नसतां सोळा सत्रा कोश अन्न उदका व्यक्तिरिक्त आलों. क्षुधा तिसरे प्रहरीं लागली. तेव्हां बोरीचा पाला सांपडला तो खाऊन पाहिला तो तोंडांत जाईना. तसाच सांयकाळीं एका ग्रामाबाहेर आलों, तों एका बैराग्यानें पीठ आणून दिलें. त्याची भाकर खादली. ती अमृत-समान लागली. नंतर निद्रा केली. प्रातःकालीं गंगा-सहस्रनाम म्हणत ईश्वर-स्मरण करीत चाललों. तों एका गांवामध्यें गेलों. तेथें एक साहुकार होता, त्यानें घरीं नेलें. भोजन एक ब्राह्मण होता, व यशवंतराव चाबुकस्वाराकडील भेटला, त्याजकडून स्वयंपाक करवून भोजन केलें. तों शत्रूचे स्वार गांतांत आले, हें वर्तमान कळलें, तेव्हां साहुकार म्हणाला कीं आम्ही गाडी करून जयनगराकडे पावते करितों. गाडींत बसून चाललों. तों पाहिलें कीं हा फसावितो. असें बुद्धीस येऊन गाडी टाकून पाय उतराच होऊन चाललों. बरोबर दोन तीन ब्राह्मण, दोन मराठी

+ बापूजीपंत–कोण ? हिंगणे ?

माणसें, याप्रमाणें दहा बारा कोश गेलों. असे सात दिवस पायीं चाललों. नित्य भोजनाचें साहित्य ईश्वर देववी. तेणें करून समागमचे मंडळी सुद्धां भक्षून रेवडी पावेतों आलों. तों लष्करचे पळे त्या वाटेनें गेले. त्यांस गांवांत बालोराव म्हणून चौघे भाऊ असत. ते माझें नांव ऐकून पुसत, कसे आहेत ? चेहरा कसा! खुणा खाणा सर्व त्यांणीं पुसून घेतलें. मागाहून हे येतात हें जाणून मार्गावर नेहेमीं पहात बसत. आम्ही आलों तों त्यांणीं रेवडी बाहेर ओळखिलें, पुसूं लागले. नांव न सांगावें हा निश्चय, परंतु तो आंगींच नांव लावूं लागला. त्याचे बोलण्यांत वांकडी गोष्ट नाहीं, आम्हांस साहित्य करून द्यावें, उपकार करावा हें पाहिलें. तेव्हां नांव सांगितल्यावर आपले घरास मंडळी सुद्धां नेऊन उत्तम प्रकारें भोजनाचें साहित्य करून दिलें. भोजन केल्यावर वस्त्रें दिलीं. तदनंतर **रामजी** दास जोशी मातबर रेवडींत असे, त्यास वर्तमान कळल्यावर त्याणें आपले घरीं नेऊन ठेविलें. सात दिवस भोजनास व उत्तम वस्त्रें दिलीं. पुढें आमचें मानस **दीग** भरतपुरास जावयाचें. परंतु तो म्हणे सोबत चांगली लावून गाडी करून देऊन पावतें करीन. त्यावर एक लग्न निघालें, त्या बराबर गाडी करून देऊन बराबर पेढे साहित्य करून दिलें. आम्ही निघालों तों वाटेंत **कृष्णभट वैद्य** आले. त्यांणीं सांगितलें कीं, **स्त्री विरोजी बारावेकर** यांणीं संभाळून आणिली. ती **जि ग नी स नारो**पंत **गो**खले यांचे घरीं आहे. तेथें त्या गृहस्थानें साहित्य वस्त्र पात्रांचें केलें. आम्ही तेथें गेल्यावर भोजन क्षिरीचें घातलें. तेव्हां आनंद झाला. मग **स्त्री**स एक गाडी दुसरी करून तेथून निघालों. तों **दि**गेस आलों. तेथें पुरुषोत्तम **म**हादेव **पा**णिपताहून आले होते, ते **वा**नवळे यांचे गुमस्त्याचे बिऱ्हाडास राहिले होते. त्यांस कळतांच त्यांणीं आपले बिऱ्हाडास नेलें. तेथें कुटुंब सुद्धां कमकसर महिनाभर होतों. क्षुधा फार लागत असे. त्यांणीं वस्त्रें वगैरे साहित्य भोजनाचें चांगलें केलें. तेथून मातोश्रीचा शोध फार केला. परंतु घरचा खिजमतगार बराबर होता त्याणें सांगितलें कीं, घोड्यावरून पडून जखम लागून मेली[१६]. हेंच ठिकाण लागलें. पुढें पालखी व घोडीं घेऊन ढवळपुरावरून **ग्वाल्हेरी**स सारें लष्कर पळून **पा**र्वतीबाई, **ना**ना पुरंधरे, **म**ल्हारजी **हो**ळकर सारे होते तेथें आलों. अंतःकरणापासून होतें कीं, श्रीकाशीस जाऊन नेहमीं वास करावा. प्रपंचांतील विषय-मात्रीं दुःख हें पुरतें समजलें. परंतु देहप्रारब्ध बळवंत. तेथें आलियावर सर्वांनीं निषेध केला. एकदां देशीं जावें. मातोश्रींचा विधी करावा. वगैरे कित्येक प्रकार **का**शींत गेल्यावर कसें होईल. **पा**णिपत जालें तेव्हां **का**शीही कसी होते. असें चित्तांत येऊन लष्करा बरोबर येऊं लागलों. **पा**णिपताचें वर्तमान **श्रीमंत ना**ना साहेबांनीं ऐकून माझें स्मरण फार गुरूजी[१७] जवळ केलें कीं, त्याचें शरीर अशक्त, कसा निभाव होईल ? परंतु ईश्वरकृपेनें व त्यांचें आशिर्वादें महत्सं-

---

१५. बारावकर–हा पार्वतीबाईस आपल्या घोड्यावर घेऊन तिचें प्राणरक्षण करणारा 'बारवेकर.' नानांची आई व कुटुंब युद्धारंभीं पार्वतीबाई जवळच होतीं.

१६ 'गिलचे यांजकडे सांपडली' असें भा० सा० ब० येथें लिहिलें आहे.

१७ हे गुरुजी कोण ? महादाजी बल्लाल करकरे ?

कटांतून पार पडलों. पुढें श्रीमंत नानासाहेब यांचें दर्शन बराणपुरांवर जालें. पाहतों तों शरीर फार क्षीण जहालें आहे. मर्जी बेतन्हा जाली आहे. बहुतांच्या अब्रू क्षणक्षणां जातात. परंतु मजवर सदयतेनें लोभेंकरून भाषण करून वर्तमान पुशिलें. सांगितलें. तीन चार दिवस बरोबर राहिलों. श्रीमंत गोपिकाबाई व नारायणराव यांस देवी आल्या. करितां त्या सहवर्तमान नर्मदातीरीं राहिलीं. परस्परें*उभयतांचें चित्तही ठीक नाहीं हें कळलें. काल-वैपरित्यें करून न घडावयाचें तें ही घडलें. तदनंतर या मर्जीत कसें होईल जाणून निरोप घेतला कीं टोंक्यास पुढें जातों. जावें म्हणून आज्ञा दिली. टोंक्यास येऊन राहिलों. तों श्रीमंतही मागाहून तेथेंच आले. पुन्हा दर्शन घेतलें. मर्जी बिकट असतां एक शालिग्राम मागितला तो बहुत कृपेंकरून आज्ञा झाली कीं, क्षेत्रांतून पाहिजे तो घेणें. सीतारामचंद्र मूर्ती घेतली. एक दिवस प्रदोष तेथें पडला. ते दिवशीं श्रीमंत थोरले रावं यांचें श्राद्ध म्हणून मला भोजनास बोलाविलें. मी विनंती सांगून पाठविली कीं, प्रदोष आहे. तत्रापि यावें म्हणूनच उत्तर जाहलें. यावरून स्वारी देवास जातेसमयीं गुरुजकिडून विचारावितें. तेव्हां आज्ञा जाली कीं, रावसाहेब यांचें श्राद्ध आहे याजकरितां जरूर जरूर यावें. त्या वरून गेलों. श्राद्धाचे ब्राह्मण [यांचीं] भोजनें जाहल्यावर खासा भोजनास बसले. एकीकडे श्रीमंत माधवराव [व] एकीकडे मला बसविलें, आणि दुसरे स्त्रीकडून वाढविलें. तिला शिक्षा वाढावयाची दाखविली. अर्थात् मातोश्रीकडून लेंकरास वाढविलें. नंतर श्रीमंतांस विनंती केली कीं, कांहीं दिवस गंगातीरीं राहून मन स्वस्थ करावें असें आहे. त्यावरून आज्ञा जहाली कीं, कांहीं दिवस राहावें. श्रीमंत कूच करून पुण्यास गेले, तों शरीर क्षीणच होतें. शेवटील समय. लवकर यावें म्हणून पत्रें आलीं. त्यांचे अन्नाचें शरीर, समयीं जवळ असावें, याकरितां पुण्यास येऊं लागलों तो पारनेरा आलीकडे वर्तमान ऐकिलें कीं, कैलासवास केला. श्रीमंत दादासाहेब यांचीं पत्रें आलीं कीं, जरूर यावें. पुढें पुण्यास आलों. श्रीमंतांस देवदेवेश्वर+सन्निध कैलासवास जाहला. हें ऐकून श्रम जहाले. नंतर दादांही कृपायुक्त ममता केली. पुढें श्रीमंत राजश्री माधवराव साहेब यांस साताऱ्यास पेशवाईचीं वस्त्रें द्यावयाकरितां घेऊन गेले. समागमें मलाच घेऊन गेले. राजद्वारीं वस्त्रें घ्यावयास समागमें येणें म्हणून बहुत आग्रह केला. विनंती केली कीं, आम्हांस गरज काय ? आमचे खावंद आपण म्हणोन गेलों नाहीं. त्यावर श्रीमंतीं राजआज्ञा घेऊन [ते] पुण्यास यावयास निघाले. समागमेंच होतों. वाटेंत चालतां एक गाडदी शेतांतील कुणब्याचे बायकोवर बलात्कारें सर्वां देखतां जाऊन पडला. तो एका राउतानें भाल्यानें मारिला. तेव्हां कामाची दशा पाहिली. नंतर श्रीमंत निरा उतरोन पलीकडे गेले

---

* नानासाहेबांचे व गोपिकाबाई यांचें ? त्याच वर्षी नूतन सपत्नी झाल्यामुळें बाईचें मन रुष्ट झालें असावें.

१९ थोरले राव-बाजीराव बल्लाळ.

२० ही नारोबानाईक वाखरे, पैठणकर, यांची कन्या. लग्न १७८२ मध्यें मार्गशीर्षांत झालें. नांव राधाबाई ठेविलें. + देवदेवेश्वर-पर्वतीवरील महादेव

आम्ही उद्यां उतरोन जाऊं म्हणोन शिरोळ गांवांत राहिलों. नदीस पूर आला याकरितां नावेंत बसलों. मध्य-धारेंत नांव आली ती प्रवाहीं पडली. नावाडयांनीं सांगितलें कीं, आमचा उपाय नाहीं. तेव्हां पुढें खडक जवळ आला, फुटली, म्हणजे शेवटीलच पक्ष. तेव्हां ईश्वर-स्मरण केलें. तों दोन मनुष्यांनीं उडया टाकून नाव ओढून काढिली. हें रक्षण क्षीराब्धि-शयन महाविष्णु यांणें केलें. पुढें पुण्यास आलों. तों श्रीमंतांनीं कृपा करून या समयीं कार्यांत मन घालावें हे आज्ञा केली. ×

ले. १९३ [५०] | श. १६८३ श्रावण व. ६ ता। २१-८-१७६१

श्री

राजश्रिया विराजित राजयान्य राजश्री **विश्वास रावजी** स्वामींचे सेवेसीं पो। **गोपा-राव गणेश** सां नमस्कार विनंती उपरि येथील कुशल ता। छ २० माहे मोहरम मु॥ नजीक बुढा डोंगर जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष, पूर्वी आपण पत्र पाठविलें तें पावलें तेथें लिहिलें कीं, पुढें आपले जाणियाचा विचार कोणिकडे हें लिहावें. ऐशास आम्हास श्रीमंत राजश्री **दादा**साहेब यांनीं आज्ञा देऊन हे प्रांतें खाना केलें. त्यावरून येथपर्यंत दरमजल येऊन पोंहोचलों. तों सांप्रत श्रीमंतांचीं पत्रें पातशाहा व सुजातदौले यांस आलीं आहेत आणि आम्हांस लिहिलें आहे जे तुम्ही त्यांजकडे व पुढें

× " हें पुण्यश्लोकाचें स्वानुभूत निजहस्तें लिखित प्रकरण चतुर पुरुषांनीं संगृहित परम यत्नेंकरून संपादिलें त्याची प्रति श्रीमंत राजश्री **मोरो**पंत तात्या १००० सहस्रबुद्धे यांचे प्रतिस्तिव केली. मित्ती आषाढ **शुद्ध** ५ मित्रवासर शके १७७१ सौम्यनाम संवत्सरे." **शिवकिंकर गोपाळ महादेव भोगले मुकाम पुणें.**

" हा अस्सल लेख श्रीमंत **बाळा**जी **जनार्दन** ऊर्फ **नाना** फडनवीस यांचे जाती-बद्दल त्यांनीं स्वदस्तुरचा लिहिलेला आपले जन्मापासून तों श्रीमंत **बाळा**जी **बाजी**राव पेशवे कैलासवासी होऊन त्यांचे चिरंजीव श्री **माधव**राव **बल्लाळ** यांस पेशवाईचीं वस्त्रें मिळून त्यांनीं यांस कारभार करण्यास सांगितला तों पावेतों लिहिला आहे. यांत त्यांनीं आपलीं दोषास्पद कृत्येंही लिहिलीं आहेत. सबब या लेखास फारच योग्यता आहे. असो. हा लेख अस्सल कोठें असेल तो असो, परंतु नक्कल **मोरो**पंत तात्या सहस्रबुद्धे यांचे संग्रहीं होती तिची नक्कल श्री कृपासागर राजश्री **गोपाळ महादेव** भोगले पुणेकर वास्तव्य टोकें यांणीं शके १७७१ साली केलीं ती अस्सल प्रत राजमान्य राजश्री **माधव**राव **सखा**राम कुळकर्णी **सोलेगां**वकर यांणीं प्रत घेण्याकरितां आणिली ती त्यांचे बरोबर भागानगरास आली. ती संभाळून ठेवणेविषयीं भोगले यांचें पत्र सोलेगांवकरांस आलेवरून प्रत पाहिली वाचिली. संग्रहा योग्य दिसल्यावरून संग्रह केला असे. मि० आश्विन **शुद्ध** १ भृगुवासर शके १८०० बहुधान्यनाम संवत्सरे " **वामन बाळकृष्ण दीक्षित.**"

कित्येक तेथून मनसबे करावयाचे आहेत याजमुळें दरमजल त्यांजकडे जाणार, त्यास आपले-कडील वर्तमान अलीकडे कांहींच कळत नाहीं. आपले प्रांताचा बंदोबस्त कोणे प्रकारें आहे, कोणी लबाडी करीत आसिल्यास आम्ही तेच मार्गें येत असों. तुम्ही सांगाल त्याचें पारपत्य करून पुढें जाऊं. प्रस्तुत नवीन वर्तमान ऐकिल्यांत आलें कीं, जाटांची फौज भदावर प्रांतांत येऊन अटेर घेतली आणि भिंडेस लागले आहेत,तेथोन पुढें सरकारच्या प्रांतात येऊन सपसर्ग करणार याचा प्रकार काय आहे हें सविस्तर ल्याहावें. श्रीमंत राजश्री दादासाहेब फौज सुद्धां स्वार होऊन चांदवडास आले. तेथोन हे प्रांतें यावयाचा विचार आहे. म्हणून पत्रेंच आलीं असत. वरकड सविस्तर अर्थ भेटी अंतीं परस्परें कळों येतील. आपलेकडील व जाटाचे फौजेचें वगैरे ते प्रांतींचें वर्तमान सविस्तर ल्याहावें. बहुत काय लिहिणें कृपा कीजे हे विनंती.

ले. १९४ [१०६] श. १६८३ श्रावण व. ८ ताा २३-८-१७६१

छ २५ मोहरम ॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री विश्वास रावजी* स्वामींचे सेवेशीं–

पो गोपाळराव गणेश सां। नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ त॥ छ २२ माहे मोहरम मु॥ नजीक पचावल जाणून स्वकीय कुशळ लिहीत असलें पाहिजे. विशेष–आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. जाटाची फौज येऊन भदावर प्रांतांत गडबड केली आहे. पुढें सरकारच्या प्रांतांत येणार त्यामुळें इकडे कित्येक हरामखोरांनी दुंडी आरंभिली आहे म्हणोन कित्येक विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशास ये विशीं आपली खातरजमा होऊन स्वस्थता असों द्यावी. आम्ही आपले पाशीं येऊन पोहोंचलों ऐसेंच जाणावें. येथोन पेशजी आपणाकडे मुजरद जोडी रा। केली आहे. तीं पत्रें पावलींच असतील. त्यास आम्ही दरमजल येत असों. आम्ही आपण एकत्र जाहल्यास ईश्वर इच्छा आहे तरि खावंदाचे पुण्य प्रतापें करून सर्व शत्रु हरामखोर असतील त्यांचें पारपत्य होईल, चिंता नाहीं. देशींचें वर्तमान तर श्रीमंत राजश्री दादा साहेब फौज सुद्धां स्वार होऊन बऱ्हाणपुरीं आल्याचीं पत्रें आम्हांस आलीं आहेत. पुढें दरमजल हे प्रांतें येणार. आपणांस कळावें. बहुत काय लिहिणें कृपा कीजे हे विनंती

ले. १९५ [३८] श. १६८३ मार्गशीर्ष शु॥ १ ताा·२७-११-१७६१

॥ श्री ॥

वेदशास्त्र संपन्न राजश्री गोविंद दीक्षित पाटणकर स्वामींचे सेवेशीं––

विद्यार्थी माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय

---

* विश्वासराव लक्ष्मण–नारोशंकराचा पुतण्या.

कुशल लिहीत जावें. विशेष तुह्मांपासून कर्ज घेतलें मुद्दल रुपये ४०००० दिंमत बाबूराव सदाशिव यांस राजमरे [?] यास[1] ५००० हुंडी पुण्याची बाबूराव दीक्षित पटवर्धन यांजवर एकूण पंचेचाळीस हजार रुपये घेतले. यास ब्याज दरमहा दर सदे रुपये १। सबोला बिनसूट प्रो करार केलें असे. जाले मुदतीचें ब्याज मुद्दल हिशेब करून देऊं. मिती मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा शके १६८३ वृषनाम संवत्सरे जाणिजे. छ ५, जमादिलावल, सु॥ इसने-सितैन मया व अल्फ बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले. १९६ [१०१]

श. १६८३ माघ व ४. ता १२ २-१७६२

श्री

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री विश्वासराव यांसि प्रती नारो शंकर आशिर्वाद उपरि येथील कुशल ता॥ छ १७ रज्जब मुक्काम नजीक नासिक यथास्थित असे. विशेष तुह्मी छ २ माहे मिनहूचें पत्र पाठविलें व आणखीं दोन तीन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. राजश्री सुभेदारे[1] देशास आले व र॥ बाळाजी गोविंद फौजेसुद्धां झांशी प्रांतें न राहतां शिरोंजेस येऊन सागराकडे गेले. येणेंकडून चहूंकडचा बंदोबस्त नीट राहिला आहे. झांशीचे किल्ल्यास मोर्चे लागले आहेत इत्यादिक तिकडील मजकूर विस्तारें लिहिले ते अवगत जाहाले. ऐशास आम्ही दरबारचा उलगडा करून श्रीमंत स्वामींची आज्ञा घेऊन फौजसुद्धां पुणतांब्यानजीक आलों. तेथून फौज कासारखारीनें नसरतपुरास पाठविली. आम्ही सडे जनस्थानास येऊन श्री त्र्यंबकेश्वराची यात्रा करून जनस्थानाहून काल प्रस्थानें डेरा दाखल जालों. राजश्री मल्हारराव सुभेदार चांदवडा [स] आले आहेत. भेटीस यावयाविशीं त्यांचें पत्र आलियास त्यांजकडून चालते मजलीनें फौजेस मिळोन र॥ विठ्ठल शिवदेव व अंताजी माणकेश्वर व येशवंतराव पवार ही तिन्ही पथकांसहवर्तमान मजल दरमजल त्या प्रांतास येतों. पुढें पांच सात हजार फौज तुम्हांकडे लांब लांब मजलांनीं पाठविली असे. या फौजेबरोबरि र॥ चिमाजी वामन व माधवराव यांजला देऊन पुढें शिरोंजेकडून झांशीकडे रवाना करणें. फौजेचे अवाईनेंच वेढा उठोन जाईल. अथवा मातबर फौजेचेंच काम असालिया आम्हो तों मजल दर मजल येतच आहों. तिकडेस आलियास तिकडील कामें सहजांत घडोन येतील. तुम्हीं उज्जयनीस राहोन तिकडील बंदोबस्त राखावा· आम्हीही येऊन पोंहोचतों. तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. हे +आशीर्वाद.

राजश्री खंडोपंत व राजश्री चिमणाजीपंत स्वामींचे सेवेशीं-नमस्कार विनंती उपरि. तुम्हीं हिम्मत धरून चिरंजिवांस उज्जनीस ठेवून पुढें फौज घेऊन जावें. तिकडील रंग पाहावा तैसें करावें. तों इकडील फौजांचा उपराळा सत्वरच होईल. चिंता

---

१ सुभेदार=मल्हारराव होळकर. २ बाळाजी गोविंद बुंदेले.

+ पत्र नारोशंकरानें पुतण्या विश्वासराव लक्ष्मण यास लिहिलेलें आहे.

न करणें. तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. बहुत काय लिहिणें हे विनंती. पै॥ छ १ साबान मु॥ बेगदा पे॥ उज्जन शुक्रवार सायंकाळ.

ले. १९७ [१८५] | श. १६८४ मार्गशीर्ष शु. १० ता २६-११-१७६२

॥ श्री ॥

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ८९ चित्रभानुनामसंवत्सरे मार्गशीर्ष शुद्ध १० भृगुवासरे क्षत्रिय-कुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति स्वामी यांनीं राजमान्य राजश्री त्रिंबक सदाशिव यांसि आज्ञा केली ऐसीजे. विजयादशमीचे सुमुहूर्तें स्वामी सिंहासनारूढ जहाले, हें संतोष वर्तमान तुम्हास कळावें म्हणून आज्ञापत्र सादर केलें असे व राजश्री माधवराव प्रधान व वरकडांस आज्ञापत्रें सादर झालीं आहेत. तुम्ही राज्यांतील एकनिष्ठ सेवक आहां तरि आपणाकडून सविस्तर वर्तमान लेहून विनंती पत्र पाठवून स्वामींस संतोष पाववणें. तीर्थरूप श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब यांचें आज्ञापत्र सादर आहे त्यावरून कळेल. राजश्री महादजी राव [?] मोरे व मल्हार महादेव पे॥ आहेत. जाणिजे.

ले. १९८ [१७८] | श. १६८५ वशाख व. ६ ता ३-५-१७६३

॥ श्री ॥

चिरंजीव राजश्री महिपतराव त्रिंबक यांसि माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित जाणें. विशेष-राजश्री स्वामींस किल्यावर नेऊन ठेवणें आणि तुम्हीं निघोन पुण्यास येणें. हे आशिरवाद खाना छ १९ सवाल. हे आशिरवाद. (भारतवर्ष शकावली पृ. ४६ पहा.)

ले. १९९ [१८१] | श. १६८५ अधिक ज्ये. शु. ६ ता १९-५-१७६३

श्री.

चिरंजीव राजश्री बज्याबा यांसि प्रती माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. राजश्रींस वर न्यावयाचा मजकूर लिहिला तो कळला. त्यास आमचें येणें तिकडे होईल असा निश्चय नाहीं. यास्तव पहिलें लिहिलें आहे त्याप्रमाणें सत्वर करणें. कां कीं प्रस्तुत काळ खालीं राखावयाचा नाहीं. यास्तव लिहिल्याप्रमाणें करणें. वरकड चाकरी करून दाखवावी म्हणून लिहिलें त्यास तुमच्या स्वरूपास हेंच योग्य आहे कीं आपल्या मातबरी सारखी चाकरी करून दाखवावी, यांतच सर्व आहे. कोणी म्हणतात कीं चाकरी करतों हेंच मोठें काम आहे, असेहि कित्येक आहेत. आपलें स्वरूप काय आणि सरकारचो तैनात काय

खातों हें मनांतच येऊं नये. आणि जी चाकरी करतों हें फार मानून कित्येक आहेत. तुमचा उमेद आहे याचप्रमाणें काम तुम्हांपासून घ्यावें हेंच मनांतून येथूनही आहे, समयानसार व प्रसंगानसार घडेल. तुमची मातबरी अशी आहे कीं सर्वांपेक्षां चाकरी अधिक करावी. यांतच स्वरूप आहे. बापापासूनहि असेंच आहे. पत्र फाडून टाकणें. दीक्षितासी बोलून निरोप दिल्हा आहे. येतील. तुम्हीं त्यांचें स्वरूप राखीत जाणें. बाहेर वांकडे न पडे तें करणें, आधिक उणें आढळेल तें निराळें पत्र पाठवीत जाणें. पत्र दुसऱ्यास नच कळावें. येथून माझ्या आतचें+ जाईल, तें अथवा तुमचें दोन्ही पत्रें नच कळावीं, महिनाभर राहणें. कन्यागताचें स्नान करून येणें. रवाना छ ५ जिल्काद हे आशिर्वाद.

ले. २०० [१७९] श. १६८५ अधिक जेष्ठ शु. ८ ताा २०-५-१७६३.

श्री.

चिरंजीव राजमान्य राजश्री महिपतराव त्रिंबक यांसि माधवराव बल्लाळ प्रधान आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणें. विशेष. तुम्ही विनंती पत्र पाठविलें तें प्रविष्ट झालें. राजश्रींस कित्यावर न्यावें त्यास ते कित्यावर जात नाहीं या अन्वयें राजश्रींचे जाबसाल कित्येक तपशीलवार लिहिले ते सविस्तर कळले. ऐशीयास राजश्रीस आरोग्य झालेंच आहे. तरि हर तजवीज करून कित्यावर घेऊन जाणें. तुम्ही आपला मजकूर हुजूर येण्याविषयीं लेखन केला त्यास तुम्ही तूर्त न येणें. रवाना छ ६ जिलकाद बहुत काय लिहिणें हे आशिर्वाद.

ले. २०१ [३३] श. १६८५ श्रावण व ११ ताा ३-९—१७६३

श्री

पो श्रावण वद्य १४ मंगळवार सवा प्रहर दिवसास.

वेदशास्त्र संपन्न राजश्री बाळकृष्ण दीक्षित स्वामीचे सेवेशीं.

विद्यार्थी रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावून बहुत संतोष झाला. याचप्रकारें निरंतरी पत्रीं सविस्तर लिहित जावें. यवनाची फौज बुडावितों. आपणास कळेलच. हल्लीं शहरास जातों. असो. निजामअल्ली खान बाकी राहिले त्याचें पारपत्य श्रीकृपें करून होईल. रं॥ छ २४ सफर. आपली दया पूर्ण असावी. सर्व देव ब्राह्मणांचे आशीर्वादें करूनच उत्तम फळ प्राप्त जहालें. बाकी राहिलें तें होईल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

+ माधवरावास हं अक्षर येत नसे त्याचें हें उदाहरण.

ले. २०२ [११६] | श. १६८५ फाल्गुन शु. १ ता॥ ३-३-१७६४

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक महादजी शिंदे साष्टांग दंडवत विज्ञापना ता॥ छ २९ साबान पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. आम्हाबराबर पांच तोफा पाहिजेत. स्वारींत कोठें गांवगढी लागते. त्यास तोफां विना जेर होत नाहीं. यास्तव स्वामी कृपाळू होऊन नगरास तोफखाना आला आहे यापैकीं स्वारीच्या तोफा पांच द्यावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.+

ले. २०३ [१४१] | श. १६८६ ज्येष्ठ व. १४ ता॥ २८-६-१७६४

श्री

राजश्री त्रिंबकराव मामा स्वामींचे सेवेशीं—

विनंति उपरि आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जहालें. आम्हीं येथें येऊन पिरेपट्टणास चौफेर मोर्चे बसविले. तेव्हां दुसरे दिवशीं किल्लेकरी कौलास येऊन कौल मागूं लागले. त्याजवरून त्यांस कौल देऊन बाहेर काढिलें, आणि छ २५ जिल्हेजीं किल्यावर सरकारचें निशाण चढलें. ठाण्यांतील पांच हत्ती व पंधरा घोडीं पाडाव आलीं व कोडग [कुर्ग]-वाल्याकडे रा॥ अप्पाजी गोविंद रवाना केले आहेत. त्याचाही मजकूर कसा तो एका दो रोजांत कळेल म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास आपण जाऊन किल्यास मोर्चे देऊन किल्ला जोरबजोर घेतला, व ठाण्यांतील पांच हत्ती व पंधरा घोडीं पाडाव आलीं, हे मोठी गोष्ट जहाली. या दर्दे करून दुसरीं ठाणीं अवसान धरणार नाहींत. राजश्री आप्पाजी राम छ २५ जिल्हेजीं मंगळवारीं येथें येऊन दाखल जाहाले. त्यांचे बोलण्याचा अर्थ सविस्तर दुसरे दिवशीं हैदरखानाकडील सांडणीस्वार व राजश्री राव सेनापती ऽ यांजकडील दोघे स्वार यांबराबर लेहून पाठविलें आहे, त्याजवरून सविस्तर कळेल. रा॥ तुळाजी पवार व कुडचीकर व बांडे प॥ गी र पा डी र येथें होते त्यास शत्रूचा जोरा तिकडे फार जाहाला. यांची पाळथ राखोन दगा करावा असें त्याचे चित्तांत होतें. परंतु तुळाजी पवार व कुडचीकर व बांडे मोठे निकडीनें शत्रूवर आपला दाब राखून सांभाळून आले. बांडे तों होसकोटयास राहिले. तुळाजी पवार व कुडचीकर लष्करांत येऊन दाखल जहाले. रात्रंदिवस मेहनत फार. याजकरितां त्यांचे घोड्यांत कांहीं ताकत राहिली नाहीं. रवाना छ २७ माहे जिल्हेज. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंती.

+ या वेळीं माधवराव कर्नाटकांत असून रघुनाथराव पुण्यास होता. त्यास महादजीनें उत्तरेंतून हें पत्र लिहिलेलें आहे (पहा कै. या. पृ. १३० व खरे ले. ३२५)

ऽ उमराव घोरपडे.

ले. २०४ [११२] { श. १६८६ आषाढ ताा १५-७—१७६४

श्री

पैा छ २४ मोहरम सनखंमस

श्रीमंत गुणसागर लोकपालक विश्वभूषण औदार्यवंत श्रीक्षीराब्धिशायीवरप्रताप रमासानकुल गोब्राह्मणप्रतिपालक महा राजेश्री दादा साहेबांचे सेवेशीं-आज्ञाधारक देवजी बयाजी किले सेंधवें दिम्मत मल्हारजी होळकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञाप्ति येथील क्षेम ताा छ १५ मोहरम पर्यंत महाराजांचे कृपेदृष्टी करून आनंदरूप जाणोन विशेष. साहेबीं आज्ञापत्र पाठविलें तें छ ९ रोजी प्रविष्ट जाहलें. शिरीं वंदून परम संतोषावाप्ति जाली. पत्रीं आज्ञा सादर केली कीं र॥ महादजी शिंदे यांची सरदारी दूर करून राजश्री मानाजी शिंदे यांस सांगितली, याजकरितां महादजी शिंदे आशेशिवाय उठोन ते प्रांतें गेले असत. सेंधबे प्रांतांत आले म्हणजे आटकाव करून पुढें जाऊं न देणें. त्यास साहेबांचें पत्र प्रविष्ट जालें ते दिवशीं घांटाखालीं मौजे सांगवी प्रें॥ आंबे येथें मशारनिल्हेचा मुक्काम होता. आज्ञाप्रमाणें किले मजकूराचा घांट पांच सातशें भिल्ल वैगरे जमा करून बंद केला. त्यास मशारनिलेस बातमी जाली. तदनंतर किले मजकूराचा घाट सोडून चांचरे पटी घा मार्गे घाट चढून पंचवीसा कोसांची मजल करून निघोन गेले. साहेबांचे सेवेशीं हे विज्ञापना.*

ले. २०५ [१८०] { श. १६८६ माघ शु. १५ ताा ५-२-१७६५

॥ श्री ॥

चिरंजीव नाना यांसि प्रती माधवराव बल्लाळ प्रधान आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. सरकारचा जामदारखाना पुरंधरीं पेशजी होता तो प्रस्तुत कोठें आहे, जिन्नस व दागिने काय काय आहेत, ते सर्व तुम्हांस ठाऊक आहेत. हल्लीं तों जामदारखाना कोठें आहे तो लिहून पाठविणें. जामदारखानियांत दागिने व जिन्नस जो असेल त्यांची कुल याद लिहून पाठविणें. तुमचे समजाविशीचा प्रकार कसा झाला हें लिहिणें. तुम्ही याल कधीं हें कळलें नाहीं. तरि सत्वर लिहिणें. खाना छ १४ साबान बहुत काय लिहिणें हे आशिर्वाद.

---

*मानाजी फांकडे याजवर दादांचें फार प्रेम असून महादजी रक्षापुत्र म्हणून शियांची सरदारी मानाजीकडे त्यांनीं दिली; परंतु महादजीनें आपले अंगी पाणी आहे असें दाखविल्यावरून माधवराव बल्लाळ यांणीं पुढें त्याजकडेच सरदारी कायम केली.

ले. २०६ [१४३] | श. १६८७ वैशाख ; ता १७-५-१७६५

श्री.

सेवेशीं महादाजी बल्लाळ व हरी बल्लाळ +कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ २६ जिलकाद मुा नजीक कपिला संगम कृष्णा उत्तर तीर स्वामींचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनीं सांडणीस्वाराबरोबर व जासुदा बो पत्रें पाठविलीं तीं पावलीं. सरकारचे कागदपत्र प्रविष्ट केले. उत्तरें घेऊन पाठवितों. इकडील वर्तमान तर राजश्री मुरारराव सावनूरकर यांस निरोप जाला. छावणीस राजश्री गोपाळराव रहाणार, त्यास निश्चय नाहीं. श्रीमंत कृष्णा उतरोन उत्तर तीरास आले. फौजेचे नालबंदींचें काम चालीस लागलें. दोनी स्वाऱ्या मिळोन नालबंदीचा ऐवज ठरेल त्यापैकीं निमे तूर्त द्यावा. त्याचे भरतीस सात आठ लक्ष पाहिजेत. याजकरितां ऐवजाचे तरतुदीविशीं श्रीमंतांनीं आपणांस पत्र लिहिलें आहे. आतां इकडे कांहीं गुंता नाहीं. दरमजल येणार. आज आठ कोसांचें कूच आहे. रामतीर्थावरून, म्हसवडवरून येणार. पाऊस पडों लागला. एक मुहूर्त ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, दुसरा वद्य चतुर्दशीपर्यंत इतकियांत येऊन पोचणार. वरकड नवल काय? विशेष वर्तमान तर बंकापुरचा किल्ला खालीं करून घ्यावयास राजश्री राजेबहादर गेले होते. छ १९ जिलकादीं किल्ला हस्तगत जाला. आंत कांहीं जकीरा दारूगोळी तोफ नाहीं. दाणा मात्र होता. तो विकत घेतला. किल्ल्यांत शंकराजी राम ठेविले आहेत. याउपरी गोपाळराव यांस देतील अथवा सरकारांतून बंदोबस्त करितील. दोनी प्रकार घाटतात. कळलें पाहिजे. स्वामींचे चरण दृष्टीस पडत तो सुदिन असे. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

ले. २०७ [१०५] | श. १६८७ माघ व ८ ता ३-२-१७६६

॥ श्री ॥

सेवेशीं विज्ञापना ता। छ २२ साबान पर्यंत वडिलांचे आशिर्वादें करून यथास्थित असे विशेष.-वडिलीं आशिर्वाद पत्र पाठविलें तें प्रविष्ट जहालें. नबाब निजाम अल्लीखान यांची तुमची भेट जाहलींच असेल बोलणें चालणें काय जहालें, तुम्ही कोणीकडे जाणार, काय मनसुबा केला, नबाब कोणीकडे जाणार; तुम्ही व नबाब वराडांतून जाल तों आमचे दोन चार मुक्काम आशेरी बरानपुरासमीप होतील नबाब कोणीकडे जाणार तें लिहिणें; म्हणोन आज्ञा. ऐशास वडिलीं आज्ञा केली ते उचित. वडील दीर्घ दर्शावें चारी मनसुबियांचे प्रकार ध्यानांत आणून कर्तव्य तें करितात. त्यास नबाबाची आमची भेट कुरुमखेडानजीक छ २१ साबानीं जाहाली. बोलणें चालणें एक दोन रोजांत होईल. नबाबाचा आग्रह आपले डेरियास आम्हीं यावें. त्यांनीं आमच्या डेरियास यावें असा आमचा आग्रह आहे. तोही प्रकार दोन

+ फडके बंधू.

तीन रोजांत उरकून नबाब. आम्ही घाट चढोन जातों. लष्करांत ताकीत निक्षून करणें ते केली आहे. लूट फाट कांहीं होत नाहीं. हा मुलुक नबाबाचा व भोसल्यांचा. नबाबांनीं कित्येक महालच्या कबुलातीचे कतबे सरकारांत होते ते मागून घेतले. भरवस्ती गांवास इकडील ताकीददार व नबाबाचे ठाणेदार बैसले आहेत. कोठें उपद्रव नाहीं, व आमचा व नबाबाचा मुक्काम [असे] ओसाड रानांतच पडले. खुलासा उद्यांचे परवांचे दिवसांत कामकाज उरकून घांट चढून जाऊं. वडीलही योजिल्या मनसुबियांस कूच करून जातीलच. घाट चढून वरते गेल्यियावर कोणीकडे जावयाचा ठहराव होईल तो सेवेशीं लिहून पाठवूं. * सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. २०८) [१०८] (श. १७६५ माघ व १४ ताा ८-२-१७६६

॥ श्री ॥

तीर्थरूप राजश्री दादासाहेब स्वामींचे सेवेशीं-अपत्यें माधवराव साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशळ ता॥ छ २७ सावान मुक्काम कुरुमखेड पर्यंत वडिलांचे आशिर्वादें करून यथास्थित असे विशेष.-करांडे यास सोडावयाचा करार राजश्री जानोजी भोसले सेनासाहेब सुभा यांजकडून जाला असतां अद्याप त्याची सुटका जाली नाहीं. तरी वडिलीं मारनिळेचे कारभारी यांस आज्ञा करून करांडियाची सुटका होय तें केलें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. २०९) [११४] (श. १६८७ फाल्गुन व. १३ ताा ९-३-१७६६

॥ श्री ॥

राजश्री माधवराव रामचंद्र गोसावी-

सु॥ सीत सीतेन मया [व] अलफ तुम्हीं विनंती पत्र छ २७ रमजानचें पाठविलें छ मा॥रीं अस्तमानीं पावलें. रा॥ बाबूराव सदाशिव+ न पुसत गेले त्यांचे मागें राजश्री रामचंद्र गणेश फौज घेऊन गेले. धारूरच्या वाटेनें नाईक गेले. त्या मागें रामचंद्रपंत पाठलाग करीत गेले. नाइकाचे पागेचीं घोडीं व जामदारखाना वगैरेंची मोजदाद करून गोठांत आणून ठेविले, म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास बाबूजी नाईक यांचीं घोडीं पागा हत्ती दोन, जामदारखाना वैगरे मोजदाद केले ते आणावयास हुजूरून राऊत पाठविले असते, यांजबराबर पाठऊन देणें. उदईक कूच करून जावें तर तोफखाना व जामदारखाना व दारकोजी निंबाळकर व सठवोजी गावडे वगैरे लोक अद्यापि आले नाहींत. त्यांस ताकीद करून पाठवावे म्हणोन तर तोफखाना, जामदारखाना व दारकोजी निंबाळकर व सठवोजी गावडे

---

* हें पत्र थोरले माधवरावाचें रघुनाथरावास असावें.

+ हे बारामतीकर नाईक;-यांचें व पेशव्यांचें नातें असून या प्रसंगीं वांकडें होतें.

वगैरेंस ताकीद केली असे. येऊन पावतील. तुम्हीं उद्याचा दिवस मुक्काम करणें. तुम्हांजवळ पथकें कोण कोण आलीं व कोण न आलीं तें सविस्तर लेहून पाठविणें. जे राहिले असतील ते ताकीद करून पाठविले जातील. नाइकाकडील सिलेदाराची सोय काय करावी तें त्याहावें म्हणोन तर मा।रनिलेकडील शिलेदार हुजूर पाठऊन देणें.

सांडणीस्वार २ दोन येथें नेहमीं पाठवावे म्हणून तर दोन सांडणी स्वार पाठविले असत.

नाना जोशी यांचे घरीं बाबूरायांची वस्तभाव आली आहे, त्यावरून त्यांचे घरीं गाडदी यांची चौकी बसविली असे. आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करून कारकून हुजुरून पाठविला असे, तहकीक करतील. जे त्याजकडे वस्तभाव असेल ते हुजूर घेऊन येतील.

रामचंद्र गणेश यांजबराबर लोक गेले ते सडे गेले. यास्तव त्यांचे मागें जावयाची आज्ञा जालियास जाऊं, म्हणोन तर त्याजबराबर कांहीं गेले नाहीं. याजकरितां तुम्हीं हळू हळू जाणें. जाणिजे छ २७ रमजान लेखनसीमा. ×

ले. २१० [१२३]

श. १६८८ चैत्र शु. १५ ता २४—४—१७६६

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामचंद्रपंत तात्या स्वामींचे सेवेशीं—

पोष्य बाळाजी कृष्ण व हरी बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल ता॥ छ १४ जिलकाद मु॥ पुणतांबे जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष—फार दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. लिहून पाठवावें. आपली लढाई फत्ते जाली म्हणोन ऐकिलें. सविस्तर ल्याहावें. श्रीमंत राजश्री राऊसाहेब टोक्याचे[1] मुक्कामास आले. तेथून सडे होऊन पुढें गंगापुरास गेले. आम्हां उभयतांस मागें ठेविलें. बुनगे सांभाळून घेऊन येणें म्हणोन आज्ञा केली, त्यावरून एक मुक्काम केला. छ १२ रोजीं राजश्री भवानराव चंद्र राऊतांनिशीं लष्करांत आले. आम्हांस वर्तमान कळतांच गेलों. भेट जाली. त्यांचें मानस श्रीमंतांकडे जावयाचें असेंच ओता [?] म्हणोन बोलिले. आम्ही सांगितलें कीं, " तुम्ही येथें आलां. आम्हांस वर्तमान कळलें. आतां तुम्हांस एकटें जाऊं देणार नाहीं. पालखींत बसवून आम्ही जातों [तेव्हां] तुम्हांस समागमेंच नेऊं. " त्यावरून आढे वेढे घेतले. शेवटीं पालखींत घालून घेऊन जात असों. कांहीं खात नाहीं. श्रीमंताचें दर्शन जाल्या खेरीज अन्न उदक देखील घेत नाहीं. आम्ही चौकी पहाऱ्याचा बंदोबस्त केला असे. भवानराव आतां निखालसतेच्या गोष्टी फार सांगतात कीं, " श्रीमंतांजवळ

× खरे लेखांक ५८५ पहा. १ थोरले माधवराव. २ हे प्रतिनिधी.

जाईन, जें करतील ते करूत. " सारांश गोष्ट, भगवंतें आपल्यास यश दिल्हें. भवानराव अनायासें करून सांपडले, मोठी गोष्ट जाली. तिकडील वर्तमान लिहीत जावें. सांप्रत आपला मुक्काम कोठें आहे ? पुढें कोणीकडे जावयाचा विचार आहे, तें सविस्तर ल्याहावें. युद्धाचें वृत्त तपशिलें लिहावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती—

राजश्री बगाजीपंत स्वामींस सा॥ नमस्कार. तिकडील वृत्त तपशिलें लिहून पाठवणें हे विनंती.

ले. २११ [१४२ } {श. १६८८ वैशाख व. १२. ताा ४-६-१७६६

श्री.

पैा छ. १७ मोहरम ज्येष्ठ सन सबा मुा ग्वालेर.

तीर्थरूप राजश्री दादासाहेब वाडिलांचे सेवेशीं—

अपत्यें माधवराव साष्टांग नमस्कार बिनंती येथील कुशळ ताा छ २५ जिल्हेज पर्यंत वाडिलांचे आशीर्वादें करून यथास्थित असें विशेष.-शहर बरानपूर येथील अमलांत मामलेदारांनीं कमपेश केली याचा अर्थ अवगत जाला, तें वृत्त वाडिलांचे सेवेशीं विनंती केली. स्वामीनीं आज्ञा केली· कीं, शहरास कमावीसदार पाठवून तहकिकात करावी. म्हणोन रा। त्रिंबक नारायण यांस कमावीस सांगितली. सस्सुभेदारी राजश्री नारो कृष्ण यांजकडे आहे तैशी त्यांजकडे करार ठेविली, ऐसें असतां नारो कृष्ण यांस पत्र सादर केलें कीं, त्रिंबक नारायण यांजकडे अम्मल सुरळीत देणें. तें त्यांनीं न मानतां जाबसाल केले. त्याजवरि खिजमतगाराबराबर पत्र सादर केलें. त्याशींही मनस्वी भाषण केलें. तदोत्तरही पत्रें माणसें पाठविलीं त्यांस शहरांत घेतलें नाहीं. बेबदल गोष्टी अमर्यादेच्या सांगितल्या. माणसें फिरोन आलीं. रा। गोपाळराव गणेश यांनीं बदामामलीची गोष्ट सांगितली, त्याचप्रमाणें नारो कृष्णासही उमेद जाली. एवंच हाच मार्ग पडतो. यांत खावंदाचा बोज काय ? यास्तव अशा गोष्टीस पारपत्य असावेंच. काम थोडें दरगुदर* करावी तर शहर बेबदल जहालें हें लौकिकांत. तेव्हां खावंदगिरीस उचीत तें झालेंच पाहिजे. हें सविस्तर वर्तमान वाडिलांस कळावें यास्तव लिहिलें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

२१२ [६५] } {श. १६८८ जेष्ठ शु.६ ताा. १३-६-१७१६

॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळाजी गोविंद स्वामी· गोसावी यांसि—

---

* उपेक्षा.

पो। रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें विशेष- राजश्री पुरुषोत्तम महादेव हिंगणे यांस जातीस सरंजाम रुपये १५००० पंधरा हजार दाव- याचा करार करून हे सनद तुम्हास सादर केली असे. तरि सदर्हू पंधरा हजार रुपयांचे तनख्याचे गांव पा। कोंच पौ। अम्बलसाल सन समान सितेना पासून नेमून देणें आणि आकार होईल तो साल दरसाल बा॥ मु॥ खर्च लिहीत जाणें. जाणिजे छ ५ मोहरम सु॥ सबासीतेन मया व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले. २१३ [१४०] श. १६८८ ज्येष्ठ व. ३ ता। २५-६-१७६६

॥ श्री ॥

पौ॥ छ ३ रबिलोबल सब्बा श्रावण गोहदचा मुक्काम.

तीर्थरूप राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेशीं. अपत्यें माधवराव साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशळ ता। छ १७ मोहरम पर्यंत वडिलांचे आशीर्वादें करून यथास्थित असे विशेष. वडिलांचें पत्र आलें त्यांत आज्ञा कीं, बराणपूरची मामलत रा॥ नारो कृष्ण याज- कडेच करार राखणें. इजारियांनीं दुसरियास न देणें. दुसऱ्यास दिल्यानीं शहर खराब करतील. नारो कृष्ण बरा आहे, याचें चालवणें, म्हणोन आज्ञा. त्यास नारो कृष्णाचें वर्तमान राजश्री चिंतो विठ्ठल.व आबाजी महादेव यांस ठावकें आहें. नारो कृष्णाची मामलत दूर न करितां त्याचाच कारकून त्रिंबक नारायण यांस कमावीस सांगितली, सरसुभेदारी त्याची त्याजकडेसच करार राखिली. त्यांस हुजूर यावयाविशीं पत्र पाठविलें असतां न आले. मनस्वी भाषण केलें. जासूद उठोन आले. तदोत्तर खिजमतगार पाठविले. पत्र सादर केलें त्यांजशीं मन माने तें बोलले.खिजमतगारांनीं पांघरुणें जाळलीं, तथापि हुजूर न आले. त्यावर गाडदी दहा पांच पाठविले. येणें म्हणोन लिहिलें असतां त्यांस शहरांत न घेतलें. बदलोन गोष्ट सांगितली. यास्तव रा॥ मलबा पानसी याजबरावर स्वार हशम देऊन आणावयास पाठविले. कैद वडिलांची. अमर्यादा नसावी. सेवकलोकीं मर्यादेनें वर्तावें हे शिक्षा. पण आज्ञा वडिलांचीच आहे, व प्रस्तुत काळीं राजश्री गोपाळराव गणेश यांणीं बदलोन गोष्ट सांगितली. तोच अन्वय नारो कृष्ण यांणीं चित्तांत आणोन बेबदल गोष्ट सांगितली आणि आटीनें आट सदर्हूप्रमाणें पडत पडत आली. येरवीं नारो कृष्ण याजवर आणिक सारखा प्रकार व्हावा ऐसा अर्थ नाहीं. जालें वर्तमान दोन तीन पत्रीं सेवेशीं लिहून पाठविलेंच आहे,. व हल्लींही जाला प्रकार विनंती पत्रीं लिहिला असे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले २१४ / १७७ — श. १६८८ कार्तिक व. ६ / ता २२-११-१७६६.

श्री.

चिरंजीव राजश्री **नाना** यांसि **माधवराव बल्लाळ प्रधान** आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें विशेष. तुम्हांस जाऊन बहुत दिवस जाहले. खासा स्वारी कार्तीक बहुळ पंचमीस डेरे दाखल जाहले. आजि कुच होऊन येवतावर मुक्काम होईल. फौज जमा होत चालली, परंतु मुक्काम होत नाहीं. दरमजल कृष्णातीरास जातों. तुम्ही मुक्काम होतील, सावकाश जाऊं, म्हणोन चित्तांत आणाल, तर न आणितां सत्वरें येऊन स्वारीचे मुहूर्ते करून लष्करांत येऊन पोहचणें. विलंब न लावणें. चाकरीचे[२] दिवसांत नेहमीं यात्रे समष्टीन राहणें. पत्र पावतांच सत्वर येणें. खाना चंद्र १९ जमादिलाखर बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

ले. २१५ / [११७ — श. १६८८ पौष व. ७ / ता २२-१- १७६७

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **बाळाजी जनार्दन** स्वामी गोसावी यांसि– पौ। **माधवराव बल्लाळ** प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जाणें विशेष. बदल देणें तसल्मात **दादो** उद्धव वरघांटचे किल्ल्याचे बेगमीस ऐवज साल-मजकुरीं द्यावयाचा त्यापैकीं तूर्त—

३५००० माघ शुद्ध पौर्णिमा रुपये.
३५००० फाल्गुन शुद्ध पौर्णिमा रुपये.
३०००० चैत्र शुद्ध पौर्णिमा शके १६८९ चित्रभानु संवत्सर.
१०००००

एकूण एक लक्ष रुपये सदर्हू मुदतीप्रमाणें देविले असत. मारानिलेकडील कारकून पुण्यास येईल त्यास ऐवज पावता करणें. पुण्याचे एकंदर ऐवजांत लाख रुपयांची नेमणूक करून दिल्ही आहे त्यास तुम्हीं ऐवजाची नेमणूक करते समयीं तेथून मुदती लिहिल्या आहेत याप्रमाणें ऐवज नेमिला असला तर उत्तमच जाहालें. या मुदतीहून जाजती मुदत असली तर त्या ऐवजीं सावकारापासून कर्ज घेऊन यास मुदतीचा मुदतीस पावता करणें. मुबदला ऐवज राहील तो सावकारास रदकर्जास देणें. सारांश गोष्ट, यांचें देणें फार निघालें, पैकीं तूर्त सदर्हू लाख रुपये देविले यास हिसका पडल्यानें मग याची स्थित रहाणार नाहीं. याजकरितां तुम्हांस लि।। असे. तरी मुदतीप्रमाणें ऐवज क्षेपनिक्षेप पावता करणें. र।। छ २१ साबान सु।। सबासितैन मया व अलफ, बहुत काय लिहिणें हे विनंती. पौ। छ ६ सव्वाल.

---

२ येथपासून खुद्दाचें अक्षर. यावरून माधवरावाची तडफ व शिपायगिरी व्यक्त होते.

ले. २१६ [१८३] — श. १६८८ फाल्गुन शु.१२. ता॥ १२-३-१७६७

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बजाबा स्वामी गोसावी यांसि पोष्य नारायण राव बल्लाळ नमस्कार विनंती उपरि येथील जाणून स्वकीय कुशल लिहिणें, विशेष-तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. तीर्थरूपांनीं चढ्या घोड्यानिशीं शिरें घेतल्याचें सविस्तर वर्तमान व तीर्थरूपांची शरीरप्रकृत सदोदित लिहीत जाणें. आम्ही लष्करांतून निघालों ते फाल्गुन शुद्ध दशमीस गंगापुरीं पावलों. खाना छ ११ माहे सवाल. सुरु सन सबा सितैन मया [व] अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले. २१७ [८७] — श. १६९० सन १७६८ पूर्वीचें

श्री.

तीर्थरूप राजश्री दादासाहेब वडिलांचे सेवेशीं—

अपत्य माधवराव साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल त॥ छ १३ सफर पावेतों वडिलांचे आशिर्वादें यथास्थित असें विशेष. वडिलीं आशीर्वादपत्रें त्रिंबकजी मुंढा खिजमतगार याजबरोबर पाठविलीं तीं पावोन त्यांचीं उत्तरें विस्तारें लिहून हरजी चव्हाण खिजमतगार याजबरोबर पाठविलीं आहेत. येऊन पावतील, त्यांजवरून सविस्तर सेवेशीं निवेदन होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. २१८ [१८२] — श. १६८९ ज्येष्ठ व. ४ ता॥ १६-३-१७६८

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री त्रिंबक सदाशीव स्वामी गोसावी यांसि पोष्य नारायणराव बल्लाळ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशळ लिहिणें. विशेष. तुम्हांकडून पत्र येऊन शरीरप्रकृतीचें वर्तमान कळत नाहीं तर तुमची शरीरप्रकृति कशी आहे तें सविस्तर लिहून पाठविणें. तीर्थरूपांकडील वर्तमान तर जुंज होऊन दादासाहेबांची फौज लुटली. दादासाहेब किल्यावर गेले. एक दिवस मध्यें जाऊन दुसरे दिवशीं भेटी झाल्या. दादासाहेबांनीं तीर्थरूप रावसाहेबांचे स्वाधीन किल्ले, कोट, मुलूख वगैरे सर्व कारभार केला. हें सविस्तर वर्तमान राजश्री बजाबांनीं लिहिलेंच असेल. खाना छ ३० मोहरम गुरुवार संध्याकाळ बाकी दिवस प्रहर. बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले. २१९ [१७६] श. १६९१ फेबुवारी १७६९

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्री श्री श्री श्री श्री ॥

महाराजाधिराज श्रीराजराजेश्वर गुणगुणालंकृत परमपवित्र श्री राजेसाहेब पंडित प्रधान श्रीमंत माधोराव साहेबजी जोग्य लिखितं-मुरली जोतश रायके अनेक आशीर्वाद वाँचणें. महाराजके गृह विचार करकै माघमास विषे पत्र भेजाथा सो महाराजने देषा होगा. जानोजी घोसले× को ऐसे लिया जैसे सिंह्के आगे मृग. मैने विचार लिषाथा महाराज पर मालूम है या नाहीं हमारा लिषा जो कागद है उस्से अमानत् रषिएगा देष लेना. जद् लढाई फते करा करोगे. तद् देष लेना. अब् और विचारांश लिया है बडि बडी मुहीम और लढाईयाँ फते करोगे जे तुमसे रुजू नही ते हाथ बांधके मिलेंगें. दुशमन भाग जावें, मारें जावें, पकडे जावें. जो मनसुबा बिगड गया हो सो श्रीमंतके हातसों सेंरै पातशाह वजीर चवकशी सों दोस्ती होवे. जश तमाम शहरोमें होवे. जो दुष्ट हैं सो दब् जावें. राजतेजकी वृद्धी होवें. जन्म पत्रकी नकल उतारकै भेज देवो. मूझे अपने इष्टकी शपथ है किसी कौं दिषावनेका नही. मैं तुम्हें आसीर्वाद देता हों. छोटे* नानानें तुमारी कृपा हम-पर कराई अब हं उमेदवार हैं हमपर मेहेरबानी करनी. हमारे नामपर जो षिंजमत फरमावो तिसकी सनद कर भेजों. पातशाहका और उमरावोंका जबाब सवाल इस ब्राह्मण कौं फरमाया. मैं निहाल भया मेरी फरदपर दसपत स्व हस्ताक्षरोंसे कर भेजों. जो षातरजमा सौं षबर सार जबाब सवाल भेजा करौं. पै॥ छ १५ सदरसला.

ले. २२० [११३] श. १६९० फाल्गुन व १४ ता॥ ५-४-१७६९

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामचंद्रपंत स्वामीचे सेवेशीं—

पो बाळाजी ‡गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल ता॥ छ २७ जिल्काद मु॥ सागर जाणून स्वकीय वुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. संक्रमणाची तिलशर्करा पाठविली ती पावली कितेक श्रीमंतांचे व भोंसल्यांचे बिघाडाचें वर्तमान लिहिलें तें सविस्तर कळलें. या प्रांतीचे वर्तमानाविशीं लिहिलें त्यास दोन तीन पत्रीं पेशजी आपणास लिहिलें आहे त्यावरून कळलेंच असेल. सांप्रत वर्तमान तरि अबदाली लाहुरापलीकडे दोन मजलीवर आला आहे. त्याची इतराजी नजीबखान रोहिल्यावर आहे. त्याजमुळें नजीबखानांनीं आपले जाग्याचा बंदोबस्त करून रतनसिंग जाटाशी सूत्र करून आणशपथ होऊन करार मदार जाला आहे. पुढें उभयतांनीं

× घोसले— भोसले. या पत्रांत सर्वत्र " ख " बद्दल "ष" वापरला आहे.

* छोटे नाना—नाना पुरंदरे.

‡ बाळाजी गोविंद हे गोविंदपंत बुंदेल यांचे चिरंजीव.

फौज सुद्धां जाऊन शाहास मैदानांत गाठोन जुंज घ्यावें याप्रमाणें मनसबा करीत आहेत. मग पहावें. सुजाद्दौला आपले जाग्यांत आहेत. अल्ली गौर बादशा व फिरंगी प्रयागास आहेत. पुढें काय मनसबा करतील पहावें. वरकड प्रांताचे वर्तमान तरि चिरंजीव राजश्री गंगाधरपंत बाबा कोचकनार प्रांतीं आहेत तिकडे गडबिंद जमीदार यांणीं सरकारी जागा दाबिली आहे, त्यांचें पारपत्य करीत आहेत. फौजा हा कालवर न आल्या याजमुळें राजे रजवाडे वगैरे *** यांची नजर ठिकाणीं राहिली नाहीं. विना मातबर फौज आल्या खेरीज बंदोबस्त यथास्थित होत नाहीं. इकडे धामोणी प्रांतें तेजगडवाले लोधी [?] वगैरे यांणीं सरकारी जागा दाबिली त्यांचेंही पारपत्य फौजा आल्या शिवाय होत नाहीं असें आहे. जर आपलें येणें लौकर होईल तरि सहजाखालीं बंदोबस्त होऊन येतो. सविस्तर आपणास कळावें. तिकडील वर्तमान सर्वदां पत्रीं लिहीत असले पाहिजे. राजश्री जानोजी बाबा भोसले यांजकडून आनंदरूप वकील बादशाकडे प्रयागीं आला आहे. त्याचीं उत्तरें गेलीं. मग काय मजकुरावर आला आहे हें कळत नाहीं. आपणास कळावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हे विनंती.

ले. २२१ [९४] पौ छ ५ रा॥खर श्रावण [श. १६९१ आषाढ शु. ११ ता॥ १४-७-१७६९

श्री

पु॥ राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ† स्वामी गोसावी यासि—

विनंती उपरि राजश्री हिंदुराव सेनापति[२] थोर मनुष्य, बोलण्यांत, मर्यादेंत, तिलमात्र अंतर दाखवीत नाहींत. आम्ही त्यांचे बहुमानास त्यांचे विचारें मातबर प्रकार करणें प्राप्त झाल्यास त्यांचे मसलतीखेरीज करणार नाहीं. तेही आमच्या डेरियास आले होते. कोणे रोखें जावें, कसें करावें, इत्यादि त्यांच्या विचारें करीत असों. तेही राहिल्या सारखें होईल तित [कें] करून दाखवावें याच प्रकारें चित्तापासून बोलतात. फौजेचा प्रकार पहातां स्वामींनीं नेमणूक केली त्यापैकीं हजार बाराशें तर आलेच नाहीं. आली फौज तिची गणती घेतल्यास चौथाई तर कमी होईलच. तेव्हां फौजही कमी मातबर भरण्यांत समजत नाहीं. निवडक प्रकार तेव्हांच उघडा दिसतो. सरदार छावणीस राहिले. त्यांसही छावणीचें संकट त्यापक्षीं जितके फौजेस ठेवावें तितका खर्च भारी. यामुळें भागले थकले, सबर निबर कोणाचे देण्या घेण्यामुळें बनतें न बनतें, यामुळें येकुण माणूस कमी होतें. तेव्हां भरणार कमी. गाडदी तरि चहूंकडे गुंतले. महमद इसफ तरि जरूरीस सिऱ्यास पाठविले. आणखी लोक भरणा स्वामीकडून आल्यास त्यास बोलवून घेऊं. येकांड्या असाम्या, घोडे चांगले माणोस आढळाचे थोडे थोडे ज्यास आढळतें तो घेऊन येतो. तूर्त त्याच्या स्वरूपाप्रमाणें रोजमरा करार करून पुढें सर्वाप्रमाणें नालबंदी वगैरे पावेल ऐसें लेहून ठेऊन चाळीस पन्नास तरि ठेविले. शें दोनशें पर्यंत उपयोगी आढळल्यासारिखे वरचेवरि पाहून ठेऊं. चार पथकें

---

† हे त्रिंबकराव मामा. २ हे घोरपडे मुरारराव गुतीकर. हें पत्र माधवराव पेशव्यांचें आहे.

निवडून ऐखादे कामास हुजुराचीं पाठवीन म्हटल्यास नेमणुके प्रमाणें हजारांचे पांचशें जातांना जातात. या प्रकारें अवस्था दाणा चाऱ्यामुळें जाली आहे. राजश्री गोपाळराव गोविंद आमच्या डेरियास येत असतात. राजश्री आनंदराव रास्ते बोलाविल्यास येत असतात, म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास विचार आचार कर्तव्याकर्तव्य राजश्री मुरारराव घारपडे यांचे विचारें करितां बहुत उत्तम आहे. ते सांगतील ते नेकसल्हाच सांगतील. फौजेच्या कमतीचा व भरण्याचा अर्थ लिहिला तर तो खराच. छावणीचा प्रकार यास्तव कमती असेल. येकांडे माणोस घोडें पाहून चाळीस पन्नास ठेविले ते ठेविले. आणखी येतील तसे पाहून शें दोनशें ठेऊं म्हणोन [लिहिलें] तर चाळीस पन्नास ठेविले या उपरि नवे लोक येकांडे ऐकंदर न ठेवणें. वर गोपाळराव व आनंदराव बोलाविल्यास येत असतात म्हणोन तर विचारआचारास उभयतांस बोलावितात, व तेही येतील. गुंता नाहीं विचार करण्यास सर्वांच्या विचारें केल्यास गुंता काय ? जाणिजे छ १० रविलोबल बहुत काये लिहिणें हे विनंती.

ले. २२२
[२९]

{श. १६९१ मार्गशीर्ष शु. ६
ता॥ ४-१२-१७६९

श्री.

श्रीमंत वेदशास्त्र राजश्री बाबा दीक्षित स्वामींचे सेवेशीं—

आज्ञाधारक खंडोजी अरगडे दंडवत विनंती विज्ञापना ऐशीजे. येथील कुशळ तागाईत छ ५ माहे शाबान मुक्काम बुंदी कोट जाणोन लेखनाज्ञा केली पाहिजे. याजवर इकडील वर्तमान तर खिचीचे निम्मे मुलूख घेऊन व बुंदी कोटियाचे अद्याप चुकलें नाहीं. एका दोन रोजांत चुकणार. दहा बारा लक्ष पर्यंत चुकणार आहे. बुंदीवर मुक्काम आहे. पुढें जाटाचे मुलूखांत जाणें आहे. जाट हि स ल पुरावर*. याजवर गोपाळराव बर्वे आहेत. पुढें बिर्नीस यांचेंच फौज आहे. पुढें जयनगराचे सुमारें आमची फौज जाणार आहे. जयनागर [व] हे एकत्र होऊन जाणार आहे. जाटाचें पारिपत्य करूं ऐसें म्हणतात. रा तुकोजी होळकर हे समागमेंच आहेत. यांची त्यांची भेटी कु र ई वर झाली. शिंदे तो उदेपुरास होते. इकडे येणार आहेत. आठा पंधरा दिवसां एक होतील. प्रागकर अल्ली गोवर पथाब्याचीं [?] पत्रें आलीं आहेत. ते व उमरावगीर गोंसावी यांचीं पत्रें आलीं आहेत कीं, " तुम्हीं आम्ही मिळून जाटाचें पारपत्य करून घेऊं. " त्यास माधोसिंगचा पुत्र म्हणतो कीं, " तुम्ही जाटाचें पारपत्य करावें. तुम्हांस पन्नास लक्ष रुपये देऊं. तुम्ही व शिंदे होळकर मिळून वांटून घेणें. " उदेपुराची मामलत चुकली आहे. पुढें जाटाचे तोंडावर राजश्री शिवाजी विठ्ठल व गंगाधर गोविंद आहेत. बाळाजी गोविंद यांची मामलत चुकली. राजश्री विश्वासराव झांशीकर पुण्यास आले आहेत त्यांची मा ब क [?] फसली आहे. रा० गोविंद शामराव गौर किल्लीं आहेत. कळलें पाहिजे. या

---

* बिसनपुरावर ?

प्रांतचें वर्तमान तर स्वामींस विदितच असेल. चंबेल उतरून पार झालों आहों. आठा पंधरा रोजांत जाटाची गांठ पडेल. जयनगरास जात आहों. इकडे मागाहून शिंदे येणार आहेत. एकत्र होऊन जाटावर जाणार. स्वामींस कळलें पाहिजे. आमचीं मुलें याणसें स्वामीच्या आज्ञेंत केलीं आहेत. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

ले.२२३. [३०] | शा. १६९१ मार्गशीर्ष शु. ८ ता ६-१२-१७६९.

श्री.

श्रीमंत वेदशास्त्र संपन्न बाबा दीक्षित मौजे कायगांव प्रांत गांडापूर स्वामीचे सेवेशीं—

अपत्य समान चरणरज आज्ञाधारक खंडोजी अरगडे मुक्काम चमिली प्रांत बुंदीकोट जाणोन स्वामींचे आशिर्वादें कडून छ. ७ माहे शाबान ऊर्फ माहे मार्गेश्वर पर्यंत शरीरेंकडून सुखरूप असों विशेष. येथील वर्तमान तर हिंदुस्थानची फौज येथें स्थित आहे. खेचिवाडा यांत छावणी करून दोन महिने राघोडा वगैरे किल्हे खेचींचे अर्धे घेऊन राजा आपले दस्तांत आणिला. त्याजपासून कांहीं खंडणी गुदस्तापैकीं घ्यावी, त्यास राजा [कडून] रा तुकोजी होळकर यांचे विद्यमानें कांहीं थोडी खंडणी चुकली. त्यांत हल्लीं घोडे व हत्ती दोन असे भरणा करून दिला. बाकी नक्त द्यावे. त्यास समागमेंच तुकोजी बरोबरच आहे. पुढें झाडून खंडणी आल्यियासि तो आपले मुलखास जाईल. बाकी अरूण किल्ला मोतीबार दिला. त्याजखालें दो लक्षांचीं जमाबंदी आहे, आणि कांहीं तुकोजीकडे किल्हे ठाणें दोन तीन बसले आहेत. वर्षासण खंडणीपैकीं मुलुख दिला आहे कळावें. दुसरें, भुपाळची खंडणी घेतली. पुढें बुंदीकोट येथींल्ही मामल्यित रा तुकोजी होळकर यांचे विद्यमानें चुकली आहे. शिंदाही आठ पंधरा दिवसांत येऊन पोंचतो. उदेपूरची त्याणें खंडणी साठ लक्ष रुपये घेऊन छावणी केली होती. त्यास श्रीमंतांस दहा वीस लक्ष रुपये हुंडी करून परभारें पाठविली. आपणही लोकांस नालबंदी देऊन आम्हांकडेस येणार आहे. पुढें जाटाचे मुलखांत तीन फौजा शिंदे व होळकर व पेशव्याची फौज पाऊण लाख स्वार मिळोन जाटावर मोहीम करून, त्याजला जेर करून पैसा मिळवावा ऐसें आहे. आणिक अल्ली गोवर दिल्लीकडील यांचे पत्र आलें कीं, " जाटाचें पारिपत्य करून रुपये पन्नास लक्षपर्यंत मिळवून देईन, " असें आहे. पुढें पहावें. जाट हातीं आल्यियासि फार उत्तम आहे. रा गोपाळराव बर्वे यांजकडे सबनीशी आहे. त्याजला दो चौ लक्षांची जहागीर देऊन फौजा नेमल्या आहेत. दहा वीस हजार फौज व पायदळ दहा वीस हजार ऐसें आमचे तोंडावर जाटानें पाठविलें आहे. सुरजमल जाट तो मेला. परंतु त्याचे कारभारी व मूल आहे. दोघे भाऊ एकच होऊन जबर लढाईस उभे राहिले आहेत. कांहीं वकील देखील येत नाहीं. माहे शिमग्यांत फार लढाईचा प्रसंग पडणार आहे. पहावें. ईश्वर कोणास यश

अपेश देणार हें न कळे. जयनगरवाला आम्हांस मदत दहा हजार फौजेनिशीं येणार आहे. विठ्ठल शिवदेव त्याचा लेक बापु दहा पांच हजारानिशीं आहे. तिकडे भागीरथी-कडून सीख जाटास मदत येणार म्हणोन ऐकण्यांत आलें आहे, पुढें पहावें. इतक्यावर जालियासि अधिक उत्तर वर्तमान लिहून पाठवूं. परंतु तुम्ही तिकडील वरचेवर आल्या मनुष्याबरोबर पत्रद्वारें तोषवीत गेलें पाहिजे. आमचे संसार सर्व प्रकारें चालविणें तुमचे स्वाधीनच आहे. फार काय लिहावें, तों तुम्हांस आमचेविषयीं सूचना मात्र लिहिली आहे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले. २२४ [७५]

श. १६९१ मार्ग शु. ११ ता ९-१२-१७६९

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्रपंत तात्या व त।। राजश्री विसाजी-पंत दादा स्वामीचे सेवेशीं—

पो विष्णु मदादेव+ साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता॥ छ १० साबान मु।। नजीक महेश्वर, वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत असले पाहिजे. विशेष.—आम्ही करवादचे मुक्कामीं होळकराजवळ दाखल झालों. आपलीं पत्रें त्याच मुक्कामीं आलीं. त्यांत लिहिलें आम्ही शिवणी हुसंगाबादेवरून भूपाळावरून खेचिवाड्यांत येतों, ऐशास आपला पहिला करार जे बढव्याचे घाटें यावें, आणि शिंदे, होळकर सर्व इक-डेच आहेत. हे, आपण येकत्र होऊन मनसबा पुढें करणें तो करावा, हा उत्तम विचार, आणि तुम्ही त्या मार्गें जावयाचा मनसबा केला. म्हणजे हे उभयतां इकडे मनसबे कर-तील. शिंदे यांनीं तों उदेपुरचे मुलाचा पक्ष धरून त्याजला घेऊन संस्थानाकडे* चाल्ले, ते मुलाची स्थापना करून संस्थानचा पैका घेणार. हा त्यांचा मनसबा. होळकर महेश्वराहून निघाल्यावर मनसबा काय करतील तो करोत. आम्हांस श्रीमंतांनीं इकडे पाठविलें व आपला आग्रह जाणोन आलों. श्रीमंतांची आज्ञा आपणांस व हे उभयतां सरदार एकत्र करून सरकारी काम करावें. आपण त्या मार्गे गेले. तेव्हां तिघांचे तीन मनसबे जाले म्हणजे आम्ही मग राहून उपयोग नाहीं त्यास सविस्तर वर्तमान र।। दादोपंत दादांनीं लिहिलें आहे, त्यावरून कळों येईल. तदनुसार आपण याच मार्गे यावयाचा मनसबा क्षेपनिक्षेप करावा त्या मार्गे जाऊन साां चुकतील. त्याहून या मार्गे मोठ्या मनसब्याचा बंदोबस्त करून उदे-पुरचाही बंदोबस्त केल्यानें सरकार काम आहे. आपल्यासही तूर्त उपयोग पडेल. यास्तव याच मार्गे यावें हें उत्तम आहे. याउपर आपली मर्जी त्याचमार्गे जावयाची असल्यास मग आम्ही यां समागमें कशास रहावें ? रा दादा व आम्ही देशास जाऊं. आम्हांस सर्व प्रकारें

+ गद्रे सावकार.

* मूळांत ' सं।।नाकडे ' ' सं।।चा ' असें आहे.

लक्ष आपलें यास्तव आम्हीं येथपर्यंत आलों. पुढें आपलें पत्र जसें येईल त्याप्रमाणें तजवीज करूं. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

ले. २२५ [१५८] | श. १६९२ आषाढ शु. ७ ता॥ २९-६-१७७०

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी—

विनंती उपरि. सालमजकुरीं स्वारी पुण्यांत असतां कोण कोणते महालांच्या रसदा करार जाहाल्या, व स्वारी निघाल्यावर कोणते महाल विल्हेस लागले, त्यां पैकीं तूर्त याव-याचा ऐवज कीती व मुदतीचा ऐवज कीती, त्यापैकीं पोतां ऐवजजमाकीती जाहला व बाकी काय तें लिहून पाठवणें, व पोत्यास ऐवज येऊन बाकी ऐवज तूर्तचा व मुदतीचा राहिला तो झाडून पोत्यास जमा करणें व ज्या महालांच्या रसदा घेणें असतील तेही महाल विल्हेस लाऊन ऐवज घेणें. लिहिले प्रमाणें आधीं करणें. रा॥ छ ५ रा॥वर. सारांश ऐवज रसदेचा पोत्यास जमा करणें. मुदतीचा ऐवज रसदेपैकीं किती त्यास या ऐवजापैकीं पोत्यास आणि-ल्यास ब्याज किती पडतें हें सविस्तर लिहून पाठो. रा॥ छ ४. बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले. २२६ [१३९] | श. १६९४ सन १७७२

श्री

राजश्री सखारामपंत गोसावी यांसि--

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ जानोजी भोंसले सेनासाहेब सुभा दंड-वत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे विशेष.-आम्हां-कडील प्रांत कडेवळीत येथील देशमुखीचे कामावरि पागा पाठविली. त्यास आम्हांकडील ठाणेदार व पागा निंबगांवीं वोस गांवांत जागा विछिन्न केली, तेथें बसोन आहेत. ऐसें असतां भगवंतराव राम याचे लोक नित्य उठोन हर्षामर्शानिमित्य भोंवते उभे राहोन कजिया करितात. आम्हांकडील पागेचें कुरण कापून नेतात. गांवकुसाचा गढीचा आसरा नाहीं. ऐसें जाणोन उपद्रव करितात. याजकरितां भगवंतराव राम यासि उपसर्ग न करीत ऐसें ताकीदपत्र देववावें. दुसरें, नगरकर किल्लेदार देशमुखीचे रसुमास* खलेल करितात. वतन-दारीच्या शेऱ्या व आंब्याचीं झाडें, मौजे मेहकरीस पागेचें कुरण आहे तें चालू देत नाहीं. यास्तव किल्लेदारास ताकीदपत्र आपले सरकारचें दिलें असतां दुसरे पत्राचा उजूर[1] करितात.

---

*रसुम-जमिनीच्या उत्पन्नांतील देशमुख देशपांडे यांचा विभाग. शेरी=१. मणीं दोन शेर याप्रमाणें एकंदर उत्पन्नावर कमावीसदाराचा हक्क २. शेरी जमीन म्हणजे गांवसि-वेच्या बाहेर असणारी बागाईत जमीन. १. उजूर=सबब. बयाद.

त्यास ताकीद देववून वतनबाब सुरळीत चाले तें करावें. राजश्री महाराव निंबाळकर व रामराव निंबाळकर व शिंद्यांकडील मामलेदारही रुसुमास खलेल करितात, त्यांसही ताकीदपत्रें देववावें कीं, त्यांचेही तालुकियांतील रुसुम अविछिन्न पावते करावे. निंबगांवचें गांवकुसूं व गढी विछिन्न केली आहे त्याचे मरामतीची परवानगी नगरच्या किल्लेदारास द्यावी कीं, भगवंत गोपाळ गुमस्ते देशमुख गढी घालतील ते घालूं देणें. ऐसें पत्र द्यावें. रा॥ छ २४ माहे जमादिलावल बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.*

ले. २२७ [११८] | श. १६९३ माघ शु. १५ ता. १८-२-१७७२

श्री.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामींचे सेवेशीं—

विनंती सेवक सदाशिव मल्हार कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागाईत छ १३ जिलकाद मु॥ अनेकल नजीक होसूर येथें यथास्थित असे विशेष. स्वामींनीं कृपा करून सेवकास पत्र पाठविलें तें पावोन परम हर्ष जाला. तो पत्रीं लेखन करावयास सेवक समर्थ नाहीं. इकडील वर्तमान तरि सविस्तर राजश्री मामांनीं सेवेशीं विनंती पत्रें लिहिलीं आहेत त्यावरून सर्व विदीत जालेंच असेल. महमद अल्लीखान याजकडील दिवाण व राजश्री माधवराव सदाशिव इंग्रजांचे मजकुराविशीं आले. कुमकेस न जावें, इतर नाइकाकडे व आपल्याकडे ही न यावें हा तह जाला. इंग्रजांनीं विलायतेस लिहून पाठविलें आहे. स्वामींचे फौजेसि कुमक करावी म्हणून तेथून आज्ञा आल्यानंतर यावें हाही अर्थ आहे. सेवेशीं सर्व विदित जालेंच आहेत. परंतु सेवकानें ऐकिलें वर्तमान सेवेशीं त्याहावें. या उपरि मसलतीचा डौल बिदनूर प्रांतीं जावें हा आहे. दिवस तों गेले. परंतु तिकडे गेल्यास हैदर नाईक सल्याची पैरवी करील. आग्रहच नंदीगड बालापूरचा आहे त्यांत कदाचित् हे नेट जाल्यास सल्ला केला तर न कळे. असे मजकुराचें वर्तमान ऐकिलें त्यावरून सेवेशीं विनंति लिहिली आहे. हे विज्ञप्ति.+

ले. २२८ [४२३] | श. १६९५ कार्तिक व ६ ता. ५- ११-१७७३

सन ११९७ फसली. फोरिस्त नंबर ५ तालीक.

नबाब हैदर अल्लीखान बहादर शादकाम व मकजीयुल्मराम बाशंद छ आमारत व अयालत मर्तबत शौकत व हशमत मंजीलत खान

---

*जानोजी भोसले ता. १६-५-१७७२ रोजीं मृत्यु पावला, त्यापूर्वीचें पत्र, कनकापुरचा तह २३-३-१७६९ रोजीं झाला, त्यानंतरचें.

१ मामा=त्र्यंबकराव विश्वनाथ पेठे.

+सदाशिव मल्हार पुरंदरे याचें पत्र माधवराव पेशव्यास.

आजी. मुशान बाज ईर्षियाक फिरावां मशहूद आंके येथील खैर आफीयत जाणून आ आमारत पन्हाह कडील खैरयत कलमी करून शादमानी रुयदाद होय तें केलें पाहिजे. दरिविला आ आमारत पन्हाहा कडून अज्जम परशराम बल्लाळ व आनंदराव व्यंकटेश व राघो विठ्ठल व बाळाजी विठ्ठल या हमराह खत खुषनमत बमय एक जजिर फिल व जवाहीर व खीलअत पारचे बरहुकूम याद दास्तपईर साल केलें तें इजार समयीं पोंहचून कलमी केला मतालिब मुफशील जाहिरीस पोंहचला, व जबानी रूबरू मशारूनइल्हे याणींराज कारणाचा मजमून मुफशिल पोशिंदा अर्ज केल्यावरून बिसयार खुषबक्तीं हांशील जहाली. इनशा अलाहुता आला दसरा होतांच आ अमारत पन्हाहा बमये भारी फौजेनिशीं त्या जिल्यास येत असों. हस्बदील खवाह मतालीब हांसील होतील म्हणून बयानवार कलमी केलें तें मालूम जहालें. पेशजी आअमारत पन्हाहाचें येणें बमै तोफखाना भारी फौजेनिशीं तुंगभद्रा पार होतांच मजल दरमजल कूच करून दरपेश आलों असतां म्हणजे दिलखवाह मतालिब कार सुरत पिजीर होऊन उमदा काज कामें हांशील जहालीं असतां बरसादचे बारशाच्या जोरामुळें माघारी कूच करून गेलों. फिलहाल मसलहातीचे रोज आनकरीब येऊन पोंहचतील दरीनजकी आअमारत पन्हाहानीं दसरियाच्या मुहुर्तानें कूच करून दरमजल तुंगभद्रा पार होऊन जलदीनें या जिल्यास येऊन पोंहचावें. हेंच ईंतिजारी आजहाद आफजूल जाणून फंद अमदनकाफिस्त अज्जम +रघुनाथराव पंडित यांची स्थापना स्वस्थळास करावी हा इरादा हरदू तर्फेनें बस्तर आहे बई सबब आअमारत पन्हाहाचें येणें यातर्फेस भारी फौज तोफखाना सुद्धां जहालियानें महाराजांचा व आ अमारत पन्हाहाचा इतिफाक होतांच बारभाईस तंबीह पोंहचून पंडित मशारुनइल्हे यांची स्थापना केली जाईल व बस्तर मसलहातीचीं काजकामें घडून येतील ये बाबेचा कित्येक मुफशिल हुकूम फरमावणें तो कयकूल मराहमत यशवंतराव शिंदे सर सुभेदार यास फरमाविला आहे. मताबिक हुकूम कलमी करतील त्याजवरून मालूम होईल. त्या मवाफिकंकार सुरत पिजीर होऊन आअमारत पन्हाहाचे आमदन या जिल्यास जलदीनें होय तें करावें. जियादचे निगाआदय आयाम बकाम शादमानी मुहामबाद.

सदरहू खत खाना छ १९ माहे शाबान सन आर्बा सब्बैन मय्या व अल्फ. (सन ११८३ फसली.) मुक्काम करवीर नबाब बहादर याजकडून हत्ती आला त्याचें नांव हुजरून सैदबक्ष म्हणून ठेविलें होतें.

ले. २२९ [१२० } {श. १६९५ माघ व १० ता ६-२-१७७४

श्री

राजश्री पंतप्रधान साहेबांचे सेवेशीं—

छ सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ गोविंदराव गायकवाड

+रघुनाथ बाजीराव यांस गादीवर बसाविण्याविषयीं हें पत्र आहे.

सेनाखासखेल समशेर बहादर दंडवत विनंती ऐशीजे. येथील कुशल जाणून स्वकुशलेखनाज्ञा करीत असलें पाहिजे. विशेष साहेबांची आज्ञा घेऊन निघालों. तुळजापुरच्या मुक्कामास पोहोंचलों. तेथून फौज नगरच्या मार्गानें रवाना करून आम्ही श्री जेजोरीनाथाचें दर्शन घेऊन दावडीस* एक दिवस राहून दुसरे दिवशीं कूच करून दरमजल गंगातीरास पोंचलों. मार्गी शिवराम अनंत व हैबतराव बाणराव व कृष्णाजी चव्हाण पागादार पागांसुद्धां गुजराथेहून आले ते भेटले. बरोबर आहेत. फौज गंगेच्या मुक्कामीं येऊन मिळाली. नंतर दरकूच चांदवडच्या मार्गे जात असतां अंताजी नागेश कुटुंब सुद्धां पळत फिरत होते. त्यांस भेटीस बोलाविलें होतें. ते येईनात. धटाई करूं लागले. नंतर दहा वीस स्वार पाठवून आणून ठेविले. तेथून पुढें ऽ साल्हेरच्या नजीक आलों. किल्ल्याचा बंदोबस्त करून दोन मुक्काम राजश्री दौलतराव यांजकरितां करून त्यांस मिळवून घेतलें. नंतर कूच करून सोनगडच्या मुक्कामास आलों. किल्ले मजकुरची बंदोबस्ती होतीच. परंतु साहेबांचे पुण्यप्रतापें करून किल्ला खालीं जाला. निशाण चढऊन आपले लोक ठेऊन बंदोबस्त करून व्यारेच्या मुक्कामास आलों. व्यारे वर त्यांजकडील पागेदार अण्णाजी अनंत वगैरे पांचशें होते त्यास आमचे पांच सातशें पुढें आगाऊ गेले होते त्यांनीं चार घोडीं पाडून व चार भले माणूस पाडून घेतलीं. व्यारेंत ठाणें घालून पुढें दरमजल सुरत अठ्ठाविशींत आलों. मांडवीकर दोनशें स्वार व चारशें माणूस सुद्धां भेटीस आले. तिकडून राजश्री त्रिंबकराव गायकवाड आणखी एक दोघे येऊन भेटले. साहेबांचे पुण्यप्रतापेंकरून दरमजल जात आहों. राजश्री फत्तेसिंग गायकवाड याचा रेवा तीरीं मुक्काम आहे. तीन हजार स्वार पायदळ मिळोन आहे. अशी बातमी बरचेवर येती. साहेब कृपें सर्व यथास्थित होईल. साहेबीं कृपाळू होऊन राजश्री दौलतराव यांसमवेत फौज घोडीं माणूस सामान यथास्थित पाठविलें. परम समाधान जालें. आम्हांजवळही फौज पेशजी व हल्लीं देशीं आणखी जमा जाली आहे. माणूस उत्तम आहे. कामकाज पडल्यास उपयोगी पडतील. दिनचर्या बातमी येत असते त्यांत अंतर नाहीं. एका दों दिवसां त्यांची आमची गांठ पडेल. त्यांच्या मनांत भेटावें असें आल्यास आम्हांकडून अंतर होणार नाहीं. विरुद्धास प्रवर्तल्यास तसेंच प्राप्त. कोणताही प्रकार मांडल्यास साहेबांचे कृपें यथास्थित होईल. कोणत्याही गोष्टीस प्रारंभ करते समयीं साहेबांचे चरणाचें चिंतन अंतःकरणीं करून पुढें उद्योग करीतों. तेव्हां

---

* दावडी ता० खेड हा गांव गायकवडांस इनाम होता तो आलीकडे त्यांणीं आपले पदरचे 'ढवळे' नांवाच्या सरदारास देऊन टाकिला. येथें खंदक, गांवकूस, गढी व वाडा आहे. सदरेच्या पुढें कारंजें आहे. जवळच एका डोंगरीवर खंडोबाचें स्थान आहे तें प्रसिद्ध आहे. गोविंदराव गायकवाड येथें देवाचे सेवेकरितां बरेच दिवस राहिले होते. देवाकडे गायकवाडांकडून चौघडा, पोषाख व खेरीज सुमारें ३०० दरमहा नेमणूक चालू आहे. येथें टांकी नेहमी सुरू असते. (का. सं. कर्ते).

ऽ साल्हेर व मुल्हेर हे दोन किल्ले बागलाणच्या पश्चिम भागीं आहेत.

त्या चरणास आमच्या करण्याचा साभिमान आहे. आमची निष्ठा चरणापाशीं. तें सर्व पार पाडून यथास्थित होऊं. ऐवज माल व ज्याचा [?] म॥ व अवांतर कित्येक अर्थ राजश्री सखाराम हरि¶ व रावजी अप्पाजी यांसि लिहिले आहेत, ते विनंती करितां ध्यानास येईल. सर्व प्रकारें आधार आश्रय एक साहेबांचे चरणाचा. साहेबीं साभिमानानें कृपा केली त्या मार्गें येथपर्यंत निभावीत आलों. एक दोन स्थळें मजबुदीचीं होतीं, तीं हस्तगत जालीं. पुढें त्यांची भेट होऊन त्यांचा बंदोबस्त करणें, तोही अर्थ साहेबांचे कृपें घडेल. त्यांची आमची गांठ लौकर पडेल. होईल मजकूर तो वरचेवर सेवेशीं लिहून पाठऊं. परंतु साहेबांचे पुण्यें करून सर्वही उलगडा पडेल. साहेबीं चिंता सेवकाची न करावी, आणि माझा अभिमान साहेबांच्या चरणीं आहे तर साहेब माझे मायबाप आहे, तर हे ब्रीदाची लज्जा मातापित्यास आहे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना. र॥ छ २४ माहे जिल्काद कृपा कीजे हे विज्ञापना.

ले. २३० [४४७ [} {श. १६९५ फा० व. २ ता २८-२-१७७४

श्री

यादी छ १५ जिल्हेज सु॥ आर्बी सबैन. खिल्ले सातारा सन ११८३ फसली शके १६९५ फाल्गुन वद्य २ सोमवार विजय संवत्सरे, ता० १ मार्च १७७४ इसवी,

	राजमान्य	र॥	बा॥ लीं॥	सुदन	छ
१ भवानराव प्रतिनिधी.	१	०	१	०	०
१ राघो बापूजी (पागे).	०	१	०	०	१
१ बाळाजी पलांडे (पागा).	०	१	०	०	१
१ नागोजी राऊत.	०	१	०	०	१
१ येसाजी देवकांते (पागा).	०	१	०	०	१
१ भगवंतराव कडेकर.	०	१	१	०	०
१ मल्हार जगजीवन (पानशे).	०	१	१	०	०
१ सठवोजी गावडे (पागा	०	१	१	०	०
१ आनंदराव निंबाळकर नाईक	०	१	१	०	०
१ महिपतराव घोरपडे	०	१	१	०	०
१ आपाजीराव पाटणकर	०	१	१	०	०
१ रामचंद्र दामोदर (अंबकिर)	०	१	१	०	०
१ माधवराव तुकदेव	०	१	१	०	०

¶ हे दोन प्रभु गृहस्थ होत. सखाराम हरी हे रघुनाथरावाचे परम स्नेही. रावजी आपाजी पुढें गायकवाडींत दिवाण झाले.

१ बाबुराव पाटणकर	०	१	१	०	०
१ जानराव पाटणकर	०	१	१	०	०
१ मुराराव हिंदुराव घोरपडे मम्मलकतमदार सेनापति	१	०	१	१	०
१ राणोजी नाईक निंबाळकर	०	१	१	०	०
१ वणगोजी नाईक निंबाळकर	०	१	१	०	०
१ मुरारराव जाधव (भुईंजकर)	०	१	१	०	०
१ नरसिंगराव धायगुडे	०	१	१	०	०
१ त्रिंबकराव विश्वनाथ	०	१	१	०	०
१ वामनराव गोविंद	०	१	१	०	०
१ सुभानराव पाटणकर	०	१	१	०	०
१ शाबाजी भोसले	०	१	१	०	०
१ लक्ष्मणराव गोविंद चिटणवीस	०	१	१	०	०
१ खंडेराव बापूजी चिटणवीस	०	१	१	०	०
१ आनंदराव गोपाळ	०	१	१	०	०
१ वासुदेव अनंत (मुताल्लिक)	१	०	१	०	०
१ खंडेराव दरेकर	१	०	१	०	०
१ आनंदाव बाजी	०	१	१	०	०
१ समस्त सेनाधुरंधर साबाजी भोंसले	१	०	१	१	०
१ भीमराव यशवंत (पानसे)	०	१	१	०	०

आशीर्वाद

१ चिरंजीव मालोजी नाईक निंबाळकर	०	१	१	१	०	०
१ सोईराजी नाईक निंबाळकर	०	१	१	०	०	०
१ आनंदाव भिकाजी रास्ते	०	१	१	०	०	०
१ दारकोजी निंबाळकर (पागा)	०	१	१	०	०	०
१ कृष्णराव बळवंत (मेहेंदळे)	०	१	१		०	०
१ हणमंतराव जाधव (भुईंजकर)	०	१	०	१	०	

एकूण अडतीस असामी यांस आज्ञा केली कीं राजश्री रघुनाथ बाजीराव यांणीं पुण्यांत नारायणराव पंडित प्रधान यांजवर कसाला केला [तो] तुम्ही पाहिलाच आहे. हें धर्मराज्य [यांत] अयोग्य गोष्ट जहाली, पुढें मशारनिलेनीं पेशवाईचीं वस्त्रें मागितलीं. संकट जाणोन पाठविलीं. परंतु पेशवाईची जी मर्यादा ती अगदींच राहिली नाहीं. शिक्का मनस्वी केला. यास्तव त्यांजकडील पेशवाई दूर केली असे. तरी तुम्ही राज्यांतील चहूं पिढ्यांचे सेवक, राज्यास अपाय होऊं लागल्यास कल्याणदायक तें करावें, हेच सेवक-

पणाची रीत. तरि राजश्री भवानराव पंडित प्रतिनिधी व त्रिंबकराव विश्वनाथ¶ व साबाजी भोंसले सेनासाहेब सुभा व वामनराव गोविंद+ हे स्वामींच्या लक्षांत आहेत; तरि तुम्हीं यांच्या लक्षांत राहून स्वामिसेवा करून ज्यांत स्वामींस संतोष ते गोष्ट करणें§.

दादांचे स्वारी बरोबर असोन गंगाबाईच्या पक्षाचे होऊन कारभारी मंडळीस मिळाले.†

छ ४ सफर खमस सबैन मया व अलफ ११८४ फसली चैत्र शुद्ध ६ गुरुवार शके १६९७ मन्मथ नाम संवत्सरे ता० ७ अप्रेल सन १७७५ इसवी. शिवाजी भोंसले सरकार कामास आले. सबब सेनासाहेब सुभा सांगोन वस्त्रें देऊन सरदारीस उभें केलें. त्या सवयीं हातरोखे पो

नांवचे मुसलमान सरदार शंभर स्वारावर
त्यास मुलीमाना शुजा आतशाआर.
१. हस्तखान मस्तखान.
१. महमद अमीनखान.
१. हैदर अगा.
१. जोरावरखान.
१. कादर दादखान.
१. रसुलखान.
१. जैतवारखान.
१. बिलंदरखान.
१. रोशनखान.
१. तेजखान.

१०

मराठे सरदार, राजश्री
१. गोविंदराव मुकुटराव.
१. काशीराव व मुकुंदराव व रामचंद्रराव पाटणकर.
१. बहिरराव पाटणकर.
१. जोगोजी यादव.
१. सुभानराव पाटणकर.
१. बाळकृष्णराव पाटणकर.
१. केशरसिंग व बहिरसिंग.
१. राणोजी कराडे.
१. हैबतराव बाबर.
१. लक्ष्मणराव पाटणकर.
१. गंगाराम जाधव.
१. गंगाजी शिर्के.
१. भवानजी आटोळे.
१. निंबाजी भोसले.
१. येशवंतराव यादव.

१५

जाणिजे छ ४ सफर खमस बहुत काय लिहिणें.

¶. त्रिंबकरावमामा. + हे पटवर्धन. § हा मसुदा असून वर निर्दिष्ट केलेल्या मंडळास आज्ञापत्रें पाठविण्याचीं असें ठरलेलें दिसतें.

†. हीं वाक्यें मागाहून लिहिलेलीं दिसतात, पण त्यांचा मागील मजकुराशीं संबंध अर्थात् नाहीं. ह्याच कागदावर पुढील मसुदाही लिहिलेला आहे पण तोही मागाहून लिहिलेला दिसतो.

दकारी कागद लिखितवार लेहून राजमान्य उपरि तेरीख साल बहुत काय [1]लिहिणें.

शिवाजी भोसले यांसि सेनासाहेब सुभा सांगितला असे. तरी तुम्हीं त्यांजवळ राहून स्वामींचे लक्ष धरून सेवा एक निष्ठेनें करून बजावून दाखविणें.

१. रामचंद्र नाईक निंबाळकर.
१. जगदेवराव नाईक निंबाळकर गोसावी यांसि.

१ जोत्याजी घाटगे वगैरे मंडळी

ले. २३१
[१३१

श. १६९६ अधिक वैशाख शु. ४
ता. १५-४-१७७४

श्री.

राजश्री पंतप्रधान साहेब साहेबांचे सेवेशीं

छ सकळ गुणाळंकरण अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य स्नेा गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादर दंडवत विनंती ऐसीजे. येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लेखन आज्ञा करीत असलें पाहिजे. विशेष आपलें पत्र छ १४ जिल्हेजचें आलें तें छ १२ मोहरमीं मुक्काम बडोदें अदकोशीं पावलें. लेखनार्थ ध्यानास आला. आम्हांकडील पत्रें येत नाहींत. याकरितां विस्मय करून लेखन केलें. ऐशियास सोनगड ब्यारे हस्तगत करून आपणाकडे पत्रें पाठविलीं. नंतर तेथून कूच करून पुढें आलों. रेवातीरीं माघ वद्य १४ त्यांची आमची लढाई जाली. त्यांचा मोड जाला. निशाणें, जरीपटका, नौबती, सुत्रनाळा, जेजाला, तोफा, उंटें, डेरे, ढाला, वगैरे लुटण्यांत आलें. ते खांसे पंचवीस स्वारांनिशीं पळोन बडोद्यास आले. दुसरे दिवशीं आपणाकडे पत्रें रवाना केलीं. नंतर कूच करून रेवा उतरलों. दरमजल चौथे दिवशीं बडोदियाच्या पश्चमेकडे अदकोशीं उदकांची नदीवर मुक्काम केला. येथून मुजरद कासीद जोडी पत्र लिहून आपणाकडे पाठविली. याप्रमाणें पत्र पाठविण्यास अनमान अथवा उपेक्षा किमपि नाहीं. परंतु मागच्या अडचणीमुळें कासीद जोड्या कोठें अडकून ठेविल्या किंवा कैसें जालें हें न कळे. साहेबांस पत्र न ल्याहावें ऐसें नाहीं. सर्वकाल आपल्याकडील निजध्यास. अस्तु. बडोदियासि जाऊन बसले आहेत. आम्हीं भोंवतीं बंदी केली आहे. पेटलाद ढवलकें वगैरे या स्थळीं त्याजकडील लोक व सरंजाम थोडा बहुत होता. तेथें अमल बसवावयाकरितां कारकून व फौज पाठविली. त्या खटपटीस मास पक्ष लागला. बेकार ग्रामांची जप्ती चहूं दरवाजियांची केली आहे. किल्या बाहेर त्याचे सिबंदी व स्वार होते त्यांस आपल्याकडील लोक जाऊन मारामार करून गांवांत नेऊन घातले. तीर्थस्वरूप राजश्री खंडेराव गायकवाड हिम्मत बहादर फौज सुद्धां येथें आम्हापाशींच आहेत. राजश्री दौलतराव फौजसुद्धां आहेत. या उभयतांकडे बडोदियांतून सलूखाचें बोलणें एक दोन दिवस आलें. या उभयतांची

---

१ मुसलमानास कसें लिहावें व मराठ्यास कसें लिहावें हें सांगितलें आहे. दकारी कागद म्हणजे छ ह्या चिन्हें करून युक्त.

भेटही त्यांणीं येऊन घेतली. सर्व सोडून नेमणुके प्रमाणें घेऊन स्वस्थ असावें त्याप्रमाण बोलणें निश्चयांत आलें होतें. परंतु पुण्याहून पत्रें खिजमतगारासमवेत व कासीदा समवेत वगैरे गुप्त प्रघट दररोज येऊन त्यास पोंचलीं. त्यावरून पुन्हा उमेद, बेकार, ग्राम न द्यावे, आपल्या दैवयोगें हा उपाय निर्माण जाला, इतःपर होईल तेथवर बळ धरावें, ऐसा निश्चय होऊन पुण्याकडे पत्रें जातात येतात. या उभयतांकडे सलूखाचें बोलणें लाविलें होतें. त्यास सांगून पाठविलें जे, आपल्या दैवें हा उपाय निर्माण जाला. इतःपर माध्यस्थ काय म्हणोन सांगून पाठविलें. तिकडील पत्रें बजिन्नस आलीं तीं यांसि दाखविलीं. यांणीं ही प्रत्योत्तर करणें तें केलें. तें त्यांच्या प्रत्ययास न आलें. आंतील बळ म्हणावें तर, मोठा आश्रय मिळोन किल्ला, हिंमत म्हणावी तर पुण्याकडील पत्रावर, हें आपणांस कळावें. चहूंकडून किल्याची बंदी केली आहे. या घटकेपर्यंत कुमक त्यांजकडे कोठून आली नाहीं. आमदाबादेची सिबंदी आम्हाकडेस आली. चाकरीस ठेविलें. पहिले देशची फौज व इकडील सिबंदी व स्वार मिळोन पंचवीस तीस हजार फौज आहे. चहूंकडून त्यास अडचण केली आहे,‡ साहेबांचे पुण्यें करून कार्यभाग सत्वरीच होईल. या मागेंच हल्ला करून घेतों. परंतु गायकवाडांचीं कुटुंबें झाडून आंत, प्रजा बहुतां दिवसांची वस्तीची वस्ती, याजकरितां सबूरीनें आजि पर्यंत करणें तें केलें. तोफाही किल्यावरील आम्हांकडील चालू आहेत. किल्या भोंवते आपले लोक जबरदस्तीनें जाण्यांत गुंता नाहीं. ते आंतून तोफा व गोळ्या मारितात. प्रयत्नास चुकत नाहीं. मनसब्याची उमेद पुणें कडील कागदपत्रावरून विशेष. तिकडे त्याचें येणें होईल हा बहुतांस संदेह. परंतु येथीलच उलगडा होणें कठीण. त्यापक्षीं तिकडे येण्याचा अर्थ कोठील ? साहेबीं येविशीं स्वस्थ चित्त असों द्यावें. येथील गुंता स्वल्प दिवसांत उरकेल. दिनावधी लागणार नाहीं. सदैव कृपावंत होऊन आज्ञा पत्रीं सांभाळ करणार साहेब समर्थ र॥ छ १९ माहे मोहरम बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे. हे विनंती*.

ले. २३२ [५२] | पो॥ छ १२ रबिलाखर सन खमस सबैन ज्येष्ठमास. | श. १६९६ जेष्ठ शु. २ ताा ११-६-१७७४

॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री **नाना** स्वामींचे सेवेशी पो **नारो शंकर** सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा छ १ रबिलाखर जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष सांप्रत आपल्याकडील पत्र येऊन परामर्ष होत नाहीं तर ऐसें नसावें. निरंतर पत्रीं सांभाळ करीत गेलें पाहिजे. या नंतर पो जंबुसर येथें राजश्री दौलत बाबूराव फौजसह जाऊन

---

‡ येथें बाजूवर आहे. * दमाजीच्या मागें त्याच्या मुलांपैकीं सयाजी याणें शिका बखेडा मांडला तेव्हां गोविंदराव यांस बंदोबस्ताकरितां पेशव्यांनीं पाठविलें होतें. तेव्हांचें हें त्यांचें पत्र आहे.

ठाणें हस्तगत केलें. यास्तव उपराळा करून अंमल बसवावा या अर्थी येथून कारकून व अस्ब पाठविले, त्यांजला वर्तमान कळतांच निघोन गेले. ते समयीं सावकाराचा गल्ला व ठाण्यांतील वस्तभाव व पागेचीं घोडीं वगैरे जिन्नस कं म पे श पन्नास पंचावन हजार रुपयांचा नेला. म्हणोन कारकुनाचीं पत्रें आलीं. त्यास यंदां पर्जन्याचे कमतीमुळें माहाल दरोबस्त खराबी-खालें आला. दरम्यान अरिष्ट उत्पन्न होऊन बहुत नाश केला. याजमुळें सावकार व इतर लोकांस नाउमेद जाली. पेस्तर आबादी होतां दिसत नाहीं. वस्तभाव ज्याची त्यास प्राप्त जाल्यानें पुढें उमेदवार होऊन माहालची आबादी होईल यास्तव आपल्यास लिहिलें असे. तरि राजश्री दौलत बाबूराव यांजला सरकारचें ताकीदपत्र द्यावें कीं, वस्तभाव व घोडीं, गल्ला वगैरे जिन्नस दरोबस्त माघारा देणें. याप्रमाणें पत्रें येऊन सावकाराचा वस्तभाव ज्याचा त्यास प्राप्त जाली म्हणजे सर्वांची खातरजमा होऊन माहालची उस्तवारी होईल. बहुत काय लिहिणें हे विनंती.*

ले. २३३ [१२४]

श. १६९६ आषाढ व १० ता ा १--८--१७७४

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोपंतनाना स्वामींचे सेवेशी—

पोष्य हरी बल्लाळ सा ा नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ ता ा छ २२ जमादि-लोवर जाणोन स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष-आपणाकडून बहुत [दिवस] पत्र येऊन कांहींच वर्तमान कळत नाहीं. तरि ऐसें नसावें. सदैव पत्र पाठवून सांभाळ करावा. इकडील वर्तमान तरि श्रीमंत राजश्री दादासाहेब धुळकोटापलीकडे सहा कोसांवर मुक्काम करून राहिले आहेत. श्रावण मासचे खर्चास दोन लाख रुपये द्यावे लागतात तेव्हां कूच होऊन पुढे येतील. त्यास ऐवजाविशीं राजश्री विष्णुपंत बाबा यांस लिहिलें आहे, ते तरतूद करतील. परंतु त्यास ऐवज लौकर द्यावा लागेल. राजश्री नारो गणेश होळकराकडील व राजश्री बाळाराव शिंदे याजकडील व विष्णुपंत बाबा सरदारांपासून रोख घेऊन बराणपुरास आले. पुरंदरास जाव * * त्यास महंमद इसफ वगैरे गाडदी यांस तेथून निरोप दिल्हा. ते येऊन बराणपुराजवळ राहिले आहेत. त्यास पुढें घालून तापी उतरोन आलीकडे आणावें, नाहीं तरि मागती श्रीमंत बराणपुरच्या मार्गे येतात, तेव्हां त्यास मिळतील याजकरितां कारभारी यांस चार दिवस अधिक लागले. परंतु आतां लवकर निघोन येतील. आमची भेट घेऊन पुढें जावें असें त्यांचें मानस आहे. मग पहावें. स्वारी बरोबर समया नाहींत. येथें द्याव्या तरि लष्करांत मिळत नाहींत * * * तां आतां समया वगैरेची यादी आलाहिदा लेहून पाठविली आहे त्याप्रमाणें सांडणी स्वारा बरोबर पाठवून द्याव्या. श्रीमंतांस वर्तमान दीनचर्येचें लिहितों, आपणांस

---

* पत्र नाना फडणिसास. दौलत बाबूराव हा सखाराम हरीचा पुतण्या.

कळतच असेल. अधिकोत्तर लिहिणेस नाहीं. श्रीमंतांचे येण्याचाच मजकूर पडला आहे. पैका पुष्कळ पावला. सेवट काय करितात कळत नाहीं. श्रावणमासचे खर्चाचा पैका द्यावा, पुढें चांदवड पर्यंत देऊं नये, असें बोलण्यांत आहे. परिणाम लागेल तो खरा. खर्चास नाहीं पावलें तर तापीवर आल्यावर पोटास नाहीं, म्हणोन मुलुकास तसदी देतील. एकूण दोन्हीकडून नुकसानी जाणून राजश्री विष्णुपंत यांस बहुत प्रकारें लहान तर्तुद करविली आहे. त्याचे पाहिले तीन लक्ष गुरुजीजवळ भरणा जाला. आम्ही दोन लक्ष श्रावणमासाचे श्रीमंताचे खर्चास मागतों. हा ऐवज त्यांस प्रविष्ट होयसें करावें. पैक्याचें मोठें संकट पडलें. सरदारांनीं मसलत लांबवली. असो. एक वेळ चांदवड दाखल जाले म्हणजे सारे गोष्टी भ्रांति फिटेल. होईल ते लिहून पाठवूं. दोन चार पत्रें आपणांस पाठविलीं, परंतु उत्तर येत नाहीं, तस्मात् आम्ही मसलत लांबविली, मेहनत करीत नाहीं, असें ध्यानांत आलें असेल, तर येथें काय करितों तें काय ल्याहावें ? दर्शनांतीं विदित करूं. आपले ममतेंत अंतर नसावें. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

ले. २३४ [१२८] { श. १६९६ कार्तीक व १ ता १९-११-१७७४

श्री.

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके १०१ जय नास संवस्सरे कार्तिक बहुल प्रतिपदा मंदवासरे क्षत्रियकुलावंतस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यांणीं राजमान्य राजश्री बाळाजी जनार्दन यांस आज्ञा केली जे, राजश्री येसाजी राम व रामचंद्र नारायण व दादाजी त्रिंबक यांजकडील गांवें हुजूर सरकारांत यावयाचा करार पेशजी नारायणराव पंडित यांचे वेळेस जाहला असतां अद्यापि सरकारांत येत नाहीं. येविशीं वेदशास्त्र संपन्न राजश्री महादेव शास्त्री फोंडेकर व अप्पाजी शामजी यांसि आज्ञा जाहली आहे. यांसि त्रिवर्ग रेटाईचा जाबसाल करितात. हुजूर जाऊन अर्ज करूं ऐसें बोलतात. म्हणोन हुजूर विदित जाहलें. तुमचे विद्यमानें करार असतां अद्यापि सरकारचे करारापैकीं त्रिवर्गाकडील व पुण्यशील आवुबाई कडील गांवें येत नाहींत याचा अर्थ काय ? राजश्री नागो शामजी हुजूर विनंती करितात जे, राजश्री रामचंद्र महादेव यांच्या कर्जाचा फडशा जाहला पाहिजे. त्यास रामचंद्र महादेव यांचा फडशाचा मात्र गुंता सरकारांतून राहिला आहे. रामचंद्र महादेव यांणीं सरकारचे तालुके अडथळून ठेऊन तालुकेंतील त्याजकडील व आऊबाईच्या वगैरे यांचे मतलबांत शिरोन बखेडा करावयाचें कारण काय ? सावकारी जो जाबसाल वाजवी असेल तो तुमचे विद्यमानें होत असतां बखेडा करणें हें उत्तम नसे. याचे बंदोबस्ताविशीं ताकीद करून आऊबाईकडे अथवा हर कोणाकडे सरकार तालुकेंतील कुमक न जावीशी करावी. मिरजकर यांणीं बावडेकर व सेनापति व शेषो नारायण व रामचंद्र भगवंत सर्वत्र कुमक पाठवणार, त्यास सर्वत्रांस ताकीद करावी जे, आऊबाईकडे कुमकी लोक परिछिन्न पाठऊं नये. ये विशी

व शेषो नारायण व रामचंद्र भगवंत यांजकडून कुमक गेल्यास यांचें पारपत्य होईल. व येसाजी राम व रामचंद्र नारायण यांजकडील ही कुमक जाऊं नये. ये विशींची ताकीद तुम्हीं केलीच आहे. इतके उपरि पाठवितील तरि जिकडून उपराळा होईल तिकडे त्यांची खराबी होईल. येविशीं तुम्हांस अनेक प्रकारें समजावितील. तन्मूलें तुमची विनंती पत्रें येतील, यास्तव स्वामींनीं अगोदर आज्ञा केली असे. सर्वत्रांस ताकीद करावी. त्रिवर्गाकडील वगैरा करारापैकीं गांवांविशीं उभयतां मशारनिले यांसि आज्ञापत्रें सादर जाहलीं आहेत त्याप्रमाणें निकड करितील. ते सरकारांत हुजूर अर्ज करूं ऐसें बोलतील. तरि त्यांची रदबदली चालणार नाहीं. आज्ञेप्रमाणें गांवें व वसूल करारा तागाईत देवावी येविशीं तुम्हीं ताकीद निक्षून केली पाहिजे. करारांत लढा राहूं नये. निभावणी जाहाली न जाहाली हें तुम्हांस न समजेसें काय आहे ? वारंवार ये विशीं सरकारचीं आज्ञापत्रें सादर असतां करारापैकीं गांवें व हारामखोर येत नाहींत हें उत्तम नसे. जाणिजे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

मर्यादेयंविराजते

पै॥ छ २८ सवाल मार्गशीर्ष मास.

ले. २३५ [४६५]

श. १६९७ ता मे १७७५

श्री.

नर्मदा तीराहून गुजराथप्रांतें फौजासहवर्तमान तुम्ही गेल्यास किती दिवस जाले ? मनसबा लांबणीस न पडावा या अर्थें जलदी करून त्याचे प्रेत्न करण्याची हद्द पोंहचवून आपलें करणें शेवटास लौकरीच न्याल हें घडावेंच. असें दृष्टोत्पत्तीत येत गेलें असतां निष्कारण दिवसगतीबर मनसुबा पडत चालला, त्वरा करून मसलत शेवटास लावण्याविशीं वरचेवर लिहिण्यांत येत गेलें. परंतु निदर्शनास न ये. यावरून सर्वांचा एक विचार होऊन कजाखी होत नाहीं असें दिसोन येतें. परंतु असें नसावें. ज्या कामांत तुम्हांसारिखे कृतकर्मे त्या कार्यास हे दिवस प्राप्त व्हावेसे नाहींत. या मागें या राज्यांत प्रसंग मोठे मोठे प्राप्त जाले तेथें तुम्हीं लोकींच जिवाभ्य श्रमें करून यशच संपादिलेंत. त्या पेक्षां सांप्रतची मसलत अधिक आहे ऐसा प्रकार नाहीं. इंग्रजांचें सहाय करून ते मनसुबा करूं इच्छितात, येविशींचा परिणाम कळतच आहे. परंतु अतःपर तुम्ही सर्वांनीं एक विचार करून हे मसलत लांबणीस पडल्यास सर्व प्रकारें हिंदुस्थान वगैरे जागांच्या बंदोबस्तास अंतर पडून जागां जागां लहानसहान शत्रु अमर्याद वर्तूं लागतील, त्यांचें पारपत्य करणें तेंही संकटच पडेल, या अर्थें या मागें शत्रूच्या पराभवार्थ तुम्हीं लोकीं कजाख्या व मेहनती केल्या आहेत त्याप्रमाणें या समयींही कराव्या; आणि मनसुबा अविलंबें शेवटास न्यावा. अखेरीचे दिवस, त्या प्रांतें छावणी न पडावी, मसलत

लौकर निर्गमांत होऊन सर्वांचें येणें देशीं घडावें, असें जालें पाहिजे. याजकरितां रात्र दिवस न म्हणतां जेणें करून त्यांजवर आपली जरब पडोन यश प्राप्त होय ते गोष्टी करावी.*

ले. २३६ [४८०] } (मुंबईवाल्यास पत्र पाठविलें त्याचा मसुदा) (छ १० जमादिलाखर श्रावण सतिसबैन) } श.१६९७ श्रावण शु. ५ ता ८-८-१७७५

श्री

दरीविला रफआंत व अवाली, मजल्त येतीजाद दोस्तां मेस्तर होष्टैन यमादु दौल्ले जलादत-जंग बहादूर यांचीं दोन पत्रें एक छ ७ रविलाखर व दुसरें छ ९ रबिलाखरचीं अमारत व अयालत मरतबत मदारूल मोहाम सखाराम पंडित यांचे नांवें बंगालियाहून आलीं, त्यांची नक्कल दोन्ही खतांची मजमून एकच आहे, त्याप्रमाणें नक्कल करून पाठविली असे. अलबतामा ई ज इ बालेले याचा नविस्ता आं अवाली पनाहास ही आलाच असेल. त्यांच्या नविस्त्या वरोन आम्ही आपल्या सरदारांस तुम्ही आपले फौजेचा बंदोबस्त केलाच असेल. ख तु तें पाठविलें कीं, तुम्ही होऊन इंग्रजांशीं लढाईचा मुकदमा दरपेश न आणणें व बंगालियाचे पत्राचें उत्तर पाठविलें असे. या मजकुराचा इतला आं अवालीपनाहास व्हावा म्हणून कलमी केलें असे. आमचे सरदार गुजराथ प्रांतें वगैरे सरकार अमली अमल मात्र बसवितील. लढाईचा मजकूर आपल्याकडून हरगीज करणार नाहींत. पुढें इरादा आं अवाली-पन्हाचा काय असेल तो लिहून पाठवावा. त्या प्रमाणें इकडूनही अमलांत येईल.

ले. २३७ [४२५ } श. १६९८ माघ व १२ ता ६-३-१७७७

श्री

राव अज्जम यशवंतराव शिंदे सर सुभेदार दाम मोहबतहू

मोहबत व मुबदत पन्हाह खुलत व मालात दस्तगाह बाद आअज इस्तियाक फिरावा मशहूद आंके येथील खुषी जाणून आपली शादमानी हमेशा कलमी करीत आला पाहिजे. दरिविला खत पाठविलें तें पावलें. मजमून मालूम जाहला. अज्जम बहिरजी नाईक गाईक वाड व बाळाजी विठ्ठल यांस पाठविले आहेत. फौजेच्या खर्चाबद्दल ऐवज पाठवावा व आम्हींही कूच करून त्या जिल्ह्यास यावें असें कलमी केलें होतें. तरी पेशजी एथून भारी फौज बंकापूर त्या जिल्ह्यास रवाना करून पाठविलें असतां बाराभाई यांजकडील पांडुरंग षकी वगैरे फौजेसुद्दां साळसी वरी येऊन नमूद जहाले. याकरितां लढाई होऊन बाराभाई यांच्या फौजा तमाम गारद होऊन पांडुरंग† षकी बगैरे नासरदार पाडाव जहाल्याचा

---

* हा महादजी शिंदे व तुकोजी होळकर यांस लिहावयाच्या पत्राचा मसूदा असावा असें वाटतें.

† पांडुरंग गोविंद पटवर्धन हे हैदराकडे पाडाव सांपडले होते. पत्र मुंबईकर इंग्रजांचें कोल्हापूरचे कारभाऱ्यास.

मजकूर आपणासही मालूम जहाला असेल. हल्लीं ही येथून भारी फौज रवाना करून पाठविली असे. आम्हींही निघावयाची तयारी करविली होती. मोहरमचा अषुरा नजदीक पोंहचला याकरितां तहकुब जहालों. इनशाह आल्ला हुता. आदवा आदज अषुरा कूच करून अनकरीब त्या जिल्ह्यास येत असों. आपणाकडून आलेले बहीरजी गायवाड व बाळाजी विठ्ठल बंकापुरास बाजीराव बर्वे कडेस येऊन पोंचले. एथून ऐवज पाठवावा तरी ऐवज घेऊन जावयास तेथून इतबारी मजाम रहाबाट जाणणारे दोनशें सवारांस बंकापुरास पाठवून द्यावें म्हणजे त्याच सवारांबराबर ऐवज देऊन आपणाकडे पाठवीत असों. आपण तेथें भारी फौजेचा जमाव करून तिकडे बाराभाई यांच्या फौजेस खूब तंबीह करीत जावें आणि तिकडील मुलूकही मारून खंडण्याही करीत असावें. इतक्यांत आम्हीही भारी फौजेसुद्धां अनकरीब येत असों. हमेषा आपली षादमानी कलमी करीत यावें. ज्यादा लिहिणें काय हा—

पैवस्ती छ २५ माहे मोहरम सुरुसन सब्बा सब्बैन मया व अलफ सन ११८६ फसली (सन १७७६ इसवी.) मुकाम करवीर.

ले. २३८
[४२४]

{श. १६९८ माघ व. १२
ता ६-३-१७७७

श्री

महाराज बुलंद दरजे शिवाजी राजे छत्रपती हमखैरखषवक्त व कामयाबाबषंद. उब्बहत व शौकत पन्हाह एकबल व इजलाल दस्तगाह कुंद वैराजहाय समूळ अलमकाज बाआंदज इजदर इस्तियाक फिरावांमषौध आंकी. येथील खुषी जाणून आपलीषादमानी हमेषा कलमी करीत यावें. दरिविला खत मसतर नमत पाठविलें तें पोंहचून मजमून मालूम जहाला. अज्जम बहीरजी नाईक गायकवाड व बाळाजी विठ्ठल यांस पाठविले आहेत फौजेच्या खर्चाबद्दल ऐवज पाठवावा. आम्हीही कूच करून त्या जिल्ह्यास यावें असें कलम असतां बाराभाई यांजकडील पांडुरंग षकी वगैरे फौज सुद्धां साळसीवरी येऊन नमूद जाहले. याजकरितां लढाई होऊन बाराभाई यांची फौज गारत होऊन पांडुरंग षकी वगैरे नासरदार पाडाव आलेला मजकूर आपणासही मालूम जहाला असेल. हल्लींही येथून भारी फौज रवाना करून पाठविली असे. आम्हीही निघावयाची तयारी करविली होती. मोहरमचा अषुरा नजदीक पोंहचला याजकरितां तहकूब जहाली. इनशा अल्ला हुता. आकब आंदाज अषुरा कूच करून अनकरीब त्या जिल्ह्यास येत असों. आपणाकडून आले बहिरजी गायकवाड व बाळाजी विठ्ठल बंकापुरास बाजीराव बरवे कडेस येऊन पोंहचले. एथून ऐवज आपणाकडे पाठवावा तरी ऐवज घेऊन जाण्याबद्दल तेथून इतबारी मजाम रहावाट जाणणार दोन तीनशें स्वारांस बंकापुरास पाठवून द्यावें म्हणजे त्याच सवारांबराबर ऐवज देऊन आपणाकडेस पाठवीत असों. आपण तेथें भारी फौजेचा जमाव करून बाराभाई यांच्या फौजेस खूब तंबीह करीत जावें आणि तिकडीलही मारून खंडण्याही करीत जावें इतक्यांत आम्हीही

भारी फौज व भारी तोफखाना सुद्धां अनकरीब येत असों. हमेषा आपली शादमानी कलमी करीत यावें. ज्यादा लिहिणें काय असे. हे कितावत.....

पैवस्ती छ २५ माहे मोहरम सुरुसन सब्बा सब्बैन मय्या व अलफ. (सन ११८६ फसली इसवी सन १७७६ मुकाम पन्हाळा.

ले. २३९ [४७७.] श. १६९८ माघ ३०. ता ९-३-१७७७

(पौ छ ५ सफर सुाासन सवां)

श्री.

पुा राजश्री महादाजी प्रभु गोसावी यांसि—

उपरि मुंबैकडील बातमी वर्तमान पेशजी लेहून गेलें आहे. याजवरून कळलेंच असेल. सांप्रत राजश्री आबाजी महादेव दवणेहून मुंबईस येऊन गडबड फारच मांडली आहे. फिरंगी तरांडी कांहीं मुंबईचे बंदरांत आलीं. आणखी चार पांच हजार गाडदी व इंग्रज तरांडियावर सामान सरंजाम मबलग चढवायास लागला आहे. म्हणोन सावकारी बातमी आहे. येथोन कोण्ही तथ्य बातमीस पाठवून बातमी आणावी त्यास इकडील माणूस एकंदर बंदरांत घेत नाहीं. आणि परस्पर वर्तमान याप्रमाणें येतें. तेव्हां कोण्हे समयीं कोठें तोंड टाकील हें न कळे. टोपीकरांचा विश्वास नाहीं. त्यांत त्यांचे चित्तांतील गुबार फुटत नाहीं. यास्तव आपले जागां फार सावध असलें पाहिजे. याजकरितां राजश्री बापूराव व राजश्री नाना फडणवीस यांचे कर्णारूढ करून उभयतां × × × ÷ पत्र राजश्री भीवराम पानसी व राजश्री विसाजीपंत बाबा यांस घेऊन पाठवावीं. त्यांत मजकूर इंग्रजानें कांहीं दुर्बुद्धि धरून कुलाबा तर्फेस गडबड गेली तरि तुम्ही फौज सुद्धां बिलाशक जाऊन सरखेलीस सामील होणें. तुम्हांस बातमी न लागली आणि सरखेल कडून तुम्हांस सूचना जहाली तरि येक घडीचा अवकाश न धरितां स्वार होऊन जाऊन कुमक करणें. व धुळपास पत्र कीं, जंजिरे खांदेरीस इंग्रज जाणार म्हणोन बातमी आहे. त्यास तुम्हांस बातमी लागतांच जंजिरे मजकुरीं आरमार सुद्धां जाऊन सामील व्हावें. अथवा सरखेलचें पत्र जाऊन पावतांच निघोन जावें. कदाचित वारें बादळाचे सबबेनें आरमार जाऊन न पोंहचे तरि आरमार विजयदुर्गाचे खाडींत रवाना करून तुम्हीं खुषकीनें फौज सुद्धां जंजिरे कुलाबा जाऊन कुमक करणें. याजप्रमाणें पत्रें जलद घेऊन पाठवावीं. व अवांतर तालुके तालुक्यास सदर्हू अन्वयें पत्रें घेऊन रवाना करावीं. व पेशजीचे लिहिले प्रमाणें पत्रें आलीं म्हणजे इंग्रजाचे बोलीचें तोंड पडोन त्यांच्या चित्तांतील भावगर्भ समेजल. याजकरितां पेशजीचे व हल्लींचे लिहिले प्रमाणें पत्रें घेऊन पाठवावीं. हे कामास दिसगतीवर घालवितां नये. अवांतर तालुकियास पत्रें न घ्यावीं. पानसी व विसाजपिंत बाबा व धुळप यांस पत्रें असावीं. व राजश्री बाळाजीराम ओक याजबराबर बातमी पत्र लिहिलें आहे त्याप्रमाणें मुरबियांस

निवेदन करून उत्तर घेऊन पाठवावें. खाना छ २८ मोहरम सु॥ सन सबा सबैन. बहुत काय लिहिणें. मोर्तब सूद.

ले. २४०
[१२६]

श. १६९९ चैत्र शु १५.
ता. २२-४-१७७७

श्री.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री गणेश विश्वनाथ गोसावी यांसि-

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ सबांसबैन मयावअलफ-तुम्ही विनंतीपत्र पाठविलें तें पावलें. राजश्री फत्तेसिंग गाईकवाड आमदाबादेस मोचें लाऊन शहरावर गोळे टाकितात. व सरकारचे महालांत उपद्रव करितात. त्यास येविशीं त्यांस सांगोन पाठविलें असतां ऐकत नाहीं. तेव्हां आम्ही आमदाबादेस येऊन मग तुमचे आमचे विचारें करणें तें करूं, म्हणून त्यास लेहून पाठऊन फौज सुद्धां बडोयानजीक गेला. तों त्याणीं उत्तर पाठविलें कीं, महीं उतरून आलीकडे आल्यास तुमची आमची कटकट होईल. म्हणून लिहिलें व आमदाबादेस जाण्याविशीं आज्ञा आली यावरून त्याणीं दोन तीन घाटाची बंदोबस्ती केली. परंतु मार्ग फुटेल तिकडून आज्ञेप्रमाणें जातच आहों. तेथें गेल्यावर आप्पाजी गणेश व आम्ही मिळोन त्यास दोन गोष्टी विचाराच्या सांगूं. आयकिलियास उत्तम, न आयकत तरि बनेल तसें करूं. परंतु त्यांची नजर आमदाबाद घ्यावी अशी आहे. त्याजकरितां धारेकडील फौज पंवार वगैरे यासि आमदाबादेस जाण्याविशीं आज्ञा व्हावी. व सुरत अठ्ठाविशीचे महाल जप्त करावे लागतील. तिकडे सोनगडास दीड हजार फौज आहे. आणखी राजश्री भिवराव येशवंत याणीं फौज सुद्धां येऊन त्याणीं व यांणीं एकत्र होऊन काम करावें म्हणजे फत्तेसिंग ताब्यावर येतील. फार भरीं भरले आहेत. याजकरितां तरतूद लौकर जाल्यानें बंदोबस्त होईल. म्हणून तुम्हीं लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐशियासि तुम्हास आमदाबादेस जाण्याविशीं आज्ञा जाली आहे. त्याप्रमाणें जाऊन दाखल होणें. त्याणीं दोन तीन घाट बंद केले तरी जाण्यास बाटा बहुत आहेत. चिंता नाहीं. तुम्ही अमदाबादेस पोंहोचल्यावर फत्तेसिंग आयकतील. न च आयकत तरि तुम्ही व अप्पाजी गणेश व राजश्री गोविंदराव खंडेराव सर्व एकत्र जाल्यावर दुसरी फौज नलगे. इतके येकत्र असतां आमदाबादेचें त्यांच्यानें काय व्हावयाचें कळतच आहे. दुसरा मजकूर सुरत अठ्ठाविशींत फौज या दिवशीं पाठवावयाची सोय नाहीं. लावणीचे दिवस. पुढें श्रावणमासापासून पाठवावयाची तजवीज केल्यानें पोटास मिळेल व शहही बसेल. या करितां तूर्त तिकडे फौज जाण्याचा उपयोग नाहीं. राजश्री अंताजी नागेश येथें आले आहेत. जाबसालांत येईल तसें तुम्हांस लिहिलें जाईल. तुम्ही लिहिल्याप्रमाणें आमदाबादेस जाऊन दाखल होणें. राजश्री रघुपतराव नारायण यांजकडील फौज तुम्हाकडे आहे. त्याचे खर्चाची बेगमी त्याजकडून होत नाहीं

---

१ बेहेरे

म्हणून तुम्हीं लिहिलें, त्याजवरून येविशीं त्यांस आलाहिदा पत्र सादर केलें आहे. ते आपले फौजेचे खर्चाची बेगमी वरचेवर करीत जातील. तुम्हीं आमदाबादेहून खर्चास यावयाविशीं रा। आप्पाजी गणेश यास त्याहावें म्हणोन लि॥ त्याजवरून खर्चास फौजेस यावयाविशीं म॥रनिलेस लिहिलें आहे, त्या प्रा॥ खर्चास देतील व संस्थान मांडवी येथील भगवंतसिंग दिवंगत जाहाले याजकरितां राणीनें संस्थानावर गुमानसिंग दत्त पुत्र घेऊन बसविले. त्याप्रमाणें त्यांची स्थापना सरकारांतून करार करून त्यांजकडे नजरेचा ऐवज करार केला. त्याप्रमाणें तूर्त पंधरा हजार रुपये तुम्हांकडे देववितो असत. घ्यावे. जाणिजे. छ १३ रा॥वर बहुत काय लिहिणें

पौ। छ २४ रबीलावर मु॥ डभई. मोर्तबसूद.

ले. २४१ [९१] } {श. १६९९ वैशाख व. १० ता १–६–१७७७

श्री

राजश्री त्रिंबकराव दाभाडे* सेनापती गोसांवी यांसिः—

छ अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य स्ने॥ गोविंदराव नारायण आशीरवाद छ २४ रा॥खर पावेतों आपले कृपावलोकनें करून क्षेम असें. विशेष. इकडील मजकूर त॥ वैशाख व॥ ३ पावेतों यथास्थित असों विशेष. राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादर यांणीं सरकारची ताकीद पत्रें गकाराविशीं व शहरचे दखलीविशीं आणलीं त्याचा म॥र पेशजी लि॥ आहे. हल्लीं पत्राच्या नकला करून पा॥ आहेत. यासि उत्तर केलें कीं, गकारास बहादर येथील अधिकारी यांणीं प्रथम देऊन शहरांत घेतलें होतें. येविशींचीं पत्रें पूर्वी सरकारांत गेलीं होतीं तें तुम्ही जाणतच आहां. त्या अन्वयावरून कार्तिक माशीं तुमचा आमचा तह ठरला. तेसमयीं यादींत कलम लिहिलें आहे कीं, शहरांत राहतील तों पावेतों बाहेर उपसर्ग होऊं न यावा. बाहेर गेले तर शहरांत न घ्यावें. त्याप्रमाणें घडलें असतां शब्द लावावा ऐसें नाहीं. शहरचे आमलाचे दखल म॥र काठेवाड व बरमगांवचे मामलतीचे इजारी यांचे बाकीचा ऐवज सवा लक्ष राहिला आहे तो घ्यावा आणि येथें कारकून राहील त्याणें सीबंदीचा दरमहाचा ऐवज सहा हजार देत जावा. शहरांत बखेडा हरएकाविशीं न

+ त्रिंबकराव दाभाडे दमाजी गायकवाडाच्या हयातींत बारला, तेव्हां फत्तेसिंगास सेनाखासखेली नव्हती. या पत्राचा लेखक कोण ? उलगडा झाला पाहिजे. पहा दाभाडे बखर. गकार कोण ?

करावा. सुदामतप्रमाणें चालावें. येविशींची खातरी करावी. म्हणजे सरकार आज्ञेप्रों दखल देऊं. गुंता नाहीं. परंतु त्यास काठेवाडचा ऐवज देणें नाहीं. आणि दखल घेणें त्यावरून राजश्री गोविंदराव फौजसुद्धां वाडेकमाडेस मुक्कामास आले आहेत. दस्तूरचीं गावें सहजांत फौजेचे मुक्कामानें खराब होत आहेत. उपाय काय येविशींची विनंती सरकारांत करून उत्तर लौकर पाठवावें. त्याप्रों वर्तणूक करूं. सरकारांतून निक्षून ताकीद यांचे वकील तेथें आहेत त्यांस करवावी कीं, काठेवाड झालेवाडचा ऐवज याची व शहरीं राहील त्याणें दरसाहा द्यावा, सुरळीत चालावें. याची निशा करून दखल घ्यावा म्हणजे वकीलांचीं पत्रें परभारें येतील. व येथें सरकारचीं पाठवावीं म्हणजे देऊन जाबसाल करूं. त्यासही समजलें आहे कीं, ऐवजाची निशा जाल्याखेरीज दखल होणार नाहीं. परंतु पत्रें पाठवून खुलासा पहातात आज पत्रें आलीं कीं, रा॥ चिंतो रणसोड बोधनी यांजकडे शहरची मामलत सांगितली. शहर व दस्तुरचा दखल द्यावा, कारकून मा॥र निल्हे कडील पत्र घेऊन आला त्याशीं बोलणें याच अन्वयें जालें. आज उत्तरें घेऊन लष्करांत जाईल. लष्कर कासिंद्रे पालडीजवळ आहे. याउपरि घडे तें लिहून पाठवूं. येथें कोणीं मामलेदार असतात. सर्वांशीं वाईट बरें कशास बोलावें लागतें मामलेदार येणार तो ज्येष्ठ मास पावेतों यावा. आश्वीन मासीं आल्यास पांच महिने शिबंदीचे चालणार नाहीं, गवगवा पडेल. पुढील. सालीं रसद कोणी देणार नाहीं. यास्तव लौकर आल्यानें ठीक आहे. माहल विल्हेस लावून चालविले. हे आशीरवाद..

ले. २४२] [१५९]

{श. १६९९ मार्ग. शु. २ ता॥ २-१२-१७७७

श्री

अखंडित लक्षुमी अलंकृत राजमान्य राजश्री जिवाजी रघुनाथ गोसावी यांसि—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ समान सबैन मया व अलफ, राजश्री बाबूराव केशव मजमदार पे॥ सिंदखेड यांणीं हुजूर विदित केलें कीं, रा॥ मल्हारराव रामकृष्ण याजकडे पे॥ मा॥ची मामलत सन खमसांत होती. त्या वेळच्या आमच्या वेतनाचें वगैरे ब्याज सुद्धां रुपये ४५० साडेचारशें येणें आहेत ते मागतों. परंतु देत नाहीं. त्यास हल्लीं सरकारांतून मल्हारराव रामकृष्ण यांस रद्द कर्जाच्या ऐवजीं वरात बाबती नांदेड येथें दिल्ही आहे. त्यापैकीं देवावे म्हणून त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरि मशारनिलेचा वेतनाबाबत वगैरे बाकी असेल तो वाजवीचे रुईनें वजा करून सदर्हू ऐवज पै॥ घेणें. ऐवज मशारनिलेस देणें. जाणिजे. छ १ जिलकाद आज्ञाप्रमाण. सेखनसीमा.

ले. २४३ }
[४४६] }

{ श. १७०० पौष शु. ८
{ ता। २७-१२-१७७८

श्री

छ. ५ जिल्हेज तिस्सा सबैन मयां व अल्फ ११८८ फसली पौष शुद्ध ७ शनवार शके १७०० विलंबी नाम संवत्सरे. ता० २७ दिजेंबर सन १८१८ इ.

मल्हार बल्लाळ भडभडे.
नारो अनंत परचुरे.
नाना फडणवीस

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री बाबुराव कृष्ण गोसावी यांस

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ तिसा सबैन मया व अल्फ. श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामी यांजकडून शिकें कटार व वस्त्रे आलीं त्यांजबरोबर निशाणाचा पटका व ढाल—तरवार व पड्दळें यावें तें न आलें येविशीं राजश्री कृष्णराव अनंत यांसही पत्र लिहिलें असे; तरी राजश्रीस विनंती करून निशाणाचा पटका व ढाल-तरवार व पड्दळें लौकर पाठवून देणें. निशाण यावयाचा सांप्रदाय असल्यास निशाण तयार करून पाठविणें. पटका न पाठविणें. पेशवाईचीं वस्त्रें देते समयींच हें देत असतात असें असतां कां राहिलें ? या उपर चांगला मुहूर्त पाहून घेऊन पाठो. जाणिजे छ ५ जिल्हेज. आज्ञाप्रमाण. लेखन सीमा.

ले. २४४ }
[२३०] }

{ आषाढ बा। ८ श. १७०१
{ ता। ७—७—१७७९

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि हैदरखानाकडील एक कारकून व पांच सात जोडथा हरकाऱ्यांच्या राजश्री पाटीलबावांकडे जाण्याकरितां आल्या आहेत. त्यांणीं तेथें जाऊन हैदरखानाकडे यातमी वरचेवर लिहून पाठवीत जावी याकरितां हैदरखानानें पाठविलें. त्यांणीं दस्तक येथील मागितलें तेंही दिलें. तो कारकून व हरकारे पाटीलबावांच्या लष्करांत येतील, राहुटीराहुटीस घरोघर फिरतील, कोण काय बोलतो, मसलत वशी हें सविस्तर पाहून व बारीक शोध करून वरचेवर बातमी लिहून कळवितील, याकरितां त्यांचा बंदोबस्त असावा. तेथील दरबारची रीत तुम्हांस माहित आहेच. ज्यानें जसें पाहिजे तसें बोलावें. बाहेरल्यास याचा अर्थ आंतील काय समजतो ? बातमीदाराच्या लिहिल्यावरून हैदरखान भलतेच तर्क काढतील. याकरितां उत्तम पक्ष तर कारकून व हरकाऱ्यांस एक जागा नेमून द्यावी आणि ताकीद करावी कीं, शिधापाणी मात्र बाजारांतून आणित जावें, वरकड कोणी कोठें जाऊं नये, फिरूं नये, दरबारास बोलावूं पाठवावें तेव्हां कारकुनानें येत जावें, तेही खांशाशीं अथवा भाईशीं बोलत जावें. याप्रमाणें करून पांच सात माणसें त्यां जवळ इतबारी ठेवावीं त्यांणीं याप्रमाणें राखीत

जावें हें उत्तम. अथवा, आपल्या दरबारचाच सारा बंदोबस्त चांगला करून रहातील तेथें राहूत, जातील तेथें जाऊत हा एक पक्ष, परंतु हा पक्ष घडावयाचा नाहीं. वर लिहिला हा पक्ष घडावा. याप्रमाणें राजश्री पाटीलबाबांस सूचना करावी. येथें हैदरखानाचे वकील आहेत यांशीं पाटीलबावाकडील दाव व मसलतीची अंगेजणीं व एकत्व हेंच भाव बोलण्यांत येतात. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. येथील दुसरा अर्थच नाहीं, तेथें ही लिहिल्या अन्वयें करावें. छ २२ जमादिलाखर हे विनंति पौ छ १२ रजब सुरुसन समानीन मुक्काम वा॥ पंचावली सडी स्वारी.

ले. २४५ [९०] | श. १७०१ अधिक श्रावण व. ता॥ ५-८-१७७९

श्री

राजश्रियाविराजीत राजमान्य राजश्री कृष्णराव बळवंतराव स्वामी गोसावी यांसि--

पो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष.—भुजापा शिराळकर वाणी वा॥ मौजे कुरडु पें॥——यांणीं मौजे मा॥रची कमावीस रा॥ जगपतराव निंबाळकर यांजकडून केली होती, त्यास वाणी मा॥रानें कांहीं अन्याय केला स॥ त्याजला न्यावयाबद्दल भागानगराहून नबाबाकडून सजावल आले. त्यास वाणी म॥र मौजे मजकुराहून पळोन जाऊन क॥ केम येथें राहिला आहे, म्हणोन हुजूर विदित जाहालें. त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरि तुम्ही आपले कडील का॥दारांस ताकीद करून क॥म॥री सजावल येतील त्यांचे स्वाधीन वाणी म॥स करून कबज घेणें. जाणिजे. छ २२ रजब सु॥ समानीन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हें विनंती.

ले. २४६ [४२८] | श. १७०१ भाद्रपद व.८ ता॥ ३-१०-१७७९

श्री.

सन ११८९ फसलो. सन १७७९ इ०. तालीक. फेरिस्त नं ९

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामींचे सेवेशी.

बाळाजी बाजीराव व सदाशिव चिमणाजी यांणीं लिहून दिला करारनामा ऐसाजे सन इहिदे आर्बैन रौद्रीनामसंवत्सरे.

साताऱ्यास तर्थिस्वरूप शाहू महाराज राज्य करीत होते त्याजमुळें वारणेचा तह जहाला होता त्यासि तर्थिस्वरूप शाहू महाराज यांणीं कैलासवास केला त्यांच्या पोटीं संतान नाहीं तेव्हां तें राज्य स्वामींचें आणि एकछत्री शिक्का महाराजांचा चालावा.

शाहू महाराज असते समयीं किल्ले साताऱ्याच्या मुक्कामीं सेवकांनीं विनंती केली होती जे, शाहू महाराज यांचा जीवात्मा आहे तों बाह्यात्कारी त्यांचे, सेवक अंतर्यामीं स्वामींचे.

शाहू महाराज यांणीं कैलासवास केल्यावर दोहीं राज्यांवर स्वामींची आणि आम्ही सेवक स्वामींचे, स्वामींच्या आज्ञे प्रमाणें वर्तणूक करूं अशी शफत दिली होती, त्याच प्रमाणें दोन्ही राज्यें एक करून एकछत्री स्वामींचा शिक्का चालावा आणि आम्ही **शाहू** महाराज यांचे कारकीर्दी प्रमाणें सेवा करून असावें हें प्रमाण. यासि अंतर करणार नाहीं.... कलम १

वारणे आलीकडे **तुं**गभद्रा पावेतों खाजगी प्रांत करून महाराजांस द्यावा.

वारणे पासून **तुं**गभद्रे पावेतों गड, कोट, किल्ले, ठाणीं दरोबस्त खासगीस करून देऊं.

साताऱ्यास राजधानीचा खर्च व खासगी खर्चास सरंजाम महाराजांकडे द्यावा.

शाहू महाराज यांच्या कारकीर्दी प्रमाणें देऊन वर्तणूक करूं.

स्वामींच्या संनिध लहान मोठे सेवक सेवा करून होते त्यांस त्यांच्या योग्यते-प्रमाणें चालवावें.

योग्यतेनुरूप स्वामींच्या आज्ञे प्रमाणें चालवूं.

हुजूरच्या सनदेनें लोकांस गांव इनाम व वतनें दिलीं तीं चालवावीं अंतर करूं नये.

स्वामींनीं कृपाळू होऊन ज्यांस इनाम गांव व वतनें जीं दिलीं असतील तीं आज्ञे प्रमाणें चालवूं.

संस्थान **बि**दनूर व **सों**धें व अंतरूज व **सा**वनूर येथील चवथाई व तोफेचा ऐवज सरकारांत यावा.

पावत आल्या प्रमाणें ऐवज पावता होईल आणि स्वामींच्या आज्ञे प्रमाणें निर्वेधपणें होईं तसें करूं.

स्वामींत व तुम्हांत किमपि पडदा नसावा. स्वामींनीं जें केलें तें तुम्हीं परिणामास नेऊन स्वामींच्या लक्षानुरूप चालून प्रांजळ रीतीनें स्वामींच्या सेवेसीं सादर असावें.

स्वामींची सेवा एकनिष्ठेनें करून स्वामी आज्ञा करतील तदनरूप आज्ञे प्रमाणें मनोदयानुरूप वर्तणूक करूं. स्वामीचरणीं द्वैतभाव किमपि न धरूं.

शिंदे, **न**रगुंदे व पतकें पूर्वी हुजूर पागेचे सरदार सरंजाम सुद्धां पूर्ववत प्रमाणें स्वामींच्या हुजुरातीस सेवा त्यांणीं करावी. त्यांच्या सरंजामाचा व पागेचा फडशा हुजूर होणें तो होत असावा.

स्वामींच्या आज्ञे प्रमाणें त्यांचे हातून वर्तणूक होय ऐशी करून देऊं. आज्ञे प्रमाणें त्यांच्या हातून वर्तणूक न होय तरि त्यांजकडील सरंजाम गड, कोट, किल्ले, ठाणीं सरकारांत घेऊन देऊं.

सरदेशमुखी व बाजे वतनें जीं सरकार तालुक्यास आहेत तीं सरकारांत असावीं.

शाहूमहाराजांच्या कारकीर्दी प्रमाणें सरकारांत चालवूं.

स्वामींकडे किल्ले हुजुरातीस आहेत त्यांचे सरंजाम पूर्वील वहिवाटी प्रमाणें किल्यांच्या तनख्यास किल्याकडे सुधामत चालावे.

पूर्वील भोगवट्या प्रमाणें निर्वेध चालवूं.

सरदेश कुळकर्णाचे व इनामगांव चालवावे.

आज्ञे प्रमाणें चालवूं.

आंगरे कडील किल्ले व जंजिरे व भुईकोट व पंचमहाल **ज**यगडापर्यंत सरकारांत यावे.

आज्ञे प्रमाणें **आं**गरे कडील किल्ले व जंजिरे व भुईकोट पंचमहाल **ज**यगडा पर्यंत दरोबस्त मुलूक घेऊन स्वामींकडे देऊं.

एकूण कलमें बारा असत. हनरावल कंपनीच्या तर्फेनें मिस्तर राबर्ट इनशा आला

त्याणें विनंति केली त्याजवरून जनरल व कौन्सिलाची खातरजमा पटावी याजबद्दल अस्सल तहनामा किल्ले तक्त पन्हाळ्यास आहेत त्याजवरून बजिन्नस नक्कल शिक्यानिशीं करून दिली असे. सुरुसन समानीन मय्या व अलफ छ २२ माहे रमजान(सन १७७९ इसवी.) गुजारत दादाजी यादव निसबत इनशा.*

ले. २४७ [४८३] | श. १७०१ अधिक शु. १२ ता २२-१०-१७७९

श्री.

रवाना छ ९ सवाल सन समानीन.

सरकारचा व तुमचा तहाचा ठराव महादजीराव शिंदे व रावरास्ते व कृष्णराव बल्लाळ यांचे मार्फत नरसिंगराव तुम्हांकडील वकील यांसि बोलोन जाला. त्याची याद करार करून आहाद शर्तीनशीं कृष्णराव नारायण व शिंदे यांजकडील गृहस्थ व रावरास्ते यांजकडील गोविंद नारायण व गणेश केशव यांजबराबर पाठविली आहे. कराराप्रमाणें तुम्हांकडून निभावणींत यावें. सरकारांतूनही करारबमोजीव अमलांत येईल म्हणोन हैदर अलीखां बहादूर यांस सरकारचें पत्र. सरकारचा तुमचा सलुख जाला. इतःपर दुसरा विचार नाहीं.[पहा तह व करारमदार पृ. ८५]

ले. २४८ [४६९] | मार्गशीर्ष श. १७०१ डिसेंबर १७७९.

श्री.

बातशाही मुलुख बंगाला इंग्रजांनीं आपले तशरूफांत आणिला आहे. त्यास तो मुलुख बुशाद व मैदान, वसाहत मोठी, त्या प्रांतीं भोंसले यांणीं पंचवीस हजार फौजेनशीं जाऊन मुलुख मारून ताराज करावा या बरहुकूम नेमणूक केली. त्याबमोजिब खंडोजी भोंसले दसऱ्याची साआलत करार करून निघोन फौज जमा करण्यास घांटा खालीं आले. बहुतकरून जमाव जाला. बाकीचाही जमाव जलद होऊन बंगाल्याचे जिल्हांत भोंसले खाना होतील. दक्षणचे सर्व साहेब-रियासत यांचा एका जाला. हे कैफियत कर्नल गाडर सुरतेस आहेत त्यास थोडीशी मालुम होतांच बायकदिगर मनसबा करूं लागले कीं, मसलहत भारी पडली, तदबिरीच्या मुशकिलींत येऊन मनसब्याकरितां मंमईस आले. मंमईकर जनरलाचें व गाडर मशारनिले यांचें कौंसल होऊन कलकत्यास पत्रें गेलीं. कर्नल गाडर यांणीं मंमईतील दोन तीन हजार जमाव करून फिरोन

---

*नक्कल १७७९ ची असली तरी प्रथमचा करार१७४१ त ठरून तो शाहूचे मृत्युनंतर १७५० चे सुमारें कोल्हापुरकर संभाजीस पेशव्यांनीं लिहून दिला असावा. त्याची नक्कल पुढें स. १७७९ त रुजू झाली. हा कागद ले. २४९ चा उत्तर भाग असावा. हा लेख मोडककृत कोल्हापूर इतिहासांत छापला आहे.

छ २६ जिल्कादीं सुरतेस जमा सुद्धां पोंचले. आइंदे चाल कोणती सुरू करतील तें पहावें. सरकारच्या फौजा व जिनशी व सरदार शिंदे होळकर सर्व तयारी आहे. लेकिन इंग्रजांचीं या प्रांतें बंदरें दोन, एक सुरत व मंमई. खुष्कींत कांहीं त्यांचा मुलुख नाहीं. आजीं सबब इंग्रजांनीं बंदर बाहेर निघावें इतकी इतजारी आहे. अगर तसेंच बंदरांत दम धरून रहातील. याजकरितां दहा हजार फौज सुरत प्रांतीं रवाना केली, त्यांणीं आसपास हंगाम करून त्यास तंग करावें. जमाव थोडा ऐसें समजोन चालून येतील. दोन चार मजली भुलावा देऊन मैदानांत आणावें. बाद सरदार वगैरे सर्व तयारच आहेत. फत्तेसिंगराव गायकवाडही त्या प्रांतीं दहा-पंधरा हजार फौजेनशीं आहेत. खुलस हाच कीं, सरकारचा गुंता हरगीज तयारीचा राहिला नाहीं. तरफैनची मसलहत एक. कचें पक्कें पैदरपै मालुम व्हावें म्हणोन कलमी केलें असे. आं साहेबांकडील ही कैफियत कलमी करीत जावी. मरातब कृष्णराव व गोविंदराव नारायण कलमी केलें त्यावरून जाहीर होईल. म्हणोन हैदरअल्लीखां बहादूर यांस नानांचें पत्र.

ले. २४९ [४२९] } { श. १७०१ सन १७७९

श्री.

सन ११८९ फसली. सन १७७९ इसवी १ फे० नंबर १४

यादी सुरुसन समानीन मय्या व अलफ*

१ किल्ले पन्हाळियासि तक्तसिंहासन केलें नाहीं. येथील रहाण्यामुळें तक्ताची जागा असें नामाभिधान पडलें आहे. थोरले श्रीमन्महाराज राजश्री शिवराज छत्रपति यांणीं सिंहासनारूढ होऊन राज्य केलें ... ... कलम १

१ तह जाहला त्यासमयीं प्रथम स्वारी साधारण नाम संवत्सरीं सन इहिदे सल्लासीन माघमासीं साताऱ्याहून श्रीमन्महाराज शाहूराजे यांजकडून श्रीमन्महाराज राजश्री संभाजीमहाराज छत्रपति यांसि न्यावयास आले व नांवनिशी श्रीपतराव प्रतिनिधि व नारोराम मंत्री व अंबाजी पुरंधरे पेशव्यांचे मुताालिक व कृष्णाजी दाभाडे व निंबाळकर व पांढरे व कित्येक नामीनामी सरदार किल्ले पन्हाळियाच्या मुक्कामीं फौज सुद्धां आले. श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति साहेबांस सर्वत्रांनीं नजरा व दुस्त व जडजडाव जवाहीर, हत्ती, घोडे नजर करून सत्के करून जोहार केले. त्या उपरि पद्धतीप्रमाणें चादरा त्यांसि देऊन विडे होऊन ते किल्ले खालीं उतरले. उपरांतिक महाराज स्वामींचीं स्वारी किल्ल्याखालीं होऊन देवाळें नावली एथें मुक्काम जाहाला. तेथून कूचदरकूच जाऊन वाठारावरी मुक्काम केला. शाहूराजे उमरजेवरी होते. श्रीपतराव व नारोराम मंत्री वाठाराहून पुढें उमरजेस गेले आणि

---

* नक्कल पुढें सन १७७९ त रुजू झाली तरी मूळ कागद इहिदे आर्बैनचा म्हणजे १७४१ चा आहे. हा कागद ले. २४६ चा प्रथम भाग असावा.

शाहूराजे यांसह कऱ्हाडा पुढें जखीणवाडीच्या नजीक माळावरी घेऊन आले. त्यांज बरोबर संपूर्ण सरकारकून व नामीनामी सरदार वगैरे फौजा लक्ष पावेतों जखीणवाडीहून रावताची कोरगिरी वाठारा पावेतों म्हणतां दोन्ही सैन्यें मिळून दोन लक्षपर्यंत जय जहाला. श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति सोन्याच्या अंबारींत स्वार होऊन समागमें सरकारकून व सरदार व नामीनामी खासे सरदार दहापांच हजारपर्यंत होते. कोरगिरींतून मुजरे घेत स्वारी जहाली. श्रीमन्महाराज उभयतां बाणाचे खास्तीवरी उभे राहून मध्यें लोक फरक करून बनवा टाकिल्या. नामीनामी लोकांनिशीं शाहूमहाराज घोड्यावरी स्वार होऊन आले. श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपतींची स्वारी हत्तीवरी होती, ते घोड्यावरी स्वार होऊन बनवा बिछावल्या होत्या तेथें येऊन उभयतां महाराज घोड्यावरून उतरले. परस्पर संनिध येऊन ऐक्यता होऊन शाहूमहाराज यांच्या पायावरि डोई श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति यांणीं ठेविली. महाराजांनीं परस्परें उभयतां बंधूंनीं आलिंगनें केलीं, त्या वेळेस मोहरा व रुपये व सोन्याचीं फुलें रुप्याची फुलें परस्पर सत्के जहाले त्या समयीं तोफेची सरबत्ती व नानाप्रकारचीं वाद्यें व शहाजानें वाजवून आनंद जाहला. फाल्गुन शुद्ध ३ तृतीया मंदवारीं दोन प्रहरा याप्रमाणें भेटीचा समारंभ जाहला. तदनंतर शाहूमहाराज यांणीं श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति यांचा हात धरून उभयतां बंधू एक अंबारीमध्यें हत्तीवर:स्वार झाले. खवासखान्यांत दोन मोर्चेलें घेऊन संभूशिंग जाधवराव बसले. संपूर्ण फौजेच्या कोरगिरीमध्यें जोहार घेत कऱ्हाडापर्यंत गेले. कऱ्हाडा नजीक कृष्णातीरीं मुक्काम जाहला. दक्षिणतिरीं श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपतींचा मुक्काम, उत्तर भागीं श्रीमन्महाराज राजश्री शाहूराजांचा मुक्काम होता, त्या डेरयापर्यंत उभयतां महाराज गेले. त्या वेळेस शाहूमहाराज यांची ज्या हत्तीवर स्वारी होती त्या हत्तीस व दुसऱ्या हत्तीस व दोन रंगविलेले घोडे एक रुप्याच्या जिनाचा व एक जरीबादली जिनाचा व दुस्तबादली व जडजवाहीर व डालतलवार याप्रमाणें देऊन श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति नदी आलीकडे आपल्या डेऱ्याच्या मुक्कामास आले. कऱ्हाडहून उमरजेस उभयतां बंधू महाराजांची सडी स्वारी जहाली, त्यांणीं श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपतीस हजार रुपये सत्का करून बादली दुस्त व जडजवाहीर व हत्ती व रंगविलेले घोडे बादली जिनाचे दिले. शाहूमहाराजांच्या आग्रहानें उभयतां ऐक्यता असून साताऱ्यासि शिमगी पौर्णिमा व्हावी म्हणून ममतायुक्त बोलून श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति यांसि घेऊन सातारियासि गेले, त्यासमयीं संपूर्ण शहरचे लोक बाहेर येऊन उभयतां बंधूचा समारंभ पाहून सत्के व खैरात बहुत झाली, आणि साताऱ्यांत पेशव्यांच्या वाडयांत मुक्काम जहाला. दोन महिने मुक्काम होता. संपूर्ण सरकारकडून व नामीनामी सरदार यांणीं श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज यांसि मेजवानी केली. नऊ हत्ती व चाळीस घोडे व जडजवाहीर व दुस्त असे बहुमान आले. शाहूमहाराज यांणीं खानगी समयीं हत्ती व रंगविलेले घोडे सामान सुद्धां व ढालतरवार व

जडावाचा खंजीर व दुस्तबादली दिली, व रोख दोन लक्ष रुपये दिले, आणि खानगी केली. बरोबर सरकारकून फत्तेसिंग भोंसले फौजेनिशीं देऊन श्रीमन्महाराज यांची स्वारी पन्हाळ्यासि पावती केली. शाहूमहाराज चार कोस घालवीत येऊन माघारे सातारियासि गेले. त्या वेळेस तहनामा जहाला त्याची यादी अलाहिदा असे. कलम.

१ आनंद नामसंवत्सरे सन खमस सल्लासीन सालीं श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति व श्रीमन्महाराज सकळ सौभाग्यादि संपन्न मातुश्री जिजाबाई साहेब यांची स्वारी आदीं जेजूरीस जहाली. तेथून सेहरीस मुक्काम जहाला. प्रतापगडास स्वारी तेथून जहाली. श्रीचें दर्शन घेऊन सप्तरात्र मुक्काम तेथें होता. तदनंतर कूच होऊन महाबळेश्वरीं सात दिवस मुक्काम होता. तेथून स्वारी सातारियासि जहाली. ते समयीं शाहू महाराज व समस्त सरदार व सर कारकून समवेत वेदनदी पर्यंत सामोरे येऊन उभयतां महाराजांच्या भेटी होऊन सातारियासि जाऊन श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति व श्रीमन्महाराज सकळ सौभाग्यादि संपन्न मातुश्री जिजाबाईसाहेब यांचा मुक्काम प्रधान पंतांच्या वाडयांत जहाला. दोन महिने मुक्काम तेथें होता. उपरांत महाराज व श्रीमन्महाराज सकळ सौभाग्यादि संपन्न मातुश्री जिजाबाई साहेब यांची स्वारी श्रीशिखरास दर्शनास जहाली. महादेवा पर्यंत शाहू राजे महाराज यांची स्वारी जहाली होती, तेथून कूच करून निघाले. नंतर शाहू महाराज कृष्णातीर नजीक बोरगांव येथपर्यंत सामादिक सहवर्तमान [आले.] श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति श्रीमन्महाराज सकळ सौभाग्यादि संपन्न मातुश्री जिजाबाई साहेब स्वारी करवीरास जहाली. मग शाहू महाराज यांची स्वारी बोरगांवाहून सातारियास जहाली. ... ... कलम.

१ इहिदे आर्बैन रौद्रीनामसंवत्सरे श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति व श्रीमन्महाराज सकळ सौभाग्यादि संपन्न मातुश्री जिजाबाईसाहेब यांची स्वारी सातारियासि जहाली ते समयीं पाली पर्यंत श्रीपतराव व बाळाजी पंडित व सदाशिव चिमणाजी व जनार्दन बाजीराव असे पुढें आले. महाराजांची स्वारी पुढें होती तेथें पंडित मशारनिल्हे यांणीं दर्शनें घेऊन जोहार केले. उपरांत चादरा देऊन बहुमान केले. तदनंतर महाराजांची आज्ञा घेऊन श्रीमन्महाराज सकळ सौभाग्यादि संपन्न मातुश्री जिजाबाईसाहेब यांच्या जोहारास आले. ते समयीं बराबर चादरा दोन होत्या. त्या आदीं श्रीपतराव याच्या आंगावरी चादर घालते समयीं त्यांणीं अर्ज केला जे, " हीं मुलें आहेत त्यासि चादरा आदी द्याव्या, उपरांत आम्ही म्हातारे आहोंच. त्या उपरी त्रिवर्गापैकीं दोघांस चादरा दोन व शेला एक या प्रमाणें दिलें. उपरांत श्रीपतराव यांसि दिले. यांणीं पुढें स्वारी जहाली तेव्हां निमपाडळीपर्यंत शाहू महाराज सामादिकसह.

———

ले. २५०. [२४१] | पौष श. १७०१ जानेवारी १७८०.

श्री.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेशीं

विनंती सेवक त्रिंबकराव आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐशीजे, येथील कुशल तागाईत पौष शुद्ध पर्यंत मुक्काम श्रीरंगपट्टण, स्वामींचे दयावलोकनें करून यथास्थित असे या नंतरि स्वामींनीं कृपा पत्रें राजश्री कृष्णराव तात्यांस[2] व राजश्री गणपतराव केश यांस व सेवकांस पाठविलीं तीं छ ५ जमादिलोवलेस पावून बहुत हर्ष जाहला. सविस्तर वर्तमान गुजराथ प्रांताकडील वगैरे वर्तमान लिहिलें तें कळलें. बहुत समाधान पाहून पत्रान्वयें स्वामीआज्ञेप्रमाणें तेच दिवशीं दरबारास जाऊन हजरत नबाबसाहेब यांस सर्व मजकूर राजश्री तात्या आदि सर्वत्रांही विदित करून नबाबसाहेब यांणीं अति प्रीति करून उत्तर प्रत्योत्तरें झालीं, तीं राजश्री, कृष्णराव तात्या जोशी यांणीं तपशिलवार विनंति सेवेशीं लिहिली आहे त्याजवरून विदित होईल. राजश्री, पाटीलबावांकडील पत्रेंही सत्वरच येतील. येथें दाखल होतां क्षणींच नबाब बहादूर यांजकडे रवाना करितें म्हणोन आज्ञा केली, तर फार उत्तम आहे. अतःपर हजरतांहीं खेमे दाखल होण्यास मुहूर्त विचारणा करविली आहे. आर्काट प्रांताचे सरहद्देस मिरअलरिजाखां यांणीं धामधूम सुरू केल्याचें वर्तमान तात्यांचे पत्रावरून श्रवण होईल. हजरतांचे मुहूर्त एक दोन विचारले ते रहित जाहाले. कारण पेशजी सेवेशीं विज्ञप्तिपत्रें लिहितच गेलों, परंतु आतां हीं पत्रें आलीं येणें करून सर्व संशयानिवृत्ती जाहली. एतन्निमित्त आतांचा मुहूर्त निश्चयात्मकच सिद्धीस पावेल. सेवेशीं श्रुत होय. विशेष काय लिहावें कृपा लोभाची वृद्धि व्हावी हे विज्ञापना. पौ छ २१ जमादिलावल समानीन हा॥ अंची ? हैदरखान.

ले. २५१ [४२६] | श. १७०२ चैत्र व. १ ता १९-४-१७८०

श्री

निशानबुल इमकान नबाब बहादर रोजे अफजूवांद.

छ दौलत व एकबाल पन्हाहा इजलाल दस्तगाह आजिजानीब सादिकूल एखलास यशवंतराव शिंदे सरसुभेदार बाआंदज इबराज मरातीब एखलास मशहूद जमीर लुत्फत खमीर गर्दानिदः मैआयद के दरिवीला आयकबल पन्हहानीं खत खुष नमत मिरसूल केलें तें नेक वक्तीं पोहचून कलमी केला मजमून बयादवार मालूम होऊन विशयार खुष वक्तीं हांशील जहाली. आयकबल पन्हहाचें येणें या जिल्ह्यास अनकरीब भारी फौज व तोफखाना सुद्धां व्हावें व

---

१ नानाचा कारकून हैदराजवळ. याचीं आणखी पत्रें पुढें येतील.

२ कृष्णाजी नारायण जोशी हैदराकडे वकिलीस पाठविण्यांत आला होता.

फौजेच्या खर्चाबद्दल ऐवज जलदीनें येऊन पोंहचावा ? बईसबब पैदरपै तीर्थस्वरूपें महाराज मातुश्री व महाराजांनीं धनीसाहेबांनीं कलमी करून पाठवीत असतां, नवाब वासवानिविस्तुवुदैक येथून भारी फौज रवाना करून पाठविली असे व आयकबल पन्हाहाची तयारी करविली असतां मोहरमचा आशुरा नजदीक पोंहचला बईसबब तहकूब जहाली. इनशाह आल्ला-हुता आलाबाद आनुषुरा कूच करून अनकरीब या जिल्ह्यास येत असों. ऐवज घेऊन जावयाबद्दल एथून इतबारी मजाम रहाबाट जाणारे दोनशें सवार बंकापुरास पाठवून द्यावे म्हणून कलम केल्यावरून श्रीमन्महाज धर्नासाहेबास खुशाली बखुशाली रुयदाद जहाली. अशास आशुरा खतम होतांच आयकबल पन्हाहानीं भारी फौज व तोफखाना सुद्धां खुद्द कूच दरकूच जलदीनें निघून बंकापुरास यावयाचें करावें. अज्जम बाजीराव बरखे याजकडे कित्येक पोषीश मसलतीच्या मजमूना वास्ते अज्जम राघो विठ्ठल यास फिरस्ताद केले असत. या हमराह दोनशें सवार देऊन पाठविले असत. तरी तेथें येऊन पोहचतांच जुदतर खर्चाची मदत इमदाद पोक्ता ऐवज देऊन रवाना करून पाठवावें. मसलतीचा वक्त हाच आहे. आशांत आयकबल पन्हहानीं ब=फौज येऊन पोहोंचावें. हुजूरचे फौजेचा जय आहे. हरदु इतिफाकेकडून फितुरीयांस तंबीह पोंहचवून दिलखवाह मतलब हांशील होतील. बारशीचे रोज नजीक न पोंहचले तों आयकबल पन्हाहाचें येणें होऊन मसलत हांशील होई तो अर्थ करावा. हरएक बाबे आपली खातरजमा बकरार राखून यावयाविषयाची अंदेशा खातरेंत न आणतां नुद आयकबल पन्हहानीं या जिल्ह्यास तसरीफ फर्मावावी. जियादय बजुशौकचे निगास्त आयद आयाम कामरानी मुद्दामवाद.

ले. २५२ [४२७] | श. १७०२ चैत्र व. १ ता॥ १९-४-१७८०

श्री

सन ११८९ फसली. सन १७७९ इसवी. तालिकेची नक्कल फेरिस्त नं० १

यादी श्रीमन्महाराज राजश्री छत्रपती स्वामींचे शेवेसीं करार होऊन यावे.

प्रांत हुकेरी तालुका व मनोळी तालुका व फुटगांव व प्रांत कागल व रायबाग प्रांत पेशजी चालल्याप्रमाणें चालावें. मध्यें सांगणारांच्या गोष्टीवरून विपर्यास पडला. पुढें होणार नाहीं. याप्रमाणें करार करून शफतपूर्वक पत्रें यावीं. ... ... कलम १

तालुका मनोळी येथील सरकार अंमल वगैरे फुटगांव व मुकासाबाब व लाडपट्टी व कमतकट्टे वगैरे अंमल चालत आला त्याप्रमाणें हुजूर यावें. आलीकडे सावनूरकर नबाब व हैदर नबाब व नवल्गुंदकर देसाई व कितूरकर देसाई यांजकडे ठाणीं व गांव वगैरे अम्मल व बाब ज्या ज्याकडे असतील त्या हुजूर सोडून द्याव्या. ... ... कलम १

हुकेरी तालुका झाडून जराबाजरा यावा. ज्या ज्यांजकडे ठाणीं व गांव व बाबी ज्या असतील त्यांतील न राहतां झाडून हुजूर यावें. ... ... कलम १

प्रांत रायबाग झाडून जरा बाजरा हुजूर यावा. ज्या ज्यांकडे ठाणीं व गांव वगैरे

बाबी ज्या असतील त्यांतील कांहीं न राहतां झाडून हुजूर यावें. ... ... कलम १

प्रांत कागल झाडून जराबाजरा हुजूर यावा. ज्या ज्यांकडे ठाणीं व गांव वगैरे बाबी ज्या असतील त्यांतील कांहीं न राहतां झाडून हुजूर यावें. ... ... कलम १

फुटगांव वगैरे फुटगांव झाडून जराबाजरा हुजूर यावें, ज्या ज्याकडे ठाणीं व गांवें असतील त्यांतील कांहीं न राहतां झाडून हुजूर यावे. ... ... कलम १

हुजुरून बोली करितां प्रधान पंताकडे आज्ञा करून ज्या ज्यांस पाठविले त्यांणीं सदर्हू तालुक्यांतील गांव घेतले असतील ते झाडोनिशीं हुजूर यावे. ... ... कलम १

स्वामींच्या पायांशीं कोणी अमर्याद वर्तणूक केली तरी स्वामींच्या आज्ञे प्रमाणें तुम्हीं त्यास शिक्षा करून स्वामींच्या आज्ञेंत वर्तणूक करीत असे करावें. ... ... कलम १

देशक व देशपांडे, पाटील कुलकर्णी वगैरे, वतनदार व इनामदार व सरंजामी वगैरे स्वामींच्या राज्यांतील तुम्हांकडे व तुम्हांकडील तालुकेदारांकडे कोणी आल्यास इनसाफा-विषयीं व हरएक विषयीं पक्षपात न धरितां स्वामींच्या सेवेशीं पाठवून द्यावे. ... कलम १

जरीपटके व दोन हत्ती हुजूरून नेले आहेत ते हुजूर द्यावे. ... ... कलम १

स्वामींमध्यें व तुम्हामध्यें हरकोणी विपर्यास वारंवार पाडतात येविषयीं शफतपूर्वक विपर्यास न येई असे कररवें. ... ... कलम १

भगवंतपंत व शेषोपंत यांणीं हुजूरचीं आज्ञापत्रें नेलीं तीं व प्रधानपंताकडील उभय-तांकडे आहेत तीं व रामचंद्र महादेव, बाळाजी वेशव यांजकडे गोपाळभट यांच्या विद्यमानें हुजूरचीं आज्ञापत्रें व सावकारी पत्रें व मनोळीच्या सनदा व दरम्यानगिरीचीं पत्रें व सनदा आहेत तीं व आप्पाजी श्यामजी व महादेव भट यांच्या विद्यमानें सावकारी पत्रें व हुजूरचीं आज्ञापत्रें आहेत व प्रधानपंतांकडील करारांचीं पत्रें आहेत तीं हुजूर यावीं ... कलम १

स्वामींकडील जंजिऱ्याचे व जंजिरे निसबतचे आरमार व किल्लेकोट यांस तुम्हांकडून व तुम्हांकडील तालुकदारांकडून हरएक विषयीं उपसर्ग होऊं नये.

तालुके विजयदुर्गाकडील ऐवज बाळाजीपंत यांणीं करार केला आहे त्याप्रमाणें सरका-रांत यावे. ... ... कलम १

करारप्रमाणें इनामपत्रें राजश्री प्रधानपंत व बाळाजी जनार्दन यांचीं स्वामींचे सेवेसी यावीं. ... ...कलम १

सरंजामी व देशमूख व देशपांडे व इनामदार यांजकडून ऐवज इसन्नेसितैनांत व सन अर्बासितैन सालीं नजरे दाखल ऐवज घेतला असेल त्याप्रमाणें ऐवज हुजूर यावा, व त्यांणीं रयात केली असेल तोही ऐवज हुजूर यावा येविषयीं तुम्हांकडून त्यांशीं ताकिदी निष्ठुर असाव्या. तुम्हांकडून दिक्कत नसावी. ... ... कलम १

करवीरावरी महादजी शिंदे आले ते समयीं करारदारांच्या यादी व सरकारचीं पत्रें व कागदपत्र कतबे अकरा लक्षांचा कतबा झाडून माघारे द्यावे. ... कलम १

साळशीं महालाकडे जंजिरे सिंधुदुर्गाकडील ऐवज चालत आहे त्याप्रमाणें जंजिऱ्याकडे चालावे. ... ...कलम १

सालदरसाल स्वामींचे सेवेसीं नजरदुस्त व जवाहीर व हत्ती घोडे सेवेसीं पाठवीत असावीं. ... ... कलम १

राजश्री यशवंतराव सिंदे सेनासाहेब सुभा सरसुभेदार हे स्वामींच्या आज्ञेनरूप सेवा करितात आणि स्वामींचा अखत्यार त्याजवरि याकरितां त्याशीं तुमची निखालसता असून उभयपक्षीं ऐक्यरूप असावें. ... ... कलम १

आजपावेतों भगवंत आप्पाजी व शेषो नारायण व रामचंद्र महादेव व बाळाजी केशव व आपाजी श्यामजी व महादेव भट यांणीं गैरवाका हजूर विनंती करून तुम्हांस हुजूरचा गैरवांका समजावून देऊन राज्याची खराबी केली आणि तुम्हाशीं विपर्यास घातला, याजमुळें राज्याची खराबी जहाली त्याचा दिनावा त्यांणीं भरून द्यावा लागेल. ... ... कलम १

राजमंडळाचे सेवक व वतनदार यांशीं तुम्ही आश्रय देऊन त्यांचा पक्षपात न धरावा आणि त्याणीं सरकारांत रुजू असून आज्ञेनरूप सेवा करावी. ... ... कलम १

सोंदें बिदनूर वगैरे संस्थानें कर्नाटक प्रांतींचीं आहेत, तेथील ऐवज पेशजीच्या कराराप्रमाणें हुजूर यावा. ... ... कलम १

पत्रें तुम्हांकडील लागतील तीं आज्ञेप्रमाणें द्यावीं. ... ...कलम १

सरकार तर्फेचे सेवक असतां सरकारांत राहून गैरवर्तणूक केल्या स्वामी आज्ञा करतील त्याप्रमाणें तुम्हांकडून तोफा व फौज स्वामींच्या सेवेसीं यावीं. स्वामी त्यांसि शिक्षा करतील. ... ... कलम १

बारा पतकें पूर्वीपासून सरकारचे सेवक यांचे पूर्वीपासून सरकारचे सरंजाम होते ते देऊन त्याणीं हुजूर रुजू असून सेवा करावी. ... ... कलम १

मनोळी तालुक्यांतील देशमुख व देशपांडे वगैरे वतनदार यांजकडे सरकारच्या सनदा व्यतिरिक्त जे गांव असतील ते सरकारांत यावे. ... ... कलम १

बाळाजी पंडित प्रधान यांच्या स्वदस्तुरची यादी पुण्यास कैलासवासी तीर्थरूप मातुश्री आईसाहेब यांची स्वारी जहाली ते समयीं व करवीरास कैलासवासी तीर्थरूप आबासाहेब यांच्या सेवेसीं बाळाजी पंडित प्रधान आले त्या समयीं त्याणीं यादी व विनंतीपत्रें शेषो नारायण व भगवंत आपाजी यांच्या विद्यमानें दिलीं आहेत त्यांस अंतर करूं नये. ... ... : कलम १

किरकोळ वतनदारी स्वामींच्या राज्यांतील जे असतील ते स्वामीकडे पाठवून द्यावे. ... ... कलम १

हणमंत शिवराम व भिकाजी नरसिंह व घनःशाम यशवंत त्या बरोबरचे कारकून व माराठे व मनुष्यें तुम्हाकडे असतील तीं हुजूर पाठविणें. ... ... कलम १

शककर्ते कैलासवासी महाराजांपासून सावकारी तरांडी सावकारीस जातात त्यांचा कौल जंजिरे सिंधुदुर्गाकडून घेऊन जात असतात, हल्लीं तुम्हांकडील अंमलदार दिकत घेऊन कौलावणीचा ऐवज सुधामत चालूं देत नाहींत, त्यांस ताकीद करून पूर्ववतप्रमाणें कौलावण चालावी. तें न जहाल्यास ऐवज जिकडे राहील तिकडून घ्यावा लागेल. ... कलम १

हुकेरी व हुकेरी तालुक्यांतील गांवठाणीं यांणीं व मनोळीच्या ठाण्यांतील व घोडीं, गुरें व दारूगोळी जेजाहाला व रेखले व दागदागीने वैगरे दास्तान शेषो नारायण व भगवंत आप्पाजी व रामचंद्र महादेव व बाळाजी केशव व आप्पाजी श्यामजी यांजकडून सदर्हु लिहिल्याप्रमाणें दोन्ही तालुक्यांतील जखिरा सामान हुजूर यावें ... कलम १

हुकेरी प्रांतांतील देसाई यांजकडे पेशजी भोगवटे विरहीत काटकाईमुळें गांव अनुभवीत आले आहेत ते गांव देहे आठ हुजूर यावे व पैकींबद्दल ऐवज त्यांजकडून यावा. देसाई मजकूर याचा कारभार ज्याणीं ज्याणीं केला असेल त्याणीं पैवस्तीबद्दल ऐवज हुजूर ऐवज द्यावा ... ... कलम १

पेशजी ठाणीं व गांवें घेतलीं तीं व गुदस्तां ठाणीं व गांवें घेतलीं व सालमजकुरीं ठाणीं व गांवें घेतलीं आहेत तीं गावें, व ठाणीं हुजूर यावीं आणि त्या पैवस्तीबद्दल वसूल हुजूर यावा. ... ... कलम १

सरकारचीं ठाणीं व गांवें आलीकडे घेऊन परभारें ज्यास ज्यास दिलीं असतील त्यांजकडून ठाणीं व गांवांपैकीं बद्दल ऐवज सदर्हू लिहिल्याप्रमाणें हुजूर यावा.

आप्पाजी श्यामजी यांणीं शेषो नारायण याजपासून कागदपत्र घेतले आहेत ते हुजूर यावेत. ... ... कलम १-

सदर्हू हुकेरी तालुका व मनोळी तालुका व रायबाग तालुका व कागल प्रांत व लाट रांगोळी सुद्धां पांच घरांचें खेडें आदिकरून बिघाभर जमीन न राहतां झाडेनिशीं हुजूर यावें. ... ... कलम १

किल्ले तोरगळची गडपट्टी तालुकदाराकडे व देशकाकडे आहे तीं किल्याचीं किल्याकडे चालत असावी. येविषयीं देशकास ताकिदी द्याव्या. कलम१

राजश्री परशुराम रामचंद्र व गंगाधरराव भिकाजी व रघुनाथराव निलकंठ व आनंदराव व निंबाजी यांचीं विनंतीपत्रें सदर्हू एकूणचाळीस कलमांची यादी पाठविली याप्रमाणें निभावून देऊं म्हणून शफतपुरःसर पत्रें यावींत. ... ... कलम १

एकूण कलमें एकूणचाळीस.

सदर्हू कलमबंदीची यादी अस्सल राजश्री बाळाजीराम दिमत लष्कर व मुंजाजी सूर्यवंशी सरनोबत व सुभानजी मुरामकर यांजकडे दिली. मशारनिल्हे राजश्री परशुराम रामचंद्र व गंगाधरराव रास्ते व आनंदराव व निंबाजी यांजकडे लष्करास शिरोळच्या मुक्कामास घेऊन गेले. तहाचे बोलिस्तव सदरहु ताल्लिकेची नकल करवीरचे मुक्कामीं चिटणीसांच्या रूमालीं ठेविली. तालीक किल्ले पन्हाळ्यास राजश्री बाजीपंत तात्या यांजकडे पाठविली. छ १३ रबिलाखर सन समानेन.

ले. २५३ [३०३] श. १७०२ चैत्र व. ११ ता॥ ३०-४-१७८०.

श्री.

राजश्री सदाशिवपंत* स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. राजश्री पाटीलबावांचीं बोलणीं विक्षेपाचीं तेथें होतात, त्यांचीं लिहिलीं लोकांच्या घरीं इकडे येतात, तेव्हां इंग्रजाचेही घरीं बातमी जात असेलच. ही गोष्ट मसलतीस वाईट. हें ध्यानांत येतें कीं नाहीं ? रती इतकी दरज पडली असतां शत्रूस बळ किती येतें याचा विचार करतात कीं नाहीं ? त्यांतही कोठें वांकडें असलें तरी थोर आहेत ते वांकडें दाखवीत नाहींत. मग येथें तर परस्परें भाऊपणा अकृत्रिम. वांकडें रतीमात्र नसतां, उगेच कोते अंदेश माणसांच्या लिहिण्यावरून व सांगितल्यावरून निःकारण विपरीत अर्थ करून बोलावे हें तर फारच विलग दिसतें, व या गोष्टी पासून उमेदही सरत्ये. अगर बोलण्यानेंच संतोष होतो तर एकांतीं तुम्हांस बोलावून नेऊन जें बोलण्याचें असेल तें बोलत जावें, दुसऱ्यास कळूं नये असें तरी ब्हावें. एवढे मोठे सरदार मसलतीवर गेले त्यांस जेणें करून उपयोग त्याच गोष्टी येथून घडत असतां, राजश्री पाटीलबावांचीं पत्रें व तुमची पत्रें येतात त्यांत एक पत्र तरी जाहिराणा दरबारांत सर्वांचे वकील बसले असतां वाचून पहावें आणि शत्रू व बाहेरील आहेत त्यांस एकत्वाचा व स्नेहाचा ऐक्यावर दाब पडावा व इष्ट आहेत त्यांस गोड वाटावें असें पत्र कधींच येऊन पाहिलें नाहीं. जीं पत्रें येतात त्यांत मनांत कल्पना नाहींत व न यावयाच्या घेऊन व कित्येक रेषें करून व कित्येक विपरीत अर्थ करून लिहून येतात तीं एकांतीं वाचावीं, त्याचे पाहे रे उत्तरें लिहून तुम्हाकडे पाठवावीं, या खालीच दिवस गेले. पुढें ईश्वरी इच्छा असेल तसें घडेल. होळकराकडील मजकूर पत्रीं लिहितां, परंतु प्रस्तुत मसलतीचे दिवस, वाटेंत लुटारीही फिरतात, एखादें पत्र त्यांकडे गेल्यास तूर्त मसलतीस अपाय, याकरितां पत्र पाठविणें तें तजवीजेनें पाठवींत जावें. पाटीलबावांचें पारपत्य जहाले तरी सरकार काम, अशा गोष्टी जेव्हां पाटीलबावांच्या मनांत येऊं लागल्या त्या परिहार लिहितां कशा जातील ? ईश्वरच त्यांच्या बुद्धीस काय साक्ष देईल ती खरी. अशीं विक्षेपाच्या मजकुराचीं पत्रें वाटेचे गर्दीमुळें इंग्रजाकडे धरलीं गेलीं असल्यास काय मनांत आणितील याचाही विचार करावा. तुम्हांकडून पत्र जासूद घेऊन आला म्हणजे आधीं लाखोटा फोडण्या पूर्वी चित्तांत येतें कीं काय नवा विक्षेपाचा ग्रंथ रचला असेल ? मग फोडून पत्रें पहावीं तों तेंच निघतें ! बरें आहे ! कितीही वाईट वाटावयाजोगें बोलले व लिहिलें तरि आम्ही चित्तांत वांकडें काडीभर आणणार नाहीं व करणार नाहीं. यास कारण एक तर आम्ही शुद्ध बुद्धीनें पाटीलबावांचे ठायीं चालतों. दुसरें खावंदाचे कार्यावर नजर, मग वाईट कशास वाटेल ? रा॥ छ २४ रबिलाखर हे विनंती. पौ छ १६ जमादिलावल वैशाखमास मुक्काम वाघोडें.[२]

* सदाशिव दिनकर, महादजी जवळ राहणारा पेशव्यांचा हस्तक. पत्र नाना फडणिसाचें. २ वाघोडिया, बडोद्याच्या पूर्वेस १० मैलांवर गायकवाडी तालुका.

ले. २५४] [२२७]

श. १७०२ वैशाख शु ४ ता ८-५-१७८०

॥ श्री ॥

राजश्री **नारो**पंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि " **बा**पूजीपंताच्या पत्रांत राजश्री **पाटी**लबावा बोलिले कीं, हैदरखाना-बद्दल दरबार खर्च आम्हांस आल्याचा भ्रम धरूं नये. आम्हांस बहुमान म्हणा किंवा दरबार खर्च म्हणा चार हत्ती वस्त्रें काय दिलीं असतील तितकींच. दरबार खर्च **रास्ते** वगैरे यांणीं करार करून घेतला असेल, आपलें पत्र आलें म्हणजे साऱ्या मिळून ऐवज घेऊन त्याजवर महिना दीड महिना लोटायास येईल. तेव्हां ऐवज दहालक्ष पावेतों उणापुरा असेल. आमचा भ्रम असल्यास एक पैसा आला नाहीं. **रास्ते** त्यांतील मध्यस्तींत होते, त्यांणीं कोणकोणाचा दरबार खर्च आणिला असेल त्याचा शोध करून तूर्त मसलतीचा प्रसंग आहे याकरितां ऐवज सर्वांचा घ्यावा, " म्हणून लिहिलें आहे, त्यास दरबार खर्चाबदल ऐवजाचा शोध करितां बितपशील.

५०००० **रास्ते.**

५०००० **कृ**ष्णराव **ब**ळाळ† यास पन्नास हजार आले म्हणोन ऐकतों.

५०००० **हरि**पंत

१००००० **पाटी**लबावांच्या नांवें आले म्हणोन ऐकतों.

१००००० आमचे नांवें.

३५०००

साडेतिही लाखांची बेरीज, पैकीं शेंकडा १० रुपये प्रमाणें वजा करून बाकी बेरजेचें नाणें होन सवाचोहों प्रमाणें दर घालून देतात त्यास बाजार पाडासही तोटा फार, याप्रमाणें ऐवज आला, त्यापैकीं आम्हीं व हरिपंतांनीं आपला ऐवज सरकारांत दिला. **रास्त्यां**नींही आपला फडशा केला. **कृ**ष्णरावही देतील. **पाटी**लबावांचा ऐवज आल्याचें वर्तमान त्यांस कळलें नसेल म्हणून तसें बोलले. वाकिलांनीं मागाहून लिहिलें असेल त्यावरून कळेल. किरकोळ मजमदार, चिटनीस, पोतनीस वगैरे मिळोन तीस चाळीस हजार असतील असें वाटतें. दहालाखांचा भ्रम धरून बोलले याकरितां तुम्हांस तपशील कळावा याकरितां लिहिलें आहे.

भोंसल्यांची फौज **ब**ंगाल्याच्या सरदे पावेतों गेली होती. व आज तागाईत पत्रेंही येत गेलीं कीं, इंग्रजांच्या तालुक्यांत फौज शिरून §तख्ततराजी केल्याचीं वर्तमानें सत्वरच येऊन पोंचतील. आम्हीही थोरपणच देऊन उत्तरें लिहित गेलों.हल्लीं पत्रें आलीं कीं, फौज फार खराब झाली, घोडीं मेलीं, याकरितां मोठमोठे सरदार हत्तीवर बसून चालतात,

† उपनांव काळे—निजामाकडील पेशव्यांचा वकील.

§ तख्ततराजी=नासधूळ.

याकरितां व देण्याचा पेंच भारी बसला हे बाहाणे लावून फौज माघारीं आणावी हा त्यांचा मनोदय आहे. हे प्रकार पूर्वीच समजले होते. येथूनही त्यांस उचित रीतीनें लिहिलें आहे; परंतु त्यांची फौज रहातां दिसत नाहीं. जाबीतजंगही[२] छ ४ रविलाखरीं मेले व चिमाफ पानसी यासही चार पांच महिने फार बरें वाटत नव्हतें, याकरितां घरास आले, उपायही केला. परंतु सार्थक न झाला. चैत्र वद्य षष्ठीस त्यांचाही काळ झाला. नबाबाच्या दरबारीं जाबीतजंग डोईजड व मातबर सरदार होते. असो, जे काळीं जें होणार तें होतें. रा॥ छ ३ जमा दिलावल हे विनंती.

ले. २५५ [३०७]

श. १७७२ वैशाख शु. १२ ता॥ १५-५-१७८०

श्री.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेशीं.

सेवक नरसिंगराव तमाजी* कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल वैशाख शुद्ध १२ मुकाम श्रीरंगपट्टण स्वामींच्या कृपें करून यथास्थित असों विशेष. छ १९ रबिलाखरचें पत्र पठविलें तें छ ५ जमादिलावलीं पावून संतोष जहाला. पत्रीं आज्ञा केली जे, मसलतीचे दिवस, अवकाश थोडा राहिला, अद्याप नबाब बहादर यांचें निघणें जहालें नाहीं, त्यास तुम्ही व राजश्री कृष्णराव व राजश्री गणपतराव मिळोन सांगोन लवकर चेनापट्टणाच्या प्रांतास मजल दरमजल जाऊन इंग्रेजास ताण बसे तो अर्थ करावा. राजश्री महदजी शिंदे यांचीं पत्रें आलीं कीं निभावणीचें पत्र पाठवून देतों. त्यास पत्र येतांच तुम्हांकडे रवाना केलें जाईल. पत्राकारितां मसलतीस जाण्यास दिवसगत लागूं नये म्हणून विस्तारें आज्ञा केली. ऐशियास, नबाब साहेब यांणीं स्वारीस निघावयाची सिद्धता करून चैत्र वद्य १३ त्रयोदशीचा मुहूर्त निश्चय केला होता. मध्यें माहिना पाऊण महिना पावेतों चिरंजीव राजश्री आनंदराव यांजकडून पत्रच येईनासें जाहलें आणि बाजारी वर्तमान गुजराथेकडील अधिक उणीं लोक बोलूं लागले व नबाब साहेब यांनीं बाजारी वर्तमानें मनास आणिलीं नाहींत. परंतु बातमीच येईनाशी जाहली, याकरितां तो मुहूर्त साधला नाहीं. आलीकडे स्वामींचें व चिरंजिवांचीं पत्रें आलीं त्यांत गुजराथेकडील वगैरे बातमी इंग्रजांचा छेपा सांभाळून सरकारचे फौज व उभयतां सरदार यांनीं कस्त चांगली केली. स्वामींनीं लिहिल्याप्रमाणें राजश्री कृष्णराव व राजश्री गणपतराव व आम्ही मिळोन पत्रान्वयें निवेदन केला. नबाब साहेब यांचें लक्ष श्रीमंतांशीं सनःपूर्वक आहे. मिरजाअलीखां यास भारी फौजेनिशीं रवाना केले आहेत. त्यांनीं अर्काट

---

२ जाबीतजंग घौशा निजामाचा सेनापति १०-४-१७८० रोजीं मरण पावला. पत्र नाना फडणिसाचें.

* नरसिंगराव तमाजी हा नानाचा हैदर अलीच्य दरबारीं वकील.

प्रांतीं दंगा माजविला आहे, आणि चेनापट्टण प्रांतींही दौड पाठवावयाची तर्तुद जाहली आहे. सत्वरच जाणार. राजश्री महादजीराव शिंदे यांचें पत्रही लवकरच येईल. नबाब साहेब यांनी राजश्री कृष्णरावाबरह सर्वांस निरोप द्यावयाचा व खांसास्वारी मसलतीस निघावयाची; मुहूर्ताचा निश्चय होत आहे. नबाबसाहेब यांशीं कित्येक बोलणें जाहलें याचा विस्तार राजश्री कृष्णराव तात्या यांच्या पत्रावरून निवेदन होईल. सेवक पदरचा, सेवेस अंतर नाहीं, करणार नाहीं. बहुत काय लिहावें. कृपा असूं द्यावी हे विनंती. पै॥ छ २१ जमादिलावल समानीन बि॥ अंची हैदरखान इ० सन १७७९

ले. २५६ [२४२]

श. १७०२ वैशाख शु. १२ ता. १५-५-१७८०

श्री.

सेवेशीं गणेश केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत वैशाख शुद्ध द्वादशी पावेतों मुक्काम श्रीरंगपट्टण स्वामींचे कृपावलोकनें करून क्षेम असों विशेष. कृपा करून हजरत नबाब साहेबांचे अंची वर छ १९ रविलाखरचें पत्र पाठविलें तें छ ५ जमादिलावलीं प्रविष्ट होऊन संतोष जाहला. पत्रीं आज्ञा कीं राजश्री महादजी शिंदे यांजकडील निभावणीपत्राचा मात्र गुंता म्हणून लिहिलें. त्यास पंथ दूर, मार्ग सुरक्षित चालेना, सबब इतके दिवस लागले. कालच त्यांचीं पत्रें आलीं कीं, आपण पत्रें व मसुदा पाठविला तो पावला. उदईक मसुद्याप्रमाणें पत्रें लिहून खाना करितों. पत्र थोडके दिवसांतच येईल. येतांच खाना होईल. तें पत्र येण्याची प्रतिक्षा करूं नये, पत्र आलें ऐसें मोजून तुम्ही व राजश्री कृष्णराव व नरसिंगराव व नबाब बहादूर यांची खातरजमा करून मसलतीवर दरकूच जाणें घडेल ऐसें व्हावें. तुम्ही मंडळीसह कामें उलगडून लवकर यावें. सविस्तर राजश्री कृष्णराव यांस लिहिलें आहे त्यावरून कळेल. म्हणोन, ऐसियास हजरत नबाब साहेब* यानीं स्वामींचे वचनाचे लायकीवर श्रीमंतांशीं मनःपूर्वक स्नेह केला यांत किमपि दरज नाहीं, इंग्रजास तंबी बेजार करावयासी अग्रेसर, नबाब साहेब यांजकडूनच मसलत ठरली आहे. तेव्हां इंग्रजाचे तंबीची फिकिर नबाबसाहेब यांस पुरती आहे. चैत्र व॥ १३ चा मुहूर्त देखील निश्चय केला होता, परंतु गुजराथेकडील बाजारी वर्तमान नाना प्रकारें बाजारी लोक बोलूं लागले व पुणियाचीं ही पत्रें येतां राहिलीं या करितां तो मुहूर्त टळला. आलीकडे दोन वेळ पत्रें आलीं तीं आम्हीं दरबारास जाऊन श्रवण केलीं. उभयतां सरदार यांणीं इंग्रजाचा छापा संभाळून कस्त चांगली केली, येणेंकरून संतोषायमान जाहले. नंतर आम्हांस बोलले कीं, रावसिंदे यांजकडील पत्रही आठ चार रोजांत येतांच तुम्हास रजा देऊन आम्ही मसलतीवर नमूद होतों, गुंता नाहीं, म्हणाले. श्रीमंतांस व स्वामींस मातबरांस वस्त्रें जवाहीर नेमून ठेविलें होतें. तें आम्हांस प्रत्येक प्रत्येक दाखवून

---

*नबाब म्हणजे हैदरखान समजावे. हें पत्र हैदराच्या दरबारीं असणाऱ्या नानांच्या वकिलानें लिहिलेलें आहे.

पेटारे बांधून सिद्ध करून ठेविले. हत्ती बदामीस रवाना केले आहेत. आम्हांस येथून रवाना व्हावयास आठ पंधरा रोज पाहिजेत. पर्जन्यकाळ समीप आला, या करितां हत्ती कृष्णापार जाऊन राहण्यास जागा कोणती आहे म्हणून पुसल्यावर, आम्हीं अथणी चांगली जागा आहे म्हणोन सांगितलें. तेव्हां बोलले कीं, तेथील कमाविसदार यांस तुम्ही रातबमसालेविशीं कागद व जासूद जोडी देणें, म्हणजे येथून पत्रें बदामीस पाठवून हत्ती पुढें रवाना होतील. तेव्हां पत्र व जासूदजोडी दिली. त्यां समागमें नबाब साहेब यानीं जासूदजोडी व पत्रें रवाना केलीं आहेत. हत्ती अथणीस जाऊन राहतील. आम्हांस रजा जाहलियानंतर पुढें सेवेशीं घेऊन येऊं. आणखी कित्येक नबाब निजामअल्लीखान यांजकडील व स्नेहभावाचें बोलणें जाहलें तें विस्तारें राजश्री कृष्णरावजी यांच्या पत्रावरून निवेदन होईल. राजश्री पाटीलबावांचें पत्र सत्वरच येईल. पत्र आल्यावर येथें किमपि गुंता नाहीं. आम्हांस निरोप देऊन नबाबसाहेब स्वारीस निघतात. सदैव पत्रीं परामर्ष करावयास आज्ञा जाहली पाहिजे. श्रुत होणें हे विज्ञापना. पैवस्ती छ २१ जमादिलावल समानीन ह॥ अं [खं ?] हे दरखान.

ले. २५७ [२३९]

श. १७०२ वैशाख व. २
ता. २०-५-१७८०

श्री.

सेवेशीं कृष्णराव नारायण जोशी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ १५ माहे जमादिलावल पावेतों मुक्काम श्रीरंगपट्टण वर्तमान यथास्थित असों विशेष. आपण छ २१ रविलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. उभयतां सरदार यांजकडील इंग्रजाशीं लढाई झाली याची व हिंदुस्थानाकडील विस्तारें बातमी पुरवणी पत्रांत लिहिली होती त्या सुद्धां पत्र आम्ही दरबारास जाऊन नबाबसाहेब यांस श्रवण केलीं. संतोषी झाले. नंतर आम्हीही स्वारीस निघावयाची त्वरा करावी म्हणोन बोलिल्यानंतर उत्तर केलें कीं, थोड्याच दिवसांत राव शिंदे यांजकडील खतही येतांच तुम्हांस रजा देऊन स्वारीस निघतों, गुंता नाहीं, असें मनःपूर्वक भाषण केलें. तेच दिवशीं स्वामींकडील पत्रें आलीं होतीं त्यांचीं उत्तरें लिहून आंचीवर रवाना केलीं आहेत. प्रविष्ट होतील. नबाबसाहेबांचे चित्तीं दुसरा अर्थ किमपि नाहीं. बाजारी खबरीवर औरंगाबाद वगैरे येथून वर्तमान मनस्वी लिहून येतें याकरितां चित्तांत कल्पना येतात, तत्रापि चित्त चंचल करीत नाहींत. श्रीमंतांकडील मनःपूर्वक लक्ष आहे. राजश्री आनंदराव वकील याजकडील पत्रें येतात त्यांत बातमी आपल्या पत्रांप्रमाणें लिहून येतो, यावरून ही विवंचना करितात कीं, आनंदराव कच्चें वर्तमान लिहून पाठवीत नाहीं, बाजारी वर्तमान ऐकण्यांत येईल तेंही लेहून पाठवीत जावें. येथून सुतरस्वार पाठविले आहेत व हरकारेही त्यांजपाशीं असोन दिनचर्येचें वर्तमान लिहून पाठवावयास आळस करावयास कारण काय?

याप्रमाणें बहुत रागें भरून बोलिले. राजश्री नरसिंगराव यांणीं मर्जी पाहून उत्तरें प्रति उत्तरें करावयाचीं तीं केलीं. ऐशियास स्वामींनीं राजश्री आनंदराव यास आज्ञा करून बातमी कच्ची पक्की लिहीत तो अर्थ केला पाहिजे. राजश्री पाटीलबावांकडील निभावणी पत्र आलें म्हणजे आम्हांस रजा होऊन नबाबसाहेब मसलतीस जाणार. रावशिंदे यांजकडील पत्रें आलियाखेरीज लढाईचीं उत्कर्षाचीं वर्तमानें कितीही आलियास यांस खरें वाटत नाहीं. नबाबांनीं वैशाख व॥ १२ सीस खेमे दाखल व्हावयास मुहूर्त पाहिला आहे. कळावें. बहुत काय लिहिणें लोभ केला पाहिजे हीं विनंति. पौ॥ छ ५ जमादिलाखर.

श्री.

ले. २५८ [३१७]

श. १७०२ वैशाख वद्य ५
ता. २३-५-१७८०

राजश्री सदाशिवपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि हैदरखानाचें निभावणीपत्र मसुद्याप्रमाणें द्यावयाची परवानगी राजश्री पाटीलबावांची जाहली होती. परंतु इतक्यांत अशेरीचा बोभाट आला जे किल्लेदारावर शिबंदी चढली होती त्यास सरकारांतून खर्चास आलें व सारे जमातदारांस खातरजमेचे कागद आले. या वर्तमानावरून मना जाहले. रात्रौ स्वारी इंग्रजांवर जाऊन माघारी आल्यावर मागती सडेस्वारी चार दिवस जाऊन आपले पत्राचे मसुदे याचे अन्वयें पत्रें घेऊन थैली पाठविली आहे. त्याची नक्कल अलाहिदा आहे म्हणोन लिहिलें. त्यास थैलीव नक्कल पावली नक्कलेवरून मजकूर समजला. त्यास हैदरखानाचीं पत्रें राजश्री पाटीलबावांस व आम्हांस आलीं होतीं त्यांत आम्ही आपले पत्रांचा जाब लिहिला तो पाटीलबावांस कळावयाकरितां नक्कल व हैदरखानाचें पत्र पाटीलबावांकडे पाठविलें होतें. त्या पत्राचा जाबसाल आमच्या नकलेच्या अन्वयें लिहून थैली पाठविली; परंतु निभावणीपत्राचा मसुदा हैदरखानाकडून पाठविला होता त्याप्रमाणें पत्र आलें नाहीं. तेव्हां हैदरखान चेनापटणावर जात नाहीं व सरकारचा पैकाही येत नाहीं, व चार महिने बरसातींत इंग्रज व हैदरखान राजकारण करून बळावितील. सर्व प्रकारें मसलतीस विलग पडेल. हल्लीं पत्र आलें यांतही सरकारांतून तहा नामा झाला आहे त्याप्रमाणें निभावणीचें पत्र पाठविलें आहे असें लिहिलेंच आहे, तेव्हां यावरून गुंता न पडावा. परंतु हैदरखानाची समज एक प्रकारची, या करतां मसुद्याप्रमाणें पत्र त्यांत एक अक्षर अधीक उणें न होतां कागदावरच शिक्का करून पाठवावें, थैलीचा दरकार नाहीं, अशीं लिहिलीं येतात, त्यापक्षीं त्याचे समजेप्रमाणें निभावणीपत्र पाठवून सरकार काम होय तें करावें. नाहीं तर हें पत्र पाठवूनही फळ नाहीं असें त्याकडून घडेल. यास्तव जरूर पत्र घेऊन पाठवावें. नबाब निझामअल्लीखान यांणीं आपणच होऊन थैली पत्राची पाठविली ते बजिन्नस पाठविली आहे. पत्र पाहिल्यावर मजकूर ध्यानांत येईल. सारांश पाहतां पाटीलबावांचे निभावणीपत्राची वाट हैदरखान पहातात. हैदरखान चेना-

पटणचे रोखें गेल्यावर नबाब शिकाकौलीकडे जाणार तोंपावेतों हे वाट पहातात. एवढा मोठा मनसुबा एक पत्राखेरीज विलग कसा पडतो हें ध्यानांत आणावें, आणि सरकारचा पैकाही येत नाहीं, तह होऊन बहुमानाचे हत्ती आले ते माघारे फिरविणें हेंही वाईट दिसतें. कदाचित् अखेर साल जाहलें, बरसात आली, आतां पत्र पाठवून फलही काय? असें ध्यानांत येईल तर पत्र पाठविलें असतां बरसातींत हैदरनाईक चेनापटणाकडे जाईल. पर्जन्यामुळें कांहीं काट न जाला तर राजकारण लागू पावणार नाहीं. सरकारचा पैका येईल, नबाबासही बोलावयास जागा होईल, दूर देशींच्या अर्थे फार चांगलें आहे असें जाणोन वारंवार लिहितों. आज पावेतों सरकारच्या कामांत पाटीलबावांकडून कोठेंही विगलता पडली नाहीं, आणि हलीं उगेच संदेह मनांत आणून निमित्य ठेवून पत्राविषयीं विलंब लावला, तर संदेहाचें मूळ येथून काडीमात्र नाहीं, तेव्हां एका घटकेंत दूर करतां येतील, परंतु मनसुबा जाहल्यास सांभाळणार नाहीं. असें आहे. * खातरजमेचें पत्र मसुद्याप्रमाणें लौकर पाठवावें म्हणोन हैदरखानास बोलावयास जागा राहिली नाहीं. हैदरखान निघाला म्हणजे नबाबास बोलावयास जागा नाहीं. मग जो अंतर करील त्यावर शब्द राहून काम होईल असें आहे. याकरितां पत्र जरूर घेऊन पाठवावें. अशेरीचा मजकूर लिहिला याची संभूतही नाहीं. चौकशी पाहिजे तशी करावी. ये विषयीं पूर्वी विस्तरें लिहिलेंच आहे. उगेच निमित्य काढून सरकार काम विलग पडावें हें न व्हावें. रवाना छ १९ जमादिलावल हे विनंति.

श्री.

२५९ } ३११ }

श. १७०२ वैशाख वद्य ६
ता. २४-५-१७८०

राजश्री सदाशिवपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. डांकेचे कारकून आपाजी सदाशिव व शिवाजी गांगरे यांणीं महनत करून शर्तीनें डांक बसविली व आम्हांपाशीं जासूद आहेत ते व डांकेचे जासूदाचे खर्चाची आबळ फार आहे म्हणोन विस्तारें फार लिहिलें त्यास आपाजी व सदाशिव यांणीं मेहनत फार केली याजमुळें त्यांचे तैनातेचा व खर्चाचा बंदोबस्त करून दिल्हा व गांगऱ्याचींही मेहनत ध्यानांत आहे. जासुदाचे व डांकेचे रोजकर दे [व] विले. चिंतो विठ्ठलाचें वर्तमान लिहिलें तें सविस्तर कळलें. आबाचिटणीस यांणीं निगडीविषयीं याद दिल्ही ती पाठविली ती पावली. त्याप्रमाणें ताकीद पत्रें देविलीं. बाळारायाकडील कृष्णभट वरखेडकर यांस इनाम गांव दिला आहे त्याचे कसरे विषयीं लिहिलेंत त्यावरून बाळारायाची खातर राखोन कसरेची सनद देविली. प्रतापगडच्या वगैरे गप्पांचें वर्तमान लिहिलें त्यास तो प्रकार कांहीं नाहीं. प्रतापगडचा बंदोबस्त चांगला आहे. राजश्री परशरामपंत

* येथपासून खुद्द नानाचें अक्षर.

भाऊ यांणीं गुमटास मोचें लाविले होते ते हल्ला करून घेऊन चार पांचशें माणूस करवीर-करांकडील ठार मारलें. तिसरे दिवशीं शिरोळही घेतलें. कितुरकरानें उपद्रव केला यामुळें त्यावर गेले. मुंबईकडून इंग्रेज आले होते त्यांचें पारपत्य केल्याचा मजकूर आलाहिदा लिहिलाच आहे. सर्व गोष्टी श्रीमंतांचे दैवें करून चांगल्याच घडत आल्या व घडतील. खाना छ १९ जमादिलावल हे विनंती. उभयतां सरदारांस सरकारचीं पत्रें व लाखोटे दोन व आम्हीं राजश्री पाटीलबावांस पत्र लिहिलें आहे तें यावें व श्रीरंगपट्टणाहून पाटीलबावांचे नांवें लाखोटा आला तोही पाठविला आहे, पावता करावा. राजश्री नारो शिवदेव याचे पत्रांत तुम्हीं सरकारी मजकूर लिहिले त्याचीं उत्तरें लिहून पाठविलीं. घराऊ मजकूर मोरो सदाशिव जैनाबादकर वगैरे यांचीं उत्तरें ते चांईस गेले तेथें ज्वर फार आला, बरे होऊन लौकरच येतील, उत्तरेंही पाठवितील. हे विनंती.

---

२६०) (श. १७०२ वैशाख व. ६
[३२३]) ता। २४-५-१७८०

॥ श्री ॥

राजश्री सदाशिवपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरी. तुम्हीं राजश्री नारो शिवदेव याचे पत्रीं लिहिलें कीं, राजेश्री पाटील-बावांचें बोलणें रेवा उतरणें नाहीं. मर्जी असली तर इकडे राहतील, मी आग्रह करीत नाहीं. नाहीं तर माझा जाबसाल आतां चालला आहे जे, सुरतेस इंग्रेज छावणीस जातो. बाजत बरसात पुण्यास गेला तर विचार कसा होईल ? याचें उत्तर पाटीलबावांनीं केलें कीं, तुमच्या मनांत आम्ही कोंडाई बारीवर छावणी करावी तर हें सहसा होत नाहीं. रेवा उतरणें नाहीं. माझें मानस कोंडाई बारीवर छावणी घडावी, सुरतेची बंदी व्हावी, निदान कोंडाई बारीवर फौज ठेवावी, पाटीलबावांनीं बराणपुरावर छावणी करावी. त्यास कोंडाई बारीवर छावणी करावयाची मर्जी असल्यास विमनस्कतेचीं पत्रें लिहूं नयेत, फार गोड येत जावीं तीं साधकें पाहून, वृत्तीवर येऊन, चित्तास आलें तर कोंडाई बारीवर अगर बऱ्हाणपुरीं छावणी करतील. बऱ्हाणपुरीं राहिल्यावर स्वच्छतेची व मसलतीस उपयोगाचीं साधनें विस्तारें लिहिलीं तीं कळलीं. त्यास छावणीचे प्रकाराचें उत्तर आलाहिदा लिहिलें आहे, त्यावरून कळेल. विमनस्कतेचीं पत्रें येथून लिहिण्यांत येत नाहींत. तुम्हांकडून निर्मूळ वृक्ष उभे होऊन येतात, त्यांचीं उत्तरें मात्र सरळ रीतीनें लिहीत गेलों. कोंडाईबारीवरील छावणीच करतां गोड त्याहावें, नाहीं तर गोड लिहूं नये, असा भाव येथें नाहीं. मुळींच गोड आहे तेथें गोडच लिहीत गेलों व लिहीत जाऊं. खाना छ १९ जमादिलावल हे विनंति.

ले. २६१ [३२४] श. १७०२ वैशाख व. ६ ता. २४-५-१७८०

॥ श्री ॥

राजश्री सदाशिवपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरी. छावणीचे प्रकार तरि सुरतेस इंग्रेज छावणीस आले आणि उभयतां सरदारही सारे फौजेनिशीं इकडे आले, तर इंग्रेजांनीं अमदाबाद तालुका व डबाई वगैरे महाल त्यांणीं घेतले ते त्यांकडे कायम राहिले व फत्तेसिंग गायकवाड यांचे पोटीं निर्वेध पडले. बाजत बरसात मसलत करणें तीं इंग्रेज दुसरीकडे करतील. तेव्हां साधल्या गोष्टी पाठीमागें पडल्या ही गोष्ट चांगली नाहीं, याकरितां सरदाराकडील दहा हजार फौज व गणेशपंत[1] सुद्धां कोंडाई बारीवर ठेवावे म्हणजे सुरतेवर दबाव पडेल आणि उभयतां सरदारांनीं अमदाबाद प्रांतीं छावणी करून अमदाबाद बरसातींत घ्यावी. तिकडे राहिल्यावर फत्तेसिंग सहजच येऊन मिळतात, दुसरा उपायच त्यांस नाहीं. डबाईही सहजांत येईल. तेव्हां इंग्रेजांनीं सालमजकुरीं जितकें साधलें तितकें त्यांच्या हातून जाऊन, त्यांचे तालुके खराब हे अधीक त्याची नुकसानी असें त्यास समजलें. परंतु पाणी उतरतांच जिकडे इंग्रेज रोंख धरतील तिकडे उभयतां सरदारांनीं यावें असें पक्कें होऊन जाहल्यास हा एक पक्ष आहे; अथवा अधिक फौज अमदाबाद तालुक्यांत छावणीस ठेवून मुलुख मारावा आणि निमे फौजेनिशीं उभयतां सरदारांनीं कोंडाईबारीवर छावणी करावी, परंतु या गोष्टींत अमदाबाद येणार नाहीं. मुलुख मात्र ताराज होईल. फत्तेसिंग काय करतील तें करूत. असें आहे परंतु उभयतां सरदार कोंडाईबारीवर राहिले असतां इंग्रेजांवर जरब चांगली राहील. दोहोंतून जें चांगलें दिसेल तें करावें. बराणपूरचे छावणींत एकही रोंख राहत नाहीं. तेव्हां तेथें रहाणें मसलतीस ठीक नाहीं. मसलतीचे व दूरदेशींचे अर्थ पाटीलबावांनाही फार समजतात. कोणताही प्रकार करणें तो मसलतीस पेंच न पडे असाच करतील. आम्हांस सुचले प्रकार लिहिले आहेत. रवाना छ १९ जमादिलावल हे विनंति.

ले २६२ [३०१] श. १७०२ वैशाख व. ६ ता. २४-५-१७८०

श्री.

राजश्री सदाशिवपंत स्वामींचे सेवेशीं—

विनंति उपरि. आमची विकृति कारभाऱ्यांस आली म्हणोन जांबगांवीं आमचें पारपत्य करीत होते तो डाव चुकला. परंतु डंश चित्तांतील कसा जातो ? या करतां आम्हांस ईर्षा देऊन लिहितात. आंतून इंग्रेज व गायकवाड मिळवून घेतलेच आहेत. एक होऊन तोफखान्यानें इंग्रज सडकील, फौजेनें गायकवाड दमवील, परंतु ज्याचे निष्ठेंत भंग नाहीं

---

१ गणेश विश्वनाथ बेहरे.

लो अपेश पावणार नाहीं. चिंतो विठ्ठल वगैरे यांणीं छापे आणिले, दगे केले, दर जुंजांत आमचेच घोडे माणूस जखमी व मरत गेले, इतर कोणाचें नाहीं. होळकराकडील पेंढाऱ्यांनीं चार दिवस मेहनत केली, शेवटीं त्यांसही मना केलें. याप्रमाणें संगत असोन आम्ही तों भ्याडच. इंग्रेज चालून आला तेव्हां फजीत पावला. गायकवाडाचें राजकारण इंग्रेज कूच करून गेल्यावर इकडे येतो असें होतें, परंतु अमलांत आलें नाहीं. फिरून सूत्र लाविलें कीं, इंग्रेज सुरतेस पावते करितों,तुम्हीं आडवें न यावें व बशतीं यादींतील काढावीं, त्यांचीं उत्तरें केसोपंतांनीं केलियाचा व साहा घटिका रात्रीस केसोपंतास गोटा बाहेर करून दिल्याचा, दिवसा ठेविण्यास पुण्याहून गोपाळराव रामचंद्र निसबत गायकवाड व गोविंदराव देशमुख चांभारगोंदेकर निसबत माधवराव जाधवराई, व हरिपंताकडील कारकून असे चौघे कारकून व दोन हुजरे सरकारचे फत्तेसिंगाकडे राजकारणास आले आहेत त्यांसि गाठ पडेल म्हणोन केसोपंतास पांहाटेचे रात्रीसच काढून दिल्हा. पुण्याहून पत्रें तुम्हांस येतात कीं राजकारणाचा अखत्यार पाटीलबावांचा. मग सरकारांतून कारकून हुजरे कां पाठवावे ? राजकारण करून पाहावें म्हणून पाठविले तर, त्याणीं आम्हांसी भेटून गायकवाडास भेटावयास जावें, तें कांहींच नाहीं. किती दिवस त्यांचे लष्करांत आले, भेटले, आम्हांस चिटी देखील नाहीं. सुरतेस गेले, दादांस भेटले, दाहा रोज तेथें राहून बायकांशी दादांशीं राजकारणें करून आले. सुरतेंत गणेशपंतांनीं कसे जाऊं दिले व ते तेथून इकडे कसे येऊं दिले, हें आम्हांस ठीक दिसत नाहीं. धनीपणा कारभाऱ्यांकडे आहे आमचें पारपत्य त्यांचे मनांत आहे म्हणून अशीं कारस्थानें चाललीं आहेत. इंग्रेज नर्मदेचे उत्तरतीरीं असतां मोहीम आमचे गळां आहेच. रेवापार दक्षिणतीरीं जाऊन सुरतेस छावणी करील, इकडे कारभाऱ्यांनीं सांभाळून घ्यावा. आम्ही चाकरी धन्याची जाणतों, त्यासि बेमानी करणें नाहीं. थोर झाल्यास बलावितील तेव्हां जाऊं. तोंपावेतों रेवा उतरणें नाहीं. कारभाऱ्यांसही ममता करून चालवणें तर दुरून चाकरी सांगावी यांतच निखालसता समजेल. अगदींच आम्ही नसावे असें असल्यास आणखी छायेस पोट भरूं, परंतु या उपरि रेवापार जाणार नाहीं. याप्रमाणें त्याहावयास आज्ञा केली त्यावरून लिहिलें असे. म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. त्यास कारभारी असतील त्यांस विकृति येईल. आम्ही कांहीं कारभारी नाहीं. श्रीमंतांचे सेवक, चाकरी करावी इतकें जाणतों, सुचेल तें त्याहावें, बोलावें, करावें, इतकें जाणतों व जेथवर आपले बस्तु सेवा होईल तितकी करावी. सर्व भार पाटीलबावांवर असतां अशीं बोलणीं बोलून तुम्हांकडून लिहावीं यांचें कारण कांहीं दिसत नाहीं. जे दौलतेचे स्तंभ व ज्यांजवर दौलतेची मदार आणि आमचा अकृत्रिम भाऊपणा असतां जांबगांवीच आमचें पारिपत्य करीत होते हें बोलणें कसें निघालें ईश्वर जाणे. तो डाव चुकला म्हणोन इंग्रेज, गायकवाड यांस मेळवून पारपत्य करावें हें तो याहून विशेष कल्पना चालली यांचें उत्तरच नाहीं. यांत एक खरें कीं निष्ठेंत अंतर नाहीं. येणें करून इंग्रेज गायकवाड फजीतच पावत गेले व ज्यांणीं लबाड्या केल्या तेही फळें पावले हें यथार्थ. पाटीलबावांची निष्ठा तशीच आहे. ईश्वर दिवसेंदिवस अधीकच यश देईल, हींच इच्छा आमची

आहे. सूत्रें अनुसंधानें सोबत्यांनीं वगैरे खेळविलीं, छापे आणविले. म्हणोन लिहिलें, त्यास जो एकनिष्ठेनें काळजी धरून खावंदाचें काम करतो त्यापुढें कोणाचें चालत नाहीं. व पाटीलबावा मेहनत करून लढाया करतात म्हणूनच दरजुंजास माणूस घोडे मरतच गेले, जो तमाशा पाहणार त्याचें कशास मरेल ? हीं उघडीच गोष्ट आहे. पेंढाऱ्यांस मना करविलें हें तर अपूर्व वाटलें. असो, जे असें करतील ते फळेंही पावतील. ज्याणीं बहुत लढाया मोठ्या मोठ्या मारल्या त्यांस भ्याड म्हणत असतील ते बुद्धिमान म्हणावे ! गायकवाडाचा मजकूर विस्तारें पूर्वी लिहिलाच आहे. पुण्याहून गोपाळराव रामचंद्र पाठविले येविशीं पूर्वी लिहिलेंच होतें. हल्लींच्या तुमच्या लिहिण्यांत गोविंदराव व हरिपंताकडील कारकून व विसाजी कृष्णाकडील मल्हारपंत असे चौघे सुरतेस येऊन, दादाशीं बायकांशीं राजकारण करून, गायकवाडाकडे आले, त्यांची केसोपंताची गांठ पडेल म्हणोन केसोपंतास रात्रीसच काढून दिल्हा असें लिहिलें. तेव्हां याजवरून व मागील गोष्टीवरूनही बातम्या यथार्थ कळतात व सांगणार सांगतात, त्यांत केसोपंत गेले होते तेव्हां वर्तमान खरेंच असेल. तुमचें पत्र येतांच माधवरायाकडील गोविंदराव चांभारगोंद्यास बायकोस बरें वाटत नाहीं म्हणोन तेथें फार दिवस आहे, त्यास बलावूं पाठविलें आहे, व मल्हारपंत विसाजीपंताकडील येथेंच आहे. दोघांस पाटीलबावांकडील गोविंदपंत येथें आहेत त्यांस भेटविले. हरिपंताकडील कारकुनाचें नांवच लिहिलें नाहीं, येरवीं तोही भेटविला असता. गोंदवानें रात्रीस केसोपंतास काढून दिलें तें इंग्रेजांच्या भयाकरितां असेल, त्याचा ग्रंथ विपरीत लावून चांगला बनाविला तोच ध्यानांत आला. तेव्हां मुळींच चौघे कारकून गेले नाहींत मग दादा, बायका, गायकवाड यांकडे राजकारणें खरीच जाली असतील ! तेव्हां पाटीलबावांस त्यांणीं भेटून जावें ते कां न गेले हें ठीकच आहे. जेव्हां चौघे कारकून जाऊन राजकारण होतें आहे तेव्हां तुह्मांस लिहिलें कीं राजकारणाचा अखत्यार पाटीलबावांचा असतां याप्रमाणें केलें तेव्हां दोष खराच. हा दोष ज्यापक्षीं आहे त्यापक्षीं इंग्रेज सुरतेस आल्यावर रेवा दक्षिण तीरची मोहीम सहजच इकडे लागली. ज्यापक्षीं कारकुनच येथें पाटीलबावांकडील कारकुनास भेटविले तेव्हां अवध्याच गोष्टी एतद्विषयीं संदेहाच्या जाऊन जिकडे इंग्रेज जाईल त्याचे छातिवर छावणी करणें प्राप्त हें सिद्धच झालें. ही फार चांगली गोष्ट आहे. कारकुनच गेले नाहीं त्यापक्षीं गणेशपंत काय जाऊं देतात ? आणि जाणें कसें घडेल ? हें पाहावें. दुरून चाकरी करून बेमानी होणार नाहीं, रेवा उतरणें नाहीं, हीं बोलणीं मात्र बोलावयाचीं मर्जी त्यांची असल्यास त्यांणीं बोलावीं; परंतु श्रीमंत लहान, सर्व भार पाटीलबावांवर व दौलतेंत जीव काय आहे, हें संभाळावयास योग्य कोण आहे, हे सर्व अर्थ त्यांस समजतात. त्याप्रमाणें समजून करितात. मग आम्हीं काय त्याहावें ? परंतु या गोष्टी बोलण्यांत देखील येऊं नयेत व यांचें कारणही नाहीं. ज्यांच्या घराण्याचे एकनिष्ठतेचे बाणे चालत आले त्यांच्या चित्तांत दुसऱ्याचे छायेस पोट भरूं हीं अक्षरेंच येणार नाहींत ही खातरजमा आहे. इंग्रेज गायकवाड मिळवून घेतले असते तर मुंबईकर इंग्रेज बेलापुरास उतरून बेलापूर व परसीक घेऊन पनवेलीस

आले त्याजवर राजश्री सखारामपंत पानसी व बाजीपंत जोशी यांजबरोबर तोफखाना फौज व गाडदी देऊन पाठविले, हे घांटावर जातांच पनवेलीहून तळोजास जाऊन मजबुती केली तों याणी जाऊन गांठ घातली, दुसरे दिवसीं हल्ला करून चार पांचशें माणूस ठार त्यांचे गोरे व फिरकीवाले मिळोन मारले, तोफा चार व गरनाळ एक पाडाव आणिली, कांहीं गोरे धरले, त्यांत एक सरदारही पाडाव आला आहे, हें होतांच तिकडे त्यांणीं कल्याण घेतलें, तेव्हां कल्याणवर जाऊन वेढा देऊन मारगिरी होत आहे. हा मोडा जाहला व तोफा आल्या यामुळें मुंबईकरास चांड येऊन आंगेजणी करीत आहे, श्रीमंतांचे दैवें करून जरबच पावतील, तेव्हां मिळवून घेतल्यावर असें कां व्हावें ! सारांश इकडून दादांशीं व बायका व गायकवाड यांकडे कोणी राजकारणास पाठविलें नाहीं व पाटीलबावांचें वांकडें व्हावें हें चित्तांतही नाहीं. अखत्यार इंग्रेजांच्या मसलतीचा पाटीलबावांवरच आहे. कोणेही प्रकारें मसलत चांगली शेवटास जावी, पाटीलबावांस यश यावें, भाऊपणा दिवसेंदिवस अधिक चालावा, हींच इच्छा आहे. रवाना छ १९ जमादिलावल हे विनंति.

२६३ } ३०६ } { श. १७०२ वैशाख व. ६ ता. २४-५-१७८०

श्री.

राजश्री सदाशिवपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. कोंडाईबारीवर छावणी करावयाचे मी बोलतों यांचें कारण इंग्रजाचे उरावर कटार राहील. सुरतेची बंदी जहाल्यास उत्तम. बऱ्हाणपुरीं राहिल्यास इंग्रज पुण्याकडे गेल्यास आणतां येतील, व मनांत कलोषता आल्या आहेत त्यांची पैरवी होईल. कागद पत्र येतील जातील व येणारास जवळ पडेल. हरतऱ्हा होऊन निखालसीचा प्रकार घडेल या अंदेशावर मी बोलतों, श्रम करतों. घडेल तें खरें. आणि दूर गेलें तितकें बरें. इंग्रज व दादांचा सलुखा होत असला अगर बिघाड ही जहाला आणि पुण्यावर चालून आले तर सरदार नसतांही आम्ही संभाळून घेऊं. असें असल्यास वृथाश्रम कशास करावे ? पाटीलबावा तिकडे आल्यानंतर एकादी गोष्ट त्यांचे दृष्टी विलग पडली तर माझें पारपत्य होईल. नेकीबदीचा अंदेशा दोहींकडून सेवकाकडे नसावा. दगाफटका कोणीं कोणास करूं नये म्हणोन लिहिलें त्यावरून अपूर्व वाटलें. परस्परें सुखदुःखाचे सोबती पाटीलबावा आम्ही. खावंद एक, त्यांत भाऊपणा, खावंदाच्या चाकरीवर एकनिष्ठ. त्यांत क्रियाही जहाली. त्याप्रमाणें परस्परें करण्यांत येतें. तेव्हां दगाफटक्याची शंका तुमचे चित्तानें घेऊन कसें लिहिलेंत ? तुमचा उपाय नाहीं. तेथील सारी मंडळी बोलतां बोलतां चित्त बेहरम होऊन गेलें असेल. त्यामुळें असें लिहिण्यांत आलें. त्यास या गोष्टी घडावयाच्याच नाहींत, मग त्याहावें काय ? तुम्ही कोंडाईबारीवरील छावणीचीं साधकें लिहिलींत तीं प्रमाण. परंतु मनसुब्याच्या रीतीनें दोन प्रकार आलाहिदा पुरवणी पत्रांत लिहिले आहेत, त्यांतूनच चांगला दिसेल तो करावा. रवाना छ १९ जमादिलावल. हे विनंती. ×

×येथून पुढील शंभरदीडशें पत्रें सदाशिव दिनकर व नारो शिवदेव आणि नाना फडणीस यांजमध्यें गेलीं आलेलीं आहेत.

श्री.

ले. २६४ [३०२] { श. १७०२ वैशाख व. ६ ता २४-५-१७८०

राजश्री सदाशिवपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. पुण्याहून चौघे कारकून सुरतेस येऊन दादांकडून व बायकांकडून मनसबा काय करून आले असनील [तो] ते जाणत. मजकूर गोंदबाशीं† बोलून गाडरशीं बोलले त्यानें उत्तर केलें जे, दादासाहेबांचे पत्रावांचून मजला कबूल नाहीं. सबब गोविंदराव आणखी एक गृहस्थ पुन्हा सुरतेस दादांचें पत्र आणावयास गेले आहेत. मोहीम सांगितली, आह्मांस दोष लावून चित्तास येईल तसें लिहितात, आधीं लिहिणें उचित नाहीं, तत्राप दोष लावून लिहावें, इरेस घालावें, साहित्य करावें, आमचे बगलेंत आग आहे ती विझून मेहनतीविशीं इरेस घालून, सरकार काम करून घ्यावें ही वाट आहे, तें न करितां आमच्या पारपत्याचींच विवंचना होत आहे. नाहीं म्हणतील तर गोंदबा स्पष्ट सरकारचे नाशास प्रवर्तक हें लिहिलीं गेलीं असतां खरें वाटलें नाहीं. सांप्रत शि नो र, चां डो द, क र्ना ली व राजपिंपळ्याचा हिस्सा गोंदबानें धन्यास न पुसतां इंग्रेजास सनदा दिल्या, आणि डबई जिल्हा परगणा आपले बायकोचे चोळीबद्दल घेतला. इंग्रेज कूच करून मागें गेला असतां त्याचपासून खालीं करून गोंदबानें आपला अंमल बसविला. तेव्हां गोपाळराव वगैरे चौघे गृहस्थ पुण्याहून आलेले ते समजावीत असतील कीं, डबाई, अमदाबाद सरकारांत देतील तर आम्हांपासून याद करार करून नेली आहे कीं, अमदाबाद, डबाई आम्हांकडे ठेवावीं. सरकारचा पैका मागूं नये. कोणे प्रकारें इंग्रजांतून गायकवाड काढावा या अर्थे बशर्ते इंग्रेजाचे पारपत्यास तुम्हीं आम्हांस मिळाल्यावर अशी बशर्ते घालून याद दिली असतांही आले नाहींत, तेव्हां हरामखोर कीं हिंदू हें समजावें. त्यांचा विश्वास धरून त्यांजकडे कारकून पाठवून राजकारण लाविलें, त्याजपेक्षां आम्ही हरामखोर ठराविले. तेव्हां गायकवाडानें इंग्रेजांकडे राजकारण लाविलें. आह्मांस तोंडघशीं द्यावें ही मसलत. कारभारी कुडवितात, धन्याचें हित करतात. आम्हस लिहितात [कीं] एक वर्ष लागो दोन वर्षे लागोत, नेस्तनाबूद इंग्रेज करावा; सलुख करणें तर नबाब, भोंसले, नाईक व सरकार चौघांचे समतें करावा; आपण आंतून गृहस्थ पाठवून राजकारणें करतात. कसें. ही करून आम्हीं तोंडांत खावी, हे मनोरथ सुफल होत. या उपरि आम्ही नर्मदा उतरत नाहीं. गाडर सुरतेस छावणीस जातो. कारभाऱ्यांनीं दादास इंग्रेजास मेळवून घेतलाच आहे तेव्हां दोन नाहींत. इंग्रेज बेमान [आहे असें] लिहितात हें तर आमचे समाधानार्थ. याचें उत्तर वीस बावीस दिवसांत आणवणें म्हणोन पाटीलबावा बोलले म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें.* त्यास विसाजी कृष्ण याकडील कारकून मल्हारपंत पुण्यांत आहेत व गोविंदराव चांभारगोंद्यांत आहे

† गोविंद गोपाळ कामतेकर गायकवाडांचा दिवाण इंग्रजांस सामील होता.

* येथपर्यंत पाटीलबावांच्या बोलण्याचा आशय.

तो आणविला आहे. असें असतां दादाकडे इ रतस गेला आणि गाडराशीं गोंदबाचे विद्यमानें उत्तरें प्रत्युतरें जालीं हें फारच खरें वाटलें- दोष लावून चित्तास येईल तसें आम्हीं कोणतें लिहिलें ? ज्या नव्या नव्या गोष्टी उत्पन्न करून संदेह घेऊन तुम्ही लिहितां त्याचे पा हे रे मात्र विस्तरें लिहितों. मसलतीचा जिम्मा हे तिकडूनच लिहित येत गेले तें आम्हीं सरळ रीतीनें लिहित गेलों. सरकारचा मजकूर सुचला तो लिहिला. हें कांहीं वांकडे भावें करून लिहिलें नाहीं. कांहींच लिहूं नये अशी मर्जी असल्यास तसेंही घडेल. दोष लागावा अशा भावेंकडून लिहिण्यांत येत नाहीं. स्वभाविक चांगली गोष्ट मनांत येते ती लिहीत असतों. इरेस आम्ही काय घालावयाचें आहे ! थोर आहेत ते आपल्या एकनिष्ठतेची व थोरपणाची इरे त्यांस असते. बगलेंतील आगीचें पूर्वी बोलण्यांत येतच गेलें येविषयींचें उत्तर जहालें त्याचें स्मरण असेलच. साहित्यही होईल तेथवर करीतच आहों. इरेस घालून सरकार काम करून घ्यावें ही वाट आहे हें खरेंच, परंतु जे काम करीत नसतात त्यांस ही गोष्ट योग्य. पाटीलबाबांचें करणें तसें नाहीं. मन घालून सरकार काम काळजीनें करतात तेव्हां इरे काय घालायची ? गोंदबा सरकारचे नाशास प्रवर्तक असें बळल्यावर आम्ही काय उणें केलें ? रांडा, पोरें धरून कैद केलीं, किल्यावर घातलीं. मनसुब्याच्या रीतीनें पाटीलबावा तिकडे गेल्यावर फत्तेसिंग येऊन भेटतील. गोंदबा कामावर पडतील असें समजून राखीत गेलों. वाकडें पाऊल दृष्टीस पडल्यावर मुलाहिजा केला नाहीं हें ध्यानांत येतें कीं नाहीं? चोळीबद्दल महाल घेतले ती चोळी किल्ल्यावर अडकविली आहे. आतां हे शास्त्रार्थ लिहून काय ? पारपत्य केल्यावर अवघ्याच गोष्टी होतील. बोलणारच पुण्याहून कोणी गेले नाहींत, मग गोंदबाचें बोलणें डबाई अमदाबाद सरकारांत देतील हें काय धरावयाचे आहे? पाटीलबावांनीं बशतीची याद गायकवाडास लिहून दिली ती समजूनच दिली असेल. असें असतांही आले नाहींत, तेव्हां हरामखोर कीं हिंद् हें समजावें म्हणोन लिहिलें. त्यास इंग्रजास भेटले तेव्हांच हरामखोर. त्यावर पाटीलबावा जात तों मर्यादा होती. तेही गेली. अस समजूनच जफ्त्या करून गोविंदराव गायकवाड यास पद यावें म्हणोन लिहून पाठविलें, तेव्हां समजूनच लिहिलें. इंग्रजाकडून गायकवाडास काढून पाटीलबावांस भेटावितों असें गोपाळराव येथें बोललें, त्यावरून रामजी पाटिलाच्या विद्यमानें त्याशीं बोलून पाठविलें. हा मजकूर पूर्वी दोन तीन वेळ लिहिण्यांत आलाच आहे. याखेरीज दुसरा जाबसाल कांहीं नाहीं व दुसरा कोणी बरोबरहि दिला नाहीं. त्याणे चिठ्ठी अथवा निरोप पाटीलबावांकडे पाठवावयाचा होता. मग काय प्रतिबंध असेल, ईश्वर जाणें दुसरें कांहीं नाहीं. तेव्हां गायकवाड, इंग्रेजाकडे राजकारण लाविलें गुडघा दिला असें घडतें कीं काय ? ही मसलत कारभारी बुडवतात म्हणोन लिहिलें त्यास, कारभारी बुडवितात किंवा कशी घडत आली हें ध्यानांत यावयाजोगेंच आहे. याचा विस्तार लिहितां फारच आहे. आंतून गुप्तस्थ पाठवून दादा, इंग्रज, गायकवाड, यांशीं राजकारण केलें नाहीं. वर्ष लागो दोन वर्षें लागोत, इंग्रजांचें पारपत्य करावें, हाच निश्चय पक्का आहे. तह करणें तरी चौघांचे विचारें करावा. जे निश्चय ठरले आहेत तेच कायम आहेत. इंग्रेज बेमान हें खरेंच लिहितों.

प्रत्ययासही आलें आहे व येईल. सुरतेस इंग्रज आला अथवा कोठेंही गेला तरी पाटीलबावांसच पारपत्य करावें लागेल. करीतच आहेत. संशय कोणें विशी घेऊं नये. रवाना छ १९ जमादिलावल हे विनंति.

लेo २६५ [३१८] | श. १७०२ वैशाख व. ६ ता. २४-५-१७८०

श्री.

राजश्री सदाशिवपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि, कित्येक संदेहामुळें रेवा उतरणार नाहीं असें म्हणतात, त्यास येथें रतीमात्र वांकडा अर्थ नाहीं,व पुढेंही घडावयाचा नाहीं.हे संदेह राजश्री नारोपंत,व रामजी पाटील यांची गांठ पडल्यावर अवघे दूर होऊन संतोषच होईल. कारभाऱ्यांसही ममता करणें तर दुरूनच चाकरी सांगावी असें बोलतात. त्यास राजश्री पाटीलबावांस चाकरी सांगणें ते श्रीमंतांनीं सांगावी. ते लहान तों पर्यंत जेथें उणें पडेल तेथें सांभाळणें त्यांकडे आहे. तेव्हां कारभारी काय चाकरी सांगतात ? रेवा उतरणार नाहीं ही गोष्ट चित्तांत देखील आणूं नये. सर्व भार त्यांवर. मसलत पडेल. तिकडे सांभाळणें त्याकडेसच आहे रवाना छ. १९ जमादिलावल हे विनंति.

लेo २६६ [४६३] | श. १७०२ वैशाख व. ६ ता २४-५-१७८०

श्री.

(रा पत्र छ १९ जमादिलोवल समानीन वैशाखमास.)

बहुत दिवस गुजरले आं मेहेरबांकडून खत येऊन खुषी होत नाहीं. त्यास दोस्तांचे अलमांत ऐसें नसावें. हमेश खत किताबतीचा शिलशिला जारी असोन आपली खेरखुषी कळवीत जावी. येखलासास लाजम आहे. आ मेहरबांचें जाणें ताहाल चेनापट्टण प्रांतीं होत नाहीं. आज पावेतों इंग्रजांस चहूंकडून ताण बसोन आयास यावे. भोंसले मातबर फोजेनशीं कटकच्या जिल्ह्यांत पोहोंचले; बलकी इंग्रजाचे तालुक्यांत हंगामा सुरू केला असेल. सरकारच्या फौजा व सरदार यांची व करनेल गाडर यांची दररोज लढाई होत आहे. घेराघेरीमुळें इंग्रज बतंग केले. चालून आले तेथें निभाव होईना, व सरदारापुढें मुकाबिल्यास कायम न रहावे. व गिराणी ही न्याहायत जाली. सबब इंग्रज माघारे सरून बडोद्याचे आश्रयास गेले. बिलफैल आं मेहरबांकडून ताण बसावा इतकाच तवकूफ. त्यास मसलहतीवर नजर देऊन जूद चेनापट्टण तालुकियांत जाणें होय तें घडावें. राव शिंदे यांचे पत्राचा अटकाव असलिया तेंही जलदच येईल. पत्राविशीं रावशिंदे यांजकडे बहुत वेळ कलमी केलें कीं रहाच्या खलशामुळें निभाव होत नाहीं. हमेशा हारकारे लुटले जाऊन सडे येतात, त्यास मोठी मसलत, तटून रहाणें मुनासब नाहीं. राव शिंदे यांचे पत्र येतांच आं मेहरबांकडे

पोंहोचावीत असों. ये बाबे खातरजमा असावी. इंग्रजांचे तंबीची मसलहत उमदी बरबस्त तदबीरें होऊन नमुदांत यावी हे सलाह नेक. याजकरितां मसलहतीस मदनजर राखून चेना-पट्टणच्या जिल्ह्यांत सरंजाम सुद्धां पहोंचवून तालुका ताख्त व ताराज करावा. सर्व दरजे व मरातब आं साहेबांचे दालानिशींत आहेत. कलमी करावें ऐसें नाहीं. मंमईकर इंग्रजांनीं कोंकणच्या सरहद्दींत शोखी केली. सबब सरकारची जमियेत जाऊन त्यांस तंबी करून कत्तल केलें. जरवा पांच चार होत्या त्या लुटून आणित्या. मुफसल कृष्णराव नारायण यांस लिहिलें आहे ते जाहीर करतील. म्हणोन हैदरअल्लीखां बहादूर यांस नानांचे नावें हिंदवी पत्र.

ले० २६७) [२२६] } { श. १७०२ ज्येष्ठ शु. १३ ता. १४-६-१७८०

श्री.

राजश्री विसाजीपंत[1] व सदाशिवपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. तुम्हीं छ २२ जमादिलावल नजीक वाघोड्याचे मुक्कामीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. " इंग्रेज नर्मदेच्या कांठीं पार आहेत. दोन तीन पलटणें अलीकडे होतीं. यास्तव बक्षी व भगीरथराव व पाराजीपंत सडे तिकडेच होते. मग सात रोज राहिला. देश वाईट. छावणीची सोय नाहीं. पाऊस लागल्यानंतर जाणें कठीण पडेल. याकरितां बक्षी वगैरे बोलावून घेतले ते आज आले. उदईक कूच होऊन ह्केलचा [हलोलचा ?] मुक्काम नेमला. दोहोदचे मार्गे माळव्यांत जाऊन नंतर छावणीचा विचार कोठें ठरेल ते विनंति करीन " म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास इंग्रेज रेवातीरीं असतां पाठीवरील फौज काढून आणिली येणें करून ते मोकळे जाहाले. सुरतेकडे कांहीं पलटणें आलीं व कांहीं मांडवीकडे आलीं व कांहीं पाण्यांतून कल्याणाकडे आलीं.पर्जन्याच्या व पाण्याच्या अडचणीमुळें निघणें प्राप्त जाहालें म्हणोन लिहिलें त्यास गोविंदराव गायकवाड यांजबराबर फौज द्यावयाची नेमली असेल तीच कांहीं दिवस इंग्रजाच्या शहावर असती तर इंग्रज फैलाव करूं न पावते. फार पावसाची झड वसावयाचे सुमारावर गोविंदरायाजवळ जाऊन रहाती. असो उभयतां सरदार वाटेच्या पाण्याच्या अडचणीमुळें माळव्यांतून येत आहेत. बरें आहे. परंतु जल्दीनें येऊन कोंडाईबारीवर उभयतांची फौजेसुद्धां छावणी करावी हें पुढील मनसब्यास उपयोगी चांगलें. सर्व भार राजश्री पाटीलबावांवर. उणें पडेल तिकडे संभाळणें त्यांस च आहे. दौलतेची काळजी वाहातात, तेव्हां उत्तम तेंच करतील. येविशीं येथून काय सुचवावें ? बराणपुरावर छावणी केली असतां मसलीतीचा रोंख सुटतो. याकरितां कोंडाईबारी-वर छावणी करावी हें चांगलें. उज्जनीस छावणी करावी असें झालें तर फारच विलग सर्व गोष्टीस पडेल. मग दौलतेची आशा कशास धरावी. ? रा॥ छ १० जमादिलाखर हे विनंति.

---

१ विसाजीपंत आठवले.

ले० २६८)
[२२४]

(श. १७०२ ज्येष्ठ शु. १४
ता. १५-६-१७८०

श्री.

राजश्री दिसाजोपंत व सदाशिवपंत स्वामींचे सेवेशी.

विनंति उपरि. गणेशपंत बेहरे यांजवर इंग्रजांनीं छापा घातला ते समयीं थोडीशी लढाई जाहाली, मशारनिल्हेस दोन तीन जखमा लागल्या, संभाळून निघोन हातगडाकडे आले, हें पूर्वी लिहून पाठविलेंच होतें. हे इकडे येतांच तिकडे पारनेर यावर इंग्रेज वर जाऊन मारागिरी किल्लेयावर केली. दोन तीन हले किल्लेकऱ्यांनीं मारून काढले. आतांच वर्तमान आलें कीं किल्ला त्यांणीं घेतला. पुढेंही ठाणीं घेत येणार. राजश्री सखारामपंत पानसे व बाजीपंत जोशी फौजे सुद्धां कल्याणकडे होते. त्यास मद्रासेहून तीन हजार माणूस इंग्रजांचे गलबतांतून मुंबईस आले व सुरतेहून दोन हजार माणूस मुंबईस आले. ते मिळोन वसईवर येणार. अशा बातम्या निकडीच्या आल्या त्यावरून उभयतां मशारनिल्हे वसईकडे गेले. कल्याणकडे दुसरी फौज रवाना केली. पर्जन्याचे दिवस, फौजेचें राहाणें कोंकणांत कठीण. इंग्रज पाईचीं माणसें, +त्यांस पर्जन्याचा विधिनिषेध नाहीं. आणि त्यांच जमाव तर इकडे भारी होत चालला व कोंडाई बारी पावेतों येऊन ते तिकडील बंदोबस्त करणार, याकरितां उभयतां सरदाराकडील दहा हजार फौज जलद कोंडाईबारीवर पाठवून छावणी करवावी. मागाहून उभयनां सरदारांनींही लौकर यावें. राजश्री पाटीलबाबांनींही या गोष्टीची तर्तूद केलीच असेल. राजश्री परशरामपंत भाऊ यांजकडील वर्तमान सिरोळ घेतलें व कितुरकर भेटल्याचें पूर्वी लिहिलेंच आहे. भाऊ गोकाकेकडे गेल्यावर येसाजी शिंदे व सटवाजी भोंसले व मानाजी शिंदे त्रिवर्ग मिळोन, हजार बाराशें राउत व दोन हजार प्यादा असे कोल्हापुराबाहेर निघोन, दौड करून गांव मारूं लागले. जयराम स्वामींचें वडगांव लुटलें. हें वर्तमान भाऊंस कळल्यावर चार हजार फौज त्रिवर्गावर रवाना केली. त्यांणीं येऊन गांठ घातली. लढाई जाहाली. तिघांजणांचा मोड जाहाला. तीनशें घोडे पाडाव आले. पाईचे लोक व स्वार त्यांजकडील फार मारले गेले. शेवटीं सडे दोन तीनशें रावतानिशीं पळाले. ते सामानगडच्या माचीस गेले. तेथपावेतों पाठलाग केला. याप्रमाणें वर्तमान जाहालें, तें कळावें याकरितां लिहिलें आहे. कितुराकरांकडील सरकारचीं ठाणीं येणें व कोल्हापुरचा बंदोबस्त राखणें याकरितां कृष्णे पलीकडे छावणीस फौज पांच हजार ठेवावी लागेल. रवाना छ ११ जमादिलाखर हे विनंति पै॥ छ २४ जमादिलाखर सुरूसन इहीदे समानीन मुक्काम उज्जनी.

+ इंग्रजांचें पायदळ फार व मराठ्यांचें घोडदळ या गोष्टीस उद्देशून वरील लेख आहे.

ले० २६९] [३२०] श. १७०२ ज्येष्ठ व २ ता १८-६-१७८०

श्री.

राजश्री सदाशिवपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. तुम्ही चंद्र २६ जमादिलेवल मुकाम नजीक बारीया[1] तालुके पायामड येथून पत्र पाठविले तें पावलें, स्वामींचीं आज्ञापत्रें सादर जाहली तीं बाघोड्यास पावलीं. राजश्री पाटीलबावांस दाखविलीं व त्यांचेंही पत्र दिलें. हैदरखानाचे निभावणीपत्राची परवानगी निक्षून जाहाली आहे. आज अगर उद्या घेऊन पाठवितों. म्हणोन विस्तारे लिहिलें तें कळलें. त्यास हैदरखानाचें पत्र लौकर येण्याविषयीं निक्षुण सांगितलें हें फार चांगलें जालें. येणेंकरून मसलतीस + + ++ उपयोग + + + पडेल पेशजी तुम्हीं पत्र पाठविलें होतें त्यांत लिहिलें होतें जे, मागाहून निभावणीपत्र पाठवितों त्याजवरून हैदरखानाकडील वकील येथें आनंदराव आहेत त्यांस सांगितलें जे, पाटीलबावांकडून निभावणीपत्र लौकरच येईल, असें सांगितलें त्यावरून वकिलानें पठाणास लिहून पाठविलें, जे निभावणीपत्र लौकर पाठविणार त्यावरून वैशाख वद्य एकादशीस हैदरखान डेरेदाखल जाले म्हणून बातमीचीं पत्रें आलीं तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. राजश्री भगीरथराव शिंदे वगैरे पांच सात हजार फौज व तोफखाना दोहदचे मार्गें पुढें रवाना जाले, मागाहून पाटीलबावाही जाणार. छावणीचा मजकुर उज्जनीचा तर्कांद दिसतो म्हणोन लिहिलें, त्यास ही गोष्ट ठीक नाहीं. मसलतीस विलग दिसतें याजकरितां तुम्ही राजश्री पाटीलबावांशी बोलून कोंडाईबारीकडेसच छावणी करावी असा निश्चय करावा ही गोष्ट जरूर जाली पाहिजे. येणेंकरून शत्रूवर दाब, मसलतीस उपयोग, याजकरितां कोंडाईबारीवरच छावणी करावी असें पाटीलबावांशीं बोलून निश्चय ठरेल तो लिहून पाठवावा. निभावणीपत्र पाठवितों म्हणून तुम्हीं पूर्वी लिहिलें होतें. त्याचा इशारा वकिलास केला त्यावरून डेरे दाखल जाले. हलीं पत्र द्यावयाची परवानगी जाली. पत्र लौकर पाठविणार त्यास पत्र लौकर येऊन त्यांजकडे गेलें म्हणजे ते कूच करून चेनापटणाकडे लौकरच जातील.+ सारांश उभयतां सरदारांची छावणी कोंडाईबारीवर व्हावी हें मसलतीस चांगलेंच. उज्जनीस राहिल्यानें फार विलग आहे. आम्हांस चांगलें दिसेल तें त्याहावें, सूचवावें. तेही दौलतेस व मसलतीस उपयोगी तेंच करतील हैदरखानाचे निभावणीपत्राची परवानगी जाली म्हणोन पूर्वी तुम्ही लिहिलें होतें. तींच अक्षरें हैदरखानाकडील आनंदराव यास दाखविलीं व येथुनहीं पत्रें हैदरखानास लिहिलीं कीं, राजश्री पाटीलबावाचें पत्र येतें, तुम्ही संदेह न धरतां लौकर निघोन चेनापटणाकडे जावें. त्यावरून हैदरखान डेरे दाखल जाले. कांहीं फौजा तिकडे रवाना केल्या. तुम्हांकडून मसूद्याप्रमाणें निभावणीपत्र रवाना जालेंच असेल. हें पत्र पावतांच हैदरखान लौकर जाईल. राजश्री नारोशिवदेव यांची रवानगी चहूं पांचा दिवशीं करतों. वांईहून आले.* रवाना छ १४जमादिलाखर हे विनंति.

---

१ देवगड वारिया गोधऱ्याजवळ. + येथें मूळ पत्र फाटून अक्षरें गेलीं आहेत. *यावरून नारोपंत वाईचा राहणार होता असें होतें.

ले. २७० }
[४७८] }

{श. १७०३ ज्येष्ठ व ९
{ता २६-६-१७८०

श्री

(छ २२ जमादिलाखर इहिदे समानीन.)

आं साहेबीं खत-फरहत नमत पाठविलें तें नेकवख्तीं पोंहचून षादमानीं हांसल जाली. आपण शुतर स्वाराबरोबर शिंदे यांचें खत पाठविलें तें पोंहचलें. लेकीन हें खत निभावणीचें नव्हे, येथून पत्र लिहिलें त्याचा जबाब आहे. आम्ही आपले दोस्तीवर नजर देऊन कूच-ब कूच रवाना होऊन गेलों असों. शिंदे यांणीं निभावणीचें खत पाठविलें म्हणोन पत्रांत लिहिलें तें कोठें राहिलें याची तहकिकात करून पाठवीतसें करावें म्हणोन कलमी केलें. चुनाचें आं मेहरबाकडोन खत येऊन पोंहतांच शिंदे याजकडे शूतर स्वाराची जोडी रवाना करावी तों इतकियांत शिंदे याजकडून निभावणीचें खत रवाना करावयावें राहिलें होतें तें मशारनिले याणीं पाठबून दिल्हें. हल्लीं आं साहेबाकडे पाठविलें आहे, पोंहचेल. खताची इंतजारी न करतां एखलासावर नजर देऊन कूच ब-कूच बेंगरुळाचे रुखें आं मेहरबांचें जाणें जालें, त्यास दोस्तीस लाजम व मसहलतीस मुनासब व दानाई व दूरंदेशीस नेक तेंच अमलांत आलें. करारांत व बोलण्यांत जे गोष्ट आली त्यांत इकडून दुसरा अर्थ होवयाचा नाहीं. बेविशीं खातरजमा असावी. खुलस करार बमोजीब सरकारांतून कोणताही गुंता राहिला नाहीं. आं साहेबी बेंगरुळावर मुक्कामात न होतां जलद मुखालिफाचे तालुकियांत पोंहोचून मुलुख ताख्त व ताराज करावा. व रयतास आयास आणून तंबी वाकई अमलांत यावी, व कृष्णराव नारायण वगैरे यांची रवानगी इकडे जलद व्हावी. आं मेहरबां करार-बमोजीब अमलांत आणतील, या बाबे दोस्तदाराची खातरजमा आहे. बाजे मरातब राव मशारनिले यांस कलमी केलें ते बयान करतील त्यावरून वाजे होईल. म्हणोन नवाब हैदरअलीखां बहादूर यांस नानांचे नांवें हिंदवी पत्र.

ले०२७१ }
[२२७] }

श. १७०२ ज्येष्ठ व १२
ता २९-६-१७८०

श्री.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरी मुंबईचे बातमींत वर्तमान आहे कीं, राजश्री पाटीलबावांस कलकत्तेकरांनीं पन्नास लाख रुपये द्यावयाचे करार केले त्यांपैकीं तीस लाख रुपये तेथून रवाना झाले. म्हणोन येथें बातमी आली. तुम्ही तर हें वर्तमान कांहींच लिहिलें नाहीं. बारकाइनें शोध करून लिहून पाठवावें रा छ २५ जमादिलाखर हे विनंति.

ले. २७२ [४७१] श. १७०२ ज्येष्ठ. जून १७८०

श्री.

हैदरअल्लीखान यांजकडील वकील दोन आले. त्याचा तपशील लिहिला व पहिले वकिलास उमेदवार करून कारस्थानी केली, ते सर्व अर्थ समजण्यांत आले, ऐशियास हर कवाईतीनें सरकार काम ज्यांत चांगलें तें पेशजीपासोन करीत आलां, पुढेंही कराल, येविशीं खातरजमा आहे. नवाब निजामअल्लीखां वगैरे यांस पेशजी फरमान पाठवण्याविशीं तुम्हांस लिहिलें होतें, त्याप्रमाणें तुम्ही पातशाह यास अर्ज करून फरमान तयार करविले असतील. कदाचि [त्] नसले जालिया हल्लीं मसोदे पाठविले त्याप्रमाणें अर्ज करून फरमान तयार करवून पाठवावे. +

ले. २७३ [३२५] श. १७०२ आषाढ व. ७ ता. २३-७-१७८०

श्री

राजश्री सदाशिवपंत स्वामीचे सेवेसीं.

विनंति उपरि. राजश्री पाटीलबाबा उज्जनीस होळकर इंदुरास छावणी करणार ही गोष्ट मसलतीस फार विलग पडली. सर्वत्र जाहिराणा जाला कीं मसलत सोडून घरास गेले, ही गोष्ट उघडी बाहेरील समजणारांस दिसते. घरांतील रीतीनें पहतां पाटीलबावांस इंग्रजांचें पारपत्य करणें जरूर व त्याप्रमाणें काळजी धरून तर्तुद ही ते करीत आहेत ही आमची खातरजमाच आहे. परंतु बरसात होतांच फौज सुद्धां इंग्रजाशीं जाऊन गांठ घालीत तों पावेतों सर्वत्रांस विलगपणाचीं बोलणीं बोलावयास कारणें जालीं व इंग्रजांशींही यावरून चतुर्मासांत कोण कसें संधान लावील याचा संदेह प्राप्त आहे. यास्तव छावणीस इंग्रजांच्या उरावर मातबर सरदार योजून दहा बारा हजार फौजेनिशीं पाठवून नबाब हैदरखान व भोंसले यांस दुहेरी पत्रें पाठवावीं कीं, इंग्रेज जरवेंत आल्यामुळें सुरतेस छावणीस निघोन गेले. पुढें बरसात त्या प्रांती भारी, भारी फौजेस रहावयास अडचण, यास्तव पंधरा हजार फौज छावणीस अमके ठिकाणीं ठेऊन आम्ही उज्जन अथवा बराणपूर काय निश्चय ठरला असेल तेथें छावणीस आलों. सर्व तयारी जारी आहे. बरसात होतांच इंग्रजाचे पारपत्यास जाणें घडेल. छावणीस राहिलों हें हीं इंग्रजाचे तोंडावरच आहे व पल्ला ही नजीक आहे. जलदीनें जाऊन पोंचूं. जो नक्षा इंग्रजाचें पारपत्याचा ठरला आहे त्याप्रमाणें आपले आपले तर्फेचें इंग्रजाचें पारपत्य करावें. त्याप्रमाणें पत्रें जरूर पाठवावीं. येणें करून त्यांची खातरजमा पटेल आणि मसलत सोडणार नाहींत. पत्रें न गेल्यास मसलत सरदारांनीं सोडली असें होऊन अगदीं मनसबा नासेल. आज पावेतों खट-

---

+ हें पत्र पुण्याहून नानानें दिल्ली येथील हिंगणे वकिलास लिहिलेलें आहे.

पट करतां करतां हैदरखान बेंगरुळा पुढें गेले. मीर वगैरे फौजा पुढें रवाना केल्या. आपण ही मागाहून दरमजल जात आहेत. भोंसलेही बंगाल्यानजीक गेले. नबाबांनी ही आपले चिरंजीव याजवरोबर फौजेची तयारी करून बाहेर काढिले आहेत. हैदरखान इंग्रजांवर गेला ही बातमी नबाबास कळल्यावर आतां रहाणार नाहींत. असा मगसवा तोंडास आला असतां उज्जनीचे छावणीचें वर्तमान कळल्यावर सर्वांस संदेह पडेल. वास्तव पत्रें लौकर पाठवावीं म्हणजे दसरा होतांच चोंहोकडून ताण चांगला बसावया जोगा आहे. मनसबा रंगास आला आहे. सर्व ही मनसबा व दूरदेशी पाटीलबावा समजतात. आम्हांस जें सुचतें तें आम्ही ल्याहावें म्हणून लिहिलें आहे. +उज्जनीस गेल्यामुळें मसलतीस एक प्रकार जाहिराप्यांत दिसेल. तत्राप जाणें तर इंग्रेजांचे उरावर दहा बारा हजार फौज ठेवून पाठीवर रहाणें व्हावयाचें होतें. असो, पुढें तरी मसलतीस चांगलें पडे व दिसे असें करावें. रवाना छ १ रजब हे विनंति. पैवस्ता चंद्र २० रजब सुरसन इहिदे समानीन मुकाम उज्जनी बाहेर. हरनाथ काशीद.

ले. २७४]
[३२१]

[श. १७०२ श्रावण शुद्ध २
तार २-८-१७८०

श्री

राजश्री सदाशिवपंत स्वामींचे सेवेशीं

विनंती उपरि तुम्ही छ १२ साबानचें पत्र पाठविलें तें छ २६ मिनहूस पावलें. राजश्री पाटीलबाबा यांणीं बलावून सांगितलें जे, आम्हांस वरचेवर कोंडाईबारीवर यावें म्हणून लिहिलें येतें, त्यास गोहदकर जाट व इंग्रज एक होऊन शिप्री कोल्हारावर छावणी केली व नजफखानाची व जयपूरकरांची फौज एक होऊन होळकराकडील रामपुरा वगैरे महालांची ठाणीं उठवून त्यांणीं आपलीं कायम केलीं. असें असतां आम्ही देशीं गेल्यास माळवा शत्रू घेतील. मग जातीनें काय घडणें तें घडेल. फौज आम्हांजवळ राहणार नाहीं. याजपेक्षां कलकत्त्याहून दक्षणेकडे इंग्रज यावयास निघतात त्यांस वाट अंतरवेदींतून पडली आहे, ही मना केली म्हणजे सुरत गुंबईकरांची कुमक होणार नाहीं. पातशाहा व नजफखान यांस मिळवून घेऊन इंग्रजाचे पारपत्य करावें ही मसलत चांगली व ग्वालेरीचें वर्तमान गोहदकरांनी घेतल्याचें व रघुनाथराव रामचंद्र कुटुंबसुद्धां मारले गेल्याचें व आंबोजी इंगळे कुटुंबसुद्धां निघून आल्याचें व खानदेशांत केसो कृष्ण आल्याचें व सारेच देशी एक जागां जाल्यानें चहूंकडील मसलती कशा आटोपतात ? विचारास आलें तर सरकारांतून देश व कोंकणची मसलत सांभाळावी, नबाब भोसले यांची देखील कौज आणावी, होळकरांनी खानदेशचे महाल केसोपंतांनीं घेतले ते सोडवून खानदेश व गुजराथ मिळून इंग्रजाचें पारपत्य करावें. आम्हांस सांगितल्यास पातशाहा नजफखान व राजेरजवाडे मिळून घेऊन इंग्रजांशीं गांठ घालितों, याप्रमाणें विचारास आलें तर होळकरासही पत्रें पाठवून खान

+येथून अक्षर खुद्द नानांचें आहे.

देशची मसलत याजकडे लावावी. आम्हांस हिंदुस्थानांत जाण्याची परवानगी पाठवावी. म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. त्यास येविशींचीं उत्तरें राजश्री पाटीलबावाचें पत्र आलें त्याचीं विस्तारें उत्तरें लिहिलीं आहेत त्याजवरून तुम्हांस सविस्तर कळेळ. पूर्वी तुमचीं दोन पत्रें पुढील मसलतीच्या मजकुराचीं आली होतीं त्यांचीं उत्तरें पूर्वी दुहेरी लिहून पाठविलीं तीं पावलींच असतील. इंग्रजांच्या तीन मसलती एक हिंदुस्थान, एक गाडर, एक मुंबईकर, अशा तीनहीं करणें प्राप्त. त्यांत हिंदुस्थानचे इंग्रजाचे मसलतीस पातशाहा नजफखान अनकूळ होतील यामुळें हलकी जाईल, मुलूक व पैकाही सरकारांत येईल, अशी आहे. खानदेश गुजराथ व देशची मसलत औघड आहे. यास्तव राजश्री पाटीलबावांचें येणें कोंडाईबारीकडे जाहल्यास फार चांगलें; नाहीं यापक्षीं होळकर फौजसुद्धां व सरकारचे सरंजामी पवार व राजश्री शिवाजी विठ्ठल वगैरे मिळून भाद्रपदमासीं कोंडाईबारीवर येणें होय असें करून मग पाटीलबावांनीं हिंदुस्थानचे मसलतीवर नमूद व्हावें. होळकराचा अनमान इकडे यावयाविषयीं जाहल्यास पाटीलबावांनीं कोंडाईबारीकडे परिछिन्न यावें. होळकरास पत्र पाठवावें म्हणोन लिहिलें त्यास येथून पत्रें पाठवावीं त्यांचे जाब त्यांणीं येथें लिहून पाठवावे, फिरून त्यांचीं उत्तरें जावीं, या खालींच दिवस निघोन जातील. मसलतीस दिवस राहिले नाहींत. याकरितां राजश्री पाटीलबावांनीं होळकराम अथवा त्यांजकडील कारभाऱ्यांस बलावून आणून साफ पुसावें कीं, एक हिंदुस्थानची मसलत व एक गाडराची खानदेश गुजराथ सुद्धां; यांतून तुम्ही कोणती करतां ? जी ते कबूल करतील ती त्यांस सांगून त्यांणीं तर्तुदेस लागावें आणि उभयतां सरदारांनीं सरकारांत पत्रें पाठवावीं. याउपरि अवकाश राहिला नाहीं. इंग्रज तो पर्जन्यांतही पेशकदमी करीत आले. तेव्हां ते दसरियाची वाट पहात नाहीं. असें मनांत आणून लौकर तर्तुद दोहीकडील व्हावी. कोणाकडे कोणती मसलत हा उभयतां विचारें राफता लिहून पाठवावें. त्याप्रमाणें सरकारांतून पत्रें पाठवावीं असें असल्यास पाठवूं. परंतु पत्राची वाट न पहातां आपल्या कामावर नमूद व्हावें. करकड इकडील अडचणीचे प्रकार पूर्वी तुम्हांस विस्तरें लिहून पाठविलेच आहेत. त्यांतही श्रीमंतांच्या दैवें करून जें घडेल तें खरें नबाबाची व भोसल्याची फौज इकडे आणविली असतां न यावयाचीं कारणें पूर्वी लिहिलींच आहेत. त्यावरून कळतील. रवाना छ ३ रमजान हे विनंति.

ले. २७५ [३२२] | श. १७०२ श्रावण शु. ३ ता ३-८-१७८०

श्री.

राजश्री सदाशिवपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. पूर्वी तुम्हीं राजश्री पाटीलबावांस राजश्री पुरुषोत्तम महादेव[1] यांचें

---

१ हिंगणे, दिल्लीच्या वकिलातीवर.

पत्र आलें होतें त्याची नक्कल येथें पहावयाकरितां पाठविली, व सरकारांतही मशारनिल्हेचीं पत्रें आलीं होतीं त्यांतील सारांश पहातां, पातशाहा व नजफखान यांच्या मनांतून इंग्रेजांचें पारिपत्य करावें, इकडील फौज मदतीस असावी, उभयतां सरदारांनीं गुजराथचे मसलतीचा पिछा सोडूं नये; व पातशाह व नजफखान यांस टाकून इंग्रजांकडील राजकारण आलें असतां स्नेह करूं नये. ` विषयीं वचन प्रमाण परस्परें खातरजमेचीं झालीं असतां, पातशाह व नजफखान इंग्रजांची मसलत करतात असे अर्थ त्यांत लिहिले आहेत. त्या पक्षीं उभयतां सरदारांकडील दहा बारा हजार फौज पातशाहाव नजफखान यांशीं पक्का करार परस्परें होऊन त्यांकडे पाठविलीं असतां ते इंग्रजांशीं बिघाड करून मसलत करतात, आणि उभयतां सरदार कोंडाईबारीकडे आले असतां हेही मसलत चांगली होईल. उभयतां सरदारांतून एकजण कोंडाईबारीकडे येऊन एकानें हिंदुस्थानची मसलत करावी हें तों पातशहास फारच अ कुलतेंचें पडेल. सारांश या समयीं पातशाहा व नजफखान यांस जरूर मेळवून घ्यावें. त्यांचा आपला करारमदार पक्का करावा. मग फौज अथवा एका सरदारान जाणें कोणतें ठराव करणें तें करून लौकर करावें. परंतु पातशाहा व नजफखान यांस मेळवून घ्यावें. हें तुम्ही पाटिलबावाशीं बोलून लौकर अमलांत येई तें करावें. आतां दिवस राहिले नाहींत. त्वरा व्हावी. रवानां छ ३ रमजान हे विनंति.

ले. २७६] [३२६] { श. १७०२ श्रावण शु.४ ता ४-८-१७८०

श्री.

राजश्री सदाशिवपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. आलीकडे तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यास राजश्री पाटीलबावा पुढील मनसुब्याची तरतुद व मसलत कशी करतात हें सविस्तर लिहून पाठवावें. पाटीलबावांस सर्व प्रकारें श्रीमंतांचे दौलतीची काळजी आहेच; व सर्व भारही त्यांवरच तेव्हां येथून विस्तारें काय त्याहावें व जें सुचत गेलें तें पूर्वी लिहित गेलोंच आहों. उज्जनीस गेल्यामुळें व फौजेस निरोप देतात या वर्तमानानें चहूंकडे अंदेश पडले आहेत, त्यांची निराकरणें आम्ही करावयाचे रीतीनें करीतच आहों. परंतु इंग्रजाची मसलत शेवटास नेली तरच सर्व गोष्टीचा परिणाम उत्तम. त्याची तरतूद साल्मजकुरी तरी लौकर व्हावी. भाद्रपद मासीं फौजे सुद्धां कोंडाई बारीवर आणि गोविंदराव गायकवाड याजबराबर दहा बारा हजार फौज देऊन अमदाबाज व बडोद्याकडे संगाम सुरू व्हावा. इंग्रजाचें कोशल ठरलें त्यांतील बातमी ऐकण्यांत आली आहे कीं गुजराथची ममलत गुदस्तां बेत केल्याप्रमाणें अमदाबाज डबाई घेऊन मुलूक कबजेंत आणला आणि स्वस्थपणें सुरतेस आलों, छावणी केली. माल मजकूर बरसात होतांच, बिबहुना भाद्रपदमासीं, गाडर जमियती सुद्धां कोंडाई बारीनें खानदेशांत येऊन पुढें चाल करावी आणि मुंबईकर व मद्रासेहून मुंबईस तीन हजार माणूस आलें आहे त्या सुद्धां पुण्याकडे चाल करावी. आम्हां पुढें कोण ठरूं

पावतो? अशी मगरूरीचीं बोलणीं होऊन सिद्धांत ठरविला आहे, व मुंबईस सामयनाचीं तरतुद भारी होत आहे. ही बातमी प्रमाण आहे. यास्तव त्याचें निघण नाहीं जाहलें तों आपण छातीवर त्यांचे जाऊन उभें रहावें तरच कांहीं मसलत होईल. या गोष्टीस थोडीसी ढील जाल्यानें मसलत संभाळणें कठीण आहे. या करतां फौजेस निरोप देऊं नये. कदाचित् म्हणतिल कीं फौज जेव्हां पाहिजे तेव्हां वरचेवर जमा होईल, तर ही गोष्ट देशीं असल्याकरितां फौज नजीक असत्ये या करतां लौकर जमा होत्ये, दूर असल्यावर देशची फौज जमा होण्यास दिवसगत लागते. तेव्हां पुढें विलग पडेल. हे सविस्तर अर्थ पाटीलबावांशीं तुम्ही बोलावे. तेही सर्व समजतात. थोरपणास उचित तेंच करतील. रवाना छ २ साबान हे विनंति. पैवस्ती छ १७ साबान सुरुसन इहिदे समानीन मुक्काम उज्जेन.

———

ले. २७७ [३०४] शके १७०२ श्रा. शु४ ता ४-८-१७८०

श्री.

राजश्री सदाशिवपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. हैदरखानास मसुद्याप्रमाणें पत्र राजश्री पाटीलबावांचें पाठविलें तें पावलें, म्हणून पूर्वी तुम्हांस लिहिलेंच होतें. हैदरखानानें सरकारच्या वकिलांस निरोप देऊन बेंगरुळास गेले. निभावणीपत्रही त्यांकडे रवाना केलें. सरकारच्या वकिलांबरोबर त्यांनीही आपले कडील मातबरे नूरमहंमदखान या जवळ त्यांणीं आपले कडील तहनामा व मध्यस्थास खातरजमेचीं पत्रें देऊन, बराबर नरसिंगराव वकील यांसही देऊन रवानगी इकडे केली. सरकारच्या वकिलांपासून हैदरखानानें निघते समयीं खातरजमा करून घेतली कीं, पाटीलबावांचे निभावणीपत्र लौकर पाठवून द्यावें. त्यास निभावणीपत्र इकडून गेलें. चांगलेंच जाहलें. बागलकोटा नजीक वकील आल्याचीं पत्रें आलीं. येथें आल्यावर लिहून पाठवूं. आलीकडे हैदरखानाचीं पत्रें त्यांचे वकिलांस आलीं त्यांत बेंगरुळाहूनही कुच करून हैदरखान कडपनाथाचे घाटानें अर्काटवर गेले; व मिरा बराबर फौज देऊन चेनापट्टणचे तालुक्यांत हंगामा पूर्वीच सुरू करविला. चेनापट्टणची बातनी आली त्यांत लिहिलें आहे कीं, हैदरखान बिघाड करून येत आहे, यामुळें महंमदअल्लीखान व चेनापट्टणकर इंग्रज बहुत घाबरे होऊन लढाईची तरतूद करतात; व वकिलानें कुंपी या बातनीत सूचना लिहिली आहे कीं, इंग्रज व महंमदअल्लीखान मनसबा करतात कीं, पंतप्रधान यांकडे अनुसंधान लावावें; आणि हैदरखानास सांगावें कीं, तुम्ही पंतप्रधान यांचा काय भरंवसा धरलात? आम्हांस म्हणतात कीं, "तुम्ही आम्ही मिळोन हैदरखानचें पारपत्य करूं. त्यास आम्ही पंतप्रधान यांचा स्नेह चाहत नाहीं. जर तुम्ही नच ऐका तर आम्ही या प्रमाणें करतों आणि तुम्ही आम्हांस अनकुळ झाले तर पंतप्रधान यांची दौलत तुम्ही आम्ही मिळोन घेऊं." असा शकटभेद हैदरखानाचें व सरकारचें द्वैत पडावें या करतां करणार आहेत. सावधता असावी. हैदरखानानें सरकाराशीं स्नेह संपादून इंग्रजाशीं बिघाड केला हा ये समयीं मोठा उपयोगीं आहे. इंग्र-

जांचें मानस आहे कीं, हैदरखान, श्रीमंत व नबाब तिघांच्याही दौलता घ्याव्या. त्यास कोणेंही प्रकारें एकाशीं शकट भेद करून एकास खालीं पाडावें, असें करतां एक राहील त्यास आपण शेवटीं गुंडाळावें. याची पूर्ती बंदोबस्ती असावी म्हणोन वकिलानें लिहिलें आहे, हें वर्तमान पाटीलबावांस सांगावें. येथील तों मजबुदी पाटीलबावांचे भरंवशावर पक्कींच आहे. पूर्वी पत्रांच्या रवानग्या तीन चार जाल्या त्यांचीं उत्तरें अद्याप आलीं नाहीं, हें काय? आतां वाटेचाही पेंच नाहीं. याकरतां पत्रें वरचेवर येत जावीं रवाना छ ३ सबैन हे विनंती. पातशाहा व नजफखान यांजकडील मजकुराचीं पत्रें राजश्री पुरुषोत्तम महादेव यांजकडून इंग्रेजाचे मसलतीविशीं आलीं होतीं तीं तुम्हांकडे पाठविलीं त्यास दिवस फार जाहले. उत्तरें निश्चय काय तो ठरावून गेलीं पाहिजेत. दिवस थोडे पुढें राहिले, व राजश्री दिवाकरपंताकडील मजकुर लिहून पाठविला होता वगैरे मजकुराचा जाबच येत नाहीं. तर वरचेवर जाब मालुमांत जमा धरून पाठवीत जावे. हे विनंती. नबाबाची थैली पाटीलबावांस आली होती ती पूर्वी पाठविली. त्यांत आदवानी करतां गुंता असें लिहिलें असेल. त्याचें उत्तर त्याहावें कीं, आदवानीचा उपद्रव हैदरखानानीं मना करून हैदरखान चेनापट्टणावर गेले. या उपर इंग्रेजाचा वकील आपणाशीं आहे त्यास साफ उत्तर देऊन निरोप द्यावा आणि सिकाकोल, राजबंदरीकडे इंग्रेजाचा नतीजा लौकर द्यावा. आपण नक्षा ठरावून पाठविला त्याप्रमाणें केलें असतां विलंब आपणाकडून होऊं नये. या अम्वयें लिहून† एक नक्कलही पाठवावी हे विनंती पै॥ छ १७ सबैन सुरुसन इहिदे समानीन मुक्काम उजैन.

ले० २७८ [४६०]

शे० १७०२ श्रावण शु. ३५ ता १५-८-१७८०

श्री

(रा छ १४ सावान इहिदे समानीन.)

आम्हीं बेंगरुळास पोहोंचून नूरमहंमदखान वगैरे यांची रवानगी करून पुढें दस्कूच रवाना होऊन गेलों असों. आइंदे इंग्रजाची तंबी जाले मजकुरास कलमी करण्यांत येईल. इंग्रजांस माकूल तंबी करावी ऐसें मुकरर केलें आहे. त्यास चेनापट्टणाकडे ताण करतांच आपल्याकडे सलुखाचा पैगाम लावतील. तरि त्यांशीं सलुख न करितां तंबीच करावी या कामावर मुकाम्यद राहून अमलांत ये ऐसें करावें, म्हणोन कलमी केलें. चुनाचे, नूरमहंमदखान वगैरे गार्जिद्दगड पावेतों पोचल्याची बातमी आली. ताहाल कृष्णा उतरले असतील. येऊन पोहोंचतील. टोपीकरांची जात बेइमान व फरेबी. एकीकडे राजकारणें लावून एकास दगा करतील. येविशींची येहतियाद व हुशारी असावी, म्हणोन इकडून पैहाम आं साहेबांस कलमी करण्यांत आलें. दरींविला आं मेहेरबांही तोंच अंदेशा दिलांत आणोन कितेक लिहितात. त्यास सरकारांतून जो दारमदार जाला त्यांत तफावत हरगीज यावयाची नाहीं. ये

† हें नबाबास महादजीनें लिहावयाचें अशी सूचना नानांची आहे.

बाबें पक्की खातरजमा असावी. ख्याल दिगर दिलांत न यावा. इंग्रजाचे कवायतीचा व चालीचा नक्षा सरकारांत खूब मालुम आहे. आं मेहेरबाकडे बळेंच कोणी पाठवून राजकारण लाविलें, व तमा तवके दाखवून शोहरा करतील, आणि सरकारांत लिहितील कीं नबाब बहादरांचा आमचा जाबसाल ठरावांत आला, याच तऱ्हेनें सरकारांतही राजकारणाची शकल करून आं मेहरबांस कलमी करून सिगोफे बरपा करतील. हर कवाइतीनें तरफैन खल्ल आणावा या कामास इंग्रज कसूर करणार नाहींत. याज करितां आं साहेबीं त्यांचा भुलावा व दगाबाजी नजरेंत राखोन शकशुभ दिलांत न आणितां करार बमोजीब खातरखा सजा करावी. सरकारांतून ही कुल्हपोशांस तंबी वाकई अमलांत येईल. दुसरी गोष्ट हरगीज होवयाची नाहीं. येविशीं खातर जमा आहेच आणि असावी. राव शिंदे यांजकडील निभावणीचें खत पेशजी खाना जालें तें आं मेहेरबांस पोंहोंचलें असेल अगर पोंहचेल. म्हणोन हैदरअलीखां बहादर यांस नानांचे नावें हिंदवी पत्र.

ले० २७९ [३०५] {श. १७०२ श्रावण व. ३ ता १८-८-१७८०

श्री.

राजश्री सदाशिवपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. इंग्रजाचीं कांहीं पल्टणें व गुलजारखानाचा भाऊ सोनगडास आलें. मागाहून दुसरीही कुमक येणार. त्या तोंडावर फौज छावणीस असावी, त्याची तरतूद पाटीलबाबांनीं केलीच असेल. तूर्त त्या तोंडावर कोणीच नाहीं असें जाणून राजश्री गणेशपंत बेहरे यांची छावणी फौज सुद्धां तिकडे करविली. छाप्यामुळें गळाठा लोकांचा थोडा बहुत जाहला व मागील देणीं मुबलग. तीं संकटें काय त्याहाकीं ? तथापि थोडी बहुत तर्तुद येथून होईल ती करून दिली. व गणेशपंत बेहरे यांणींही हिंमत धरून छावणीस राहिले. विसाजी आपाजी पाटीलबाबां पासून निरोप घेऊन निघाले, त्यांसही येथून पत्रें पाठविलीं कीं, तुम्हीं फौज सुद्धां गणेशपंत बेहरे यांजकडे जाऊन तेथें छावणी करावी. परंतु फौजेचा गळाठा फार, छावणीस रहाणें न होय, याकरितां टोक्या आलीकडे आले. कोंकणांत फौज होती, तिची तळेगांवावर छावणी करविली. मुंबईकर नजीक. कसा प्रसंग पडतो कळत नाहीं; याकरितां फौजेची छावणी करविणें प्राप्त जहालें. तसेंच करवीर प्रांतांतही राजश्री परशुरामपंत भाऊ यांणीं फौज छावणीस ठेविली. पर्जन्यकाळीं फौज कोंकणांत रहाणें कठीण, आणि कोणे समयीं कोणे स्थळास इंग्रेज दगा करतील, याकरितां दहा बारा हजार गाडद ठेवून वसई वगैरे जागांचा बंदोबस्त केला आहे. यापैकीं अनंदराव राम व धुळप याजबरोबर पांच हजार माणूस देऊन कल्याणा नजीक मलंगगड आहे तेथें राहून कल्याणकरांशीं नित्य कठोन पेटा बेलापुराकडे असें करून झोंबट लाविलें आहे. त्यास चैन पडूं देत नाहीं असें केलें आहे. गाडदी वगैरे पाईच्या माणसांचा दरमहा दीड लाख होतात व फौजेचें देणें पावणेदोन क्रोड चढलेंच आहे. शिवाय तोफखाना व किल्लेनिहाय व हुजूरातचा खर्च व आरमार वगैरे खर्च

किती आणि जमा काय हें ध्यानांत यावयाजोगें आहे. गेले अखेर साल पावेतों साल-मजकुराच्या रसदा जाऊन हैदरखानाकडील खंडणीच्या ऐवजीं मोबदला करून चालविलें. आतां बाकी राहिली नाहीं. राजश्री पाटीलबाबा श्रीमंतांच्या पायांशीं एकनिष्ठ व आमचा भाऊपणा अकृत्रिम, बरें वाईट सांगावयास जागा इतकांच, असें जाणून लिहिलें आहे. सर्व सांभाळणें राजश्री पाटिलबाबांकडे आहे व भारही त्यांवरच आहे. र॥ छ ३ साबान हे विनंती. पाटीलबाबांसही पत्र पाठविलें आहे. प्रविष्ट करावें. हें विनंती. पौ॥ छ १७ साबान सुरूसन इहिदे समानीन मुक्काम उज्जेन.

ले. २८० [४५८] | श. १७०२ श्रावण व. ५ तां २०-८-१७८०

दुसरा मसुदा रा॥ छ २४ साबान इहिदे समानीन.

आं साहेबीं छ २९ रजबचें खत मसरत नमत पाठविलें तें नेक वख्तीं पोंहचलें. आम्ही भारी जमियतनशीं घांट उतरून चंगम व कळसपाक, पोळूर व त्रिनामल ति म रायगड व हुलभगड वगैरे मकाणांत ठाणीं घातलीं. त्यांजकडील बा र व तुरुक स्वार घोडीं पाडाव आणिलीं, व तमाम तालुकियांत दौड पाठविली. मच्छिलीबंदराकडून गुंटूरच्या रस्त्यानें इंग्रजी कुमक येत असतां दहा हजार फौज पाठवून त्या जमियेतेसच घेराघेरी करविली आहे. इंग्रज आपली फौज जमा करितात. मोकाबिल्यास येतील तरि खुदाचे फजलेनें तंबी होईल ते जहुरात येईल. तरफैन जुदाई नाहीं. कैफियत इकडील तिकडे व तिकडील इकडे मालुम होत असावी म्हणोन कलमी केलें. चुनाचे आं मेहेरबांहीं इंग्रजांचीं मकाणें घेतलीं व तमाम तालुक्यांत दौड ताख्त व ताराज करण्यास गेली आहे व कुमकेचे जमियेतेस घेराघेरी करविली आहे हें ऐकून न्याहायत खुषी जाली. आं साहेब इरादा करून मातबर सरंजामानशीं त्या जिल्ह्यात गेले, तेव्हां टोपीकारांस खूब नसियेत पोहोंचवितील येविशीं खातरजमा आहे. सरकारांत सरंजाम तयारी आहेच. बाजे फौजाही जलद मुखालिफाचे मोकाबिल्यास नमूद होतील. बादशाहाकडून इंग्रजांस तंबी करण्याची मसलत ठरून इशारा आला. त्यास मसलत कबूल करून दिल्लीस जवाब रवाना जाले. याचा ताा पेशजी आं मेहरबांस कलमी करण्यांत आला. सरकारची व आपली जुदाई नाहीं. सलाह मसलत एक. याजकरितां पैहाम आपली खैरियत व इंग्रजांचे तंबीची कैफियेत हमेश कलमी करीत असावी. म्हणोन नबाब हैदरअलीखां बहादूर यांस नानाचे नांवें हिंदवी पत्र.

सोनगडाकडे पलटणें इंग्रजांचीं आलीं. यावर इकडून गणेशपंत बेहरे फौजसुद्धां दौड करून गेले. कोंकणांतही लढाई सुरू आहेच. छ १९ साबान इहिदे समानीन श्रावण.

ले. २८१ [४७०] | श. १७०२ श्रावण व. ८ ता २३-८-१७८०

छ २५ मोहरम ॥ श्री ॥

(रा छ ५ समानीन.)

बहुत दिवस गुजरले. आंसाहेबाकडून खैरीयेतचें खत येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यास दोस्तीचे अलमात ऐसें नसावें. हमेश खैर आफीयेतचें खत पाठवून दिलशाद करीत जावा हें लाजम आहे. आं मेहरबांचें जाणें चेनापट्टण जिल्ह्यांत जालें असेल. जालें नसल्यास करार बमोजिब जलद जाणें होऊन इंग्रजांस ताण बसवून सजा अमलांत यावी. गुजराथ प्रांतीं कर्नेल गाडर यांशीं व सरकारच्या सरदारापाशीं लढाई सुरू आहे. पांच-चार लढायांत इंग्रजांस नशिहातच जाली. तेव्हां या फौजांपुढें आपला टिकाव होत नाहीं ऐसें समजोन. कर्नेल गाडर यांणीं सुरतेस माघारा जण्याचा मनसबा करून, नर्मदा किनाऱ्यास आले, पिच्छावर सरकारच्या फौजा आहेत. कोंकण प्रांतीं मंमईकर इंग्रजांनीं हंगामा केला त्याचे तबीचे व कोलापूर व कितूरकर वगैरे याणीं सरकार तालुकियास इजा दिली त्यांचें पारिपत्य त्यांचें कुलूआऊजुल्-कद्र कृष्णराव नारायण यांस कलमी केलें ते जाहीर करतील त्यावरून मुफसल मालूम होईल. तरफैन दोस्ती व येगानगत तेव्हां सल्लाह मसलत पैहाम इत्तला करीत असावी. सर्व मरातब आं साहेबांचे दिलनिसीन आहेत. म्हणोन हैदरअल्लीखां बहादूर यांस नानांचे नांवें हिंदवी पत्र.

ले २८२ [४६८] | श. १७०२ श्रावण ऑगस्ट १७८०

श्री.

तुम्ही सरकार कामाविशीं बहुत कळकळीनें सायास करितां म्हणोन रघुनाथभट यांणीं सांगितलें त्यावरून परम संतोष जाला. सांप्रत रघुनाथभट यांस पाठविले आहेत. सविस्तर मजकूर इकडील सांगतील त्याप्रमाणें तुम्ही व मशारनिले एकविचारें होऊन ज्या योगें सरकारकाम चांगलें होय व लिहिल्याप्रों घडे तें करावें. यांतच इकडील तिकडील कामें व नफे आहेत. राजकारण मोठें याचें यश तुम्ही घ्याल ही खातरजमा, आणि घ्यावें. पत्रांचीं उत्तरें अति सत्वर पाठवावीं म्हणोन रामकृष्णभट केळकर यांस नानांचे नांवें पत्र.

ले. २८३ [२४९] | श. १७०२ भाद्रपद शु. ५. ता ३-९-१७८०

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि तुम्हांस जाऊन बहुत दिवस जाहले, अद्याप उज्जनीस पोंहचून पत्र न आलें हें काय ? असो. राजश्री पाटीलबावांचीं व सदाशिवपंत यांचीं पत्रें पुढील मसलतीचे

मजकुराचीं पूर्वी दोन आलीं त्यांचीं उत्तरें पूर्वीच पाठविलीं तीं पावलींच असेल. हल्लीं ग्वालेर गेली वगैरे मजकुराचीं पत्रें आलीं, त्यांचींही उत्तरें पाठविलीं आहेत. ग्वालेर गेली वाईट गोष्ट झाली, ईश्वरी इच्छा ! सारांश गुदस्तां जाहले प्रकार त्यास तुम्ही माहीतच आहां. असो जाहलें तें गुदस्त. साल मजकुरीं तरी जलदीनें स्वच्छतेनें मसलतीचा उद्योग लवकर घडावा. नाहीं तर परिणामी नाट नाहीं. उगेच संदेह व निमित्यें ठेवावीं यांत कोणाचेंही कल्याण नाहीं. नाश किती होतात हें पाहवें. आम्हांस बरें वाईट सुचेल तें लिहावें म्हणून लिहितों. जें थोरपणास उचित तें करतील. राजश्री पाटीलबावांस सांगावें कीं, आपण कोणतीही मसलत करावी, परंतु दृष्टि इकडे ठेवावी. र॥ छ ३ रमजान हे विनंति. पातशाह व नजबखान यांस जरूर मेळवून घ्यावें. इंग्रेजाचे मसलतीस फार उपयोग पडेल. हे विनंती.

ले० २८४] [४५९] { श. १७०२ श्रावण व. ११ ता २६-८-१७८०

श्री

तिसरा मसुदा. रवाना छ २५ साबान इहिदे समानीन.

चेनापट्टणकरांस इकडून खूब ताण बसतांच इंग्रज बजिद होऊन आपल्याकडे राजकारण लावितील, व मुद्देमाफक कबूल करतील, ते खातरेस न आणितां दोन तीन सालें लागलीं तरी लागोत, लेकीन तंबींच करावी याची मजबुती असावी, म्हणोन हमेश आं साहेबांचे कलमी करण्यांत येतें. व हल्लीं महमद अलीखां यांचे बोलण्याची अखबार विनाजीपंताकडून आली. त्याची नकल व आं मेहेरबांचे पत्र नूर महमदखान व नरसिंगराव यांजकडे आलीं. मशारनिले यांणीं अथणीचे मुक्कामींहून इकडे पाठविलीं. त्याजवरून मुफसल कैफियत मालुम जाली. चुनाचे, *पैहाम आं साहेबीं अंदेशा दिलांत आणोन कलमी करावें ऐसें नाहीं. तरफैन करार मदार जाला तो मजबूत व पक्का आहे. इंग्रज बजिद होऊन व तमा दाखवून राजकारण करूं लागल्यास तरफैनच्या सल्लाह मसलतीखेरीज हरगीज मंजूर होणार नाहीं, याविशीं पक्की खातरजमा असावी. आं मेहेरबां चेनापट्टणच्या सरहद्देस गेले, इंग्रज नजदीक, त्यांची चाल बहुरंगी, तऱ्हे तऱ्हेचे मकर व फरेब दाखवून तरफैन दिलांत खलश यावयाविशीं खियाल नमूद करतील. त्यास आं साहेब दुरंदेश व मजबुत-मिजाज इंग्रजांचे मकर-फरेबांस खूब वाकफ. तेव्हां त्यांचे खियालावर न जातां तंबींच करतील, येविशीं खातरजमा आहे. बिनाबर इतिल्ला कलमी केला असे. मुफसल राव मेहेरबां राव रास्ते व कृष्णराव बल्लाळ लिहितील. म्हणोन नबाब हैदरअलीखां बहादूर यांस नानांचे नांवें हिंदवी पत्र. छ १९ साबान इहिदे समानीन श्रावण.

---

* वारंवार.

ले. २८५ }
[४८४] }

{ श. १७०२ भाद्रपद शु. ८
ता ६-९-१७८०

श्री

रा छ ७ सवाल इहिदे समानीन.

आं मेहरबानीं तिमरी व कावेरीपाक येथें ठाणें घालून अर्काटचे मुक्कामाचें खत पाठविलें होतें तें पोंहोंचलें. त्याबाद पंधरा रोजांचा आरसा गुजरला, लाकिन् तिकडील कैफियत व आपलीं खैरीयेत इतल्ला होत नाहीं. सबब इंतजारी असे. त्यास मुखालिफ कोणे ठिकाणीं, व जमीयेत किती जमा झाली. आइंदे त्यांचा इरादा व तर्तुद काय आहे, हे अखबारेवरून आंसाहेबांस रोजबरोज मालूम होतच असेल. त्या बमोजीब दोस्तदारांसही मुतवातेर कलमी करींत असावें. मुखालिफांवर आंमेहेरबानीं तदबीर दीनबदीन गालब मजबूद पडावी व हे अखबार पैहाम इकडे येत असावी, या गोष्टींची दरखास्त बहुत आहे. इकडील सर्व तयारी जाली आहे. बाद दसरा सरदार व फौजा मुखालिफावर नमूद होतील. कर्नेल गाडर मुंबआले त्याचीही तयारी. येविशींचे मरातिब औतजात दोस्तां नूर महंमदखां व नरसिंगराव लिहितील त्यावरून वाजेह होईल. म्हणोन हैदरअल्लीखा बहादूर यांस नानांचे नावें हिंदवी पत्र.

आहे बाददसरा मुकाविल्यास आल्यास होईल ते जहुरांत येईल.

ले.२८६ }
[२६०] }

{ श. १७०२ भाद्रपद व १
ता १४-९-१७८०

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि आमची व राजश्री पाटीलबावांची भेट जाल्यावांचून मसलत निर्वेध होत नाहीं, त्यापक्षी भेटीचा योग करावा, भेट होतांच मसलतीचा ठराव लवकर होऊन आपलाले कामावर जावे. असें जाल्यास उत्तम. दिवसगत लागल्यानें शत्रु हांवभरी होतील तसें होऊं नये. फौजेचा जय सिरोज भेलशाचे सुमारे करवून आम्ही थोडक्या फौजेनिशी बऱ्हाणपूर पों। येतों, तिकडून नानांनी यावें, आमची त्यांची स्वच्छता भेटी होऊन झाली असा लौकिक होऊन मसलतीचा उपयोग पडेल. चारी मनसब्यांचीं घोरणें ध्यानांत आणून मसलती वांटून जिमेवार लावाव्या. होळकरांचे ध्यानास मसलत येईल तीं त्यांणी कबूल करावी. जड राहील ते आम्हांस कबूल आहे. हिंदुस्थान कबूल करतील तर साधने साधून कोठवर जावे हा जिमा लावावा. आज सात वर्षे फौज किती ठेवितात ? एके ठिकाणी मसल्तींत शरीख राहून चाकरी कशी घडती हें ध्यानांतच आहे. यास्तव पृथक मसलत सांगावी म्हणजे मन घालून करतील. शहाणा कारकून इंदुरास त्यांजकडे पाठवून आतांपासून फौजेची तयारी करविली पाहिजे. कालहरण करतील तर इंग्रज हांवभरी होतील तेंही ठीक नाहीं.

हिंदुस्तानचें काम जड आहे. कोंडाईबारीच त्यांजकडे योजोन फौज धरवावी. भेटी होतांच त्यांणीं कोंडाईबारीस जावें आम्ही सिरोंज भेलशाचे सुमारे फौजेंत जाऊं. या सर्वांनीं एकत्र राहून पारपत्य करूं म्हटल्यास हिंदुस्थान माळवा रहात नाहीं. सारांश एकत्र जाल्यास जो विचार उत्तम दिसेल तो करावा. म्हणून पाटीलबावांनीं बोलण्यांत आणिला मजकूर लिहिला उत्तम आहे. सारांश पाटीलबावांची आमची भेट व्हावी, मसलत ठरावी, त्याप्रमाणें आपलाले जिम्यावर जावें, दिवसगत लागूं नये, ही सल्लाह चांगली आहे. त्यांत लौकिकही रहातो. कार्याचाही उपयोग आहे. आमचे मतें ही सल्लाह उत्तम आहे. अशीच करणें. त्यापक्षी पत्र पावतांच फौजेचा जथ म्हटल्याप्रमाणें तिकडे पाठवून व जथ पाडावयाचा प्रकार करून पाटील बावांनी होळकरा सुद्धां खानदेशांत यावें. हिकडे लिहून पाठवावें. त्याप्रमाणें आम्हीही कूच करून येतो. भेटीनंतर सारेंच चांगले होईल. मग मसलत ठरेल तसें करतां येईल. परंतु इतकाही प्रकार आश्वीनमासी जाला पाहिजे म्हणजे चांगला. पुढें लांबला तर मसलतीस विरुद्ध असें आहे. हिकडेहि शत्रूचा वेध व हिंदुस्थानांतही आहे. तिकडून पाटीलबावांनी खानदेशांत उद्योग केला असतां व आम्ही हिकडून यावयाचा केला असतां मसलतीस कसें पडेल, हेंही ध्यानांत आणून पक्की ती सल्लाह करावी रा. छ. १४ रमजान हे विनंती.

लें० २८७ [२२९]

श. १७०२ भाद्र. व. २ ता। १५-९-१७८०

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. राजश्री पाटीलबावांचीं व सदाशिवपंत यांचीं पत्रें पूर्वी हिंदुस्थान व कोंडाईबारी व पुण्याकडील मसलतीचे प्रकार विस्तारें लिहून आलीं त्यांचीं उत्तरें विस्तारें सर्वही निश्चय करून पाठविलीं होतीं कीं, आतां पत्रें लिहून जाब जाणेयास दिवस राहिले नाहींत असें समजून पाटीलबावांनीं कोंडाईबारीकडे यावें असें लिहिलें असतां, " हिंदुस्थानांत दुसरा पाठवितात, तेव्हां आम्हांस उणेंपण, हिंदुस्थानाची मसलत करावी म्हणोन लिहिलें, आतां आम्हांस दूर काढून टाकलें, होळकरास कोंडाईबारीकडे पाठवावें " असें लिहिलें. तर पहिला संकेत होताच ही शंका निघणार. हिंदुस्थानांत होळकरास पाठवावें असें लिहिलें असतां हिंदुस्थान त्याकडे सांगितलें हें वाईट वाटणार. तेव्हां दोहों सरदारांनीं मसलती करावयाचें येथून लिहिलें असतां संदेह येणार म्हणोन असें लिहिलें कीं, एकानीं कोंडाईबारीकडे सरकारचे पथका सुद्धां यावें. एकांनीं हिंदुस्थानची मसलत करावी. उत्तम पक्ष पाटीलबावांनीं कोंडाईबारीकडे यावें. हें न होय, त्यापक्षीं होळकरास फौज सुद्धां कोंडाईबारीकडे पाठवून मग हिंदुस्थानचे मसलतीवर नमूद व्हावें. जो ठराव करणें तो पाटीलबावांनींच करून उत्तर सत्वर पाठवावें. असें लिहिलें असतां तुम्हीं लिहिलें कीं, इतकींच कल्पना घेऊन पूर्वी वाद प्रतिवाद घाल्तील. त्यास त्यांणीं कल्पना घ्याव्या त्या आम्ही

उघड्या लिहून निश्चयही त्यांवरच ठेविला. तेव्हां कल्पना घेऊन वाद प्रतिवाद घालावयास जागाच राहिली नाहीं. हे सर्व अर्थ समजूनच पत्रें लिहिलीं होतीं. तींच दाखवून निश्चय करावयाचा होता. त्यांचे चित्तांत कल्पना उठतात त्यांचें निवारण करणार ईश्वर. परंतु आपण जी गोष्ट चांगली, श्रीमंतांचे दौलतेचें कल्याण व पाटीलबावांचे स्वरूपास उत्तम तेंच लिहित जावें, व बोलत जावें, असें समजून लिहितों. आतां पत्रें जाणें येणें यास अवकाश नाहीं. असें उभय पक्षींचा भेटीचा प्रकार लिहिलात हा चांगला आहे. परंतु पाटीलबावा व होळकर दोघांस येणें लागेल. तेव्हां हिंदुस्थानचे इंग्रजास व पातशा नजीबखान सुद्धां सर्वांस वाटेल कीं, सरदार देशीं गेले. हें जाणून बखेडा करतील, इकडे गाडर मुंबईस आल्यास पंचवीस दिवस झालें. सरंजाम व तरतूद ही त्यांणीं भारीच केली आहे. आश्विन शुद्ध पक्षी निघणार म्हणून बातम्या मुंबईच्या वगैरे पैदरपै येतात. या संधींत आम्हीं गंगापार गेलों म्हणजे काय कल्पना काढून हावभरी होतील कळत नाहीं. हा पेंच मोठाच दिसतो. श्रीमंतांचे पाय ध्यानांत आणून स्वच्छ अंतःकरणें संदेह सर्व शपथी पूर्वक टाकून देऊन करून इंग्रजांचें पारपत्य पूर्वी मसलती लिहिल्या त्यांतून कोणता ठराव करणें तो करून आपआपले कामावर जाऊन निकड करावी. जाहिराणा चांगला बाहेर दिसावयाकरितां चिंतो विठ्ठल वगैरे मंडळी चांगली शोभेनें पाठवावी. सरकारचीं कामें जाहिराणा चांगली दिसे अशीं आहेत. ते केली म्हणजे सहज लोकांचेही संदेह जातील. घरांतील गोष्ट तर एक आईचीं लेंकरें, संदेह टाकले म्हणजे स्वच्छताच आहे. नवें जडावें लागत नाहीं. हाही प्रकार आहे. दुसरें तुम्हीं लिहिलें कीं, होळकरांचे घरांत फूट, त्याची तोंड पडल्यावर फौजेची तरतूद. ही तर गोष्ट फार विलग दिसते. दिवस तर नेटास आले. आणि तोंड पडून पुढें फौजेची तरतूद होणें यास दिवसगत लागणार हें चांगलें नाहीं. याचा विचार लौकर करणें तो करून भाद्रपद अखेर होळकरांची फौज जमा होय तें करावें. कोणता निश्चय ठरवितात तो लवकर लिहून पाठवावा, याप्रमाणें जाईल. सारांश तुम्हीं भेटीचा प्रकार लिहिला हा चांगला मुहूर्त पाहून उभयतां सरदारांनीं लौकर निघोन खानदेशांत यावें. आम्हींही येऊं. आतां विलंब न करावा. रा छ १५ रमजान हे विनंति.

ले. २८८
[४५७]

श. १७०२ भाद्रपद व ३
ता १६-९-१७८०

श्री

रा छ १६ रमजान सन इहिदे समानीन.

आं मेहेरबां आर्काट पावेतों पोंचले असतां इंग्रज +तांहाल नमूद होत नाहींत. त्यास कोणीकडे जमाव करविला असेल अगर पाळेगार वगैरे कोणीकडे राजकारण लाविलें आहे, व महमद अल्ली व ते एकत्र आहेत या आलाहिदा आहेत आणि काय मनसबा

+ हा काल्पर्यंत.

करितात हें कांहीं समजत नाहीं. टोपीकरांची जात मकरी व दगाबाज शायेद भुलावा देऊन कांहीं एक शक्कल नमूद करावी, या तदबिरेंत असतील. याजकरितां येविशींची बातनी पुर्तेपणीं राखून येहतियात व हुशारी होत असावी. आज राहा-येगानगत दिल-निशान जाले तें कलमीं केलें असे. बफजल इलाही आं मेहेरबां दूरंदेश व कुलाहपोश याचे फंदफरेबास खूब बाकीफ, तेव्हां या गोष्टीची खबरदारी होतच असेल. दोस्ती दारासही पैहाम इतला करीत असावी. म्हणोन हैदर अल्लीखान बहादूर यांस नानांचे नांवें पत्र.

ले० २८९ [२४६]

श. १७०२ भाद्र. व. ६ ता १९-९-१७८०

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेसीं

विनंती उपरि. किल्ले सालेरचा मजकूर पेशजी राजश्री सदाशिवपंत यांचे पत्रीं लिहिला होता, परंतु पत्रांतील मजकूर जमा धरून उत्तर पाठवावें हें सदाशिवपंत लिहितच नाहींत. त्यास इंग्रजांकडील व दादासाहेबांकडील सूत्रें किल्लेकऱ्यांकडे लागलीं आहेत याजकरितां आम्हांस येथून कळेल तसें करावें लागेल. रा॥ छ. १९ रमजान हे विनंती. पा॥ छ २९ रमजान भाद्रपद शु॥ इहिदे समानीन मुा॥ उजेन.

ले. २९० [२२०]

श. १७०२ भाद्रपद व. १४ ता २७-९-१७८०

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेसिं.

विनंती उपरि तुम्ही भेटीचा निश्चय केला तो उत्तम. तेथून राजश्री पाटील-बावांचा निघावयाचे मुहुर्तावर निश्चय ठरेल, तो लिहून पाठवावा, त्याप्रमाचें आम्हीं निघोन येऊं. येथें फौज वगैरे जमा करून मुंबईचे तोंडावर राजश्री हरीपंत राहतील. परंतु कलमें.

होळकरास बरोबर घेऊन येतील, यावें. कोणेही गोष्टींची अडचण आम्हांस पाडूं कोणी ठिकाणीं आमची भेट, कोठपावतो नये येविशयीं पक्कें असावें.
आम्हीं यावें हें लिहून पाठवावें. बराणपुरा- उभयतां सरदारांचे फौजांची तरतुद आलीकडे चाळीस कोस येणें घडावे. लौकर होऊन जमा म्हाव्या. भेटी होऊन

भेट झालियावर फिरोन संदेह उत्पन्न निश्चय ठरून आपापल्या मसल्तीवर नमूद नहोत. स्वच्छता, संतोषानें मसल्त करण्या- व्हावें.
विशीं उत्साह असें घडावें. हिंदुस्थान न सुरतेकडील दोघांनी दोन मसलती कराव्याच, हा निश्चय असावा.

सरकारचें काम पूर्वी येथें मन घालून करीत होते त्याप्रमाणें करावें. वांकडें आंत बाहेर कोठें कांहीं नसावें. इतक्या गोष्टीची पुर्ती खातरजमा करून चिठी आली म्हणजे निघोन येऊं आंतून बाहेरून शोध करून घेऊन लिहून पाठवावें. आम्हीं येथून निघणार त्यापक्षीं श्रीमंतांचें राहणें पुण्यांत ठीक नाहीं. यास्तव पुरंदरास राहतील. रा। २७ रमजान हे विनंति. पत्राचें उत्तर लवकर पाठवावें. हें विनंति.+

———

ले. २९१ }
[२२३] }

{ श. १७०२ आश्विन शु. ३०
{ ता। ३०-९-१७८०

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपर सर्व ही गोष्टी राजश्री पाटीलबावाचे चित्तांत आल्या. जाहलें तें गुदस्त या उपर मागील अर्थ लिहण्यांत न यावे. म्हणोन लिहिलें. त्यास मागील अर्थाचा विस्तार पूर्वी पासूनच करीत नाहीं. कोठें कोठें लिहिण्यांत येतें, ह्याचें कारण हेंच कीं, पुढें तरी सरकार काम चांगलें व्हावें. इतकाच अर्थ. वांकडेपणानें लिहीत नाहीं. आतां लिहिलेंत यावरून राहिलें. कोणें प्रकारें कार्य व्हावें, म्हणजे जाहालें. तेही थोर आहेत समंजस आहेत, उत्तम तेंच करतील, ही खातरजमा आहे. शिवाजी विठ्ठल व पवार यांकडील कज पट्टीच्या यादी तयार करविल्या, मागाहून पाठवितों. चिंतो विठ्ठल वैगरे मंडळी पाठवितों, गाडदी अद्यापि आले नाहींत, म्हणोन लिहिलें. उत्तम आहे. गाडदीही रवाना केले आहेत. परंतु लवकर न पोहोंचल्या तुम्ही पक्कीं बंदोबस्ती करून पाठवावे. नबाब व हैदरखान यांस दोन थैल्या व मुधोजी भोंसले यांचे नांवें लाखोटा व दिवाकरपंताचें १पत्र खुलें व तिहींच्या नकलांवरून मजकूर कळला. उत्तम लिहिलें आहे. ज्याचीं त्याकडे रवाना करूं. रा छ १ सवाल हे विनंति. पो छ. ९ शनवार प्रातःकाळ.*

———

+ हें सर्व पत्र नानाच्या हातचें आहे. गुजराथेंत शिंदे होळकर इंग्रजावर गेले त्या पूर्वी त्यांच्या व नानाच्या भेटी व्हाव्या असें ठरत होतें, असें ह्यावरून दिसतें.

* हें सर्व पत्र खुद्द नानांच्या हातचें आहे. १ चोरघोडे भोसल्यांचा दिवाण.

ले. २९२ [४७५]

श. १७०२ आश्विन शु. ११ ता ९-१०-१७८०.

श्री

रा छ १० सवाल इहिदे

आंसाहेबीं खत-मसरत-नमत-पाठविलें तें बवख्त नेक पोहचलें. चेणापट्टणाहून जनरल मंडोर नामें जंगी सरंजामसुद्धां मोकाविल्याचे इरादानें कंचीस आल्याची खबर आली. त्या वरून आम्ही अर्कोटाहून कंचीस पोंहोंचून त्यास घेरा दिल्हा. मच्छलीबंदर व गंठुराहून करनल बेली नामे सरदार सरंजामानिशीं कुमकेस येत होता, त्याजवर फौज पाठवून घेरा-घेरी करविली. ते कंचीहून चौ कोसांचे फासल्यानें गढीचा आसरा घेऊन राहिले. त्याचे उपराळ्यास जनरल मंडोर याणें आपले हामराही पैकीं वेष चुनीदी जमियेत पाठविली. करनल बेली यांणी आपली व कुमकेत आलेली जमियेत घेऊन इकडील फौजेशीं लढाई करीत येत *चालिले. हे बातमी कळतांच कंचींत मंडोर याचें तोंडावर जमियेत ठेवून आम्ही खाशी फौजसुद्धां चालून जाऊन मारामारी करोन करनल बेली यांचे फौजेस कत्तल आम केलें. खुद्द करनल बेली सरदार या शिवाय मातबर तीस पालखी-निशीन सरदार व पांचशें गोरे हे साबूत पाडाव आले. पांचशें फिरंगी व दोन हजार बार पावेतों मारले गेले§. बाकी कुल् लष्कर लुटून घेतलें- हें कंचीस जनरल मजकूर याणें ऐकून घाबरा होऊन रात्रींचे वख्तीं जमावसुद्धां फरारी जाला. त्याचे पिछावर इकडून फौज पाठविली. यांशीं त्यांशीं लढाई होऊन निष्प जमियेत मारून घेतली. सर्व सरंजाम टाकीत टाकीत कांहीं जुज जमियेत नशीं चेंगलपट येथील गढीचे आश्रयास जाऊन पोंहोंचला. इकडून फौजेनें त्या गढीस घेरिलें आहे. खुदाचे फजलेकडून तंबी अनकरीब होईल ते लिहिण्यांत येईल. म्हणोन कलमीं केलें. चुनाचे आं मेहेरबांही गाडद व तोफा व फौज वगैरे मातबर सरंजामसुद्धां इंग्रजावर इरादा केला. तेव्हां दोस्तदारांस हेंच यकीन् होतें, जे अब्दल टोपीकर मैदानांत येऊन मोकाबिला करूं पावणार नाहींत. अडचणीचे जागां मकर फरेबानें जें होईल तें करतील. अगर मुकाबिल्यास आले तरि आं साहेबांचें सरंजामापुढें टिकणार नाहींत. बेशुभः शिकस्त खाउन फरारी होतील. याची आजमायेष आज सहा वर्षें जालीं. सरकारच्या फौजांशीं व इंग्रजांशीं लढाईचा मारका-रुबकार आहे. लेकीन कुलहपोष हमेश अडचणीच्या जागां घरोन फंद फरेबच करीत राहिले. कोणही रोजीं मैदानांत येऊन मोकाबिला केला आणि कायम राहिले हे तरकीब नजरेस आली नाहीं. चुकोन

---

* इंग्रजी ग्रंथांत तर बेलीस कुमक केली नाहीं सबब जनरल मनरोस दोष दिलेले आढळतात.

§ स्वाधीन होतों असें निशाण दाखवून शस्त्रें खालीं ठेविल्यावर इंग्रजी फौजेवर हल्ला करून हैदरानें कत्तल केली असा त्यावर आरोप आहे. फ्रेंच सरदार हैदराकडे होते त्याणी ह्या वेळीं पुढें होऊन वरेच इंग्रज लोक वांचविले अशी फ्रेंच लोकांची स्तुति केलेली आढळते.

मैदानांत गांठ पडली, तेव्हां शिकस्तच होऊन गेले. सबब दोस्तदाराचे दिलांत हें गुजरलें होतें. बफजल-इलाही त्या बमोजीबच जहुरांत आले मुखालिफास खूब नशीयत पोहोंचली. यावरून न्याहयेत खुषी व खुरमी जाहली. खुदा येताला हे फत्ते आं मेहेरबांस व जमिये दोस्तास मुबारक लाये. इंग्रजाचीं शिकस्त व आं साहेबाचीं फत्ते हे खबर श्रीमंत खुदावंत न्यामत राव पंतप्रधान यांस अर्ज होतांच बहुत खुषवख्त होऊन आपल्या तदबिरेस व जुरतेस तहसीं व आफरींत फर्माविली याचा पत्ता ताा ऐतजांत दोस्तां नूरमहमदखां व नरसिंगराव लिहीतील त्यावरून दीलनिशीन होईल. आइंदे महमदे आलीखां व गोरदोर चेनानापट्टनांत आहेत. त्यांची खेश मकरी व दगाबाज. चार दिवस दम खाऊन कलकत्त्यास लेहून तेथून जमियत जहाजांवर अगर खुषकींतून आणवितील. मजबुत होऊन फितना किसाद बरपा करतील. अगर बमीनत आपणांशीं राजकारण लावून तमा व तवक्का दाखवितील. तरफैन इत्यफाक व येकदिलींत खळश आणावयास कसूर करणार नाहींत. आं मेहेरबां त्यांचे रस्म व रवयास खूब वाफक आहेत. टोपीकरांनीं जमून जोर धरला नाहीं तो पावेतों लगट एक हिरेरी करून नेस्त व नाबूद करण्यांत येतील. या बाबे खातर जमा आहे. इकडील कैफियत तरि दसऱ्याचे रोजी सातनेक पाहून खेमे बाहेर दिल्हे. जलदच खेमेदाखल होण्यांत येईल. बाद इकडून ही कुलहपोशास नशियेत कसकशी होईल ते जहुरांत येईल. हमेश खत पाठवून तिकडील कैफियत कलमी करीत जावी. म्हणोन हैदरअलीखां बहादूर यांस पत्रें हिंदवीं.

१ नानांचें.
१ हरीपंततात्या.

—

२

———

ले. २९३ [२१५] | श. १७०२ आश्विन व.१४. ता ा २६-१०-१७८०

श्री.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपर इकडे येण्याचा मजकूर राजश्री तुकोजी होळकरांशीं बोलण्यांत आला कीं नाहीं? नसला आला तर आइते समयीं कदाचित दिक्कती काढतील, विलंबाने निघतील. याचा विचार केलाच असेल. लिहिण्यांत तुमचे कोठें आलें नाहीं यास्तव लिहिलें आहे. आतां त्वरेनें येणें होऊन मसलतीवर नमूद व्हावें, नाहीं तर अशाच खाली दिवस जातील. खर्चा खाली सरकार येतें. काम कांहींच होत नाहीं. शत्रु हावभरी होतात, बळकट होतात. हे सर्व विचार ध्यानांत यावया जोगे आहेत. ता ा छ २७ सवाल हे विनंती.

———

ले० २९४] { श. १७०२ कार्तिक शु. ३
[२१२] { ता० ३०-१०-१७८०

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि होळकर प्रकर्णी पांच चार वेळ पत्रें तपशिलें करून सादर जाहालीं त्या प्रमाणें राजश्री पाटीलबावांशीं बोलत गेलों, परंतु ज्या समयीं होळकराकडील मजकूर काढला तें वेळेस सारीं बोलणीं एकीकडे टाकून चार चार घटका वाद प्रतिवाद होत गेले. पाटीलबावांचें म्हणणें कीं, " खावंदाचे घरींहून जाबसाल होणें ते यथायुक्त होत असावे, पूर्वीच्या चाली पाहाव्या, तीं घोरणें पुढें चालवीत असावीं, न ऐकिलें त्यास समजून सांगावें. ते न होतां बाईस संपुष्टांत घालावें अशींच साऱ्यांचीं मर्जी एकसा दिसते. यावरून आश्चर्य आहे ! अहल्याबाई होळकरांची सून, तिचा अपमान केला असतां लौकिकांत ठीक दिसेल कीं काय ? तीही केवळ अपमान करून घ्यावया जोगी नाहीं. होळकरांनीं फत्तरगडचे आलीकडे आज पावेतों फौज किती बाळगली व चाकरी कोणती केली, सरंजामाचा वसूल आज पावेतों किती आला, त्यांचे आमचे महाल बरोबरीचे आहेत त्यांत त्यांचे महालाचा वसूल आमचे महालापेक्षां कमी कां आकारतो; याची पुरशीस धनी पणाचा कारभार जिकडे असेल त्यांनीं करावा. एकाचाच पक्ष धरून लिहिणें बोलणें युक्त नाहीं " अशीं बोलणीं झालीं. पाटीलबावांनीं पत्र ये विशीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. अहिल्याबाई कडील याद आली ती पाठीलबाबांनीं दिल्ही ती पाठविली आहे. पावेल. म्हणून विस्तारें मजकूर लिहिला तो सर्व कळला. त्यास अहिल्याबाई कडील याद पाठविली ती पाहिली. त्यास अशा यादी मागेंही एक दोन वेळ आल्या. त्यास अशा यादींनीं काम कांहीं ब्हावयाचें नाहीं. कालहरण होतें. येविषयींचें तपशिलवार उलगडून पूर्वी दोन चार वेळां लिहिले आहे, त्याचें उत्तर असें सांगतात की त्यांचें वाक्य वेदतुल्य. ऐकोन लिहितात. त्यास वेदतुल्य वाक्य ऐकावयाचें नाहीं. वास्तविक गोष्ट असेल तीच लिहिली असेल. सर्वांचे मानस बाईस संपुष्टांत घालावें असें आहे म्हणून बोलले, त्यास बाईस संपुष्टांत घालावयाचें प्रयोजन काय आहे ? सरकार काम ब्हावें, मातबर सरदारी, दिवस मसलतीचे समीप आले, फौजेची तयारी जाली पाहिजे, विना पैक्या खेरीज फौज जमा कशी होते? या कारितां पूर्वी तपशिलवार लिहिलें होतें, त्याचीं उत्तरें अशीं यावीं कीं काय ?असो, तुम्ही पूर्वी लिहिलें आहे त्या अन्वयें पाटीलबावांशीं बोलावें आणि बाईस पाटील बावांचें पत्र पाठवावें कीं, " डौलाचे खर्चापुरता ऐवज बाईनीं ठेऊन तेथील वहिवाट बाईकडील महालकरी तिहीं माहली आहेत त्यांनीं करावी. बाकीचे महाल राहिले त्यास होळकरास मसलत संबंधें पैका लागेल तो बाकीचे महालापासून घेतील. " असें बाईस पाटील बावांनीं निक्षून लिहिल्या शिवाय तोड पडत नाहीं. असे पत्रोपत्रीं मजकूर वारंवार लिहिले असतां कांहीं काम होईल असें वाटत नाहीं. मसलतीचे दिवस जवळ आले. फौजेची तयारी होऊन चाकरीचे उपयोगीं पडली पाहिजे, या करितां लिहिल्या अन्वयें तुम्हीं बोलून बाईस पत्र पाटील बावांनीं पाठवावें

म्हणजे तोड पडेल, नाहीं तर पडावयाची नाहीं. फौज किती बाळगली ? महाल खराब कां ? चाकरी काय झाली ? हें पुसावें तर इकडील आवघेच जाबसालास पाणी पडतें. सरकारची नुकसानी मात्र भारी हें खरें. दुई नसल्यास इतकेही जाबसाल पुसावे, नीट करवावे. सरकार मसलतीस उपयोग पडावा, इतकेंही करितां येतें. असो, लिहिल्याअन्वयें बाईस लिहून पाठवावें, आणि अमलांत येई तें करावें. बाईस संपुष्टांत घालावी ही गोष्ट येथें नाहीं. अस्ती तर ते मार्ग निराळे घडत जाते. पूर्वील सांप्रदायावर जावें तर दुई नसते तेव्हां कोठेंच पेंच पडत नाहीं. विरुद्ध पडल्यावर सरदारी कोणाकडे ? त्यांचें कसें व्हावें ? याचा विचार करावा लागतो, हें सर्व मनांत आणावें. रा छ १ जिल्काद हे विनंती

ले. २९५ [२९१]

श. १७०२ कार्तीक व. १ ता १३-११-१७८०

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. छ. २७ रमजानपासून डांकेबराबर सात रवानग्या पत्राच्या केल्या. एकाही पत्राचें उत्तर अद्याप येत नाहीं. आश्विन वद्य ७ निघतों म्हणून पत्रें पाठविलीं त्यास दीड महिना होऊन गेला राजश्री पाटीलबावा कधीं निघून येतात हेंही वारंवार लिहिलें. आश्विन वद्य सप्तमीस आह्मी निघून खडकीवर मुक्काम केला. त्यासही पाऊण महिना होऊन गेला. असो, कार्तीकमास गेला. अद्याप उभयतां सरदार आपापले घरीं. फौजांची तरतूद नाहीं. मसलतीचा निश्चय नाहीं. श्रावणपासून पत्रें पाठवीत गेलों कीं, भाद्रपद अखेर कोंडाईबारीवर फौज यावी. त्यासही ठिकाण नाहीं. गाडर आपले सरंजामानिशीं खुषकीनें वसईनजीक आला. वसईचीं वरकड ठाणीं तालुक्यांतील घेतलीं. एक वसई फक्त राहिली. त्यास मुंबईकरांनीं मोर्चेबंदीचें वगैरे सामान बेसुमार केलें. तें धारावीस आणून ठेविलें. कार्तिकी पौर्णिमेचें भरतें समुद्रास येतें त्या दिवशीं पाण्यांतून व खुषकींतून येलगार किल्ल्यावर करणार म्हणोन बातमी आली. पूर्वी रास्त्यांचें पथक व §मुसाभरंज वसईकडे रवाना केले म्हणोन लिहिलें होतें. परंतु इंग्रजांचें सामान भारी. थोडे फौजेनें उपराळा होणार नाहीं. याकरितां रामचंद्र गणेश व बाजीपंत यांबराबर गावडे, निंबाळकर वगैरे हुजरात पांच सात हजार देऊन मागाहून रवानगी करितों. पैक्याचे ओढीमुळें प्रसंग कठीण पडला आहे. आणि मसलत तर सारी इकडेच मुंबईकर सुद्धां भारी पडली आहे. सरदार तर उभयतां

---

§ मुसा भरंज हा कोण ? एक पोर्तुगीज सरदार पेशव्यांचे पदरीं होता. त्याणें वसई नजीकच्या लढाईंत रामचंद्र गणेशा प्रमाणेंच बहुत पराक्रम केला. पण त्याचें नांव सिनोर नरोन्हा असें होतें.

आपले घरीं. परिणाम दौलतीचा ईश्वराधीन आहे. आमच्यानें होईल तेथवर करतो. ईश्वरी इच्छा असेल तशा बुद्धीही सरदारांस होतील. लिहिण्याची, बोलण्याची अवधी या उपर कांहीं राहिली नाहीं. गुजराथ त्यांणीं वेध नाहीं याकरितां मोकळी टाकून वसईकडे आले. सर्व मनसबा विचार ध्यानांत आणून पहावा. र॥ छ. १५ जिलकाद हे विनंती.

ले. २९६ [४७२]

श. १७०२ मार्ग. ९ ता ५-१२-१७८०

श्री

छ ८ जिल्हेज मार्गशीर्ष इहिदे समानीन र॥ केलें.

आमेहेरबानीं खत मसरत नमत पाठविलें तें सातनेक पोंहचलें. अर्काट मकाण नामी मसनदनसींचें त्यांत मुखालिफा कडील सरंजाम पोख्त होता. तें छ ४ जिलकादीं हल्ला करून ठाणें कायम केलें. कित्येक लोक कत्तल आला व बाकी दस्तगीर जाले. हे मकान खुदाचे फजलेकडून फत्ते जालें. हे खुष खबर मालुम होवयाबदल लिहिली असे. हमेश आपली शादमानी व तिकडील मनसब्याची कैफियत निगारष करीत असावी म्हणोन कलमी केलें. चुनाचे अर्काट मकाण मसनदनसींचें, तेथील बंदोबस्त जाल्यास बहुत दाब व लौकिक व बकाया मुरदराज जाऊन मुखालिफावर जरब ऐसे जाणून आज राहायेगानगत निगारष करण्यांत आलें होतें. बफजल इलाही तेथील बंदोस्त खातरखा जाल्याचीं पत्रें आं साहेबांचीं आलीं. त्याबरून न्याहयत खुषी जाली. त्याचा बयान कलमी करण्यांत येत नाहीं. बहुत बेहतर व बन्या जाले. आईंदे आजराहा ये मसलत मुलकी व राहिल्या मकाणाच्या बंदोबस्ताची तदबीर होतच असेल. इंग्रज मकर फरेब बहुत जाणतात. आंसाहेबही त्यांचे रस्मरवयास खूप वाकीफ. हे मरातब मुफसल कलमी करण्यांत आलेच आहेत. मुकरर ल्याहावें याची हाजत नाहीं. इकडील मजकूर तरि साविक कर्नेल गाडर मय सरंजाम सुरतेनजीक होते. त्यांणीं दोन पलटणें केशोपंत याजबराबर खानदेशांत पाठवून रुख नमूद केला होता. त्यावरून गणेशपंत त्याचे मुकाबल्यावर आहेत. त्यांजपाशीं फौजेचा जमाव करविला. मैदानांत यावे हे इंतजारी होती. मैदानच्या लढाईची जुरत न पाहून गाडर मजकूर यांणीं तों रोख सोडून तमाम सरंजामासुद्धां दर्याकिनारियानें कोंकणांत नमूद जाले. सरकारांतूनही सरदार फौजा घांटाखालीं रवाना केल्या. लहान मोठ्या एकदोन लढाया जाल्या त्यांत हटवून माघारें घातलें. याउपरि थोडेच रोजांत होईल ते जहुरात येईल. भोंसले फौजेसुद्धां सरहद्देवर होते तेही बंगाल्यावर उतरले असतील. नबाब निजाम अल्लीखान बहादूर यांची फौज व सरदार जमा जाले व होत आहेत. जलद शिकाकोलीकडे निघावें म्हणोन इकडून पैहाम कलमी करण्यांत येतच आहे. शिंदे होळकरही डेरेदाखल होऊन फौजांचा जमाव जाला व करितात. मेहेरबान कृष्णराव नारायण यांची रवानगी फौजसुद्धां आंसाहेबांकडे

जलदच केली जाईल. येविशींचे मरातीब ऐतजाद दोस्ता नूरमहमदखान व नरसिंगराव लिहितील त्यावरून वाजे होईल. सदर्हू प्रमाणें हैदर अल्लीखां बहादूर यांस नानांचे नांवें हिंदवी पत्र.

छ ७ जिल्हेज इहिदे समानीन मार्गशीर्ष.

ले. २९७ [४८५] | इ. १७०२ सन १७८०

श्री.

उभयतांचे नांवें हैदरखानास छ १० सन.

आंअमारत पन्हानीं महबतनामा आबरीशमामा इबलाग केला तो बरबस्त पोंचला व सदाकतअतवार नरसिंगराव तमाजी मोहिबाकडून पारचे घेऊन आले ते पोंहचून मोमिझले यांणीं कितेक वजे दोस्तीचे इरादे जाहीर केले ते मालूम होऊन बहुत खुशवख्ती जाहाली. साहेब मेहरबान दोस्तां लक्ष्मणराव रास्ते हुजूर येऊन यांणीं नरासिंगराव मोमिझले यांणीं मोहिबाकडील कितेक मुकदमे इजहार केले ते अथां जाले. लेकिन आं अमारत पन्हाची व खुदावंद न्यामत पंडित प्रधान साहेबांची दोस्ती मुस्तकीम होऊन दीनबदीन जादा चालोन दोस्तीची तरक्की व्हावी हें तफैन बजा आहे. बील फैल लक्ष्मणराव मोमिझले यांस कुल कैफियत जाहीर केली आहे. ते नरसिंगराव तमाजी कलमीं करतील ते दर्याफ्त करून मुकदमा अमलांत येणें, हें मसल्तीचे जागा नेक आहे. हमेशा किताबत पाठवुन दील-ताजगी करणें दोस्तीचे जागां लाजम असे.

ले. २९८ [३७२] | शके १७०२ सन १७८०

॥ श्री ॥

राजश्री बिसाजी आप्पाजी गोसावी यांसि.

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेा॥ महादाजी शिंदे दंडवत विनंती. उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुम्ही फौजसुद्धां कसबे आकोळनेर इकडून येणार म्हणून विदित जहालें, त्यास राजश्री आपाजीराव दाभोळकर यांजकडे को। मजकूर हा गांव आहे. तरि त्या वाटेनें आकोळनेरावरून येणार असलां ऐशियास गांव चुकवून यावें. कदाचित् त्याच वाटेनें आलां तरि कसबे मजकुरीं मुक्काम न करून ताकीदीस स्वार देऊन रखवाली करावी+ रा॥ छ २३ रजब* गांवाशीं उपद्रव तुम्हांकडील काडीमात्र

+ येथून खुद्द महादजींचें अक्षर. * येथें बाजूवर महादजी शिंदे यांचा शिक्का आहे.

लांबून द्यावा. गांव इकडील आहे. येविशीं निक्षून ताकीद असावी. बहुत काय लिहिणें हे विनंती.

मोर्तब
सुद

ले. २९९ [४६१] | शके १७०२ सन १७८०

श्री

आपले दुषमानाची [?] तबियत बहुत काइली होती त्यास फजल-इलाही आराम होऊन गुसल केली, याची हकीकत सदाकतदस्तगाह नरसिंगराव तमाजी यांणीं अर्ज केल्यावरून न्याहत खुषी जाहली. याचा तफशील काय ल्याहावा ? आपल्यास सेहत जालियाचे खुषीचे पारचे वगैरे तपशील फर्द आलाहिदा पाठविले असत. + + + + + कितेक मरातब हुजरून गोविंद नारायण व गणेश केशव दि॥ आनंदराव भिकाजी रास्ते यांस इरशाद जाले हे बयान करतील व सदाकत दस्तगार मजकूर लिहितील त्यावरून वाजेह होईल. हमेशा खत किताबत फरहद जादा करीत जावी.

ले. ३०० [४७९] | श. १७०२ मार्ग. व. ६ ता. १७-१२-१७८०

श्री

तुह्मी छ २० माहे जिल्हेजचें पत्र पाठविलें तें छ २२ माहे मोहरमीं पावलें. सविस्तर मजकूर लिहिला तो समजला. त्याचीं उत्तरें व इकडील मजकूर राजश्री बाळाजी जनार्दन यांणीं लिहिला त्यावरून कळेल.मेवा सेव दाणे पंधरा पेटारी एक पाठविली ते पावली.तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जाणे म्हणोन पुरषोत्तम महादेव हिंगणे यांस सरकारचें पत्र.

ले. ३०१ [१०९] | सन १७८० च्या पुढील

॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री तात्या *स्वामींचे सेवेशीं-पोष्य भवानी शिवराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. तागाईत चैत्र वद्य ११ पर्यंत मुक्काम शहर स्वामींचे कृपावलोकनें

* हरिपंत तात्या फडके ?

सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष-राजश्री सेनाखासखेल यांजकडील उपसर्ग सरकार अमलांत होऊं नये या अर्थी सरकारांतून पूर्वी त्यांस पत्रें आलीं होतीं. तीं त्यांजकडे प्रविष्ट करून त्यांचीं उत्तरें आलीं तीं सवेशीं पाठविलीं आहेत. अवलोकनें भावार्थ ध्यानास येईल. यजमान स्वामींची मला आज्ञा आली त्याप्रमाणें मीही सरदारांस पत्र लिहिलें होतें. त्यास तो मजकूर गाळून उत्तर आलें. बजिन्नस कारकुनाची चिठ्ठी आली त्याची प्रती पाठविली आहे. सारांश कोणी [कोणती ?] गोष्ट शाश्वत नाहीं. काठेवाडांत सरकार महालीं फौजेचा उपद्रव लागतोंच आहे. सरदारांनीं फौजेंत वरचेवर पत्रें दिल्हीं, परंतु प्रमाण राहिलें नाहीं. विस्तारें कोठवर लिहूं ? स्वामींचीं खासदस्तुर पत्रें बोधपर येत गेलीं त्यांचा स्मर रहावा, पोटीं विवेक करावा, तें कांहीं मनांत न आणतां दिवसा दिवसाचें करणें नवीन पडतें. असो. सालमजकुरीं काठेवाड झालेवाडचा पैसा ठराबून आले प्रमाणें साहुकाराकडे भरणा पावेल ऐसें दिसत नाहीं. करारांत गायकवाडाकडील उपसर्ग न लागावा ऐसें आले आहे. कौलपत्र मवासांस या अन्वयें आहेत. इच्छा सर्वोत्तमाची. स्वामींची कृपा तारक आहे. विस्तारें विनंती वारंवार कोठवर लिहावी ? स्वामींचे ध्यानांत आहे. तेथें रा॥ गमाजी [गयाजी ?] पाटील यासि निक्षूण ताकीद होत जावी. वरकड मजकूर सर्व ती॥ राजश्री खंडोपंत दादा व राघोपंत विनंती करितां अवगत होईल. हे विज्ञापना.

ले. ३०२ [४८९] | श. १७०२ पौष व. १२ ता २१-१-१७८१

श्री

आं अमारतपन्हानीं किताबत इरसाल केली ते उसुल होऊन मजमून मालूम जहाला. ऐशास बंदेगानअल्ली राऊ साहेब पंडित प्रधान साहेबांचे दौलतींतीत कित्येक खिसा लिहिला तरि जागा जागा हरएक बखेडे जालियास सहजांत बंदोबस्त होऊन येतात. सरकार तर्फेचे सरदारांहीं हिंदुस्थान प्रांतीं तमाम बंदोबस्त अंमल बसवून पादशाहातीचे बंदोबस्त करीत आले. बिलफैल इंग्रज वगैरे उमेद धरून येतात त्यांचाही बंदोबस्त सरकारचे सरदार आहेत तेच करतील. आमा बंदेगान अल्लीच्या दौलतींतील खिसे मोहिबी इशारे बकरार बयादवार कलमीकरितां हे दाना दूरंदेश असतील त्यास लाजस नसे. लेकिन इंग्रजाकडील पलटणें व व कौसलदार येतील त्यांस पोंहोंचवून द्यावें लागेल म्हणोन इशारा केला. त्यास जे सरकारचे फितुरी ते तुमचे फितुरी असतां त्याची सरबरा होते. इहताजुबजमाजे होठेवर आहे त्याचा फायदा जहाला तो अलम रोषन् आहे. ज्यानब या प्रांतीं येऊन मोहिबाचे मुलखास उपसर्ग अद्याप न केला. हल्लीं कौंसलदार तुम्हीं पोंहोंचून देणार तुमचे मुलखाची तालुक्याची खराबी होईल कीं आबादी राहील हे दिलांत दूरंदेशीनें जाणावें.

ले. ३०३ [४६६] श. १७०२ पौष व. १२ ता २१-१-१७८१

श्री

मंबईकराकडोन एक शक्स राव मेहरबान हरीपंत यांजकडे कांहीं बोलावयास म्हणोन लष्करानजदीक येऊन राव मशारनिले यांस सांगून पाठविलें त्यास लष्करांत येऊं न देतां ताछुकियांतून काढून दिल्हा. आं साहेबांस कळावें सबब कलमी केलें असे. ये त जा त दोस्तानूर महमदखां व नरसिंगराव हरदो मानिले यांतून तेथून कितेक बोलून रवाना करून त्यांस हरदोंतून एकजण त्यास तेथून पाठवितील. त्यांणीं कृष्णराव नारायण यांचें हामराहा जलद यावें, ऐसें आं साहेबांचें खत यावें, येविशीं पेशजी कलमी केलें त्या जबाबाची इंतजारी असे. योविशींचे मरातीब हरदो मशारनिले कलमी करतील. त्यावरून वाजे होईल.

इंग्रज मकर फरेब जाणतात. त्याचे खेशास आं मेहरबांही खूब वाकीफ कलमी करावयाची हाजत नाहीं. आं साहेबाकडे ही मकर फरेब करण्यास व राजकारण लावण्यास चुकणार नाहींत.

ले. ३०४ [४६७] श. १७०२ पौष ब १२ ता २१-१-१७८१

श्री.

श्रीमंत खुदावंत-न्यामत राव पंतप्रधान यांचा व आपला पक्का सलुख होऊन करारनामे अहाद शर्तीनशीं कृष्णराव नारायण सरकारचे मातबर यांजबराबर देऊन व आपल्याकडील नरसिंगराव यांची रवानगी जाली. लौकरच आं साहेबापाशीं पोहोंचतील. दरीकिला आखबारे वरून माल्लम जालें कीं, आं मेहरबानाची फौज आदवनी व मुदगल वगैरे नबाब निजाम अल्लीखां बहादूर यांचे तालुकियांत येऊन हरकत केली. प्रांत तमाम वैराण जाला. मकाणास मोहसारा होणार. ऐशियास खुदावंत-न्यामत राव पंतप्रधान यांचा व नबाब निजाम अल्लखां बहादूर यांचा सलुख व एकलास बहुतां दिवसांचा, सर्व बाबे त्याशीं जुदागी नाहीं. हल्लीं आं साहेबांचाही पक्का सलूख होऊन दोस्तांची मजबुती जाली. तेव्हां तिन्ही दौलती एक व बेहबुदी व मसलत एक, जुदागी राहिली नाहीं. इंग्रजास तंबी करण्याची मसलत मातबर अवघ्यांचे एकदिलानें मुखालिफांची तंबी व्हावी. दरमियान असे सिकोपेमुळें मोठे मसल्तींत कमती येती. आपले आपल्यांत पेंच येतात. हे सल्लाह दौल्त नाहीं. याजकरितां फौजेस ताकीद होऊन माघारी आणवावी. नबाबाचे तालुकियास उपसर्ग लागूं नये. अमिरुलउमराव बसालतजंग यांणीं इंग्रजाशीं राजकारण व पैगम केला. सबब अवल हा बंदोबस्त करावा हें आं साहेबांचें दिलांत असेल. त्यास योविशींचे कुल मरातब नबाब मवसुफ यांस कलमी केले आहेत. त्याचा येविशींचा बंदोबस्त जलदच करतील. इंग्रजाचे तंबीचे मसलतीस नबाब मवसुब एकदील आहेत. शिकाकोल राजवंदरीकडे चालून

जाण्यास लौकरच खेमे-दाखल होणार. अदवनी कडील हंगाम लौकर आपण मना करवावा, सर्व मसलती व दूरंदेशी आपलें दीलनशीन आहेतच. मुफस्सलबयान नरसिंगराव पोंचल्यानंतर करतील त्यावरून मालुम होईल. म्हणोन हैदरअल्लीखां बहादूर यांस मदारुल महाम व राव रास्ते व कृष्णरावजी यांचे नांवें पत्रें.

ले. ३०५ [४८७] { स. १७०२ पौष व. १२ ता २१-१-१७८१

श्री.

छ. २५ मोहरम सन इहिदे समानीन पौषमास.

आं साहेबी खत फरहत नमत इबलाग केलें ते बसातनेक पोंहचून शादमानी जाली. इंग्रजाची फौज गारत जाली. हे खबर पोंहचतांच जनराल कूट भारी जमावानशीं चेनापट्टणास आला. इकडील बंदरावर मुखत्यार व जंगी सामानाची तयारी करीत आहे. इंग्रजांनीं नागपूरचे भोसले यांसि मकाफी जाबसाल बोलोन सलुख करून घेतला. मोंगलाकडे तो मातबर फिरंगी जाऊन दरमदार जालाच आहे. कूट मजकूर चेनापट्टणास आल्यावर मंबईकर व गाडर यांस कोणीही वजेनें श्रीमंतांशीं सलूख करून तिकडील सरंजाम इकडे घेऊन येणें ऐशी खतें लेहून जाहाज रवाना केलें म्हणोन चेनापट्टणची बातमी आली. जनराल मजकूर चहूंकडील जमियेत जमा करून मोकाविल्यास निघणार, खुदाचे फजलेकडून त्याची तंबी होईल ते जहुरांत येईल. इंग्रज मकरी काबूतलब त्यांचे चालीस वाफक असां. येथून त्याहावें ऐसें नाहीं. कर्नाटकगड वगैरे कितेक गड किल्ले व महमद अल्लीखांचा भाऊ अबदुल वहाबखां दस्तगीर जाले. अमदाबाद वगैरे मुलूख सोडून देऊन दरोबस्त इंग्रजी जमाव घेऊन जलद येणें या मजमूचे खत व दुसरे जाहाज गाडराकडे कूट मजकूर यांणीं रवाना केलें, लढाईचा आजम् मुकरर केला आहे, तिकडे खालीं मैदान रहात आहे. सबब सुरत वगैरे मकाणें व बंगाल्याकडे भारी पायबंद बसे ऐसें करावें. कृष्णराव नारायण याजबराबर दोन हजार स्वार देऊन इकडे पाठवावें, बाकी मरातब नूर महमदखान व नरसिंगराव सांगितल्यावरून मालुम होईल, म्हणोन कलमी केलें. चुनाचे, जनराल कूट इकडील बंदरावर मुख्त्यार, तो जमाव सुद्धां चेनापट्टणास आला, व चार्लस इस्मत जनराल ही नवा जाला, हे अखबर सरकारांत आली होती, त्यावर हरदो मशारनिले यांचीं पत्रें सरकारांत आलीं कीं, आम्ही चेनापट्टणास आलों. आपली दोस्ती चाहातों. त्यास कोण्याही बंदरास जनराल नवा येतो तो अव्वल सरकारांत खत पाठवीत असतो व कोणाचेंही खत सरकारांत आलें तरी त्याचा जबाब द्यावा हा कदीमापासोन शिरस्ता, सबब त्याचे खताचा जाब दिल्हा. त्यांत मजमू, नेकी, दोस्तींत खलल कोणीकडून हें जाहीर आहे. याची इतला पेशजी आंमेहरबानास निगारष केलाच आहे. भोंसले स्वराज्याचे सिक्कमांत, तेव्हां मकफी सलुख करून घेतील हें कयासांत गुजरत नाहीं. थोडेच आरशांत बंगाला गारत

केल्याच्या खबरा आपल्यास पोहचतील, ऐसें हमेश भोंसले सरकारांत लिहितात. इकडूनही हे शकल जलद नमुदास यावी म्हणोन पत्रें जातात. इंग्रजाचे तंबीचा नक्षा नबाब निजाम-अलीखां बहादूर यांचे सल्लाहानें ठरला.साल्गुदस्तां अदवनीच्या मंझेलामुळें नमूद न जाले.मंझेला फैसल जाला तों बरसात सुरू जाली.बादबरसात आजम् करतील ऐसें होतें. बरसात गुजरली, तांहाल निघणें होत नाहीं. व मिस्तर हालन यास लावून ठेविलें सबब सरकारांतून त्यासीं लिहिण्यांत येतच आहे. हल्लीं आपल खत पोंचल्यावरही निकडीनें नबाब मवसुफ यांस लिहिलें आहे. व कोण्ही मातबरही त्यांची मिजाज दरयाफ्त करण्यास खाना करण्यांत येईल. जनराल कूट याणें अलबता मंबईकर व गाडर यांजकडे जाहांजे पाठविलीं असतील इंग्रज मकरफरेब बहुत जाणतात. हरएक जागा इत्यफाकांत जूदाई आणोन आपली गुरबत व रास्ती दाखवून खुष्कीचे दौलतींत दखल करीत चालिले. याव चालाने तरफैन दिलांत शुबः आणतील, याचे बयान मुफसल पैहाम आंसाहेबांस कलमी क यांत आले व आंमेहरबांही त्य चे रवय्यास खूब बाकीफ खलस दुनयाईत जितवया तमा व तवक्यास्च्या शकला आहेत त्या इकडे व तिकडे बहुताद हल्लीं व आईंदे दाखवितील. हर तरहिबरें निफाक पाडावयास कसूर करणार नाहींत. लेकीन सरकारांत जे गोष्ट करारमदारांत आली तेच पक्की व मंजूर आहे. दुसरी शकल दिलांत यावयाची नाहीं. योविशींची खातरजमा साबीक जाली, त्या बमोजीब असावी. दुनयाईत व दौलतीचे अलमांत कौलकरार आहादपैमान हे उमदी चीज आहे. याचा हिफाजत केलियांतच दौलतीची सरसबाजी आहे. जेथें वचनांत तफावत तेथें दौलतीची कायमी कशी राहील? खुदायताला पैहाम निगा करीत असतो. जेथें सखुनाची पास तेथेंच फजल इलाही, ऐसें समजावें. तरफैनच्या इत्यफाकांत कोणाचें कांहीं चालणार नाहीं व नफेही यांतच आहेत. हें दूरदेशीनें समजोन इकडील करार बमोजीब कायमी आहे, आंमेहरबांचीही असावी. कोणेही बाबें दिलांत शुबः येऊंच नये. करनल गाडर वसईकडे आला, त्यास किल्याची मजबुती पक्की व सरंजाम पोक्त, फौजा उपराळ्यास जाऊन पोंहोचल्याच होत्या. तशांत मारगिरी व लढाई सुरू होतां किल्लेदार याणें हरामखोरी करून मकाण त्यांचे हवाली केलें. आपण निघोन जात असतां सरकारची दौड जाऊन दस्तगीर करून आणिला. हरामखोराप फैलाबमोजीब सजा होईल, लेकीन मकाण मुखालिफाचे बबजांत तूर्त गेलें. इनशाआल्लाहोताला तरफैन्या एक दिलीन मुखालिफाची शिकस्त होऊन सर्व खातरखां होईल. मुजाका नाहीं. इंग्रजाकडील केसो कृष्ण दातार कांहीं पलटणें व तोफा व स्वार जमाव सुद्धां खानदेशांत हंगामा करीत होता त्याचे तंबीवर गणेशपंत बफौज होते. दरीमिला रावमेहरबान तुकोजीराव होळकर मजमीयेत त्या जिल्ह्यांत आले. त्याजकडील कांहीं फौज व गणेशपंत बेहरे एक होऊन त्यांशीं लढाई केली, तीन प्रहर पावेतों लढाई जमली. अखेरीस सरकारचे फौजांनीं चालून घेऊन पलटणें गारत केली, तोफा व हत्ती घोडे व बंदूका वगैरे कुल जिनस लुटीस आला. चंद्रराव पवार सरदार त्यांकडील ठार पडला. जानीनिशी केसोपंत पहाडांत पळून गेला. आईंदे गणेशपंत व होळकरांकडील कांहीं फौज पेंढार कुल सुलतेकडे ताख्ततागाजी करण्यास रवाना करविलें, होळकर मैफौज हुजूर आणविले, जलदच येतील. मेहरबान हरीपंत हुजुरात

वगैरे फौज सुद्धां कोंकणांत गाडराचे मुकाबिल्यावर आहेत. जागा अडचणींची, सबब मैदानांत काढून लढाई घ्यावी या तदबिरेंत आहेत. कोंकण व सुरतेकडे पायबंद असतां गाडर हे मसलत सोडून निघूं पावणार नाहींत. जनराल कुट जमाव करितो, मुकाबिल्यास आल्यावर मैदानांत आंसाहेबापुढें ठरणार नाहीं. बपजलइलाही नतीजाच पोंहोचेल. मेहरबान कृष्णराव नारायण यांचीं रवानगी आंसाहेबाकडे केली. फौज रवाना करण्याची तयारी होत आहे, अनूकरीब रवाना होइल. येविशींचे मरातब ऐनजात दोस्तां नूर महमदखान व नरसिंगराव कलमीं करतील त्यावरून जाहीर होईल. म्हणोन हैदर अलीखां बहादूर यास पत्रें हिंदवी.

ले. ३०६ [४६४] | श. १७०२ माघ शु. ८ ता ४-२-१७८१

श्री.

(छ. १० सफर हिहिदे माघ शु. १० दशमी)

इंग्रज बेइमान कावूतलब बंगाला वगैरे हिंदुस्थानांत ज्या दौलतींत त्यांचा कदम शिरला तेथील अहवाल काय जहाला व इमान देऊन सलूख कसा राखतात हें महशूर आहे. दक्षणेंत याच बमोजीब मकर फरेब करीत चालिले. खुषकींत टोपीकराची चाल वाईट, सबब यांस पोख्त सजा करून खारीज करावें, [ही] सलाह नेक जाणून इंग्रजांचे तंबीचा नक्षा सरकारांत मुकरर जाहला. त्या बमोजीब सरकारांतून लढाई मुरू आहे. भोंसले बंगाल्याचे सरहदेस जाऊन पोहोंचले. हैदरअलीखान यांणीं चेनापट्टण तालुका अर्काट वगैरे कूल् मकाणें तशरुफांत आणिलीं. फक्त चेनापट्टण राहिलें तेथें ही महासरा दिल्हा. नबाब निजामअलीखां बहादूर यांच्याही फौजा शिकाकोल राजबंदरीकडे जाणार. चौकडून ताण बसला आहे. इंग्रज पावप्यादे किती दिवस ठरणार ? ईश्वर सत्तेनें होईल तें जहुरांत येईल. सरकारांतून आणखीही मातबर फौज बंगाल्यांत कलकत्याचे सुमारें रवाना करण्याची तर्तूद होत आहे. फौजेच्या संरंजामाचे तदबिरेविषयीं आपल्यास पेशजी लिहीण्यांत आलें. जबाब ताहाल आला नाहीं. सबब इंतज्यारी आहे. इंग्रजाची चाल बादशाहा आदिकरून सर्व दौलतदारांस वाईट हे द्वंदेशीचे मार्गे समजोन त्यांचे तंबीची शक्कल नमूरांत आणावी. आपणाकडोन उत्तर आलें कीं, फौज पोख्त बंगाल्याकडे आली ऐसें समजावें. वितेक जाबसाल बोलण्यास राघो मल्हार यास आपणाकडे पाठविले आहेत. सविस्तर बोलतील त्याप्रमाणें तर्तूद व्हावी. हा ऐन वख्त आहे. ऐसा समय आइंदे तदबीर केल्या यावयाचा नाहीं. पत्राचे जाब जलद येऊन पोंहोचावे म्हणोन पत्रें हिंदवी.

२. चेतसिंघ.†
१. सरकारचें.
१. नानांचें.

२

† काशीकर चेतसिंग. सुभानसिंग हा चेतसिंगाचा कारभारी असावा. या पत्रावरून नानानें इंग्रजाविरुद्ध सर्व हिंदी सत्ताधीशांस कसें उठविलें तें दिसून येतें.

१. बाबू सुभानसिंग यास नानांचे नांवें जास्त लिहिणें कीं, तुम्हीं चेतसिंघ यांस दूरदेशीने सांगून लिहिल्याप्रमाणें जलद घडावें. म्हणोन व यादीप्रमाणें मजकूर.

३

(तीन पत्रें छ १६ मोहोरम सु॥ इहिदे समानीन.)

ले. ३०७ [४७३]

श. १७०२ माघ शु. १२ ता ६—२—१७८१

श्री

छ १२ सफर सन इहिदे समानीन माघ

आंसाहेबी खत फरहन-नमत इबलाग तें बसाआल्त नेक पोंहचून शादमानी जाली. इंग्रजांची फौज गारद जाली, ही खबर पोंहचतांच चनराल कूट चिनापट्टनास भारी जमावसुद्धां आला. इकडील बंदरावर मुखत्यार आहे. इंग्रजांनीं नागपूरचे भोसले यांसि मिलाफी जाबसाल बोलून मुलूख (सलूख ?) करून घेतला. मोंगलाकडे तों मातबर फिरंगी जाऊन दारमदार जहालाच आहे. कूट मजकूर चेनापट्टणास आल्यावर मंमईकर व गाडर यास कोणीही वजेनें श्रीमंतांशीं सलुख करून तिकडील सरंजाम हिकडे घेऊन येणें ऐशीं खतें लिहून जहाज रवाना केलें म्हणोन चिनापट्टणची बातमी आली. जनराल मजकूर मोकाबिल्यास निघणार. खुदाचे फजले करून त्यांची तंबी होईल ते जहुरांत येईल. इंग्रज मकरी, काबूतलब त्याचे चालीस वाकीफ असां. येथून लिहावें ऐसें नाहीं. तिकडे सुरत बंगाला खालीं मयदान रहात आहे. तिकडे भारी पायबंद बसे ऐसें करावें. कृष्णराव नारायण याजबराबर दोन हजार स्वार देऊन इकडे रवाना करावें. बाकी मरातिब नूरमहमद खान व नरसिंगराव सांगतील त्याजवरून मालूम होईल म्हणोन कलमी केलें. चुनाचे भोंसले स्वराज्याचे शिकमांत. तेव्हां मिलाफी सलुख करून घेतील हें कयासांत येत नाहीं. थोडवयाच आरश्यांत बंगाला गारत केल्याच्या खबरा आपणांस पोंहचतील. ऐसें हमेशा भोंसले सरकारांत लिहितात. इकडूनही हे शक्कल जलद नमुदांत यावी म्हणोन पत्रें जातात. इंग्रजांचे तंबीचा नक्षा नवाब निजाम अल्लीखान बहादूर यांचे सल्लाहानें ठरला. सालगुदस्ता आदवनीचे मझेल्यामुळें नमूद न जाले. पुढें बरसातही गुजली. तहाल निघणें होत नाहीं व मिस्तर होलन यास लावून ठेविले. सबब सरकारांतून त्यास लिहिण्यांत येतच आहे. हल्लीं आपलें खत पोंहचल्यावर नवाब मौसुफ यांस निकडीनें लिहिलें आहे. इंग्रज मकर फरेबी बहुत जाणतात. हरएक जागा इतिफाकांत जुदाई आणोन आपली गुरवत व रास्ती दाखवून खुषकीचे दौलतींत दखलगिरी

करीत चालिले. याच चालीनें तरफैन दिलांत घुभः आणतील. याचे बयान मुफसल पयहम आं साहेबास कलमी करण्यांत आले, व आंसाहेबहीं रवयास खूब वाकीफ आहेत. खुलास दुनयाईंचे अलमांत जितक्या तवक्याच्या शकला आहेत त्या तरफैन दाखवून हर तदबिरीनें निफाक पाडावयासि कसूर करणार नाहींत. लेकीन सरकारांत जे गोष्ट करारांत आली तेच पक्की व मंजूर आहे. तरफैनचे इतिफाकांत कोणाचें कांहीं चालणार नाहीं, हे दूंदेशीनें समजोन इकडील करार बमोजीब कायमी आहे. आंमेहरबानांचांही असावी. कोणेहीं बाबे दिक्कत व घुभः येऊं नये. फीलहाल राव मेहरबान तुकोजीराव होळकर व गणेशपंत बेहरे एक होऊन केसो कृष्ण दातार खानदेशांत इंग्रजी स्वार पलटणें व जमावसुद्धां हंगामा करीत होता, त्याची खूब तंबी केली. इंग्रजी पलटणें कापून काढलीं. चंदरराव पंवार सरदार यांजकडील ठार पडला. खांसा केसोपंत पळोन गेला. गणेशपंत बेहेर व होळकरांकडील कांहीं फौज सुरतेकडे ताख्तताराजी करण्यास रवाना जाले. दोस्तदार ही बमयफौज कोकणांत गाडराचे मुकाबिल्यास आहों. राव मेहरबान तुकोजीराव होळकरही फौजसुद्धां येऊन पावले, जागा अडचणांची सबब मयदानांत काढून लढाई घ्यावी, ह्या तदबिरांत आहों. खुदाचे फजलेकडून होईल तें जहुरांत येईल. करनेल कूट जमाव करून मुकाबिल्यास आलियावर आं साहेबांपुढें ठरणार नाहीं. खूब नतीजा पोंहचेल. मेहेरबान कृष्णराव नारायण यांची रवानगी आंसाहेबांकडे जहाली आहे. फौजेची तयारी होत आहे. अनकरीब येऊन पोंहचेल. येविशीं ये मरातीब आयतेजाद दोस्ता नूरमहमदखान व नरसिंगराव कलमी करतील त्याजवरून वाजे होईल. म्हणोन हैदरअल्लीखान यांस हरीपंत तात्यांचें पत्र.

ले. ३०८ श. १७०२ माघ वा ३
[४७६] ता ११-२-१७८१

श्री.

(छ. २० सफर माघ इहिदे समानीन.)

आं साहेबीं खत-फरहत्त-नमत इबलाग केलें तें बसाअत नेक पोहोंचून शादमानी हांसील जाली. त्यांत कलमी केलें कीं, बिलफैल जनराल कूट भारी जमावानिशीं चेनापट्टणाहून बाहेर निघाले आहेत. आह्मीही त्यांचे तंबीचे पैरवींत असो. खुदाचे फजलेकडून चंदरोनांत जें होईल तें जहुरांत येईल. भोंसले यांणीं बंगाल्याकडील मोहीम करण्याचा करार असतां कूट मजकूर इकडे येतो, बख्शी भोंसलें यांसि कांहीं देणेंघेणें करून आला. याकरितां भोंसले तिकडे मोहीम करीत नाहींत. निजाम अल्लीखान करारा प्रमाणें सिकाकोल राजबंदराकडे न जातां फिरंगियांकडील मातबर वकिलास आपणापाशीं ठेवून फिरंगियाचा व आपला दारमदार मखफी करून घेऊन आपले मारफतीनें श्रीमंतांकडील सलुखाचा करून देतों ऐसें सांगतात, म्हणून तेथून फिरंगियाकडील वकील चिनापट्टणास लिहून पाठवीत आहे. त्याजवरून जनरल कूट मजकुरानें मोंगलाचा व श्रीमंतांचा सल्ला जैशी त्यांची खातर

असेल त्या प्रमाणें करून घेऊन तमाम फौज तिकडे बोलावून, एक तरफ लढाई पाडावी असें त्यांणीं मोकरार केलें आहे. त्यास आपले कायममिजाजीवर नजर देऊन करारप्रमाणें इकडून अमलांत येत आहे. आपणाकडोनही अमलांत येईल.करारास जिनहार कसूर येणार नाहीं हें यकीन आहे. जानो-बैन जुदागी नाहीं. याजकरितां इकडील कैफियत कलमी केली असे. कृष्णराव नारायण यांस दोन हजार स्वारांनिशीं जलद रवाना करावें फरांशिसांची सत्तावीस जहाजें मोरीस बंदरास येऊन येथूनही निघालियाची खबर आली. आपणांस मालूम व्हावें याजकरितां कलमी केलें असे. म्हणोन आं साहेबांनीं मुफसल मरकूम केलें तें जाहीर जालें. चुनाचे भोंसले बंगाल्यांत जाऊन इंग्रजांचे सरहद्देवर पोंहचले तेथून इकडे पैदरपै पत्रें पाठवितात कीं, इंग्रजाचे मुलखांत ताख्त-ताराजी केल्याचें वर्तमान जलदीनेंच येऊन पोंहचेल, ऐसें लिहतात. याजकरितां कांहीं देणें घेणें करून इंग्रजांशीं सलुख करून घेतील ऐसें कयासांत येत नाहीं. आलीकडे यांनीं ताख्त-ताराजी केली ऐसी खबरही आहे. लाकीन भोंसले याजकडून पत्रें आलीं नाहीं. तीं आलियावर आं साहेबांस इतला केला जाईल. नबाब निजाम अल्लीखान बहादूर यांचे सल्लाहानें इंग्रजांचे तंबीचा नक्षा ठहरला, ऐसें असतां मिस्तरास लावून टेविले आणि मसल्तीस नमूद ताहाल होत नाहीं. येविशीं सरकारांतून नबाब मौमुफ यांसि लिहिलें होतें. त्याचें उत्तर आलें कीं, इंग्रजांचा वकील आसल्यास काय मुजाका ? दौल्त आहे तेथें वकील असतच आहेत. लाकीन राव पंडित प्रधान यांसि करार केला त्यांत कसूर सरेमो यावयाचा नाहीं. त्यास इकडूनही त्यांजकडे बरचेवर लिहिलें जातें कीं, करारा-प्रमाणें सिकाकोलीकडे जलदीनें नमूद व्हावें. जनराल कूट याणें मोंगलाचा व श्रीमंतांचा सल्लाह करून घ्यावा याजप्रमाणें मोकरार केलें आहे. म्हणोन आं साहेबीं कलमी केलें. त्यास इंग्रज जात हरामजादी व काबूकार व मकरफरेब फार जाणतात. हरएक जागां इतिफाकांत निफाक पाडोन तरफैन दिलांत घुभः पाडतील. याचा बयान मुफसल पेशजीं आं साहेबांस लिहिण्यांत आलाच आहे. दरीविला यांणीं चाल याच बमोजिब धरिली आहे. परंतु सरकारांतून जे गोष्ट करारांत आली तेच मंजूर. ये बाबे आपणांस खातर जमा पक्का आहेच आणि असों द्यावी. फरांशिसांचीं सत्तावीस जहाजें मोरसाहून निघालीं तेव्हां लौकरच येतील. ते आलियानें इंग्रजांची तंबी बबाकई अमलांत येईल. मेहेरबान कृष्णराव नारायण यांची बमय फौज रवानगी करण्याची ढील नाहीं. लाकीन कित्येक मरातीब मसल्तीचे आं साहेबांशीं बोलावयाचे आहेत याजकरितां येत जात. दोस्तां नूरमहमदखान यांणीं अगर नरसिंगराव यांणीं हमराहा कृष्णराव नारायण यांचें आलें पाहिजे. ये बाबे आं साहेबास इतला केला आहे; त्याचे जबाबाची ईंतजारी आहे. जाव लौकर यावा. बमय फौज येऊन पोंहचतील. याजप्रमाणें नानांचे नांवें हैदरअल्लीखान यांस पत्र.

———

ले. ३०९ [२८२] | श. १७०२ फाल्गुन शु. २ ता २५-२-१७८१

श्री.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि बाईकडे +महालांची वहिवाट चालत आहे त्याप्रमाणें त्यांची त्यांजकडे चालून कर्जदाराकडे महाल आहेत तो ऐवज सरकारांत घ्यावा असें असल्यास उत्तम आहे. राजश्री तुकोजीबांवांकडे ऐवज द्यावा तरि त्याचा खर्च मात्र समजावितील. तूर्त मसलतीचा अर्थ तर ध्यानांतच आहे. त्यांजकडे सरदेशमुखीबद्दल ऐवज येणें त्याऐवजीं सरकारांत घ्यावा असें असल्यास पाटीलबावांशीं बोलून बाईस लिहून पाठवून बाईनीं ऐवज सरकारांत द्यावा याप्रमाणें निश्चयांत आणावयास येईल. सुचली विनंती लिहिली आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक होईल म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास सरदेशमुखीचा ऐवज सरकारचा त्यांजकडे वाजवी येणे आहे त्या पक्षी तुम्ही पाटीलबावांशीं बोलून बाईस लिहून पाठवून सरकारच्या ऐवजाचा फडशा लवकर करून घ्यावा. ऐवज फार येणें आहे. सरकारांत येईलसें करावे रा छ. १ रविलाबल. हे विनंती.

ले. ३१० [२३१] | श. १७०२ फाल्गुन शु. ५ ता २८-२-१७८१.

श्री.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि तुम्ही छ ४ रविलावलचें पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री पाटीलबोवा दरबूच खामखेड नजीक भेलसें पांच कोस येथें गेले. इंग्रज सिप्रीपासून सुरंजे पावेतों ठाणीं बसवीत आले. तों अंबाजी इंगळे व सदाशिव मल्हार यांच्या त्यांच्या लढाया होत आहेत. तुरुक स्वारांपुढें वाढोन आले होते त्यांवर लढाई करून कांहीं मारले, कांहीं पळाले, दोन चार धरून आणिले. तों पाटीलबावा आल्याचें वर्तमान ऐकून पुढें यावयाचें महकूफ होऊन सुरंजेजवळ मुक्काम केला. राणेखानभाई† पुढें फौज घेऊन गेले.खेची राजगडबालेही आले. फौजा जाऊन पोंहोचल्या. रस्त बाहेरील बंद केली. सिप्रीपासून ठाणीं बसवीत इंग्रज आले तीं ठाणीं चंदेरीकर राजे याणें उठवलीं. ते पाटीलबोवांस येऊन सामील होणार. इंग्रजाचा संदर्भ आला आहे कीं, आम्हांस माघारे जाऊं द्या म्हणतात, असें लिहिण्यांत आलें आहे. पक्कें लिहिलें येईल तेव्हां लिहून पाठवूं. आपल्या कडील वर्तमान इंग्रजाचें येत नाहीं

+ बाई होळकर=अहल्याबाई.

† ज्याने महादजीस पाणीपत येथून पळून येत असतां आपल्या पखालीच्या बैलावर बसवून दक्षिणेंत आणिलें. ह्यास महादजी भावाप्रमाणें लेखी व म्हणूनच त्यास 'भाई' असें म्हटलें आहे. मागेंही बरेंच पत्रांत 'भाई' असें म्हटलें आहे तें यांसच.

म्हणोन तेथें बापूजी रघुनाथ ठेविले आहेत त्यापाशीं म्हणत होते. परभारें त्यांस वर्तमान गाडर्ड बोरघांट चढोन वरता आला हें कळलें म्हणून पुसत होते, म्हणोन लिहिलें, तें कळलें. त्यास पाटीलबावा भेलशा नजीक जाऊन पोहोंचले, उत्तम जाहलें. इंगळे व दक्षीची तुरक स्वारांची लढाई जाहली त्यांत जे तुरक स्वार सांपडले त्यांची जबानी इंग्रजाचें लष्करचें वर्तमान सविस्तर पुसून लिहून घेऊन पाटवाव्या व इंग्रजाबरोबर सामान खरेंखुरें किती आहे हाही शोध घेऊन लिहून पाटवावें, व खेची राजगडवाले यांची व आपली मिळोन सारी फौज आपले मिळोन किती हें सविस्तर लिहून पाटवावें. बाहेरील रसद बंद केली. याप्रमाणेंच चौतर्फा बंदी चांगली केल्यानें आयास येतील. चंदेरीवाल्यानें कोणकोणतीं ठाणीं उठविलीं ? पाटीलबोवांस कधीं येऊन भेटणार ? त्यापाशीं जमाव किती आहे ? हें लिहून पाठवावें. माघारे जाऊं या म्हणोन इंग्रजाचा संदर्भ आला आहे. त्यास ते दगाबाज आहेत, त्यांचें कदापि ऐकूं नये. संदर्भ लावून फौज चोहोकडे गेली म्हणजे मग ती चाल करतील. आयते मैदानांत सांपडले आहेत. पारपत्यच होय तें करावें गाडर बोरघांट वर चढून आल्याचें वर्तमान इकडील सविस्तर पूर्वी लिहून पाठविलेंच आहे. रा छ २१ रविलोवल हे विनंती.*

ले. ३११ [२०९] | श. १७०२ फाल्गुन शु. १२ ता ७-३-१७८१

श्री.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशी.

विनंती उपरि. प्रस्तुत इकडील वर्तमान तर छ ३ रबिलाखरी खोपलीहून चार पलटणें तोफा वगैरे सरंजाम घेऊन मजबुदीनें पनवेलास रस्त आणावयाकरितां रात्रीस कूच करून जाऊं लागलीं, तों राजश्री परशरामपंत भाऊ यांची बातमी होतीच, याणींही रात्रीसच त्यांसीं जाऊन गांठ घातली. निकड करून लढाई लाविली. तों पेढारी लागूनच होते. शें दीडशें माणूस ठार व दोनशे पावेतों जखमी इंग्रजाकडील केले. तीन चारशे बंदुका व दाहा बारा उंट व छकडे दारू गोळ्याचे व डेरे राहुट्या व चार साडे चार हजार बैल त्यांवर कांहीं जिनसी व कांहीं रिताडाचे याप्रमाणें पाडाव आणिले. उजडतांच मुक्काम त्यांचा बारबईवर अडचणीच्या जाग्यांत जाला. त्यावर दुसरे दिवशीं रात्रीस कूच करून जाऊं लागला. तो त्यांणीं गांठ घातली. शें पन्नास त्याकडील माणूस मारलें व हजार बैल पाडाव आणला. इकडून बाणांचा मारगिरी केली. त्याणें त्या कडील दारूचे छकडे होते त्यास आग लागून त्याकडील माणसें फार जळालीं. रात्रीसच पळून पनवेलास गेले. बराबर दीड दोन हजार पावेतों बैल राहिला तो बराबरच नेला. त्याजवर जरब बसून नाश फार जाला. याकरितां मुंबईकडील पलटणें घेऊन मजबुदीनें तिकडून येतील व घाटावर एक तोंडीं लढाई निश्चय तोफा घेऊन जाऊन मारगिरी करावी तेही करितात. घांटावर बातम्या बांधून अडचणींत

* या पत्रांतील हकीकत इंग्रजी ग्रंथांत आढळत नाहीं.

राहिले आहेत पुढें वाढून येत नाहींत. तेव्हां कामही मातबर होत नाही. याकरितां राजश्री तुकोजी होळकरही फौजसुद्धां थोडक्या दिवसांनें कोंकणांत गेले. भाऊ व हे एक होऊन तिकडून रस्त घेउन येतील त्यावर निवड करतील. राजश्री पाटील बाबांस पत्र लिहिलें आहे तें प्रविष्ट करावें रा॥ छ. १२ रविलाखर हे विनंती.

ले. ३१२
[२८६]

{श. १७०२ फाल्गुन व. ६
ता॥ १५—३—१७८१

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि तुम्हीं छ २८ सफरचीं उज्जनीचे मुक्कामचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. राजश्री शिवाजी विठ्ठल यांच्या गळीं हिंदुस्थानची मसलत घालून सुरतेकडे यावें, अथवा शिप्रांचे पलटणाचे तरी पारपत्य लौकर व्हावें, दिवस थोडे राहिले, व मोठा मनसबा तूर्त होत नाहीं, या दोंहोंतून तरी एक लौकर घडावा, याप्रमाणें लिहिलें होतें. हें राजश्री पाटीलबाबांनीं ऐकून उत्तर केलें कीं, मसलत चांगली लिहिली आहे. परंतु इंगळे जाऊन इंग्रजाशीं भिडले असतां इंग्रजांनीं सिप्री घेउन पुढें चाल धरली. भूपाळकरांनीं त्यांशीं राजकारण लाविलें कीं तीन लाख रुपये देऊन मेलसे घेऊन देणें. आम्ही मागें कूच केलें म्हणजे इंग्रज पुढें घेऊन मेलशास लागेल. भूपाळकर सामील होईल. मेलसें घेऊन अगदीं माळवा हाता खालीं घालून बऱ्हाणपुरास ठेप देतील. यास्तव आम्हासच इंग्रजांचे पारपत्यास गेलें पाहिजे. याचें पारपत्य करून देशास येतों. दक्कूच इंग्रजावर चालले. सुज्याबलपुरापुढें नऊ कोसांवर मुक्काम गेल्याचें वर्तमान आलें. त्यापुढें फौज घेऊन भाई गेल्याचें वर्तमानही आलें. आम्ही होतों तेव्हांच भाई बोलत होते कीं, सुजाबलपुरापासून पुढें जाऊं. गेले असतील. लष्करांत होतों तेथें शरीर प्रकृत नीट नाहीं, याकरितां राजश्री सदाशिवपंत दाजींचे भाचे बापूजी रघुनाथ व गंगाजीस लष्करांत ठेवून उज्जनीस आलों काशिदांच्या जोड्या तेथें ठेविल्या आहेत. वर्तमान लिहिल्यांत येईल. पाटीलबाबांची डाक लष्करापासून येथपावेतों आहे. येथून पुण्यापावेतों सरकारची डाक आहे. पत्रें येतील. राजश्री शिवाजी विठ्ठल व बळवंतराव धोंडदेव व पवार पाटीलबाबांस सामील झाले. म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास सिप्री कडील पलटणें पुढें न येतां उगीच तेथें राहिलीं होतीं असें समजोन सुरतेकडील विचार लिहिला होता. हल्लीं पलटणेंच पुढें आलीं तेव्हां खुद्द राजश्री पाटीलबावाच इंग्रजांवर गेले, त्यापक्षीं भूपाळकरांचें राजकारण इंग्रजाशीं होऊं पावणार नाहीं. आतां त्या पलटणाचें पारपत्य करावें हाच मनसुबा चांगला. पाटीलबावाच गेले तेव्हां जथ चांगला पहून पारपत्य करतील यांत गुंता नाहीं. प्रकृत नीट नाहीं म्हणून उज्जनांस आलेत, उत्तम केलेंत. औषध घेऊन लवकर बरें व्हावें. बापूजी रघुनाथ लष्करांत ठेविले त्यांनीं वर्तमान वरचेवर लिहून पाठवीत जावें. शिवाजी विठ्ठल वगैरे पाटीलबावांस सामील झाले, उत्तम झालें रा॥ छ. १५ रविलाखल हे विनंती.

ले. ३१३ }
[२७७] }

{श. १७०२ फाल्गुन व. १०
ता। १९-३—१७८१

श्री

राजश्री याविराजित राजमान्य राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. राजश्री खंडेराव पवार राजश्री महादजी शिंदे यांजकडे गेले आहेत म्हणोन ऐकिल्यांत आलें, ऐशियास इकडे सरकार चाकरी भरावयाचे दिवस, त्यांचें पथक इकडे आहे, यास्तव मशारनिले आले पाहिजेत. तरि तुम्हीं पाटीलबावांस लिहून पाठवून पवार तेथून निघून लवकर येत तें करावें. रा॥ छ २३ रविलावल. बहुत काय लिहिणें लोभ असों द्यावा हे विनंती.

ले. ३१४ }
[४७४] }

{श. १७०२ फाल्गुन व. १३
ता। २२-३-१७८१

श्री.

छ २६ रबिलोवल. शिमगा. इहिदे समानीन पत्र रवाना जालें.

गाडर जमावासुद्धां घाटावर येऊन अडचणीचे जागां मुक्काम करून आहे. मेहेरबान हरीपंडत व तुकोजीराव होळकर सामान सरंजामसुद्धां त्याचे मुकाबल्यास आहेत. मुतवातिर लढाया अमलांत येतात. मेहरबान परशरामपंडत यांस बमयफौज रस्त बंद करून पायबंद द्यावयाकरितां घाटाखालें कोंकणांत रवाना केले. शिपरी कोल्हारावर इंग्रजी पलटणें आलीं, त्यांचे तंबीकरितां रावमेहरबान महादजीराव शिंदे त्या रुखें चालून गेले. हें आंसाहेबास पेषजी कलमी करण्यांत आलेंच आहे. दरीविला परशराम पंडत यांणीं इंग्रजी पलटणें पनवेलीहून रसद घेऊन येत होतीं त्यांजवर फौज पाठविली. त्या फौजेनें पलटणाशीं गांठ घालून दोन तीनशें लोक इंग्रजी कत्तल केले. एक निशाण व तीनसे बंदुखा व शंभर बैल बाबत व दोनशें बैल गल्ला ऐसे लुटून आणिलें. तिकडील तोफांचे गोळ्यानें परशराम पंडत यांजकडीलही घोडीं व लोक ठार व जखमी जाले. ते रोजीं पलटणांस पुढें जावयाची फुरसत न सांपडली. सबब अडचणीचीं जागा व झाडीचे आसरियानें मुक्काम करून राहिलीं. परशरामपंडत खोपलीचें रुखें होते, त्यांणीं दुसरे दिवशीं कुल् सरंजामसुद्धां त्या पलटणांवर येऊन इलगार केला. तेव्हां पलटणें फौजेच्या मुकाबिल्यास ठरूं न सकतां झाडींत पसरा झालीं. व गाडर याकडून कुमक येऊन रात्रीं गलबळ न करतां पलटणें झाडींतून निघोन गेलीं. अडचण व झाडीचा आसरा नसता तर गारतच केलीं असतीं. गाडर जमावासुद्धां घाटावर मुक्काम करून आहे. त्यास हरीपंत व होळकर यांणीं छ २४ रबिलोवलीं तलाब्यास जाऊन त्याचे जमावावर तोफा लागू केल्या. व बाणाचीही मारगिरी बेतन्हा केली, ते वस्तीं तिकडोन इंग्रजी लोक चालून आले, त्यांस हरिपंत व होळकर यांणीं गाडरवर स्वार पायउतारा करून हटवून माघारें घातले. खुलश गाडर यांस दुतर्फा फौजेचा ताण

व शह बसला, सबब अंदेशांत आहे. पुढें यावयाची ताकद होत नाहीं. महादजीराव शिंदे यांजकडोन बातमी आली कीं, कुमक नामें सरदार इंग्रजी पलटणासहित शिराजे नजदीक दोहों कोसांवर मुक्काम करून होता. तेव्हां त्यांशीं मुकाबील होऊन तोफांचा व बाणांची मारागिरी केली. इंग्रज लढाईचा ताब आणूं न सकतां हटून शहरचे आश्रयास गेले. आजींसबब आम्हींही ताकुबावर जाऊन व लगट करून न्यहायत आजिज व वतंग केलें. या प्रमाणें शिंदे यांचें पत्र आलें. त्यावर दोन दिवस चौगिर्दा फौज उभी करून तोफांची व बाणांची मारगिरी करून तंग केलें. त्यावर दुसरे दिवशीं आखीरष इंग्रज बेहिम्मत होऊन दुसरा इलाज न पाहतां चंदेरीचे रुखें फरारी जाले. ते वख्तीं महादजीराव शिंदे यांणीं त्यांचा पाठलाग करोन इंग्रजी लोक दोन तीनशें तहतंग केले, व बाहीर बुनगा लुटोन घेतलीं. त्या लढाईंत शिंद्याकडील एकदोन सरदार व घोडीं व कांहीं लोक कामास आले. आईंदा फौजेचे पलटणांशीं लडाई होत जात आहे. बहुत करून पलटणें गारत होतील ऐसें कियासांत येतें. याबमोजीब सरसरी सरकारचे कारकुनाकडून लढाईतच पत्र लिहून बातनी आली. मुफसल मागाहून वर्तमान आलियावर लिहिलें जाईल. म्हणोन हैदर अलीखां बहादूर यास नानांचे नांवें हिंदवी पत्र.

ले. ३१५ [२७२] | श. १७०३ चैत्र शु. १ ता॥ २५-३-१७८१

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे शेवेशीं

विनंती उपरि. गाडराची लढाई सुरू झाली याउपर वर्तमानें वरचेवर येत जाऊन आम्हांस कळवीत जावें असें रा० पालीलबाबा बोलले म्हणून लिहिलें. त्यास जें वर्तमान होत गेलें तें लिहीत गेलों. पुढेंही वरचेवर लिहून पाठवीत जाऊं. प्रस्तुत गाडर सव्वा महिना घोरघाटावर येऊन जाहला. अर्धा सरंजाम खालीं ठेविला आहे. अर्धा वरता आहे. अडचणीची जागा धरून बतेऱ्या बांधोन तोफा ठेऊन राहिला आहे. रा० हरिपंत व होळकर पंचवीस तीस हजार फौजेनिशी कारल्यानजीक आहेत. नित्य तोफा घेऊन जाऊन लढाई होत असत्ये. कोंकणांतून पिछाडीवर रा० पर्शरामपंत भाऊ बारा हजार फौजेनिशीं आहेत. तेही खालील पलटणांवर निकड बरीच करतात. परंतु अद्याप घाट सोडून पुढें येत नाहीं. या पुढें वर्तमान होईल तें लिहून पाठऊं.

सरकारचा ऐवज रा० पाटीलबाबांकडे येणें याचें उत्तर पूर्वी लिहून पाठविलें आहे. रा० राघोपंत गुरूजी तेथें आहेत. सरकारचा ऐवज किती होतो तें रुजवातीनें याद करावी म्हणोन लिहिलें त्यास रुजुवातीनें याद करतों, परंतु याची एखादी वरात केल्यास फलाणे मुदतीस देऊं अशी कांहीं तोड पडावयाजोगी असल्यास लिहून पाठवावें. मसलतीवर रा० पाटीलबावा गेले असतां लिहूं नये. परंतु सरकारांत लाचारी व वरातही करावयास कोठें जागा राहिली नाहीं याकरितां लिहिलें आहे.

रा० पाटीलबावांचें पत्र पाठविलें तें पावलें. त्याचें उत्तर पाठविलें आहे तें प्रविष्ट करावें. रवाना छ. १९ रबिलावल हे विनंति.

———

ले. ३१६ } {शके १७०३ चैत्र शु.५
[३१५] } {ता॥ २९-३-१७८१

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. राजश्री पाटीलबावा व फौज एकत्र होऊन इंग्रजाचे भोंवतें एक दिवस फिरून तीन कोसांवर मुक्काम आहे तेथें आले दुसरे दिवशीं तोफा तयार करून घेऊन गेले. तों इंग्रज भेलशाच्या सुमारें दोन कोस आले होते ते माघारे रुरंजे जवळ जाऊन पुढें पाव कोसावर बतेच्या बांधोन तोफा ठेवून मारगिरी करतात. पाटीलबावा बरोबर दोन तोफा लंबछड्या आहेत त्यांचे गोळे इंग्रजांच्या मुक्कामा पावेतों जातात. परंतु त्यांणीं काम ह्मावें असें नाहीं. यास्तव भेलशाहून दोन तोफा भारा आणावयास पाठविले आहेत ते आल्यावर निकड करणार. इंग्रजांचा जोर भारी पडावासा नाहीं. इंग्रज सुरजेजवळ आला येणें करून पोटाची बेगमी आहे. लष्करा बाहेर त्यां कडील कोणी येऊं पावत नाहीं. पाटीलबावांजवळ फौज पेंढार सुद्धां वीस हजार आहे. निकड केल्यास लौकरच कार्य ह्मावेंसें आहे म्हणून लिहिलें कळलें. त्यास इंग्रज मैदानांत आले आहेत त्यावर पाटीबावाही खूप फौजे सुद्धां गेले आहेत. जथही बरा पडत चालला आहे. तेव्हां निकड करून पारपत्य करतील ही खातरजमाच आहे. भेलशाच्या तोफा येऊन पोहाचल्याच असतील. भोंवतालची बंदी इंग्रजांच्या पक्की करून भूल करून मग निकड केल्यास काम चांगलें होईल. युद्धाचे कार्यास पाटीलबावा दीक्षित, येथून त्याहावेंसें नाहीं. भूपाळकर फौज पाठवितो म्हणून पत्रें पाठवितात, अद्याप त्यांकडील कोणी आलें नाहीं म्हणोन लिहिलें. त्यास भूपाळकर याचा विश्वास धरूं नये. खांसा अथवा फौज पाठविली तथापि सावधता असावी. भूपाळकराचीं पत्रे येथें आलीं होतीं कीं वकील पाठवितों. त्याचें उत्तर पाठविलें कीं, इंग्रजाचे पारपत्यास तुम्हीं जाऊन राजश्री पाटीलबावांस सामील ह्मावें व वकील इतबारी पाठवून द्यावा. हें वर्तमान तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. रवाना छ. २३ रबिलावल हे विनंती.

———

ले. ३१८ } {ता॥ २०-४-१७८१
[२१८] }

॥ श्री ॥

राजश्री पाटीलबावा गोसावी यांसि.

आशीरवाद विनंति उपरि. पनबेलीहून पांच पलटणें गोडराकडे घोरघाटास येत होतीं. त्यावर राजश्री तुकोजी होळकर व राजश्री परशरामपंत भाऊ यांणीं निकडीनें लढाई

करून इंग्रजांकडील नाश फार केला. हें पूर्वी सविस्तर लिहिलेंच आहे. त्यावरून कळलें असेल. घाटावरूनही राजश्री हरिपंतांनीं तोफा त्यांच्या बतेऱ्यानजीक नेऊन मारगिरी इंग्रजावर फार केली, व त्यांनींही मारगिरी भारी केली. छ २३ रोज मजकुरीं रात्रीस गाडर आपले सरंजामासुद्धां घाबरा होऊन घाटा खालीं उतरला. तें वर्तमान हरिपंतास कळतांच फौजसुद्धां घाटावर जाऊन वरून तोफांची व बाणांची मारगिरी केली. त्यावर दुसरे दिवशीं संभाळून गाडरानें कूच करून जाऊं लागला, तों होळकर व परशरामपंत फौजसुद्धां तिकडून आडवे होऊन इंग्रजावर निकड केली; व हरिपंतही फौजसुद्धां व दोन तीन तोफा घेऊन घाटाखालीं उतरून पाठीमागून निकड केली. हजारों गोळ्यांचे छकडे व गाड्या व डेरे राहुट्या वगैरे पाडाव आणले. लढाई दुतर्फाही चालली आहे म्हणोन पत्रें आलीं. मागाहून होईल तें लिहून पाठवूं. आपल्याकडील वर्तमान सविस्तर वरचेवर लिहून पाठवीत जावें. ग्वालेरी सिमथरकर गुजरांनीं घेऊन आपणाकडे पत्रें पाठवीत म्हणोन वर्तमान ऐकिलें त्यावरून संतोष जाहला. परंतु आपलें पत्र सविस्तर वर्तमान लिहून आलें नाहीं. या दिवसांत इंग्रजाकडील ग्वालेर आली ही मोठी गोष्ट लौकिकास व मसलतीस चांगली जाहली. प्रस्तुत इंग्रज कोठें आहे वगैरे सविस्तर वर्तमान लिहून पाठवावें. इंग्रजावर फौजांची निकड बसून लढाई होत आहे. घाबरा जाला आहे. रा॥ छ २५ राकर. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

———

ले. ३१९ [२४७] } { ता॥ २०-४-१७८१

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरी. तुम्ही छ. ११ रबिलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. गंगाजी रामजी पाटील बावांजवळ सडे स्वारींत आहे. त्याचें पत्र छ. ५ त रखेच आलें तेंच बजिनस पाठविलें आहे. त्यांत फौज जमा होऊन इंग्रजास घेरा घालून आहेत व ग्वालेरचें वर्तमान लिहिलें आहे, विदित होईल, म्हणून लिहिलें तें कळलें, व गंगाजीचें पत्र पाहिलें. फौज जमा होऊन इंग्रजावर नित्य लढाई होते, फार उत्तम आहे. पुढें इंग्रज कोणाकडे रोंख धरतो व पाटील बावा तर्दुद काय करतात हें लिहून कळवावें. ग्वालेरचा किल्ला घेतला म्हणून लिहिलें आहे त्यास ही गोष्ट मोठीच झाली. ग्वालेर सरकारांत आली येणें करून इंग्रजाचा थारा मातबर मोडला व मनुष्यांसही उपयोग पडला. पुढें होईल तें वरचेवर शोध चांगला करून लिहून पाठवीत जावें. इकडील वर्तमान राजश्री पाटील बावांस लिहून पत्र पाठविलें आहे हें प्रविष्ट करावें, त्या पत्रावरून तुम्हांसही सविस्वर मजकूर कळेल. इंग्रज घाबरा होऊन माघारा जात आहे. इकडील फौजांची निकड बसली आहे. पुढें होईल तें लिहुन पाठवूं. रा॥ छ २५ राखर हे विनंति.

ले. ३१९ [१२२] } { ता। २६-४-१७८१

श्री

पो छ १ जमादिलोबल सन इहिदे समानीन वैशाख शुद्ध ३ गुरुवासर

श्रीमंत महाराज राजश्री रावसाहेब ‡स्वामींचे सेवेशीं- विनंती सेवक हरी बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता। छ २९ रबिलावर पावेतों स्वामीचे कृपावलोकनें यथास्थित असे विशेष. स्वामींनीं छ २५ रा।लावरचे आज्ञापत्र स्वहस्ताक्षरें कृपा करून सादर केलें तें छ २७ मिनहूस पावोन परम संतोष जाला. इंग्रज घाट उतरोन गेला. तुम्हीही त्यांचे पिछावर गेलां. उभयतां सरदार आहेत. चहुंकडून येकदांच एलगार करून इंग्रज बुडवून टाकणें म्हणून आज्ञा. ऐशास इंग्रज घाटमाथा खंडाळ्यावर होता. त्यास राजश्री परशरामपंत व तुकोजी होळकर यांस फौज सुद्धां घाटाखालीं अगोदर रवाना केलें होतें. यांणीं त्याची रस्त मना केली होती. यामुळें त्याचे लष्करांत महागाई जाली, व आम्ही खडकाळ्याचे मुक्कामींहून एका दो रोजांत ला [क ?] व पास येऊन तोफा सुरू करून मारगिरी करीत होतों. महागाईमुळें त्यांनी घाटमाथाहून कूच करून खालीं उतरून खालापुरास इंग्रज आला. आम्ही छ २५ रा।लावरी घाटाखालीं उतरून रात्रीचे त्याचे लष्कराचे पाऊण कोसाचे तफावतीनें उभे होतों. त्यास त्यांणीं ते दिवशीं प्रहररात्र रहातां कूच करून चालिला. तेव्हां आम्हीं फौजसुद्धां निकड करून झुंजाचें तोंड लाविलें. सरकारचे सरदार व लाक व गाडदी व हशमी लोकांनीं स्वामिसेवा एकनिष्ठता महाराजांचे चरणांचें चिंतन करून इंग्रेजांचा जंगी मार होत असतां खातरेस न आणितां लढाई सुरू करून मोठ्या तारफेनें बेन्याहत [बेनियाहत ?] मर्दुमी करून युद्ध केलें. इंग्रेजास जरब चांगली दिल्ही. त्याजवर छ २८ रा।लावरी खालापुरापुढें चौक आहे त्या मुक्कामींहून त्यांणीं कूच केलें. त्यास आम्ही प्रहर रात्रीस पहाटेचे तयार होऊन त्यांचे पिछावर आलों. व उभयतां सरदा ही आले. तोफांची मारगिरी त्याजवर केली, व लोकांनीं व सरदारांनीं काल निकड करून जुंझाचें तोंड लाविलें. सर्वांनीं स्वामिसेवा जीवाभ्य श्रमें करितात. इंग्रजांचें माणूस फार जायां जाहलें. गाडर इंग्रेज यांणीं हिंदुस्थानांत जागां जागां लढाया केल्या त्याच तौरानें इकडे मर्दुमी दाखवावयास आला. त्यास स्वामी प्रतापवान्. सरकारांत सरदार व लोक वीर भारथी आहेत, यांणीं मोठे मोठे मनसुबे करून शत्रु पादाक्रांत केले असतां या टोपकराचा मजकुर काय ? स्वामींच्या तेजप्रतापें याचा गर्व परिहार जाहला. याचें पुरतें पारपत्य स्वामींच्या आज्ञेप्रमाणें करावें हाच आमचा सर्वांचा सेवाधर्म, तदनुरूपच धावदाव पाहून लगट करीतच आहों. दारूचें बळ फार, लढवई चांगला, म्हणूनच मर्दुमी करून मुक्कामास जातो. इंग्रज पनवेलीस जाऊन पोहोंचला. आम्ही दो तिही कोसांचे अंतऱ्यानें आहों. कालचे लढाईंत एक तोफ इंग्रजांची पाडाव जाली व बंदुखा आल्या. दारू मार्गानें लोकांस फार सांपडली. पेंढाऱ्यांनीं बैल आणिले, त्यांच माणूस फार जायां जालें. सर्व गोष्टी स्वामींचे पुण्यप्रतापाच्या आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

‡ सवाइ माधवराव.

ले. ३२० }
२४४] } { ता॥ २८-४-१७८१

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं

विनंती उपरि. गाडरायें थैलीपत्र आम्हांस आलें होतें त्याचा मजकूर व त्यायें उत्तर लिहिलें तो मजकूर राजश्री पाटीलबावांस कळावयाकरितां पत्र लिहून पाठविलें होतें. त्यावर दुसरें पत्र जाहजाचा सरदार पातशाई इंग्रजावडील यायें थैलीपत्र आलें होतें त्याचा मजकूर व उत्तर लिहिलें त्याचा मजकूरही लिहून पाठविला होता. त्यास पाटीलबावांच्या पत्रायीं उत्तरें आलीं त्यांत गाडरायचे पत्रायचा मजकूर लिहिला तो कळला हें उत्तर आलें नाहीं, आणि मागाहून जाहजांचे सरदारायचा मजकूर लिहिला त्यायें उत्तर आलें आहे. तेव्हां गाडरायचे मजकुरायें पत्र पावलें कीं न पावलें हे काहीं समजले नाहीं; यास्तव शोध करून लिहून पाठवावें, व श्रीमंतास आरोग्य जाहल्यायें पत्र पूर्वी पाठविलें तेंही पावलेंच* असेल रा छ ३ जमादिलावल हे विनंती

ले ३२१ }
[३०८] } { ता ३०--४--१७८१

श्री

राजश्री नारोपंत स्वामीं सेवेशीं

विनंती उपरि. येथून तुम्हास पेशजी लिहिलें होतें कीं, तूर्त गोहोदकराशीं बिघडूं नये. त्यास ममतेंत घेऊन इंग्रजाचे मसलतीस हमवार करून व आणखी चार राजेरजवाडे अनकूळ करून घेऊन यमुना उतरून पाटीलबावांनीं अंतरवेदींत हंगामा सुरू करावा, पुढें पाहिजे तसें करावयास येईल, म्हणून लिहिले होतें. त्यायें उत्तर पांडुरंगपंत यांणीं लिहिलें कीं, प्रसंगीचें वर्तमान तर वरचेवर विनविलच आहे. यंदां यमुनेस उतार नाहीं त्यापक्षीं पार जाणें कळतच आहे. अंतरवेदीस मसलत पाहून इंग्रजांचे पारपत्याची तरतूद असावी तेव्हां साऱ्यांचे दोष पोटात टेवून तूर्त मसलतीचें अर्धें समेटून घेऊन उपयोगीं पडतसे करावें, तें नाहीं, त्यापक्षीं चार दिवस हंगामाचे याच प्रांतीं घालून अखेरीस सहजच साऱ्या गोष्टीची अडचण, तेव्हां विचार करणें प्राप्त व इतकें घडावयाचा प्रसंग दृष्टीस पडतो यामुळें सूचनार्थ विनंती लिहिली आहे. कदाचित् दैवें करून एखादें घबाड साधल्यास मग त्याजवर या प्रांतीं छावणी होऊन देशीहून फौज बोलवून बाज बरसात मातबर मसलत होईल तर न कळे. विचार करून पाहतां अशा गोष्टी घडाव्या हें दिसत नाहीं, म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास तिकडील मसलती विषयीं भरंवसा राजश्री पाटीलबावांचा मानतों. असें असतां पुढील विचार या प्रकारचे दिसों लागले हें ठीक नाहीं. पाटीलबावा मातबर सरदार, नांव लौकीक मोठा,

---

* सवाई माधवरावास देवीचें दुखणें झालें होतें.

याचा नक्षा राही तें घडावें. पहिलीं लिहिणीं काय येत गेलीं आणि होत आहे काय हें पाहवें. रवाना छ ४ रविलाखर हे विनंती

ले. ३२२
२४८] {ताा ५-५-१७८१

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री पांडुरंगपंत स्वामीचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी जनार्दन, साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. राजश्री नारो शिवदेव यांस येथून पत्रें लिहून पाठवीत असता त्यांत राजश्री पाटीलबावांचे चित्तास वाईट वाटावयाजोगें तर कांहीं लिहित नाहीं; तत्रापि त्यांच्या समजेस एकादें वाईट वाटतें. त्यास पेशजी एक वेळ नारोपंतास लिहिलें होतें कीं, जें पाटील बावांचे चित्तास वाईट वाटावयाजोगें असेल ती पुरवणी दाखवूं नये. मजकूरच तोंडानें बोलत जावा. याप्रमाणें लिहिलें असतां मध्यें एकादे वेळेस पत्रें दाखविल्यावर वाईट वाटोन उदासीनतेचे भाव तुमच्या लिहिण्यांत कां येतात? असो, हल्लीं लिहिलें आहे तरि पाटीलबावांस संतोष वाटावयाजोग्या ज्या पुरवण्या असतील त्या वाचून दाखवीत जाव्या. कदाचित एखादे पुरवणींत त्यांस वाईट वाटावयाजोगें असल्यास ती पुरवणी दाखवूं नये, मजकूरच तोंडानें त्यांस संतोष वाटे असा बोलत जावा. रा० छ १२ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति

ले. ३२३
[२१६] {ताा १७-५-१७८१

श्री.

राजश्री पाटिलबावा गोसावी यांसि.

आशीर्वाद विनंति उपरि. इकडील कितेक मसलतीचे विचार राजश्री नारो शिवदेव यांस लिहिले आहेत. सर्व समजोन पुतेंपणें मनन करून पोक्त विचारें उत्तरें लिहून पाठवावीं. दौलतीचें सर्व ओझें आपल्यावर आहे. मसलती तों तिडणींच्या दिसतात. तजवीज करून उलगडल्या पाहिजेत. पत्राचीं उत्तरें सत्वर यावीं. रा. छ. २२ जमादिलावल. बहुत काय लिहिण लोभ असो दीजे हे विनंति.

ले. ३२६
[२७४]

ता १७-५-१७८१

श्री.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि. पांडुरंग रघुनाथ यांचे पत्रांतील मजकुराचीं उत्तरें.

छ. १८ जिल्हेजीं शेषाद्रून दोन पलटणें कुलारसा यावयास निघालीं, त्यावर भाई जाऊन लढाई झाल्याचा मजकूर लिहिला तो कळला.

छ २५ जमादिलाखरचे पत्राच्या रवानगीचा लखोटा पावला नाहीं. शिरोंजे पावेतों थांग + + त्याचे ठिकाण लावतों म्हणून लिहिलें आहे. त्यास त्या लाखोट्याचा शोध जरूर लावावा. इंग्रजाकडील वगैरे कित्येक मसलतीचे मजकूर नाजूक पत्रांत लिहून गेले आहेत. एखाद्या परक्याच्या हातीं लागल्यास वाईट पडेल, व पाटीलबावास ही मजकूर समजणार नाहींत. याजकरितां शोध जरूर करून ठिकाण लावावें; आणि पाटीलबावांस पत्रें गेलीं आहेत त्यांच्या मालुमाती जमा धरून उत्तरें यावीं व तुमच्याही पत्राची मालूमात जमा धरून उत्तरें असावीं, म्हणजे मजकूर ध्यानांत येतो. अलीकडे तुम्ही उज्जनी महेश्वरास आहां याकरितां इकडून पत्रें जातात तीं पांडुरंगपंताकडे पाठवितों. तीं तुमच्या नांवचीं पत्रें म्हणून मालूमात धरून येथें पत्रें लिहित नाहीं. आपलेकडील मजकूर मात्र लिहितात, त्या पुरवण्या येथ पाठवितां. येणें करून येथील पत्रांचें उत्तर समजत नाहीं व येतही नाहीं.

इकडून पत्रें राजश्री पाटीलबावांस पाठविलीं त्यांचीं उत्तरें मागितलीं त्याचें उत्तर पाटीलबावांनीं केलें कीं, सांप्रत कांहीं आम्ही लिहित नाहीं. त्यावयाजोगा दिवस आणील ते दिवशीं लिहूं. या विषयीं बोललों कीं ही रीत मोंगलास किंवा हैदरखानास लिहिण्याचा विचार, आपले घरीं हें चित्तांत आणावयाचें कारण नाहीं. त्यावरून आम्हांस उत्तरें लिहावयास सांगितलीं आहेत. मागाहून घेऊन पाठवितों म्हणून लिहिलें आहे. त्यास पांडुरंगपंतांनीं उत्तरें चांगलींच केलीं. आपले घरीं पत्र लिहिण्यास संकोच असूं नये जें बरें वाईट होईल तें इकडून आम्ही लिहित असतों, तिकडून त्यांनीही लिहावें. येविषयीं दुसरा अर्थ चित्तांत आणूंच नये.

छावणीचे प्रकरणीं राजश्री शिवाजीपंत बापू व गंगाधर गोविंद व झांशीकर व हाडे कोठेकर यांचीं खलबतें निरनिराळीं होऊन त्यांनीं उत्तरें केल्याचा मजकूर कलमवार लिहिला तो कळला. त्यास जो तो आपले परी बोलतो. परंतु मसलत पाटीलबावांवर आहे, याकरितां इंग्रजांच्या शहावर छावणी करून त्यांची रस्त बंद होय व जड न हात तें करावें.

रा छ २२ जमाजिलावर हे विनंति. पौ छ १२ रजब सुरसन इसने समानीन डाके बराबर.

ले. ३२७ } {ज्येष्ठ व. ११ श. १७०३
[५००] } {ता १७-६-१७८१

पो छ २७ जाखर.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **बाबूराव स्वामींचे सेवेसीं.**

पो **बाळाजी जनार्दन** साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुम्हीं पत्र छ १९ जमादिलावलचें *पाठविलें तें पावलें. इंग्रेज घांटावर आला होता ते समयीं **श्रीमंत** महाराज **मातुश्री** आईसाहेब व **श्रीमंत** महाराज राजश्री छत्रपति आपल्यास यश यावें व शत्रूचा पराजय व्हावा हें चिंतन करीत होती, त्याप्रमाणें घडलें, संतोष जाला. सविस्तर वर्तमान लिहून पाठवावें म्हणोन लिहिलें, तें कळलें. ऐशियास **गाडर** इंग्रज भारी जमाब व पोख्त सामान सरंजाम व तोफा घेऊन लढावयाची हिंमत धरून **बोर**घांट चढून अडचणींचीं जागा धरून राहिला होता. तेथें मातबर फौजेचा येलगार व्हावयाचा इलाज नसतां राजश्री हरीपंत फडके फौजेसुद्धां खडकाळ्यानजीक मुक्काम करून तेथून अहर्निशीं इंग्रेजांकडे तलाव्यास जाऊन इंग्रेजांवर तोफा लावून बाण सोडून मारगिरी व करोल वगैरे लोक पायउतारा करून निकड करीत गेले; व राजश्री **परशुरामपंत भाऊंची** खानगी फौजेसुद्धां घाटाखालीं इंग्रेजांची रस्त बंद करून ताण द्यावयाबद्दल केली. त्यांणीं घाटाखालीं जाऊन **गाडरा**चीं पलटणें रस्त घेऊन **बोर**घाटास येत होतीं, त्यांजवर दोन वेळां निकड करून व लढाई मारून तीन चारशें माणूस त्यांचें ठार केलें. डेरे राहुट्या दारूचे छकडे व रुप्यांचीं भांडीं व पांच हजार बैल घोडीं वगैरे लुटून आणिलीं. त्यांजवर **पनवेली**हून पांच पलटणें **गाडरा**कडे कुमकेस येणार ही बातमी येतांच राजश्री तुकोजी होळकरही फौज घेऊन घांट उतरून कोकणांत गेले; आणि इंग्रेजांचीं पलटणें, चालोन येत होतीं त्यांजवर होळकर व भाऊ यांणीं घेतलें. या समागमें तोफा नसतां करोल पाय उतार करून घोडे उठवून इंग्रजांचे आराब्या पावेतों जाऊन हत्यार लाविलें. निकडीनें जुंजले. त्याही लढाईंत चार पांचशें माणूस इंग्रेजांचें ठार जहालें. इकडीलही घोडे माणूस ठार जहालें. उंटें छकडे बंदुका वगैरे त्याजकडील पाडाव आलें, घाबरे होऊन **खोपवली**चा पल्ला जवळ व **गाडरा**नें दोन पलटणें पुढें कुमकेस पाठविलीं, यामुळें तीं पलटणें खोपवलीस येऊन पोहोंचलीं. परंतु त्यांची बाकी खराबी बहुत जहाली. इकडूनही राजश्री हरीपंत यांणीं फौज व तोफा गाडद घेऊन जाऊन **गाडरा**वर निकड भारी केली. दुतर्फा मातबर शह व जरब बसली.

---

* " मूळांत जमादिलाखरचें " असें आहे व पत्राचा महिना " जमादिलावल " लिहिला आहे. हें अर्थात चुकीनें नक्कल करणारानें लिहिलें असावें. पुढेंही लढाई हल्ले वगैरेचा महिना ' जमादिलाखर ' असा दिला आहे तो आम्ही बदलून ' जमादिलावल ' केला आहे व अस्सल पत्र लिहिल्याचा महिना "जमादिलाखर" दिला आहे. सं. का. सं.

फिरून कुमक अथवा रस्त येऊन पोहोंचण्याची मुष्कील पडली. त्यांचे लष्करांत दाण्या-वैरणीची महागाई झाली व तेथें नेट धरून रहावयाची हिंमत न राहिली. अशा विचारांत पडून छ २३ रविलाखरीं गाडर जमियत व सामान सरंजामसुद्धां रात्रौ घांट उतरून खालीं जाऊं लागला. हीं बातमी हरीपंतास लागतांच तयार होऊन गेले तों ते खालीं उतरले. यांणीं वरून मारगिरी केली तेव्हां दुसरे रोजीं खालून इंग्रेज कूच करून जाऊं लागला, तों हेही खालीं उतरून त्यांशीं गांठ घेतली व तिकडून होळकर व भाऊ यांणीं ही निकड बसविली. बरी लढाई जहाली. इंग्रेज घाबरा होऊन शें दिडशें मुर्दे त्यांणीं टाकिले ते त्यांस काढावयाची फुरसत न पडली. गाडे छकडे दारू व हजारो गोळे तोफांचे पाडाव आले. ते दिवशीं तीन चारशें माणूस इंग्रेजांचे ठार पडलें. भारी गळाठा त्याचा होऊन खालापुरास राहिला. तेथून छ २४ रबिलावली चौकास जाऊं लागला. तेव्हांही हरीपंत व होळकर व भाऊ असे तिघे तिहींकडून इंग्रेजांस घेरून लढाई दिली. त्या दिवशींही इंग्रेजांचें पांच सातशें माणूस ठार जखमी जहालें. दारू गोळे बंदुका छकडे आले. तेथून छ २८ तारखेस कूच करून पनवेलीस जाऊं लागला. तेव्हांही यांणीं गांठून फारच निकड केली. आराब्या-पावेतों घोडे चालवून लढाई मारिली. हजार बाराशें माणूस त्यांचें ठार जखमी जहालें. चार सरदार त्यांजकडील मातबर पडले. त्यांत एक दोन गाडराचे प्रतीचे चांगले लढवाई मर्द होते. बंदुका व तोफा बेसुमार पाडाव आले. बुणगें वगैरे लुटलें गेलें. दारूगोळे तर मुबलक सोडविले. इकडीलही घोडे माणूस बरेंच जायां जखमी जहालें. परंतु इंग्रेजास जरब चांगली बसली. फार खराबी त्याची जहाली. मुडदे देखील काढावयाची फुरसत न सांपडली. शिकस्त होऊन मुंबईकडे बंदराकिनारा गेला. याप्रमाणें महाराजांचें प्रतापें होऊन इकडील सरदारांस यश आलें. सर्व प्रताप महाराजांचा, पुढें ही होणें तें महाराजांच्याच प्रतापें होऊन हा राज्याचें कल्याण होईल. चिंता नाहीं, राजश्री गणेशपंत बेहेरे फौजसुद्धां सोनगडाकडे आहेत तिकडे इंग्रेजांचीं पलटणें होतीं त्यांसही मशारनिल्हेनीं जरब बरीच पोहोंचविली; व प्रस्तुत कोकणांतून राजश्री बाजीपंत यांस फौजसुद्धां वसई तालुकियांत व सुरतेपर्यंत मुलखांत गर्दी करून ताण द्यावयाबद्दल रवाना केलें असे. तें सविस्तर कळावें म्हणोन लिहिलें असे. व श्रीमंत महाराज यांणीं श्री आबासाहेब व महाराज यांचे सेवेशीं विनंतिपत्रें लिहून पाठविलीं आहेत. गुजरावीं. श्रीमंतांस देवी येऊन आरोग्य जहालें. स्वारी पुण्यास आली. रा छ २४ जमादिलाखर बहुतकाय लिहिणें. लोभ असावा हे विनंति. §

---

§ह्या पत्राची नकल आम्हांस रा० सा० गोपाळराव बळवंत नेने यांजकडून मिळाली.

ले. ३२८
[२६३]

आषाढ शु. ७ श. १७०३
ता २८-६-१७८१

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि.

चार पांच हजार गोसावी+ झांशीकडून पाटीलबावांनीं आणविले होते ते आले. त्यांची रवानगी भाईकडे केली. सांप्रत गोसावी बैरागी वगैरे मिळोन कमपेष दहा हजार पायींचा जमाव इकडील जहाला आहे. पलटणें* कोलारस शेषई व डोंगरांची जमा कोलारसास येऊन तोफा नेणार त्या समयीं इकडून निकड करावयाचा विचार आहे, म्हणून लिहिलें. त्यास पायींच्या माणसांचा जमाव बराच जाहला निकडही करतील. रा॥ छ. ५ रजब हे विनंति.

जालमसिंग कोटेकर यांसि छ. ७ मिन. हूस निरोप दिल्हा ते कोट्यास गेले, दोन तीनशें स्वार व दोन तीनशें पायींचे माणूस लालाजी बल्लाळ यांजबराबर ठेविले म्हणून लिहिलें, त्यास संस्थानिक व राजे रजवाडे जमीनदार यांस निरोप द्यावयाचा नव्हता. औघ्यांसच निरोप दिल्हा हें ठीक जालें नाहीं. जें करणें तें विचार पाहुनच करीत असतील. पैा॥ छ. २९ रजब सुा॥ इसनेसमानीन डांके बराबर.

ले. ३२९
[२६२]

आषाढ शु. ९ श. १७०३
ता ३०-६-१७८१

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेसीं.

विनंति उपरि. त्रिंबक महादेव काकिर्डे ¶ यांजकडे सरकारचे कर्जपट्टीचा ऐवज येणें त्याचा फडशा जाहला नाहीं, याजकारितां त्यांचे गांवची सरकारांत जप्ती करून कर्जपट्टीचा ऐवज घेतों. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. रा॥ छ. ७ रजब हे विनंती.

+ हे गोसावी लोक शिंदे पेशवे वगैरे सर्वांच्या लष्करांत थोडे बहुत असत. दुसरे बाजीरावाजवळ एक नंगी पल्टण म्हणून होती ती गोसाव्यांचीच होती.

* हीं पल्टणें इंग्रजांचीं. शेषई, कोलारस वगैरे ठिकाणें झांशीचे पश्चिमेस आहेत. 'डोंगरीची जमा' हे शब्द वाचण्यांत कांहीं चूक असावी. 'बुढा डोंगर' म्हणून शेसई जवळ आहे त्याचें नांव या मोहिमेंत येतें.

¶ महादजी गोविंद काकिर्डे पूर्वी महादजीचा दिवाण होता त्याचा मुलगा.

ले. ३३० [३१६] | आषाढ व. १ श. १७०३ ता ६-७-१७८१

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. माधवराव तुकदेव मानाजी शिंदे वगैरे मिळून दोन तीन हजार फौज जमा केली आणि खूळ करावें या उद्योगांत होते. ही बातमी येतांच त्यांजवर प्रतिनिधीकडील फौज पाठविली. त्यांची व माधवराव वगैरे यांची गांठ गोपाळपुरानजीक पंढरपुरी पडोन लढाई झाली. माधवराव यांस जखमा लागोन पाडाव आले. मानाजी शिंदे यांसही जखमा लागल्या, आणि पन्नास पाऊणशें लोकांनशीं पळून गेले. वरकड फौज लुटून फस्त केली. वर्तमान तुम्हांस कळावें म्हणून लिहिलें आहे. रवाना छ. १३ रजब हे विनंति.

पैवस्ती छ. २९ रजब सुरूसन इसने समानीन, मुकाम वस्ती वुडा डोंगर डांके बराबर.

ले. ३३१ [२६१] | भाद्रपद व. १ श. १७०३ ता ३-९-१७८१

॥ श्री ॥

राजश्रि याविराजित राजमान्य राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरि. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. राजश्री सदाशिव पवार याजविशीं मजकुराचें पत्र राजश्री पाटील बावा यांस लिहिलें आहे. त्यास तुम्हीं तें पत्र वाचून पाहून त्याप्रमाणें पाटील बावांशीं बोलून आनंदराव पवार यांजला इकडे पाठवून देवबावें. सदाशिव पवार याचें महालीं व कारकुनास आनंदरायाकडील हरएक विशीं उपद्रव लागतो त्याचा बंदोबस्त करून उपद्रव न लागे ऐसें करवावें. रा छ. १४ रमजान बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

---

* सदाशिव पवार-हा धारकर पवार यांच्या मुलखांत पेशव्यांचा जाहगीरदार असावा.

ले. ३३२ [२९४] | मार्गशीर्ष शु. १२ श. १७०३ ता २७-११-१७८१

श्री.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. राजश्री पांडुरंग रघुनाथ यांणीं लिहिलें त्यांचीं उत्तरें.

इंग्रज दरकूच ग्वालेरीस जाऊन पुढें हेष्टिनाचे कुमकेस जाणार; दहा तोफा व दोन हत्ती इंग्रजांनीं नेले होते ते चिमणाजी पंताचे स्वाधीन केले. कोलारसांत सरकारचे ठाणें कायम जहालें. शोषईतही ठाणें सरकारचें पाठवितों, म्हणोन चिमणाजी पंतांनीं लिहिलें त्यास ही पलटणें हेष्टिनास मिळाल्यावर मसलत भारी पडेल याचा विचार काय केला आहे., हें राजश्री पाटीलबावांस पुसावें. तोफा हत्ती दिल्या, मतलबाकरितां घेतल्या, परंतु पुढील विचार आधीं करावा तरच चांगलें. कोलारस सिप्रींत ठाणीं बसलीं याचा संतोष मानूं नये.

चेतसिंग राजा पांच हजार फौज सा छ.१० जिल्हेज हे विनंती.

व पन्नास हत्ती खजीना घेऊन बिजेगडास कुटुंब ठेवून रेवामुकुंदपुरास आला, तेथून मुजरत पत्रें राजश्री पाटीलबावांस पाठविलीं. राजाचें मत फिरोन जमाव करून, इंग्रजावर जावें. पाटीलबावांकडे वकील रवाना केला, तो आल्यावर कांहीं पैक्याची तोड पडल्यास त्या प्रांतीं जावें असा विचार दिसतो म्हणोन विस्तरें लिहिलें, त्यास अमानी इंग्रजास मिळाला व फितुर चेतासिंगाचे फौजेंत जाल्यामुळें राजा हलका जहाला, या मुळें निघाला, परंतु हिंमत आहे, अशा समयीं त्याची कुमक करून इंग्रजांचें पारपत्य करावें. केवळ पैक्यावरच दृष्टी ठेवूं नये. मसलतीवर नजर देवून करावें. समय आहे.

ले. ३३३ [४४५] | पौष शु. ७ श. १७०३ ता २२-१२-१७८१

श्री. *

शिक्का

दस्तक सरकार राजश्री पंतप्रधान ता कमाविसदारान व चौकीदारान ब रहदारान व बाजेलोकान व जकाती महालानिहाय सुरूसन इसने समानीन् मया व अलफ. राजश्री नारो कृष्ण कारकून निसबत दफ्तर हशम याचे तांदूळ खंडी २ दोन एकूण बैल सर २० वीस खातें फिरंगाण कोकणांतून खरीदी करून हर एक घांटे एक खेप पुणियास आणितील त्यांस आणूं देणें. जकातींचा तगादा न लावणें. जाणिजे छ. ६ मोहरम आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

---

* येथे बाजूवर शिक्का आहे.

ले. ३३४
[७२]

शु. १७०३
सन १७८२ पूर्वीचें पत्र

श्री

राजश्री यादवराव बल्लाळ दिंमत बजाजीराव घाटगे स्वामीचे सेवेशीं पो. शामराज बल्लाळ फडणीस कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष. राजश्री पांडुरंगराव यादव यांजकडे मजमदारीचें काम देविलें त्यास त्यांचे हातून काम घेऊन वेतन देववीत जाणें. राजश्री परशराम पंडित व जयवंत बाबा मंत्री व रघुनाथ पंडित सचिव व रघोजी भोसले सेनासाहेब सुभा व राजमंडलचे कारभारी व बाळाजी जनार्दन व परशराम रामचंद्र व परशराम सदाशिव व त्र्यंबकराव सदाशिव व जयवंतराव बाबा व फत्तेसिंग बाबा गायकवाड याप्रमाणें हुजूरची मंडळी यावयाचीं, त्यास राजाजीराव घाटगे व बहिरजीराव व निराजी शामराव व शामराज निळकंठ पेशवे व निजाम अल्लीखान व हैदरखान व मुरादखान वगैरे व राघोजी आंगरे बजारतमाव सरखेल व गोविंदराव गायकवाड हिंमत बहादूर याप्रमाणें राजमंडल यावयाचीं त्यास त्यांची बरदस्त बराबर मंडळी सुभानराव व घोरपडे व पिराजीराव घोरपडे व शामराव गोविंद व जानराव बाजीराव शलकर [?] याप्रों यावयाची. त्यास त्यांची बरदस्त ठेवणे. रा छ ३ जमादिलावर बहुत काय लिहिणें हें विनंति.+

ले. ३३५
[११५]

शु. १७०३
सन १७८२ पूर्वीचें पत्र

श्री

राजश्री बाजीराव यादव दिम्मत पंत सचीव स्वामीचे सेवेशीं—

पो गंगाधरराव यादव दिम्मत बाजीराव घाटगे नमस्कार विनंती विशेष-राजश्री माधवराव बल्लाळ फडणीस यांचे चिरंजीव बळवंतराव याजकडे मजमदारीचें काम देविले आहे. त्यास यांचे हातून काम घ्यावें व दुसरे राजश्री तुकोजीराव आटोळे सफेजंग बहादूर व यशोदाबाई जाधव गंगाधरराव गोविंद व बाजीराव रघुनाथ व परशराम पंडित व जयवंत बाबा मंत्री व अहिल्याबाई व रघोजी आंगरे व रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा व लक्ष्मणराव वगैरे राजमंडळ यांची स्वारी यावयाची त्यास त्यांची बरदास्त ठेवणें रा॥ छ साबान बहुत काय लिहिणें हें विनंती.

+ हैदर तारीख ७—१२—१७८२ रोजी वारला, त्यापूर्वीचें पत्र असावें.

ले. ३३६ [१३६] } { श. १७०३ सन १७८२ पूर्वीचे.

श्री

राजश्री यादवराव बल्लाळ फडणीस व मजमदार व दफ्तरदार स्वामींचे सेवेसीं पो। बाजीराव यादव कृतानेक सां। नमस्कार विनंती विशेष–राजश्री पांडुरंगराव रामचंद्र व दिनकरराव शामराव यांजकडे मजमदारीचें काम सरकारांतून देविलें यास्तव त्यांचें हातून काम घेऊन वेतन देवीत जाणें. राजश्री परशुराम पंडित व जयवंतबाबा मंत्री याप्रमाणें स्वारी यावयाची यास्तव त्यांची बरदास्त ठेवीत जाणें. दुसरें राजश्री येशवंतराव पारसनीस व बजाजीराव घाटगे व जनार्दन बल्लाळ व त्र्यंबकराव यादव व जाफरखान ब शादरखान व महंमदखान व निजाम अलीखान व शामखान व हुसेनखान व पिराजीराव व हंबीरराव तुकोजीराव आटोले समशेर बहादर सेनाकर्ते व सेना धुरंधर व राजआज्ञा ममलकत मदार, डबीर पारनीस याप्रमाणें राजमंडल यावयाचें त्यास त्यांची बरदास्त ठेविण्यांत यावी, हे विनंती.

ले. ३३७ [१९३] } { श. १७०३ माघ व. ७ ता ४-२-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं

विनंती उपरि. इंग्रजाचे तहप्रकरणीं पाहतां हैदरखानाचें कलम मनस्वी लिहिलें आहे. याचें कारण पाहतां शोध लागला कीं, हैदरखानाचा तह इंग्रज करीतच नाहींत. सरकारांत वकील आला व भोसले. मोंगल, त्याविशीं बोलतात. तेव्हां हरएक तोड काढून तह करतील. तेव्हां आपले महत्व राहात नाहीं या करितां हैदरखानाचे पक्षाचे याणीं फेशजी लिहिलें. पुढें हैदरखान सुद्धां तह करावा म्हणून पत्रें येऊं लागलीं, त्यास त्याचा दाब इंग्रजावर असावा, तेव्हां त्याणें खानाचे तोडजोडीचा मजकूर बोलावा , तें तर नाहीं. कसेंही करून आपले हातें तह करून आपलें मात्र महत्व रक्षावें या अर्थे इंग्रजांनीं म्हटलें तें कबूल केलें. सरकारचे जाबसाल नीट जाले नाहींत आणि खानाचेंही कांहीं नाहीं, तेव्हां आपला ऐवज बाहेर निघतो. तेव्हां तहनाम्यांत लिहिलें आहे तें कलम लिहून घेतलें. सांबाचा जाबसाल हातीं घ्यावया विशींचें कबूल करीतच नाहीं. आम्हांशीं तर निक्षून बोलले आहेत कीं, सांबास दिल्हा तरच तह करूं, न देत तर करणार नाहीं. त्यास मध्यस्त पाटीलबावा, यास्तव मध्यस्तांचे हवाला करावा हें बोलून पहावें. दिल्हा तर हाताखालीं ठेवावा. नाहीं तर पेंच आम्हांवर घालावा असाही विचार आहे. इंग्रज आपल्या पाशीं ठेवून अखेरसाल पावेंतों दतिया, चंदेरी, नरवर, खेची, व भूपाळ ही मसलत करावी. पुढें अखेर सालीं उज्जनीस

जाऊन बसावें. तिकडे यावयाविशीं पत्रें आल्यास बोलावें कीं, तीन वर्षें मसलतीच्या पेंचामुळें ताकद राहिली नाहीं. फौज दूर करून दोन वर्षें घरीं बसले आहेत त्याणीं मसलत करावी, हे वाद घेऊन बसावें. असे रंग दिसतात. गोहदकराचें पारिपत्य झाल्यावरून मोठें कृत्य झालें यावरून मर्जी बेहवा जाली आहे. लिहिले मजकूर प्रगटांत येऊं नयेत. भाई सरकारपल्यावर निंक्षूण आहे. नवे कारभारी यांचेही वावगें नाहीं. या उपरि होईल तें वर्तमान लिहिन. इतक्या विक्षेपाच्या गोष्टी होळकरा करितां म्हणोन बोलण्यांत भाव दिसतात. म्हणोन विस्तरें करून भाव लिहिले ते सविस्तर कळले. त्यास हैदरखानाच्या कलमाचा प्रकार तर पेशजी लिहिलाच आहे. त्याप्रमाणें अमलांत यावें. दादासाहेबांचा प्रकार तर तुम्हांशीं निक्षूण दादासाहेब दिल्हे तरच तह करूं, नाहीं तर करणार नाहीं याप्रमाणें बोलले आहेत. तेव्हां याप्रमाणें करतीलच. इंग्रज आपल्यापाशीं ठेवून अखेर साल पावेतों दतिया, चंदेरी वगैरे ही मसलत करावी, पुढें अखेर सालीं उज्जनीस जाऊन बसावें, तिकडे यावयाविशीं पत्रें आल्यास मसलती मुळें ताकद राहिली नाहीं, फौज दूर करून दोन वर्षें घरीं बसले आहेत त्याणीं मसलत करावी असे रंग दिसतात म्हणोन लिहिलें. त्यास पाटील बावांचीं पत्रें जलदीचीं आलीं कीं, इंद्रसेन निरोपाची जलदी करतो. या करितां तहनामा व डौल लौकर पाठवावा, या विषयीं पत्रें आलीं त्यावरून तहनामा व डौल पाठविले. तेव्हां इंग्रजांस आपल्यापाशीं बहुत दिवस कशास ठेवतील? येथून लिहिल्याप्रमाणें दादासाहेबांस हवाली करून घ्यावयाचें करून खानाचीही तोड पाडतील. फौज दूर करून दोन वर्षें घरीं बसले आहेत त्याणीं मसलत करावयाचा प्रकार तर त्यांचे घरीं बखेडा त्या विशीं कितीक वेळां पत्रें पाठविलीं आहेत परंतु काय जालें? असो. त्यांचा बंदोबस्त जाल्यावर मसलतीस ही उपयोग त्याजकडून घडेल. लिहिले मजकूर प्रगटांत येऊं नयेत म्हणोन लिहिलें. त्यास हा मजकूर प्रगटांत आणिला नाहीं. भाई सरकारच्या पल्यावर निक्षूण आहेत व नवें कारभारी यांचेंही वावगें नाहीं म्हणोन लिहिलें, त्यास सरकार कामाची काळजी भाईस आहे तेव्हां त्यांजपासून सरकार उपयोग तेंच घडत असावें व नवें कारभारी यांचें स्वरूप समजलेंच आहे. पुढें घरीं बसावें, खर्चाखालीं आलों म्हणावें, असें लिहिलें त्यास काय ईश्वर बुद्धी देईल तें करतील. परंतु समयास सरकार कामास अंतर करणार नाहींत. रा छ १ रविलावल हे विनंती.

ले. ३३८ [२५१] | श. १७०३ फाल्गुन शु. २ ता १४-२-१७८२

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेसीं.

विनंति उपरि. चंदेरी व दतिया व खेची या संस्थानांत उपद्रव देऊं नये, म्हणोन आज्ञा जाहली होती तें पत्र पाटीलबावांस दाखविलें नाहीं. कारण. संस्थानाविशीं नकार

झाल्यास विक्षेप मानितील. याकरितां दाखविलें नाहीं व मजकूरही बोलिलों नाहीं. स्वामींनीं हा मजकूर राजश्री आपाजीराव यांस लिहिला होता तें पत्र राजश्री राघोपंत‡ गुरुजी यांणीं पाहिलें होतें. त्यावरून एके दिवशीं संस्थानचा मजकूर निघाला तेव्हां राघोपंत बोलिले कीं, तिन्ही संस्थानें घ्यावयाची परवानगी सरकारांतून येईल असें दिसत नाहीं. यावरून मर्जी बहुत विक्षेपास पावली. आम्ही संस्थानें घेऊंच लागल्यावर आम्हांस परवानगी कशास पाहिजे ? असें मनास येईल तेंसं विक्षेपानें बोलूं लागले व बोलतात, हें आम्हांस ही परभारें समजलें आहे. राघ्यानें यांजकडे पेगाम लाविला आहे कीं ग्वालेर देतों. हे म्हणतात गोहदेसुद्धां घेईन. याप्रमाणें बोलणीं होतात. येविशींचा वगैरे होळकराविशीं विक्षेपाचीं बोलणी बोलतात. त्याचा मजकूर सविस्तरें करून लिहिला तो सविस्तर कळला. त्यास संस्थानाविशीं परवानगी येईल असें दिसत नाहीं हें राघोपंतांनीं बोलल्यावरून इतका विक्षेप होऊन बोलावयाचें कारण काय ? तिनी संस्थानें सरकारचीं त्यांचें रक्षण ब्हावें तें एकीकडे राहून संस्थानिकांचें पारपत्य करून संस्थानें घेऊं, कोणी परवानगी [बद्दल] बोलल्यास विक्षेपाची बोलणीं दाख [वितात]. तुम्ही येविशीं सुचवीत जावें. गोहदकरापाशीं बोलणीं बरीच जरबेचीं घातलीं आहेत. येणें करून तो नरम पडून जसें म्हणतलि तसें ऐकेल होळकराविशीं विक्षेपाचीं बोलणीं बोलतात, त्यास होळकराचे घरीं वखेडा काय पडला आहे, त्यांणीं येथून कसकसें लिहिलें अष्टे, त्याचा उलगडा होऊन †तेस्त होत नाहीं. असो हल्लीं आलाहिदा पत्र लिहिलें आहे त्याजवरून कळेल. ग्वालेर येत असल्यास गोहदेची मसलत समेटावी हें चांगलें दिसतें. तेही विचार पाहून चांगलें तेंच करतील. रा छ १ रविलावल हे विनंति.

ले. ३३९]
[२८७]

{श. १७०३ फाल्गुन शु. २
{ता १४-२-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं,

विनंती उपरि. सुरतेंत अद्भुत वायू सुटोन घरें दारें पडलीं हें वर्तमान विलायतेस गेल्यापासून कौसल झालें त्यांत आपली बेमानी असें जाणोन हेष्टिनास फांशी द्यावें असा निश्चय जाला. त्यावरून हेष्टिनास घेउन जावयाकरितां मेस्तर होम व स जा व ल पाठविले आहेत. त्यासि हेष्टिन बोलतो कीं, आतां मी श्रीमंतांशीं वगैरे विरुद्ध वादवीत नाहीं, सलुख करितों व हैदरखानाशींही सलुख करतों, व काशीच्या राजाची स्थापना

† येथें मूळपत्र फाटलें आहे.

‡ राघोपंत गुरुजी व महादाजी बल्लाळ गुरुजी यांचा कांहीं आप्तपणा नाहीं. पहिले कोंकणस्थ व दुसरे कऱ्हाडे.

करतों, याप्रमाणें वर्तमान आलें. सत्यामिथ्या श्री जाणें. परंतु काशीच्या राजाच्या घरीं कलकत्याहून पत्रें आलीं आहेत. ++ तुमचे काम तुम्हांकडे सांगून स्थापना पूर्वक्त करावी याप्रमाणें निश्चय होतो म्हणून आलीं व काशीकहून पत्रें आलीं कीं, हेष्टिनानें काशींत राजाची स्थापना केली होती त्यास कैद केलें. यावरून कलकत्याची बातमी खरी असेलसें वाटतें. मुंबईस जनराल विलायतेहून दुसरा आला. त्याणें बंदोबस्त करून मागील जनराल यांस फांशी दिलें व सुरतेस सात हजार माणूस मुंबईहून आले ते सुरतेंत वगैरे गुजराथेंतील बंदोबस्त करणार म्हणोन पायागडाहून पत्र पाटीलबावांस आलें, म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. त्यास कलकत्याची बातमी खरी असल्यास याचा अनुभव पाटीलबावांस लवकरच येईल कीं, पाटीलबावा जसें म्हणतील तसें इंग्रज कबूल करतील, आणि तह करतील, हेंही दृष्टीस पडेल. मग कलकत्याचें वर्तमान खरें असें समजण्यांत येईल. हैदरखानाच्या तहाचेंही बोलणें हैदरखानाचा व इंग्रजांचा तह होणें तो सरकारचे विद्यामानें म्हावा हें इंग्रजाशीं बोलून करारांत आणावें. मुंबईचें वर्तमान पायागडाहून पत्र आलें म्हणून लिहिलें, परंतु ही बातमी खरी असती तर येथें ही बातमी समजती. ह्या *बातम्या खऱ्या नाहींत. कलकत्याची येथें येते, त्यांत हें कांहीं नाहीं व मुंबईचीही नाहीं. रा। छ. १ रविलावल हे विनंती.

ले. ३४० [२५६]

शा. १७०३ फाल्गुन शुद्ध ८ ता। २०-२-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि. चिठ्ठी पाठविली ती पावली. नारो हरीनीं डाक यांचे स्वाधीन आहे, त्यास कोणी उज्जनीस पाठऊन न्यावयाजोगें असल्यास न्यावें, म्हणोन लिहिलें. त्यास येथून कोणी पाठऊन आणिवणें ठीक नाहीं. तुम्हींच नारोपंतास त्याहावें कीं, सोबत चांगली पाहून, बसावयासा वगैरे सोय करून देऊन, रवाना करणें. खर्च पडेल तो देऊं. अथवा तुम्ही दोघांतून एकजण येऊं म्हणून लिहिलें त्यास तुमचेंच येणें झालें तर आणावयाची सोय चांगलीच होईल. रा। छ ७ रविलावल हे विनंति. नारो हरीकडून रवाना करण्यास युक्तिनें येथें प्रविष्ट होय असा आपला बराबर कोणी देऊन पाठवावा हे विनंति.

+ या शब्दापुढील दोन अक्षरें फाटली आहेत.

* येथपासून नानाचें अक्षर. हें सर्व पत्र नानाच्या हातचें आहे.

ले. ३४१ [३२९] श. १७०२ फाल्गुन व. ८ ता ७-३-१७८२

श्री

राजश्री सदाशिवपंत स्वामीचे सेवेशीं

विनंती उपरि. तुम्हीं छ २७ सफरचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. स्वामींनीं तहनामा पाठविला तो सिप्रीत पावतांच पुढें रवाना केला. मागाहून मीं व राजश्री रामजीपाटील बोहोंचलों. पाटीलबावांची व नारोपंताची भेट जाहली. यादींवरून जाबसाल पाटीलबावांसीं होतात. इंग्रजांशीं बोलून करारांत आले म्हणजे विनंति पत्रीं लिहावयास येतील म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास तुम्ही तेथें गेला आहां. सविस्तर पर्याय तुम्हांजवळ व रामजी पाटिलाजवळ बोलण्यांत आलेच आहेत व लिहिण्यांत आले आहेत. त्याप्रमाणें लवकर अमलांत यावे, वरकड नारो शिवदेव यांस लिहिलें आहे त्यावरून कळेल. रवाना छ २२ रविलावल हे विनंति

ले. ३४२ [२८३] श. १७०४ वैशाख शु. ३ ता १५-४-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं

विनंती उपरि. स्वामीकडून पत्रें आलीं ती सविस्तर राजश्री पाटीलबावांस दाखवून आज्ञेप्रमाणें एकेक कलमा करितां चार चार वेळ खेचीत बोललों. त्यांणीं इंद्रसेनाशीं बोलून जाबसाल निश्चयांत आणिले ते पाटीलबावांनीं आठ कलमें तपशीलवार पत्रीं लिहिलीं व तुम्ही लिहिल्यावरून सविस्तर कळलें, त्यांचीं उत्तरें पाटीलबावांचे पत्रीं लिहिलीं आहेत, त्याजवरून सर्व कळेल व कित्येक मजकूर हैदरखान प्रकरणीं वगैरे तुम्हास लिहिले होते ते मजकूर तुम्हीं जमा धरून त्यांचीं उत्तरें पाटीलबावांनीं लिहिलीं आहेत त्याजवरून कळेल म्हणोन लिहिलें. त्यास पाटीलबावांचे पत्रावरून सर्व मजकूर समजला. त्यांचीं उत्तरें ही पाटीलबावास लिहिलीं आहेत त्यावरून कळेल. र॥ छ. १ जमादिलावल हे विनंती.

ले. ३४३ [२१९] श. १७०४ वैशाख शु. ३ ता १५-४-१७८२

श्री

राजश्री रामजी पाटील गोसावी यांसि

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री बाळाजी जनार्दन आशीर्वाद विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. सिप्रीचे मुकामींहून निघोन लष्करांत

गेल्यावर तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. इंग्रजाचे तह प्रकरणीं वगैरे सविस्तर बोलणें होऊन अमलांत यावयाचें त्यास तुम्हास जाऊन फार दिवस जाले. बोलणीं जालींच असतील ये विशीं तुमचीं पत्रें यावीं, तीं कांहींच न आलीं. यावरून अपूर्व वाटलें. त्यास इंग्रजाचे तहाचे व होळकराकडील मजकूर सविस्तर बोलण्यांत आले, व श्रीमंत राजश्री दादासाहेबांस येथें आणून देऊन सरकारांत स्वाधीन करावें. हें तुमचें बोलणें निश्चयाचें आहे. त्याप्रमाणें कराल ही खातरजमा आहेच. परंतु तेथें पाटीलबावाशीं पक्कें बोलून कसें केलें हें सविस्तर लिहुन पाठवावें; व राजश्री नारो शिवदेव यांस फार दिवस तिकडे जाऊन जाहाले, त्यांचे घरच्याही अडचणी आहेत, याकरितां त्यास पाठवावयाविशीं राजश्री पाटीलबावा यांस लिहिलें आहे, +तुम्हीं येथें पावल्यावर पत्र एक न आलें हे काय ? किती एक बोलणीं जालीं होतीं, त्यांचें कसें केलें हें बरचेवर लिहून पाठवावयाचें होतें. असो, हल्लीं सविस्तर लिहून पाठवावें. रा छ १ जावल बहुत काय लिहिणें, लोभ असों दीजे हे विनंती.

ले. ३४४]
[२५०] }

{ स्व. १७०४ वैशाख शु. ४
ता १६-४-१७८२

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री दिनकरपंत स्वामींचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जावें. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. परगणे शाहाडोराव परगणे कामबाग व आहिरवाड्यांतील वगैरे ठाणीं इंग्रजानें घेतलीं होतीं त्याजवर आम्हीं व राजश्री यादवराव हरी दिमत शामराव नारायण राजेबहादर यांणीं मिळोन चंदेरीच्या राजास सामील करून शिबंदी ठेऊन इंग्रजाचीं ठाणीं उठवून आपलीं ठाणीं बसविलीं आहेत म्हणोन लिहिलें. ऐशियास इंग्रजाचीं ठाणीं उठविलीं उत्तम केलें. त्यास ठाणीं द्यावयासि शिबंदी खर्च कार्याकारण जरुराती जाहला असेल त्याचा हिशेब राजश्री नारो शिवदेव यास समजावावा. ते समजोन खर्चाची हिसेरसीद करून माहलावर ऐवज बसवितील तो सरकारी व सरंजामीं माहलचे कमाविसरदारांपासून घेऊन ठाणीं त्यांचे स्वाधीन करावीं. इंग्रजापासून ठाणीं तुम्ही व मशारनिल्हेनीं घेतलींत येविशीं तुमचें व त्यांचें बोलणें आहे त्यास तुम्हीं हुजूर यावें. समजोन करावयासि येईल. रा छ २ जा लोवल बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति "

+येथपासून खुद्द नानाचें अक्षर.

ले. ३४५]
[२५९]

श. १७०४ वैशाख शु. ४
ता १६-४-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. राजश्री पांडुरंगपंताचे पत्रांतील जाबसाल.

येथून लिहिलें होतें कीं फरासिसाचे पातशाहाकडून मुसामुतीण वकील आला. त्याचे बोलण्यांत फरसिसांचा जमाव लौकरच फुलचरीस होईल. अनुभव येण्याचेही दिवस थोडे राहिले आहेत. असें आहे म्हणून लिहिलें होतें तें राजश्री पाटीलबावांस निवेदन केलें. उत्तर झालें कीं, खानाकडे फरासिसांचा जमाव येऊन पोंचला असल्यास मोठें काम आहे. परंतु कराराप्रमाणें आले मात्र पाहिजेत. नजीक आले म्हणून खानांनीं लिहिलें होतें. आलीकडे पत्रें त्यांजकडील आलींच असतील. जमाव कोठपर्यंत आला हें लिहून पाठवावें. व तिकडील इंग्रजांचेंही वर्तमान लिहून पाठवावें. म्हणोन लिहिलें, त्यास फरासिसांचा जमाव हैदरखानाकडे येऊन पोंहचला हें पेशजी लिहून पाठविलेंच आहे. त्यास साडेचार हजार फराशीस खुषकीस उतरले, व साडेनऊ हजार पावेतों गलबतावर आहेत. फराशीस आल्या पूर्वी इंग्रजाकडील कर्णेल बारस पांच सात हजार जमावानिशीं होता, त्याची व खानाची लढाइ होऊन बारसाचे लोक गारद करून सरदार पाडाव आणिला. त्याजवर टिपू व फराशीस मिळून जाऊन इंग्रजाचें ठाणें गुडलूर म्हणून आहे तें घेतलें. ठाणें घेतल्यावर फाराशीस निघून ज्या बंदरीं मुक्काम होता तेथें गेले. त्याजवर खानांनीं फराशिसास लिहून पाठविलें कीं. तम्हीं आपणाकडील जमाव आणखी लौकर येऊं द्यावा. त्याचें उत्तर आलें कीं, तुमचें आमचें बोलणें होऊन अद्याप ठराव जाहला नाहीं. याप्रमाणें उत्तर आलें म्हणून वर्तमान लिहिलें आलें. तुम्हांस कळावें म्हणून लिहिलें आहे. खानांनीं तिकडे इंग्रजास जरब बरीच दिल्ही आहे. येविशीं राजश्री पाटीलबावांसही पत्र लिहून पाठविलें आहे. प्रविष्ट करावें.

येथें उदिष्टन आला होता. त्यास इंद्रसेन राजश्री पाटीलबावाकडे आला आहे, म्हणून सांगितलें. त्यावरून त्याचे चित्तांतील आशय दिसला कीं, इंद्रसेन मुख्य हेष्टिनाकडून आला आहे, तेव्हां तो कसें बोलेल हा आशय कळावयाकरितां येथून लिहिला होता. त्याचें उत्तर पाटीलबावांनीं केलें कीं, इंद्रसेन मुख्य हेष्टिनानें इकडे पाठविला. याचें कारणें हेष्टिनास मान्य, याचे योग्यतेस गाडर देखील पोंचत नाहीं. जितके इंग्रजांकडील वकील सलुख्याचें बोलणें बोलतात तितके इतल्या इंद्रसेनास देतील. याची योग्यता विशेष आहे. तेव्हां उदिष्टनाचे अंतःकरणीं येत असेल हें प्रमाण, म्हणोन बोलले, म्हणून लिहिलें त्यास इंद्रसेनाची योग्यता सदरहू वर लिहिल्याप्रमाणें पाटीलबावा बोलले त्यापक्षीं इंद्रसेन तह करील तो हेष्टिनास मान्यच पडेल, तेव्हां सरकारचे मुद्देमबाफक हैदरखान मुद्धां पाटीलबावा तह करून घेतीलच ही खातरजमा आहे.

+एक बातमी आली आहे कीं, इंग्रजांनीं फराशिसाकडे बोलणें लाविलें आहे. मग काय घडेल पहावें. इंग्रेज फराशिसांच्या जागा घेतल्या त्या बजिन्नस सुद्धां देणार असेंही आहे. हैदरखानानीं सरकार व खान, फराशीस मिळून तह करावा म्हणोन कलमवार याद पाठविली, आणि लिहिले कीं, अधिक उणें कसें करावयाचें तें लिहून पाठवावें. त्यांत कित्येक कलमांत पेंच होते ते उलगडून सरकार व हैदरखानास चांगले व त्यांत फराशिसांसही चांगलें पडून उपयोग अशीं उत्तरें लिहून पाठविलीं आहेत.

नबाबासही इंग्रेजावर मसलत करावयाचा उद्योग करीत आहों. घडेल तें खरें.

सविस्तर राजश्री पाटीलबावांस कळवावें. रा छ० २ जमादिलाखर हे विनंता

ले. ३४६]
[२६७]

{श. १७०४ वैशाख शु १३
ता २५-४ १७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. राजश्री पाटीलबावांनीं इंद्रसेनाशीं बोलावें कीं, "टिपूनें बेदनूर घेतल्यांतच आहे. मुसाबुसी फराशीस भारी सरंजमानिशीं महमुद (?) बंदरास दाखल जाहला. याउपरि बिदनूरचें काम झाल्यावर टिपू व फरांशीस एक होऊन चेनापटणास महसरा करणार. तेथें इंग्रजी सर्व बंदरचा जमाव जमा जाहला. त्यांणीं ज ला खालीं अथवा चेनापटण त्यांणीं घेतलें तरी कंपणीस मोठा पेंच बसेल. याची तजवीज काय ठरावितां ? तुमची आमची दोस्ती जाहली तेव्हां तरफे न सल्लाह मसलत सगजली पाहिजे, असें बोलोन त्याचें उत्तर काय होतें तें ऐकून घेऊन, पाटीलबावांनीं बोलावें कीं, तुमचे आमचे करारांत ज्या रकमा आल्या त्याप्रमाणें टिपूनें ऐकल्यास उत्तमच झालें. न ऐकल्यास श्रीमंत फौज सुद्धां अनकूल आहेतच. परंतु नबाब निजाम अलीखान व भोंसले यांस ही मसलतीस अनुकूळ करून घेतलें पाहिजे," इंग्रजांचा त्यांचा पहिला दोस्तीचा शिलशिला आहे. हल्लीं करारनाम्यांतही कलम लिहिलेंच आहे. यास्तव "तुम्ही कलकत्यास ई मा जु दौ ला बहादर यास त्याहावें, आणि नबाब निजाम अलीखान बहादूर व भोंसले यांस त्यांची पत्रें जावीं कीं श्रीमंतांशीं सलुख महादजी शिंदे यांचे विद्यामानें जाहला, हल्लीं फराशिस आले त्यांची तंबी करणें जरूर, तुम्ही आमचे दोस्त व हल्लीं पंतप्रधान यांणीं तुमचें कलम पक्कें करून घेतलें, तेव्हां विशेष दोस्ती जाहली, यास्तव फौज कुल सरंजाम सुद्धां तुम्ही आमची कुमक करावी हें चांगलें. या अनवयें दाबानें त्याहावें असें इंद्रसेनाशीं बोलोन लौकर करवावें. दिवस हंगामास थोडेच आहेत. पाटीलबावा म्हणतील " असफदौला व महमद

+येथपासून खुद्द नानाचें अक्षर.

अल्लीखान इंग्रजांचे पेटयांत, नबाब निजाम अल्लीखान व भोंसले आमचे पेटयांत, तेव्हां त्यांस इंग्रजाकडून पत्रें कशास लिहावीं ? आपणच बोलावें. त्यास आम्ही नबाबाशीं व भोंसल्यापाशीं बोलों लागल्यास ते सरकारावर येहसान येऊन जाबसाल करतील. तेव्हां आपल्यावर येहसान करून घेण्यापरीस परभारें जाल्यास उत्तम. कलकत्याहून त्यांस पत्रें परभारीं आलीं म्हणजे त्यांचे जाब उभयतांही लिहितील कीं, श्रीमंत फौज घेऊन कुमकेंस यावे म्हणजे आम्ही सिद्ध आहों. " असे जाब लेहून सरकारांत लिहितील कीं " कसें करावें." तेव्हां इकडून सल्लाह सागूं कीं " फार उत्तम आहे, आम्ही चालतों तुम्हीही फौज सुद्धां चालावें. " यांत बहुत नफे आहेत म्हणजे नीट पडेल. गोडीस येईल. काम होईल. या पैकीं इंद्रसेनाशीं किती बोलावें, त्याजकडून कलकत्यास कसें लिहावें, कलकत्तेकरांनीं नबाब भोंसले यांस पत्रें कशीं लिहावी, याची तजवीज पाटीलबावांचे विचारें ठरेल तसें करतील. ज्यांत दाबानें काम होय असे रीतीनें घडावें. इंग्रजांचीं पत्रें दाबाचीं. जावीं. केवळ फराशीस आहे म्हणून घाबरेपणाचीं नसावीं. सुचलें व मनांत आलें तितकें लिहिलें या पैकीं चांगलें उपयोगी व ज्यांत काम, तितकेंच पाटीलबावा घेतील व तुम्हीही असेंच सांगावें. रवानां छ २२ जमादिलावल हे विनंती.

ले. ३४७
[२३८]

श. १७०४ वैशाख व ३
ता ३-५-१७८२

श्री

पु॥ राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि वसई वगैरे कोंकण व गुजराथ प्रांतींचा मुलूख इंग्रजांनीं घेतला आहे तो देऊं, अमदाबादेविशीं मात्र फत्तेसिंग गायकवाड यांसि आमचें वचन गेलें आहे तेवढें स्थल त्याकडे ठेवावें, याप्रमाणें इंद्रसेन बोलतो. राजश्री पाटीलबावा म्हणतात कीं ही गोष्ट घडावयाची नाहीं, म्हणोन लिहिलें त्यास रा॥ फत्तेसिंगाची वर्तणूक तिगस्तां कसकशी जाहाली तें सविस्तर पाटीलबावांचे ध्यानांत आहेच. तेव्हां आमदाबादेविशीं उत्तर केलें तें ठीकच केलें. सरकारचा गुजरात प्रांतांतील मुलूख इंग्रजाकडे गेला असोन तो दरोबस्त सरकारचा सरकारात इंग्रजापासून माघारा यावा असें पाटीलबावांनीं करावें व करतील ही खातरजमा आहे. आमदाबादची ओढ ते धरणार नाहींत. परंतु हैदरखानसुद्धां तोड पडून तह ठरणें हेंच कठीण. रा॥ छ २९ जमादिलावल हे विनंति.

ले. ३४८ [२८९] श. १७०४ आधिक जेष्ठ शु. ता १५-५-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं

विनंती उपरि राजश्री पांडुरंगपंताचे पत्रांतील जाबसाल—

नबाबाची चाल ठीक दिसत नाहीं. तुम्हीं तर इंग्रजांचे मसलतीवर गुंतला आहां. तुम्हांस पेंच न बसावा या करितां बरव्हारी व गुतीच्या सुमारें दहा पंधरा हजार जमाव करावा. दोस्तीचे जागा सलाह जाणून लिहिलें आहे. म्हणून येथून हैदरखानास लिहिलें आहे. तें यांचें उत्तर स्नेहाचे रीतीनें सुचविलें उत्तम केलें असें यावें, तें एकीकडे राहून आणखीच तऱ्हेचें उत्तर आलें तो मजकूर राजश्री पाटीलबावांस कळवाल म्हणून येथून लिहिला होता. त्याचें उत्तर आलें कीं, महमद अल्ली खान यांचा मुलूख हैदरखानास प्राप्त जाला यामुळें मसलतीचा विचार त्याचे ध्यानांत येत नाहीं, परंतु नबाब भोंसले इंग्रज एक झाले असतां पेंच भारी बसेल हें त्याचे समजेस येत नाहीं. तथापि आपले मसलतीस सोबती झाला आहे तेव्हां त्यास सोडून इंग्रजाशीं सल्ला करणें ठीक नाहीं. हैस्तिनाकडून इंद्रसेन येथें आला आहे त्याचे बोलण्याची भवती न भवती होऊन कलमबंदी याद आलाहिदा पाठविली आहे त्यारून ध्यानास येईल याप्रमाणें उत्तर झालें म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास हैदरखान आपले मसलतीस सोबती झाला तेव्हां त्यास सोडून इंग्रजाशीं सलाह करणें नाहीं हा येथील खंबीर पक्का आहे. पाटीलबावांकडून कलमबंदीची याद आली त्याचीं उत्तरें आलाहिदा कलमबंदी लिहून पाठविली आहेत त्यावरून कळेल. +हैदरखानाची समज व चाल एक प्रकारची याचा अनभव राजश्री पाटीलबावांस येईल. तत्राप इंग्रजांचे मसलतीवर उपयोगी पडेल, याकरितां त्यास सोडून करतां नये.

या प्रांतीं उष्ण काळ भारी. ग्वालेर तालुक्यांत झळा लागून माणसें फार मरतात व धान्याची धारण कमी व वैरणीचा तोटा, वैगरे लिहिलें तें सविस्तर कळलें.

संगमखरी दगड या दिवसांत चांगला निघत नाहीं, पर्जन्य काळीं काढले तसे मिळतात, याकरितां पर्जन्यकाळीं श्रीमंताचे आज्ञेप्रमाणें दीड गज लांब व गजभर रुंद अर्ध गज तीस तसू जाड याप्रमाणें पाठवून देऊं, याप्रमाणें पाटीलबावांनीं सांगितलें म्हणोन लिहिलें व दुसरी बातमी लागली कीं, धारेजवळ मांडवगड किल्ला आहे तेथें पातशाही इमारत संगमखरी दगडाची आहे व दगडही मोठाले आहेत, वर लिहिल्याअन्वयें तेथेंही मिळेल, म्हणोन लिहिलें, त्यास तेथेंही शोध करवावा व तुम्हीं वर लिहिल्या अन्वयें पर्जन्य काळीं दगड जरूर पाठवावा. संगमखरी दगडास तिकडे उणें नाहीं लवकर पाठविल्यास येईल, परंतु आमचें काम याकरितां कसें होईल पहावें.

रोज छ. २ जमादिलाखर हे विनंती.

+ येथपासून नानाचें अक्षर.

ले. ३४९
[२९३]

शके १७०४ अ. ज्येष्ठ शु. ८
ताा २०-५-१७८२

श्री.

राजश्री **नारो**पंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. तुम्ही चंद्र १४ जमादिलोवलचीं पत्रें पाठविलीं ती पावलीं. राजश्री **पा**टीलबावा यांचे लष्करांतून रा० **पां**डुरंग **र**घुनाथ यांचें पत्र व पुरवण्या मिळोन तीन आलीं तीं पाठविलीं आहेत, त्यावरून ध्यानांत येईल, म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास पत्रें पाठविल्याप्रमाणें पावलीं त्यांचीं उत्तरें.

अंत्रीचे गढीवर तोफांची मारगिरी करून गढी घेतली, तेथून दुसरे दिवशीं कूच करून **सा**लबाईचे मुक्कामीं येऊन गढीवर मारगिरी सुरू केली आहे, लौकरच जेर होईल, म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास आज पावेतों गढी हस्तगत झालीच असेल. पुढें होईल तें लिहून पाठवावें.

पुरुषोत्तम **म**हादव यांस देवआज्ञा झाली-याचें वर्तमान लिहिलें तें कळलें. *राजश्री देवरावही दिल्लीस समयास पोहोंचले. तेही कार्यांत उणें पडूं देणार नाहींत.

नजफखान वारल्याचें वर्तमान †लिहिलें तें कळलें. त्यास येथें वर्तमान येतांच राजश्री **पा**टीलबावांस व तुम्हांस पेशजी लिहून पाठविलें आहे कीं **खा**न वारले तेव्हां इंग्रज पातशहाकडे अनुसंधान लावून, लोभ भारी दाखवून, पातशहास हाताखालीं घालून, **आ**गरें वगैरे जागा दाबावयास चुकणार नाहींत. त्यास **पा**टीलबावा **ग्वा**लेरीजवळ आहेत, तेथपर्यंत जाऊन पातशहाचें अनुसंधान दुसरीकडे न लागतां आपले हाताखालीं घातल्यास मोठींच गोष्ट आहे, व समय हाच आहे, म्हणोन विस्तारें करून पत्र **पा**टीलबावांस लिहिलें आहे व तुम्हांसही लिहिलें आहे त्यावरून कळलेंच असेल. सदर्हू लिहिल्या अन्वयें जरूर घडावें.

+पातशहास ममतेंत घेऊन बंदोबस्त आपले लगामीं लावून घेतल्यानें मोठींच गोष्ट आहे. दूर देशीनें पाहिल्यास ध्यानांत येईल. जरूर करावेंच करावें. पैकाही तिकडे मिळेल. सर्वही केल्यास घडावयाजोगें आहे. पुढें ईश्वरी इच्छा. रोज चंद्र ७ जमादिलाखर. हे विनंति.

ले. ३५०
[३४२]

शके १७०४ अधिक जेष्ठ शु. ८
ताा २०-५-१७८२

॥ श्री ॥

राजश्री **आ**पाजीराम स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि तुम्ही छ १९ रबिलाखरमचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. हेष्टिनाकडून

---

*हें वाक्य नानांच्या हातचें आहे. पुरुषोत्तम महादेव व देवराव हे हिंगणे. +येथपासून नानांचें अक्षर

† मृ. इ. ४. १७८२

इंद्रसेन आला आहे. त्याचें बोलणें जहालें. त्यांतिल भाव राजश्री पाटीलबावांनीं सांगितले कीं, इपटेनचे तहाप्रमाणें हल्लीं तह करावा. त्यांत साष्टी खेरीज करून करावा व अंतरवदीचें कलम तो मुळींच नाहीं व आज पावेतों मुलूख किल्ले वगैरे सरकारचे जे घेतले आहेत ते साडून सरकारांत द्यावे. याप्रमाणें वाकिलाचे बोलण्यांत आहे व पाटीलबावांच्या बोलण्यांत आहे कीं, पगडीवाल्याचा पक्ष इंग्रजांनीं करूं नये, व टोपीवाल्यांचा पक्ष सरकारांतून होणार नाहीं. ऐसें इंग्रजाजवळ बोलले. त्यानें उत्तर केलें जे, आम्ही पगडीवाल्यांपैकीं नबाब, भोंसले, हैदरखान या तिघांचा पक्ष करणार नाहीं. तुम्ही महमदअल्ली व सुजातदौलांचा लेक यांसि तुमचें विरुद्ध नसावें. याप्रमाणें बोलणीं जहालीं. ये विशींचा मजकूर पाटीलबावांनीं लिहिला आहे, त्यावरून श्रुत होईल. हैदरखानसुद्धां तहाविशीं गोष्ट अवघड पडली आहे. म्हणोन विस्तारें करून लिहिलें तें सर्व कळलें. त्यास साष्टी खेरीज करून इपटनचे तहाप्रमाणें तह इंग्रज करणार, त्यास इपटनचे तहापेक्षां तळेगांवावरील तह जहाला आहे तो चांगला आहे, व त्याची सर्व माहीतगिरी पाटीलबावांस आहे. त्याप्रमाणें तह जाला असतां चांगलें. त्या-खेरीज मुलूख इंग्रजांनीं आलीकडे घेतला आहे तो सरकारांत देऊन हैदरखान सुद्धां तह करावा असेंच पाटीलबावा करून घेतील. महमदअल्लीखान सुजातदौलाचा लेक यासि तुमचें विरुद्ध नसावें ऐसें इंग्रजांचें म्हणणें, त्यास सुजातदौलाचा लेक ते आपल्या पेट्यांत घेऊन बोलतात. तेव्हां सरकारचा करोडींचा मुलूख अंतरवेदींचा जातो, व महमंदअल्लीखान याचा मुलूख हैदरखानांनीं घेतला आहे तो सोडवावा. तेव्हां ही गोष्ट हैदरखान कशी ऐकतात? थारांश सरकारचे मुद्देमवाफक हैदरखान सुद्धां पाटीलबावांनीं तह करून द्यावा हें चांगलें. §इपटेनचे तहाप्रमाणें केल्यानें इतके दिवस मसलत करून खराबी काय झाली? हैदरखान धोबती करून घेतला यांत नफा काय राहतो? इपटेनाप्रमाणें तर राजश्री पाटीलबावा जामगांवाहून पुण्यास आले होते, तेव्हांच गाडरांचें बोलणें होतें. या करितां इपटेनाप्रमाणें करणें ठीक नाहीं. सविस्तर राजश्री पाटीलबावांचे पत्रांचीं उत्तरें व राजश्री नारो शिवदेव यांस लिहिलें आहे. रवाना छ ७ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें, लोभ असावा हे विनंति.

पौ छ ७ रजब जेष्ठमास शुद्ध नवमी सौम्यवासर सुरूसन सल्लास समानीन.

ले. ३५१
[२३३]

श. १७०४ अधिक ज्येष्ठ शु. १३
ता। २५-५-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं

विनंति उपरि राजश्री पांडुरंगापंताचे पत्रांतील जाबसाल सालबाई गढीवर मारागिरी होत आहे, लौकरच हस्तगत होईल, म्हणोन व तोफा लागू करावयाचा मजकूर कळला. देव-राव हिंगणे यांचीं पत्रें राजश्री पाटीलबावांस आलीं कीं नजफखान मेला, प्रस्तुत तेथें

---

§येथपासून खुद्द नानांच्या हातचा मजकूर.

बरेंखेडा जाहला आहे, अशा समयास आपली स्वारी इकडे आलियास स्वल्प मेहनतीनें महत् लाभ घडावा असें आहे. पातशहा आपले लक्षांत आहे. वरकड थोरलाले अमीर उमराव इच्छा करतात कीं, पाटीलबावांची स्वारी या वेळेस इकडे आल्यास मोठा उपयोग आहे. नाहीं तर इंग्रज इकडे प्रवेश करतील. मग उपाय चालणार नाहीं, याप्रमाणें सर्वांचें मानस आहे. हा समय पुढें यावयाचा नाहीं म्हणोन पत्रें आलीं तीं पाटीलबावांला दाखविलीं म्हणोन लिहिलें. त्यास पाटीलबावांनीं या समयांत दिल्लीस जाऊन, पातशाहा हाता खालीं घालून, बंदोबस्त करावा हें येथून ही पेशजी विस्तार लिहून पाठविलेंच आहे, त्याप्रमाणें जरूर घडावें.

चंदेरीचे राजाचा बंदोबस्त करून घ्यावयाकरितां पाटीलबावांनीं बळवंतराव धोंडदेव यांजबरोबर बैरागी देऊन राजा बरोबर चंदेरीस रवाना केलें. तेथें गेल्यानंतर बळवंतराव व राजधर एक जाहाले. तेव्हां राजा निघोन चंदेरीस गेला. उभयतां एक होऊन राजाचे मुलका जवळून खंडण्या घेतात. राजाचीं पाटीलबावांस पत्रें येतात कीं, आपण बंदोबस्त करून द्यावयाकरितां बळवंतरावास दिलें त्याणीं आम्हांस कैद करावें असें केलें तेव्हां निघोन चंदेरीस आलों. बळवंतराव लिहितात कीं, राजा दगा देऊन पळून गेला, याजकरितां राजधरास अनुकूल करून घेतलें, बैरागी यांस निरोप दिल्हा. आतां बळवंतराव मात्र आपल्या फौजेनिशीं चंदेरी प्रांतीं आहेत. राजाचे मुलकापासून खंडण्या घेतात. इकडे येण्यास शिंबदीच्या तंट्याचें निमित्त दाखवितात. याप्रमाणें वर्तमान आहे म्हणोन लिहिलें. त्यास राजाचा बंदोबस्त करून द्यावयाकरितां बळवंतराव यास पाठविलें ते व राजधर एक जाहाले तेव्हां राजा चंदेरीस गेला. आतां राजा आपले परीं बनाऊन लिहितो व बळवंतराव आपले परी बनाऊन लिहितात, परंतु यांतील छाण पाटीलबावांनीं करून करणें तें करावें. रा छ १२ जमादिलाखर हे विनंति.

ले. ३५२ [२००] | श. १७०४ अधिक जेष्ठ वद्य १ ता. २७-५-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं

विनंती उपरि.—तह प्रकर्णी इंद्रसेनाची भवती न भवती होऊन सरकारचे तहाचा निश्चय बोलण्यांत आला, त्याचीं कलमें पांडुरंग रघुनाथ यांणीं लिहिलीं त्यांचे जाबसालः—

साष्टी व उरण खेरीज करून वसई वगैरे कोंकण प्रांतीचे किल्ले व जागे जे इंग्रजांनीं घेतले असतील ते सोडावे म्हणून लिहिलें. त्यास मुख्य मुद्दा साष्टीचा. तो खेरीज करून वरकड जागे सोडतात, त्यास साष्टीसुद्धां दरोबस्त जागे सोडवून द्यावे हें चांगलें.

श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस पाटीलबावांचे स्वाधीन करावें, जोपर्यंत सुप्रवृत्तीनें चालत तोंपर्यंत पंचवीस हजार रुपये दरमहा हपटनचे तहाप्रमाणें त्यांस द्यावे, म्हणोन

लिहिलें. त्यास दादासाहेबांस पाटीलबावांचे विद्यमानें कुटुंबासुद्धां सरकारांत हबाली करावे याप्रमाणें म्हावें हें चांगलें. हपटनचे तहाप्रमाणें चालावयाचें कबूल करावें. सुरळीत चालल्यास चालवूं.

आमदाबाज सुद्धां गुजराथ प्रांतींचा मुलूख घेतला आहे तो सोडावा म्हणून लिहिलें; उत्तम आहे.

हपटनचे तहांत सरकारांतून लिहून दिल्हें आहे कीं तीन लक्षांचा मुलूख भडोच नजीक इंग्रजास तोडून द्यावा. हें कलम पाटील बावांनीं उडवून देऊन, सदर्हू मुलूख इंग्रजांनीं मागूं नये याप्रमाणें करारांत आणलें म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास निदानीं तीन लक्षांची जागीरही इंग्रजास देऊन साष्टी, उरण सरकारांत घ्यावयाचें करावें. हाही एक निदान पक्ष करावा.

भडोच पाटीलबावांस द्यावी असा तळेगांवच्या तहांत इंग्रजांचा करार आहे. त्याप्रमाणें हल्लीं द्यावी म्हणून लिहिलें; उत्तम आहे.

सदर्हूप्रमाणें जाबसाल बोलण्यांत येऊन निश्चयापावेतों देखील गोष्ट आली होती, इतक्यांत कालचीं पत्रें श्रीमंतांचीं आलीं तेव्हां पासून मर्जी ठीक नाहीं. याउपर काय ठरेल पहावें म्हणोन लिहिलें, त्यास राजश्री पाटील बावांनीं इंग्रजाशीं जाबसाल बळ पडेल असे चित्तांत यावे ते न येतां मर्जी ठीक नाहींशी झाली. असो मर्जी ठीक न दाखवून सरकार काम चांगलें घडत असल्यास उत्तम आहे. परंतु हैदरखानाचे तहाचें यांत कोठेंच लिहिलें नाहीं हें काय ? हैदरखानाचे मुद्दे कोणते कबूल केले, काय ठराविलें, हें या लिहिण्याबराबर असावें तें कांहींच लिहिलें नाहीं. हैदरखानसुद्धां तह जाला तर करावा, हा येथील विचार व राजश्री पाटीलबावांचाही विचार आहेच. याकरितां हैदरखानाची तोडजोड कशी, त्याचे मुद्दे कोणते ठरले व हैदरखान यास कसें सांगावें, कदाचित् हैदरखानास फरांशीस आल्यामुळें बोंदूं लागले तर याची तोड काय ? तें पुसोन लिहून पाठवावें. रा॥ छ १४ जा॥कर हे विनंति.

ले. ३५३ (२०२)

श. १७०४ अधिक जेष्ठ व.१ ता॥ २७-५-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. राजश्री पांडुरंगपंताचे पत्रांतील जाबसालः-

राजश्री पाटीलबावांचे कारभाऱ्यांचें खलबत झालें त्यांतील आशय भाईनीं सांगितला, तो आलाहिदा विनविला आहे. परंतु भाव तो आढळत नाहीं. सारांश मसलत होत नाहीं ही गोष्ट खरी. सदाशिव मल्हार यांशीं दोन दिवस खलबत दाट चाल्लें आहे. चौविसावे जमादिलावलचे रोजीं दो प्रहरां इंग्रजांचा कारभारी व सदाशिव मल्हार आले त्यांचें चार घटका खलबत झालें. मागतीं सायंकाळीं सदोबा आल्यावर द ह ताजी मुनशी बोलावून मागती खलबत जालें. यांतील आशय समजल्यावर

विनंती करीन म्हणून लिहिलें. त्यास खलबतांतील अन्वय तुम्हांस कळलाच असेल. सविस्तर शोध करून लिहून पाठवावा. पाटील बावांचें व कारभारी यांचे खलबत झालें त्यांतील आशय भाईनीं सांगितला तो आलाहिदा तुम्हीं लिहिला. त्याचें उत्तर सविस्तर लिहून पाठविलें आहे. त्यावरून कळेल.

पाटीलबावा एके दिवशीं म्हणूं लागले कीं, इंग्रज श्रीमंत दादासाहेबांस तुमचे स्वाधीन करूं असें म्हणतात, याचें कसें करावें ? त्यावरून उत्तर केलें कीं, हा विषय आमचा नाहीं, याचें उत्तर श्रीमंत करतील, आज्ञा होईल तर हा जाबसाल त्यांजकडे लिहून पाठवितों, ते याविषयींचें उत्तर लिहितील, असें बोलले‍त म्हणोन लिहिलें, त्यास पाटीलबावांस मसलती करणें तेव्हां बंदोबस्त राहणार नाहीं. याकरितां दादासाहेबांस पाटील बावांनीं आपले विद्यामानें सरकारांत हवाली करावें म्हणजे बंदोबस्त चांगला राहील. व मागें पुढें सरकारचा शब्दही कोणावर नाहीं. छ. १४ जमादिलाखर हे विनंती.

ले. ३५४ [२५८]

श. १७४ अधिक जेष्ठ व. १ ता. २७-५-१७८२

॥ श्री. ॥

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. राजश्री पांडुरंग रघुनाथ यांणीं लिहिलें कीं नबे जमादिलोवलचीं पत्रें बेबिसावे मिनहूस सादर झालीं, त्यांत श्रीमंतांचीं पत्रें राजश्री पाटीलबावांचे नांवें चार होतीं ते पाटीलबावांस प्रविष्ट केलीं. व आपले नांवाचीं पत्रें व यादी पाहिल्या. तह प्रकरणीं चारी यादी पाटीलबावांस दाखविल्या; व आपल्या पत्रांपैकीं एक थोरली पुरवणी खेरीज करून वरकड दाखविली; या खेपेची उत्तरें तीक्ष्ण आहेत. पाहून उत्तर झालें कीं, याचीं उत्तरें करूं. भाईच्या शरीरीं समाधान नाहीं. परंतु तसेच बलाऊन आणले. त्यांस पत्रें दाखविलीं. सारांष पत्रें पाहिल्यावर मर्जी ठीक दिसली नाहीं. उत्तरें झाल्यावर सविस्तर विनंती करीन. उत्तरांस दीसगत लागते म्हणोन आपण लिहिलें होतें, त्यास श्रीमंतांचीं पत्रें येतात त्यांत भाव कसे व इकडील तर्दुद कशी हें सर्व ध्यानांत आहेच. उत्तरें लौकर होत नाहींत याचे अर्थ उघडेच आहेत. श्रीमंतांनीं या पेक्षांही अधीक लिहिल्यास यंदा यांच्यानें मसलत होत नाहीं. हे परिछिन्न उघडे बोलतात कीं, आपण होळकर सारे निसूर बसून आम्हांवर दगड टाकितात. आम्ही इंग्रजाच्या मसलतींचा कसाला गुदस्तपासून कसा केला हें पाहावें. सारे तमाशा मात्र पहातील, व पहावा ही इच्छा आहे. एखाद्या जागां मसलतीमुळें पेंचांत आल्यास तिळा इतकी कुमक म्हटली तर कोणाच्यानें ह्मावयाची नाहीं असो बोलून फळ काय ? ज्याचा त्याणें आपला विचार पाहून करणें तें करावें.असेही विचार एकांतांत होतात. तेव्हां अंतरवेदची मसलत होण्याचा अर्थ यावरून ध्यानास येईल. तूर्त महिना पंधरा दिवस या प्रांतीं घालऊन छावणीच्या दिवसांत बहुत करून अवंतिकेस जातील असें दिसतें. याजवर

न कळे. म्हणून विस्तारें करून लिहिलें तें सविस्तर कळलें.त्यास पेशजी पाटीलबावांनीं लिहिलें होतें कीं, इंद्रसेन हेष्टिनाकडून सलुखाचे जाबसालास मुक्त्यारीनें आला आहे. त्याशीं हैदरखान सुद्धां सरकारचे मुद्दे मुवाफक कसकसे बोलावे येविशीं लिहिलें होतें. त्यावरून इंद्रसेन मुख्य हेष्टिनानें तहाचे बोलणें बोलावयास पाठविला हा मुक्त्यार असें जाणून पाटीलबावांनीं त्याशीं हैदरखान सुद्धां तहाचें बोलणें, त्याची याद, व हैदरखानाचे मुद्यांची याद वैगेरे यादी पाठविल्यावर मर्जी संतोष होऊन यादी बद्दल हैदरखान सुद्धां तहाचें बोलणें इंद्रसेनाशीं घालावें व त्याप्रमाणें अमलांत यावें, असे भाव लिहून सविस्तर लिहिलें होतें, यांत मर्जी दिक्क व्हावी असें नव्हतें. असो. बाह्यत्कारी मर्जी दिक्क दाखविली असेल. परंतु पाटीलबावा यादीच्या अन्वयें सरकारचे मुद्देमवाफक हैदरखान सुद्धां तहाचें बोलणें इंद्रसेनाशीं बोलून आणितील, ही खातरजमा आहे. हे उघडें बोलून दाखवितात कीं, आपण, होळकर, सारे निसूर बसून आम्हांवर दगड टाकतात. आम्ही इंग्रजाच्या मसलतीचा कसाला गुदस्तांपासून कसा केला, हें पहावें. सारे तमाशा मात्र पाहतील. तिळा इतकी कुमक व्हावयाची नाहीं. असो ज्याचा त्याणें आपला विचार पाहून करणें तें करावें असे विचार एकांतांत होतात, म्हणून लिहिलें. त्यास गुदस्तांपासून पाटीलबावांबरच कसाला इंग्रजाच्या मसलतीचा पडला, परंतु तितकाही कसाला सोसून पुढें मसलत करणें ही योग्यता पाटीलबावांचींच तर होय. पाटीलबावांवर गुदस्तापासून मसलत पडलीच, परंतु गुदस्ता इकडे गाडर बोरघाटावर येऊन मसलत पाडली तेव्हां पल्ला जवळ, मसलत समीप पडली, तेव्हां करणें प्राप्त. सरकारांत पैक्याची अडचण कोणे प्रकारची, तथापि अडचणींत अडचण सोसून फौजेचा जथ पाडून इंग्रजावर मसलत केली. मातबर सरदार होळकरही समयास आले. इंग्रजाची व सरकारची लढाई होऊन इंग्रज शिकस्त खाऊन कोण्या तऱ्हेने माघारा गेले, त्याची पायमल्ली किती झाली, कोणे तऱ्हेनें गेला, हें सविस्तर वरचेवर पत्रें लिहून गुदस्ता पाठविलींच होतीं, त्यावरून ध्यानांत आलें असेलच. तेव्हां तमाशा पहातात किंवा मसलत केली हें ध्यानांत येतच असेल. साल मंजकुरी तर तहाचेंच बोलणें बोलावयास इंग्रजानें वकील पाठविला आहे. त्याशीं बोलणें पाटीलबावा बोलतच आहेत. तेव्हां हैदरखान सुद्धां सरकारचा तह पाटीसबावा चांगलाच करतील ही खातरजमा आहे. पाटीलबावा कसें करतात हा तमाशा पहावा हे इच्छा येथील नाहीं. मोठीं मोठीं कामें पाटीलबावांनीं करावीं, सरकारचे मातबर उपयोग तेच घडत असावे, आणि पाटीलबावांचें कल्याण असावें, सरकारच्या मोठ्या मसलती होऊन पाटीलबावांस यश यावें, भाऊपणांत अंतर पडूं नये असें घडावें, हाच संतोष मोठा आहे. व याप्रमाणें पाटीलबावा करतील ही खातरजमा आहे. तिकडे परावा+ मुलूख मसलत केल्यानें मनसबा होऊन पैका मिळेल असें आहे व खालीं मैदान,याकरितां सुचतें तें लिहितों. आपलाच आपण नाश करून घ्यावा असें ज्याचे चित्तांत असेल त्याचे मनांत तमाशा पहावा असें येईल तर कळेना. येथील समज अशी नाहीं. रा छ १४ जमादिलाखर हे विनंति.

+ परकीयांचा

ले. ३५५
[२८८]

श. १७०४ अधिक जेष्ठ व. १
ता॥ २७-५-१७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि राजश्री पांडुरंगपंताचे पत्रांतील जाबसालः—

सालबाईचे गढीस मोर्चे लाविले आहेत. कार्याकारण तोफांची मारगिरी होत असते. गढी लवकरच हस्तगत होईल. तदनंतर स्वारी हिंमतगडाकडे जाणार. राणा ग्वालेरीस होता तो गोहदेस गेला. म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास गढी आजपर्यंत हस्तगत झालीच असेल. पुढें होईल तें लिहून पाठवावें. सावध असत जावें.

पेशजी महतपूरचा मजकूर येथून लिहून पाठविला होता व पुढें घालमेल करूं नये म्हणून लिहिलें होतें, त्याचें उत्तर पाटील-बावांनीं केल्याचा मजकूर पुढें घालमेल कशास करूं, येथील जमीनदारांनीं बोभाट सांगितले, सरकारचा माहाल खराब होतो असें जाणून केलें, म्हणून लिहिलें तें कळलें.

हेष्टिन काशीहून निघून कलकत्त्यास गेला. त्यांतिल आशय इंद्रसेनास ठावका असेल, याचा शोध करून लिहून पाठवावें, म्हणून येथून लिहिलें होतें. त्याचें उत्तर लिहिलें कीं, येथें शोध केला, इंद्रसेनाच्या बोलण्यांत हेष्टिन काशीच्या कार्यभागानिमित्य आला होता, तो उरकल्यावर मग कशास राहावें म्हणून माघारा गेला. काशीहून लोक येतात जातात त्यांच्या बोलण्यांत हैदरखानाचा ताण भारी बसल्यामुळें अंतरवेदींतील सारा जमाव घेऊन माघारा गेला असें आहे. इकडील मसलतीवर पाटीलबावा आहेत. हे अंतरवेदी खालीं पाहिली असतां चाल करतील. याजकरितां इंद्रसेनास सलुखाचे बोलण्यास पाठविला. म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास हेष्टिन मात-बरच मनसबा करायास काशीस आला होता. परंतु हैदरखानाचा ताण व फराशीसांचें येणें यामुळें गेला. इकडील समारोप केला असें दिसतें.

रा॥ छ. १४ जमादिलाखर हे विनंती.

ले. ३५६
[२७६]

श. १७०४ अधिक जेष्ठ व ८
ता॥ ३-६-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंतीं उपरि, राजश्री पांडुरंगपंतांनीं छ २७ जमादिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. वर्तमान कळलें. राजश्री गोविंदराव यांणीं येथून बातमीचा मजकूर लिहिला होता तो तुम्हीं कळावयाकरितां पत्रीं लिहिला तो मजकूर अवघा लटका आहे. योविषयींची उत्तरें सविस्तर मागाहून पाठवूं रा॥ छ २२ जमादिलावल हे विनंती.

ले. ३५७
[३००]

श. १७०४ जेष्ठ शु. २
ता। १३-७-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. इंग्रेजाचा व सरकारचा सलूख जाला तेव्हां हैदरखानानें कराराप्रमाणें न ऐकिल्यास सरकार व इंग्रज मिळोन खानावर मसलत करावयाची त्यास नबाबास टाकतां येणार नाहीं. मसलतीस मेळवून घ्यावे लागतील. कारण कीं, हैदरखान फराशीस व नबाब एक जाले तर मसलत भारी पडेल. या करतां नबाब निजाम अल्लीखान या मसलतींत आले तर त्यांसही वांटणी द्यावी लागेल. म्हणोन पेशजी छ. ११ रमजानचे खानगींत साल गुदस्त तुम्हांस पुरवणी लिहिली होती त्याचें उत्तर तुम्ही लिहिलें कीं, राजश्री पाटीलबावांनीं उत्तर केलें जे, नबाबांस वांटणी देणें असें उघड इंग्रजाशीं बोलूं नये, म्हणजे ते आपल्या पेच्यांत राहिले. याचें उत्तर केलें कीं, नबाबाची समजूत पडणार नाहीं. नबाब मसलतीस सामील झाल्यास त्याची तोड तुम्हीं व आम्हीं मिळोन काढावी त्यांत तिसरा हिसेदार ठरतो, यास्तव इंग्रेजाशीं बोलावें कीं, तुमचा मुलूख तुम्हीं घ्यावा. आमचा आम्हीं घ्यावा. हैदरखानाचा मुलूख सुटेल त्याची वाटणी फौजेवर करावी. फौजेच्या अन्वयें दोन हिस्से सरकार, तिसरा हिस्सा इंग्रेज याप्रमाणें साधेल तर करून घ्यावें, असें मत आहे म्हणोन पेशजी तुम्हीं लिहिलें होतें. त्यास हल्लीं टिपू व फराशीस एक जहाले. यांचा सरंजाम भारी जमला आहे. नबाबाकडेही त्यांचीं अनुसंधानें आहेत, नबाबांस टिपूमियां व फराशीस एक जाले तर मसलत भारी पडेल, याकरितां नबाब सामील करून घ्यावे हें चांगलें. तेव्हां वाटणी द्यावी लागेल, या करितां इंद्रसेनाशीं बोलून कसकसें ठरावांत आणलें आहे तें लौकर लिहून पाठवावें. बोलणें जालें नसल्यास हल्लीं बोलून येविशीं ठरावांत आणून लौकर लिहून पाठवावें. रवाना छ १ साबान हे विनंती. तहनामे दिले घेतल्याचीं पत्रें आलियावर तुम्हांकडे पत्रांच्या रवानग्या फार जाल्या. जाब येत नाहींत हें ठीक नाहीं, वरचेवर उत्तरें पाठवीत जावीं. हे विनंती.

ले. ३५८
[२२५]

श. १७०४ जेष्ठ शुद्ध ९
ता। १९-७-१७८२

श्री.

चिरंजीव राजश्री पांडुरंगपंत बापू यांसि प्रति नारो शिवदेव अशीर्वाद उपरि येथील कुशल तागाईत छ ७ साबान यथास्थित असे विशेष. तुम्हीं पत्रें व तहाच्या यादी पाठविल्या त्यांत मुद्दा मोठा साष्टी व हैदरखान. त्यांपैकीं साष्टी तरि होत नाहीं व हैदरखान यांनीं माा अल्लीचा व इंग्रजांचा मुलूख घेतला आहे तो सोडून द्यावा, त्यास त्यानें करोड रुपये खर्चून प्रांत सोडविला तो सोडतो कसा? मसलतीवर कायमच आहे. नवे फराशीस आणिले आहेत, तेव्हां इंग्रजाचें पारिपत्य पुरतें करणार. तीन किल्ले मात्र बाकीस राहिले असतां त्यांस

कांहीं पेंच नाहीं, राहिले तें घेतच आहे. गाडराकडून सरकारांत वकील आला होता त्याचे बोलण्यांत होतें कीं, साष्टी सुद्धां घ्यावी, परंतु हैदर नाइकाचा पक्ष सोडावा हें वर्तमान श्रीमंतांनीं लिहिलें होतें, त्याचीं उत्तरें हैदरनाइकाचे पक्षाचीं आलीं. त्यांचे जाब श्रीमंतांनीं लिहिले त्याजवरून मर्जी बहूत खट्टी जाहाली असें असोन बावांनीं तह असा कसा केला ? साष्टी नाहीं व हैदरचा तह न झाल्यास गुजरातचा तीन लक्षांचा मुलूक सुटणार नाहीं. हैदरखान यांनीं घेतला मुलूक सोडावा ही: गोष्ट घडावयाचींच नाहीं. ते त्यांचा तह होतच नाहीं यामुळें हैदराचा पेंच पडल्यास भारी पडेल किंवा नाहीं याचा विचार बावांनीं केल्यावांचून तह केला नसेल. तहाची यादी जाहाली ती इंग्रजांपाशीं दिली ते यादीची नक्कल चेनापट्टणचे इंग्रजाकडे जाईल. ते फूट पाडावयाकरितां त्यास दाखला देतील, तेव्हां त्याचा पेंच सध्या पडेल असें दिसतें. येविशीं पत्रें श्रीमंतांचीं येतात तीं तुम्हीं दाखवीत असतां किंवा नाहीं हेंहि समजत नाहीं. असो श्रीसत्तेनें घडेल तें प्रमाण. सुचलें तें लिहिलें आहे. तुम्ही समय पाहून विनंति करीत जाणें.–अशेरीवर बावांकडील लोक चढून केशवराव जगन्नाथ उतरून गेले, हें वर्तमान पूर्वी लिहिलेंच आहे. किल्ला नाक्याचा व भिल्ल भोंवताले बहुत, यास्तव बंदोबस्त किल्ले याचा व वाटचा बंदोबस्त जाहाला पाहिजे. याचा विचार केला असेल. तूर्त या प्रांतीचे लोक ठेविले आहेत यांच्यानें परिणाम लागेलसा दिसत नाहीं. माणूस पं च ग ड किल्ले तयार असावे त्यांत दोन तीनशें माणूस आपले ममतेचे असल्यास चांगलें. हें तुम्ही सुचवून उत्तर काय होईल तें लेहून पाठवावें. माजी किल्लेदाराचे किरकोळ फडसे करावयाचे होते ते केले. या उपरि येथून निघोन लौकरच येतों. राजश्री आबाजी नाईक समागमेंच येणार, त्यास त्याचे मातुश्रीस ज्वराची पीडा जाहाली आहे त्यास कांहीं एक उतार पडल्यावर निघोन येऊं. नाइकाचे तीर्थरूपही येथें भेटीस येणार त्यांजकडे पालखी पाठविली आहे. तेही येतील. भेट होईल. वरकड कांहीं गुंता नाहीं. राजश्री दाजी पुण्यास गेले. सुखरूप जाऊन जाब आला तो तुम्हांकडे पाठविलाच आहे. होळकराकडील जाबसालाची चिठ्ठी राजश्री बाजीपंत मामांनीं श्रीमंतांचे नांवें आणिली ते ती त्याप्रमाणें मातुश्री अहिल्याबाईनीं ही चिठ्ठी दिली त्यांत नांव आमचें लिहिलें आहे. त्या चिठ्या व बाईचे बोलण्याचे अन्वय व बावांचे बोलण्याचे भाव मामांनीं सांगितले त्याप्रमाणें श्रीमंतांशीं बोलले, त्यांचीं उत्तरें निक्षून जाहालीं नाहींत. झाल्यावर लिहून पाठवितील याप्रमाणें मातुश्रीस बोलून पुढें उज्जनीस येऊं. तुम्हांस स्वारांविषयीं लिहिलें आहे त्याप्रमाणें पाठवून द्यावे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

ले. ३५९ [३२७] { श. १७०४ आषाढ व. १४ ता ८–८–१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि. राजश्री पाटीलबावांनीं इंद्रसेनाशीं तहप्रकरणींचे जाबसाल करार मदा–

रांत आणिले त्यांची कलम बंदी याद ठरविली त्या यादीची नक्कल श्रीमंतांकडे पाठवावयास दिली ती याद पारशी व तिची हिंदवी करून दोन्ही यादी पाठविल्या आहेत. त्या वरून सर्व भाव ध्यानास येतील. या करतां त्यांचीं उत्तरें दूरदेशींचे विचारें करून लिहिण्यांत यावीं म्हणोन विस्तारें करून लिहिलें तें सर्व कळलें. त्यास दोन्ही यादी पाहिल्या. मजकूर सर्व कलमवार ध्यानांत आला. सारांश कोणेही प्रकारें सरकार काम होऊन पाटीलबावांस येश यावें यास्तव निदान पक्षाची तोडजोड लिहून पेशजी यादी पाठविल्याच आहेत. त्या पाहून सर्व समजण्यांत आलेंच असेल. व हल्लीं तह प्रकर्णीची याद पाहून उत्तरें कलम बंदी लिहून पेशजींच्या अन्वयें पाठविलीं आहेत याप्रमाणें बोलून करारांत आणावें. पाटीलबावांच्या पत्रांचीं उत्तरें लिहिलीं आहेत प्रविष्ट करावीं. +या तहनाम्यांत दिकतीं फार आहेत याचे विस्तार कलमवार पूर्वी लिहून पाठविले आहेत, ते पाटीलबावांशीं बोलिल्यास त्यांचे ही चित्तांत यावया जोग्या आहेत. ऐकल्यावर उत्तर काय करतात तें लिहून पाठवावें. रवाना छ २७ साबान हे विनंति.

ले. ३६० [२०५] | श. १७०४ आषाढ व. ४ ता ८-८-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. राजश्री पांडुरंगपंत यांनीं लिहिलें जे, राजश्री पाटीलबावांनीं सांगितलें कीं,

श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस पाटीलबावांचे स्वाधीन करूं असें कलमबंदींत लिहिलें नाहीं. परंतु इंद्रसेनाच्या बोलण्यांत करार आहे कीं, कलमबंदीचे यादींत दादासाहेबांचे कलम लिहिलें आहे. त्या मुदतीस युक्तीचे वाटेनें तुमचे स्वाधीन करूं म्हणोन लिहिलें. त्यास इंग्रजाच्या या बोलण्यावर जाऊं नये. ते दगाबाज आहेत. या करितां दादासाहेबांस अगोदर आपले हातीं घ्यावें अथवा कचेश्वरास आणून पोंहचवून द्यावें. येविशींचा मजकूर पेशजी लिहिला आहे व हल्लींही कलमबंदीच्या उत्तरावर आलाहिदा लिहिला आहे. याप्रमाणें घडावा.

कलमबंदीचे यादींत हैदरखानाचें कलम लिहिलें आहे. त्याप्रमाणें घडल्यास उत्तम. कदाचित हैदरखान तुमच्या सांगितल्यावर नच ऐके तर भडोच नजीक तीन लक्षांचा मुलूख हपटनचे तहांत सरकारांतून इंग्रजास लिहून दिल्हा होता तो हल्लींच्या तहांत इंग्रजापासून माघारा सरकारांत घ्यावयाचें ठरविलें आहे. तो मुलूख तीन लक्षांचा माघारां मागूं नये. वरकड लिहिल्याप्रमाणें सरकारचा तह करावा. हैदरखानाशीं आम्ही परभारां समजून घेऊं असेंही इंद्रसेनाच्या बोलण्यांत आहे म्हणोन लिहिलें. त्यास हैदरखानाचे मुद्दे इंग्रज कबूल करते तर मुलूख इंग्रजांस

+नानांच्या हातचा मजकूर.

द्यावा लागता. हैदरखानाचे मुद्दे इंग्रजांनीं कबूल करणें हें घडत नाही त्यापक्षीं हैदरखान तरी कसे ऐकतील हें समजलेंच आहे. त्याअर्थी सरकारचा मुलुख तरी कां गमवा ? हैदरखानाचे बोलण्यास या मुलकाचा संबंध लागत नाहीं.

रा॥ छ २७ साबान हे विनंती.

ले. ३६१ [२६६] श. १७०४ आषाढ व. ८ ता ८-८-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं

विनंती उपरि. राजश्री पांडुरंग रघुनाथ यांणीं लिहिलें जे, राजश्री पाटीलबावांनीं सांगितलें कीं इंग्रजाच्या तहाचा ठराव न जहाला तर सलुखाची भानगड तुटतांच बंगाल्याकडे फौजेची रवानगी होऊन बंगाल्यांत हंगाम सुरू होय अशी तर्तूद जाहली पाहिजे. विना इंग्रज जरबेंत येत नाहीं. सुचलें तें सांगितलें आहे असें बोलले म्हणोन लिहिलें. त्यास इंग्रजास ताण देऊन जरबेंत आणावें ही मुख्य गोष्ट, परंतु पूर्वी इंग्रजांचे मसल्तीचा नक्षा ठरला त्याप्रमाणें चोहींकडून ताण बसता म्हणजे इंग्रज जरबेंत येऊन म्हटलें तसें ऐकता. परंतु ती गोष्ट घडली नाहीं. मसल्त पडतां सरकार व हैदरखान उभयतांवर पडली. तथापि इंग्रज नरम पडून चोहींकडून सलुखाची भानगड पाडली. परंतु सरकारचे मुखत्यार पाटीलबावा त्यांशीं बोलावयास मुख्य कलकत्त्याहून हेष्टिनाकडून इंद्रसेन मुखत्यार आला त्यांशीं पाटीलबावांनीं सरकारचे मुद्दे मवाफक हैदरखान सुद्धां तहाचें बोलावें म्हणोन येथून विस्तारें करून लिहून पत्रें वरचेवर लिहित गेलों. गाडराकडून उदिष्टीन* येथें बोलूं लागला, त्याचे बोलण्यापेक्षां पाटीलबावा जवळ अधीक होईल हें जाणून त्यास निरोप देऊन पाटीलबावानींच मुद्दे माफक तह करावा, पाटीलबावांस यश यावें, आणि सरकार काम मातबर घडावें, म्हणोन लिहिलें होतें. त्यास पाटीलबावांकाडून इंग्रजांच्या तहाच्या बोलण्याची भवती न भवती होऊन कमलबंदीच्या यादी आल्या, यांत पहातां हपटेनच्या तहा पेक्षांही कांहीं कलमांत नुकसान दिसतें. याकरितां तह प्रकरणीं यादी पैकीं निदानपक्ष लिहून पेशजी यादी पाठविल्या आहेत व हल्लीं ही लिहिलें आहे याप्रमाणें घडावें, म्हणजे सरकार काम होइल व पाटीलबावांस यश येईल. रा॥ छ २७ साबान हे विनंती.

ले. ३६२ [२७५] श. १७०४ आषाढ व. ४ ता ८-८-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. राजश्री पांडुरंगपंतांनीं लिहिलें कीं, राजश्री पाटीलबावांच्या सांगितल्या-

---

* उदिष्टिन=Watherstone.

प्रमाणें इंग्रजांच्या तहप्रकरणींची पुरवणी व दिल्लीकडील मजकुराची पुरवणी श्रीमंत दादासाहेबांचे व तिहीं लक्षांचे मुलखाचें कलम लिहिलें आहे ती पुरवणी व बंगाल्याचे मसलती विषयींची पुरवणी एकून चार पुरवण्या लिहिल्या आहेत त्यांचीं उत्तरें येतील (तीं) पाटीलबावांस दाखवावीं लागतील, याकरितां दाखविण्यास उपयोगी पडत अशीं उत्तरें यावीं म्हणून लिहिलें आहे, त्यास या चहूं पुरवण्यांचीं उत्तरें दाखवावयाजोगींच येथून लिहिलीं आहेत. दाखवावीं. र॥ छ २७ साबान हे विनंती.

ले. ३६३ }
[२२५] }

{ शके १७०४ श्रावण शु. २
{ ता ११--८--१७८२

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि. पांडुरंगपंताचे पत्रांतील जाबसाल कलमवंदीच्या यादी पाठविल्यांत भडोजेचा मजकुर नाहीं. त्यावरून आशंका येईल तर सरकारचा इंग्रजांचा तह झाल्यास भडोच पाटीलबावांस द्यावी याप्रमाणें इंद्रसेनानें वेगळें पाटीलबावांस लिहून दिली आहे. हे पाटीलबावांनींच सांगितलें म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास भडोजेचा जाबसाल वेगळाला लिहून घेतला, असाच तह समयीं साष्टीचाही जाबसाल उगवून घ्यावयाचा होता. पेशजी रामजी पाटलाकडे यादी आली ती त्यांणीं आणून दाखविली. त्यांत भडोजेचा जाबसाल कांहीं नव्हता. याकरितां पेशजी लिहिलें होतें कीं, साष्टीकरितां पाटीलबावांनीं भडोजेचा जाबसाल उगवून घेतला नसेल. असो हल्लीं निदानपक्षीं लिहिल्याप्रमाणें घडावें म्हणजे चांगलें. हल्लीं तुमच्या लिहिण्यांत भडोजेचा जाबसाल उगवून घेतला म्हणून आहे. उत्तम आहे. येथील विचार आढळतो जे, कलबंदीच्या यादीवरून श्रीमंतांस विचार पडून आमच्या साधनास लागतील त्या काळीं आपण जसें म्हणूं तसें घेऊन मुख्य इंग्रजाचा तह आपले हातून घाडावा हा मनोदय आहे, याकरितां याप्रमाणें श्रीमंतांस कर्तव्य असल्यास मग यश दुसरीकडे कशास यावें ? म्हणोन लिहिलें. त्यास इंग्रजाशीं तह करावा हा मनोदय येथीलही आहे. परंतु तहाचीं कलमें चांगलीं सरकार उपयोगीं मुद्दे माफक अशीं तर उगवून घेतलीं पाहिजेत किंवा नाहीं. इंग्रज बोलतो ते आपला नफा पाहून बोलतो. त्या अनवयें कबूल केलें असतां हपटनच्याही तहास नुकसानी. मग तळेगांवचा तह कोणीकडे ? याकरितां पेशजी लिहिल्याप्रमाणें व हल्लीं निदान पक्ष लिहिल्याप्रमाणें होत असल्यास उत्तम. मग कसेंही करून तोड काढण्यास येईल. याकरितां याप्रमाणें घडल्यास बरें.

सविस्तर अर्थ पेशजी लिहिलेच आहेत व हल्लीं लिहिले आहेत. ध्यानांत आणून ज्यांत त्यांच्या लौकिकास चांगलें व सरकारचे मुद्देमाफक तेंच घडवितील. तुम्हीं सविस्तर बोलावें. रा॥ १ रमजान हे बिनंति.

ले. ३६४
[२०७]

श. १७०४ श्रावण शु. १
ता ११-८-१७८२

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. राजश्री पांडुरंग पंताचे पत्रांतील जाबसालः—

राजश्री पाटीलबावा उचपाड परगण्यांत येऊन गळ्या सोडवितात. पांच सहा गळ्या सोडऊन शिवाजी पंत बापूचे हवालीं केल्या. आणखी पांच सहा आहेत त्या सोडविल्यानंतर मग दुसरीकडे जातील.स्वारी हिंमतगडाकडे जाणार म्हणून लिहिलें तें कळलें.

बरवासागराचा मजकूर लिहिला तो सविस्तर कळला.

पूर्वीचे खानगींत दादासाहेब व हैदरखान यांचीं कलमें दोन लिहिलीं आहेत.परंतु आलीकडे बारिक मनास आणितां दादासाहेबांचें कलम लिहिल्याप्रमाणें इंद्रसेनाच्या बोलण्यांत आहे, हैदरखानाचा जाबसाल लिहिल्याप्रमाणें बोलण्यांत नाहीं, व कलमबंदींत हैदरखानाचें कलम लिहिलें आहे त्याप्रमाणें खचित आहे. असें असतां पाटीलबावा काय समजोन बोलले, त्यांचे ते जाणत. परंतु जाबसाल ध्यानांत असावा म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास जसें दादासाहेबांचा जाबसाल इंद्रसेनाशीं करार करून घेतला तेव्हांच तुम्हांपाशीं बोलले असतील. परंतु दोहीं कलमांचे अर्थ पहातां नुकसानीच आहे. आधीं दादा आपले स्वाधीन करून घ्यावे तेव्हां तहाचें पक्कें ठरवावें हें जालें नाहीं व हैदरखानाचें कलम तर कांहींच उगवून घेतलें नाहीं. खाना छ. १ रमजान हे विनंती.

ले. ३६५
[२२२]

श. १७०४ श्रावण शु. १३
ता २१-८-१७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपर. इंग्रजाचा तह हैदरखान सुद्धां खातरजमा व्हावें असें मनांत्त होतें. यांत लौकिक चांगला. तें नाहीं त्यापक्षीं सरकारचे मुद्दे साध्य आदीकरून तरी व्हावे तेंही नाहीं. तेव्हां निदानपक्षाचीं कलमें लिहून पत्र लिहिलें आहे. याप्रमाणें तरी खामखां घडावें. तुम्हीं राजश्री पाटीलबावांशीं एकांतीं बोलावें कीं इंग्रजांचा तह आपले हातें होतो ही गोष्ट लहान नाहीं. यांत कस्त करून सरकारचीं कलमें जितकीं अधिक साधतील तीं साधावीं, हा लौकिक मोठा आहे. पाटीलबावाही दूरदेशही आहेत. त्यांचेही ध्यानांत यावया जोगीं कलमें आहेत. या उपर त्यांचेही थोरपणास व श्रीमंताचे दौलतेस उपयोगी तें करतील. रा छ ११ रमजान हे विनंति.*

---

* हें सर्व पत्र खुद्द नानाच्या हातचें आहे.

ले. ३६६ [२७८] | श. १७०४ श्रावण शु. १३ ता २१-८-१७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. हैदरखानास टाकून तह केला असतां खान वाईट मानून उगीच राहणारच नाहीं. तेव्हां सरकारांतून इंग्रजास मिळून मसलत करणें प्राप्त. याचा करार इंग्रज गुदस्तां भोंसल्याचे विद्यमानें बोलत होते कीं, सरकारचा तह करून खानावर मसलत करावी. जो मुलूख व किल्ले सुटतील त्यांपैकीं निमे सरकार व निमे इंग्रज यांणीं घ्यावे, त्यांत सरकार तालुक्यांस लागतें तें सरकारांत घ्यावें, इंग्रजास लागतें तें इंग्रजास द्यावें. असें बोलत होते त्यास तें येथून ऐकिलें नाहीं. हल्लीं करारांत आणावयाचें राजश्री पाटीलबावांचे विचारें जाल्यास या मसलतीस निजामअल्लीखानास टाकितां येणार नाहीं. कारण, हैदरखान व फरासीस [व] नबाब एक होतील. मसलत भारी पडेल. याकरितां जर निजामअल्ली खान यांत आले तर त्यांसही वांटणी द्यावी लागेल. जर नबाब मसलतीस घरीक न झाले तर घाटावरील तालुका श्रीरंगपट्टण, बिदनूर वगैरे सरकारांत घ्यावे. घाटाखालील तालुका चंदावर खेरीज करून इंग्रजांनीं घ्यावें. हैदरखानाचें पारिपत्य सरकार व इंग्रज मिळोन करावें. हा मजकूर पुढील मसलतीचा लिहिला आहे. रा छ. ११ रमजान हे विनंती.

ले. ३६७ [२३२] | श. १७०४ श्रावण शु. १४ ता २२-८-१७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि सरकारांतून तह इंग्रजाशीं नबाबास व भोंसल्यास न कळवितां केल्यास दोघेही उदास राहून वांकड्याही चाली धरतील व तसाच मनसुबा पडल्यास हैदरखान व नबाबही एक ह्मावयास चुकणार नाहींत व कित्येक गोष्टीस वाईट पडेल. कदाचित् पाटीलबावा म्हणतील कीं, दोघांचेही विचारें नक्षा ठरला असतां एक तर पैका घेऊन माघारे आले. एक घरींच स्वस्थ राहिले. मसलतीस घरीक असते तर त्यांस घेऊन करावें तें नाहीं. मसलत सरकारावरच पडली. तेव्हां सरकारांतून तह केल्यास वाईट त्यांनीं कां मानावें? त्यास एक गोष्ट त्यांस बोलण्यास आहे कीं, इंग्रज आम्हांशीं बहुत नफे बोलत होते, परंतु आम्हीं श्रीमंतांचे दोस्तीकरितां कबूल केले नाहींत; व आंतून बातम्याही मनास आणितां इंग्रज नबाबाशीं बहुता रीतीनें बोलत होते, परंतु श्रीमंतांच्या दोस्ती करतां इंग्रजांशीं गुंतले नाहींत असेंच आहे. यास्तव परभारेंच सलूख केला असतां वाईट मानतील असें आहे. घेऊन केलें असतां उपयोगी पडेल. इंग्रजांचा तह करण्यास हैदरखान तुटतो याकरितां नबाबाचे मक्त्याचे रुपये दरसाल इंग्रजांकडे यावयाचा करार आहे व इंग्रेजही देत असतात; परंतु आपण तहनाम्यांत कलम त्याहावें कीं, नबाबाचा मक्ता दरसाल तुम्हांकडे करार आहे त्या-

प्रमाणें देत जावा. तसेंच भोंसल्याचीही चौथ बंगाल्याचा देत जावी. याप्रमाणें तहनम्यांत इंग्रजांशीं बोलून जरूर ल्याहावें. येणें करून नबाबास व भोंसल्यास गोड वाटेल. यांत इंग्रजांचेंही कांहीं जात नाहीं. राजकारणास उपयोगीं पडेल. रा छ १२ रमजान हे विनंति.

ले. ३६८ [३१४] | श. १७०४ श्रावण शु. १४ ता २२-८-१७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. मौजे वेळास हा गांव आमचा वतनी आहे तो इंग्रजांकडे कोंकणांत वाणकोटा खालीं आहे. तो सोडून द्यावा असें मनांत होतें, परंतु साष्टी सरकारची सुटली नसतां आपला गांव सोडून द्यावा हें ठीक नाहीं. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. खाना छ. १२ रमजान हें विनंति.

ले. ३६९ [२६५] | शके १७०४ श्रावण शु. १९ ता २२-८-१७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि हैदरखानाशीं वचनाप्रमाणें होऊन करार मदार जाहले. त्यास टाकून आपले मुद्दे मात्र करून घेऊन तह इंग्रजाशीं करावा, तेव्हां हैदरखान यांचें विरुद्ध सरकाराशीं पडेलच. फराशिसांचे पातशहाकडून मुसामूतीण वकील येथें आला आहे त्याशीं दारमदाराचीं कलमें ठरावांत आलीं. त्यांच्याही नकला पूर्वी पाठविल्या आहेत, त्यास तह इंग्रजांचा केला असतां तेही विरोधच मानतील. इतकेंही करून इंग्रजांचा तह करावा तर सरकारचेही मुद्दे खातरखां कोठें होतात ? तेंही नाहीं; व इंग्रज तह करतील त्याप्रमाणें चालवितील, हाही भरंवसा येत नाहीं. असे पेंच आहेत. त्यास हैदरखानास सोडावें, त्याचें विरुद्ध करून घ्यावें, फराशिसांचे राजकारण तोडावें, तेव्हां सरकारचे मुद्दे निदान पक्ष कलमवार पत्रोत्तरीं लिहिले आहेत त्याप्रमाणे तरी घडावें. फरांशिसांचाही भारी सरंजाम मुसाभुसी सरदार याबरोबर देऊन त्याचे पातशाहानें इकडे खाना केला तो मोरस बंदरास आला. पुढें लौकरच येणार म्हणोन बातम्या आल्या आहेत. ते व हैदरखान एक होतील तेव्हां इंग्रजांस मसलत संभाळणें कठीण पडेल. याकरितां इंग्रजांनीं सरकारचे मुद्दे ऐकून तह केला असतां सरकार व इंग्रज व नबाब भोंसले यांस घेऊन त्या मसलतीचें धोरण एव्हां पासून बांधिलें पाहिजे, याचाही विचार केल्यानें बरें आहे. नाहीं तर खान व फरांशिस एक जाहले असतां सर्वांस पेंच पडेल. गत एक करूं जातां दिवसगत लागेल, याकरितां हाही मजकूर इंग्रजांशीं बोलून ठेवावा कीं तुमचा तह झाल्यामुळें हैदरखानानें आम्हाशीं विरुद्ध केल्यास तुम्ही आम्ही मिळोन खानाचें पारपत्य करावें. फराशीस हैदरखान मिळोन एक जाहले असतांही करावें. याचा तपशील आलाहिदा लिहिला आहे. रा छ. १२ रमजान हे विनंति.

ले. ३७० [२६४] | श. १७०४ श्रावण शु. १४ ता २२-८-१७८२

श्री

राजश्री **नारो**पंत स्वामींचे सेवेशीं

विनंती उपरि. राजश्री **पा**टीलबाबांचें व इंद्रसेनाचें बोलणें तह प्रकरणीं होऊन ठराव जहाला त्यांतील सारांश प्रथम **पां**डुरंगपंतांनीं लिहिला, त्यावर **रा**मजी **पा**टील यांजकडे याद आली. त्याचे कलमांत गुण दोष येतात ते भाव लिहून उत्तरें पेशजीच गेलीं, तदुपरांत **पा**टीलबावांनींच तह प्रकरणीं दोन यादी हिंदवी व पारसी पाठविल्या त्यांचींही उत्तरें पेशजीच पाठविलीं, व हल्लींही निदान पक्षाचीं कलमें शेवटील तोडजोडीचीं लिहून पत्रें पाठविलीं आहेत. याप्रमाणें तर घडावेंच घडावे. याउपरि येथें लिहून पाठवून उत्तर जाण्यास दिवसगत लागते. इंग्रजांची मसलत शेवटास जाऊन पुढील मसलतींचे डौल धरावयाचे घोरवट एव्हांपासून घडले पाहिजेत, या करतां येथें लिहिल्या तोडजोडीप्रमाणें घडविलें असतां चांगलें. व **पा**टीलबावा मातबर सरदार त्याणीं सरकारचा तह इंग्रजांशीं पक्का केला हाही त्यांचा नक्षा मोठा होतो. सर्व भाव हे **पा**टीलबावांचे ध्यानांत येण्याजोगे आहेत. सारांश इंग्रजांचा तह पक्का करावा. तह जाला असतां हैदरखान यास वाईट वाटोन वांकडी चाल धरल्यास त्याचेही पारपत्यास इंग्रजांनीं षरीक असावें, हें आधीं शपथपुरःसर पक्कें करून घ्यावें. सदर्हु लिहिल्या तोडजोडी इंग्रजांसही भारी पडावयाजोग्या नाहींत. त्याणेंही कबूल कराव्या व पाटीलबावांनीं इंग्रजांकडून कबूल करवाव्या. तुम्हीं **पा**टीलबावांकडे जाणार ते पोहोंचलांच असाल. नसले तरी पत्रदर्शनीं लांब लांब मजली करून दोन तीन पर्याय लिहिले आहेत हे सविस्तर एकांतीं चांगले रीतीनें बोलून करावे. **रा**मजी पाटील व **स**दाशिवपंत यांचीं खानगी करतों म्हणोन पूर्वी पत्रें पाठविलीं होतीं, परंतु त्यांस येथें पोंचावयास दसरा येईल, तदनंतर उत्तर प्रत्युत्तरें येण्यास व जाण्यास दिवसगत लागते, मसलतीचे घोरवट पुढील बांधण्यास दिवस रहात नाहींत, याकरितां सर्व अर्थी खोलून लिहिले आहेत. तहाचा ठराव होतांच अगोदर **दा**दासाहेब यास कुटुंबसुद्धां इंग्रजांनीं आणून द्यावे. मग किल्ले, कोट, व मुलूख याच्या चिठ्ठ्या घ्याव्या, नाहीं तर अगोदर किल्लयाकोटांच्या सनदा घेऊं नयेत. किल्ले, कोट, शहरें व मुलूख सरकारांत देतील, जाहिराणा **शौ**बरेत सलुखाची जहाली, मग **दा**दासाहेबाविशीं बाहाणे लावितील, नाना प्रकार करतील. इकडे हैदरखानही सुधे रहात नाहींत. मग पेंच पडेल. हें पुरतें ध्यानांत आणून **दा**दासाहेबांस अगोदर आणवून ठेवावें. मग ठाण्यांच्या चिठ्ठ्या घ्याव्या. हपटेनचे तह समयीं इंग्रजांनीं **दा**दासाहेबांचा करार केला, अगोदर ठाणीं मुलूख घ्यावीं, मग **दा**दाही कराराप्रमाणें येतील, त्यावरून मुलुख व ठाणीं घेतलीं, मग **दा**दांचे येण्यास नाना प्रकारच्या दिक्कती लाविल्या कीं, **मुं**बईकर लबाडी करतात. **मुं**बईकर म्हणत कीं, **क**लकत्तेकर करतात. असें करून दादांस ठेवून पुढें **त**ळेगांवची मसलत केली. या करतां लिहिलें आहे. **दा**दासाहेब कुटुंबा सुद्धां आले व ठाणीं किल्ले आल्यावर मग इंद्रसेनाचें येणें **श्रीमं**तांपाशीं घडावें, येणेंकरून चांगलें. पूर्वी राजश्री **पा**टीलबावांचेही लिहिण्यांत

होतें कीं, इंद्रसेनास पुण्यास पाठवावयाचें असल्यास पाठवूं. तो आल्यानें जाहिराप्यास चांगलें. लिहिल्याप्रमाणें तुम्ही बोलून करावें. याउपर तह प्रकरणीं लिहिण्याचा अर्थ कांहीं राहिला नाहीं. सर्व भार पाटीलबावांवर ठेविला आहे. त्यांचे थोरपणास येऊन जेथवर कलमें साधतील तें साधून ज्यांत चांगलें तें करावें. करतील. तुम्ही लिहिल्या अन्वयें सर्वही अर्थ एकांतीं चांगलें रीतीनें बोलावे. रवाना छ. १२ रमजान हे विनंती.

ले. ३७१ } { श १७०४ भावण शु १४
[२५३] } ता २२-८-१७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

बिनंति उपरि, नबाब व भोंसल्यास कसें कळविणार, कसें करणार, हें कांहीं लिहिलें नाहीं असें पाटीलबावा म्हणतील, तर याची तोड योजिली आहे कीं, इंग्रजांशीं तह पाटीलबावांनीं पक्का गुप्त करून येथें लिहून पाठवावें, आणि त्या यादीची नकल येथून एक नबाबाकडे व एक भोंसल्याकडे लिहून पाठवून पत्रें येथून ल्याहावीं कीं, इंदसेन पाटीलबावांकडे आला, तो सरकारचे मुद्दे याप्रमाणें बोलतो. याचें उत्तर काय ल्याहावें, कदाचित् म्हणालेx कीं पाहून आमचे हातून केल्यास नफा अधिक करून देऊं, तर त्याची मुदत महिन्या दीडामहिन्यांत काय अधिक नफा करून देतात, असें तेथें वकील असतील त्यांणीं ++धावी. इंद्रसेनानें कौल करार येथें केला असतां याहून मुद्दे त्यांचे वियमानें इंग्रजांनीं अधिक करणें हे गोष्ट कळतच आहे. तेव्हां याहून अधीक होत नाहीं असें सांगतील. मग केल्यास त्यांस संतोष राहून केलें असें होईल. ही एक तोड कळावयाकरितां लिहिली आहे. रा छ १२ रमजान हें विनंति.

ले. ३७२ } { श. १७०४ श्रावण व. ८
[२६८] } ता ३१-८-१७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. इंद्रसेनाशीं तह प्रकरणींचीं बोलणीं होऊन राजश्री पाटीलबावांकडून याद आली. त्यांचीं उत्तरें गुणदोषाचीं एक पुरवणी, व एक तहनाम्यांत कलमें लिहावयाचीं एक, एकूण दोन पुरवण्या व आणखी मजकुराच्या पुरवण्या लिहून छ २१ रमजानीं रवानगी केली. त्यांत तहनाम्यांत लिहावयाच्या कलमाच्या पुरवणींत गायकवाडांनीं पेशजीप्रमाणें सरकारांत चालावें, न चालल्यास त्यांचा बंदोबस्त होणें तो सरकारांतून होईल, हें कलम

× भोंसले किंवा नबाब यांणीं असें म्हटल्यास.

+ येथें कांहीं अक्षरें गेलीं आहेत.

दुबारा लिहिण्यांत आलें आहे. त्यास एके ठिकाणीं रफुकाचें +कलम असावें आणि त्याचें उत्तर त्या कलमावर असावें कीं, रफुकाचे कलम आलाहिदा लिहिलें आहे हें कलम असावें. म्हणजे तहनाम्याचे यादीस सत्रा कलमांस ताळा पडतो. त्यास हें कलम राहून गायकवाडाचेंच दुबारा पडलें आहे. त्यास तुम्ही तेथें पत्रें पाहिल्यावर पाटीलबावांशीं सदर्हू लिहिल्या अनवयेंच समजावून बोलावें. रा छ २१ रमजान हे विनंती. रामजी पाटील व सदाशिवपंत यांची रवानगी करणार होतों, त्यास रायाजी पाटील व सदाशिवपंत यांची रवानगी करावी, रामजीपाटील येथें असावे, असें त्यांचे विचारें ठरलें. तह प्रकरणीं निश्चयाचे प्रकार तुम्हांस लिहून पाठविलेच आहेत. होईल तेथवर करून करावें. त्यांत अगोदर दादासाहेब यांस स्वाधीन करून घ्यावे हें जरूर घडावें. वरकड होळकर संबंधी वगैरे मजकूर सविस्तर उभयतांबराबर सांगोन पाठवितों. यांस जाण्यास उशीर लागला, याकरितां तह प्रकरणीं पत्रें लिहून तुम्हांकडे रवाना केलीं, हा मजकूर यांस येथें कळू दिला नाहीं. यांजवळही तुम्हांस लिहिल्याप्रमाणे कलमें बोलिलीं. रायाजीपाटील यांणीं कबूल केलें आहे कीं, वीस कलमांचे यादीप्रमाणें पाटीलबावांशीं बोलून अधिकउणीं अक्षरें कलमांत घालावयाचीं कलमें दहा आहेत, तीं तर करून घेऊं म्हणोन बोलिले आहेत. परंतु यास दिसगत लागेल याकरितां पुढें लिहून पाठविलें. हे विनंती.

ले ३७३ / [२०६] — श. १७०४ श्रावण / आगस्ट १७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. इंग्रजाचे तह करण्याची कलमबंदीची याद पूर्वी राजश्री पाटीलबावाकडून पारशी व हिंदवी आली, त्याचीं उत्तरें ब निदान पक्षाचीं कलमें सरकारचे तहाचीं लिहून पत्रें पूर्वी तुम्हांकडे पाठविलीं ती पावलींच असतील. सरकारचा तह इंग्रजांशीं पाटीलबावांचे विद्यमानें जाहाला हे शौहरत इंग्रजांनीं हैदरखानास कळविली; व पाटीलबावांचे लष्करची ही बातमी खानास गेली. त्यावरून खान इंग्रजांचे गळीं पडून सलूख करून इकडे चाल धरणार म्हणोन बातम्या आल्या. जर खान व इंग्रज एक जाहाले तर फारच विलग पडेल. याकरितां इंग्रजाकडील यकत्यारी इंद्रसेन आला आहे, हीं कलमें ह्मावयाजोगीं व इंग्रजांसही फार अवघड पडायाजोगीं नाहींत, या करितां तहाचीं कलमें येथून लिहून पाठविलीं आहेत. त्यांत जेथवर साधतील तेथवर करून घ्यावीं. पाटीलबावांस सर्व काळजी आहे. इतकेंही बोलत असतां इंग्रज नच ऐकेल तर पाटीलबावांनीं तह ठरविला आहे त्याप्रमाणें श्रीमंत राजश्री दादासाहेबांस क्षेपनिक्षेप लौकर घ्यावयाचें करावें, व हैदरखानानें सरकाराशीं विरोध केला असतां इंग्रजांनी अनुकूळ होऊन खानाचें पारपत्य करावें व इंग्रजांनीं परभारां सलूख

+ रफूक-रफाकत=स्नेह

हैदरखानाशीं करूं नये हा पक्का करार दस्तऐवजीं घ्यावा; व पादशाहाचें कलम लिहिलें आहे तें तिन्ही चांगलीं उगवून घ्यावीं. +वरकड कलमांपैकीं जेथवर साधेल तेथवर साधून घेऊन तह करावा. सर्व दौलतेचा भार राजश्री पाटीलबावांवर आहे. पुढें मागें दोष न पडे असें पाहून करावें. या उपर विलंब लाऊं नये. रा रमजान हे विनंती.

———

ले. ३७४ [२७९]

श. १७०४ श्रावण व. १४ ता ६–९–१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. हरिपंत तात्या यांचे निखालसीविषयीच्या बोलण्याचा प्रकार चालला आहे. निश्चयांत येईल त्याप्रमाणें लिहून पाठवीन. सारांश स्वामीचे व्यतिरिक्त हें होणार नाहींतसें दिसतें, म्हणून लिहिलें, त्यास सर्वही निखालसतेचे विषय तुम्हाबरोबर सांगून पाठविले असतां अद्यापिही तुमचे लिहिण्यांत दिसतें म्हणून लिहितां. त्यास उत्तम रीतीनें स्वच्छता होय तें लवकर करून लिहून पाठविणें. स्वच्छतेनें कामें होतात, संदेहानें नास.यास्तव गेल्या गोष्टी गुदस्त असतां सर्वांनीं एकच स्वच्छता परस्परें व्हावी हें चांगलें. रा छ २७ रमजान हे विनंती.

———

ले. ३७५ [२९०]

श. १७० आश्विन शु ३ ता ९–१०–१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं

विनंती उपरि. सरकारचा व इंग्रजांचा तह झाला. फराशिसांचे वकिलाशीं राजकारण राखावें कीं तोडावें म्हणून आज्ञा,त्यावरून आज्ञेप्रमाणें राजश्री पाटीलबावांशी बोललों. उत्तर झालें कीं वकिलांस निरोप देऊं नये, उगाच नाद राखून ठेवावा, एरवीं फराशिसांपासून या मागें सरकार उपयोग आजपावेतों कोणता पडला कीं पुढें पडणार? तथापि नाद राखावा. या अन्वयें उत्तर जालें, या प्रमाणें पाटलिबावांचेंच पत्र घेऊन पाठविलें आहे. म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास फराशिसांचे वकिलास निरोप देऊं नये, नाद राखून ठेवावा, असें राजश्री पाटीलबावा बोलले ही गोष्ट चांगली आहे. त्यास निरोप देत नाहीं. पाटीलबाबांनीं दूर-देशीचे विचार मनांत आणून सांगितलें. बरें आहे. रा छ १ जिलकाद हे विनंती.

———

+ येथपासून अक्षर नानाचें आहे.

ले. ३७६ [३१०] | श. १७०४ आश्विन शु. ६ ता १२-१०-१७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. मौजे जलालपूर भामोरे येथील पाटीलकी मुधोजी भोंसले यांची व सावलीगड तालुका येविषयींची ताकीद पत्रें पाठवावीं या विषयींची आज्ञा, त्यास आज्ञेप्रमाणें राजश्री पाटीलबावांस सांगितलें व बोललों. त्यास सावलीगडाविषयीं पत्रें भोंसले यांकडील वकील येथें आहेत त्यांणीं मागितलीं त्याप्रमाणें दिलीं. जलालपूर भामोरे यांस भोख गांवीं पंचाईत नेमून द्यावी. जिकडील जमीन ठरेल तिकडे द्यावी. या अन्वयें बाळाजी जनार्दन जामगांवकर यांस पत्र दिलें तें पाठविलें आहे म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास सावलीगडाविषयीं भोंसल्यांचे वकिलांनीं पत्रें मागितलीं त्याप्रमाणें दिलीं. उत्तम केलें. जलालपूर व भामोरें यांचे पंचाइती विषयीं बाळाजी जनार्दन यांस पत्र पाठविलें तें पावलें. होष्टिन कलकत्त्याहून काशीस येणार. तेथून काल्पीचे सुमारें यावें, यांनीं तेथें जावें, भेट व्हावी असें वर्तमान आहे. दुसरें दिल्लीस राजकारण करावें, पन्नास लाख रुपये नजर द्यावी असेंही बोलतात, म्हणून लिहिलें, त्यास बारीक रीतीनें शोध करून लिहून पाठवावें. पुढें होईल तें वरचेवर लिहित जावें. परमेश्वर बुध्य देईल व त्यांस बरें दिसतील तें करतील व श्रीमंतांचें दैवानें जें सिद्धीस जावयाचें तें जाईल. रा छ ४ जिलकाद हे विनंती.

———

ले. ३७७ [२५२] | श. १७०४ आश्विन शु. ९ ता १५-१०-१७८२

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. राजश्री शिवाजी विठ्ठल यांचेविशींचा मजकूर आज्ञेप्रमाणें राजश्री पाटील ज+लों. उत्तर झालें जे, त्यांचा उरपाड महाल तेव्हडा सोडून द्यावा. बापूचे सरदारींचा गलाठा फार आहे,यास्तव श्रीमंतांनीं अगत्य वादानें लिहिलें आहे. +त्यापै ची उरपाड सोडून दिली म्हणजे मग आमचाच बोभाट पंच महालाचे वाटणीविशींचा सरकारांत आल्यास आम्हांस त्याहावें असें उत्तर झालें, म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास पुंरदरचे मुक्कामीं सरंजाम्यांकडील महालांचा मजकूर बोलण्यांत आला तो राजश्री पाटीलबावांस ठाऊक आहेच. सरकारांत तालुका थोडा राहिला, खर्च बेमुबलग, हे अर्थ पाटीलबावांचेही ध्यानांत आहेत. रा छ. ७ जिलकाद हे विनंति.

———

+ पुढील कांहीं अक्षरें फाटलीं आहेत.

ले. ३७८ [२३६] { श. १७०४ आश्विन शु. १४ ता० २०-१०-१७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरी. इंग्रजांच्या तह प्रकरणीं भवती न भवती होऊन निदान पक्ष तह कर-ण्याचीं पत्रें छ. २१ रमजानीं मंदवारी तुम्हांकडे खाना केलीं. त्यावर दोन तीन खानग्या तुम्हांकडील आल्या, परंतु त्या खानगीचीं पत्रें पावल्याचा अद्याप तुमचा जाब आला नाहीं, यावरून वाटतें कीं, पत्रें पावलीं न पाबलीं हें कळत नाहीं. याकरितां लिहिलें आहे. तरी सदर्हू खानगी तुम्हां जवळ कोणत्या तारखेस पावली तें लिहून पाठवावें. कलमवार पत्रें व निदान पक्ष सुद्धां लिहून पाठविलें होतें. उत्तर आलें नाहीं. त्या मागून दोन खानग्या केल्या आहेत. पावल्याचीं उत्तरें पाठवावीं. रा॥ छ १२ जिल्काद हे विनंति. छ ७ जिल्हेज सुरूसन सलास समानीन मुक्काम परगणे खालेर.

ले. ३७९ [८८] { श. १७०४ आश्विन व. ५ ता० २६-१०-१७८२

॥ श्री ॥

श्री.
राजा शाहू नरपति हर्ष-निधान, माधवराव नारा-यण मुख्य प्रधान*

छ मा॥ अनाम देशमुख व देशपांडये पो॥ जालनापूर यांसि माधवराव नारायण प्रधान सु॥ सलास समानीन मया व अलफ. नरहरी रनाळेकर यवनमय होऊन भ्रष्ट जाला, त्याजला प्रायश्चित्ताचा अधिकार नसतां शामाचार्य व कांहीं प्रभृती ब्राह्मण पैठणकर यांणीं शुद्ध केला. सबब पैठणीं परस्परें ब्राह्मणांचा तट जाला. उपरांतिक जाबीतजंग यांजकडील काादार पेशजी आला होता, त्यानें बलात्कारें शुद्ध ब्राह्मणांची व बहिष्कृत ब्राह्मणांची पंक्ति करून एकाकार केला. सबब पैठणकर झाडून ब्राह्मण सर्व बहिष्कृत जाले. त्यास प्रायश्चित्त द्यावयास सरकारचे कारकून शंकराजी राम व जयराम रायदेव पाठविले. त्यांणीं झाडून पैठणकर सर्व ब्राह्मणांचीं प्रायश्चित्तें परगण्यासुद्धां केलीं. पैठणचा संसर्ग तुम्हांस घडला आहे. तरि तुम्हीं सर्व ब्राह्मणांस ताकीद करून झाडून प्रायश्चित्तें परगण्यासुद्धां उभयतां कारकून यांचे विद्यमानें संसर्गानुरूप फडशा करणें. जाणिजे. छ. १८ जिलकाद आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

---

* 'न' लिहून दुसऱ्या कागदावर उठविला असतां जसा उलटा उठतो तसा मूळ शिक्यांत सर्वत्र आहे, तसा वर काढतां आला नाहीं. हा उलटा 'न' असण्याचें कारण असें. पिंगळे यांचे घराण्यांत पेशवाई होती तीं त्यांजकडून काढून भट यांस दिली हा बदल तो दर्शविण्याकरितां शाहूनें हें शेवटचें अक्षर 'न' उलटें वठावें असें ठरविलें.

ले. ३८०
[२९६]

श. १७०४ कार्तिक शु. १३
ता १७--११--१७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं

विनंति उपरि. आठ महिने या प्रांतीं स्वारी राजश्री पाटीलबावांची राहिल्यामुळें सरकारचे महालची स्थिति कांहीं राहिली नाहीं, तत्रापि कमाविसदारांनीं कस्त त्याची खातरजमा करून परगण्याचीं जोतपात रयतीस दिलासा देऊन करविली. इंग्रजाचे मसलतीचा तर शेवट जाहला. आतां आंबोजी इंगळे बानींकर पुढें उभे राहून सरकारच्या महालांत गढीबंद जमीनदारांचें पारपत्य करून, चार रुपये मेळवावे असें निमित्त करून, महाल लुटावे अशा तजविजेंत आहेत. त्रिंबकराव नारायण यांजकडील महाल चोळणींत आले असतां पचावळीपासून दहा हजार रुपये अगोदर घेतलेच होते. आतां बिरोट म्हणोन रणोद परगण्याचा गांव आहे तेथें तीन दिवस मोर्चे लावून सत्रा हजार रुपये पाटीलबावांचे व तीन हजार दरबार खर्च एकूण वीस हजार रुपये घेतले. त्यावर रणोदकरानीं इंग्रजांस रस्त पोंहोंचवली हें निमित्य उभें करून कसबा लुटावा असें केलें. कमावीसदाराची रदबदल कोण ऐकतो ? रणोद कसब्यावर इंगळे स्वारी करून जातात असें कळलें तेव्हां यादव हरी कमावीसदार याणी तेथील खंडणी ठराविली. अबरूची मर्यादा कांहीं राहिली नाहीं. इंगळे आलियावर नवी सराई शाहाडौरा महत्पुर खुटावत परगण्यांतील गढ्यांची याद लिहून लाख दोन लाख रुपये मेळवावे असें पाटीलबावांस समजविलें. पाटीलबावांनीं मला बोलावून ती याद दाखविली आणि बोलिले कीं, " हे गढीबंद सरकार कयांतील गांव सरकारांत पैका देत नाहींत, इंग्रजांचे दंग्यांत गोळी वाजविली. यांचें पारपत्य करून मवासाचें पारपत्य करावयाचें योजिलें आहे. येविशीं तुमचे चित्तांत कसें येतें ? " त्यावरून विनंती केली कीं, " गढीबंद जमीनदारांचा बोभाट कमावीसदारांनीं सांगावा तेव्हां पारपत्य करावें. ते तर कोणी बोलले नाहींत; आणि एक गढीचें पारपत्य करूं जातां सगळा परगणा बुडतो. सरकारचे महालांची खराबी होते. अहीर धंदेरे वगैरे गिराशे या प्रांतीं आहेत त्यांचें पारपत्य करावें तें न होतां सरकारचेच महाल लुटावे हें ठीक नाहीं. " अशी भवती न भवती प्रहरभर दरबारांत जहाली. शेवट मर्जी खप्पा जहाली.रदबदलीची पराकाष्ठा जाली.आतां मर्जीस येईल तसें करावें, असें बोलून राहुटीस आलों. त्यावर भाईची भेट जाली. त्याणींही सांगितलें कीं, तूर्त इंगळ्याचे नादीं आहेत. दूरदर्शीचा विचार न पाहातां कोणीकडूनही चार रुपये मिळवावे ही बुद्धि जाल्यावर विचार कशाला पुसतां ? म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. त्यास सरकार तालुक्यांतील गढ्यांस मोर्चे लावून रुपये घेणें आणि त्याची रदबदल सरकारचे वकिलांनीं करणें तें न ऐकतां लोभावरच दृष्टी देऊन रुपये घेणें, सरकारचा तालुका खराब होतो, लौकिकांतही एक प्रकार दिसतो, इतक्याही गोष्टी चित्तांत येत नाहींत,ही गोष्ट फार वाईट.असेंही करतां इंग्रजांस रस्त पोहोंचावली अथवा लबाडी कोणी केली असली तर सरकारचे कमावीसदारांकडून बंदोबस्त करवून चार रुपये गुन्हेगारीचे नजरेचे ठरावून कमावीसदारास सांगावें कीं, हे रुपये सरकारांत

पुष्यास पावते करणें. असें करणें थोरपणास चांगलें दिसतें. असो. सरकारचें पत्र येविशीं राजश्री पाटीलबावांस पाठविलें आहे, प्रविष्ट करावें. कांहीं चित्तांत येऊन उपद्रव मना जहाला तर बरेंच जहालें, नाहीं तर ईश्वरी इच्छा, परंतु मर्यादा सोडल्यावर ईश्वरास गोष्ट मानत नाहीं असें आहे. +खाना चंद्र ११ जिल्हेज हे विनंती. सरकारचीं पत्रें राजश्री पाटीलबावांस दोन व राजश्री पांडुरंग रघुनाथ यांचें नांवें एक अशीं पाठविलीं आहेत. सरकारचे पत्राचे लाखोटे करून देणें तर द्यावे, अथवा खुलीं देणें. हे विनंती.

ले. ३८१ [१८७] | श. १७०४ कार्तिक व. ३ ता. २३।११।१७८२

राज+

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि. राजश्री पाटील बावांचीं पत्रें येतात कीं, इंद्रसेन निरोपाची जलदी करितो, पुण्याहून पत्रें येतात त्यांत निश्चय ठरून लिहीत नाहींत, म्हणोन वारंवार लिहितात. त्यास तुम्हांकडे इंग्रजांचा तह करण्याचें कलमबंदीचें पत्र पूर्वी पाठविलें व निदानपक्षही लिहिलाच आहे. त्यास मुख्य सरकारचा मुद्दा श्रीमंत राजश्री दादासाहेब व साष्टी. त्यास साष्टी तर नाहीं. त्यास दादासाहेब कुटुंबसुद्धां इंग्रजानीं हवालीं करावे, याप्रमाणें तहनाम्यांत ठरावून वरकड कलमांपैकीं जेथवर होईल तेथवर करारांत आणून आधीं दादा आलियावर मग ठाणीं मुलुख घेणें तो घ्यावा. असें जाहालें तरच तह करावा. दादांचें कलम मळमळीत लिहिलें आहे तसें असल्यास तह करणें ठीक नाहीं. चहूंकडील दोष मसलतीस येऊन, सरकारांत गाडराकडून उदिष्टीन आला त्याचे बोलण्यांत दादा व साष्टीही यावयाचें होतें. परंतु राजश्री पाटील बावांकडे कलकत्याहून इंद्रसेन आला आहे, तेंही राजकारण सरकारांतच आहे असें जाणून, व नबाब भोंसलेही इंग्रजांचे तहाविशीं बोलत होते तें न ऐकून उदिष्टिनास निरोप दिला. आणि हल्लीं दादा हवालीं करून घेतल्याखेरीज तह केला असतां आपले सरकारचे मसलतीसहि कांहीं न जाहालें; आणि नबाब भोंसलेही काय म्हणतील ? हैदरखानाचा मुद्दा कांहींच न जाहाला, तेव्हां खान तों फारच वाईट मानतील§. हे अर्थ पुरते ध्यानांत आणावे. दुसरे साष्टीचा मुद्दा सरकारचा होत नाहीं व अंतरवेद वगैरेही कलमांत नुकसान्या. हैदरखान षरीक जाहला त्याचें कांहींच नाहीं. त्यास करार असतां तोडावें, फराशीस ही येणार त्यांचें राजकारण तोडावें, इतक्या गोष्टी कबूल करून दादांचेंही कलम मळमळीत. जाहीराणा मात्र तहाचा होऊन हैदरखान उगाच सोबती आहे तो नाहींसा होईल, आणि आपले घरचें खूळ दादा येणार नाहीं. बाहाणे हजार

+ येथपासून खुद्द नानाचें हस्ताक्षर.

§ या वेळीं निजाम अली, हैदर व मराठे असे मिळून इंग्रजांविरुद्ध कट करण्याचें ठरत होतें. तेव्हां हैदरास सोडून तह करणें ठीक नाहीं असा नानांचा भाव. इकडे हैदरानें तर इंग्रजांचा फार नाश केल्यामुळें त्यास ते ह्या तहांतून गाळूं लागले.

लावतील. बिनसल्यास मसलतही फिरोन उभी राहील. याकरितां दादासाहेबांस इंग्रज कुटुंब सुद्धां निखालस हवालीं करीत असेल तर तह करावा, नाहीं तर करणें ठीक नाहीं, याप्रमाणें सांगावें. तुम्हांकडील पत्रें आलीं त्यांचीं उत्तरें मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. तुम्हास हा मजकूर जलदीनें कळावयाकरितां हें पत्र पुढें पाठविलें आहे. रा छ १७ जिल्हेज हे विनंति. पौ छ. १० मोहरम सु॥ सलास समानीन मया व अल्फ मु॥ नजीक अटेरी.

ले. ३८२ [१९२]

श. १७०४ मार्ग. व. २ ता॥ २१-१२-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. राजश्री पाटीलबावांचे पत्रांत लिहिलें आहे कीं, आधीं सरकारचे किल्ले व ठाणीं व मुलूख सोडावा, उपरांतिक दादासाहेबांस स्वाधीन करावें. असें इंद्रसेनाशीं करारांत आहे, त्याप्रमाणें इंग्रजांनीं सरकारचा मुलूख व जागा सोडल्यावर दादासाहेबांस कशास ठेवतील ? व तुमचे पत्रांत इंग्रज म्हणतात कीं दादासाहेबांस स्पष्ट तुमच्या स्वाधीन करावें, यांत आमचा लौकिक राहत नाहीं. तुमचा आमचा तह झाला म्हणजे तुम्ही आपल्याकडील कोणी मातबर माणूस दादासाहेबांकडे समजुतीस पाठवावे. म्हणजे आम्ही त्यांस निक्षून सांगून तुमचे स्वाधीन होत असें करूं. यावरून पाटीलबावांशीं बोलिलों कीं, विना दादासाहेब हातीं आल्याखेरीज तह घडावयाचा नाहीं. त्यावरून पाटीलबाबा बोलले आहेत कीं, सरकारचा तहनामा आलिया उपरांतिक हें बोलणें इंद्रसेनाशीं बोलून जर दादासाहेब हातीं आले तर तहनामा देऊं, नाहीं तर देणार नाहीं. म्हणोन लिहिलें, त्यास आधीं सरकारचे किल्ले व ठाणीं मुलूख सोडल्यावर दादासाहेबांस कशास ठेवतील, असें पाटीलबावांचे लिहिण्यांत, व कोणी गृहस्थ दादासाहेबांकडे पाठवावा, आम्हीही त्यास निक्षून सांगोन तुमचे स्वाधीन होत असें करूं असें इंद्रसेन म्हणतो, त्यास तहाचीं कलमें ठरावांत आणावीं. तेव्हां ठराव तर जाहला. मग अगोदर सरकारचे किल्ले ठाणीं व मुलुख घेऊन मग दादासाहेबांकडे गृहस्थ पाठऊन इंग्रज निक्षून त्यांस सांगोन स्वाधीन होत असें करणार, तें तह ठरल्यावर काय ? दादास सांगणें तें सांगोन हस्तगत होत तें आधीं कां करीनात ? दादासाहेब स्वाधीन होतसें करूं म्हणतात, मग अगोदर असें केल्यास काय बाध ? मग किल्ले मुलुख घ्यावा. इंग्रजांस करणें त्यापक्षीं फळ सारखेच. आणि असें न केलें तर मुलूख घेतल्यावर दादास हजार बाहाणे लावितील. शेवटीं दुसरीच तऱ्हा पाडतील. मग इकडे हैदरखान वगैरे हेही काय करितात कळत नाहीं, आणि दादासाहेबांचें न येणें, मग तह करूनही फळ नाहीं. याकरितां आगोदर दादासाहेबांस काय सांगणें त्या तऱ्हेनें सांगून स्वाधीन होत असें करा. तों पावेतों किल्ले मुलुख आहे तसा असों द्यावा. दादासाहेब आले म्हणजे मुलुख किल्लेही घेऊं, असें बोलावें. किल्ले मुलूख आगोदर द्यावे असें इंद्रसेन म्हणतो,

त्यास करारांत ठरलें तेव्हां घेतल्या दाखलच ठरलें. पुढें महिना दो महिन्यांत दादासाहेब येतसे किल्ले मुलूख घेतल्यावर करणार तें करून दादासाहेब यावे, मग किल्ले मुलुख घ्यावा. यांत कांहीं तह व बोलणीं लिहिणीं ठरलीं यांत उणें होत नाहीं. असें असतां किल्ले मुलूख घेतल्यावरच दादासाहेब स्वाधीन होतील असेंच म्हणूं लागलां, तर पराछिन्न तह स्वच्छतेनें करीत नाहीं असें समजावें. आगोदर स्वाधीन केल्यास निखालस तह असें समजावें. सरकारचा मुलुख किल्ले आगोदर आल्यास किफायतच आहे, आल्यास चांगलें, मग दादासाहेब आले तर काय चिंता ? असें आम्ही म्हणावें. परंतु पुढें पेंच आहे याकरितां ते आम्हींच दोन महिने तुम्हांकडे आहे तसा असों द्यावा म्हणतों. यांत नुकसानी आहे कीं नाहीं? परंतु नुकसानी कबूल करून पुढें दोन महिन्यांनीं युक्तीनें स्वाधीन करणार ते दोन महिने ठाणीं मुलूख त्यांकडेच असल्यानें दादासाहेब स्वाधीन झाले म्हणजे घ्यावा. सारांश, दादासाहेब स्वाधीन झाल्याखेरीज किल्ले मुलूख घेऊं नये. लिहिली तोडही चांगली. याप्रमाणें जाल्यास करावें. पुढें+ तरी दादासाहेबास इंग्रेज स्वाधीन करण्याचें करारांत आलेंच आहे तों पावेतों किल्ले मुलूख त्यांकडेच असावा, ही तोड चांगली आहे. रा॥ छ १५ मोहरम हे विनंती.

ले. ३८३ [१६४] | श. १७०४ मार्गशीर्ष व. २ ता॥ २१।१२।१७८२

॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राममान्य राजश्री आपाराव स्वामींचे शेवेशी.

पो॥ बाळाजी जनार्दन सां। नमस्कार विनंती उपरि. येथील कुशळ जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुम्हीं छ १४ सवाल छ २१।२४ व छ २९ जिलकादचीं पत्रें पाठविलीं ते पावलीं. तह प्रकर्णीं राजश्री पाटील बावांचें व इंद्रसेनाचें बोलणें जालें त्यांतील मजकूर कलमवंदी लिहून पाठविला तो सविस्तर कळला. पाटील बावांनीं लिहिल्याप्रमाणें तहनामा व डौल शिक्यानशीं लौकर आलें पे॥ येविशींचा मजकूर लिहिला तो कळला. त्यास येविशींचे मजकुराचीं पत्रें पाटील बावांचीं ही तीन चार रवानग्यांचीं आलीं. त्यांत लिहिलें कीं, "श्रीमंत दादासाहेबांस इंग्रजांनीं स्वाधीन करावें असें पक्कें करून घेतलें आहे व येथून कलमांचीं याद पाठविली होती त्यांपैकीं कलमें बोलून करारांत आणिलीं आहेत. परंतु पूर्वी पारशी नकल तहनाम्याची येथें पाठविली, त्याप्रमाणें शिक्का करून तहनामा पाठवावा; व एक डौल शिक्का करून पा॥, शिक्याचा तहनामा इंद्रसेनास *दाखवून. येणेंकरून त्यास इतवार पुरेल व जावयाची जलदी करणार नाहीं. हा तहनामा आम्ही आपल्या जवळ ठेवूं, त्यास देणार नाहीं. दादासाहेबांचें कलम वगैरे कलमें ठरावांत आलीं, त्याप्रमाणें इंद्रसेनाकडून कलम त्याचा तहनामा आणवून मग हा देऊं." असें लिहिलें. आणि मुदतीचीं पत्रें पाठविलीं. त्यावरून तहनामा शिक्यानशीं व डौल पा॥ आहे. परंतु दादासाहेब यांस अगोदर स्वाधीन करून घ्यावे, मग किल्ले मुलुख सरकारचा सरकारांत घ्यावा,

---

+ येथून खुद्द नानाचें अक्षर. * म्ह० दाखवूं.

तरच तह करावा. याप्रमाणें होत नसल्यास करूं नये, म्हणून राजश्री पाटील बावाचे पत्रीं लिहिलें आहे व नारो शिवदेव यांस ही विस्तारें करून लिहिलें आहे, त्याजवरून तुम्हांस सविस्तर कळेल. तुम्हीही पाटील बावांशीं बोलून अमलांत आणावें. इंग्रजांचे तहाचें काम फार नाजूक व मोठें आहे. कोठें कसे पेंच बसतात व पुढें बसतील हे सविस्तर अर्थ मशारनिलेचे पत्रीं लिहिले आहेत. सारांश दादासाहेब स्वाधीन होत असेल तरच [त] ह करावा व हैदरखानाचे कलमाचा पर्याय लिहिला आहे. हीं दोन कलमें, वरकड साधेल तेथवर, याप्रमाणें जहालें तरच करावें. नाहीं तर करूं नये. मग श्रीमंतांचें दैव आहे. रवाना छ १५ मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती. पौष शुद्ध ९ रविवार. मुक्काम बिलोटी [नजीक, गोहद.]

ले. ३८४ [१९१]

श १७०४ मार्गशीर्ष व. २ ता २१-१२-१७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. सरकारांतही इंग्रजांचें राजकारण होतें. त्यावरून गुा गाडरानें उदिष्टिनास येथें पाठविलें, त्याचे बोलण्यांत दादासाहेब व घेतला मुलुख व साष्टीही यावयाचा आशय होता, व हैदरखानाचेही मुद्दे बोलणार होता. परंतु वकील आल्यामुळें चहूंकडे संदेह पडले व पाटीलबावांचें लिहिलें आलें कीं, इंग्रजांचा तह करणें तर होष्टिनाकडून इंद्रसेन आला आहे, यासच पुण्यास पाठवितों. याचे हातून करावा. त्यावरून इंद्रसेन पाटीलबावांकडे आला. हें राजकारण सरकारांतच आहे असें समजून उदिष्टिनास निरोप दिला. नबाब, भोंसले यांचेंही बोलणें आजपावेतों आहे कीं, दादासाहेबांस कुटुंबसुद्धां व घेतला मुलुख इंग्रज देतात, सरकारचे मुलखाचा वसूल इंग्रजांनीं घेतला आहे तोही यावयाचें करूं, आमचे अथवा भोंसल्यांचे वियमानें तह जाहल्यास फिरोन इंग्रजांनीं लबाडी केली तर आम्ही तिघे एक, यांत श्रीमंतांचें काम फार आहे, असें नबाबाचें बोलणें व भोंसल्याकडीलही बोलणें होतें. हल्लीं तो भोंसल्याकडून बळवंतराव येथें आले, तेही याप्रमाणें बोलतात. परंतु येथील विचार कीं सरकारांतूनच तह व्हावा. याकरितां नबाब, भोंसले यांकडील बोलण्यांत अधीक मुद्दे घालून पाटीलबावांकडे कर्मी मुद्दे लिहून निदानची याद पाठविली. त्यास नबाब, भोंसलें यांचे हातून तह न झाल्यास ते दोघेही रुष्ट. हैदरखान सौबती व कौल करार वचन प्रमाण. त्याचा मुद्दा कांहीं न होतां तह करणें, तेव्हां त्यासही वाईट वाटेल. फराशिसांशीं दारमदार झाले, या माहिन्यांत मुसाभुशी भारी सरंजामानिशीं येणार, त्यास तोडावें. इतके प्रकार होऊन सरकारचे मुद्दे तरी खातरखा व्हावें तेही नाहीं. हे सविस्तर अर्थ पाटीलबावांचे ध्यानांत यावे याकरितां लिहिलें आहे. आतां तह करणें त्यापक्षीं दादासाहेब तरी कुटुंबसुद्धां स्वाधीन करून घ्यावे. तरच तह करावा. नाहीं तर दादाचें कलम मळमळीत ठेवून तह करूं नये. वरकड कलमें साधतील तेथवर साधावीं राजश्री. पाटीलबावांचें पहिलें

पत्र आलें, त्यांत दादासाहेब इंग्रजांनीं आमचे स्वाधीन करावे असें पक्कें बोलण्यांत करून घेतलें म्हणोन लिहिलें. त्यावर दुसरे पत्रांतही आहे. परंतु तुमचे पत्रांत तह झाल्यावर कोणी मातबर दादासाहेबांकडे पाठवावा, आम्ही त्यास सांगून तुम्हांकडे येत असें करूं; असें इंद्रसेन म्हणतो. परंतु पाटीलबावा बोलिले कीं, हें कलम पक्कें करून घेऊं हें चांगलेंच आहे. रा छ १५ मोहरम हे विनंती.

ले. ३८५
[१९१]

श. १७०४ मार्गशीर्ष व. २
ता २१-१२-१७८२

श्री.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

निनंति उपरि. राजश्री पाटील बावांनीं दोन तीन पत्रें आम्हांस लिहिलीं. त्यांत श्रीमंत राजश्री दादासाहेबांस इंग्रजांनीं स्वाधीन करावें असें पक्कें करारांत आणिलें आहे. हें पक्कें करून घेऊं तरच तहनामा देऊं, नाहीं तर देणार नाहीं, व तुम्हांकडूनही याच अन्वयें पाटीलबावांनीं लिहिविलें आणि तहनामा पारशी नकल पाठविली, त्याप्रमाणें शिक्का करून पाठवावा व डौल पाठवावे. शिक्याचा तहनामा इंद्रसेनास दाखविल्यावर त्यास भरंवसा पुरेल. मग निदानचीं कलमें लिहून पाठविलीं त्यांपैकीं, करारांत आणिलीं त्यांचा तपशील लिहिल्याप्रमाणें डौलांत करून त्याचा तहनामा कलकत्त्याहून आणवून मग हा देऊं. या प्रमाणें पत्रें तीन खानग्यांचीं आलीं. त्यावरून पारशी नकलेप्रमाणें तहनामा शिक्यानिशीं व डौल शिक्का करून पाठविलीं आहेत. परंतु सरकार रीतीप्रमाणें तहनामा नाहीं, असो. हा ठेवावयाचाच आहे मग चिंता नाहीं. इंद्रसेनास दाखविण्याकरितां आणविला म्हणून पाठविला आहे. डौलांत भरणें तें पुढें यथापद्धत करावयास येईल. परंतु श्रीमंत रा० दादासाहेबांस स्वाधीन करून मग किल्ले मुलुख ध्यावे असें ठरलें तर तह करावयाचा. नाहीं त्या पक्षीं करूं नये. जर इंग्रजांचे मनांत दादासाहेबांस स्वाधीन करावें हें निखालस आहे, त्यापक्षीं अगोदर स्वाधीन करण्यास काय बाध ? जर पुढें इंग्रजांचे मनांत दादासाहेबांस ठेवून लबाडी करणें नाहीं तर अगोदर देतील. जर लबाडी करणें आहे तर अगोदर देणार नाहींत. हीच परीक्षा तहाची आहे. मग उगीच अगोदर किल्ले ठाणीं घेऊन चोहोंकडून मनसब्यास विलग पाडून ध्यावें हें ठीक नाहीं. जर दादासाहेब अगोदर न येतां तह करूं लागले, तर तहनामा पाठविला हा रद्द म्हणोन सांगावें. रा छ १५ मोहरम हे विनंती.

ले. ३८६ [१९०] { श. १७०४ मार्ग. व २ ता० २१-१२-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. तुम्ही छ. २४ जिलकादचीं पत्रें पाठविलीं तीं पावली. 'पूर्वी राजश्री पाटीलबावा यांणीं कलमबंदीची याद इंग्रजांकडील तहाची ठराविली, त्याप्रमाणें सरकारचा तहनामा शिक्यानशीं आल्यानंतर इंद्रसेनास तहनामा दाखवून त्याजपासून लिहून घ्यावयाचे जाबसाल पाटीलबावा बोलले. कलम.

१ हैदरखानानें महंमद अल्लीखान व इंग्रज यांचा मुलूख घेतला आहे, व पाडाव इंग्रजाकडील त्यांकडे गेले आहेत, ते सोडून द्यावयाविषयीं सरकारांतून हैदरखानास सांगावें. त्याणें ऐकिल्यास उत्तम, न ऐकल्यास सरकार व इंग्रज सामील होऊन हैदर खानाकडील सरकारचा व महंमद अल्लीखान व इंग्रज यांचा मुलूख सोडून घ्यावा. कदाचित् हैदरखान इंग्रजांकडे सलुखाचें बोलणें लावील तर इंग्रजांनीं ऐकूं नये. हैदरखानाचा तह होणें तो सरकारांतून होईल. सरकारचा मुलूख व महंमद अल्लीखान इंग्रज यांचा मुलूख सोडविल्यानंतर हैदरखानानें तह केल्यास उत्तम. न केल्यास सरकार व इंग्रज सामील होऊन हैदरखानाचें पारिपत्य करून त्यांकडील मुलुख सुटेल त्यापैकीं निमे सरकारांत घ्यावे व निमे इंग्रजांनीं घ्यावे.

१ श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस कुटुंबसुद्धां सरकारांत स्वाधीन करावें असें आमचें बोलणें. याचें उत्तर इंद्रसेनानें केलें तें पाटीलबावा यांणीं सांगितलें कीं, ते म्हणतात, स्पष्ट दादासाहेबांस तुमच्या स्वाधीन करावें यांत लौकिक आमचा रहात नाहीं. यास्तव तुमचा तह झाला म्हणजे तुम्ही आपल्याकडील कोणी मातबर माणूस दादासाहेबांकडे समजुतीस पाठवावे. म्हणजे आम्ही त्यांस निक्षून सांगोन तुमचे स्वाधीन होय असें करूं. याजवरून पाटील बावांनीं उत्तर केलें कीं, बिना दादासाहेब हातीं आल्याखेरीज तह घडावयाचा नाहीं हें स्पष्ट आहे. एविशीं मागती आपण इंद्रसेनाशीं बोलून दादासाहेब हस्तगत होय तें करावें. यावरून पाटीलबावा बोलले आहेत कीं, सरकारचा तहनामा आल्या उपरांतीक हें बोलणें इंद्रसेनाशीं बोलून जर दादासाहेब हातीं आले तर तहनामा देऊं, नाहीं तर देणार नाहीं.

१ जहाजांच्या 'अमदरफ्तींत सालाबाद स्त र' (?) इतकें अधिक असावें म्हणून आज्ञा. याचें उत्तर पाटीलबावांनीं केलें कीं, लिहून घेऊं.

१ सरकारचे किल्ले, कोट, शहरें इंग्रज सरकारांत देतात ते जकिरा रहावे म्हणून आज्ञा. त्याचें उत्तर पाटीलबावांनीं केलें कीं, जेथवर साधेल तेथवर करून घेऊं.

१ सरकारचा व इंग्रजांचा तह होईल त्याप्रमाणें चालावें असें मंबईवाल्यांचें पत्र शिक्यानशीं आणून द्यावें म्हणून आज्ञा. याचें उत्तर पाटलिबावांनीं केलें कीं. मंबईवाल्यांचें पत्र शिक्यानशी आणून द्यावयाविशीं इंद्रसेनास बोलून पत्र आणवूं.

५

सदरहू पांच कलमांचे जाबसाल इंद्रसेनापासून पक्के करून घेऊन याप्रमाणें कलकत्याचें लिहिलें कंपनीच्या मोहरेनिशीं आल्या उपरांतिक सरकारचा तह इंद्रसेनास देऊं. याप्रमाणें पाटील बवांचें बोलणें आहे. तहपत्र आल्यावर होईल वर्तमान तें लिहीन म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. त्यास सदर्हू पांच कलमापैकीं दोन कलमांचीं उत्तरे आलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिलीं आहेत. त्यांत दादासाहेब व हैदरखान यांचे कलमाचें उत्तर तपशिलवार लिहिलें आहे त्याप्रमाणें करावें. वरकड कलमें तुम्ही लिहिल्याप्रमाणें तहनाम्यांत लिहावीं. यां खेरीज राजश्री पाटीलबावांचे पत्रांत कलमें लिहिलीं आहेत, त्यांत तहनाम्यांत लिहावया जोगतीं कलमें.

१ गायकवाडांचीं कलमें तहनाम्यांत यथास्थित उगवलीं नाहींत. तीं इंग्रजांशीं बोलण्यांत अशीं यावीं कीं, गायकवाड याणीं पूर्ववत प्रमाणें सरकारांत चालावें. त्यांचा बंदोबस्त होणें तो सरकारांतून होईल. येविशीं इंग्रजांनीं त्यास आश्रा देऊं नये व मदत करूं नये, म्हणोन लिहिलें, त्यास गायकवाडांकडील कलम पूर्वी कलमबंदीचे यादीत लिहिलें आहे. हल्लीं आपण वर लिहिल्याअन्वयें लिहून घ्यावयाविशीं लिहिलें त्यास लिहिल्याप्रमाणें लिहून घ्यावयास येईल.

१ वरकड कलमें श्रीमंत कैलासवासी यांचे वेळेस तहनामे झाले व हपटेनचे तहात आलीं असतील त्याप्रमाणें दुतर्फा चालावें म्हणोन लिहिलें, त्यास याप्रमाणें तहनाम्यांत कलम लिहून घ्यावयास येईल.

२

दोन कलमें लिहिलीं हीं चांगलीं आहेत. तहनाम्यांत लिहून घ्यावीं. या खानगीचे कागदपत्रकें सुद्धां चांगलें मनन करून लिहिल्याप्रमाणें सांभाळून करावें. याहून जितकें साधेल तितकें करून घ्यावें. रा छ १५ मोहरम हे विनंती.

ले. ३८७ [२३४] (श. १७०४ मार्गशीर्ष व. २ ता ा २१।१२।१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं

विनंति उपरि. इंग्रजांचे तह प्रकरणीं राजश्री पाटीलबाबांचीं व तुमचीं पत्रें येत गेलीं. प्रथम रामजी पाटील यांजकडे तहनाम्याची याद आली. त्याजवर तहनाम्याची नकल फारशी हिंदवी आली. आलीकडे पाटीलबावांचीं व तुमचीं पत्रें छ २९ जिलकाद पावेतों आलीं. त्यांतील सविस्तर अर्थ कळला. त्यास रामजीपाटील यांजकडे याद आली व

पाटीलबावांचीं व तुमचीं पत्रें आलीं त्यांतील कलमा कलमाचा अर्थ पहातां एकास एक मिळत नाहीं. यास्तव इस्तकाबिलपासून पत्रें आलीं त्यांचीं पत्रकें धरून तुम्हास पाहण्यास पाठविलीं आहेत. त्यांत एकेका प्रकरणाखालीं रवानगीचा तपसील कलमावर लिहिला आहे तो पाहिल्या नंतर सविस्तर ध्यानांत येईल. त्यास ज्या रवानगीतील सरकार उपयोगी कलम असेल तें तहनाम्यांत आणावे. एकदां एक प्रकारचें एकदां दुसरे प्रकारचें, त्यांतही कित्येक कलमें पाटीलबावांचे पत्रांत चांगलीं, तुमचे पत्रांत चांगली नाहींत; कित्येक तुमचे पत्रांत बरीं असे प्रकार आहेत. तहनाम्यासही हिंदवींत व पारशींत बारीक तफावत कोठें मोठीही आहे. हें सविस्तर तुम्हास समजावें याकरितां लिहिलें आहे. सरकार उपयोगी तें करावें. तह प्रकरणीं बहुत पत्रें आज तागायत कलमा कलमाचे अर्थ लिहून तपसीलवार पाठविलीं, त्यांतील उपयोगी जाबसाल राजश्री पाटीलबावांशीं व भाईशीं चांगले रीतीनें बोलावे. नाहीं तर पुढें हें आम्हांस कळलें नव्हतें अथवा आम्हीं असें सांगितलें होतें असें पुढें म्हणतील. मग यांत होतें तें त्यांत गेलें असें होईल. याकरितां लिहिलें आहे. रा छ १५ मोहरम हे विनंति.

ले. ३८८
[२४३]

श. १७०४ मार्गशीर्ष व. २
ता। २१-१२-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं

विनंती उपरि राजश्री पाटील बावांकडून पारशी कलमबंदीची याद आली, त्याप्रमाणें त्यांच्या लिहिल्यावरून पारशी तहनामा शिक्यानशी पाठविला आहे. हा इंद्रसेनास दाखविल्यावर मागाहून कलमें ठरावांत आलीं त्याप्रमाणें तहनामा कलकत्याहून येणें, यास दिवसगत लागेल, याकरितां राजश्री पाटीलबावांनीं श्रीमंतांचे लग्नास जरूर यावें, समागमें इंद्रसेनासही घेऊस यावें. म्हणजे पाटीलबावांनीं इंग्रजांचा वकील श्रीमंतांजवळ आणून तह केला असें लौकिकांत चांगलें दिसेल; तों पावेतो त्यांचा तहनामाही येईल; व श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वाधीन होण्याचेंही समजेल. अवघ्या गोष्टींस चांगलें. +श्रीमंतांचे लग्नाचे मुहूर्ताचा निश्चय माघ शुद्ध नवमीचा जाहला आहे. लग्नचिठ्याही मागाहून येतील. रामजी पाटील व सदाशिवपंत येथें असतां पाटीलबावांचे चित्तांत देशीं येऊन देवदर्शन श्रीमंतांचें दर्शन घ्यावें असें आहे म्हणोन पुसत होते. त्यास इंग्रेजांचा तह ठरला, तर आतां श्रीमंतांचे लग्नाचे समारंभास आल्यानें फार चांगलें आहे. रा छ १५ मोहरम हे विनंति.

+ येथपासून खुद्द नानाचे अक्षर.

ले. ३८९]
[२९२]

श. १७०४ मार्गशीर्ष व.२
ता. २१-१२-१७८२

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि.तहनाम्यांत हैदरखानाचें कलम लिहिलें आहे त्यास हैदरखानास त्या प्रमाणें मान्य झालें तर उत्तमच झालें.कदाचित् हैदरखान म्हणूं लागेल कीं,सरकारची आमची दोस्ती झाली आहे त्याप्रमाणें काईम असावी,इंग्रज आम्ही समजून घेऊं.तर हैदरखानास वचन प्रमाण दिलें असतां खान असें बोलूं लागले तर इतका स्नेहाचा लौकिक झाला तो टाकून इंग्रज व आपण मिळोन खानावर मसलत करावी, यांत लौकिक बाईट होतो व सरकारची पत रहात नाहीं. याकरितां इंग्रजांशीं करारांत यावें कीं, तुमचा आमचा तह झाल्यावर तुमचा व महंमदखान अल्लीचा मुलूख हैदरखानानें घेतला असेल तो सोडून द्यावयाविषयीं खानास आम्ही सांगूं. ऐकिलें [तर] उत्तम आहेच. न ऐकिलें तर आम्हांस सोईस पडल्यास करारांत आलें आहे त्याप्रमाणें तुम्ही आम्ही मिळोन खानावर मसलत करूं व आम्हांस दुसरे मसलतीचें काम पडल्यास व हैदरखानांनीं आम्हांशीं सलूक ठेविल्यास, तुम्ही [व] खानानीं परस्पर समजून घ्यावें. परंतु शर्त हे कीं, पुढें मागें खानांनीं सरकाराशीं विरुद्ध केल्यास तुम्ही आम्ही मिळोन खानाचें पारपत्य करावें. त्याप्रमाणें कलम जरूर लिहून घ्यावें. नाहीं तर सरकारास हैदरखान सामील होऊन जितकी मसलत केली, परस्पर आगत स्वागत स्नेहभाव चालले, नबाब, भोंसले वगैरे सर्व ठिकाणीं हैदरखानाशीं वचन प्रमाण मजबूत याचा लौकीक जाला असतां, लागलेंच इंग्रजांस मिळवून घेऊन खानावर चालून गेले, तेव्हां मराठ्यांचा इतबार नाहीं.* वांकडी चाल दृष्टीस पडे तोंपर्यंत त्यावर मसलत करणें चांगलें नव्हे. यास्तव उगवून लिहिलें आहे. हें राजश्री पाटीलबावांशीं बोलुन इंद्रसेनाशीं बोलण्यांत खचीत आणून निराळा करार करून घ्यावा. ×हैदरखानाचा मुद्दा कांहीं तरी इंग्रजांपासून आम्ही करून घ्यावा हें खानाशीं वचन प्रमाण जहालें त्याप्रमाणें त्यानें मसलतही केली,त्यास योग्य तें नाहीं, आणि खान म्हणों लागला कीं बरें तुम्ही तह करावयाचा नवता तो केला, असो,तुमचे सरकारचीं आमची दोस्ती आहे त्याप्रमाणें असावी, इंग्रज मी समजून घेईन. असें बोलत असतां त्याजवर मसलत करणें हें ठीक दिसणार नाहीं. जर त्यानें सरकारशीं विरुद्ध केलें तर सरकार इंग्रेज मिळून मसलत करावयाचें कलम ठरविलें तें बरेंच आहे. सरकारांत विरुद्ध न केल्यास तुम्ही त्यांणीं समजोन घ्यावें असें असावें.कदाचित् इंद्रसेन म्हणेल कीं, परभारें समजून घेऊं, मग तह इंग्रेजाचा व हैदरखानाचाच होणें तेव्हां परभारें होईल. तर याचें उत्तर बोलावें कीं, जेव्हां तह करणें तेव्हां सरकारचे विद्यमानाखेरीज करूं नये. याचें कारण तुमची आमची दोस्ती हैदरखाना खेरीज झाली, या करतां याप्रमाणें बोलून करारांत आणावें. रोज छ १५ मोहरम हे विनंती.

---

* या पुढील १ ओळ फाटली आहे × येथून अक्षर नानांचे हातचें आहे.

ले. ३९०
[१८८]

श. १७०४ मार्गशीर्ष व. ९
ता॥ २८-१२-१७८२

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. पांडुरंग रघुनाथ यानीं लिहिलें कीं, रामजी पाटील यांजकडे याद तहाची गेली होती. त्याचीं उत्तरें कलमवार व मागाहून निदानपक्षाची याद कलमवार आली. त्याच्या पुरवण्या सविस्तर राजश्री पाटील बावांस दाखविल्यावर रात्रौ पाटील बावांचें व भाईंचें बोलणें जालें कीं, कलमबंदीच्या यादीचीं उत्तरें आलीं तीं ऐकिलीं. त्यांत उघडें नाहीं. लिहावें तर विषाद येईल. या करितां तपशील लावून लिहिलें आहे. परंतु तह करावयाचें त्यांचे विचारास येत नाहींसें दिसते. त्यावरून भाईनीं उत्तर केलें कीं रामजी पाटील व दाजी यांची रवानगी करितों. असें लिहिलें आहे. त्याबराबर एखादी तोड सांगून पाठविली. (फाटलें)सांगितलें. दुसरे दिवशीं पाटील बाबा म्हणूं लागले कीं, हल्लीं निदानपक्षाची याद आली, त्यांत हैदरखानास पंचवीस लक्षांचा मुलूख महमद अल्लीच्या मुलखापैकीं द्यावा व सरकारचीं कलमें लिहिलीं आहेत त्याप्रमाणें तह खानासुद्धां करावा. त्यास हैदरखानाचा मुलूख देऊन इंग्रज तह करीतच नाहींत. हैदरखानानीं मुलूख घेतला तो सोडून द्यावा, म्हणजे इंग्रज त्याशीं बोलणार नाहींत, हे पर्याय सविस्तर पूर्वी लिहून गेलेच आहेत. या उपरि *दाजी व रामजी पाटील येणार तेही पत्राच्याच अन्वयें बोलूं लागल्यास इंद्रसेन राहणार नाहीं. तह करणें असल्यास पूर्वी कलमबंदीची याद येथून पाठविली आहे त्याप्रमाणें तहनामा शिक्यानशीं लिहून व दुसरे डौल शिक्यानशीं सत्वर पाठवावे, म्हणजे शिक्याचा तहनामा इंद्रसेनास दाखऊन त्याचें समाधान करूं. हल्लीं निदानपक्षाची याद आली, या पैकीं जे जावसाल घडावयाचे आहेत ते तुम्हाशीं बोलतों, त्या अन्वयें लिहून पत्रें रवाना करणें. त्याप्रमाणें होऊन आल्यास इंद्रसेनाशीं पक्कें करून घेऊन डौलाचे कागदावर तहनामा करून द्यावयास येईल. परंतु येथून कलमबंदी याद पाठविली आहे त्याप्रमाणें शिक्यानशीं तहनामा आल्याखेरीज इंद्रसेनास भरंवसा पुरत नाहीं. कदाचित् मनांत संदेह येईल कीं, कलमबंदीच्या यादीवर शिक्का कसा करून पाठवावा ? तर चिंता नाहीं. तो तहनामा येथेंच राहील. त्यावरून निदानपक्षाच्या यादीचीं उत्तरें पाटीलबावांकडील निदान पक्षाची जालीं त्याप्रमाणें त्यांचींच पत्रें श्रीमंतांस घेऊन पाठविलीं आहेत. त्यावरून सविस्तर अर्थ ध्यानास येईल, म्हणोन लिहिलें, त्यास तहाचे अर्थ सविस्तर ध्यानांत यावे, व चोंहींकडील भाव समजावे, व तह करण्याची तोडही पडावी, हे अर्थ लिहिण्यांत किती येतील ? या करितांच उभयतांची रवानगी केली आहे. ते येऊन पावलेच असतील. त्यांच्या बोलण्यावरून सविस्तर कळेल. राजश्री पाटीलबावांचीं पत्रें पावलीं. त्यांचे जाब लिहून पाठविले आहेत. निदानपक्ष येथून लिहिला होता त्या पैकीं कलमें करून घडावयाचीं तीं पाटील बावांनीं आपल्या पत्रीं लिहिलीं आहेत तीं कळलीं. त्याचीं उत्तरें पाठविलीं आहेत त्यावरून तुमच्या ध्यानांस येतील. पूर्वी पाटीलबावांचीं पत्रें आलीं त्यांत

* सदाशिव दिनकर

श्रीमंत राजश्री दादा साहेबांस इंग्रजानीं ठेवूं नये, आम्हांकडे द्यावें, असें आहे म्हणोन लिहिलें होतें. हल्लीं कलमबंदीचें पत्र आलें त्यांत सरकारचे किल्ले ठाणीं व मुलूख सोडावा उपरांतीक दादासाहेबांस हवालीं करावें, असें करारांत पक्कें आहे. त्याप्रमाणें इंग्रजांनीं सरकारचा मुलूख सोडल्यावर दादासाहेबांस कशास ठेवतील म्हणोन लिहिलें आहे; व तुम्हीं, कलमें व्हावयाचीं लिहिलीं त्यांत इंद्रसेनाचें बोलणें कीं, दादा साहेबांस तुमचे स्वाधीन करावें यांत लौकिक आमचा चांगला दिसत नाहीं. त्यास तुमचा आमचा तह जाल्यावर, तुम्ही मातबर माणूस दादा साहेबांकडे समजुतीस पाठवावा, आम्हीहीं त्यांस सांगून तुमच्या हस्तगत होयसें करूं. पाटीलबाबाही म्हणाले कीं, पक्केपणें हा ठराव करून घेऊं तेव्हां तहनामा देऊं. न झाल्यास देणार नाहीं. त्यास विना दादासाहेब कुटुंब सुद्धां स्वाधीन करून घेतल्याखेरीज तह करणें ठीक नाहीं, व तहनामाही देऊं नये. रा॥ छ. १२ मोहरम हे विनंती.

ले. ३९१ श. १७०४ मार्गशीर्ष व १२
[२१४] ता॥ ३१-१२-१७८२

श्री.

राजश्री पाटिलबावा गोसावी यांसि.

आर्शीर्वाद विनंती उपरि. आपण छ ७ शवाल व छ २४ व २७ जिलकाद तीन रवानग्यांचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. पूर्वी कलमबंदीचे यादीचीं उत्तरें रा० नारो शिवदेव यांजकडे आपण पाठविलीं व रामजी जाधव यांनीं लिहिलीं तीं पत्रें पावल्यावर हल्लीं आपणाकडून निदानपक्षाची याद कलमवार आली. सर्वांस कलमें लिहिलीं त्यां पैकीं कलमें अधिक उणीं काय पडतात, त्याचें बोलणें नारो शिवदेव येथें आले त्यांसि बोलून कलमवार पत्रें लिहिलीं आहेत, व मशारनिल्हेहीं लिहिलें त्यावरून सविस्तर कळेल. आपल्याकडून दोन रवानग्यांचीं पत्रें आलीं, त्यांत तह कर्तव्य किंवा न कर्तव्य या दोहींतून कोणताही स्पष्ट अर्थ दृष्टीस पडत नाहीं. येथें तर इंद्रसेन निरोपाची उतावळी करितो. त्यास येथें येऊन आठ नऊ महिने होत आले. तह प्रकरणीं बोलणीं होऊन चार महिने झाले याकरितां कलकत्त्याहून हेस्टन यानें इंद्रसेनास लिहिलें आहे, तहाचा जाबसाल होत नसला तर उठोन येणें. त्यास एक महिन्यांत तहनामा पुण्याहून आणवितों असें म्हणोन करार केला आहे. त्यास पेशजी तहनाम्याची पारसी कलमबंदीची याद पाठविली आहे. त्याप्रमाणें तहनामा सरकारचा लिहून त्याजवर शिक्का करून पाठवावा. व दुसरे कोरे डौलावर +शिक्का करून पाठवावें म्हणजे इंद्रसेनास दाखवून हल्लीं आपण निदानपक्षाची याद लिहून पाठविली आहे, त्याप्रमाणें कलमें करारांत आणून कागदावर लिहून द्यावयास येईल, व त्या अन्वयें त्याजपासूनही कंपिनीचे मोहोरेनशीं लिहून घेऊं. इंद्रसेन जावयाची जलदी करितो त्यास शिक्यानिशीं तह-

---

+ सही शिक्का केलेला कोरा कागद. यावर तहनामा ठरेल त्याप्रमाणें ठरल्यावर लिहावयाच्या.

नाम्याची याद येईल ती दाखवून मग हल्लींचे यादीप्रमाणें जाबसाल बोलावयास चार दिवस अधिक आगळे लागले तर चिंता नाहीं. निरोपाची जलदी करितो तें करणार नाहीं. याद शिक्याची न आलियास त्यास तह होईल असा भरंवसा पुरत नाहीं. याकरितां पेशजी कलमबंदी याद पारसी पाठविली आहे, त्याप्रमाणेंच लिहून वर शिक्का करून, व दुसरे डौल शिवयानिशीं, याप्रमाणें दोन पाठवून द्यावीं. म्हणजे हल्लीं कलमें लिहिल्याअन्वयें इंग्रजांचे आपले जाबसाल परस्पर सुधरून डौलाचे यादीवर लिहून त्यां पासून लिहून घेऊन मग त्यांस द्यावयासि येईल. कलमबंदीची याद शिक्यानिशीं येईल ते आह्मांजवळ राहील, म्हणोन विस्तरें लिहिलें तें कळलें. राजश्री **नारो शिवदेव** यांणींहि सविस्तर पत्रें पाठविलीं, त्यावरून सर्वार्थ समजले. त्यास आपले लिहिल्यावरून पेशजी आपणांकडून पारसी याद कलमवार आली त्याप्रमाणें सरकारचा तहनामा शिक्यानिशीं करून पाठविला आहे, व डौलही शिक्यानिशीं पाठविले आहेत. परंतु बशर्ते श्रीमंत राजश्री **दादासाहेब** कुटुंबासुद्धां इंग्रजांनीं स्वाधीन करावे; व वरकड कलमें येथून निदानपक्षाची याद पाठविली होती त्यांपैकीं कलमें इंग्रजांशीं बोलण्यांत येऊन, हल्लीं लिहून पाठविलीं व याहून जेथवर साधतील तीं साधून घेऊन, डौलावर कलमबंदी लिहून अगोदर त्यांजपासून कलम त्यांचे कंपिनीचे मोहोरेनिशीं व तेथील कोसलदार यांच्या दस्वतइनिशीं तहनामा त्यांचा घेऊन उत्तम पक्ष इंद्रसेनानें येथें येऊन द्यावा, नाहीं त्या पक्षीं आपणही तेथें द्यावा. इंग्रजाचे तहाचें काम लहान नाहीं, बहुत जपून सांभाळून करावें. सविस्तर **नारो शिवदेव** यांस लिहिलें आहे, त्याजवरून कळेल. हैदरखानाचे मजकूर सविस्तर नारोपंतास लिहिलें आहे, त्याप्रमाणें इंग्रजाशीं बोलून पक्कें करारांत आणावें. रा छ. १५ मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती. पो छ. ९ सफर मुा बिलहेटी नजीक गोहद.

ले. ३९२ }
[४६२] }

{श. मार्गशीर्ष शु. ३ श. १७०४
{ता. ७-१२-१७८२

श्री

दरीविला नबाब हैदर अल्लीखां बहादूर व्यहरतनसीब जाले, हें ऐकून दिलास बहुत गमगीनी व रूपगी जाली त्याचा बयान कलमी होऊं सकत नाहीं. लेकिन खाहेश इलाही इलाज काय ? अलम दुनयास हेच राहा व रस्म. दरपेश येह लाजम के आं शाहामतपन्हा या मरातबावर नजर देऊन सबर व विवेक करावा, व नबाब मरहुमाप्रमाणें दौल्तीचा बंदोबस्त व हुषयारी राखून इकडील येकसु व एकदिलीचा तरीक साविक होता त्या बमोजीव अमलांत यावा. आज राहा येगानगत यांत मातंपूरसीचा खिल्त आं शाहामतपन्हास पाठविला आहे. बतपशील आलाहिदा फर्द पाठविला आहे. बाजे मरातब **गोविंद नारायण** व **गणेश केशव** दि॥ **आनंदराव भिकाजी रास्ते** यांत इरशाद जाले हे बयान करतील, व सदाकत दस्तगाह नरसिंगराव तमाजी लिहितील, त्यावरून वाजेह होईल. हमेशा खत किताबत पाठवून खुषी जादा करीत जावी. (हैदर मृत्यु पावला ता. ७ १२ १७८२. त्यानंतरचें पत्र.)

ले. ३९३ [४५२]

पौष शु. ६ श. १७०४ ता. ८-१-१७८३

श्री.

श्रीयासह चिरंजीव राजश्री *माधराव प्रधान यांसि प्रती गोपिकाबाई मुक्काम नाशिक आशीर्वाद उपरि येथील कुशल तागायत छ ४ माहे सफर जाणून स्वकीन कुशल वर्तमान यथास्थित असे विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें.

" मी लहान, वडीलीं सर्व-त्याग करून श्रीक्षेत्रीं वास केला आहे, त्यास सर्व माहित बडिलांस, यास्तव कोणे रीतीनें चालावें हें सर्व ल्याहावयास आज्ञा व्हावी , " म्हणोन लिहिलें. त्यास सूर्य ग्रहण संधि अन्वयें कृष्ण पक्ष होऊन लोप जाहला होता, तो हल्लीं पुण्योदयें करून दुष्टांचा संहार व सुष्टांचे पालग्रहणार्थ तुम्ही या कुळांत जन्म घेऊन पुरंदर येथें उदयास आलां; त्यापक्षीं इकडून लिहावयाचें कारण दिसत नाहीं.परंतु मानवी देह आणि तुम्हीं लिहिलें, त्यापेक्षां तूर्त चालावयाचें जें सुचलें तें लिहिलें आहे. तपसील कलम बंदीः-

१ प्रातःकालचे घटका रात्रौ उठोन दिशस जाऊन पादप्रक्षालन मुखप्रक्षालन करून दिवाणखान्यांतील श्रीमृत्तिका गणपतीचें दर्शन घेऊन प्रातःस्मरणाचे श्लोक म्हणावे. नंतर सूर्योदयाबरोबर वैद्यांनीं येऊन हात पहावा. प्रकृतिअन्वयें औषध घ्यावें. नंतर लिहावयास बसावें. कित्यांत हात फिरवून मग ज्या कागदावर निशाणें +व्हावयाचीं असतील ते लिखितान्वयेंच वाचावें. ते समयीं जवळ गुरुजी व आणखी एक दोघे संभावित योग्य असतील ते. असावे. जास्त असो नये. येणेंप्रमाणें घटिका तीन. येकूण घटिका. कलम १

१. तालिमखान्यांत जाऊन दंड काढावे. दिवसेंदिवस शक्ति अन्वयें चढते दंड असावे. बरोबर समवयी मुलें पांच चार संभावितांचीं असावीं. व जेठी एक दोघे व नेहमीं विश्वासुख गृहस्थ बरोबर असावयाचे तें असावें खिसमतगार कार्याकारण असावे. जेठी यांनीं कुस्तीचे डाव शिकवावे. नंतर समवयी मुलांसुद्धां प्रकृतीस जो खुराक मानेल तो नेमेंकरून घेत जावा. येणेंप्रमाणें घटिका दीड. येकूण घटी साडेचार. कलम २.

२. स्नान करावयाचे समयीं पंचांग जोशी वाचून संकल्प सांगावा. नंतर गंगाष्टक म्हणावें. संध्या थोडकी, परंतु न बोलतां करावी. तर्पण करावें, उपाध्ये यांणीं पूजा करावी. ते समयीं पुराण देवघरांत व बाहेर गायन होत असावें. आपण तुलशी फुलें माळा वहावीं. नंतर नित्यदानें देऊन क्षणभर बसावें. ते समयीं शास्त्री व वैदिक महान् शिष्ट आल्यास नमस्कार करून योग्यतेनुरूप उत्थापन देऊन कांहीं भाषण करावें. नंतर उपहार करावयास जावें. येणेंप्रमाणें घटी साडेतीन येकूण घटी आठ. कलम ३.

१. कचेरीस यावें ते समयीं सर्वांस देऊन योग्यतेनुरूप नेत्रलाभ व भाषण होत असावें. कचेरींत लघु शब्द बोलूं नये व गैर नि ही [?] बोलूं नये. मनुष्यपरीक्षा असावी. गैरवाखा एखाद्यानें समजाविलेस पक्केपणीं विचार करून अपराध ठरल्यास दुसऱ्याकडून त्यास निषिद्ध

+ निशाणें=शेवटील अक्षरें. " आज्ञा प्रमाण. " हीं अक्षरें सही ऐवजीं घालीत. लिखितान्वयें म्ह० लिखितें समजून. ' एक पंथ दोकाज ' ह्या न्यायानें.

करवावें. आपण नेत्र-कटाक्ष करून पहावें. अपराधानुरूप पारपत्य करावें, परंतु संभावित गृहस्थ बहुत दिवस पदरींचा प्रामाणिक अशानें रदबदली केली असतां क्षमा करावी. दुसऱ्याचें क्षुद्र काढूं नये येणें करून त्याचा अपमान होतो, आणि तो त्याचे मनांत दंश राहतो, साधल्यानुरूप नाश करील. आणि आपल्यास लघुपणा येईल. संन्निधानीं लोभांत लघुमनुष्य राखल्यास जें केलें त्यास ते रुकार देतात, परंतु जन लोक वाईट म्हणतात, थोरपणास हानि होती. येणेंप्रमाणें घटी तीन. येकूण घटी अकरा. कलम ४०

१. भोजनाचे पूर्वी सोंवळें जाहले नंतर थोरल्या देवघरांत जाऊन, फुलें घालून, नमस्कार करून, ब्राह्मणांस उदक सोडून, भोजनास बसावें. ते समयीं भाषण करणें ते राजनुयज्ञांतील ब्राह्मणभोजन प्रकरणीं वगैरे योग्य सर्वांस दिसेल तें बोलावें. पाक करणार व शिष्य मंडळी सुशिक्षित विश्वासुक असतील ते बाळगावे. घटी २. येणेंप्रमाणें घटी १३.

कलम ५

१. भोजनोत्तर आचमन करून शतपदी करून तांबूल घ्यावा. नंतर दोन घटिका राजविलास खेळ खेळावे. एकादे दिवशीं निद्रा आल्यास घटी अर्ध घटिकानिजावें, येणेंप्रमाणें घटी २ येकूण घटी पंधरा. कलम ६

१. शास्त्री यांजवळ विराटपर्वापासून भारतांतील चिंतनिका करीत असावी; व वृद्ध मनुष्यें पदरचीं बहुत दिवशीं व अन्यत्र शहाणे असतील त्यांशीं दिल्लीप्रकरणीं व महाराजप्रकरणीं गोष्टी कशा जाहल्या त्या ऐकण्यांत असाव्या. आपले वडिलांच्या गोष्टी कारभारी यांसि एकांत स्थळीं विचारीत असावें; व तसबिरा व नकाशे अनेक पहात असावे. ते समयीं शाहाणे बुद्धिमान् असतील ते जवळ असावे. येणेंप्रमाणें घटिका चार. एकूण घटिका. १९.

कलम ७.

१. खर्डे लिहावयास बसावें. ते समयीं एक दोन मुलें संभावित गृहस्थांचीं बुद्धिमान् पहावयास असावीं. करदन बस्तन गुणाकार भागाकार करावयाचा सराव बहुत असावा. गुरुजी यांणीं विद्याभ्यासाकारितां बोलणें प्राप्त आहे. परंतु लिहावयाचे जागींच बोलावें. तेथें विशेष कोणी असों नये. घटी चार. एकूण घटिका तेवीस. कलम ८.

१. लिहिणें जाहलेनंतर कांहीं उपहार थोडासा मर्जी असल्यास मुलासमवेत घेऊन करावा. नंतर तांबूल घ्यावा. घटी एक. एकूण घटिका चोवीस. कलम ९.

१. घोडीं फेरावयास चार रोजांनीं जात जावें. ते समयीं बरोबर पटवर्धन मंडळी व अन्यत्र सरदार असावे. त्यांशीं भाषण करणें तें संतोषवृत्तीनें करावें. परंतु अत्यंत लोभही नसावा व विरुद्धही न दाखवावें. कांहीं अंतर जाहल्यास क्षमा होणार नाहीं असें भय असावें. योग्यता बघून त्याशीं भाषण संतोषेंकरून करावें. आठां दिवशीं बाग पाहावयास गेल्यास जिन्नस तेथें फुलें व फळें जीं आणून पुढें ठेवितील तीं योग्यायोग्य बघून त्यांस देववावीं व आपण द्यावयाचीं असतील त्यांस आपण देऊन मग यावें. ज्या दिवशा स्वारी जावयाची नाहीं त्या दिवशीं कागदपत्र दवलतप्रकरणीं असतील ते कारभारी यांणीं समजावीत असावें.

ते समयीं कोणी असों नये. व गंगाभगीरथी ताई साठी यांची भेटी चार रोजीं एक वेळ घेत असावी. त्यांसच वाड्यांत यावयाचा बेत ह्मावा. नंतर त्यांस बहुत संतोषेंकरून बोलावें व मूलपणानें बोलण्याचा डौल दाखवावा. वाड्यांतच आज रहावें असा आग्रह करून ठेवून घेत जावी. दिवाण यांणीं राजकारणाचें वर्तमान व पुढील योजना करावयाचा विचार करून विनंती करीत असावी. त्या समयीं अन्यत्र कोणी असों नये. व त्यांतील अभिप्राय दुसऱ्यापाशीं निघों नये. म्हणजे मसलती असाध्य होत नाहीं. बातमी हरतऱ्हेची राखावी म्हणजे मसलतीस बल बहुत आहे. पदरच्या मनुष्यांचें चालवावयाचें त्यास जिकीर करूं नये. एकूण घटी चार. एकूण घटिका अठ्ठावीस. कलम १०

१. तिरंदाजी करावयास जावें-तेथें बरोबर सरदार व पागे व मानकरी बराबर असल्यास तीर कोण कसे मारताहेंत ध्यानांत असावें. व हरएक खेळ पहावयाचे ते सवत्र समवेत पहावे. येणें प्रमाणें घटिका दोन. एकूण घटीका ३० कलम ११.

१. दीपदर्शन जाहल्यानंतर संध्येस वस्त्रांतर करून बसावें. संध्या जाहलेनंतर स्तोत्रपाठ म्हणावा. नंतर पुरुषसूक्त अथवा पवमानांतील अध्याय म्हणावे. ते समयीं आश्रितांनीं जवळ असावें. नंतर भोजनास जावें. भोजन होऊन उठेपर्यंत घटी चार. कलम १२.

१. भोजनोत्तर तांबूल खावयास दिवाणखान्यांत क्षणभर बसून तांबूल घ्यावें. नंतर कार्याकारण मंडळी जवळ असावी. ते समयीं बातमीदार यांणीं वर्तमान गुप्त सांगत असावें. व हरएक बातमीचीं पत्रें आलेलीं पहावयाजोगीं असतील तीं पहावीं. बाकीचीं पत्रें विश्वासूक मनुष्य कोण असेल त्याजकडे काम योजावें, त्यांणीं सांगावें. व त्यावर ही बातमी प्रमाण अथवा अप्रमाण सांगतात याची चौकशी असावी. नंतर निद्रेस जावें. येणेप्रमाणें घटी तीन. एकूण घटिका सात. कलम १३

एकूण कलमें तेरा लिहिलीं आहेत, तीं ध्यानीं आणोन चालल्यास उपयोगीं पडतील. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

ले. ३९४ [२७०] पौष व.३ शके १७८४ ता. २१-१-१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. इपटनानें पुरंदरास येऊन सरकारशीं तह केला त्यास आम्ही उणें काय केलें, असें राजश्री पाटीलबावा बोलले म्हणोन लिहिलें, त्यास हल्लीं पाटीलबावांचे विद्यामानें इंद्रसेन बोलत आहे, त्याची कलमबंदीची याद आली त्यास व इपटनचे तहाचे कलमबंदीस कमी काय याचा तपशील पेशजी विस्तरें करून लिहून पाठविला आहे, त्यावरून कळलेंच असेल, व हल्लींही लिहिलें आहे. कलम

१ महमद अलीखानाचे मुलकाची सरकारची चौथ तहनाम्यांत लिहून घ्यावी म्हणोन लिहिलें होतें तें घडत नाहीं.

१ साष्टीचा वारसा ठेविला होता तो तुटला.
१ चंदावरचें राज्य भोंसल्याचें म्हणजे स्वराज्य. तें पूर्ववत् प्रमाणें त्यांचें त्यांजकडे असावें तें घडत नाहीं. +
१ गायकवाडाकडील मार्गील ऐवज बुडाला.
१ अंतरवेदचें कलम.
१ दुसरे टोपीकराशीं स्नेह न करणें.

६

याप्रमाणें इपटनाचे तहास व हल्लीचे तहास कमी स्थूलमानें लिहिलें आहे. किरकोळ सुद्धां पूर्वी लिहिण्यांत आलेंच आहे. हें बहुत वेळ लिहिलें गेलेंच आहे त्यावरून ध्यानांत आलेंच असेल, रा॥ छ. १५ मोहरम हे विनंती.

ले ३९५ [२८४] | पौष व.३ श. १७८४ ता २१-१-१७८३

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. फरासिसांचे पातशाहाकडून मुसा मुंतिण वकील आला त्याचें बोलणें जालें हा मजकूर पूर्वी लिहिलाच आहे. त्यास वकिलाच्या बोलण्यांत चोवीसावे जिलकादापासून दोहों महिन्यांनीं सहा हजार फरासिसांचा जमाव फुलवरीस येईल, हैदरखानास सामील होऊन चेनापट्टणाकडील इंग्रजाचें पारपत्य करून मुंबईवर येतों असें बोलणें होतें. त्यास पावणे तीन महिने होत आले. हैदरखानाकडीलही पत्रें आलीं. त्यांत फरासिसाकडील जाहजें नजीक आलीं, लौकरच येऊन पोचतील, असें लिहिलें होतें. इतक्यांत लौकर आले तर सर्वांवर दबाब व मोठेंच काम आहे. प्रस्तुत मुंबईस तीन जहाजें इंग्रजांचीं लढवाई मातबर, वरतें दोन हजार माणूस विलायती अशीं मुंबईस येऊन दाखल जाहलीं. इंग्रजांच्या वकिलांच्या बोलण्यांत फरांसीस आम्ही येऊनच देणार नाहीं. फरासिसांचे वकिलाचे बोलण्यांत आम्हांपुढें इंग्रजांचा सरंजाम टिकूं पावणार नाहीं, अशीं बोलणीं आहेत. अनभवास येण्याचे दिवसही थोडे राहिले आहेत. रा॥ छ १७ सफर हे विनंती.

ले. ३९६ [२९५] | पौष व. ३ श. १७८४ ता॥ २१--१--१७८३

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. इकडील कचीं पक्कीं वर्तमानें आढळतात तीं सेवेशीं लिहितों त्यासु,

---

+ ह्यावरून चंदावरचें राज्य परत मिळविण्याचा उद्योग होता हें स्पष्ट दिसतें.

तेथें रामजी पाटील आहेत त्यांस येविशींचें कळूं नये हें पूर्वी लिहिलें होतें व आतां मागती लिहावयाचें कारण विस्तारें पांडुरंग रघुनाथ यांणीं लिहिलें तें कळलें. त्यास पूर्वी लिहिलेल्यापासून कागद तो दाखवितच नाहीं, व मजकूरही विशेष बोलत नाहीं. मसलतीवर कायम असावें, पुढें मसलत करावी, येविशीं राजश्री पाटीलबावांस थोरपण देऊनच बोलत असतों. आलीकडे इंग्रजाशीं दारमदार जहाला, फौज निरोप मागणार, गोसाव्यांची तारीख बंद करणार हें लिहिलें आहे, तेव्हां मसलत अगदींच नासणार असें जाणोन हा मजकूर रामजी पाटील यांशीं बोलण्यांत आला खरा, कीं रामजी पाटीलांनींही लिहावें कीं मसलत करावी, जमाव फुटूं देऊं नये, असें समजोन बोललों. पांडुरंगपंत येथें लिहितात असें रामजी पाटील लिहितील हें समजलें नव्हतें. या उपरि ये गोष्टीचा बंदोबस्त होईल. पांडुरंग रघुनाथ यांणीं कच पक्कें लिहित जावें. रा छ १७ सफर हे विनंती.

ले. ३९७) (माघ शु. ९ श. १७८४
[३३१] (ता। १०-२-१७८३

॥ श्री ॥

नेमणूक † लग्न श्रीमंत राजश्री राबसाहेब सुरूसन सल्लास समानीन मया व अलफ. कामें नेमून सांगितलींः—

[१.] अक्षतेस सोईरे व गृहस्थ व वैदिक व पंडित व मातबर सरकारकून व सरदार व शिलेदार व संस्थानिक वगैरे सर्वांस अक्षत समारंभानें फिरोन करावी. देखील वाणी उदमी सर्वांस द्यावी.

१. गृहस्थ मातबर समारंभानें फिरावयास कसबा देखील जुनाकोट, सोमवार, मंगळवार, पेठेंत अक्षत करावयासिः—

१ नीळकंठराव गोविंद. १. महिपतराव साठे.

२.

१. आदितवार व वेताळ पेंठ व भवानी पेंठ व गंज पेंठः—

१. पांडुरंगराव बाबूराव. १. गणपतराव कोलटकर.

२.

१. बुधवार व शुक्रवार व नारायण पेंठ व सदाशिव पेंठ—रास्ते.

---

† ही नेमणूक--यादी आम्हास रा० रा० काशिनाथ कृष्ण लेले हल्लीं वस्ती इंदूर याजकडून मिळाली. हिचे बंद किती तें सांगतां येत नाहीं. ही त्रुटित आहे. उपलब्ध बंद आहेत ते १--२२ पर्यंत बहुतेक शाबूत आहेत. २३ वा बंद गाहाळ झाला आहे. २० व्या बंदांत मजकूर पुरा झालेला नाहीं, याजवरून आणखीं कांहीं बंद असावेत असें होतें. या प्रकरणाची दुसरी प्रत कोणास मिळल्यास ती आम्हाकडे पाठवावी, तिचा फार उपयोग होईल.

१. शनवार पेठ व मेहुणपुरा व हशमपुराः—

१. अमृतराव. १. बाळाजीनाईक भिडे.

२.

१. फौजेचे अक्षतेसः—

१ आपा. १ बाजीपंत.

२

१ पर दरबारचे गृहस्थांसः—

१ माधवराव सदाशिव. १ बळवंतराव जिवाजी.

१ मातबर सर कारकून. १ पंतसचिव. १ पंतप्रतिनिधी. १ मंत्री.

१ अमात्यपंत.

अक्षतेसः—

१ बाळाजी जनार्दन १. * * *

१. सोइऱ्याकडे नित्याची अक्षतंः—

१ हरीपंत. १ पानशी.

२.

वाजंत्री, कर्णेकरी, व तासेमर्फेवाले, व गाडदी, चोपदार, भालदार, व ढालाईत व ईटेकरी खासबारदार वगैरे शागिर्दपेशा हत्ती, घोडी, राऊत वगैरे सरंजाम. उपाध्ये अक्षतेचे वाटयांसहित.

[२.] समेत मातबर गृहस्थ व सरदार व शिलेदार वगैरे येतील त्यांचा आदरमान चांगला करावा. नाच रंग दिवस रात्र समेत बसून चालवावा.

१. अमृतराव विश्वनाथ. १ विसाजी कृष्ण. १ मल्हार धोंडदेव.

१ रघुनाथ सदाशिव घाणेकर.

[३.] सोइरे व गृहस्थ व भिक्षुक यांस भोजनास व फराळास व नाच पहावयासि व पुण्याहवाचन व सीमंतपूजन व वागनिश्चय व लग्नसमयीं व वरातसमयीं बोलावण्याचें काम सर्वोत्तम शंकर यांजकडे. दररोज भोजनाचें प्रथम आमंत्रण करावयाचें त्यांत मातबरांचे घरीं यांनीं जावें. वरकडाचे घरीं ज्याचेकडे बोलावण्याची नेमणूक केली आहे त्यांनीं जात जावें. जे दिवशीं भोजनास येणार त्यांस व त्यांचे ब्राह्मणांस ओळखोन घ्यावयासि दरवाज्यावर माहीतगार बसवावा. आले कोण, नाहीं कोण याचा झाडा पहावा. कोणास विसरूं नये.

१ सोयरे लोकांस विठ्ठलराव मोरेश्वर व मोरो विश्वनाथ भावे, हरी जिवाजी यांणीं बोलवावें, त्यासः—

कारकून. शागिर्दपेशा.

१. गृहस्थांचे आमत्रणांस देखील सरकारकुनः--

२. रामचंद्र इच्छराम व सखाराम गंगाधर १ नारो बापूजी पोक्षे
कारकून दि॥ पागा हुजूर.
शागिर्द

---

१. भिक्षुक पंडित व वैदिक व संस्थानिक व देव वगैरे यांचें बोलावणें निा रामशास्त्री व दादो हरी मराठेः-

कारकून. शागिर्द.

[४.] सोयरे यांजकडे नित्य लग्नांत जितके न्यावयाचे त्यांची नांवनिशी दाखवून योग्यायोग्य पुसून आमंत्रणें करून, जमा करून, भोजनास व फराळास नेत जावें. वाड्यांत भोजनास बोलावण्याचें होईल तेव्हां वाड्यांत आणावें.

१. सरदार, शिलेदार, व मराठे, मुसलमान अल्ली बहादूर वगैरे यांस सोयरे यांजकडे भोजनास व फराळास जमा करून न्यावें व वाड्यांत भोजनास फराळास बोलावणें ते समयीं बोलवावें. या कामास बाजी गोविंद बर्वे वगैरे.

वकील, संस्थानीक-माधवराव सदाशिव

[५.] तेल अर्गजा लावण्याचें काम गृहस्थ व सोयरे लोक यांस समेत स्नानाची सूचना करून बोलवावें. येतील त्या समयीं पूर्वी रांगोळी घालून चौरंग मांडून ठेवावे. तेथें आदरें करून अभ्यंगास घालोन उंच तेल व अर्गजा योग्यायोग्य पाहून लावीत जावा. उंच उटणें केशर कस्तुरीचें वगैरे करणें तें पुसोन करीत जावें. निा हरी जिवाजी बर्वे.

साहित्य.

तेल, अर्गजा.
केशर वगैरे उटण्यास.

तेल लावणारे न्हावी व खिजमतगार वगैरे चांगले कसबी असतील त्यांजकडून लावावें

वाटचा रुप्याच्या.
चौरंग व पाट.

हलक्या हातानें न्हावी.

खिजमतगार.

[६.] स्नानाचें पाणी व प्यावयाचें पाणी तयार करावयाचें काम निा गंगाधरराव गोविंद.

उष्ण पाणी तापवून स्नानास येतील त्यांस देत जावें. अभ्यंग करतील त्यांस आग्रहें करून अधिक देत जावें. जसा समुदाय होत जाईल तशी तरदूत पाण्याची राखावी.

प्यावयाचें पाणी गाळून शीतल करावें. वेळा, वाळा, कापूर, लावून उदवून सिद्ध करावें. सर्वांस भोजन समयीं व फराळ समयीं देत जावें. पहिल्यानें मागाहून असें दोन वेळ

बोभाट पडूं नये. भोजनोत्तर आंचवावयासि उष्ण पाणी व हातास लावावयासि साखर व दांत कोरावयासि लवंगा याप्रमाणें देत जावें. जे सोंवळे ब्हावयाचे वेळेस पाय धुणारे असतील त्यांस वोटे घालवावे. त्यांजवर पाट ठेवून पाणी देत जावें.

साहित्यास असामी.

कारकून.
शागिर्द.
ब्राह्मण.
रखवालीस प्यादे.

——

पंगतींतून लहान भांड्यानें चिखल न होतां पाणी वाढावें. रुप्याच्या कासंड्या, तांबे, पंचपात्रें, मातबरास समयोचित पाणी प्यावयासि द्यावयाकरितां सिद्ध असों द्यावीं. प्रयोजन लागेल तसें पाणी देत जावें. भांडीं पाणी प्यालियावर माघारीं घ्यावीं.

साहित्य.

भांडीं, कडया, हांडे, गंगाळें, घागरी व तपेलीं व लोटे, तांबे व वोळक व रुप्याचीं भांडीं.

कुंभार काम व बुरुड काम व खाद्या पाणी गाळावयासि व झांकावयासि वगैरे. साखर धुवट व लवंगा तबकें सुद्धां व काड्या दांत कोरावयाच्या सिद्ध असाव्या, व केळीचे फाळके.

——

[७.] भोजनास व फराळास गृहस्थ सोवळे होऊन येतील त्यांस योग्यायोग्य पाहून पाटावर बसवण्याचें काम लक्ष्मण बल्लाळ आपटे यांजकडे, व सोवळीं, व शाला कोणास समयास द्यावयाचें प्रयोजन लागल्यास कोतवाल आणून ठेवावीं.

[८] गंध अक्षत उगाळून लावण्याचें काम जनार्दन मुकुंद यांजकडे व बाबाजी लंबोदर.

केशरी गंध अर्काचें व मध्यम ऐशीं दोन प्रकारचीं चांगलीं, रंगदार कपाळीं लावावयासि; व अंगास लावण्यास केशर व अर्गजा वगैरे सुवासिक एक व साधें पांढरें एक व गुलाबी चंदनाचें व कृष्णागराचें याप्रमाणें चांगलीं उगाळावीं. केशरी गंधांत केशराची कसर राहूं नये. व अक्षता उंच कस्तुरीचीं व मध्यम कस्तुरीची ऐशा दोन कराव्या. गंध-अक्षत खांसा मध्यम असामी पाहून लावीत जावी. उभे खोडानें गंध उगाळावें.

गंध लावणारे चांगले कुशळ चौकस माणूस असावे. त्याणीं सांखळीनें कपाळीं लावावें. वांकडें गंध लागूं नये व अक्षत लावते समयीं नाकास धक्का न लागतां कपाळाचा मध्य पाहून लहान मोठी अक्षत ओघळ न येतां वाटोळी लावावी, व गंध उभें आडवें ज्यांस जसें पाहिजे तसें लावावें. कोणा मातबर असतील त्यांचेपुढें गंध व अक्षता ठेवीत जावी. व हातास लावण्याचें गंध देते समयीं भागीरथीचा गुलाब वाटींत पुढें ठेवीत जावा. गंध अक्षता लावणार यांणीं नखें काढून बोटें चांगलीं करून लावावें.

साहित्य व सामान.

साहित्यास
कारकून
शागिर्द ब्राह्मण
चौकीस प्यादे

साहित्य

केशर कस्तुरी वगैरे आणून चौकशीनें खर्च करावा. शिलकेस सामान. अथवा गंध राहील तें जपोन दुसरे दर्वसास राखीत जावें. ताम्हनें, वाट्या व सांखळ्या व टिळे सोन्याचे व रुप्याचे व तांब्याचीं भांडीं.

सहाणा व खोडें.

धातरजाडा बारीक धुवट गंधें पुसावयास व रुमाल शेल्याचे.

[२] उदबत्या भोजन समयीं लावीत जाव्या. खासे पंगतीस उदबत्तीचीं घरें व झाडें रुप्याचीं असतील तीं लावावीं. वरकड जागां सोंगटीं मांडावीं. व फराळास मातबर गृहस्थ बसल्यास उदबत्या लावाव्या. भोजन जहालियावर सोंगटीं धुवून ठेवावीं. नि।। विसाजी राम बर्वे.

कारकून वगैरे.

कारकून अंजनवेलकर.
प्यादे रखवालीस वगैरे.

उदबत्यांचीं घरें व झाडें रुप्याचीं व सोंगटीं लांकडी वगैरे.

[१०] स्वयंपाक वाड्यांत सोइरे व गृहस्थ भोजनास येतील त्यांचा सिद्ध करीत जावा. त्याची तरतूद.

कित्ता

१. भात साधा दोन प्रकारचा.
खासा व मध्यम.
१. साकरभात व वांग्यांचा वगैरे दररोज सरासरी दोन करीत जावे.
१. वरण तुरीचें.
१. सांबारा दोन प्रकारचीं.
१. आमटी दोन प्रकारची.
१. लोणचें दहा प्रकारचें चिरून, व साखरेचें लोणचें.

१. कढी.

१. सारें दोन प्रकारचीं.

१. भाज्या दहा बारा प्रकारच्या कराव्या. त्यांत एकदोन प्रकार तोंडलीं परवरें वगैरे मागाहून उष्ण व सगळीं वांगीं वगैरे उष्ण वाढावीं.

१. क्षीर वळवटे दोन प्रकारचीं. दररोज दोन प्रकारच्या निरानिराळ्या.

१. पूर्णपोळ्या सपीठाच्या.

१. पक्वान्नें घिवर फेण्या वगैरे तीनचार प्रकार दररोज.
१. वडे साधे व वाटल्या डाळींचे कडिवडे.
१. तूप साजूक फार चांगलें व मध्यम.
१. मठ्ठा व चरव्हा व शिरखंड, अंबरस.

१. खिचडी ओले हारभरे यांचे डाळींची वगैरे प्रत्यहीं एक प्रकारची.
१. पापड, सांडगे व फेण्या व तिळवडे व चिकवड्या मीरगोडें बोंडें मेक्यांच्या काचऱ्या, या प्रमाणें तळून.

सदर्हू प्रमाणें साहित्य आचारी चांगले शहाणे लावून स्वयंपाक चांगला करावा. पात्रांचा अदमास पुसोन घेऊन दोन प्रहरांत भोजनें होत अशी तजवीज करावी. स्वयंपाक भाज्या वगैरे उष्ण रसाच्या लोणचीं भाज्या एक सारख्या हारीनें वाटोळ्या वाढाव्या. एकास एक लावूं नये. आंबटी, सांबारें, वरण, क्षीर वगैरे यांचे थेंबटे मध्यें पाडूं नयेत. वाढते समयीं गडबड न करितां चतुराईनें वाढावें. हें काम **चिंतो विश्वनाथ** व **मोरो विश्वनाथ** भावे व वाकनीस यांणीं करावें.

वाढावयास असामी.
१. दफ्तरचे कारकून.
१. वाड्यांतील मंडळी.
१. शागिर्द नवे ठेवावे.

तूप वाढावयास **पांडुरंग बाबूराव** यांजकडील शहाणे वाढणारे यांनीं रुप्याचे तोटीच्या कासंड्यांनीं वाढावें.

सदर्हु बंदोबस्त अंताजी मल्हार वाकनीस यांणीं राखावा. कमी पडल्यास मशारनिल्हेस पुसावें. दोन अडीच प्रहरां सोयऱ्यांकडे भोजनाचें जाहल्यास अगोदर वाड्यांत फराळास घालावें. भोजनाचें तिकडे होईल. जे दिवशीं रात्रौ सोयऱ्यांकडे भोजनाचें होईल, ते दिवशीं दोन प्रहरीं भोजनाचे वाड्यांत होईल.

[११] विडे बांधावयाचें काम नि॥ **केशवराव बल्लाळ केतकर.**

खाशीं पानें कमावीसदारांकडून आणविलीं आहेत तीं माफजतीनें राखावीं. वरकड पानांची तरतूद जाहली न जाहली पाहत जावी व खरेदी ही करावी.

सुपारी फुलवर्डा वगैरे चांगली पाहून धुवावी. त्यापैकीं तबकांत मोकळी घालावयाची त्यास केशराचें पाणी देऊन, गुलाब घालून, रंगदार करावी. व कांहीं रोठा सुपारीचें फूल पाडून ठेवावें. व चिकणी सुपारी नुस्ती व खुषबोईदार करून ठेवीत जावी.

विडे बाधणें ते हिरवे खर्ची पानांचा व बाजूचा सात पानांचा बांधावा. पिकल्या पट्या बाजूच्या सात पानांच्या सुपारीचे पानांची गुंडी उभी घालून भरदार चांगल्या बांधाव्या. कुलपी विडे केळींचीं पानें लावून दहा पानांचा एक व बारा पानांचा त्यांत गंगेरी दोन पानें घालीत जावीं. त्यास दुकाडींची खूण करावी. या प्रमाणें कुलपी विडे धुतली सुपारी घालून चुना नेमस्त दुसरे पानास न लागे असा घालून बांधावे. बांधणार चांगले चौकस लावून डोलदार बांधावे. सुपारी

पानें कळीचीं गंगेरी व रामटेकीं तबकांत घालावीं तीं रुमालांनीं पुसून चांगलीं निवडून नीट करून ठेवून देत जावीं. व कांहीं पानें सोनेरी वर्ख लावून तयार करावीं. ज्या दिवशीं जसे विडे लागतील तशी तरतूद करीत जावी. देखील ब्राह्मण भोजन व बायकांकडील. १

चुना केशरी व साधा पांढरा सफेत खांसा समेत तबकांत ठेवण्याकरितां करावा. १

साहित्यास व साहित्य.

साहित्यास कारकून वगैरे.

१ कारकून.
१ ढलाईत.
१ प्यादे.
१ शिंदे पोरगे व खिजमतगार.
१ भोई.
१ कामाठी.

—

साहित्य.

१ सुपारी, कात, आंबाडी तसलमातीस आणावी. कालचा खर्च आज समजावून चिठ्ठी घेत जावी.
१ चुना पारनेर व रेवदंडा व धोडपे पैकीं.
१ कुंभार काम व बुरूड काम.
१ नगारे यांचे पूड व घागरी व खाद्या व अडकिते व सुऱ्या, कातऱ्या वगैरे.
१ चुना, सुपारी व रंगण्यास केशर व गुलाब.

—

[१२] विडे समेत वाटावयाचें काम, पिकल्या पत्र्या व कुलपी विडे व हिरवे विडे च मोकळीं पानें व सुपारी व चुना या प्रकारें पुडें ठेवून ठेवणें व वांटणें या कामास दिवस रात्र हजीर राहून विडे ज्यांस जसे देणें तसे यथायोग्य पाहून देत जावे. वावगा खर्च करूं नये. चौकशीनें वांटावे.

साहित्यास.

१. + + ÷ + पानसी.
१ कारकून नि।। तोफखाना व पोषाख.
१ खिजमतगार.
१ प्यादे.

—

साहित्य.

तबकें व डबे व पानदानें व चुनाळ रुपे सोन्याचे.

सरपोस व बस्ते.

लग्नापूर्वी पुण्याहवाचन व वागनिश्चय व सीमंतपूजन समयीं विडे देणें ते सगळी सुपारी व पानें देत जावीं. समेत विडे खाणारे आहेत त्यांस विडे देत जावे.

—

[१३] विड्याचें सामान लवंगा, जायफळें वगैरे वांटण्याचें काम यशवंतराव पोतनीस यांजकडे. साधें सामान व रुपेरी व सोनेरी असे रोजचे खर्चाचे अजमासें कारखान्यांतून आणून निराळें दास्तान करून बंदोबस्तानें ठेवावें. मजालस होत जाईल तसें समयोचित माणूस पाहून वांटीत जावें. मातबरांपुढें चौफुले भरून ठेवीत जावे व सर्वांस खिचडी करून वांटावे. पिस्ते व बदाम चौफुल्यांत असावे. नेहमीं जपून करावें.

साहित्यास	साहित्य
कारकून पोशाखी	तबकें व चौफुले व सरपोस.
खिजमतगार इतबारी.	
प्यादे.	
कारकून जिन्नस कारखान्यांतून आणावा. त्याचा झाडा राखावा.	

---

[१४] खुषबोई गुलाब व अत्तर समेंत वाटावयाचें काम निसबत त्रिंबक महिपत राव चिटणीस. गुलाब व अत्तरें उंच व मध्यम खर्चाचे अजमासें रोजचे रोज कारखान्यांतून आणून निराळें दास्तान करून बंदोबंस्तानें ठेवावें. मजालस होत जाईल तसे समयोचित माणूस पाहून वांटीत जावें. मातबरापुढें अत्तर गुलाब ठेवीत जावा. वावगा खर्च करूं नये. रात्रंदिवस जपून चौकशीनें करावें.

साहित्यास	साहित्य
कारकून पोशाखी.	तबकें व गुलाबदाण्या व अत्तरदाण्या सोन्या रुप्याच्या.
खिजमतगार इतबारी.	सरपोस वगैरे सामान लागेल तें.
चौकशी प्यादे.	रंग केशरी वगैरे खासगी कडून आणवून प्रयोजन लागेल ते समयी टाकीत जावा.

कामें निसबत खासगी.

[१५] कोशिंबिरी वांटून वाढावयाचें काम. चांगल्या कोशिंबिरी बीस प्रकारच्या व निखट चटण्या चांगल्या बारीक वांटून रुचिकर कराव्या. व निंबें चिरून पंचामृत, रायतीं व भरतें दोन आदिकरून पंचवीस तीस प्रकार करावे. एक दुसरी चमत्कारिक कोशिं-

[१६.] पाट मांडावयाचें काम. पंगतीस एके सुतानें पाट सारखे मांडावे, त्यांत खासे पंगतीस रुप्याचे फुल्यांचे वगैरे चांगले थोर एकसारखे पाहून बसावयास व जागा असेल तसे टेकावयास मांडावे.

याप्रमाणें भोजनास व फराळास दोन्ही

बिरी करावी. विचारून वाढावी. मीठ धुऊन पांढरें बारीक करावें. व वाढणारे चौकस शहाणे असावे. त्यांणीं वाढाव्या. हारींनें एक एकास न लागतां हिरव्या, पिवळ्या, लाल, काळ्या, वगैरे रंगाचे अनुक्रमानें मध्यें थेंबटे न पडतां गलबल न करितां वाटोळ्या वाढाव्या. हात धुऊन मग दुसरी कोशिंबिर वाढीत जावी.

सदाशिवभट **ना**नल चौकशीस.

कारकून निा खासगी.

ब्राह्मण.

साहित्य कोशिंबिरीचें व उपसाहित्य भांडीं व पाटे वरवंटे कोठींतून घ्यावें. पानपत्रावळी व खादीचे रुमाल वगैरे लागेल तें.

---

[१७] रांगोळी घालावयाचें काम चांगले ठशाचीं रुंदाळ रांगोळी असतील तीं आणि त्यांणीं रांगोळी भोजन समयीं व फराळ समयीं घालावी. खांसे पंगतीस रस्ते व पात्राची जागा कुशाद राखावी. गुलाल रंगदार असेल तो घालावा. नित्य तऱ्हे तऱ्हेची रांगोळी घालीत जावी. अभ्यंगाचे जागां व बायकांकडे भोजनसमयीं व फराळसमयीं वगैरे जेथें काम पडेल तेथें जपोन घालीत जावी. रांगोळी हिरवी, पांढरी, गुलाली, वगैरे तऱ्हेतऱ्हेची गौंडे यांणी घालावी.

गौंडे.

साहित्य गुलाल व शिरगोळा कोळंबीं मडकी भरून व सुतळी वगैरे.

जागां मांडावे. सायंकाळीं पाट धुवावे. त्यांतून फराळाचे पंगतीस मांडावे लागतील ते ओल्यानें पुसून मग मांडावे. भोजनोत्तर आंचवण्याचे जागां मातबर गृहस्थांस बसावयास शेपन्नास पाट समुदाय पाहून मांडीत जावे. वोटे करून वोळ्यावर मांडावे.

कारकून निा खासगी.

शागिर्द.

कामाठी.

रखवालीस प्यादे.

रुमाल खादीचे पाट पुसावयास.

पाट कोठींतून व जवाहीर खान्याकडून वगैरे फुल्यांचे असतील तिकडून आणवण्याची तरतूद करावी, व गृहस्थांकडील.

फराळाचा कारखाना साहित्य.

कित्ता.	कित्ता.
१ लोणचीं पांच प्रकारचीं व पापडसांडगे.	१ खारीक व खोबरें व खजूर व बदाम व पिस्ते व नारळ व मेवा वगैरे
१ कोशिंबिरी दहा प्रकारच्या.	१ मेवा मिठाई.
१ पक्कान्नें व लाडू.	१ दहीं व दूध.
१ पोहे आंबेमोहोर बारीक भात व खानदेशांतून नवे पोहे आणवून व मातबरांस लाह्या.	१ तूप साजूक व मध्यम.
	१ मुरांबे.
	१ ह रो रा [?]
—	—

याप्रमाणें साहित्य प्रतिदिवशीं सोइरे व गृहस्थ फराळास येतील त्यांस रांगोळ्या घालवून समया, पाट मांडून, आदरपूर्वक

[१९] आतशबाजीशें काम-नळे चंद्रजोती व हवया व झाडें तऱ्हेतऱ्हेचीं वैगेरे. दारूचें काम तयार करावयासि कोठींतील सामान व कमावीसरदारांकडील सामान घेऊन कसबी कारागीर लावून शिरा दारू चांगली व कसब चांगलें या तऱ्हेची तयार करावी. धूर होऊं नये. सोयरे यांचे मंडपांत पुरुष व बायका रात्रीचें जाणें येणें पडेल तेथें दारूकाम लागेल तसें समयोचित लावीत जावें. झाडें लावण्याचीं कोठें कशीं तीं पुसून लावावीं. दारू कामाच्या पांट्या वाटेनें दुरूनच चालावाव्या. रखवाली चांगली चौकशीनें करावी. खर्च होईल तो रोजचे रोज फडीं समजवावा. या कामास रस्त्यांतून नेहमींच जागां जागां दारू नेऊन लावीत जावी पाटी रस्त्यांतून फिरवूं नये. व गोडी दारू लावीत जावी तारा फटाका वैगेरे. मिरवणुकेंत दारू नसावी. वरकड प्रकार थोरली दारू बाहेर होईल त्यांत करावे.

कारकून नि॥ खासगी, प्यादे.

कामाठी व बेगारी.

बुरूडकाम पांट्या वैगेरे.

दागिने व झाडें तऱ्हेतऱ्हेचीं करणें तीं पुसून करावीं.

---

[२१] सडासंमार्जनाचें काम पहाटेस उठोन झाडसारवण करावें. केर जेथें पडेल तेथून वरचेवर जपून काढीत जावा. भोजनाचीं जागा ताजे शेणानें सारवीत जावी. फार चिखल पाडूं नये. याप्रमाणें बंदोबस्त राखावा.

कारकून.

साहित्यें यथास्थित करून, योग्यायोग्य पाहून तसतसें फराळास घालावें. जपून यथास्थित वाढावें. फराळास बाहेर द्यावयाची परवानगी येईल तसें समजोन देत जावें. बंदोबस्त चांगला राखावा.

कारकून.

रखवालीस माणसें. माणसें

शागिर्द वाढणार.

भांडीं, कुंभारकाम, बुरूडकाम वैगेरे साहित्य.

[२०] नक्षत्रमाळा व बाग चांगले तऱ्हेदार कागदी करावे. व मंडपांत कंदिलें कागदी शोभार्थ लावावीं. आंत दिवा लावूं नये. व फाणूस लावावे त्यांत मेणबत्या लावाव्या. व कारंज्याजवळील फुलझाडें कागदी व मेणाचीं करावीं. कांहीं फुलझाडें बागांतून आणून मांडावीं. व कारंज्यांत पाणी समयाचे समयास जपून घालीत जावें. फवारे रुप्याचे व तांब्याचे मजालस पाहून लावीत जावे. व मेणाचा बाग करावा.

कारकून.

गवंडे.

कामाठी.

फवारे वैगेरे साहित्य लागेल तें.

---

[२२] शाकभाज्या चांगल्या दहा पंधरा प्रकारच्या दररोज पाहिजेत. त्यांस सरकारचे बागांतून ज्या होतील त्या कराव्या. व हरभरा व वाटाणा आमटीस करावा. कमावीसदारांकडील शाकभाजी व पानें येतील तीं माफजतीनें राखावीं. आलीं न आलीं तरतुदींत असावें. व भोंवताले गांवीं बागाईत

कामाठी बेगारी.
भांडी व केरसुण्या वगैरे.

[२३] बागांतील बंगले व कारंजीं व बैठका नीट करण्याच्या आहेत त्या नीट करून तयार कराव्या. १

नगारखान्याचें काम साधें करविलें आहे त्याप्रमाणें जलदीनें तरतूद करून तयार करावें दोहीं कडील. १

आहे तेथें माणसें पाठवून शोध करावा. भाजी पानें मिळतील तीं आणवावीं. वाड्यांत भाजी व ब्राह्मण भोजनाकडे व पानें केळींचीं वाड्यांत रोजचे रोज सावधगिरीनें जपोन देत जावीं. बोभाट पडूं नये. काम सरबागे यांजकडे. १

[२४] सभेंत मजालशीस दिवसास उदबत्यांचीं झाडें रात्रौ उदबत्यांचीं झाडें व मोमबत्या लावणें तशा पाहून लावीत जाव्या. झाडें मोमबत्यांचीं लावणें तीं पुसून लावावीं.

साहित्य करणारे.	सामान
१. गौडे.	१. उदबत्यांचीं झाडें व मोमबत्यांचीं घरें व झाडें रुप्याचीं वगैरे.
१. प्यादे रखवालीस	१, उदबत्या व आगरबत्या व मोमबत्या.
२	

रोषणाई.

[२५] कचेरींत मंडपांत समया नाचाचे जागां थोर जोड्या लावीत जाव्या. वरकड मजालसींत समया सारख्या जोड्या, त्यांचे खालीं पराता व तबकें, पितळ्या ठेऊन, एक सुतानें, मध्यें सारखी जागा उजेडाचा सुमार पाहून राखून, मांडीत जाव्या. वाती सफेत शेल्याच्या घालाव्या. तेल निवळ असेल तें बुधल्या चांगल्या घेऊन त्यांणीं घालावें. दिवसापूर्वी सिद्धता करून वेळेस आणून जेथले तेथें कसबी दिवटे हिंदुस्थानी व चांगले देशचे शिरा असतील त्यांजकडून गलबल न पडतां मांडवींत जावे. गूल वरचेवर काढावे. मजालसींतून फिरण्यास दिवटे पोशाखी

[२६] भोजनाचे समयीं समया खाशांचे पंगतीस दोन पात्रांआड एक, व वरकड पंगतीस चार पात्रांआड एक, याप्रमाणें उजळ समया वाती उजळ घालून चांगल्या कोरड्या न राहतां भिजऊन तेल निवळ पांढरें असेल तें घालून पात्रावर न पडतां तजविजीनें झाऱ्यांनीं समयांवर घालावें. गुलदानांनीं गूल काढावे व खासेपंगतींत समया मध्येंच एक उंच एक नीच अशा असों नयेत. रुप्याच्या समया खासे पंगतीस मांडाव्या. त्यांजवर तेल रुप्याचे झाऱ्यांनीं घालावें. पंगतींतून तेलवात पहाण्यास शहाणे कारकून व शागिर्द चौकस असतील ते फिरत जावे. याप्रमाणें

असावे. मजालस पाहून जे समयीं बुधल्या व गुलदानें रुप्याचीं लागतील तेव्हां घेत जावीं. नाचासमयीं कसबी दिवटे दोहींकडे उभे करावे. मागें पुढें नाचण्यावें पाऊल पडेल तसे मागें पुढें मशाल धरीत जावी. गूल खालीं पहूं नये, व कसबिणीस लागूं नये. याप्रमाणें करावें. १

जागांजागां मंडपांत व दिवाणखान्यांत व मंडपाचे देवड्यांत व इतर देवड्यांचे वाटांत व जागांजागां कारखान्यांत वगैरे समया, कंदिलें, हिलाल दिवेलावणीं जेथें जसें पाहिजे तसें पाहून लावीत जावें. सारी रात्र कोणते जागां असावयाचें त्याचा बंदोबस्त तसा राखावा. १

शेगड्या रुप्याच्या व तांब्याच्या व लोखंडी दहा सिद्ध करून ठेवीत जाव्या. भोजनसमयीं प्रयोजन लागेल तशा मांडाव्या. भोजनसमयीं व फराळसमयीं प्रयोजन लागेल तसें पाहून समया मांडीत जाव्या. १

बायकांचे जेवण्यास व फराळास व मजालसीस सदर्हू अन्वयें समया लावाव्या. बोभाट पाडूं नये. १

लबेस हिलाल दिवट्या जातील ते आले गेले वरचेवर पहात जावें. तेलाचा बंदोबस्त राखावा.

सोयऱ्यांचे मंडपांत पुरुष व बायका रात्रीचे जाण्या येण्यास हिलाल, दिवट्या अगोदर बातमी राखोन सिद्ध करून ठेवाव्या. बाहेर निघतांच बरोबर चालावें. हिलाल, मशाल जेथें जशा धरणें तशा वाटेनें जपोन धरवीत जाव्या. व रस्त्यांत हिलाल पुरावे. तेलाची बेगमी करावी. बंदोबस्त राखावा. कोणाचे अंगावर गूल पाडूं नये. १

साहित्यास व साहित्य.

कारकून दिवटे असामी.

१ जगदीश गणेश.
कारकून.
दिवटे.
देसचे देखील सरकार
हिंदुस्थानी.

१ त्रिंबक उद्धव व रामचंद्र विरेश्वर.
शागिर्द
कामाठी बेगारी.
प्यादे रखवालीस.

असामी व साहित्य.

समया थोर, मध्यम व लहान चाळ्यांच्या मिळोन मांडाव्या. त्यांचा बेत पाहून त्याप्रमाणें बुधल्या समेत तोट्या नख्या.

चर्मी रंगदार.
साध्या चर्मी.
पितळी.

कंदिलें, दिवे लावणीं.
तबकें, पितळ्या व पराता व शेगड्या.
लोटे तांब्याचे व हांडे व गुलदानें व तपेलीं व झाऱ्या.
समया व बुधल्या व झाऱ्या व गुलदानें रुप्याचीं.

शेले वगैरे उतारी सनगें स्वच्छ वातीस व खाथा.

नवघणें, दोऱ्या, सुतळी व विड्या पोताच्या व पहारा, गीर्ह्या चर्मी व कोळसे वगैरे लागेल तें.

हिलाल, कोंड्या सुद्धां व दुशाखी.

तेल व चिंधडे व पोत व पलिते तसलमातीस घेत जावे.

कालचा खर्च आज समजावून चिठी घेत जावी.

[२७] रोषणाई कडील कारखान्याची तयारी.

१. गवई नटवे वगैरे कळवंतीणींचे ताफे यांची हजेरी राखावी. सिधे वगैरे चौकशीनें देत्रावे. चांगले ताफे असतील ते मजालसींत रात्रंदिवस हजीर राखावे. नाच चांगला यथायोग्य करावा. बायकांकडे ताफे लागतील तसे पाठवावे. या कामास.

१ रघुनाथ सदाशिव.
१ कारकून दफतराकडील.

१ चिटको मल्हार वैद्य.
प्यादे व ढालाईत.

कसबी ताफे नामी बाहेरून आणवण्याचे. त्याची तरतुद आले न आले हें चिटको मल्हार याणी पहात जावें.

[२८] वाजंत्री व कर्णेकरी व बांके व रणसिंगे यांची हजेरी राखावी. अक्षतेस व आमंत्रणास व सोयऱ्यांचे मंडपांत जाण्या येण्यास देखील बायकांकडे ताफे लागतील तसे पाठवावे. व पालख्या व आबदागिरे व बाग व नक्षत्रमाळा माफजतीनें राखाव्या. जिकडे नेणें आणणें पडेल तिकडे नेत आणीत जाव्या. माणसें कसबी पोषाखी असावीं.

बापूजी आनंदराव.
प्यादे.
बेगारी.

कारकून हजेरी राखून शिध्याचे कामास.
आफदागिरे.

[२९] सोयऱ्यांचे घरीं जाण्या येण्या समयीं वाजंत्री व कर्णेकरी व तासेमर्फे व गाडदी व शागिर्दपेशा हत्ती, घोडीं, राऊत, सांडणी, हिलाल, दिवटे, आतषबाजी सर्व सरंजाम करीत जावा. रात्रंदिवस फार चांगलें जपून बंदोबस्त राखावा.

१ बाळाजीपंत ठोसर.
१ राघो विश्वनाथ गोडबोले.
भालदार व चोपदार

१ विसाजी आपाजी.
लबेचे कामास प्यादे व जासूद व ढालाईत.

हत्ती, घोडीं यांचें सामान न सांडणींचें सामान व खासबारदार यांचे बंदुकीचे गलेफ वगैरे यांची तरतूद जहाली न जहाली पहावी.

बायकांकडील साहित्यास

[३०] विडे व अत्तर खुषबोई व रुखवत वगैरे साहित्य पहावें. व लुगडीं व खण मागतील तसे आणून द्यावे. व भोजनास व फराळास बायकांस आमंत्रण करावें. आल्या न आल्या पहावें. जे समयीं जें काम पडेल तें नेहमीं सावधगिरीनें जपोन करावें.

महदाजी बल्लाळ साठे.

रामचंद्र नाईक परांजपे यांजकडे लुगडीं व खण सांभाळून देणें हें काम.

कारकून.
खिजमतगार.
जासूद व प्यादे.
शागिर्द.

[३१] मिरवणुकेचें साहित्य सोयरे यांजकडे जाणें येणें समयीं वाजंत्री व कर्णेकरी व पालखत्रें व नक्षत्रमाळा व बाग कागदी व हिलाल दिवटे आतषबाजी व तासे, मर्फे, हत्ती, घोडीं, पालख्या व गुलाल व पायघड्याचें सामान याप्रमाणें नेहमीं जपोन तरतूद करावी. सावधगिरीनें बंदोबस्त चांगला राखावा.

१ बाळाजी वामन दामले
१ कारकून
भालदार व चोपदार
प्यादे व जासूद
खासबारदार.

सदर्हू प्रमाणें बंदोबस्त राखावयाची यादी महादजी बल्लाळ यांजवळ लिहून दिली आहे. त्या यादीवर वहिवाट करावयाची मखलासी लिहिली आहे त्याप्रमाणें.

खाशा वाड्यांत महादाजी बल्लाळ व मशारनिल्हेकडील कारकून यांणीं बंदोबस्तानें करावें. रामचंद्र नाईक परांजपे यांणीं माहितगारीनें सांगत जावें.

नवरीचे मंडपांत रामचंद्र नाईक यांणीं कामकाज बंदोबस्तानें करावें. १

[३२] मंडप जागां जागां घालणें त्यास लांकडें खासगीकडील वगैरे सरंजाम फरासखान्याकडील सामान व बाहेरून आणविलें आहे त्याची तरतूद राखून अवघा सरंजाम करून बेताप्रमाणें पसंती-योग्य सिद्ध करावें.

१ सखोत्तम शंकर.
१ बाळाजी कृष्ण ठोसर यांजकडील कारकून व शागिर्दपेशाचे लोक. कारकून.

१ सखाराम विश्वनाथ साने लोकसुद्धां.
हशमी लोक.
बेगारी.
साहित्य जें लागेल तें.

पत्रावळी व केळीचीं पानें व द्रोण यांचे कारखाने.

[३३] पत्रावळींचा कारखाना गांवगन्नाचे गुरव आणविले आहेत त्यांस बेगारी

[३४] केळीचीं पानें नीट करावीं व द्रोण केळीचे चांगले दोहों काड्याचे नोक-

यांजकडून रानांतून पानें आणवून पत्रावळी चांगल्या सरकारचे वाड्यांत द्यावया योग्य करवाव्या. व कमावीसदार यांजकडील वगैरे पत्रावळी येतील त्या जमा करून माफजतीनें ठेवाव्या. जिकडे द्यावयाच्या चिव्या येतील तिकडे देत जाव्या. कर्बेळाचीं पानें वाळलीं आणविलीं आहेत तीं बिगारी वगैरे यांस समजोन देत जावीं. खर्च चौकशीनें जपोन करावा.

१ रामचंद्र नारायण प्रां पुणें.
कारकून पौ। मजकूर.
प्यादे रखवालीस.

द्रोण केळीचे चांगले आणविले आहेत ते ब्राह्मणभोजनाकेंड द्यावे. भरतीस ओलीं पानें बेगारी यांजकडून आणवून द्रोण करावयास द्यावीं.

दार लावावे व पत्रावळी भरतीस घेऊन नीट करून भोजन समयीं व फराळा समयीं. पुरुषांकडे व बायकांकडे दिवस रात्र समयीं जपून मांडीत जावे. खासे पंगतीस पानें चांगलीं थोर मांडावीं. फाठकीं, डागीळ असूं नयेत. व द्रोण दरपानास दहा वारा पर्यंत मांडावे. फराळाकडे लहान पानें व हा ॅ पत्रावळी व द्रोण लागतील तसें मांडीत जावे.

रामचंद्र हरी देवधर वगैरे कारकून नि॥ दफतर एकबेजी जासूद व प्यादे.

सुऱ्या, कातऱ्या, कोळंबी, वगैरे साहित्य व भोंस.

शागिर्द.

सोयरे लोक व मातबर सरदार व शिलेदार वगैरे यांचे परामृषार्ची कामें.

[३५] नबाब भोंसले होळकर वगैरे मातबर शिलेदार सरकारकून मराठे मुसलमान यांसि आमंत्रणें करावीं. भोजनास व नाच पहावयासी सोयरे यांजकडे व वाड्यांत योग्यायोग्य पाहून न्यावे. बोलवावे. व सिधे पाठवावे. बाहेरून येतील त्यांचे जागेची सोय करून द्यावी.

१ कृष्णराव बळवंत.
१ बाजी गोविंद.
१ राघो बापूजी.
१ धोंडो मल्हार.
१ माधव रामचंद्र.
कारकून

[३६] सोयरे बाहेरून येतील व गांवांतील यांसि सिधा पाठवावा. बाहेरून येतील त्यांचे बिराडाची सोय करून द्यावी. व भोजनास व फराळास व नाचास वगैरे बोलवावें. सोयरे यांजकडे भोजनास नित्य जमा करून नेत जावें. या कामास

१ विठ्ठलराव मोरेश्वर.
१ हरी जीवाजी.
१ कारकून.
१ जासूद.
१ प्यादे.
चोपदार.

प्यादे व जासूद.
चोपदार व भालदार.
कामाठी व बेगारी.

[३७] भिक्षुक व वैदिक व थोर पंडित व अग्निहोत्री व देव चिंचवड वगैरे संस्थानिक ब्राम्हण येतील त्यांस शिधा वगैरे निसबत बाळाजी राम लेले.

कारकून.
प्यादे.
जासूद.
कामाठी.
बिगारी वगैरे.

बाहेरील संस्थानिक वगैरेचे व चिंचवडकर येतील त्यांस जाण्याची सोय करून द्यावी. व शिधा व फराळास पोहोंचवावें.

कामाठी.

[३८] मामलेदार व हशम गाडदी वगैरे शागिर्दपेशा व कारखान्याचे लोक यांसि सिधा द्यावयाचा नि॥ महादजी बल्लाळ गुरुजी.

[३९] संस्थानिक वकील वगैरे यांसि शिधा व फराळास पाठवावें व भोजनास सोयऱ्यांकडे व वाडयांत बोलवावें. व नाचास बोलवावें. निसबत माधवराव सदाशिव. व जाण्याची सोय करून द्यावी.

कारकून.
प्यादे.
जासूद.
कामाठी वगैरे.

[४०] ब्राम्हणभोजनाचें काम.—स्थळ संयपाकास व भोजनास सिद्ध करावें. सामोग्री कोठींतून न्यावी. व. भांडीं कोठीपैकीं व बाहेरील गृहस्थांकडील जमा करविलीं आहेत, त्यांपैकीं न्यावीं. आचारी ब्राम्हण खटपटे लावून संयपाक सिद्ध करावा. भात, वरण दोन तीन भाज्या व सांबारें व आवळेगाजराचें लोणचें व कढी व पुरुणपोळ्या व तूप याप्रमाणें भोजनास घालावें. व भोजन जहालियावर उष्टीं काढून संमार्जन करावें. समुदाय पाहून संयपाक करावा. वाढणारांस निराळा करावा. त्यांत तीन भाज्या व कढी व सांबारें या प्रमाणें करून सर्वांस भोजन घालीत जावें. संयपाक उरेल तो वावगा वांटूं नये. मराठे लोक शागिर्द पेशा वगैरे एक एक दिवस उरेल तसा पुसून देत जावा. सामुग्री खर्च होईल तो रोजचे रोज समजावावा.

१ रामचंद्र नारायण प्रांत पुणें. | कारकून प्रांत मजकूर.

साहित्यास.

किल्लेहाय व तालुकेहाय व हुजूर हशमाचे कारकून सर्वोत्तम शंकर यांणीं जमा करून द्रोण करावे, व ब्राम्हणांस वाढावें. गोविंद राम आपटे व गोविंद हरी देवधर यांनीं महालचे कारकून जमा करून न्यावे.

भोजन दक्षणा द्यावयासि.

१ उपाध्ये. | १ कारकून फडणिशीकडील.
गंध देशपांडे यांनीं पिंजरीचें लावावें.

तूप पोतदार यांनीं वाढावें.

पत्रावळी देशमुख पुणें यांनीं मांडाव्या.

खरकटीं भांडीं महादजी नारायण यांणीं घासवावीं.

रखवालीस प्यादे व बेगारी.

पागांचे व शिलेदारांचे कारकून व शिलेदार कारकून व सरकारचे कारखान्यांकडील कारकून वाढावयास घेऊन जावे.

पक्कान्नें बुंदीचे लाडू खासगीकडून आणून वाढावे.

---

[४१] शिध्याच्या चिठ्या द्यावयाचें काम सोयरे लोक व शिलेदार व मातबर सरदार व शागीर्दपेशा व भिक्षुक वगैरे यांसि सिधा द्यावयाची परवानगी ज्यांकडे कामें नेमिलीं आहेत तिकडून येत जाईल, त्याप्रमाणें कोठीचा शिरस्ता उत्तम, मध्यम, कनिष्ठ तीन प्रतींचा पाहून ज्यास जसा द्यावयाचा तसा प्रकार करून सिधा, दाणा, वैरण, पानपत्रावळ, दूध, भाजी, सर्पण, आदीकरून ज्यास जसें द्यावयाचें तसें समजोन चौकशीनें देत जावें.

१ त्रिंबक विनायक.

१ गोपाळ महादेव फडणिसीकडील

कारकून प्रांत जुन्नर.

शागिर्दपेशा वगैरे.

चोपदार.	भालदार.	दिवटे.
ढलाईत.	प्यादे.	जासूद.

कारकून शिलेदार.

किरकोळ कामें.

[४२] पालख्या गृहस्थांच्या व सरदारांच्या जमा कराव्या. सोयरे लोक पुण्यास आणावयास, व पुण्यास बायका वगैरे मंडपांत आण्या येण्यास, व शिवाय ब्राम्हण वैदिक पंडित × × त आण्या. आलीं गेलीं बरेचवर पहात जावीं. बोभाट पाडूं नये. व कोणाचे सामानास तसनस होऊं नये. या कामास

२ काशी त्रिंबक. दांडेकर व यादो तुकदेव यांचे चिरंजीव.

[४३] शहरचे रस्ते झाडवून चांगले करावे. त्यांत सोयरे यांजकडे जावयाचा रस्ता फार चांगला राखावा. वाटेंत धोंडे, माती, लांकडें, चिखल, केर पडेल तो झाडून काढवून रोजचे रोज रस्ता झाडीत जावा. त्या रस्त्यांतील. × × × + स चाकरी करून जावें. दिवसाचे त्याणीं व चांभार व गाडवें व गाडे व काबाडे वगैरें यांसि फिरूं देऊं नये. हें काम कोतवाल घासीराम याजकडे.

प्यादे, जासूद, डलाईत.

---

[४४] पखाला जमा करून छिडकाव मंडपा पुढें व दरवाज्या बाहेर व सोयरे यांचे मंडपाचे रस्त्यास करावा.

श्रीनिवास नरशी कारकून.

प्यादे.

सक्केकरी व पखाली पागांचे वगैरे.

[४६] शेण गांवांतील गौळी यांजकडील व सरकरचे थट्टीचे गुरांचें व तोफखान्याकडील व बाहेरील नाक्यावरील जमा करून छकड्यावर घालून, वाड्याजवळ दररोज आणून ठेवावें. जिकडे मागतील तिकडे देत जावें.

१ कारकून चिमणाजी बल्लाळ.

प्यादे.

छकडे तोफखान्याकडील वगैरे व बिगारीचे गाडे.

---

[४८] मंडपाचे पडदे व बिछाने यांची रखवाली करावी. हिलाल व दिवटे व आतशबाजीचें काम लागेल ते समयीं मांडवावर माणसें चढवून × ×

हरी बल्लाळ यांस विचारून चिठ्या लिहून रवाना करीत जाव्या. कारकून पाठविण्याचे तेथें पाठवावें. बेगारी गांवगन्नाचे आणविले आहेत. ते आले न आले पहावे. हजेरी राखावी. शीघ्र चौकशीनें देवीत जावा. जिकडे परवानगी होईल तिकडे कामकाजास देत जावें. काम पाहून रिकामे जहाले म्हणजे माघारे आणवीत जावे. सारे बिगारी यांचें बिराड एक जागां असावें. चाकरीस वाड्याजवळ नेहमीं रात्रंदिवस असावे.

१ नारो महादेव गद्रे सरदार.

[४५] उष्टीं पुरुषां कडील व बायकांकडील भोजनाचीं व फराळाचीं काढावीं. चांगल्या भुया सावडून सारवून स्वच्छ करावें. पुरुषांचे पंगतीस वाढण वाढते समयीं भाताचीं शितें वगैरे पडतील तीं काढीत जावीं. वरचेवर जपोन काढावीं

१ कारकून कृष्णाजी नारायण लिमये.

ब्राह्मण व शागीर्द.

केरसुण्या वगैरे साहित्य.

---

[४७] कचेरी मंडपाचे देवडीवर सोयरे व गृहस्थ व शिलेदार वगैरे येतील ते ओळखून पाहून आंत घेत जावे. त्यांस ढका लागूं नये. बावगें माणूस आंत शिरूं नये. असा बंदोबस्त नेहमीं.

१ आबाजी विश्वनाथ आठवले,

कारकून व प्यादे.

माणूस पाहून खिजमतगार मात्र घेत जावे. इतर जिलबींचें माणूस घेऊं नये. शिलेदार वगैरे घेणें ते बाजी गोविद यांजकडील. * *

बाहेरील मातबरांचे घरचीं [भांडीं] जमा करून आणावीं आणि भोजन-शालेकडे वगैरे जिकडे द्यावयाची परवनगी होईल तिकडे तसलमातीस द्यावीं. झाडा चांगला राखावा. ज्यांचें भांडें त्याची वरती खूण असावी. बदलूं नयेत व गहाळ होऊं नयेत, ऐसा बंदोबस्त करावा. कल्हई ज्यास करावयाची असेल त्यास करावी. या कामास

१ भिकाजी विश्वनाथ जकाते प्रांत पुणें.

कारकून निसबत मजकूर.

१ नारो नरसी कारकून यांणीं नारो महादेव सांगतील त्या प्रमाणें वर्तावें.

रखवालीस प्यादे.

—

कुंभार काम व वुरूड काम बेगारीचे वुरूड व कुंभार येतील त्यांस सामान देऊन दागीने तयार करवावे. बेगारी वेठे सुद्धां हजेरी चांगली राखावी. शिधा देवीत जावा. जो दागीना उत्पन्न होईल तो रोजचे रोज समजावावा. कमाविसदारांकडील सामान येईल तें माफजतीनें ठेवावें. जिकडील चिठ्या येतील. तिकडे सामान देत जावें. ब्राह्मण भोजन आदि करून बोभाट कोणीकडील पाडूं नये. या कामास.

प्यादे.

कामाठी.

—

फरासखान्याचे दरोगे यांणीं सभेंतील बिछाने व जागजागां दिवाणखाने यांतील व बायकांकडील आदि करून हमेशा जपून ज्या समयीं जसे ज्या जागां पाहिजेत तसे घालून सिद्ध करीत जावे. फिरोन जमा करावयाचें असेल तें जमा करावें. पंखे मजालसी समयीं वारा घालावयासि दांडीचे फरासाजवळ देऊन उभे करावे. विड्याचे पानांच्या चुनपट्या वगैरे बिछान्यावरील केर वरचेवर काढावा. मजालसींतून फरास फिरणें ते ब पोषाख असावे.

कारकून.

फरास.

प्यादे चौकशीस.

— —

ले. ३९८] [२२८] { माघ शु. १० श. १७०५ ता ११–२–१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरी. हैदरखान वारले तेव्हां इंग्रेज शेर होतील, हैदरखानाचे चिरंजीव टिपु आहेत त्यांचा दाब व कर्तृत्व कसें पडेल कळत नाहीं. याकरितां इंग्रजाचा तह लवकर पक्का व्हावा याउपर विलंब लागूं नये. एखादा पेंच बसल्यास वाईट पडेल. याकरितां सूचना लिहिली आहे. एके प्रकारें सर्वांचीं वचनेंही +उगविलीं हें बहुत एकांतीं राजश्री पाटीलबांवास सांगावें रा छ ८ रोबल हे विनंति.

+ हैदर वारल्यामुळें कोणास कांहीं माघारें घ्यावें न लागतां आपापलीं बोलणीं उगवून घेण्यास सवड सांपडली असा भाव.

———

ले. ३९९ [३१३] माघ व. ९ श. १७०४ ता॥ २५-२-१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं

विनंती उपरि. तुम्हीं छ. २७ सरकारचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. उत्तरें अलाहिदा लिहिलीं आहेत त्यावरून कळेल. पुढें होईल तें वरचेवर लिहून पाठवित जावें. अटेर घेऊन ग्वालेर शहरांत अंमल बसल्याचा वगैरे मजकूर लिहिला तो कळला. दिल्लीकडील सरदार आगरेयास आले. गोहदकरांचीं त्यांचीं राजकारणें होतात म्हणोन कळलें. त्यास येविशींची सावधगिरी असावी. रवाना छ २२ रविलावल हे विनंती.

ले. ४०० [१९५] माघ व. ९ श. १७०४ ता॥ २५--२--१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशी.

विनंती उपरि. पूर्वी तहनामा पाठविला, ते समयीं हैदरखानाचे कलमाचे तीन पर्याय लिहिले होते कीं, हैदरखानानें कराराप्रमाणें इंग्रजांचा व महंमद अल्लीखानाचा मुलुख सोडून सरकारांत ही तहानेंच चालेल [तर] बरेंच झालें; दुसरा पक्ष सरकारचा व इंग्रजांचा तह झाला असतां हैदरखानानीं सरकाराशीं विरोध न केला आणि इंग्रजांची मसलत केली तर इंग्रजांनींच खानाची मससत करावी, सरकारांतून मसलत करितां येणार नाहीं; तिसरा पक्ष सरकारचा व इंग्रजांचा तह झाला यामुळें हैदरखानांनीं सरकारशीं बिघाड केला तर सरकार व इंग्रज मिळोन मसलत करावयाचें कलम लिहिलें तें चांगलें आहे, म्हणून विस्तरें येथून लिहिलें होतें. त्याचें उत्तर लिहिलेंत कीं, तें पत्रच राजश्री पाटिलबावांस बजिन्नस दाखविलें. उत्तरें झालीं कीं, सरकारचा व इंग्रजांचा तह जाहालियावर हैदरखानांनीं तहाप्रमाणें इंग्रजांचा व महंमद अल्लीचा मुलूख सोडून देऊन सरकारांतही तहानेंच चाललयास बरेंच जाहलें. इंग्रजही त्यांशीं बोलणार नाहींत. दुसरा पक्ष सरकाचा व इंग्रजांचा तह झाला असतां हैदरखानानें सरकाराशीं विरोध न केला आणि इंग्रजांनींच खानाची मसलत करावी, त्यास गोष्ट इंग्रज स्पष्ट ऐकत नाहीं, येविशींची भवति न भवतीही विस्तरयुक्त लिहिली. हैदरखानाचे कलमाचा पर्याय येथून लिहिला असतां दुसरीच तऱ्हा लिहिण्यांत आली. यावरून कांहीं समजत नाहीं. येविशींचा निश्चय तुम्ही बोललां त्याप्रमाणें इंद्रसेनास सांगूं. याचें उत्तर केलें कीं, याचा निश्चय आमच्यानें सांगवत नाहीं. लिहून पाठवून उत्तर येईल त्याप्रमाणें विनंती करूं. याचें उत्तर पाटीलबवांनीं केलें कीं, पत्राचा जाब येण्यास दोन अडीच महिने लागतील तों पावेतों इंद्रसेन राहत नाहीं त्यापक्षीं निरोप द्यावा लागेल. याचें उत्तर शेवटीं केलें कीं, श्रीमंतांचे दौलतीची काळजी आपल्यास नाहीं अशी नाहीं. जें आपल्यास

चांगलें दिसेल तें करावें.म्हणोन विस्तरें करून लिहिलें तें कळलें. त्यास कराराप्रमाणें इंग्रज व महंमद अल्लीखान यांचा मुलूख व पाडाव सोडून देऊन सरकारांतही तहानें चालेल तर बरेंच जालें. हें कलम व न चालल्यास दोघांनीं मिळून मसलत करावी हें (कलम) करारांत आणलें आहे तें चांगलेंच आहे. कदाचित हैदरखानानीं सरकारशीं स्नेह राखून इंग्रजांची मसलत केली याचा पर्याय लिहिला होता, तो समजूनच लिहिला होता. परंतु हल्लीं हैदरखान वारले. तेव्हां सर्वांचींच वचनें उगवलीं, तेव्हां याच कलमावर तूट खावी असें नाहीं. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस कुटुंब सुद्धां स्वाधीन इंग्रजांनीं करावें आणि वरकड कलमां पैकीं पेशजी लिहिण्यांत आलीं व जेथवर साधतील तेथवर साधून घेऊन लवकर तह करावा. या उपर विलंब लावूं नये. रवाना छ. २२ रबिलावल हे विनंती.

ले. ४०१ [१९४] | माघ व. ९ श. १७०४ ता॥ २५-२-१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. हैदरखान वारले, त्यांचे चिरंजिवांस मातमपुरशींचीं वस्त्रें पाठविलीं, हा मजकूर पेशजी लिहिलाच होता. पुत्रही पराक्रमी आहे. परंतु हैदरखानाचा दाब इंग्रजांवर मातबर होता, यामुळें इंग्रज खानास वचकत होते. खान वारल्यावर इंग्रजानीं तिहींकडे तीन टोळ्या करून त्याच्या मुलखांत पाय शिरकाविला. एक टोळी बिदनुराकडे येऊन बिदनूर संस्थान मोठें तें इंग्रजांनीं हस्तगत केलें. थोडा थोडा कदम पुढें टाकीत चालिले म्हणोन बातमीचीं पत्रें आलीं. त्यावरून वर्तमान कळावयाकरितां लिहिलें आहे. इंद्रसेन पाटीलबावांजवळ आहे तो हेष्टीना पासून आला. मुक्तयार आहे. या करितां सरकारचा तह पेशजी लिहिल्याप्रमाणें या उपर दिवसगत न लागतां दादासाहेब कुटुंबसुद्धां हस्तगत करून घेऊन पक्का तह लौवर व्हावा. या उपर विलंब लाऊं नये. रा॥ छ २२ रबिलावल हे विनंती.

ले. ४०२ [२४०] | माघ व. ९श. १७०४ ता॥ २५-२-१७८३

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे लग्नाचा निश्चय माघ शुद्ध नवमीस झाल्याचीं वगैरे पत्रें पेशजी लिहून पाठविलीं होतीं त्यांजवरून कळलेंच असेल. त्यावर माघ शुद्ध नवमीस इंदुवारीं श्रीमंतांचें लग्न जाहलें. महाराज राजश्री छत्रपतीस्वामी साताऱ्याहून लग्नसमारंभास आले. समारंभ चांगला जाहला. पाटीलबावांस वर्तमान कळण्याकरितां लिहिलें आहे. नबाबाचे पुत्र येणार होते ते समारंभाचे समयीं येऊन पोंहोचले नाहींत. मागाहून आले.

नबाबाची व धौषाचे लेक यहतिशामतजंग यांची लढाई निर्मळेवर भारी जाहली. त्यावर यहतिशामतजंगानें आपले आईस नबाबाकडे पाठवून अ ना य घेऊन हात बांधोन येऊन नबाबास भेटला, या उपर त्यास कसें ठेवितात तें पहावें. निर्मळ व कांहीं जहागिरी त्याकडे ठेवावी असें आंतून करारा आहे. पुढें होईल तें लिहून पाठवूं. परंतु ही मसलत त्यांची जाहली. रा छ २२ रोवल हे * विनंति.

ले. ४०३ [२४५] फाल्गुन शु. ३ श. १७०४ ता ६-३-१७८३

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. छ. २६ सफरचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. राजश्री पांडुरंग रघुनाथ यांचीं पत्रें पुरवण्यासुद्धां सहा आलीं तीं पाठविलीं आहेत त्यांवरून विदित होईल. राजश्री अंबोजी इंगळे यांचे गांवचे महजराविशीं रामजी पाटील विनंती करतील त्यांस आज्ञा व्हावी कीं, गुदस्त महालकरी यांजपासून पैका घेतला व सालमजकुरीं अंतस्तें घेतलीं आहेत तीं द्यावीं आणि रुपया घेतला आहे त्याच्या यादी कमाविसदाराकडून आणविल्यास येतील. तो जाबसाल आलियावर पत्राची आज्ञा होणें तर व्हावी, म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास पांडुरंगपंतांचीं पत्रें पाठविल्याप्रमाणें पावलीं. उत्तरें आलाहिदा लिहिलीं आहेत त्यांवरून कळेल. अंबोजी +इंगळे यांचे महजराविषयींचा मजकूर लिहिला या अन्वये रामजीपाटील यांशीं बोलतों. रा छ. २ रविलाखर हे विनंति.

ले. ४०४ [१९६] फाल्गुन शु. ११श. १७०४ ता १३।३।१७८३

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. तुम्हीं छ १९ रविलावल मुक्काम नजीक ग्वालेर येथील पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. इंग्रजांचा तह करणें त्याविशीं श्रीमंत दादा साहेबांचें कलम पक्कें करून घेऊन मग तहनामा हवालीं करावा अशी आज्ञा. या अन्वयें बोलत असतां हैदरखान मेल्याचें वर्तमान आलें, त्यावरून तहनामा हवालीं करावा, येविशीं राजश्री पाटिलबावांनीं आग्रहें करून सांगितलें. आम्हीं उत्तर केलें कीं, धन्याची आज्ञा अशी नाहीं, व तुमचे लिहिण्यांत ही असें नाहीं, तेव्हां तहनामा कसा द्यावा? त्याजवर राजश्री आपाजी राम दाभोळकर व राघोजीपंत गुरुजी यांस मध्यस्तीस घातलें.

---

* निर्मळचे जहागीरदार धौशे यांचें व निजामअल्लीचें वांकडें पडून धौशांनीं बंड केलें होतें. मराठ्यांनीं निजाम अल्लीची मदत केली.

+ इंगळे महालुंग्याचे यांच्या गांवच्या महजराची भानगड काय होती तें समजत नाहीं.

परंतु आम्हीं ऐकिलें नाहीं. पाटीलबावांचें ह्मणणें जे, हैदरखान वारले या उपर ओढणें ठीक नाहीं. दादांचें कलम नीट करून देऊं, असा कागद श्रीमंतांस लिहून देतों. तहनामा द्या, नाहीं तर इंद्रसेनास निरोप देतों. मग जें होणें तें होईल. आम्ही इकडील तोंडावर आहों. तिकडे संभाळणें तसें संभाळावें. परंतु आम्हास आज्ञा नाहीं कबूल कसें करावें? शेवटची गोष्ट निग्रह करून तहनामा आम्हांपासून घ्यावा असा डौल दिसतो. आज्ञा येईल तशी वर्तणूक करूं. म्हणून तपाशिलें करून लिहिलें तें कळलें. त्यास तुम्हीं उत्तरें प्रत्युत्तरें ठीकच केलीं. त्यांणीं आम्हांस लिहिलें त्या भरोंशावर तहनामा पाठविला. त्यांणीं लिहिल्याप्रमाणें निभवावें हें उचीत. पाहिलें लिहिणें काय? हल्लीं बोलतात काय? असो. परंतु हैदरखान मृत्यु पावले हेंही निमित्य ज ले. त्या पक्षीं पाटिलबावा म्हणतात कीं, दस्तऐवजीं कागद लिहून देतों तो कागद लिहून घेऊन, आम्हांस धण्याची आज्ञा नाहीं परंतु आपण सांगतात त्या अर्थी देतों. ज्यांत श्रीमंतांचे दौलतींचें कल्याण तीं गोष्ट करावी. इतकें सांगून दस्तऐवज लिहून घेऊन त्यांजकडील तहनामा आपले जवळ घेऊन मग इकडील तहनामा हवाली करणें. येवढे थोर सरदार, पाहिल्यानें लिहिलें काय? हल्लीं निग्रह करून घेणार ही रीत नव्हे. असो. पक्की बळकटी करून घेऊन करावें. रा॥ छ. ९ रा खर हे विनंती.

ले. ४०४
[२३७]

फाल्गुन व. १३ शु. १७०४
ता॥ ३०-२-१७८३

आम्हीं तुम्हांस द रे वी सा हून पत्र पाठविलें त्याचें उत्तर तुम्हीं पाठविलें तें आम्हांस गुडलूरचे मुक्कामीं छ १४ रबिलाखरीं पावलें. तें वाचून बहूत खुशाल जाहलों. तुम्ही हमेशा दोस्त फराशिसांचे आहां. आम्हांस आमचे खावंदानीं बहूत फौज व सरंजाम देऊन या प्रांतीं पाठविलें. कारण इंग्रजांस तंबी करून मारून काढावा. आमचे खावंदाचा आम्हांस हुकूम आहे कीं, हिंदुस्थानांतील सरदार आहेत त्यांचा मुलूख व किल्ले इंग्रजांनीं घेतले आहेत ते त्यांजपासून घेऊन ज्यांचे त्यांस द्यावे. आम्ही तुम्हांस लिहिलें आहे हें खरें मानावें. यांत तफावत पडणार नाहीं. मुसामुंतीण यांणीं मुसा वर्णेत याज समागमे पत्रें पाठविलीं तीं सर्व पावलीं. तीं पाहून बहुत खुषी झाली कीं, तुम्हीं इंग्रजा समागमें सल्ला करीत नाहीं. तुम्हीं खरें जाणावें कीं, आतां तिकडे यावयाचा मोसम नाहीं. मोसम आलीं म्हणजे आम्हीं बहुत मजबुदी सरंजामानिशीं तिकडे येतों. तुम्हीं आम्ही मिळोन इंग्रजांस खस्त करोन टाकूं. आम्ही आपली फौज व दारूगोळा सारा तयार केला आहे. थोडक्याच दिवसांत आम्ही आपल्या शत्रूवर चालून चेनापटणावर जातों. आमचा दुस्मान आहे त्याशीं लढाई करून तंबी करून जलद तुम्हांस वर्तमान लिहून पाठवितों. जे इंग्रजास सामील होतील त्यां सुद्धां तंबी श्रीमंत व आम्ही मिळून केली जाईल. तुम्हींही इंग्रजाशीं लढाई करावी. मुसामुंतीण यांणीं आम्हास लिहिलें कीं, श्रीमंत राजश्री माधवराव साहेब यांची शादी झाली. आमचे

तेर्फेनें मुबारखबाजी करावी म्हणोन मुसामुर्तीण यास लिहिलें आहे. आमचा व श्रीमंत कैलासवासी बाळाजीराव यांची व आमची बहुत दोस्ती होती. कोलेनल मुसामुर्तीण तुम्हांपाशीं आहेत ते इतबारी पातशाहाचे व वजीराचे व आमचे आहेत. जे आपणांस सांगावयाचें असेल तें यांजबळ सांगावें. यांजला जें सांगणें तें तुम्हांजवळ सांगतील. तुमचे जबाबास आम्ही बहुत उमेदवार आहों. ईश्वर तुम्हांस फत्ते देऊ. छ २६ रविलाखर सन सल्लास समानीन.

ले. ४०५ [२६७]

चैत्र शु. ३ श. १७०५ ता॥ ४-४-१७८३

॥ श्री. ॥

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. हैदरखान वारल्याचें वर्तमान प्रथम इंग्रजांचे घरीं आलें, मागाहून पुण्याहून बातमीचीं पत्रें आलीं. छ ६ रविलाखरीं टिपूचें पत्र बावांस आलें. त्यावरून अप्रमाण कसें मानावें? वर्तमान तथ्य आहे आहे असें असतां स्वामींनीं न लिहिलें यावरून पाटीलबावा बोलले जे, एवढें थोरलें वर्तमान श्रीमंतांनीं लिहिलें नाहीं. अपूर्व आहे म्हणोन लिहिलें ते कळलें. त्यास खान वारल्याची बातमी येथेंही आली व खानाकडील नूरमहंमदखान येथें आहेत त्यांस लिहिलें आलें. परंतु आपले वकीलांचे लिहिलें आलें नव्हतें. या मागें एक दोन वेळां अशींच वर्तमानें आलीं परंतु तीं मिथ्या जाहलीं, यास्तव लिहिलें नाहीं. वकीलांचे लिहिलें आलें त्यावरून पेशजी तुम्हांस लिहिलें आहे त्यावरून कळलेंच असेल. टिपूचें †पत्र पाटीलबावांस नसेल, नूरमहंमदखानानीं लिहिलें असेल. त्यास बिना सरकारचे वकीलांचें पत्र आलियाखेरीज कसें लिहावें म्हणून लिहिलें नाहीं. नाहीं तर येवढें वर्तमान लिहावयासि विलंब न होता. एक एक वर्तमान येथें असें ही उठलें होतें कीं त्याहावयास खातरजमा न होई. वकीलांचीं पत्रें आलियावर खातरजमा जाली तेव्हां लिहून पाठविलें. रा॥ छ १ जाावल हे विनंति.

ले. ४०६ [२९७]

चैत्र शु. ३ श. १७०५ ता॥ ४-४-१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. इंग्रजांकडील तहनामा यादी प्रमाणें लिहून पाठवावा व एक डौल शिक्का करून पाठवावें. नवीं कलमें बोलण्यावर आलीं त्याप्रमाणें व श्रीमंत राजश्री दादासाहेबांस अगोदर घ्यावयाचें पक्कें करूं तेव्हां नवीं कलमें बोलण्यांत आणलीं तें डौलांत भरून त्याप्रमाणें इंद्रसेनाकडून कलकत्याचा तहनामा आणवून तो घेऊन मग डौल भरून तयार केलेला देऊं. यादीप्रमाणें येईल तो देणार नाहीं. म्हणोन तीन खानग्यांचीं पत्रें राजश्री पाटीलबावांचीं

† येथपासून खुद्द नानाचें अक्षर आहे.

व तुमचीं आलीं होतीं. व पूर्वीपासून श्रीमंतांचे घरचा विश्वास शिंद्यांचे लिहिण्यावर व बोलण्यावर कीं सरकार कामावर अथवा मर्यादेंत अंतर घडणार नाहीं असें जाणोन तहनामा व डौल पाठविले व तह करावयाविषयींही लिहिलें. त्यास राजश्री पाटीलबावांचे लष्करांतून चार पांच ठिकाणीं लिहिलीं आलीं कीं, सरकारचे वकिलावर जबरदस्ती करून तहनामा घेऊन इंग्रजांस दिल्हा. तुम्ही तो मोघम—परंतु भोंसले, होळकर व हैदरखानाकडील वकिलांनीं वगैरे विस्तारें त्यांस लिहिलें त्यावरून अपूर्व वाटलें. तहनामा व डौल विश्वासानें पाठविले असतां असें न घडावें व हा लौकिकही करावयाचा नव्हता. तह करणें खराच. लिहिलीं पुसलीं ही आलीं गेलीं, तेव्हां अशी गोष्ट बाहेर दिसिवणें यांत काय ध्यानांत आणलें असेल तें असो. थोर आहेत त्यांचें लिहिणें बोलणेंचें प्रमाण असतें व त्या विश्वासावरच मोठीं कामें होत असतात व ज्या मर्यादा आहेत, त्या चालविल्या असतां कल्याण होतें. असो. जें यांचे थोरपणास चांगलें दिसलें असेल तें केलें असेल. श्रीमंत राजश्री दादासाहेब पूर्वी हरी बाबाजीचा नाश करून निघोन गेले. त्यावर राजश्री पाटीलबावांचीं बोलणीं झालीं कीं, दादासाहेब कुटुंबासुद्धां सरकारांत आणून हवालीं करीन. येविषयीं शर्तीचीं बोलणी चिमापा व तुम्हांजवळ जालीं होतीं त्यांचें स्मरण तुम्हांस असेल. त्या निश्चयावरून हल्लीं ईश्वरें तसें घडावयास आणिलें आहे. दादासाहेबांचा बंदोबस्त होणें कठिण आहे. एखादा फितूर कीं दंगा केल्यानें दौलतीसच पेंच बसावयाचा. याकरितां दादासाहेब कुटुंबासुद्धां येथें पाठवून द्यावे हेंच बरें. यांत असें होईल कीं, ज्यांजपासून गेले त्यांनीं आणून सरकारांत दिल्हे. यांत निमित्यही पुढें मागें राहत नाहीं. येविशीं राजश्री पाटीलबोवांशीं बोलून पक्कें करून घ्यावें आणि लिहून पाठवावें. रा छ १ जीावल हे विनंती.

ले. ४०७ [१९८] चैत्र शु. ३श. १७०५ ता ४-४-१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि श्रीमंत राजश्री दादासाहेब यांस इंग्रजांनीं हवालीं करावें, याप्रमाणें पक्का ठराव राजश्री पाटीलबावांनीं करून घेऊन मग तहनामा सरकारचा पाटीलबावांनीं इंग्रजांस दिल्हा व इंग्रजांचा आपणापाशीं घेऊन दादासाहेबांस आणावयाकरितां राजश्री केसोपंतांस पाठविलें. त्यास दादासाहेब त्याजपाशीं येतील. आल्यावर येथेंच आम्हांकडे पाठवितील. कदाचित् दादासाहेब येते समयीं वाटेनें एखादी गलबल केली अथवा हरतऱ्हा करून निघोन गेल्यास फार विलग पडेल. याकरितां येविशींचा बंदोबस्त चांगला असावा व केलाही असेल. परंतु सूचली गोष्ट लिहिली आहे. कां कीं त्यांची रीतभात व बोलण्याची प्रमाणिकता सर्व माहीत आहे व पूर्वी अनभवासही आली* आहे. तेव्हां याचा बंदोबस्त चांगला

---

* पूर्वी दादास शिंदे बुंदेलखंडी नेत असतां ते नजर चुकवून पळून सुरतेस इंग्रजांकडे गेले होते. + येथून खुद्द नानाचें अक्षर.

असावा. सारांश पाटीलबावांपाशीं सुरक्षित येऊन पोंहोचून येथें येत असें घडावें. मध्येंच निघोन गेले तर विलग पडेल. कोणे गोष्टीविशीं विश्वासावर जाऊं नये. रा छ १ जमादिलावल हे विनंती.

ले. ४०८ [१९९]

चैत्र शु. ३श. १७०५ ता ४-४-१७८३

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. राजश्री पाटीलबावा म्हणूं लागले कीं, इंग्रजांचा तह झाला त्यांचा कंपू मंबईत रिकामा बसला आहे, त्यास पुढें सरकार व इंग्रज मिळून हैदरखानावर मसलत करावयाची त्याची तरतूद एथ्हां पासून होऊन योजना घडावी. इंद्रसेन म्हणतो जे, तुम्हांस गरज असल्यास कंपू ठेवूं, नाहीं तर कलकत्त्यास बलावूनं घेऊं. म्हणोन लिहिलें. त्यास येथून खानास लिहून पाठवूं. त्यांनीं महमद अलीखानाचा व इंग्रजाचा मुलुख सोडून सरकारचे दोस्तींत राहिले तर बरेंच जालें; ऐकिलें नाहीं तर त्याजवर मसलत करावी लागेल तेव्हां कंपू उपयोगीं पडेल. याजकरितां तूर्त आहे तेथें असों द्यावा. + टिपूनें न ऐकिलें तर सरकार व इंग्रज मिळून मसलत करावयाचे करारांतच आहे, त्या पक्षीं कंपू असावा हें बरें. येथून लिहून जाईल त्याप्रमाणें त्यांनीं सामील व्हावें. हा पुढील मनसबा आहे. आधीं सरकारचा मुलूख किल्ले ठाणीं येतील, श्रीमंत राजश्री दादासाहेब कुटुंब सुद्धां येतील, तदनंतर खानास लिहून न ऐकिलें तर मसलत करावयाची ती होईल. रा॥ छ १ जे॥ वल हे विनंती.

ले. ४०९ [२१७]

चैत्र शु ३ श १७०५ ता ४-४-१७८३

राज.

राजश्री पाटिलबावा गोसावी यांसि.

आशीर्वाद विनंती उपरि. राजश्री नारो शिवदेव यांस तिकडे जाऊन बहुत दिवस जाले, व त्यांचे घरींही अडचणी आहेत, यास्तव मशारनिलेनीं येण्याविशीं एक दोन वेळां लिहिलें. परंतु इंग्रजांचे तहाचा जाबसाल होत होता. याजकरितां त्यांस येण्याविशीं लिहीलें नाहीं. आतां तहही जाला. त्यास मशारनिलेस इकडे रवाना करावें. रा॥ छ १ जावल बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

ले. ४११ [२०१] चैत्र. व ९ श. १७०५ ता। २५-४-१७८३

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. सुरतेस श्रीमंत राजश्री दादासाहेबांस इंग्रज खर्चास देत होते ते हल्लीं देत नाहींत. व इंग्रजांचा तह जाला हें चित्तांत आणून चौंहीकडे राजकारणें दादासाहेब यांचीं चालीस लागलीं. टिपू, नबाब, भोंसले वगैरे यांजकडेही कारकून रवाना केले. याप्रमाणें बातम्या येतात. त्यास दादासाहेबांस इंग्रजांनीं स्वाधीन करावें असें करारांतच आहे. राजश्री पाटील बावांचे स्वाधीन जाल्यास सरकारांत हवालीं करतील, परंतु मध्येंच कोठें निघून गेले तर ठीक नाहीं याचा बंदोबस्त जरूर करावा. इंग्रजांची अटकही नाहीं. पांच सात कोस जातात येतात असें आहे. याकरितां लिहिलें आहे. मध्येंच निघोन गेले तर इंग्रज म्हणतील, आम्हीं काय करावें आणि तह तर जाला. मुद्दा हातचा गेला असें होईल. याचा बंदोबस्त चांगला करावा. रा॥ छ. २२ जमादिलावल हे विनंती.

ले. ४१२ [३१२] चैत्र व. ९ श.१७०५ ता। २५-४-१७८३

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. राजश्री पाटीलबावांनीं इंग्रजांशीं सलूख करून परस्परें तहनामे दिले घेतले. इकडे तों फराशीस भारी सरंजामानिशीं आले. टिपूनीं बिदनूर प्रांतीं हंगाम केला. या उपर उलटून फराशीस आपण एक होऊन चेनापटण घेतलें तर मसलत भारी पडेल. दक्षणेंत इंग्रजांचें मकाण सुरत मुंबई खेरीज नाहीं. करनाटक निर्वैर टिपू फराशीस एक. तेव्हां कसा कल बसेल न कळे. यास्तव याची तजवीज पाटीलबावांस,काय ठरवितात, मनसबा कसा करावा येविशीं एकांतीं चार घटका निवळ बोलोन, पक्का मनसबा काय सांगतात तो लेहून पाठवावा. इंग्रजांचा तह ठरला हा एके प्रकारें ये समयीं बरा होता. त्यास हल्लीं भारी सरंजामानशीं फराशीस आले. ते व टिपू एक, त्यांत दुसरे मातबर कोण कोण मिळतील, अशा तिडणी आहेत. यांत कसा कल बसेल, याकरतां याचा पुर्ता विचार लिहून पाठवावें. रवाना छ २२ जमादिलावल हे विनंती.

ले. ४१३ [३०९] चैत्र व.९ श.१७०५ ता। २५-४-१७८३

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. राजश्री पाटीलबावा म्हणतील कीं, टिपूशीं सलूख केल्याप्रमाणें बोलावें. ऐकिल्यास उत्तम. नच ऐकेल तर आपलें वचन क्रिया उगवली. मग इंग्रजांची

कुमक करावी यांत सरकारचा नफा आहे. ऐशास यांत एक पेंच आहे. कोणता म्हणाल तर सरकारांतून फौजा पाठवणें व कुमक करणें हें कांहीं बरसातींत घडत नाहीं. दसरा झालिया वरील तजवीज. दसऱ्यास साहा महिने अवकाश. टिपू सरंजाम सुद्धां पाऊसकाळ न म्हणतां लढाईस मबजूद. फरांसीसही भारी जमाव सुद्धां आले. दोघेही मजबूद. श्रीमंतांचा सलूख झाला हें समजलें आहे, तेव्हां फुरसत पहूं न देतां चेनापट्टणावर जातात. इंग्रजी जमाव व कलकत्ते व असफुदौला कडील तालुक्यांतील व अंतरवेद, सुरत, मुंबई आदिकरून दौलतींचा लढाईचा सरंजाम व मातबर सरदार व गोरे जमीयत चेनापट्टणास जमलीं. तेथें मोठींच लढाई पडेल. न जाणो, चेनापट्टण घेतलें तर सारा जमाव निकड करून कामास येईल. दुसरीकडे निघून जावयास ठिकाण नाहीं. हा जमाव पेचांत आला असतां पुढें इंग्रजांपाशीं कांहीं नाहीं असें जाणावें. आणि टोपीकरांचा पल्लाही लांब. बरें काय चिंता आहे, वरीस दोन वर्षे दम खाऊन मजबूतपणें पुढें करणें तें करूं, असेंही कौन्सिलांत इंग्रज ठरवितील. तेव्हां टिपू व फरासीस जबरदस्त. कर्नाटक निरवैर जालें. नजर मुंबई सुरतेवर ठेवितील किंवा काय मनसबा करतील हें क्यासांत येत नाहीं. असें जाल्यास भारी तिडण पडेल. फरासीस दहा बारा हजार गोरा उतरला, तेव्हां याचें आश्चर्य नाहीं. घडूं शके. विलायतेस फरासीस व वलंदज व पुर्तकेश तिघे टोपीवाले एक झाले आहेत असें ऐकितों. श्रीमंतांचे दौलतीचें ओझें पाटीलबावांवर. यास्तव याचें पूर्तेपणीं मनन करून पाटीलबावांनीं ल्याहावें. खुलासा उत्तरें लौकर यावीं. रा छ २२ जमादिलावल. हे विनंती.

ले. ४१४ [२३५] — चैत्र व. ९ श. १७०५ ता० २५-४-१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं

विनंति. उपरि इंग्रजांशीं सलुख तुह्मांसुद्धां आम्हीं केला त्याप्रमाणें तुम्ही ऐकावें हें उत्तम, हें साफ टिपूशीं बोलावें कीं न बोलावें. इकडून आदी काय पडदा पळायास केला नाहीं. नबाब बाहदुरासुद्धां इंग्रजांशीं सलुख केला याचा तपशील मागाहून पक्कें ठरल्यावर लिहून पाठवूं,, ऐशीं पाटीलबावांचीं पत्रें आलीं, इतकाच मजकूर सांगितला. लौकिकांत सलुखाचा गलबा संपूर्ण झाला. आम्ही मात्र टिपूस लिहिलें नाहीं. सदरी लिहिल्याप्रमाणें बोललों. पुढें स्पष्ट बोलावें किंवा दुसरें कांहीं सांगून नाद ठेवावयाची तजवीज करून ठरावून त्याशीं कसें बोलावें हें पाटीलबावांस पुसून लिहून पाठवावें. तूर्त समेट करावयाच्या युक्तीनें टिपूशीं बोलावें म्हणतील तर फराशिसांचे व टिपूचे दारमदार झाले, त्यावरून फराशीस आले. विदनूर घेतल्याच दाखल. तेव्हां हें बोलणें त्यांस गोड लागणार नाहीं. चेनापट्टण कदाचित घेतलें तर मग तों नजर ठिकाणींच राहणार नाहीं.

इंग्रजांशीं तह जाहाला हें वर्तमान फराशिसांकडील वकील मुसांमुतीण यास परभारें समजलें, त्यावरून वकील येऊन निरोप मागूं लागला, तेव्हां त्याशीं टिपूस जितका मजकूर कळविला तितकाच वकीलाशीं बोलण्यांत आणिला. पुढें फराशिसांसीं कसें बोलावें, राजकारण राखावें किंवा तोडावें, याचा विचार पाटीलबावांस पुसून लिहून पाठवावा. इंग्रजांचा तह जाहाला असतां फराशिसांचा वकील रहात नाहीं. मुसाभुसी भारी सरंजामानिशीं आला, तेव्हां मनसबा कसा पडेल कळत नाहीं. रा॥ छ २२ जमादिलावल हे विनंति.

ले. ४१५ [२१३] चैत्र व ११ श. १७०५ ता॥ २७-४-१७८३

श्री

सेवेसीं आज्ञाधारक गोविंद राम कृतानेक विज्ञापना ऐसिजे. ता॥ छ. २४ जमादिलावर मुक्काम पुणें पावेतों साहेबांचे कृपेकडून सेवकाचें वर्तमान यथास्थित असों. विशेष. राजश्री नारो शिवदेव यांनीं श्रीमंत राजश्री नाना स्वामीस पत्र पाठविलें कीं, गोविंद राम यानीं पुण्याहून पाटीलबावांस पत्रें लिहिलीं कीं, खांसा नबाब पुण्यास येणार, हैदरखान मेला, पाठीमागें टिपूवर इंग्रजांची मसलत, या समयीं त्यांचा उपराळा न केला तर इंग्रज त्याची दौलत घेऊन पुढेंही चाल करतील. यांचा इतबार नाहीं, या करतां सरकार व नबाब यांणीं टिपूची कुमक करून इंग्रजांचा रेंच मोडावा. टिपूचाही पैगाम आहे कीं खानाचा काळ जाला, या समयीं आमची कुमक करावी. मुसा भुसी फरासीस आपले जमावासुद्धां टिपूजवळ येऊन पोंहोंचला. एक वकीलही पुण्यास आला आहे. पंचवीस लक्ष रुपये तूर्त फौजेस मदत खर्च घ्यावा. याप्रमाणें आंतून नूरमहंमदखानाचे विद्यामानें ठराव होऊन सरकारची दहा बारा हजार फौज मिरजकर, रास्ते वगैरे मिळाले. तिकडे खाना होणार, तर्तूद होते. नबाबासही कांहीं द्यावें आणि आपले कुमकेस न्यावें याप्रमाणें टिपूचे घाट आहेत. नबाब हींच मसलत बोलावयाकरितां पुण्यास येतात येविशीं येथीलही कारभारी यांचे संमत आहे. आपले हातून इंग्रजांचा तह झाला नाहीं हें मुख्य साऱ्यांच्या पोटांत आहे, या करितां सारे एक होऊन टिपूची कुमक करावी याप्रमाणें विचार होतात. कदाचित् त्याची कुमक न केली आणि शिंद्यांनीं तह केला हाच सिद्धीस न्यावा, तर इंग्रज त्यांच्या लगामीं राहिले. दुसरें श्रीमंत राजश्री दादासाहेबांस आपले बगलेंत ठेवणार, उपरांतिक म्हणतील तसें ऐकावें. कदाचित् मसलतीमुळें देशीं बोलाविलें तर इंग्रजांचीं पलटणें बरोबर घेऊन मातबर जमावानिशीं येणार तेव्हां स्वइच्छा व्यवहार होईल तेंही ठीक नाहीं. यास्तव तूर्त नूरमहंमदखानाचे विद्यमानें ठराव होतो त्याप्रमाणें पैका घेऊन टिपूकडे फौज खाना करावी. पर्जन्यकाळ जवळ आला, दोन महिने दरम्यान आहेत, इतक्यांत फौजेची तयारी होऊन फौज खाना करावयास मासपक्ष पाहिजे, त्यावर सरदार व येथून जाईल त्यांणीं तुंगभद्रा

तीरीं छावणी करावी, इकडे पाटीलबावांस लिहून पाठवावयासि येईल कीं, तुम्हीं टिपूचे मसलतीस फौज रवाना करावयासि लिहिलें त्यावरून दहा हजार बारा हजार फौज रवाना केली, परंतु दरम्यान बरसात आली आहे, याकरितां छावणी तुंगभद्रा तीरीं होऊन बाद-वरसात चुकवून अर्थ घ्यानास येतील तों पावेतों सरकारचे किल्ले कोट मुलूक इंग्रजांकडून सरकारांत यावयाचे व दादासाहेब यावयाचे याचें काय होतें तेंही समजेल. ज्यांत सरकारचा नफा आडळेल तशासारखे डौल धरावयासि येतील असे विचार एकांतांत होतात. फौज अवश्यमेव टिपूचे कुमकेस रवाना होते यांत संदेह नाहीं. याप्रमाणें गोविंद राम यांचीं पत्रें पुण्याहून श्रीमंत राजश्री पाटीलबावांस आलीं. त्यांतील मजकूर सदर्हू प्रमाणें पाटील-बावांनीं आम्हांस सांगितला म्हणोन मशारनिल्हेचीं पत्रें सरकारांत आलीं, तीं नाना स्वामींनीं मजला दाखविलीं, त्यावरून त्या पत्रांतील मालुमांत धरून सेवेशीं विनंतीपत्र लिहिलें आहे, घ्यानास येईल. ऐसियास रास्ते व परशरामभाऊ यांजकडील दहा हजार फौज टिपूचे कुमकेस पाठविणार म्हणोन बाजार वदंता ऐकिल्यावरून मात्र लिहिलें होतें. मागाहून शोध पहातांना हें वर्तमान मिथ्या म्हणोन सेवेशीं विनंती लिहिली होती. वरकड मजकूर मालुमांतील प्रमाणें मीं ऐकलेंही नाहीं, आणि सेवेशींही लिहिलें नाहीं असें असतां हा मज-कूर येथें लिहून आला, त्यावरून सेवेशीं विनंती लिहिली. असो. साहेबांचे सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. ४१६ [२६९] चैत्र व. १२ श. १७०५ ता २८-४-१७८३

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. रामजी पाटलास पाठवावा हा निश्चय ठरल्यावर राजश्री पाटील-बावांनीं राजश्री आपाजीराम यांस व मजला बोलावून सांगितलें जे, पुण्याहून गोविंद राम व रामजी पाटलाकडून कारकून यांचीं पत्रें आलीं त्यांत त्यांणीं लिहिलें आहे कीं, नबाब पुण्यास येणार व टिपूचे कुमकेस रास्ते मिरजकर वगैरे मिळोन दहा हजार फौज सरकारची जाणार. याप्रमाणें लिहिलें आहे व इंग्रजांचे घरीं बातमी आली. त्यांणींही सांगोन पाठविलें. त्यास तह जहाला असतां टिपूचे कुमकेस फौज जाणार हें ठीक कीं काय? पंचवीस लक्ष रुपये तूर्त सरकारचे फौजेस मदत खर्च घ्यावा याप्रमाणें नूर महंमदखानाचे विद्यमानें ठराव जहाला आहे. त्याप्रमाणें पैका घेऊन फौज तिकडे रवाना करावी. इकडे टिपूचे मसलतीस फौज रवाना केली असें लिहून दोहोंकडे नाद राहून फौजेची छावणी तुंगभद्रातिरीं करवावी. चातुर्मास्यांत चोहोंकडील विचार घ्यानांत आणून पुढें पहावें तसें करावें. याप्रमाणें विचार होतात. त्यास आधीं टिपूजवळ फौज गेल्याखेरीज पैका तो देईल हें घडणें जरूर. त्यांतही दिल्हा तर ही गोष्ट लपणार नाहीं. मग दोहोंकडे नाद कसे रहातील? जें होणें तें विचा-

रून म्हावें. तशीच मर्जी असल्यास त्यासारखा विचार करावा लागेल. यास्तव रामजी जाधव यास पाठवितों. टिपूनें इंग्रज [व] महमदअल्लीखानाचा मुलूख सोडून देऊन खलष तोडावा. न ऐकल्यास इंग्रजांनीं ताण बसविलाच आहे. इकडून सरकारची फौज पाठवून मुलूख सोडवावयास लागावें. येविशीं दोन तीन रवानग्या केल्या असतां अद्याप उत्तर देखील येत नाहीं. असो; हल्लीं तोच मजकूर रामजी जाधव यांजबराबर सांगोन पाठवितों. ते राजश्री नाना यांसि बोलतील. पूर्वी पत्रें पाठविल्यावरून नूर महमदखानाशीं बोलोन त्यांचीं पत्रें टिपूकडे जाऊन उत्तरें आलीं असतील तेही कळतील. कदाचित् बोलले नसले तर मशारनिल्हे त्याशीं बोलतील. या कामा करतांच यांस पाठवितों. याप्रमाणें बोलणें जहालें म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. त्यास नबाब आपले जागां आहेत. त्यांचें पुण्यास यावयाचें येथें तर कांहीं समजण्यांत नाहीं. टिपूचे कुमकेस मिरजकर व रास्ते मिळोन वगैरे दहा हजार फौज सरकारची जाणार म्हणून लिहिलें त्यास मिरजकर तर लग्नास निरोप घेऊन गेले. रास्ते येथें आहेत. इकडे तह होत असतां फौज टिपूचे कुमकेस पाठवावयाचें कसें घडेल ? व पंचवीस लक्ष रुपये सरकारचे फौजेस टिपूनें मदत खर्च देणें हेंही घडणें कळलेंच आहे. सरकारचे खंडणीचे रुपये करारप्रमाणें सालोसालचे कोठें येतात, तेव्हां हे देईल ? असो; फौज कुमकेस टिपूचे पाठवून इकडे लिहावें कीं, मसलतीस पाठविली, तेव्हां दोन्ही नाद कसे रहातात , म्हणोन लिहिलें. त्यास फौज पाठवायाची संभूतही येथें नाहीं, तेव्हां जाते कोठून ? टिपूनें करारप्रमाणें इंग्रज [व] महमद अल्लीखानाचा मुलूख सोडून देणें व पाडाव सोडून देणें हें न ऐकल्यास मसलत करण्याचे विचार. त्यास बरसात आली. इतक्यांत टिपूचीं उत्तरें येणें आहेत तें आल्यावर समजेल. त्यासारखा विचार करारप्रमाणें टिपूनें न ऐकल्यास बाजबरसात टिपूवर मसलत करणें प्राप्त. त्यास सरकारचा प्रकार तर पैक्याची ओढ सरकारांत कोणे प्रकारची हें सर्व ध्यानांतच आहे. होळकराविशींचा प्रकार पेशजी किती वेळ विस्तरें करून लिहून पाठविला, परंतु त्या पत्राचीं उत्तरेंच येत नाहींत. यावरून काय समजावें ? छ. १७ मजकुरीं रवानगी केली त्यांत साराच तपशील उलगडून लिहून पाठविला आहे. या उपरि पत्राचे उत्तरास विलंब नसावा. लिहून पाठविलें आहे त्याप्रमाणें परिछिन्न पाटीलबावांनीं बाईस सांगोन पाठवावें कीं, चार महाल तुम्हांकडे आहेत, त्यांपैकीं डौलाचे खर्चापुरता ऐवज ठेवून बाकी ऐवज सरदारीकडे पाठवून द्यावा. व वरकड महाल रदकर्ज सुद्धां तुकोजीबावांकडील महालकरी आहेत त्यांची वहिवाट ते करतील. मसलतीमुळें चार रुपये अधिकआगळे घेऊन सरकार काम करतील यास अडथळा बाईचा नसावा. याप्रमाणें साफ सांगोन पाठवावें आणि अमलांत यावें. पत्राचें उत्तर लवकर पाठवावें, तुम्हीं दुसरें लिहिलें कीं, रामजी जाधव यांची रवानगी करतों, करारप्रमाणें टिपूनें इंग्रज [व] महमदअल्लीचा मुलूख व पाडाव न सोडल्यास इंग्रजांनीं ताण बसविलाच आहे. इकडून सरकारची फौज पाठवून मुलूख सोडवावयास लागावें. येविशीं दोन तीन रवानग्या केल्या असतां अद्याप उत्तरें देखील येत नाहींत. असो. हल्लीं तो मजकूर रामजी पाटलाबरा-

बर सांगोन पाठवितों, ते नानांशीं बोलतील म्हणोन लिहिलें. त्यास टिपूनेंच इंग्रजांस ताण दिला. बिदनूर जुरतीनें घेऊन इंग्रज हत्यारें ठेवून कौल घेऊन बाहेर निघाले ते कैद केले. येविशींचे वर्तमानाचीं पत्रें पेशजी रवाना केलीं त्यांवरून सविस्तर कळलेंच असेल. तेव्हां इंग्रज व महमदअल्लीचा मुलुख व पाडाव सोडणें कळलेंच आहे. तथापि पेशजी पाटीलबावांनीं लिहिल्यावरून नूरमहमद खानाशीं बोलून पत्रें टिपूस पाठविलीं आहेत. त्यांचीं उत्तरें कशीं येतात पहावें. पत्रें पाठविलीं असतां उत्तरें देखील येत नाहींत म्हणोन लिहिलें, त्यास कोणत्या पत्राचीं उत्तरें जाण्याचीं राहिलीं ? जीं पत्रें येतात त्यांची रवानगी वरचेवर उत्तरें लिहून करीतच आहों. व जहाला मजकूर तोही वरचेवर लिहित असतों. झाडून मजकूर जमा धरून उत्तरें जातात. तिकडून पत्रें येतात त्यांतच मजकूर जमा न धरतां उत्तरें येतात. तेव्हां पत्र पावलें कोणतें, न पावलें कोणतें हेंही समजत नाहीं. रा छ. १५ जमादिलाखर हे विनंती.

ले. ४१७ [२२८] | वैशाख शु. ११ श. १७०५ ता ११-५-१७८३

श्री.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि. तुम्ही छ २१ रबिलाखर व छ ६ जमादिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. उत्तरें अलाहिदा लिहिलीं आहेत त्यांवरून कळेल. प्रस्तुत ग्वालेर किल्यास तोफा लाविल्या आहेत, मोर्चेही चालतात, शहरांत अमल पाटीलबावांचा आहेच, किल्ला मात्र लढतो. तो ही लवकरच सुटेल, किल्या-खालीं बदलगड होता तो घेतला म्हणोन लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. ग्वालेर तालुक्यांत राजश्री शिवाजी विठ्ठल यांचा सरंजाम आहे तो त्यांकडे चालवावा असा करार आहे, त्या प्रमाणें त्याचा त्यांकडे दिला असल्यास बरेंच झालें. नाहीं तर द्यावा. रवाना छ ९ जमा-दिलाखर हे विनंति. राजश्री पाटीलबावांचीं पत्रें आलीं त्यांचीं उत्तरें पाठविलीं आहेत. प्रविष्ट करावीं. हे विनंति.

ले. ४१८ [३४४] | वैशाख शु. १३ श. १७०५ ता १४-५-१७८३

॥ श्री ॥

राजश्री आपाजीराम स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. इंद्रसेन येऊन तह पक्का जाला. उमदा माणूस प्रमाणिक आहे. या-करितां दोन लक्षांची जागीर द्यावयास करार केला आहे. त्याप्रमाणें सुरत अठ्ठाविशींत दोन लक्षांचे ज्यागिरीच्या सनदा इंद्रसेनाचे नांवें पाठवून द्याव्या, म्हणोन सांगितलें, त्यावरून विनंती लिहिली आहे, म्हणोन विस्तारें लिहिलें. त्यास वकिलास जागीर द्यावयाचा करार,

मागें तह जाले, परंतु कोठें केला नाहीं. उदिशीन साष्टी सुद्धां बोलत होता, परंतु इंद्रसेन आल्यामुळें यास निरोप दिल्हा, त्यास साष्टांचेंही त्याच्यानें जालें नाहीं. असो, पाटीलबावांनीं लिहिल्यावरून गायकवाडाचे मुलखापकीं सरकार ऐवजाशिवाय लाख रुपयांची जागीर द्यावयाचें बोलून लिहून पाठवावें म्हणोन लिहून पाठविलें आहे.

गुजराथ दरोबस्त सुटली व सरकारचे किल्ले कोट, सरकारांत आले म्हणजे शिवाजी विठ्ठल व त्रिंबक नारायण व आनंदराव गोपाळ वगैरे सर्वही स्वामींस लिहितील व विनंती करतील. परंतु सरकार ओढगस्तींत कांहीं अर्थ राहिला नाहीं. त्यापक्षीं याचा विचार करून करणें तें करावें. सरकार चाकरी करून दाखवावी, आणि करतील असा अर्थ पहतां तूर्त शिवाजी विठ्ठल मात्र आहेत. वरकडांनीं सरंजाम खावून असावें इतकाच अर्थ आहे. सुचली विनंती लिहिली आहे, म्हणोन लिहिलें. त्यास मुलूख किल्ले सरकारांत आल्यावर समजून करणें तें केलें जाईल. तुम्हीं लिहिलें हाच विचार येथील आहे.

रवाना छ १२ जमादिलाखर हे विनंती.

ले. ४१९ }
२९७] }

{वैशाख व. १२ श. १७०५
ता ा २७-५-१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. टिपूनें इंग्रज व महमद अलीखानाचा मुलूख सोडून द्यावा, याप्रमाणें टिपूस सांगोन पाठवावें. त्याणें ऐकिल्यास उत्तम. न ऐकिल्यास सरकार व इंग्रेज मिळोन मसलत करावी. याप्रमाणें तहनाम्यांत कलम लिहिलें आहे. त्यास इंग्रेज शेर जहाले आणि बिदनूर घेतलें म्हणोन तिकडे वर्तमान गेल्यावरून टिपूचे मसलतीस फौज लौकर जावी, म्हणोन पाटीलबावांनीं दोन तीन वेळ लिहिलें. त्यावर टिपूनें जुरतीनें बिदनूर घेतल्याची बातमी आली तीं मागाहून लिहून पाठविली. तीं पत्रें पावल्यापूर्वीच रामजी पाटलाचे येण्याची तजवीज करून रवानगी केली. याचें कारण असें असेल कीं, रामजीपाटलाचे मनांतून इकडे येणें, त्यास कांहीं तरी बहाणा असावा याकरतां हीं साधनें आबा चिटणिसाचे विद्यमानें लावून निघणें होय असें केलें; व गोविंदपंत व रामजी पाटलाचे कारकून येथें आहेत त्यांस रामजी पाटलानें असेंही लिहिलें असेल, कीं तुम्हीं हरतऱ्हेनें बनावून वर्तमान लिहून पाठवावें म्हणजे आमचें येणें तिकडे होईल. असेंही लिहून पाठविलें असेलसें वाटतें. त्यावरून त्यांणीं लिहिलें असेल. एऱ्हवीं उगेच कांहीं नसतां असें विना सुचने वेगळ कांहीं लिहवणार नाहीं. तस्मात् सूचना आहे. याचा तुम्हीही बारकाईनें शोध करून लिहून पाठवावें. इंद्रसेनानेंही फौज टिपूचे कुमकेस जाते म्हणोन पाटीलबावांकडे सांगोन पाठविलें. त्यास येथें ही गोष्ट नसतां इंग्रेज लटकें सांगून पाठविणार नाहींत. इंग्रेजांकडील बोलण्याचे

मध्यस्त रामजी पाटलांनीं ममतेंत घेतले असतील, त्यांणीं पाटीलबावांजवळ बनावणी केली असेल. रा छ २५ जमादिलाखर हे विनंती.

ले. ४२० [२५४] | वैशाख व.१२ श.१७०५ ता। २७-५-१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. राजश्री पांडुरंग रघुनाथ यांणीं छ ७ जमादिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. पुढें होईल वर्तमान तें वरचेवर लिहून पाठवित जावें. ग्वालेर किल्यास उरवाई कडून तोफांची मारगिरी व मोर्चेंही लाविले आहेत, सुरुंग ही चालतो, म्हणून पेशजी लिहिलें होतें. त्यावर प्रस्तुत तो सुरुंग उडविला. त्यावर उरवाईचा बुरुज तिन हिसे पडला. हल्ली आणखी दोन तीन सुरुंग चालविले आहेत. तोफांची मारगिरी सुरू आहे. खांसास्वारी मोर्च्यावर जात असत्ये, म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास उरवाई बुरुज तिन हिस्से उडाल्यावरून त्यासही विचारच पडला असेल. आणखी सुरुंग लाविले त्यापक्षीं घाबरे होऊन सूत्र लावतील असेंही वाटतें. पुढें वरचेवर वर्तमान लिहीत जावें. रा छ २५ जमादिलाखर हे बिनंती.

ले. ४२१ [२९९] | वैशाख व १२ श.१७०५ ता। २७-५-१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. पूर्वी रकारनामक पुण्यांत असतां दाब व पराक्रम आणखींच होता. येथें आल्यानंतर एक दिवसही सरकार उपयोगाचीं गोष्ट बोलले नाहींत. उलटें येथील रंगांत हमरंग होऊन तहनामा देते समयीं आमचा व पाटीलबावांचा तट पडला ते समयीं बोललें जे, तेथील प्रसंग मी पाहून आलों तेथें अगदीं पोकळ आहे, येथें वर्काल मात्र वोढून विकतात. त्यावर तहाचा शेवट जाहला तो पूर्वी सविस्तर लिहिलाच आहे. तह झाल्यावर रकारनामकास कोण पुसतो ? येथें काल हरण करीत होते, परंतु मोठी क्षित मागती पुण्यांत जाऊन कारभार करावा. पैका मिळवावा याकरितां आबा चिटणीसांचें साधन केलें होतें. सांप्रत प्रसंग पाहून आबांनीं पुण्यास मशारनिल्हेस पाठववें असें सिद्ध केलें. त्यावर भाईस सल्लाह विचारिली. भाईचे मनांत त्यांस पाठवूं नये. परंतु गोष्ट सिद्ध झाल्यावर नाहीं म्हटल्यास काय संदेह येईल ? त्यामुळें संमत देणें प्राप्त झालें. आम्हांवर तहनाम्यामुळें गैर मर्जी जहाली, तेव्हांपासून मशारनिल्हेस मोठा संतोष जहाला. आलीकडे रवानगी सिद्ध जहाली. तेव्हां कोणकोणापाशीं आमच्या वल्गनाही जहाल्या आहेत. असो, या उपर इकडील वर्त-

मानाचीं पत्रें येतील त्यांत अर्थ गोड असेल तितका त्यास कळविल्यास चिंता नाहीं. कच्चें पक्कें मात्र त्यांशीं बोलण्यांत येऊं नये व त्यांस समजूं नये. म्हणोन विस्तारें करून लिहिलें तें सविस्तर कळलें. त्यास येथून जातें समयीं बोलले कीं, मी येथें काय बोलून दाखवूं? तेथें गेल्यावर पाटीलबावांशीं बोलून खामखा सरकारच्या मर्जीनरूप काम करून दाखवितों. याप्रमाणें बहुत खातरजमेनें बोलले. तेथें गेल्यावर कांहींच घडलें नाहीं. असो, जें त्यांच्या उचितास आलें तें त्यांणीं केलें. हल्लीं येथें येणार. आल्यावर समजूनच घडणें तें घडेल. उगाच वल्गनाही केल्या असल्या तरी काय होणार? असो, तुमचें लक्ष यथास्थित आहे त्यापक्षीं चिंता नाहीं. रामजी पाटील खातरजमेनें बोलले असतां कांहीं घडलें नाहीं, तेव्हां त्यांचेंही स्वरूप समजलें.+ रामजी पाटील काल येथें आले. बोलणें जहाल्यावर समजलें. तुम्हांस येण्याविशीं पूर्वी पत्र पाठविलें त्याबरून उद्योग केलाच असेल, रवाना छ २५ जमादिलाखर हे विनंती.

ले. ४२२ [२९८] | वैशाख व.१२ श. १७०५ ता॥ २७-५-१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. इंग्रजांचा व सरकारचा तह होऊन परस्परें तहनामे दिले घेतले याचा लौकिकही चोहींकडे जाला. इकडे टिपूनें अर्काटाकडे फौज व भारी सरंजाम चेनापट्टणकर इंग्रेजाचे तोंडावर ठेवून आपण येऊन बिदनूर घेतलें. आंत इंग्रेज गोरे एक हजार व साडेतीन हजार कवाइती माणूस कित्यांत होतें तें धरून तेथील जनराल सुद्धां कैद केले, या मुळें गर्वही जाला. त्यांत मुसाभुसी फराशीस भारी जमावानसीं गुडलूर बंदरास येऊन दाखल जाला. पुढें आपणही तिकडे जाऊन फरांशीस व आपण एक होऊन चेनपट्टणावर जाऊन चेनापट्टण घ्यावें हा इरादा होता. त्यास सरकारचा इंग्रेजांचा तह जाला हें वर्तमान कळलें. यावरून बल्हारी गुती येथें आपण छावणी करणार. खाशा टिपूबरोबर ही सरंजाम भारी आहे. कदाचित श्रीमंतांकडून कसें होईल. या करितां आपण छावणी इकडे करून मुसाभुसी व आपला सरंजाम अर्काटावर आहे तो एक करून चेनापट्टनावर मसलत करणार. निजाम अल्ली खान याणींही एक वकील मातबर मुसाभुसीकडें पाठविला आहे. हैदरखानाचा वकील तों नबाबाजवळ आहेच. सरकारचा इंग्रेजांचा तह जाला, तेव्हां टिपूस भरंवसा सरकारचा मोठा होता तो तुटला. तव्हां नबाब, टिपू, फराशीस एकत्र होतील किंवा कसें घडेल समजत नाहीं. चोंहींकडून एक प्रकार मसलत दिसते. हल्लीं मुसाभुसी याचें पत्र आम्हांस आलें त्याची नक्कल राजश्री पाटीलबावांस पहावयास पाठविली आहे. पुढें मसलतीचा विचार कसा हें सविस्तर बोलून पाठवावें. रा॥ छ २५ जमादिलाखर हे विनंती

+ येथपासून नानाचें अक्षर

ले. ४२३ [२०३] ज्येष्ठ शु. ४ श. १७०५ ता ४-६-१७८३

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. श्रीमंत राजश्री दादा साहेबाच्या कारकुनाबरोबर मुद्याची याद आली. ती तुम्हीं कलमवार पत्रीं लिहिली ती कळली. तिचा तपशील पाटीलबावांनीं लावून उत्तरें केलीं कीं, पैका आम्हापाशीं कशाचा ? नित्य कर्ज घेऊन भक्षावें अशी अवस्था आहे. सरंजामाचा प्रकार म्हणाल तर आज घडत नाहीं. तुम्हीं येथें यावें पोटपाण्याची बेगमी थोडी बहुत घडेल. तीस बत्तीस तोफा आहेत इतक्यांस बैल मिळावयाचे नाहींत. तोफा साऱ्या भडोजेस टाकाव्या. दोन चार बराबर आणाव्या. धनीपणाचा कायदा तर आपण धनीच आहेत, त्या पक्षीं याचें पुसणें काय ? याप्रमाणें भवती न भवती चालली आहे. परंतु असा विचार आहे कीं, लाख रुपये पावेतों खर्चास यावे आणि बोलण्या चालण्यांत त्यांची अधीक आगळी खातरजमा करून कोणतेही प्रकारें उज्जनीस आणावें म्हणोन लिहिलें. त्यास जाजती मुद्दे ऐकावयाचे नाहींत. ऐकूं नयेत. जर करितां इकडे गोदातीरीं रहाण्यास येऊंच लागले तर पाटीलबावांनीं इंग्रजांचे तहांत करार केला आहे त्याच धोरवळ्यानें घडेल. येविशीं पेशजीं लिहून पाठविलेंच आहे, त्यावरून कळेलच. रा॥ छ ३ रजब हे विनंती.

ले. ४२४ [२०४] ज्येष्ठ व. २ शके १७०५ ता १६-६-१७८३

॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. राजश्री केसो अनंत यांनीं सुरतेहून पत्र पाठविलें कीं, श्रीमंत राजश्री दादासाहेबांनीं आपणाकडे राजकारण येण्याविशीं लाविलें आहे. त्यास राजश्री पाटीलबावांनींही मला हेच आज्ञा केली कीं, श्रीमंत आपणाकडे जात असल्यास उत्तम आहे. त्यांची खातरजमा न होय तर उज्जनीस जावें.त्यास आपणाकडे येत असले तर यांत पाटीलबावांस संतोष आहे. लौकर जाणें होय तर करावें नाहीं तर यांचीं राजकारणें होऊं लागलीं आहेत. याप्रमाणें लिहून आलें व राजश्री रामजी पाटील यांचेंही बोलणें कीं, दादासाहेब इकडे आल्यास पाटीलबावांसही संतोष आहे. तेव्हां उपेक्षा केली तर कोणीकडे निघोन जातील कळत नाहीं. याजकरितां त्यांची खातरजमा करून आणावयास राजश्री हरीपंत, होळकर, रास्ते, पांडुरंगराव यांस पाठवावयाचें केलें. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. राजश्री पाटीलबावांस पत्रें लिहिलीं आहेत. प्रविष्ट करावीं. रा॥ छ. १५ रजब हे विनंती.

ले. ४२५ [२७१] — ज्येष्ठ व. २ श. १७०५ ता ता १६-६-१७८३

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. मुसाबुशी फाराशीस भारी सरंजामानिशीं गुडलूर बंदरास येऊन दाखल जहाला. त्याचें पत्र आम्हास आलें त्यांतील मजकूर कळण्याकरितां नक्कल पत्राची करून तुम्हांकडे पाहण्याकरितां पाठविली त्याजवरून सविस्तर कळलेंच असेल. टिपूमिया यांस येथून लिहून गेलें आहे याप्रमाणें त्याणें ऐकिल्यास उत्तम. न ऐकिल्यास मसलत करणें प्राप्त, तेव्हां त्याची तर्तूद श्रावण भाद्रपदमास पावेतों जहाली पाहिजे. त्यास होळकर मातबर सरदार, त्यांचे घरीं बखेडा, त्याचा बंदोबस्त होऊन फौज सुद्धां मसलतीवर मुतवजे केले पाहिजेत. ऐशास होळकराचे बखेडेयाचे बंदोबस्ताविशीं पेशजी किती वेळां लिहून पाठविलें, परंतु बंदोबस्त होऊन आला नाहीं. त्यास याउपर पेशजी लिहिल्याप्रमाणें लवकर बंदोबस्त होऊन यावा, म्हणजे मसलतीस उपयोगी पडेल.* पूर्वी लिहिल्याअन्वयें गंगाजलनिर्मळ अहिल्याबाईस सांगोन राजश्री तुकोजीबावांकडील महालकरी आहे, त्याची वहिवाट रदकर्जाचे महाल सुद्धां तुकोजीबाबांनीं करावी. त्यास बाईकडील अडथळा नसावा. याप्रमाणें राजश्री पाटीलबावांनी बाईस सांमून उत्तर पाठवावें म्हणजे यांजकडून भारी फौज ठेवून मसलतीवर घालवूं. सरकार कामाचा उपयोग जाणून लवकर करावें. आतां अवकाश राहिला नाहीं. मागें पत्रें गेलीं त्यांचीं उत्तरेंच येत नाहींत. अपूर्व आहे. र॥ छ. १५ रजब हे विनंती.

ले. ४२६ [१६५X] — ज्येष्ठ व. २ श. १७०५ ता ता १६-६-१७८३

॥ श्री ॥

राजेश्री आपाजीराम स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. तुम्हीं छ ११ जमादिलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. धुळपांनीं इंग्रजाचे तरांडियांसि लढाई देऊन धरून नेलीं त्याविशीं इंद्रसेनास मुंबईकरानें वर्तमान लिहून पाठविलें. त्यानें राजश्री पाटीलबावांस सांगोन पाठविलें. त्यावरून पाटीलबावांनीं स्वामींस पत्र लिहिलें आहे. व पांडुरंग रघुनाथ यांणींही सविस्तर लिहिलें आहे. त्यास कराराप्रमाणें गोष्टी अमलांत याव्या. धुळपास ताकिद होऊन तरांडीं माघारीं देवावीं म्हणून विस्तारें करून लिहिलें तें सविस्तर कळलें. त्याप †धुळपानीं तरांडीं वरील सरदार व लोक-

---

* येथ पासून खुद्द नानाचें अक्षर. ×जुना ले. २११ वर हेंच हें पत्र आहे.

† आनंदराव धुळप म्हणून पेशव्यांच्या आरमाराचे सरदार विजयदुर्ग जि॥ रत्नागिरी येथें असत. वरील लढाई रत्नागिरीचे नजीकच झाली असें विविधज्ञान विस्तारांत धुळपाचा पवाडा प्रसिद्ध झाला आहे त्यावरून होतें. 'रेंजर' नांवाचें इंग्रजांचें लढाऊ तांडे या वेळीं धुळपांच्या तडाक्यांत सांपडलें होतें.

सुद्धां दस्त केलीं ते तह जाला त्यापक्षीं सोडून द्यावयाचीं. त्यांत मुंबैकरांचें पत्रही आलें. त्यावरून तेम्हांच धुळपास लिहून सोडून दिल्हीं. राजश्री पाटीलबावांस उत्तर लिहिलें आहे. रवाना छ १५ रज्जब हे विनंती.

ले. ४२७ [२१०] | आषाढ शु. ५ श. १७०५ ता ४-७-१७८३

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंति उपरि. इंग्रजांचे तरांडीं मुंबईहून बिदनुराकडे जात होतीं, त्यांवर इंग्रजांकडील मातबर सरदार होता. त्यास तीं तरांडीं धुळपांनीं सरदारांसुद्धां पाडाव करून आणलीं त्याविशीं सरकारांतून मुंबैकरांचें पत्र आलें कीं, सरकारची आमची दोस्ती त्या पक्षीं तरांडीं वरील सरदार व लोक सुद्धां सोडून देवावीं. त्यावरून तरांडीं सरदार व लोक सुद्धां धुळपांस लिहून सोडवून दिविलीं. वर्तमान तुम्हांस कळावयाकरितां लिहिलें आहे. तरांड्यांवरील इंग्रजांकडील लोकांनीं लढाई मातबर दिली. धुळपांनींही चांगली लढाई देऊन दस्त केलें. परंतु तह जाला त्या पक्षीं सोडून देविलें. रा छ. ३ साबान हें विनंती.

ले. ४२८ [२८५] | आश्विन शु. २ श. १७०५ ता २८-९-१७८३

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. इंद्रसेनास निदान एक लक्षाची जागीर गायकवाडाचे जागिरी पैकीं सरकार ऐवजा शिवाय द्यावयाचें बोलून लिहून पाठवणें म्हणोन आज्ञा, त्यास आज्ञेप्रमाणें राजश्री पाटीलबावांशीं बोललों व त्यांस पत्र होतें तें दिलें. उत्तर झालें कीं, इंद्रसेनाचें मनोगत राखिल्यास सरकार उपयोगीच आहे, याजकरितां त्याशीं बोलून दीड लक्ष रुपये वसुली जागा त्यास लावून द्यावी. याप्रमाणें ठराव जाला आहे. गायकवाडाचे मुलखापैकीं जागीर लावून देतों म्हटल्यास ठीक दिसत नाहीं. याजकरितां इंद्रसेनास सरकार तालुक्यापैकीं दीड लाख रुपयांची वसुली जागा लावून द्यावी. त्याचे मोबदला गायकवाडापासून सरकारांत घेतल्यास चिंता नाहीं, असें म्हणतात. म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास पूर्वी श्रीमंत कैलासवासी यांचे वेळेस तह झाले, व अलीकडे हेस्टिनाचे वियमानें पुरंदरचे मुक्कामी तह झाला. तेम्हां त्यास सरकारांतून जागीर दिली नाहीं, व चालही नाहीं. हल्लीं पाटीलबावा इंद्रसेनास जागीर द्यावयाचें तुम्हां जवळ बोलले, त्यास सरकारचा मुद्दा साष्टीचा तसाच राहिला. उदीष्टीन येथें आला होता. त्याचे म्हणण्यांत साष्टीचेंही बोलणें होतें. परंतु पाटीलबावांचें लिहिलें आलें, यावरून इंद्रसेन सरकारचे नफे अधिक करील असें जाणून उदीष्टिनास

निरोप दिला. इंद्रसेनाचें बोलणें होऊन तह ठरला, त्यांत साष्टीचें कलम अगदींच राहिलें. तेव्हां सरकारचे नफे ते इंद्रसेनानें काय केले? तथापि पाटीबावांनीं जागीर द्यावयाचें लिहिलें, बरें आहे. परंतु कलकत्याहून पांच कलमांचा करार होऊन यावयाचा आहे. तो आला म्हणजे दीड लक्षांची जाहीर द्यावयाची सनद पाठवून देऊं. रा छ.१ जिलकाद हें विनंती.

ले, ४२९ [२८१] } { आश्विन शु. २ श. १७०५ ता ता २८-९-१७८३

श्री.

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. पंचवीस हजारांची वरात पाठविली ती पावली. राजश्री पाटीलबावांस दाखविली. उत्तर अद्याप आलें नाहीं. पन्नास हजारांचे वरातेची कृपा जाली असती तर लोकांचे निमे देण्यापासून मुक्त होतों. आणखी पंचवीस हजारांचे वरातेविषयीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत म्हणोन लिहिलें, त्यास तूर्त पंचवीस देविले आहेत हे वसूल करून घ्यावे, आणि लिहून पाठवावें. पुढें बाकीचाही ऐवज देविला जाईल. रा छ. १ जिलकाद हे विनंती.

ले. ४३० [२७३] } { आश्विन शु. २ श. १७०५ ता ता २८-९-१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. राजश्री विनायक विठ्ठल बन्हाणपूरचे कमावीसदार यांस ताकिदी-विषयीं आज्ञा त्यास आज्ञेप्रमाणें राजश्री पाटीलबावांशीं बोललों. त्यांनींही कमावीसदारास ताकीद केली. परंतु शहरचे मामलतीची घालमेल होणार यामुळें विनोबाशीं निक्षून बोलतां येत नाहीं. मामलतीचा ठराव झालाच असेल. श्रीमंताचे लग्नाचें पन्नास हजार रुपयांचें कापड आलें. बाकी वीस हजार रुपयांचें कापड येणें तसेंच राहिलें आहे. त्यास द्यावयाचें असलियास निक्षून कमावीसदारास ताकीद करून देवावें, नाहीं तर नाहीं म्हणून सांगावें. या प्रमाणें राजश्री पाटीलबावांशीं बोलून उत्तर होईल तें लिहून पाठवावें. फर्मासी कापडाची पांच हजारांची वरात त्या प्रमाणें एक हजार रुपये पावले. बाकी राहिले त्याची ताकीद करवावी. रा॥ छ १ जिल्काद हे विनंती.

ले. ४३१ [२०८] } { आश्विन शु.२ श.१७०५ ता ता २८-९-१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि. दादासाहेबांस तिकडे न्यावयास मसलत वकीलांची, असा बाबांच्या मनांत संदेह येऊन आम्हांवर मर्जी ठीक नाहीं, केवळ रामजी पाटील यांचीं पत्रें येतीं तर बाबांस खरें न वाटतें. त्याबराबर दुसरे गृहस्थाचें पत्र मुकाबल्याचें होतें त्यावरून खरें वाटलें.

दादासाहेब तिकडे गेल्यामुळें मर्जी खट्टी आहे. आम्हांवर रोष बहुत आहे. रामजी पाटलांचें जाणें राजश्री दाजीबा व गोविंदराव दि॥ कृष्णराव रास्ते यांचे घरीं आहे. दुसरें राघोपंत गुरुजी त्यांचेच आहेत. रामजी पाटलांचे पत्राबरोबर त्यांचींही पत्रें येत असतात म्हणोन व विशिखांचे बोलण्यांत भाव निघाले कीं सांबास तिकडे घेऊन गेले, आतां होळकर वगैरे एक गट होऊन मागतीं पुरंदरचे मसलती सारखा प्रसंग घडतो. फिरून आमचें साधन करीत फिराल. थोडक्याच दिवसांत प्रत्ययास येईल. म्हणून बोलण्यांतील मजकूर विस्तारें लिहिला तो सर्व कळला. त्यास श्रीमंत दादासाहेब इकडे येणार हें पूर्वी अगोदरच पाटीलबावांस लिहिलें आहे असें असतां,तुम्हीं लिहिल्यावरून इकडे आणावयाचें केलें असें म्हणतात. असो. येथून लिहितात त्याप्रमाणें बोलतात. हें लिहिणें प्रमाण मानूं नये. येखादे गोष्टीचा पक्का शोध लावून मग बोलावें. विशिखांचे बोलण्यांतील अर्थ लिहिला, त्यास पुढें मागें तसा प्रसंग जाल्यास पाटीलबावांसच सांभाळावें लागेल. दादा साहेबांचा भरंवसा कोणीही मानीत नाहींत. भलतेकडेच जातील. याकरितां आणावयाचें केलें. परिणाम ईश्वराधीन आहे. र॥ छ. १ जिलकाद हे विनंती.

ले. ४३२]
[३२९]

आश्विन शु.५ श. १७०५
ता॥ १-१०-१७८३

श्री

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरि तुम्हीं छ ४ रमजानचीं पत्रें व राजश्री पाटीलबावांचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. ग्वालेर किल्ला घेतला. आठ पंधरा रोज येथेंच राहून किल्याचा बंदोबस्त जाल्यावर पुढें कोणती मसलत करतात तें लिहून पाठवीन. जेनाबादचे कमावीसदारास ताकीदपत्र घेऊन पाठविलें आहे. व त्याप्रमाणें ऐवज द्यावा, तेथें कोणी रजबद केलीयास सूट देऊ नये. पाटीलबावांचें निक्षून बोलणें आहे. लग्नाचीं वस्त्रें भाई वगैरे यांस आलीं. राजश्री माधवराव गंगाधर यांस आलीं नवतीं.यास्तव बावांनीं त्यांस वस्त्रें देऊन सरकारचीं वस्त्रें देतों म्हणून बोलले. म्हणून लिहिलें तें व श्रीमंत दादासाहेब इकडे आले येविशीं राजश्री पाटीलबावांचें बोलणें जालें त्याचा मजकूर लिहिला तो सर्व कळला व राजश्री रामजी जाधव यांनीं पाटीलबावांस पत्र लिहिलें होतें त्यांतील मजकूर व त्याजवर पाटीलबावांचें बोलणें जालें त्याचा विस्तारें करून मजकूर लिहिला तो सर्व कळला. त्यास ग्वालेर घेतली, आतां पुढें मसलत कोणती आहे तें लिहून पाठवावें. जेनाबादचे कमावीसदारास ऐवजाविशींचें पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री शिवरामपंत थये यांजकडे पाठविलें आहे. ते ऐवज घेतील. नाहीं तर होईल तें लिहून पाठवूं. सूट देऊं नये म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. माधवराव गंगाधर यांस श्रीमंतांचे लग्नाचीं वस्त्रें सरकारचीं आलीं नव्हतीं, त्यावरून पाटीलबावांनीं येथें त्यांस वस्त्रें सरकारचीं म्हणून दिल्हीं म्हणोन लिहिलें त्यास सरकारचीं वस्त्रें ज्यांनीं अहेर केले त्यांस दिल्हीं, त्याजबराबर राजश्री दाजी गंगाधर यांस दिल्हीं. र॥ छ ४ जिलकाद हे विनंति.

ले ४३३ [३३०] कार्तिक व.१२ श.१७०५ ता २१-११-१७८३

श्री लक्ष्मीकांत.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोपंतनाना स्वामींचे सेवेशीं.

पोष्य कृष्णाजी तानदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील तागायत छ २५ माहे जिल्हेज पावेतों मुक्काम महतपूर कुशलरूप जाणून स्वकीय कुशळ लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. बहुत दिवस झाले. कृपा पत्र येऊन संतोष होत नाहीं, तर सविस्तर लिहून सांभाळीत गेलें पाहिजे. विशेष प्रों महतपूर सरकार चंदेरी येथील जाबसालविशीं पूर्वी आपण पत्रें श्रीमंत राजश्री पाटीलबावांस लिहिलीं व राजश्री पांडुरंगपंत बापूस लिहिलीं तीं पत्रें आम्हीं रवाना केलीं. परंतु लष्करें दूर गेलीं करेराचे मुक्कामपर्यंत चिरंजीव राजश्री केसोपंत महत्पुराहून गेले. पुढें मार्ग चालेना. तेव्हां परतोन आले. पत्रें रवाना केलीं माहालीं आलियावर तहशील करावी, त्यांस तेथील जमीनदारांनीं हरामखोरी केली. केसोपंताशीं करार केला कीं, महत्पुरास जातों ऐसें बोलोन परभारें लष्करांत गेले. आम्हांकडे आले नाहींत. पूर्वी महालची तहशील राजश्री यादवराव हरीनीं नेली. त्यास सर्व कसबें जमीदाराचीं आहेत. तरी येविशीं श्रीमंत राजश्री पाटीलबावांस पत्र लिहून पाठवावें आणि जमीनदार तेथें गेले आहेत त्यांजला ताकीद निक्षून करून महालीं येऊन अम्मल सुरळीत चालेल तें करावें. श्रीमंतांनीं आमचे पासून रसद दहा बारा हजार घेतले.आम्हास महालाचा ऐवज पैसा एक आला नाहीं,तरी पत्रें लिहून पाठवावीं. आपलेकडील राजश्री पांडुरंगपंत बापू आहेत त्यांजला पत्र लिहून तपसीलवार द्यावें म्हणजे ते जाबसाल करून घेऊन पाठवितील. श्रीमंत पाटीलबावांस पत्रें चांगलीं लिहून पाठवावीं. ज्या गोष्टीनें आमचा ऐवज उगवे तें करावें. आपण मन घातल्यास कार्य होऊन येईल. यानंतर आपण पत्र राजश्री केसोपंत निा गोपाळ संभाजी याजबरोबर पाठविलें तें पावलें. आपले भराशियावर जाहागिरीचीं खेडीं आहेत त्यांचा बंदोबस्त करितों. कारकून आमचे तर्फेचा पाठवितों. आपण निक्षून पत्र राजश्री पांडुरंगपंतास लिहोन दिल्हें पाहिजे कीं महतपूरचे जमीदार तुम्हांपाशीं आले आहेत त्यांसि दबावून सांगणें कीं, कृष्णाजीपंत यांणीं सरकारांत पंधरा हजार दोन सालची रसद दिली आहे त्याचे रुपयांची निशा देणें; नाहीं तरी तुमची अबरू राहणार नाहीं.—ऐसे पत्र निक्षून राजश्री पांडुरंगपंतास कृपा करून लिहोन दिल्हीं पाहिजेत. कृपा लोभ असों दिजे. हे विनंती.*

---

* आजपर्यंत सालबाईच्या तहा संबंधें नानाफडणीस व त्यांचे हस्तक यांजमध्यें पत्रव्यवहार प्रसिद्ध होत आला तो रा. अंताजीपंत हर्डीकर व गोविंद रामचंद्र केळकर वस्ती महाड यांनीं मोठ्या मेहनतीनें मिळवून आम्हांकडे पाठविला. ह्या तहा संबंधें आणखीहीं पत्रें मशारनिल्हेनीं पाठविलेलीं आम्हांकडे शिल्लक आहेत. पण तीं बहुतेक त्याच त्या मजकुराचीं असल्यामुळें तूर्त तीं प्रसिद्ध करण्याचें तहकूब केलें आहे. सं. का. सं.

ले. ४३४ [२८०] कार्तिक व.१४ श. १७०५ ता २३-११-१७८३

श्री.

राजश्री नारोपंत स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि.

पाटीलबावांचें मत कीं, नारो गणेश यांस होळकरांचे कारभारांतून काढावें. बाईनीं व आपण एक होऊन मसलत करावी. येविषयींचा मजकूर लिहिला तो सर्व कळला. त्यास नारो गणेश यांस कारभारांत न घालणें हें पूर्वीच जालें असतें तर असतें. आतां कसें होईल! पूर्वी पाटीलबावांचीं पत्रें आलीं कीं, कळेल तशी खातरजमा होळकराची करावी त्यावरून केली ती त्यांणीं निभावावी. पाटीलबावा व इंग्रज देशीं आले तर होळकरांचे यांचे खटे मीठे प्रसंग होत चालले आहेत तेथें आम्हांवर वृत्ति कशा होतील न कळे, म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास पाटीलबावांचें व इंग्रजांचें येणें काय म्हणून होणार? आल्यास ईश्वरी इच्छेनें घडेल तें खरें. थोरपणा आहे तेथें वांकडें होणार नाहीं.

रा छ. २७ जिल्हेज हे विनंती. पो छ. ९ मोहरम सुा आर्बा समानीन सुा शाहाजानपूर.

ले. ४३५ [४०७] शके १७०५ सन १७८३

श्री

कापशीकर घोरपडे याजबद्दल.

यादी कापशीकर घोरपडे यांची वंशावळ. मूळपुरुष हे उदेपूरचे राणे याच्या घराण्यांतील एक पुरुष दक्षिणदेशीं येऊन विजापूरपादशाहींत येऊन रोजगार करून राहिले. त्यांणीं जांबेची, व वांगीची व भाळवणीची, व नहावीची पाटीलकी मिळवून पादशाही रोजगार करून पांचचार डोई गुदरल्या. नंतर श्रीशिवछत्रपति शककर्ते महाराज यांणीं राज्यास प्रारंभ केला. त्या समयीं घोरपडे यांचा पुरुष म्हाळोजी हे छत्रपति पाशीं पांचशें स्वारानिशीं चाकरीस राहिले. कांहीं दिवसांनीं महाराज यांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी महाराज हे पन्हाळ्या वर होते. म्हाळोजी घोरपडे यास स्वारांसुद्धां पन्हाळ्यास छत्रपतींनीं पन्हाळकिल्याची सरनोबती देऊन संभाजी महाराज यांजपाशीं ठेविलें होतें. पुढें शिवाजी महाराज यांचा शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे चैत्र शुद्ध १५ रविवारीं रायगडीं काळ जहाला. नंतर संभाजी महाराज यांणीं म्हाळोजीबुवा घोरपडे यास पन्हाळ्यास ठेवून आपण रायगडास गेले. धाकटे बंधु राजाराम साहेब यांस नजर बंदींत ठेवून आपण सात वर्षें राज्य केलें. संगमेश्वरीं महाराज असतां अवरंगजेब पादशहा याजकडील सरदार इलाइचिबेग येऊन

संभाजी महाराज यांस धरिलें त्या समयीं गर्दी जहाली, त्यांत म्हाळोजीबावा घोरपडे ठार झाले. त्यांस तिघे पुत्र ज्येष्ठ संताजी घोरपडे, दुसरे बहीरजी घोरपडे व तिसरे मालोजी घोरपडे. हे त्रिवर्ग मिळून राजाराम साहेब यांजकडे फौजे सुद्धां रायगडास गेले. तेथें महाराज यांणीं काजकाम सांगितलें, कृपा संपादन केली. पुढें विशाळगड मुक्कामाहून पादशहाच्या फौजेवर छत्रपतींनीं स्वारीस पाठविलें. संताजी घोरपडे जाऊन पादशहाच्या फौजेवर छापा घालून पादशाहाच्या डेऱ्याचे कळस घेऊन येऊन महाराजां पुढें ठेविले. त्या समयीं छत्रपतींनीं तिघां भावांस किताबती दिल्या. संताजी बावा यांस ममलक्तमदार, बहीरजी घोरपडे यास हिंदूराव व मालोजी यांस अमिरुल उमराव अशा किताबती देऊन बहुमान केला. संताजी बावास सेनापती दिली. शके १६१०. पुढें राजाराम साहेब छत्रपति चंदीस गेले. मोंगलाई फौजेवर वेढा भूदरगडास पडला, सबब संताजी घोरपडे सेनापति यांस वेढा उठविण्याचा आज्ञा झाली, त्यावरून सेनापती यांणीं लढाया मारून वेढा उठविला. नंतर कर्नाटकांतून स्वारी देशीं आली तेव्हां छत्रपतींची मर्जी प्रसन्न होऊन कुटुंब ठेवावयास भूधरगड घोरपडे यांस दिला. पुढें राजारामसाहेब यांचा काळ शके १६२१ सांत जाहला. पुढें सेनापती फौजबंद मुलकांत स्वाऱ्या शिकाऱ्या करीत असतां म्हसवडकर माने यांणीं दंगा करून विश्वासानें संताजी घोरपडे यांस मारिला. शके १६३५. नंतर सेनापती यांच्या ज्येष्ठपत्नीचे पुत्र पिराजी घोरपडे हे शिवाजी महाराजांकडे पन्हाळे मुक्कामीं आले, त्यांणीं शांतवन करून सेनापतींचीं वस्त्रें दिलीं. शके १६३७. नंतर तेही स्वामिसेवा करीत असतां स्वामी कार्यावर मौजे हलकर्णी कसबा नूल या ठाण्यावर पडले. शके १६५०. त्यांचे पुत्र राणोजी घोरपडे हे लहान पांचसहा वर्षांचे होते, आणि पिराजी घोरपडे यांची सापत्न मातुश्री द्वारकाबाईसाहेब यांणीं नातू राणोजी यास घेऊन करवीरीं संभाजी महाराज छत्रपति यांजकडे येऊन भेटली. महाराज कृपावंत होऊन सेनापतींचीं वस्त्रें दिलीं. हें शके १६८५ कापशी मुक्कामीं जहालें. त्याजवर राणोजी घोरपडे यांचा काळ शके १७०५ सालीं जहाला. त्यांस स्त्रिया दोन पुत्र सुमारें नऊ यांचा तपशील.

४ ज्येष्ठ पत्नी लक्ष्मीबाई ... ...

१ ज्येष्ठ पुत्र सुबराव. २ रे सखारामबाबा.

३ रे नारायणराव. ४ थे द्वारकोजीराव.

यां पैकीं तिघांचा नष्टांश. नारायणराव घोरदडे यांस पुत्र चार, राणोजी ऊर्फ मुरारराव दुसरे संभाजीराव, तिसरे दिनकरराव व चवथे संभाजीराव ऊर्फ सुबराव यास दत्तक दिले, ते सांप्रत आहेत. मुरारराव यास पुत्र एक, त्याचें नांव नारायणराव, दोघांचा नष्टांश.

५ कनिष्ठ पत्नी अंबिकाबाई यांस पुत्र.

१ संताजीबाबा सर्वांत ज्येष्ठ. २ म्हाळोजीबाबा.

३ पिराजीबाबा ४ राघोजीबाबा, ५ जयराम.

९

ले. ४३६ [१३८] | भाद्रपद व. ४ श. १७०६ ता ३-९-१७८४

॥ श्री ॥

राजश्री गोविंद रावजी गोसावी यांसि—

शिक्का. छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य-स्नेा राव रंभाजी

फारशी जयवंत निंबाळकर दंडवत विनंती उपरी येथील कुशळ ता छ १७ माहे सव्वाल मुकाम भागानगर जाणून वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री नरसिंगराव घाटगे टेंभुर्णीकर हे येथें आले. यांणीं आपलें वर्तमान सांगितलें जे, राजश्री आनंदराव घाटगे यांचे हातें चाकरी व परगणे मजकूरचें कामकाज घेऊन नोकरी आपण करार केली म्हणून. त्यास आनंदराव सरकार चाकरीस दुरुस्त नाहीं. यास्तव राजश्री नरसिंगराव घाटगे हे चांगले मनुष्य जवामर्द, सरकार चाकरीस दुरुस्त, असें जाणून नवाब मुषरुलमुल्क बहादूर यांचे अनुमतें ठरलें जे सरकार उपयोगी आहेत, यांचाच बंदोबस्त करावा. त्याजवरून प्रगणे टेंभुर्णी पैकीं देहे एकूणीस तनखा रुपये १७५०० साडे सतरा हजार सदर-हूची सनद राव मशारनिले यांचे नांवें करून दिल्ही आहे. तर प्राा मजकूरचा जागीरीचा अमल यांचे सुपुर्द करून द्यावा. तुम्हांकडील कारकून प्रगणे मजकुरीं ठेविला तो घेऊन जावा. सन ११९३ सालीं चाकरीस न आले सबब नजर पांच हजार ठरविली. ते रुपये खरीप रब्बी झाडा करून घ्यावे. याप्रमाणें ठरलें आहे. त्यास मुदतीप्रमाणें सदर्हु ऐवज घ्यावा. येविशीं दौला बहादूर व राजश्री सोयराजीपंत याणीं आपणांस पत्रें लिहिलीं आहेत, तर नरसिंगराव घाटगे यांचा अमल दाखल करून घ्यावा. फिरून बोभाट येऊं न द्यावा. याचे भाऊबंद यांशीं कटकट करतील तर त्यांस ताकीद निक्षून करावी. हें काम सरकार किफायतीचें व मनुष्य बहुत चांगला ऐसें समजून केलें आहे. तर दरम्यान तुम्हांकडून घालमेल न व्हावी. तालुकियास स्वराज्याचा उपसर्ग बहुत लागून प्रगणा खराब जाहला. याजकरितां स्वराज्या-कडील बंदोबस्त चांगला करून द्यावा. तैसेंच करमाळियाकडीलही कांहीं उपद्रव न द्यावा. म्हणून राजश्री शामराव व चंडीदासपंत यांस ताकीद करावी. मशारनिलेपासून करारनामा लेहून घेतला त्याची नक्कल पहावयास पाठविली आहे. हें काम जवा म नु द [मर्द ?] बाळा बहादर [?] सोयराजीपंत याच्या आमच्या विचारें जाहालें असें. यांत घालमेल न व्हावी. लिहिल्याप्रमाणें कामाचा बंदोबस्त करून द्यावा. राा छ १७ सव्वाल हे विनंती. सन ११९४.

ले ४३७ [४३०] | चैत्र शु. ३ श. १७०७ ता ११-४-१७८५

श्री.

सन ११९४ फसली. सन १७८४ इसवी. फेरिस्त नंबर ८

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १११ विश्वावसुनाम संवत्सरे चैत्र शुद्ध ३ तृतीया इंदुवासरे

क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपति यांणीं राजमान्य राजश्री परशराम रामचंद्र यास आज्ञा केली ऐशीजे. मनोळी तालुक्याचे पांच लक्ष रुपयांच्या निशेपैकीं आळते तालुका याजवरि दरसाल पन्नास हजार रुपये उसनेवारी तीन सालें द्यावयाचा करार हस्तेबंदीची यादी करून दिली आहे. सदर्हू ऐवजास उगवणीस वेदशास्त्र संपन्न राजश्री बाळ जोशीराव व राजश्री शिवराव परशराम मुतालिक सचिव व गुंडो दामोदर यांचा कतबा दिला आहे. त्या प्रमाणें सालोंसाल द्यावे. न पावल्यास तालुका देहे १६ सोळा जमाबंदी गांवगन्ना गांवकर यांच्या गुजारतीनें ठरावून तालुका ठाणें सुद्धां कमावीस खरेदीसिबंदी राजश्री केसो सदाशिव सदर्हू पांच लक्षांचे बाकीचे सावकार यांच्या स्वाधीन करून देणेची आज्ञा होईल. इस्तकबिल चैत्र सन खमस समानीन तागायत सन सम्मान समानीन चैत्रमास तीन सालांत दीड लक्ष रुपयांची पुरवणी करून द्यावी. तीन सालें भरल्या नंतर सदर्हू तालुक्यास सावकारांचा संबंध नाहीं. जाणिजे बहुत काय लिहिणें.

मोर्तब. बारसुरू सुद्रबार समत सुद्रबार.

ले. ४३८] [४३१] { चैत्र शु. ६ श. १७०७ ता. १४-४-१७८५

श्री.

सन ११९४ फ. सन १७८४ इ. फेरिस्त नंबर ९.

यादी राजमंडळाकडून राजश्री परशराम रामचंद्र यांजकडे मनोळी तालुका वगैरे सोडविणें बद्दल राजश्री केसो सदाशिव यांजकडून रुपये पांचलक्ष कर्ज घेऊन निशा करविली, त्यासि मामलत तालुका मनोळी वगैरे देऊन ऐवज नेमणूक करून दिला. सुरुसन खमस समानीन मय्या व अलफ.

मनोळी तालुक्यापैकीं रुपये ३,५०,००० साडेतीनलक्ष व मनोती व ब्याज पांचलक्ष रुपयांचे एकंदर मनोळी तालुक्याकडून ऐवज पुरवणी करून घ्यावी. ऐवज फिटल्या नंतर ठाणीं सुद्धां तालुका हुजूर यावा.

सदरहू निशापैकीं दरसाल आळतें तालुका याजवर पन्नास हजार रुपये तीन सालें घ्यावयाचा करार करून हस्तेबंदीची यादी करून दिली आहे. सदरहू ऐवजास उगवणीस वेद शास्त्र संपन्न राजश्री बाळाजोशीराव व शिवराव परशराम मुतालिक सचिव व गुंडो दामोदर यांचा कतबा दिला आहे. त्याप्रमाणें सालोंसाल घ्यावा. न पावल्यास तालुका देहे १६ सोळा जमाबंदी गांवकर यांच्या गुजारतीनें ठरावून तालुका ठाणीं सुद्धां कमावीस खरेदी शिबंदी तुमच्या स्वाधीन करून देण्याची आज्ञा होईल. यायिषयीं परशराम रामचंद्र यांच्या नांवें सदरहू मजकुराचें पत्र दिलें आहे. .....कलम.

एकूण कलमें दोन येणेंप्रमाणें पांच लक्ष रूपये कर्ज देऊन मामलतीवरि करारमदार करून ऐवज लावून दिला असे. सदर्हूप्रमाणें ऐवज फडशा होईपर्यंत सुरळीत चालेल. मामलतीस तोसीस लागणार नाहीं. आफत फितूर मातबर पडून मामलत दिगर जाहल्यास हिशेबीं राहील तो ऐवज सरकारांतून फडशा होईल. सदर्हू पांच लक्ष रुपये हप्तेबंदी सालमजकूर चैत्रापासून तीन चैत्र दरसालीना एक लक्ष सदसष्ट हजार रुपये द्यावयाचा करार, त्यांसि प्रथम हप्ता पावल्यानंतर मनोळींचें ठाणें अविंदाकडून अपाय जाहल्यास सदर्हू एक लक्ष सदसष्ट हजार रुपयेची उगवणी त्रिवर्ग मशारनिल्हे यांच्या विद्यमानें ब्याजमनोती सुद्धां उगवणी करून देविली जाईल. छ. ४ माहे जमादिलाखर मोर्तब.

ले. ४३९ [१५६] पैा॥ छ २० जावल सीत. फाल्गुन व. १ श. १७०७ ता ७-३-१७८६

॥ श्री ॥

राजश्री अमृतराव स्वामींचे सेवेशीं—

विनंती उपरि. तुम्ही छ. ६ जा॥वलचें पत्र पाठविलें तें पावलें. मालीट इंग्रज आज श्रीमंतांचे दर्शनास आला होता. आगोदर त्यांनीं कचेरीस यावें, नंतर श्रीमंतांनीं यावें, असा बेत करून भेठ जाली. मालीटास मात्र भेटले, नजराणा केला त्याची याद पाठविली आहे. मालीट पर्वतीचे रमण्यांतच राहिला आहे. बायका वैगरे वाड्यांत राहिले म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास बेत .अगोदर त्यानीं यावें, नंतर श्रीमंतांनीं यावें, असा करून भेट करविली. उत्तम केलें. नजराण्याची यादी पाहिली. पुण्यांतील नेमणुकेचे फौजेस रोजमरा वाटावयाचें लिहिलें त्यास एक दुमाही व दोन आठवडे द्यावे रा॥ छ.१४ जा॥वल हें विनंती.

ले. ४४० [४८२] ज्येष्ठ व. १४ शके १७०९ ता १४-६-१७८७

श्री.

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान ताहा मोकदम देहाये पैकीं पारनेर भिसूर सुरुसन समान समानीन मया व अलफ.राजश्री नारायणराव ढमढेरे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम परगणे मजकूर पैकीं. मोकास बाबेचे गांव बि॥:—

-॥- प्रो॥ पारनेर निंमे	१ मौजे बावुर्डी गुमट	१ मौजे आपधूप
१ ,, डोंगरगण	१ ,, निंबलक	१ ,, गटेवाडी
१ ,, दाहिठण गुंजाल	१ ,, टांकळी	१ ,, हिवरे बाजार
१ ,, मुगसी	१ ,, हमीदपूर	१ ,, भोंदरे
१ ,, गाजदीपूर	१ ,, करनूळ खोरें	१ ,, दळवें खुर्द
१ ,, जांबगांव	१ ,, घाणेगांव	१ ,, हिवरें कोर्डा
१ ,, नोंदूर पठार	१ ,, धोत्रें खुर्द	१ ,, वडगांव जावळी

१ ,, शाहजापूर	१ ,, पाडळी	१ ,, पिंपळगांव रोठा [?]
१ ,, शिरोळें आडबई	१ ,, भोईरें खुर्द	१ ,, करनूळहोर
१ ,, हिंगणगांव	१ ,, निंबगांव धाणा	१ ,, भडगांव
१ ,, भोईरें बुद्रुक	१ ,, कालकुंद	१ ,, धोत्रें बुद्रुक
१ ,, निंबगांव धाणा	१ ,, ढोंकी	—
—	—	११
११॥	१२	

३४॥

एकूण साडे चौतीस गांवचा अमल पेशजी पासोन चालत आहे, त्याप्रमाणें करार असे. तर मा॥रनिलेचे कमावीसदाराशीं रुजू राहून देहाये मा॥र चे मोकासबाबेचा अमल व जकात सुदामत चालत आल्या प्रो सुरळीत देणें, जाणिजे. छ. २७ साबान.

———

ले. ४४१ [३३९]

पौष व. १ श. १७१० ता १२-१-१७८९

॥ श्री ॥

पै॥ छ २९ रबिलाखर ऊर्फ पौषमास मु॥ श्रीमथुरा सुरुसन तिसां समानीन.

राजश्रीयाविराजीत राजमान्य राजश्री आपाजीराम स्वामींचे सेवेशीं पोष्य हरि बल्लाळ सां॥ नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष. तुम्ही छ ८ व छ २२ रविलावरचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. राजश्री अल्ली बहादूर यांची व पाटीलबावांची भेट झाली. नंतर अल्ली बहादूर यांची रवानगी दिल्लीस केल्याबद्दलचा मजकूर पेशजी लिहिला आहे, त्यावरून कळेल म्हणोन.* गुलाम कादर यास मोरचेमध्यें कोंडून लढाई चालली होती. तों मागाहून अल्ली बहादर यांची रवानगी फौज सुद्धां केली. दरमजल हे जाऊन पोंचले. नंतर पाहिली फौज व हे एक होऊन त्यास जकड बसविली. मार्गशीर्ष वद्य षष्ठीस लढाईची निकड केली. तो दोन हजार फौजेनिशीं पळोन गेला. बातमी कळतांच फौज पाठीमागें गेली. तेव्हां दहा कोसांवर गुलाम कादराशीं गांठ घालून लढाई जाली. त्यास शिकस्त केला. त्याजकडील कारभारीही आणिले. त्या शिवाय तोफा हत्ती वगैरे आणिलीं. त्याची याद आलाहिदा आहे. त्यावरून कळेल, म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. त्यास अल्ली बहादर यांची भेट होऊन दिल्लीस रवानगी केल्याचा मजकूर पेशजी लिहिला त्यावरून सविस्तर कळलें. सांप्रत गुलाम कादर याची व अल्ली बहादर यांची सरकारची फौज सुद्धां लढाई होऊन गुलाम कादर कारभारी सुद्धां शिकस्त सांपडले,

* या शब्दापुढील शब्द फाटले आहेत.

ही मोठीच गोष्ट जहाली. श्रीमंतांचें दैव थोर आहे. वरकड वर्तमान सविस्तर श्रीमंतांचे पत्रावरून कळेल.+ राजश्री पाटलिबावांनीं इतके दिवस मेहनत केली त्याचें सार्थक ईश्वरें केलें. मोठी फत्ते जहाली. सदैव वर्तमान लिहीत जावें. रा॥ छ १५ रबिलाखर बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

ले.४४२] [४००] पौष १७१० जानेवारी १७८९

श्री.

यादी गुलामकादरा बरोबर बंदवे आणिले त्यांची नांवनिशीः-

१ गुलामकादर.	१ सतारखान गुजर.	१ इसब रोहिला,
१ मन्यारसिंग.	१ जोरदस्तखान.	१ जिसुक ब्राह्मण बिलास-
१ नाजरखोजा.	१ हसन रोहिला.	रायाचा.
१ बिलासराय दिवाण.	१ मनुलाल ब्राह्मण.	१ याकुदखोजा.
		—
१ कुसलाकरोडा.	१ इजब रोहिला.	३
१ हमीमबुअलीखा.	१ घासी गार्डवान.	८० तोफा सुमार.
१ नजीम रोहिला.	१ कुतबीखवास.	२२ हत्ती नग.
—	—	० उंट घोडीं यांची गणती
७	७	आली नाहीं.

ले. ४४३ [४०१] अधिक आषाढ शु.८ श.१७१२ ता॥ २०-६-१७९०

श्री.

यादी छ ६ सव्वाल मुक्काम नजीक पाटण येथें लढाई इसमालबेगाचे लढाईंत शिलेदार हुजुरात पैकीं ठार, जखमी सुा तिसैन मया व अलफ बद्दल यादी.

३६१ खांसे व स्वार

३०९ जखमी.

७२ तरवारीचे.	३४ भाल्याचे.
९ बर्चीचे.	६ तिराचे.
१५७ गोळीचे.	३१ गोळ्याचे व दगडाचे.
२३८	७१

३०९

+ येथपासून खुद्द खाशांचें अक्षर आहे.

५२ ठार.

३६१

१७३ घोडीं.

१०४ जखमी ६९ ठार.

१७३

५३४

(ग्वालेर दरबार पत्रें भाग ३ ले. ९६ येथें हाच कागद आहे.)

ले. ४४४ / [४०२] — श. १७१२ / ता॥ १७९०

श्री

यादी इसमायल बेग यांजकडे महाल. सु॥ तिसैन मया व अलफ.

१ परगणें झझर	१ परगणें इंदोर निमकसार	१ परगणें हुशी
१ ,, बसईबानसूर	१ ,, राता	१ ,, नाहारझाल
१ तालुके पाटोधा	१ ,, खैरथळ	१ ,, रोहतक
१ परगणें दादरीतहा	१ ,, नूरनगर	१ ,, पातियाबाद व शिरसाबाद
१ ,, बोरी	१ ,, पाटोधी	१ ,, दुंडावर
१ ,, रेवाडी	१ ,, दादरी	१ ,, नगीना मे॥नजर
१ ,, पूर.	१ ,, हिसार.	
१ ,, कोटकासम.	१ ,, बवल	१ ,, झवानावट पोंकरा
१ ,, महीम.	१ ,, काठी.	१ ,, तिजारा.
१ ,, दुशाख तुशाम	१ ,, कानोड.	१ ,, साकरस.
१ ,, इसमायलपूर.	१ ,, रताय	१ ,, रसघन.
१ ,, गिमेट.	१ ++++डथा.	१ ,, टावरेधोरा.
१ ,, सवारणपूर.	१ ,, नार्नोळ.	१ ,, तावडू.
	१ ,, बोहोदा.	
१ ,, भौझालडी.	१ ,, हरसोली.	१ ,, कोटफुळी.
१ ,, लाहोरा.	१ ,, निमराणा.	
१५	१६	१३

ले. ४४५ [३४५] कार्तिक व. ९ श. १७१२ ता ३०-११-१७९०

॥ श्री ॥

राजश्रियाविराजीत राजमान्य राजश्री आपाजीराम स्वामींचे सेवेशीं

पो बाळाजी जनार्दन सा नमस्कार विनंति उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लिहित जावें. विशेष छ ११ मोहरमचें पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री पाटीलबावा डेरे दाखल जहाले, सरदारांकडील फौजा पुढें गेल्या होत्या त्यांनीं सांबर वगैरे ठाणीं घेऊन अजमेरीस गेले, शहर घेऊन किल्यास मोर्चे लाविले, मारवाड्यांचा जमाव मेडत्यावर जाला होता, तेथून लढाईच्या इराद्यानें पुढें पांच कोस आले,सरदारांकडीलही फौजा चालून गेल्या, त्यांची यांची लढाई मातबर जाली, त्यांत श्रीमंतांचे प्रतापें करून मारवाड्यांचा मोड होऊन सरदारांस यश आलें, तोफा पाडाव आल्या, मेडत्यांत ठाणें बसविलें, गंगाराम भंडारी व आलियार बेगखान मेडत्यांत होते त्यांस धरिलें, म्हणोन विस्तारें लिहिलें तें सर्व कळलें. त्यास सरदारांकडील फौजांनीं अजमेरच्या मोर्च्यांचा बंदोबस्त राखून राठोड चालून आले त्यांजवर जाऊन लढाई मारली, त्यांत राठोड मोडले, सरदारांचे फौजेस यश श्रीमंतांचे प्रतापें करून आलें, [ही] मोठी गोष्ट जहाली. येणेंकरून राठोडांवर दाब चांगला बसला. पाटीलबावा डेरे दाखल जहाले. उत्तम आहे. पुढें काय होईल तें लिहून पाठवावें. गंगाराम भंडारी व अलियारबेग यांचें काय केलें व अजमेरीस मोर्चे बसले आहेत तिकडील वर्तमान काय, हें सविस्तर लिहावें. रा छ २२ रावल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

पैा छ २४ रविलाखर ऊर्फ मार्गशीर्ष वद्य ११ मुा मारवाड नजीक कृष्णगड शुक्रवार.

ले. ४४६ [१६०] वैशाख शु. २ श. १७१३ ता ५-५-१७९१.

॥ श्री ॥

पै छ १७ माहे रमजान सन १२००

राजश्रियाविराजीत राजमान्य राजश्री गोविंदरावजी स्वामींचे सेवेशीं–

पोष्य बळवंतराव भवानीशंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ तागाईत छ १ माहे रमजान मुक्काम हुमनाबाद जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें विशेष. श्रीमंत महाराज यजमान साहेबीं राजश्री तात्या यांजकडे फौज सुद्धां रवाना केलें तेव्हां आज्ञा हेच कीं, तात्यांची व हजरतींची भेट होणार त्या पूर्वी तात्यांजवळ जाऊन पोंहचावें, त्यांचे विचारें नबाब बंदेगान अलीची भेट व्हावी. त्यास लोकांचे स म जो त्या स [समजुतीस ?] चार दिवस अधीक वाशीमावर लागले. यांत तात्यांची व हजरतींची भेट होऊन मसलहत प्रकरणीं बोलणें होऊन तात्या यांची स्वारी पुढें कृष्णा उतरून गेली. त्यास त्वरेनें तात्यांजवळ जाऊन पोंहचण्यास मार्ग हुमनाबादेचा नीट जाणून येथपर्यंत येणें

जाहालें. त्यास नीट मार्ग येतां हजरतीची स्वारी मध्यंतरीं आहे, पृथक भेटीचें तों प्रयोजन नाहींच. इकडील बाजेकरी [?] व या दौलतीची कळकळ तात्यांस व आपणांस आहेच. तात्या यांचे व हजरतीचे भेटीचे प्रसंगीं इकडील मतलब उगविलेच असतील. प्रत्येक आम्हांस काय बोलावयाचें आहे. त्यांस मार्ग जवळून तेव्हां परस्पर जाणें हें चांगलें. किंवा वीस पंचवीस कोशीं असतांना एक दिवस राहून सरासरी भेट घेऊन जावें. जैशी येविशीं करीन [?] सल्लाह असेल त्याप्रमाणें सूचना व्हावी. हा मार्ग सोडून जावें तरि दिवसगत लागेल. वासना तों तात्यांजवळ सत्वर जावें हेच. व यजमानाची आज्ञा याचप्रमाणें. सर्वात्मना यजमानांचा विश्वास आपले ठायीं तेव्हां उचित प्रकार जो असेल तोच आपण लिहीतील. येविशींची विनंती तात्या यांस लिहिली आहे या उपरि जाण्यास दिवस बहुत थोडके राहिले. पत्राचीं उत्तरें सत्वर यावींत. त्याप्रमाणें येथून घडण्यांत येईल. बहुत काय लिहिणें लोभाची वृद्धि कीजे हे विनंती. (* गोविंदराव काळे)

ले. ४४७ [१२५] पौ छ २७ रमजान वैशाख शु. ११श. १७१३ ता ११-५-१७९१

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोविंदराव+ स्वामींचे सेवेशीं—

पो। परशराम रामचंद्र नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष—तुम्ही दु कि त्ता [?] पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर आपले व राजश्री गोविंदराव बापू यांचे पत्रावरून सविस्तर कळला. याचप्रमाणें वरचेवर तिकडील इंग्रजाकडील व टिपूकडील वर्तमान लिहून कळवीत जावें. इकडील मजकूर तरि आम्ही धारवाडचा बंदोबस्त करून तुंगभद्रा पार होऊन दक्षणतीरास आल्यानंतर मायेकोंडा व होदेगिरें व संतीवनूर बे चेनागिरी ठाणीं घेऊन नजीक रामागिरी येथील मुक्कामास गेल्याचें वगैरे वर्तमान तपशीलवार राजश्री गोविंदराव बापू* यांचे पत्रीं लिहिलें आहे. त्याजवरून सर्व मजकूर कळेल. छ १० रमजान बहुत काय लिहिणें लोभ असो द्यावा हे विनंती

ले. ४४८ [४४३] आश्विन शु. ११ श. १७१३ ता २८-९-१७९१

श्री.

नक्कल.

राजश्री बळवंतराव महादेव कमाविसदार परगणे आमझरें गोसावी यांसि.

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित महादजी शिंदे दंडवत. सुरुसन इसने तिस्सैन मयां व अल्फ. बहल देणें विनायक महादेव व नारोकृष्ण कारकून निसबत

---

* गोविंदराव काळे + गोविंदराव पिंगळे

बक्षी यांसि वेतनें जातीस व मुदबखचे रोजमुरे व शागिर्दपेशा वगैरे बाबत तागाईत सन इहीदे तिस्सैन अखेर सालबद्दल करारचिठ्ठया येणेंप्रमाणें रुपये.

८२८० वेतनें व शागिर्दपेशा वगैरे दरसाल रुपये १८२० प्रमाणें इस्तकाबिल छ. १७ सफर सन सब्बा तागाईत सन इहिदे तिस्सैन अखेर साल, माहे ५४८१८.

आकार ८२८० रुपये.

२१४॥ मुदबखबद्दल वगैरे सालिना ७०२ रुपये प्रमाणें इस्तकबिल छ ९ जमादिलाखर सन इहिदे तागाईत छ १७ सवाल एकंदर साल माहे ३८२०

रुपये.

४३९। दफ्दरखर्च निसबत बक्षी खातें कागद व समया.

११७ खातें उंट नफर १ एकूण रुपये.

१६४९॥। चंदी व लागवड घोडे यांस व उंटांस इस्तकाबिल सन तिस्सैन तागाईत सन इहिदे तिस्सैन दुसाला.— रुपये.

१४६। सारवान व मसालची यांचे हिशेबाबद्दल.— रुपये.

१४३। खातें तेल दीपास व मशालेस. रुपये.

१०९२०

पैकीं आदा पातशाई महाल पैकीं परगणे आपाजी राम फडणीस रुपये ५५०० बाकी देणें रुपये ५४९० पैकीं परगणे बडोदें वगैरे महाल येथील सन सल्लास तिस्सैनचे रब्बीचे ऐवजीं वरात लावून दिली रुपये २७४० बाकी देणें ते रुपये २७५०

एकूण दोन हजार सातशें पन्नास रुपये तुम्हांकडून देविले असत. तरि परगणे मजकूर येथील पेस्तरसाल सन सल्लास तिस्सैनचे रब्बीचे एवजीं सदर्हू सत्तावीसशें पन्नास रुपये ज्येष्ठ शु० १५ पूर्णिमा शके १७१५ पंधराचे मित्तीस मशार निल्हेस उजनचलनी आदा करून कबज घेणें. जाणिजे. छ. २९ माहे मोहरम बहुत काय लिहिणें हे विनंती मोर्तबसूद.

ले. ४४९ } { मार्गशीर्ष शु ८ श. १७१४
[४०८] } { ता २१-११-१७९२

श्री

यादी... ... ...

१. सन खमस खमसैन मय्या व अल्लफ. शालिवान शके १६७६ म्हणजे राज्याभिषेक शके ८१ सालीं श्रीचे व कैलासवासी श्रीमन्महाराज शंभुछत्रपति महाराजांचें दर्शन घेऊन सावनूरकर नबाब साहेब याच्या प्रांतात जाऊन लढाई करावी असा बेत पुर्णे

मुक्कामीं ठरवून श्रीमंत बालाजी बाजीराव पंडित प्रधान ऊर्फ नानासाहेब व सदाशिव चिमणाजी पंडित ऊर्फ भाऊसाहेब हे फौजे सुद्धां पुण्याहून दरकूच निघाल्यावर पंडित प्रधान यांनीं महाराज सरकारांत विनंतीपत्रें देऊन वकील पाठविले. नंतर किल्ले पन्हाळ्याहून महाराज सरकारची खांसास्वारी व खासामहालच्या स्वाऱ्या करवीरीं येऊन दाखल जहाल्या, व पंडितप्रधान यांची स्वारी कन्हाडनजीक येऊन पोंहोचली. तेथून कूच दरकूच पंडितप्रधान यांची स्वारी फौजेसुद्धां निघून कसबा बावडे तफ हवेली नजीक कोल्हापूर श्रीपंचगंगातीरास मुक्काम जहाला. दुसरे दिवशीं महाराज सरकारची खांसास्वारी हत्तीच्या अंबारींत होऊन कोश दीडकोश श्रीपंचगंगेच्या ऐलतीरास महाराज सरकारचे डेरे दिले होते त्या डेऱ्यांत दाखल जहाल्यावर पंडितप्रधान यांजकडील तोफखाना सुरू जहाला व पंडितप्रधान महाराज सरकारच्या डेऱ्यानजीक आल्यावर पायउतारा होऊन डेऱ्याच्या दरवाज्यांत हात जोडून हातांवर रुमाल घालून महाराज सरकारच्या सदरेनजीक येतांच महाराज सरकारांनीं पंडितप्रधान याच्या आंगावर चादर भरगचीं पंडितप्रतिनिधी यांजकडून घातल्यावर दोन्ही हातांवरील रुमाल काढून महाराज सरकारचे पायावर मस्तक ठेवून नंतर जोहार केल्यावर बसावें म्हणून आज्ञा जहाल्यावर सदरेनजीक पंडितप्रधान मर्यादेप्रमाणें बसून आपल्याकडील सरदार व मानकरी यांजकडून सरकारास जोहार करवून दर्शनें करविलीं. नंतर महाराज सरकारची खांसास्वारी हत्तीच्या हौद्यांत जहाल्यावर पंडितप्रधान व सदाशिवराव भाऊ ऊर्फ भाऊ साहेब खवासखान्यांत बसून उभयतां पंडित यांहीं मोर्चलें आपले हातांत घेऊन महाराज सरकारांवर उडाविण्यास प्रारंभ केल्यावर, महाराज सरकारची खांसास्वारी देशरव करवीरास येण्याविषयीं जहाली. ... कलम.

२. पंडितप्रधान यांहीं आपल्याकडील सरदार व मानकरी वगैरे फौजेचे लोक यांसी अगोदरच सूचना केली होतीं कीं, महाराज सरकारची खांसास्वारी हत्तीच्या हौद्यांत होऊन देशरव जहाल्यावर तुम्हीं दोहों बाजूस कोरबंदीनें उभें राहून महाराज सरकारांस जोहार करावा. ... ... कलम.

३. महाराज सरकारची खांसास्वारी देशरव जहाली ते समयीं महाराज सरकारचा जरीपटका आघाडीस व पेशव्यांचा जरीपटका पिछाडीस याच अन्वयें महाराज सरकारच्या नोबती, पाठीमागें पेशवे यांची नोबत झडत होती. ... ... कलम.

४. सावनूरकर नबाबसाहेब यांचा व पेशवे यांचा तह होऊन पेशवे सरकारची स्वारी पुण्यास दाखल जहाल्यावर पुढें शके १६८४ साली श्रीमन्महाराज मातुश्री जिजाबाई साहेब यांची स्वारी पुण्यास घेऊन गेले. ते समयीं पंडित प्रधान पेशवे श्रीजेजुरी मुक्कामीं येऊन दर्शन घेतलें.

सदर पद्धती प्रमाणें घेऊन श्रीमन्महाराज श्रीं जिजाबाई साहेब यांची स्वारी पुणें मुक्कामीं घेऊन गेले, आणि राहण्यास निराळा वाडा दिला होता, तेथें नित्य पंडित प्रधान यांणीं कुटुंब सुद्धां येऊन दर्शन घेत होते, आणि मेजवानी वगैरे मानमर्यादा वर लिहिल्याप्रमाणें केली आहे. प्रतिनिधी व अमात्य व सेनापती हमेषा करवीरास येतात त्यांत महाराज

सरकारची स्वारी सामोरी जाऊन चादर घालून तिकडून सत्कार व नजराणा होऊन आणणेचा पाठ आहे हा प्रसिद्ध आहे. राजश्री गणपराव गायकवाड समशेर बहादर सेनाखास गील यांचे पूर्वज कधीं महाराज सरकारांत आले याचा दाखला दप्तरीं नाहीं, व महाराजसरकारची स्वारी बडोदे प्रांतीं गेलेला दाखला नाहीं. त्यास सदरीं अष्टप्रधान यांच्या पद्धती प्रमाणें व्हावें व महाराज सरकारांतून सत्कार सदर्हू प्रमाणें व्हावा असें वाटतें, यासी हरकत दिसत नाहीं.

५ सन अशरीन मय्यातैन व अलफ सन १८१९ इसवी शके १७४१ सालीं महाराजसरकारांतून तीळशर्करेचीं आज्ञापत्रें " राजमान्य राजश्री " म्हणून सादर झालीं आहेत त्यांचा तपशील.

१ आनंदराव गायकवाड सेनाखासगील.
१ सयाजीराव गायकवाड समशेर बहादर.
१ जयसिंगराव गायकवाड.
३

येणें प्रमाणें आज्ञापत्रें गेल्याचा दाखला चिटणीसीकडे आहे.

६ गायकवाड यांचे पूर्वज पिलाजीराव गायकवाड रहाणार मौजे + + कांहीं कारणपरत्वें घरांतून निघून तळेगांवीं खंडेराव दाभाडे याजपाशीं येऊन राहिले. पुढें दाभाडे यांसि कर्ते पाहून कैलासवासी श्रीमन्महाराज शाहू छत्रपति यांणीं शके १६३५ सालीं सेनापतीचीं वस्त्रें दिलीं. नंतर पिलाजी गायकवाड यांचे पुत्र दमाजी गायकवाड हे कर्ते सबब त्यांसि कैलासवासी श्रीमन्महाराज शाहु छत्रपति यांहीं शके १६३५ समशेर बहादर हा किताब देऊन वाढविलें. पुढें गुजराथ वगैरे गायकवाड यांच्या ताब्यांत येऊन आजवर त्यांच्या वंशांत गुजराथ प्रांत चालत आहे.

७. सन सल्लास तिस्सैन मय्या व अलफ सन १७९२ इसवी शालीवाहन शके १७१४ परिधावी नामसंवत्सरे गोविंदराव गायकवाड यांस सेना खासगील पदाची वस्त्रें फत्तेसिंग गायकवाड वारल्यानंतर पुण्यास जाऊन श्रीमंत पेशवे यांजपाशीं दोन अडीच वर्षे राहिल्यावर रावजी आप्पाजी सातारचे सुभेदार यांच्या मार्फत प्रयागजी यांचे नातू फत्तेसिंग गायकवाड यांजवळ बडोदे मुक्कामीं होते, त्यांची खातरी करून त्यांणीं नजर वगैरेची खातरी पेशवे सरकारांत दिल्यावर श्रीमंत सवाईमाधवराव पंडित प्रधान यांणीं कैलासवासी श्रीमन्महाराज राजश्री शाहूछत्रपति सातारकर यांच्या सेवेशीं विनंतीपत्र लिहून गोविंदराव गायकवाड यांस सेना खासगील पदाचीं वस्त्रें व आज्ञापत्र आणून पुणें मुक्कामीं दिलीं, आणि शके मजकुरीं मार्गशीर्ष शुद्ध ८ रोजीं गायकवाड यांणीं रावजी आप्पाजी यांस आपल्या दौलतीचे कारभाराचीं वस्त्रें दिलीं. नंतर श्रीमंत पेशवे यांचा निरोप घेऊन मशारनिल्हे गायकवाड गुजराथप्रांतीं निघून गेले. त्यांस पुत्र व कन्या:—

१ वडील स्त्री सौभाग्यवती गहिनाबाई यांस संतान नाहीं.

१ दुसरी स्त्री सौभाग्यवती सौंदराबाई यांसि पुत्र आनंदराव गायकवाड अवलिया होते.

१ तिसरी स्त्री सौभाग्यवती अन्नपुर्णाबाई यांस पुत्र फत्तेसिंगराव गायकवाड.

१ चवथी स्त्री सौभाग्यवती गयाबाई यांस पुत्र व कन्या.

१ सयाजिराव गायकवाड यांचा वंश गादीवर आहे.

१ वडील स्त्री सौभाग्यवती चिमाबाई यांच्या पोटीं पुत्र

१ गणपतराव गायकवाड समशेरबहादर सेनाखासगील.

१ दुसरे आप्पासाहेब गायकवाड.

१ तिसरे दादासाहेब गायकवाड.

१ चवथे नानासाहेब गायकवाड.

———

४

कन्या (सयाजीरावांच्या)

१ वडील कन्या सौभाग्यवती चजूबाई दत्तवाडकर घोरपडे यांच्या घरीं दिली आहे.

१ दुसरी कन्या सौभाग्यवती (बायजाबाई) देवासकर कदम यांच्या घरी दिली आहे.

१ तिसरी कन्या सौभाग्यवती रदुबाई निरवीकर कदम यांच्या घरीं दिली आहे.

१ चवथी कन्या सौभाग्यवती (गंगाबाई) खानवलकर यांच्या घरीं दिली आहे.

१ दुसरी स्त्री सौभाग्यवती गिरजाबाई यांस कन्या एक शिर्के कुठरेकर यांच्या घरीं दिली आहे. त्यांस पुत्र संतान नाहीं.*

———

ले. ४५० [४३५]

मार्गशीर्ष शु. १२ श. १७१४ ता. २५-११-१७९२

श्री

सन १२०२ फ० सन १७९२ इ० फेरिस्त नंबत १९ पैकीं

करारनामा सुजा अतवत हनूर दस्तगाह अज्जम लेप्टनेंट उलियम टामस सांडीफोर्ड कारपरदाज आजतर्फ हशमतपन्हा अज्जम हनराबल मेजर जनराल राबर्ट आबरकांबी प्रसिदेन्त गोवर्नदोर जनरालें जंजिरे मुंबई व अज्जम बाळाजी राम सरलष्कर आजतर्फ श्रीमन्महाराज राजश्री शिवाजीराजे छत्रपति तक्त कोल्हापूर या तर्फे दरम्यान हरदू तर्फेनें सरकारच्या कुलअखतियारानिशीं एकबाल पन्हाह हनराबल सरकार कंपनीचें कर्ज श्रीमन्महाराज राजे यांजकडून देणें, त्याच्या फैसल्या बाबे व जंजिरे मुंबई येथील सरकारचे पन्हाहांतील बेपारी यांस इंग्रजी.

स्थान कबूल करून कुलिअख्तियार पाठवितील तेव्हां सरकार कंपनी तर्फेनें निशाणी व शिक्का होईल.

---

* हा कागद मोडककृत कोल्हापुरच्या इ. त. ले. ७ येथें आहे.

सदर्हू कलमें हनराबल मेजर जनराल राबर्ट आबरक्रांबी प्रसिदेन्त गोवर्नदोर जनरल जंजिरे मुंबई या तर्फेनीं अज्जम लेप्टनेन्ट उलियम:टामस सांडीफोर्ड कारपरदाज व श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर यां तर्फेनें अज्जम बाळाजीराम सरलष्कर या दरम्यान जंजिरे मुंबईच्या मुक्कामीं करार जहाले आहेत. इंग्रजी तारीख २९ माहे नवंबर सन १७९२ छ. १० माहे रबिलाखर सुरुसन सल्लास तिस्सैन मया अलफ.

बाळाजीराम मामले लष्कर हुजूरच्या आज्ञेवरून करारनामा लिहिला असे.

ले. ४५१ / [४३६]

मार्गशीर्ष शु.१२श.१७१४ / ता॥ २५-११-१७९२

सन १२०२ फसली सन १७९२ इ. तालिक फे० नं० १९ पैकीं.

करारनामा सुजात आतबत बुरदस्तगाह अज्जम लेप्टनेन्ट उलियम सांडीफोर्ड कारपरदाज अजतर्फ हिशमत पन्हाह अज्जम हनराबल मेजर जनराल राबर्ट आबरक्रांबी प्रसिदेंत गोवर्नदोर जनराल जंजिरे मुम्बइ व अज्जम बाळाजीराम सरलष्कर आजतर्फ श्रीमन्महाराज राजश्री शिवाजी राजे छत्रपति तक्त कोल्हापूर यां दरम्यान हरदू तर्फेनें सरकारच्या कुल्-अस्तियारानिशीं एकबाल पन्हाह हनराबल व सरकार कंपनीचें कर्ज श्रीमन्महाराज राजे यांजकडून देणें, त्याच्या फैसल्या बाबें व जंजिरे मुंबई एथील सरकारचे बेपारी यांस इंग्रजी. सन १७८५ पासून मालवणच्या आरमारानें नुकसान केलें असे त्याच्या फैसल्या बाबें, तपशील जलेबमोजीब करार केला आहे बितपशील:—

१ जे दोस्ती अजकदी मूळ आयाम पासून हनराबल कंपनी व श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर या दरम्यान चालत आली आहे ते फेर मोहकम करून तर्फेनें दरम्यान कज्जिया चालत असे तों हीं कलमें कबूल जहाल्यावर फैसल्हा होईल.

२ श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर करार करितात कीं, त्यांहीं अज्जम मिस्तर ब्रूम याजशीं करार केला होता त्यापैकीं बाकी हनराबल सरकार कंपनीचें कर्ज देणें असेल तें तिहीं दफातीनें यावे. पाहिल्या दफातीचा ऐवज तारीख १ माहे जानेवारी सन १७९३ ते दिवशीं आदा करावा व दिगर दफातींचा ऐवज आदा होय तंव पावेतों तो दरसालच्या जानेवारी महिन्याच्या १ ले तारखेस देत जावा, म्हणजे तारीख १ माहे जानेवारी सन १७९५ ते दिवशीं कुल् फैसल्हा होईल.

३ सदर्हू कर्ज श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर यांजकडून सरकार कंपनीस देणें. त्यास बियार सालें गुजरलीं व ब्याज चढलें सबब कीं, त्यांच्यानीं राज्यावर मुदत कसाला गुजरला, त्यामुळें त्यांच्यानीं ब्याज द्यावयास ताकद नाहीं म्हणून हनराबल कंपनीकडेस आज तरी किल्लेबतबनी दरख्यास्त करितात कीं, ब्याज माफ करावें, त्यास ब्याज द्यावयाची हिम्मत राहिली नाहीं. याजकरितां कबूल केलें जात आहे, जे सदर्हू करारप्रमाणें श्रीमन्महाराज आपलें इमान राखून ऐवज आदा करतील तरि ब्याजाचा दावा करणार नाहीं.

४ श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर करार करितात कीं, त्यांच्या आरमाराकडून बेपारी-

यांसि नुकसान इंग्रजी सन १७८५ पासून जहालें आहे. त्याची यादी दास्ती बयाज इंग्रजी तारीख ३१ जुलई सन १७९२ पावेतों करून हिशमत पन्हाह अज्जम मेजर जनराल राबर्ट आबरक्रांबी प्रसिदेन्त गोवर्नदोर जनराल मुंबई यांसि श्रीमन्महाराज राजे यांजकडे पाठविली आहे, त्याचा ऐवज द्यावयाकरितां करार करितात कीं, तूर्त अज्जम बाळाजी राम सरलष्कर याजबरोबर रुपये वीस हजार पाठविले आहेत हे द्यावे व दिगर पंचवीस हजार रुपये चहूं दफातींनें द्यावे म्हणून करार केला असे. त्याचा तपशील पहिली दफातीं तारीख १ मार्च सन १७९३ व दिगर तीन दफातींचा ऐवज दरसाल मार्च माहिन्याच्या १ ल्या तारखेस देत जावा. जबलग सदर्हू पस्तीस हजार रुपये फैसला होई तंव पावेतों द्यावे. ऐवजांत बेपारी यांचे कुल् नुकसान फैसला होईल.

५ सदर्हू कलमें करारांत आणून त्याजवरी श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर या तर्फेनीं अज्जम बाळाजी राम यांहीं खुद आपली निशाणी व महाराज यांजकडून या कामाकरितां शिक्का याजकडेस दिला असे. तो शिक्का करून द्यावयास अख्तियारकुल् असे. या करितां मशारानिल्हे बाळाजीराम यांणीं या काररावरी निशाणी महाराजांचा शिक्का केला, म्हणजे हा करार श्रीमन्महाराज राजे यांजकडूनच बहाल व मोहकम जहाला व एकबालपन्हाह सरकार कंपनी तर्फेनें ज्या वक्तीं हा करार दाहद बंगाल येथील शामत व अवलीमर्तबत हनराबल यरेल कार्नेलवालीस नैट आफ धी ग्यार्डर बहादूर गवरनर जनराल हिंदुस्थान कबूल करून कुलिअखत्यार पाठवितील, तेव्हां सरकार कंपनी तर्फेनीं निशाणी व शिक्का होईल.

सदर्हू कलमें हनराबल मेजर जनराल राबर्ट आबरक्रांबी गोवर्नदोर जनराल जंजिरे मुंबई या तर्फेनें अज्जम लेफ्टनेन्ट उलियम टामस सांडीफोर्ड कारफरदाज व श्रीमन्महाराज राजे कोल्हापूरकर या तर्फेनीं अज्जम बाळाजी राम सरलष्कर या दरम्यान जंजिरे मुंबईच्या मुक्कामीं करार जहाले असत. इंग्रजी तारीख २५ माहे नवंबर सन १७९२ इ. छ १० माहे रविलाखर सुरुसन सल्लास तिस्सेन मय्या व अल्लफ. बाळाजीराम मामले सर लष्कर, हुजूरच्या आज्ञेवरून करार लिहिलें असे.*

ले. ४५२ / [.४३४] — मार्गशीर्ष शु. १२ श. १७१४ / ता २५-११-१७९२

सन १२०२ फ. सन १७९२ इ. — नकल फेरिस्त नंबर १९.

करारनामा सुजा आतवत हनूर दस्तगाह अज्जम लेप्टनेंट उलियम टामस सांडीफोर्ड कारपरदाज अजतर्फे हशमत पन्हाह हनराबल मेजर जनराल राबर्ट आबरक्रांबी प्रसिदेन्त गोवर्नदोर जनराल जंजिरे मुंबई व अज्जम बाळाजी राम सर लष्कर अजतर्फे श्रीमन्महाराज शिवाजी राजे छत्रपति तक्त कोल्हापूर, यां दरम्यान हरदू तर्फेनें सरकारचे कुल् अख्तियारानिशीं एकबाल पन्हाह हनराबल सरकार कंपनीचें कर्ज श्रीमन्महाराज राजे यांजकडून देणें

---

* हा व खालील कागद बहुतेक एकाच मतलबाचे आहेत.

त्याच्या फैसल्या बाबे व जंजिरे मुंबई एथील सरकारचे पन्हांतील बेपारी यांस इंग्रजी सन १७८५ पासून मालवणच्या आरमारानें नुकसान केलें असे, त्याच्या फैसल्या बाबे तपशील नेले बमोजीब करार कलमेंत आहे. बितपशील. कलम.

१. जे दोस्ती आनकदी मूळ आयम पासून हनराबल कंपनी व श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर यां दरम्यान चालत आली आहेत ते फेर महकूब करून तर्फेनें दरम्यानें कज्जिया चालत असे तो हीं कलमें कबूल झाल्यावर फैसल होईल. कलम.

२. श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर करार करितात कीं त्याहीं अज्जम मिस्तर ब्रूम यांजशीं करार केला होता त्या पैकीं बाकी हनराबल सरकार कंपनीचें कर्ज देणें असेल तें तिहीं दफातीनें द्यावें. पहिल्या दफातीचा ऐवज तारीख छ १ माहे जानेवारी सन १७९३ ते दिवशीं आदा करावा. व दिगर दफातींचा ऐवज आदा होय तों पावेतों दरसालच्या जानेवारी माहिन्याच्या १ ले तारखेस देत जावा. म्हणजे तारीख १ जानेवारी सन १७९५ ते दिवशीं कुल् फैसल होईल.

३. सदर्हू कर्ज श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर यांजकडून सरकार कंपनीस देणें त्यास बिसयार सालें गुजरलीं व ब्याज चढलें सबब कीं, त्यांच्या राज्यावर बहुत मुदत कसाला गुजरला त्या मुळें त्यांच्यानें ब्याज द्यावयाची ताकद नाहीं म्हणून हनराबल कंपनी कडेस अजतरीक मेहेरबानी दरखवास्त करितात कीं ब्याज माफ करावें. त्यास ब्याज द्यावयाची हिम्मत राहिली नाहीं, या करितां कबूल केलें जात आहे जे, अगर सदर्हू कराराप्रमाणें श्रीमन्महाराज राजे आपलें इनाम राखून ऐवज आदा करतील तरि ब्याजाचा दावा करणार नाहीं.

४. श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर करार करितात कीं, त्यांच्या आरमारांकडून बेपारी यांस नुकसानी इंग्रजी सन १७८५ पासून जहालें आहे त्याची याददास्तबमा ब्याज इंग्रजी तारीख ३१ जुलई सन १७९२ पावेतों करून हशमत पन्हाह अज्जम मेजर जनरल राबर्ट आचरकांबी प्रसिदेन्त गोवर्नदोर जनरल जंजिरे मुंबई यांहीं श्रीमन्महाराज राजे यांजकडे पाठविली आहे, त्याचा ऐवज द्यावयाकरितां करार करितात कीं तूर्त अज्जम बाळाजी रामया हमराह रुपये वीस हजार पाठविले आहेत ते घ्यावे व दिगर पास्तिस हजार रुपये चहूं दफातींनीं द्यावे म्हणून करार केला असे. त्याचा तपशील पहिली दफात तारीख १ मार्च सन १७९३ व दिगर तीन दफातींचा ऐवज दरसाल मार्च माहिन्याचे १ तारिखेस देत जावा. जबलग सदर्हू पास्तिस हजार रुपयांचा फैसल्हा होय तंव पावेतों ह्या ऐवजांत बेपारी यांचे कुलनुकसान फैसल होईल. कलम

५. सदर्हू दफातींचा ऐवज आदा व्हावा त्याच्या जामिनीकरितां व या पुढें इंग्रजी कौली तरांडी यास श्रीमन्महाराज राजे यांच्या आरमाराकडून इजा न पोंहचावी याविषयीं सरकार कंपनीची निशा पुरली पाहिजे, म्हणून श्रीमन्महाराज राजे करार करितात कीं,

जंजिरे मालवणास इंग्रजांही फैतारी घालावी. त्या फैतारीवरि इंग्रजी निशाण उडेल. जंव पावेतों सदर्हु दावे फैसल होत ते तंव अगर त्या बाद इंग्रजांच्या हातील कीं फैतारी ठेवावी वरत्या बाबे इंग्रजांच्या अख्त्यार असे. या शिवाय श्रीमन्महाराज राजे कबूल करितात कीं, अगर इंग्रजांस दरकार पडल्यास कोल्हापुरांत आपण जेथें रहातात त्या जागीं फैतारीस जागा द्यावी व त्या हरदु फेतूर्‍यांत जे शिपाई लोक सरकार इंग्रजांकडून रहातील त्यांस अनुका अडीश्री श्रीमन्महाराज राजे देतील. जेथ पावेतों सदर्हु कलमें कुल अमलांत येत तंव पावेतों.

६. सदर्हु कलमें करारांत आणून त्याजवरि श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर या तर्फेनीं अज्जम बाळाजीराम यांणीं खुद्द आपली निशाणी व महाराजांकडून या कामाकरितां शिक्का त्याजकडेस दिला असे तो शिक्का करून द्यावयासि त्यास अख्त्यार कुल् असे. याजकरितां मशारनिल्हे बाळाजीराम यांहीं या करारावरि निशाणी करून महाराजांचा शिक्का केला म्हणजे हा करार श्रीमन्महाराज राजे यांजकडूनच बहाल व मोहकम जहाला व एकबालपन्हाह सरकार कंपनी तर्फेनीं ज्या वक्तीं हा करारदाद बंगाल येथील शहामत व अवलीमर्तबत रैट हनराबल येरल कार्नवालीस नैट आफ धी ग्यारडर बहादूर गवर्नर जनरल हिंदुस्थान कबूल करून कुल् अख्तियार पाठवितील, तेव्हां सरकार कंपनी तर्फेनीं निशाणी व शिक्का होईल.

सदर्हु कलमें हनराबल मेजर जनराल रावर्ट आबरक्रांबी प्रसिदेन्त गोवर्नदोर जनराल जंजिरे मुंबई या तर्फेनें अज्जम लेप्टनेन्ट उलियम टाम्स सांडी फोर्डकारपरदाज व श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर यांत तर्फेनीं आज्जम बाळाजी राम सरलष्कर यां दरम्यान जंजिरे मुंबईच्या मुक्कामीं करार जहाला आहे ते इंग्रजी तारीख २५ माहे नवेंबर सन १७९२. छ० १० माहे रबिलाखर सुरुसन सल्लास तिस्सैन मया व अल्फ. बाळाजी राम मामले लष्कर हुजूरच्या आज्ञेवरून करारनामा लिहिला असे.

ले. ४५३ [४३७] आषाढ व. ७ श. १७१५ ता॥ २९-७-१७९३

श्री

सन १२०३ फ. सन १७९३ इ. नकल फेरिस्त नं० २९

यादी खेमसावत भोंसले सरदेसाई प्रांत कुडाळ व महालानिहाय यांजकडे जाबसाल करवीरकर महाराज यांजकडून उलगडून घ्यावयाचे. सुरुसन आर्बातिस्सैन मय्या व अलफ.

... ... कलमें बितपशील.

सन सम्मानांत महाराजांची स्वारी घाटाखालीं जाऊन सावताकडील किल्ले कोट प्रांत घेतला आहे तो सरंजामसुद्धां माघारा द्यावा

५ किल्लेकोट.... ... ...

लढाई खेरीज किल्यावरील वगैरे तोफा व जकीरा व चीजबस्त जरा बाजरा जें जें असेल तें माघारें द्यावें. कलम.

वाजवी खर्च द्यावायाजोगा असेल तो

१ तालुका गंधर्वगड व दरे वैगरे निसबत कमळजाबाई भोंसली. ... ...
१ ठाणें तुकरवाडी ... ...
१ किल्ले नरसिंहगड ... ...
१ किल्ले भरतगड ... ...
१ कोटनिवर्ती ... ...

५

१ मुलूक घेतला असेल तो दरोबस्त माघारा द्यावा.

६

एकूण सहा कलमांचें कलम सदर्हू प्रमाणें उभयतांकडील कारकुनाच्या हवालीं व्हावा. सन सम्मान समानीन व तिस्सा समानीन दुसालांत पाडाव ब पाडाव लोकांपासून कतबे घेतले आहेत व कुळांपासून कतबे घेतले आहेत त्यांपैकीं कांहीं वसूलही घेतला आहे, त्यास वसूल घेतला असेल तो घेतलाच. बाकी घेणें राहिलें असेल तो घेऊं नये. त्याचे रोखे राहिले असतील ते माघारे घ्यावे व रोखे घेऊन वसुलांत आले नाहींत असेही रोखे असतील ते माघारे घ्यावे ब लढाईतील वैगरे सरदार व कारकून व पाडाव लोक व चाकरमाने व रयत सोमसांवत सुद्धां अटकेंत असतील ते सोडून द्यावे व कोणापासून जामीन कतबे घेतले असल्यास माघारे द्यावे.

सदर्हू पैकीं पाडाव वैगरे सोडले असतील ते जाऊन बाकी राहिले असतील ते सोडून द्यावे व रोखे कतबे माघारी सांवताकडे द्यावे. सोमसांवत माजगांवकर यास अटकेंत ठेऊन त्याजपासून तीन हजार रुपये खंड करार करून तो ऐवज जगदेवराव नाईक निंबाळकर यास तैनातींत लावून दिला आहे. त्यास मशारमजुरा देऊं. बाकी जकिरा वैगरे जरा बाजरा माघारें सावंतास देवावें.

साल मजकुरीं सनतिस्सैनांत वसूल व खंड पुरोई व कुळें धरून नेऊन त्यांजपासून ऐवज घेतला असेल तो व कुळांपासून कतबे घेतले असतील ते माघारे द्यावे. मुलुकांतील साल-मजकुरीं वसूल पडला असेल तो ते नेमणुकीप्रमाणें शिबंदी किल्याची व महाल संबंधी खर्च रुजुवातीनें वजा करून बाकी राहील तो ऐवज सावंतास माघारा द्यावा ... कलम १

सन तिस्सैनांत कलम ठरलें त्यास सल्लास अखेर चार सालें त्यास चोहों सालांची जमा महाराजांकडील व सांवताकडील कारकून यांच्या गुजारतीनें वाजवी ठरेल त्यांत शिबंदी खर्च वगैरे वाजवी आला असेल तो वजा करून बाकी ऐवज निघेल तो महाराजांकडून सांवतास देवावा.

कर्यात पाटगांव येथील चौकी नरसिंहगड निसबत सांवताकडील पुरातन पासून राहते त्याप्रमाणें दाखला पाहून ठेवावी. ... ... कलम १

सुधामत पासून चौकी असेल त्याप्रमाणें असावी. समानगड प्रांतांतून व हेरलेवाडीहून घनःश्याम यशवंत हेरे तालुक्यांत स्वारी करून दंगा करितात त्यास त्यांणीं दंगा करूं नये. या प्रमाणें महाराजास विनंती करून बंदोबस्त करावा. ... ... कलम १

सदर्हू प्रमाणें बंदोबस्त करावा.

निल्हे यांणीं तीन हजार रुपये घेऊन ज्यास्ती दोन हजार रुपये मागतात ते मागूं नये. पहिल्या तीन हजार रुपयांचा रोखा जगदेवराव नाईक यांणीं घेतला असेल तो माघारा द्यावा. ... ... कलम १

सदर्हू प्रमाणें कलमांचा फडशा जहाला असे.

एकूण सात कलमांचा फडशा सदर्हू लिहिले प्रमाणें करून देवावा छ २० जिल्हेज सुहुसन आर्बातिस्सैन मय्या व अलफ.

ले. ४५४ [१३०] मार्गशीर्ष शु. १२ श. १७१६ ता ४-१२-१७९४

पैा छ १४ जमादिलावल. ॥ श्री ॥

विनंती विज्ञापना. दौलानीं कम [काल ?] ठाण्यास आम्हांस बोलाविल्यावरून छ ७ जमादिलावल सोमवारीं गेलों. येकांतीं बैठक होऊन दौलाचे बोलण्यांत आलें कीं, मीर आलम याजकडून पत्रें आली आहेत. छ २९ माहे रा खरीं श्रीमंतांनीं मीर आलम व राजाजी यांसि बोलाविल्यावरून गेले. दरबार जाला. मदारुल महाम व परशराम पंडत व अप्पा बळवंत व चिंतामणराव फडके व गोविंदराव भगवंत सदर्हू इसमें होतीं. श्रीमंतांनीं मदारुल महाम यांस आज्ञा केली कीं, यांशीं बोलावें. त्यावरून मदारुल महाम यांणीं बोलण्यास आरंभ केला. याप्रमाणें इबरत सदरी आणून बोलण्यांतील मजकूर लिहिला. तें पत्रच मीरआलम यांचें दौलानीं आम्हांस वाचून दाखविलें, याचा तपशील आलाहिदा पुरवणी पत्रीं विनंती लिहिली आहे, त्यावरून ध्यानांत येईल. रा छ १० माहे जमादिलावल. हे विज्ञापना.

ले. ४५५ [१२७] मार्गशीर्ष व. ७ १७१६ ता १३-१२-१७९४

॥ श्री ॥

विनंती विज्ञापना. मीर पोलाद अल्ली सिकंदर जाहा नबाबाचे पुत्र यांनीं मजला सांगून षाठविलें कीं, नबाब व श्रीमंत उभयतां निफाला येणें ठीक नाहीं. जर तुम्हीं म्हणाल तर मी या कामांत येतों. मुषरूलमुलुक यांस सांगून नबाबाची मर्जी घेतों. म्हणोन निरोप. याचे उत्तर त्यांस दिल्हें कीं, आपण या कामांत यावें असा आम्हांकडून पैगाम आपल्याकडे नाहीं हीं गोष्ट जाहिरींत येईल ते वेळेस आम्हांकडून स्पष्ट उत्तर होईल कीं, याजकरितां आमचे नांव तुम्हीं घेऊं नये. याचा जबाब त्यांनीं दिल्हा कीं, तुमचें बोलणें आहे असें मी

कसें म्हणेन ? जर तुम्हांकडून कांहीं असतें तर बोलतों. कांहींच नाहीं याजकरितां तुमचें घेणार नाहीं. जर मर्जी हुजूरची असली तर मी शोध करून पाहतों.¶ याप्रमाणें पुसतों. परंतु माझे विद्यमान जाबसाल करावा असें तुम्हीं करार करून सांगावें. तेव्हां त्यांस म्हटलें कीं, मुषरूलमुलुक या गोष्टीवर राजी होणार नाहीं; याजकरितां तुम्हीं हें करूं नये. मुषीराची मर्जी ही घेतली. होत असल्यास करावें. मला मान्य, नबाबाची परवानगी ही देवविंतों, ऐसें त्याचें म्हणणें आहे. तुम्हीं हो म्हटलें म्हणजे उदईक जाहीर दारीनें तुम्हांकडे कोण गृहस्थ बोलावयासि पाठवितों. तेव्हां त्यांस उत्तर दिलें जे दौलाचे संमतें हें आपलें बोलणें. त्यास श्रीमंतांस या गोष्टीची विनंती लिहितों. तेथून उत्तर आलियावर काय आज्ञा येईल तसें सांगेन, म्हणोन यास जबाब देऊन खुंटविलें. विनंतीही लिहिली आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें करीन. रा॥ छ १९ जमादिलोवल. हे विज्ञापना.

ले. ४५६ [४८६]

ता. १६-१२-१७९४ मार्गशीर्ष व. १० श. १७१६

श्रीगजानन प्रसन्न.

छ २४ जमादिलावल.

यादी सर च्यार्लिस वार मालीट इंग्रज वकील कलकत्तेकर यांजकडील उंट जरूर पंचवीस सुरत प्रांत गुजराथ येथून पुणियासि येत आहेत. यांसि जकातीचा उपसर्ग न लागतां पुणियासि येऊं देणें म्हणोन रहदारीचे सुरुसन खमस तिसैन.

सदर्हूप्रमाणें रहदारीचे दस्तक देवावे. देणें. छ २२ जमादिलोवल सन खमस तिसैन मार्गशीर्ष.

ले. ४५७ [४५३]

सन १७९५ पूर्वी

श्री.

*स्वति श्री मंदमंदाकिनी-संदोह संपूरिता-शेष-जटामंडल-पारिलसच्छिव-चरण द्वंद्व-निर्द्वंद्व-भजनासादित-समस्त-पुमर्थ-सार्थसार्थकीकृत-निज-वंशावतारेषु, पूर्व-पूर्व-धन्य-राजन्य-मुर्धन्याचरित-धर्माचरण-प्रचारण-चातुर्य-धुरीणेषु, सौजन्य-सिंधुषु, श्री महाराजाधिराज महाराणा श्रीमद्भीमसिंहनृपवर्येषु, ¶ श्रीमन्माधवराय नारायण-पंडित-प्रधान-विहिताशीराशयः

---

* हें पत्र व पुढील बरींच पत्रें रा० रा० त्रिंबकराव जीवनराव चिटणीस यांजकडून अस्सल मिळालीं. कांहीं सोनेरी रुपेरी वेलबुट्टीच्या कागदावर लिहिलेलीं आहेत. पेशव्यांच्या चिटणीसांचे त्रिंबकराव हे वंशज होत. त्यांनीं होऊन हे कागद आम्हांकडे प्रसिद्ध होण्याकरितां दिले ह्या बद्दल आम्हीं त्यांचीं स्तुती करून आभार मानितों.

¶ यावरून हें पत्र उदेपूरचे राणे भीमसिंग यांस सवाई माधवराव यांणीं लिहिलें आहे असें होतें. हा बहुधा पाठविण्याच्या पत्राचा मसुदा असावा.

समुळसंतु. †पौषकृष्ण वधि श्री मत्त्रिलोचन कृपया परिवाराः क्षमिणो वयं भवदीयं शर्माहैश्च मानमाशास्महे. विशेषस्तु. मौजे बाडी परगणे मेवाडायंग्रामः श्रीराणाजीभिरस्मत्पूर्वजौ गद्युपनामक-विष्णु-महादेव-सदाशिव-महादेवाख्यावुभौ भ्रातरौ एकत्र स्थितिमंतौ, तयोर्ज्येष्ठो विष्णु महादेव इति तन्नाम पुरस्कारेण दत्तः तदनंतर विष्णु महादेवो सदाशिव महादेवस्य पुत्रो रघुनाथरावश्च उभौ विभक्तौ जातौ. तदानीमेतद्ग्रामस्योपभोग उभाभ्यां समेन कर्तव्य इतिनिश्चये जातेपि एकविंशतिसंवत्सरपर्यंतं गणपतराय-विष्णुना एकेनैव संपूर्णग्रामस्योपभोगः कृतः अस्माकमर्धांशो न दत्तेति सदाशिव रघुनाथैर्निवेदितं. अतः अधुना यावत्संवत्सर पर्यंतं सपूर्ण ग्रामस्योपभोगः यथा गणपतराय-विष्णुना कृतस्तथा वर्तमान एकविंशति संवत्सरपर्यंतं सदाशिव रघुनाथः संपूर्ण ग्रामस्यानुभवं करिष्याति. अग्रे उभावपि समानविभागाभ्यामनुभविष्यतः गणपतराय विष्ण्वनुयाय्यवरोधं करिष्यातिचेच्छ्रीमद्भिः शिक्षणीयः-

---

ले. ४५८ [१२९] ता॥ २१-२-१७९५ फाल्गुन शु. २ श. १७१६

श्री

विनंती उपरि छ १ माहे षाबान सिद्दी इमामखान यांस दौलांनीं पाठविल्या वरून प्रातःकालचे प्रहर दिवसास आले. पत्राचा जबाब आला कीं नाहीं म्हणून पुशिलें.आला नाहीं, येईल ऐसें उत्तर केलें. नंतर कितेक अंदेशाचें बोलणें बोलत होते.तृतीय प्रहर जाला अद्याप पत्रें आलीं नाहींत म्हणाले.आलियावर सांगून पाठऊं.तेव्हां बोलिले कीं,पत्रें आलीं म्हणजे आपणच चलावें. उत्तम म्हणोन सांगितलें.नंतर बोलिले कीं,कदाचित् सायंकाळ पर्यंत जबाब न आल्यास आपण दौलाकडे चलावें, चार गोष्टी बोलण्यांत याव्या म्हणजे ते नवाबास मुक्काम करण्याविषयीं अर्ज करितील: तेव्हां त्यांस म्हटलें जे, पत्राचा जबाब आलिया वेगळ काय बोलावें ? जबाब येईल तेव्हां येऊं. कूच करणें अथवा मुक्काम याविशीं आम्ही कांहींच म्हणत नाहीं, आणि म्हणणारही नाहीं. जशी तुम्हांस सल्लाह वाटेल तसें करावें. आमचा प्रतिबंध किमपि तुम्हांस नाहीं. पत्राचा जबाब तुम्हांस पावे तों पर्यंत नबाबाचा मुक्काम तेथेंच असावा, अशी खावंदांची आज्ञाही आम्हांस आली नाहीं. मग कूच अथवा मुक्काम याविशीं काय म्हणून तुम्हांस सांगावें ? तुम्हांस सल्लाह दिसेल तसें करावें. आमचे बोलण्याची प्रतीक्षा करूं नये.तेव्हां ते म्हणाले कीं, कूच करा अथवा मुक्काम हें आपण म्हणों नये. परंतु दौलाचें आपलें बोलणें होईल. कूच मुक्कामाचे बोलण्या वेगळें आणखी बोलणें नाहीं कीं काय ? फैसल्याचा ठराव वैगरे अंदेशाचीं बोलणीं होतील. त्यांतच कूच मुक्कामाचा प्रकार हें ते समजतील. याजकरितां पत्र आलें अथवा न आलें तरी चलावें म्हणोन बोलले. तृतीय प्रहर आतां जाला. सायंकाळीं सांगूं म्हणून बोलिलों. तेव्हां म्हणाले उत्तम आहे. आतां येथून जा ये कशास करूं ? मी सायंकाळ पर्यंत येथेंच असतों. बरोबरच येईन. ऐसें म्हणोन येथेंच राहिले. सायं-

---

† ह्या शब्दापुढें तिथि घालण्याकरितां जागा टाकिली आहे.

काळ जाला तों पर्यंत पत्राची प्रतीक्षा केली. पत्राचें उत्तर नाहीं, तेव्हां संध्या भोजन केलें. इतकियांत दौलाची येक चिठ्ठी चोपदार घेऊन सिंदीकडे आला. चिठ्ठी त्यांनीं पाहून चोपदारास बसावयास सांगितलें. मग काय चिठ्ठींत होतें हें समजलें नाहीं. रावजी येतात किंवा कसें ऐसें लिहिलें असेलसें वाटतें. आम्ही भोजन करून सहा घटका रात्रीं दौलाकडे गेलों. सिंदी इमामखानही बरोबर होते. तेथें बोलणें जालें. त्याचा त॥ आलाहिदा लिहिला असे. र॥ छ ३ षाबान हे विनंतीर.

ले. ४५९] [५९] ताा ११-३-१७९५ फाल्गुन व. ५ श. १७१६

खर्ड्याच्या लढाईचा पवाडा.

हिंदुस्थान गुजराथ सोडून शिंदा दखनेंत आला ॥ हुकुम केला बादशाहानें त्याला ॥ ध्रुपद ॥ मजल दरमजल नर्मदा उतरून आले पार ॥ धरला दखनचा सुमार ॥ बेगुबेग येऊनि पाणी घेतले गंगातीर ॥ फौज होती चाळीस हजार ॥ मनीं मनसुवा करुनी चढले बालेघाटावर ॥ धरला व्यंकाजी तस्कर ॥ मग कित्येकांसी जरब पोंचली मरून झाले चूर ॥ पळाले पुंड पाळेकर ॥ तेथुन जलदिनें कूच करुनी दाखल तुळजापुर ॥ आले दखनांत झाले जाहिर ॥ दखनदेशीं अंबा भवानी दैवत अनिवार ॥ देविसी केला नमस्कार ॥ चाल धुमाळीं ॥ दिले तुळजापुर सोडुनी ॥ गेले चंद्रभागा उतरुनी ॥ खबर ऐकिली श्रीमंतांनीं ॥ दोन कोस आले चालुनी ॥ भेटले हाडपसराच्या रानीं ॥ नेमिली पुण्याची छावणी ॥ जवळ पेठ आहे भवानी ॥ मुक्काम वानवडीवर केला ॥ हुकूम केला बादशाहानें त्याला ॥ १ ॥

सहा चार महिने तिथें गुजरले पुण्यास येऊनी ॥ मनसुबा बहू सबळ करुनी ॥ नबाबासी पत्र लिहिलें फार फार अर्जीनी ॥ खर्ची द्या आम्हांस पाठवूनी ॥ जासुदजोड्या केल्या खाना पोंचल्या जाऊनी ॥ पत्र टाकिलें मुजरे करूनी ॥ नबाब बहादर मशरनमुलुख एक मसलत करूनी ॥ पत्र पाहिलें त्यांनीं ॥ वाचुन परगण्यावर चिठ्या नेमिल्या समय सम पाहूनी ॥ नगदी ऐवज दिला लावूनी ॥ पांसष्ट लाख रुपये पोंचले नाहीं भरलें मनीं दखनचा हिशेब घेऊं भरूनी ॥ चाल धुमाळी ॥ ऐसें करणें भगवंताला ॥ हिंदुस्थान ज्यानें काबिज केला ॥ परतुन दखनमधी आला ॥ पुणें शहरीं काळ झाला ॥ खबर कळली नबाबाला ॥ नबाब बेदरावरी आला ॥ खरे खोटे भासे लोकांला ॥ तक्ती दवलतराव स्थापिला ॥ हुकुम केला बादशाहानें त्याला ॥ हिंदुस्थान सोडून० ॥ २ ॥

नबाबानें पत्र लिहिलें श्रीमंत नानासी ॥ शिवाय दवलतराव बापुसी ॥ पांसष्ट लाख रुपये आम्हीं कर्ज दिलें शिंद्यासी ॥ लवकर द्या आमचे आम्हांसी ॥ आटोकाट सरदार मिळोनी बसले मनसुब्यासी ॥ क्रोध आला दवलतरावासी ॥ तुम्हीं बसून रहा पुणें शहरीं हुकूम करा आम्हांसी ॥ पाहुनि घेतों नबाबासी ॥ तमाम फौजा मिळोनि दिले रोजमुरे

त्यासीं ॥ बोलाविलें **जिऊबा** दादासी ॥ तिथें जेवत असलां तर इथें या तुम्हीं पाणी पियासी ॥ घेऊनि **देवजी गवळ्यासी** ॥ चाल धुमाळी ॥ घेऊनि लवकर पाँचले ॥ **श्रीमंत पुण्याबाहेर** निघाले ॥ **मुळामुठावर** डेरे दिले ॥ बावन उमरावर मिळाले ॥ एकंदर बसूनि मनसुबे केले ॥ **भोंसले** ते हि लवकर आले ॥ **शिंदे** आघाडीस घातले ॥ येऊन **सिनेवर** शह दिला ॥ हुकुम० **हिंदुस्थान**० ॥ ३ ॥

बेदर सोडून नबाब लौकर बाहेर निघाले ॥ अमिर उमराव संमे घेतले ॥ चला चला म्हणून लवकर धारुरावर आले ॥ **पुण्याकडे** झेंडे फिरविले ॥ तेथुन जलदिनें कूच करूनि **वांजरानदीवर** आले ॥ **फिरंगी** आघाडीस घातले ॥ **शेकसलाची** करूं कंदुरी **मशीरन** बोलले ॥ **पेशवे** थरथरां कांपुं लागले ॥ पासष्ट लाखांचा मुलूख मागतां तेही विसरून गेले ॥ स्वप्नीं नबाब दिसूं लागले ॥ सांडीवरती सांडी फिरती डाकवाले बसविले ॥ वरचेवर बातमी आणऊं लागले ॥ चाल धु० ॥ घाट उतरले **मोहरेरीचा** ॥ मार्ग धरिला **पुण्याचा** ॥ एकच गट करून फौजेचा ॥ माळ चढले **नायगांवाचा** ॥ तंक [ला ?] वा आला तिकडून पेशव्याचा ॥ निश्चय केला यांनीं झुंजाचा ॥ धडाधड बार सुटे तोफेचा ॥ **मुसा** रहिमुनच‡ मोरचा तुडवीला ॥ हुकूम० **हिंदु**० ॥ ४ ॥

नबाबानें मोरचा तुडविला कळलें **श्रीमंताला** ॥ अजुरदे जाले बहु मनाला ॥ अमीर सारे बोलावूनी आणिले डेऱ्याला ॥ वक्त हा बुडायाचा आला ॥ **नाना फडणीस** एक मसूदी तर्क त्यानें काढिला ॥ **बोलाविलें जिउबा** दादाला ॥ तुम्हीं आघाडीस असतां मनसुबा कसा नाहीं कळाला ॥ नबाब गफलतीनें आला ॥ तींच विरशरी धरून सज्या फौजा आघाडिला ॥ चुरस लागली तेव्हां **शिंद्याला** ॥ **भिवराव पानसे** तोफखाना त्यांचे हवालीं केला ॥ **फिरंगी** लोक तैनातीला ॥ चाल धु० ॥ **पेशव्यांनीं विंचरणा** रोंखून सज्या फौजा पुढें देऊन ॥ **रास्त्यांनीं** एक अलंग धरून ॥ **फडक्यांनीं** तवाफरा* बांधुन ॥ **राजे** बहादर नाम निशाण ॥ फौजा **नाना**च्या आध्यान ॥ तेथें मिळाले अष्टप्रधान ॥ हौद्याशीं हौदा भिडुनी गेला ॥ हुकूम केला ॥ ५ ॥

करून स्वारी तयार नबाब जरदा अंबारींत ॥ बेगन्यापुढें हुजुरांत ॥ त्यांची उमेदवारी पेशवे सर करूं सहजांत ॥ बांधली रांडांनीं हिंमत ॥ **मशरल मुलुख**

---

‡ मुसा रहिमान हा पेशव्यांचा आरब सरदार होता.

* तराफरा=तवातोबरा ? पूर्वी प्रत्येक घोडेस्वारानें मुलुखगिरीवर जाते वेळीं एक तवा व एक तोबरा इतकी सामुग्री तरी जवळ बाळगावी असा प्रघात असे. त्यावरून तवा-तोबरा म्हणजे मुलुखगिरीस लागणाऱ्या वस्तु यांचा समाहार झाला. फरा म्हणजे शिपायांची रांग असा अर्थ आहे, पण मग 'तरा' शब्दाचा उलगडा चांगला होत नाहीं.

त्याचे मसुदी राजा नेमिवंत ॥ झाडुन फौजा त्याच्या अंकित ॥ रोशनाखा पर बिनीवाले नबाबाच्या हुकुमांत ॥ भरअमल दोन्ही दळांत माहित ॥ इस्मालखा दनी पठाण गारदी त्यांचे संगत ॥ नामी करवळ आहे हुजुरांत ॥ फाजलखा रोहिले खांसि बारा हजार जमात ॥ जंबुरे जोडुन उंटावर [त] ॥ चा० धु० ॥ नबाबानें हल्ला केली ॥ फौज लोणिचा माळ चढली ॥ दोन्ही दळें उभीं ठाकलीं ॥ नामी सरदार आसदअल्ली ॥ तोफखान्याला शिलक दिली ॥ देवडी मार जेव्हां बसाविली ॥ पेशव्याची मागें फौज हटविली ॥ फिरुन खरनदीवर मुक्काम केला ॥ हुकूम केला० हिंदु० ॥ ६ ॥

रातोरात आणून तोफखाना जोडिला जिउबा दादानीं ॥ लोणीगारमाळ पसरुनि ॥ एकापरीस एक शिपाई रांगडा हिंदुस्थानी ॥ दोन कंपु फिरंगाणी ॥ मन्याबापु भोंसले परशरामभाऊ आज्ञा घेऊनी ॥ एक मोरचा त्यांनीं रोंखुनी ॥ भवानराव प्रतिनिधी आले †अनूपान भोगुनी ॥ एक मोरचा त्यांनीं रोंखुनी ॥ चौकोसाची लांबण पडली कोणांत नाहीं कोणी ॥ ×बहिऱ्यामधीं फौज गेली मिसळुनि ॥ चाल धुमा० ॥ तोफेचा एकच वर्षला कहर ॥ गगनीं लागुनि गेला धूर मायसी पारख [लें] *लेंकुर ॥ नबाबासी कळुनि आला फितूर ॥ मजल काय [?] सुटेल तोफेचा बार ॥ पांचजण निवडले रणशूर ॥ मुसा रहिमुचें बुडविलें लष्कर ॥ रंमणा बहुत तिथें मातला ॥ हुकुम केला बादशाहानें त्याला ॥ हिंदु० ॥ ७ ॥

लालखान वजिरखान ह्यांनीं रणांत घोडीं घातलीं ॥ परशरामभाऊसीं जखम चढविली ॥ दाजीसाहेब येथ शामजंगास स्वारी केली ॥ पठाणी लोक संग हाटेली ॥ कटाव करीत चालले जेव्हां तिराचे मार बसविली ॥ भोंसल्यानें गर्दबाण उडविली ॥ वजिरखानासी बाण लागतां हौद्यांत जान सोडिली ॥ लालखांची सुद नाहीं लागली ॥ बाळासाहेब ठार जहाले वस्त शान §पडली ॥ खनाखना लव्हा गर्द उडाली ॥ भलेभले सरदार ह्यांनीं बहिरींत तोंडें घातलीं ॥ आंबारी नबाबानें फिरविली ॥ चाल धु० ॥ लोक लोक झाले चंथत ॥ नबाबमशरलमुलुक हौद्यांत ॥ आनंदराव किल्ला ठेवा नजरेंत ॥ हावाई लाविली किल्यांत ॥ नबाबदाखल सुलतान दुर्गात ॥ बुणगे आले शिवपट्टणा भोंवत ॥ वेढा काय शिद्याचा पडला ॥ हुकूम केला बादशाहानें त्याला ॥ हिंदु० ॥ ८ ॥

---

† अनुपान भोगून–ह्याचा अर्थ स्पष्ट कळत नाहीं.

× बहिऱ्यामधी–तोफांच्या आवाजामुळें बधिरपणा आला त्यांत. किंवा खोंडा, दरी, नळी ?

* मूळांत 'मायशी पारख लेंकर' असें आहे. त्याचा 'आई म्हणून तिलाच लेंकराची पारख, ओळख राहिली–बाकी सर्व धुंदी झाली,' असा निर्वाह करतां येईल. परंतु वर दिलेलाच पाठ असावा असें वृत्तावरून होतें व त्याचा अर्थही बरा होतो. पारखलें=परकें झालें, त्याची ओळख बुजाली.

§ 'वस्तशैन्य' असें मूळांत आहे. कदाचित् 'मस्तसैना' असेंही होईल.

खरनदीवर दिले मोरचे किल्याशीं रोंखून ॥ फौज नबाबाची घेरून ॥ जिउबा-दादा श्रीमंतांशीं बोले अर्ज करून ॥ नबाबास क्षणांत घेइन लुटून ॥ लुटुल्यावांचून कारण नाहीं बसा शह देऊन ॥ नाना करील तेंच प्रमाण ॥ बेद्ड्यासी हुकूम टाका रस्ते बंद करून ॥ रुपयाशेर तेव्हां मिळेना अन्न ॥ पाण्यावांचुनि फौज तरसली नबबानें ऐकून ॥ सल्यास धाडिले गोविंद किसन ॥ चाल धु० ॥ गोविंद किसन आले परतून ॥ नबाबासि वर्तमान सुचवून मशीरल मुलूख दिले पाठवून ॥ पेशब्यांनीं टाकिलें कैद करून ॥ जसा सांपळ्यांत ब्याघ्र कोंडून ॥ नबाबासि नानाचें वचन ॥ खातरजमा झाली येथुन ॥ अवघा चित्तिचा विकल्प उडाला ॥ हुकुम केला बादशहानें त्याला ॥ हिंदु-स्थान गुजराथ सोडुन शिंदा दखनांत आला ॥ ९ ॥

शके १७१६ आनंदनाम संवत्सर ॥ फाल्गुन वद्य ६ षष्ठी बुधवार ॥ किल्यामधिं येऊनि नबाबासि आठवला विचार ॥ द्यावी निंबाळकरासि जहागीर ॥ नबाब बोलतां हजर विश्वासराव बापु सुपेकर ॥ आणविले आपासाहेब निंबाळकर ॥ भेट घेऊ-निया [करा] कुचाचा विचार ॥ किल्यामधीं सदर ज्याहा बाहादर ॥ शके १७१७ राक्षसनाम संवत्सरे ॥ चैत्र पौर्णिमा शुक्रवार ॥ दळभार घेऊन नबाब वांजरानदीच्या वर ॥ संगे होते निंबाळकर ॥ चाल घुमाळी ॥ कनिया अखेर त्या वेळेस ॥ नबाब गेले भागानगरास ॥ श्रीमंत पोंचलें थेट पुण्यास ॥ गैबिचे देणें भुजंग आयास ॥ कादरभाई चाकरु दिले बिनीस ॥ त्यांनीं जाऊन गांठिलें हारदास ॥ रामछंद गातो मजलसीला ॥ हुकूम केला बादशाहानें त्याला ॥ हिंदुस्थान गुजराथ सोडुन शिंदा दखनांत आला ॥ हुकूम केला बादशहानें त्याला ॥१०॥+

ले. ४६० [५४] श्री ता॥ ११-३-१७९५ फाल्गुन व. ५ श. १७१६

यादी श्रीमंत महाराज राजश्री सवाई माधवराव साहेब यांची स्वारी मोंगलांवर खर्ड्यापर्यंत गेली त्यांचे मुक्कामांचा ऽ तपशीलः—

१. प्रथम श्रीमंतांची स्वारी निघोन मुहूर्तानें गारपिरावर डेरे दाखल झाले.

१. तेथोन कूच करून थेउरचे मुक्कामास मुळामुठा नदीचे कडेस मुक्काम झाला. आजमासें कोस ५. तेथें मकरसंक्रमण झालें.

१. तेथोन पुढें कूच होऊन मौजे नांदेड [व] करखांब गांवामधीं नदी मुळा मुठा, तेथें मुक्काम जाहला. कोश सात.

१. तेथोन पुढें कूच होऊन मौजे पारगांव साळूमाळूचें म्हणतात व वाळकी [यां] मधी नदी मुळामुठा व भीमेचा संगम झाला आहे, तेथें मुक्काम जाहला. कोश सात. लष्कर आघाडी पिछाडी दोन कोश तळ पडत होता.

+ हा पोवाडा रा. रा. कृष्णाजी रघुनाथ केळकर यांजकडून आम्हांस मिळाला.

ऽ ही याद आम्हास देलवडी ता० भिमथडी येथीस इनामदार श्री० रावजी पुणेकर यांजकडून रा० शं० तु० शाळिग्राम यांणीं मिळवून दिली. हींत जीं स्थलांची नावें आलीं आहेत तीं जशीं मुलांत दिसलीं दिलीं आहेत. कोठें फरक असल्यास आमचे मित्र आह्मांस कळवितील.

१. तेथोन पुढें मौजे मांडवगणावरून मौजे काष्टी [व] तांदळी [या] दोहीं गांवचे मधीं घोडनदीवर मुक्काम झाला. अजमासें कोश आठ. श्रीमंत व शिंदे व होळकर यांचा मुक्काम सरासरी तीन कोश पडला होता.

१. तेथोन पुढें मौजे आडळगांवावर मुक्काम झाला. कोश सात. लष्करचा तळ लांबी रुंदी सदर्हूप्रमाणें कोश तीन असे. पाणी वोढयाचें. [ओढा] पूर्वेस वाहतो.

१. तेथोन पुढें मौजे भोसेगांवापाशीं डोंगराची खिंड आहे, ती खिंड उतरून मौजे मिरजगांवावरून पूर्वेस नागलवाडी व सिंगवी [यां] मधीं नदी सीना [इज] वर श्रीमंतांचा मुक्काम झाला. मिरजगांवावर होळकर उतरले. खांडवी कोंबळीवर शिंदे होते. एकूण अजमासें तळ चार कोश होता. आपा साहेब व भाऊ साहेब वगैरे झाडून लो क पा ळ [?] यांचें लष्कर उतरलें होतें. मु ॥ कोश ९.

१. तेथोन पुढें कूच होऊन फकराबाद धानोरे तेथें मु॥ झाला. श्रीमंतांचीं खाशी स्वारी रत्नापुरांत राहिली. मधीं खडकत गांवावर जिऊबा दादा भेटले. त्यांणीं आपली फौज व पल्टणें वगैरे दाखविलीं. तो गांव मौजे खडकत, तेथून पुढें दोन कोशावर फकराबाद धानोरे एकूण दोन गांवें. दरम्यान मधीं विंचलना नदीवर मु॥ झाला. तेथें मौजे कउडगांव येथें भोसले येऊन मिळाले. त्यांची भेट होऊन नंतर फकराबाद धानोरेवर मु॥ झाला. कोश ६. लष्करची आघाडी पिछाडी सुमारें ५ कोशांचा तळ पडला होता. तेथें हुताशनी झाली. दुसरे दिवशीं धुळवडी तेथें खेळून प्रहर रात्र पिछलीचे सुमारास सज्या फौजा तयार होऊन आपासाहेब व भाऊसाहेब व बाबा फडके व जिऊबादादा व होळकर व भोसले ऐसे सडे तयार होऊन नबाबाचे तोंडावर मौजे बावीवरून मौजे घोडेगांवावर गेले. तेथें पहिले दिवशीं मोंगलावर जाऊन उभे राहिले. मोंगल नबाब मोहोरीचा घाट खर्ड्याचे उत्तरेस आहे तो बालेघाट उतरून तळगसी घांटावर खरनदीवर मु॥ झाला होता. तिकडील फौज तिसरे प्रहरीं चालून आली. त्यांची यांची गोळागोळी होऊन ते परत माघारे मु॥ स गेले. श्रीमंतांकडील स्वाऱ्या माघाऱ्या फिरोन घोडेगांवचे रानांतच मुक्काम झाला. तेथें मुक्कामाखालीं गांव [होते ते] घोडेगांवचे उत्तरेस ठाणें पिंपळगांव तेथें शिंदे [व] जिऊबादादा राहिले. व बाबा फडके व आपासाहेब व भाऊसाहेब व होळकर व भोसले ऐसे घोडेगांवचे रानांत दक्षिणेचे आंगें वाघेगांव आहे तेथपर्यंत राहिले. अजमासें चार कोशांचे आंत.

१. पुढें दुसरे दिवशीं नबाबांचें कूच होऊन वाकीगांव खरनदीच्या कडेस खरड्यापासोन पश्चिमेस अदमासें दोन कोश आहे, तेथें नबाबाचा मुक्काम झाला. ते दिवशीं श्रीमंतांकडील सज्या स्वाऱ्या तयार होऊन फकराबाद धानोऱ्याहून खाना नबाबाचे तोंडावर जाऊन, गोळागोळी होऊन, संध्याकाळीं माघारे फिरून घोडेगांवापाशीं दक्षिणेस मौजे नाणजेवर व चोंभेवाडी वर मु॥ झाला. तिसरे दिवशीं नबाब कूच करून परांड्याचे सुमारें चालले. आघाडीस राजे रावरंभा व दुलेखान व आशद अलीखान व चंडावले आणखी वगैरे फौजा ऐसे आघाडीस बिनीवर चालले होते. मध्यें बुणगे घालून पिछाडीस खासे

नबाबाची स्वारी झाडून फौजांसुद्धां येत होते. तों इतक्यांत श्रीमंतांच्या फौजा आपासाहेब व भाऊसाहेब व भोंसले व होळकर ऐसे उजवे बाजूस दक्षिणेचे आंगें तरडगांवचे रानांत टेंकडीवर सरंजामसुद्धां उभे राहिले होते. खालीं लवणांत उत्तरेकडील बाजूस बाबा फडके हुजुरातसुद्धां जरीपटका घेऊन उभे होते. टेंकडीवर तोफा नवाबाचे बुणग्यावर लावावयास आणल्या होत्या. त्याही पश्चिमेकडून येत होत्या. तों जिउबादादा फौज पलटणें तोफखाना घेऊन उत्तरेकडून नबाबाचे खासे स्वारीचे तोंडावर उभे होते इतकियांत पेंढारी यांनीं बुणग्यावर तोंड लाविलें. तेव्हां नबाबाकडील आघाडीच्या फौजा डठल्या. तों पेंढारी लुटारी निघोन गेले. नवाबाकडील फौजांची उठावणी झाली ती येऊन आपासाहेब व भाऊसाहेब टेंकडीवर उभे होते त्यांजवर आघाडी आली, तों इकडून आपासाहेब व भाऊसाहेब यांनीं उठावणी केली. तेव्हां दोहींदळांची चकमक होऊन गर्दी झाली. ते वेळेस भाऊसाहेबांस कपाळावर जखम लागली. तों उत्तरेकडून जिउबादादा फौज तोफखाना घेऊन येऊन पोहोंचलें. त्यांणीं तरडगांवचे रानांत रणटेंकडी म्हणतात त्या टेंकडीवर नवाबाकडील फौजेचा जमाव होता, त्याजवर उत्तरेकडून तोफा लाविल्या व श्रीमंतांकडील बारगीर झाडून जमा होऊन करोळी सुरू झाली, व भोंसले यांणीं दक्षिणेकडून बाणांचा मार केला. ऐशी लढाई प्रहर दीड प्रहर झाली. तों दोन प्रहरचे सुमारास मोंगलाकडील लालखान पठाण यास हौयांत गोळी लागून तो ठार झाला, व आवांतर मोंगलांचे फौजेची धूळधाणी होऊन मागील सहा घटका दिवस आदमासें राहतांना मोंगलाचा मोड झाला. तेव्हां मोंगलाच्या फौजा खर्ड्याचे दक्षिणेस डोंगराचीं खिंड आहे, त्या खिंडींत अस्तमानीं शिरल्या. त्यांचे पिछावर श्रीमंतांच्या फौजा जाऊन चढूंकडोन मोंगल वेढून ती रात्र सरून मागील दोन घटका रात्र राहतांना मोंगल खर्ड्याजवळ आणून घातला. पेंढारी लुटारी यांनीं आगाडीस कांहीं मोंगलाची लुटालूट केली. हें वर्तमान श्रीमंतांस कळतांच मोंगलांस पाण्याच्या पखाली मिठाचे छकडे असें कांहीं पाठविलें म्हणोन सांगतात. आणि सांडणीस्वार पाठवून श्रीमंतांनीं आपले फौजेंत ताकीद केली कीं, मोंगल बुडवूं नये, राखावयाचा आहे. हें वर्तमान ऐकून श्रीमंतांच्या फौजा मांघाच्या फकराबाद धानोऱ्यावर आल्या. दक्षणेकडील चिंचपूर व गी यांचें [व] देवकराचें चिंचपूर असे दोन्ही गांवावर भोंसले व होळकर राहिले. बाबा फडके व आपासाहेब व भाऊसाहेब बोरलेगांवचे रानांत राहिले व जिउबादादा घोडेगांवचे रानांत राहिले. दुसरे दिवशीं श्रीमंतांचा मुक्काम रत्नापुराहून फकराबादेवर नवाब मोडल्याचें वर्तमान ऐकून, कूच करून, मौजे पिंपरखेडे व गीरवलीगांव कांहीं जमळेगांवचें रान एकून तीन गांवावर श्रीमंतांचा मुक्काम विंचलना नदीवर जाला. तेथून भाऊसाहेबांचे समाचारास श्रीमंत बोरलेगांव बेलवडीचे रानांत आले. तेथें भाऊसाहेब होते. तेथें समाचार घेऊन रत्नापुरावर माघारे गेले. कोश ३. तेथून भाऊसाहेब जखमी म्हणून नाणजगांवावर मुक्काम केला. तेथें नबाबाकडील रावरंभा भाऊसाहेबांचे समाचारास आले. पुढें सल्याचें बोलणें लागून संकेत ठरला. इतक्यांत दोन तीन रोजांत नबाब यांस खर्ड्यांत

पाणा व वैरणीचा फार तोटा म्हणून खर्ड्यातून कूच करून खर्ड्याचे पूर्वेस देवगांव [व] आंब; दोन्हीं गांवावर मुा करून राहिले. तेव्हां श्रीमंताकडील फौजा नबाबाचे पिछावर आणखी गेल्या. त्या फौजेचा मुा शेलगांव कोश २ तेथें झाला. मग नबाबाकडील सल्याचें बोलणें ठरवून तह झाला. सरकारचे कागदपत्र उलगडून दिले. तेव्हां श्रीमंतांचें म्हणणें मोंगलास झालें कीं, तुमचे आमचे कागदोपत्रीं ठराव झाल्याप्रमाणें हस्तगत होई तोंपर्यंत तुम्हांकडील मेसरील मुलुख ओलीस द्यावा. तेव्हां मोंगलानें खर्ड्याचे मुक्कामींहून मेसरील मुलुख यास गोविंदराव काळे यांचे जिमतीस देऊन गोविंदराव काळे हे मेसरील मुलुख यास रत्नारपुचे मुा श्रीमंताजवळ [येऊन] हजर केलें. नंतर नवाब कूच करून विटेचे घाटानें जावयास पुढें नळी वडगांव बालेघाटांखालीं आहे त्या वडगांवावरून घाट चढून, घाटांत जोतीबाची वाडी आहे, तिजवरून बालेघाट चढून घाटावर विटेगांव आहे त्या गांवावर मुा झाला. कोश ४. तेथून कूच करून कल्याणरायाचे वाशीवरून पुढें कळंबास गेले. तेथोन पुढें मातीची गढी म्हणोन गांव आहे, त्या गांवावरून पुढें भालकी गांव आहे, तेथें मुा करून पुढें मैलार गांव आहे तेथें मुक्काम करून पुढें बेदरास गेले. बेदरावर चार रोज मुा करून हैदराबादेस गेले.—कलम.

१. पुढें श्रीमंतांकडील फौजा शेलगांवांत होत्या त्या नबाब कूच करून गेल्यावर श्रीमंतांकडील फौजा शेलगांवावरून कूच करून संगमेश्वर गांव तेथें खरनदीचा व सीनेचा संगम झाला आहे, तो गांव संगमेश्वर तेथें मुा झाला. अदमासें कोश ४.

१. श्रीमंतांचा मुा रत्नापुरावर होता. तेथोन कूच करून मौजे आव्हाटी गांव सीनेच्या कडेस आहे तेथें येऊन श्रीमंताचा मुा झाला. तेथें फौजा साऱ्या येऊन मिळाल्या. तेथें सरकारची भेट होऊन हजेरी झाली. मग श्रीमंत व सर्व फौजा मिळोन कूच करून परांड्याचा किल्ला पाहून मुा पश्चिमेस झाला. कोश ५ पांच.

१. तेथोन पुढें कूच करून कारली मुगावावरून सोनारीवर मुा झाला. कोश ५ पांच.

१. तेथोन कूच करून रुईदुधीवर मुा झाला. कोश ६.

१ तेथोन कूच करून अंजनडोहावर मुा झाला. कोश ६.

१ तेथोन कूच करून सिद्धटेकानजीक भीमानदीवर मुा झाला. कोश अजमासें ७.

१. तेथोन कूच करून मौजे आलेगांवावरून खारेवाडीवर मु॥ झाला. गारदौंडे-पर्यंत आघाडी होती. श्रीमंतांचा मु॥ खारेवाडीवर गारदौंडेपासून पूर्वेस खारेवाडी कोशावर आहे, तेथें मु॥ श्रीमंतांचा झाला. खारेवाडी लहान गांव म्हणोन मोठें गांवचें नांव लाविलें. परंतु शोध घेतां खारेवाडीवर मु॥ होता. कोश ७.

१. तेथोन कूच करून गारदौंडचे दक्षिणेस पावकोशीवर रस्ताच आहे, त्या मार्गानें स्वारी दौंडचे पलीकडून मौजे नानगांव इ त व ळ न [?] दोन गांवावर मु॥ भीमातीरीं झाला. कोश ६.

१. तेथोन पुढें कूच होऊन देलवडीस आले. तेथें राघूजी टकले यांची मेजवानी

आपासाहेब व भाऊसाहेब यांणीं घेऊन पुढें टेंकचे खांबगांवावर मु॥ झाला. नदी मुळा मुठा. कोश ८.

१. तेथोन कूच करून थेऊर कोलवडीवर मु॥ झाला. मधी नदी मुळामुठा कोश ६.

१. तेथोन स्वारी पुण्यास दाखल झाली. कोश ५.

स्मरणाचीं कलमें लिहिलीं त्यांचीं उत्तरें.

१. जिऊबादादा निजबत शिंदे हे मिरजगांवचे पूर्वेस गांव खडकत आहे तेथें येऊन भेटले व फौज दाखविली असें म्हणतात.

१. सध्या फौजा [यांचा] पाहिले दिवशीं घोडेगांवावर मु॥ झाला. दुसरें दिवशीं मौजे नाणजेवर मु॥ होऊन फाल्गुन वद्य ५ समारंभ तेथें झाला. तें रान मौजे नाणज व चौंभेवाडीवर रंगपंचमी झाली.

१. भाऊसाहेबांचे समाचारास श्रीमंत आले ते गांवचें नांव बोरलेगांव बेलवडीचे रानांत.

१. मसरील मुलूख यास गोविंदराव काळे घेऊन रत्नापुरचे मुक्कामीं आले.

१. नबाब खर्ड्यास गेल्यानंतर सरकारच्या फौजा कोणकोणत्या गांवावर राहिल्या आहेत तें सदरीं झाडून मुक्कामांचीं गांवें लिहिलींच आहेत.

१. नबाब खर्ड्याहून गेल्यावर मुंगीचे घाटानें गेले नाहींत, विटेचे घाटानें गेले, तो मजकूर सदरीं लिहिला आहे.

१. या गांवचा मु॥ दुसऱ्या गांवावर गेला तो तळ कितीक लांब पडत होता म्हणोन आज्ञा त्यास शिंदे, होळकर, भोंसले, आपासाहेब व भाऊसाहेब, वगैरे निरनिराळे उतरत होते, तेव्हां पांच चार कोशपर्यंत तळ पडत होता.

१. गारदींस पाच्छाई जादे होते म्हणून श्रीमंताची स्वारी गेली नाहीं. दौंडेच्या पलीकडून अर्धा कोशाचे छाव्यानें स्वारी गेली. नवबदी नगारे वाजले नाहींत म्हणोन परस्परां सांगतात.

१. सरकारच्या फौजा नबाबाच्या पिच्छावर गेल्या त्यांचे मुक्काम व कोश सदरीं कळलेच आहेत. खर्ड्यापासून दक्षणेस चार कोश सुमारें गेल्या होत्या. तथून माघारें फिरल्या.

१. स्वारी पुण्याहून जातां येतां मुक्कामाचे कोश किती ते सदर मुक्कामाचे लिहिलेच आहेत.

ले. ४६२]
[१३७] }

{ता. २७-८-१७९५
अधिक भाद्रपद शु. १२ श. १७१७ ?

श्री

राजश्रियाविराजीत राजमान्य राजश्री भाऊ स्वामींचे सेवेशीं—पो गोविंदराव कृष्ण सा। नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय लिहीत असावें विशेष इक.

डील वर्तमान सांप्रत श्रीमंताचे पत्रीं विस्तारें लिहिलें आहे, त्यावरून कळेल. सांडणी स्वाराची रवानगी येथून छ ९ सफरीं केली. सरकारचे व आपल्या कडील पत्राचे जाब नवाबाकडील पारशी पत्रें व आपले पत्राचीं उत्तरें रवाना केलीं आहेत. सांडणी स्वार पोहोंचून पत्रें प्रविष्ट होतील, पावल्याचें उत्तर यावें. सांडणी स्वाराबरोबर पत्रें पाठविलीं त्यांचें उत्तर लवकर यावें· म्हणजे पुढले चालीचा मार्ग समजेल. राजश्री गोविंदराव बोलतील त्याजवरून ध्यानांत येईल. रा॥ छ ११ माहे सफर. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हें विनंती.

ले. ४६२ [४४९] | ता॥ ७-१२-१७९५ कार्तिक व. ११ श. १७१७

श्री

(छ २४ जमादिलोवल सीत तिसैन मया व अल्लफ १२०५ फसली कार्तिक वा ११ सोमवार शके १७१७ राक्षस नाम संवत्सरे तारीख ८ दिजेंबर १७१५ इसवी.)

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबूराव स्वामींचे सेवेशीं, पो। बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष–श्रीमंत रावसाहेब यांचे शरीरीं किंचित् वायूची भावना पांच–सात दिवस होऊन गणपतीचे दिवाणखान्याचे दुमजल्यावरून कारंजाचे आंगें संगी फरषावर जमिनीस आले. उजवे मांडीस जखम भारी होऊन दातास जरब बसली. तबीब वैद्य व देवी मानवी वगैरे उपाय बहुत जाले. परंतु गुणास न येतां तिसरे दिवशीं सायंकाळीं कैलासवास केला. ही गोष्ट मोठी वाईट जाली. ईश्वरइच्छेस उपाय नाहीं. श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामी व श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब यांचीं समधानाचीं पत्रें येतील म्हणोन प्रतीक्षा होती. हल्लीं इकडून, विनंती पत्रें पाठविलीं आहेत प्रविष्ट करावीं. पुढें राज्याचा बंदोबस्त राहून, स्वामी सेवा घडली पाहिजे, येविशींची विनंती करून पुढील कर्तव्याचे विचारांची आज्ञापत्रें घेऊन *पाठवावीं. रवाना छ. २४ जमादिलोवल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हेविनंती. पैवस्ती छ. २५ जमादिलोवल.

* ह्या तजविजीवरून खालील यशोदाबाईच्या नांवचें आज्ञापत्र लिहिलें गेलें असें दिसतें.

ले. ४६३ [४४८] | श. १७१७ सन १७९५

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १७१ राक्षसनाम संवत्सरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी यांणीं गंगाभागिर्थी यशवदाबाई प्रधान यांसि आज्ञा केली ऐशिजे. माधवराव पंडित प्रधान तुमचे भ्रतार यांस अकालीं कैलासवास प्राप्त जहाला, पोटीं पुत्र नाहीं, पुढें पेशवाईचे पदाचा कारभार चालोन बंदोबस्त जहाला पाहिजे, त्यास तुमचे वंशा-

तील रघुनाथ बाजीराव यांचे पुत्र आहेत त्यांतील तुम्हांस पुत्र देऊन पदाधिकारी करावा, तर पेशजी रघुनाथराव यांजपासून अनन्वित गोष्ट घडली, त्या वेळचे सरदार व मुत्सदी यांचा पूर्व द्वेष स्मरोन राज्यांत बखेडा पडेल, व शास्त्रविरुद्ध पडतें, व पेशजी कैलासवासी बाळाजी बाजीराव यांणीं स्वामिसेवा एकनिष्ठपणें केली, एतदर्थी त्यांचे वंशाचें नांव पुढें चालावें, याजकरितां तुमचे भ्रताराचे नांवें गोत्रजांतील दत्तपुत्र तुम्हांस देऊन, पेशवाईचे पदास अधिकारी करोन, कारभार राजश्री बाळाजी जनार्दन यांणीं करावा असें महाराजांचे मर्जीस येऊन, तुम्हांस पुत्र घेण्याविषयीं हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरि गोत्रजांतील दत्तपुत्र तुम्हीं घेऊन हुजूर विनंती करणें.

———

ले. ४६४ [४८८] } { ताा १०-६-१७९७ ज्येष्ठ व. १ श. १७१९

श्री

राजश्री कावेरी राजे संस्थान बो म रा ज पा ळे गोसावी यांसि—

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित बाजीराव रघुनाथ प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जाणें. विशेष. चिरंजीव राजश्री चिमाजीआपा यांचे लग्नाचा निश्चय जेष्ठ वद्य नवमीस केला आहे, तरि तुम्ही लग्नसमारंभास निघून येणें. जाणिजे छ १४ जिल्हेज सुरुसन समान तिसैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. [लेखन सीमा.]

———

ले. ४६५ [४५५] } { ताा ५-६-१७९८ ज्येष्ठ व. ७ श. १७२०

श्री

पैा छ १७ रविलोवल सन तिसा तिसैन श्रावण.

अपत्य अलीबहादूर चरणावरि मस्तक ठेवून विज्ञापना तागाईत छ १९ जिल्हेज मुक्काम न दी लो ज नजीक काळींजर येथें साहेबांचे प्रतापें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. पागा दिम्मत राजश्री उमाजी वाघ याचे पागेचे बेगमीस धोडपचे जहागिरीचे गांव आहेत तेथील अंमल भोंसले नागपूरकर व नबाब निजामअलीखां बहादूर यांजकडील मामलेदार सुरळीतपणें देत नाहींत. त्यास मशारनिल्हे पागे सुद्धां आम्हांजवळ सरकार चाकरीवर आहेत, याकरितां सेवेशीं विनंती लिहिली आहे तरि उभयतां सरकारांतून ताकीद होऊन मामलेदार सुरळीतपणें वाजबी अंमल पागेचे गांवचा देत ते आज्ञा जाहली पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

———

ले. ४६६ [४५४] } { ता॥ ४-११-१७९८ आश्विन व. ११ श. १७२०

श्री.

पौ छ १२ जिल्काद सन तिसा तिसैन चैत्रमास.

श्रीमंत महाराज राजश्री बाजीराव पंडित प्रधान साहेब गोसावी-यांसि.

छ सकल गुणालंकरण अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित मुतुरामालिंग विजय रघुनाथ सेतुपति कृतानेक दंडवत विनंती येथील कुशल तागाईत छ २५ जमादिलोवर पावेतों यथास्थित असे विशेष. श्रीरामेश्वर क्षेत्र येथील राज्य दाहशें वर्षे आमचे वडिलांवडिलीं करीत आले. पुढें इंग्रजांचा जोर पडला, तेव्हां खंडणी दरसाल पांचलक्षच कर द्यावयाचा करार केला. देत होतों. पुढें जास्ती मागावयास लागले. सात लक्ष दिल्हे. तसे दहा पांच वर्षे लोटलीं. त्या उपरि नऊ लक्ष घेतले. मग राज्यलोभ प्राप्त होऊन, क्षेत्रीं रामनाथ दूर किल्ला आहे तेथें फितूर करून, किल्ला घेऊन, आम्हांस धरून, त्रिचनापल्लीचे किल्ल्यांत नेऊन कैदेंत ठेविलें. मुलुख सर्व जप्त केला.पांच वर्षे झालीं.हल्लीं आमचे वकील राजश्री श्रीनिवास नारायण यांस आपणांकडे पाठविलें. जे, श्रीमंतांस विनंति करून, इंग्रेजांशीं बोलून, आमची मोकळीक करावी म्हणून पाठविलें. ते बातमी त्यांला कळून आम्हांस जास्ती बंदोबस्त केला. पत्रें देखील लिहितां नयेसें झालें. हें पत्र बहुत संकटानें लिहिलें आहे. वकील मजकुरासही पाठविलें आहे. तरि धर्मसंस्थान देवब्राह्मणभूयिष्ठ आहे. उत्तरेस काशी, दक्षिणेस रामेश्वर, हे दोन्ही पुण्यक्षेत्रें नीचांनीं आक्रमिलीं आहेत. आपण धर्मस्थापना करणार, देवब्राह्मणप्रतिपालक, दुष्टनिग्रह, शिष्टप्रतिपालक हिमःसेतुपर्यंत आपला पराक्रमप्रताप चालतो. यास्तव विनंतीपत्र लिहिलें आहे. वकिलासही संनिधानास पाठविलें आहे. इंग्रजांशीं पक्केपणें बोलून पूर्ववत् प्रकार मुलुखसुद्धां आमची स्थापना करून, राज्य आमचे स्वाधीन करून, इंग्रजांस खंडणी द्यावयाचा करार करून दिल्हा त्याप्रमाणें त्यांची खंडणी सालोसाल देत जाऊं. आपणास नजर द्यावयाचे प्रसंगास वकील मजकूर विनंती करतील, त्याप्रमाणें बोलून, करार होऊन, जें ठरेल त्यास सावकारी हमी देऊन खातरजमा करूं. राज्यीं आम्हांस स्थापना करून यथाप्रकार राज्य आमचे स्वाधीन जालेवरि ऐवजाचा भरणा करूं. यास अंतर सहसा होणार नाहीं. नकानें गजास धरिलें तेव्हां भगवंतानें धांवा करून रक्षिल्याप्रमाणें आम्हांस जीवापासून सोडवून कीर्ति घेतली पाहिजे. इतःपर हरएक प्रसंगास आमचे कारभारी मोकळे आहेत ते पत्रें लिहून पाठवितील तें मान्य करून, कार्यभाग करून देऊन चालविलें पाहिजे. सुज्ञाप्रति विशेष काय लिहिणें. कृपा निरंतर असूं द्यावी हे विनंति.

सही.

———

ले. ४६७
[४९१]

भाद्रपद व.४ शके १७२१
ता. १७-९ सन १७९९

श्रीगजानन

श्रीमंत कैलासवासी भाऊसाहेब* मांडवगाहून निघोन पाडळीच्या मुक्कामास स्वारी आली. तेथून माझे नांवें आज्ञापत्र व दोन जासूदजोड्या करवीराकडील दीनचर्येची बातमी समजण्याकरितां पाठविले. तेथपासून बातमी दीनचर्येची ज्या ज्या कारणाची पाहिजे तीं ती बातमी स्वारी सुरापूर व येलबुर्गे वगैरे प्रांत फिरून भाद्रपदमासी एक वर्षानीं पट्टण-दुडावर फौजसुद्धां मुक्काम झाला तेथपर्यंत बातमी पोचविली. कैलासवासी बाळासाहेब यांनीं पांच चार वेळां मिरजेहून लिहून पाठविलें कीं,नारो हरी यांजकडून बातमी करवीर प्रकरणीं जशी पाहिजे तशी आली. मलाही मिरजेहून श्री कैलासवासी बाळासाहेब यांची आज्ञा बातमी लिहिणेंविशीं जाहलीच होती. परंतु करवीरकरांचा व कैलासवासी भाऊसाहेब यांचा पहिलेपणापासून वैरत्वाचा प्रकार फार वाढलेला, याजमुळें तिकडे बातमी लिहिण्याचा मोठाच आंदेशा. तिकडे बातमी लिहितों असें समजल्यावर पारिपत्यास उशीर नाहीं. पेशजी कैलासवासी भाऊसाहेब मांडवगणास राहिले, हें करवीरकरांनीं मनांत आणून आगळीक केली. भूधरगडचा किल्ला फितूर करून घेतला. करवीरकर महाराज यांची स्वारी तासगांवास येऊन वाड्याचा वगैरे फारच नाश केला. याजमुळेंच मोठा बद्ध कटाक्ष पडला. मी हें कांहीं मनांत न आणितां उमेदवारीच्या भावें कैलासवासींची फत्ते जाहल्यास माझे सेवेची बूज होईल, यास्तव लिहीतच गेलों. करवीर [कर] फौजसुद्धां वेदगंगा, दूधगंगा या नद्या उतरून हमीदवाड्यावर मुक्काम आला. उभयतांचे सैन्यास चार कोसांची तफावत राहिली. दरम्यान नदी नाहीं. कैलासवासींच्या फौजेंत खर्चाचा गवगवा पडून पांढरे मंडळी शिलेदार कांहीं फितूर होता. हें वर्तमान वरचेवर दररोज लिहीतच गेलों. करवीरकरांनीं छापा घालावा ही मसलत करून दोन वेळां उद्योग केला. एक दिवस निघाले तों कांहीं अपशकुन जहाला, यामुळें राहिले. दुसरे दिवशीं आणखी उद्योग करून निघाले, तों पर्जन्य आला. असे दोन वेळां दोन प्रकार झाले. मग छाप्याची मसलत राहिली. नंतर भाद्रपद वद्य ३ शके १७२१ इंदुवारीं अस्तमानीं भोजन करून महाराज कचेरीचे डेऱ्यांत येऊन बसले. तमाम मानकरी व शिलेदार व रत्नाकरपंत वगैरे यांस बोलावून लढाईची मसलत उदईक मंगळवारीं चालून जावें. तिकडील फौज आल्यास लढाई द्यावी. न आल्यास गोटावर चालोन घ्यावें. असें सर्वांचे विचारें ठरून लष्करांत ताकीद झाली कीं, प्रातःकाळीं सूर्योदयास भोजन करून लढाईच्या तयारीनें निशाणाबरोबर चालतें व्हावें. याप्रमाणें बेत झाल्यावर कचेरी बर्खास्त झाली. इतकें होईजे पर्यंत मी त्यांचे डेऱ्यांतच होतों. नंतर आपले राहुटीस येऊन जाहला मजकूर कैलासवासीकडे लिहून पाठविला. पेशजी छाप्याचा मजकूर दोन वेळां लिहिला होता तसें झालें नाहीं. बेफाम राहूं नये. सावधगिरी

*परशुराम भाऊ पटवर्धन

पक्की असावी. करवीरकर प्रातःकाळीं भोजन करून फौजेची तयारी करून निघाले. मी आपले राहुटीस भोजन करून निघालों. स्वारी प्रातःकाळच्या तास दिवसास चालती जहाली. मी स्वारीबरोबरच निघालों. आणखी प्रातःकाळीं निघाल्याचें वर्तमान लिहून पाठविलें. ती चिट्ठी प्रहर दिवसास जाऊन पोंचली, तोंपर्यंत तिकडील फौजेंत कांहीं तयारीची हालचाल नव्हती. तोफखान्याचे बैल चरावयास गेले होते. व शिलेदार लोकांचें घरणें बसलें होतें. बातमीची चिठ्ठी पोंचल्यावर तोफांचे बैल आणविले व शिलेदारांस कांहीं खर्चास दिलें व कांहीं देतों म्हणून उठविले. मग तयारीची गडबड जहाली. करवीरकरांची स्वारी फौजेसुद्धां दोन प्रहरचे सुमारें निपाणी नजीक गेले. तेथें चार घटका दम खाऊन चालते झाले. निपाणीच्या पुढें पाव कोस जाऊन उभे राहिले. कैलासवासीच्या लष्करांत तयारी होऊन कैलासवासी आपासाहेब व दाजी साहेब उभयतां दोन टोळ्यांनिशीं दोहीकडे चालते झाले. पुढें एक ओढा होता त्यांत कांहीं गाडद व पायदळ घालून * * * तोफांची मारगिरी चाललीच होती. करवीरकरांकडील पायदळानें नेट करून ओढ्यांतील पायदळावर चालून घेतलें. परस्पर गोळागोळी होऊन तिकडील पायदळांचा मोड जहाला. सुमारें शंभर माणूस जायां जखमी झालें. व पंचवीस तीस सुमारें ठार झालें. बाकी सर्व पळून गेले. करवीरकरांच्या पायदळानें तोफांशीं गांठ घातली. तोफा पाडाव जाहल्या. आपासाहेबांच्या मोकाबल्यावर रत्नाकर आपा राजाज्ञा व हैबतराव गायकवाड वगैरे शिलेदार होते. आपासाहेब फौजसुद्धां पुढें चालून आले. करवीरकारांची फौज पुढें जाहली. लढाईचें तोंड लागलें. करवीरकारांकडील धुळोजी पांढरे हे शंभर दीडशें घोड्यांचे सरदार होते, ते ठार जहाले. व रायाजी जाधव पागेकडील सरदार हे घोड्याखालीं आले. तेथें पाव घटका झटपट चांगलीच जहाली. ते समयीं करवीरकरांच्या फौजेंत थोडीशी गलबल होऊन निशाणाचा हत्ती माघारा फिरला. हें वर्तमान महाराज पाठीमागें जवळच होते त्यांजवळ सुमारें तीनशें लोक चांगले होते त्यांनीं पुढें गलबल जहाली हें पाहून, नेट करून पुढें आले. नंतर फिरून सांवर बसला. लढाई होतच होती. इतक्यांत आपासाहेब यांच्या डाव्या हातास दंडाजवळ गोळी लागली त्यामुळें कांहींसे घयाळ झाले. परंतु शूरत्वाचे अभिमानानें दम धरून पुढें चाल न करितां जाग्यावर उभे राहिले. यामुळें दाजीसाहेब यांचा व महाराज यांजकडील फौजेचा लढाईचा समय आला. इतक्यांत दाजीसाहेब यांजकडील फौज उधळली. त्या फौजेंत कांहीं फितूर होते त्याजमुळें असें झालें. नंतर रत्नाकरपंत आपा व हैबतराव गायकवाड यांनीं त्या उधळलेल्या फौजेचा पाठलाग केला नाहीं. इकडे लढाईस सुरवात होत होती. तेव्हां महाराज यांजकडील दोन्ही टोळ्या एकत्र होऊन आपासाहेब यांजवर येण्याचा रोख धरिला. हें आपासाहेब यांनीं पाहून कांहीं माघारे हटले. परंतु दोन चार वेळां माघारे उलटोन पाठीवरील फौज थोपून राहून थोडे थोडे हटत माघारे सरले. ते जवळच अमलझरी म्हणून लहानसें खेडें होतें त्याचे आसऱ्यास जाऊन उभे राहिले. करवीरकरांची फौज पाठीवर होती ती गांवानजीक उभी राहिली. उभयतां फौजांस गांव दरम्यान जाहला. मग

कोणीं कोणावर चालून घेतलें नाहीं. जाग्यावर उभे होते. नंतर रत्नाकरपंत यांचा रोख इकडे येण्याचा होता तो त्यांनीं सोडून भाऊसाहेबांचे गोटाकडे जाण्याचा रोंख धरिला. सायंकाळचा दिवस तीन चार घटका होता. राजमंडलकराची फौज गोटाकडे गेली. दाजीसाहेब फौजेसुद्धां निघाले. ते गोटाकडे न जातां परभारेंच निघोन गेले. आपासाहेब यांच्या चित्तांत मागें बुणग्यांत भाऊसाहेब होते ते निघून गेलेच असतील. हें मनांत आणून अमलझरीवरून तेही परभारें निघोन फौजे सुद्धां चालते जहाले. राजमंडळकराचे फौजेनें पाठलाग केला नाहीं. लढाई विघडली. भाऊसाहेब मागें बुणग्यांत होते. राजमंडळकराची फौज गोटाकडे आली हें पाहून जवळची मंडळी भाऊबंद व शिलेदार नागो शामजी वगैरे लोक निघाले. जाग्यावर हत्ती एक व दोन तोफा व निशाण होतें. शागीर्दपेशा सुद्धां निघाले ते समयीं भाऊसाहेब यांस घेऊन जाते तर निभावयाजोगा समय होता. परंतु कोणास धीर धरणें जहालें नाहीं. आपापले जीव घेऊन निघोन गेले. जवळ कोणी एक दमाचा मनुष्य राहिला नाहीं. इतक्यांत राजमंडळचे फौजेनें वेढा घालून गोटांत शिरले. भाऊसाहेब खाशा घोड्यावर बसले होते. तसेच एकाएकीं निघोन चालले. गोटांत राजमंडळकराची फौज शिरली. इतक्यांत हैबतराव गायकवाड हे गोटाकडे जात होते, त्यांनीं भाऊसाहेब ओळखिले नाहीं; परंतु सुभानराव बागुल म्हणून शिलेदार येलगुरकर हे पेशजी कैलासवासीपाशीं कांहीं दिवस चाकरीस होते ते पुढें इकडून चाकरी सोडून राजमंडळींत गायकवाडाचे पथकांत चाकरीस राहिले, त्यांनीं ओळखिलें आणि गाइकवाड यांस सांगितलें. नंतर त्यांजकडील लोक जाऊन गांठ घातली. मानेवर वार टाकिला. त्या जखमेनें घायाळ होऊन हातांत पट्टा होता त्या पट्टयानें पांच चार असामींवर वार करून जखमी केले. इतक्यांत दहावीस असामींनीं गांठून आणखी वार कानानजीक दोहो बाजूस दोन हलके केले. तेणें करून फारच घायाळ होऊन घोड्याखालीं आले, हें तिकडील स्वारांनीं पाहून जवळ येऊन पाही तों निर्जीव होऊन पडले. जीव होता न होता ही भ्रांत. तेव्हां गाइकवाड यांनीं पडदेलें व हातांतील पट्टा कैलासवासींचा घेऊन आपले जवळ ठेविला आणि आपले बारगिराचे घोड्यावर पुढें देऊन महाराजांकडे पाठवून दिले. हैबतराव आपण गोटाकडे लुटीस गेले. नंतर मागून सरजेराव घाडगे आले. त्यांची व बारगिरांची गांठ पडली. बारगिरांस बोलले कीं, महाराजांनीं भाऊसाहेबांस आणावयास मला पाठविलें. असें सांगून बारगीर याचे घोड्यावरून आपले घोड्यावर घेऊन महाराजांकडे आले. बारगीर माघारा गेला. महाराज उभे होते तेथें पुढें येऊन घाडगे उभे राहिले. कैलासवासी यांस महाराजांनीं पाहिलें. आपण पाडाव करून आणिले म्हणून सांगितलें. श्रीमंतांचे पदरचे मोठे सरदार पाडाव जाहले. जीव होता किंवा नाहीं हा चितांत अंदेशा न आणितां वैरत्वाचा भाव चित्तांत आणून, त्यांत तर मोठींच फत्ते जाहली तो हर्ष मोठा, देहभान राहिलें नाहीं. सरजेराव घाटगे यांस आज्ञा झाली कीं, मूर्दा घोड्यावरून खालीं ढकलून देणें. त्यांनीं आज्ञेप्रमाणें केलें. जवळ खासबारदार होते, त्यांस आज्ञा झाली कीं, मारून टाकणें. त्याजवरून खासबारदार यांनीं जवळ जाऊन पाहिलें तों जीव नाहीं. मग त्यांनीं वार टाकिला नाहीं.

करवीरकरांनीं केवळ वेडेपणाच केला. इतक्यांत सायंकाळचा अर्ध घटका दिवस राहिला. मीं तेथें जवळच होतों. महाराज प्रेत सोडून पुढें पाव कोश जाऊन बैठक केली. तोफांचे बार करविले. साखरा वांटल्या. खुशाली जाहली. मी प्रेताजवळ दोन प्यादे बसवून त्या जवळच होतों. करवीरास व पन्हाळ्यास वगैरे किल्लेकिल्लीं व वकिलांस तमाम पत्रें फत्ते झाल्याचीं रवाना झालीं. घाटगे यांनीं बक्षिसाची आड घालून भूधरगडच्या किल्याची सनद घेतली. त्याच बैठकेस दोन चार घटकांनीं हैबतराव गाइकवाड लुटीस गेलेले माघारे आले. महाराजांची भेट घेऊन जाला मजकूर कळविला. त्या वेळेस घाटगे समक्ष होते त्याच बैठकेस लबाड झाले. भूदरगडच्या किल्याची सनद घेतली होती ती माघारी घेतली. इतकें होईजेपर्यंत मध्यरात्र झाली. थोडीशी मर्जी स्थिर जाहली. नंतर दहनाचा विचार भाऊराव जोशी यांस सांगितला. त्यांनीं आज्ञा घेऊन सांगतों, म्हणून सांगितलें. त्यांची वाट दोन तीन घटका पाहिली. त्यांनीं विचारिलें नाहीं. नंतर सरजेराव घाडगे यांस सांगितलें. त्यांनींही विचारलें नाहीं. मग प्रीतिराव चव्हाण व बचाजीपंत देऊळकर उभयतां त्या मंडळींतून उठोन बाहेर आले. त्यांची गांठ घेतली आणि त्यांस कांहीं दरबार खर्च कबूल करून मजकूर सांगितला. त्यांनीं विनंती करून आज्ञा घेऊन देतों म्हणून महाराजांकडे गेले. विनंती केली. त्याजवर महाराजांचें त्या मंडळीचें खलबत दोन घटका जहालें. परवानगी द्यावी न द्यावी हेंच मनांत. परंतु चव्हाण यांचा नेट चांगला पडला. नंतर त्यांनीं मला सुचविलें. मग मी पुढें जाऊन महाराजांस विनंती केली कीं, सरकारचा मनोदय पूर्ण झाला. यश आलें. कैलासवासींचें प्रेत आपणाकडे पाडाव आलें त्यास अग्निसंस्कार जाहला पाहिजे. हें महाराजांचे लौकिकाला चांगलें. मीं मिरजकर बाळासाहेब यांजकडून आपणा जवळ आहें. त्यास मला भूषण व यश हें सर्वपरी चांगलें. तेव्हां महाराज चव्हाण यांस बोलले कीं, नारोपंत काय म्हणतात? ते समयीं चव्हाण यांनीं उत्तर केलें कीं, त्यांजकडे सेवकपणा, त्यांनीं विनंती करावी, महाराजांनीं आज्ञा द्यावी, हें उत्तम आहे. त्याजवर दहन करावें म्हनोन आज्ञा झाली. जोशीराव जवळच होते त्यांस महाराजांनीं सांगितलें कीं, नारोपंत यांजकडे काय साहित्य लागेल तें देणें. त्यांनीं आज्ञा म्हणोन त्याजवर ते निघून हमीदवाड्यास आपले गोटास वुणग्यांत निघोन गेले. फिरोन त्यांची माझी गांठ पडली नाहीं. व मलाही त्यांचे साहित्याचें कारण नाहीं. इतकें होईजेपर्यंत अडीच प्रहर रात्र जाहली. नंतर प्रेताजवळ आलों, कोरी पासोडी घोडीवर घडीस होती ती काढून त्यांत प्रेत घालून घोडीवर पुढें घेऊन निघालों. डोंगर कटारीची वाट खचरट, त्यांत थोडा थोडा पाऊस पडत होता. तसेच हलके हलके पहांटेच्या तीन घटका रात्रीस हमीदवाड्यावर लष्करच्या मुक्कामास चार प्रहर दिवस चार प्रहर रात्र आठ प्रहरांचा ताण वसला. चार पांच कोश आलों. बचाजीपंत देऊळकर महाराजांकडील मुतसदी यांनीं कारकून व प्यादे गांवांत जळणाचे शोधास पाठविले. त्यांनीं घरांत शिरून जळण जेथें सांपडलें तेथें काढिलें. साऱ्या गांवांत दोन मोटा गोवऱ्या सांपडल्या. लांकूड तों अगदींच नाहीं. गांव लहान, त्यांत लष्करचा मुक्काम पंधरा वीस रोज होता. जळण अगदीं राहिलें नाहीं. इतक्यांत सूर्योदय जाला. महाराज त्या दिवशीं गोटास

आले नाहींत. बुणग्यांस कूच करून येण्याची आज्ञा झाली. त्याप्रमाणें कूच जाहालें. रत्नाकर पंत यांचे गोटांत लांकडें तीस चाळीस भारे होतीं, तीं जाग्यावरच राहिलीं. तेथें गांवचे लोक लांकडें नेतील म्हणून चार प्यादे बसविले. आणि बचाजीपंत देऊळकर यांस सांगून यशवंतराव घाटगे यांचे पागेचे पंधरा असामी मोतदार आणून सारीं लांकडें गांवानजीक तळें आहे तेथें नेलीं. दहनाची जागा तळ्यावरच नेमिली. गांवांतून जोशी पांच सात असामी वगैरे भिक्षुक होते त्यांस बलावून आणून कांहीं तुळशी काष्टें मिळविलीं. व गोमुत्र आणविलें. शेला दहा रुपयांचा व चंदन दोन धडे व सुवर्ण दोन मासे तुकडे नऊ व तेल व कापूर वगैरे लष्करांतच जिन्नस घेतला. ब्राम्हण गांवचे जोशी चार असामी आणून प्रेत तळ्यावर दहनाचे जागीं नेलें. मंत्राग्नीचा विचार व्हावा हा हेतु होता. परंतु समयास ब्राह्मण चांगला मिळाला नाहीं. गांवचे जोशी होते ते केवळ ढ. मग तसेंच भडाग्नि देऊन दहन केलें. त्या दिवशीं हमीदवाड्यास मुक्काम केला. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं गांवचे जोशी व मी स्नानें करून अस्थि काढिल्या व रक्षा एक बैलभर झाली ती कृष्णेंत नेऊन टाकावी म्हणोन उद्योग केला. परंतु मध्यंतरीं वेदगंगा व दूधगंगा या नद्यांस पाणी भर आलें होतें. नांव टोकरा तेथें कांहींच नाहीं. मग ती रक्षा तेथें त्या गंगेंत विसर्जन करोन माघारे हमीदवाड्यास निघोन आलों. नंतर अस्थि मिरजेस रवाना करावयाच्या त्यास ब्राह्मण मिळेना. तेव्हां श्रीमंत हरबा अण्णा पटवर्धन यांजकडील ब्राह्मण लष्करवाल्यांनीं उंटें, हत्ती देऊन बेगारीस आणिला होता, तो अगदीं लुटलेला, नेसावयास पंचा चार हात मात्र होता. मग त्या ब्राह्मणाचा सरंजाम चर्मी जोडा एक व पासोडी एक व डोईस बांधावयास पंचा एक व दोन रुपये खर्चास देऊन त्याजबरोबर चार असामी प्यादे दिले. आणि रवानगी केली. मार्गाची माहिती नाहीं, तेव्हां टिपण लिहून दिलें, आणि रवानगी केली. कोंगजोळा इचलकरंजी तेथून कुरुंदवाड तेथून मिरज याप्रमाणें सांगितलें.. त्याप्रमाणें अस्थि मिरजेस पोचल्या. पत्राचें उत्तर कैलासवासी बाळासाहेब यांनीं मला लिहिलें होतें कीं, दहनास वगैरे खर्च काय जाहला असेल त्याची याद पाठवून देणें. ऐवज पाठवून देऊं. याप्रमाणें लिहिलें. परंतु मी याद पाठविली नाहीं. कारण कैलासवासी भाऊसाहेब यांचे चौघे पुत्र, शिवाय भाई मंडळी बहुत आप्त पदरची मंडळी थोर थोर वगैरे कित्येक लहान मोठे इतके असोन अंतकाळच्या समयास जवळ कोणीच नाहीं. नारो हरी करंदीकर याचा जन्मांतरींचा योग उभा राहिला. अशा पुण्यश्लोकाचे देहास हात लागून अंतकाळची सेवा जी पुत्राचे हातून व्हावयाची ती माझे हातून घडली. अशी सेवा हजारों रुपये खर्च केल्यानें घडावयाची नाहीं ते घडली. मोठाच अलभ्य लाभ झाला. शेवटीचा अंतकाळसमयाचा पुत्र नारो हरी असें विश्वतोमुखी जाहलें. कैलासवासींचा काळ उत्तम प्रकारचा जाहाला. कसा म्हणाल तर आमरणांत क्षात्र धर्म करून श्रीमंताची पेशवे यांची सेवा चाकरी केली. शूरास जसें मरण धारातीर्थी यावें तसें आलें. तो प्राणी सूर्यमंडळ भेदून उत्तम लोकास जातो. त्यास पुनः जन्म नाहीं. श्रीगणपति आराध्य त्याची केवळ निःसीम भक्ति अंगारकी चतुर्थी

व्रतदिवस. एक पत्नी व्रत. दिगंत कीर्ति ज्याची. प्रदोष समय, त्याकालीं देह विसर्जन झालें. हमीदवाड्यावरचा सारा विधि आटोपून मग करवीरकरांच्या लष्करांत गेलों. याप्रमाणें मजकूर जाहाला. पुढें करवीरास वेढा कैलासवासी आपासाहेब यांनीं दिला व वेढा उठला तो मजकूर अलाहिदा आहे कळावें.

———

[४६८. १५१·लें]

माघ व. ५ शके १७२१
ता॥ १४-२-१८००

॥ श्री. ॥

सेवेशीं धोंडो गोबिंद गोडबोले कृतानेक साष्टांगनमस्कार विज्ञापना ता॥ माघ वद्य ५ तृतीयप्रहर पावेतों सुखरूप असों विशेष-राजश्री पंतप्रतिनिधी व चंदनवंदनकर व साताकर यांस निक्षून ताकीद झाली पा॥. वारंवार तेंच लिहितोस हें काय ! असें कदाचित् म [नां] त येईल. त्यास स्वामींची स्वारी त्या प्रांतीं जाऊन माझा अम्मल सुरळीत चालण्याविशीं ताकीद होणें यांत मला भूषण बहुत आहे. स्वामींचें साहाजिक भाषण परंतु सेवकास महाभूषण याजकरितां वारंवार विनंती लिहितों. हेंही स्वामींचे ध्यानांत आहेच. रास्ते यांस आरब दूर करण्याविशीं ताकीद जाहली म्हणोन कळलें. फार संतोष जाहला. क्षेत्राचा उपद्रव गेला. राघोपंत सफरे म्हणून कोणी कऱ्हाडे गृहस्थ पूर्वी बाबूराव केशव यांचे पदरचे त्यांनीं सालगुदस्त बंडांत पुण्यास येऊन सातहजार रुपये भरून कऱ्हाडची मामलत केली. तेव्हां ते दोषी याजकरितां मशारनिलेस धरून वैराटगडास आटकेंत ठेविले आहेत याविशीं रा॥ चिंतोपंत देशमुखास माहीत पुर्तेपणें आहे व सेवेशीं विनंतीही केली आहे. त्यास त्यांचा चार रुपये खंड ठरावयाचा तो दरम्यान वो॥ रा॥ वैजनाथ भट मामांचें बोलणें पडेल व पडतें त्यांत भाव यांस उगेंच कैद केले, दोष नाहीं याजकरितां त्यांस सोडून द्यावें याप्रमाणें झालें. त्यास मी आक्षेप घेतला. सरकारचे अपराधी अटकाविले आहेत त्यास परवानगी सरकारची. ते पक्षीं परवानगी शिवाय सोडतां येत नाहींत. तेव्हां इकडे निरुपाय जाणोन वेदमूर्ति रा॥ मामा सरकारांत विनंती करून मशारनिलेस सोडवावयाचा उद्योग करतील व चालला आहे. सरकारांतून ते गृहस्थ सुटल्यास सरकारचे चार रुपये मात्र येणार नाहींत. परतु बोलणें बोलतील ते मात्र मध्येंच रुपये खातील. आणि अपराध पक्का याजकरितां त्यास मुक्ततेची परमाणगी नच व्हावी. कदाचित् सरकारचा खंड देऊन सुटत असिल्यास मग नीटच आहे. माझा ज्वर परिहारला. पंधरा दिवशीं पूर्ववत शक्ति येईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

———

ले. ४६९ [३३३] श. १७२२ सन १८००

श्री.

वंशावळ घोरपडे. मुळ पुरुष म्हालोजीराव. यांचे चिरंजीवांनीं करवीरकर महाराजांचे पदरीं राहून, कामकाजें करून पदें तिघांनीं तीन व सरंजाम इनाम पांच पांच गांव स्वपराक्रमानें ज्याचे त्यानें मेळविले.

वडील संताजीराव घोरपडे यांस सेनापति पद देऊन इनाम गांव पांच दिल्हे.

१ जहिरजीराव यांस हिंदुराव हें पद देऊन इनाम पांच गांव दिल्हे.

१ मालोजीराव यांस अमिरुल उमराव हें पद देऊन इनाम गांव पांच दिल्हे.

—

३

यांसि सरंजाम.

सेनापतीस कापशी सरंजाम १. हिंदुराव यांस गजेंद्रगड सरंजाम १. अमिरुल उमराव यांस आजरें सरंजाम १.

पौं अमिरुल उमराव यांचे घराण्याची वंशावळ. मूळ पुरुष मालोजीराव याचा पुत्र शिवराव यांस पुत्र ४.

१ येशवंतराव याचे पोटीं.

१ शिवराव यास मुरारराव याजकडे दत्त दिला.

१ व्यंकटराव यास पुत्र नाहीं.

—

२

३ केदारजीराव यांचे पोटीं.

१ रामचंद्रराव.

१ खंडेराव.

१ काशीराव.

—

३

रायचंद्रराव यांचे पोटीं.

१ मालोजी.

१ आबा.

—

२

२ मानोजी यांचे पोटीं.

१ येशवंतराव.

१ खंडेराव.

—

२

येशवंतराव यांचे पोटीं.

१ मालोजीराव.

१ नरसिंगराव.

—

२

खंडेराव याचे पोटीं.

१ शिवराव.

१ भुजंगराव.

—

२

४ जनकोजीराव यांचे

० नकल.

—

०

*वाटणी न झाल्याचे सरदार लिहून दिले असामी १७ पौ शिंदे व होळकर व भोंसले सेनासाहेब सुभा व भोंसले अक्कलकोटकर या चार असाम्या सरदार यांच्या वाटण्याच नाहींत. परंतु यांचे पोटीं सरदार आहेत त्यांच्या वाटण्या आहेत. बाकी असामी १३ पैकीं गुतीकर व गजेंद्रगडकर व कापशीकर घोरपडे हे घरभाऊ सबब ३.

बाकी असामी.

१ नाईक फलटणकर.
१ देऊळगांवकर जाधवराव.
१ मालोजीराजे घोरपडे.
१ घाटगे सर्जेराव.
१ अमरसिंग जाधवराव.
१ शिर्के.
१ तोरगळकर सेना खासखेल.
१ घाटगे बुंदकर.
१ डफळे जतकर.
१ पाले सावजनकर.

१०

वाटण्या जाल्याचे सरदार असामी.

१ आटोळे १ भापकर १ दरेकर.
१ दाभाडे तळेगांवकर १ बांडे.
१ पवार. १ ढमढेरे तळेगांवकर.
१ खटावकर महाराज. १ पुरंदरे.
१ अंबीकर. १ वाघमारे तलेसंगकर.
१ माने म्हसवडकर. १ बोकील कोरेगांवकर
१ विश्वासराव चिंतामण पागे.
१ खंडेराव वाकडे. १ केरोजी काळे.
१ जाधवराव वाघोलीकर व वाडीकर.
१ भोइटे नसिराबादकर. १ धायबर.
१ शितोळे न्हावीकर वगैरे. १ शेलार.
१ पान्से. १ पटवर्धन. १ रणनवरे.
१ मोरे सरलष्कर १ चव्हाण अठपाडीकर.
१ रामदुर्गकर. १ वाबळे.
१ सदाशिव माणकेश्वर.
१ गोडसे वडूथकर. १ बारामतीकर.
१ देवकांते.

३२

---

* येथपासून पुढील मजकुराचा घोरपडे यांच्या वंशावळीशी संबंध फारसा दिसत नाहीं. पण दोन्ही यादी एकाच कागदावर असल्यामुळें त्या एकत्र दिल्या आहेत. ही वाटणी कोठील व कसली तें समजत नाहीं.

ले. ४७० [१४५] { शके १७२२ सुमारें सन १८००

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेशीं—

पो भवानी शंकर हैबतराव कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लेखन करीत असलें पाहिजे. विशेष-आपण पत्र पाठ तें पावलें. प्रांत वाई येथें ब्राह्मण ज्ञातींत कोणी कन्येचे रुा घेऊन विवाह करूं नये, जो कन्येचा ऐवज घेईल त्याजपासून दुप्पट व जो देईल त्यानें कन्येचे बापास रुा दिल्हे असतील तितके, व मध्यस्ती करून पैका घेईल तो ऐवज त्याजपासून सरकारांत घेतला जाईल. या प्रमाणें ब्राह्मण ज्ञातीस व जमीदार व धर्माधिकारी व उपाध्ये व जोशी व पाा कुळकर्णी, यांस निक्षून ताकीद केली असतां आज्ञेप्रमाणें वर्तणूक न करीत, त्यांजपासोन सदर्हुप्रमाणे ऐवज घेऊन कांहीं खर्चाची बाब न लावितां हिशेवीं जमा करावी, म्हणोन लिहिलें. ऐशास प्रांत वाई येथील गांव बहुत करून दुमाले आहेत तेथें आमचा रोखा पत्र चालत नाहीं. वसुली गांव व वाई क्षेत्र व देशमुख व देशपांडये वगैरे सरकारचे पत्राअन्वयें आणवून ताकीद करवितों. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

ले. ४७१ [४४४] { मार्गशीर्ष शु. १२ शके १७२३ ता १६-१२-१८०१

श्री.

श्री राजा शाहू छत्रपति प्रौढ प्रताप पुरंदर आनंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादर

तैनातजाबता शिलेदार जदीद येकांडे कारकून कृष्णाजी अनंत असामी १ तैनात बारमाही नक्की शिरस्ता सुरुसन इसने मय्यातैन व अलफ. रुपये

६०० जातीस.

१०० शागीर्दपेशाबद्दल.

७००

एकूण असामी एक यास तैनात बारमाही नक्की शिक्का रुपये सातशें करार केले असत. पैकीं नाणे बट्टावगैरे व दरबारखर्च वजा होऊन बाकी तैनातेचे कबज शाईचे मार्गे पावेल. चाकरी इमानेइतबारें करावी. हजेरीस घोडें तिनशांवर किमतीचे लागेल. लढाईत घोडें

निशाणापुढें पडींत जहाल्यास दाखला पाहून किंमत पांचांचे मतें ठरेल ती दिल्ही जाईल. लुटींत नगारा, निशाण, नौबत, ढाल पालखी, व हत्ती, खाजिना, व तोफा सांपडेल तें सरकारांत दाखल करावें. चाकरीची तेरीख छ ८ साबान सन मजकूर पासून चालू असे. जाणिजे छ ९ माहे साबान. मोर्तबसूद.

ले. ४७२ [१२१] } { माघ शु. १३ श. १७२३ ता १५-२-१८०२

॥ श्री ॥

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसि

छ सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ आनंद राव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर दंडवत विनंती येथील कुशळ जाणून स्वकीये कुशळ लिहित असलें पाहिजे. विशेष--कानोजी गायकवाड यांणीं बदमामली करून बखेडा बहुत केला. यास्तव समस्त सरदार यांचा एकदील करून कानोजीराव यांस कैदेंत ठेऊन दौलतीचा बंदोबस्त केला. हें वर्तमान आपणांस कळावें म्हणोन लिहिलें आहे, मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. स्वामीचे प्रतापें बखेडखोरांचें पारपत्य करून बंदोबस्त केला. आज छ मारींच बंदोबस्त झाला. मागाहून सविस्तर विनंनि लिहितों. रा छ ११ रमजान याज उपरि मी चाकरानें ल्याहावें आ. [?] इष्ट नाहीं. वडिलानीं चाकरी करितां हा काल काहाडिलें याच अन्वयें माझी हीच न वे रा आहे. एकदां खावंदाचे पाये व रि न पाहावे तो सुदीन. वरकड आणिक नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती. शिक्का

ले. ४७३ [१८६] } { माघ शु. ९ श. १७२३ ता ११-२-१८०२

॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री कृष्णराव नारायण स्वामी गोसावी यांसि पोष्य बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. शहर सातारा येथील बंदोबस्तास चिरंजीव राजश्री त्र्यंबकराव माहिपत पुरंदरे यांजकडील सरंजामी पतकाचे स्वार एकशें पाठविले असत. तर यांजकडील एकशें स्वार घोडे राऊत चांगला पाहून गणती घेऊन चाकरी घेत जाणें जाणिजे. चंद्र ७ सवाल सु॥ इसने मयां तैन व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

ले. ४७४ [३९] श्रावण शु. १३ श. १७२४ ता ११-८-१८०२

॥ श्री ॥

वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामचंद्र दीक्षित व लक्ष्मीनारायण दीक्षित गोसावी यांसि—

सकल—गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहा॥ येशवंत राव होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. खानदेश प्रांतीं खासा स्वारी आल्यावर पुढें राजश्री फत्तेसिंगराव माने वगैरे फौजा या प्रांतीं रवाना जाल्या. जनवार्ता सैन्याचा उपद्रव यामुळें कायगांव टोकें प्रवरासंगम तीर स्थळीं क्षेत्राची जागा, ब्राह्मणांस भय उत्पन्न जालें. साल गु॥ क्षेत्र कायगांव पेंढारी यांणीं लुटलें. त्यामुळें भय अधिक प्राप्त जालें. त्यावरून क्षेत्रस्थ ब्राह्मण श्रीफल घेऊन मान्यांच्या भेटीस पुण्यस्थंभीं गेले. त्यांनींही अभय दिलें. जे आम्हांस येविशीं सुभेदार* साहेबांची आज्ञा आहे जे, क्षेत्रास उपसर्ग होऊं नये. त्यावरून सर्वांस संतोष जाला. हलीं राजश्री नबाब ‡ अमीरुद्दौले फौजेसुद्धां कसबे गांडापूर येथें आंबडाकडे स्वारी जाणार त्याजकडील उपसर्ग क्षेत्रास किमपि लागला नाहीं. माने यांणीं खात्री केली त्याप्रमाणें अनुभवास सर्वांच्या आलें. पूर्वापार कैलासवासी थोरले सुभेदारापासून ×या स्थलाचा अभिमान आहेच. त्याप्रमाणें सांभाळ करूनच आम्हांकडील गांडापूर परगण्यांतील तीन गांव नेवास परगण्यांतील एक गांव ऐकूण चार गांव आहेत. आज पांच सहा वर्षें पायमालीनें खराब जाली. त्यास त्याचे व तीरस्थळींचें संरक्षण घडावें याकरितां नबाबास पत्र दिल्हें पाहिजे. म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशियास तुम्हांकडील लक्ष्मण उमाजी याजबराबर राजश्री अमीरुद्दौले याजला पत्र पाठविलें आहे, हें त्याजकडेस पावतें करावें. गांवास उपद्रव देणार नाहींत. सर्वदा पत्र पाठऊन तोषवीत जावें रा॥ छ ११ रबिलाकर. सु॥ सलास मैयातैन व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तसुद.

ले. ४७५ [४९७] श. १७२५ स. १८०३

श्री सद्गुरु प्रसन्न.

यादी दास्त बेरीज बादशाई हिंदुस्थान अवरंगजेब कारकीर्दीचे जमाबंदी रुपये रुधिरोद्गारी संवत्सरे पुणेचे मोहिमेस गेले असतां कुंपणी सरकार तर्फे जेनरल वलजली बाहादूर यांणीं ठराव केला बेरीज.

---

* यशवंतराव होळकर. ‡ यशवंतरावाचे पदरचा पठाण सरदार अमीरखां ?

× मल्हारराव होळकर.

तपशील.

शहाजहानाबाद ऊफ दिल्ली.

२८६५८३७५	सुभे शहाजहानाबाद ऊर्फ दिल्ली परगणे २२६ सरकार.
२४५४६९९५	सुभे अकबराबाद ऊर्फ आग्रे. सरकार १४, महाल २६८.
१३७५९०००	अजमेर ऊर्फ मारवाड. सरकार ७, परगणे १२३.
९४०१५२५	इला [हू] बाद ऊर्फ प्रयाग. सरकार १६, परगणे २४७.
९५१८२५०	सुभे बेदर ऊर्फ पैठण सरकार ८, महाल २४०.
६६१३५००	सुभे अयोध्या. सरकार ५, परगणे १२७
१०२६२५००	सुभे उडाया ऊर्फ जगंनाथ. सरकार १५, परगणे १३२.
११५७२५००	सुभे डाका ऊर्फ बंगाला. सरकार ७, परगणे १०९.
१४५२४७५०	सुभे अमदाबद ऊर्फ गुजराथ. सरकार ९, परगणे ८८.
२३७४२५०	सुभा ठाठा ऊर्फ सिंद. सरकार ४, परगणे ५७.
६११६३७५	मुल्तान. सरकार ३, महाल ९६ सि.
२२३३४२५०	लाहोर ऊर्फ पैजाबाद. सरकार ५, परगणे ३१६.
३१५७१२५	कासमेर. महाल ४६ सि.
३१६३०००	काबूल. सरकार ८ परगणे ९६ सि.
१९२२६७५०	सुभा माळवा ऊर्फ उज्जनी. सरकार १२, परगणे ३०३०
३८६५०००	सुभे केदार. महाल ५०, सि.
१२७४३५०२	सुभा अवरंगाबाद. सरकार १२, महाल १३६.
५७०४०२३	सुभा बराणपूर. सरकार ६, परगणे १३६.
७५०४५६५	सुभे बेदर. सरकार. १२, महाल १३६.
११२५००००	सुभे इलजपूर. बराड. सरकार ५, परगणे ६१.
४६९७६६५१४२	सुभे विजापूर. सरकार १८, परगणे २८१.
५७७३६५२६८१०	सुभे हैदराबाज सरकार ४२, परगणे ४०५
३३१००९४१२८१२	

तपशील शाई ५७ बेरीज.

१२४२२०९१६	राव पंतप्रधान.
३४६७३३०४८७	नबाब अल्ली निजाम बहादूर
१२३५७८७०९८१	इंग्रज बहादूर.
१६३०१५००	आबदाअल्ली.
३२२३४९८३८४	सीक वैगेरे चिलर.
३३१००९४१२८१२	

सरकार राव पंडित प्रधान रुपये

सरकार. निसबत.

८७२२९९१६ ३६९९१०००

सरकार राव प्रधान अमल रुपये.

८७२२९९१६

तपशील.

८५५३८७५	सुभे शहाजहानाबाद ऊर्फ दिल्ली.
१२१७३९९५	सुभे अकबराबाद ऊर्फ आगरे.
१३०००००	अजमेर ऊर्फ मारवाड.
१६०००००	सुभे उडाया ऊर्फ जगन्नाथ.
१९२२६७५०	सुभे माळवा ऊर्फ उज्जनी.
६५७५०००	सुभे वराड
५५३८४२३	सुभे बऱ्हाणपूर.
३०००००	सुभे लाव्होर.
११९००६०१	सुभे विजापूर.
१०७९८७५०	सुभे आमदाबाद.
६२६२५२२	सुभे औरंगाबाद.
३०००००	सुभे बेदर.

८७२२९९१६

तपसील.

खालसात अमल कुल.	रुपये
४८०००० परगणे पुण्या	२६४३९६ हवेली जुनेर
१३०७६३ परगणे सिवनेर.	९५०११९ इंदापूर.
३५०००० विजयदुर्ग.	११०७२५ सुपे.
४७९३५ बारसी	१२००० सासष्ट पिंपळगांव
१२५००० सोलापूर	२१००० वतुर नारायणगांव
३९३७४ आईरवाडी	१५००० वाई.
२३२१६७ कुक (म?) रखेड	८००० खतराबावदान (?)
१५५००० एरंडोल	२५००० प्रतापगड.
४००००० नेवासा	१८००० सिंहगड
२५००० बेदूर [वोतूर ?]	३२००० लोहगड व इस कालेगड.
१८००० पारनेरी	२०००० पेठागांव
३१२४३० हवेली संगमनेर	१५००० केर्नेल.
९२६३५ कुंभारगांव	३१५००० बागलाण.

७५३५० नासीक
६४३५६ आकोळनेर
३५१७५ कोपरगांव
२४६७१३ रत्नागिरी
१८५०० भैरवगड
६४००० वंदन
१९५०० चंदन
९००० चाकण
२६१०८९८

३६००० त्रिंबकगड.
७२५००० सुभे वसई.
६०४००० कल्याण भिवडी सुवर्णदुर्ग
१३५७९६ अंजनवेला.
४५६९३ रेवदंडा.
५५००० पाली
१६००० करनाळा.
२४००० पेलार.
६०००० रायगड.
३००० पुरंधरगड.
३५१०७२९

६१२१६२७

दफेसुभे गुजराथ

११५०००० आमदाबाद
१५३६००० सुरत अठ्ठाविशी
५२५००० जंबुसर (जेबुसर)
१७५००० हकूनश्रार
१०३००० आसावा
१४४००० बलसाडे
८०००० सुरत हवेली
५०९००० फुटमहाल
१५३६०००
२६८६०००

बेरीज पट्टी
१३२५००० सुभे झांशी
२५०००० आला [म ?] णपन महाल.
१५४२५०० बुंदेलखंड.
८५०००० सागर
४८०००० कालिपी
२१२५०० गडमंडल
१५४२५००
७५००० जळगांव
१००००० बादामी

कर्नाटक.

२२५००० बागडकोट.
५२००० केरूर.
५००८० नंदवाडीगी.
१५६००० बेळगांव शहापूर.
२८०००० खानापूर
३४५७०७५॥ सावनूर वगैरे टिपु-
सुलतान याजकडून आले ते
१०६९४२२ सावनूर.
३९७५६३॥॥ धारवाड
४७६९८९ हेबरगी.
१६०६५४८७ ज्यालीहाळ.
६६७९००८३ नवलगुंद.
१३४६९३८१० हावनूर.
२०६७१३८२ गदग.
७५७३५८१० जुने हुबळी.
६१५१३८४ बंकापूर.
५४३६३८४ कलघटकी.
५२१३५८२ मिश्रीकोटी
५२८६९०८१० कितूर.
३४५७०७५८८

१८५००० देशमुखी
११०००० गंगथडी
७५००० बालाघाट
१८५०००

१४००००० गांइकवाडनजर

४८२८५००

१५१५०० खंडणी
८५००० सुरापूर.
१६५०० तपवाल.
५०००० कर्नोल.
१५१५००

४११९५७५८८

एकूण कुल १७७५५७०२८८ रुपये.

फौज सरंजामीस नेमणुकीस दिला रुपये.

९५००००० मल्हारराव होळकर याशी स्वार
४३२००० आंबाड
१३५००० राउता.
३९४००० नंदुरबार.
१७५००० महेश्वर.
७५०००० रामपूर कि ला ट रका वगैरे.
२५४००० रामपूर किला.
२९६००० द इ फ क पूर.
४८१००० जाहगीरात माल्यो.
२५७००० चांदवड.
३१७४०००

२२००० हजारास जहागीर.
२९५००० सुलतानपूर.
४१५००० इदाजारत.
३०५००० रामपूरत.
३१२००० सिरोंज.
२८६००० सैद
३५००० विजेनगर.
४६७०००० हिंदुस्थान पैक समाईक वगैरे.
६३१८०००

९५००००००

४५००००० अनंदराव पवार वगैरे स्वार १५००० सि.

२०२५२८३ माळवा (?) परगणे धारवाड वगैरे पटवर्धन मंडळी.

११४२४४४ चिंतामणराव पांडुरंग व गंगाधरराव गोविंद स्वार ३००० सि.

३२०००० सरकार मिरज.
१३०००० मंगळवेढें
९०००० ऐनापूर.
६०००० करकंभा.
३०००० भुसा.
१०५००० शाहापूर.
३३००० तेरदळ.
१८६३१३ लक्षमेश्वर.
९५४३१३

६९९९५ नवे हुबळी.
४०३१३ ब्याहट्टी
३९८६३ ताडस
१८००० हेबळीपरगणे परंड.
१९९६० जुनेहुबळी पैकीं खर्च खंडणी. १८८१३१
१८८१३१

११४२४४४

६३८८३९ परशराम रामचंद्र यास स्वार १५०० याशी

३२००० तासगांव करयात.	३३००० तेरदळ.
२८००० बरडोल.	५६००० यादवाड.
१६००० येकसंब.	११३३७३ कुंदगोल.
१५००० अनवलें.	१०२९६६ मुळगुंद.
१०५००० गोकाक.	१२५०० भरतकुणकी.
८०००० जमखंडी	५५०० पुलतांब.
	६३८८३९

२४४००० कुरुंदवाडकर रघुनाथराव स्वार ३००.

३०००० कुरुंदवाड.	४५००० मईदरगी.
३१००० रायबाग.	३३००० तेरदळ.
१०५०० शाहापूर.	
२४४०००	

१४०५००० प्रतिनिधि स्वार ५०००

२१००० प्रतापगड	६०००० विजापूर.
३५००० मयाणी.	८०००० खटाव.
३००००० वाई.	७२००० काशीगांव.
६०००० वेंलापूर.	१०५००० विजापूर.
६०००० विशाळगड.	५०००० बागवाडी.
७२००० गोठा.	३४००० कोक [ला !] टनूर.
२२७००० सरदशमुखा.	१४०५०००
४०००० वांगी.	

१११०००० रास्तेचे स्वार ३००० सि.

३००००० तालिकोट सिंदगी.	१२५००० आथणी.
४५००० कोक [ला ?] टनूर.	५०००० उकली.
९०००० मुळवाड.	१५००००० खानदेशपैकीं.
२१०००० जतकरंजगी.	१११००००
५०००० नालतवाड.	

४०२५०० मुधोळकर मालोजी घोरपडे स्वार ८००.

३२००० मुधोळ.	१०३०००० माचकनूर.
१२५००० अलमेल.	७५००० इंडी.
६७५०० तंवा	४०२५००

३०००० संकराजी घोरपडे जाहागीर बिलगी.

३५८००० पानसे दिमत तोफखाना सरंजाम.

१६२००० हुनगुंद. ४२००० मुतला [क !] वी,
२१००० हलसंगी. ४५००० हिपरगें.
१८००० म्हमदापूर. ४०००० वैराग पानगांव.
३०००० मल्हारगड.

३५८०००

१२५००० थोरात सिलेदार यास परगणे वाळवें स्वार ५००
६०००० भापकर मंडळी परगणे होरोती स्वार १५.

१८०००० हरीपंत फडके.

३०००० कोलार. ३५००० सांगोलें.
२१००० ब्रम्हपूर. २०००० घाट नांदूर.
३०००० अंवलनेर. ३२००० पिंपळनेर.
१२००० चिलर फुटगांव १८००००

४५०००० नानाफडणवीस स्वार ७००.

१९२००० चोपडा १०२००० नेरें.
६०००० भाना. ९६००० मलकापूर.

४५००००

७५०००० त्रिंबकराव मामा पेठे खानदेश पैका स्वार १२००
४५०००० शाहाजी राजे भोंसले अक्कलकोटकर स्वार १०००.

३००००० बेदर परगणे अक्कलकोट.
१५००००० हवेली पुरंदरपैकीं सरदेशमुखी.

४५००००

१५००००० सुलतानराव बंडगर चौथाई मिा स्वार ५०० नेमणूक मोंग [ला] ईवर.

२१४९५७८३

बेरीज दफे चिलर वगैरे.

२३२००० माधवराव पुरंदरे ३०० स.

१८००००० सासवड वगैरे. ३२००० सरदेशमुखी चौथाई.

२३२०००

२०००० जळगांव परगणे
६०००० सेखामिरा वांईकर स्वार१५० सि.
८०००० माधवराव आंबेकर यास आंबे वगैरे.

७५००० सुल्तानजी भोंसले खानदेश पैकीं स्वार २००.
१५०००० रघुनाथराव नायगांवकर यास नायगांव वगैरे गंगथडी स्वार ५००.
९००००० रंगराव राजे बहादर यांस हिंदुस्थान परगणे मालेगांव पैकीं स्वार ३०००
१२००००० विठ्ठलराव सुंदर स्वार ३००० राज्य हिंदुस्थान.
२४०००० खंडेराव वोडेकर स्वार ८०० याशी वोढें वगैरे.
२२००००० अल्ली बहादर यास बुंदेलखंड परगणे सरकलपाल मशारनिलेकडे आहे. स्वार १००००

१८०८७००० राजमंडळकर.

१३५००० त्रिंबकराव दाभाडे सेनापति तळेगांव वगैरे स्वार ५००.
१०००००० रघोजी राजे भोंसले नागपूर व छत्तीसगड वगैरे बंगाला कटक वगैरे मोंगलाई घासदाणा बराड वगैरे सेनासाहेब सुद्धां २५०००.
७२००००० गोविंदराव गायकवाड यांस ५००० [सर] खेल सेमसेर बहादर गुजराथ खास परगणे बडोदा सुरत अठ्ठाविसी.
७५००० भास्करराव इसलामपूर वगैरे स्वार ३००.
३००००० बाबूराव आंगरे सेना सरखेल कुलाबा वगैरे स्वार सरमजाम.
२५००० जयवंतराव सुमंत.
७५००० कृष्णराव चिटणीस चिल्लर फुटगांव जाहगीर.
१५००० अमात्य सातारे परगणे.
२३२००० रघुनाथराव सचीव मालदेश.
३०००० राजाज्ञा यांस कसबे वांई.

१८०७७०००

९२५००० कोलापूरकर राजमंडळ स्वार स्वार ३०००.

७५०००० राजास नेमणूक कोल्हापूर मालवण राजानगर वगैरे.
६००० तोरगल सिंदे यास.
१००००० नरगुंद व्यंकटराव यासि.
१५००० कापसीकर घोरपडे यासि.

९२५०००

१६५००० वापोजी नाईक बारामतकिर बारामती इंदापूर
बार्सी पैकीं. स्वार २००.
४५००० भोसले मंडली परगणे महादेव.

२५७००० निंबाळकर मंडली.
१०५००० फलटण.
५२००० भालोणी
६०००० अकळोज.
४०००० दहीगांव.

२५७०००

२०००००० सरदेशमुखी चौथाईबद्दल मोकरर घासदाणा वगैरे सरंजामाबद्दल.
२००००० फौज सरंजाम दिल्हा आजमास.
२९५००००० दौलतराव शिंदे आलिजा बहादूर यासि.
९००००० सरंजाम नेमणूक स्वार २२०००.
६३७०००० सुभे माळवे परग- २५०००० गांडापूर
णे उज्जनी वगैरे. २९५००० झालनापूर.
१००००० बरानपूर वगैरे २१५००० आमदानगर.
खानदेश. ४०००० गोरवंडी.
३५०००० सरकार हंडा. ३५००० वडेगांव.
१८५००० खंडाळा. ८५००० श्रीगोंदा उर्फ
१७५००० चाळीसगांव चांभारगोंदे.

९०००००

२०५००००० पादशाई मुलुख सुभा दिल्ली अकबराबाद वगैरे सर केले
आहे वाटणी करार दर शेंकडा.
२२ सिंदे २३ होळकर.
१० पोवार. ४५ पेशवे.

१००

याप्रमाणें आहे. वांटणी दिली नाहीं सबब होळकराशियांस कज्जा.

२९५००००००

१४६३०७ गुतीकर घोरपडे मंडळी मुरारराव घोरपडे सेनापति
३७३०७ सेंडूर
१८००० गजेंद्रगड दवलतराव घोरपडे.

१६०००गलगलें.
३७५०० काळेनिडगुंद.
३७५००वेळोति वरोळी वागेणूर वगैरे.

१४६३०७

५६४,६२,३०७

एकूण ९५७१३७८२॥ रुपये.

यांपैकीं चौथाई खंडणी घासदाणा मोंगलाई राजे वगैरे कडून खंडणी येणें बद्दल बजा कुल्सरकार राखल. ८४८३८७६॥ रु.

जातां कुल

८७२२९९१६

निसबती राजेस चालिवणेचे

३६९९१०००

तपशील

३७३३००० उदेपूर राजेराणा हिंदुपती यास सुभे दिले परगणे पादशाई नेमणूक
१००५५००० राजे अमरसिंग प्रतापसिंग बिजेसिंग मारवाडी यांत.
७३६७००० जयसिंग सवाई यांस जयपूर वगैरे धाडोड वगैरे
११०६०००० बुंदीकोट राजेस बुंदीकोट सुभा. आगरा परगणे.
६००००० भुपाळकर नबाब यासि भुपाळ वगैरे.
१७००००० बुंदेलखंड राजेस झन्ना पन्ना वगैरे.
३००००० जाट यास भरतपूर वगैरे.
२४४६००० काटेवाड राजे यांस चालवणेचे सुभे गुजराथ परगणे.

३६९९१०००

३४६७३३०४८७ नबाब निजाम आलीखां बहादूर याचे सरकारास कुल्

तपशील

३२४०२८२८५खालसात.
२२७००२२८२ निसबती राहणार.

३४६७३३०४८७

बेरीजपटी रुपये.
तपसील
ऐन सरकार कुल् रुपये.

३२४०३२८२८५

तपसील रुपये.

१०५३०२३७८५ सुभे हैदराबाद परगणे १३०.

५७९४८७४ सरकार गोलकुंडा परगणे. १२
५२१८०९८८॥ सरकार मेदक. १२
७७३१२३८६॥। भोवानागिरी. ११
३२४८३२८१० पानगल
१२७०३३८१॥ कौलकोंडा १३७
८२१४५० सरकार नलकोंडा ६७
२००७३६८९॥। सरकार येलगदल. २१
५००६२५८१॥। कवास. ५
७४२७२४८१५ वरंगल. १६
२८०५५७८२। खबमेट. ११
१८९१०८२॥। सरकार देवरकोंडा १३
१०५३०२३७८५

७२०४५६५ सुभे बेदर. ४३

१४४००५० सरकार बेदर. ७

२०३७५० हवेली बेदर ३१. १९५००० कारीमुगी.
३१३९०० भालकी. २०७६०० नारायणगांव.
२९१३०० चिटको. ६३५०० निटूर
१६५००० हुसनाबाद.
१४४००५०

१३२६६९४ सरकार मळीखेड ११.

८२१६१ हवेली. ९२३५ उटकूर.
१५६३० सेडम. ३७९०० अमराचिर्ते.
२८७६५३ चितापूर. ९१,९०० घेडमाल.
९७६०० अबदलपुर. ६७९५० कडेचूर.
२०१०३५ चिंचोळी. ९८९१५ मगदरपक.
२५३६०० कालकोर्ती.
१३२६६९४

१४६७७२ सरकार यातागिरी कोटनूर वगैरे.
८०५९४६ सरकार रामागिरी.
३४८५१०३ सरकार नांदेड १३.

२६९९१३ हवेली.
३१३७५५ वसमत.
३६२७५० इंदूर.
१५०९४५ बोधन.
११२७५० राहंश.
२७३५१५ निरमळ पंचमहाल.
९२६९५ बोलकोडापूर.
५१७५० वामेलवाडा.

२३१६५५ कंदार.
३१९५० रुद्रार.
१६२७५० पेगलूर.
२६४६०० रोजारा.
३५६०० परळी.
१३७६९० भुधोळ.
९९१७८५ कोंडलवाडी वगैरे

३४८५१०३

७२०४५६५

३९४६९०० सुभे विजापूर परगणे १७.
७३७१७७ कलबुरगामहाल १.
१०२५२७४ सरकार नळदुर्ग.
८५७९९४ सरकार मुदगल.
९१६०० हवेली.
५६३५० कुकनूर.
१६१३२५ कोपलं.
१०६५०० येलबारगा.
८७५०० कुष्टगी.
६८३५० तावरगेरा.

७६५०० गंगावती कमनगिरी वगैरे.
३१५०० सिदनूर.
२८९०० खडगुपी.
१०२००० कायताल.
४७४६९ मसकी.

८५७९९४

१३२६४५५ सरकार रायचूर.
४०६३५३ संस्थान गदवल परगणे २.
२३३००० अमलपूर.
६८७१०२ रायचूर.

१३२६४५५

३९४६९००

५८८०९८० सुभे अवरंगाबाद.
३०६५६१ सरकार दौलताबाद.
२७७९५० अवरंगाबाद.
६५३६०० बीड सरकार
३९७५०० पाथरी.
३०२५६१ सरकार पैठण.

७४६०१३ पुरंड हवेली.
२९८७९० सहगड
१८९८६९५ धारूर वगैरे भुमघाट.
९९९३०० परंडा.

५८८०९८०

१६५६०० सुभे हतुरानपूर पैकीं ३० गांवे वगैरे.
४६७५००० सुभे वराड वगैरे.
६७५००० वासीम.
१५३६००० एलचपूर.
१४६४००० माहावर.
१००००००० छतीसगड परगणे.
४६७५०००
३२४०३२८२८५

निसबतीवार राहणार
९२२९५० मुरापूरकर.
११५७५२२८२ कर्नोळकर नबाब.
७२६३६७८२ गाजीपूर नंदपाळ.
४३११६५ अदवानी परगणें नाकनोल.
११५७५२२८२
१८९५५० बनगाज [न ?] अल्ली गुलाम अल्ली खानास.
२२७००२२८२

एकूण बेरीज पटी ३४६७३३०४८७ रुपये
इंग्रज बहादर १२३५७८७०९८१ रुपये
तपशील रुपये.
९४१२११८४८१ खालसात.
२९४५७५२५ निसबत राहणारा.
१२३५७८७०९८१

तपशील रुपये.
खालसात कुल् ९४१२११८४८१ रुपये.
तपशील रुपये.
३०२३५४०० नबाब कासम अल्ली खान बहादर याजकडून घेतल्याबद्दल.
२१५७२५००० सुभे डाका ऊर्फ बंगाला सरकार कुल् १०९
८६६२९०० सुभे उडाखा सरकार १४.
३०२३५४००

४१०००० सुरतकर नबाब यांणीं दिले सुरत कसबा.
९००२५०॥ सुमे अवरंगाबाद परगणे झमई साष्टी वगैरे.
१८१९६८५२ नबाब महमद अल्लीखान यास चालत होते ते.

८९४०८५२ सुमे हैदराबाद पैकीं

१०१०५२७४१० सरकार कंची १५ ८१८६५५ पालकोट. १२
५०७६१९४१० चंद्रगिरी. ९ ८९११२० त्रिणामल. १५
६७५६८९४१५ सरवपल्ली. १२ ७४७६६५॥ राये वेळूर. ८
४८०९४८४३ तिरपासूर. ६५१२०० वालकोंडापूर. ५
५११४१५४५ चेंगलपेठ. ९२४८०० वरदावर.
५७४७३१ वाहवासी. ७१९२५०। सरकार चंदी ८
४२७५३७४१० उद्यगीरी. ६

८९४०८५२

९३५६००० तिरचेनापल्ली त्रिणावली रामनाथपूर वगैरे सरकार तिरचनापल्ली.

१८१९६८५२

२२४१२८८९ टिपूसुलतान याजकडून घेतले ते.

६०२४७८९ श्रीरंगपट्टण पैकीं

२१५००० श्रीरंगपट्टण. ९१४५५ बालम.
११२००० म्हैसूर. १०६००० महाराज दुरंग.
१२४००० सत्यमंगळ. ५९२०० हरोली रामगिरी.
१२००० हरपनपल्ली. [?] ५६५६० तेरकाणांबी.
६२००० पिरीयापट्टण. ८०००० चिकलूर.
१०७६०० मंदुर. १६८९८० इराडे.
७२००० ह [ब] गण देवरकोट ७२१७५ दुरवी करेव.
५४००० बेटपपर. ४२५२० किलोरी.
६४००० ताईऊर. ९१६५५ चनरायपट्टण.
८०००० यलदूर. ४६००० जुगनेहल्ली.
५२०००० मलवली. ८१६०० गरडनागिरी.
६४८०० तलकाड. ४६१३४ चिकामंगलूर.
२१६०० नरसिंहपूर. ३१५०० भैरवदुर्ग.
४३२०० येडोतोरा. २४५००० सत्यमंगल.
२१४००० चेऊर. २३८५०० सेखगिरी.
१४२००० चेजरी. १५६००० सत्यमंगळ

२१२७५० धारापूर.
१६३७५० केरूर.
१६७००० कागेम.
४७५०० उतगुडी.
१०५६५० हेरतूर.
१२७५०० विज्यमंगळ.
४८५०० आतूर.
६७६९० होसूर.

११२००० नागमंगळ
११५५०० परमती.
४३२०० वामचूर
१३६००० अनंतगिरी.
४८००० कावेरीपूर
२९७५०० दिंडगल.
८३४७५० कोईमतूर
१८५००० शालम.

६०,२४,७८९

५७९२६९४ सरकारा सी रा ज ग पे ब वगैरे.

४५८९३९ हवेली.
३७१०३१ हसनबेल्लूर.
२०९०० नागमंगल.
४९९८ गंगाबेल्लूर.
७५००० कुणगल उतरी दुर्ग.
२१६०० मेलकोठा.
२८१२९५ संकरायपट्टण.
३२१८३१ बेंगळूर.
१०८६५५ मागडी [उ ?]
२५३८९३ मंदगिरी.
९१७५० खानखानली.
२८१२५ कडूर.
२२२२५५ तुमकूर दवरायदुर्ग.
२८९५७ त्यामगोडिक.
३३३७५ शिवगंगा.
२४७३५ माकलीदुर्ग,
६२३५५ मनकोलार
२२५००० रसूलपूर ची ना ना
इ ला न के री.
८४३७५ उंकणीकोट.

८८९९३ अंकुसगिरी
८४२७७ हडीपीहाल.
५८७५५ निडगळ.
१८९५० पावगड.
६५६०० हागलवु [बडी?]
१५८६४५ नेलवगल.
२७००० देवडनहल्ली.
३२४००० बालापूरखुर्द.
३१८७८९ होसकोट.
४७९२३४ बसवापटण चेनगिरी
३९३१२७॥ कोलारमुलबगल.
५९२५० रायसमुद्र.
३५७९१॥ सत्यमारडनहल्ली.
६१५०० पालकोट पंनागर.
५८७०० धर्मपूर.
३९८६०० बारामाहाल.
११२००० केगरीकोट.
१०९५०० ला [क ?] गुदी
२२०९१० बालापूर.

५७९२६९४

४०२४६९० सरकार इला [क ?] री ऊर्फ नगर.

३६४१७० हवेली.
६५८३० नावलदहावे.

२९१४५४ बिदनूर नगर.
१६८५३५ कौलिदुर्ग.
७२३६५ खुमसी.
७८९६५ बिनगी.
२१९६४८ कोपा.
९८१८३ वस्तारी.
१०९६५ चेंद्रगुती.
८६९० सोरबतवानंदी.
७४२०० जेडेआनवटी.
७७५०० उडगणी सिकारीपूर.
१०२५०० लक्काळी दानवास.
१०८५३० बेरूर [स्त !]
१३८६९५ तरीकरा.
८६४५० अनंतपूर.
११३३६५० मंगलूर कांडयाल.
४४८६५० बालतूर.
२६५००० कुदापूर.
९१७५० कारकल.
१६८५० शिवमोघा.
१०१९१ अजमपूर.
९१९२० गिरसिवा.

४०२४६९०

१४३४८६७ चित्रदुर्ग.
२९८६०० हवेली.
११२६५० भीमसमुद्र
१०६९५० होमदुर्ग.
११४३६७ हालेलकेरी.
११२९६५ दौडरी.
११७६३५ मायकोंडा.
११६५०० मालेकालमुरू.
११६०० तलंख.
९१५०० हणमखर.
८०६०० कणकुपा.
१२६५०० हिरूर.
१००००० आईमंगल.
४५००० गुडी [तु ?] कोट.

१४३४८६७

१४३२००० संस्थान सोदा
३६१४३२ बाईदनाड ऊर्फ कोंडग.
२६७७५५ पालघाट.
२९७६५०० कलीकोट वगैरे मलेबारपैकीं.
९८१६२ गुमी नाईडपाल.

२२४१२८८९

१२००२२०२८१० नबाब निजामअल्लीखान [यांणीं] दिल्हा तो
४२०८५१८८१४ अवल दफा दिल्हा ते.
११६७७०९ सरकार हूजूर.
१७४२६८ सरकार नांजूर.
५५३२५८२ गुप वेल्लूर.
२४६००० निजामपटण.
५४०९५८ मछेली बंदर.
६८५५०९ राजमहेश्वर.
८४०८२२८१२ सिकाकोल.

४२०८५१८८१४

७७९३६८३८१२ दुयम दफा दिल्हा ते.
७०४००० परगणे रायदुर्ग.
१०८००० कुर्पा. ५३१००० रायदुर्ग.
६५००० धर्मवार.
७०४०००
६४०००० हरपनहल्ली.
४५३०० जरीमला [क ?]
१८८००० आनेगोदी.
४३१२८१८॥ हैदराबादपैकीं सरकार.
७३८२०५४५ उरमकोंडा. १२०७८७१४२ गजेकोटा.
८९८६९६ गुत्ती. १४६८०४६८१ सीदोट.
४३१२८१८॥
३५३७५४४ सिरे परगणे रत्नागिरी.
१३५५१४० सरकार अदवानी.
१०१४००० हवेली. ४७६५० तलो [के ?] ल कोट.
१०९५३४ बेलारी. ९२६०० सिर गुपा.
९१३५५ कुरुगोड.
१३५५१४०
९७३५० नंदपाळ पैकीं काईल कुल.
७७९३६८३॥॥
१२००२२०२४१०
९९५६००० चंदावर राजे यासी चालत होते ते हाली कुंपणीदाखल
९४१२११८४४
निसबतीस.
१५९८६५२५ सुजायत दौला बहादर यासि.
१३७१५०० सुभे दिल्ली परगणे अंतरवेदी.
८००१५२५ सुभे इलाबाद ऊर्फ प्रयाग.
६६१३५०० सुभे अयोध्या.
१५९८६५२५
९२००००० नंजनाड कीरीट राजा राजराजे यासि
४२७१००० संस्थानिक.
१६५००० त्र्यंकटागिरीकोट.
१३२५००० काळहस्ती.

१२९६००० नगरी नारायण वर्म.
४२७१०००
२९४५७५२५

जमानशहा अबदाली यास चालवणेचे. १६३०१५०० रुपये
तपशील.
६११६३७५ सुभे मुलतान.
३१५७१२५ सुभे काश्मिरी.
३१६३००० सुभे कांभोज काबूल.
३८६५००० सुभे केदार.
१६३०१५००
चिल्लर
२३७४२५० गुलामशहा शिद्दी यास सुभा ठठ्ठा.
१९३३४२५० शिक यांस सुभे लाहोर.
१०००००००० परतार्य राज्य ज्वालामुखी नेपाळ गोरख वगैरे.
५२६४८३। सांवतवाडी परगणे गोशा श्रीवर्धन हबसी वगैरे.
३२२३४९८३।
एकूण सदर रुपये

ले. ४७६
[१५२]

ता॥ १०-११-१८०९ (?)

॥ श्री ॥

पुर॥ राजश्री बाबा स्वामीचे सेवेशीं. विनंती ऐसीजे. इकडील राजकांतीचे वर्तमान तरि जलचरांचीं पळटणें बंगाल्यांतील व चिनापट्टन लगायेत गुजराथ वगैरे या प्रांतींचे दरोबस्त जमाव पलटनें सुमारी पाऊणशें कमकसर याचा कौसल ठहरून बादबरसाद आश्वीन अखेर तयारी करून हिंदुस्थान प्रांतीं आपल्या मुकाबिलास येतात यांत संदेह नाहीं. जंगी सरंजाम तयार करण्याकरितां या प्रांतीचे महालानिहाय मिळोन येथें साहुकारापासून पन्नास लक्ष रुपये घेतले. वराता सावकार म॥रांस कलकत्याकडे लाऊन दिल्या. पोख्त सरंजाम लेश करविला आहे. याप्रमाणें तांत्राचे अधिकारी यांनीं मसलतीचे घाट बांधून स्वार सरंजाम सुद्धां येत आहेत. तरी आपण श्रीमंत महाराजांस राजकांतीचे भाव सुचवून तयारींत असावें. दुसरे तेथून होडिया नेमावर घाट येथील मुक्काम पावतों माणसांची डाक रवाना जाहली आहे. हालकरे चारशें व कारकून इंग्रेजांनीं नेमून पाठविला आहे. आज पंधरा रोज जाहले. बेटांत आपल्याकडील गृहस्थ आहे त्यांना तथ्य वृत्त सांगितलें त्यावरून

सुचना लिहिण्यांत आली आहे. कारण कीं, सर्वांस आधार तेथील. येथील उमेद तिळमात्र नाहीं. आतां छद्म [छनद ?] करितां परंतु सिद्धीस जाणार नाहीं.

———

ले.४७७ } { ता।१७-२-१८११
[४५०] } { माघ व. ९ श. १७३२

श्री.

(छ. २२ मोहरम इहिदे अशर मयातैन अलफ ११२० फसली माघ वद्य ९ रविवार शके १७३२ प्रमोद तारीख १७ फेब्रुवारी सन १८११ इसवी पो छ. २६ मोहरम सन इहिदे अशर मयातैन व अलफ माघ मास).

श्रीमंत महाराज मातुश्री माईसाहेब साहेबांचे सेवेशीं.

विनंती सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान कृतानेक विज्ञापना ता। छ. ११ मोहरम सन इहिदे अशर मयातैन पावेतों साहेबाचे कृपें करून सुखरूप असो विशेष. राजश्री येशवंतराव होळकर यांचें बोलणें कीं, " माझे प्रकृतीस समाधान नाहीं याजकरितां मजला जेजुरीस येऊन देवदर्शन घ्यावयाचें. देवदर्शनावांचून माझा प्राण जातो; त्यापक्षीं मजला आज्ञा आली असतां जेजुरीस यावयाचें, अथवा आज्ञा न जाली तरी जेजुरीस येऊन देवदर्शनावांचून येथें माझा प्राण जातो, त्यापक्षीं मजला जेजुरीस येणें प्राप्त, मग प्राण जावो अथवा राहो. परंतु मजला जेजुरीस यावयाचें. " म्हणोन होळकराकडील वकील सरकारांत बोलतात. त्यास होळकरास येण्याविषयीं सरकारांतून आज्ञा न जाली तरी जबरदस्तीनें दक्षणेंत यावयाचा इरादा त्यांचा आहे. तेव्हां होळकर यांचे वास्तविक प्रकृतीस ठीक नाहीं. म्हणोन जेजुरीस देवदर्शनाकरितां येणार किंवा देवदर्शनाचे निमित्यानें इकडे जबरदस्तीनें येणार; कोणत्या मतलबाकरितां येतो याचा निश्चय नाहीं. त्यास होळकर यांचें आमचें वांकडे कसें व त्याणें प्रांताची दशा कशी केली; या सविस्तर मजकुराची समक्ष विनंती केलींच आहे. व हा मजकूर जगप्रसिद्धही आहे. यास्तव होळकराचें इकडे येणें जहालें असतां मी पुण्यास रहावें हें मसलतीस येत नाहीं. याजकरितां होळकराचा दक्षणेंत येण्याचा प्रकार दिसला म्हणजे मी विजयदुर्गास जाऊन रहावयाचा बेत केला आहे. होळकर इकडे आलियावर प्रसंग कसा पडतो याचा नियम आज समजत नाहीं. महाराजांची स्वारी सातारियास पेशजी परशरामभाऊ पटवर्धन यांणीं चिरंजीव राजश्री चिमणाजी रघुनाथ यांस यशोदा बाईचे मांडीवर बसवून चिमणाजी माधवराव असे शिक्के व पेशवाईचीं वस्त्रें आणून दिल्हीं; तसेंच यशवंतराव होळकर यांणीं चिरंजीव राजश्री विनायक अमृतराव यास पेशवाईचीं वस्त्रें आणिलीं. पूर्वी असे बखेडे जाले. कारण सातारा जागा नाजूक, बाकी नव्हे. बळकुबळीस रहावयाचे उपयोगीं नाहीं. सबब पूर्वी शिवाजी महाराज यांणीं रायगडासारख्या जागा बसवून दौलती केल्या. प्रसंगाचे दिवसांत साताऱ्यास खांसा स्वारी रहाणें हें माझे व राजश्री सदाशिव माण-

केश्वर यांचे विचारास येत नाहीं. रायगड जागा चांगली मजबूत, कोणी म्हणेल कीं तेथें फौज पाठवून वस्त्रें आणूं किंवा बंडबखेडा करूं, तर होणार नाहीं, असें माझे व मशारनिलेचे विचारांत आलें. याजकरितां साहेबांचे मर्जी मु ब र कें त आल्यास यशवंतराव होळकर दक्षणेंत येऊन कोठें लढाईचा प्रसंग न करितां करारप्रमाणें नर्मदापार माघारा गेल्यास मी विजयदुर्गाहून पुण्यास येईन ते समयीं साहेबांची स्वारी सातारियास जावी. कदाचित् यशवंतराव होळकर लढाईच्या इराद्यावर येऊन बखेडा करूं लागल्यास ते मसलत शेवटास जाय तों रायगडास महाराजांनीं कुटुंबसुद्धां आनंदांत असावें. मसलत शेवटास गेल्यावर मग सातारियास यावें. याचें मनन करून हे मसलत बाहेर कोठें न फोडतां आज्ञोत्तर यावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. ४७८ [१५३] ता. १४.१०.१८११ आश्विन व. १२ श. १७३३

श्री.

श्रीमंत राजश्री आबासाहेब साहेबांचे सेवेशीं—विनंती सेवक मल्हार चिंतामण बोधनी अकबरनीस कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना छ २५ माहे रजमान पावेतों आपले कृपें करून सरकार कामावर हजर असों विशेष. ता॥ वाफगांव येथील आकबार येणेंप्रमाणें श्रुत व्हावी. कलमे.

१ हुजुरींहून नारायणराव हालकारे सरकार आज्ञेवरून श्रीजेजुरीलिंगाचे नवस फेडावयाकरितां आश्वीन शुद्ध ७ पुणें मुक्कामीं येऊन राजश्री बाबाजी बाजीराव मामलेदार ताल्लुके म॥ हे नारायणराव वरोबर जेजोरीस जाऊन तेथें श्रीचा गोंधळ व कुळधर्म व ब्राह्मणभोजन उत्तम प्रकारचें करून देवाची पूजा अर्चा वस्त्रप्रावर्णासह उत्तम प्रकारें केली; व सर्व आश्रित व पाध्ये वाघे मुरळी यांचा सन्मान करून बहुत चांगला समारंभ केला. आसमंतात जेजुरीचे मोठा लौकीक जाहला. या कृत्यास बारा चौदा दिवस कमावीसदार तेथें होते. नंतर नारायणराव श्रीपंढरपुरास गेले व बाबाजी पुण्यास सरकार कामावर हजर आहेत.

१. ता॥ वाफगांव देहे नव येथील इकडील रिवाजाप्रमाणें गांवकरी यानीं कमावीसदार यांजकडे पीक पाणीचे आर्ज्या केल्या आहेत कीं आमची पहाणी पिकाची करून नजरेस आणावें, त्यावरून क॥दार यांनीं कोठें कोठें कारकून पाठविले आहेत व आणखी पाठविण्याची योजना आहे. कलम.

१. नवगांवीं शकून पोत्याच्या चिठ्या केल्या आहेत. नवगांव मिळोन शेंसवाशें रूपयांचा आकार होईलसा दिसतो. कलम.

१. क॥×आले. येथील पाटील कुळकर्णी यांचा व रयतेचा तंटा त्रिंबकराव रामचंद्र यांचे अमलापासून वाढला दिसतो. रयतीस फूस देणार क॥ माराच्या दोन तीन असाम्या

× कमावीसदार

येक गोपाळराव बारेकर व एक आनंदराव शेटे व एक नारायणराव प॥ भुजबळ हे त्रिवर्ग आणीक एक दोन असे मिळोन असे रयतेस बिछडून कुभांड गांवांत मोठें मांडलें आहे. रात्रंदिवस कचेरी दरबार साहेब लोकांपर्यंत अर्ज्या रयतीकडून देऊन पुढें बोलण्यास आपण होऊन तकरार कुभांड करीत आहेत. पाटील कुळकर्णी याजकडे विशेष दोष आहे असें नाहीं; परंतु कुळकर्णी यानें लिहूं नये, गांवांत पाटलांनीं कामांत येऊं नये, असे नाना प्रकारचे तकरारी करून मोठा बखेडा मांडला आहे. अशा खटल्यानें क॥दार यास रात्रंदिवस मोठी दगदग पडून वसुलाशींही हरकत गु॥ ही अखेरसालपर्यंत केली असें दिसोन आलें. यंदांही तसाच प्रकार दिसण्यांत येतो. याविशीं साहेबांकडे यादबिद देऊन बंदोबस्त करण्याचे तजविजींत अक्षर्या आहेत. परंतु बारेकर वगैरे तीन असाम्या यांचा बंदोबस्त इंग्रज सरकारांतून अगर आपले सरकारांतून जाल्या वांचून गांवचा बखेडा मोडत नाहीं असें दिसतें ही मोठी जिकीर आहे. कलम.

सदरहू कलमें लिहिल्याप्रमाणें मनन होऊन उत्तरास आज्ञा जाहली पाहिजे. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. ४७९
[६३]

ता॥ १५-७—१८१२
आषाढ शु. ७ श. १७३४

॥ श्री म्हाळसाकांत ॥

राजश्री रावजी गोविंद गोसावी यांसि—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—स्ने॥ मल्हारराव होळकर दंडवत विनंति उपरी तुम्ही ज्येष्ठ वद्य ६ व एकादशीचीं पत्रें पाठविलीं तीं पावून लेखनार्थ अवगत जाहला. येथें पावल्यावर सरकार पत्रें उभयतां बाबांस दाखऊन आज्ञेचे भाव सर्व दर्शविले. त्यांनींही बोलण्याचा क्रम चालू केला आहे. धन्याचा लोभ कारभारी यांचे मनःपूर्वक जपणें हें बारीकपणें ध्यानीं आल्यावरून लेखन केलें आहे. राजश्री बाळाजी लक्ष्मण नि॥ विंचूरकर यांची भेट करविली. त्याचेही बोलण्यांत उचित तेंच निदर्शनास आलें. पुढें घडल्याचें लेखन होईल म्हणोन लि॥ ऐशियासि तुम्ही सरकार पत्रें व आज्ञेअन्वयें बोलून क्रम चालू करविला हें नीटच. यावर दिनावधीवर न पडतां आरंभिला विचार सत्वर बनून ये तें करवणें. खावंदाचा लोभ दिवसेंदिवस दिसण्यांत येईल तसें सेवाही करण्याची उमेद, इकडे हे भाव कारभारी व बाळाजी लक्ष्मण यांस दर्शवून त्यांचें जपणें मन ज्या दौलतीविशीं आहे त्याची वृद्धी घडे तें करणें. करीम पेंढारी सरकार कैदेंत त्याचें बोलणें लाऊन सुटका होती ह्या आवया राजश्री खंडो महादेव व सखाराम जगजीवन यांनीं ऐकून तेथील मर्जीचे भाव विस्तारें लेहून पाठविले, त्यास येथें होणें तें दूरदेशीने तेथील सलेनेंच होणें तें होईल. तुम्ही बोलण्याचा क्रम.

श्री
म्हाळसाकांत चरणीं
तत्पर येशवंतराव सुत
मल्हारराव होळकर

चालता जाला ते पक्षीं दररोज होईल तसें लेहून वरचेवर कळवीत जाणें. आळस न करणें रा॥ छा॥ ५ रजब सु॥ सल्लास अशर मया तैन व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

मोर्तब
सूद.

ले. ४८० [९३] | आषाढ व. ३ श. १७३४ ता॥ २७-७-१८१२

॥ श्री ॥

राजश्री रावजी गोविंद गोसावी यांसि—

छ अखंडित लक्ष्मी अलकृत राजमान्य-स्नेा॥ मल्हार होळकर दंडवत विनंति उपरि तुम्ही राजश्री खंडो माहादेव व सखाराम जगजीवन सह श्रीपंढरपुराकडे छ ५ रोजीं गेल्याचें वर्तमान राजश्री माधवराव येशवंत यांचे लिहिल्यावरून समजण्यांत आलें. तेथें गेल्यावर श्रीचे दर्शनाचा गुंता उर्कोन सरकार प्रकर्णी बोलण्याचा प्रसंग पडून घाटावर आणिलेंच असेल. कारभारी यांजकडून प्रतिकूलता कोणतीही नाहीं. येक दोस्ताचे रुकाराची गुंता तेही बोलून चालून पल्यावर आणिलेंच * असेल. सारांश प्रसंगीं कोणेही विशींची न्यूनता न पडतां आरंभिला कार [?] अविलंबें शेवटास जाय तें करणें. दुसरें इंग्रजांनीं काम काजें उगऊन घेण्याची बहुत निकड लाविली होती, त्यांत पन्हाळेकरांची कुमक करून मसलत वाढवावी हा इरादा दिसण्यांत येतो. याचें बारीकपणें वास्तविक असेल तसें लेहून सविस्तरें कळविणें. रा॥ छ १७ रजब सुा॥ सल्लास अशर मयातैन व अलफ बहुत काय लिहिणें.

ले. ४८१ [७०] | शके १७३४ सन १८१२

॥ श्री ॥

राजश्री सदाशिवपंत भाऊ गोसावी यांसि—

छ सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य स्नेा॥ मल्हारराव होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहित असावें. विशेष—इकडील सरदारींत खर्चाची वोढ. महालांत पेशजी प्रां॥ उत्पन्नास जागा नाहीं. फौज बाहेर मोहिमीस रहात गेली. सध्यां तो प्रकार सर्व आपले ध्यानांत. तीर्थरूप कैलासवासी बाबासाहेबांनीं पदरचे माणश सर्व लोभांत ठेऊन फौजेची हुशारी ठेविली तो ओघ यथास्थित चालून सरकार चाकरी घडावी याहून दुसरें लक्ष नाहीं. राजश्री गणपतराव नारायण येथें कामाकाजांत व

---

* येथें शिक्का बाजूवर आहे.

राजश्री बाळाजी लक्ष्मण देशींहून आले; त्यांचें म्हणणें श्रीमंत स्वामींचे अभयोत्तरें व भाऊंचे लोभानें सर्व विचार घडतील. येविषयींच माार राजश्री खंडो महादेव व सखाराम जगज्जीवन यांजला लिहिण्यांत आला आहे. उभयतां कलवितील त्याप्रों श्रीमंतांस विनंती होऊन क्रमें यथापूर्व प्रवाहास येऊन वडिलांचा लौकिक राहणें आपल्याकडे आहे.

ले. ४८२ [१५५] } { वैशाख व. ७ शके १७३५ ता। २२-५-१८१३

॥ श्री ॥

रा। विसाजी देवराव गोा। यासीं—

सुरुसन सलास आशर मयातैन व अलफ. शेखचांद शिलेदार यास सरकारांतून बक्षीस रुपये ५०० पांचशें पाठविले असत, तरि त्यास देऊन पावती घेऊन हुजूर पाठवून देणें. जाणिजे. छ २१ जाावल असल पत्र बाळाजीपंत कारकून निा। त्रिंबकजी डेंगळे यांजकडे देऊन डाके बरोबर लष्करांत रवाना केलें. छ २३ जाावल मुा। सलास अशर मयातैन मुा। नाशिक.

ले. ४८३ [१५४] } { वैशाख व. १२ श. १७३५ ता। २७-५ १८१३

॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामींचे सेवेशीं—

विनंती सेवक लक्ष्मण बल्लाळ साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ ता। छ २६ रा। वल मुक्काम वीरगांव पेा। आकोलें यथास्थित असे. विज्ञापना पेा। दिंडोरीकडे बातमीस स्वार पाठविले होते, व रा। फत्तेसिंग काळे याजकडे जासूद पाठविले होते. दोहोंकडून तहकीक वर्तमान आलें कीं, जयराम मोरेश्वर सुटले. खांसा कामास आला. येविशीं फत्तेसिंग काळे यांनीं मजला पत्र लिहिलें त्याची नकल सेवेशीं पाठविली असे. त्याजवरून सेवेशीं विदित होईल. मातुश्री उमाबाईकडील वर्तमान तरि नाशिकावरि आहेत. परंतु गंगातरीं मौजे निफाड पेा। चांदवड येथें मीर महमद बाकर नाशिकचा अमीन हजार बाराशें फौज सुद्धां अकस्मात् सेनापतीचें कूच होऊन पुढें जाणार. येका दो दिवशीं जातील. सेवेशीं कळावें म्हणून लिहिलें असे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

ले. ४८४ [६४] | आश्विन शु. ६ श. १७३६ ता. १९-१०-१८१४

॥ श्री म्हाळसाकांत ॥

राजश्री रावजी गोविंद गोसावी यांसि—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ मल्हारराव होळकर दंडवत विनंती उपरी. तुम्हीं भाद्रपद व॥ ५ चें पत्र पाठविलें तें पाऊन लेखनार्थ अवगत जाहला. फणशा मंदाणकर निंबोप्यास पावून उत्तर आलें. चांदवडचें पत्र आलें नाहीं.आल्यावर लेखन करीन. श्रीमंतांची स्वारी भीमातीरीं कपिला पष्टी करून येणार. अजम अलफिस्टन साहेबांस व खुशरुदीन मोदी व त्र्यंबकजी डेंगळे यांस पत्रें सरकारचीं येतात तीं योग्यते प्रमाणें येत असावीं म्हणोन राजश्री खंडोपंत बाबांनीं साहेबांस लिहिलें आहे. त्या अन्वयें पत्रें येप्यास आज्ञा व्हावी म्हणोन लिहिलें. ऐशियाशि फणशा व मूल आज पावेतों चांदवडीं पोंहोचऊन तुम्हाकडे पत्रें आलींच असतील. त्यांजला तेथें ठेवणें. सांप्रतचे प्रसंगास अप्रशस्त जाणोन नेमाडी प्रांतीं आणावयाचें ठरून राजश्री परशराम होळकर यांजपाशीं पावते करण्याविशीं पत्र राजश्री रामजी आगरवाले व भिकाजी गोमाजी यांस पाठविलीं त्याप्रमाणें ते करतील.याचा तपशील राजश्री खंडो महादेव यांचे पत्रीं लिहिला आहे. तेथें प्रसंगानुरूप बोलावयाचें तें बोलून इकडेही कळविणें. आज पावेतों श्रीमंतांची स्वारी पर्वाचें स्नान करून पुण्यास आलीच असेल. पुढें श्री स्वामिस×जाण्याचें ठरेल तैसें कळविणें. साहेब मोदीव डेंगळे यांस पत्रें यावर मशारनिलेचे लिहिल्या अन्वयेंच लिहिण्यांत येत जातील र॥ छ ५ जिलकाद सु॥ खमस अशर मयातैन व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

श्री
म्हाळसाकांत चरणीं तत्पर
येशवंतराव सुत मल्हारराव
होळकर.

मोर्तब
सूद

ले. ४८५ [१५७] | ता. १४-१२-१८१४ मार्गशीर्ष शु. ३ श. १७३६

श्री

पै॥ छ १८ मोहरम सन खम्मस अशर

साहेब साहेबांचे सेवेशीं. आज्ञांकित बयाजी नाईक विज्ञापना. मेजर इलफिस्टन वकील दिम्मत इंग्रज कलकत्तेकर यांजकडील दिनचर्येची बातमी—

१. छ १ मोहरमचें वर्तमान–मशारनिले प्रातःकाळीं गणेशखिंडी पावेतो जाऊन

× कार्तिकस्वामीस. § बयाजी नाइक—हा एक हुजुऱ्या असून हेराचे काम त्याच्याकडे होतें.

सहल करून आले. गोपाळ खंडेराव रास्ते यांजकडील कारकून प्रातःकाळीं मशारनिलेशीं बोलून गेले. जिऊबाई भानूकडील कारकून मेस्त्र रसल याशीं बोलून गेले. गंगाधर शास्त्री यांजकडील जासूद एक लखोटा घेऊन आला तो मुंबईचे डांकेवर रवाना करावयास मशारनिले जवळ पावता करून गेला. मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व वऱ्हाणपूरचीं पत्रें डांके बरोबर आलीं. जाब रा॥ जाले.

१. छ २ मोहरमचे वर्तमान—मशारनिले व कपतान कलोस वगैरे पांच असामी प्रातःकाळीं गारपीरचे लष्करांत जाऊन तेथून घोरपडी पावेतों सहल करून आले. खुसरखजी मोधीं येऊन मशारनिलेशीं दोन घटका बोलणें केलें. कप्तान कलोस व मेस्त्र रसल व बापूजी गोपाळ साने बोलण्यांत होते. नंतर निघोन आदितराम साहुकार यांचे येथें जाऊन घरास गेले करवीरकारांकडील कारकून मशारनिलेशीं बोलून गेले. गंगाधर शास्त्री यांजकडील आगशीकीरस्ताई मेस्त्र रसल याशीं बोलून गेला. पांडोबा नाईक पिपडी करवीरकराकडील पत्र घेऊन आले. ती थैली मशारनिलेस पावती करून दोन घटका बोलून गेले. जीऊबाई भानू कडील कारकून व प्रभाकरपंत जोशी मोधींशीं बोलून गेले. मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व वऱ्हाणपूरचीं पत्रें डांके बरोबर आलीं. जाब रा॥ जाले. शीरूरनजीक लष्करचे छावणीचे गर्दनवाईस पेंढारी येऊन उपद्रव केला. म्हणोन छावणीतील टोपकारांकडून डांके बरोबर बारा घटका रात्रीं मशारनिलेस पत्र आलें. एक टोपकर व दहा शिपाई छावणीनजीक जखमी जाले, अशी बातमी आहे. हैदराबादचे डांकेस इंग्रजाकडील जासूद आहेत त्यांस मौजे चिंचोली येथील टप्यावरील जासूद डांकेचीं पत्रें घेऊन येत होता, त्याची पेंढाऱ्यांची गांठ पडून पेंढाऱ्यांनीं भाला मारिला. जासूद जखमी झाला. म्हणोन मशारनिले कडे बातमी आली. कप्तान फोट मुंबइस गेले होते ते बोर घाटावर खंडाळ्याचे मुक्कामीं आले, म्हणोन दापोडीचे छावणींत बातमी आली. त्याजवरून छावणीतील टोपकरानीं लौकर येण्याविशीं पत्र पाठवून डांक बसावयास घोडे रवाना केले.

२

दोन रोजां वर्तमान निवेदन जालें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. ४८६ [१४९] } { मार्गशीर्ष शु. १२ श. १७३६ ता. २४-१२-१८१४

श्री

साहेबाचे सेवेशीं आज्ञांकित बयाजी नाईक, विज्ञापना, मेस्तर एलफिनइष्टेन वकील दिम्मत इंग्रज कलकत्तेकर यांजकडील दिनचर्येची बातमी.

१. छ १० मोहरमचें वर्तमान. मशारनिले प्रातःकाळीं दापोडी पावेतो जाऊन सहल करून आले. अनुमिया हैदराबादकर नारायणजी डांकबाले याशीं बोलून गेले. मुंबई व

हैदराबाद व श्रीरंगपट्टण व ब्रह्माणपुरचीं पत्रें डांके बरोबर आलीं. जबाब रा जाले. रिकाड कोशलदार व कर्णेल ग्रांट मुंबईहून वंगल्यास आले. सात मुक्काम केले होते. वेहरास येऊन देऊळ वगैरे जागा पाहून, कारल्यास मुक्काम करून, मागतीं मुंबईस गेले. सरकारचा जासूद व माारनिले कडील खिजमतगार तरतुदी करितां माारनिलेनीं पाठविले होते ते माघारे आले.

१. छ ११ मोहरमचें वर्तमान. बापूजी गणेश गोखले यांस माारनिलेनीं पत्र लिहून, थैली तयार करून खाना करावयास त्यांजकडील सखोपंत टेंभे यांस बोलावून आणोन त्यांचे हवालीं केलीं. सखोपंतांनीं एक घटका बोलणें करून गेले. बापूजी गोपाळ साने येऊन कप्तान कलोस यांशीं बोलून गेले. करवीरकराकडील कारकून मेस्त्र रसल यांशीं बोलून गेले. प्रभाकरपंत जोशी मोधीशीं बोलून गेले. आंगरे यांजकडील बापूभट सोमण मेस्त्र रसल यांशीं बोलून गेले. गंगाधर शास्त्री यांणीं जासुदाबरोबर लखोटा पाठविला तो मुंबईचे डांकेवर खाना करावयास माारनिले जवळ पावता करून गेला. मुंबईचे डांकेवर व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व ब्रह्माणपूरचीं पत्रें आलीं. जाब रा॥ जाले. दोन रोजां वर्तमान निवेदन जालें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. ४८७ [१५०] ता. २२-१२-१८१४ मार्गशीर्ष शु. १० श. १७३६

श्री.

साहेब साहेबांचे सेवेशीं आज्ञांकित बयाजी *नाईक विज्ञापना, मेस्त्र इलफिनइस्टोन वर्काल दिम्मत इंग्रज कलकत्तेकर यांजकडील दिनचर्येची बातमी—

१. छ. ७ मोहरमचें वर्तमान. मशारनिले प्रातःकाळीं दापोडी पावेतों जाऊन सहल करून आले. गोपाळराव खंडेराव रास्ते यांजकडील कारकून व बापूजी गोपाळ साने माार निलेशीं वेगलालें बोलून गेले. करवीरकर यांजकडील कारकून मेस्त्र रसल यांशीं बोलून गेले. प्रभाकर पंत जोशी मोधीशीं बोलून गेले. मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व ब्रह्माणपूरचीं पत्रें डांकें बरोबर आलीं. जाब रा॥ जाले.

१. छ ८ मोहरमचें वर्तमान. करवीरकरांकडील वासुदेवभट गुरुजी व तीन असामी कारकून ऐसे येऊन मा॥निलेशीं बोलणें करून गेले. गंगाधर शास्त्री व बापू भैराळ मा॥निलेशीं दोन घटका बोलणें करून सायंकाळीं गेले. चिंतामणराव पटवर्धन व भिरजकर व तासगांवकर व कुरुंदवाडकर यांस मा॥निलेनीं पत्र लिहून चार थैल्या तयार करून त्यांजकडील कारकून बोलावून आणोन चौघांचे हवालीं चार थैल्या खाना करावयास केल्या. त्या घेऊन चौघांनीं कप्तान कलोस यांशीं बोलणें करून गेले. बापूजी गोपाळ साने मशारनिलेशीं व मोधी यांशीं बोलून गेले. मुंबई, हैदराबाद व श्रीरंगपट्टण व ब्रह्माणपूरचीं पत्रें डांके बरोबर आलीं. जाब खाना केले. गारपिरचे लष्करांतील शिपाई व गंगाधर शास्त्री यांज-

---

* बयाजी नाईक हुजऱ्या हेराचें काम करीत होता.

कडील माणसें मोहरमची फर्कीरी मागावयास आले. सबब मशारनिलेनीं लष्करवाले यांस रुपये दहा व शास्त्री यांजकडील माणसांस पांच एकूण पंधरा रुपये दिल्हे.

१. छ ९ मोहरमचें वर्तमान. निपाणीकर यांस मशारनिलेनीं पत्र लिहून थैली करून रवाना करावयास बापूजी गोपाळ साने यांचे हवालीं केली. ती घेऊन साने गेले. मशारनिले व कप्तान कलोस व मेजर रसल व कप्तान पाटेंजर व दुसरे व जी [खुसरुजी ?] मोधी ऐसे चार घटका दिवस राहतां राजश्री सदाशिवपंत* भाऊ यांजकडे नाना फडणीसांचे बाड्यांत येऊन भाऊंशीं बोलणें केलें. श्रीमंत महाराज साहेबाचे सेवेशीं मशारनिलेनीं पत्र बापू साने यांचे हातें लिहून बरावर थैली करून आणली. ती भाऊंचे हवालीं करून दोन घटका रात्रीं गेले. मोधी मागें राहून एक घटका बोलून गेले. आनंदराव मल्हार व धोंडो मल्हार बोलण्यांत होते. कप्तान फोर्ट+ श्रीरंगपट्टण दोन वेळां येऊन मशारनिलेशीं बोलणें करून, खाना खाऊन दोन प्रहर रात्रीं गेले. आंगरे यांजकडील कारकून प्रातःकाळीं मशारनिलेशीं बोलून गेले. मुंबई, हैदराबाद व बन्हाणपूरचीं पत्रें डांके बरोबर आलीं. जाब रा जाले. भिकाऱ्यास चार रुपयांचा खुर्दा मशारनिलेनीं खैरात केला.

३

तीन रोजां वर्तमान निवेदन जालें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले. ४८८ [४४१] } { सन १८१७ पूर्वी शके १७३९

श्रीनाथ स॥

राजश्री सदाशिव भाऊ गोसावी यांसि.

छ सकळ गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ दौलतराव शिंदे दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष कैलासवासी श्रीमंत नानासाहेब व दादासाहेब यांणीं सरकारांतून कैलासवासी तीं॥ जयापा शिंदे दत्ताजी शिंदे यांस समागमें दिवाणगिरीचे व फडणविशीचे कामावर रामचंद्र मल्हार यांस दिल्हे होतें, त्याचें व वडिलांचें न बने, तेव्हां ते उठोन पुण्यास गेले. नंतर राजश्री रामराव अपाजी दाभुळकर यांचे आजे रामाजी अनंत व लक्ष्मण केशव वैद्य यांजला उभयतां श्रीमंत यांणीं सनदापत्रें देऊन रवाना केलें. श्रीमंतांचे कृपे करून वडिलांचे चाकरीचा उत्कर्षसा दिसोन आला. पादशाहा यांचीही प्रसन्नता जाली. पुढलि हुजूर आले

---

* सदाशिवपंत भाऊ माणकेश्वर. टेभुर्णीचे कुळकर्णी. आरंभी हरदासाचा धंदा करीत. पुढें गोविंदराव पिंगळे यांचे मार्फत हैदराबादेस होते.

+ क. फोर्ड हा मराठी फौज मोडून इंग्रजी पलटण बाजीराव साहेबांनीं तयार केली होती त्याजवरील मुख्य. यालाच पेशव्यांचे बखरींत पोट साहेब म्हटलें आहे.

ते समयीं रामाजी अनंत यांस पादशह यांणीं सरंजाम इनाम करार करून सोनई बाम्हणी च्या सनदा पन्नास हजारांच्या करून दिल्या, त्यास सरकारांत भेटीच्या प्रसंगीं रामाजी अनंत यांणीं श्रीमंत यांचे चरणीं अर्पण केल्या. तेव्हा त्याजपैकीं श्रीमंत मातोश्री बायांचे नांवे तीस हजारांचा सरंजाम ठेवून बाकी वीस हजारांचा सरंजाम रामाजी अनंत याजला कृपावंत होऊन मुबदला कसबे अकूळनेर पो पांडे पेडगांव व मौजे नवगांव होऊन पो आंबाड व मौजे खेडलें परमानंदाचें पे॥ नेवासे येणे प्रमाणें तीन गांव मशार निल्हेस धर्मदाय देऊन पुत्रपौत्रादि वंशपरंपरा सनदा करून देऊन पुष्टीकरणास्तव राजपत्रेंही दिलीं. व लक्ष्मण केशव यांजला मौजे टेंभरी प्रांत कल्याण हा गांव दिल्हा, याच्याही सनदापत्रें करून देविल्या आहेत. त्यास सदर्हू चार गाव निर्वेध आजपर्यंत चालत आहेत. सांप्रत सरकारांतून गांव जप्ती जाली आहे, म्हणोन ऐकिलें. त्यास रामजी अनंत पाणिपतचे स्वारीस कामास आले व अपाजी राम हेही सरकार चाकरीचे उपयोगी पडून मारवाडचे स्वारीस कामास आले. आलीकडे गोपाळ जनार्दन वैद्य हेही जयपूरचे लढाईत जुरत करून कामास आले. रामराव अपाजी व जनार्दन लक्ष्मण सरकार चाकरीचे जागीं लक्ष ठेवून राहत आहेत. सांप्रतकाळचा प्रकार दंग्यामुळे वगैरे खर्चाची वगैरे अडचण पडून देण्याचे पेंचांत आहेत. याचा उलगडा वोढीस्तव होऊन न आला. प्रपंचास वगैरेस आधार सरंजामाचाच आहे. हें श्रीमंत स्वामींचे ध्यानांत येऊन पूर्वीपासून अभिमानपुरःसर सांभळ होत आला. त्यापक्षीं आतांही श्रीमंत स्वामी यांणीं कृपावंत होऊन चार गांवच्या सोडचिठ्या जप्तीच्या मोकळकोविषयीं देऊन गांव चालविले पाहिजेत. श्रीमंतांस विज्ञप्ति लिहिण्यांत येऊन हें पत्र आपणांस लिहिलें आहे. त्यास आपण येविशीं श्रीमंतांस विनंती करून रामराव आपाजी तिकडे आले आहेत,त्यांजवर श्रीमंत प्रसन्न होऊन गांवच्या मोकळिकेविशीं सोडचिठ्या देऊन इकडे रवनगी होय तें करावें. रवाना छ. १९ जमादिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हें विनंती. मौर्तब सुद †

[सदाशिव माणकेश्वर दुसरा बाजीरावाचे कारभारावर सन १८०६ ते १८१७ पर्यंत होता त्या वेळचे हें पत्र आहे.]

ले ४८९] [४९२]

माघ शु. ६ श. १७३९ ता ११-२-१८१८

श्री.

मेस्तक संवत्सर नांवें व शालिवाहन शक व यवनी फसली दिल्लीचा व सन अर्बा व शिवाजी राजे भोसले छत्रपती यांचा शक सुरूसन समान अशरीन मयातैन व अलफ.

---

† हा व पुढें येणारे आणखी २ म्हणजे जुने ले. ४३९ व ४४० असे तीन कागद मुरलीधर एकनाथ पळशीकर यांजकडून मिळाले.

[१] अबदुल्लाखान जावलीस शिवाजीराजे यांणीं मारिला.

आज संवत्सर चैत्र शुद्ध १ दे मृगापासून मृगापासून जेष्ठ शुद्ध १३ पासून
शार्वरीनाम पासून शक फसली अबीं शिवाजीराजे यांचा
३४. १५८२. १०७०. १०६१. ०.
सन इहिदे सितैन अल्फ.

[२] शास्ताखानाचा सुभा येऊन चाकण किल्ला घेतला,
प्लवनाम ३५. १५८३, १०७१. १०३२. ०. सन
इसने सितेन अल्फ.

[३] त्यानंतर भाद्रपदमासीं खानाचा पुत्र शिवाजीराजे यांनीं आंगठा कापून मारिला. व विठ्ठल मोरदेव देशपांडे परगणा पुणें कार्तिक वद्य ४ मेने [ले ?] व सुभा पुरंदर या खालीं आला. त्याचा तळ कोंडितावर आला.
क्रोधीनाम ३८. १५८६. १०७४. १०६५. ०.
सन खमस सितेन अल्फ.

[४] थोरले चिंतामण देव पौष वद्य ४ समाप्त झाले.
कीलकनाम ४२. १५९०. १०७८. १०६९. ०.
सन तिसा सितेन अल्फ.

[५] शिवाजीराजे सिंहासनारूढ जाहले ज्येष्ठ शुद्ध १३ जाहले शक. आनंद-
नाम संवत्सरे ४८. १५९६. १०८४. १०७५. १.
खमस सबेन अल्फ.

[६] शिवाजी राजे शांत चैत्र शुद्ध १५ जाहले. मग संभाजी राजे सिंहासनारूढ झाले. श्रावण शुद्ध १५.
रौद्रनाम ५४. १६०२. १०९०. १०८१. ७.
इहिदे समानीन अल्फ.

[७] रामदासस्वामीचा अवतार समाप्त जाहला.
दुर्मतिनाम ५५. १६०३. १०९१. १०८२. ८.
इसने समानीन अल्फ.

[८] शाहूराजे यांचा जन्म.
दुंदुभिनाम ५६. १६०४. १०९२. १०८३. ९.
सलास समानीन अल्फ.

[९] अवरंगजेब पातशहा यांणीं विजापूरची पातशाई घेतली.
रक्ताक्षीनाम ५८. १६०६. १०९४. १०८५. १०.
खमस समानीन अल्फ.

[१०] भागानगरची पातशाही अवरंगजेब यांणीं घेतली. क्षयनाम
संवत्सर ६०. १६०८. १०९६. १०८७. १३.
सबां समानीन अलफ.

[११] संभाजीराजे फाल्गुन वद्य तुळापुरीं अवरंगजेब पातशहा याचे लष्करांत शांत जाहले.
विभवनाम २. १६१०. १०९८. १०८९. १५.
तिसां समानीन अलफ.

[१२] राजाराम राज्यारूढ झाले. राजाराम चंदीस होते म्हणोन जालपुगारखान यानें जाऊन वेढा घातला. शुक्लनाम
संवत्सर ३. १६११. १०९९. १०९०. १६.
तिसैन अलफ.

[१३] संताजी घोरपडे सेनापती यास राधाबाईनें म्हैसवाडीस मारला.
ईश्वरनाम ११. १६१९. ११०७. १०९८ २४.
सुरुसन् समान तिसैन अलफ.

[१४] राजाराम फाल्गुन वद्य ९ सिंहगडीं शांत झाले.
प्रमाथीनाम १३. १६२१ ११०९. ११००. २६.
सु।। मया व अलफ.

[१५] धरणीधर महाराज देव यांचा जन्म श्रावणमासीं जहाला.
सुभानुनाम १७. १६२५. १११३. ११०४. ३०.
सु।। अर्बा मया व अलफ.

[१६] अवरंगजेब पातशहा माघ वद्य ४ नगरी शांत झाले. अमरसिंग स ला ज चे द डा गी चा पुत्र किंवा पुतण्या याचे वेळेस रंभाजी निंबाळकर याणें पुणें लुटलें.
व्ययनाम २०. १६२८. १११६. ११०७. ३३.
सु।। सबा मया व अलफ.

[१७] शाहूराजे राज्यारूढ झाले. बहादूरशाहा पातशाई करूं लागले. बहादूरशा व अजमशा यांचें युद्ध झालें. अजमशाहा पडिले. रामसिंग बंड्या याचें कबंध उठलें. तेच वर्षी शाहूराजे मोंगलाईतून दक्षिणेस आले. खेडावर ताराबाईचे फौजेची लढाई झाली. फत्ते जाहली.
सर्वजित्नाम २१. १६२९. १११७. ११०८. ३४.
सन समान मया व अलफ.

[१८] बहादूरशा पातशा भागानगरास जाऊन कामबक्षास मारून पातशाई घेतली.
सर्वधारीनाम २२. १६३०. १११८. ११०९. ३५.
सु।। तिसां मया व अलफ.

[१९] त्रिंबकजी ढमढेरे यांणीं पुणें लुटून आपलें ठाणें फालगुनमासीं बसविलें.

विकृतीनाम २४. १६३२. ११२०. १११९. ३७.

सु॥ इहिदे अशर मया व अलफ.

[२०] रंभाजी निंबाळकर यांणीं त्रिंबकजी ढमेढेरे यांचें ठाणें उठवून बाजी कदम फौजदार ठेविला. त्याणें ७ वर्षें अमल केला.

खरनाम २५. १६३३. ११२१. १११२. ३८.

सु॥ इसन्ने अशर मया व अलफ.

[२१] बाळाजीपंत यांस पेशवाई जाहली. बहिरोपंत पिंगळे यांची काढून दिली

विजयनाम २७. १६३५. ११२३. १११४. ४०

सु॥ आर्बा अशर मया व अलफ.

[२२] बाळाजी विश्वनाथ प्रधान यांणीं सय्यदाची फौज आणून हिंगणगांव घेतलें, दमाजी थोरात धरिला, आणि सय्यदाबरोबर दिल्लीस गेले. भिवरे अलीकडे स्वराज्याचा तह सैदानीं केला. बाजी कदम याचें ठाणें पुणियांत होतें तें उठवून पेशवे यांणीं आपला अमल बसविला. अंबाजी त्रिंबक पुरंदरे यांस अमल सांगितला. मुलुखास कौल देऊन वसाहत केली.

विलंबीनाम ३२. १६४०. ११२८. १११९. ४५.

सन तिसा अशर मया व अलफ.

[२३] श्री नारायणदेव भाद्रपद शुद्ध ७ शांत झाले.

विकारीनाम ३३. १६४१. ११२९. ११२०. ४६.

सन अशरीन मया व अलफ.

[२४] बाळाजी विश्वनाथ सासवडास चैत्र शुद्ध ७ शांत झाले. त्यांचा पुत्र बाजीराव यास वैशाखमासी पेशव्याचीं वस्त्रें जाहलीं.

शार्वरीनाम ३४. १६४२. ११३०. ११२१. ४७.

सन इहिदे अशरीन् मया व अलफ.

[२५] बाजीराव प्रधान यासि बाळाजी बाजीराव पुत्र मार्गशीर्षमासीं लोहगडीं जन्मले.

प्लवनाम ३५. १६४३. ११३१. ११२२. ५८

सन इसन्ने अशरीन मया व अलफ.

[२६] नारायण गोसावी तुकोबाचे पुत्र श्रावण शुद्ध ७ मृत्यु पावले.

शुभकृत् ३७. १६४५. ११३३. ११२४. ५०

सन आर्बा अशरीन मया व अलफ.

[२७] ताराबाईचे पुत्र शिवाजीराजे चैत्र शुद्ध २ शांत झाले.

पराभवनाम ४०. १६४८. ११३६. ११२७. ५३.

सन सबा अशरीन् मया व अलफ.

[२८] धाकटे संभाजी यांणीं निजाम उल्मुल्ख यांसि पुण्यास आणून सल्ला बिघडला. बाजीराव यांणीं अवरंगाबादेभोंवतीं धामधूम करून पैठणानजीक युद्ध झालें. बाजीराव यांची फत्ते झाली. निजाम उल्मुल्ख याणें सल्ला केला. संभाजी राजे दक्षिणेस येऊन आपले स्थळीं कोल्हापुरीं राहिले.

प्लवंगनाम ४१. १६४९. ११३७, ११२८. ५४.

सन समान अशरीन् मया व अलफ.

[२९] राजश्री सदाशीव चिमणाजी याचा जन्म श्रावण शुद्ध ४ झाला.

साधारणनाम ४४. १६५२. ११४०. ११३१. ५७.

सु॥ इहिदे सल्लासीन मया अलफ.

[३०] सरकारचे वाड्यापाशीं प्राचीन गांवकुसूं होतें तें काढून चिमाजी आप्पा यांनीं पेठ मोहीयाहाबादीची जमीन घेऊन मदार वेसीपासून मावळत वेसीचे सुमारें घेतली.

पिंगलनाम ५१. १६५९. ११४७. ११३८. ६४.

सन समान सलासीन मया व अलफ.

[३१] श्रीमंत दादासाहेब यांचा व्रतबंध माघ शु. २ झाला.

सिद्धार्थीनाम ५३. १६६१. ११४९. ११४०. ६६.

सन आर्बैन मया व अलफ.

[३२] बाजीराव बल्लाळ प्रधान मुक्काम काकडे प्रांत रावेर रेवातीरीं वैशाख शुद्ध १३ स शांत झाले. त्यांचे पुत्र बाळाजी बाजीराव यांसि पेशवाई झाली. त्याजवर त्यांचे चुलते चिमाजीअप्पा पौष शुद्ध ११ स वारले.

रौद्रनाम ५४. १६६२. ११५१. ११४१. ६७.

सन इहिदे आर्बैन मया व अलफ.

[३३] श्रीमंत विश्वासराव बल्लाळ यांचा जन्म श्रावण शुद्ध २ झाला.

दुंदुभिनाम ५६. १६६४. ११५२. ११४३. ६९.

सन सल्लास आर्बैन मया व अलफ.

[३४] श्रीमंत दादासाहेब यांचें लग्न वैशाख शुद्ध ३ झालें. श्रीमंत माधवराव यांचा जन्म वद्य ५ स झाला.

रक्ताक्षीनाम ५८. १६६६. ११५४. ११४५. ७१.

सन खमस आर्बैन मया व अलफ.

[३५ श्रीमंत राव परशराम प्रतिनिधि शांत झाले. स्त्रीनीं सहगमन केलें. मार्गशीर्ष शुद्ध ८ मुक्काम सातारा.

क्षयनाम ६०. १६६८. ११५६. ११४७. ७३.

सन सबां आर्बैन मया व अलफ.

[३६] निजाम उल्मुल्ख बऱ्हाणपुरीं शांत झाले.

विभवनाम २. १६७०. ११५८. ११४९. ७५.

सन तिसां अर्बैन मया व अल्फ.

[३७] शाहूराजे मार्गशीर्ष वद्य ३ शांत झाले. पुढें शुद्ध ८ स धाकटे शिवाजी यांचे पुत्र ताराबाईचे नातू राजाराम राज्यारूढ झाले.

शुक्लनाम ३. १६७१. ११५९. ११५०. ७६.

सन खमसेन मया व अल्फ.

[३८] निजाम उल्मुल्ख यांचे पुत्र नाजरजंग फुलबारीस वारले. ते सालीं श्रीमंत भागानगरास स्वारीस गेले. मागें दमाजी गायकवाड सातारियास जावयाकरितां आले. सबब पुणें पळालें.

प्रमोदनाम ४. १६७२. ११६०. ११५१. ७७.

सु॥ इहिदे खमसेन मय्या व अल्फ.

[३९] सलाबतजंग व निजामअल्ली व रामरावपंत चढार्द्र करून वढुकर गांव पावेतों आले. तीन महिने लढाई झाली. मागती सलुख झाला. ते समयीं पुणें बोस झालें. श्री त्रिंबक किल्ला घेतला.

धातानाम १०. १६७८. ११६६. ११५७. ८३.

सु॥ सबा खमसेन मया व अल्फ.

[४०] आश्विन अधिक वद्य ४ टोळधाड आली. व भूमिकंप श्रीगंगातीरीं व श्रीकृष्णतीरीं धोमीं झाला.

ईश्वरनाम ११. १६७९. ११६७. ११५८. ८४.

सु॥ समान खमसेन मया व अल्फ.

[४१] सन ११६९ मध्यें नजीबखान रोहिले यांणीं दिल्लीस अबदुल अलीखान यास आणून त्यांचें व दत्ताजी शिंदे याचें युद्ध झालें. दत्ताजी शिंदे ठार पडिले. व देशीं श्रीमंत विश्वासराव व भाऊसाहेब यांणीं सलाबतजंग व निजामअल्ली वल्द निजाम उल्मुल्ख याजवर चढाई करून शिकस्त केलें. पांसष्ट लक्षांचीं जहागीर व दवलताबाद किल्ला घेतला. त्याजवर दत्ताजी शिंदे पडले. याची खबर आली. म्हणून पडदुरा नजीक राजश्री नानासाहेब यांची भेट घेऊन उभयतां दिल्लीस चढाई करून गेले. भाऊसाहेब यांणीं ६५ लक्षांची जहागीर घेतली ते समयीं दवलताबाद व अशेरी व बऱ्हाणपूर विजापूर चाऱ्ही स्थानें घेतलीं.

बहुधान्यनाम १२. १६८०. ११६८. ११५९. ८५.

सु॥ तिसां खमसेन मया व अल्फ.

[४२] चैत्र शुद्ध ६ तारा रात्रौ दुसरे घटकेस पडून नगाऱ्यासारखा नाद उठला. कार्तिक शुद्ध ९ स श्रीमंत भाऊसाहेब यांणीं मुशाफरजंग गारपिराशीं मारिला. व देकारास

ब्राह्मण गेले होते ते ओढ्यास पूर येऊन दोन चारशें वाहून गेले, ते मेले.
प्रमाथीनाम १३. १६८१. ११६९. ११६०. ८६.
सन सितैन मया व अल्फ.

[४३] वैशाख शुद्ध ११ स अरुणोदयीं ईशान्येस तारा पडला. केतूचा उदय झाला. व अधिक श्रावण वद्यांत १३ दिवसांचा पंध्रोडा पडला. व संभाजी राजे करवीरनिवासी मार्गशीर्ष शुद्ध ११ स शांत झाले. १२ स दहन झालें. व फत्तेसिंग भोंसले शाहूराजे यांचे पाळक लेंक कार्तिक शुद्ध १२ स शांत झाले. व भाद्रपदमासी वद्य पक्षीं कपिलाषष्ठी पडली. व फाल्गुन वद्य २ मौजे दउडज तालुके नीरथडी येथें वोढ्यांत करंगळी एवढा रक्ताचा झरा चार घटका वाहिला, म्हणोन गांवकरी यांणीं राा नारो आपाजी जिल्हेदार यांस अर्जदास्त पाठविली. व चैत्र शुद्ध १ स श्रीमंत भाऊसाहेब व विश्वासराव साहेब अबदुलअल्ली दिल्लीस आला म्हणोन गेले त्याचे व यांचें पौष शुद्ध ८ स युद्ध झालें. श्रीमंत विश्वासराव पडले. फौजेनें शिकस्त खाल्ली. फार नाश झाला. भाऊसाहेब यांचा ठिकाण नाहीं. मुक्काम पानिपत नजीक दिल्ली.
विक्रमनाम १४. १६८२. ११७० ११६१. ८७.
सन इहिदे सितैन मया व अल्फ.

[४४] बाळाजी बाजीराव प्रधान पर्वतीस जेष्ठ वद्य ६ मंगळवारीं आंवशीचे प्रहर रात्रीस कैलासवासी झाले. त्यांचे पुत्र माधवराव साहेब यांस दादासाहेब यांणीं समागमें घेऊन जाऊन मातोश्री ताराऊ आईसाहेब यांजकडोन आषाढ वद्य ३ स वस्त्रें व शिक्के देवविले. त्याजवर कार्तिकमासीं निजामअल्ली वल्द निजाम उल्मुल्ख यांणीं सल्ला मोडिला. ह्याजमुळें श्रीमंत रावसाहेब व दादासाहेब चढाई करून गेले. ते समयींचे प्रसंगांत ताराऊसाहेब वारली. महिना तीथ लागणें आहे. मार्गशीर्ष चतुर्दशीस निजाम अल्ली उरळी पावेतों प्रांत जाळीत आला. त्या मुक्कामीं मोंगलाकडील रामचंद्र माधवराव व चंद्रसेनाचा पुत्र व मोंगल अल्लीचा धाकटा भाऊ पेशवे यांजकडे फुटोन आले. सबब मोंगलांचा धर सुटला. आणि सल्ला झाला. तदनंतर कर्नाटकांत पंत प्रधान यांची स्वारी गेली. दादासाहेब रुसून पुण्यास आले. निळकंठराव महादेव व सखाराम भगवंत कारभार सोडून घरीं बसले. त्रिंबकराव विश्वनाथ मामा कारभारी झाले.
वृषनाम १५. १६८३. ११७१. ११६२. ८८.
सन इसने सितैन मया ब अल्फ.

[४५] दादासाहेब माधवरावसाहेब यांजवर रुसून एका घोड्यानिशीं गेले. त्यांणीं वीस हजार फौज दोन महिन्यांत जमा करून माधवराव साहेब यांजवर चढाई करून आले. त्यांचे व यांचें युद्ध कार्तिक वद्य ११ स न्हावरें तालुके कर्डे भीमे पलीकडे झालें. रावसाहेबांचा मोड झाला. त्रिंबकराव मामा व बाबूराव राम फडणीस व गोपाळराव पळून गेले. चुलत्या पुतण्यांच्या भेटी कार्तिक वद्य १२ स झाल्या. उभयतां एक झाले. कारभार सखाराम भगवंत

निळकंठराव महादेव करूं लागले. प्रधान पंताच्या व मोंगलांच्या भेटी मुक्काम पारगांव भिमातीरीं झाल्या. भाऊसाहेब यांणीं पासष्ट लक्षांची जहागीर घेतली होती तीं माघारी दिली. मोंगल भागानगराकडे गेला. पंतप्रधान मिरजेस जाऊन मोरचे लाऊन पंतांचा व मोंगलाचा सल्ला झाला. तदनंतर फौजेसुद्धां मार्गशीर्ष वद्य १३ स साताऱ्यास जाऊन महाराज रामराजे यांस बाहेर काढून अधिकार दिले.

रामचंद्रराव जाधव यास सेनापती. १
नारो शंकर यास प्रतिनिधी. १
विठ्ठल शिवदेव यास राजाज्ञा. १
कानोजी मोहिते यास सरलष्कर. १

चार पदें जुन्यांचीं काढून दिलीं. वरकड ज्यांचीं त्यांस दिलीं आणि मिरजेस गेले. नंतर प्रतिनिधी नारो शंकर यासि दिली म्हणोन गोमाजी यमाजी प्रतिनिधीचे कारभारी जानोजी भोंसले यांजकडे जाऊन भोंसले यांस मोंगलाकडेस घेऊन गेले. आणि सल्ला बिघडला. मोंगल भागानगरचा रोंख सोडून मिरजेवर प्रधान पंताकडे स्वारी केली. प्रधान-पंत मिरज हस्तगत करून दरकूच अवरंगाबादेस शहरास जाऊन हल्ला करून शहरापासून दोन लक्ष रुपये घेतले. आणि वराडांत गेले. म्हणोन हेही त्यांचे मागें लागून वराडांत गेले. म्हणोन पंत भागानगर प्रांतीं गेले. मोंगल व भोंसले बराडांतून पुणियास येऊन ज्येष्ठ शुद्ध ११ शके १६८५ पुणें जाळलें. आणि मोंगल माघारा धारुरास गेला.

सुभानुनाम. १७. १६८५. ११७३. ११६४. ९०.
सन अर्बा सितेन मया व अलफ.

[४६] श्रावण शुद्ध १ मोंगलाचा दिवाण विठ्ठल सुंदर वगैरे सरदार यांसि पंत प्रधान यांणीं राक्षसभुवनावर मारलें, दहा हजार फौज लुटली. निजामअल्ली पळून शहरास गेला. पंतांनीं मोंगल शहरांत कोंडून नऊ लक्षांची जहागीर घेतली. अवरंगाबादेहून आश्विन अखेर श्रीमंत रावसाहेब पुणियास आले. गांव जळाला होता त्याची आबादी करून पौषमासीं कर्नाटक प्रांतीं गेले. तिकडे हैदर नाईक याची लढाई पहिली, पौष शुद्ध २ होऊन परस्परें लढाई लागली. याजमुळें छावणी करून भाद्रपदमासीं येऊन धारवाड घेतलें. दादासाहेब नाशिकास आनंदवल्ली जवळ आले.

तारणनाम १ ८. १६८६ ११७४. ११६५. ९१.
सु॥ खमस सितेन मया व अलफ.

[४७] धारवाड घेऊन फिरून हैदराची गांठ घातली. हैदर झाडींत बिदनुराकडे पळून गेला. दादासाहेब देशीं येऊन अनंतपुरास सल्ला झाला.

पार्थिवनाम १९. १६८७. ११७५. ११६६. ९२.
सु॥ सित सितेन मया व अलफ.

[४८] रावसाहेब दादासाहेब वराडांत जाऊन भोंसले यांस शह देऊन दादासाहेब फौज घेऊन हिंदुस्थानांत स्वारीस गेले.

व्ययनाम २०. १६८८. ११७६ ११६७. ९३.

सु॥ सब्बां सितैन मया व अल्फ.

[४९] श्रीमंताची स्वारी कर्नाटकांत जाऊन सीरे मदगिरी हूसकोट हैदराकडील घेऊन आणखी खंडणी घेऊन आले.

सर्वजित्नाम २१. १६८९ ११७७. ११६८. ९४.

सन सम्मान सितैन मया व अल्फ.

[५०] आषाढमासीं हिंदुस्थानांतून दादासाहेब आले श्रीमंत रावसाहेब जाऊन भेट घेतली. पुढें कलह वाढला. दादासाहेब आनंदवल्लीहून गंगातीरानें धोडपेस आले.

सर्वधारीनाम २२. १६९० ११७८. ११६९. ९५.

सु॥ तिस्सा सितैन मया व अल्फ.

[५१] ज्येष्ठमासीं श्रीमंत रावसाहेब धोंडप किल्यानजीक जाऊन लढाई झाली. चिंतो विठ्ठल जोशी सांपडले. फौज लुटली गेली व कांहीं पळाली. दादासाहेब किल्याखालीं येऊन भेटले. नंतर पुणियास स्वारी आषाढमासीं आल्यावर गंगाधर यशवंत होळकराकडील यांचें पारिपत्य केलें. पुढें मार्गशीर्षमासीं श्रीमंत स्वारीस निघाले, ते तुळजापुराहून निजामअल्लीखान याचा दिवाण रुकमत दौला फौजे सुद्धां घेऊन वऱ्हाडांत जानोजी भोंसला याजवर चढाई करून गेले. ते गांठ न घालतां दूर दूर होते. वऱ्हाड नागपूर सुद्धां झांबडलें. जानोजी भोंसले फौजे सुद्धां गंगातीरास निर्मळचे रोखे आले. श्रीमंत फौजसुद्धां पाठीवर गेले. गांठ पडूं दिली नाहीं. चैत्रमासीं भेटून सल्ला झाला. रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण फौज पंचवीस हजारानिशीं रवाना केले.

विरोधीनाम २३. १६९१. ११७९. ११७०. ९६.

सुरूसन सबैन मय्या व अल्फ.

[५२] श्रावणमासीं धूमकेतु एक महिनाभर निघत होता व पर्जन्याची अतिवृष्टि झाली. त्याजमुळें पिकें गेलीं. भाद्रपद मासापासून पर्जन्य अगदीं गेला. महर्गता झाली. मार्गशीर्षमासीं धूमकेतु आठ दिवस निघत होता व सात दिवस पर्जन्य लागला. शाळू वगैरे पेरले. पिकें झालीं. स्वस्ताई झाली. हैदर नायक याचा बिघाड झाला. श्रीमंत रावसाहेब यांची स्वारी कर्नाटकांत वैशाख मासपर्यंत होती. शरीरीं समाधान नाहीं म्हणून खासा स्वारी पुणियास आली. त्रिंबकराव पेठे फौजे सुद्धां तुंगभद्रेपार छावणीस ठेविले. विसाजी कृष्ण व रामचंद्र गणेश व तुकोजी होळकर व महादजी शिंदे पन्नास हजार फौज सुद्धां आषाढमासीं खेचीवाडा प्रांतीं जाऊन छावणी केली. जयनगरकर याजपासून दहा लक्ष रुपये खंडणी घेतली. आणि जयनगरकर यांची फौज बरोबर घेऊन सुरजमल्ल जाट यांचा प्रांत कुंभार भरतपूर डाडीगड येथें जाऊन जाटाशीं लढाइ झाला. जाट पळून भरतपुरास गेला.

फौज तीस हजार लुटली. दहा हत्ती व दोन हजार घोडे व तोफखाना वगैरे सरकारांत आला. आणि जाटापासून पासष्ट लक्ष रुपये खंडणी करार केली. नजीबखान रोहिले याचें राजकारण होळकर यांणीं करून रोहिले यांच्या भेटी झाल्या. जाटाकडील पासष्ट लक्षां-पैकीं दहा लक्ष रुपये वसूल आले. बाकी ऐवज वसूल न देतां नजीबखान याचे सूत्रें रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण बिनीवाले फौज सुद्धां छावणीस राहिले. नजीबखान अपमरणानें मेला. त्याचा लेंक जाबतेखान फौज सुद्धां अंतरवेदींत राहिला.

विक्रमनाम २४. १६९२. ११८०. ११७१. ९७.

सु॥ इहिदे सबैन मय्या व अल्फ.

[५३] कार्तिकमासीं माधवराव साहेब कर्नाटक प्रांतीं जाण्याकरितां सिद्ध होऊन कृष्णातीरपर्यंत गेले. परंतु शरीरीं बहुत समाधान नाहीं. म्हणोन फौजा पुढें त्रिंबकरावमामा पेठे यांचे कुमकेस कृष्णराव अप्पा मेहेंदळे वगैरे सरदार रवाना करून फाल्गुनमासीं स्वारी पुण्यास आली. त्रिंबकराव मामाची व हैदर नाईक याची लढाई श्रीरंगपट्टणानजीक झाली. हैदर जातीनें पुत्रासुद्धां पळून पट्टणास गेला. फौज व पंचवीस हजार प्यादा मारला गेला. मोठें युद्ध झालें. मामा फौजे सुद्धां छावणीस राहिले. सल्ला झाला नाहीं. विसाजी कृष्ण व रामचंद्र गणेश यांचा व नजीबखान याचा लेंक जाबतेखान यास होळकर याणीं शुक्रतालास नेऊन पोंचविला. विसाजीपंत बिनीवाले व शिंदे होळकरसुद्धां दिल्लीस राहिले. त्यांचें ठाणें होतें तें उठवून आपलें ठाणें बसविलें. रामचंद्र गणेश व विसाजीपंत बिनीवाले या उभयतांचा कारभार संबंधें कलह लागला. सबब श्रीमंतांनीं रामचंद्र गणेश देशीं आणविले. विसाजीपंत फौजे सुद्धां दिल्लीस छावणी करून राहिले.

खरनाम २५. १६९३. ११८१. ११७२. ९८.

सु॥ इसने मय्या व अल्फ.

[५४] श्रीमंत माधवराव साहेब यांस कार्तिक वद्य ७ स प्रातःकाळीं प्रहर दिवसास मौजे थेऊर येथें श्रीचिंतामणीपाशीं दैवाज्ञा झाली. श्रीमंत सौभाग्यवती रमाबाई-साहेब यांणीं सहगमन केलें. धरणीधर देव चिंचवडकर यांचा काल मार्गशीर्ष वद्य ६ स मंगळवारीं आवशीचे चार घटिका रात्रीस झाला. व श्रीमंत नारायणराव साहेब यांसि पेशवाईची वस्त्रें महाराज रामराजे छत्रपति यांणीं मार्गशीर्ष वद्य ४ रविवारीं दोन घटिका रात्रीस दिलीं.

नंदननाम. २६ १६९४. ११८२. ११७३. ९९.

सु॥ सलास सबैन मय्या व अल्फ.

[५५] श्रीमंत नारायणराव राज्य करूं लागले. नंतर दादासाहेब व आनंदी बाईसाहेब यांचे मनास कांहीं विकल्प येऊन बाहेर सखाराम भगवंत वगैरे मुत्सद्दी यांचे सल्यानें रावसाहेब यांस कैद करून आपण राज्य करावें असें झालें. ती मसलत बाईनीं मोडून शस्त्रघात करून फडशा राव यांचा कराबा असें केलें. आणि सरकार वाड्यांत हजेरी लोकांची आहे, असें पुणें शहरांत वर्तमान फोडून गर्दीनवाई चौकी पहारे यांत जुने लोक

होते ते काढून परदेशी लोक ठेविले. त्याजवर भाद्रपद शुद्ध १३ स रावसाहेब यास दादा यांणीं बोलावून दोन प्रहरीं पाठवून आपले समक्ष आणून सुमारसिंग व खरगसिंग व तुळाजी पवार याजकडून रायावर जखमा करून मारिलें. वरता चापाजी टिळेकर खिजमतगार तोही खाशाच्या आंगावर तेथें मारला गेला. इच्छारामपंत ढेरे गर्दीत तेसमयीं मारले गेले. गोहत्या व ब्रह्महत्त्या व स्त्रीहत्त्या वगैरे फार झाल्या. हें वर्तमान तिसरे प्रहरीं शहरांत सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन फडणीस व हरी बल्लाळ फडके वगैरे मुत्सद्दी व सरदार मानकरी यांस कळल्यावर राव यांचें दहन केलें. दादासाहेब यासीं बिघड करून श्रीमंत मातुश्री गंगाबाई साहेब रावयांची स्त्री यास एक महिना गरोदर होती, तिजला किल्ले पुरंदर येथें नेऊन त्यांचें नांवें मामलेदार व महालनिहाय वगैरे लोकांस सनदा पाठवून चार महिने कारभारी यांणीं राज्य केलें. इकडे श्रीमंत दादासाहेब दसेरयाचे मुहूर्तानें वाड्यांतून स्वारी सीमोल्लंघनास बाहेर निघाली, ती शहरांत न येतां परभारें गारपिरावर डेरे मुक्कामीं दाखल झाली. मागून श्रीमंत सौभाग्यवती आनंदीबाई ही गेली. नंतर मागें शहरचा व वाड्याचा कारभारी यांणी बंदोबस्त पक्का करून दादासाहेब यांस नबाब भागानगरकर यांजवर खासा स्वारी फौज सुद्धां जाणें असें मुत्सद्दी यांणीं ठरवून समागमें नाना फडनवीस आदि सरदारमंडळी शरीरास समाधान नाहीं, हा मजकूर खाशास समजाऊन पुण्यास निरोप घेऊन माघारे आले. दादासाहेब यांणीं तिकडचा रोख सोडून प्रांत सुरत गुजराथ या रोखानें स्वारी कूचदरकूच चालली. ती सुरतेस गेली. मागें सरकारी फौजा हरिपंतात्या फडके बरोबर होते, तेही फौजेनिशीं माघारे आले.

विजयनाम. २७. १६९५. ११८३. ११७४ १००.

सु॥ आर्बा सबैन मय्या व अलफ.

[५६] श्रीमंत माधवराव नारायण साहेब यांचा जन्म अधिक वैशाख शु॥ ७ इंदुवारीं १६ घटका दिवसास पुरंदरीं झाला. नाना फडणवीस व हरीपंततात्या वगैरे मुत्सद्दी किल्ले पुरंदरीं होते. पुणें शहरचें काम नारो अप्पाजी तुळशीबागकरी यांजकडे होतें. त्याजला किल्ल्याहून बातमी येतांच सरकारी तोफाखान्यांतील तोफा सोडावयास प्रारंभ केला. व महालनिहाय राज्यांतील मामलेदार व किल्लेदार यांस सनदा पाठवून किल्लेनिहाय तोफा सोडाव्या अशी परवानगी आली. नारो अप्पाजी फाल्गुन शु० ५ शांत झाले. नंतर श्रीमंत बाजीरावसाहेब यांचा जन्म किल्ले धार येथें माळव्यांत मार्गशीर्षमासीं झाला. तेव्हां श्रीमंत दादासाहेब सुरतेस होते.

जयनाम. २८. १६९६. ११८४. ११७५. १०१.

सु॥ खमस सबैन मय्या व अलफ.

[५६ अ.] कोळ्यांचा दंगा कल्याण प्रांतीं झाला. साष्टी इंग्रजानें सरकारांत होती ती घेतली. शके १६९७ फ. स. ११७६.

[५६ ब.] तोतया भाऊसाहेब म्हणून कोंकणांत रत्नागिरीस झाला. तेथून

कोंकणपट्टीचीं खंडणी घेत घेत राजमाची पावेतों आला. तेथें पुण्याहून फौजा रवाना होऊन चौकशी करितां खोटा होऊन मारिला. शके १६९८.

मोरो बाबूराव फडणीस सरकारचे इतराजींत आले. दस्त श्रावणमासीं झाले.

[५७] राजाराम राजे छत्रपति मार्गशीर्ष शुद्ध १० स भोमवारी कैलासवासी झाले. व धरणीधर देव यांचे पुत्र नारायण देव गंगास्नानास सिंहस्तास जात होते. वाटेनें घोड-नदीवर कांठीं स्नानास उतरले. तों श्री गणपतीची मुहूर्त चोरानें नेली. दुसरे तिसरे दिवशीं देवाचे नेत्र व बेंबी काढून घेऊन देव नदींत टाकिला. माघ वद्य ३.

हेमलंबी नाम ३१. १६९९. ११८७. ११७८. १०४.

सु॥ समान सबेन मय्या व अलफ.

[५८] पंत प्रधान यांजकडील कारभारी माधवराव निलकंठ पुरंधरे व अमृतराव विश्वनाथ पेठे यांणीं राजाराम ह्याचा पुत्र आणून किल्ले सातारा येथें तक्तावर बसून राजा शाहू नांव ठेवून राजमुद्रा नवी जाहली. राजे यांणीं पंतासही नवी मुद्रा करून दिली.

विलंबीनाम ३२. १७००. ११८८. ११७९. १०५.

सु॥ तीसा सबेन मय्या व अलफ.

[५९] श्रीमंत माधवराव साहेब धाकटे यांचा व्रतबंध मौजे पर्वती येथें माघ-मासीं जाहला.

प्लवनाम ३५. १७०३. ११९१. ११८२. १०८. सु॥ इसने समानीन मया व अलफू.

[६०] श्रीमंत माधवराव साहेब धाकटे यांचें लग्न. समारंभ मोठा झाला.

शुभकृत्नाम. ३६. १७०४. ११९२. ११८३. १०९.

सु॥ सल्लास समानीन मया व अलफू.

[६१] श्रीमंत दादासाहेब यांस मौजे सीतापखेड कसबे धरणगांव परगणे कुंभेरी श्रीगोदातीरीं मार्गशीर्ष वद्य ३ सह ४ स देवाज्ञा जाहली. तेसमयीं मातुश्री आनंदीबाई चिमाजी अप्पाचे वेळेस गरोदर होती.

शुभकृतनाम ३७. १७०५. ११९३. ११८४. ११०.

सु॥ अर्बा समानीन मया व अलफू.

[६२] श्रीगंगेस महा थोर पूर आला. दोन्ही थडीचे गांव बहुत गेले. तीन महिने श्रावण मासापासून दीड पायलींची धारण पुणें प्रांतीं जाहली होती. पुढें स्वस्थता झाली. कपिलाषष्ठी पडली.

पराभवनाम ४०. १७०८. ११९६. ११८७. ११३.

सु॥ सबा समानीन मया व अलफू.

[६३] श्रीगोदातीरीं नासिकाकडे वगैरे प्रांतीं थंडी बहुत पडून मोठे वृक्ष सुद्धां झाडें जळालीं.

कालकनाम ४२. १७१०. ११९८. ११८९. ११४.
सुरू० तीसा समानीन मया व अलफू.

[६४] परशराम रामचंद्र पटवर्धन मिरजकर फौज सुद्धां कर्नाटकांत टिपूवर रवाना केले. ते धारवाड किल्यास प्रथम जाऊन किल्ला सरकारांत घेतला. मागाहून हरी बल्लाळ फडके मोंगलाची फौज घेऊन पट्टणास गेले. पट्टणाकडून इंग्रज ही आला.
साधारणनाम ४४. १७१२. १२००. ११९१. ११७.
सुरू० इहिदे तिसेन मया व अलफू.

[६५] हरी बल्लाळ व मोंगलाचा व इंग्रजाची फौज मिळोन बेंगरूल वगैरे ठाणीं घेऊन पट्टणावर जाऊन हल्ला करून टिपू जेर केला. तेव्हां टिपूनें तीन कोट रुपये तीघांस खंडणी देऊन दीड कोटीचा मुलूख देऊन सल्ला केला. श्रीमंताची फत्ते झाली.
विरोधकृत्नाम ४५. १७१३. १२०१. ११९२. ११८.
सुरू० इसन्ने तिसेन मया व अलफू.

[६६] हरी बल्लाळ फडके कर्नाटकांतून चैत्रमासीं फौजसुद्धां पुणियास आले. नंतर कांहीं दिवसांनीं शरीरीं समाधान नाहीं सबब श्रीमंतांची आज्ञा घेऊन मौजे सिद्धटेक येथें श्रीगणपतीपाशीं गेले. तेथें शांत झाले. महिना तीथ लागणें असे. व पुढें ज्यैष्ठमासीं हिंदुस्थानांतून बारा वर्षांनीं मोठमोठे संस्थानी होते, त्यांस मोडून दिलीस नवा बादशहा बसवून पंताचे नांवें वजीरी माहीमरातब व नालकी व पोषाक जवाहीर वगैरे घेऊन महादजी शिंदे फौजसुद्धां पुण्यास आले. श्रीमंताची भेट घेऊन वजीरीचीं वस्त्रें वगैरे नजराणा नालकीसुद्धां आणिला तो सरकारांत निवेदन करून रावसाहेब यांस नालकींत बसवून खासा स्वारी पुणें शहरांतून मोठ्या समारंभानें वानवडीस लष्करास गेले. तेथें श्रीमंतांनीं वजीरीचा दिवाणगिरी व दुसरी नालकी शिंदे यांस दिली.त्या वर्षी महागाई मोठी तीन चार शेरांची चारी मुलखांत धारण झाली. ते शके १७१५ चे भाद्रपदपर्यंत होती. माणसांचा वगैरे संहार फार जाहला. आश्विन मासापासून पर्जन्य पडून स्वस्थता जाहली.
परिधावीनाम ४६. १७१४. १२०२. ११९३. ११९
सुरु० सलास तिसेन मया व अलफ.

[६७] महादजी शिंदे ह्यांस नवज्वर होऊन माघ शुद्ध त्रयोदशीस अवशीचे पांच घटका रात्रीं मृत्यु पावले. पोटीं पुत्रसंतान नाहीं. ते समयीं तुकोजी शिंदे यांचे तिसरे पुत्र अमृतराव शिंदे यांचा पुत्र दौलतराव शिंदे हे महादजी शिंदे यांणीं जिवंत असतां पुत्र म्हणून जवळ ठेविले होते. परंतु अंत-काळीं जवळ नव्हते. तुळजापुरीं देवीचे दर्शनास गेले होते. नंतर कारभारी यांणीं तेथून आणून शिंदे यांची क्रिया त्यांचे हातें करवून १३ वे दिवशीं श्रीमंत माधवराव साहेब यांणीं सरदारीचीं वस्त्रें दिलीं.
प्रमाथीनाम ४७. १७१५. १२०३. ११९४ १२०.
सुरू० आर्बा तिसैन मया व अलफ.

[६८] श्रीमंत माधवराव साहेब मार्गशीर्ष मासीं खासा स्वारी समागमें दौलतराव शिंदे व होळकर वगैरे तमाम सरदार फौजेसुद्धां व बाळाजी जनार्दन फडनवीस व चिंतामण हरी फडके वगैरे तमाम मुत्सद्दी घेऊन निजाम अल्लीखान मोंगल ह्याजवर चढाई करून सोनेवर गेले. तेथें मोंगलाची गांठ खर्ड्यानजीक शिंदे व हुजरात व भोंसले यांणीं घालून लढाई मोठी झाली, खासा खर्ड्यांत कोंडिला, तेव्हां मोंगलांचा तह होऊन मशीर उल्मुलुख दिवाण व तीन कोट रुपये खंडणी व ३५ लक्षांचीं जहागीर व दौलताबाद किल्ला सरकारांत घेऊन स्वारी फत्ते करून शके १७१६ चे वैशाख शुद्ध त्रयोदशीस पुण्यास दाखल जाहले, मोंगलांचा दिवाण कैद करून ठेविला.

आनंदनाम ४८. १७१६. १२०४. ११९५. १२१.

सुरु० खमस तिसैन मया व अलफ.

[६९] श्रीमंतांस कांहीं शरीरास स्वारी खर्ड्याहून आल्यापासून स्वस्थ नव्हतें. पुढें आश्विन मासीं शुद्ध १२ स गणपतीचे रंगमहालाचे दुसरे मजल्यावरून सात कारंज्याचे हौदांत उडी टाकिली. त्यानें कारंजें लागून पाय मोडिला. व कांहीं आंगासही दगड लागले. त्यांनीं प्रकृति विलक्षण होऊन शुद्ध पौर्णिमेस ४ घटका दिवसास वाड्यांत रावसाहेब कैलासवासी जाहले. नंतर शहरचा बंदोबस्त करून मग दहन झालें. त्याजवर बाळाजी जनार्दन फडणीस यांणीं मातोश्री यशवदाबाईसाहेब ह्यांचे मांडीवर दत्तक देऊन पूर्ववत्प्रमाणें चालवावें म्हणून आग्रह धरून चार महिने राज्याचा कारभार चालविला. ही मसलत दौलतराव शिंदे ह्यांचे कारभारी याचे मनास न ये. सबब शिंदे फौजसुद्धां श्रीमंत बाजीराव व चिमाजी आपासाहेब जुन्नरास होते तेथें त्याजकडे संधान बांधिलें. तों नाना फडनवीस यांणीं राजश्री परशराम रामचंद्र पटवर्धन वगैरे सरदार यांस फौजेसुद्धां पाठवून उभयतां श्रीमंतांस माघ वद्य पंचमीस खडकीचे पुलापाशीं आणिलें. पंधरा दिवस मुक्काम तेथेंच होता. नानांची भेट जाहली. नंतर दौलतराव शिंदे फौज जमावानिशीं श्रीमंताचे भेटीस आले. त्याचे भयानें नाना फडनवीस फाल्गुन शुद्ध त्रयोदशीस साताऱ्यास स्वारी गेली. नंतर श्रीमंताची व शिंदे यांची भेट फाल्गुन वद्य द्वितीयेस झाली. स्वारी वाड्यांत येऊन दाखल जाहली. एक दिवस वाड्यांत राहून शहरांत पाण्याचा दुकाळ भारी यामुळें माघारी खडकी मुक्कामीं स्वारी आली. तेथून मौजे थेऊर येथें मुक्काम करून राहिले. व मौजे वीर नजीक जेजुरी येथें ब्राह्मणाचे घरीं गाई माणसासारखी माघमासीं सारखी तीन दिवस मनुष्यासारखी रडत होती. व मौजे बेलसरनजीक जेजोरी कऱ्हातीरीं झऱ्यास करंगली येवढा रक्ताचा प्रवाह माघ वद्य पंचमीस एक प्रहरभर वाहिला. व श्रीकृष्णातीरीं फाल्गुनमासीं क्षेत्र वाई येथें मासेवळण तीन दिवस जाहलें. संहार फार जाहला.

राक्षसनाम ४९. १७१७. १२०५. ११९६. १२२.

सुरू० सीतातिसैन मया व अलफ्.

[७०] नाना फडनवीस यांची समजूत करून श्रीमंत बाजी साहेब यांणीं पुण्यास आणिलें. कांहीं दिवस नानांनीं कारभार केला. नंतर श्रीमंतांनीं शिंदे यांजकडून नानास धरविलें. तेव्हां नानांनीं सखाराम घाडगे याजकडें कारस्थानीं लावून मोकळे जहाले. नंतर श्रीमंत अमृतराव यासी व बाजीराव साहेब यासी बिघाड होऊन होळकर पुण्यावर चालून आले. मोठी लढाई झाली. बाजीराव साहेब पळून वसईस गेले. नंतर इंग्रज बहादर याशीं सल्ला करून त्याजला मदत आणिलें. जाहीरनामा सरकार दौलत मदार कंपिणी इंग्रज बहाहर सु० समान अशर मयातैन व अलफ. तमाम लोकांनीं जाहीरनामा समजोन त्याप्रमाणें वर्तणूक करावी याजकरितां लिहिलें जातें जेः—

" बाजीराव साहेब राज्यावर आल्यापसून नानाप्रकारचे बेखेड व बंडें होत होतीं. राज्यांत मुलखावर हुकमत कधीं चालली नाहीं. पुढें होळकर यांचा दंगा झाला तेव्हां राज्य सोडून पळून वसईस जाऊन खंडेराव रास्ते यां या मदतीनें गुजराण करून राहिले. नंतर कंपिणी सरकारची दोस्ती केली. त्याजवरून कंपिणी सरकारची फौज येऊन बाजीराव साहेब यांसि गादीवर बसवून तमाम बंडें व बखेडे होते ते मोडून मुलखांत बाजीराव साहेब यांचा हुकूम चालू करून दिला. पाहिल्यानें दंग्यामुळें व पुढें पुष्कळ दुष्काळ पडला त्यानें मुलूख बहुतेक उध्वस्त झाला होता तो कंपिणी सरकारच्या भरंवशावर आबाद झाला. बाजीराव साहेब यांणीं मामलती करून मक्तयानें लावल्या ते मक्तेदार रयतेपासून जाजती ऐवज घेत गेले. तत्रापि बहुत आबादी झाली तेव्हां मुलखाचा ऐवज जमा जाहला. त्याजवर बाजीराव साहेब यांणीं दौलतीचा खर्च व ऐषआराम करून खजिना बहुत जमा केला. व मराठे सरदार यांजवर बाजीराव साहेब यांचा दाब बहुत दिवसांपासून नव्हता तो लागू करावा असें कंपिणी सरकाराहून कबूल केलें नव्हतें. जें वाजवी असेल तें चालतें करून द्यावें अशी कंपिणी सरकारची खायश होती. त्यावरून गायकवाड यांजकडील जाबसाल ठरावयाकरितां गायकवाड यांणीं आपले कारभारी गंगाधरशास्त्री यांस कंपिणी सरकारच्या बहादरीवर पुण्यास पाठविलें. ते येऊन बहुतेक जाबसाल लवकरच उलगडावे ऐसें जाहलें होतें. त्यांत बाजीराव साहेब यांची किफायत बहुत होती. इतक्यांत गंगाधरशास्त्री यांस बाजीराव साहेब यांचे कारभारी यांणी पंढरपूर क्षेत्री मारिलें. त्या वेळेस तमाम रयत व यात्रेकरी वगैरे सर्व म्हणत होते की, शास्त्री यांस त्रिंबकजीनें बाजीराव साहेब यांचे हुकुमाशिवाय मारिलें नाहीं. असें असतां बाजीराव साहेब दोस्त, मोठे दौलतदार, असें करतील हा गुमान मनांत न आणितां ज्या त्रिंबकजीनें मारिलें त्यास हवाली करून द्यावा असा कंपिणी सरकारचा विचार होऊन, त्रिंबकजीस हवाला करावा असें बोलणें पडलें. तेव्हांच हवाला करावा तो न केला. याजकरितां कंपिणी सरकारची फौज बहुत जमा झाली. नंतर त्रिंबकजीस हवाला केला. त्यासमयीं कंपिणी सरकारांत खर्च बहुत जाहला. तो दोस्तीवर नजर देऊन न मागतां त्रिंबकजीस हवाला करून घेतला. आणि दोस्ती पाहिली चालत होती त्याप्रमाणें कायम ठेविली. नंतर बाजीराव साहेब यांणीं बाहेरचे सरदार यांस पत्रें पाठवून त्यांची फौज तयार करावी अशी तजवीज केली. व आपले राज्यांत

बंडें उभी करून बंडाचे कुमकेकरितां आपली फौज तयार करून कंपिणी सरकारची लढाई पडावी आणि नुकसान व्हावें अशी तजवीज करूं लागले. त्याजवरून बखेडा मोडावा याजकरितां कंपिणी सरकारची फौज तयार होऊन पुण्यास आले आणि बाजीराव साहेब यांस शहराभोंवतीं तंबी केली. त्या वेळेस बाजीराव साहेब हातीं सांपडले होते, तेव्हां मुलखाचा बंदोबस्त करावयाजोगी कंपिणी सरकार फौज बहुत तयार होती, परंतु तहनामा झाल्यापासून हरवख्त बाजीराव साहेब यांचे बोलणें पडत होतें, जे आम्हांस राज्य प्राप्त जहालें व आम्ही ऐषआराम करितों हें सर्व कंपिणी सरकारचें देणें आहे. आमचा शुकार गुजारा कंपिणी सरकारचे भरंवशावर होत आहे, असें बहुत तऱ्हेनें बोलत होते. याजकरितां गादी कायम ठेवून त्यांचे हातीं फिशाद न व्हावा याजकरितां वसईचा तहनामा कायम ठेवून नवा तहनामा जहाला. पांच हजार स्वार व तीन हजार पायदळ मदतीस देत जावें. असा बाजीराव साहेब यांचा पाहिलाच करार होता, ती फौज कंपिणी सरकारांतून ठेवावी, असें होऊन फौजेचे खर्चास मुलूख लावून दिला. तेव्हां पासून दोस्ती पाहिल्याप्रमाणें चालेल. नंतर पेंढारी चढूंकडून रयतेस दरसाल उपद्रव करितात. बाजीराव साहेब यांचे मुलाखांत बहुत उपद्रव होता. याजकरितां पेंढारी यांचा बंदोबस्त व्हावा अशी कंपिणी सरकारांतून तजवीज जाहली. तेव्हां बाजीराव साहेब यांचें बोलणें पडलें जे, पेंढारी यांचा बंदोबस्त झाल्यानें आमची बहुत किफायत आहे. आम्ही ही फौज सामील देतों. असें खात्रीनें बोलून बहाण्यानें कंपिणी सरकारच्या आश्रयावर जो खजिना जमा केला होता तो ऐवज बाहेरचे सरदारांस पाठवून त्यांस बिघडविलें व आपली फौज तयार केली. कंपिणी सरकारची फौज जवळ होती ते दूर जावी याजकरितां दोन हजार स्वार व कंपिणी सरकारची फौज बराबर देऊन फौज दूर केली. अशी संधि पाहून एकाएकीं कांहीं कारण व जाबसालाची तक्रार नसतां फौज तयार करून कंपणी सरकारचे फौजेशीं लढाई केली व कोणत्याही मुलुखांत चाल नाहीं तशी चाल करून इंग्रजी वकिलाचे बंगले व छावणींची जागा जाळून लुटून टाकिली. कंपिणी सरकारचे मुलखाची रयत व वाटसरू सळ्याचा भरंवसा धरून येत होते त्यांस घरून कैद करून व कित्येक लुटले व दोन इंग्रजी सरदार मुंबईकडून येत होते त्यांस तळेगांवाजबळ चोराचेंही पारिपत्य करीत नाहीं त्या तऱ्हेनें मारिलें. ते मारणार अद्याप चाकरीवर आहेत. त्याजवरून बाजीराव साहेबांचे हुकमाशिवाय मारिलें नाहीं, असा निश्चय होतो. व ज्या त्रिंबकजीनें गंगाधरशास्त्री मारिले त्यास जवळ आणून कारभारांत वागवूं लागले. त्यावरुन बाजीरावाचे हुकमाशिवाय त्रिंबकजीनें शास्त्री यांस मारिले नाहींत असें पहिल्यापासून लोक बोलतात तो मुद्दा शाबूद करून घेतला. व पेंढारी बोलावून मुलूख लुटवावा अशी तजवीज करूं लागले. या तऱ्हेचे दौलतदारीचे सांप्रदाय सोडून वर्तणूक करूं लागले. आणि कंपिणी सरकारास बुडवावें असें केलें. त्यावरून कंपिणी सरकारचा निश्चय जहाला जे. बाजीराव साहेब राज्याच्या उपयोगीं नाहींत. याजकरितां बिलकूल राज्यांतून काढून कंपिणी सरकारांतून मुलुख व किल्ले काबीज करून अमल करावा अशी तजवीज होऊन एक सडी फौज बाजीराव साहेब यांचे मागें रवाना करून एक

फौज किल्ले घेण्याकरितां जात आहे व दुसरी फौज अहमदनगराजवळ येऊन पोहोंचली व एक मोठी फौज खानदेशांत आली आहे व जनरल मनरोसाहेब कर्नाटकाचा बंदोबस्त करीत आहेत, व मुंबईकडून फौज येऊन कोकणचे किल्ले घेऊन त्या प्रांताचा बंदोबस्त होत आहे आतां थोडे दिवसांत बाजीराव साहेब यांचें ठिकाण नाहीं असें होऊन महाराज छत्रपति सातारकर बाजीराव साहेब यांचे कैदेंत आहेत त्यांस सोडवून मोकळे करून त्यांचे मंडळींत शानशोकीकरितां त्याजकडे कांहीं राज्य चालेल, अशी तजवीज करून कंपिणी सरकारचे हातून सातारे किल्ल्यावर महाराजांचे झेंडे कायम करून त्यांचे तर्फेचे लोक होते त्यांची खातरजमा केली असे. त्यास जो मुलुक महाराज यांजकडे होईल त्याचा न्यायइनसाफ व हुकमत व अमलात करितील. कंपिणी सरकारांत मुलुख राहील तेथें सरकार कंपिणीचा अंमल होईल. परंतु कोणाचे वतनास व इनामास व वर्षसनास व देवस्थानास व खर्चास व खैरातीस व कोणाचे ज्ञातीस व धर्मास खलेल न होतां वाजवी असेल तसें चालेल. बाजीराव साहेब मक्तेदारांस मामलती देत होते तें महकूब होऊन कमावीसदार यांजकडे सांगून वाजवी ऐवज असेल त्याची उगवणी होईल. कोणावर जास्ती जुलूम कांहीं एक होणार नाहीं. येविशीं कोणी अंदेशा घेऊं नये. बाजीराव साहेब यांजकडे चाकरीस कोणी असतील त्यांणीं चाकरी सोडून आजपासून दोन महिन्या आंत घरीं यावें. जे कोणी न येतील त्यांचें वतन जप्ती होऊन खराबी झाल्याशिवाय रहाणार नाहीं. जमेदार यांणीं आपले परगण्यांतून जे बाजीरावसाहेब यांजकडे चाकरीस असतील त्यांची याद तूर्त समजावी. चाकरी सोडून जसे जसे घरीं येतील त्याबेळेस यादी समजावीत जाव्या. बाजीराव साहेब यांची कुमक करूं नये. त्यांजकडे वसूल एकंदर देऊं नये. न दिल्यास सालमजकुरीं मुलकास उपद्रव लागला. असेल त्याची फिर्यादीची दर्याप्ती होऊन सूट मिळेल. बाजीरावसाहेब यांजकडे वसूल दिल्यास तो ऐवज मजुरा न देतां दरोबस्त घेतला जाईल व जमेदार कुमक करितील व ऐवज देतील त्यांचें वतन व जमिनी त्यांजकडे चालणार नाहींत. तारीख ११ माहे फेब्रुवारी सन १८१८ इसवी मुा छ. ५ रबिलाकर.*

ले. ४९० } {ता। २०-११-१८३०
[४९२] } {मार्गशीर्ष शु. ५ शके १७५२

श्री.

†श्रीमंत सवाई माधवराव यांचा व्रतबंध चैत्रमासीं जाहला. इंग्रजांचे भयानें

---

* हें" मेस्तक' विष्णु घोंदेदेव वरिमांडकर यांणीं कोल्हापुराहून पाठविलें. हें खर्ची कागदाच्या चिकट बंदावर लिहिलें आहे.अक्षर वाटोळे वळणदार सुवाच्य आहे. शेवटचा जाहीरनामा राजवाड्यांनीं इ. ऐ.च्या बखरींत व भाव्यांनीं रुमाल २ यांत छापला आहे.

† येथपासून पुढील मजकूर अंताजी रामचंद्र हरडीकर यांणीं एक प्रकरण पाठविलें त्यावरून जशाचा तलाच उतरून घेतला आहे. ह्या प्रकरणाच्या पूर्वभागांतील माहिती ले. ४९२ च्या ' मेतकांत ' आली आहे सबब तो मात्र घेतला नाहीं.

पुण्यांत पळण झाली. सखाराम बापू बोकील सरकारांत इतराजींत येऊन कैद झाले; फाल्गुनमासीं. शके १७०१.

वसई सरकारांत होती ती इंग्रजानें घेतली १७०३.

श्रीमंत माधवराव यांचें लग्न माघ शुद्ध ९ स पुण्यांत झालें. कृष्णाजी बहिरव थत्ते यांची कन्या सौभाग्यवती रमाबाई साहेब केली. शके १७०५. फ० स० ११८४.

श्रीमंत रघुनाथराव दादासाहेब मार्गशीर्ष वद्य [पक्षीं] गंगातीरीं मौजे सितापखेडें प्रा धरणगांव प्रांत कुंभारी एथें शांत झाले, ते समयीं मातोश्री आनंदीबाई गरोदर होती. पुढें चिमाजीआपा यांचा जन्म जाला.

इंग्रजानें वसई घेतली होती ती पुनः सरकारांत घेतली.

मातोश्री पार्वतीबाई साहेब यांसि देवाज्ञा झाली. श्रावण वद्य ३ शके १७०६.

चिमाजीआपा यांचा जन्म चैत्र शुद्ध ९ स झाला. शके १७०७.

श्रीगोदेस महापूर येऊन गांव वहावले. तीन महिने श्रावण मासापासून दीड पायलीची धारण झाली. पुढें स्वस्तता जाली. कापिलाषष्ठी पडली. शके १७०९.

श्रीगंगातीरीं नाशिकाकडे वगैरे थंडी फार पडली त्यानें मोठे वृक्ष सुद्धां जळाले.

सरकारचे वाड्यांत थोरले चौसोंपीस बांधावयाचा प्रारंभ केला. कार्तिक वद्य १२.

सदाशिव दीक्षित दांत्ये यांस मार्गशीर्ष वद्य २ स देवाज्ञा झाली. तात्या पेंडसे यांस माघ वद्य ३ स देवाज्ञा झाली. श्रीमंत मातोश्री गोपिकाबाईस श्रावण वद्य १ स देवाज्ञा झाली. १७११.

रामशास्त्रीबावा यांस कार्तिक शुद्ध ३ सह ४ स देवाज्ञा झाली. शके १७१२.

राजश्री परशुरामभाऊ पटवर्धन मिरजकर करनाटक प्रांतीं रवाना केले. त्यांनीं सरकारांत धारवाड किल्ला सर केला. मागाहून राजश्री हरि बल्लाळ फडके व मोंगलांची फौज घेऊन टिपूवर गेले. इंग्रज ही चिनापटणाकडून आला. शके १७१३ फ० स० ११९२.

लक्ष्मणराव रास्ते यांनीं नहर आणिला तो पेठेंत श्रावणमासीं दाखल जाला. शके मजकूर.

हरि बल्लाळ व इंग्रज व मोंगल तिघे मिळून बेंगळूर वगैरे ठाणीं घेऊन पटणावर जाऊन हल्ला केला. टिपू जेर होऊन तीन कोटी तिघांस खंडणी देऊन व दीड कोटीचा मुलूक देऊन सल्ला केला. सरकारची फत्ते झाली.

सरकारवाड्याचे चौसोपींची वास्तुशांत वैशाख वा ७ स झाली.

वैशाख वा १ स तिसरे प्रहरीं पर्वतीस कार्तिक स्वामीचे देवालयावर वीज पडली. श्री देवास धक्का लागला नाहीं.

नाना फडणीस यांचा नहर पुण्यांत सदाशिव पेठेंत हौदांत मुहूर्तानें सोडला. मिति ज्येष्ठ वद्य ५. तेच दिवशीं तिसरे प्रहरीं सरकारची सातखणी व बंगला कोठीस अग्न लागून जळालीं.

घाशीराम कोतवाल यानें ब्राह्मण मारिले, सबब भाद्रपद शुद्ध प्रतिपदेस रात्रीस धरून

आणिला. दुसरे दिवशीं दोन प्रहरीं शहरांत धिंड काढून गारपिरावर ब्राह्मणांकडून मारविला, १७१४ फ० स० ११९३.

हरि बल्लाळ फडके कर्नाटकांतून चैत्रमासीं पुण्यास आले. तेच सालीं महादजी शिंदे हिंदुस्थानांत मोठे मोठे संस्थानी होते त्यांस मोडून दिल्लीस नवा पादशहा बसवून श्रीमंत पंत प्रधान यांचे नांवें वजिरी व कांहीं मरातब व नालकी घेऊन ज्येष्ठमासीं पुण्यास आले. श्रीमंतांचें दर्शन घेऊन वजिरीचीं वस्त्रें वगैरे सर्व आणिलीं होतीं तीं निवेदन करून समारंभानें नालकींत श्रीमंतांस बसवून स्वारी करून शहरांत मिरवत आले. नंतर श्रीमंतांनीं वजिरी, दिवाणगिरी, व मोरचल व दुसरी पालखी महादजी शिंदे यांस दिली. वानवडीवर मुक्काम करून राहिले. तेच वर्षी ज्येष्ठापासून महागाई चार शेरांची धारण मुलकांत जाली. शके १७१५ भाद्रपद पावेतों होती. शहरांत माणसें फार मेलीं. पुढें स्वस्ताई झाली. श्री ओंकारेश्वर याचे देवालयांत नदीचें पाणी पुराचें आलें. श्रीमंत रमाबाई यांस माघ वा। १४ स शके १७१५ फ० स० ११९४ सालीं देवाज्ञा झाली.

महादजी शिंदे यांस माघ शुद्ध १३ स देवाज्ञा झाली. पाटील बाबा यांचे बंधु तुकोजी यांचा पुत्र अमृतराव यांचा पुत्र दौलतराव यांस मरणाचे पूर्वी पुत्र म्हणविलें होतें. तेरावे दिवशीं श्रीमंतांनीं सरदारीचीं वस्त्रें दौलतराव यांस दिलीं.

फाल्गुन वद्य ११ स मातोश्री आनंदीबाईस देवाज्ञा झाली. आनंदनाम संवत्सर (४८) शके १७१६ फ० स० ११९५ खमस तिसैन मया व अल्फ.

श्रीमंत माधवराव नारायण मार्गशीर्ष मासीं खासा स्वारी समागमें शिंदे होळकर वगैरे तमाम फौजा घेऊन निजाम अल्लीखान याजवर चढाई करून शिना नदीवर गेले तेथें मोंगलांची गांठ खर्ड्यानजीक पडोन लडाई झाली. मोंगल शिकस्त होऊन पळोन खर्ड्यांत गेला. मश्रुलमुल्क मोंगलांचा दिवाण व तीन कोटी रुपये खंडणी व तीस लक्षांची जहागीर दौलताबाद किल्ला सरकारांत घेऊन शके १७१७ वैशाख शुद्ध १३ स कैद करून..... हरि बल्लाळ फडके यांस सिद्धटेकास शुद्ध ७ स देवाज्ञा झाली. राक्षसनामसंवत्सर शके १७१७, सन ११९६ त तिसैन मया व अल्फ.

श्रीमंत माधवराव साहेब यांनीं आश्विन शुद्ध १२ रविवारीं श्रीगणपतीचे रंगमहालावरून उडी टाकिली. त्यानें पाय मोडला. शुद्ध १४ सह १५ स अस्तमानीं देवाज्ञा झाली. नाना फडणीस यांचे मनांत दत्त पुत्र देऊन पूर्ववतप्रमाणें चालवावें म्हणून आग्रह धरून चार महिने चालविलें. शिंदे यांचे कारभारी बाळोबा पागनीस यांचे विचारास न ये. सबब शिंदे फौज सुद्धां गंगातीरास गेले. म्हणून नाना फडणीस यांनीं राजेश्री परशुराम भाऊ वगैरे यांस पाठवून उभयतां श्रीमंत माघ वद्य ५ स पुण्या नजीक खडकीचे पुलाजवळ आणिले. पंधरा दिवस मुक्काम त्याच ठिकाणीं होता. शिंदे ही फौज सुद्धां भेटीस आले. तेव्हां त्यांचे भयानें नाना पळून सातान्यास गेले. श्रीमंत व शिंदे यांच्या भेटी झाल्या. फाल्गुन वद्य २ स वाड्यांत स्वारी येऊन एक दिवस राहून उदकाचे दुकाळासुळें स्वारी माघारी जाऊन खडकीवर राहिली.

मुकाम वीर एकलपूर नजीक जेजुरी एथें ब्राह्मणाचे घरीं माघमासीं गाय माणसा-सारखी तीन दिवस रडत होती.

मौजे बेलसर नजीक जेजुरी ऐथें कऱ्हेच्या तीरीं करांगळी एवढी रक्ताची धार वाहिली. माघमासीं नळनाम (५०) संवत्सर शके १७१८ सन ११९७ सबां तिसैन मय्या व अलफ.

दौलतराव शिंदे रुसले, म्हणून श्रीमंत बाबासाहेब समजुतीस गेले. तेथें त्यांनीं अट-काव करून ठेविले. मागें परशुराम भाऊ व बाबा फडके यांनीं चिमाजी आपास बला-त्कारें पालखींत घालून वैशाख वद्य १० स दत्तविधान केलें. त्रिंबकराव अमृतेश्वर थत्ते यांस पाठवून शाहूराजे यांजपासून वस्त्रें आणून चिमणाजी माधवराव जहाले. परशुराम भाऊ कारभार करूं लागले. यांनीं मश्रुल सोडिला. नाना फडणीस यांनीं ..... मा.....काहून परत आले. जहागीर मोंगलाची सुटली. कालयुक्तनाम-संवत्सर शके १७२० सन ११९९ तिस्सां तिसैन मय्या व अलफ.

शिंदे यांचें व बायांचे न बने,झाडून फौज बायांकडे जाली. पूढें लढाई जाली. नंतर बाया मिरज प्रांतीं गेल्या.तेथून वाईस आल्या. तेथें समजूत पडली.नंतर बाया ब्रह्मणपुरास गेल्या.

गोविंदराव काळे व शिवराम नारायण थत्ते पौष शुद्ध ८ स कैद केले.

श्रीमंत विनायकराव यांचा व्रतबंध माघ शुद्ध १३ स जाला. चैत्र वैशाख मासीं टोळ अति होते. झाडास पान राहिलें नाहीं. नाना फडणीस शिंदे यांचे कैदेंतून सुटून श्रावणमासीं पुण्यास आले. सिद्धार्थीनाम संवत्सर शके १७२९ सन १२०० मयातैन व अलफ.

श्रीरंगपट्टण इंग्रजानें टिपूस मारून वैशाख वद्य ३ स घेतलें. नाना फडणीस यांस फाल्गुन वद्य ३ स देवाज्ञा जाली. सरकार वाड्यांत शागीर्द होता तो जिनगर निघाला, सबब आश्विन ६ स त्यांचें पारिपत्य केलें, आणि शहरास प्रायश्चित दिलें. परशुराम भाऊ भाद्रपद वद्य ४ स कोल्हापूरकर यांचे लढाईत ठार मेले.

यशवंतराव होळकर व शिंदे यांजकडील पलटणें यांची लढाई पुण्या नजीक होऊन शिंदे यांचा मोड झाला, सबब बाजीराव साहेब महाडास पळून गेले. तेथून सुवर्णदुर्गास गेले. तेथून वसईस गेले. बाजीराव साहेब यांनीं इंग्रजाशीं सल्ला करून इंग्रजांस बरोबर घेऊन वैशाख वद्य ९ शके १७२६ शर्की पुण्यास दाखल जाले. श्रावणमासीं मोठी महागाई होऊन तीन मापटीं म्ह० दीडशेर कैली दाणे रुपयास धारण झाली.माणसें फार मेलीं. शके १७२६

श्रीत्रिंबकेश्वरची अर्चा बाजीराव यांनीं माघमासीं केली शके १७२८.

शेंडेनक्षत्र मार्गशीर्ष मासीं निघत होतें. शके १७२९.

गतभर्तृका स्त्रिया यांचें क्षौर नाकझरीवर पुण्यांत श्रावण शुद्ध १२ स केलें. यशवंत-राव होळकर यांस कार्तिक शुद्ध १३ स देवाज्ञा जाली.

शेंडेनक्षत्र आश्विनमासीं धूमकेतु निघाला. धरणीकंप फाल्गुनमासीं शुद्ध १२ जाला. १७३३.

फाल्गुन शुद्ध १२ स सरकार वाड्यास अग्न लागून बंगला व कोठी जळाली.१७३४+ (मूळ प्रतींचें) हस्ताक्षर गोविंद रघुनाथ वाडदकर रहाणार कसबे भिंवडी प्रगणें साकसें प्रांत कल्याण भिंवडी हल्लीं वस्ती कसबे भिंवडी तालुके वसई, यांचें असे. सु. स. इहिदे सल्लासीन मयातैन व अल्फ (१७३१) माहे मार्गशीर्ष शुद्ध ५ शनिवारीं सकाळीं लिहिली. कोणी घेऊं नये. इंग्रेजी ता० २० माहे नवंबर सन १८३० संवत १७८४ विकृतिनाम संवत्सरे.

समाप्त.

ले. ४९१]
[४९३]}

पेशवे यांची वंशावळ.

बाळाजी विश्वनाथ यांस वर्षें शके १६३५ माघमासीं झालीं. नंतर शके १६४१ शार्वरीनाम संवत्सरीं चैत्र शुद्ध ७ स सासवड मुकामीं शांत झाले.

बाजीराव बल्लाळ यांस शके १६४२ वैशाखमासीं वर्षें झालीं. नंतर पुढें शके १६६२ रौद्रनाम संवत्सरीं रेवातीरीं मुकाम काकडें येथें शांत झाले.

बाळाजी बाजीराव यांस शके १६६२ त वर्षें झालीं. नंतर पुढें शके १६८३ ज्येष्ठ वद्य ९ स प्रहर रात्रीं पर्वतीस शांत झाले.

माधवराव बल्लाळ यांस शके १६८३ वृषनाम संवत्सरीं आषाढ वद्य ३ स वर्षें झालीं. पुढें शके १६९४ विकृतिनाम संवत्सरीं कार्तिक वद्य ८ स थेउरास प्रातःकाळीं प्रहर दिवसास शांत झाले. स्त्री रमाबाई अग्निप्रवेश झाली.

नारायणराव बल्लाळ यांस शके १६९४ मार्गशीर्ष वद्य ४ रविवारीं दोन घटका रात्रीस वर्षें झालीं. नंतर पुढें शके १६९५ भाद्रपद शुद्ध १३ दोन प्रहरीं सुमेरसिंग व खरगसिंग व तुळाजी पवार यांनीं मारिलें.

रघुनाथ बाजीराव यांस शके १६९५ त वर्षें झालीं. पुढें शके १७०५ मिति मार्गशीर्ष वद्य ३ स शांत झाले.

माधवराव नारायण यांचा जन्म शके १६९५ मिति आधिक वैशाख शुद्ध ७ दोन प्रहरीं झाला. पुढें शके १७०१ चैत्र शुद्ध १ स वर्षें झालीं. नंतर पुढें शके १७१७ आश्विन शुद्ध १२ स दिवाणखान्यांतून तिसरे खणांतील माडीवरून उडी टाकिली. तिसरे दिवशीं शुद्ध १४ स शांत झाले.

चिमणाजी माधवराव यांस शके १७१८ नलनामसंवत्सरे वैशाख शुद्ध ३ प्रहर दिवसास वर्षें झालीं.

+ ही शकवार माहिती रा० रा० अंताजी रामचंद्र हरडीकर यांनीं महाडाहून ता २४ अकटंबर १८८३ रोजीं पाठविली. तिचें हस्ताक्षर रा० नारायण बळवंत हरडीकर यांचें आहे.

बाजीराव रघुनाथ यांस शके १७१८ मार्गशीर्ष शुद्ध ५ भानुवासरीं श्रवणनक्षत्रीं रात्रौ वर्त्तें झालीं. षष्ठस्थानीं चंद्र.

सातारचे राजे यांची वंशावळ.

शके १५९६ आनंदनाम संवत्सरे ज्येष्ठ शुद्ध १३ स राज्याभिषेक [शिवाजी महाराज यांस] झाला. समाप्त झाले चैत्र .....

संभाजी शिवाजीचे पुत्र सिंहासनारूढ श्रावण शुद्ध ५ शके १६०२ रौद्रनाम संवत्सरीं. शके १६१० फाल्गुन वद्य ३० स तुळापुरीं औरंगजेब पादशहा याचे लष्करांत शांत झाले. शके १६०८ त धरून नेले. पुढें भालेराई झाली.

शाहू संभाजीचे लेंक सिंहासनारूढ झाले शके १६२९. शके १६७१ मार्गशीर्ष वद्य ३ स समाप्त झाले.

रामराजे दत्तक शके १६७१ पासून पुढें शके १६९९ मार्गशीर्ष शुद्ध १० स समाप्त झाले.

शाहू राजे दुसरे दत्तक सिंहासनारूढ झाले. शके १७०० मार्गशीर्ष वद्य ७ स पुढें वैशाख शुद्ध ९ शके १७३० विभवनामसंवत्सरीं समाप्त झाले.

शाहू राजे तिसरे सिंहासनारूढ झाले शके १७३० विभवनामसंवत्सरे मिति वैशाख शुद्ध १३ स. ते समयीं पहिलें नांव टाकून शाहूच ठेविलें. सबब दुसरे शिक्के फिरविले नाहींत.

ले. ४९२ सन १८३२

[३३२]

श्री.

यादी पेशवे यांनीं पेशवाईचा उपभोग कधीं पासून कसा केला त्याची अनुक्रमणिका जुने कागदावरून लिहिली. सुरूसन सल्लास सल्लासीन मयातैन व अलफ.

बाळाजी विश्वनाथ यांसि पेशवाईचीं वर्त्तें शाहू छत्रपति यांनीं शके १६३५ विजयनाम संवत्सरे सन ११२३ फसली अर्बासन अर्बाअशर मया व अलफ या सालीं माघमासीं जहालीं. त्यांनीं सात वर्षें कारभार केला. त्याचा विस्तार——वर्षे.

१. प्रथम सालीं वर्त्तें जाहलियानंतर स्वारी कोकणांत कानोजी आंगरे यांजकडे जाऊन, भेटी होऊन सलूख जहाला. लोहगड कोरीगड वगैरे किल्ले घेतले. लोहगडास बाहिरो मोरेश्वर पिंगळे अटकेस होते. त्यांस घेऊन सातारियास आले.

१. सन रंवमस अशर मया व अलफ, सन ११२४ शके १६३६ जयनाम संवत्सरे, या सालीं तमाम रयतेस कौल दिल्हा, आणि आबादी केली.

१. सनसीत अशर मया व अलफ. या सालीं सासवडास वगैरे ठिकाणीं होत.

१. सन सबां अशर मया व अलफ. स्वारीस सहकुटुंब निघोन दमाजी थोरात यांची भेट होऊन हिंगणगांव नजीक दमगडास अटकेंत होते.

१. सनसमान अशर, थोरातास खंड देऊन मुलें माणसें ठेऊन स्वारी दिल्लीस गेली.

२ सन तिसां अशर शके १६४० कोटिहोम केला. दिल्लीहून स्वारी येऊन थोरातांचें पारिपत्य केलें. आणि स्वारी सातारियास गेली. ते सन अशरीन सातारियास होते,

१. सन इहिदे अशरीन मया व अलफ, शके १६४२ शार्वरीनाम संवत्सरे सासवडास निधन जाले.

—

७

बाजीराव बल्लाळ यांचा कारकीर्द—वर्षे.

१. सन इहिदे अशरीन मया व अलफ, शके १६४२ शार्वरी संवत्सरे छ० २० जमादिलाखर वर्षे जाहली स्वारी देशीं.

१.सन इसन्ने अशरीन. स्वारी बऱ्हाणपूर भडभुंज्याचें पारिपत्य केलें.

१. सन सल्लास अशरीन. गोदऊचें पारिपत्य केलें.

१. सन आर्बा अशरीन. सैद याचे पारिपत्य केलें.

१. सन खंमस अशरीन औरंगाबादेस किलीजखान यांचा भेट; दाऊदखान वगैरेचें पारिपत्य केलें.

२. सनसीत अशरीन. दिल्लीस स्वारीस गेले. बराबर अंबाजीपंत पुरंदरे मुख्यत्वें होते. ते सनसबां अशरीनांत दिल्लीहून सातारियास आले.

१. सनसमान अशरीन. सातारियास होते.

१. सनतिसां अशरीन. स्वारीस आपासाहेब. हिंदुस्थानांत दया बहादूर याजवर गेले. बाजीराव यांस पुत्र जहाला. दमाजी गाईकवाड याचें पारिपत्य केलें.

११. इा सनसल्लासीन मया व अल्फ ता सन आर्बैन मया व अल्फ. अकरा वर्षे स्वारी शिकारी करून स्वामी सन्निध राहून कृपा संपादन होते. या सालांचा तपशील लागला नाहीं. कर्नाटकांत मोंगलावर अशा स्वाऱ्या जाल्या असतील.

० सन इहिदे आर्बैनांत रेवातीरीं निधन पावले.

—

२०

बाळाजी बाजीराव नाना साहेब.

कित्ता.

१. सन इहिदे आर्बैनांत [११४१] वर्षे जहालीं. सातारियास होते.

१. सन अर्बा आर्बैनांत [११४४] स्वारी भोंसलें पायागडावरून उज्जनीस

कित्ता.

२. सन इसन्ने आर्बैन [११४२] हिंदुस्थानांत गढेमंडळे येथील खंडणी घेऊन मखसुदाबादेस जाऊन भागिरथीस्नान करून, सन सल्लास आर्बैन [११४३] पुण्यास आले.

खंडणी घेऊन स्वारी माघारी आली. भाऊसाहेब कोकणांत किल्ले पहावयासि गेले.ते सालीं बयबाईचें लग्न जहालें.

१. सनसीत आबैंन [११४६]सातारा मुक्कामीं होते. जनार्दन बाजिराव निजधामास गेले.

१. सन समान व सनतिसां [११४८ ४९] देशीं होते. लहान स्वारी शिकार केली असेल. सर्व राजकारण सातारा येथें होत असे.

१. सन इहिदे खमसेन [११५१] खांसा व भाऊ बरोबर. स्वारी कर्नाटक सावनूर पावेतों गेले. पुढें महादोबा पुरंदरे रवाना केले. स्वारी पुण्यास आली. दमाजी गाईकवाड सातारियास आले. पुढें माहादोबाही आले. अखेर साली.

१. सन सल्लास खमसेन [११५३] खांसा व भाऊ व दादा नाशीक पावेतों गेले. पुढें खांसा व भाऊ कोकणांतून पुण्यास आले. दादासाहेब अमदाबादेस जाऊन, ती घेऊन आले. थाळनेरास होळकर सुद्धां मिळोन हिंदुस्थानांत गेले.

१. सन खमस खमसेन [११५५] स्वारी कृष्णे पावेतों जाऊन आले. पुढें सिंहस्थ सबब नाशिक त्रिबकास गेले. दादासाहेब हिंदुस्थानांत.

१. सन सबां खमसेन [११५७] खांसा स्वारी श्रीरंगपट्टणास गेली. बराबर भाऊसाहेब होते. दादासाहेब लाहूरचे स्वारीस गेले. तोफा रात्रौचा रिवाज चालू.

१. सन समान खमसेन [११५८] खांसा स्वारी व भाऊ बरोबर तांदुळजे पर्यंत जाऊन नबाबापासून पंचवीस लक्षांची जागीर घेतली. दादासाहेब लाहूरचे स्वारीस होते विश्वासराव साहेब यांचा जन्म इसन्ने आबैंनांत जहाला.

१. सन सबां आबैंन [११४७] स्वारी कर्नाटकांत जाऊन बहादूरबिंडा घेऊन पुण्यास आले. ताई यात्रेहून आली.

१. सन खमसेनांत [११५०] स्वारी सातारे येथें होती. शाहूमहाराज निजधामास गेली. व उमबाई निधन पावली.

१. सन इसन्ने खमसेन [११५२] खांसास्वारी पुण्यांत भाऊसाहेब सांगेले पावतों गेले. मागें उमाबाई दाभाडीमुळें माघारी फिरोन चऱ्होलीस भेटी जहाल्या. पुढें गाजुदिखान आला. गंगथडीवरून गेले. पुढें नासरजंग व रामदासपंत आले. लढाई जहाली. बाबूराव फडणीस यांस गोळा लागला.

१. सन अर्बा खमसेन [११५४] खांसा व भाऊ माधवराव यांचें लग्न करून कर्नाटकांत गेले. तरदळ व जमखंडी घेऊन स्वारी माघारी आली. दादासाहेब हिंदुस्थानांत कुंभेरीस गेले.

१. सन सीत खमसेन [११५६] नारायणराव यांचा जन्म. पुढें स्वारी कर्नाटकांत सावनूर पावेतों जाऊन अखेरीस पुण्यास आले. दादासाहेब कुंभेरीहून देशीं आले. स्त्री जानकी बाई प्रसूत होऊन मृत्यु पावली.उपरांतिक गलगल्यास दुसरें लग्न करून सावनुरास स्वारींत मिळोन बरोबर आले. तुळाजी आंगरे यांसि धरून आणिलें.

१. सन तिसा खमसेन. [११५९] खांसा स्वारी कोकणांत पुळ्यांचे गणपतीस गेली. मातोश्री ताई मृत्यु पावली. भाऊसाहेब पुण्यांत होते. दादासाहेब लाहूरचे

१. सन सितैन. [११६०] खांसा स्वारी व दादासाहेब तांदूळज्याचे मुक्कामीं मोगलापासून साठ लक्षांची जहागीर घेऊन माघारे आले. तेच सालीं भाऊसाहेब व विश्वासराव साहेब नगरचा किल्ला घेऊन हिंदुस्थानांत गेले.

स्वारीहून दसरियास देशीं आले. तेही पुळ्याचे गणपतीस गेले.

१. सन इद्दिदे सितैन [११६१] खांसा वारी मार्गशीर्षमासीं पैठणास लग्न केलें. पुढें पाणीपतचें वर्तमान विपरीत आलें. सबब हिंदुस्थानांत खेचिवाड्या पावेतों जाऊन माघारे पुण्यास आले. भाऊसाहेब पाणीपतास गर्द झाले. फौज गारद जहाली. दादासाहेब गु ट म ट क ला कडे जाऊन अखेर सालीं पुण्यास आले. नानासाहेब यांणीं ज्येष्ठ वद्य ६ स कैलासवासी जाले. तेच सालीं कऱ्हीरकर संभाजी राजे शांत जहाले. पुढें पुत्र घेऊन शिवाजी नांव ठेवलें.

नानासाहेबांची कारकीर्द.

माधवराव बल्लाळ थोरले रावसाहेब.

१. सन इसने सितैन [११६२] शके १६८३ वृषानाम संवत्सरे वर्षे जहालीं. यानंतर मोगल उरळीवर आला. त्याजवर स्वारी करून त्यास माघारा लाऊन कितूर पावेतों कर्नाटकांत जाऊन पुण्यास आले. नंतर नारायणराव साहेब यांचा व्रतबंध जहाला.

१. सन सल्लास सितैन मया व अलफ. उभयतां पुण्यास होते. दरम्यान घोडनदीवर खांसा व दादासाहेब दोनी फौजांची लढाई होऊन खांसा हस्तगत जाले. संग्रिध दादा येऊन उभयतां फौजा घेऊन मिरजेस जाऊन मिरज घेऊन भागानगर प्रांतीं गेले. मोंगल पुण्यास येऊन जाळपोळ करून माघारा गंगेवर गेला. तों स्वारी गंगेचे आसपास आली. सरंजाम लोकांस दिल्हे. सिंहगडास नारायण राव साहेबांचें लग्न झालें.

१. सन अर्बा सितैन मया व अलफ. खांसा व दादासाहेब भागानगरच्या पेठा जाळून गंगेनजीक आले. राक्षसभुवनावर मोंगलाशीं लढाई होऊन त्याची खराबी जाली. तो पळून औरंगाबादेस गेला. उपरांत स्वारी पुण्यास आली. पुण्याहून [दादा] साहेब आनंदवल्लीस गेले. दोन तीन महिने झाल्या नंतर स्वारी कर्नाटकांत धारवाडास गेली. तेथें छावणी जाली.

१. सन खमस सितैन मया व अलफ खांसा स्वारी धारवाड घेऊन पुढें गेले. हैदरखानापासून खंडणी घेतली. तों दादासाहेब आनंदवल्लीहून कर्नाटकांत येऊन स्वारींत मिळाले. नंतर उभयतां पुण्यास आले.

१ सनसीत सितैन मया व अलफ खांसा स्वारी भोंसल्यावर जाऊन पुढें गंगापुराकडून पुण्यास आले. दादासाहेब श्रावणमासचीं दक्षिणा होऊन आनंदवल्लीस गेले. तेथून हिंदुस्थानांस

जावयास निघाले. ते खांसा स्वारींत मिळाले. नंतर पुढें गोहदेस गेले. तेथें छावणी जहाली. रामचंद्र गणेश खांसा स्वारींतून फौजेसुद्धां भवानराव प्रतिनिधीवर जाऊन त्यास घेऊन आले.

१ सन सबां सितैन मया ब अलफ. खांसा स्वारी कर्नाटकांत जाऊन सिरे. मदगीर व खंडणी घेऊन अखेरीस पुण्यास आले. दादासाहेब गोहदेस छावणीस होते. ते पुढें अखेरीस देशी आनंदवल्लीस आले.

१ सन समान सितैन मयां व अलफ. स्वारी दक्षणा श्रावणमासचीं होऊन आनंदवल्लीस जाऊन दादासाहेबांस भेटून पुण्यास आले. अखेरीस मागती गंगातीरास धोडपपावेतों गेले. दादासाहेब आनंदवल्लीस होते. पुढें वैशाखमासीं अमृतराव यांस घेऊन, आणखी फौज धरून, स्वारीस धोडपे पावेतों गेले. आणि खांसा व आपण पुण्यास आले. गोपाळराव गोविंद मिरजकर फौज घेऊन कर्नाटकांत गेले होते, ते अखेरीस गंगातीरास स्वारींत मिळाले.

१ सन तिसां सितैन मयां व अलफ खांसा व दादासाहेब पुण्यांतच होते. श्रावणमासचीं दक्षणा जहालियानंतर आपण भोंसल्यावर गेले. विसाजी कृष्ण व रामचंद्र गणेश यांसि हिंदुस्थानांत फौज देऊन रवाना केलें.

१ सन सबैन मया व अलफ.खांसा स्वारी कर्नाटकांत जाऊन निजगल किल्ला घेतला. तेथें नारायणराव साहेब यांचे हातास गोळी लागली. तेथें त्रिंबकराव मामास फौज सुद्धां छावणीस ठेऊन अखेर सालीं पुण्यास आले. विसाजी कृष्ण व रामचंद्र गणेश व शिंदे होळकर हिंदुस्थानांत.

१ सन इहिदे सबैन मया व अलफ. खांसा स्वारी कर्नाटकांत जाण्यास निघाली. ते तांदुळवाडी प्रांत वांई पावेतों गेली. तेथें समाधान नाहींसें झालें. सबब कृष्णराव बळवंत यांजबरोबर दहा हजार फौज देऊन त्रिंबकरावमामाकडे पाठविलें आणि खांसा पुण्यास आले. त्रिंबकरावमामा कर्नाटकांत होतेच. रामचंद्र गणेश, शिंदे, होळकर हिंदुस्थानांत.

१ सन इसने सबैन मया व अलफ. खांसा स्वारी गंगातीरास कटोरे पावेतों जाऊन नगरावरून पुण्यास आले. मागाहून नारायणराव साहेबही कटोरे यास येऊन स्वारींत मिळाले. रामचंद्र गणेश व शिंदे व होळकर यांस हिंदुस्थानांतून माघारे खांसा स्वारींत आणविले. हिंदूस्थानांत विसाजी कृष्ण बिनीवाले राहिले. त्यांणीं नजीबखान मोडिला. तेच सालीं राधाबाई *निजधामास गेली.

१ सन सल्लास सबैन मया ब अलफ त्रिंबकरावमामा हैदरखान यांजपासून खंडणी घेऊन भाद्रपदमासीं पुण्यास आले. खांसास्वारी कटोरियाहून पुण्यास आले. बागेंत राहिलें होते. तेथून निघोन थेवरास गेले. अत्यंत दुखणें जालें, येणेकरून कार्तिक वद्य ८ कैलासवासी

---

* नानासाहेबाची बायको वाखरे यांजकडील, लग्न २७-१२-१७६० व मृ.१९-११-१७७०.

झाले. रमाबाईसाहेब यांणीं सहगमन केलें. दादासाहेब व नारायणरावसाहेब संनिधच होते. पुढें पुण्यास आले.

—
१२

नारायणरावसाहेब

१ सन सलास सबैनात मार्गशीर्षमासीं वर्षे झालीं. नंतर गंगापुरास गोपिकाबाईसाहेब यांस भेटावयास गेले. भेटून माघारे पुण्यास आले.

१. सन आर्बा सबैनांत भाद्रपदमासीं गाडद्यांचा दंगा होऊन वाड्यांतच मारले गेले. शके १६९५.

—
२

दादासाहेब यांस वर्षे सन आर्बा सबैनांत अश्विनमासीं वर्षे आणविलीं. नंतर दसरा करून स्वारीस निघाले ते बेदराहून बल्हारीपावेतों गेले. बिसाजी कृष्ण हिंदुस्थानांतून आश्वीनमासीं पुण्यास आले. त्रिंबकरावमामा यांस साबाजी भोंसले याचे पारिपत्यास रवाना केलें. व हरी बल्लाळ याजबरोबर फौज जमावून स्वारी झाली. सरासरी मिळून दादासाहेब कारकीर्द.... ... ...वर्षे १

माधवराव नारायण सवाई—कारकीर्द वर्षे

१. सन आर्बा सबैन या सालांत राज कारणें जालीं:—

१. माघमासीं पार्वतीबाई साहेब व गंगाबाई साहेब पुण्याहून निघोन पुरंदरास गेलीं. तेथून सर्व बंदोबस्त जाला. खाशांचा जन्म अधिक वैशाख मास शके १६९६ शुद्ध ७ स जहाला. वर्षे सातारियाहून आणविलीं.

१. त्रिंबकरावमामा व मोंगल मिळाले. दादासाहेबांचे मागें लागले. पंढरपुरा नजीक लढाई होऊन मामांस धरिलें. चैत्रमासीं.

१. हरि बल्लाळ फडके मामांस धरिल्यावर फौज सुद्धां दादासाहेबांचे मागें लागले.

—
३

१. सन खंमस सबैन.

१. खांसा स्वारी पुरंदरास.

१. हरि बल्लाळ खानदेशांतून गुजराथेंत गेले.

१. सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन बऱ्हाणपुरा पावेतों दादांचे तहाकरितां गेले. मार्गशीर्ष मासीं साष्टीचा किल्ला इंग्रजांनीं घेतला. विसाजी कृष्ण कुमकेस गेले, ते अखेरीस पुण्यास आले.

—
३

१. सन सीत सबैन.
१. खांसा स्वारी पुरंदरास.
१. होळकर, शिंदे देशीं आले.
१. हरि बल्लाळ गुजराथेंत.
१. रामचंद्र गणेश तळेगांवीं जाऊन करवीरास गेले.
१. कोन्हेरराव पटवर्धन कर्नाटकांत गेले.

५

१. सन सबां सबैन.
१. खांसा स्वारी पुरंदरास.
१. हरि बल्लाळ गुजराथेंतून येऊन कर्नाटकांत गेले.
१. बाजी गोविंद तोतया आंगरे यांनीं व सरकार फौजेनें धरिल्यावर कोंकणातून घुमट शिराळे यावर रामचंद्र गणेश होते त्यांजकडे गेले.
१. पांडुरंगराव गोविंद कर्नाटकांत गेले. ते हैदरखानानें धरून नेले.
१. भीवराव पानशी कोकणांत बंदोबस्तास गेले.

५

१. सन समान सबैन.
१. खांसा स्वारी पुरंदरास.
१. हरि बल्लाळ कर्नाटकांत शिरेटीस.
१. शिंदे वगैरे करविरास.
१. मोरो बाबूराव फाल्गुन अखेर कारभार करूं लागले, ते पुरंदरीं गेले.
०. गंगाबाई साहेब निजधामास गेलीं.
१. रामचंद्र गणेश करविराहून आले ते कोरेगांव पावेतों गेले.

५

१ सन तिसां सबैन.
१. खांसा स्वारी पुरंदराहून वैशाखमासीं व्रतबंधा करितां पुण्यास आली.
१. इंग्रज व दादा साहेब तळेगांवास आले. त्यांचा तह होऊन झांशीस रवाना झाले. ते नर्मदा तीराहून मागती गुजराथेंतून मुंबईकडे गेले.
१. सरकारी फौज इंग्रजांचे पारपत्यास तळेगांवा नजीक गेली. हरिबल्लाळ कर्नाटकांतून अब्वलीस पुण्यास आले.

३

१. सय समानान.

१. खांसा स्वारी पुण्यास.

१. सरकारचे डेरे गारपिरावर जाले. बाजी गोविंद,कल्याण इंग्रजानें घेतलें सबब कोकणांत गेले.

—

२

१. सन इहिदे समानीन.

१. खांसा स्वारी पुणें गडबडी मुळें माघमासीं पुरंदरास गेले.

१. इंग्रज बोरघाट चढोन आला,त्याचें पारपत्य जालें.वसई किल्ला इंग्रजानें घेतला. लढाई जाली. रामचंद्र गणेश ठार जाले. त्यांचे पुत्र माधवराव व बाजी गोविंद गुजराथेंतून आले व गणेश विश्वनाथ गुजराथेंतून आले.

—

२

१. सन इसने समानीन. खांसा स्वारी पुणें. गणेश विश्वनाथ बेहरे खानदेशांतून आले ते निर्मळास मोगलाचे कुमकेस गेले.

१. सन सल्लास समानीन खांसा स्वारी पुणें.--प्रथम लग्न जालें.

१. सन आर्बा समानीन. खासा स्वारी पुणें. दादा साहेब इंग्रजाकडे गेले होते ते सुरतेहून आले. पुढें मार्गशीर्षमासीं कैलासवासी जाहाले. याच सालीं पार्वतीबाई व सगुणाबाई निधन पावलीं. बाळाजी जनार्दन व हरि बल्लाळ येदगिरीस मोंगलाचे भेटीस गेले. इंग्रजांचा तह होऊन गुजराथ मुलुख सुटला.

१. सन खंमस समानीन. खांसा स्वारी गंगापुरास बाईस भेटून आले. भाऊसाहेब यांचा पालाशविधी केला. बाळाजी जनार्दन मोंगलास भेटून अब्वलीस नंतर हरी बल्लाळ गंगापुरास गेले.

१. सनसमानीन खासा स्वारी पुणें; बाळाजी जनार्दन व हरी बल्लाळ कर्नाटकांत गेले. ते नाना बदामीहून माघारे आले; हरी बल्लाळ पुढें गेले.

१. सन सबा समानीन. खासा स्वारी पुणें. हरि बल्लाळ कर्नाटकांतून अखेर सालीं पुयास आले.

१. सन समान समानीन. खासा स्वारी गंगापुरास जाऊन आली. अल्ली बाहादूर हिंदुस्थानांत रवाना केले, व होळकर ही रवाना केले. ते सालीं शिंदे यांजवर रांगडे फिरून पडले सबब.

१. सन तिसां समानीन, खांसा स्वारी पुणें. श्रावणमासीं गोपिकाबाई साहेब यांणीं कैलासवास केला; दक्षणा पुढें जाहली,

१. सन तिसैन, खांसा स्वारी सिंहस्थ सबब त्रिंबकेश्वरास जाऊन पुण्यास आले.

१, सन इहिदे तिसैन, खांसा स्वारी पुणें, परशराम रामचंद्र कर्नाटकांत होते, ते धारवाड घेऊन पुढें गेले, हरि बल्लाळ माघमासीं कर्नाटकांत इंग्रजाचे कुमकेस गेले.

१. सन इसने तिसैन खांसा स्वारी कन्यागत निमित्य **वांई**स गेले, **रा**स्ते यांणीं मोठा समारंभ केला. तेथून राजदर्शनास **सा**तोरियास गेले. हरि बल्लाळ व **पर**शराम **राम**चंद्र **श्री**रंगपट्टण पावेतों गेले, पुढें टिपूशीं खंडणी घेऊन तह केला.

१, सनसल्लास तिसैन. खांसा स्वारी पुणें. दुसरें लग्न झालें, हरी बल्लाळ कर्नाटकांतून अब्बलीस आले. **शिं**दे हिंदुस्थानांतून आले. **पर**शुरामभाऊ तोफखाना घेऊन **कर्ना**टकांतून आले. रंगाचा समारंभ अलौकिक झाला.

१. सनआर्बा तिसैन, **आनं**दीबाई व **म**हादजी **शिं**दे व हरी बल्लाळ फडके त्रिवर्ग याच सालीं मृत्यु पावले. **दौ**लतराव **शिं**दे यांस वस्त्रें झालीं. **गो**विंदराव **गाई**कवाड यास सेनाखासखेल समशेर बहादूर हें पद दिलें.

१. सनखंमस तिसैन. खांसा स्वारी मोगलावर झाली. **भों**सले व **पर**शुराम भाऊ व **हो**ळकर स्वारीबरोबर होते. मुख्यत्वें **दौ**लतराव **शिं**दे यांजकडील **जि**वुबादादा बक्षी **मों**गलाचा पराभव करून **मा**शिरास घेऊन पुण्यास आले, मोठी फत्ते झाली. अलीबहादूर मोठे फौजेनिशीं हिंदुस्थानांत होते.

१. सन सीत तिसैन, खांसा अश्वीन शुद्ध १२ माडीवरून पडून अत्यावस्थ झाले तें शुद्ध १५ कैलासवास केला. राज्याचा शेवट **ना**नासाहेबांचे वंशाचा झाला. ब्रम्हप्रळय होईल, **रा**वसाहेब बोलले, त्याप्रमाणें पुढें निदर्शनास आलें.

२३

ले. ४९३ [४१०] सन १८३३ श. १७५५

श्री.

फेरिस्त नंबर १ सन १०३६ फसली.

यादी चंदावराकडील वंशावळ व राज्यकारकीर्द. मूळ शहाजी महाराज हे दौल्ताबादेकडून शके १५४८ क्षय नाम संवत्सरांत विजापुरीं आले.

त्यांस पुत्र तीन आणि पत्न्या दोन. ज्येष्ठ पत्नी **जि**जाबाईसाहेब **लु**कजी जाधवराव देऊळगांकर यांची कन्या. दुसरी पत्नी तुकाबाई साहेब मोहिते यांची कन्या. तिघां पुत्रांचा तपशील.

जिजाबाई साहेब यांचे पुत्र.

१. ज्येष्ठ पुत्र **सं**भाजी महाराज यांचा जन्म दौलताबादेस **क**नकागिरी [येथें] तोफेचा गोळा लागुन उडाले. त्यांची नकल.

तुकाबाई साहेब यांचे पुत्र.

व्यंकटेशराजे यांचा जन्म **चं**दावरीं जाहला. प्रवृत्ति नांव **य**माजीराजे †यांची स्त्री देशच्या घाडग्याची कन्या **भु**येकर किंवा

† यकाजी किंवा येकोजी असावें.

१. शिवाजी महाराज यांचा जन्म शिवनेरी किल्यावर. हे छत्रसिंहानाधीश जाहाले. यांचा तपशील अलाहिदा आहे.

कागलकर या उभयतांतून कोणीची असेल ती असो .....कलम

३

मूळ पुरुष शहाजी महाराज, एक शिवाजी महाराज स्वदेशीं राज्य व वंशावळ अलाहिदा आहे. यमाजी महाराज यांचा वंश चंदारावकडील मूळ पुरुष. शहाजी महाराज यांचा काळ होदिकरी तुंगभद्रातीरीं शके १५८३ प्लवनामसंवत्सरे माघ शुद्ध ५ रोजीं काळ जाहला.

यमाजीराजे यांस पुत्र तिघे, ज्येष्ठ शहाजीराजे, यांची स्त्री इंगळे यांची कन्या, यांत संतान नाहीं. दुसरे सरफजीराजे यांस स्त्रिया दोन कोयाजी घाटगे याची बहीण, दुसरी शिर्के यांची कन्या एक. उभयतांच्याही पोटीं संतान नाहीं. तिसरे तुकोजीमहाराज हे वंशधर. व्यंकाजी राजपुरुष २ रे.

तुकोजीमहाराज व्यंकाजीचे औरसपुत्र यांस स्त्रिया चार इंगळे यांची कन्या एक मोहिते यांची कन्या एक, नलवडे यांची कन्या एक, व खेबोडेराव यांची कन्या एक.एकूण चार.इंगळे यांच्या कन्येच्या पोटीं बाबासाहेब महाराज पुत्र व एक कन्या,ती शिर्के यांच्या घरीं दिली. मोहिते यांच्या कन्येच्या पोटीं प्रतापसिंह राजे पुत्र एक व कन्या एक ती कन्या मल्हारजी गाढे यास दिली. नलवडे यांच्या कन्येच्या पोटीं चवघी कन्या, चवघी पैकीं एक सटवोजी गाढे यांस दिली. एक पुंजाजी गाढे यांस दिली. सुलतानजी जगताप यांस एक दिली व ठुबे यास एक दिली. खेबोडेराव यांच्या कन्येच्या पोटीं दोघे पुत्र, एक अण्णा साहेब व दुसरे नानासाहेब. उभयतांस संतान नाहीं. बाबासाहेब व प्रतापसिंह असे उभयतां पुत्र. तुकोजी महाराज हे .....पुरुष तिसरे ३.

बाबासाहेब महाराज यांस स्त्रिया तीन, कामराजे घाटगे यांची कन्या एक व बाबूराव इंगळे यांची बहीण एक. यडोहत यांची कन्या तिसरी. घाटगे यांच्या कन्येच्या पोटीं दोघी कन्या मात्र, तिघींसही पुत्रसंतान नाहीं. याचे सापत्न बंधु मोहिते यांच्या कन्येचे पुत्र प्रतापसिंह राजे यांस बायका पांच, प्रथम लक्ष्मणराव मोहिते यांची कन्या एक दुणगो यांची कन्या एक, शिंद्यांची कन्या एक, महाडकाची एक व काटकर याची एक, एकूण पांच. दुणगो यांच्या कन्येच्या पोटीं तुळजा महाराज जाहले. व काटकर यांच्या कन्येच्या पोटीं अमरसिंह महाराज जहाले. मोहिते यांच्या कन्येच्या पोटीं कन्या दोन, एक महाडकांच्या घरीं व एक निंबाळकर यांच्या घरीं अशा दोघी दोघांच्या घरीं दिल्या बाबासाहेब यांस पुत्रसंतान नाहीं. सबब कनिष्ठ सापत्न बंधु प्रतापसिंह महाराज वंशधर यांस पुत्र दोघे. तुळजा महाराज, दुसरे अमरसिंह महाराज. प्रतापसिंह महाराज हे ... ... पुरुष ४ थे.

तुळजामहाराज ज्येष्ठ व अमरसिंह महाराज कनिष्ठ. तुळजामहाराज यांचीं लग्नें चार.

पैकीं महाडकाच्या दोन, इंगळ्यांची एक व मोहित्याची एक एकूण ४ चार. महाडकाच्या कन्येच्या पोटीं कन्या एक जहाली, ती निळकंठराव घाटगे यास दिली. तुळजामहाराजास पत्रसंतान नाहीं. याच्या कारकीर्दीत इंग्रजी जहाली. अंतकाळ समयीं बुवाजी भोंसले याचे भाऊ शहाजी भोंसले यांचा पुत्र दत्तक घेऊन नांव शरफजी राजे ठेवून अमरसिंह बंधु याच्या हातीं पुत्र देऊन तक्तावर बंधूस बसवून त्यांचा काळ जहाला. हे पुरुष ... ... ५ वे.

शरफजी राचे तुळजामहाराजांचे दत्तकपुत्र व सापत्नबंधु अमरसिंह, उभयतां मिळून राज्य करीत असतां अमरसिंह यांस स्त्रिया चार, गोविंदराव गाढे यांची कन्या एक, कृष्णराव गाढे यांच्या कन्या दोन व पिराजी शिंदे यांची कन्या एक, एकूण चार स्त्रिया. गोविंदराव गाढे यांच्या कन्येच्या पोटीं कन्या एक, ती भानजी मोहिते याच्या पुत्रास दिली. कृष्णराव गाढे याच्या कन्या दोघी पैकीं एकीच्या पोटीं प्रतापी रामराजे सांप्रत आहेत. यांच्या स्त्रिया दोघी, काशीराव इंगळे यांची कन्या एक, व रामचंद्र मोहिते यांची कन्या एक, एकूण दोघी स्त्रिया सांप्रत आहेत. शरफजी राजे यांची लग्नें दोन. पैकीं सर्जेराव घाटगे यांची कन्या एक व झुंजारराव घाटगे यांची कन्या एक, एकूण दोघी. सर्जेराव घाटगे यांच्या कन्येच्या पोटीं कन्या चार व झुंजारराव घाटगे यांच्या कन्येच्या पोटीं कन्या एक एकूण कन्या पांच व पुत्र एक नांव शिवाजी. एकूण सहा. कन्या इंगळ्यांच्या घरीं एक, सुर्वे यांच्या घरीं एक, मोहिते यांच्या घरीं तीन, याप्रमाणें पांच कन्या दिल्या. शिवाजी महाराज यांस स्त्रिया तीन सुर्वे यांची कन्या एक, मोहिते यांची कन्या एक व महाडीक यांची एक, एकूण स्त्रिया तीन त्या सांप्रत आहेत. अमरसिंहराजे राज्य करीत असतां इंग्रज यांचीं चार हिस्से चाकरी बद्दल आम्हांस द्यावे, एक हिस्सा तुम्हीं घ्यावा असें असतां अमरसिंह यांणीं कबूल केलें नाहीं. शरफजीमहाराज ज्येष्ठ बंधूचे पुत्र, राज्याचे अधिकारी ते जाणून इंग्रजांनीं त्यांजकडे साधन केलें. शरफराजे यांणीं मान्य केलें अमरसिंह यांणीं शरफजीस बोलले कीं, वडील व राजधर तुम्हीं होऊन कबूल केलें. फार उत्तम आहे. आहांस राहण्यास जागा दुसरी योजून द्यावी. त्याजवरून शरफजीमहाराजा यांणीं मध्यार्जुन नेमून दिलें. तेथें जाऊन राहिले व मानकरी कांहीं बरोबर गेले तेही तेथेंच आहेत. तेथें गेल्यावर अमरसिंह यांचा काळ जहाला. त्यांचा पुत्र प्रतापराम महाराज कुटुंबसुद्धां मध्यार्जुनींच आहेत. शरफजी महाराज चंदावरीं राहून राज्य करीत असतां शके १७५५ सालीं काळ जहाला. याचे औरस पुत्र शिवाजीमहाराज सांप्रत चंदावरी राज्य करीत आहेत. शरफजी वंशधर हे ... ... पुरुष ६.

ले. ४९४
[४९६]

श्रावण शु. १५ शके १७६२
ता. २-८-१८४१

श्री.

यादी पेशवे यांचे मूळपुरुष वंशावळ.§

§ हें प्रकरण रा. बापू दीक्षित श्रोत्री बेकनाळकर इनामदार यांजकडील रा. विष्णु धोंडदेव भागवत यांणीं कोल्हापुराहून पाठविलें.

१ मूळपुरुष विसाजीपंत, गोत्र गार्ग्य, उपनाम भट, वतन श्रीवर्धन देशमुख, प्रांत दंडाराजापुरी पंचमहाल यांचे पुत्र.

१ कृष्णाजी विश्वनाथ वडील.
१ जानो विश्वनाथ दुसरे.
१ रुद्राजी विश्वनाथ तिसरे.
१ बाळाजी विश्वनाथ चवथे.
चवघे पुत्र यांपैकीं

१ बाळाजी विश्वनाथ नानासाहेब यांची स्त्री, मल्हार दादाजी बर्वे यांची बहीण, नांव राधाबाई, कटोरेकर पुण्यास आले.

१ समागमें कृष्णाजी विश्वनाथ यांचे पुत्र नारोबा यांची स्त्री गोदूबाईस घेऊन आले. वरकड कोणी आले नाहींत.

३ बाळाजी विश्वनाथ यास पुत्र.

१ बाजीराव बल्लाळ प्रधान.
जन्म काळ शके १६४१
१ चिमणाजी बल्लाळ आपासाहेब.
१ अनुबाई कन्या घोरपडी इचलकरंजी त्र्यंकटराव घोरपडे यांस दिली.

यांच्या स्त्रिया.

१ बाजीराव प्रधान यांची स्त्री काशीबाई बळवंतराव जोशी चासकर यांची कन्या, कृष्णराव यांची बहीण.
१ चिमणाजी बल्लाळ आपासाहेब यास त्रिंबकराव विश्वनाथ मामा पेठे यांची बहीण.

बाजीराव प्रधान यांस पुत्र व कन्या.

१ बाळाजी बाजीराव प्रधान नानासाहेब.
१ तिसरे जनोबा बाबासाहेब
१ दुसरे रघुनाथराव दादासाहेब उमर वर्ष ५४ कापूरगांवीं [कोपरगांवीं ?] शके
१ भिऊबाई कन्या आबाजी नाईक. जोशी बारामतीकर यांस दिल्ही.+

या त्रिवर्गांच्या स्त्रिया

२ बाळाजी बाजीराव प्रधान नानासाहेब यांस दोघी बायका.
१ गोपिकाबाई भिकाजी नाईक रास्ते वाईकर यांची कन्या.
१ दुसरी राधाबाई पैठणकर वाखरे देशस्थ यांची कन्या.

२

३ दादासाहेब यांस उमर ५४ काळ कोपरगांवीं जहाला.
१ गोपाळराव बर्वे यांची कन्या जानकीबाई.
१ दुसरी आनंदीबाई राघो महादेव वोक म ल ण क र यांची कन्या.
१ तिसरी भिकाजीपंत पेंडसे यांची कन्या मथुराबाई.

३

+ ही बाजीरावाची बहीण, मुलगी नव्हे.

१ जनोबा बाबासाहेब यास बायको नारोबानाईक भिडे यांची बहीण, नांव सगुणाबाई. बाबासाहेब मयत १२ वर्षांचे.

बाळाजीपंत नानासाहेब यांस पुत्र व कन्या.

१ विश्वासराव यास स्त्री सदाशिव हरी दीक्षित पटवर्धन यांची कन्या, नांव लक्ष्मीबाई पाणपतास गेली होती. माघारे येऊन पण्यमुक्कामीं मेली.

१ माधवराव यांची स्त्री रखमाबाई शिवाजी बल्लाळ जोशी यांची कन्या. थेऊरावर सती गेली. शके १६९४ कार्तिक वद्य ८ रोज बुधवार.

१ तिसरा मोरोबा लहानपणीं देवाज्ञा जहाले.

१ चवथा नारायणराव याची बायको कृष्णाजी हरी साठे यांची कन्या नांव गंगाबाई.

—

४

चौघांपैकीं वंश जाहला [तो] नारायणराव साहेब यांजे पोटीं माधवराव सवाई जहाले. नारायणराव साहेब यांजवर गर्दी होऊन मयत जहाले. शके १६९५ भाद्रपद मास शुद्ध १४. राज्य केलें मास ९. सवाई माधवराव यांसि बायका

१ रमाबाई केशव नाईक टोंकेकर थत्ते यांची कन्या.

१ दुसरी यशवदाबाई गणेशपंत गोखले यांची. कुंबोशीकर.

—

चिमणाजी बल्लाळ आपासाहेब यांसि बायका त्रिंबकराव विश्वनाथ पेठे मामा यांची बहीण. आपासाहेब वसईस जाऊन तीन वर्ष लढाई करून ठाणें घेतलें. पुण्यास आले. नंतर मयत जहाले. पोटीं वंश.

१ सदाशिवराव भाऊसाहेब.

१ बयाबाई कन्या गंगाधरराव नाईक ओंकारास यांस दिली.

—

सदाशिवराव भाऊसाहेब यांची स्त्री.

१

१ दुसरी पार्वतीबाई भिकाजी नाईक कोलटकर यांचा कन्या.

भाऊसाहेब व बयाबाई पांच वर्षांचीं होतीं. आपासाहेब देवाज्ञा जहाले. बाई सती गेली. पुण्य मुक्कामीं ओंकारेश्वराजवळ.

१ भाऊसाहेब पाणपतच्या स्वारीत गेले. शके १६८२, उमर ३३, समागमें विश्वासराव गेले होते.

रघुनाथराव दादासाहेब यांचे पोटीं.

१ प्रथम पुत्र जहाले विनायकराव नांव ठेविलें होतें, मुलास घेऊन खेळवीत होते. हातावर घेऊन उडावितां खालीं पडून मयत जाहला.

१ नंतर दुर्गाबाई कन्या जाहली. ती पांडुरंगराव बाबा बारामतीकर जोशी यास लग्न करून दिलें. तें लग्न माधवराव साहेब व नारायणराव साहेब यांणीं केलें. समारंभ बहुत केला.

१ दत्त अमृतराव रावसाहेब.

१ मग बाजीरावसाहेब धारेस जन्म.

१ चिमणाजी आपासाहेब कोपरगांवीं जन्मले. दादासाहेब यांचा काल जहाल्यावर चार महिनेनीं उपजले.

१ दादासाहेब मयत होतांच आनंदीबाईचे आंगावरील जवाहीर घेऊन येणें म्हणोन नाना फडणीस यांणीं अन्याबा मेहेंदळे यांसि पाठिवलें. जवाहीर देणें म्हणोन मशारनिल्हे बोलिले. बाईनीं उत्तर केलें कीं, आंगावर आहेत ते काढून घेणें. म्हणोन बोलली. हें उत्तर मशारनिल्हे यांणीं नानास लिहिलें. त्यांणीं उत्तर पाठिवलें कीं निघून येणें. म्हणोन माघारे आले.

बाळाजीपंत प्रधान यांसि प्रथम बहिरो अनंत पिंगळे याजकडे पेशवाई होती त्याची गुमस्तगिरी सांगून पिंगळे यांणीं श्रीमंत महाराज सातारेकर यांजजवळ ठेविलें. ते पांच वर्षे शके १६३० यांत ठेविलें. ते पांच वर्षे करून शके १६३६ सालीं आपणच खुद्द पेशवाई करून घेतली. पुढें मयत जाहले. उपरांत बाजीराव बल्लाळ प्रधान यांणीं राज्य केलें.

१ सवाई माधवराव यांणीं माडीवरून उडी टाकिली. शके १७१७ आश्विन वद्य १२ रोज भोमवार अस्तमानीं. नंतर देवाज्ञा जहाले चवथे रोजीं शुद्ध १५. राज्य केलें वर्षे २२.

१ शाहू महाराज यांचा काल जहाला शके १६७२. राज्य केलें वर्षे ४४.

१ अवरंगजेब बादशहाचा काल शके १६२८. नंतर त्याचे पुत्र तक्तावर आजमतारासाहेब

१ बाजीराव रघुनाथसाहेब यांणीं राज्य केलें वर्ष २२. जन्म शके १६९५ यांसि बाइक

१ भागिर्थीबाई धोंडभट भागवत याची कन्या.

१ दुसरी सांवताचे वाडीकडील. नांव लागणें.

१ तिसरी दाजिबा फडके यांची कन्या.

१ चवथी धोंडोपंत मंडलिक रास्ते यांची कन्या, नांव बाराणशीबाई, यांचे पोटीं पुत्र जहाले होते, नांव वामनराव.

१ पांचवी हरि रामचंद्र ढमढेरे यांची कन्या उपनांव देवधर.

१ सहावी बळवंतराव पेंडसे नांव सरस्वतीबाई.

—

६.

बाळाजी बाजीराव नानासाहेब यांचा काल जहाला शके १६८३ पर्वतीस जहाला. दहन लांकडी पुलानजिक केलें. वृंदावन तेथें आहें. उमर वर्ष ४२.

१ पुणें जाळिलें शके १६८५ सुभानुनाम सवंत्सरे.

१ तोतया होऊन मारिला शके १६९९ पौषमास.

महादजी शिंदे यांचा काळ जहाला. शके सतराशेंपंधरा माघ शु॥ ११.

१ दौलतराव शिंदे यांचा काल जहाला १७४९.

१ नाना फडणीस यांचा काळ जहाला शके १७२१, सिद्धार्थीनाम संवत्सरे.

१ हरिपंत फडके यांचा काळ जहाला शके १७१६.

१ परशुराम भाऊ यांचा काळ जहाला शके १७२१ सिद्धार्थीनाम संवत्सरे, भाद्रपद वद्य ४ मंगळवार.

बंद चार वेदशास्त्र संपन्न राजश्री बापूराव दीक्षित श्रोत्री इनामगांव संस्थान मौजे बेकनाळ कर्यात सोलापूर प्रांत हुकेरी यांचे आहेत. हस्ताक्षर सखाराम गोविंद निसबत श्रोत्री यांणीं लिहिलें. शके १७६३ ख्लनाम संवत्सरे. श्रावण शु॥ १५ सन इसने आरबैन मय्यातैन व अल्फ जमादिलावर.*

ले. ४९५] [४९४]

ता॥ ७-८-१८४१ श्रावण व॥ ६ श. १७६३

श्री*

बाळाजी विश्वनाथ.

कैलासवासी बाळाजी विश्वनाथ यांसि पेशवाई महाराज शाहूराजे यांणीं दिली ती कधीं दिली ? कोणत्या कारणानें प्राप्त जहाली ? पूर्वी काय संपत्ति होती ? पेशवाई जहाल्यावर किती दिवस केली ! पराक्रम कसे कसे काय काय करून स्वामिकृपा संपादिली ! म्हणोन पुशिलें. त्यास बाळाजीपंत नाना [यांचें] भट उपनाम. हे कसबे श्रीवर्धन होतें, सुभा प्रांत राजापुरी येथील देशमुख तेथेंच रहात होते. त्यांजवर शामलाचा कसाला जहाला म्हणून परागंदा होऊन कसबे चिपळूण सुभे दाभोळ येथें राहून, कांहीं दिवस जकाती वगैरे रोजगार करून, संसार करीत होते. पुढें श्रीहरीनें कृपा केली, तेव्हां मोठा रोजगार मिळवावा ऐशी उमेद धरून श्रीमंत पंतसचिव शंकराजी नारायणपंत त्यांजकडे आले. तेथें कांहीं दिवस योग्यतेनें राहिले. तेथून किल्ले सातारा येथें मातुश्री ताराबाई आऊसाहेब राज्यकारभार चालवीत होती, त्यांजपाशीं परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि होते, तसेच थोर सरदार धनाजी जाधवराव व त्र्यंबकराव दाभाडे सेनापति व संताजी घोरपडे व हुजारातचे सरदार होते, त्यांचे मसलतीनें राज्यकारभार चालत होता. शाहू महाराज दिल्लीस बेगमेजवळ अटकांत होते. दक्षिणेस कोट किल्ले मुलूख यवनाक्रांत सर्व होते, त्याची त मू ट मर्दाईनें चालवीत होते, तेथें बाळाजीपंत नाना सचिव यांजबरोबर गेले. ते स्थळीं जाते समयीं अंबाजीपंत पुरंदरे यांची गांठ पडली. दोघांचें बोलणें जहालें.त्यांत तुम्ही आम्ही बेरोजगारी, एकदुःखी,त्यापक्षीं एक जागां रहावें.

---

* हें प्रकरण रा. बापू दीक्षित श्रोत्री बेकनाळकर यांजकडील आमचे स्नेही रा० विष्णु धोंडदेव भागवत यांणीं कोल्हापुराहून पाठविलें. खर्ची कागदावर लिहिलें असून बंद ७ पाठपोट आहेत. अक्षर साधारण आहे.

नानांनीं अंबाजीपंतांस वाचा दिल्ही कीं, वडील भाऊ तुम्हां, धाकटा भाऊ मी, रोजगार मिळविला तर तुम्हीं संसार पहावा. तुम्हांस मिळाला तर मी पाहीन. याप्रमाणें निश्चय करून सातार्‍यास एकत्र राहिले. दैवयोगेंकरून धनाजी जाधवराव यांचा दिवाणगिरी नानास मिळाली. तेथेंच दहा पांच वर्षे राहून सर्व दौलतीची यकत्यारी करून दौलत मिळविली.

त्यानंतर शाहू महाराज यांविशीं पादशहाजवळ बेगमेनें बोलणें केलें कीं, "शाहू राजा माझा पुत्र, त्यापक्षीं बहुत दिवस आठरा वर्षे संरक्षण केलें. आतां यासि राज्यावर बसवावा." ऐशी भीड खर्चून बहाली करवून वस्त्रें देऊन दिल्लीहून रवाना केले. दहा हजार फौज दिल्ही. तेथून येत येत खानदेशांत आले. याजवर इकडील वर्तमान सर्व संस्थानिकांस पत्रें आलीं. त्यावरून परशुराम भोंसले यासि पंधरा हजार फौजेनिशीं नागपुराहून संताजी भोंसले यांणीं पाठविलें आणि सांगितलें कीं, खोटा असल्यास मारून टाकावा, लुटणें. त्यांणीं महाराजांस भेटल्यावर चौकशी केली त्यांत सूर्यबिंब खरें असें भासलें. तेव्हां विरोध करून लुटावें तो संशय गेला. महाराजांचीं शर्तीनें चाकरी करून सिंहासनीं बसला आहे हे निष्ठा धरून नागपुरास लिहून आणखी फौज आणवून दरकूच चालले.

इकडे सातार्‍यास आऊसाहेब यांणीं निश्चय केला कीं, हा राजा नव्हे, जोगडा कोणी आला आहे, यासि मिळूं नये. याप्रमाणें सरदार व सरकारकून बोलावून सर्वांस पुशिलें. दूधभाताची पाटी पुढें ठेविली. त्यांत प्रथम प्रतिनिधि यांणीं हात टेवून सांगितलें कीं, प्राण आहे तोंवर युद्ध करीन, भेटणार नाहीं. तैसाच सचिव यांनीं संकल्प केला. सर्व निश्चय सांगितले, परंतु जोगड्यास मिळणार नाहीं. ऐसा विचार होऊन तयार करून किल्ले रांगणा येथें आऊसाहेब यांस पाठविलें.

तों खेडकडूस येथें महाराजांची स्वारी पंचवीस हजार फौजेनिशीं आली. हें ऐकून प्रतिनिधि खासा सरदार सुद्धां चाळीस हजार फौजेनिशीं चाकणेस आले. दुसरे दिवशीं दोन्ही फौजा तयार होऊन दरम्यान गांठ पडोन लढाई जहाली. त्या लढाईंत महाराजांस यश आलें. दहा पांच हजार घोडे प्रतिनिधीच्या फौजेंतील सांपडले. प्रतिनिधीचे फौजेचा मोड होऊन मागती चाकणेस आले. परशुराम भोंसले याचे खातरजमेमुळें बिंब खरें, ऐशी सर्वांची खातरजमा जहाली. तेव्हां रात्रीस सर्व सरदारांनीं जाधवराव यांशीं विचार करून आपआपले कारभारी गुप्तरूपें पाठवून भोंसल्याचे हातून कोणास न कळतां भेटोन मुख्यत्वें करून बाळाजीपंत नाना सर्वांचे येखलाशीचें बोलणें बोलले कीं, आम्ही महाराजांचे चाकर. पाय पहावे ऐशी निष्ठा आहे. हुकूम व्हावा. प्रातःकाळीं येतों. याप्रमाणें निखालस बोलणें करून, हुकूम घेऊन, जे कारभारी आले होते त्यांसि शेले पागोटीं व झगे व विडे देऊन रवाना केलें. नानांनीं महाराजांसि पंचवीस हजार फौज घेऊन उदईक येतों म्हणोन कबूल केलें. महाराजांनीं बहुत प्रसन्न होऊन आज्ञा केली कीं, "ही चाकरी केलियावर मागाल तें बक्षीस आहे. निखालस मागा." यांणीं अर्ज केला कीं, "आठां पदांतून उत्तम

देखत बक्षीस म्हणें. " महाराजांनीं कबूल केलें. आणि लागलेच गोटास आले. सर्वांचा एक विचार जहाला कीं, भेटीस जावें.

नंतर प्रातःकाळीं प्रतिनिधि यांणीं तयारीनिशीं फौजेस ताकीद केली. परंतु कोणींही जीव ठेविला नाहीं. चार घटका दिवसास प्रतिनिधि तयार होऊन बसले. सर्वांचे कारकून बोलावून आणून पुशिलें. सर्वांनीं उत्तर दिल्हें कीं, कालचे लढाईत कांहीं घोडीं गेलीं, कांहीं जखमी जहालीं. लोक जखमी फार जहाले, त्यामुळें त्यांचे खबरदारीस आणखी लोक गोटांत गुंतले. आज आमचें निघणें होत नाहीं. हें ऐकून फितूर जहाला ऐशी [शंका] मनांत आणून आपले मायेची पांच सात हजार फौज होती तितकीच घेऊन पुण्यास येऊन जलद साताऱ्यास जाऊन किल्ला बळकावून राहिले. वरकड फौज जाधवराव यांजबरोबर जाऊन महाराजांस नानानीं भेटी केल्या. महाराजाची मर्जी बहुत संतोष जहाली. तेथून शिरोळास येऊन किल्ले रोहिडा यावर शंकराजी नारायण सचिव होते त्यांस भेटीस बोलाविलें. ते क्रियेस स्मरोन आले नाहींत. त्याजवरून महाराजांनीं सांगून पाठविलें कीं, आम्ही भेटीस येतों. हें वर्तमान ऐकून त्यांणीं देहावसान केलें. दुसरे दिवशीं महाराज किल्लेधाखालीं गेले तों त्यांचें शव वरून उतरलें. हें पाहून वर जाऊन त्यांची स्त्री येसूबाई यांचें समाधान महाराजांनीं बहुत प्रकारें केलें, आणि साताऱ्यास येऊन मोर्चेबंदी केली. ते एक वर्षपर्यंत किल्ला लढला. तेव्हां शेखमिरा वांईकर हा दिल्लीस महाराजांजवळ अटकेंत होता, त्याजवर बहुत विश्वास होता. त्यास सांगून किल्ल्यावर फितूर करविला आणि किल्ल्यावर स्वारी जाऊन प्रतिनिधीस बेडी घालून कैद करून ठेविलें. महाराज शके १६२९ एकूणतिसाचे साली सिंहासनावर बसले. मुलुखाचा बंदोबस्त करून संस्थानिक सरदारांस निरोप जहाले. तेव्हां महाराजांनीं नानास सांगितलें कीं, *मोरोपंत पिंगळे पेशवे आहेत ही पेशवाई त्यांजकडून दूर करून तुम्हांस देतों. तुम्ही करावी. नानांनीं अर्ज केला कीं, तूर्त " मी जाधवरावाचा चाकर आहें. त्याजपासून निरोप घेऊन येईन नंतर चाकरी करीन. तोंपर्यंत माझें बक्षीस जामदारखान्यांत असावें. "

असें बोलून निरोप घेऊन जाधवरायाबरोबर गेले. चार वर्षेपर्यंत जाधवराव यांजवळच होते. एके दिवशीं नानाकडील चाकर याजपासून बेकैदी जहाली म्हणोन जाधवरायांनीं हात तोडावयाचा हुकूम केला. हें समजल्यावर नानांनीं सांगून पाठविलें कीं, हात तोडूं नये, मला बक्षीस द्यावें. हें त्यांनीं न ऐकतां हात तोडिला. इतक्यावरच नानांनीं आपले मायेचे पांच हजार लोक होते ते तयार करून जाधवरायास सांगितलें कीं, इतकी गोष्ट आमची चालली नाहीं, तेव्हां आम्हांस चाकरीची गरज नाहीं. पोट भरेल तिकडे जाऊं. असें म्हणून तेच समयीं कूच करून साताऱ्याचे वाटेनें वीस कोसांचा मुक्काम केला. त्यांची फौज कांहीं घेऊन समजावयासि कारभारी आले. त्यांची गांठ पडों न देतां कृष्णा उतरून माहुलीस मुक्काम केला, तेथून त्यांची फौज माघारी गेली. नाना येऊन महाराजांस भेटले.

---

* बहिरोपंत पाहिजे.

त्यांचा निरोप घेऊन सेवेशीं आलों म्हणोन अर्ज केला. महाराजांनीं बक्षीस तयार आहे म्हणोन हुकूम केला. नंतर मोरोपंत पेशवे यांसि महाराजांनीं आज्ञा केली कीं, तूर्त सरकारांत गरज आहे तर तीस हजार रुपये तुम्हीं द्यावे. पेशवे यांणीं विनंति केली कीं, तूर्त ऐवज नाहीं. महाराजांनीं सांगितलें कीं तुम्हीं पेशवे, तुमच्यानें कार्य होईना, तेव्हां कसें करावें ! त्यांणीं अर्ज केला कीं, पैका तर नाहीं, महाराजांची मर्जी असेल तसें करावें. महाराजांनीं हुकूम केला कीं, याचा विचार होईल. नंतर बाळाजीपंतनाना यांसि बोलावून सुमुहूर्तावर पेशवाईवस्त्रें बहुमान केला. रहावयासि किल्ला पुरंदर सचिवाकडे होता तो देविला. तेथून आज्ञा घेऊन पुरंदरास येऊन सासवड येथें वाडा बांधून राहिले.

ते समयीं पिलाजी जाधवराव हे वाघोलीस रहात होते, तेथून दिवे घाटावर चाहूरभर जागा इनाम घेऊन तेथें वाडी वसवून आपला किल्ला बांधून मजबूत वस्ती केली. तेथें रहात होते. ते सरंजामी सरदार दौलतदार पोक्त त्यास पूर्व स्नेह होताच. परंतु पुढें केवळ घरोबा भाऊपणा जहाला. तैसाच बाजी भिवराव रेटरे यांसी घरोबा विश्वासाचाच जहाला. तेही दौलतदार होते. राणोजी शिंदे हे योग्यतेस पुढें विशेष आणिले, परंतु त्या वेळेस त्यांची चाल मर्दुमीची मनसोब्याची ऐशी होती. मल्हारजी होळकर हे शिलेदारीनें बांड्याचे पदरीं होते तेथून आणून मर्द माणूस मसलतदार अशा योग्यतेनें जवळ बाळगिले. अशा माणसांचा संग्रह करावा ऐशी आवड नानांस होती. म्हणोन मध्य देशांत सासवड ऐशी जागा पाहून वाडा बांधून वस्ती केली.

तेथें चार सहा महिने जहाल्यावर दमाजी थोरात मवास हिंगणगांव ठाणें करून मुलूख मारून रहात होता, त्याणें हजार पांचशें प्याद्यानिशीं येऊन पेशव्यांस धरून नेलें. तेव्हां त्याशीं खंडाचा ठराव पन्नास हजार रुपये केला आणि त्याजपाशीं बोलीस बाजीराव व आपासाहेब उभयतां पुत्र मातुश्रीबाई सुद्धां व अंबाजीपंत तात्या पुरंदरे असे हिंगणगांवीं ठेवून, आपण निघोन सातार्‍यास येऊन महाराजांस वर्तमान सांगितलेवर महाराजांनीं पन्नास हजार रुपये सरकारांतून देऊन रवाना केलें. तेथून सासवडास येऊन विचार करून आठ पंधरा दिवस राहून, खातरजमेचे लोक चार हजार फौज ठेवून हिंगणगांवावर चालून जाऊन सांगून पाठविलें कीं, लढाईस येणें, नाहीं तर बोली सोडून देणें. हें ऐकून दमाजीनें बाई सुद्धां सर्वांस जिवें मारावें ऐशी तसदी केली, कीं तुम्हीं त्यांस याप्रमाणें सांगून पाठविलें नाहीं तर मारले जाल. ऐसें ऐकून अंबाजीपंत तात्या यांणीं उत्तर केलें कीं, " आमची आशा त्यांणीं सोडली, म्हणोन चालून आले आहेत. आम्हीं प्राण तुम्हांस अर्पिले आहेत. तुम्हांमध्यें मर्दुमी असली तर त्यांशीं लढाई करून धरून आणा, अथवा आम्हांस मार मारल्यानें तुमचे हातीं, उगेच सांपडणार नाहींत." तेव्हां दमाजी यांची लढाई जहाली. दमाजीस धरून कैद करून हिंगणगांव लुटून मुलें माणसें यांस भेटून दमाजी कविले सुद्धां कैद करून बेड्या घालून, गांवावर गाढवांचा नांगर फिरवून त्याची दौलत सांपडली ती घेऊन सासवडास आले. फौजेस निरोप देऊन मुलें माणसें तेथें ठेवून खासा नाना तात्याजी पुरंदरे यांसि समागमें घेऊन दमाजीस घेऊन महाराजांस

भेटले. दमाजी कबिले सुद्धां महाराजांनीं किल्ले परळी येथें बंदांत ठेविले. मोठें खळ मोडिलें. येणें करून महाराज संतोषी जहाले. पन्नास हजार रुपये सरकारचे नेले होते ते पोत्यास लाविले. महाराजांनीं आज्ञा केली कीं, " हे रुपये तुम्हांस बक्षीस दिले होते, त्यासि देऊन मुलें माणसें सोडून आणावीं तें कां न केलें ! " यावर नानांनीं अर्जी केली कीं, " महाराजांनीं कमी केलें नाहीं. परंतु पेशवाई मी करितों, मुलें माणसें खंडणी वोलगारास देऊन सोडविल्यानंतर पेशवाई करावयाचें स्वरूप जातें, यास्तव केलें नाहीं. स्वामीचे कृपेकरून मुलखाचें खळ मोडलें. स्वामींस यश आलें. " हें ऐकून महाराजांची मर्जी बहुत प्रसन्न जहाली.

नबाब †निजामन्मुलूख औरंगाबादेंत होते त्याशीं लढाईचे प्रसंग करून स्वराज्याचा बंदोबस्त पूर्व मर्यादेप्रमाणें गोदेपर्यंत करून अम्मल चालता केला. पुढें नबाब दिल्लीस जाऊं लागले, त्याकाळीं नानाशीं संधान त्यांणीं केलें कीं, तुम्ही दिल्लीस फौज पंचवीस तीस हजार स्वार घेऊन यावें. त्यावरून तीस हजार तयार करून रोज तीस हजार रुपये ध्यावे याप्रमाणें करार करून महाराजांची आज्ञा घेऊन दिल्लीस गेले. त्याची खातरजमा बहुत जहाली. तेव्हां नानास तगटी निशाण देऊं लागले. त्यासि नानांनीं उत्तर केलें कीं, आमचे स्वामींचें निशाण भगवें हें ठेवून दुसरें करावें हें आम्हांस योग्य नाहीं. त्यावर नबाबांनीं त्या निशाणाची गौरव राखून बादली पटका निशाणास लावून उभयपक्षीं संतोष राखिला. दिल्लीस जाऊन पादशाहाच्या भेटी जहाल्यानंतर बोलणें लाविलें कीं, राजा शाहू बेगम साहेबांचा पुत्र यासि कृपा करून राज्यावर रवाना केलें, त्याप्रमाणें संस्थानीं कायम जहाले. साहेब सुभे दक्षिणेंत यांची सरदेशमुखीचें वतन करून दिलें आहे, त्याचा सनदांचा हुकूम होऊन बक्षीस जहालें पाहिजे. असें नबाबाचे संस्थानाचें बोलणें करून पादशाही सनदा दरोबस्त घेऊन दहा कोटी रुपये सरकारची नजर व एक कोट रुपये दरबारखर्च असे आकरा कोटी रुपये कबूल करून निशा सावकारी दिल्ही. निरोपाचे [पोशाख] पादशहाचे गेले. तेव्हां सर्व मुत्सद्दी यांणीं एक विचार केला कीं, ब्राह्मण मर्दामर्दी नामोश घेऊन जाणार यासि कोठें नेऊन दरवाज्यांत घालमेल करून सनदा हिरावून घ्याव्या. पादशहा आमचें ऐकत नाहीं. त्यापेक्षां हा सिद्धांत करून शहरचे दरवाज्यांत पांच हजार सोदे पाठविले. ही बातमी नानास समजली. त्याजवरून मनसोबा करून सर्व स्वारीचा सरंजाम करून आपले नावकरी बाळाजीपंत भाऊ, फडणीस यांचे आजे बरोबर होते त्यांस पालखींत बसवून, झाडून लवाजमा त्याजबरोबर देऊन, स्वारी त्यांची लाविली आणि आपण शेपन्नास स्वारांनिशीं कोणी शिल्लेदार असें लोकांत भासवून दरवाज्याबाहेर निघोन लष्करांत गेले; आणि पादशहास अर्जी लिहून पाठविली कीं दरवाज्यांत सोद्यांचा जमाव झाला आहे त्यांत ताकीद व्हावी. ऐशी अर्जी पाठविली. तों स्वारींत हत्यार चाललें. फडणीस ठार जहाले. इतक्यांत ताकीद सजावलाची आली. त्यांणीं सोदे दूर केले. परंतु फडणीस कामास आले. वरकड स्वारीचे लोक येऊन लष्करांत पोंचले. ते वेळेस रामाजीपंत भानू, बाबूराव फडणीस यांचे तीर्थरूप, यांचें समाधान करून वचन दिल्हें कीं,

† या ऐवजीं सय्यद हुसेनअली पाहिजे.

तुम्ही चाकरीची शर्त केली. त्यास जोंपर्यंत बाळाजी विश्वनाथ याचा वंश यास पेशवाई तोंपर्यंत तुमची फडणिशी, असा करार करून देऊन शांतवन केलें. नंतर नबाबाची स्वारी देशीं आलियावर निरोप घेऊन महाराजांकडे येऊन भेटीं जहाल्या. सारें निवेदन करून सनदा व खिलत पादशाही म्हणजे वस्त्रें आणिलीं होतीं [तीं] महाराजांस दिल्हीं. त्याजवरून महाराजांस अति उत्साह जाहला.

पुढें नबाबाची एखलास यामुळें दक्षिणचे सहा सुभे विजापूर, दौलताबाद, बऱ्हाणपूर हे लगत यांत अम्मल सरदेशमुखी व गनिमाची चौथाई बाबतीं पेशजीचे कराराचा हा अम्मल स्वारी करून सुरू [करूं] लागले आणि विजापूर, वेदर, भागानगर हे तीन सुभे यांत नागपूरकर भोंसले यांसि फावेल तसा अम्मल यांणीं बसविला.

याप्रमाणें श्रम साहस करून बाळाजीपंत नाना यांणीं महाराजांची सेवा एकनिष्ठेनें करून पेशवाई केली. थोरले पुत्र बाजीराव बल्लाळ व धाकटे पुत्र चिमणाजी बल्लाळ आपा, वडिल कन्या अनूबाई हीं व्यंकटराव घोरपडे यांसि दिल्ही. दुसरी कन्या भागूबाई* ही बाबूराव सदाशिव बाबूजी नाईक बारामतीकर यांचे बंधूस दिल्ही. याप्रमाणें सात वर्षें पेशवाई करून शके १६४२ बेचाळीस सालीं दिनगत झाले. पुढें बाजीराव साहेब यांणीं पेशवाई चालविली. [हस्त अक्षर रामचंद्रभट्ट जोशी याचें असे. मि० श्रावण वा ६ मंदवारीं तिसरे प्रहरीं समाप्त. शके १७६३ ख्रवनाम संवत्सरे सुा इसन्ने अर्बैन मया तैन व अलफ.]

ले. ४९६] [४९५]

ता॥ १६-८-१८४१ श्रावण वा॥ ३० श. १७६३

श्रीबाजीराव बल्लाळ

कैलासवासी बाजीराव बल्लाळ प्रधान यांणीं पेशवाई केली ती किती वर्षे केली ? यांसि पेशवाई कधीं प्राप्त झाली ? पराक्रम काय काय केला ? म्हणोन प्रश्न केला त्यास बाळाजी विश्वनाथ यांणीं शाहू महाराज यांची चाकरी एकनिष्ठपणें करून पेशवाई मिळविली. त्या दवलतीचा उपभोग सात वर्षे केला. स्वामींची कृपा पूर्ण संपादून ‡दिवसगत जाहले. ते समयीं बाजीराव साहेब वीस बावीस वर्षांच्या वयांत होते. चिमणाजी आपा साहेब दहाबारा वर्षांचे उमरीत होते. कारभारी अंबाजीपंत पुरंदरे दिवाण होते. तसे ब्राह्मणमंडळींमध्यें बाजी भिवराव व कृष्णराव महादेव जोशी चासकर हे बाजीराव यांची स्त्री काशीबाई ताई यांचें बंधु हे मोंगलाईत चाकरी करून दवलत करीत होते, शिपाई महाशूर होते. त्यांचे तीर्थरूप महादाजी कृष्ण बहुत बुद्धिवान् होते. तसेंच चिमणाजी आपा यांचे सासरे विसाजी कृष्ण, त्रिंबकराव मामा पेठे यांचे तीर्थरूप, हे बुद्धिवान्. तसेच मल्हार दादाजी वर्वे कचरेकर, रायाचे मामा, हेही शहाणे द्रव्यवान् मामलेदार व बाबूरावजी नाईक बारामतीकर शिपाई आणि द्रव्यवान् व व्यंकटराव घोरपडे हे सरकारचे सोयरे सरदार

---

* हिचें नाव अन्यत्र भिऊबाई असें आढळतें.

‡ मूळांत " दिवसगत " झाले. असें आहे तें बरोबर नाहीं.

प्रसिद्ध पूर्वी **नारो**जी घोरपडे प्रसिद्ध होते त्यांचे पुत्र हेही होते. व मराठे लोकांत **पिलाजी जाधवराव** व **राणोजी शिंदे** व **मल्हारजी** होळकर इत्यादिक मोटमोठे माणूस दवलतींत होते. तेव्हां **बाजीराव सा**ताऱ्यास जाऊन **महाराजांस** भेटले. नंतर वस्त्रांचें बोलणें लागलें. तें ते काळीं **बाजीराव** साहेब बहुत उद्दाम प्रकृतीचे, शिपाईगिरींत अवघा वेळ मग्न, राज्यभार चालवावयास सबूरी असावी तो भाव नव्हता. याजमुळें या पदाचे उपयोगीं नाहींत असें राजश्री यांसि बहुतांनीं मसलत दिल्ही. सर्वांचें ऐकून घेऊन सर्वांस एक उत्तर दिलें कीं, **बाळाजी विश्वनाथ** यांणीं या राज्यांत जिवादारभ्य श्रम साहस करून पुढें सुख भोगिलें नाहीं. याजकरितां यांस वस्त्रें तूर्त देतों. यांचे दैवीं असल्यास श्रीशंभु कृपा करील. उपयोगीं नाहीं असें दिसल्यास पुढें विचार होईल. अशी श्रीदेवाची प्रार्थना करून महाराजांनीं **बाजी**-राव साहेब यांसि वस्त्रें दिल्हीं. दिवाणगिरीचीं वस्त्रें **चिमणाजी आपासाहेब** यांसि देऊन बहुमान केला. कांहीं दिवस हुजूर राहिले.

नंतर स्वारी तेथून निघोन **सा**सवडास येऊन आपले दौलतींत किल्ले कोट महाल मुलुख यांचा बंदोबस्त करून फौजेचा जमाव करून **औरंगाबाद** प्रांतीं गेले. तेथें नबाब यांस भेटून **खान**देशांत जाऊन बागलाण प्रांतांत जाऊन खंडण्या घेऊन यश घेऊन आले. दुसरे-यानें अशिरी किल्ल्यापर्यंत जाऊन अशिरी हाल्यानें घेतली. ती स्वारी जय घेऊन आले. फिरोन स्वारी **हिंदुस्थानांत जयनगरास** गेले. तेथें राजा **जयसिंग** याची भेट घेऊन खंडणी मागितली. त्यांणी सांगितलें कीं, खंडणी कोणास आजपर्यंत दिल्ही नाहीं. देणें ते ब्राम्हणांस देतों. **रा**यांनीं उत्तर केलें कीं, आम्ही चाकरी करितों, पोटास पाहिजे, आणि ब्राह्मण आहों. तेव्हां राजांनीं तीन लाख रुपये तुलसीपत्र घालून पाठविले ते **रा**यांनीं घेतले आणि राजाची मर्जी बहुत संतोष करून स्वारी करून येऊन फिरोन स्वारी **हिंदुस्थानांत** जाऊन किल्ले कोट कांहीं हस्तगत केले. प्रांत **माळवे**, सुभा मोठा, तेथें **दया बहादूर** का र ब्राह्मण होता त्याशीं लढाई **चिमणाजी आपा** साहेब यांनीं करून सुभा बुडविला. वीस लक्षांचा प्रांत घेऊन अंमल बसवून हुजूर आले. राजश्रीस मोठा संतोष जहाला. फिरोन नबाब **निजाम**उन्मुलूख यासी विघाड होऊन लढाई होऊन सल्ला करून आपल्या मनोदया-प्रमाणें तह केला.

त्यावर महाराजांनीं सांगितलें कीं, " राव, तुम्हीं त्रिंबकराव दाभाडे सेनापति हे **गुजरा**थेंत फौजबंद जहाले आहेत, ते हुकम गेला असतां हुजूर येत नाहींत; त्यांस घेऊन यावें. तर तुमचा शर्थ, " अशी आज्ञा जहाली आणि विडे दिल्हे, ते घेऊन **गुजरा**थेंत गेले. तेथें ऐशीं हजार फौज दाभाडे यांजबरोबर व रायाबरोबर बाराहजार ते हस्तगत कसे होतील अशी मसलत झाली. परंतु बाजीराव साहेबांनी सर्व सरदारांस सांगितलें कीं, लढाईस जातों. महाराजांचे पुण्यें करून यश आल्यास दाभाडे यास घेऊन जाऊं, ते न आले तरि आम्ही तेथें खर्च जाहलों, तुम्ही देशीं जावें. हें ऐकतांच पिलाजी **जाधव** यांणीं सिद्धांत सांगितला कीं, तुम्हांस टाकून आम्ही देशीं कशास जावें ? तरी लढाई उदयीक करावी. जें होणें तें होवो. असा विचार करून तरतूद चांगली करून लढाईस उभे राहिले. चार घटका लढाई

लागली. तों ईश्वरइच्छेनें त्रिंबकराव सेनापति अंबारींत बसून तिरंदाजी करीत होते, तेथवर चालून जाऊन बंदुकीची गोळी कपाळांत लागून ठार जाले. ते काळीं दाभाडे याचे फौजेस पळ सुटला. हे सर होऊन लूट केली. दहा बारा हजार घोडे सांपडले व हत्ती सांपडले.

नंतर कूच करोन देशीं आले. त्रिंबकराव पडल्यावर बाबूराव सवाई [व] त्यांचे पुत्र यशवंतराव हे दोघे कबिले सुद्धां पाठलाग करीत साताऱ्यासि आले. तों अगोदर बाजीराव साहेब राजवाड्यांत पोहोंचलें. तेथवर दाभाडे येऊन महाराजापाशीं दाखल झाले. तैसे पाहूनच माघारे माहुलीस जाऊन राहिले. ते पंधरा दिवस पर्यंत होते. महाराजांनीं विचार केला कीं, "दोन्ही सरदार मोठे त्यांत दाभाडे मारिले यामुळें त्यांची स्त्री उमाबाई कीर्तिवंत आहे ही फिर्याद बाजीराव पेशवे यांणीं मारिले म्हणून आली. त्यास हुकुमानें आणविलें, तेथें लढाईस उभे राहिले. तेव्हां मागें सरावें तें ठीक दिसत नाहीं. दैव योगें दाभाडे पडले. परंतु समजूत दोघांची करावी लागती. या अर्थें माहुली संगमीं सरकारचा डेरा देऊन बाड कनाथाचें उभें केलें आणि खासा स्वारी महाराजांच्याच डेऱ्यांत आली आणि उमाबाईस बोलाविलें. वर्तमान ऐकून घेऊन बाजीराव यांसि बोलाविलें. तेव्हां खासे राव व दादासाहेब व जनार्दनपंत बाबा दोघे पुत्र लहान दहा बारा वर्षांचे होते, ते बरोबर घेऊन डेऱ्यास येऊन मुजरे करून उभे राहिले. एके बाजूस उमाबाई बसली होती. दुसरे बाजूस यांसि आज्ञा जाहाली, तेथें बसलेवर महाराजांनीं पुसिलें. तेव्हां यांनीं अर्ज केला कीं, "उमाबाई काकी यांसि बहुत प्रकारें हुजूर यावयाचा हुकूम आहे त्याप्रमाणें त्रिंबकराव काका यांसि बोलावें. त्याप्रमाणें काकी बोलली कीं, मीही काकास बहुत विचारें सांगितलें. परंतु एकंदर लढाईवांचून दुसरें बोलणें चालेना. युद्धास उभे राहिले. तेव्हां मला दाली महाराजांनीं बांधली तिची शरम राखावी लागेल. त्यांत मी बारा हजारांनिशीं, काकाजवळ ऐशीं हजार फौज, तेथें मला मारावयासि त्याला कठीण नव्हतें. परंतु दैवगतीनें त्यांस गोळी लागली. असें जाहलें असतां महाराज आज्ञा करितील ते शिरसा [वंद्य] असें म्हणाले. तें ऐकोन महाराजांनीं आज्ञा केली कीं, "राव! तुमचे दोघे पुत्र उमाबाईचे मांडीवर बसवा." म्हणतांच रायांनीं दोघांस बसविलें. उमाबाईस हुकुम केला कीं, त्रिंबकराव आयुष्यानें गेले, चिंता नाहीं. हे दोघे पुत्र बाजीराव यांचे तुजला दिल्हे, हे तुझे. यांसि वाढवून आपले म्हणावें. असें समाधान करून मिठाई भरून ताटें आणवून मध्यें मांडून हुकूम केला कीं, "या उपरि उभयपक्षीं मनांतील किंतू सोडून द्यावा आणि तातांत अवघीं बसून पेढे खावे. साच क्रिया." इतकें बोलून महाराजांनीं घास उचलिला. सर्वांनीं पेढे मिठाई खाऊन एकलासी केली. नंतर स्वारीस जावयाची रवानगी केली.

तेथून हिंदुस्थानांत स्वारी केली. राजा जयसिंग यासि भेटले. शिंदे, होळकर व यशवंतराव पोवार यांचे बाप आनंद पोवार हे ते काळीं दौलतदार होते. या सर्वांसीं तह केला कीं जो मुलूख सरकारांत येईल त्याचे हिस्से करून फौजा जमा करून एक विचारें चालावें. याप्रमाणें बोलणें ठरावून हिसे केले. त्यांत शेंकडा एकतीस रुपये सरकार एक हिसा, शिंदे रुपये

तीस एक हिसा, होळकर रुपये तीस एक हिसा, पोवार रु० नऊ. याप्रमाणें करार करून फौज ठेवून दिल्लीस जयसिंग राजा सुद्धां जाऊन पादशहाचे दौलतीविषयीं चाकरींत उणें पडों देत जाऊं नये, ये प्रमाणें ठराव करून, संस्थानी करून, राजवाडे जे जे वेरोख होते त्यांजवर मसलत केली. बुंदेलखंडचें राज्य घेऊन राजाशीं तह करून सरकारांत मुलुख आला त्याची कमावीस गोविंद बल्लाळ बुंदेले यासि सांगून ठेविलें. उज्जनी शिंदे यांजकडे वांटणींत आली. होळकर यांजकडे इंदूर दिल्हें. पवारास धारेचें संस्थान दिल्हें. याप्रमाणें वांटणी केली. दिलींत कोणी वकील ठेवावयाचा, परंतु तीन वर्षें स्वारी होती याजमुळें कोणी मागें रहावयास अनमान करूं लागले. तेव्हां महादेव भट्ट हिंगणे नाशिककर यांणीं कबूल केलें. त्यांस राजाचे विद्यमानें दिल्लीस पातशहा जवळ ठेवून देशीं येऊन महाराजांस भेटून सर्व वर्तमान निवेदन केलें. त्यापासून शिंदे होळकर पवार यांचा तह हिंदुस्थानांत चालला आहे.

पुढें वसईस फितूर आपासाहेब यांणीं करून फौज पायदळ पाठविलें. तीन वर्षां अगोदर फितुराचा उद्योग चालला होता, तो मजकूर समयासि आंतील फिरंगी यांस कळला. तेव्हां आपासाहेब इरेस पडले जे खासा स्वारी वसईस गेली. तेव्हां होळकर व जाधवराव व बाजी भिवराव व गणपतराव मेहेंदळे सासवडकर व रामचंद्र हरी पटवर्धन मानाजी आंगरे आणखी सरदार बरोबर होते. हशमी लोक बहुत ठेविले आणि मोर्चेबंदी किल्ल्यास केली. किल्ल्याभोंवतीं जमीन वालूची, याजमुळें मोर्चे ढासळतात. तीन वर्षें मोर्चे बसले. पावसाळ्यांत उपाय नाहीं. लोकांनीं लढाई बहुत बाहेर फिरंगीयांशीं प्रांतांत पडल्या त्यांत बाजी भिवराव चिंचणचे हल्लांत ठार जहाले. तसेच दुसरे लढाईत शंकराजी केशव फडके यांचे बंधु महादजी केशव हशमाचे सरदार हेही ठार जहाले. माणूस दहा हजार साहेब चाकरीवर कामास आले. तितक्यांच्या बाळपर्वशा आपासाहेब यांनीं चालविल्या. शेवटीं आपासाहेब यांस क्षयाचें दुखणें लागलें. वसई तों येत नाहीं. तेव्हां साहेबीं सर्व सरदार बोलावून सर्वांस विचारलें कीं, " वसई येत नाहीं. माझा हेतु वसई पहावी, त्यास तुम्ही तोफा भरून मी पुढें उभा राहतों, तुम्ही बत्ती द्यावी. म्हणजे मेलेवर आंत जाऊन पडेन. तुम्ही देशीं जावें. " असें ऐकतांच रामचंद्र हरी पटवर्धन, पिलाजी जाधव व होळकर यांणीं खातरजमा केली कीं, " धनियास टाकून गेल्यानें भिक्षा देखील आम्हांस मिळणार नाहीं. त्यापेक्षां आम्ही किल्ला घेतों. चिंता नाहीं. " त्याजवर सलाबत कूच करून दारूचे बुधले भरून सुरंगानें बुरूज उडविला. तेव्हां आंतील फिरंगी यानें जरब खाऊन दाणा आंतील सरला असें पाहून संधान लाविलें. तेव्हां किल्ला दिवाण रहावयासि द्यावा आणि तीन दिवसांस चीजवस्त जाईल ते नेऊं, असें संधान आलें. याप्रमाणें कबूल करून फिरंगी बाहेर काढून वसई सर करून आपासाहेबांनीं किल्ला पाहून महाराजांस विनंतीपत्रें पाठविलीं कीं, " किल्ला सर जहाला. कोणाकडे द्यावा ही आज्ञा व्हावी. " म्हणोन त्याजबरोबर पत्रें पाहतांच महाराजांस परम संतोष होऊन उत्तर लिहून सनदा नानासाहेब यांचे नावें पाठविल्या. तीं पत्रें आलियावर प्रांताचा बंदोबस्त केला. शंकराजी केशव यांचे भाऊ चाकरी-

वर पडले सबब सुभा सांगितला. हशमी सरदार पडले त्यांचे भाऊ व पुत्र व पुतणे कामकाजाचे उपयोगीं होते त्यांस सरदाऱ्या करार करून वसईत ठेविले. त्याची वस्ती नेहमीं केल्यावांचून मालवणचे रानची लावणी होणार यास्तव उजाड गांव होते ते सरंजामास लावून दिल्हे. त्याचे कबिले आणून लावणी करविली. वसईचें बेट आगाशीपावेतों सहा कोश तितकियांत कौल देऊन नारळीची झाडाची लावणी करून वीस वर्षे चालवूं असा कौल दिला. आरमार होतें तें त्याची सुभा बाजीराव बेलोसे यांणीं पहिली फितुरीची मेहनत केली, सबब त्यांस सांगून किल्ला नवा जंजिरा बांधिला व चंद्रराव मोरे यांणीं पहिली फितुरीची चाकरी करून श्रम केले होते त्यास वसईचे किल्याची हवालदारी सांगितली. याखेरीज ज्यांणीं ज्यांणीं तेथें श्रम केले त्यांस बहुतेकांस कामधंदे सांगून ठेविलें. नंतर कूच करून हुजूर येऊन महाराजांची भेट घेऊन निवेदन केलें. महाराजांची पूर्ण कृपा जाहली. ते समयीं भेटीचे वेळेस महाराजांनीं बादली चादर आंगावर घातली आणि चिमणाजी पंडित म्हणोन किताब दिल्हा.

बाजीराव साहेब यांचे स्वारीची रवानगी केली. तेथून सासवडास येऊन फौजेचा बंदोबस्त करून औरंगाबादेस स्वारी आली. नबाबाशीं बोलण्याचाही घाट बनला नाहीं सबब बिघड जाहला. उभयपक्षींही लढाईस उभे राहिले. नबाबाची फौज कोंडली. पाणी नाहीं असें जाहलें. दोन प्रहर भरत आले तेव्हां सेनापति यांनीं एक बाजू धरली होती, त्यांनीं रायासि सांगितलें कीं आपण पाठीमागें जाऊन स्नान करून भोजन करून लवकर यावें. तोंपावेतों आम्हीं यास जाऊं देत नाहीं. या बोलण्यावर कोसभर मागें बाज्यावर येऊन स्नान करून भोजन उरकून तेथें जाईं तों चार घटिका लागल्या. इतकियांत नबाबांनीं बातमी आणून लाख रुपये सेनापतीस अंतस्थ देऊन यांच्या फौजेंतून पाण्यावर जाऊन हुशार जाहले. त्याजवरून ते दिवशीं मनांत निकर्ष होता तो राहिला. दुसरे दिवशीं निकड बसवून नबाबाची रस्तबंद केली. आठ चार दिवस नबाबाचे लष्करांत फार महागाई पडली. बाजार बंद जाहला. त्या समयास त्याचे सणाचा दिवस जाला. तेव्हां नबाबांनीं वकिलास पाठविलें कीं, लष्करांत महागाई जाहली आहे यास्तव दाणा किराणा पाठवून द्यावा. त्याजवरून रायांनीं सर्वांस पुशीलें, कोणी मसलत दिली कीं, या समयीं नबाब काहील होईल, तें ऐकून रायांनीं उत्तर दिलें कीं, आपला शत्रु आजारी अथवा भुकेला अथवा निजेला असतां नाश करणें आमचे शिपाईगिरीस योग्य नव्हे. नबाबांनीं सांगून पाठविलें त्यापेक्षां गौरव करावा. असें बोलून शेटयांस सांगून दाणा किराणा जिन्नस पांच हजार बैल आपल्या छबिन्यांतून त्याचे लष्करांत पाठविले. त्याजवरून नबाबास बहुत संतोष वाटला. पुढें लवकरच सलाह होऊन भेटी जाहल्या.

त्याजवर नबाबांनीं सांगून पाठविलें कीं, तुमची आमची एखलास ह्या अर्थे बायकांचा मनोदय आहे कीं, आपले पुतणे आपले घरीं येऊन भेटावे. याकरितां तुम्हीं जाऊन भेटून यावें. तेव्हां रायानें उत्तर केलें कीं, त्याची आमची लढाई प्रसंगें करून साहेबचाकरीकरितां होती, परंतु कैलासवासी नानांचा व त्यांचा भाऊपणा त्या अर्थी आम्ही त्यांचे पुतणे खरेच.

म्हणून त्यांणीं बोलाविलें. न गेलों तरि आम्ही भिऊन न गेलों असें होईल. महाराजांचें पुण्य समर्थ आहे. त्यांणीं काल सल्याचें बोलणें जालें ते समयीं आण शपथी केल्या आहेत. त्यापेक्षां बट्टा लावून घेणार नाहींत. जावें हें योग्य. असें म्हणोन पांच हजार खांसा निवड करून फौजेंतून स्वारी बरोबर घेतला. लष्करांत मुक्कामीं आपासाहेब व अंबाजीपंत तात्या ठेविले आणि सांगितलें कीं तुमची तयारी असावी. आम्ही जातों. शहरांत गेल्यावर एक प्रहरभर वाट पहावी. आम्ही प्रहरांत येतों. न आलों तरि तुम्ही चालून यावें. असें सांगून पांच हजार स्वारांनिशीं शहरच्या दरवाज्याजवळ गेले. तेथें हजार स्वार उभे करून पुढे गेले. दुसरे दरवाज्यांत हजार स्वार उभे केले. तिसरे दरवाज्यास हजार स्वार. खासा वाड्यांत दरवाज्याशीं दोन हजार. याप्रमाणें बंदोबस्त करून शंभर लोकांनिशीं वाड्यास जाऊन दिवाणखान्यांत बसले. तेथून जनानखान्यांत जातीनें राव व मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे हे दोन खिजमतगार करून बरोबर घेतले. नबाबाचे कारभारी जनानखान्यांत रहाणार असे चौघे आंत गेले. तेथें बागेमध्यें बैठक करून भोंवतालीं सोपियास चिकाचे पडदे लावून आंत बायका बसविल्या. खाशी बैठक बेगमेची होती त्या पडद्या बाहेर लगत रायास बैठक केली. तेथें राव जाऊन बेगमेस सलाम करून बसले. राव स्वरूपानें अति सुज्ञ होते तें पाहून बेगमेस व सर्व बायकांस संतोष जाहला. चार घटकांपर्यंत बैठक होऊन निखालसपणाचीं बोलणीं बेगमे कडून वडीलपणाचे नात्यानें रायाकडून लेंकरूपणाचे नात्यानें जाहलीं. नंतर बादली वस्त्रें बेगमेनें रायासि दिलीं. जवाहीर उत्तम प्रकारें देऊन विडा देतेसमयीं बेगमेनें आपले हातीं विडा घेऊन चिरंजीव म्हणून पडदा उचलोन रायाचे हातीं विडा दिला. वरकड अत्तर गुलाब इत्यादिक उपचार केला आणि निरोप दिला. तेथून राव उठून येथें अनुक्रमें शहराचे दरवाज्या बाहेर फौजे सुद्धां निघोन लष्करांत प्रहराचे आंत पोहोंचले. हें सर्वांनीं पाहून रायाचे मर्दुमीचें लोकांनीं आश्चर्य केलें. या नंतर बेगमेनें नबाबास सांगितलें कीं, आपली कन्या वधू आहे ही राव बाजी यांस द्यावी, वर उत्तम द्यावयासि योग्य आहे. हिचें लग्न करून देऊन घरोबा वाढवावा. म्हणोन त्याजवरोन नबाबांनीं संधान करविलें. खंजिरा बरोबर विवाह विधि केला. लेंकीस आंदण बहुत दिलें. हत्ती व पागा व दासी असे दिले. जवाहीर, वस्त्रें व भूषणें बहुत दिलीं. त्या लोकांत आपली कन्या पुतण्यास द्यावी असा मार्ग आहे म्हणोन केलें. त्याप्रमाणें घेऊन आले. तिचें नांव मस्तानी. तिचें आंदण आलें त्या घोड्याची पागा व हत्ती वगैरे व तिचें संस्थान निराळें राहून पुण्यांतील वाड्यांत निराळी हवेली करून ठेविली. तिचे पोटीं दोन मुलें जहालीं. तीं राहिलीं नाहींत. एक पुत्र राहिला. त्याचें नांव समशेरबहादूर ठेविलें. त्याची योग्यता खासे पुत्राचे अन्वयें राखिली. लग्न केलें. त्यास सरदारी दिली. पुढें नानासाहेब यांणीं चौघडा साहेब नौबद सोन्याचे दांडीची चौरी दिली. त्यास पुत्र एक अलीबहादर जहाले, त्याचाहीतसाच मरातब राखिला. समशेर बहादर भाऊसाहेब यांजबरोबर गिलचाचे लढाईत जखमा लागून वाटेनें येतांना वारले.

दिल्लीहून बाजीराव जय पावून आल्यिावर राजश्री यांसि साताऱ्याशीं मुत्सद्दी व

सरकारकून यांणीं गैरत बहुत सर्वांनीं समजाविलें कीं बाजीराव आतां चढून गेले आहेत. पाहिली मर्यादा होती. आतां महाराजांच्या भेटी झाल्यावर जन बोलले. त्याची खातरजमा करावी. या अर्थी एक दिवशीं खासा मदारी हत्तीवर अंबारी ठेवून खासास्वारी व सरकारकून प्रतिनिधि श्रीपतराव सुद्धां माहुलीस येऊन तिसरे प्रहरीं वडाचे झाडाखालीं गाशावर महाराज उभे राहिले. इतक्यांत बाजीराव लष्कराहून सडे आले. तेथें सर्वांस सांगितलें कीं बागेंतून जाऊन येतों म्हणून सर्वांस हुकूम जहाला. सर्वांकडे पाहून झाला. तेव्हां सर्व जाग्यावरच राहिले. पेशवे यांजकडे पाहिलें नाहीं. याजवरून ते बरोबर चालले. पांच खिसमतखार मात्र बरोबर चालिले. बाग जवळच होता, बागेच्या दरवाज्यापर्यंत खिजमतगार होते. तेथें त्यांजकडे पाहिलें, ते सारे तेथेंच राहिले, महाराज पुढें चालिले. रायाकडे पाहिलें नाहीं. ते बरोबर चालिले. शेंपन्नास हातावर बागाचे नहर होते तेथें पायांतील पैजार टाकून महाराज पुढें गेले. तों बाजीराव यांणीं पैजार महाराजांची घेऊन महाराज बंगल्यांत बसले, तेथें जाऊन उभे राहिले. नंतर महाराजांनीं आपले ठिकाणीं विचार केला कीं मुत्सद्दी सांगत होते जे, बाजीराव पहिले पेक्षां उन्मत्त जहाले, पाहिली मर्यादा राहिली नाहीं, असें सांगितलें होतें, त्याची परीक्षा पहातां मर्यादेपेक्षां विशेष मर्यादा पाहून संतोष. वस्त्रें व पैजारा बाजीराव यांणीं उचलिल्या होत्या त्याच रायास दिल्या, आणि निरोप दिला. याप्रमाणें बाजीराव साहेब यांणीं राज्य केलें.

शके १७६३ ह्लवनामसंवत्सरे मित्ति श्रावण वद्य १४ स प्रारंभ. समाप्त मित्ति वद्य ३० स प्रातःकाळीं प्रहर दिवसास समाप्त. माहे जमादिलाखर सन इसने आर्बेन मया तैन व अल्फ.*

ले. ४९७ }
[४४०] }

{ सन १८२६
{ शके १७४८

॥ श्री ॥

इ॥ शके १६३५ सन हिजरी ११२४ श्रीमंत बाळाजी विश्वनाथ महाराज शाहूराजे भोंसले यांचे पंतप्रधान जहाल्यापासून कारकीर्दी होत गेल्या त्यांत कारभारी जाले त बितपशीलः—

१ श्रीमंत बाळाजी विश्वनाथ प्रधान, कारभारी अंबाजीपंत पुरंदरे दिवाण.

२० कारकीर्दी श्रीमंत बाजीराव बल्लाळ प्रधान.

---

* हेंही प्रकरण बापू दीक्षित श्रोत्री यांजकडीलच रा. विष्णु धोंडदेव भागवत यांनीं पाठविलें. हें खर्ची कागदाच्या उभ्या बंदावर लिहिलें आहे. नवव्या बंदावर संपूर्ण झालें आहे. अक्षर मध्यम प्रकारचें आहे. शेवटीं शक १७६३ लिहिला आहे, तो प्रत केल्याचा किंवा बखर लिहिण्याचा हें कळण्यास मार्ग फारसा नाहीं. तथापि प्रत केल्याचा असावा असें वाटतें.

१७ कारभारी अंबाजीपंत पुरंदरे दिवाण.
३ श्रीमंत चिमाजी बल्लाळ, भाऊ कारभारी.
२०

२२ श्रीमंत बाळाजी बाजीराव प्रधान.
१२ महादाजी अंबाजी पुरंदरे दिवाणपणानंतर [सर] दार.
३ रामचंद्र बावा व भाऊसाहेब
६ भाऊसाहेब कारभार करून दिल्लीस गिलच्यावर गेले.
१ नीलकंठ महादेव पुरंदरे स्वारी एक हिंदुस्थान.
२२

१२।८ श्रीमंत माधवराव बल्लाळ प्रधान कारकीर्दी वर्षे.
३ नीळकंठ महादेव पुरंदरे, सखाराम भगवंत बोकील.
-।।।- त्रिंबकराव मामा.
४॥ सखाराम भगवंत बोकील.
४ मोरो बाबूराव फडणीस भानु धोडप स्वारी.
८= सखाराम भगवंत बोकील, श्रीमंत रघुनाथ बाजीराव वाड्यांत होते ते मोकळे जाले. शके १६९४ कार्तिकमास-
१२।=

-।।।- श्रीमंत नारायणराव बल्लाळ प्रधान इस्तकबील पौष शके १६९४ तागाईत भाद्रपद शके १६९५ कारभारी सखाराम भगवंत व बालाजी जनार्दन फडणीस व हरि बल्लाळ फडके. श्रीमंत रघुनाथ बाजीराव वाड्यांत आहेत.

-।।।- रघुनाथ बाजीराव वाड्यांतून मोकळे जाले. कारभारी सखाराम भगवंत महिने ३. श्रीमंत रघुनाथ बाजीराव कार्तिक अखेर प्रधान जाले. कारभार सदाशिव रामचंद्र व चिंतो विठ्ठल व आबाजी महादेव करूं लागले. सखाराम भगवंत ब नाना फडणीस निरोप घेऊन पुण्यास आले. पुणियांत नारो आप्पाजी मुतालकीवर व केशवराव केतकर कोतवालीचे अंमलावर. श्रीमंत स्वारीस कारकीर्द महिने ९. शिक्का लष्करांत अधिक वैशाख पर्यंत चालला. शके १६९६ कारकीर्द पुण्यांत इस्तकबील माघ शके १६९५ शुद्ध ५ तागाईत अधिक वैशाख शुद्ध ७ शके १६९६. मातोश्री गंगाबाई किले पुरंदरीं. पुणियांत केशवराव केतकर कोतवालीचे कामावर होते त्यांस धरिलें. नारो आपाजीचा अमल पुण्यांत. किल्यावरून बाईचा हुकूम चालविला. स्वारींत श्रीमंत रघुनाथ बाजीराव आहेत. किल्यावर बाई जवळ कारभारी सखाराम भगवंत बोकील व बाळाजी जनार्दन होते. त्रिंबकराव मामा व हरिपंत फौज सहवर्तमान निजाम अलीखान भागानगरकर नबाब एक होऊन श्रीमंत रघुनाथ बाजीराव

यांवर गेले असत. स्वारीत फौजेंत हुकूम श्रीमंतांचा. किल्यावरून हुकुम मातुश्री गंगाबाईचा. एकूण महिने ९ कारकीर्दी २.

२२ इ॥ शके १६९६ अधिक वैशाख शुद्ध ७ मातुश्री गंगाबाई गरोदर होतीं. त्यांस पुत्र किल्ले पुरंधरीं श्रीमंत माधवराव नारायण जाले. कारभारी सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन फडणीस असतां वस्त्रें माधवराव नीलकंठ पुरंधरे यांणीं सप्तऋषीस जाऊन राजश्रीचीं वस्त्रें पेशवाईचीं व शिक्के कटार आणिली, तीं वैशाख मासीं शके मजकुरीं किल्यावर बाळंतीणीजवळ श्रीमंत असतां चौरंगावर वस्त्रें जवाहीर व ढाल तरवार कटार १ व शिक्के कटार जाबते माफक आली, तीं ठेवून सभा कचेरी नाच [चालला] असतां नजरा लोकांनीं करून माधवराव नारायण प्रधान यांचा शिक्का पत्रावर जाहला. त्यास कारभारी.

५ सखाराम भगवंत बोकील व नाना फडणीस.

१७ बाळाजी जनार्दन फडणीस व हरी चळाळ.

२२

कारकीर्द श्रीमंत माधवराव नारायण इ॥ आश्विन शुद्ध १५ कोजागिरीची, शके १७१७ राक्षसनाम संवत्सरे वर्षे २१॥ वि॥ बाळाजी जनार्दन महिने ५ फाल्गुन शुद्ध १५ पर्यंत नंतर श्रीमंत बाजीराव चिमणाजी आपा साहेब परशराम रामचंद्र घेऊन आले.

॥= कारकीर्द चिमणाजी माधवराव प्रधान इ॥ वैशाख शके १७१८ नलनाम संवत्सरे आश्विन वद्य १२ कारभारी परशराम रामचंद्र, बाबा फडके, बहिरोपंत मेहंदळे. यांत बाबा फडके कैद चावणेंत गेले, पुन्हा आले. नारोपंत चक्रदेव मशीराचे लष्करांत

२२ कारकीर्द श्रीमंत बाजीराव रघुनाथ प्रधान इ॥ मार्गशीर्ष वद्य ५ सह ६ नलनाम संवत्सरे शके १७९८ कारभारी:—

१ बाळाजी जनार्दन फडणीस कैद झाले, सुटले, घरीं आले, मेले.

१ नारोपंत चक्रदेव कैद जाले. सुटले. घरीं आले, मेले.

१ बाबा फडके कैद जाले. सुटले. मिरजेस गेले.

१ त्रिंबकराव परचुरे काशीस गेले. मृत्यु पावले.

१ चिमणाजी खंडेराव निा जाधव, कैदेंत आहेत.

१ दौलतराव शिंदे आलिजाहाबहादूर हिंदुस्थानांत.

१ भोंसले नागपूरकर निरोप दिल्हा.

१ मशिरीन्मुल्क दिवाण निजामअलीखां बहादूर भागानगरीचे निरोप दिल्हा.

१ होळकर मल्हारराव मारिले, त्यांस खंडेराव जाले. त्यांचे येशवंतराव हिंदुस्थानांत.

१ संपूर्ण पागा वगैरे भेटल्या.

१ गोपाळराव मुनशी निा पारसनीस कारकून कैदेंत आहेत. कारभारास लागले होते.

१ गोविंदराव काळे कैद सोडले ते आहेत.

१ गोविंदराव पिंगळे मृत्यु पावले.

१ बाळोजी कुंजीर शिंद्याकडे गेले, ब्रह्मपुरीं आहेत.

१ वैजनाथ भट मामा सातारेयास राजश्री जवळ. त्यांचा काळ आषाढमासीं पुणें मुक्कामीं जाला.

१ चिंतो वामन देशमुख आहेत. फडणीसीची तेरीख करितात.

१ मोरो बाबूराव फडणीसीवर आणिले. कैद जाले. सुटले. मेले. त्यांचे पुत्रही मेले. नातू काशीपंत आहेत.

४ शके १७२५ श्रीमंत वसईहून वैशाख मासीं आले. कारभारी.

१ राजश्री सदाशिव माणकेश्वर भाऊ यांस चौघडा दिल्हा. रहावयास दादा गद्रे यांचा वाडा दिल्हा. हल्लीं नाना फडणीस यांचे वाड्यांत शके १७२८ त येऊन राहिले.

१ राजश्री कृष्णाजी भवानी दिवाण राजश्री सदाशिव भाऊंचे कारभारी होते. शके १७२० ज्येष्ठ मासीं मृत्यु पावले.

१ रा चिंतोपंत देशमुख फडणीसीची तेरीख घालितात. महाल मुलकी कारभार करितात.

१ कर्णेल कलुष इंग्रज चाकर ठेविले ते पुण्याजवळ आहेत.

४

शके १७२७ फाल्गुन शिंदे होळकर हिंदुस्थानांत, भोंसले नागपुरीं मशरीन्मुल्लख भागानगरीं गेला तो मृत्यू पावला. उभयतां सरदारांवर इंग्रज लढतात, हिंदुस्थान प्रांतीं तह करून आहेत.

१ श्रीमंत अमृतराव साहेब काशीस गेले, तेथें आहेत. शके १७२८.

१ श्रीमंत चिमणाजी रघुनाथ जुन्या वाड्यांत आहेत. शके १७२८ खर्चाची नेमणूक जाली आहे.

१ शके १७३९ कार्तिक शु ९ लढाई इंग्रज. मोर दीक्षित समाप्त. नंतर बापू गोखले. श्रीमंत हिंदुस्थानांत ब्रह्मवर्ती, या प्रमाणें जालें.

इ शके १७३९ ता शके १७४८ कंपनी साहेब इंग्रज बहादूर पंतप्रधान बडे साहेब अलफिन्टन बहादूर सुभा पुण्यांत राबीन्सन् साहेब वर्षे ९

ले. ४९८
४८१]

श्री.

(छ ११ जमादिलोवल)

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक सोयराजी अवधूत कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष. विज्ञापना

ता। छ. २५ माहे रकिलाखर स्वामीचे कृपावलोकनें करून सवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. सरकारचें आज्ञापत्र सेवकाचे नावें सादर जालें कीं तुम्हांस-संक्रमणचे तळि शर्करायुक्त पाठविले असत ते घेऊन स्वीकार करणें म्हणून.त्यास आज्ञापत्र शिरसा वंदन करून शर्करामिश्रित तीळ अत्यादरें सेवकानें स्वीकारून अमृतलाभातुल्य आनंद होऊन सेवक सनाथ जाला. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.*

ले. ४९९
[४९०]

श्री.

याद इंग्रजाचे ता।। गडकिल्लेस ठाणा घातल्याची तपशील.*

१ चंगमचा किल्ला.	१ पोळूरचा किल्ला.	१ त्रिणामलचा किल्ला.
१ सुलभगड.	१ तिमरायगड.	१ रावतनळूरगड.
१ धोवीगड.	१ चेतपटचाकिल्ला.	१ आरणीचा किल्ला.
३	३	३

ले. ५००
[५०१]

श्री.

*पादशाही तवारिखेंतील फिकरा पोख्त समंजस. मलमत बोलणारास आदब माफ. जसें लिहिणारास ताजीम माफ तसें राज [कारण] करणारास सलाह मसलत बोलणें व लिहिणें, एक शब्द सख्त पडतो, बोलण्यांत येतो, त्यांत एक चित्तास वाईट वाटून झोंबतो, एक पसंत पडतो तो संतोषजनक चित्तास होतो. असे शब्द येतात. हे पूर्वीपासून थोर, सुज्ञ पातशाहादिक यांणीं माफ केले आहेत व पसंदही करतात. हे थोराची रीत आह.S

---

* अशा पत्रांची तारीख देण्यास साधन नाहीं. सन अंदाजानें दिला आहे.

S ह्या लेखाची नक्कल रा० रा० बळवंत कमळाकर यांजकडून मिळाली.

ले. ५०१ [४९९] } { स. १८५० श. १७७२

पंत अमात्य हुकुमपन्हा बावडेकर यांची वंशावळ.



समाप्त.

† स्त्री जानकीबाई मोरोपंत पिंगळे यांची कन्या. § स्त्री व्यंकुबाई आपले मुलाचा कृष्णरावाचा सर्व कारभार दक्षतेनें करी. ‡ मोरेश्वरराव मुलासहित दत्तक घेतले होते. ¶ रघुनाथरावाच्या पश्चात् कारभार त्यांची स्त्री जानकीबाई नेमलेल्या कारभाऱ्यां मार्फत पहात असे सुमारें वर्षे २. * ही वंशावळ रा० गोविंद बळाळ शितूत असि० मास्तर यांजकडून मिळाली.

कठिण शब्दांचा

कोष.

अ.

अकबरनीस—बातमीदार.
अखबार—बातमी, वर्तमान.
अंगेज—अंगिकार.
अंगेजणी—शौर्य.
अगाध—कठीण.
अज-तर्फ—कडून (अज्-प्रत्यय; तर्फ-बाजू).
अज-तरीक—रीतसर, (तरीका-पद्धत).
अजरामत } बक्षीस.
अजरा-मरहामत } (मर्हमत-कृपा).
अज्जम—सर्वश्रेष्ठ (आजम).
अर्जानी—आर्जवानें; नम्रपणानें.
अजुर्दा—खट्टू ; खिन्न.
अजुर्दार-पत्रें पोंचविणारा जासूद; काशीद.
अंतरवेद— (अंतर्वेदी) गंगा व यमुना यांच्या दरम्यानचा मुलुख.
अंतराई—अंतर.
अंदेशा—संशय.
अन्करीब—जवळ; लवकरच; बहुतकरून.
अनुपान भोगणें—जेवणें(अन्नपान).
अनुपत्य—अनुपपत्ति; दालभैर्य.
अनुफा-अडीश्री— (उल्फा=शिधा अडीश्री अडीच शेरी; पासरींचीं निम्मे अडीश्री)-शिधासामुग्री, पोटगी.
अमल—घडणूक (अमल-कलम-लेख हाण).
अंमा—परंतु, पण, लेकिन.
अमानत—ठेव.
अमारत—प्रधानत्व (अमीरपासून).
अमीनपणें—विश्वासूपणानें.
अयान—ज्ञात; श्रुत; व्यक्त.
अयालत्—वर्चस्व.
अलंग-कोट,=भिंत,=रांग,=बाजू,(सैन्याची).
अलफ—हजार
अलबता—बेशक; खास; निश्चित.
अलम-रोषन—दुनियेंत श्रुत;जगद्विख्यात.
अवलाद—संतति (मुलाकडून वंशज).
अफलाद—संतति (मुलींकडून वंशज).
अवश्यक—अगत्य.
अवसान—बळ.
अवाली पन्हा—उच्चपदाचे आश्रय.
अवाली-मंजलस—उच्चपदाचे.
अशुरा— (आषुरा) मोहरमचा नववा अगर दहावा दिवस.
अहाद—अटी.
अहीर—रानांतील चोरांची एक जात.

आ.

आँ—तो, = तीं, = तें = (आँ साहेबी-त्या प्रभूनीं).
आईंदे—पुढें.
आखीरश—शेवटीं.
आंगेजणी—स्वतःच्या हिंमतीनें केलेलें कृत्य; शौर्य; साहस; लगट.

आजम (आज्म)—विचार; संकल्प; निश्चय.

आजमायष—अनुभव, परीक्षा.

आजराहा— (अज्राहे) रस्त्यानें, मार्गें, पूर्वक.

आजीन-सबब—या कारणास्तव; यास्तव; **आजीज**—लाचार.

आध्यान—आधीन, हुकमांत.

आफरीन—शाबासकी.

आफ्तर— (आत्तर) दोषयुक्त, बिघडलेला (ले. ८०).

आब—मान.

आबदारखाना—पिण्याचें पाणी साठविण्याचें टाकें.

आबरी शमामा—अंबरासारखा सुवासिक पदार्थ.

आबळ—आबाळ.

आबादी—समृद्धि.

आमद—उत्पन्न, आवक (पटवर्धन).

आमदन—येणें; आगमन.

आमद-रफ्ती—दळणवळण, ये जा.

आयास—हायास, जिकीरीस.

आयास येणें—जेरीस येणें.

आरगानरगा—वेढा (पटवर्धन).

आरजो—आर्जव.

आरसा— (अर्सा) अवधि, वेळ, काळ, संधि, अवकाश.

आराबा—तोफखाना; तोफेचा मारा.

आलाहिदा—वेगळा.

आहाद—शर्ती; अटी.

आहाद पैमान—वचन; करार;दारमदार.

इ.

इजहार करणें—स्पष्ट करून सांगणें; जाहीर करणें.

इजाफत—इसाफत पहा.

इजारा—मक्तेदारी, खंडाची पद्धति.

इत्तफाक—एकी;सहविचार; योगायोग.

इतबारी--विश्वासू.

इतराजी--गैरमर्जी.

इतल्ला--वार्ता; खबर; लक्ष; लोभ.

इंतिजारी— मार्गप्रतीक्षा; प्रतीक्षा.

इबलाग--पाठविणें.

इमान उजवणें-आणभाकेंतून मुक्त होणें.

इर—ईर्षा; तंटा.

इरसाल करणें—पाठविणें. (ले.३०२).

इरशाद--हुकूम; उपदेश.

इस्तकबील--भावी, पुढें होणारे. (हाल म्ह.हल्लींचें याचे उलट).

इस्तमालत—लावणी.

इसाफती- } इनाम गांव.,गांवचें उत्पन्न,
इजाफत- } वाढ.
इजाफा- }

उ.

उजूर—सबब, तक्रार, आक्षेप.

उत्पात--दांडगाई.

उतारी--वापरून = निरुपयोगी = झालेले (कपडे).

उपमर्दन—नाश.

उपराळा—मदत.

उमर-दराज--चिरंजीव, पुत्र.

उस्तवारी—व्यवस्था; शुश्रूषा; मजबुती.

एहतियाद—सावधागिरी; खबरदारी.

ऐतजात—विश्वासू (स्नेही).

ओढगस्त—अडचणींत असलेला.

क.

—+—

कजाखी—कटकट; मारामारी; लढाई.
कजिया—तंटा.
कट्टा करणें—कापून काढणें.
कडिवडे—कढी-वडे.
कतबा—लेख; करारनामा .
कत्तल-आम—सर्वांची कत्तल.
कथळा,-ळें—भांडण, लाथाळी.
कदीम—जुना; पुरातन.
कबज—पावती; पोंच, ले. २४५)
कबजी—ताब्यांतील, अमली.
कबदस्त—हस्तगत.
कबिला—कुटुंब, बायकामुलें, परिवार.
कबू—चिवट; कठीण.
कम्पेश } —कमजास्त.
कंबेश }
कयास—विचार, तर्क.
करदन-बस्तन—हिशेब, (पट. गणित).
कर्यात—तालुका, दहाबारा गांवांचा पेटा.
करवळ } बंदुक, बंदुक स्वार.
करोळ }
करार बमोजीब—कराराप्रमाणें.
करिना— (करिणा) योग्यायोग्य-विचार, संबंध.
करीन-सल्ला—योग्य सल्ला.
कलम करणें—लिहिणें; छाटणें.
कश्यप—(कच्छप) कांस ? आसरा.
कसाला—कष्टी मेहनत,श्रम, दुःख, पीडा.
कही } —दाणा वैरण वगैरे मिळवून
कहीवाले } आणणारी लष्करी तुकडी
काटकाई—कापाकापी.
काबाडे—मजूर.
काबूतलब—संधिशोधक, संधिसाधु.
काबुकार—धूर्त, हिकमती.
कायम-मिजाज—दृढचित्त; दिलाचा खंबीरपणा.
कारणिक—उपयोगी.
कारपरदराज } —कारभारी, मुत्सदी.
कारपरदाज }
कारेगार—लागू, सिद्ध.
काशीद— पत्र पोहोंचविणारा दूत, जासूद.
काहील—निरुत्तर.
काहिली—बिमारी, घबराट.
किताबत—पदवी.
किया—आणभाक शब्द; करार.
किलाफ— किस्सा; तंटा.
कीर्द-महामुरी—लावणी; लागवड व वसाहत (पट०).
कुचैद—खटपटी, कारस्थान.
कुचोद्य—कुविचार; लुच्चेगिरी.
कुमक—मदत.
कुल—सर्व.
कुल—अजीजुल-कुद्र—(कुल+अजीज+उल+कुद्र) सर्वमित्र.
कुलाह-पोश— टोपीकर, इंग्रज.
कैद—शिस्त.
कोतवाल } —अडीअडीचणीसाठीं
कोतल } राखून ठेवलेला; रिकामा.
उ० घोडा.
कोताई—कमीपणा.
कोरबंदी—रांग.
कोसल— कौन्सिलचा अपभ्रंश.
कोळंबे—रुंद .तोंडाचें भांडें, पडगा.
कौल—लेख; परवाना; सुरक्षितपणें जाण्याविषयीं अभयपत्र.

कौलास येणें--शरण येऊन तहास प्रवर्तणें.
कौसलदार—कौन्सिलर (अप०).

ख

खट्टी—नाराज (मर्जी).
खत—पत्र.
खत—किताबत-चिठ्ठीचपाटी.
खत्ता करणें—इमान गमावणें; बेइमान होणें
खपगी—खफा होणें, राग येणें, वाईट वाटणें.
खबरदारी—संरक्षण.
खर्च होणें—पडणें, कामास येणें.
खलब—तंटा.
खलेल—व्यत्यय; प्रतिबंध.
खलश—खंड; अंतर; अंदेशा; विरुद्धपणा.
खवासखाना—अंबारींत खासे बसण्याच्या मागील मानकरी बसण्याची जागा.
खस्त करणें—कापून काढणें.
खामखा—कांहीं झालें तरी; निश्चयानें; खचित; जरूर.
खारीज—हाकलून लावणें.
खावंदगिरी—धनीपणा.
खास-बारदार—खाशाची बंदूक घेऊन चालणारा नोकर.
ख्याल-दिगर—दुसरा विचार.
खाहेश-इलाही—ईश्वराजी मर्जी.
खियाल--विचार.
खिलत—सन्मानाचा पोषाक.
खिसा— बोलाचाली; तंटा.
खुदा-ए-त-आला—प्रभावशाली ईश्वर, तेजोमय ईश्वर.
खुदावंत-न्यामत— श्रीमंत.
खुरमी—(खुर्मी) आनंद; संतोष.
खुलाश—सारांश.
खुश-नमत—आनंददायक पत्र.
खुश-वक्ती—आनंद; खुशाली.
खुषकी—जमीन.
खेमा—डेरा.
खेमे-दाखल—डेरेदाखल.
खेरखुषी—समाचार.
खैर-आफियत—क्षेम कुशल; खुशाली.
खैरियत-खुशाली;सुरक्षितता.

ग

गडीबंद—गढी-किल्याचा आश्रय असलेला.
गंजिफा—दारुगोळा.
गंगेरी पानें-विड्याच्या पानांची एक जात.
गमागिनी—(गम दुःख) फिकिर; दुःख.
गफलत—बेसावधपणा.
गर्नाळ— मोठी तोफ.
गरगशा— गोंधळ; दंगल.
गरमी—उष्णता; जाचणी; तोंडजरब.
गलबा—गवगवा.
गल्ला—धान्य; पीक.
गली—गॅली नांवाचें पोर्तुगीज तारूं.
गलेफ—गवसणी.
गळाटा—डबघाई; खराबा.
गारत—गारद-नष्ट.
गालब—जिंकणारी.
गाशा—पातळ गादी.
गाहा—जमाव.
गाही—साक्षी.
गिर्दी—वर्तुळाकार लहानशी उशी.
गिरफदारी—बंधन;विवंचना; चिंता.

गिरफ्तदीर—दुःखी; कष्टी.
गिराणी—महागाई.
गिराशी— डोंगरी लुटारू.
गिरिफदार—गुंतलेले; कैद झालेले.
गिरिफ्तर—हैराण.
गीर्दनवाई-शहरकोट व भोंवतालचा प्रदेश.
गुजारत—मध्यस्ती; मार्फत.
गुत्ता— } अडथळा;दगा फटका;अडचण.
गुत्ता— }
गुबर—(घोबार) भ्रम, संशय.
गुबार—वावटळ, हेतू.
गुमज—घुमट; समाधि; मंदीर.
गुमान—विचार.
गुरबत—नम्रता; अजीजी.
गुराब—एक प्रकारचें तारूं.
गुरें वळणें—कारभार करणें.
गुलदान—(गुल—दिव्यावरची कोळी, काजळी) गुल काढण्याचें भांडें.
गुसल—स्नान.
गौरशी—नावाजणें; वाहवा करणें.

घ.

घराऊ—घरगुती; स्वपक्षाकडील, आपल्या राज्यांतील.
घावदाव—संधि.
घासदाणा-घोड्याच्या गवत व चंदीच्या खर्चाबद्दलचा कर. हा गांवचे उत्पन्नावर शेंकडा सुमारें २रु. असे.
घबाड—मोठा लाभ.

च.

चकला—बरेच परगणे मिळून झालेला प्रांत.
चढ्या घोड्यानिशीं—घोड्यावरून न उतरतां.
चंद रोज—कांहीं दिवस.
चर्मी—कातड्याचा.
चांचवे—चांचे; समुद्रावरील लुटारु.
चाडी—चाहाडी.
चाडें—समईत तेल घालतात तो भाग.
चांदणी—मंडपाचें वर लावण्याचें पाल.
चाहूर—जमीन मोजण्याचें एक माप.
चिरा—मोठा दगड; पायाचा दगड.
चुनाचें—ज्या अर्थी; जसें कीं; ऐशियास.
चोरपायकी—चोरून हल्ला करणें.
चोळणींत येणें—खराब होणें.
चौगीर्द—चोहोबाजूंनीं.
चौफुला—चार खण असलेलें पात्र.
चौसोपी—चार सोपे असलेली जागा.

छ.

छकडा—लहानशी गाडी.
छद्म—कपट.
छबिना—रात पहारा.
छाण—छाननी; सत्यनिर्णय.
छिडकाव—सडा शिंपडणें.

ज.

जकड-जखड—ताण.
जकिरा— }
जखीरा— } सांठा; सामान सुमान.
जड—मूळ पाळ.
जडाव—जमाव.
जथा— सांचणी; मिळवामिळव; संघ.
जथणें—जमाव जमवणें.
जंगी—(जंग=लढाई) लढाईचें; युद्धासंबंधी विशेषत दारुगोळ्याचें व तोफखान्याचें सामान.
जंजिरा—जलदुर्ग.
जंबुरा—लहान तोफ.
जनाबेंत उजू—स्वतः नबाबाच्या निष्ठेंत.

जमात—जमाव.
जमियेदोस्त—सर्व मित्र.
जरब—धक्का.
जरबा—तोफा.
जराबाजरा—कण न कण.
जरीद—नवीन ठरलेला.
जरीदा—सडा (स्वार).
जरूर—कठीण; अशक्य.
जलचर—इंग्रज.
जलुषी-जुलूस = राज्यारोहण, राज्यरोहणापासून मोजण्यांत आलेला शक.
जवा वसविणें—ठाकठीक करणें.
जश—यश.
जहुरात—जाहिरात.
जानाबैन—(जानेबैन) दोन्ही बाजू;तर्फैन.
जाबता—नियम; बंधन; यादी.
जाबसाल—(जबाब; सवाल अप०)तहाचें बोलणें; संभाषणरूप तह.
जिनसी—माल सामान, धान्य गवत वैगरे.
जिनहार—बिलकूल; हरगीज; कधींही.
जिम्मा—जबाबदारी.
जिलब—लवाजमा; मिरवणूक; शृंगारलेला घोडा.
जिलबीस- आघाडीस.
जीवादारभ्य—जिवापलीकडे.
जीवनमाफक—सामर्थ्यानुरूप.
जीवाभ्य—जिवापलीकडे.
जूद—(फा.)लौकर.
जुदतर—(फा.) फार लवकर.
जुदाई } दुजाभाव; निराळेपणा.
जुदाशी }
जुरत—धैर्य; हिंमत.
जूज—थुलक; थोडी; किरकोळ, अल्प.
जेजाल—लहान तोफ.
जेठी—मल्ल.
जेर—चीत; पराभूत.
जोडी—जासूद जोडी.
जोतपात—शेतकीस लागणारे सामान व जनावरें.
जोरतलबी (मुलुख)—शक्तीच्या योगें करून अम्मल चालवावा लागतो असा मुलुख.
जोर-ब-जोर—जबरदस्तीनें.
जोरी—ज्वारी.
जोहार—(जतुगृह, लाक्षागृह)जाळून घेणें.

झ.

झडती—तपशीलवार हिशेब.
झरझऱ्या—दांडीचे हुक्के.
झाडून—सर्व.
झुंज—लढाई.
झोंबट—लढाई.

ट.

टप्पा—प्रांत.
टिका—टिळा; (गादीवर बसण्याचे वेळीं वडील नातलगानें टिळा लावला म्हणजे सर्व विधि पूर्ण झाला असा रजपुतांचा समज आहे.)
टिळा—टिळ्याचें गंध लावण्याचा शिक्का.
टेपर—वाईटपणा; बोल; दोष.

ठ.

ठोकरा—बुरडी नांव करून तिला कातड्यानें मढवितात अशा नांवेस ठोकरा म्हणतात.
ठाकुरकी—लौकिक; अब्रू.

ड.

डेरेदाखल—तंबूत येऊन उतरणें.
डौल—स्थिति.
डौल—मात्रा; दरजा; दौलत; ऐट.
डौळ—सहीशिक्क्याचा कोरा कागद.

ढ.

ढालाईत—ढाल बांधलेले-शिपाई; चोपदारासारखे काठी घेतलेले थोर गृहस्थांचे परिचारक.
ढाल—निशाण; बावटा.

त.

तगटी—सोनेरी.
तगीरी—बडतर्फ करणें; कामावरून दूर करणें.
तजावजा—पांगलेले.
तदबीर—युक्ति; प्रयत्न; योजना.
तबीब—शस्त्रवैद्य.
तंबी—शिक्षा; पारिपत्य.
तमा—फिकीर; पर्वा; भीति.
तमा-त-वक्का—महत्वाकांक्षा; आशा.
तरक्की—उन्नति; प्रगति; सुधारणा.
तरकीब—व्यवस्था, युक्ति.
तरतूद—उपाय.
तरांडें—एक प्रकारचें तारुं.
तरिक-सावेक-(तरिका रस्ता; सावेक; जुना, पहिला) जुना मार्ग; रीत; वहिवाटीप्रमाणें.
तर्फ—तालुका; पेठा.
तर्फैन—उभयपक्ष; उभयपक्षी. (हा शब्द दुसऱ्या शब्दास जोडून लावतात. जसे-तर्फैन दिलात्-तर्फैन खलष;तर्फैन जुदाई).
तलब— पगार; वतन; बोलावणें.
तलावा—टेहळणी.
तवकल,तवकूल—भरंवसा; (ईश्वराबर).
तवाफ—प्रदक्षिणा.
तस्रीफ—आगमन; बहुमानाचा पोशाख.
तसलीमात—(तस्लमात). मोघम खर्ची घेतलेली रक्कम; अनामत; सलाम; वंदन.
तसरूफ—ताबा; कबजा.
तहकीक—खात्री; निर्णय; निश्चिती.
तहकीकात—चौकशी; सत्यान्वेषण.
तहतंग—अडकविलेले; कैद केलेले.
तहद, तहत—(ता = हद फा.)सीमांत; पर्यंत. (आहद-पासून).
तहरह—तह वगैरे.
तंग करणें—गच्च बांधून टाकणें; पक्के पेचांत आणणें.
ताकूब—पिच्छा; पाठलाग.
ताख्त—मारलूट; उध्वस्त.
ताख्त-ताराजी—हल्ला करणें व लुटणें.
ताजीम—उत्थापन; बहुमान.
ताफा—मंडळी; टोळी.
ताब—शक्ति; सामर्थ्य.
ताब्बीन—आज्ञेंत; स्वाधीन.
तावूत—तिरडी.
तांब्र—इंग्रज.
ताराज—खराब; उध्वस्त.
तालमाला--(ताळमाळा) रागरंग.
तालीक—नक्कल.
ता-हाल—हा काळपर्यंत; आजपर्यंत.
ताळेबंद--हिशेबाचा तक्ता.
तिजाई--तिसरा हिस्सा.
तिडण—पेच; पंचाईत.

तिरकती—एक प्रकारचें जहाज.
तिरा--तिसरा.
तिवट--पागोटें.
तूट खाणें—तह मोडणें.
तेरीख--बेरीज; ताळेबंद.
तैनात—पगार.
तैनात-जाबता-नोकरीबद्दल लेखी करार.
तोड पाडणें--दिलसफाई होणें; तोड निघणें.
तोंड--बाजू.
तोंड टाकणें--हल्ला करणें.
तोर तोरा--डौल; दरजा.
तोशीस--नुकसान; झीज.
थट्टी--गोशाळा ("थट्टी गोवाटिका नाम" रा. ब्य. कोश).
थांक, थांग--ठिकाण.

द.

दखल--ताबा; प्रवेश (नवीन घेतलेल्या-मुलखाचा ताबा करणें.)
दखलगिरी--ढवळाढवळ.
दखल करणें—हात घालणें.
दबाब—दरारा.
दफा--कलम.
दफाति—स्मरण वही.
दर्ज (दरज)--फरक; संदेह.
दरख—सरकारी अधिकाराची जागा.
दरखदार--सरकारी अधिकारी.
दरकार--जरूर, आवश्यकता.
दरज--फट; छिद्र.
दरपेश } --पुढें.
दरफेज }
दरोबस्त--सर्व; तमाम; बिलकुल.
दरिम्विला—यावेळीं, हल्लीं.
दरुणीमहाल--जनानखाना.
दस्तक--परवाना; लायसेन्स.
दस्तक--सही. (दस्तखतचा अपभ्रंश).
दस्तांत आणणें—ताब्यांत घेणें.
दस्तगीर--जरुरी.
दस्तुराचें गांव—वहिवाटीचें गांव.
दागिना—नग.
दारमदार—करार; वचन प्रमाण; मान-सन्मान.
दाली बांधणें—तरवार कमरेस बांधणें.
दास्त—रक्षण.
दास्तान—कोठार.
दिक्क—खिन्न; रुष्ट.
दिक्कत—अडचण; शंका; हरकत.
दिक्कत बसवसी—दिक्कतखोर; संशयी.
दिगर—अन्य; आणखी; भलते; उलटा.
दिमत—पदरचें; तैनात; हवाला.
दिरिंग—उशीर; विलंग.
दिली—(जानी) मनांतील.
दिलखवाह—यथास्थित; मनाजोगे.
दिलताजगी—संतोष.
दिल-निशीन—पसंत.
दिल-शाद—चित्तास संतोष.
दिलासा—आश्वासन; धीर; उत्तेजन.
दिलेरी—रुस्तुमी धैर्य; शौर्य; पराक्रम.
दिवटे—दिवे लावणारे.
दुकित्ता—दुहेरी.
दुदिल—दुलंग; दोन्हीकडे संधान बांध-णारा.
दुनियाई—दुनिया.
दुमदारी—पिछाडी. (दुम = शेपूट).

दुमाला—इनाम; जहागीर.

दुरंदेश—दूरदर्शी.

दुरा—दुसरा.

दुरादृष्ट—कमनशीब; दुर्दैव.

दुशाखी—अनेक काकडे लावतां यावे म्हणून एका काठीच्या टोकांस शिंग लावलेला दीपयष्टी.

देखील—सुद्धां; सह (अव्यय .)

देशकत वतनें—स्थानिक वतनें उ. देशमुख, देशपांडे वगैरे.

देहे } —गांव
देह }

धमधमा—तोफा डागण्यासाठीं केलेला उंचवटा.

धोरवटा— धोरण.

धातुपोषण.—गोड थाप (ले ०४)

न

नगदी सामान—रोकड पैसा.

नजर पेशकशी—(पेशकशी-नजराणा).

नजर नियाज—(नवस)नजराणा ले. ५८.

नतिजा—फळ; परिणाम; शिक्षा.

नफर--नग;संख्या; व्यक्ति;हलका शिपाई.

नमूद--रुजू; उद्युक्त.

नवघण—ओझीं वाहण्याकरितां बांबूच्या काठीस दोर लावून करतात तें.

नविस्ता—पत्र; लेख.

नशीहद—उपदेश: अद्दल; शिक्षा.

नशीहतपूर्वक—(नशीहत-ताकीद) निकडीचा; निक्षून.

नहर--नळ.

नक्षत्रमाळा—लग्नाच्या मिरवणुकींत कागदी फुलांच्या माळा करतात त्या.

नक्षा—कार्यक्रम; विचार; ब्यूह.

न्याहायत--अति; बहुतच; पराकाष्ठा.

नामोश--लौकिक; अब्रू.

नायकवाडी--पत्तिनायक शिबंदीचा मुख्य

नालकी—पालखीसारखें वाहन.

नालबंदी—स्वारांच्या खर्चाकरितां आगाऊ दिलेली रक्कम.

निकड—निकराचा हल्ला.

निकर्ष—निकराचा हल्ला वेढा(१७० ले.)

निखालसता—खात्री, शुद्धभाव.

निगादास्त—शुश्रूषा; २फौजभरती; फौज बंदी.

निगारष—लेखन.

निदेश--हुकुम (निर्देश.)

निफाक—दुष्मनी; वैर.

निफांसी—फांसा नसलेले; कोंडा नसलेले.

नियाबाच-(नियाबत) नायबी; मुतालिकी.

निर्गम--निकाल.

निष्प--आधीं.

निशा--खातरी; परीक्षा; खातरजमा.

निशाणें--शेवटील अक्षरें, "आज्ञा प्रमाण" हीं अगर अशींच अक्षरें, जीं सही ऐवजीं घालीत.

निसबत—पक्ष; तर्फ; संबंध.

निसूर--निश्चित.

नीम--रजावंद (नीम=अर्धा; रजावंद= खुषी) अर्ध प्रसन्न.

नील--तरवार.

नेकीबदी--हलाली-हरामी; इमानदारी अगर बेमानी.

नकसल्ला—चांगला सल्ला; सदुपदेश.
नेहेटबाजी—नेटानें चाल करणें.
पडदळ—(कटिचर्म तु पडदळे, रा. ब्य. को.) कमरपट्टा.
पन्हा—छाया; आश्रय.
पर्याय—मजकूर.
पर्वाचें स्नान—पर्वकाळाचें स्नान.
परवर—एक भाजीचें फळ.
परामृष—परामर्ष.
परावा—दुसरेपणा.
परिच्छिन्न—बिलकूल; सर्वथा; साफ; स्पष्ट (पर्वरीश्).
परिवारिष—समाचार; निभावणी; पोषण.
पस्पा—पिछेहाट.
पळण—पिछेहाट.
पाइक—जासूद; हालकारा; सेवक.
पाग्या—रिसाल्याचा अधिकारी.
पाडाव—जिवंत सांपडलेले किंवा कैद केलेले शत्रूकडील लोक.
पाणी पडणें—थंड पडणें; दाद न देणें.
पांघरुणें जाळणें—पत्रास जबाब लवकर मिळण्याकरितां धरणें धरण्याचा हा एक प्रकार. (ले. २१३.)
पायमाली—पायमल्ली; नाश; तुडवणुक.
पारचे—वस्त्रें, पोषाक; पत्र.
पालखीनशीन—पालखीच्या योग्यतेचे.
पालछत्र—काठीच्या टोंकास पागोटें बांधून तयार केलेलें छत्र.
पालाशाविधि—कोणा पुरुषाचा शोध न लागल्यास त्याचा पळसाच्या पानांचा पुतळा करून सर्व उत्तरकार्य करतात या विधीस पालाशविधि म्हणतात.
पावप्यादे—पायदळ.
पास—काळजी; व्यवस्था; पक्षपात.
पाळेकर—(पाळेगार) म्हैसूरकडील जमीनदार.
पीलखाना—हत्तीशाळा.
पुरशीस—चौकशी.
पुस्त पुन्हा—पाठराखा; मदत; पाठबळ.
पेटा—तर्फ; बाजू.
पेशकदमी—युद्धाची हालचाल.
पेशजीप्रमाणें—पूर्वीप्रमाणें.
पेस्तर—पुढें; पुढील.
पैगाम—बोलणें; संधान; प्रयत्न; संदेश; बोलण्याचा क्रम.
पैजार—पायताण; जोडा.
पै-दर-पै—एकामागून एक; दरदिवशीं; वरचेवर.
पैरवी—पाठलाग; खटपट; विचार; वाटाघाट; आव.
पैवस्ती—दाखल झाल्याची तारीख.
पैहाम—वारंवार वरचेवर निरोप.
पोख्त—पुष्कळ.
पोष्य—सेवक.
पोत—चिंध्यांचीं वेटोळीं करून त्यांचीं केलेलीं कडीं.
पोतें—तिजोरी; कोथळा; खजीना.
पोतनीस—खजिनदार.
पोशीस—गुप्त.
पोशिंदा—(पोशिदा) गुप्त.
प्रत्योपकार—उलट मारा.
प्रस्त—प्रस्तुत (अपभ्रंश.)

फ

फजल—कृपा.
फड—कचेरी
फडफर्मास—सरबराई.
फडशा—निकाल; नाश.
फंदफरेब—(फन्फरेब) लुच्चेगिरी.

फंदफिरिंदा--कौटिल्य.
फर्द--यादी.
फर्माशी--मुद्दाम तयार करविलेले; उच्च प्रकारचें (कापड) सांगितल्याप्रमाणें काढलेलें.
फरहत-नमत-आनंददायक (पत्र बातमी).
फरद--एकेरी पत्र.
फरहद्द—(फरहत्त) खुषी; संतोष.
फरांशिस—फ्रेंच.
फरासखाना-राहुटया,शामियाने, जाजमें, खुर्च्या वगैरे सामान अगर तें ठेवण्याची जागा.
फलादेश—फलप्राप्ति.
फवार—हजाऱ्याचें तोंड,कारंजे.
फाजील—जास्त उरलेला; शिल्लक.
फाणूस—कंदील.
फासला } —अंतर.
फासेला }
फावलेमानी—फावले संधीला.
फितनाफिसाद—गडबड; दंगा.
फिरस्ताद—पाठवणूक.
फिलहाल—सध्यां; आतां.
फिशादल—तंटा.
फिसालत—कारस्थान.
फुरोई—मामलेदारानें कायद्याविरुद्ध घेतलेला दंड.
फूलपाडणें—(सुपारीचे)फुलाच्या पाकळीप्रमाणें पातळ कातरे करणें.
फेरिस्त—यादी.
फैतारी—फॅक्टरी; वखार.
फैला—कृत्य; कर्म.

ब

ब—हें एक फारसी अव्यय आहे याचा अर्थ "नें" "सह" असा होतो.

बई—सबब—या कारणास्तव.
बकाया उमर दराज—(बकाया=घडून आलेल्या गोष्टी; उमर दराज=चिरंजीव; पुत्र) दीर्घायुष्याची शाश्वती.
बगलेंत आग—अंतःशत्रु; हितशत्रु; अस्तनींत आग.
ब-जिन्नस—खुद्द तेंच, अस्सल.
बर्जिंदे--आजीज; लीन; दीन.
बजीद--लाचार; रुष्ट; दीन.
बजीद होणें—आग्रह करणें; बळी पडणें.
बतपशील } —तपशीलवार.
बितपशील }
बतंग—गतिहीन; जेर; लाचार.
बद-नक्षा—कमीपणा; दुर्लौकिक.
बद-मामली—उद्दाम वर्तन; हरामखोरी.
बद-वक्त—बेअब्रू; अप्रतिष्ठा.
ब-पोषाक—पोषाकासुद्धां; पोषाक केलेलें.
ब-फजल-इलाही—ईश्वरकृपेनें.
बमय } —सह.
मय }
बमिनत—मिनतवारीनें.
बमोजीब—प्रमाणें.
बरकंदाज—बंदूकवाला शिपाई.
बरखंदाजी—गोळीबार करणें.
बरवख्त—योग्यकाळीं.
बराय—साठीं.
बराय-खुद—जातीनें; स्वतः.
बलकी } —इतकेंच नव्हें तर.
बलके }
ब-वख्त-नेक—सुसमयीं.
ब-शर्त—अटीप्रमाणें.
बस्ता—गाठोडें; थैली.
ब-साअलत-नेक—(बसाअतनेक, साअत—तास) सुसमयीं.

बहाली—बहालमर्जी; जागेवर किंवा हुद्यावर नेमणूक (बडतर्फीच्या उलट).

बहिरी—गर्दी.

बहुताद—पुनःपुनः.

बहुल—कृष्ण; वद्य.

बळ-कुबळ—वाईट प्रसंग.

बाका—एक प्रकारचें शिंग; बाका वाजविणारे, बाके.

बांकी—मजबूतीची (जागा); खंबीर.

बाजत-बरसात—बरसातीनंतर.

बाजे—वरकड; अवांतर; इतर.

बाजेकरी } —उत्पादक, कर्ता, कार-
बाजीकार } भारी; पुढारी.

बाट—लुचा.

बाड—तंबू.

बातेऱ्या—बुरूज.

बाद } —नंतर.
बाजद }

बादली (पोषाक)—भरजरी पोषाक.

बाबत—रक्कम.

बाबती—चौथाई वसूल येईल त्यांतून सरकारांत जमा होणारा पैका.

बारा महाल—१पोतें. २ कोठी. ३ पागा. ४ दरजी. ५ टांकसाळ. ६ सौदागिरी. ७ इमारत. ८ हवेली. ९ पालखी. १० थट्टी. ११ चौबिना. १२ शरी महाल.

बा-यक-दिगर—एकमेकांशीं

बाहीर बुनगे }
बाजार बुनगे; बुनगे } सैन्याबरोबरचे —उदमी वगैरे
बुलगे } गैरलढाऊ लोक

बाळ-पर्वशी-(पर्वारीश—पालनपोषण.) बाप कामास आल्यावर करण्यांत येणारें पुत्रांचें पोषण; तत्संबंधीं नेमणूक.

बितपशील—तपशीलवार; सविस्तर.

बिदा—खानगी.

बिनावर—म्हणून; साठीं.

बिनी—आघाडी.

बिलंद—उंच; दुर्गम; बेलाग.

बिलफैल—आतां; सांप्रत (साने). वस्तुतः; अगदीं (पटवर्धन).

बिसयार—फार; पुष्कळ.

बुनगे } —गैर लढाऊ लोक.
बुलगे }

बुधला—कातड्याचें केलेलें कुपीसारखें भांडें.

बुलंद-दरजे—दर्जा उंच आहे असा.

बे-औसान—गलित धैर्य.

बेगन्या—बेगमा.

बेगमी—पुरवठा.

बे-गुबेग—बेगीबेगी; लवकर.

बेजरब—न भितां.

बेतऱ्हा—रीत सोडून.

बेतरह—अतीशय; खूब.

बेदडा—पेंढारी, बेरड.

बेदील—असंतुष्ट.

बेनिहायत—पराकाष्ठेची.

बेबदल भाषण—बंडखोरीचें भाषण.

बेफाम—गाफल, असावध.

बेमुबलग—अपरिमित; असंख्य.

बेरोख—वाकडे.

बवाकाई (बवाकई)—त्याप्रमाणें.

बेशुभह—निःसंशय.

बेषचुनीदी (बिषचुनीदी)—अधिक निवडक; अगदीं निवडक.

बेहडा—नाल्याच्या प्रवाहामुळें झालेली खोल भेग; ओघळी, नाला.

बेहबुधि—कल्याण; सुस्थिति; भरभराट; मजबुती.

बेहरम—साशंक, रुष्ट.
बेहवा मर्जी—बिघडलेली मर्जी.
बेदा—अडथळा.
बंदवे--कैद करणें; बंदिवान.
ब्यहस्त नशीन } —स्वर्गस्थ; (बेहेस्त=
बेहेस्त नशीन } स्वर्ग).

भ.

भाष्य—शपथ.
भुलावा—फसवणूक.
भुमे—गुजराथेकडील एक प्रकारचे माहीतगार लोक.
भोंस—बोरू, बांस.

म.

मकर-फरेब—कुटिलपणा; फंदफितुरी; दगलबाजी.
मकरी—विश्वासघातकी.
मखपी—गुप्त, आंतली.
मखलाशी—बरोबर आहे असा शेरा देणें (सरकारी पत्रावर.)
मजरे—मौजा; वाडी; गांव.
मजल—मजाल; बिशाद.
मज्बूत-मिजाज—दृढ चित्ताचे. खंबीर. दिलाचे.
मज्मू—वसुलीचें काम.
मज्मुदार } —वसुलाचा अधिकारी.
मुजुमदार }
मज्मून—मजकूर; सारांश.
मझेला—तंटा; भांडण.
मतालिब—मतलबचें अनेकवचन.
मदनजर—हेतु; एकदृष्टि.
मदार—भार; विश्वास.
मदारुल-महाम—मुख्य व्यवस्थापक, (एक पदवी).
मनसबा—विचार.
मनसुबेबाज—युक्तिवान; अक्कल लढविणारा; मुत्सद्दी.
मनोति—पस्तुरी; वाद; (सावकार ठराविक व्याजाशिवाय जास्त रक्कम घेतो ती.)
ममलकत-मदार—राज्याचा आधार, एक किताब.
मरकुम करणें—लिहिणे.
मरातब } पदवी; आंतील भेद;
मरातिब } विशेष माहिती; मजकूर.
मरामत—दुरुस्ती.
मर्फा—एक प्रकारचा नगारा.
मवसुफ—मशार्निल्हे; वर सांगितलेले.
मवास—लुटारू.
मवाशी—रानटी लुटारूंचा धंदा.
मश्गुल— लौकीक.
मसुदी—मुत्सद्दी.
मसलहात—(मस्लहात) मसलत; योग्य विचार; उपदेश; अंगीकृत कार्य; मोहिम; स्वारी.
मसरत-नमत-आनंदकर (पत्र, बातमी).
मस्नद—गादी.
महकूब } तात्पुरती थांबवणूक;
महकूफ } तहकुबी; रहित; बंद.
मवकूफ }
महजर—बादशाही सनद; निवाडा; निकालपत्र.
महमुदी—बारीक आणि घट्ट विणीचें कापड.
महसूर— (महशूर) सुप्रसिद्ध; माहीत.
महागिरी—एकप्रकारचें तारू.
महाबतनामा—मैत्रिपत्र.
महाल—अंतर्गृह; राणीवसा; जिल्हा.
महालकरी—जिल्हाधिकारी. (महाल=जिल्हा).
महासरा—मोहसर; वेढा.
माकूल—योग्य.

माकूल करणें—जाणता करणें; समज देणें.

मातबर—बळकट; मजबूत, थोर.

मातम-पुरशी—दुखवट्याची विचारपूस; समाचार.

माफजत—बंदोबस्त;काळजी; सुरक्षितपणा.

मामलत
मामला
मामलियत } —तालुक्याच्या वसुलीचें काम.

मामलेदार—तालुक्याच्या वसुलीचा अधिकारी.

मारका-रुबकार— (मारका=युद्ध, (रुबकार=पुढें येणें) रणांत गुंतणें; रणोद्योग.

मारगिरी—लगट; मारा.

मालात
मालत
मालियत } —जिंदगी; मालमत्ता;

माहीमरातब—दोन गोल व सोन्याचे मत्स्य मिळून होणारें व हत्तीवरून मिरवावयाचें राजचिन्ह; अलंकारविशेष.

मिजाज-दर्याफ्त—मर्जीची चौकशी; मानस कसा आहे तो पाहाणें.

मिनहू—त्याच, चालू महिन्याच्या.

मिरधा—जासुदांचा अगर शिपायांचा नाईक.

मिरास—वडिलोपार्जित वतनदारीची जमीन.

मुकरर— पुन्हा; २ ठराव.

मुकय्यद—कायम; मजबूत.

मुकाबला—गाठ, लढाई.

मुखालिफ—शत्रु, विरुद्ध पक्ष.

मुजरद--ताबडतोब, मुद्दाम, जरूरीचे.

मुजाफा—हरकत; दोष; पर्वा.

मुतवजे--रवाना.

मुतवातीर
पै-दर-पै } --एकसारखे;पुन्हः पुंन्हाः.

मुतशील—ताब्यांतला; कबजांतला.

मुताालिक--उपमंत्री; नायब.

मुबदख--रसोई; स्वयंपाक.

मुद्दा--अट; शर्त.

मुद्दे-मवाफक—मुद्दे-माफक;मुद्यास,धरून मुद्दे जाऊं न देतां.

मुनासब-- योग्य; रास्त.

मुबारक
मुबरक } –मंगलदायक; कल्याणकारक.

मुबारखबाजी-- (मुबारख-बादी) अभिनंदन.

मुफशील
मुफस्सल } --सविस्तर; तपशीलवार.

मुलाजमत—भेट, हुजूर नोकरी,नोकरी.

मुलाहिजा— भीड.

मुष्किली—अडचण.

मुस्तकीम—कायम; भक्कम.

मुसब
मोसम } —ऋतुमान; पर्जन्यकाळ.

मुहूर्त—मूर्ति, (अपभ्रंश).

मेके—एक प्रकारची फळभाजी.

मेढा—वासे, दांडकी यांची भिंत; कोट.

मेस्तक—यादी; टिपण.

मै-जमियत—(मै-सह) जमातिसह.

मोईन—नेमणूक.

मोकाबिला—सामना; लढाई.

मोकासा—इनाम; माफी जमीन.

मोमिल्ले—मशार्निल्हे; वर सांगितलेलें.

मोर्चे—माऱ्याच्यावेळीं तोफा ठेवण्यासाठीं केलेला उंचवटा.

मोरस—मॉरिशस.
मोहकम—भक्कम; दृढ; पक्का.
मोहताद—मोतात; नादार.
मोहसबा—हिशेब; आढावा; (मोसबा)
मोहिब--मित्र; दोस्त.
मोहोर—सिक्का.
मौसुफ } पूर्वोक्त; वर सांगितलेलें.
मवसुफ }

य.

यकीन—निश्चित; खचित खातरी; विश्वास
यख्त्यारी—अधिकार.
या--किंवा.
याददास्त-बमा = (याददास्त = सूचि) यादी.
यादविद—निश्चित यादी; ठराव.
यादबमोजीब—यादीप्रमाणें.
येकसू--स्नेह.
येकांडी असामी—कोणाच्याही पक्षांत अगर पथकांत नसलेला पगारी शिपाई, एकटा.
येखलाशी—स्नेह.
येगानगत—स्नेह.
येलगार—हल्ला; दौड.
येलची--वकील; प्रतिनिधि.
येहसान--कृपा; उपकार.

र.

रकम--कलम; ठराव.
रकांरपूर्वक--" र " अक्षरानें आरंभ होणारें नांव संकेतानें नांव कळविण्याची एक रीत उदा०रघूजी भोसले.
रजनद—रदबदली.
रजावंदी--समजूत; खुष करणें;अनुमोदन.
रदकर्ज—कर्जफेड.
रफूक—मेहेरबानी; स्नेह.
रफेदफे—निकाल व्यवस्था; निरवानिरव.
रमणा—तुमुल युद्ध.
रयात--सूट.
रव—दाल.
रवानगी—आगाऊ खर्ची.
रवेश—चाल; रीत.
रसद--(रस्त) युद्धोपयोगी सामुग्री.
रस्म—वहिवाट.
रस्मरव--चालरीत; वहिवाट.
रहावट—मार्ग, रस्ता.
रहाचा खलशा--रस्त्याचा बेदा;अडथळा.
राऊत—घोडेस्वार.
रातबामसाला—(रतीबमसाला) रोजी; खुराक व इतर योग्य खर्च.
राफता—चाल; वागणूक.
राबता—स्नेह; येजा.
रास--नग.
रास्ती--सचोटी.
राहा—रस्ता, मार्ग.
राहा-येगानगत—(राहे-येगानगत). ऐक्यमार्ग; मैत्रिमार्ग.
रिताड—रिकामे.
रुई--प्रकार; मार्ग; रीत.
रुखनमूद--(रुख-रोख) दिशा; रोख नेमलेला.
रुजवात--ताडून पाहाणें.
रुबकार--सन्मुख; पुढें येणें.
रुबरु—समक्ष.
रुयदाद--प्रविष्ट; प्राप्त.
रुसकत } —निरोप घेणें.
रुकसत }
रुसुम—जमिनीच्या उत्पन्नांतील देशमुख देशपांडे यांचा भाग.

रेच मोडणें—तोरा उतरविणें, खैरी जिरविणें.

रेवण—मातीचा ढीग किंवा बुरूज.

रोखा करणें—गांवकऱ्यांना शेतसारा किंवा दुसरे कांहीं पैसे देण्याबद्दल हुकूम करणें.

रोजकर—खर्चाचे पैसे; मुशाहिरा.

रोठा—सुपारीची जात, (ज० श्रीवर्धनी रोठा).

रंगांत हमरंग करणें—ज्या नादीं किंवा भरीस असेल त्याच नादीं किंवा भरीस भरविणें.

ल.

लगामी—आधीन.

लतिया—हद्द; शीव.

लव—निरोप घेऊन जाणारी मंडळी.

लव्हा—तरवार.

लाकिन } —परंतु; तथापि.
लेकिन }

लाजम—योग्य.

लाजिमा—कर; हक्क.

लुगारा—लूट.

लंबछडया—लांबछोड्या, लांब पल्ल्याच्या.

व.

वजे—रीत; मार्ग.

वजारत-माब—(वजारत-मआब) एक पदवी.

वजीर-इ-आजम—मुख्य प्रधान.

वरात—हुंडी; चेक.

वसवसा—भीति; संशय; दिक्कत.

वसवासी—संशयी.

वलंदेज—डच.

वाकनीस—अखबारनवीस; वृत्तांतलेखक.

वाका—प्रकरण; खटला; हकीकत.

वाकीफ—माहितगार; जाणता.

वाजेह—ज्ञात; स्पष्ट; विशद.

वादून येणें—चालून येणें.

वारापाणी—नाश; निकाल.

विराह—कलह.

वोलगार—ओलीस ज्याच्याजवळ आहे तो मनुष्य.

वोला—ओलीस; करार पुरा करीपर्यंत ताब्यांत ठेवलेले लोक.

श.

शक्स—माणूस.

शक्कल—योजना; व्यवस्था; स्थिति; प्रकार.

शकटभेद—कपटानें फोडणें.

शकशुभा—(शुक शुभह) अंदेशा, भीति, संशय.

शकी—दुर्दैवी.

शकुनाचें पोतें—आरंभाचें पोतें; बोहणीसारखा प्रथम वसूल आलेला पैसा.

शरीक—सामील.

शह—दरारा; धाक; अडवणूक.

शहरपन्ना—तटबंदी; कोट.

शहाजणें—मंगल वाद्यें (जय झाल्यावर शहाजणें वाजवितात.)

शादमानी—आनंद; खुशाली.

शामल—हबशी.

शाहिदी—(शहादत) साक्ष; पुरावा.

शिकम—पोट.

शिकस्त—पराभूत, हटविलेला.

शिबंदी—वसुलीच्या कामासाठीं ठेवलेली फौज.

शिरा—उत्तम.

शिलशिला--क्रम; जमाव; परंपरा; वहिवाट.

शुकरगुजारा—कृतज्ञता.

शुतरस्वार—(सुतर = उंट) सांडणीस्वार.

शेखदार--तर्फदार कारकून. (याजकडे सुमारें २०--२५ गांवांचाकारभार असतो).

शेर—जबरदस्त;समर्थ.

शेरी--(१) मणी २ शेर या प्रमाणें एकंदर उत्पन्नावर कमाविसदाराचा हक्क.

(२) शेरी (जमीन)=गांव सीमेच्या बाहेर असलेली बागाईत जमीन.

शोखी--दांडगाई.

शोध करणें—शुद्ध करणें.

शोहरा—प्रसिद्धि.

शौहरत—प्रसिद्धि, कीर्ति.

शांत होणें—मरणें.

ष

षकी, शकी—दुर्दैवी.

षुभः, शुभा, सुभा—अंदेशा; भय.

स.

सई होणें—जिंकणें; यशस्वी होणें.

सकटतार—सेक्रेटरी (अपभ्रश.)

सकेकरी—पाणी देणारे,सक्का=पखाल.

सख्त—कठीण; कडक.

सखुनाची पास—शब्दाचा मान; वचनाप्रमाणें चालणें.

सजावल—ढालाईत; वसूल, तगादा करणारा.

सजुंदा—परिपूर्ण; तयार.

सत्का—कुरवांडी; ओवाळणी.

सदाकत—प्रामाणिकपणा.

सदाकत—दस्तगाह—प्रामाणिकपणाचा निधि.

सदाकत--अतवार—प्रामाणिक.

सनगे—कापड.

सनमादिक,सामादिक——मसलतींत असणारे?

सप्रयुक्त—युक्तीच्या वाटेनें

सफेजंगी—खडें युद्ध; घोर युद्ध.

सबनीस—लष्करची जमा; तैनात; हजरी घेणारा आधिकारी.

सबर—सबुरी; धीर; सहनशीलता.

सबर--निबर—थकले भागलेले.

समजौता—तडजोड; समजूत.

समष्टीन—एकत्र; बरोबर.

सर्फराजी—कृपा.

सर्फराजी करणें—मान देणें;सत्कार करणें.

सरद—सरहद्द.

सरपोस—चादर; आच्छादन.

सरबरा—व्यवस्था.

सरबागे-सरकारी बागेंतील मुख्य कामगार

सरसबाजी—समृद्धि.

सराफखाना—(शराबखाना) पर्णागार; विद्येचें साहित्य ठेवण्याची जागा.

सरेमो—(सरि--म) बालाग्रही,थोडेंसुद्धां.

सलानत—वचक; दरारा; भीति.

सा-अलत—वर्षाची वेळ सण.

साडेतीन वस्त्रें—दरबारांत अधिकाऱ्यांना देण्यांत येणारा पोषाख, त्यांत साडेतीन वस्त्रें असत.

१ पागोटें.
१ शालजोडी अथवा शेला.
१ महमुदी कापडाचा पायजमा. अथवा झगा.
१ पटका करण्याकरितां किनखापाचा अर्धा तुकडा.

३॥

सातानेक—सुमुहूर्ती.
सापेक्षित—दुःखी.
साबिक—पूर्वी; प्रथम.
स्वामी—कार्तिकस्वामी.
सार्वभौम—दिल्लीचे पादशाहा.
सारद—सरहद्द-(अपभ्रंश).
सार्वान—सांडणिस्वार; उंटवाला.
साल-ब-साल—वर्षानुवर्ष.
सावर बसणें—बाजू सावरून बसणें.
साहित्य—मदत.
साहेबकाम—स्वामिकार्य.
साहेबनौबत—मोठा नगारा; हत्तीवरील डंका.
साक्ष-उपसाक्ष—उपमा प्रतिउपमा, निरनिराळे दाखले.
सिकम-पोट.
सिकस्त—पराभूत.
सिगोफ } —भिन्नभाव, निराळी गोष्ट.
सिकोप }
सिगोपे बरपा करतील—दुसरी शक्कल लढवतील.
सुद—शुद्ध.
सुदामत— वहिवाट, सरळ.
सुपूर्द—हवाली.
सुरतपिजीर—यशस्वी.
सूत्र—तहाचें बोलणें; धागा.
सूत्रनाल—उंटावरील तोफ.
सेरणी—शिरणी; ज्याच्या बाजूनें जय झाला अशेल त्यानें आनंदप्रदर्शक म्हणून द्यावयाची रक्कम.
सेहत—(प्रकृतीस) आराम, तन्दुरुस्ती.
संजगुरा—एल प्रकारचें बारीक धान्य.
सजुता—जप्यत.
संध्यातून—संधि साधून.
संभूत—वार्ता सांडणीस्वार.

ह.

हजारिया—सहस्र सैनिक बाळगण्याची मनसब.
हप्तहजारी—सप्त सहस्र सैनिकांचें आधिपत्य.
हमरंग—तोच रंग; एकच नाद.
हमराहा—संगति; बरोबर; सामील.
हमराही—बरोबरील लवाजमा; फौज.
हमवार—सारखी; सरळ, प्रसन्न.
हया—दुर्दशा; त्रास.
हर्कारा—जासूद.
हर्दू—दोन्ही.
हर्शामर्ष—तह अगर लढाई.
हरगीज—कधीही, बिलकुल, सर्वथा.
हरोरा—शिरा, सांजा.
हरोळ—बिनी, आघाडी.
हलखुद—जसें पाहिजे तसें (" यथा तथ्यं तु हलखुदम् " रा. ब्य को.).
हंशम—परिवार; शिपाई; प्यादे.
हगामा—धूम, लुटालूट.
हाजत—जरूरी, आवश्यकता; अडचण.
हाटेली—हट्टी.
हावभरी—आशाळभूत; उत्सुक.
हास्बदील—मर्जीप्रमाणें.
हाशील—खर्च; प्राप्त, लभ्य.
हिफाजत—संरक्षण.
हिलाल—टेंभा.
हुक्के—१ गुडगुडी.२ (बाँब) ज्वालाग्राही पदार्थांनी भरलेलें पात्र.
हुजरात—खुद्द हुजूरची खडी फौज (फक्त आणीबाणीच्या वेळींच ही लढाई वर पाठवितात).
क्षेपनिक्षेप—ताबडतोब; एकदम.

सूचि.

आंकडे पृष्ठांकांचे

अ १७२
अकण्णा ११
अजमशहा ७७
अजीजखान १९
अंताजी नारायण ५३,५५
अंताजी माणकेश्वर १२८,१३१,१३२,१३७, १३९,१५१,१५५,१५७,१५८,१६१,१८२
अंताजी नागेश २०२,२१४
अप्पाजी पंत २६
अफजुलखान १६, १७ (विजापुरी)
,, (निजामशाही) ४५५
अबदुल राजखान ३६
अबदुल्लाखान १०
,, अफझुलखानाचा अपभ्रंश ४५५
अबदुल हसन बक्षी १०
अबदुल हसन कुतुबशहा २२, २४, २५
अबदुल महमद (वजीर अदिलशाही) १६, १८, १९, २०
अबदुल रहीम बहलुलखान १८
अबदुल करीम नबाब (विजापुरी) २१,२२
अबदुल रऊफ २३, २४
अंबरखान ९
अंबाजी त्रिंबक पुरंदरे ४०,४४,२२१,४५७, ४७६,४८९, ४९२,४९४,४९९, ५०१
अमरसिंग राजे तंजावरकर ४८४, ४८५
अमानसिंग बुंदेले १४८
अमिनखान करी २५
अमीरखां ४२७
अमृतराव पेशवे ४६८, ४७९, ५०३
अमृतराव विश्वनाथ पेठे ४६५
अमृतराव शिंदे ४६६, ४७२
अमृतराव शंकर ७२, ७७
अर्जुनसिंग बुंदेले ६७, ७२, ७३
अलफिस्टन (एलफिन्स्टन) ४५०,४५१, ४५२, ५०३
अलमगीर(औरंगजेब पहा) १९,२०,२४,७७
अलाजखान ९
अली खुदावंतखान १३
अली अदीलशहा १६, १९,
अलीजहा शहाजादा (औरंगजेबाचा पुत्र)२४
अलीनवाजखान १६६
अली गौहर बादशहा १९५, १९७
अलीबहादूर ३८९, ४८३, ४९२, ४९९
असद अली ४०८, ४१०
असदखान १५, १६, २६, २८
असफखान १०
अहमदखान वलद खुदावंतखान १५
अहमदखान बंगस (पठाण) ८७, ८९,
अहमदशहा अबदाली ११२, १५१, १५६, १६१, १९४ ४५९, ४६०
अहिल्याबाई होळकर २७८

आ

आऊबाई २०९
आकारजा ८
आकारी जवान १०
आकींतखान १०
आजमशहा (औरंगजेबाचा पुत्र) ४५६
आनंदराव निंबाळकर १६२, २०३
आनंदराव गणेश दिपे १७२
आनंदरूप वकील(जानोजीचा वकील) १९५
आनंदराव भिकाजी रास्ते १७२, १९६, २०४, २२०, २३३, २५७
आनंदराव व्यंकटेश २०१
आनंदराव (हैदरखानाकडील वकील)२४६
आनंदरावराम २५४
आनंदराव धुळप २५४, ३७९, ३८०
आनंदराव गोपाळ सुपेकर ३७५
आनंदराव घाडगे ३८६
आनंदराव पवार ४९६

आनंदीबाई पेशवे ४६३, ४६४, ४६५, ४७२, ४८३
आप्पाबळवंत (कृष्णराव बळवंत पहा) ४०३
आप्पाजी गणेश २१४,२१५
आप्पाजीराम दाभोळकर ९६, १८५, २६८ ३६४, ३७२, ३८९, ३९३
आबरक्कांबी (मुंबईचागव्हर्नर)३९७–४०१
आबाजी नाईक, आबूजी नाईक ६५, ७०
आबाजी महादेव २१३
आंबोजी इंगळे २४९, २७८, ३२६, ३६४

इ–ई

इंद्रसेन २९९, ३४३, ३६३, ३६६, ३७४, ३८०,३८१
इब्राहिमखान वजीर १६
इमामखान हवालदार १३
इरादतखान १०, १२
इच्छोरामपंत ढेरे ४६४
इब्राहिम अदिलशहा ८, १४
इस्माइलखा पनी (एलिचपूरकर) ४०८

उ.

उदाजी चव्हाण ३०. ३१, ४५, ७३. ९७
उदीतसींग रजपूत ७
उदीष्टीन Wather stone ३१५, ३८०
उमरावगीर गोसावी १९६
उमाबाई दाभाडे ७७, ८२, ४७७, ४९६

ए.

एकलासखान (सिद्दीरेहान) ९, १५
एफिस्टन-अल्फिस्टन पहा.
औरंगजेब ५, ७, ११, २४, २५,२६, ४५५, ४५६, ४७५

क.

कदमराव ९
कबगुलशन दिवाण (कलुशा) २६
करीम पेंढारी ४४७
करीम सर्जे १४
कलुश (कर्नल क्लोज) ४५१,४५२,५०३
कलुष कलुशा २६
काजी सय्यद रणदुल्लाखान ९,११,१३,१४
कान्हुजी आंग्रे ३१,८१,४७५
कान्होजी मोहिते ४६१
कान्होजी गायकवाड ४२६
कामबक्ष शहाजादा २७,२८,४५६
काशीबाई (नागण प्रभूची बायको) २९
कुडिडोर (डच सरदार) ४८
कूट (कर्नल) २७२,२७४,२७६,२७७
कृष्णंभट अभ्यंकर ३४
कृष्णराव बल्लाळ काळे २२०,२३०,२५७
कृष्णराव बळवंत मेहेंदळे २०४,२१८,४०३, ४७९
कृष्णाजी भास्कर पंडित ७
कृष्णाजी भवानी ५०३
कृष्णाजी महादेव जोशी ४९४
कृष्णाजीपंत घोरपडे २६
कृष्णाजी बहिरव थत्ते ४७१
कृष्णाजी मोहिते ३६
कृष्णाजी नारायण,जोशी २२४,२३३,२४४, २५६, २६७ २७१, २७२, २७६, २७७, ४२७
कृष्णाजी दाभाडे ४५,२२१
कृष्णाजी परशराम प्रतिनिधि ४१,४२,७३
कृष्णाजी अनंत १६६,२१७
कृष्णाजी तानदेव ३८३
कृष्णाजीराव केतकर ५०१
केशव भास्कर ७
केसो अनंत ३७८
केसो कृष्ण दातार २३८,२३९,२४९,२६७ २७३
कोन्हेरराव पटवर्धन ४८१
क्लोज कर्नल ४५१,४५२,५०३

ख.

खकरखान २२
खंडेराव होळकर ५०२
खंडेराव दरेकर २०४
खंडेराव गायकवाड २०६, २१४
खंडेराव पवार २८१
खंडोजी अरगडे १९६, १९७
खंडोजी भोंसले–ऊर्फ चिमणाबापू ८,२२०

खरकासिंग गारदी ४६४
खवासखान दौलतखान– नवाजिषखान पहा
८,९,११–१५,१९,२०,२१,२२,२५
खवाज हुसेन १५
खवाजे अमीन २१
खाजे दातखान १०
खानमहमद १६
खान आलम ९४, ९५
खुजस्ते बुनियाद (औरंगाबाद) २७
खुजस्ता अख्तर २८
खुशरुद्दीन मोदी ४५०, ४५१
खेदसिंग बुंदेले १४९
खेमसांवत २, २९, ३६, ४०१, ४०२
खेलोजी भोंसले १
खैरीयतखान ९, १३, १३

ग.

गंगाधर यशवंत चंद्रचूड ८२,८३,११९,१२५, ४६२
गंगाधरशास्त्री ४५१,४५२,४६८,४६९
गंगाबाई पेशवे २०५, ४६४,४८०,४८१, ५०१
गंगाधर गोविंद खेर १९६
गणपतराव मेहेंदळे ४९७
गणेश विश्वनाथ बेहेरे २१४,२३६,२३८, २४५,२५४,२५५,२७३,२७६,४८२
गणेश कृष्ण ११९
गणोबल्लाल देसाई (पंचनदी) ३४
गाजीखान १५
गाजीउद्दीनखान २४,२५,९०
गाजीउद्दीनखान फेरोजजंग९०,९२,९३,९४, १००,१०३,१०४,१०६–१११,१५६, १५७,४७७
गाडर (कर्नल) २२०, २४१–२४३, २५०,२५१,२५६,२६६,२६७,२७२, २७३,२७९,२८१
गायकवाड वंशावळ३९६, ३९७कान्होजीपहा
गालीषखान १९
गुमानसींग मांडवीकर २१५
गुरुजी १ महादजी बल्लाल करकरे पहा; २ राघोपंत गुरुजी पहा.
गुलामकादर ३८९
गोपाळ खंडेराव रास्ते ४५१,४८३
गोपाळ जनार्दन वैद्य ४५३
गोपाळराव गणेश बरवे १३३, १३५, १७०,१८०,१८१,१९०,१९१,१९६
गोपाळराव पटवर्धन १८७, ४७९
गोपाळराव रामचंद्र २३८,२३९,२४१,२४२
गोपिकाबाई पेशवे १७९,४७१,४८०,४८२
गोविंद हरी (पटवर्धन) ७७
गोविंदराव चिटणीस ७७,७८,८१,१०२
गोविंदराव दाभाडे ८२
गोविंद बल्लाळ बुंदेले (खरे) १३२,१३३, १३५,१४८,१४९,१५६
गोविंद दीक्षित १४५,१६९,१७०,१८१ १९६
गोविंदराव गायकवाड २०१,२०२, २०६, २०७,२१४,२१६,२४२,२४४,२५१,२८३
गोविंदराव नारायण २१५
गोविंद गोपाळ कामतेकर ४२१२४२
गोविंदराम ३७१,३७२
गोविंद कृष्ण काळे ३८६, ३९२, ३९३, ४०९,४१२,४१३,४७३,५०२
गोविंदराव पिंगळे ३९३,५०३

घ.

घाटगे—आनंदराव, चांदोजी, झुंझारराव, नरसिंगराव, सखाराम सर्जेराव
घाशीराम कोतवाल ४७१,४७२
घोरपडे:– ४२३
मालोजी पहा ३०,३८४,३८५
संताजी ३०
हिंदुराव (बहिरजी घोरपडे पहा)४२
राणोजी ४२
सगुणाबाई ४२
नारायणराव ७४,३८५
बहिरजी घोरपडे ३८५
मुरारराव घोरपडे ३८५
नारोजी ४९५

च.

चंद्रसेन जाधव ४६०
चव्हाण-राणोजी पहा ३०
विठोजी पहा ३०
उदाजी पहा ३०,३१,४९,७३
प्रीतिराव ३१
शंभूसिंग ४५
तुकोजी १४४
रामचंद्र ३०
चांदोजी घाटगे ३४
चापाजी टिळेकर ४६४
चिंतामण हरी फडके ४६७
चिंतो महादेव ४१
चिंतो विठ्ठल जोशी २३५,२३८,४६२,५०१
चिंतो रणसोड बोधनी २१६
चिमणाजी रघुनाथ ४४५, ४६५. ४७१, ४७३,४७४,५०२,५०३
चिमाजी आप्पा पेशवे (थोरले) ४०,५०, ५१,५३,५५,५७,५९,६०,६२,४५८, ४७६,४९२,४९४,४९५,४९९,५०१
चिमाप्पा पानशे २३१

ज.

जगदेवराव नाईक निंबाळकर ४०२
जगजीवनराव परशराम प्रतिनिधि ७३
जनकोजी शिंदे १३३,१३५,१३८,१३९, १४२, १५३-१५५,१५७,
जनरल वेलस्ली ४२७,
जनार्दन बाजीराव पेशवे ६१, २३३,४४७, ४९६
जबरदस्त १८
जयाजी शिंदे-जयाप्पा ६७-६९,७६, ८२, ८६-९०, ९३-९६, ९८-१००, १०५-११२,११६,११७,११९-१२२, १२४,१२६-१३१,१३४
जयसिंग राजे १९,४९६,४९७
जयराम सांवत ७४
जयनगरकर राजे ४६२
जानसरखान ६
जानभट (अभ्यंकर) ३५
जानबा निंबाळकर९१,९३,९५,१००,१०२ १०३
जानकीबाई(राघोबादादाची बायको)४७७
जानोजी भोसले १४३,१४५,१४६,१७०, १८७,१९४,१९५,१९९,४६१,४६२
जाबितखान (नजीबखानाचा पुत्र) ४६३
जाबीतजंग उर्फ धौशा २३१,३२५
जालमसिंग हाडे (कोटेकर) २८८, २९१
जालपुगारखान-झुलफिकारखान पहा.
जिजाबाई (कोल्हापूरकर संभाजीची बायको) १७२, २२३, ३९५
जिजाबाई (शिवाजीची आई) ३८४
जिऊबाई भानू ४५१
जीवबादादा बक्षी ४०७, ४१०, ४११, ४१३, ४८३
जीवाजी रघुनाथ ४१, २२६
झुंझारराव घाटगे १४४
झुलफिकारखान-यतिकादखान २६, २८, ३०, ४५६
टिपू, सुलतान ३३८, ३६३, ३६६, ३६८, ३६९,३७१.३७२,३७५,३७७, ३७९, ४६६,४७१,४७३,४८३
डुप्ले फ्रेंच सरदार ९२

त

तानाशहा (कुतुबशाही) २७
ताराबाई ३१, ८१, ८२, ८६, ८८, ९९, १०१, १०२, १०६, १०७, ११५, २२७, ४५६, ४५७, ४५९, ४६०,४८५
तुकाबाई (शहाजीची बायको) ४८३
तुकोजी चव्हाण १४४
तुकोजी होळकर १९७, २११, २६४, २६५, २७३, २७६, २७८, २८४, २८५, ३७३, ३७९, ४६२
तुकोजी शिंदे ४६६, ४७२
तुकोजी राजे-तंजावरकर ४८४
तुळाजी आंग्रे ५६, १६४, १६५, ४७७
तुळाजी पवार १८५, ४६४
तुळजा महाराज तंजावरकर ४८४

तोतया भाऊसाहेब ४६४
त्रिंबकराव पेठे ६६, १८५,१९५,२००,२०४,२०५,४६०, ४६२,४६३, ४७९, ४८०, ५०१
त्रिंबक विनायक कोनेरपंत ८२, ८३
त्रिंबक हरी पटवर्धन ८३
त्रिंबक सदाशिव ऊ० नाना पुरंदरे—नाना पुरंदरे पहा
त्रिंबक नारायण १९०, १९१, ३७५
त्रिंबकराव गायकवाड २०२
त्रिंबकराव दाभाडे सेनापति २१५, ४८९, ४९५, ४९६
त्रिंबकराव आप्पाजी २२४
त्रिंबक महिपत पुरंदरे ४२६
त्रिंबकराव डेंगळे ४५०, ४६८, ४६९
त्रिंबकजी ढमढेरे ४४६
त्रिंबकेश्वर अमृतराव थत्ते ४७३
त्रिंबकराव परचुरे ५०२

द

दर्गाकुलीखान १०७,१०८, १००
दत्ताजी शिंदे–८९, ११२, १२८, १२९, १३१, १३२, १३५, १३८–१४१, १४४, १४५, १४७, १४८, १५३, १५४, १५५, १५७,४५९
दमाजी थोरात १०७, १६५, २०७,४७६, ४७७
दमाजी गायकवाड ४५७, ४७५, ४७६, ४९२, ४९३
दलपतराव १५
दयाबहादुर ४९५
दाऊदखान १४
दारकोजी निंबाळकर पाटील ८३, २०४
दादंभट पिलंभट उपाध्ये (सिंधुदुर्ग) ३४
दादोबा प्रतिनिधि १०६
दादोबा देसाई (पंचनदी) ३४
दाभाडे—गोविंदराव—उमाबाई—कृष्णाजी त्रिंबकराव, यशवंतराव,
दाभोळकर—
रामाजी अनंत पहा
आपाजी राम पहा
व्यंकटराव राम पहा
रामराव आपाजी पहा
कृष्णराव रामराव पहा
आपाजी रामराव पहा
दाराशिको, शहाजादा १३
दारुल्जफर विजापुरी–दिलेरखान पहा
दियामत् उल्मुल्क ८
दियानतराव १९, २०
दिलेरखान–रुस्तुमखान २३, २४,२५, २६
दिवाकरपंत चोरघोडे २६२
दीक्षित–पाटणकर कायगांवकर–वासुदेव, नारायण, गोविंद ऊ. बाबा, बाळकृष्ण, लक्ष्मीनारायण, रामचंद्र.
दुर्विश पातशहा ८
देव चिंचवडकर—थोरले चिंतामणी, धरणीधर महाराज, नारायण देव ४५५, ४५६ ४५७, ४६३, ४६४
देवराव हिंगणे ३०५
दौलतराव शिंदे ७५, २०२, २०६, ४५३, ४७२, ४७३, ४८३, ५०२
दौलतराव शिंदे (संभाजीचा सरदार) २६, ४६६, ४६७
दौलत बाबूराव २०७,२०८
दौलतखान (खवासखान, नवाजिषखान पहा) ८, ९, ११–१५,१९–२२,२५
धनाजी जाधव ३१,४८९,४९०
धर्माजीपंत डबीर १९, २०
धोंडोपंत पुरंदरे ७७,७८
धौशा (जाबीतजंग पहा.)

न

नजीबखान रोहिला— १५३, १५६, १६२, २४९, २५१, ३०५, ४५३, ४५९, ४७९
नबाबखान ९, १५
नरहर कृष्ण मुतालिक दि. पंत प्रतिनिधि ३७
नरसिंगराव घायगुडे २०४
नरसिंगराव तमाजी २२०, २३१, २३४, २५७, २६८

नरसिंगराव घाटगे ३८६
नवाजिषखान-दौलतखान व खवासखान पहा
नाईकवाडी १५
नागण प्रभू—कुडाळकर २९
नाना पुरंदरे—त्रिंबक सदाशिव पुरंदरे पहा. ८०, ८१, ८३, ८४, ८५, १६६, १६७, १६९, १७६, १७८, १८३, १९२, १९३.
नानाफडणीस (बाळाजी जनार्दन भानु) ७६, ९९, १७३, १८०, १९२, १९९, २०७, २०८, २०९, २१३, २१७, २२०, २२४, २२९, २३०, २३१, २३४, २४०, २४१, २४३, २४५-२५७, ३४३, ३६१-४६४, ४६७, ४६८, ४७१-४७३, ४८०, ४८२, ५०१, ५०२.
नारायण दीक्षित पाटणकर-कायगांवकर ४८, ५४, ५७. ५९, ६१, ७९
नारायण भास्कर १६४, १६४, १६५
नारायणराव व्यंकटेश घोरपडे ७४, १०६, ३८५
नारायणराव बल्लाळ पेशवे १८९, १९३, २०४, २०९, ४६३, ४६४, ४७४, ४७८, ४७९.
नारायणराव ढमढेरे ३८८
नारायण गोसावी(तुकारामबुवाचा पुत्र)४५७
नारोशंकर राजेबहादर-७१, १५४, १७२, १८२, १८७, २०७, ४६१
नारोकृष्ण १९०, १९१
नारोपंत उर्फ नारो शिवदेव पोंक्षे (वाईकर) २०८, २१७, २२०, २३०, २३६, २४०, २४३, २४६, २४७, २५६, २५७, ३४३, ३६१.
नारोजी घोरपडे ४९५
नारो आप्पाजी तुळशीबागकर ४६४, ५०१
नारो अनंत परचुरे २१७
नारो गणेश शौचे २०८, ३८४
नारो त्रिंबक १६७
नारो चक्रदेव ५०२
नारोबा देसाई त. पंचनदी ३४
नारोराम मंत्री २२१
नासिरजंग निजाम ५९, ७५, ८२, ९२, १००, ४५९, ४७७
नारो तुकदेव ७९
निजाम ८८, १३६, १४३, १४८, २४१, ३६४, ३६९-३७१, ३७७
निजाम अलीखान (निजामुल्मुल्काचा पुत्र) १८५, १८७, १८८, २३४, २४७, २४८, २७५, २७६, ४५८-४६२, ४६७, ४७२, ५०२
निळकंठराव महादेव पुरंदरे ४६०, ५०१
निळकंठराव त्रिंबक ४२
नियामतखान न्यामतखान १२
निंबाळकर आनंदराव— जगदेव नाईक फिरंगोजी, महादजी नाईक, मालोजी नाईक, यशवंतराव, राणोजी, राव रंभा निंबाळकर, रंभाजी, वणगोजी नाईक, हणमंतराव, नूरमहमदखान २५२,२५३, २५७, २६८, ३६६, ३७१, ३७३, ३७४.
नेकनामखान १९

प

पटवर्धन—
परशराम रामचंद्र ऊ. भाऊ पहा
पांडुरंग गोविंद, कोन्हेरराव, गोपाळराव, गोविंद हरी, रामचंद्र हरी, वामनराव गोविंद, परशराम पंडित प्रतिनिधि ७, ४०३, ४५८, ४८९, ४९१,
परशराम बल्लाळ २०१
परशराम बाबा-ब्रम्हेंद्रस्वामी पहा.
परशराम रामचंद्र ३८७, ३९३, ४८२, ४८३, ५०२
पहिदखान काश्मीरी २६
परशुराम भाऊ पटवर्धन २३५, २३६, २४५, २५४, २७९, २८१, २८२, २८३, ३७२, ४०८, ४१७, ४४५, ४६६, ४६७, ४७१, ४७२, ४८३
परसोजी भोसले ४९०

पवार—
आनंदराव, खंडेराव, तुळशी, यशवंतराव
प्रतापसिंह राजे ४९४
पाटणकर-दीक्षित कायगांवकर पहा.
पॉटिंजर (कॅप्टन) ४५३
पांडुरंग गोविंद पटवर्धन २११, २१२, ४८१
पांडुरंग रघुनाथ (शिंद्याचे लष्करांत) ३०१, ३०४, ३१७, ३४३, ३६४, ३७५, ३७८, ३७९, ३८३
पानशे—
१ चिमाप्पा
२ भीमराव यशवंत उर्फ भिवराव
३ मल्हारराव जगजीवन उर्फ मलबा
४ सखारामपंत
पादशहा बिबी (आदिलशहाची मुलगी) शहरबानु पहा.
पाम नाईक महार (किल्लेदार) २५, २७
पायपुडे=मानाजी पायगुडे पहा.
पार्वतीबाई पेशवे १७१, १७८, ४८०, ४८२
पिंगळे— गोविंदराव, मोरोपंत, बहिरो मोरेश्वर
पितांबर शेणवाई २
पिराजी घोरपडे ५, ३८५
पिलाजी जाधवराव ४९१, ४९५, ४९७
पुरंदरे—
१ अबाजी त्रिंबक
२ महिपत त्रिंबक उ. बजाबा
३ त्रिंबक महीपत
४ सदाशिव मल्हार
५ त्रिंबक सदाशिव उ. नाना
६ नीळकंठराव महादेव
७ महादोबाऊ माधवराव नीळकंठ.
पुर्तकेश (पोर्तुगीज) ३७०
पुरुषोत्तम महादेव हिंगणे १७८, १९१, २५०, ३०५
पोलादखान १९
पोटसाहेब—फोर्ड पहा

फ

फत्तेखान ९, १०, ११
फत्तेसिंगराव माने ४२७
फत्तेजंग-शेख निजाम पहा.
फत्तेसिंग भोंसले ६९, ७०, ८३, २२३, ४५९
फत्तेसिंग गायकवाड २०२, २१४, २१५, २२१, २३७, २३८, २४२
फरहादखान ९
फाजलखा रोहिला ४०८
फिरंगोजी निंबाळकर १४४
फेरोजजंग-गाजीउद्दीनखान पहा
फोर्ड (कॅप्टन फोर्ड) पोटसाहेब ४५१, ४५३
फोंडसांवत (कुडाळकर) ३४,
फ्रेंच ३२३, ३२९, ३४२, ३६४, ३६९, ३७०

बजाजी माधवराव १०५
बजाबा पुरंदरे १९२
बयाजी नाईक ४५०, ४५१, ४५२
बयाबाई ४७७
बंदेगान अलीनिजाम ३९२
बहादूरखान नबाब २१, २२, २३
बहादूरशहा (औरंगजेबाचा पुत्र) ७७, ४५६
बहादूरखान रोहिला ८७
बहलोलखान २१, २२, २३
बहिरो मोरेश्वर पिंगळे ४५६, ४७५
बहिरोपंत मेहेंदळे ५०२
बहीरजी घोरपडे (उर्फ हिंदूराव) ५
बहीरजीनाईक गायकवाड २११, २१२
बळवंत गणपत मेहेंदळे १४७, १७६
बळवंतराव भवानीशंकर ३९२
बाजीराव घोरपडे १६
बाजी गोविंद बरवे २१२, २२५, ४८१, ४८२
बाजीपंत जोशी(बाजी गंगाधर?) २४०, २४५
बाजी कदम ४५७
बाजीराव रघुनाथ पेशवे ४१५, ४१६, ४२६, ४४५, ४६४, ४६७, ४७०, ४७२, ४७५, ५०३
बाजी भिमराव ४९२, ४९४, ४९७

बाजीराव थोरले ३१,४०,४४,४८,४९,५०, ५४,५७,५९,६०, ११८, १७९,४५७, ४५८,४७४,४७६,४९४, ५०३.
बापूजी बाजीराव ६६,१०४
बापूजी रघुनाथ २७९,२८०
बापू गोखले (बापूजी गणेश) ४५२,५०३
बाबा करी १५
बाबा फडके४१०,४११,४७२,४७३,५०२,
बाबा दीक्षित गोविंद दीक्षित पहा१९६,१९७
बाबूराव मल्हार ५५
बापूजी भीमराव ६३,६४,१००
बाबूजीनाईक बारामतीकर६५,७३,७४,७५, ८०,८१,१०२,११५,११६,१८८, ४९४
बाबूराव कान्हेर १४७
बाबूराव रामरामी १६९
बाबूराव कृष्ण २१७
बाबूराव फडणीस ४६०,४७७,४९३
बाबूराव दाभाडे ४९६
बाळकृष्ण दीक्षित ११९, १२३, १८४,
बाळाजी गोविंद खेर १७०, १८२, १९०, १९४,१९५,१९६
बाळाजी कृष्ण १८९
बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे ३१,४५,५५, ५७-८०,८३-९१,९३, ९५-९८, १०४, १०७-१०९, ११२, ११३, ११५,११७,१२१,१२२, १२४, १२५,१२७-१२९,१३१, १४०,१४१, १४३-१४५,१४८,१५२,१५३,१५४, १५८,१६१,१६३,१६५-१७१,१७८, १७९,२१८,२२३,२२४, २३५,४५९, ४७३,४७४,४७६-४७७,४७८,४८३, ४९७, ५०१
बाळाजी विठ्ठल २०१,२११,२१२
बाळाराव शिंदे २०८,२३५,
बाळाजी देसाई (पंचनदी) ३४
बाळाजी विश्वनाथ पेशवे ४५६,४५७,४७४, ४७५,४७६,४८९,४९३,४९४,४९५, ४९८,५००
बाळोजी कुंजीर ३९७, ३९८, ३९९, ४०१ ५०३,
बिरबल ११
बीबी बडेसाहेब (अदिलशाही) ८,१६
बंगस (अहंमदखान पहा)
ब्रह्मेंद्रस्वामी ४७,४९,५०, ५३, ५५, ५९, ६१,६३

भ

भगवंत रामचंद्र अमात्य ४२
भगवानसिंग मांडवीकर २१५
भगीरथराव शिंदे २४४,२४६
भद्राप्पा नाईक राजे १८
भवानराव प्रतिनिधि १८९,१९०,२०३, २०५,४०८,४७९
भाई-राणेखान भाई पहा
भानजी प्रभू देसाई-(कुर्टे, सिंधुदुर्ग) ३५
भीमराव यशवंत पानशे २०४,२१३,२१४, ४०७
भोसले (नागपूरकर) २४१,२४३,२४८ २४९,२७२,२७४,२७५, २७६,३६९, ४०७,४६२,४७६,४७८, ४७९,४८३, ४९४,५०२
भोसले—सातारकर-वंशावळ ४७५
तंजावरकर वंशावळ ४८३

म.

मल्हारराव जगजीवन पानशे १९१,२०३
मल्हारराव होळकर (पहिला) ६७-६९, ७६,८२,८३, ८६-८८,९०, ९३-९६, १००,१०६,१०७,१०९-९११,११९, १२८,१७८,१८२,१८६, ४४७,४४८, ४५०,४९२,४९५
मल्हारराव होळकर (दुसरा)४७४, ४४८, ४५०,५०२
मल्हार नाईक रास्ते १४७
मल्हारपंत २४१
मल्हार बल्लाळ भडभडे २१७
मलिकंबर १०
मलिक रेहान (सिद्दी रेहान पहा)
मनरो-(जनरल) ४७०

मन्याबापू भोसले ४०८
मनसूर अलीखान(वजीर)सफदरजंग पहा७७, ८९.१२४,१३७, १५३, १५५,१५७.
महंमद (अदिलशहा) ८,१३,१४,१६,१७,
महंमद अमान ९,२२
महंमद याकूबखान १३
महंमद आजम २३-२८
महंमद अकबर (औरंगेजबाचा पुत्र) २७
महंमद बेदर बख्तखान २८
महंमद मनरुद्दीन[उर्फ जहांदर बादशाहा]२८
महंमद आजिमुद्दीन २८
महंमद फिरुकसेर २८
महंमद अब्बास ३६
महंमदअलीखान (अर्काटचा नबाब)१०३, २००, २५२, २५७, ३६८, ३७१, ३७३, ३७५
महंमद इसफ गारदी १९५, २०८
महादजी नाईक निंबाळकर ८६
महादोबा पुरंदरे ८२,१०७,१२६,१४८, ४७७,५०१
महादाजी केशव १६६,४९७
महादजी बल्लाळ करकरे (उर्फ गुरुजी)१७८ २०९
महादजी बल्लाळ फडके १८७
महादजी कृष्ण जोशी ४९४
महादजी शिंदे (उर्फ पाटील बावा) १३७, १८५,१९६,२११,२१७, २१८,२२०, २२४,२२९-२३४,२३९,२४०,२४३, २४५, २४६, २४७, २५०, ते ३४३, ३६१-४६१,४६६-४७२.४८३
महादजी प्रभु २१३
महीपत त्रिंबक उर्फ बजाबा पुरंदरे १६७, १६८, १८३,१८४,१९२,बजाबा पहा
मशीर उल्मुल्क (निजामाचा दिवाण) ३८६, ४०३, ४०४,: ४०६, ४१२, ४१३, ४६७, ४७२, ४७३, ५०२, ५०३
माधवराव गोविंद कानडे ४८२
माधवराव तुकदेव २९२
माधवराव नीलकंठ पुरंदरे ४६५, ५०२
माधवराव रामचंद्र १८८
मादण्णा ११
मानाजी पायगुडे ८१, ८३, ८४
मानाजी आंग्रे ४६, ४७, ५५, ६०, ११३, १५२, १६०, ४९७
मानाजी जाधव ५५
मानसिंग (उर्फ बाबजी जाधव) ८६
मानसिंग जयनगरवाले १३४, १३६, १३७,
मानाजी शिंदे फाकडे १८६, २४५,२९२
मालीट ३९६, ४०४
मालोजी घोरपडे ५१०,१११,३८४,३८५
मालोजी नाईक निंबाळकर २०४
मालोजी भोसले १२
मालोबा देसाई पंचनदीकर ३४
मीर्झा यूसफ बेगखान १९, २०
मीर्झा बकर २१
मीरखां ७१
मीर्झा महंमद (मुस्तफाखान पहा)
मीर अलम ४०३
मीर पोलादअली निजामाचा पुत्र ४०३
मिथ्या अच्छन १६५
मीर अली रझाकखां २२४
मुकरबखान १४
मुरारपंत (मुरार जगदेव) १०-१५
मुर्तजा पादशाहा १३
मुल्ला महंमद १७, १९
मुसलखान १८
मुजफ्फरखान १९, २०, १६६
मुरारराव घोरपडे (उर्फ हिंदुराव) ८८, १२६ १९५, १९६, २०४, ३८५
मुधोजी भोसले १५०, २६२, ३२४
मुरारराव सावनूरकर १८७
मुत्तुरामलिंग सेतुपति ४१६
मुसा मुंतीण (फ्रेंच) ३६५, ३६६ ३७१
मुसाभुसी (फ्रेंच सरदार) ३६५
मुसा वर्णत (फ्रेंच सरदार) ३६५
मुस्तफाखान ८, ९, १२-१६
मोहबतखान १०-१३

मोरोपंत पिंगळे ४९१, ४९२
मोर दीक्षित ५०३
मोरोबादादा फडणीस ४६४, ५०१, ५०३

य

यतिबारखान ८
यतियादखान ९
यशवंतराव १६
यतिकादखान उर्फ झुल्फुकारखान २६
यशवंतराव गोपाळ ४१
यशवंतराव पवार७७,८१,१३१,१८२,४९७
यशवतंराव दाभाडे ११७, ४९६
यशवंतराव निंबाळकर १६२, १६३
यशवंतराव शिंदे २०१,२११, २२४, २२७, २४५
यशवंतराव होळकर ४२७,४४५,४७३,५०३
यमाजी शिवदेव ८०
येसूबाई नागण प्रभू कुडाळकर २९
येसूबाई शाहूची आई ३१
येसाजी भोसले ७४
येसाजी कुसाजी शिंदे(यशवंतराव शिंदे पहा)
येहेतीशाम जंग धौशाचा मुलगा ३६४, ४०८
यशोदाबाई ४१४, ४६७

र

रघुनाथ बाजीराव ऊ. राघोबादादा ९८, १००, १०५, ११२, ११५, ११६,११८,१२०,१२३,१३२, १४५, १५१,१५३,१५४,१६१,१६२,१७९–१८१,१८४–१८६,१९०,१९१,१९३, २०१,२०४,२०५,२०८, २३९,२४०, २४१२४२,२९५, ३२७,३३१, ३३२, ३६४,३६६–३६९,३७१,३७२,३७८, ३८१,३८२,४१५४५८, ४५९, ४६१, ४६५,४७१,४७४,४७७,४८०, ४८२, ४९६,५०१
रघूजी भोसले ६९, ७०, ७३, ७६, ७८, ८०,८३, १०१, १०४, ११८
रघुनाथराव रामचंद्र २४९
रघुनाथ हरी १७१
रघुनाथ नारयण राजेबहादर २१४
रफीउल् दराजत २८
रणमस्त खान ६
रणदुल्ला खान ९, ११,१३, १४
रमाबाई पेशवे ४६३, ४७१, ४७२, ४८०
रसेल ४५१, ४५२
राघो गोविंद ६३, ६४, ७७
राघोपंत गुरुजी २८२, २९६, २७९, ३६४,३८२
राघोपंत १३, १४
राघो बल्लाळ देसाई पंचनदीकर, ३४
राघो विठ्ठल २०१,२२५
राजसबाई ३१
राजाराम छत्रपति (कोल्हापूरकर) ४३९
राजाजी–रामदासपंत पहा
राजा नेमीवंत–निजामाचा सरदार ४०८
राजाराम छत्रपती ५, ३०, ३१, ३७,४५६, ४६५
राजे राम मोगलांचा सरदार १०
राणेखान उर्फ भाई २७८, २९१, ३७६
राधाबाई पेशवे १७९, ४७९
राणोजी घोरपडे ५, ४२
राणोजी चव्हाण ३०
राणोजी निंबाळकर २०४
राणोजी शिंदे ५१, ६६, ४९२, ४९९
रामराजे (छत्रपती) ८६, ४६१, ४०५
रामराजे (तंजावरकर) ४८५
रामजी बाबाजी २९
रामशास्त्री प्रभुणे ४७१
रामसिंग बंडा ४५६
रामचंद्र बाबा शेणवी ६६, ६८, ७१, ७५, ७८, ८०–८२, ५०१
रामदास पंत उर्फ राजा रघुनाथ ९२–९४, ९८, १००–१०५, १०८,
रामदासस्वामी ४५५
रामजी पाटील ३२०,३३४,३३६,३४९, ३७२,३६४,३७५,३८१,३८२,३७३
रामचंद्र पंडित अमात्य ५,६,३४,३७
रामसिंग जोधपूरकर १२४,१३०,१३३, १३६,१३८

रामचंद्र गणेश कानडे १३३,१८८,१८९, १९४,१९८,४६२,४७९,४८१,४८२
रामाजी केशव ६२
रामाजी विश्वनाथ बर्वे १६८
रामाजी महादेव ११४,१६७
रामाजी अनंत दाभोळकर ९६,११६,११७, १२४,१२५,१२८,१३१, १४०-१४२, १४४,१४९,१५३,१५४,१६१, ४५३, ४५४
रामचंद्र जाधवराव ९५,१११,४६०,४६१,
रामराव आप्पाजी दाभोळकर ९६,४५३
रामचंद्र भगवंत २०९,२१०
रामचंद्र मल्हार फडणीस ४५३
रामचंद्र दीक्षित २४,२७
रामचंद्र हरी पटवर्धन ४९७
रायाजी भोसले १११
रावजी आप्पाजी गायकवाडी दिवाण २०३
रावजी गोविंद ४४७,४४८,४५०
रावरंभा निंबाळकर ३८६,४१०
रुस्तुमखान (दिलेरखान पहा.)
रुकनुदौला ४६२
रंभाजी निंबाळकर ४५६,४५७

ल

लखम सावंत २
लक्ष्मण शंकर ५८,५९
लक्ष्मीनारायण दीक्षित-कायगांवकर ४२७
लक्ष्मण केशव वैद्य ४५३
लक्ष्मणराव रास्ते ४७१
लाजसिंग राजे मोगलांचा सरदार १०
लालखान वजीरखान ४०८
लुकजी जाधवराव ४८३

व

वंशावळी-पेशवे ४८०,४८९
,, बावडेकर ५०३
वजीर-सफदरजंग पहा
मनसूर अल्लीखान पहा.
वणगोजी नाईक (निंबाळकर) २०४
वलंदेज (डच) ३७०
बालाजहा (महंमद आजमचा पुत्र) २८
वासुदेव दीक्षित कायगांवकर ५८,५९,६१, ७९,८३,८५,९१,९३,९६,९७,९८, १०७, १०८,१०९, ११५, ११६,:११८, ११९, १२३,१२५,१२७,१२९,१४५,१५३
वासुदेव जोशी ५५
वामनराव गोविंद पटवर्धन २०४,२०५
विठोजी चव्हाण-हिम्मत बहादर ५,३०,३१
विठ्ठल शिवदेव ५५,१४५,१५२,१५४, १८२,१९८
विठ्ठल सुंदर राजेबहादर १०५, ४६१

विष्णु महादेव गद्रे १४५,१९८,२०८,२०९, ४०६
विश्वासराव पेशवे १४८,१७६,४५८,४६०, ४७७,४७८
विसाजी कृष्ण (बिनीवाले) १६८,१९८, २१३,२३९,२४१,४६२,४६३,४७९, ४८०,४९४
विश्वासराव लक्ष्मण-नारोशंकरचा पुतण्या १८०,१८१,१८२
विश्वासराव झांशीकर १९६
विनायकराव रघुनाथ पेशवे ४८७
विसाजीपंत आठवले २४४,२४५,२५४
विसाजी आप्पाजी २९८
विनायक विठ्ठल ३८१
विनायक अमृतराव पेशवे ४४५,४७३
वेलस्ली (जनरल) ४२७
व्यंकटराव ६६
व्यंकटराव मोरेश्वर ८०
व्यंकटराव राम दाभोळकर ९६
व्यंकटराव घोरपडे ४९४
व्यंकोजीराजे तंजावरकर ४८३,४८४

श

शंकराजी नारायण पंत-सचिव ४८९,४९१
शंकराजी केशव फडके ४९७
शंभु छत्रपति (करवीरकर) ५,२९,३१, ३४,३९,४१,४३,४४,४८,२१८,२२०, २२१-२२३,३९४,४५८-४६०,४७८, ४८३

शंभुसिंग चव्हाण ४५
शंभुसिंग जाधवराव २२२
शमसुद्दीन हकीम १९,२१,२३
शहाजी भोसले ८,११-१७,४८३
शहाजहान बादशहा ९,१०,१२,१३
शहाजादा दाराशिको १३
शहा नवाजखान १२७,१२९
शहा आलम- (उर्फ बहादरशहा) २४,२८
शहाजी दुसरा (तंजावरकर) ४८४
शामराव २१,२२
शाईस्तेखान ४५५
शाहूमहाराज छत्रपती थोरले ३१,३९,४०, ४२-४४, ६३, ७१, ७३, ८०-८२, २१८,२२१,२२२,२२३,४५५,४५९, ४६०,४७५,४७७, ४८६,४९३, ५००
(दुसरे) शाहूराजे सातारकर ४६५,४७५
(तिसरे) शाहूराजे ऊ० प्रतापसिंह ४७५
शिकंदर अली १०
शिकंदर सुलतान (अदीलशाही) २०, २१, २३-२५,२७
शिवराम गोविंद भिडे (सावकार) ८५
शिवाजी शंकर ४१
शिवाजी विठ्ठल १९६,२५०,२६२,२९०, ३२४,३७५
शिवाजीराजे तंजावरकर ४८५
शिवाजीमहाराज थोरले छत्रपती ७,१७, १९-२१, २३, ४५५. ४७५,४८४
शिव छत्रपती दुसरे १८३,२०९ २१७
ताराबाईचा पुत्र उ० वेडा शिवाजी३१,४५७
शिवाजी करवीरकर दुसरा (संभाजी चा पुत्र) २०१, २१२, २२५, ३८७, ४७८
शिवराम नारायण थत्ते ४७३
शेषो नारायण २०९,२१०,२२७.
शेखजी ४५
शेख निजाम-मुकरबखान ६,२६
शेख महमुद्दीन ९,१०,१३
शेख मोईनुद्दीन १०
शेख मुजहान २२
शेख मखदुम २३
शेख मिरा वाईकर २६,४९१
शेख सल्ला ४०७
सेख हुसेन २४
श्रीनिवासराव ११,१२,१२६
श्रीपतराव प्रतिनिधि ३१,७३,२२१,२२३, ५००

स.

सकवार बाई शाहूची बायको ६९,७३

सखाराम भगवंत बोकील १२६,१९९,२११, ४६०,४६३, ४६४,४८०,४७१,५०१
सखाराम बापूजी नाईक भिडे ८५
सखारामबापू सखाराम भगवंत पहा
सखाराम हरी प्रभु २०३
सखारामपंत पानसे २४०,२४५
सखाराम घाटगे ४६८
सखोजी नाईक जगताप ३७
सगुणाबाई घोरपडे ४२
सगुणाबाई (शाहूची बायको) ७३,४८२
सर्जेखान २४
सर्जाखान ६,२४
सर्जेराव घाडगे ९,१३,४८५
सटवाजी भोसले २४५
सटवोजी जाधव १६६
सदाशिव चिमणाजी ३१,६२,६५,६६,६९, ७४-८३,८५,११०,१२२,१३६,१३९, १६०,१६६,१६८, १६९,१७४,२१८, २२३, ३९५,४५८,४५९,४६१,४७६, ४७८,४८२,४९८
सदाशिव रामचंद्र ५०१,५०२
सदाशिव दिनकर २२९,२३४,२३५,२३७, २४०-२४६,२४८,२४९,२५१,२५२, २५४,२५७
सदाशिव मल्हार पुरंदरे २००,२७८
सदाशिव माणकेश्वर ४४७,४५३,५०३,
संताजी घोरपडे५,६, १३,८५, ४५६,३०, ४८९ संताजी भोसले ४९०
सफदरजंग ७८,८७,१०४
संभाजी छत्रपती करवीरकर ४५८,४५९

संभाजी राजे (शिवाजीचा पुत्र) २३,२४, २६,३०,३६,४५५,४५६,४७५,४८३,
संभाजी भोसले शहाजीचा वडील पुत्र १७,२१
सभासिंग बुन्देले ६७
संभाजी आंग्रे ४६,५५,५६
समशेर बहादुर १३१,१४५,४९९
सयाजी गायकवाड २०७
सरफराज (जयसिंगाकडील सरदार) १९
सरफोजीराजे (तंजावरकर) ४८४
सरफोजीराजे दुसरा तंजावरकर ४८४
सय्यद इलपास उर्फ सर्जेखान १८
सय्यद उस्मान १४
सय्यदखान २१,२४
सय्यद बंधु ४५७
सय्यदमखदुम २४
सय्यद रणदुल्लाखान काजी ९,११
सय्यद लष्करखान ९२, ९३, १०२, १०५, १०६,१०८,१०९१२५,१२७,१२८
सय्यद शरीफखा ८०
सलाबतजंग निजाम ९०, ९१, ९२, ९४, ९५, १०६, १०७, १०८, १०९, ११५, ११८, १२९, १४८, ४५९
सलाबतखान (औरंगजेचा सरदार) १९, २२
सवाई माधवराव २०१, २१४, २१६, २१७, २१८, ३४३, ३६३, ३६६, ३८८, ४०९, ४१४, ४६१, ४६३-४६७, ४७०-४७२,४७४,४८०,४८१,४८३, ५०२
सांडीफोर्ड (उलियम टॉमस सॅन्डफोर्ड) ३९७-४०१
सादलखान पठाण ८९
सादतखान १०५
साबाजी क्षिंदे ८८
साबाजी भोसले २०४, २०५, ४८०
सिआदतखान ८
सिद्दी अंबर १२, १३, ४५
सिद्दी अबदुल अजीज १८
सिद्दी जवाहर उर्फ सलाबतखान १७
सिद्दी पोलाद १२
सिद्दी मसाऊद १८,२२,२३,२५,
सिद्दी याकूत हवालदार (तोरमळकर) १८
सिद्दी रेहान ११-१६
सिद्दी समुल (संबल) ४५
सिद्दी सायासईफखान १२,१३
सुजाउदौला- १५५,१५६,१६१ १६२, १९५,
सुभानराव ४४,
सुमेरसिंग गार्दी १६९, ४६४
सुर्याराव १५
सोमाजी ५३
सोमशेखर नाईक (हरपनहली) १४८

ह

हणमंतराव जाधव २०४
हणमंतराव निंबाळकर ११२,१४४,१४७
हमीदखान ९
हरी गोपाळ १६८
हरी बल्लाळ १८७,१८९, २०८,२३०,२३८, २४५,२४६२४७, २५२,२७३, २७६, २८२, ३७८, ३८९, ३९२,४ ६४, ४८०-४८३,५०१,५०२
हरीराम १८
हरी सांवत ३४
हाफीज अबदुल २४
हाफीझ नसरुल्ला १२
हारिदास कृपाराम-[काशीचे सावकार] १२४
हिन्दुराव घोरपडे ४२
हिदायत मोहिदीनखान ८२,९३,९४१००
हिंदुपत बुंदेले १४८,१४९,१७०
हुसेनखान १४
हेस्टिंटज २९७,३०१,३६३,३८०,४७१ ४७२ [हेष्टिन]
हैदरअली १८५,२००,२११, २१७, २१८, २२०,२२१,२२४,२३०,२३१, २३४, २३९,२४३,२४६,२५३-२५७,३४३, ३६१,३६४,३६६, ३६८,३७१,३७८, ४६१,४६२,४६६,४८०,४८१.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १ ते २२ मधील
कै० इतिहासाचार्य रा. वि. का. राजवाडे
यांच्या संपूर्ण

ऐतिहासिक प्रस्तावना.

पृष्ठसंख्या ५०० चे वर किंमत ३ रु.

राजवाडे यांचें भाषाप्रभुत्व व विचारसामर्थ्य एवढें गंभीर, तेजस्वी आणि शास्त्रीय असून प्रसंगविशेषीं इतकें बालबोध आहे कीं, त्यांचे लेख वाचतांना गोष्टीतील सोपेपणा, तत्त्वज्ञानांतील गूढता आणि काव्यामधील स्फूर्ति, ध्वनिवाद व मनोहारित्व हीं एकत्र अनुभवास येतात. मराठींतील असा क्वचितच वाचक असेल कीं ज्यानें राजवाडे यांचा एकादाहि लेख वाचला नाहीं. 'यामुळें इतिहासाचार्य राजवाडे यांचे हे लेख होत,' एवढें म्हटलें म्हणजे ह्या प्रस्तावनांसंबंधानें वेगळें व विशेष सांगण्याचें कारण नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाविषयीं अधिकारयुक्त लेखन असें राजवाड्यांचेंच होय. सामान्यतः पुढीलप्रमाणें ह्या प्रस्तावनाभागांत विषयविवेचन आलेलें आहे. आर्यांच्या व पाश्चात्यांच्या इतिहासव्याख्येची तुलना, इतिहासाची स्थलकाल-व्याप्ति, भाषा व इतिहास यांतील परस्पर संबंध, इतिहासाचे भौतिक व आत्मिक भाग, मराठ्यांच्या इतिहासाची स्थिति, मराठ्यांच्या मोहिमांची धोरणमीमांसा, महाराष्ट्रधर्मविवेचन, वारकरी पंथ व इतर पंथ, श्रीशिवाजीचीं थोरवी, शिवाजीच्या बखरींचें विस्तृत व प्रसंगशः परीक्षण, ग्रँटडफच्या इतिहासांतील चुका, पानपतप्रकरणाची साद्यंत व कारणात्मक चिकित्सा, ब्रह्मेंद्रस्वामी,पेशवे, छत्रपति, आंग्रे, शिर्दी, चंद्रराव मोरे,समर्थ व बुंदेले इ इ. व्यक्तींचें कार्य, मराठे व अबदली,तत्त्वज्ञान व व्यवहार,मराठी भाषेची श.१२१२ते१८१८ तील चढउतार, फारशी भाषेच्या संसर्गानें झालेलें स्थित्यंतर, भाषेची वाढ केव्हां होते, समाजभ्रष्टता म्हणजे काय, मुसलमान व हिंदुसंस्कृतीवैशिष्ट्य, स्वराज्याचीं अंगें,इतिहाससाधनांची प्रामाण्याप्रामाण्यता, कालनिर्णय इ. इ. अनेक महत्त्वाच्या विषयांचें विवेचन साधार व परिणामकारक भाषेनें ह्या प्रस्तावनांतून आलेलें आहे. पुस्तकास शेवटीं विस्तृत सूची दिली असल्यामुळें वरील कोणत्याहि विषयावरील राजवाड्यांचें मत नेमकें व चटकन् काढून पाहण्याची मोठी सोय झाली आहे. किं. रु. ३ ट. ह. ०६ सर्वांस घेण्यास सुलभ पडावें म्हणून किंमत अत्यंत कमी ठेविली आहे.

महिकावतीची ऊर्फ

माहिमची बखर.

शके १३७० पासून १६०० पर्यंतच्या माहिम बेटांतील राजकीय, सामाजिक व धार्मिक उलाढालींची हकीकत यांत आली आहे. ह्या ग्रंथास प्रसिद्ध इतिहास-संशोधक कै० विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं विवेचनात्मक व मार्मिक प्रस्तावना जोडली आहे. पृष्ठसंख्या ५५५. कागद ग्लेझ, बाइंडिंग जाड पुठ्ठ्याचें, कापडी मजबूत किंमत रु. २।८ ट. ख. ४३.

शिवचरित्रसाहित्य खंड ३ रा.

(विक्रीस तयार)

किंमत ३ रुपये. **पृष्ठें २८०**

भा. इ. मंडळाच्या सभासदास २॥ रु. संपादकः-शं. ना. जोशी, व ग. ह. खरे.

[भा. इ. सं. मंडळ पुरस्कृत ग्रं. क्र. २४]

शिवकालीन मराठ्यांचा इतिहास अस्सल मराठी पत्रांच्या आधारें लिहिला पाहिजे, या इतिहासाचार्य राजवाडे यांच्या सिद्धांतानुसार विश्वासनीय व निवडक कागदपत्र प्रसिद्ध करण्याचें काम पुणें येथील शिवचरित्रकार्यालयाच्या खटपटीनें व या खंडांतील २७७ नवीन पत्रानें होणार आहे. पुरंदर किल्ला घेतल्याची हकीकत, जयसिंगप्रकरण, मोरया गोसावी व रणदुल्लाचे उल्लेख वगैरे साक्षात् शिवाजी-चरित्राच्या माहितींत भर घालणारे प्रसंग यांत २५।३० आले असून सोंधेकर, जेधे, मोरे, बेलसरे, शिवरे, आणि इंदापूर, आकोले, बावडे, नागोठणें, चांबळी वगैरे ठिकाणचे वतनदार, यांच्या कागदांतून शिवाजीकालीन लोकांची स्थिति व विचार समजण्यास उपयोगी असे निवडक कागद यांत ३३ घराण्यांतून १०।१२ संशोधकांच्या कित्येक वर्षांच्या खटपटीनें प्रकाशित झाले आहेत. मराठ्यांच्या इतिहासाची अभिरुचि असणाऱ्या सर्व वाचकांनीं व संस्थांनीं या ग्रंथाचा संग्रह करणें अवश्य आहे.

राधामाधवविलासचंपू.

शहाजीमहाराजांच्या पदरीं असलेल्या जयराम कविकृत बारा भाषेंत बाळ-बोधांत लिहिलेला श्रीशहाजीमहाराज हा अपूर्व चरित्रात्मक चंपूग्रंथ इतिहास-संशोधक कै० वि० का० राजवाडे, यांच्या प्रस्तावनेसह आम्हीं छापला आहे. पृष्ठें डेमी अष्टपत्री तीनशें. मराठ्यांच्या इतिहासांतील शेकडों बाबींवर यानें प्रकाश पडत आहे. किंमत ३ रु. ट. ख. ४४.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

[खंड ४]

(वि० का० राजवाडेकृत)

सदर ग्रंथास १३३ पानांची प्रस्तावना प्रसि . इतिहाससंशोधक कै० विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, यांनीं लिहिली आहे. य ग्रंथांत (१) नारायणव्यवहाराशिक्षा (२) सवाई माधवराव आठ वर्षांचे अ ांना त्यांच्याकरतां तयार केलेली पेशव्यांची बखर (३) पेशवाईच्या अ ची अखबार (४) रमास्वयंवर (५) शके १७३८ सालची हकीकत (६) पेशव्यांची वंशावळ.रा. रा. राजवाडे यांचे प्रस्तावनेंत त्या वेळच्या स्थितीचें सविस्तर वर्णन असून जागोजाग माहितीहि अगदीं नवीन दिली आहे. पृष्ठसंख्या डेमी १२ पेजी ३१७, कागद ग्लेझ, बाइंडिंग कापडी जाड पुठ्ठ्याचें आहे. किंमत १४. ट० ह० ४२४६.

* श्रीरंगपट्टणवर मोहीम

अथवा

सव्वाशें वर्षांपूर्वीचा दक्षिण हिंदुस्थान.

ले०—द० वि० आपटे.

फक्त सव्वाशें वर्षांपूर्वी महाराष्ट्रांतील मुत्सद्दी व लढवय्ये कोणत्या धोरणानें आपलें राजकारण चालवीत, इंग्रज, निजाम आणि टिपू यांना ते कसे बिनतोड शह देत, यांचें सविस्तर वर्णन या पुस्तकांत भरपूर ऐतिहासिक पुराव्यानिशीं केलेलें आहे. आणि अनेक ऐतिहासिक चित्रें व नकाशे ठिकठिकाणीं दिले आहेत. किंमत १॥ रुपया. ट० ह० ४२४६.

* इतिहासमंजरी

अथवा

ऐतिहासिक पत्रें, उतारे, चर्चा.

लेखक—द० वि० आपटे.

महाराष्ट्राच्या इतिहासांतील प्राचीन काळापासून पानिपतपर्यंतच्या विविध प्रसंगांची माहिती यांत अस्सल पत्रांच्या व गद्यपद्यात्मक अनेक उताऱ्यांच्या सहाय्यानें दिलेली असून ती लहानापासून थोरापर्यंत सर्वांना मनोरंजक वाटण्याजोगी आहे. शिवाय अनेक चित्रें व नकाशे दिले असून भरपूर टीपा जोडल्या आहेत. पृष्ठसंख्या ३१६ किं. रु. २ ट. ह. ४२४६.

---

* फुल्या केलेलीं पुस्तकें प्राथमिक शाळांकरतां सरकारनें मंजूर केलीं आहेत.